शिरोमणीच्या दीधितीवर एक उत्कृष्ट टीका लिहिली. त्यामुळें याची कीर्ति होऊन याच्या वेळचा सर्वांत मोठा तर्कज्ञ म्हणून यास लोक मान देऊं लागले. याच्याच काळीं हिंदी तर्कज्ञान अत्युच्च शिखरास पोंचलें. यानें तर्कज्ञानावरील बऱ्याच ग्रंथांवर टीका लिहिल्या आहेत. त्या 'गदाधरी' या नांवानें प्रसिद्ध आहेत.

याच्या 'व्युत्पत्तिवाद' या ग्रंथाच्या हस्तलिखितावर स. १६२५ हें साल आहे तेव्हां हा त्यापूर्वी होऊन गेला असला पाहिजे. याच्या शक्तिवादावर जयरामाच्या एका शिष्यानें टीका लिहिली आहे.

यानें खालील ग्रंथ लिहिले आहेत. (१) तत्त्वचिंतामणिदीधितिप्रकाश. (२) तत्त्वचिंतामणिव्याख्या. (३) तत्त्वचिंतामण्यालोकटीका. (४) मुक्तावलीटीका. (५) रत्नकोशवादरहस्य. (६) अनुमानचिंतामणिदीधितिटीका. (७) आख्यातवाद. (८) कारकवाद. (९) नयवाद. (१०) प्रमाण्यवाददीधितिटीका. (११) बुद्धिवाद. (१२) मुक्तिवाद. (१३) विधिवाद. (१४) विशयन्तावाद. (१५) व्युत्पत्तिवाद. (१६) शक्तिवाद. (१७) स्मृतिसंस्कारवाद. (१८) शब्दप्रामाण्यवादरहस्य (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक पा. ४८१).

२. (स. १७०० सुमार) हा 'रसिकजीवन' या ग्रंथाचा कर्ता होय. यानें आपल्या ग्रंथांत पुष्कळ ग्रंथकारांचा आणि ग्रंथांचा उल्लेख केला आहे. त्यांमध्यें जगन्नाथरायाच्या 'रसगंगाधर' या ग्रंथाचा उल्लेख असून त्यांतील कांहीं उतारेहि यानें घेतले आहेत. त्यावरून यानें 'रसिकजीवन' हा ग्रंथ जगन्नाथरायाच्या 'रसगंगाधर' या ग्रंथानंतर लिहिला असला पाहिजे. 'रसगंगाधरा'चा काल स. १६५० असा ठरविलेला आहे. तेव्हां यानें आपला 'रसिकजीवन' हा ग्रंथ स. १६५० नंतर किंवा स. १७ व्या शतकाच्या मध्यास लिहिला पाहिजे.

३. हिन्दी कवि. या दक्षिणी ब्राह्मणानें चैतन्य महाप्रभूंना भागवत सांगितलें. हा संस्कृत पंडित असल्यानें संस्कृतगर्भित हिंदी भाषेंत तुळशीदासारखी ग्रंथरचना यानें केली आहे.

गन्नमरस गन्नम नायडू—(स. १२६८) हा रुद्राम्बा काकतीय राणीचा सेनापति.

गमाजी यमाजी मुतालिक—(मृ. स. १७६४) याचें नांव सदाशिव यमाजी. पण व्यवहारांत हे गमाजीबाबा मुतालिक या नांवानें प्रसिद्ध होते. गमाजी यमाजी हा यमाजी शिवदेवाचा मुलगा. हा शुक्ल-यजुर्वेदी ब्राह्मण असून माधवरावाचे पक्षाचा होता. हा प्रतिनिधीचा मुतालिक होता. निजामचा दिवाण विठ्ठल सुंदर व गमाजी हे व्याही होते.

स. १७६३–७२ या कालांत पेशव्यांचा प्रतिनिधीशीं बेबनाव झाला. स. १७५४ त जगजीवन परशुराम ऊर्फ दादोबा प्रतिनिधी वारल्यावर भवानराव ऊर्फ श्रीनिवास गंगाधर त्या पदावर दाखल झाले. साताऱ्यास जाऊन पेशवाईचीं अगर अन्य वस्त्रें द्यावयाचीं तीं प्रतिनिधींचे हातून द्यावयाचीं असा परिपाठ होता. अर्थात् वस्त्रें घेण्यासाठीं छत्रपती व प्रतिनिधी या दोन व्यक्तींना आपल्या लगामीं ठेवणें पेशव्यास भाग होतें. भवानरावास पेशव्यांनीं पुण्यास राहण्यास बोलविलें. तें त्यांनीं कबूल न केल्यामुळें दादास राग येऊन त्यानें याचें प्रतिनिधिपद काढून आपला अल्पवयी मुलगा भास्कररावा यास दिलें, व तो वारल्यावर नारो शंकरास दिलें. भवानरावास या वेळेस हा जाऊन भेटला. गोपाळराव पटवर्धन निजामाला आधींच मिळाले होते; व तेथें त्यांचा सत्कारहि चांगल्या तऱ्हेनें झाला होता. हा व प्रतिनिधिहि त्यांत सामील झाले.

या कारस्थानाचें निरसन पेशव्यांनीं करून रूसून गेलेल्या मंडळींस परत आणून निजामास राक्षसभुवन येथें चोपलें. भवानराव व त्यांचा हा मुतालिक हे परत पेशव्याकडे आले. पुढें भवानरावास पेशव्यांनीं प्रतिनिधिपद देण्याचें ठरविल्यावर त्यानें मिटतें घेतलें. परंतु गमाजीनें मात्र दंगाच चालवला. तेव्हां पेशव्यांनीं गमाजीवर फौज पाठवून याचा पराभव केला.

गमाजी विठ्ठल सुंदराशीं संधान करून पेशव्याशीं लढण्यास आला असतां राक्षसभुवनचे लढाईत मारला गेला. गमाजी स्वभावानें क्रूर असल्यामुळें 'यमाजीस (काळास) न भ्यालें तरी गमाजीस भ्यालें पाहिजे' अशी म्हण त्या वेळीं मराठी भाषेंत प्रचारांत आली होती.

गयकर्णदेव कलचुरी--(स. ११२४-५२) हा त्रिपुरीच्या कलचुरी घराण्यांतील यशकर्णदेवाचा पुत्र. यानें मेवाडचा राणा विजयसिंह याची मुलगी आल्हणदेवी आपली राणी केली होती. तिचाच मेडाघाट येथील शिलालेख आहे. तिचा मुलगा नरसिंहदेव.

गयदास—सुश्रुत-टीकाकार डल्हन यानें निर्देश केलेला वैद्यकावरील ग्रंथकार.

गयाधर—हा अनेक सिद्धांपैकीं एक. जात कायस्थ. ग्रंथ ज्ञानोदयोदेश (तें. १३।६५). ग्रंथाची भाषा हिन्दी.

गर्ग—यानें 'शकुनावती' या नांवाचा एक ग्रंथ संस्कृतांत रचिला होता. ग्रंथाचे एकंदर १७८ श्लोक आहेत. तो

कान्हूर येथें सांपडला (मं. वा. इ. श. १८३७ ले. १२२).

२. मंखाच्या ग्रंथपरीक्षणार्थ नेमलेला एक.

गर्दभिल्ल--उज्जयनीच्या सुप्रसिद्ध विक्रमादित्याच्या हा बाप.

यानें जैन साधु कालिकाचार्य याचा अपमान केला. तेव्हां, कालिकाचार्य, याचा सूड उगविण्याकरितां, शक राजाकडे मदतीसाठीं गेला. त्या वेळीं 'राजांचा राजा' ही पदवी धारण करणारा शक राजा (साहानुसाहि) राज्य करीत होता. कालिकानें शक लोकांचीं मनें वळवून त्यांची मदत घेऊन उज्जयनीच्या गर्दभिल्ल राजावर स्वाऱ्या केल्या व उज्जयनीचें घराणें संपुष्टांत आणण्याचा घाट घातला. पण पुढें याचा मुलगा प्रख्यात विक्रमादित्य यानें गतवैभव परत मिळवून उज्जयनी येथें आपली सत्ता स्थिर केली.

याच्यानंतर याचा मुलगा विक्रमादित्य हा येथें राज्य करूं लागला. गर्दभिल्ल राजाचा पुराणांतरीं निर्देश आहे. या आख्यायिकेंत फारच थोडा अंश ऐतिहासिक दिसतो.

ख्रि. श. तिसऱ्या शतकांत वायव्येकडून ज्या बाह्य लोकांच्या टोळ्या हिंदुस्थानांत आल्या व ज्यांनीं आंध्रांच्या साम्राज्याचा नाश झाल्यानंतर आपलीं राज्यें स्थापिलीं त्या आभीर, शक, यवन, बाल्हिक या लोकांबरोबरच याचें नांव सांपडतें.

यानें आपलें एक छोटेंसें राज्य स्थापन केलें होतें. वरील सर्व लोकांचीं राज्यें समकालीन असून ठिकठिकाणीं पसरलीं होतीं.

गर्भश्रीकांत मिश्र—' साकारसिद्धि' नांवाचा ग्रंथ यानें रचला. विष्णुस्वामीचा हा शिष्य होता.

गहिनीनाथ--(गैबीनाथ पाहा).

गंग--(स. १६२५ चे सुमारास) हा एक हिंदी कवि होता. हा ब्राह्मण असावा. संग्रहग्रंथांमध्यें याच्या पुष्कळ सुंदर कविता आढळतात. याला एका कवितेबद्दल अबदुलरहिम खानखानानें ३६ लाख रुपये दिले, अशी प्रसिद्धी आहे.

गंगईकोंड चोल—(स. १०१२-१०४३) याला मुदींकोंड, निगरिल्ली, उत्तम चोल व राजेन्द्र असेंहि म्हणत असत. हा पहिल्या राजराजाचा मुलगा. हा युवराज असतांनाच बापाबरोबर पुष्कळ मोहिमांवर गेला होता. इडैत्तु, रैनाडु, दुर्गम वनवासी, अजिंक्य तटाचे कोळीप्पाक्कई, मण्णैक्कडगम हीं प्रसिद्ध तटबंदीचीं ठाणीं जिंकून नंतर यानें एळम्(सीलोन)वर स्वारी केली. तेव्हां तेथील राजाचा पराभव करून त्याचा, त्याच्या राणीचा, व सुंदर नांवाच्या त्याच्या पुत्राचा असे तीन रत्नखचित मुकुट व राजाचा बहुमोल कंठा खंडणीदाखल घेतला. केरळ प्रान्तावर स्वारी करून तेथील राजाचा सर्व खजिना, मुकुट व सूर्यमाला.नांवाचा कंठा मिळवला. पुढें यानें अनेक बेटें जिंकलीं (स. १०१५-१०२०). मुयंगी येथें जयसिंग चालुक्याचा पराभव करून शांदिमुत्तीवु, रट्टपाडी येथील कुबेराच्या नऊ निधींइतकी संपत्ति यानें मिळविली . विक्रमवीराचे चक्रकोट, मदुरमंडळ, नामनैक्कोणम्, पंचप्पळळी, माशुणीदेश, आदिनगर (येथील धीररथाला जिंकून त्याचा सर्व खजिना घेतला), ओड्डविषय, कोसलैनाडु, दंडभुक्ती (येथें धर्मपाल राजा होता), दक्कनलाट (गोविन्दचन्द्राचा), वळंगदेश, निकोबार बेटें, शंगुक्कोट्टम (महिपालाचें) व गंगराजाची राजधानी इतके देश व शहरें यानें जिंकलीं (स. १०२०-२२). हीं नांवें तिरु व लंगाडु ताम्रपटांत येतात. कदाचित् ही यादी अतिशयोक्तीची असेल. तथापि हा फार पराक्रमी होता ही गोष्ट खरी. नंतर यानें पाण्ड्य देश जिंकून त्यावर यानें आपल्या राजपुत्रास सुभेदार नेमलें. याच्या सेनापतीनें गंगातटाकापर्यंत मोहीम केली व ओरिसाच्या राजास आणि बंगालच्या महिपतीस मांडलिक बनविलें. यानें गंगैकोंड शोळापुरम् येथें एक मोठा तलाव बांधला; व त्यांत गंगेचें पाणी तो शुद्ध करण्यासाठीं आणून घेतलें. त्याचें नांव जयस्तंभतडाग होतें. याची एक बाजूची पाळ पंधरा मैल लांब होती. या तलावामुळें त्या प्रान्तापैकीं अर्ध्या प्रान्तास शेतीसाठीं पाणी पुरवण्यांत येई. यानें आपली मुलगी अम्मंगदेवी राजराज चालुक्यांस दिली होती. राजशेखरविलास नांवाच्या काव्यांत यानें केलेल्या मोहिमांचा इतिहास आलेला आहे. यानें स. १०३३ पर्यंत मुलूखगिरी केल्यानंतर मग आपलें सारें लक्ष प्रजेच्या सुखसोयीकडे लाविलें. या कामांत यानें बारा वर्षे घालविलीं. यानें गंगैकोंडशोळापुरम् येथें राजधानी स्थापून तेथें अनेक देवळें बांधलीं; व वर सांगितलेला तलाव बांधला. कांहीं वर्षांपूर्वी या तलावाच्या पाळीचे दगड काढून ते सध्यांचे कोलेरून येथील धरण बांधण्यास नेले. हल्लीं तो तलाव व देवळें नामशेष झालीं आहेत. एकोणिसाव्या शतकांत फेरोनें लिहिलेल्या गॅझेटियरमध्यें त्यांच्या सौंदर्याची व अजस्त्रपणाची फार प्रशंसा केली आहे. राजेन्द्रानें आपल्या राजाधिराज नांवाच्या मुलाला स्वतः सर्व राज्यकारभाराचें शिक्षण दिलें होतें. यानें एकतीस वर्षे राज्य करून प्रजेस सुख दिलें. हा स. १०४३ मध्यें वारला. याच्यामागून याचा दुसरा पुत्र राजाधिराज ऊर्फ जयमकोंड हा राजा झाला.

गंग घराणें (पूर्व कलिंग)—यांचें मूळगांव गंगवाडीतील 'कोलाहल' हें होय. हे चंद्रवंशीय असून यांचें गोत्र आत्रेय आहे. १ वीरसिंह–२ कामार्णव पहिला (याला दानार्णव, गुणार्णव पहिला, मारसिंह, वज्रहस्त १ ला असे भाऊ होते. याचें राज्य ३६ वर्षे)–३ दानार्णव (दुसरा राजा कामार्णवाचा भाऊ. ४० वर्षे.)–४ कामार्णव दुसरा (५० वर्षे.)–५ गुणार्णव (५ वर्षे.)–६ वज्रहस्त (स. ८६३–८७८. याच्यानंतर याचा भाऊ कामार्णव तिसरा गादीवर आला)–७ कामार्णव तिसरा (स. ८७८–९७. यानें आपल्या घराण्याचा शक चालू केला) –८ गुणार्णव दुसरा (स. ८९७–९२४. याच्यानंतर याचा नातु व वज्रहस्त तिसऱ्याचा मुलगा जितांकुश गादीवर आला.)–९ जितांकुश (स. ९२४–९३९. याच्यानंतर याचा पुतण्या व गुण्णमाचा मुलगा कलिंगालांकुश हा गादीवर आला.)–१० कलिंगालांकुश (स. ९३९–५१. याच्यानंतर आठवा राजा जो गुणार्णव दुसरा त्याचा भाऊ गुंडम पहिला हा गादीवर आला.)–११ गुंडम पहिला (स. ९५१–५८. याच्यानंतर नववा राजा जितांकुश याचा भाऊ कामार्णव ४ था हा गादीवर आला.)–१२ कामार्णव ४ था (स. ९५८–८३)–१३ वज्रहस्त ४ था (स. ९८३–१०१७. अनियंक भीम.)–१४ कामार्णव ५ वा (स. १०१७. याच्यानंतर याचा भाऊ गुंडम २ रा हा गादीवर आला)–१५ गुंडम दुसरा (स.१०१७–१९. याच्यानंतर याचा भाऊ कामार्णव ६ वा हा गादीवर आला.)–१६ कामार्णव ६ वा (मधुकामार्णव, स. १०१९–३८. बा. विनया.)–१७ वज्रहस्त ५ वा स. १०३८–७०. बा. अनंगा.)–१८ राजराज १ ला (देवेंद्रवर्मन्, स. १०७०–७८. बा. कुलोत्तुंग चोल पहिल्याची मुलगी राजसुंदरी)–१९ अनंतवर्मन् चोदगंग (स. १०७८–११४२)–२० मधुकामार्णव ७ वा (स. ११४२–११५२. याच्यानंतर याचा भाऊ राघव हा गादीवर आला.)–२१ राघव (स. ११५२–६७. बा. चंद्रलेखा)–२२ राजराज दुसरा (स. ११६७–९२; अनंतवर्मन्. याच्यानंतर याचा भाऊ अनियकभीम हा गादीवर आला.)–२३ अनियकभीम (स.११९२–१२०२. बा. बाघल्ला ?)–२४ राजराज तिसरा (गुण किंवा सद्गुण. स. १२०२–१९१)–२५ अनन्यभीम (लाडदेव. स. १२१९–१२५३. बा. कस्तुरा)–२६ नरसिंह पहिला (बा. सितादेवी ? स. १२५३–५६. याला चंद्रिका नांवाची एक बहिण होती. ती परमादी हैहयास दिली होती.)–२७ वीरभानूदेव पहिला (बा. चालुक्यराजकन्या जाकल्ला. स १२५६–७५)–२८ नरसिंह दुसरा (प्रताप अनंतवर्मन्. स. १२७५–१३०६)–२९ वीरभानू दुसरा (वीराधिवीर; बा. लक्ष्मी. स. १३०६–२५) –३० नरसिंह तिसरा (गणपति. स. १३२५–१३५०)–३१ वीरभानू ३ रा (बा. तारा आणि हिरा. स. १३५०–७८)–३२ नरसिंह ४ था (बा. पार्वती. स. १३७८–१३९७)–३३ वीरभानू ४ था (या घराण्यांतील शेवटचा राजा). (सिवेल आणि आयंगार पृ.३५७).

गंग घराणें (पश्चिम)—हें घराणें प्रथम अनन्तपूर जिल्हा आणि म्हैसूरमधील कोलार प्रांतांत राज्य करीत होतें. त्या वेळीं या घराण्याच्या राज्यास 'गंगवाडी' असें म्हणत. या घराण्यांतील राजे 'पर्मानदी' आणि 'कोंगुणीवर्मन्' या पदव्या लावीत असत. बनवासीचा कदंबराजा मृगेश्वरवर्मन् यानें सनाच्या पांचव्या शतकामध्यें या घराण्यास जिंकलें होतें. पण पुढें स. ७५३ त राष्ट्रकूटांनीं चालुक्यांना जिंकलें तेव्हां यांनीं आपली सत्ता परत मिळवून आपल्या राज्याचें संरक्षण केलें. शेजारच्या बलिष्ठ राजांचें हें घराणें नेहमीं मांडलीक असे. पुढील वंशावळींतल्या राजांचा दिलेला काल हा प्रमाण मानलेला असून तो फ्लीट, राइस वगैरेंनीं दिलेल्या कालाहून भिन्न आहे (एस्. कृष्णस्वामी आयंगार यांचें कल्चर पृ. १८९; एपि. इंडि. १४. ३३७; एपि. क. ९ प्रस्तावना पृ. ६; एपि. इंडि. ५. १५३. ६. ५९ पाहा).

१ हरिवर्मन् (अय्यवर्मन् स. ४५०)–२ विष्णुगोप (कांहीं लेखांत याचा उल्लेख नाहीं.)–३ माधव पहिला (सिंहवर्मन्. स. ४७० च्या सुमारास. याला स्कंदवर्मन् पल्लवानें गादीवर बसविलें)–४ अविनीत–५ दुर्विनीत (याचा भाऊ पृथ्वीपति यानें म्हैसूरमधील पुन्नाडराज हा आपल्या सासऱ्याचा प्रांत मिळविला.)–६ मुष्कर–७ श्रीविक्रम–८ भूविक्रम (विलंद येथें पल्लवांचा पराजय केला. याच्यानंतर याचा भाऊ शिवमार हा गादीवर आला.) –९ शिवराम पहिला (स. ६६८ ?)–१० इरेयप्पा पहिला (कांहीं ठिकाणीं यास गाळलें आहे.) –११ श्रीपुरुष (विलदें येथें पल्लव राजास ठार मारिलें. बा. कांचेब्बी.)–१२ शिवमार २ रा (स. ८०५-१० याच्यानंतर याचा भाऊ विजयादित्य गादीवर आला.)–१३ विजयादित्य (स. ८१०–८४०)–१४ पृथ्वीपति पहिला (बारावा राजा शिवभार २ रा. त्याचा हा मुलगा. याला मारसिंह पहिला या नांवाचा भाऊ होता. स. ८४० -७७)–१५ मारसिंह दुसरा (स. ८७८-९००. याला कुंदव्वे नांवाची बहीण होती.)–१६ पृथ्वीपति २ रा

(स. ९००-९४०. याला विक्रमादित्य नांवाचा मुलगा होता. तो धवल पल्लवाच्या भांडणांत मारला गेला.)– १७ बूतुग २ रा (हा तेरावा राजा विक्रमादित्याचा वंशज होय. वंश येणेंप्रमाणें–१३ विक्रमादित्य-राजमल्ल पहिला-इरेयप्पा तिसरा–भूतुग पहिला–इरेयप्पा ४ था–१७ बूतुग दुसरा. याला दोन भाऊ व एक बहीण होती. स. ९३९–९५३. बा. रेवकन्निम्मडी व कल्लब्बरासी)– १८ मल्लदेव (स. ९५३-६१. बा. बिजब्बी. याच्यानंतर याचा भाऊ मारसिंह तिसरा हा गादीवर आला)–१९ मारसिंह तिसरा (स. ९६१–७४. हा जैनधर्मीय होता.) राचमल्ल (राज ४ था. स. ९७४–८४. अठवा राजा मल्लदेव त्याचा हा नातू. याच्या बापाचें नांव इंद्र. यास रक्कस गंग व अरुमोलिदेव असे भाऊ होते. हा या घराण्यांतील शेवटचा राजा.)

या घराण्यांतील सतरावा राजा बूतुग दुसरा याच्या पासूनच्या पुढील वंशावळीत कांहीं ठिकाणच्या लेखांवरून फरक आढळतो.

गंग परमादि—(चोल वीर राजेन्द्र पाहा).

गंगाजी आव्हाड—हा नाना फडणिसाच्या विश्वासांतील असून महादजी शिंदे यांचेकडे असे. महादजी यांच्याशीं नेहमीं वाटाघाटी करी. स. १७८८ चे सुमारास याची अहल्याबाई होळकरणीकडे शिष्टाई चालू होती (म. रि. उ. २ पृ. २५). हा नानास महत्त्वाची बातमी पुरवी (ऐ. प. १८५). बातमी पुरविण्याची पद्धत अशी दिसतें कीं, यानें सर्व माहितीचीं पत्रें बऱ्हाणपुरासारख्या ठिकाणीं पाठवावयाचीं व तेथून तीं नानाकडे रवाना व्हावयाचीं. त्यासंबंधीं भा. ४. ४९; ऐ. स्फु. ले. ७. १४; खरे ले. २५१६ हे कागद मननीय आहेत.

गंगाजी नाईक अणजूरकर—हा वंश हल्लीं अणजूर, जि. ठाणें, येथें नांदत आहे. वसईच्या अपूर्व संग्रामांत हा विशेष चमकला. यानें त्या वेळीं पुष्कळ खटपट करून साष्टींतील लोकांस मराठ्यांचे बाजूस वळविलें. यांनीं पेशव्यांस माऱ्याच्या जागा व गुप्त वांटा दाखविल्या; व यांनीं पेशव्यांच्या तर्फेनें लढून मनोर येथें पोर्तुगिझांचा मोड केला. पुढें चिमणाजी आप्पानें याची रवानगी वसईकडे केली. तेथें किल्ल्यावर चढण्याचा यांनीं उद्योग केला. परंतु त्यांत फारसें यश आलें नाहीं व इतर मंडळींनीं मिळून अंताजी रघुनाथाच्या सूचनेवरून मध्यंतरीं उत्तरेस आगाशीजवळ वैतरणेच्या मुखाजवळ जो आरनाळ्याचा किल्ला आहे, तो घेतला. याच्या सर्व कामगिरीबद्दल बाळाजी बाजीरावानें यास पालखी दिली. हे साष्टीचे पाटील होते (म. रि. म. १ पृ. २९२–९३).

हा जातीनें पठारेप्रभू असून कल्याणावरील फिरंग्यांचा हल्ला परतविण्यांत प्रमुख होता.

गंगादेवी—बसवाची पत्नी आणि बलदेवाची कन्या. बलदेव हा विज्जल राजाचा प्रधान होता. हिला गंगाबा असेंहि कोणी म्हणतात.

गंगाधर—(स. १४३४) यानें 'चांद्रमान' नांवाचें तंत्र केलें आहे. श्रीशैलाच्या पश्चिमेस एकीकडे कृष्णवेणी व दुसरीकडे भागीरथी यांच्यामधील सगर नांवाच्या नगराचा हा रहिवासी. याचें गोत्र जामदग्न्य होतें. याच्या पित्याचें नांव चंद्रभट होय. याच्या वंशांतील श्रीचंद्रलवर विद्यापूरचा राजा प्रेम करीत असे. याचा मुलगा विश्वनाथ या नांवाचा होता. गंगाधराचें चंद्रमानतंत्र फार कठीण म्हणून तेंच त्यानें सुबोध पद्यांत लिहिलें. त्याचा काल उपलब्ध नाहीं (भा. ज्यो. पा. ३१६).

२. 'निर्णयसिंधु' नंतर यांची ग्रंथरचना झालेली आहे. ग्रंथ-आशौचनिर्णय (आशौचगंगाधरी) (सं. सूं).

३. (स.१५८६)–यानें ग्रहलाघवावर शके १५०८ या वर्षी 'मनोरमा' नांवाची टीका लिहिली आहे. हा मुहूर्तमार्तंडकार नारायणाचा पुत्र. मुहूर्तमार्तंड ग्रंथ शके १४९३ मध्यें झालेला आहे. हा कौशिकगोत्री वाजसनेयी ब्राह्मण. हा देवगिरीच्या उत्तरेस जें प्रसिद्ध शिवालय (घृष्णेश्वर) आहे, त्यानजीकच्या टापर गांवचा रहिवासी होय. सध्यां ह्याचा मातुलवंश मात्र हयात असल्याचें शोधाअंतीं कळून आलें (भा. ज्यो. पा. २७७).

गंगाधर कोकील—(स. १७७८ सुमार) हा एक योगी होता. मुकुंदराजानें दृष्टांत झाल्यावरून याला आपला गुरु केलें.

यांच्या परंपरेवरून पाहतां हा सुमारें सवाशें वर्षांमागें होऊन गेला असें अनुमान निघतें व तें खरें आहे. याला महादेव आबा नांवाचा मुलगा होता. सायखेड्यास (औरंगाबाद जिल्ह्यांतील गंगातटाकीं असलेलें) याची समाधि आहे (मं. अहवाल शके १८३४).

गंगाधर तिमाजी हणमंते—भोसल्याचे पिढीजाद नोकर. कोल्हापूरकर संभाजीच्या पदरीं हा सुमंतपदावर होता (म. रि. म. १ पृ. ४२९).

गंगाधरनंदन—यानें मराठींत कुंडांकुश नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ कुंडपद्धतीवर लिहिला आहे.

गंगाधरपंडित—या विद्वान् ब्राह्मणानें भास्कराचार्यांच्या लीलावती ग्रंथावर अमृतसागरा नांवाची टीका लिहिली आहे.

गंगाधरपंत गोखले—हा रास्ते (गोखले) घराण्याचा मूळ पुरुष असून वेळपेश्वराचा राहणारा होता. आदिलशाहींत हा वेळपेश्वरचा महाजन असून जाफराबाद महालांचा रसदभरणा दामोळास करीत असे.

याच्यानंतर याचें काम याचा नातू हरि नारायण हा पाहत असे.

गंगाधरबाबा—(रामीरामदास पाहा).

गंगाधरमहालक्ष्मी–कोचीन देशाची ही पहिलीच राणी होय. हिनें पोर्तुगीजांच्या मदतीनें कोचीनची गादी बळकाविली.

गंगाधर मोरेश्वर पिंगळे––शिवाजीच्या वेळचा एक मुत्सद्दी. संभाजीच्या वेळींहि हा होता (स.१६८६).

गंगाधर यशवंत ऊर्फ गंगोबातात्या चंद्रचूड— (मृत्यु स. १४-२-१७७४) हा मूळचा निंबगांवचा. बाजीरावानें यास हिशेबी कामांत नोकरीवर घेऊन पेशव्यांचे तर्फेनें होळकरांचे फडणीस म्हणून नेमून दिलें. तेव्हांपासून पेशवे व होळकर यांच्यामधील कारभार हा पाहूं लागला. मल्हारराव्याचा गंगाधर यशवंतावर पूर्ण विश्वास असून तहाच्या, हिशेबाच्या व मतलबाच्या वगैरे भानगडींत तो याचा सल्ला घेत असे. होळकराकडील हरएक बाबतींत यांचें नांव येतें. यांचें पत्रलेखन व भाषा चंद्रचूड दप्तर. ले. ३३ वरून कळून येईल. हा मल्हारराव्याची दिवाणगिरी करीत असतां प्रसिद्धीस आला.

हा सैन्य घेऊन जाटाला मदत करण्याकरितां लढाईस गेल्याचा उल्लेख आहे (रा. खं. ३. १६३).

अबदालीची पाठ फिरतांच सुरजमल्ल जाटानें मोठ्या सैन्यानिशीं दिल्लीवर स्वारी केली. या वेळीं गंगाधरपंत चंद्रचूड दीड हजार फौजेनिशीं जाटाबरोबर होता (म. इ. सा. खं. १. ले. २८८).

शके १६८१(स.१७५९) मध्यें अबदालीनें दिल्ली घेतली, पण तो देशांत बंडाळी माजल्यामुळें परत गेला. तेव्हां इकडचे हिंदुस्थानांत कोणाची सत्ता चालणार याबद्दल लोक साशंक होते. पुढें पानपतमुळें विस्कटलेली घडी मल्हारराव व [illegible] बसविण्याचा जोरानें प्रयत्न करीत होते.

[illegible] व मल्हारराव्यानें मोगल बुडवावा अशी सल्ला दिली व त्याकरितां दहा लक्षांची जहागीर द्यावी असें [illegible] (चं. द. १. ले. ५४).

(स. १७६३ जुलै) मोगलाचा भाऊ बसालतजंग [illegible] फोडून मराठ्यांकडे आणण्याचें काम याकडे सोपविण्यांत आलें. त्याप्रमाणें शके १६८३ च्या अधिक-[illegible] गंगोबा बसालतजंगास घेऊन मराठ्यांच्या लष्करांत दाखल झाला (चं. द. १ ले. ६८–७०).

माधवराव दादासाहेबांकडे सर्व व्यवस्था सोंपवून कर्नाटकच्या स्वारीस निघाले होते. त्यांनीं जानोजी भोसल्यास आपणाबरोबर येण्याविषयीं निकडीचे निरोप पाठविले. परंतु इंग्रजांनीं (ता.८ फेब्रु.१७६४) 'बंगाल्यांत कासमअलीचा पराभव केल्यामुळें पूर्वी ठरलेल्या तहान्वयें, या वेळीं मला कासमअलीच्या मदतीस गेलें पाहिजे, अर्थात् माधवरावांच्या स्वारीबरोबर आपणांस हजर राहतां येत नाहीं याबद्दल पेशवे विशाद मानतील तरी प्रसंगीं तुम्हीं (गंगोबा) आहां. कळेल त्याप्रकारें निराकरण करून मर्जी बहाल राहे ते गोष्ट करावी (चं. द. १ ले. ८८) असें त्यानें कळविलें.

(श. १६८५) फाल्गुन शुद्ध १४ हा आपली मुलगी मथुराबाई हिच्या लग्नाकरितां नाशिक येथें आला होता.

(स. १७६४) या वेळीं दरबारांत उपस्थित झालेला चौथाईच्या हिशेबाचीं प्रकरणें मिटविण्याकरितां मल्हाररावानें सांगितलें होतें. यामुळें रघुनाथराव व हा यांमध्यें मधून मधून खटके उडत (चं. द. १ ले. ८९).

हा फाल्गुन शु. ११ स तीनचार दिवस ज्वर येऊन निंबगांवीं मृत्यु पावला, असें याचा मुलगा यशवंत गंगाधरचें पत्र उपलब्ध आहे. पत्र १४-२-१७७४ चें आहे (पे. द. ५. २३).

राक्षसभुवनच्या लढाईच्या वेळीं निजामचा भाऊ सलाबतजंग याला फोडण्यापासून तो फायदेशीर तह घडवून आणीपर्यंत यानें उत्कृष्ट कामगिरी केली. तसाच इतर महत्त्वाच्या कामांत हा असे. पण घोडपच्या स्वारीनंतर (स. १७६६) हा सखारामबापूच्या मसलतीनें दादाला मिळाला. म्हणून याचा सर्व सरंजाम जप्त करून याला मुलांमाणसांसुद्धां कैद करण्यांत आलें. नंतर तीस लक्ष रुपये खंड घेऊन याला कैदेंतून मुक्त केलें व सरंजामहि परत देण्यांत आला. तीस लक्षांपैकीं चोवीस लक्ष रुपये यानें ताबडतोब भरले व बाकीचे सहा लक्ष माधवरावाच्या मृत्यूनंतर सखारामबापूच्या कारकीर्दीत माफ झाले (चं. द. १. १). हा दादाचा पक्षपाती असल्यामुळें जप्तीचे प्रसंग पूर्वीहि दिसतात (चं. द. १५४, ६०).

मराठेशाहींतील याच्या वेळच्या प्रत्येक महत्त्वाच्या गोष्टींत याचा हात असे. एखादी गोष्ट हमखास घडवून आणण्याच्या बाबतींत याची योजना होई. लेखणी, तलवार आणि डावपेच या सर्वच बाबतींत हा कुशल होता.

गंगाधरशास्त्री पटवर्धन—(मृ. स. १८१५ जुलै) हा मेणवलीचा राहणारा होता. यास वयाचे ८ वे वर्षी पुण्यांत पेशव्यांचे वाड्यांत कर्नाटक स्वारीचे दप्तरांत कारकुनीचें काम मिळालें. हे पटवर्धन हरिपंत फडक्यांचे

उपाध्ये असल्यामुळें त्यांच्याकडे गंगाधरशास्त्र्यांचें जाणें येणें होतें. हरिपंतानें गंगाधर कारकुनी करतो म्हणून याचें उपाध्येपण काढून घेतलें, त्यावरून यानें कृष्णातीरीं वाईस जाऊन वयाचे वीस वर्षांपर्यंत शास्त्राध्ययन केलें.

सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर पेशवाईसंबंधानें ज्या धडामोडी उपस्थित झाल्या त्या गंगाधरशास्त्री यास माहीत होत्या. यानें बाळोजी कुंजराबरोबर पेशवे दरबारांत राहून बाजीरावाची मर्जी संपादिली. पुढें श्रीमंतांची शास्त्र्यावर मर्जी बसली म्हणून नानांचें व याचें वितुष्ट आलें. दुसरें एक कारण असें झालें कीं, 'नाना फडणीसाचा सासरा दादा गद्रे याची एक रांड होती. तिची शास्त्र्यावर मर्जी बसली. त्यामुळेंहि नाना फडणीस याचा द्वेष करूं लागला, आणि त्यानें शास्त्र्याचे वडिलांस कळविलें कीं, आमचेकडील बातमी हा बाजीरावास कळवितो.'

याचे वडिलांस नाना आपला सूड घेईल अशी धास्ती पडून तो कुटुंबासह बडोद्यास राहावयास गेला. तेथें त्या वेळचा दिवाण रावजी आपाजी यानें याचा चांगला परामर्श घेतला. त्याचा व याचे वडिलांचा स्नेह होता. त्यानें गोविंदराव गायकवाडास बडोद्याचें पद मिळवून देण्याचे वेळीं हरिपंत व नाना फडणीस यांजकडे शिफारस करून स्वतः पैसे वगैरे देऊन पुष्कळ खटपट केली होती. आणि या खटपटीमुळेंच पुढें गोविंदरावाची दिवाणगिरी रावजी आपाजीस मिळाली.

रावजीचा मुलगा सिताराम व गंगाधरशास्त्री हे दोघेहि स्नेहभावानें एकत्र वाढले. गायकवाडांतून पटवर्धनास १२०० रु. वर्षासन करून देण्यांत आलें. रावजी आपाजी मरण पावल्यावर सीतारामबाबास दिवाणगिरी देण्याची खटपट गंगाधरशास्त्र्यानें केली. रेसिडेंट वॉकर याचा याजवर अत्यंत लोभ होता. त्यानें शास्त्र्यास गायकवाडाचे दरबारीं बोलणें करण्याच्या नाजूक कामीं नेमिलें. त्या वेळीं 'हें काम मला नको, लोक आपणास विरुद्ध समजावतील आणि सितारामबाबाचें व माझें वांकडें पडेल' असें यानें सांगितलें. तेव्हां साहेबानें आज्ञा केली कीं, 'तुम्ही चोरी लाच न करतां उभय सरकारांचें काम निष्ठेनें करावें; म्हणजे तुमचा सांभाळ मी करीन.' पुढें, मी मगरूर, माझें बोलणें बहुत अमर्यादेचें पडतें, असें सितारामबाबास वाटूं लागलें, आणि उत्तरोत्तर उभयतांचें वितुष्ट पडलें, असें हा शास्त्री आपल्या चरित्रांत लिहितो.

मेजर वॉकर व जेम्स कॉनिक या दोघांचाहि हा मुख्य सल्लागार असून बडोद्यांत इंग्रजांचें बस्तान बसविण्यांत याचीच त्यांना चांगली मदत झाली.

ता. १५-१२-१८०८ चे पत्रांत वॉकरनें आनंदराव गायकवाडास खास पत्र लिहून याची प्रशंसा व शिफारस केलेली आढळते. इंग्रजांस आंत आणणारा मुख्य पुरुष दिवाण रावजी आपाजी. त्याला शास्त्र्याची भरपूर मदत होती. रावजी आपाजी ता. १८-७-१८०३ रोजीं मरण पावला. त्यापूर्वी थोडे दिवस म्हणजे ता. २।२।१८०२ रोजीं दरमहा शंभर रुपये पगारावर रेसिडेंटपाशीं गुप्त बोलणें करण्याचे कामीं याची नेमणूक प्रथम झाली. रावजीचे पश्चात् बाबाजी आपाजीशींहि शास्त्र्याचा स्नेह कायम राहिला, असें त्याच्या पत्रव्यवहारावरून स्पष्ट होतें.

स. १८१४ मध्यें यास पेशवे व गायकवाड यांच्यामधील देण्याघेण्याच्या व अहमदाबाद वगैरेचा गायकवाडाच्या नांवानें कायमचा इजारा करून घेण्याच्या निकालासाठीं पुण्यास पाठविण्यांत आलें. पुढें बाजीरावानें शास्त्री हा फडक्यांच्या पदरीं कारकून असतांना त्याचें आपल्याशीं उद्धटपणाचें वर्तन होतें अशी सबब सांगून याची भेट घेण्याचें नाकारलें. या वेळेच्या पूर्वीपासूनच बडोद्याचा कारभारी सिताराम रावजी यास शास्त्र्याविषयीं मत्सर वाटूं लागला होता. त्यानें शास्त्री हा सर्वस्वीं इंग्रजांच्या वतीचा मनुष्य आहे असें बाजीरावास सांगितलें. शास्त्र्यास पेशव्यांच्या दरबारीं वकील म्हणून पाठविण्याची सूचना यापूर्वी एकदां (स.१८११) पुढें आली होती. या वेळीं पुष्कळ दिवस राहूनहि शास्त्र्याचा उद्देश सफल न झाल्यामुळें यानें ब्रिटिश रेसिडेंटाचा सल्ला घेऊन असें ठरविलें कीं, गायकवाड व पेशवे यांच्यामधील वादग्रस्त प्रश्न तडजोडीनें सोडविण्याचें काम इंग्रजांकडे सोंपवून आपण स्वतः बडोद्यास परत जावें. शास्त्र्याचा हा विचार पेशवे व त्रिंबकजी डेंगळे यांस समजला तेव्हां शास्त्र्यानें आपलें जाणें लांबणीवर टाकावें म्हणून त्रिंबकजीनें यास वळविण्यास सुरुवात केली. तेव्हां पेशव्यांच्या मुख्य कारभाराची जागा हा मागूं लागला. बाजीरावानें आपली मेहुणी शास्त्र्याच्या मुलास देऊं केली, व यानें सुचविलेली मुलखाच्या देण्याघेण्यासंबंधानें तडजोडहि त्यानें कबूल केली. परंतु शास्त्र्यानें आपल्या मागण्या पुऱ्या होईपर्यंत लग्न करण्याचें तहकूब केलें. या गोष्टीचा बाजीरावास राग आला.

पुढें कांहीं दिवसांनीं बाजीराव पंढरपुरास गेला. तेव्हां शास्त्री त्याच्याबरोबर गेला. जुलैच्या १४ व्या तारखेस रात्रीं कांहीं थोडींशीं चाकरमाणसें बरोबर घेऊन शास्त्री विठोबाच्या देवालयांत देवदर्शनास गेला. देवदर्शन केल्यावर पेशव्यांची गांठ घेऊन शास्त्री बाहेर पडला. पण तो थोडा दूर जातो न जातो तोंच कांहीं मारेकऱ्यांनीं

याच्यावर हल्ला करून याचे तुकडे तुकडे केले (जुलै १८१५). डफ म्हणतो कीं, हें कृत्य बाजीरावानें डेंगळ्याच्या मदतीनें केलें. उलट कांहींचें म्हणणें कीं, सिताराम या दिवाणानें शास्त्र्यांचा खून करविला. या वेळीं सितारामानें धार येथें सैन्य जमविलें होतें. थोड्याच दिवसांत सितारामास इंग्रजांनीं अटकेंत ठेविलें. यावरून या म्हणण्यास पुष्टि मिळते. क. वॉलेस म्हणतो कीं, शास्त्र्याच्या खुनांत पेशव्याचा कांहीं फायदा नव्हता. कारण त्यामुळें गुजराथ हातची जात होती. म्हणून याला जिवंत ठेवण्यांतच त्यांचा फायदा होता.

यानें आपलें स्वतःचें लिहून ठेविलेलें चरित्र उपलब्ध असून तें भा. इ. स. मंडळाच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झालें आहे.

शास्त्र्याबद्दल एल्फिन्स्टनचा अभिप्राय मार्मिक आहे. तो असा:—

"गंगाधरशास्त्री हा मोठा धूर्त व बुद्धिमान् आहे. यानें बडोदें संस्थानची व्यवस्था उत्तम ठेविली आहे. येथें पुण्यास तो पुष्कळ खर्च करून मोठ्या मिजाशींत राहतो, व आपली स्वारी अशा झोकांत काढतो कीं सर्व शहर याच्याकडे पाहत राहतें ! जुन्या पद्धतीचा शास्त्री असला तरी थेट इंग्रज असल्याप्रमाणें राहण्याची ऐट करतो. तुरतुर चालतो, तडतड बोलतो, वाटेल त्याला उलट उत्तर देतो, पेशवा व त्याचे कारभारी यांना 'मूर्ख' म्हणतो, 'डॅम रॅस्कल' हा शब्द याचे तोंडीं फार आहे. बोलतांना मधून मधून इंग्रजी शब्द खूप घुसडून देतो." (विविधज्ञानवि. व. ६२, पृ. ३६५-६६).

हा ब्रिटिश सरकारच्या मध्यस्थीनें व त्यांची हमी घेऊन पुणें येथें आला होता. त्यामुळें याचा व रेसिडेंट मि. एल्फिन्स्टन याचा फार चांगला परिचय झाला होता. याला संस्कृत भाषेचें चांगलें ज्ञान होतें. त्याचप्रमाणें यानें इंग्रजी भाषेचीहि थोडी ओळख करून घेतली होती. राजकारणनिमित्तानें याचें व इंग्रज लोकांचें बरेंच दळणवळण झाल्यामुळें यास इंग्रज लोकांविषयीं अधिक आदरबुद्धि उत्पन्न झाली होती. हा नेहमीं त्यांचें अनुकरण करण्यास तत्पर असे. याच्याबद्दल मि. एल्फिन्स्टन ह्यांनीं एके ठिकाणीं उल्लेख केला आहे तो फार मौजेचा आहे.

शास्त्रीबुवांचें हिंदुस्थानीमिश्रित इंग्रजी भाषेचें ज्ञान "यशवंतराव होळकर बहोत ट्रिकवाला था, लेकिन् बडा अकलकंद, काकआय (काकचक्षू) था." ह्या वाक्यावरून दिसून येतें (जु. ऐ. गो. पृ. ५०).

गंगाधरशास्त्री फडके—आद्य मराठी व्याकरणकर्ते. यांनीं स. १८२२ सालीं मराठी व्याकरण लिहिलें. तें पुढें स. १८३६ सालीं छापलें जाईतोंपर्यंत हस्तलिखितावरूनच मुंबई सरकारनें प्रथम काढलेल्या मराठी शाळेंत शिकवीत. शास्त्रीबुवांनीं गुजराथेंत एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या जागीं असतांना मराठीप्रमाणेंच गुजराथी भाषेचींहि दोन, एक बाल व दुसरें प्रौढ, व्याकरणें लिहिलीं.

गंगाधर सरस्वती—(सरस्वती गंगाधर पाहा).

गंगानंद कवींद्र—(स. १५२५ सुमार) तिरहुतचा राहणारा मैथिल ब्राह्मण. हा बिकानेरचा राजा कर्ण याचा आश्रित होता. याच्या थोरल्या भावाचें नांव रघुदेवशर्मा. याचे पुढील संस्कृत ग्रंथ आढळतात:- (१) कर्णभूषण, (२) काव्यडाकिनी, (३) मंदारमंजरी, (४)शृंगदूत. पहिला ग्रंथ काव्यमालेंत प्रकाशित झाला असून रसविषयक आहे. दुसऱ्या ग्रंथांत काव्यदोषांचें वर्णन असून तो काशीस्थ सरस्वतीभवन पुस्तकालयांत प्रसिद्ध झाला आहे. पुढले दोन ग्रंथ उल्लेखावरून अनुमानित होतात. ते अद्यापि प्रसिद्ध झाले नाहींत. कर्णाचा राज्यकाल स.१५०५-१५२७ पर्यंत होता. त्यावरून याचा काळ निश्चित होतो.

गंगाबा—बसवाची पत्नी.

गंगाबाई पेशवे—(मृत्यु स. १२-७-१७७७) ही साठ्यांच्या घराण्यांतील होय. ही नारायणराव पेशव्याची बायको. लग्न सिंहगडीं त्रिंबकराव मामानें लावलें. नारायणरावाचे वधानंतर गंगाबाई गर्भार असल्याचें आढळून आलें. तेव्हां दादाचे पक्षाकडून तीस मारण्याचे प्रयत्न सुरू झाले. तें पाहून कारभाऱ्यांचे कारस्थानास जोर आला.

नारायणरावास माधवरावानें आपले हातीं सोंपविलें असतां त्याचा बचाव आपल्याकडून झाला नाहीं, याबद्दल सखारामबापूस अगोदरच फार दुःख होत होतें; त्यांत जेव्हां गंगाबाईस मारण्याचे प्रयत्न सुरू झाले, तेव्हां आपण इतकी मंडळी पेशव्यांचें अन्न खाल्लेली जवळ असतां, गंगाबाईच्या असहाय स्थितींत तिचा आपल्या हातून नुसता बचाव सुद्धां होऊं नये, याजबद्दल कारभारी व सरदार यांचे मनांत लाज, खेद व त्वेष या भावना उत्पन्न झाल्या. अर्थात् त्यामुळें चाललेल्या कारस्थानास जोर आला.

शनिवारवाड्यांत गंगाबाईची अवस्था अत्यंत बिकट होती. तिची सुटका कशी करावी, हा एक मोठा प्रश्न कारभाऱ्यांपुढें उभा राहिला. शेवटीं बऱ्याच वाटाघाटी होऊन सखारामबापूनें नारो आपाजी तुळशीबागवाले यांचे साह्यानें बाईस शनिवारवाड्यांतून माहेरीं साठ्यांचे घरीं जाण्याचे निमित्तानें बाहेर काढून तेथें लगोलग पालखींत

बसवून बंदोबस्तानें पुरंदर किल्ल्यावर पोंचविलें. तेथें माघ शु. ५ म्हणजे ता. १७-१-१७७४ रोजीं गंगाबाईचे नांवानें कारभार सुरू झाला.

त्यानंतर ता. १८ एप्रिल रोजीं गंगाबाई प्रसूत होऊन पुत्र झाला. त्याचे नांवानें पेशवाईचीं वस्त्रें आणून तीं ता. २९ मे १७७४ रोजीं म्हणजे जन्मानंतर ४० वे दिवशीं पुरंदरावर स्वीकारण्यांत आलीं, तेव्हांपासून सवाई माधवरावाची कारकीर्द समजतात.

गंगाबाई सकेशा स्थितींतच ता. १२-७-१७७७ रोजीं मरण पावली (म. रि. म. भा. ४, पा. ३५१).

गंगाबाई शिंदे—महादजी शिंद्याची पत्नी. ही पळबेकर जाधवांच्या घराण्यांतील होती.

गंगाराम (महाराष्ट्र-पुराणाचा कर्ता)—एक बंगाली गृहस्थ. नागपूरकर भोसल्यांनीं बंगालवर ज्या मोहिमा केल्या त्यांचें तपशीलवार तत्कालीन वर्णन फारसें उपलब्ध नाहीं. मराठ्यांच्या स्वारीचें एक वर्णन ''महाराष्ट्रपुराण'' ह्या नांवानें गंगाराम नांवाच्या मनुष्यानें स. १७५१ मध्यें बंगाली भाषेंत लिहिलेलें हल्लीं प्रसिद्ध झालें आहे.

गंगाराम हा बंगालमधील मैमनसिंग येथील राहणारा असून तो या वर्णनाचे वेळीं बंगालची राजधानी मुर्शिदाबाद येथें हजर होता. यानें वर्णन केलेल्या बहुतेक गोष्टी कांहीं पाहिलेल्या व कांहीं विश्वसनीय रीतीनें ऐकिलेल्या अशा लिहिल्या आहेत.

या महाराष्ट्रपुराणाचा फक्त पहिला अध्याय उपलब्ध असून त्यांत भास्करपंताच्या खुनापर्यंत हकीकत आली आहे. त्यांत स. १७४३ मध्यें भास्करपंतानें बंगालवर केलेल्या स्वारीचें वर्णन दिलें आहे (ना. प्रां. इ. पृ. १०७-१०८).

गंगाराम जडी—(ग्रंथकाल स. १७४२) यानें भानुदत्ताच्या 'रसतरंगिणी'वर 'नौका' नांवाची टीका लिहिली आहे.

भांडारकर ओ. रि. इं. मधील गव्हर्नमेंट मॅन्युस्क्रिप्ट लायब्ररींत 'नौका' टीकेची एक हस्तलिखित प्रत आहे. त्या प्रतींत 'ग्रहांकनगपृथ्व्यंके' हा शब्दप्रयोग कालनिदर्शनासाठीं केला आहे. त्या शब्दप्रयोगाचीं ग्रह, अंक, नग, आणि पृथ्वी, अशीं पदें पडतात; व त्यांचा अर्थ संवत् १७९९ (स. १७४२) असा होतो.

यावरून यानें आपली 'नौका' नांवाची टीका स. १७३२ मध्यें लिहिली नसून स. १७४२ मध्यें लिहिली असें निश्चित ठरतें (पी. के. गोडे).

गंगा विष्णु महेश्वर—हा एक वैद्य होय. माधवराव पेशव्यांची आई गोपिकाबाई ही जेव्हां आजारी पडली, तेव्हां तिची प्रकृति दाखविण्याकरितां हिंदुस्थानांतून याला आणविलें होतें. हा फार नामांकित वैद्य होता.

गंगू मंगाजी—यास शिवाजीमहाराजांनीं आपली वाकनवीसी सांगितली.

गंगेय साहिनी—(स. ११९९-१२६०) हा म्हैसूरच्या कायस्थ घराण्याचा संस्थापक. हा गणपति काकतीयाचा सेनापति होता. यानें म्हैसूर व हैद्राबाद यांच्या आसपासचा प्रदेश सत्तेखालीं आणून स्वतंत्र राज्य स्थापन केलें (म. रि. मध्य भा. ४ २३३, २३४).

गंगेश—(स. १३५६ सुमार) हा जातीनें ब्राह्मण असून मिथिलेचा रहिवाशी होता. यास गंगेश अथवा गंगेश्वर असें म्हणत असून उपाध्याय हें याचें आडनांव होतें. यानें तत्त्वचिंतामणि नांवाचा एक अतिशय उत्तम ग्रंथ लिहिला आहे. दरभंग्यापासून १२ मैलांवर कमला नदीच्या तीरावर असलेल्या करियन या गांवीं याचा जन्म झाला. हा लहानपणीं अगदीं निरक्षर होता असें म्हणतात. आपल्या चुलत्याच्या घराशेजारील स्मशानांत जाऊन तेथें यानें काली देवीची प्रार्थना केली व तिला प्रसन्न करून घेऊन तिजकडून तर्कज्ञान संपादन करून घेतलें.

गंगेशानें सप्तदार्थी या ग्रंथाचा कर्ता शिवादित्यमिश्र (तत्त्वचिंतामणि, प्रत्यक्षखंड पृ. ८३०) याचा निर्देश केला आहे व तसेंच वैशेषिक तत्त्वज्ञानावरील ग्रंथ रत्नकोश यांतीलहि कांहीं उतारे घेतले आहेत. यानें निर्देशिलेल्या श्रीकर नांवाच्या गौड मीमांसकाबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाहीं. आनन्दसूरी व अमरचंद्रसूरी यांच्या मतांचा गंगेशानें निर्देश केला आहे. ते स. १०९३-११५० या वेळीं होऊन गेले. तेव्हां गंगेश १०९३-११५० च्या नंतर होऊन गेला असला पाहिजे. गंगेशानें श्रीहर्षाच्या 'खंडनखंडखाद्य' यावर टीका केली आहे, तेव्हां हा स ११८६ मध्यें राजा जयचंद्र याचे दरबारीं कनोज येथें होऊन गेलेल्या श्रीहर्षानंतर होऊन गेला असावा. गंगेशाचा मुलगा वर्धमान उपाध्याय हा स. च्या १३ व्या शतकांत होऊन गेला. तेव्हां गंगेश हा १२ व्या शतकाच्या शेवटीं होऊन गेला असावा. धनुखा शिलालेखावरून असें दिसतें कीं, महेश ठक्कर हा भगीरथ ठक्कराचा भाऊ होता. त्यानें तत्त्वचिंतामणीवर एक उत्तम उपटीका लिहिली आहे; व तो स. १५५६ त होऊन गेला. शिष्यांच्या मालिकेंत गंगेशानंतर भगीरथ हा ७ वा पुरुष होता. ३० वर्षांची एक पिढी समजल्यास गंगेश हा

भगीरथापूर्वी १८० वर्षे होऊन गेला असला पाहिजे. म्हणजे हा स. १३७६ च्या सुमारास होऊन गेला असावा (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४०५-६).

गंजन—एक हिंदी कवि. हा गुजराथी ब्राह्मण काशी येथें राहत असे. यानें 'कमरुद्दीनखाँहुलास' नांवाचा शृंगाररसयुक्त ग्रंथ लिहिला. त्यांत भाव, रस व ऋतु यांचें वर्णन केलें आहे. त्यांत ग्रानें आपल्या वंशजाचा परिचय दिला असून आपला पणजा चंदेल्ल मुकुटरायाची प्रशंसा केली आहे.

गंड चंदेल्ल—(स. १०००-१०२०) धंगानंतर त्याचा पुत्र गंड गादीवर आला. याला मुसलमान इतिहासकार नंद म्हणतात. गझनीच्या महमूदानें याच्यावर स्वारी करून याचा पराजय केला व पुष्कळ लूट केली (स.१०२०). पुन्हां महमूदानें लुटीच्या लोभानें स.१०२२ त स्वारी केली तेव्हां गंडानें युद्ध न करतां पुष्कळ नजराणा देऊन त्याला परत लावलें. यानंतर मुसलमानांनीं १७० वर्षेपर्यंत चंदेल्ल राज्यावर स्वारी केली नाहीं.

गंडरादित्य चोल—(स. ९६५) हा राजादित्याच्या मागाहून राजा झाला. हा त्याचा धाकटा भाऊ होय. याच्या वेळीं मान्यखेटच्या तिसऱ्या कृष्ण राष्ट्रकूटानें याचे बरेच प्रान्त, व कांचीं शहर कावीज केलें आणि तंजावराला वेढा दिला. पण यानें त्याला परत घालविलें. यानें आपल्या नांवानें एक शहर वसविलें. त्याचें नांव गांधारादित्यचतुर्वेदीमंगलम् (हल्लींचें त्रिचनापल्ली प्रांतांतील कंदरादित्तम होय). याच्या राणीनें याच्या पश्चात् कोनेरीराजपुरम् येथें एका देवळांत याचा पुतळा स्थापिला. तो अद्यापि तेथें आहे. हा भावाचा कारभार पुष्कळ वर्षे पाहत असला तरी यानें एक वर्ष राज्य केलें. याच्या मागें याचा मुलगा अज्ञान असल्यानें याचा धाकटा भाऊ अरिंजय अथवा अर्जुन मधुरकोंड राजकेसरी हा राजा झाला.

यास राजकेसरीवर्मन् ही पदवी होती. यास वीरनारणीयार व शेंबियन महादेवीयार या नांवांच्या दोन राण्या होत्या. याची श्रद्धावान् म्हणून ख्याति होती. यानें एक काव्य केलें आहे. त्याचें नांव 'तिरू विशैप्या' हें होय. या काव्याच्या शेवटीं परांतक चोलाचा मुलगा असें यानें आपणास म्हणून घेतलें आहे. याच्या दुसऱ्या राणीचा उल्लेख प्रामुख्यानें आढळतो. हा मेला तेव्हां ती राणी तरुण होती.

गंडरादित्य शिलाहार—(स. १११०-३५) कोल्हापूरचा राजा.

गागाभट्ट—पैठणचें भट्ट घराणें काशीस जाऊन राहिलें आणि विद्वत्तेबद्दल काशी येथें भट्ट घराण्यांतील लोकांनीं अग्रमान मिळवला. त्या घराण्यांतील दिनकर ऊर्फ दिवाकरभट्टाचे हे पुत्र. यांचें मूळ नांव विश्वेश्वरभट्ट. वडिलांनीं यांचें नांव लाडानें गागाभट्ट असें ठेवलें. यांनीं अनेक शास्त्रांवर ग्रंथ लिहिले, पण यांचा मुख्य भर मीमांसा व धर्मशास्त्र यांवर होता. यांचे ग्रंथ-१ मीमांसाकुसुमांजलि (पूर्वमीमांसावृत्ति), २ भाट्टचिंतामणि (सिद्धान्तविवेचनात्मक), ३ राकागम अथवा सुधा (जयदेवाच्या चंद्रालोकावर टीका), ४ दिन करोद्योत (हा धर्मशास्त्रावरील ग्रंथ याच्या पित्यानें सुरू केला आणि यानें पुरा केला), ५ निरूढपशुबंधप्रयोग (बौधायनसूत्रानुसारी), ६ पिण्डपितृयज्ञप्रयोग, ७ कार्यस्थधर्मप्रदीप (हा शिवाजीच्या राज्याभिषेकानंतर लिहिलेला ग्रंथ आहे), ९ सुज्ञानदुर्गोदय (सोळा संस्कारांवर), ९ शिवार्कोदय, १० समयनय, ११ आपस्तम्बपद्धति, १२ आशौचदीपिका, १३ तुलादानप्रयोग, १४ प्रयोगसार.

यानें 'शिवार्कोदय' नांवाचा ग्रंथ लिहिला होता. त्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत अलवार संस्थानच्या महाराजांचे हस्तलिखित ग्रंथसंग्रहालयांत आहे, अशी माहिती मिळते (C. C.). हा ग्रंथ अद्यापि प्रसिद्ध झाला नसला तरी त्यांतील अखेरचे माहिती देणारे श्लोक शिवचरित्रप्रदीपांत कै. स. म. दिवेकर यांनीं प्रसिद्ध केले आहेत (पा. २२३).

पूर्वमीमांसाशास्त्रावर जैमिनीचीं सूत्रें आहेत. त्यांवर शबरस्वामींचें गद्यात्मक भाष्य आहे. त्यावर कुमारिल भट्टाची श्लोकवार्तिक नांवाची श्लोकबद्ध टीका आहे, पण पहिल्या अध्यायाच्या पहिल्या पादावरच आहे. पुढें ते दिवंगत झाल्यानें ती टीका अपुरीच राहिली. ती शिवाजीमहाराजांच्या आग्रहावरून गागाभट्टानेंच पुरी केली, असें शिवार्कोदयाच्या अखेरच्या श्लोकावरून दिसतें. हा ग्रंथ यानें संन्यास घेतल्यावर लिहिला असेंहि तेथें म्हटलें आहे. तसेंच यानें 'समयनय' नांवाचा एक ग्रंथ छत्रपति संभाजी राजांकरितां तयार केला होता. तो शके १६०३ (स.१६८१) मध्यें लिहिला. हा ग्रंथ इटलींतील फ्लॉरेन्स येथील लेखसंग्रहांत आहे, असें विश्वेश्वर या नांवावर लिहिलें आहे त्यावरून दिसतें (C. C.). हा ग्रंथ आणवून प्रसिद्ध होणें जरूर आहे.

यांचा शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकाशीं कसा संबंध आला याबद्दल बखरींत वेगळाल्या हकीगती आढळतात. शिवाजीमहाराजांनाच राज्याभिषेकाची

आवश्यकता वाटून त्यांनीं बाळाजी आवजीसारखीं कर्तबगार व या प्रश्नाचें महत्त्व जाणणारीं माणसें उदेपुरीं पाठवून तेथील वंशाशीं आपला संबंध व राज्याभिषेकपद्धति यांची माहिती करून घेतली आणि भालचंद्रभट पुरोहित व सोमनाथभट कात्रे यांस काशीस पाठवून यांस रायगडीं आणवलें. यांनीं शिवाजीच्या शेहेचाळीस-सत्तेचाळिसाव्या वर्षी प्रायश्चित्तपूर्वक गायत्रीमंत्रोपदेश केला आणि विवाहादि पुनः करून राज्याभिषेक केला. शिवाजीनींहि याला लाखांनीं मोजण्यासारखी दक्षणा दिली. या कामीं याला विरोधहि बराच असावा असें दिसतें (निश्चलपुरी पाहा). प्रतापरावाचा मृत्यु वगैरेसारखे अपशकुनहि झाले. पण शिवाजी व गागाभट्ट यांनीं मोठ्या धैर्यानें ही गोष्ट पार पाडली आणि या बाबतींत गागाभट्टासारख्यांनीं पुढाकार घेतला, ही मोठ्या कौतुकाची गोष्ट आहे.

गाजीउद्दीनखान—(स. १६८४ - १७१०) याचें मूळ नांव मीर शहाबुद्दीन. याच्या हाताखालीं तुर्की मोगलांचें छोटें सैन्य असे. हा औरंगजेबाबरोबर दक्षिणेंत आला होता (स. १६८४). रायगडाच्या खालीं निजामपुरी येथें यानें संभाजीचा पराजय केल्यानें यास औरंगजेबानें गाझीउद्दीन ही पदवी दिली (स. १६८५).

विजापूरच्या वेढ्यांत यानें अजमशाहास रसद पोंचवून त्याची उपासमार थांबविली; आणि शेवटीं याच्याच मार्फत विजापूर खालसा झालें. पुढें याला फिरूजजंग अशी पदवी मिळाली (स.१६८७).

यामुळें मराठ्यांनीं वऱ्हाडांत धूमाकूळ घातला तेव्हां याची वऱ्हाडचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली (स. १७०५). याचाच मुलगा हैद्राबादच्या गादीचा संस्थापक निजामुल्मुल्क होय. बहादुरशाह मोगलाच्या कारकीर्दीत हा गुजराथचा सुभेदार झाला; व पुढें अहमदाबाद येथें स. १७१० मध्यें मृत्यु पावला.

२. (मृ. २६ आक्टोबर स. १७५२) हा निजाम उल्मुल्काचा वडील मुलगा होय. याला निजामानें बादशाहाकडून अमीरुल् उमरा हें पद देऊन यास दिल्लींत ठेविलें. स. १७३९ च्या सुमारास कांहीं दिवस हा दिल्लीचा वजीर होता. निजामाच्या मरणसमयीं हा दिल्ली प्रांताच्या सुभेदारीवर होता (स. १७४८). तेव्हां अर्थातच याचा धाकटा भाऊ नासिरजंग यानें गादी बळकावली.

वरील हकीकत यास समजल्यावर बादशाहाच्या परवानगीनें हा दक्षिणेंत येण्यास निघाला, परंतु वाटेंत औरंगाबादेस याच्या सावत्र आईनें मेजवानीस बोलाविलें व अन्नांत विष घालून याचा वध केला.

३. (स. १७५२ मृ. स. १८०२ ?) हा दुसऱ्या गाजीउद्दीनाचा मुलगा व निजामुल्मुल्कचा नातू होय. हा १७-१८ वर्षांचा असतांना दिल्लींत मीरबक्षीच्या कामावर होता. याजवर सफदरजंगाचें पुत्रवत् प्रेम होतें. गाजीउद्दीनाचा (याचे बापाचा) दक्षिणेंत खून झाला, ही बातमी दिल्लीस येतांच सफदरजंगानें बादशहाकडून यास बापाचे जागीं कायम करून त्यास गाजीउद्दीनखान, अमीरुल् उमरा, इमादउन्मुल्क असे किताब दिले. पुढें बादशहा व सफदरजंग यांचें वांकडें आलें असतां हा बादशहाचे बाजूस होता. त्यामुळें अर्थातच याचें आणि सफदरजंगाचें वांकडें आलें.

कुंभेरीचा वेढा चालू असतां यानें मल्हारराव्याची भेट घेऊन भरतपुरास वेढा दिला. तेव्हां दिल्लीस बादशहा व वजीर खानखानान यांनीं याचे विरुद्ध खटपट चालवून आंतून जाठांशीं पत्रव्यवहार सुरू केला. हें यास कळतांच यानें दिल्लीच्या सभोंवार लुटालूट आरंभिली. मराठ्यांच्या प्रचंड फौजा उत्तरेंत आणण्याचें काम यानें केलें. हा जेव्हां बादशाही तोफखाना घेऊन डीग, भरतपूर, वगैरे किल्ल्यांस वेढे देऊन बसला, तेव्हां बादशहास पस्तावा होऊन त्यानें सफदरजंगास परत बोलावलें. खुद्द बादशहा वजीर खानखानास घेऊन, याचे मदतीचे मिषानें, पण वस्तुतः याचे विरुद्ध सिकंदऱ्यापर्यंत चालून आला. खुद्द बादशहाचेंच पत्र याचे हातीं पडलें तेव्हां यास बादशहाचें सर्व कपट कळून आलें; आणि लगेच हा व मल्हारराव होळकर बादशहाचा पाठलाग करीत दिल्लींत घुसले.

होळकर व याच्या फौजांनीं बादशहास दिल्लींत कोंडिलें. वजीर खानखानान बादशहास सोडून गेला. तेव्हां बादशहानें याची समजूत करण्यासाठीं दरवाजे उघडून यास आंत घेतलें. यानें वाड्यांत मोठा दरबार भरवून खालील भाषण केलें:

'बादशहास राज्य करण्याचें चातुर्य नाहीं. त्याच्या हातून मराठ्यांचा बंदोबस्त होत नाहीं. मित्राशीं त्यानें विश्वासघात केला आहे. तर त्याला पदच्युत करून तयमूरचा दुसरा लायक वंशज तख्तावर स्थापणें हेंच योग्य आहे.'

यानें हा बेत एकदम अमलांत आणिला व बादशाह (अहमदशाह) व ऊधमबाई यांचे डोळे काढून त्यांस यानें कैदेंत टाकिलें, आणि जहांदरशहाचा मुलगा 'आजीजुद्दीन' यास आलमगीर असें नांव देऊन तख्तावर बसविलें (३ जून १७५४). याच वळीं खानखानानाची वजिरी जाऊन ती यास मिळाली. नंतर पुढें यानें बादशहा आलमगीर व खानखानान या दोघांसहि ठार मारलें.

पंजाबचे कारभारावर नेमलेला मीरमन्नू मरण पावल्यावर अबदालीनें मीरमन्नूच्या अल्पवयी मुलाचे नांवानें लाहोर व मुलतान या दोन सुभ्यांचा अंमल नेमून कच्चा कारभार त्याच्या विधवा आईकडे सांगितला. परंतु तो अल्पवयी मुलगा मरण पावला व सर्वच गोंधळ माजला. पंजाब प्रांत जिंकण्यास ही चांगली संधि आहे असें पाहून यानें स. १७५६ च्या आरंभीं लाहोरकडे स्वारी केली. मीरमन्नूच्या मुलीशीं लग्न करण्याचें ठरवून त्या संबधांत यानें सासूशीं पत्रव्यवहार सुरू केला; व पुढें कपटानें मीरमन्नूची स्त्री व मुलगी यांस कैद केलें. पुढें अलीगौहरनें मध्यें पडून उभयतांची गोडी करून दिली.

अबदालीनें तिसऱ्या स्वारींत यास काढून नजीबखानास दिल्लींत प्रस्थापिलें. अबदाली गेल्यावर यास आपल्या शत्रूंचा सूड घेण्यास चांगलेंच फावलें. मराठ्यांच्या मदतीनें यानें नजिबखानास अधिकारावरून काढून स्वदेशीं घालवून दिलें; व आपला अंमल दिल्लींत बसविला. तेव्हां नजीबखानानें अबदालीस परत हिंदुस्थानांत बोलावलें.

स. १७५९ च्या हिवाळ्यांत अबदाली चवथ्यानें इकडे आला; व त्यानें एकामागून एक अशीं पंजाबांतील मराण्यांचीं ठिकाणें घेण्यास सुरुवात केली. तेव्हां हा फारच घाबरला. स्वतःच्या बचावार्थ यानें बादशहास एका साधूच्या दर्शनास म्हणून बाहेर काढून ठार मारविलें.

पुढें दुसरा राजपुत्र सिंहासनावर स्थापून तो स्थिरस्थावर करणार इतक्यांत अबदाली येऊन पोंचला. तेव्हां हा पळून जाठांचे मुलखांत जाऊन राहिला. तेथून कांहीं दिवसांनीं हा दक्षिणेंत आला. परंतु निजामशाहींत यास थारा न मिळतां, मराठ्यांनीं याचे निर्वाहास कालपी येथें जहागीर दिला. येथें हा १८०२ च्या मे महिन्यांत मरण पावला (मु. रि. भा. २ पा. ४२०). याचा मृत्युकाळ निश्चित नाहीं.

वजीर गाजीउद्दीन दत्ताजी पडल्यावर जाठांचे आश्रयास गेला. परंतु तेथें निभाव न लागल्यामुळें दक्षिणेंत येऊन निजामशाहींत व इतर ठिकाणीं कैक वर्षे रानोमाळ गरीब स्थितींत भटकत राहून स. १७९० मध्यें सुरत येथें मरण पावला (म. रि. म. ३, पा. १३२).

पानिपतप्रकरणीं प्रसिद्धीस आलेला निजामुल्मुल्कचा नातू वजीर गाजीउद्दीन यास दिल्लीस वजिरी मिळविण्याची फार उत्कंठा होती. पण आलमगीर बादशाहास मारल्यापासून मुसलमानांपैकीं त्याजवर कोणाचाच विश्वास नव्हता. हा लपूनछपून राहिला नसता तर अल्पावधींत बहुधा प्राणासहि मुकला असता. मराठ्यांनीं याचें पूर्वीचें सख्य स्मरून (माधवरावानें) याचा चांगला परामर्ष घेतला; आणि मृत्यूपूर्वी थोडे दिवस ता. ३०-१०-१७७२ रोजीं याला बुंदेलखंडांत दोन लक्षांची जहागीर नेमून दिली.

सेयरमुताखरीनचा कर्ता लिहितो—

"आलमगीरचा खून केल्यापासून शहाअलम किंवा दुसरा कोणी गाजीउद्दीनचे वाऱ्यास उभा राहत नसे. शेवटीं हा कंटाळून दक्षिणेंत आला. तेथेंहि यास थारा मिळेना, तेव्हां मक्केस जाण्याचा विचार करून हा सुरतेस गेला असतां सन १७७९ त यास इंग्रजांनीं आपल्या आश्रयास ठेविलें" (भाग ३. पृष्ठ ११५). (म. रि. म. भा. ४ पा. ३०६). याची बायको गन्ना ही हिंदुस्तानी कवयित्री म्हणून प्रसिद्ध आहे. हाहि प्रख्यात फार्सी कवि व ग्रंथकार होता.

गाझीउद्दीन हैदर—(स. १८१४-२७) अयोध्येचा नबाब सादतअलीचा पुत्र. हा स. १८१४ त गादीवर आला. यानें पहिल्यानेंच आपल्या नांवाचें नाणें पाडलें. यानें इंग्रजांस नेपाळच्या लढाईच्या वेळीं कांहीं इंग्रजी मुलूख गहाण ठेवून घेऊन दोन कोट रुपये ६ टक्के दरानें व्याजानें दिले. स. १८१९ त दिल्लीचा बादशाहा इंग्रजांशीं अराजनिष्ठ आहे यावरून त्याची बादशाहत कमी करून नबाबास तें पद दिलें, परंतु ही गोष्ट मुसलमानांस आवडली नाहीं; व याला लोकांनीं जुमानलेंहि नाहीं. ब्रह्मदेशाच्या लढाईच्या वेळीं यानें इंग्रजांस आणखी १॥ कोट रुपये कर्जाऊ दिले. यानें इंग्रजांस पैशाची वेळोवेळीं मदत केल्यानें इंग्रजांची याच्यावर बहाल मर्जी होती. हा सन १८२७ त मरण पावला.

गाझी फारुकी—हा खानदेशच्या दाऊद फारुकीचा मुलगा.

गाझी बेग—जयसिंग मीर्झाचा सरदार. आग्ऱ्यास जातांना शिवाजीबरोबर होता (मु. रि. भाग २ रा, पृ. ४२०).

गॉर्डर्ड—(मृ. स. १७८३) हा एक इंग्रज सेनापति असून आपल्या राष्ट्राची सेवा एकनिष्ठेनें करणारा होता (स. १७५९). हा पुढें मद्रास (१७५९-६१). व बंगाल (१७६३) मध्यें होता. पुढें यानें मराठ्यांकडून भडोच घेतलें (स. १७७२). पुढें हा मराठ्यांच्या विरुद्ध हालचाली करीत होता (स. १७७८-८१).

वडगांवच्या तहांत अपमान व नुकसान असे दोन मुद्दे इंग्रजांचे अंतःकरणास झोंबले. त्यामुळें इंग्रजांना वडगांवचा तह रद्द करावा असें वाटूं लागलें. तशा परिस्थितींत दादा

पुन्हां इंग्रजांकडे पळाला व त्यास गॉर्डर्डनें आश्रय दिला. तेव्हां नवीन तह इंग्रजांशीं करावा, असें पुणें दरबारनें ठरविलें. या नवीन तहाचीं पहिली अट नानांनीं अशी घातली कीं, 'प्रथम साष्टी व दादा हे आमच्या हवालीं करा आणि मग तहाचें काय तें बोला.' ही अट गॉर्डर्ड यास पसंत न पडून यानें दादास नानाचे हवालीं करण्याचें नाकारलें. त्यामुळें युद्धास तोंड लागलें.

यानें प्रथम फत्तेसिंगास आपल्या बाजूस वळवून मराठ्यांची बाजू हलकी केली. त्यामुळें याला पुढें गुजराथेवर मोहिम करण्यास सोपें गेलें. ता. ११-१२-१७८० रोजीं चिमाजी आप्पाच्या पराक्रमाचें स्मारक जें वसई तें ठिकाण गॉर्डर्डनें अचानक काबीज केलें; व शेवटीं पुणें दरबारला तह करणें भाग पाडलें. त्याप्रमाणें तहाची वाटाघाट करण्याकरितां हेस्टिंग्जनें याचीच योजना केली. पण शिंद्यांच्या हालचालीमुळें हेस्टिंग्जचें वरील मत बदलून पुढें युद्ध चालू ठेवावें असें त्यानें ठरविलें. पण मद्रासच्या इंग्रज चौकड्यांनीं युद्ध थांबवून तह करण्याचें ठरविलें; व त्याकरितां त्यांनीं गॉर्डर्ड यास तहाची वाटाघाट करण्यास पाठविलें (१७८१).

गार्ग्य नारायण— आश्वलायन गृह्यसूत्रावर वृत्ति लिहिणारा.

गालिब—(स. १७९५-१८३८) एक उर्दू कवि. याचें नांव नजमुद्दौला दबीरुल्मुल्क मीर्जा असदुल्ला खाँ असें असून गालिब हें याचें उपनांव होतें. याच्या बापाचें नांव अबदुल्ला बेग.

उर्दूतील सर्वश्रेष्ठ कवींत गालिबचें नांव पहिलें येतें. यानें प्रथम आपलें उपनांव 'असद' असें ठेविलें होतें. पण पुढें स. १८२७ मध्यें यानें आपलें नांव गालिब ठेवून कवितेंत असद नांवाचा हा उपयोग करी. हा स. १८२९ मध्यें कलकत्त्यास गेला. नंतर हा रामपूर येथें गेला. तेथील नबाबानें याचा सन्मान करून यास २०० रु. दरमहा वेतन दिलें. कारण तेथील नबाब याचा जुना शिष्य होता. पण याला दिल्लीशिवाय चैन न पडल्यामुळें हा थोड्याच दिवसांत दिल्लीस गेला.

हा विनोदप्रिय असून याचा विवाह नबाब इलाही बक्षखाँसाहेब यांच्या कन्येशीं झाला होता. पण यास बायकोपासून सुख लाभलें नाहीं. कारण बायकोचा स्वभाव फार कर्कश होता. याला एकंदर सात अपत्यें झालीं, पण तीं एक एक वर्षाचीं होऊन मेलीं.

हा व्यवस्थितपणाचे बाबतींत फार दक्ष असे. स. १८४१ मध्यें दिल्लीस एक कॉलेज उघडण्यांत आलें. त्यावेळीं तेथें एका फार्सी प्रोफेसरची अवश्यकता होती. गालिबची प्रसिद्धी ऐकून कॉलेजच्या टामसनसाहेबानें यास बोलाविलें. बोलवल्याप्रमाणें हा भेटीस गेला. पण साहेबाच्या दाराबाहेर जाऊन हा उभा राहिला. कांहीं दुसऱ्या कारणामुळें साहेब बाहेर आल्यामुळें त्यास हा बाहेर उभा असल्याचें दिसून आलें. तेव्हां साहेबानें यास बाहेर उभा राहण्याचें कारण विचारलें. 'साहेब माझ्या स्वागतार्थ बाहेर आले नाहींत म्हणून' असें यानें उत्तर दिलें. तेव्हां साहेबानें यास 'आपण नोकरीकरितां आलां आहांत, स्वागताकरितां नाहीं' असें सांगून त्या जागेवर दुसऱ्या इसमाची नेमणूक केली. यावरून याच्या स्वभावाची जाणीव होते.

वास्तविक हा एक फार्सीतील महाकवि होय. तरी पण हा उर्दूमध्येंहि कविता करीत असे. याचें उर्दूतील लिखाण फार थोडें आहे. याच्या काव्यांत अद्भुत आनंद असे. यानें आपली कविता सरळ आणि सर्वसाधारण लोकांना कळेल अशा व्यावहारिक भाषेंत लिहिली आहे. उर्दूमध्यें याचा एक दीवान आहे, परंतु फार्सीमध्यें याचीं बरींच पुस्तकें असून तीं लोकप्रिय आहेत. हा मोठा गुणी आणि उदार होता. याचें व जौकचें कधीं पटलें नाहीं. तरी पण यानें आपल्या कवितेंत जौकची प्रशंसा केली आहे. हा मीर(कवि)चा परम भक्त होता. यानें सौदाचीहि प्रशंसा केली आहे. याचे शिष्य पुष्कळ होते. यानें उर्दू कवितांचा प्रवाह बदलून त्यास आपल्या गुरुभक्तीचा परिचय चांगला करून दिला.

हा गद्यांतहि फार चांगलें लिहीत असे. याचें गद्यांतील लिखाण इतकें चांगलें आहे कीं त्यासारखें गद्य अद्याप उर्दूत कोणींच लिहिलें नाहीं. 'उर्दू-ए-मुअल्ला' हा याचा उर्दू-गद्यांतील प्रसिद्ध ग्रंथ होय. या ग्रंथांत याच्या पत्रांचा संग्रह आहे. याशिवाय 'औद-ए-हिन्दी' हाहि याचा एक दुसरा ग्रंथ होय. उर्दू कवितेंतील याचा तात्त्विक भाग अद्वितीय आहे. यानें कोणाचेंहि अनुकरण न करितां स्वतंत्र रीतीनें कविता केल्या आहेत. याच्या कवितेंतील वर्णनें स्पष्ट असून हृदय-द्रावक आहेत. यानें आपल्या उर्दू 'दीवानां' तील पुष्कळ 'गजला' काढून टाकून तो लहान केला.

याच्या वंशाच्या परंपरेची माहिती इराणच्या बादशहाजवळ मिळते. इराणांतील सर्व कर्तृत्ववान् पुरुष नष्ट झाल्यावर याचे पूर्वज इराण सोडून दिल्लीस आले; व पुढें हिंदुस्थानांतच त्यांनीं आपलें वास्तव्य ठेविलें. म्हातार-

पणी गालिब बहिरा झाला आणि स. १८६८ मध्यें मरण पावला (क. कौ. भा. ४ था).

गावबा—एकनाथाचा एक मंदबुद्धि शिष्य. गोदाकांठच्या एका ब्राह्मणाचा मुलगा. हा पुरणपोळीचा हट्ट घेई म्हणून आईनें याला एकनाथाच्या घरीं पाठविलें. तेथें याला नेहेमीं पुरणपोळी खावयास मिळे. पण याच्या जडपणामुळें एकनाथ या शब्दापलीकडे याचें अध्ययन नव्हतें. पण नाथाच्या घरीं यानें श्रवणभक्ति चांगली केली. त्यामुळें याला अधिकार प्राप्त होऊन युद्धकांडाच्या ४४ व्या अध्यायानंतर भावार्थरामायण पुरें करण्याचें काम नाथांनीं मरतेसमयीं याच्यावर सोंपविलें आणि तें काम यानें चांगल्या प्रकारें पुरें केलें आहे (आजगांवकरकृत एकनाथचरित्र, पा. १०८-१०९).

गाहडवाल घराणें—यशोविग्रह, महीपाल. १ चंद्रदेव (स. १०८५-११००), २ मदनपाल (स. ११००-१११४), ३ गोविंदचंद्र (स. १११४-११५५), ४विजयचंद्र (राज्यपाल,अस्फोतचंद्र) (स.११५५-११७०) ५ जयचंद्र (स. ११७०-११९३), हरिश्चंद्र (स. ११९३-१२००).

या घराण्याचे ताम्रपट व शिलालेख सांपडले आहेत. त्या सर्वांमध्यें या घराण्याचा संस्थापक यशोविग्रह असल्याची एकवाक्यता दिसते. सूर्यवंशांतील व चंद्रवंशांतील राजपुरुष नष्ट झाल्यावर कनोजच्या राज्यावर या घराण्याचें स्वामित्व प्रस्थापित झालें. गाहडवालांच्या पूर्वी जे सूर्यवंशी राजे कनोजला राज्य करीत होते ते गुर्जर प्रतिहार घराण्यांतील असले पाहिजेत (राठोड वंश पाहा).

कनोज येथें या घराण्यांतील चंद्रदेवानें राज्य स्थिर केलें. स. १०३६ मध्यें कनोजला गुर्जर प्रतिहार घराण्यांतील राजा यशपाल राज्यारूढ होता, असें कारा येथील शिलालेखावरून समजतें. या राजाचे मागून या घराण्यांतील जे राजे तक्तनशीन झाले त्यांची माहिती अनुपलब्ध आहे. कदाचित् याच सुमारास चेदीच्या कलचुरी हैहय घराण्यांतील कर्णराजानें कनोजला आपलें राज्य स्थापन केलें असावें व त्याचे मागें भोजराजा राज्यावर आला असावा. कारण बसाही येथील ताम्रपटावर असा मजकूर आहेः " भोजराजा देवस्त्रियांच्या नेत्रांचें अनुरंजन करूं लागला व कर्णराजा स्मृतिशेष झाला, तेव्हां पृथ्वीला शत्रूंचा त्रास झाला. पृथ्वीनें चंद्रदेवाला आपला भर्ता केलें." यावरून कर्ण व भोज राजांचे पश्चात् चंद्रदेव कनोजच्या गादीवर आला असें दिसतें. मात्र यांपैकीं भोज हा माळव्यांतील परमार घराण्यांतील भोज नव्हे. उपरिनिर्दिष्ट 'सूर्यवंशांतील राजघराण्यांतील राजपुरुष व चंद्रवंशांतील राजपुरुष नष्ट झाल्यावर कनोजच्या सिंहासनावर गाहडवाल घराण्यांतील चंद्रदेव विराजमान झाला' असा रहण येथील ताम्रपटांतील मजकुरावरून बोध होतो. गुर्जर प्रतिहार राजे आपली सूर्यवंशांत गणना करीत व कलचूरी हैहय राजे आपली चंद्रवंशांत गणना करीत व माळव्यांतील परमार घराण्यांतील राजे आपल्या वंशाची उत्पत्ति अग्निवंशापासून झाली असें समजतात. म्हणूनच चिंतामणराव वैद्य समजतात त्याप्रमाणें कनोजचा भोजराजा हा माळव्याच्या भोजराजाहून भिन्न असला पाहिजे.

गाहडवाल राजांच्या बहुतेक सर्व ताम्रपटांत करांच्या यादींत 'तुरुष्कदंड' नांवाच्या एका कराचा निर्देश असतो. या शब्दाचे अर्थ विद्वानांनीं अनेक केले आहेत. कोणी त्याचा अर्थ 'सुवासिक किंवा मसाल्याच्या कांड्यावरील कर' असा करतात, कोणी 'तुर्कांपासून संरक्षण करण्याकरितां बसविलेला कर' असा करतात. श्री. वैद्य कनोजच्या राजानें गझनीचे राजाला द्यावयाच्या करभाराकरितां कर असा अर्थ करतात. व्हिन्सेंट स्मिथच्या मतें 'तुर्क लोकांपासून संरक्षण करण्याकरितां हिंदूंकडून वसूल करावयाचा कर' असा या शब्दाचा अर्थ असावा. कोनावच्या मतें 'देशांत वास्तव्य करून राहिलेल्या मुसलमान प्रजेवरील कर' असा अर्थ करावा.

गांगेयदेव विक्रमादित्य कलचुरी—(स. १०१०-३८) त्रिपूरी येथील कलचुरी घराण्यांतील दुसऱ्या कोक्कल कलचुरीचा मुलगा.

जेजा-भुक्ति येथील चंदेल्ल घराण्यांतील विजयपाल राजाचा हा समकालीन होय. याचा निर्देश अल्बेरुनीनें 'डाहलचा राजा' असा केला आहे. हा मोठा पराक्रमी आणि महत्त्वाकांक्षी राजा होता.

गिरमाजी खंडेराव—प. रघूजी भोसल्याचा सरदार. मुधोजी व जानोजी यांच्या तंट्यांत हा जानोजीकडे होता (ना. प्रां. इ. पा. १०६-११६).

गिरिअम्मा—(स. १७५० सुमार) कानडी ब्राह्मण कवयित्री. हेळवनकट्टे या गांवच्या रंगनाथाची ही भक्त असल्यामुळें हिच्या नांवामागें या गांवाचें नांव जोडलेलें असतें. वास्तविक हिचें गांव हरीहराजवळील कोमारनहळ्ळी होय.

ग्रंथः—चंद्रहासकथा, सीताकल्याण, उद्दालककथा. शिवाय हिचीं पुष्कळ पद्यें प्रसिद्ध आहेत (क. क. च. भा. ३ पा. ६९).

गिरिजाबाई—पैठणच्या एकनाथाची पत्नी.

गिरिधर—(जन्म स. १६५३–१७३९) हे शिष्य-परंपरेनें समर्थांपासून चवथे आहेत (वेणाबाई, बहिणाबाई, गिरिधर). हा मूळचा मिरजतासगांवकडे राहणारा, परंतु पुढें गुर्वाज्ञेवरून हा बिडापासून सातआठ कोस असलेल्या ईटगांवीं जाऊन राहिला व तेथेंच याचा मुख्य मठ आहे. याचा जन्म शके १५७७ च्या सुमारास झाला असावा, असें अनुमान निघतें. यास पुत्रसंतान नव्हतें. मात्र एक कन्या होती. यानें काशीयात्रा केली होती. याचा समर्थ-चरित्रपर समर्थप्रताप नांवाचा ग्रंथ महत्त्वाचा आहे. यांत शकसंवत्सर हे आढळत नाहींत, तिथि क्वचित् आढळते; व कथाहि कालक्रमानें दिल्या नाहींत. तथापि श्रीसमर्थांनीं सांप्रदायद्वारां प्रचंड घटना निर्माण करून ती चालविण्याकरितां जे शिष्य प्रान्तोप्रान्तीं नेमिले, त्यांचीं नांवें, त्यांनीं जेथें आपले मठ स्थापिले त्या गांवांचीं किंवा प्रांतांचीं नांवें, त्या शिष्यांचे विशिष्ट गुण किंवा कामगिऱ्या इत्यादिकांविषयीं विश्वसनीय माहिती या ग्रंथांत आहे. आणि त्यांपैकीं बऱ्याच गोष्टी समकालीन कागदपत्रांच्या व ग्रंथांच्या पुराव्यानें खऱ्या ठरत असल्यामुळें व ग्रंथकारहि समकालीन असल्यानें हा ग्रंथ विश्वसनीय ठरला आहे. ' श्रीनिवृत्तिराम ' व ' समर्थप्रताप ' हे याचे दोन ग्रंथ छापून प्रसिद्ध आहेत. याचे एकंदर ४० ग्रंथ उपलब्ध आहेत. त्याशिवाय अभंग, पदें वगैरे फुटकळ कविता बरीच आहे.

यानें पुढीलप्रमाणें ग्रंथ लिहिले:—

१ श्रीग्रंथभावार्थ (श्लोकः दासबोधाचा सारांश), २ ग्रंथान्वय (अभंगः यांत दासबोधाचे वीस दशक व दोनशें समास यांचीं नांवें आहेत), ३ श्रीआत्मानुभव (ओव्या), ४ श्रीदासबोधग्रंथराज–भावार्थ (श्लोक), ५ गुरुमार्ग (अभंग), ६ शिष्यभावार्थ (अभंग), ७ श्रीगुरुआज्ञा (अभंग), ८ श्रीगुरुरूप (अभंग), ९ शिष्य-शासन (अभंग), १० श्रीगुरुदीक्षा (अभंग), ११ श्रीस्वामी-दर्शन (अभंग), १२ श्रीदेवदर्शन (अभंग), १३ श्रीरामरूप (अभंग), १४ श्रीसीतारूप (अभंग), १५ प्राणनाथ (अभंग), १६ योगीराज (अभंग), १७ दीक्षासंवाद (अभंग), १८ साधुसंवाद (अभंग), १९ श्रीगुरुदेवनमन (ओवी), २० देवसंवाद (श्लोक), २१ गुरुगीतार्थ (अभंग), २२ गुरुवाक्यमाला (श्लोक), २३ श्रीशिवरहस्य (श्लोक), २४ लोकस्वभाव (ओवी), २५ श्रीकृष्णकथातरंग (ओवी), २६ हरिलीला (श्लोक), २७ नानापंथ (पदेंः कडवीं), २८ हकिकतवाके (कडवी), २९ काशीयात्राकथन (अभंग), ३० काशीखंड (अभंग), ३१ श्रीसमर्थ-करुणा (श्लोक), ३२ श्रीकरुणाराम (श्लोक), ३३ श्रीकरुणारुद्र (श्लोक), ३४ अद्वरामायण (श्लोक), ३५ मंगलरामायण (श्लोक), ३६ छंदोरामायण (ओव्या), ३७ सुंदररामायण (ओव्या), ३८ संकेतरामायण, ३९ निवृत्तिराम (ओव्या), ४० श्रीसमर्थप्रताप (ओव्या), ४१ स्फुटकविता (श्लोक, पदें वगैरे).

२. (स. १६९६ नंतर) अभंग व पदें केलीं. गुरु दिगंबर श्रीपाद. परमहंसदीक्षा.

३. गुजराथी कवि. हा गुजराथींतील छंदोबद्ध रामायणाबद्दल प्रसिद्ध आहे. याशिवाय, तुळशीविवाह, राजसूययज्ञ, गोकुळलीला, राधाविरह, रणछोडजीनी गर्भो इत्यादि काव्यें वाचनीय असून उपलब्ध आहेत.

गिरिधरकविराय—(जन्म स. १७१२) हिंदी कवि. कुंडलिया नांवाचा एक छंद आहे, त्यामध्यें यानें कविता लिहिली आहे. ' गिरधरका कुंडलिया ' नांवानें याचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. 'खाँई' शब्दानें ज्या कुंडलियेचा प्रारंभ आहे, ती याच्या बायकोची असें मानतात. हा अयोध्या प्रांतांतील होता. अडाणी लोकांच्या तोंडींहि याची कविता आहे. याच्या कवितेच्या लोकप्रियतेचें कारण साधी रचना व तत्त्वप्रतिपादन हें होय (क. कौ. भा. १).

गिरिधर बहादूर—(स. १७१३–१७२८) उत्तर मोगलशाहींत जे थोडे हिंदु कामदार स्वपराक्रमानें प्रसिद्धीस आले त्यांत याच्या कुटुंबाची गणना आहे. हे नागर ब्राह्मण अलाहाबादेकडे राहत होते. यांचे वडील दयाराम व चुलता छबिलाराम, हे दोघे शूर व मुत्सद्दी असून ते बहादूरशहाचा दुसरा मुलगा अजीमुश्शान याच्या पदरीं होते. याचे वडील स. १७१३ च्या सुमारास आपल्या धन्यासाठीं लढून समरांगणीं मरण पावले. अजीमुश्शान मारला गेल्यामुळें छबिलाराम जहांदरशहाचे पक्षास मिळाला. त्यानें यास व गिरिधरास कारामाणिकपूरचा फौजदार नेमलें. येथें यांनीं द्रव्यसंचय करून फौज वाढविली. नंतर हे दोघे फर्रुखसयरला मिळाले. परंतु सय्यदांनीं गिरिधरास दिल्लीस बोलाविलें. स. १७१९ मध्यें छबिलाराम अर्धांगवायूनें मरण पावला. त्या वेळीं चुलत्याच्या उत्तरक्रियेची सबब सांगून हा प्रयागास एक वर्ष राहिला. हा पराक्रमी, अनुभवी व शूर सरदार होता. पुढें याला आणण्याकरितां सय्यदांनीं आग्र्याहून रतनचंद नांवाच्या एका सरदारास पाठविलें. त्याची व याची खाजगी भेट झाली त्यांत गिरिधरानें तीस लाख रुपये व अयोध्येचा सुभा घ्यावा व अलाहाबादचें ठाणें सोडून द्यावें असा तह ठरला.

पुढें याची बदली माळव्यावर स. १७२१ च्या सुमारास झाली. स. १७२४ त माळव्याचा विभाग करण्यांत आला. मंडलोईच्या मार्फत मराठ्यांची फौज माळव्यांत येऊं लागली तेव्हां त्यांचा यांचा सामना जुंपला.त्यांत चिमाजी आपा व मल्हारराव होळकर होते. देवासच्या ईशान्येस सुमारें पन्नास मैलांवर सारंगपूर येथें याचें वास्तव्य होतें. चिमाजीआपानें याजवर अचानक हल्ला करून यास आमझरा येथें ठार मारिलें (स. १७२८ अखेर). उज्जनला एक तट आहे त्यास याच नांव आहे (म. रि. म. १) (दयाबहादुर पाहा).

गुजराथचे राजे—सोलंकी (चालुक्य) राजे १ मूलराज (स. ९६१-९६)—२ चामुंड (स. ९९७-१००९)—३ वल्लभ (स. १०१० याचा भाऊ),—४ दुर्लभ (स. १०१०-१०२१ याचा भाऊ) नागराज-५ भीम १ ला (बा. बकुला, स. १०२१-१०६३)—६ कर्ण (स.१०६३-९३)—७ जयसिंह सिद्धराज (बा. कांचनदेवी,स.१०९३-११४३),(पहिल्या भीमाला दोन पुत्र होते. एक कर्ण व दुसरा खेमराज ऊर्फ हरपाळ) खेमराज ऊर्फ हरपाल-त्रिभुवनपाल—८ कुमारपाल (स.११४३-११७३, कुमारपलाला कीर्तिपाल व महीपाल नांवांचे दोन भाऊ होते.) —९ अजयपाल (महीपालाचा पुत्र.स. ११७३-७६)—१० मूलराज दुसरा (स. ११७६-७८),—११ भीम दुसरा (दुसऱ्या मूळराजाचा भाऊ, स. ११७८-१२४१) १२ त्रिभुवनपाल. यानंतर गुजराथचें राज्य बघेल किंवा बाघेल वंशाकडे गेलें.

बघेलवंश-धवल-अर्णोराज (आनाक किंवा आना), —लवणप्रसाद—वीरधवल (याला तीन पुत्र), वीरम, वीसल व प्रतापमल्ल (कुमारपाल सोलंकीच्या मुलीचा मुलगा)—अर्जुनदेव (स. १२६०-७३ याला पुत्र दोन), रामदेव (स. १२७३) सारंगदेव (स. १२७३-९५) —कर्ण (पत्नी कमलदेवी-मुलगी देवलदेवी-अलाउद्दीन खल्जीनें राज्य घेतलें स. १२९७).

मुसलमान राजे—१ मुजफ्फरशाह (स. १३९६) २ अहमदशाहा (स. १४११) ३ मुहम्मद करीमशाह (स. १४४२) ४ कुतुब्बुद्दीन (स. १४५१) ५ दाऊदशाहा (स. १४५९) ६ महमूदशाह (बेगडा) (स. १४५९) ७ मुजफ्फरशाह (स. १५११) ८ सिकंदरशाह (स. १५२६) ९ (नासिरखाँ) महमूद (दुसरा) (स. १५२६) १० बहादुरशहा (स. १५२६) (दुसरा) ११ मीर मुहम्मदशाहा (फारुकी) (स. १५३७) १२ महमूदशाहा (तिसरा) (स. १५३७) १३ अहमदशहा (दुसरा) (स. १५५४) १४ मुजफ्फरशाहा (तिसरा) (स. १५६१),

गुण कामदेव—हा नेपाळच्या ठाकुरी वंशांतील एक राजा. हा विक्रमदेव याच्या मागून गादीवर बसला. यानें कान्तिपूर वसाविलें. हेंच सांप्रतचें खाटमांडू होय. हें शहर स. ७२३ या वर्षी वाग्मती व विष्णुमती या नद्यांच्या संगमावर वसाविलें. त्याचप्रमाणें थांबेल हें खेडेगांवहि (या ठिकाणीं विक्रमाचा विहार व इतर पुष्कळ देवळें आहेत) या शहरानजीकच वसलें आहे. यानें एकूण ५१ वर्षे राज्य केलें.

गुणचंद्रगणि—एक जैन लेखक. स. १०८२ मध्यें यानें महावीरचर्यम् नांवाचा एक प्राकृत ग्रंथ लिहिला (विंटरनिट्झ--हिस्टरी ऑफ् संस्कृत लिटरेचर, भाग २).

गुणधर्म—(स. ८८६-९१३) कानडी कवि. हा महेंद्रांतक ही पदवी धारण करणाऱ्या गंग राजाच्या पदरी होता. यानें हरिवंश किंवा नेमिनाथपुराण आणि शूद्रक या नांवांचे ग्रंथ लिहिले.

गुणभद्र—(स. ४२०-४७९) एक बौद्ध भाषांतरकार. यानें स. ४३५-४६८ च्या दरम्यान रत्नकरंडसूत्र याचें चिनी भाषेंत भाषांतर केलें. तसेंच 'सुखावती व्यूह' व 'लंकावतार' (स. ४४३) या ग्रंथांचींहि चिनीमध्यें भाषान्तरें केलीं (विंटरनिट्झ-हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर, भा. २).

२. (स. ८१५ सुमार) जैन लेखक. हा व याचा गुरु जिनसेन या दोघांनीं मिळून त्रिषष्टिलक्षणमहापुराण अथवा महापुराण हा ग्रंथ लिहिला. यांत आदिपुराण व उत्तरपुराण असे दोन भाग असून त्यांपैकीं आदिपुराणांतील पांच प्रकरणें व संपूर्ण उत्तरपुराण गुणभद्रानें लिहिलें आहे. याशिवाय यानें 'आत्मानुशासन' या नांवाचें एक नीतिपर काव्यहि लिहिलें आहे (विंटरनिट्झ-हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर, भा. २).

गुणरत्न—(ग्रंथकाल स. १४०९) हा जैनधर्मी श्वेतांबरपंथी असून तपगच्छ शाखेचा होता. यानें 'सद्दर्शनसमस्या' या ग्रंथावर 'सद्दर्शनसमुच्चयवृत्ती' अथवा ' तर्करहस्यदीपिका ' नांवाची टीका लिहिली आहे. या टीकेंत यानें ' न्याय ' व इतर पद्धतींचें सुंदर विवरण केलें आहे. यानें ' क्रियारत्नसमस्या ' नांवाचा आणखीहि एक ग्रंथ लिहिला आहे.

संवत् १४९६ म्हणजे स. १४३९ त रत्नशेखरसूरीनें आपल्या 'श्राद्धप्रतिक्रमणसूत्रवृत्ती' मध्यें याचा निर्देश केला आहे. हा देवसुंदर्सनाचा शिष्य असून सं. १४२० म्हणजे स. १३६३ मध्यें अनहलिपट्टण येथें यास सूरी हें पद प्राप्त झालें. त्यावरून हा स. १३६३ ते १४३९ च्या दरम्यान होऊन गेला असला पाहिजे. गुणरत्नाचा गुरु देवसुंदर सूरी हा, सं. १४६६–स. १४०९ त होऊन गेलेल्या 'गुर्वावली' ग्रंथाचा कर्ता मुनिसुंदरसूरीचा समकालीन होता. 'क्रियारत्नसमस्या' हा ग्रंथ मी सं. १४६६ म्हणजे स. १४०९ मध्यें लिहिला असें हा स्वतःच म्हणतो.

यानें आपल्या सद्दर्शनसमुच्चयांत शौद्धोदनि, धर्मोत्तराचार्य अर्चत, धर्मकीर्ति, यज्ञाकार, कमलशील, दिङ्नाग व इतर बुद्धतत्त्वज्ञानी तसेंच तर्कभाषा, हेतुबिंदु, अर्चततर्कटीका, प्रमाणवार्तिक, तत्त्वसंग्रह, न्यायबिंदु, न्यायप्रवेश, व इतर बुद्ध ग्रंथ यांचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें 'न्याय' या भागांत हिंदु तत्त्वज्ञानी अक्षपाद, वात्स्यायन, उद्योतकर, वाचस्पति, उदयन, श्रीकंठ, अभ्यतिलकोपध्याय, जयंत, व तसेंच न्यायसूत्र, न्यायभाष्य, न्यायवार्तिक, तात्पर्यटीका, तात्पर्यपरिशुद्धि, न्यायालंकार, न्यायालंकारवृत्ति इत्यादि ग्रंथांचा उल्लेख आला आहे. भासर्वज्ञाचें न्यायशास्त्र व त्यावरील न्यायभूषण, न्यायकलिका, न्यायकुसुमांजलि, इत्यादि १८ टीकांचाहि निर्देश यांत केलेला आहे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ५२–५३).

गुणवंताबाई भोसले—ही इंगळे यांची कन्या व शिवाजीमहाराजांची आठवी पत्नी. हिचें लग्न शके १५७९ वैशाख शु. १२ (ता. १५ एप्रिल १६५७) या दिवशीं झालें (शिवाजी-निबंधावली, पा. २१०–२२५).

गुणविजयगणि—(हेमविजयगणि पाहा).

गुणविष्णु—(स. ११०० नंतर सुमार) यानें केलेलें छांदोग्यमन्त्रभाष्य प्रसिद्ध आहे. हा गौडाधिप बल्लाळसेन व लक्ष्मणसेन यांच्या सभेंत होता. इंडिया ऑफिसमध्यें असलेल्या छांदोग्य मन्त्रभाष्याच्या पुस्तकांत हा भट्टदामुकाचा मुलगा असें लिहिलें आहे (Vol. I, p. 47). सतराव्या शतकांतील वंग देशांतील टीकाकारानें कांहीं मंत्रांवर विनियोगाबद्दल अनिरुद्ध भट्टाचा व मंत्रभाष्यकार म्हणून गुणविष्णूचा निर्देश केलेला आढळतो. बल्लाळसेनाचा गुरु अनिरुद्धभट्ट व हा हे दोघे समकालीन होते. अनिरुद्धाची पितृदायिता व त्याचें भाष्य हें दोघांनीं एकमेकांच्या विचारानें लिहिलें आहे. स. च्या १२ व्या शतकांत हे दोघेहि बल्लाळसेनाच्या सभेंत होते (छान्दोग्यमंत्रभाष्याची इंग्रजी प्रस्तावना पाहा).

सामवेदाच्या नित्यकर्मसंस्कार वगैरेंत येणाऱ्या मंत्रांवर यांचें थोडक्यांत भाष्य आहे. पाणिनीय व्याकरणाचा यानें आश्रय केला आहे. स. १६ व्या शतकांतील रघुनन्दभट्टानें आपल्या स्मृतितत्त्वांत याचा वारंवार उल्लेख केला आहे. सतराव्या शतकांत विद्यावाचस्पतीनें, 'षट्कर्मव्याख्यानचिंतामणि' करणाऱ्या नित्यानंदानें व शत्रुघ्नानें याचा उल्लेख केलेला आहे.

गुणाकर पंडित—यांचें उपनांव काटे. गुणाकर अशी यास पदवी होती. थोरले शाहूमहाराजांची यावर फार कृपा होती. सिद्ध गुणाकरानें कपिलानिर्णय नांवाचा संस्कृत गद्यग्रंथ लिहिला तो याचाच असावा (मं. श. १८३५ वा. इ. ले. ७९).

गुणाढ्य—(स. खि. पूर्व चवथें शतक सुमार) याची जन्मकथा ही एक मासलेवाईक कथा असून ती पुढीलप्रमाणें आहे:

"प्रतिष्ठान प्रांतांत सुप्रतिष्ठित म्हणून एक नगर आहे. तेथें सोमशर्मा नांवाचा कोणीएक उत्तम ब्राह्मण होता. त्यास वत्स व गुल्मक असे दोन पुत्र व श्रुतार्था नांवाची तिसरी कन्या, अशीं तीन अपत्यें होतीं. कांहीं कालानें भार्येसह तो ब्राह्मण मरण पावला. तेव्हां त्या दोघां पुत्रांनीं आपल्या भगिनीचें पालनपोषण केलें. पण एकाएकीं ती कन्या गर्भवती झाली. तेव्हां तेथें दुसरा कोणी पुरुष नसल्यामुळें त्या दोघां बंधूंस परस्परांविषयीं शंका आली. परंतु श्रुतार्था फार शहाणी होती. तिला आपल्या भावांची वृत्ति साशंक झाली आहे, असें समजलें व त्याबरोबर ती न विचारतांच त्यांस म्हणते–'तुम्ही मजविषयीं पापशंका करूं नका. मी तुम्हांस खरा प्रकार सांगतें. कुमार कीर्तिसेन या नांवाचा नागराज वासुकीचा पुतण्या आहे. मी स्नानाला गेलें असतां त्यानें मला एकदां पाहिलें व त्याचें चित्त कामासक्त झालें. त्यानें आपलें कुल व नांव सांगून गांधर्वविधीनें माझ्याशीं लग्न लाविलें.' पण भगिनीचें तें भाषण ऐकून, 'तूं सांगतेस तें खरें कशावरून' असें विचारलें, तेव्हां तिनें त्या नागकुमाराचें स्मरण केलें. त्याबरोबर तो प्रत्यक्ष पुढें आला आणि त्यांस म्हणाला "हिला मीं आपली भार्या केली आहे, व त्यामुळें ही सुरसुंदरी शापापासून मुक्त झाली आहे. हिला पुत्रच होईल व त्याचा जन्म होतांच तुम्हीं दोघेहि शापापासून मुक्त व्हाल.' असें सांगून तो गुप्त झाला. पुढें कांहीं दिवसांनीं श्रुतार्था प्रसूत झाली व तिला पुत्र

झाला. तोच मी आहें असें समज. मी जेव्हां जन्मास आलों तेव्हां, हा गुणवंतांचा अवतार झाला आहे, असें आकाशवाणीनें सांगितलें. तें ऐकून माझ्या बांधवांनीं माझें गुणाढ्य असें नांव ठेविलें. माझ्या उत्पत्तीनें माझ्या आईचा व मामांचा शाप क्षीण झाला व तीं दोघेंहि कांहीं कालानें मरण पावलीं. त्यामुळें मला फार दुःख झालें व माझें सर्व धैर्य गळालें." "पण प्रसंगच पडला म्हणजे सर्व प्राणी तो सहन करण्यास सिद्ध होतात या न्यायानें मीं आपल्या शोकाचा त्याग केला आणि मी जरी लहानच होतों, तरी ईश्वरावर सर्व विश्वास टाकून विद्या संपादन करण्याकरितां दक्षिण देशांत एकटाच गेलों. योग्य गुरूजवळ राहून सर्व विद्या शिकलों. त्यामुळें माझी प्रसिद्धी झाली. पण मित्रा, जन्मभूमीचें प्रेम कांहीं अवर्णनीय असतें. मला परदेशांत बरें वाटेना म्हणून मी आपल्या देशांत परत आलों. माझे गुण सर्वांच्या अनुभवास येऊं लागले. माझ्या विद्येवर लुब्ध होऊन पुष्कळ शिष्य मजबरोबर आले होते. त्यांच्यासहवर्तमान मी फार दिवसांनीं प्रतिष्ठानांत प्रवेश केला व तेथें मला अवर्णनीय शोभा दिसली."

हा शालिवाहन राजाचा एक मंत्री. यानें उदयनाच्या गोष्टी असलेलें पैशाची भाषेंत लिहिलेलें बृहत्कथा नांवाचें पुस्तक काणभुती नांवाच्या पिशाचाच्या सांगण्यावरून राजास अर्पण केलें. परंतु राजा असलें घाणेरडें पुस्तक घेईना, तेव्हां यानें त्यापैकीं कांहीं भाग जाळून टाकले. नंतर कांहीं दिवसांनीं राजाला या पुस्तकाची महती कळल्यावर त्यानें याजजवळ मागितलें म्हणून यानें याच्याजवळ शिल्लक असलेला शेवटला भाग फक्त त्यास दिला. सध्यां पैशाची भाषेंतील बृहत्कथा उपलब्ध नाहीं. यानें राजाला संस्कृत व्याकरण ६ वर्षांत शिकवण्याचें कबूल केलें होतें .(कथासरित्सागर २. ८). पुढें सोमदेवानें बृहत्कथेचें कथासरित्सागर नांवानें संस्कृतांत भाषान्तर केलें. तसेंच क्षेमेंद्रानें बृहत्कथामंजरी यावरूनच लिहिली. मूळ सोमदेवाच्या ग्रंथाचा काल स. चें दुसरें शतक होय. पैशाची ही त्या वेळच्या पर्शियन सम्राटाची भाषा होती. सध्यां देशभाषा सोडून इंग्रजी भाषेंत जसे ग्रंथ लिहितात तसें त्या वेळींहि झालेलें आहे.

गुणानन्दविद्यावागीश– (स. १५७० सुमार) जैनतर्कज्ञ यशोविजयगणि (स. १६०८-१६८८) यानें आपल्या 'न्यायखंडनखाद्य' या ग्रंथांत याजवर टीका केली आहे. स. १६२२ त याच्या एका ग्रंथाची नक्कल करण्यांत आली. यावरून हा स. १६२२ पूर्वी होऊन गेला असला पाहिजे. त्यानें रघुनाथशिरोमणीच्या ग्रंथावर टीका लिहिल्या असून तो त्याच्या बराच मागाहून होऊन गेला. हा स. १५७० च्या सुमारास होऊन गेला असावा. यानें खालील ग्रंथ लिहिले आहेत:—

(१) 'अनुमानदीधितिविवेक' (२) 'आत्मतत्त्वविवेकदीधितिटीका' (३) 'गुणविवृतिविवक' (४) 'न्यायकुसुमांजलीविवेक' (५) 'न्यायलीलावतीप्रकाशदीधितिविवेक' (६) 'शब्दालोकविवेक' (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४६८).

गुणांक—चालुक्यांपैकीं तिसऱ्या विजयादित्याचें नामान्तर.

गुप्त—(स. ११७५ पूर्वी) हा गुप्त घराण्यांतील महागुप्ताचा मुलगा होय. हा चालुक्यांचा मांडलीक राजा असावा. यांचें म्हैसूर प्रांतांत राज्य होतें.


२. (स. ११८२ पूर्वी) हा गुप्तांपैकीं पहिल्या वीर विक्रमादित्याचा मुलगा. हा आपल्या भावानंतर गादीवर आला. बायको पद्मलादेवी.

३. (स. १२६२-६५) हा गुप्तांपैकीं तिसऱ्या विक्रमादित्याचा मुलगा. महादेव यादवाचा जहागीरदार.


गुप्तघराणें—१ महागुप्त, २ गुप्त १ ला, ३ मल्ल किंवा मल्लिदेव (स. ११७५ गोविंदराजाचा मांडलिक), ४ (वीर) विक्रमादित्य १ ला, ५ जोम्म किंवा जोयिदेव (स. ११८१, आहवमल्ल कलचुरीचा जहागिरदार), ६ गुप्त २ रा (बा. पद्मलादेवी), ७ विक्रमादित्य २ रा (आहवादित्य, बा. पत्तलादेवी स. ११८२-१२१३), ८ जोयिदेव २ रा (स. १२३८ सिंघण यादवाचा जहागिरदार), ९ विक्रमादित्य ३ रा (बा. मैलालदेवी), १० गुप्त ३ रा (स. १२६२-६५, महादेव यादवाचा जहागिरदार). हे माळव्यांतील गुप्तांचे वंशज असावेत. हें घराणें धारवाड जिल्ह्यांतील गुप्तव किंवा गुप्तवोळल येथें राज्य करीत होतें (सिवेल आणि आयंगार, पृ. ३५०).

गुप्तघराणें (सम्राट् पाटलीपुत्र)

श्रीगुप्त
|
घटोत्कच महाराजगुप्त
|
१ चंद्रगुप्त (स. ३१९-३३६)
|
काच २ समुद्रगुप्त (स. ३३६-३८०)
|
रामगुप्त ३ चंद्रगुप्त २ रा (स. ३८०-४१३)



२. गुप्त घराणें (माळवा)



(मौखरी E. A. PIRES, M. A. कृत)

गुमान मिश्र—(काव्यकाल स. १७४३) हिंदी कवि. यानें अली अकबरखाच्या आज्ञेवरून नैषधकाव्याचा हिंदींत अनेक छंदांत अनुवाद केला (क. कौ. १).

गुरदीन पांडे—हिंदी कवि. यानें स. १८०२ मध्यें बागमनोहर नांवाचा ग्रंथ लिहिला. त्यांत अनेक छंद व साहित्यविषयक गोष्टींचें वर्णन केलें आहे.

गुरवमिश्र—दिनाजपुर येथील गरुडस्तंभावरच्या लेखांतील २५-२६ व्या ओळींत याला 'कलियुग वाल्मिकी' असें म्हटलें आहे. यानें वेदावर भाष्य लिहिल्याचाहि उल्लेख आहे. नारायणपाल देवाच्या ताम्रशासनांतहि याच्या वेदज्ञानाचा उल्लेख आहे (गौडलेखमाला, पृ. ६२). हा स. च्या १० व्या शतकांत पाल वंशांतील नारायणपाल देवाचा प्रधान होता. याचा पणजा दर्भपाणि व बाप केदारमिश्र हे वेदवेत्ते असून क्रमानें देवपाल व शूरपाल यांचे प्रधान होते (संस्कृतसाहित्यपरिषद, १५. १०).

गुरु गोविंदसिंह—(स. १६६५–१७०७) हा शिखांचा दहावा गुरु होय. याच्या बापाचें नांव गुरु तेजबहादूर आणि आईचें नांव गूजरी असें होतें. याचें लग्न वयाचे ७ वे वर्षी लाहोरच्या हरिवंश खत्री यांच्या मुलीशीं झालें होतें.

विचारक्रांतीनें राज्यक्रांति घडवणारा थोर पुरुष म्हणून याची कीर्ति आहे.

एके काळीं हा हिंदुजातीचा ढालीप्रमाणें संरक्षक होता. यानें हिंदुजातीचें आणि धर्माचें संरक्षण करण्याकरितां वीर-जात निर्माण केली. हा विद्वानांचें आदरातिथ्य चांगल्या प्रकारें करी. हा स्वतः मेधावी, देशकालज्ञ, आणि रणनिपुण होता.

एक हिंदी कवि म्हणूनहि याला मोठा मान आहे. हा संस्कृत व फार्सी भाषेंत विद्वान् असून हिंदी कवि होता. यानें जाप, सुनीतिप्रकाश, ज्ञानप्रबोध, प्रेमसुमार्ग, बुद्धिसागर, विचित्रनाटक आणि ग्रंथसाहेबांतील कांहीं भाग असे ग्रंथ लिहिले (क. कौ. भा. १ ला).

सर्वलोहप्रकाश, चंडीचरित्र हे ग्रंथहि याचेच आहेत. हा सुंदर व्रजभाषा लिहीत असे. 'सप्तशती' नांवाचा सुप्रसिद्ध संस्कृत ग्रंथ यानें हिंदी भाषेमध्यें 'चंडीचरित्र' या नांवानें गुंफला आहे (शब्दसागर–प्रस्तावना).

हा धोरणी व चलाख असल्यामुळें याच्यापासून शीखपंथांत नवीन मन्वंतर सुरू झालें. यानें लष्करी शिस्तीचें महत्त्व समजावून देऊन एक नवीनच प्रजासत्ताक मंडळ स्थापिलें. केस, लोखंडी कडे, कंगवा, कच्छ (चोळणा) व कट्यार असे पंचकनें आरंभणारे पांच पदार्थ धारण करावे असा शिखांना नियम घालून दिला. अनेक नियम तयार करून शिस्त राखण्याचा प्रयत्न केला. गोवध-बंदी करून हिंदूंचीहि सहानुभूति संपादन केली.

आदिग्रंथाचा 'दसम पादशाहीं' म्हणून जो विभाग आहे तो गुरु गोविंदसिंगाचा असून जहाल शीख त्याला मानतात. यानें 'खालसा' म्हणजे 'एकी' हा अर्थ लोकांना पटवून दिला. गुरुमता नांवाचें एक मंडळ स्थापिलें.

'दसम पादशहाका ग्रंथ' यामध्यें 'विचित्र नाटक' ही १४ भागांची पद्यरचना दिली आहे. हा ग्रंथ गुरु गोविंदसिंहानंतर २६ वर्षांनीं भाई मणिसिंह यांनीं प्रकाशित केला. जुन्या हिंदींत हा ग्रंथ असून त्यांत संस्कृत व फार्सी शब्द आले आहेत. यांत सोढी वंशाचा उगम रघुवंशापासून झाला असल्याचें दिलें आहे. लवानें लाहोर आणि कुशानें कसूर हीं शहरें स्थापिलीं. कुशवंशीय कालकेट हा बलवान् असल्यामुळें लववंशीय कालराय याला त्यानें हाकून दिलें. तो सानौध देशांत गेला. तेथें त्यानें एका राजकन्येशीं लग्न केलें. त्याला सोधीराय हा मुलगा झाला. हाच सोढी-वंशाचा मूळ पुरुष. याच वंशीय लोकांनीं पुढें पंजाब घेऊन कुशवंशीयांस हांकून दिलें; व ते बनारसला पळून गेले. तेथें ते वेदपारंगत झाले म्हणून त्यांस वेदिस् नांव मिळालें. ह्या गतगोष्टींनीं उत्पन्न झालेला रोष शमविण्यासाठी पंजाबच्या सोढी राजानें वेदिसला परत बोलाविलें. राजानें त्यांना वेद म्हणण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें त्यांनी वेद म्हटले. त्यावर राजा खूष होऊन त्यानें आपलें सर्वस्व त्यास दिलें. ह्या वेळीं संतुष्ट होऊन वेदिसचा मुलगा त्या राजाला म्हणाला, "मी ज्या वेळीं नानक म्हणून कलियुगांत अवतार घेईन त्या वेळीं तुला जगन्मान्य करीन. आणि तूं त्या वेळीं लोकोत्तर होशील." ज्या वेळीं गुरु अमरदासानें रामदास सोढीला गुरुपद दिलें त्या वेळीं हें वचन सत्य झालें. तेथून पुढें गुरुपद वंशपरंपरा सोढी घराण्यांत राहिलें.

शेवटचा गुरु गोविंदसिंहानें आपल्या कार्याचें दिग्दर्शन केलें आहे. पूर्वजन्मीं यांनीं हेमकूट पर्वतावर तपश्चर्या केली तेव्हां परमेश्वरानें यांस कलींत जन्म घेण्याची आज्ञा केली. तेथें यांची इच्छा नसतांना केवळ ईश्वराज्ञेनें यांस यावें लागलें. धर्मसंस्थापना करण्यासाठीं हा जन्म यांनी घेतला. यांना नानकाचे शिष्य अगर नानकाचे वंशज यांचें अस्तित्व मान्य आहे. पहिल्याला धार्मिक व दुसऱ्याला राजकीय महत्त्व आहे.

या विचित्र नाटकामध्यें युद्धाच्या वेळीं आवेश आणण्याच्या दृष्टीनें वीररसाचा भरणा केलेला आहे. भागवताच्या दशमस्कंधांतील कृष्णाच्या शौर्याच्या कृत्यांचें वर्णनहि यांत केलें आहे. चंडीचीहि त्यांत स्तुति दिलेली आहे.

भाई सुखासिंहाचें 'गुरुविलास' आणि भाई संतोखसिंहाचें 'सूरजप्रकाश' यांत गोविंदसिंहाचें चरित्र सांपडतें. आनंदपुरांत गोविंदसिंह बरेच दिवस राहिले होते.

गुरुबक्षसिंह हा एक यांचा पट्टशिष्य होता (हि. का. १. ५१-६१).

मुसलमान होईना म्हणून अत्यंत क्रूरपणें तेजबहादरचें शिर धडापासून वेगळें करण्यांत आलें. तेव्हां आपली शक्ति वाढविण्याचा यानें निश्चय केला. वीरवृत्तीचा उपदेश देण्यास सुरुवात केली, आणि तलवार, घोडे वगैरे युद्धसाहित्यच गुरूला भेट देण्याविषयीं सांगितलें. आणि स्वतःहि साधूचा वेष सोडून बादशाही थाटानें राहण्यास सुरुवात केली. गोवधबंदी करून धर्मरक्षक अशी पदवी धारण केली; आणि एकीचा सर्वांना उपदेश करून हिंदुमात्राचा विश्वास संपादन केला. राम, भरत, भीष्म, अर्जुन आणि भीम यांचा आदर्श डोळ्यापुढें ठेवण्याविषयीं हा उपदेश करी; चंडीची उपसना लोकांना करावयास सांगे आणि चंडीचा साक्षात्कार म्हणून आपल्या हातांतील नंगी तलवार दाखवी. दयाराम खत्री, धर्मा जाट, हिम्मत कहार, साहेबा नापित आणि मोहकम धोबी हीं पांच माणसें देवलिा बळी जाण्यास तयार झालीं. त्यांना यानें आपल्या बरोबरीचा अत्यंत मोठा मान दिला; आणि जातपात न मानतां धर्माकरितां मरण्याला लोकांना उत्तेजन देऊन लोक तयार केले.

यानें आपल्या संप्रदायाचें नांव खालसा म्हणजे एकी असें ठेवलें आणि प्रत्येकाला नांवाचे आणि खरोखरीचे सिंह बनवले. मुसलमानांशीं याचीं युद्धें सुरू झालीं तेव्हां अनेक प्रसंगांतून हा सुरक्षित पार पडला. पण याचीं दोन मुलें युद्ध करतांना पडलीं आणि शिखांचा सर्व संहार होण्याची वेळ आली तेव्हां हा मुसलमानी वेष पत्करून पळाला. वाटेंत एका ठिकाणीं मुसलमानांबरोबर जेवण करून याला आपले प्राण वांचवावे लागले. दुसरीं दोन मुलें चिणून ठार मारलीं गेलीं. त्या दुःखानें याची माता गुजरी हिनें तुरुंगाच्या खिडकींतून उडी टाकून प्राण दिला (बंदा पाहा). शेवटीं हे दक्षिणेंत नांदेड येथें शांततेनें दिवस घालवीत असतां मारले गेले.

एके दिवशीं रात्रीं अताउल्ला आणि त्याचा भाऊ गूल खाँ या दोघां पठाणांनीं मिळून, गुरु गोविंदसिंहाच्या पोटांत झोपला असतांना कट्यार भोंसकली. कारण गोविंदसिंहानें त्या पठाणाच्या बापास लढाईत मारिलें होतें. कट्यार भोंसकल्यामुळें गोविंदसिंह जागा झाला, आणि तलवार घेऊन एका घावांत गुलखाँचे दोन तुकडे केले.

पण याला (गोविंदसिंह) झालेल्या जखमेंतून अधिक रक्त गेल्यामुळें याचाहि तेथेंच प्राण गेला. हा सर्व प्रकार गोदावरीच्या कांठीं अविचल गांवीं नांदेड-पाशीं झाला.

गुरुदास—हे शिवरामस्वामींचे गुरुबन्धु. यांचे गुरु पूर्णानन्द (नारायण). ग्रंथ-गुरुबोध, तारकबोध, श्रीकृष्ण-दर्शनविलास, श्रीनाथद्वादशमहावाक्यविलास (सं. सू.).

गुर्जरभक्त—हा नामदेवाचा गुजराथमधील तद्देशीय अनुयायी होय.

नामदेवानें आपल्या भक्तिज्ञानाच्या उपदेशाचा वर्षाव याच्यावर केला, त्यामुळें यानें कृतज्ञतेनें नामदेवाचीं स्तुतिस्तोत्रें गाऊन स्वतःस कृतार्थ मानून घेतलें. नाम-देवाचे चमत्कार गुर्जर-वाङ्मयांत घुसले आहेत. गुर्जर-भक्त नरसीचे हृदयांत भक्तीची लागण करून पुनः जोपासनेची जोखीम उचलणारा महाभाग महाराष्ट्रांतील एक वारकरी भक्तच होता. गुर्जर नांवाचे दोन भाऊ होते. ते दोघेहि नामदेवाचे अनुयायी होते. त्यांपैकीं एक भक्त व दुसरा कवि होता (मं. त्रै १८४७-४८ पृ. ८९९).

गुर्जर शिव व्यास—(स.१४०३ सुमार) एक महानु-भाव. हे कवीश्वर आम्नायांतील अचळ मुरारीमल्लाचे शिष्य. यांचें पूर्वाश्रमींचें नांव शिवपाळ असून हे श्रीचक्रधर वंशांतील सहावे पुरुष होत. यांच्या पित्याचें नांव धर्मपाळ. हे गुजराथेंतून पैठण येथें आले. यांचा पुतण्या संगपाळ सोंगेराजव्यास या नांवानें प्रसिद्ध झाला.

यांनीं बरींच सांप्रदायिक व धार्मिक रचना केली. यांनीं धाराशिवकर ओंकारव्यास यांचे शिष्य सिद्धान्ते हरि व्यास यांच्या साहाय्यानें श्रीचक्रधराच्या मुखांतून निघा-लेल्या सूत्ररूप वाक्यांचा आधार घेऊन शके १३२५ च्या सुमारास तिन्ही स्थळांची बांधणी केली. प्रथम सूत्र, त्यावर टाचण म्हणजे भाष्यलापिका अशी रचना आहे (म. वा. इ. भा. २. २७४).

गुलझारखान—(स. १७७५-८४) याच्या बापाचें नांव मीरखान. थोरले बाजीरावाच्या हा फौजेंत सरदार होता. त्यास चोपडें परगण्यांत पन्नास हजा-रांचा सरंजाम फौजेकरितां दिलेला होता. त्याचा हा मुलगा होय. स. १७७५ च्या सुमारास यानें खान-देशांत केलेल्या बंडाळीची हकीकत वाचण्याजोगी आहे. हा रनाळ्याचा असून यानें कैक दिवस दादाचे तर्फेनें दंगल माजवून दिली होती.

यानें राघोबादादास चांगलीच मदत केली. स. १७७९ मध्यें हा सातपुड्याचे जंगलांत मोठ्या जमावानिशीं होता. यानें पाटलाजवळून खंड घेऊन गांवें लुटलीं. एकदा चोपड्याचे गढीवर यानें छापा घालून कांहीं लोक ठार मारले. याप्रमाणें याची बंडाळी स. १७८२ त दादा ठिकाणीं बसेपर्यंत कमीजास्त प्रमाणांत चालली होती. याच्या पारिपत्याची मसलत नानानें लगोलग सुरू केली. विसाजीपंत आठवले, भगीरथराव शिंदे वगैरेसहि याजवर जाण्याचा हुकूम होता. त्याप्रमाणें त्यांनीं याजवर स्वारी करून याचा पराभव केला. तेव्हां हा पळून गेला. यानें पुष्कळ ब्राह्मणांस मारून कैद केलें. पुढें हा, धारकर खंडेराव पवार व चंद्रराव पवार असे दादाचे साहाय्यास सुरतेस गेले.

स. १७८० च्या सुमारास शिंदे-होळकर माळव्यांत गेल्यावर हा बीजागडच्या डोंगरांत भिल्लांचा जमाव करून राहिला. यानें अहिल्याबाईस पत्रें लिहिलीं कीं, 'श्रीमं-तांनीं कृपा करून बापरोटी विभागून द्यावी, आणि मजला चाकरी सांगावी.' त्याप्रमाणें बाईनें पुण्यास लिहून पाठ-विलें. तें जुळलें नाहीं, तेव्हां अहल्याबाईनें याजवर फौज पाठविली. अहल्याबाईचे मदतीस पेशव्यांची फौज गेली होती. शेवटीं त्या लढाईंत याचा पराभव झाला.

एक एक बंडखोर नाहींसे झाले तेव्हां हा उघडा पडला, त्याबरोबर यानें भुणेकर कारभाऱ्यांशीं सल्ला करून आपला बचाव केला. हा पुढें निजामशाहींत गेला. हा पुनः नोकरींत पेशव्यांकडे येण्याची खटपट स. १७८४ त करीत होता. त्यापुढें याचें नांव येत नाहीं (म. रि. उ. रि. १).

गुलाबराम—(स. १७९२-९३) पेशव्यांचा कलकत्त्याचा वकील. सेवकरामाचा दुसरा पुत्र.

गुलाम मुस्तफा कुलीखाँ—(यकरंग पाहा).

गुलाम हमदानी—हा मसहफी या नांवानें प्रसिद्ध आहे.

गुलाम अली हिंदू-शाह—(स.१५८८सुमार) प्रसिद्ध इतिहासकार फिरिस्ताचा बाप. याचें मूळ गांव कॅस्पिअन समुद्राच्या किनाऱ्यावर असणारें अस्त्राबाद होय.

हा फार विद्वान् होता. हा आपली मातृभूमि सोडून प्रवास करीत हिंदुस्थानांत आला. हिंदुस्थानांत आल्यावर अहमदनगरच्या पहिल्या मुर्तजा निजामशाहीनें यास आपला मुलगा मिरान हुसेन याला फार्सी शिकविण्या-करितां ठेविलें. अशा प्रकारें याची चांगल्या जागेवर नेम-णूक होऊन थोडे दिवस होतात न होतात तोंच हा मरण पावला. याच्या मृत्यूनंतर फिरिस्ता हा विजापूरच्या दिलावरखानाच्या आश्रयास गेला (बील).

गुलाम कादिर—(मृत्यु स. १७८९ मार्च ३) हा नजीबखान रोहिल्याचा नातू होय. याच्या पित्याचें नांव झबेताखान. हा दिल्लीच्या बादशहास वरचेवर त्रास देई. एका स्वारींत हा बादशहाच्या हातांत सांपडला असतां याचें पुरुषत्व नष्ट करण्यांत आलें होतें. त्याचा वचपा यानें पुढें काढला. शिंदे व हा यांमध्यें वैर असल्यामुळें शिंद्यांच्या सुस्थितीमध्यें हा स्वस्थ होता. स. १७८७ त महादजीचा जयपूरजवळ लालसोट येथें झालेला पराभव पाहतांच यानें दिल्लीच्या मराठ्यांच्या शिबंदीस हाकून लावलें; व इतरहि किल्ले काबीज करण्याचा सपाटा चालविला. पण शिंद्यानें शीख व जाट यांना याच्या मुलखांत पाठविलें तेव्हां आपल्या मुलखांत हा परत गेला. एकदां अशाच एका प्रसंगीं यानें शहाअलम बादशहावर स्वारी केली व त्याचा पराभव करून त्याच्या मुली व सुना यांची विटंबना करून अत्याचारहि फार केला. तेव्हां बंदोबस्तासाठीं मराठी फौज रवाना झाली. तेवढ्यांत यानें बेदरबख्तास गादीवर बसविलें. पण मराठ्यांच्या पाठलागामुळें हा बेदरबख्तासह पळून गेला. मिरतचा आश्रय घेऊन हा कांहीं दिवस तेथें होता. परंतु अन्नाच्या तुटवड्यामुळें याचे हाल झाले व शेवटीं निसटून पळून जात असतां वाटेंत घोड्यावरून पडून बेशुद्ध झाला; व मराठ्यांच्या हातांत सांपडला. मराठ्यांनीं याचे नाक कान छाटून यास ठार मारलें. याप्रमाणें नजीबखानाचा सूड मराठ्यांनीं त्याच्या नातवावर उगविला.

गुलामघराणें—१ कुत्बुद्दीन ऐबक (स. १२०६–१०)–२ आरम (आरामशाह, अल्लाउद्दीन, स.१२११)–३ शंसुद्दीन अल्तमश (स. १२११–३६, हा कुत्बुद्दीन ऐबकच्या अल्तमश नांवाच्या मुलीचा नवरा)–४ रुक्नुद्दीन फीरूजशाह (पदच्युत, वध स. १२३६)–५ रझिया (स. १२३६–४० पदच्युत)–६ मुइजुद्दीन बहराम (स. १२४०–४२ वध)–७ अलाउद्दीन मसूद (स. १२४५–४६ पदच्युत, रुक्तुद्दीनचा मुलगा)–८ नासिरुद्दीन महमूद (स. १२४७–६६)–९ मुलगी, घियासुद्दीन बल्बनची (उलूघखानाची) बायको (स. १२६६–८६, याचा पुत्र बुघ्राखान आणि त्याचा पुत्र)–१० (मुइझुद्दीन) कैकूबाद (स. १२८६–९०).

याशिवाय नासिरुद्दीन महमूद हा शंसुद्दीन अल्तमशचा मुलगा होता. आणि बल्बनची मुलगी त्याला दिली होती. बल्बनला मुहंमद नांवाचा मुलगा असून त्याला कैखुश्रव नांवाचा मुलगा होता. कैकूबादनंतर जलालुद्दीन खल्जीच्या ताब्यांत दिल्लीचें राज्य गेलें.

गुल्बदन बेगम—ही बाबराची सर्वांत लहान मुलगी होय. हिचा जन्म स. १५२३त झाला. ही खिजरख्वाजा नांवाच्या सरदारास दिली होती. याच्यावरच पुढें सिकंदरशाहा चालून आला असतां त्याचा अकबरानें पराभव केला. हिनें हुमायूनची हकीकत लिहून ठेविली आहे.

गुहदेव--(स. ७०० सुमार) देवराजयज्वानें आपल्या निघण्टुभाष्याच्या प्रस्तावनेंत गुहदेव हा वेदाचा भाष्यकार होता असें लिहिलें आहे. तसेंच 'रश्मयश्च देवागरगिर' या तैत्तिरीय आरण्यकांतील मंत्रावरील भाष्याचा उतारा दिला आहे. यावरून हा तैत्तिरीयसंहितेवरील भाष्यकार असावा. श्री. रामानुजाचार्यांनीं आपल्या वेदार्थसंग्रहांत इतर भाष्यकारांबरोबर याचाहि निर्देश केला आहे. याचें भाष्य अध्यात्मपर असावें.

गुहल्ल कदंब—हा गावें येथील कदंब घराण्याचा आद्य पुरुष होय. याचें गोवा व हल्सी (पलशिका) येथें राज्य होतें. षष्ठदेव १ ला हा याचाच मुलगा होय.

हा पश्चिम चालुक्यांपैकीं सहाव्या विक्रमादित्याच्या वेळीं बनवासी येथें मांडलिक म्हणून राज्य करीत होता (संपगांव तालुक्यांतील कादरोळी येथील शिलालेखावरून). यानेंच गोव्याचें घराणें स्थापन केलें. याला गूवल असेंहि म्हणत.

गुहसेन मैत्रक—(स. ५३९–७०) हा वलभीच्या धरपट्ट मैत्रकाचा पुत्र. याचे तीन ताम्रपट व एक शिलालेख सांपडलेले आहेत. या घराण्यांतील हाच गुप्तापासून स्वतंत्र झालेला पहिला राजा होय. म्हणून भट्टार्कानंतर याचेंच नांव यापुढील राजांनीं दानलेखांत दिलेलें आहे (म. भा. १. २. १४६).

गुहिल—(स. ५५० सुमार) उदेपूरच्या रजपूत राजांच्या इतिहासांतील हा पुरुष आहे असें समजण्यास हरकत नाहीं. ख्यात किंवा राजप्रशस्ति महाकाव्य यांच्यांतील माहितीपेक्षां शिलालेखांतील माहिती अधिक विश्वासार्ह आहे आणि उदेपूर राज्यांत सांपडलेल्या शिलालेखांत याच्यापासूनच वंशावळीला सुरुवात केली आहे. याचा शिलालेख मिळाला नसला तरी आगरा येथें जमिनींत गाडलेलीं याचीं दोन हजार चांदीचीं नाणीं सांपडलीं आहेत. तीं स. १८६९ मध्यें सांपडलीं असून त्यांवर श्रीगुहिल असा लेख आहे. (कनिंगहॅमकृत आर्का. सर्वे रि. भा. ४, पृ. ९५). नरवर येथें असेंच एक नाणें सांपडलें होतें. त्यावर श्रीगुहिलपति असें लिहिलेलें होतें (BRAS 19. 122) या अक्षरांचें वळणहि आगरा येथें सांपडलेल्या शिक्क्यावरील अक्ष-

रांच्या वळणाशीं जुळतें आहे. कनिंगहॅमनें हीं नाणीं हूणांपैकीं तोरमाणाच्या नंतर झालेल्या कोणाचीं तरी असावींत असें म्हटलें आहे, पण तें बरोबर नाहीं. गुहिलपति नांव नसून उपनांव आहे. त्याचा अर्थ गुहिल वंशजांचा स्वामी किंवा अग्रणी असा आहे. म्हणून तें नाणें कोणा गुहिल वंशजाचें असावें. वरील दोन हजार नाणीं आकारांनीं लहान आहेत. त्यांचें वर्णन कार्लाइलनें आपल्या आर्क्यालॉजिकल सर्व्हे रिपोर्टांत सविस्तर केलें आहे. त्यावरून हा स्वतंत्र राजा होता असें समजतें. चाटसू नगरांत सांपडलेल्या शिलालेखांत याच्यापासून बालादित्यापर्यंत बारा पिढ्या दिल्या आहेत. चाटसूच्या आसपासच्या प्रदेशावर हे विक्रमसंवताच्या आठव्यापासून अकराव्या शतकापर्यंत राज्य करीत होते. चाटसू हें आगऱ्याच्या जवळ आहे. या भागावर यांचें राज्य असावें. कदाचित् याच्या पूर्वीपासून या घराण्यांत राज्य असावें. पण हा प्रतापी असल्यामुळें याच्यापासून वंशावळ दिली. मिहिरकुलानंतर यांचींच नाणीं मिळतात. त्याअर्थी वरील अनुमान बरोबर असावें. याच्यापासून पांचवा वंशज शिलादित्य याचा वि.सं. ७०३ (स. ६४६) मधील शिलालेख मिळाला आहे. आणि तो राजपुताना म्युझियममध्यें ठेवलेला आहे. त्यावरून याच्या कालाचा अदमास करितां येतो. हा वि. सं. ६२३ (स. ५६६) मध्यें होता असें ठरतें. याच्यानंतर उदेपूरच्या गादीवर भोज आला (रा. इ.).

गुंड—हा मंत्रकूट देशाचा राजा होता. हा दुसऱ्या प्रोलाकडून पराभव पावून ठार मारला गेला. मरणापूर्वी याची हजामत केली; व याच्या छातीवर डुक्कर काढलें.

गुंड नायक—हा प्रतापरुद्राच्या गजसेनेचा मुख्य होता. यास स्वामीद्रोहरगंद ही पदवी होती. याचा स. १२९९ च्या शिलालेखांत निर्देश आढळतो.

गुंडरिपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं पंचावन्नावा सिद्ध होय. यालाच गोरक्षपा असेंहि म्हणतात. हा जातीनें चिडीमार असून डिसु नगरचा राहणारा होता. हा लीलापाचा शिष्य. याचा शिष्य हालिपाद. याचा कोणताहि ग्रंथ उपलब्ध नाहीं. फक्त चर्यागीतिमध्यें याच्या कांहीं गीति सांपडतात. यावरून हा हिंदी कवि होता हें सिद्ध होतें.

गूवल कदंब—(गुहल्ल कदंब पाहा).

२. (स. १०९८) गोव्याच्या कदंबापैकीं पहिल्या जयकेशिनचा मुलगा. गूहल व गुहल्ल हीं नांवें एकमेकांबद्दल वापरीत.

गृहवर्मा मौखरी—(स. ६००-६०६) हा मौखरी वंशापैकीं अवंतिवर्मन्‌चा एक पुत्र व कनोजचा एक राजा होय. हा मौखरी वंशामध्यें शेवटचा राजा होऊन गेला. हा हर्षवर्धन सम्राट् याचा समकालीन होय. यानें हूणांशीं टक्कर देऊन आपलें राज्य बरेंच वाढविलें. याच्यावर देवगुप्त मालवराजानें स्वारी केली व यास ठार केलें. या सुमारास मौखरी दुर्बल झाले होते. याचा काल स. ६०६ हा असावा, असें त्या वेळच्या सांपडलेल्या नाण्यांवरून समजतें. याचें लग्न प्रभाकरवर्धनची कन्या राज्यश्रीशीं झालें.

गेब्रियल बाउटन—हा ईस्ट इंडिया कंपनीचा एक शस्त्रवैद्य होता. स. १६४५ च्या जानेवारींत हा सुरतेस असतांना कंपनीचे वशिल्यानें असालतखानाच्या नोकरीस राहिला आणि पुढें यानें कंपनीच्या हितसंबंधीं आपलें वजन पुष्कळ प्रसंगीं खर्ची घातलें. राजकुमारी जहानारा हिचें, कपडे पेट घेऊन अंग भाजलें. त्या वेळीं तिला यानें बरें केलें. त्यासाठीं मोगल बादशहानें कंपनीला खुल्या व्यापाराची सवलत दिली, असा इतिहासतज्ज्ञांचा अभिप्राय होता. परंतु हें अरिष्ट राजकन्येवर स. १६४४ मध्यें गुदरलें व त्या सुमारास बाउटन हा होपवेल जहाजावर होता. असालतखान याजवर बादशहाची बहाल मर्जी होती खरी; परंतु बाउटन बादशहाच्या दरबारीं असल्याचा पुरावा मिळत नाहीं; आणि बादशहाच्या फर्मानाऐवजीं राजपुत्र शहासुजाच्या आज्ञापत्रानें खुद्द बाउटनला याच्या स्वतःसाठीं, कंपनीसाठीं नव्हे, खुल्या व्यापाराची सवलत मिळाली. नंतर कंपनीनें राजपुत्राजवळ ३००० रुपये भरून ही सवलत कंपनीसाठीं मिळविली (वि. ज्ञा. ५८. २८७-८८).

गैनीनाथ—निवृत्तिनाथाचे गुरु. यांनाच गयिनीनाथ किंवा गहिनीनाथ असें म्हणतात. गैबीनाथ व हे भिन्न होत. यांची व निवृत्तिनाथाची भेट त्रिंबकेश्वरीं तो वाघाच्या भीतीनें याच्या गुहेंत शिरल्यामुळें झाली.

गैबीनाथ—(स. १५२०-१५८०) हा ज्ञानेश्वर-महाराजांच्या परंपरेतील एक. याची परंपरा ज्ञानेश्वर-सत्यामलनाथ-गैबी अशी आहे. यापुढील शिष्यपरंपरा गुप्तनाथ-उद्‌बोधनाथ-केसरीनाथ-शिवदिनकेसरी. याचे ग्रंथ पंचीकृतविवेक, कांहीं अभंग व पदें (सं. सू.).

धुंडिराज नरहरी माळू या कवीनें आपल्या नवनाथ-भक्तिसार नामक प्राकृत ओवीबद्ध ग्रंथांत याचें चरित्र पुढीलप्रमाणें दिलें आहे. मच्छिंद्रनाथानें आपला शिष्य गोरखनाथ यास संजीवनीमंत्राची संथा देऊन त्यास मंत्र एकांतीं घोकण्यास सांगितला. त्याप्रमाणें तो मंत्र घोकीत असतां गांवचीं मुलें मातीचीं चित्रें तयार करून देण्या-

विषयीं त्यास म्हणालीं. पण चित्र तयार करतांना संजीवनमंत्र म्हटला गेल्यानें चित्र सजीव झालें. तोच गैबीनाथ किंवा गहिनीनाथ होय. याचें पोषण मधु ब्राह्मणाच्या स्त्रीनें केलें. पुढें यास मच्छिंद्रानें उपदेश दिला. याची समाधि गर्भागिरी नामक पर्वतावर असून हिंदुलोक यांना गैबीनाथ व मुसलमान गैबीपीर असें म्हणतात. यानेंच पुढें साक्षात्कारानें सोहिरोबा अंबिये यास अनुग्रह दिला.

गोकुळ जाट—(स.१६८० सुमार) औरंगझेबानें हिंदु जनतेस छळण्यास सुरुवात केल्यामुळें हिंदु चिडले, तेव्हां जाटांनीं, याच्या हाताखालीं बंड केलें. सदाबाद परगणा लुटला. तेव्हां औरंगझेबानें सर्व प्रकारें प्रयत्न करून पाहिला, पण कोणाचा टिकाव न लागल्यानें तो स्वतः यावर चालून आला. त्या वेळीं मात्र सैन्याच्या कमतरतेमुळें याचा पराभव झाला. याचे अत्यंत हाल केले. प्रत्येक अवयव वेगळा तोडून नंतर यास ठार मारलें.

गोकुळनाथ शर्मा—(स. १७०० सुमार) मैथिल ब्राह्मण. पिता–पितांबरशर्मा. माता–उमादेवी. यानें अमृतोदय नांवाचें संस्कृत नाटक व इतरहि ग्रंथ केले आहेत.

गोग्गिराज—तैलपाचा सेनापति. बारपाचा सेनापति व लाट देशचा राजा. याची मुलगी नायलदेवी. तिचा विवाह देवगिरीच्या वेसुगी यादवाशीं झाला (इंडि. अँटि. १२.१२०).

गोणराज चालुक्य—हा चालुक्य राजपुत्र बिजरस याचा भाऊ होता.

गोणाई—नामदेवाची माता.

गोपा—शुद्धोदनपुत्र बुद्धाची पत्नी. ही दण्डपाणि शाक्याची मुलगी.

गोपादित्य—(ख्रि. पू. ३७१) एक काश्मीरचा राजा. याच्या वेळीं कांहीं जातींमध्यें लसूण व कांदा खाणें हें निषिद्ध मानलें जात असे. त्यास अनुसरून यानेंहि कित्येक कांदे व लसूण खाणाऱ्या ब्राह्मणांना शिक्षा केल्या (स्मिथ पृ. ३१४ फुट नोट).

गोपाळ—(स.७८०–८००) पाल घराण्यांतील पहिला राजा होय. याच्या बापाचें नांव वप्यट असें होतें. हा गादीवर येण्यापूर्वी बंगालमध्यें सुयंत्रित सत्ता नसून जिकडे तिकडे अंदाधुंदी माजली होती. तेव्हां बंगालमध्यें सुराज्य व्हावें म्हणून बंगालच्या लोकांनीं याला गादीवर बसविलें. भद्र राजाची मुलगी दद्दादेवीशीं यानें लग्न लाविलें होतें (एपि. इंडि. ४·२४३–५४).

निधंपूर येथील ताम्रपटांत भास्करवर्म्याचा गोपाळ नांवाचा एक सामंत होता. जर भास्करवर्मन् याच्या हाताखालीं असणारा (सामंत) गोपाळ व पाल घराण्याचा पहिला राजा गोपाळ हे एकच असले, तर मग भास्करवर्म्यानंतर हा गोपाळ लोकप्रियतेच्या जोरावर बंगालच्या गादीवर आला असावा किंवा बंगालच्या लोकांनीं याला गादीवर बसविलें असावें.

जर वरील दोन्ही व्यक्ति एकच असें मानलें तर पाल घराण्याच्या सुरुवातीचा काल निश्चितपणें ठरवितां येतो.

याला पश्चिमेकडील वत्सराजाशीं, कनोजच्या वर्म इंद्रायुधाशीं व राष्ट्रकूटांच्या तिसऱ्या गोविंदराजाशीं युद्ध करावें लागलें असावें (म. यु. भा. २ पा. २३१). स. ७३०–४० चे दरम्यान हा बंगालचा राजा झाला. यानें आपलें राज्य मगधपर्यंत वाढवलेलें होतें. यानें ४५ वर्षे राज्य केलें. हा बुद्धधर्मीय असून याची राजधानी बिहार प्रांतांतील उदंडपूर होतें (इंडि. अँटि. ११. १३६, १६०; १२. १६४).

२. (स. ९२५–५०) राज्यपाल पालाचा पुत्र. याच्या कारकीर्दीच्या पंधरा वर्षांनीं अष्टसाहस्रिकाप्रज्ञापारमिताची एक प्रत विक्रमशिला बिहारमध्यें लिहिली. नालंदमध्यें वागीश्वरीची व बुद्धगया येथें शंभुसेनानें बुद्धाची मूर्ति स्थापन केली.

३. कामधेनु या संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

४. हा बंगाल्यांतील पाल घराण्यापैकीं कुमारपालाचा मुलगा व रामपालाचा नातू. हा रामपालानंतर गादीवर आला, पण लवकरच साप चावून अपमृत्यूनें मेला (हि. क्वा., मार्च १९२९).

हा स. ११४२ मध्यें गादीवर आला. याला स्वाभाविक मृत्यु आला. हा कांहीं महिने गादीवर होता (मनहलीचा याचा लेख).

५. हा मराठी कवि नेवासें येथें शके १६९० (स. १७६८) च्या सुमारास होऊन गेला. संतसूचींत हा ओतूरचा असें लिहिलें आहे. यानें महाभारताचीं सर्व पर्वें मराठींत ओवीबद्ध केलीं होतीं. पण त्यांपैकीं पहिलीं चार व स्त्रीपर्व आणि सौप्तिकपर्व हीं फक्त मिळालीं. बाकीचीं तेरा पर्वें मिळालीं नाहींत. यांनीं आपलें शांतिपर्व खूप विस्तृत केलें असून त्याचे राजधर्म (२८ अध्याय), आपद्धर्म (१५ अध्याय) व मोक्षधर्म (३६ अध्याय), असे भाग केले आहेत. उपलब्ध ग्रंथाच्या ओव्या बेचाळीस हजार आहेत. याशिवाय याचे ग्रंथ–महालयामाहात्म्य अ. २०. मल्हारीमाहात्म्य अ. ८, व्यंकटेशमाहात्म्य अ. १०. शिवरात्रिकथा, तिथिसार. यानें मुक्तेश्वराला जातवेदा म्हटलें आहे.

मुक्तेश्वराचें महाभारत यानें वाचलें असावें. याची रचना त्याच्या खालोखाल आहे.

विष्णुसहस्रनामावरील गोपाळ कवीची टीका कै. परशुरामपंत तात्यांच्या अवलोकनांत आली असती तर आपली 'नामार्थदीपिका' रचण्याचा उद्योग त्यांनीं केला नसता असें वाटतें (म. क. च. भा. २ पा. १०२--१०८). यानें कर्णपर्वाच्या पहिल्या अध्यायाच्या शेवटीं गुरूचें नांव अनंत दिलें आहे.

गोपाळचंद्रमिश्र—(जन्म स. १६३२) एक हिंदी कवि. याच्या बापाचें नांव गंगाराम आणि मुलाचें नांव माखनचंद्र.

यानें 'रामप्रताप-काव्य' हा ग्रंथ अर्धा लिहिला व उरलेला याचा मुलगा माखनचंद्र यानें पूर्ण केला. हैहयवंशी राजा राजसिंह याच्या दरबारीं याला मान मिळत असे. राजसिंहानें याला आपला दिवाण केलें होतें असें म्हणतात. राजाच्या इच्छेवरून यानें 'खूबतमाशा' (स. १६८८) नांवाचा एक ग्रंथ लिहिला. याशिवाय याचे ग्रंथ–जैमिनिअश्वमेध, छदामाचरित्र, भक्तिचिंतामणि, रामप्रताप, छन्दविलास वगैरे.

गोपाळदास (कायस्थ)—(स. १४५० सुमार) यानें 'शब्दामृत' नांवाची कालिदासाच्या कुमारसंभवावर टीका लिहिली. याच्या बापाचें नांव बलभद्र. यानें आपल्या ग्रंथांत केलेल्या ग्रंथकार व ग्रंथ यांच्या उल्लेखावरून हा मोठा विद्वान् असावा असें दिसतें.

याच्या ग्रंथांत सारस्वतव्याकरण आणि कालापव्याकरण यांचा उल्लेख आला असल्यामुळें याच्या वेळीं ग्रंथकार पाणिनीच्या व्याकरणाचा उपयोग करीत नसत असें दिसतें. पाणिनीच्या व्याकरणाचा फैलाव भट्टोजी दीक्षिताचे वेळीं फार जोरानें झाला. भट्टोजीचा काल स. १६३० असा आहे. तेव्हां गोपालदास हा स. १६३० च्या पुष्कळ पूर्वी होऊन गेला असला पाहिजे.

यानें आपल्या ग्रंथांत 'प्रक्रियाकौमुदी'चा उल्लेख केला आहे. आणि 'प्रक्रियाकौमुदी' हा ग्रंथ स. च्या १४ व्या शतकाच्या उत्तरार्धांत लिहिला असें रा. के. पी. त्रिवेदी यांनीं ठरविलें आहे. तेव्हां 'प्रक्रियाकौमुदी'च्या रचनाकालानंतर कांहीं पिढ्यांनीं हा (गोपालदास) झाला असला पाहिजे.

वर उल्लेखिलेल्या ग्रंथाशिवाय यानें 'करटीकौतुक' नांवाचा ग्रंथ लिहिला (Catalogue of Mss. in the Berlin Library (1853), Part I, p. 292). हा ग्रंथ काव्यात्मक असून त्यामध्यें हत्तीच्या रोगांची माहिती दिलेली आहे. यानें आपला 'कुमारसंभवावरील टीका' हा ग्रंथ नामतीर्थाच्या आज्ञेवरून आणि सम्यक्तीर्थाच्या देखरेखीखालीं लिहिला असें त्याच टीकेंत म्हटलें आहे (B. O. R I. Ms. No. 678 of 1886–92—Folio–1). नामतीर्थानें वेदान्तावर 'उपदेशसहस्रकतुव्याख्या' हा ग्रंथ लिहिला (C. C.). परंतु गोपालदासानें उल्लेखिलेला नामतीर्थ व हे दोघे एकच होत, या म्हणण्यास भरपूर आधार नाहीं.

२. अनंत व गोपाळ ह्या दोघांनीं मिळून काव्यें केलीं आहेत. यांचे गुरु जयरामस्वामी वडगांवकर. ग्रंथ–कथाकल्पतरु, पदें, भगवद्गीताटीका (पदबोधिनी ही भिन्न आहे). र. श. १६१६–१७ (स. १६९४) युवा, नाशिकक्षेत्रीं संपूर्ण (सं. सू.).

गोपाळदास गौर--(स. १६२२ नंतर) हा अशेरीचा किल्लेदार होय. याचा भाऊ विठ्ठलदास हा शहाजहानचे दरबारीं होता. स. १६२२ त शहाजहान बापाविरुद्ध बंड करून दक्षिणेंत आला आणि गोपाळदासास आपला सारा सरंजाम सुपूर्द करून अशेरीच्या किल्ल्यावर ठेवून (स. १६२३) स्वतः पर्वीझबरोबर लढण्यास निघून गेला. पर्वीझ जहांगीरच्या हुकुमावरून शहाजहानचें बंड मोडण्यास निघाला होता. शहाजहान निसटून गेला तेव्हां पर्वीझनें अशेरीस वेढा दिला. गोपाळदासानें दोन वर्षेपर्यंत किल्ला भांडविला. या कामगिरीबद्दल शहाजहाननें यास पांच हजाराची मनसब व 'मानधाता' असा किताब दिला. याचेच पुत्र बळिराम व मनोहरदास हे होत (B B R A S मार्च १९१५–डॉ. मोदी). मनोहरदासाला माहुलीचा किल्लेदार नेमलें. यानें तेथील तीन तटांची दुरुस्ती केली व पुष्कळ वर्षें कारभार केला. अशेरी किल्ला माहीम तालुक्यांत आहे. याला राजा म्हणत.

गोपाळ नाईक तांबवेकर—हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून याच्या पित्याचें नांव विश्वनाथ. सातारा जिल्ह्यांत वाळवें तालुक्यांत कासेगांवाजवळ कृष्णातीरीं तांबवें म्हणून गांव आहे तेथील हा राहणारा. थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत सराफीच्या धंद्यावर यानें लाखों रुपये मिळविले. थोरल्या बाजीरावांस लक्षावधि रुपये कर्ज देणारा जसा परशुराम नाईक अनगळ, तसा महादजी शिंदे यांस कर्ज देणारा हा गोपाळ नाईक तांबवेकर होय. यानें बत्तीस शिराळें येथील जहागीरदारीण पार्वतीबाई भोसले हिजकडून कृष्णातीरीं मालखेड म्हणून गांव आहे तो खरेदी करून घेऊन,

५४ ब्राह्मणांस अग्रहार दिला. हा गांव देतांना प्रत्येक ब्राह्मणास एक पांचखणी तिघई घर, पुढें आंगण, मागें परस व शौचकूप, पांच माणसांच्या प्रपंचास लागणारीं भांडीं व एक वर्ष पुरेल इतकी अन्नसामग्री, अशा प्रकारची तजवीज करून दिली. यानें कृष्णातीरीं एक घाट व विष्णुमंदिर बांधिलें. यानें त्या देवस्थानास लाखों रुपयांची संपत्ति अर्पण केली आहे (गोपाळराव गोविंद पटवर्धन पाहा).

स. १७७२ त यानें डाकोरचें मंदिर बांधिलें. याला कृष्णराव नांवाचा एक मुलगा होता. सध्या यांचे वंशज डाकोर येथें आहेत (म. रि. उत्तर वि. ३ रा. पृ.६२५).

एक पेशव्यांचा सरदार होय. याचा उल्लेख दादानें मोरोबास लिहिलेल्या पत्रांत आला असून, त्यामध्यें याला फौजेसुद्धां पाठविण्याबद्दल मोरोबास विचारलें आहे.

स. १७७८ मध्यें दादाच्या सरदारांनीं पुण्यावर केलेल्या स्वारींत हाहि होता. याला पेशव्यांची पोतदारी पाहिजे होती. तेव्हां दादास मदत करून दादाला पुण्याची गादी मिळवून नंतर त्याच्याकडून पोतदारी मिळवावी या खटपटींत हा होता (म. रि. उत्तर वि. १ ला).

गोपाळनाथ—(समाधि स. १७६६) हा औरंगाबादनजीक सलाबतपूरचा राहणारा. याच्या वडिलांचें नांव गोविंद व आईचें नांव आनंदीबाई. हा शुक्लयजुर्वेदी, कौंडिण्यगोत्री होता. यांचें उपनांव घोलप. हा ब्रह्मचारी होता. याचे गुरु वऱ्हाडांतील मारकी येथील रंगनाथ होत. हा नाथांच्या पंथाचा होता. यानें शके १६८८ श्रावण व. ३० रोजीं त्रिपुटी येथें समाधि घेतली. यानें तयार केलेले असे दोन ग्रंथ आहेत. पैकीं पहिला 'शिरोमणी' व दुसरा 'समाधिबोध'. याचीं पदें व अभंग इत्यादि कविता आहेत. शिरोमणी हा ग्रंथ शके १६६८ त रचिला. याचें एक चरित्र उपलब्ध आहे (मं. वा. इ. शके १८३७, ले. १०९).

२. समाधि माहुली येथें. शिष्य शाहूराजे. ग्रंथ–वेदांतरहस्य, सप्तशती (यांत गुरु आत्मारामाचा उल्लेख आहे). संतकविकाव्य–सूचिकारांच्या मतें हा ग्रंथ गोपाळ याज्ञवल्कीचा असावा (सं. सू.)

गोपाळनाथ मळगांवकर—(स. १७०० सुमार) मालवणाजवळील परुळें गांवचा साधु. हा जातीनें गौड ब्राह्मण. दुष्काळांत पिता मेल्यावर आईसह पंढरपुरास गेला असतां तेथें धामणगांवच्या बोधलेकरांच्या आश्रयानें राहिला व त्यांचाच अनुग्रह घेतला, व त्यांच्याच आज्ञेनें पुन्हां मळगांवीं येऊन राहिला. यांनीं अनेक चमत्कार केल्याची प्रसिद्धी आहे. खेमसावंतांचीं यांच्यावर श्रद्धा होती.

गोपाळनाथांनीं लिहिलेली अशी, स्कंदपुराणांतर्गत पांडुरंगमाहात्म्य, अध्याय ५, ओवीसंख्या सुमारें ६००; प्रकाशबोध या नांवाचा एक वेदांतपर ग्रंथ, ओवीसंख्या २०२, बालक्रीडा, ओवीसंख्या २५० व इतर पदें, अभंग, भूपाळ्या वगैरे फुटकळ कविता बरीच आहे. इतर जुन्या महाराष्ट्र कवींप्रमाणें यांची कविता पूर्ण प्रासादिक असून तींत फारसे कठीण शब्द नाहींत. ज्याप्रमाणें एकनाथांनीं आपल्या कवितेंत आपला व आपल्या गुरूचा 'एकाजनार्दन' या नांवानें उल्लेख केला आहे, त्याचप्रमाणें गोपाळनाथांनीं 'गोपाळबोध' किंवा 'बोधगोपाळ' या नांवानें आपला व आपल्या गुरूंचा उल्लेख केला आहे. 'बोध' हें पद बोधलेबावांचें दर्शक होय हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. हे पूर्ण अद्वैतमतवादी होते. खऱ्या देवासंबंधानें लिहितांना यांनीं आपल्या प्रकाशबोध ग्रंथांत ब्रह्मा-विष्णु-महेश यांच्याहि पलिकडे तो आहे असें स्पष्ट म्हटलें आहे (महाराष्ट्र–कविचरित्र भा. १ ला, पृ. २४९–२६१).

गोपाळ पंडित—(स.१३००सुमार) एक महानुभाव. हा पैठणजवळील वरखेड वाडेगांव येथील मूळ रहिवासी होता. याच्या बापाचें नांव चक्रपाणी. गोपाळ सात महिन्यांचा उपजला. डोळे उघडेनात तेव्हां याच्या आईनें यास चक्रधराच्या स्वाधीन केलें. पुढें याचे डोळे उघडून यास दिसूं लागलें. यावरून चक्रधरानें याचें नांव पारमांडल्य असें ठेविलें. मोठेपणीं हा देवनगरास जाऊन राहिला. तेथें हा रामदेवराव जाधव यांची धाकटी राणी कामाइसा अथवा कामाई देवी हिचा पुराणिक व खजिनदार होता. याच्याच मार्फत पुढें राणीनें नागदेवाचार्याचा मंत्रोपदेश घेतला. यानें सहा ग्रंथ मराठींत लिहिले आहेत. त्यांपैकीं 'चौपद्या' व 'सुभाषितअंताक्षरी' हे दोन पद्यात्मक असून बाकी चार गद्य आहेत. सुभाषितअंताक्षरी निर्यमक श्लोकबद्ध आहे. पण या श्लोकांत जरा चमत्कृति आहे. श्लोकाच्या एका चरणाचें जें अंत्य अक्षर तेंच त्याच्या पुढल्या चरणाचें आदि अक्षर आहे.

गोपाळपंत कुलकर्णी नाझरेकर—संन्यासोत्तर यास निजानंद म्हणूं लागले.

गोपाळपुरी—(स. १७६८) इंग्रजांचा जानोजी भोसले नागपूरकर यांचेकडे गेलेला वकील.

गोपाळभट—भवभूति कवीचा आजा व नीलकंठाचा बाप. हा उंबर नामक ब्राह्मणकुलोत्पन्न होता.

गोपाळ (श्रीधर) महाबळेश्वरकर—' हे भले थोर अनुष्ठाते, सूर्य-उपासनी, पद्महस्ती ' म्हणून शिवाजी-महाराज आणि जिजाबाई यांनीं यांच्याकडून मंत्रोपदेश घेतला. आणि यास शिवाजीनें आपल्या अभ्युदयार्थ सूर्याचें अनुष्ठान सांगितलें. आणि असें अनुष्ठान प्रतिवर्षी व्हावें म्हणून दरसाल शंभर पाच्छाई होन, आठ खंडी धान्य, आरक्त वस्त्रें दोन, पीतांबर एक, शाल एक व आसन एक इतकें देण्याची सनद देऊन व्यवस्था केली. आणि यांचा मंत्रोपदेश वंशपरंपरेनें घेतला जावा अशी सनद स. १६५३ फेब्रुवारी १८ (श. १५७४ फाल्गु. १) रोजीं करून दिली (प. सा. ६३१). यावरून शिवाजीमहाराजांची यांच्यावरील श्रद्धा व्यक्त होते.

गोपाळ रघुनाथ—यानें चंद्रावळी आख्यान मराठींत रचलें (मं. वा. इ. श. १८३७ ले. १९१).

गोपाळ रघुनाथ चिटणीस—हा दौलतराव शिंद्याचा चिटणीस होता. बायांचे युद्धांत व समेटांत हा होता. लाखेरच्या लढाईपासून हा तीन वर्षेपर्यंत नजर-बंदींत होता. " साल गुदस्त (स. १७९७) कृष्णोबा चिटणीस यांनीं दहा लक्ष खंड देऊन चिटणीशी करून घेतली, त्यासमयीं गोपाळराव भाऊंस सोडविलें. ते सन १७९८ चे आरंभीं पुण्यास आले. " हा बन्यापैकीं सेना-नायक होता. शिंदे-होळकर युद्धांत यानें खानदेशांतील होळकरांचा मुलूख मारून काबीज केला. हा बऱ्हाणपूरचा सरदार होता. इंग्रज-शिंदे यांच्या युद्धांत यानें बराच पराक्रम केला. याचें दुसरें आडनांव कुलकर्णी असें होतें. हे निगडीचे राहणारे. म्हणून यांस निगडीकर असेंहि म्हणतात. आसईच्या लढाईत हा प्रामुख्यानें चमकत होता (म. रि. उ. ३).

गोपाळराम वादीन्द्र दर्यापूरकर—(स. १५०० नंतर) एक महानुभाव. यांचा एक निष्कलंकाध्याय ब्रह्माण्ड-गोलक या नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ आहे. त्यांत १११२ओव्या आहेत. वादीन्द्र गोपाळदासानें अनेक ग्रंथांचें संशोधन केल्याचा त्या त्या ग्रंथाच्या शेवटीं उल्लेख सांपडतो. या कवींचा काळ सोळाव्या शतकांतील आहे. वादीन्द्र गोपाळदास आणि गोपाळदास दर्यापूरकर एकच होय. याची भगवद्गीतेवरील टीका प्रकाशित झाली आहे.

यानें निष्कलंक ब्रह्मांडगोलकाची पूर्वपीठिका ग्रंथाच्या शेवटीं दिली आहे. मूळ निष्कलंकाध्याय ग्रंथ १२५ ओव्यांचा पुरुषोत्तम मुनीनें केला. पुढें देवदासानें त्यांत आणखी स्पष्टार्थ करणारी भर घालून ग्रंथ २७५ओव्यांचा केला; आणि त्याचें नांव ब्रह्मांडगोलक असें ठेवलें. नंतर पुनः दोनशें ओव्यांची भर घातली. शेवटीं तर यानें त्याचा विस्तार १११२ ओव्यांचा केला (म. वा. इ. २. ७५३-५५)

गोपाळराव गणेश बर्वे—हा दादांचा मेहुणा होता. हा कोणाचाच हुकुम न ऐकतां मन मानेल तसेंच वर्तन करी. अशा रीतीनें अनेक इसम दादाचा आश्रय करून बंडखोरी करीत, त्यामुळें चुलते-पुतण्यांत वारंवार तेढ उत्पन्न होई. पानिपतच्या लढाईनें झालेली अपकीर्ति धुवून काढण्यासाठीं स. १७६९ त माधवरावानें ज्या कांहीं सरदारांस उत्तरेस पाठवलें त्यांपैकीं गणेश बर्वे हा एक होता. त्या वेळेस याजकडे स्वारीची सबनिसी होती (म. रि. म. ४ पा. २१०).

गोपाळराव गोविंद पटवर्धन—(स.१७२१-७१) पेशवाईंत जे साडेतीन राव होते त्यांपैकीं हे पहिले राव होत. मुरारराव घोरपडे, भवानराव प्रतिनिधी आणि अर्धाराव माधवराव पेशवे मिळून साडेतीन राव पेशवाईंत प्रसिद्ध होते. गोपाळ नाईक तांबवेकर नांवाच्या एका सरदारानें आपल्या नांवापुढें राव लावून घेतलें म्हणून भवानराव प्रतिनिधीनें शेपन्नास माणूस पाठवून गोपाळराव तांबवेकरास मारून टाकलें व त्याची पालखी मोडून टाकिली, अशी आख्यायिका हरिवंशाच्या बखरींत दिलेली आहे (पा. ३०).

याचा जन्म स. १७२१ च्या सुमारास झाला असावा. स. १७४० च्या सुमारास यास शिलेदारी मिळाली आणि दमाजी गायकवाडाबरोबर नाना पुरंदरे यांची जी लढाई झाली, तीस गेंड्याच्या माळाची लढाई असें म्हणतात. त्या लढाईंत यानें चांगला पराक्रम केला (पे. द. ६. १८५; २६. १७१), व दमाजीला पकडून नानासाहेबां-पुढें आणून उभें केलें. त्याचप्रमाणें स. १७५१ सालीं पेशव्यांनीं गायकवाडावर स्वारी केली तींतहि यानें बराच पराक्रम गाजविला. परंतु याचें खरें कार्यक्षेत्र म्हणजे कर्नाटक होय. तिकडच्या बहुतेक स्वाऱ्यांमध्यें याचा संबंध येतो, आणि प्रत्येक वेळीं प्रामुख्य जरी याचेकडे नसे तरी सोंपविलेलें काम हा पार पाडण्याचा प्रयत्न करी. त्यामुळें याचें वर्चस्व सारखें वाढत चाललें. हैदरशीं यानें अनेक लढाया केल्या. पहिल्याच लढाईत हैदरनें सारखे छापे घालून याला जेरीस आणलें, व लढाई कंटाळवाणी करून सोडली. शेवटीं ३२ लाख रुपयांवर तह झाला. त्यांपैकीं १६ लाख पदरांतहि टाकले. पण हा तह पेशव्यांना पसंत पडला नाहीं, व याच्यावर जरा दोषारोप आला. यापुढें उद्गीरची लढाई झाली (स. १७६०). त्या लढाईंत

यानें नरमपणाचें राजकारण धरलें. त्यामुळें दौलताबादचा किल्ला हातीं येणें कठीण होऊन बसलें. परंतु नानासाहेबानें तंबी भरतांच यानें हल्ला करून किल्ला हस्तगत केला. पण किल्लेदारास ३५ हजारांची जहागीर व १ लक्ष १५ हजार नगद देऊन किल्यावर पेशव्यांचें निशाण चढविलें. पण यामुळें नानासाहेबांची यावर इतराजी झाली व किल्लेदाराची भरपाईहि झाली नाहीं, त्यामुळें हा दरबारींहि बेतानेंच जाऊं लागला. याच्या त्या उदासीनतेबद्दल नानासाहेबांनीं यास बराच दोष दिला.

सदाशिवराव भाऊ पानपतावर गेल्यानंतर दक्षिणेंत निजामअल्ली फौज जमा करून दंगा करण्याचे बेतांत होता. त्यास जरबेंत ठेवण्याकरितां रघुनाथरावदादांची रवानगी झाली. त्यास मिळण्याबद्दल याला लिहिलें होतें. पण हा त्यांना जाऊन मिळाला नाहीं. याबद्दल नानासाहेब पेशव्यानें याला लिहिलेलें खरमरीत पत्र उपलब्ध आहे (ऐ. ले. सं. प. नं. २७). त्यांत नानासाहेबानें असें लिहिलें, 'शेवटपावेतों खाविंदाशी ओढून व्यर्थ सरदारीं तोडतां इतका दुराग्रह तुम्हां लोकांस नसावा. लटकाच वसवसा सखारामाचा मानला. तिळमात्र तो तुम्हांसी आकस करणार नाहीं. चि. रघुनाथराव तर तुमच्यावर कृपाच करतील. व्यर्थ सरदारीं न तोडणें". इतकें लिहिल्यानंतरहि हा रघुनाथरावांना जाऊन मिळाला नाहीं. हा व वडील गोविंद हरी यांचें सखारामबापूपुढें कांहीं चालत नसल्यामुळें हे त्याचा अत्यंत द्वेष करीत. यामुळें मराठी राज्याची अत्यंत हानि झाली. आणि यालाच पटवर्धन घराण्यांतील लोकांनीं देशस्थ-कोंकणस्थ वादाचें स्वरूप दिल्यामुळें त्याचे अनिष्ट परिणाम दीर्घ कालपर्यंत टिकणारे झाले आहेत.

दक्षिणेकडच्या बंदोबस्तास कांहीं जिव्हाळ्याची मंडळी पाहिजेत असें पाहून नानासाहेबानें पटवर्धन मंडळीस मोठमोठ्या तैनाती देऊन वाढविलें. पटवर्धनांची कौटुंबिक जमियत मोठी असून शीलशौर्यादि गुणांनीं ते पेशव्यास व विशेषतः गोपिकाबाईस फार प्रिय झाले. " सखाराम बापू हुशारीनें वागतो तसे तुम्ही सुद्धां कारभारांत निपुण व्हा " असें नानासाहेब यास वारंवार सांगे.

पटवर्धनांचा ओढा सर्वस्वीं गोपिकाबाईकडे असून तिच्याच प्रोत्साहनानें हे वागत असत.

घोडनदीचे लढाईंत माधवरावाचा पराभव होऊन तो चुलत्याचे स्वाधीन झाल्यावर हा आपल्या पथकासह मिरजेस आला. दादाचे विरुद्ध बंड करण्याचा बऱ्याच सरदारांचा विचार होता. हा बंडाचा पुढाकार घेण्यास तयार नव्हता. परंतु लढण्याचे कामांत हाच प्रमुख असल्यामुळें दादास याचीच फार दहशत होती. तेव्हां आबा पुरंदऱ्यास दादानें यावर पाठविलें. जमखिंडीजवळ आबानें यावर एकदम हल्ला करून याचें सारें लष्कर लुटलें. तेव्हां हा निजामास जाऊन मिळाला. निजाम अशा फुटून येणाऱ्या लोकांचा डोळ्यांत भरेल असा सन्मान करी. पण कसें झालें तरी हे फितुर झालेले लोकच. स्वतःच्या घरांत ज्यांना महत्त्व मिळवितां आलें नाहीं त्यांना बाहेर तरी किती. मोठेपण मिळणार ?

घोडनदीचे युद्धानंतर चुलते-पुतण्यास सर्व इसम रुजू झाले तरी हा फुटून राहिल्यामुळें पटवर्धनांची पांच पंचवीस लाखांची नुकसानी झाली. मिरज वगैरे स्थळें हातचीं जाऊन कुटुंब देशोधडीस लागलें. आणि मोगलांचा आश्रय केल्याबद्दल गोपिकाबाई सुद्धां याजवर रागावली.

" आजपावेतों कायावाचामनें आपल्या राज्याचें अकल्याण इच्छिलें नाहीं. आमचे गुणाचे ग्राहक असते तर मोगलाईंत देखील यावयाचें प्रयोजन नव्हतें. आम्हीं तुम्हांकरितां सर्वस्वास बुडालों, हें चित्तांत किमपि न आणितां आमचे ठायीं दोषारोप ठेविले; यामुळें अतोभ्रष्ट ततोभ्रष्ट. कालमहिमाच तसा, त्यास आपला काय इलाज ! " शहाणपणाची परीक्षा कठिण प्रसंगांतच होते.

स. १७६३ मध्यें मोगलांनीं पुण्यावर स्वारी करून पुण्यापर्यंत मुलूख जाळला. ही गोष्ट याच्या माहितीनें झाली. निजामानें आपल्या सैन्याच्या आघाडीस राहण्यास फर्माविलें होतें. आणि त्याप्रमाणें गोपाळराव आघाडीवर होता. त्यामुळें 'गोपाळराव आगलावे' असाहि याच्या संबंधानें याच्याच ज्ञातिबांधवांनीं केलेला उल्लेख आढळतो. कदाचित् गोपाळरावांनीं मंदिरादि विध्वंसाच्या वेळीं आळा घालण्याचा प्रयत्न केला असेल, पण तो याला साधला नाहीं.

ता. २० ऑगस्ट १७६३ त राक्षसभुवनच्या लढाईनंतर हा पेशव्यास भेटून समाधान पावून पुनः पेशव्यांच्या पुढील उद्योगांत सामील झाला. याच्या हातून जो काय अपराध घडला असेल, त्याची सवाई भरपाई इतउत्तर जिवापाड राष्ट्रकार्य करून यानें धन्यास पोंचविली. पुढील आठ वर्षांत माधवरावाचा हा केवळ उजवा हात बनला.

एप्रिल १, १७६४–१७६५ दरम्यान हैदरशीं झालेल्या युद्धांत माधवरावाची मुख्य भिस्त यावर होती. पेशव्यांच्या जिव्हाळ्याचा इसम हा एकच होता. यास असें प्रोत्साहन मिळाल्यामुळें यानेंहि जिवाची पर्वा न

करितां स्वाऱ्यांत उत्कृष्ट कामगिरी केली. हा हैदरास शेरास सव्वाशेर भेटला.

सन १७६६ तील हैदरावरील तिसऱ्या स्वारींतहि यानें चांगली कामगिरी केली.

स. १७७० च्या जून महिन्यांत यानें चिक्कबालापुराजवळ हैदरच्या फौजेशीं गांठ घालून त्याचें बरेंच नुकसान केलें. पुढें ता. १९-१०-१७७० त यानें कोल्हार प्रांत सर्व काबीज करून हैदरचा सरदार चंद्रोजी जाधव व बाळाजी भीमराव यांचा पाडाव केला.

या सर्व कामगिरीमुळें यास अतिशय ताण बसून शरीर फार क्षीण झालें. त्यांतच यास जलोदराची व्यथा होऊन हा स्वारीवरून मिरजेस निघून गेला व ता. १०-१-१७७१ रोजीं मरण पावला.

कर्नाटकांतील स्वाऱ्यांत माधवरावाचा उद्योग तडकाफडकी यशस्वी होण्यास याची व इतर पटवर्धन मंडळींची मदत विशेष कारण झाली.

हा जसा शूर तसाच स्पष्टवक्ता व व्यवहारांत सणसणीत होता. हा शरीरानें सडपातळ व मध्यम उंचीचा होता. स्वभाव आनंदी व उत्साही असे. हा मानी, धाडशी व तल्लख असून कर्नाटकांतील संस्थानिकांस याचा मोठा दरारा वाटे.

'गोपाळरावासारखे पुण्यश्लोक कोणी नाहीं. आमची अदृष्टें खोटीं म्हणून ते नाहींसे झाले. डेरा थोरला मुदपाकाचा व संध्येची राहुटी, सारा वेळ मस्करऱ्या हें नजरेंत येतें. तेव्हां परम दुःख होतें; वहिनीस आकाशाची कुऱ्हाड पडली. सारें क्षणभंगुर.'

बाबुराव कोल्हटकरचे चिरंजीव रघुनाथराव यास यांच्या दुसऱ्या कुटुंबाची मुलगी कुसाताई ही दिली होती. याच्या दुसरे कुटुंबाचें नांव सरस्वतीबाई.

गोपाळराव घाणवडकर—(स. १८०० सुमार) हा सातारा जिल्ह्यांतील खानपूर तालुक्यांत घाणवड म्हणून गांव आहे तेथचा कुलकर्णी. बापू गोखल्यांच्या हाताखालीं एक लहानसा सरदार होता. हा इतका क्रूर व दुष्ट मनुष्य होता कीं, ह्यास मनुष्याचा जीव घेण्याच्या कामीं कांहींच वाटत नसे.

कोल्हापूरकर व पेशवे यांच्या लढाया चालू होत्या तेव्हां सरहद्दीवरील कित्येक गांवचे लोक कोल्हापूरकरास मिळाले. तेव्हां तिकडील बंदोबस्ताच्या कामावर यास नेमला होता. त्या वेळीं ह्यानें पुरुष, स्त्री, किंवा मूल, तसेंच लबाड आणि सालस ह्यांतील भेदाभेद कांहीं न पाहतां ओळीनेंच माणसें बसवून मेखसूनें त्यांचीं डोकीं फडाफड फोडून टाकावीं; आणि तें क्रूर कर्म डोळ्यांनीं पाहून हंसत असावें. ह्याच्या घोड्यापुढें खांद्यावर मेखसू टाकलेले दोन मांग नेहमीं चालत असत. हा आला असें समजतांच गांवचे लोक गांव ओसाड टाकून पळून जात. ह्याच्या क्रौर्याच्या पुष्कळ गोष्टी वारणा नदीच्या कांठच्या गांवांतून जुने लोक सांगत असतात. कित्येक ठिकाणीं 'घाणवडकराचें मेकसू' हे शब्द चौदावें रत्न ह्या अर्थी लोक वापरतात. हा अत्यंत अधम होता (भा. व. खं. ३ ऐ. गो. पृ. ३४-३५).

गोपाळवर्मा उत्पल—(स.९०३) काश्मीरच्या शंकरवर्म्याचा पुत्र. हा अल्पवयी असल्यामुळें याची माता सुगंधा ही विधवाबाई राज्यकारभार चालवी. हा अल्पवयीच मरण पावला (सुगंधा पाहा).

गोपाळाचार्य कालगांवकर—(स. १८९८ मृत्यु) सातारचे राजे प्रतापसिंह महाराज यांच्या पदरीं अनेक गुणी माणसें होतीं. त्यांतच गोपाळाचार्य हे एक होते. हे नरसिंहाचार्यांचे नातू होत. हे उत्तम पौराणिक व कवि होते.

प्रख्यात शूर जो चतुरसिंग त्याचा पुत्र बाळासाहेब सेनापति यास ह्यांचें पुराण ऐकल्यावांचून एक दिवसहि करमत नसे. ह्यांनीं प्रतापसिंहोदय, नीतिमंजरी, राघवचंपू, राधाविलास, रासार्या, विठ्ठलार्या इत्यादि ग्रंथ केले आहेत.

प्रतापसिंह महाराजांनीं सर्व महाभारताचा तर्जुमा मराठींत करण्याचें काम ह्यास सांगितलें, तें पूर्ण झालें नाहीं. तथापि निम्याच्यावर झालें आहे. प्रतापसिंहामागून आप्पासाहेब महाराजांनींहि ह्यास आपल्या आश्रयास ठेवलें होतें. पुढें सातारचें राज्य खालसा झाल्यावर राजाच्या आश्रितास पेन्शनें करून दिलीं. त्याप्रमाणें ह्यासहि इंग्रज सरकाराकडून पेन्शन मिळत होतें. हा स. १८९८ मध्यें परलोकवासी झाला (भा. व. खंड ३. ऐ. गो. पृ. १५-१६).

गोपाळ संभाजी खांडेकर—(मृत्यु स. २२-५-१७९३ पूर्वी) खांडेकर हे गार्ग्यगोत्री कऱ्हाडे ब्राह्मण. बुरंबाडचे गणेश व गोपाळ संभाजी हे प्रथम स. १७५० चे पुढें नानासाहेब पेशव्यांचे वेळेस उदयास आले, आणि पानिपतोत्तर काळीं यांचा पराक्रम विशेष झळकला. प्रथम यास बुंदेलखंडांत झांशीची मामलत मिळाली. पानिपतचे पराभवानें तिकडील मराठ्यांचा अंमल ढासळूं लागला, तेव्हां या दोघां बंधूंनीं तिकडे चांगला उद्योग केला. हा भावासारखाच पराक्रमी असून उत्तर हिंदुस्थानांतील उद्योगांत सतत झटणारा होता. कांहीं दिवस याजकडे

धारची दिवाणगिरी असून माधवरावाचा याजवर लोभ होता. माधवरावानें यास पंथपिंपळोदची जहागीर दिली. गोपाळ संभाजीचे वंशज गणपतराव हे हल्लीं उज्जनीस राहतात. या घराण्याची एक शाखा फडणीस म्हणून साताऱ्यास आहे (ना. प्रां. इ. ५६५; म. रि. म. भा. ४, पा. ३०१).

गोपिकाबाई पेशवे—(स. १७२५–१७८८) भिकाजी रास्ते यांची ही कन्या. हिचा जन्म स. १७२५ च्या सुमारास झाला. भिकाजी हा मोठा सावकार होता. एकदां दिवाळींत भिकाजीनें शाहूस मेजवानी दिली. त्या वेळीं गोपिका शाहूच्या नजरेस पडली. तेव्हां शाहूंनीं हिचें लग्न स्वतःच ठरवून नानासाहेबाशीं विवाह लावला. स. १७३० च्या सुमारास (१० जानेवारी) वांईस लग्न झालें. ही नेहमीं नानासाहेबांबरोबर स्वारीशिकारीस जात असे. हिला राजकारण चांगलें कळत असून दरबारांतील कारभारहि ही पाहत असे. नानासाहेबांनीं *प्रयाग सोडविण्यासाठीं उत्तरेंत जी मोठी स्वारी केली* तींत ही होती. हिला त्या वेळीं दोनतीन महिने गेलेले दिसतांच हिची पुण्यास रवानगी करण्यांत आली. पुढें जुलईंत प्रसूत होऊन मुलगा झाला. तोच विश्वासराव होय.

हिनें कायद्यानें कन्याविक्रय बंद करावा असें पेशव्यांकडून घडवून आणण्याकरितां नाना फडणीसास विनंति केली. देश व समुद्रकिनारा या भागांत कन्याविक्रय जारीनें चालू असल्यामुळें अनाचार वाढला आहे असें हिचें म्हणणें आहे (पे. द. ३२. २०६).

हिनें सवाई माधवरावांस केलेला उपदेश (का. सं. प. या. ४५२) बोधपर आहे. हिला ३ मुलें झालीं होतीं, परंतु तीं सर्व हिच्या अगोदरच मृत्यु पावलीं. मुलांचीं नांवें अनुक्रमें विश्वासराव, माधवराव व नारायणराव अशीं होतीं.

सदाशिवराव भाऊची चढती कळा पाहून गोपिकाबाईस तिरस्कार वाटे व त्यास पानपतावर पाठविण्यास हीच कारणीभूत झाली, असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे; परंतु अद्यापि त्याची शहानिशा झालेली नाहीं. उद्गीरच्या लढाईच्या प्रारंभीं भाऊसाहेबांवर मुजफरखानानें मारेकरी घातले होते. हिच्याच चिथावणीवरून हें कृत्य झालें होतें असाहि तत्कालीन तर्क आहे. त्यास बाईची प्रेरणा असावी असें डफ म्हणतो. स. १७६३ त निजामानें पुण्यावर चाल केली असतां गोपिकाबाई कुटुंबांतील माणसें व जवाहीर घेऊन पुरंदरावर गेली.

नानासाहेबांच्या अंतकालीं बाई जवळच होती. नानासाहेबांनीं मृत्युपूर्वी सहाच महिने दुसरें लग्न केल्यामुळें ही त्यांजवर रुष्ट होती व मृत्यूनंतर कांहीं दिवस बाईचें, राघोबा दादाचें व दोघां कारभाऱ्यांचें एकचित्त झालें होतें. परंतु पुढें बिघाड होत जाऊन ही गंगापुरास जाऊन राहिली.

हिला लिहितांवाचतां चांगलें येत असे; व मोठीं राजकारणेंहि करण्याचा ही आव आणी. राघोबावरहि हिचा वचक असे. इतर मराठे सरदारहि हिला वचकून असत. नानाफडणीसावर तिचा लोभ असे. गंगापुरास ही ३ ऑगस्ट स. १७८८ त वारली.

गोपीनाथ—वल्लभाचार्यांचा पुत्र. यास विठ्ठलनाथ नांवाचा धाकटा भाऊ होता. दोघांमध्यें गादीबद्दल तंटे लागले. तेव्हां हे दिल्ली येथें बादशहाजवळ होते. तेथें हा मरण पावला व धाकट्या भावास गादी मिळाली.

२. शिवादिनाचा शिष्य. नारळीप्रसाद या मराठी काव्याचा कर्ता (मं. वा. इ. १८३७ ले. १४२).

गोपीनाथ चक्रवर्तिन्—कौतुकसर्वस्वम् नांवाच्या संस्कृत प्रहसनाचा कर्ता.

गोपीनाथपंत बोकील—यास पंताजी गोपीनाथ असेंहि म्हणतात. हा शहाजीच्या पदरीं नोकरीस होता. शहाजीच्या घरीं याचें केवळ जाणेंयेणेंच नसे तर जिजाबाईशीं सोंगट्या खेळण्यापर्यंत घरोबा होता. हा हिवरे गांवचा कुलकर्णी होता. अफजुलखानाकडे वकील म्हणून शिवाजीनें यांस पाठविलें होतें. मोठ्या शहाणपणानें यानें अफजुलचें मन वळवून दोन माणसांतच भेट व्हावी असें ठरविलें. याच्या या कामगिरीमुळें महाराजांनीं यास हिवरें गांव इनाम दिलें. याचें उपनांव बोकील असें असून याचाच वंशज प्रसिद्ध सखारामबापू बोकील होय.

गोपीनाथभट्ट दीक्षित ओक—(ग्रंथकाल स. १७७३) संस्काररत्नमाला नांवाच्या संस्कृत ग्रंथाचा कर्ता. हिरण्यकेशी शाखेचा चित्पावन ब्राह्मण. प्रथम काशीस राहत असे. नंतर पेशव्यांच्या आश्रयानें पुण्यास राहूं लागला. पुणें येथें नेने घाटावर साकुर्डीकर दीक्षित म्हणून यांचें घराणें नांदत होतें.

गोपीनाथ मौनि—(स. १६५० सुमार) हा महाराष्ट्रीय असून राजा जयसिंहाच्या कारकीर्दीत बनारस येथें होऊन गेला. हा स्वतःस तर्कशास्त्रांतील कमलेंद्र असें म्हणवितो. यानें खालील ग्रंथ लिहिले आहेत:—

१ शब्दालोकरहस्य, २ तर्कभाषाटीका, ३ पदार्थविवेकटीका (हिस्टरी ऑफ इंडियन् लॉजिक, पा. ४८५).

गोवुरी ओव—विजयनगरच्या आरविदू घराण्यांतील वेंकटपतिदेवराय २ रा याचा हा सासरा होय. याची कोंडाम्बिका नांवाची मुलगी वेंकटराजास दिली होती. वेंकटराजाची दुसरी बायको रघवाम्बा हीहि याची मुलगी होती.

स. १६०६ पर्यंत याचें वेंकटराजाचे दरबारांत चांगल्या प्रकारचें वजन होतें. यानें दान पुष्कळ केलें असा उल्लेख शिलालेखांत आहे (वेंकटराजाचा नरसिंगपुरमचा शिलालेख).

गोमाजी नाईक पानसबळ—लुखजी जाधवरावाच्या पदरचा मनुष्य. जिजाबाई माहेरून शहाजीकडे आली, त्या वेळीं तिच्याबरोबर विश्वासाचा व खात्रीचा मनुष्य म्हणून जाधवरावानें यास पाठविलें होतें. प्रतापराव गुजरापूर्वी हा कांहीं काळ शिवाजीचा सेनापति होता असें याच्या शिक्क्यावरून दिसतें. हा स. १६४६ मध्यें पुण्याचा हवालदार होता. याचा मुलगा खंडेराव नाईक राजारामाच्या वेळीं योग्यतेस चढला. याचे आडनांवाचा उच्चार पानसबळ आहे. सवर अनुस्वार नाहीं.

स. १६४८ च्या सुमारास विजापूरचे नोकरींतील पांचसातशें पठाण शिवाजीकडे राहण्यास आले. शिवाजीच्या मनांत त्यांना आपल्याकडे ठेवावयाचें नव्हतें. परंतु याचा सल्ला विचारतां बोलला कीं, 'तुमचा लौकिक ऐकून हे लोक आले आहेत. त्यांना विन्मुख जाऊं देणें योग्य नाहीं. हिंदूंचाच संग्रह करूं, इतरांची दरकार ठेवणार नाहीं अशी कल्पना धरिली, तर राज्य प्राप्त होणार नाहीं. ज्यास राज्य करणें त्यानें अठरा वर्ण, चारही जाती आपआपले धर्माप्रमाणें चालवून संग्रह करणें' ही सल्ला फार चांगली जाणून राघो बल्लाळ अत्रे याचे निसबतीस त्यांना ठेवून घेतलें (म. रि. पूर्वार्ध, पा. १२१-२२).

गोरक्षनाथ—अयोध्येजवळ जयश्रीनामक एका नगरांत सद्बोध ब्राह्मणाची सद्वृत्ति नांवाची बायको होती. मत्स्येंद्रनाथ एकदां भिक्षानिमित्तानें तिच्या घरीं आले. सत्पुरुष जाणून तिनें मुलाची गोष्ट काढली. त्यांनीं तिला विभूति दिली, पण तिनें प्रसादबुद्धीनें ती विभूति न घेतां उकिरड्यावर टाकून दिली. बारा वर्षांनीं मत्स्येंद्रनाथ पुन्हां आले व 'मुलगा कोठें आहे ?' म्हणून विचारलें. तेव्हां तिनें खरी हकीकत सांगितली. तेव्हां उकिरड्यापाशीं जाऊन मत्स्येंद्रांनीं 'अलक्ष्य' (अलख) म्हणून हांक मारिली. तेव्हां 'आदेश' असें प्रत्युत्तर देत गोरखनाथांची बालमूर्ति बाहेर पडली ! यांना अयोनिसंभव म्हणतात त्याचें कारण हेंच. गोरखनाथ गुरूपाशीं सर्व विद्या शिकले. मत्स्येंद्रनाथ योगी व भोगीहि होते. परंतु गोरखनाथाचें वैराग्य अग्नीसारखें प्रखर होतें. हा योगी असून याच्या योगसिद्धीच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. सिंहलद्वीपच्या प्रमिला राणीच्या प्रेमपाशांतून गोरखानेंच मत्स्येंद्राची सुटका केली. हा योगी, शिवोपासक, अद्वैतमती व किमयागार म्हणून प्रसिद्ध आहे. याचें कर्तृत्व दांडगें होतें. याचे मठ बंगाल, नेपाळ, पंजाब, काठेवाड, महाराष्ट्र, सिंहलद्वीप वगैरे दक्षिणोत्तर सर्व दिशांकडे आहेत. मत्स्येंद्रनाथ व गोरक्षनाथ हे नेपाळांतल्या गुरखे लोकांचे देव आहेत. त्यांना गुरखे ही संज्ञा गोरखनाथापासूनच मिळाली आहे. नेपाळांत बौद्धांचा महायानपंथ होता त्याला गोरखनाथांनीं चांगलाच खो दिला; व सर्व लोकांस शिवाची उपासना दिली. गोरखाचा काल अजून अनिर्णित आहे.

गोरक्षपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एक सिद्ध. हा जातीनें मछुआ असून कामरूपदेशांतील राहणारा होता. याच्या वेळेस देवपाळ नांवाचा राजा होऊन गेला (स. ८०९-४९). यानें 'वायुतत्त्वभावनोपदेश' (तं. ४८। ५१) हा ग्रंथ लिहिला.

गोरा कुंभार—(स. १२६७-१३१७) हा तेरढोकीचा राहणारा. या गांवीं याचें वतनी इनाम होतें. ह्याचा जन्म शके ११८९ मध्यें असल्यामुळें संतमंडळींत सर्वांत हा वडील होता; व सर्वजण याला गोरोबाकाका असें म्हणत. जसा वयानें तसाच वैराग्यानेंहि हा सर्वांत श्रेष्ठ होता. आवा घडण्याकरितां माती आणावी आणि ती मऊ करण्याकरितां तींत नाचतांना तोंडानें पंढरीनाथाचे भजनाचा सपाटा लावावा व प्रेमाच्या भरांत येऊन आनंदानें डुलत राहावें असा याचा नित्यक्रम असे. हा आपल्या अभंगांत नामदेवाचा मोठ्या प्रेमानें वारंवार उल्लेख करतो. "म्हणे गोराकुंभार अनुभवाचा ठेवा । प्रत्यक्ष नामदेवा भेटलासी ॥" (महाराष्ट्र सारस्वत). गोरोबांना संती व रामी अशा दोन स्त्रिया होत्या. गोरोबा चिखल तुडवीत असतां भजनानंदांत तल्लीन होऊन इतके नाचले कीं, रांगतें पोर पायाखालीं तुडवतांना मेलें याचीहि यांना शुद्धि नव्हती. 'माझ्या अगाला हात लावाल तर तुम्हांला विठोबाची शपथ' असें संती सहज म्हणाली, तों यांनीं तिला स्पर्श करण्याचेंहि सोडून दिलें. मग आपल्या बहिणीपासून तरी मूल होऊन वंश चालो म्हणून संतीनें स्वखुषीनें याचें रामीशीं लग्न लावून दिलें. लग्नसमयीं 'दोघी बहिणींना समानतेनें वागवा' असा सासऱ्यानें उपदेश केला, तों यांनीं तिच्याहि

अंगाला हात लावायचा नाहीं असें ठरविलें. एके रात्रीं दोघी बहिणींनीं याचे दोन्ही हात आपल्या पोटावर घेतले तों आपले हात पापी समजून तोडून हा थोटा बनला. अशा याच्या करारीपणाच्या गोष्टी सांगतात. नामदेवांना डोक्यावर थापटणें मारून 'कच्चा घट' म्हणून यांनींच ठरविलें व मग कच्चेपणा घालविण्यासाठीं नामदेव विसोबा खेचरांना शरण गेले.

याचे सुमारें त्रेचाळीस अभंग प्रसिद्ध आहेत, पण ते बहुतेक याच्या नांवावर कोणींतरी मागाहून लिहिले असावेत. कारण यांपैकीं २१ अभंगांत गोरोबाचें चरित्र असून त्यांत याची फारच स्तुति केली आहे. सूरदास व कबीर या उत्तरकालीन संतांचे निर्देश याच्या अभंगांत आहेत. यांचें देहावसान वयाच्या ५० व्या वर्षी शके १२३९ मध्यें झालें.

गोराबादल—हें एका व्यक्तीचें नांव आहे किंवा गोरा व बादल अशा दोन व्यक्ति आहेत याबद्दल संशय आहे. पूर्वीच्या लोकांनीं जरी हीं दोन व्यक्तींचीं नांवें आहेत असें मानलें आहे तरी श्री. ओझा यांना ती गोष्ट मान्य नाहीं. त्यांच्या मतें गोरा हें वंशसूचक नांव असून बादल हें व्यक्तीचें नांव आहे. राठोड दुर्गादास, सींसोदिया पत्ता इत्यादि नांवांप्रमाणें हें एका व्यक्तीचें नांव आहे. गोरावंश नष्ट झाल्यामुळें भ्रमानें दोन व्यक्ती मानण्याची चूक झाली आहे. कर्नल टॉडनें गोरा व बादल या दोन व्यक्ती मानून त्या सिंहल राजाच्या कुटुंबांतील मानल्या आहेत. तसेंच गोरा हा पद्मिनीचा काका व बादल हा पुतण्या होता असें म्हटलें आहे. पण हें चूक असून रत्नसिंहाच्या कारकीर्दीचा विचार करितां सिंहलद्वीप (लंका) येथील पद्मिनी असणें अशक्य असून चितोडपासून पूर्वेस चाळीस मैलांवर सिंगोली आहे तेथील राजाची पद्मिनी ही मुलगी असावी असें ओझाजींना वाटतें.

गोवर्धन—यानें 'तर्कभाषाप्रकाश' या नांवाची टीका केशव-मिश्राच्या 'तर्कभाषा' या ग्रंथावर लिहिली.

कीथनें याच्या टीकेचा काल स. १५७८ असा दिला आहे. परंतु तो काल ग्रंथाच्या नकलेचा असून ती नकल गोवर्धनाच्या भावानें केली. यावरून यानें आपली टीका स. १५७८ च्या पूर्वी २५-३० वर्षे लिहिली असली पाहिजे. तेव्हां याच्या टीकेचा काल स. १५५० पर्यंत मागें ढकलला जातो.

२. पुराणसर्वस्व नांवाच्या संस्कृत भाषेंतील ग्रंथाचा कर्ता. हा बंगालच्या सत्यखानाचा आश्रित होता. महाभारत-टीकाकार अर्जुनमिश्र आणि हा समकालीन होते. (इंडियन कल्चर, जुलै १९३५ पा. १४१-४६).

गोवर्धन मार्तंड—त्रावणकोरचा राजा. यांचें राज्य वेनाद नांवानें प्रसिद्ध होतें. सिलोनपर्यंत याचें राज्य पसरलें होतें. पांड्य याचे मांडलिक होते (हिस्टरी ऑफ केरळ).

गोवर्धनाचार्य—(स. १०७५-११२५) बंगालचा राजा लक्ष्मणसेन याच्या पदरीं हा कवि होता. याच्या बापाचें नांव नीलांबर असें असून याचे शिष्य उदयन व भाऊ बलभद्र हे होत. यानें आपल्या काव्यांत बहुतेक प्राचीन थोर थोर कवींचा उल्लेख केलेला आहे.

जयदेव कवीनें 'गीतगोविंदांत' याची स्तुति केलेली आहे. यावरून बाण, भवभूति व कालिदास यांच्या नंतर हा कवि झाला, हें उघड आहे. याचा आर्यासप्तशती नांवाचा एक ग्रंथ आहे. त्यांत एकंदर ७५६ आर्या आहेत. हा ग्रंथ शृंगाररसात्मक आहे (वि. वि. २१ अ. ९-१०).

गोवळकोंड्याचें कुत्बशाहीघराणें—१ सुलतान कुली (कुत्बुल्मुल्क, स. १५१२-१५४३ खून) - २ जमशीद (स. १५४३-५०, याचे भाऊ हैदरकुली, कुत्बुद्दीन व) ३ इब्राहीम (स. १५५०-८१, पत्नी बिबी जमाली निजामशाह)-४ मुहम्मद कुली (स. १५८१-१६१२ याचे बंधु अबदुल कादिर, हुसेन कुली, मुहम्मद अमीन) ५ मुहम्मद (मुहम्मद अमीनचा पुत्र. स. १६१२-३५)-६ अबदुल्ला, (स. १६३५-७२ याची मुलगी ताजमहाल अबुल हसनला दिली होती)-७ अबुल हसन (स. १६७२-८७ खालसा-मृ. १७००).

मुहम्मद बाहामनीच्या वेळीं सुलतान कुली हा तेलंगणचा सुभेदार होता. स. १५१२ मध्यें स्वातंत्र्य जाहीर केलें व गोवळकोंडा ही राजधानी केली.

गोविंद—नामदेवाच्या चार मुलांतील एक.

२. हा सुप्रसिद्ध सुतार मंडनचा पुत्र. यानें वास्तुशास्त्रावर उद्धारधोरणी, कलानिधि व द्वारदीपिका नांवांचे तीन ग्रंथ लिहिले. याला उदेपूरच्या कुंभ राण्याचा आश्रय होता.

गोविंद कवि—हा तंजावरच्या तेलगू राजाच्या वेळीं उदयास आला. हा चांगल्यापैकीं कवि असून यांचें काव्य बरेंच प्रसिद्ध आहे. यानें गुजराथची कन्या इंदुमती हिच्यावर 'इंदुमती-परिणय' म्हणून एक काव्य लिहिलें आहे. याखेरीज द्रविड देशांतील पुष्कळ देवालयांचा वर्णनात्मक इतिहास यानें लिहिला आहे.

गोविंद कृष्ण काळे—(मृ. स. १८२३) काळे हे काशीचे राहणारे. यांच्या वडिलांचें नांव कृष्णराव बल्लाळ. वडिलांच्या हाताखालीं हा तयार झाला. आणि त्यांच्या मृत्यूनंतर स. १७८६ मध्यें यानें निजामाकडे पेशव्यांचा वकील म्हणून काम करण्यास सुरुवात केली. याचें सुव्यवस्थित ठेवलेलें दप्तर राजवाडे खंड ५.७ व २२ मध्यें प्रसिद्ध झालें आहे. खर्ड्याच्या लढाईनंतर झालेल्या तहांत याचा मुख्य हात होता, पण तो जोरदारपणें याला अमलांत आणतां आला नाहीं. सवाई माधवरावाच्या मृत्यूनें तर सर्वच पारडें फिरलें. पेशवे-दरबारनें व निजामानेंहि बराच मोठा सरंजाम दिला होता. रावबाजींना सल्लामसलत देणाऱ्या अमृतरावादि मंडळींत हा होता; व त्यामुळें हा नानासहि कैदेंत टाकण्यास तयार झाला. पुन्हां एकवार नानास कैदेंत टाकण्यास ह्याची तयारी झालेली पाहून उलट श्रीमंतांनींच यास कैदेंत टाकण्यास सांगितलें; व त्याप्रमाणें नानानें केलेंहि (स. १७९९). या वेळीं याचा १। लक्षाचा सरंजाम जप्त करण्यांत आला. पुढें इंग्रजींत हा बारामतीस येऊन राहिला. या वेळीं कांहीं इनाम गांवें व पोलिटिकल पेन्शन म्हणून ३ हजार रुपये इंग्रजांकडून याला मिळत. हा स. १८२३ त वारला. इंग्रजांच्या विरुद्ध एक गुप्त कट रचण्याचा यानें प्रयत्न केला असें कांहींचें म्हणणें आहे, पण कटावर एल्फिन्स्टनचा विश्वास नाहीं.

गोविंद गदाधर (जुन्नरकर)—यानें कुंडमार्तंड नांवाचा ग्रंथ स. १६१३ मध्यें केला.

गोविंद गुप्त—दुसऱ्या चंद्रगुप्ताचा मुलगा. हा गादीवर आला नव्हता.

गोविंद गोपाळ कामतेकर—हा सारस्वत ब्राह्मण असून फत्तेसिंग गायकवाडाचा दिवाण होता. याचा गोंदबा या नांवानेंहि उल्लेख करितात. याच्या वंशाची हल्ली वस्ती बडोदें येथें आहे.

ज्या वेळीं गॉर्डर्डनें (इंग्रज सेनापति) गुजराथेवर स्वारी केली तेव्हां फत्तेसिंगानें 'पुण्याहून फौजा लवकरच न आल्यास गुजराथ हातचा जाणार' असें पुण्यास लिहून कळविलें, आणि अंतस्थपणें गॉर्डर्डशीं संधान चालू ठेविलें. हा खेळ या दिवाणाच्या सल्ल्यानें फत्तेसिंग खेळत होता. महादजीनें नानास लिहिलेल्या पत्रांत याच्याविषयीं खालील उल्लेख केला आहे.

' गोंदबा स्पष्ट सरकारचे नाशास प्रवर्तला हें त्यास कळत नाहीं. सांप्रत त्यानें धन्यास न विचारतां सिनोर, चांदोर, करनावळीच्या सनदा इंग्रजास दिल्या, आणि डभई किल्ला व परगणा आपले बायकोचे चोळीबद्दल घेतला. इंग्रज कूच करून जाताच डभईत गोंदबानें आपला अंमल बसविला. चौघे गृहस्थ पुण्याहून आलेले गोंदबाजवळ आहेत. तेव्हां गोंदबास हरामखोर कीं हिंदु काय म्हणावे ! आम्ही इकडून राजकारण करतों, ते तिकडून करतात, तेव्हां आम्हास तोंडघशीं पाडावें हीच कीं नाहीं मसलत ! वगैरे--' त्याचप्रमाणें नानानें आपल्या पत्रांत याच्याविषयीं खालील उल्लेख केला आहे—

' गोंदबा सरकारचे नाशास प्रवर्तक असें कळल्यावर आम्हीं काय उणे केले ? रांडापोरें धरून किल्यावर कैदेंत घातलीं. चोळीबद्दल महाल घेतले, ही चोळी किल्यावर अडकविली आहे.' वगैरे (म. रि. उत्तर वि. १ ला).

गोविंदचंद्र गाहडवाल—(स. १११४-११५५) हा कनोजच्या मदनपाल गाहडवालाचा मुलगा. तत्कालीन लेखांत याचें वर्णन ' नवीन स्थापलेल्या राज्यास यानें आपल्या बाहूंनीं दोरखंडाप्रमाणें बांधून स्थिर केलें.' ' याचे लढाऊ हत्ती तिन्ही दिशांस सारखे फिरत होते ' असें आढळतें. यानें 'नरपति-हयपति-गजपति-त्रैलोक्यविजेता ' हें बिरुद प्रथमच धारण केलें. या तीन राज्यांचा खुलासा अद्यापि झालेला नाहीं. हयपतीचें राज्य कनोजच्या प्रतिहाराचें राज्य, गजपति म्हणजे बंगालचें राज्य, आणि नरपति म्हणजे चेदीचें राज्य असावें. नरपति म्हणजे कदाचित् तेलंगणाचें राज्य असेल तेलंगणाच्या राजानें याच्या पदकमलाचें चुंबन घेऊन याचें मांडलिकत्व कबूल केलें, असें याचें वर्णन आलें आहे. बनारस व त्याभोंवतालचा प्रदेश याच्या ताब्यांत होता. कारण त्या प्रान्तांतील बरींच गांवें यानें दान केलीं आहेत व त्याचीं दानपत्रें बनारस येथून प्रसिद्ध झालीं आहेत. यावरून याला व जयचंद्रास मुसलमानी लेखक बनारसचा राजा म्हणतात. पण याची ती दुसरी राजधानी दिसते.

हा युवराज असतांच यानें पूर्वेच्या गौडांचा आणि पश्चिमेकडील हंमीराचा पराभव केला; आणि आपल्या अश्वदळाच्या जोरावर मुसलमानांना पायबंद घातला असावा असें दिसतें.

हा माळव्याच्या भोजाप्रमाणें आपल्या दरबारांत विद्वानांस आश्रय देत असे. या बाबतींत याचें वर्णन ' विविधविचारविद्यावाचस्पति ' या विशेषणानें गाहडवालांच्या लेखांत येतें. याचा युद्धखात्याचा प्रधान लक्ष्मीधर यानें ' व्यवहारकल्प' नांवाचा ग्रंथ धर्मशास्त्र व काम

चालविण्याची पद्धत या विषयांवर लिहिला आहे. यामुळे यास समुद्रगुप्त, हर्ष, भोज, शिवाजी, महमूद, व अकबर इत्यादि महान् विजेते व विद्वानांचे चहाते अशा राजांच्या मालिकेंत घालावयास हरकत नाही. यानें स. १११४ पासून स. ११५५ पर्यंत दीर्घ काळ राज्य केलें. स. ११०४ पासून स. १११४ पर्यंतचीं आणखी दहा वर्षें गोविंदचंद्राच्या राज्यकालांत सर व्हि. स्मिथनें चुकीनें घातलीं आहेत. पंडित गौरीशंकर ओझा यांनीं याचा राज्यारंभकाल स. १११४ हाच दिला आहे स. ११०४-९ पर्यंत यानें युवराज म्हणूनच सही केली आहे. तसेंच इतर लेखांचें आहे (इंडि. ॲंटि. २ पा. ३५८, १४. पा. १०३).

हा पुष्कळ वर्षें राज्य करीत होता. बनारसजवळ याचे एकवीस ताम्रलेख एकत्र सांपडले. ते ११५४ पर्यंतचे असून एपि. इंडि. मध्यें छापले आहेत. एकंदर आतांपर्यंत चाळीस लेख मिळाले आहेत. याच्यानंतर विजयचंद्र गादीवर आला.

याच्या राणीचें नांव कुमारदेवी. हिचा एक लेख सारनाथ येथें सांपडला आहे. त्यावरून पाल, राष्ट्रकूट व गाहडवाल यांचा शरीरसंबंध दिसून येतो. तसेंच तुरुष्कांनीं दूषित केलेली वाराणसी शुद्ध करण्याकरितां हरानें सांगितल्यावरून हरि गोविंदचंद्ररूपानें अवतरला असें त्यांत म्हटलें आहे. त्यावरून वाराणाशीवर मुलसमानांचें आक्रमण, गोविंदचंद्रानें त्यांचा केलेला पराभव व वाराणशीशीं संबंध या गोष्टी स्पष्ट होतात (एपि. इंडि. ९, पा. ३१९). यानें जेतवनविहाराला पांच गांव दिले होते. यांचें नांव कांहीं हस्तलिखित लेखांत अभयचंद असें दिलेलें आढळतें (हिं. भा. अ. पा. ३४०) व याच्या राणीनें म्हणजे कुमारदेवीनें सारनाथ येथें बांधलेल्या प्रचंड बुद्धमंदिराचीहि माहिती मिळते.

गोविंदचंद्र हरिचंदन—(मृत्यु स. १७६१) अतगड येथील बोधले घराण्यांतील हा २१ वा राजा होय. याच्या बापाचें नांव जगन्नाथ अथवा जगबन्धु हरिचंदन असें होतें. जगन्नाथ हा एका मुसलमान नबाबाचा गंजम प्रांतावरील सुभेदार होता. याच्या बापानंतर याचा थोरला भाऊ मधुसूदन हा गादीवर आला. मधुसूदनानें स. १७५८–१७६१ पर्यंत राज्य केलें. मधुसूदन निपुत्रिक मरण पावल्यामुळें गोविंदचंद्र हा गादीवर आला.

याच्याविषयींचे शिलालेख उपलब्ध असून त्यांवरून हा उत्तम राजा होऊन गेला असें सिद्ध होतें.

याच्यावर नबाब कुम्भील आनंदराज यानें स्वारी केली, पण त्यांत त्याचा पराभव झाला. यानें गुंसूर येथील राजा कृष्ण भुंज याचा पराभव केला. कृष्ण भुंजावर गेलेल्या सैन्याचा श्रीकरण पत्नैक हा सेनापति होता. यानें पुष्कळ राजांना मदत केली व आपला गेलेला प्रांत परत मिळविला.

हा स. १७६१ मध्यें गादीवर बसला. याच्या वेळचे बरेच शिलालेख उपलब्ध आहेत.

गोविंद ठक्कुर—ह्याच्या पित्याचें नांव केशव असें असून आई सोनादेवीबाई होय. याचा वडील व धाकटा असे दोघेहि बंधु कवि होते. यानें नारायण यास आपला गुरु केलें होतें. यानें मम्मटाच्या काव्यप्रकाशांतील कारिकांवर स्वतंत्रपणें टीका करून पुष्कळ नवीं उदाहरणें देऊन विवेचन केलें आहे. त्यामुळें याच्या ग्रंथास स्वतंत्र ग्रंथाचें महत्त्व आलें आहे. तो ग्रंथ काव्यप्रदीप या नांवानें प्रसिद्ध आहे व त्यावर नागेशानें उद्योत नांवाची टीका लिहिली आहे. यानें केलेल्या टीकेंत भास्कर भट्टाचार्य व चंडीदास भट्टाचार्य हीं नांवें आढळतात. दुसरी टीका म्हणजे काव्यप्रकाशांतील उदाहरणपद्यावर उदाहरणदीपिका नांवाची दीपिका यानें लिहिली. हा तर्कशास्त्रज्ञ होता (वि. वि. पुस्तक २२ अंक १–२).

गोविंददास—(स. १६०० सुमार) एक बंगाली कवि. हा मैथिली किंवा बंगाली ब्राह्मण. कदाचित् हा कायस्थ असेल. याचा जन्म चटगांव जिल्ह्यांतील देवग्राम गांवीं झाला. गोत्र अत्रि. याचा मुख्य ग्रंथ विद्यासुंदर. याचे विचार गंभीर व तात्त्विक आहेत. याचे ग्रंथ– १ प्रेमविलास, २ भक्तिरत्नाकर, ३ भक्तमाल. याच नांवाचे दोन कवि होऊन गेले, एक बंगाली व दुसरा मैथिल (क. कौ. भा. ७).

गोविंद दीक्षित—हा एक कवि होय. तंजावरचा अच्युतप्पा नायकाचा हा एक आश्रित होता. हा नुसता कवि नसून तत्त्वज्ञानीहि होता.

यानें 'हरिवंशसार-चरित्रम्' हा पद्यात्मक ग्रंथ ३ विभागांत संस्कृतमध्यें लिहिला आहे. या ग्रंथावर अप्पय्या दीक्षित यानें टीका लिहिली आहे. याशिवाय यानें कांहीं पदें लिहिलीं आहेत व त्या पदांच्या संग्रहास 'संगीतसुधानिधी' असें नांव दिलेलें आहे. हा एक तामीळ कवि असावा, कारण यानें संस्कृताचें भाषांतर तामीळमध्यें केलें आहे.

२. (सनाचें सोळावें शतक) ऋग्वेदी आश्वलायन कर्नाटकी ब्राह्मण. गांव पट्टेश्वरम् (धेनुपुरम्). हें गांव कावेरीच्या एका उपनदीवर आहे. याच्या बायकोचें नांव

नागंबा. याला आठ मुलगे व एक मुलगी होती. हे तंजावरच्या नायक राजांचे प्रधान होते. यांना राजा होण्याचा मान मिळत असूनहि हे प्रधान झाले. यांनीं अनेक अग्रहार दिले. त्यांपैकीं 'एकादशीअग्रहारम्' हा तंजावरमध्यें अद्यापि प्रसिद्ध आहे. यांना अद्वैतविद्याचार्य असें तंत्रशिखामणीमध्यें चूडामणीनें म्हटलें आहे. नायक राजे वैष्णव होते व हे शैव होते. यानें अनेक यज्ञ केले. तंजावर भागांत यांनीं बांधलेलीं अनेक स्थळें यांची अद्यापि आठवण देतात. यांचे वेदांत, धर्म, शिल्प व संगीत या शास्त्रांत ग्रंथ आहेत. यांच्यांत चमत्कार करण्याचीहि शक्ति होती. पेट्टेश्वरम् येथें ज्ञानांबिकेच्या देवळानजीक यांनीं देह ठेवला. ज्ञानांबिकेच्या सन्निध यांची व यांच्या पत्नीची उभी मूर्ति आहे) एन्. के. पंतलु-गोविंद दीक्षित चरित्रावरून).

गोविंद नीळकंठ (खाजगीवाले) लिमये— हा गोविंद शिवराम यांचा नातू होय. यास स. १७९२ मध्यें श्रीमंतांकडून हत्ती मिळाला. हे खर्ड्याच्या लढाईंत हजर होते. पुढें यांच्यावर स्वारी नाराज झाल्यामुळें यांचा अर्धा सरंजाम, साडेचोवीस हजारांची जहागिरी व साडेसहा हजारांची खाजगीची नेमणूक रद्द केली गेली. यांनीं पुण्याच्या शुक्रवार पेठेंत एक विष्णुचें देऊळ बांधिलें. यांच्या मुलाचें नांव नीळकंठ असें होतें. त्यावर स. १८३८ त बंडाचा आरोप आला होता. परंतु स. १८४०त तो निर्दोषी सुटला व स. १८५९ त वारला.

गोविंद न्यायवागीश—(स. १६५० सुमार) ह्याचा जन्म वासुदेव सार्वभौमाच्या कुलांत झाला असून ह्याच्या वेळीं हाच सर्वांत विद्वान् तर्कज्ञ म्हणून प्रसिद्ध होता. रेवी येथील राजा राघव याचा यास आश्रय होता. या रेवी गांवासच मागाहून कृष्णनगर असें म्हणूं लागले. या राजा राघवानें दिङ्नगर येथें स. १६९९ त एक तळें बांधलें. हा आपल्या बापाचें नांव न्यायवाचस्पति असें देतो. हा न्यायवाचस्पति म्हणजे रुद्रन्यायवाचस्पतीच होय. यानें खालील ग्रंथ लिहिले आहेत:

(१) न्यायसंक्षेप, (२) पदार्थखण्डनव्याख्या, (३) समासवाद (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४८०).

गोविंदपंत—हे निवृत्तिनाथाचे आजे होत. हे मूळचे आपेगांवचे कुळकर्णी.

गोविंदपंत गानू—अहल्याबाई होळकर यांचे खासगी कारभारी.

गोविंदपंत बुंदेले—(मृत्यु स. २२-१२-१७६०) यांचें नांव गोविंद बल्लाळ खेर असें आहे. कऱ्हाडा ब्राह्मण. यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील नेवरें असून हा तेथील कुळकर्णी होता. ह्याचा बाप लहानपणींच वारल्यानें सर्व काम ह्याच्या अंगावर पडलें. हूड स्वभावामुळें काम नीट न होऊन भाऊबंदांचा त्रास अनिवार होऊं लागला. तेव्हां बर्व्यांचें उदाहरण पाहून हा देशावर आला व बाजीरावापाशीं राहिला. अंगच्या हुशारीनें व कर्तबगारीनें हा मोठेपणास चढला.

ज्या वेळीं बाजीराव छत्रसाल राजाच्या मदतीस निघाला त्या वेळीं हा लष्कराबरोबर होता. बुंदेलखंडाकडे जात असतां मध्यें नदीवर लष्कराचा तळ पडला. तेथें या गोविंदपंतानें एक प्रेत जळत होतें त्यांतून विस्तव घेऊन पदरांत पीठ होतें त्याच्या दोन भाकऱ्या करून खाल्ल्या! तिकडे श्रीमंतांचें लक्ष होतेंच. तेव्हां यास विचारलें कीं, 'तूं कोठून आलास ?' तेव्हां यानें सांगितलें कीं, ' मी श्रीमंतांचे लष्कराबरोबर दक्षिणेंतून आलों. परंतु आज दोन दिवस झालें, खावयास मिळालें नाहीं, म्हणून थोडें खाऊन घेतलें. ' तेव्हां श्रीमंतांस वाटलें कीं हा मुलगा मोठा साहसी आहे. पुढें छत्रसाल राजाकडून झांशी, जालवण, गुलसराई, काल्पी व सागर हे प्रांत मिळाले. तेव्हां श्रीमंतांनीं स. १७३३ त गोविंदरावास सांगितलें कीं, तूं हे संभाळ.

फरुखाबादच्या लढाईंत यानें रोहिल्यांचा जंगी पराभव केला आणि पेशव्याकडून शाबासकी मिळविली. त्यासंबंधीं यांचें पुढील पत्र वाचण्यासारखें आहे (स. १७५५).

"बक्कुल्लाखान पातशाहींत नामी सरदार होता. त्याजला परम संकटें परम उपायें जीवाकडे न पाहता बुडविला. मराठा सरदार हें कर्म करिता तर जमिनीवर न माता. आम्ही स्वामीचे ब्राह्मण, आमची शिफारस कोण करणार? आज दोन लाख रुपयाचा तोपखाना स्वामीस मेळवून दिल्हा" (रा. खं. ३. १३७).

यावरून ब्राह्मण व मराठे या बाबतींतील पेशव्यांच्या वर्तणुकीबद्दल तर्क करतां येतो.

पानपतच्या युद्धापूर्वीपासून यानें वेळोवेळीं पेशव्यास बजावून सांगितलें कीं, हिंदुस्थानांत जय्यत अशी २० हजार फौज हवी; " रांगडे लोक हरामजादे फौज नसलिया बंदोबस्त रहाणार नाहीं. "

बक्कुल्लाखानाचा पराभव झाल्यावर राघोबादादानें तो प्रांत बर्व्यांच्या हवालीं केला. तेव्हां बर्वे व पंत यांचें सूत जमेना. अंतर्वेदींत प्रवेश करून यानें इटावा येथें जबरदस्त लढाई देऊन अस्करअल्लीस ठार केलें; व पुष्कळ प्रांत मराठी राज्यास जोडून स्वदेशीं परत आला. देशीं

आल्यावर वांईजवळील वाकेश्वराचा उद्धार करून त्यास बावधन हें गांव इनाम दिलें.

यानें अब्दाली दुआबांत असतां इटाव्याच्या बाजूनें बराच परिणामकारक शह देण्याचा प्रयत्न केला (रा. खं. ६. ५३२-५३८). हा शह उडविण्यासाठीं शिकारीचें निमित्त काढून शहाबल्लीखानाचा पुतण्या आताईखान यास अब्दालीनें दहा हजार निवडक स्वारांनिशीं गुप्त रीतीनें याच्यावर रवाना केलें. तीनचार प्रहरांत वीसपंचवीस कोसांची दौड करून दिवस मावळण्याच्या सुमारास गाजुद्दीननगराजवळ आताईखानानें गोविंदपंतास गांठलें. बांड्या रंगाचें होळकरी निशाण पुढें करून हे स्वार याजवर आले, तेव्हां ते शत्रु असतील असें यास वाटलें नाहीं. जवळ येतांच त्यांनीं कापाकापी सुरू केली. शत्रू किती आहे याचा अंदाज न लागल्यानें पंतांची फौज कांहीं लढली व कांहीं पळाली. स्वतः पंत व त्यांचा मुलगा पळत असतां हा घोड्यावरून खालीं पडला. त्याबरोबर याचें शिर शत्रूनें कापलें व तें अब्दालीनें सदाशिवरावांकडे पाठवून दिलें (मार्ग. शु. १५. २२ डिसें. १७६०). सदाशिवरावानें याच्या मुलास समाधानीचें पत्र धाडून बुंदेलखंडाची व्यवस्था दक्षतेनें ठेवण्याविषयीं लिहिलें (रा. खं. १. २७२). हा अब्दालीची रसद मारण्याचा प्रयत्न करीत असे, असें काशिरायाच्या बखरीवरून दिसतें. तथापि अब्दालीला मागें फिरावें लागेल असा निकराचा शह याला देतां आला नाहीं. सदाशिवराव रसद मारण्याविषयीं व ऐवज पाठविण्याविषयीं शेवटपर्यंत याला तगादा करतांना आढळतो. पण याच्याजवळ त्या कामाला पुरेल इतकें सैन्य नव्हतें. कांहीं वेळेला जमिनीचें उत्पन्न कमी करण्याचा आरोपहि याच्यावर केलेला आहे. पण त्या आरोपाचा पानपतच्या पराभवाशीं कांहीं संबंध नाहीं. राजवाडे यांचें याच्याविषयींचें लिखाण आग्रहीपणाचें आणि जातिद्वेषमूलक असल्यामुळें विचारार्ह नाहीं.

गोविंदपाल—(स. ११६१-१२००) हा बंगाल्यांतील पाल घराण्यापैकीं मदनपाल व चित्रमटिका यांचा पुत्र. हा स. ११६१ मध्यें गादीवर आला. याचा एक लेख विक्रमसंवत् १२३२ (स. ११७४) चा सांपडला आहे. तो याच्या राज्यारोहणापासून चौदा वर्षांनीं लिहिलेला आहे.

याच्या शासनकालाचा शिलालेख याच्या ३ऱ्या वर्षापासून लिहावयास सुरुवात झाली; व हा शिलालेख गदाधरच्या गयेमधील मंदिरांत आहे. याच्या शासनकालाच्या १८ व्या वर्षांत 'अष्टसहस्त्रिकाप्रज्ञापारमिता' ची एक प्रत लिहिली गेली; व ती हल्लीं एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररींत सुरक्षित आहे. चोविसाव्या वर्षामध्यें 'अमरकोष' लिहिला गेला. सदतिसाव्या वर्षामध्यें 'गुह्यबाली' ची एक प्रत व अडतिसाव्या वर्षी 'पंचकर' ची एक प्रत लिहिली गेली व एकोणचाळीस वर्षामध्यें 'योगरत्नमाला' याची एक प्रत लिहिली गेली. हे सर्व प्राचीन ग्रंथ केम्ब्रिज युनिव्हर्सिटीच्या लायब्ररींत आहेत.

याच्या कारकीर्दींत इख्तियार खल्जीची स्वारी झाली; व ३८ व्या वर्षी त्यानें गयेवर आपला अधिकार गाजविला. पण यानें पुन्हां गया आपल्या ताब्यांत घेतली. त्याला याच्या कारकीर्दीच्या शेवटल्या वर्षांत उद्दान्तपूर येथें घनघोर युद्ध करावें लागलें. त्यांत हा मारला गेला (स. १२००).

याच्या हयातींत यानें आपल्या राज्याचें उत्तम प्रकारें संरक्षण केलें. याच्या मागून येणारे राजे प्रबल नसल्यामुळें पाल वंशाच्या राज्याची वाढ स. १२०० त खुंटली ती कायमचीच खुंटली. याच्या नंतर मुसलमान लोकांनीं वंग देशावर स्वारी करून तो देश आपल्या ताब्यांत घेतला (गोपाळपालाचे पाषाण-शिलालेख).

गोविंदप्रभु—(स. ११८८-१२८५ सुमार) यालाच गुंडप्रभु अगर गुंडोबा म्हणत असत. हा काण्वशाखीय ब्राह्मण वऱ्हाडांत ऋद्धिपूर येथें राहत असे. याचा जन्म ऋद्धिपूरजवळच्या काटसुरेगव्हाण या खेड्यांत शके १११० (स. ११८८) मध्यें झाला. याचा जन्मकाल कोणी शके १०८३ देतात; कोणी ११०० देतात.

याचे आईबाप लहानपणींच वारल्यामुळें मावशीनें ऋद्धिपूर येथें याचें पालनपोषण व विद्याभ्यास केला. हे महानुभाव पंथाचे संस्थापक होत. यांचा शिष्य चक्रधर कृष्ण. यांना परमार्थाचा छंद लागून हे कांहीं काळानंतर सिद्धकोटीला गेले. हे मोठे तपस्वी व प्रेमळ कृष्णभक्त होते. हे दीर्घायुषी होते. यांनीं आपल्या देखत आपल्या महानुभाव सांप्रदायाचा चक्रधर कृष्णानें केलेला प्रचार पाहिला आणि चक्रधरानंतर तेरा वर्षांनीं शके १२०७ (स. १२८५) मध्यें आपला देह ठेविला (म. वा. इ. १ ४१५-१६).

गोविंद बाळकृष्ण दीक्षित गरुड—(स. १७८३ ते १८५१) हे एक संस्कृत कवि, ज्योतिषी व धर्मप्रबंधकार होऊन गेले. यांच्या पुत्राचें नांव सिद्धेश्वर. यांनीं (१) मंजूषा, (२) तरंगिणी, (३) कालप्रबोधोदय व (४) एकादशिका-प्रकाश हे चार ग्रंथ केले. हे कऱ्हाडचे राहणारे. यांचा गुरु रामचंद्र दैवज्ञ. शिवाय यांनीं

ज्योतिषशास्त्रावर बरेच ग्रंथ रचिले. महाराष्ट्रांत अलिकडे जे संस्कृत ग्रंथकार होऊन गेले त्यांमध्यें यांची गणना प्रामुख्यानें होते. लहान लहान असे यांचे बरेच ग्रंथ आहेत (मं. श. १८३६ वा. इ. ले. ६४).

गोविंद भगवत् पूज्यपाद—गौडपादाचार्यांचे शिष्य व आद्य शंकराचार्यांचे गुरु.

गोविंद भगवंत पिंगळे—(मृ. स. ३.१.१७९९) हे मूळचे राहणार इंदापूरचे. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. गोत्र भारद्वाज. यांचा गोविंदराव काळे यांच्या वशिल्यानें पेशवे सरकाराच्या फडांत शिरकाव झाला. हे फडणिसाचे विश्वासपात्र कारकून होते. यांस आलेलीं पत्रें म. इ. सा. खंड ७ यांत आलेलीं आहेत. यांस पेशवे सरकारांतून सरंजाम मिळाला असून, निजामाकडून निंबगांव, सांगवी, व भाळवणी अशीं तीन गांवें स. १७८३ मध्यें जहागीर मिळाली. यांना तीन पुत्र असून त्यांचीं नांवें अनुक्रमें व्यंकटराव, शामराव व भगवंतराव अशीं होतीं. शके १७३६ चे वांटणीपत्रकांत हे स. १७९९ त दिवंगत झाल्याचा उल्लेख आढळतो (मं. श.१८३७वा.इ. ले.७२).

गोविंदराज—(स. १०५०–११०० सुमार) मिताक्षरेमध्यें याचा उल्लेख आलेला नाहीं. पण हरलता यामध्यें आलेला आहे.

याची 'मनुस्मृती' वरील टीका फार प्रसिद्ध आहे. या टीकेचा कांहीं भाग रावसाहेब मंडलीक यांनीं छापलेला आहे; आणि कांहीं भाग डॉ. जॉली यांनीं प्रसिद्ध केला आहे. उग्र या शब्दाचें स्पष्टीकरण दोन ठिकाणीं निरनिराळें दिल्यामुळें याला कुल्लूकानें दोष दिला आहे.

याच्या ग्रंथांतून याच्या स्वतःविषयीं माहिती मिळते. हा भट्टमाधवाचा मुलगा होय, आणि नारायणाचा नातू होय. हा गंगेच्या तीरावर राहत असे. मनुस्मृतीचें अध्ययन झाल्यावर यानें मनूवरील प्राचीन टीकांचें अवलोकन केलें.

ज्ञान आणि कर्म यांच्या संयोगानें मोक्ष मिळतो, वगैरे मेधातिथीसारखीं याचीं मतें होतीं. कुल्लूकानें याचा वेळोवेळीं उल्लेख करून याचा उपहास केलेला आहे. मुलीच्या मुलाचा हक्क याविषयीं याचीं मतें दायभाग यामध्यें आलेलीं आहेत.

स्मृतिमंजरी हा एक याचा ग्रंथ होय. याची हस्तलिखित प्रत फार क्वचित् ठिकाणीं आढळते. यामध्यें धर्माविषयीं विवरण केलेलें आहे. धर्म, संस्कार, रोजची स्नानसंध्या, शिष्यावस्था, गृहस्थाश्रम व संन्यास यांतील कर्में वगैरेसारख्या सर्व गोष्टींची माहिती या स्मृतिमंजरींत दिलेली आहे. हा ग्रंथ धर्मशास्त्राच्या माहितीचें आगर आहे, अशी या ग्रंथाची ख्याति आहे.

गोविंदराज मौर्य—(स. १०७० सुमार) हा नाशिककडील मौर्य घराण्यांतील एक राजा. याचा एक शिलालेख वाघली (पूर्वखानदेश) या गांवीं आहे. हा देवगिरीकर यादवांचा मांडलिक होता.

गोविंदराज यादव—(स. १२०० सुमार) यादव घराण्यांतील एक राजा. मलुगी अमरगांगेयानंतर हा गादीवर आला.

गोविंदराव खंडेराव चिटणीस—(स. १७१६–८४) खंडो बल्लाळ चिटणिसाचा हा पुत्र.

खंडोबाच्या पश्चात् चिटणिसीचें काम याचा ज्येष्ठ भाऊ जिवाजी पाहत असे. त्याचेनंतर हा चिटणिसीचें काम पाहूं लागला. शाहूचा याच्यावर संपूर्ण विश्वास होता. शाहूची धाकटी राणी सगुणाबाई ही याला मुलाप्रमाणें वागवी. विरूबाईचीहि याच्यावर मर्जी होती. तिच्याच शिफारशीनें शाहूनें याला चिटणिशी दिली. बाळाजी विश्वनाथाची व याची मैत्री होती. शाहूच्या मृत्युसमयीं पेशव्यांनीं जी मसलत केली, तींत हाहि होता. हा अखेरपर्यंत साताऱ्यास राहिला. नानासाहेबांनीं याला लिहिलेलें एक पत्र फार महत्त्वाचें आहे (भा. व. ऐ. या. ले. ५७). याला लक्ष्मण नांवाचा एक पुत्र होता. शिवाय आणखी २ मुलें होतीं. त्यांचीं नांवें बाबाजी व शिवराम. हा ता. १३-८-१७८४ रोजीं मेला. तेव्हां याचा पुत्र लक्ष्मण यास दुखवटा पाठविला, असा उल्लेख भा. व. शकावलीमध्यें आहे.

पेशव्यांनीं याच्याशीं संधान नेहमींच चांगलें राखिलें होतें. ज्या वेळेस शाहूनगरांत मोठी आग लागली होती तेव्हां त्यांत याच्या वाड्यासही ती लागून तो वाडा पार जळून गेला. ता. २०-३-१७५३ (रा. खं. ६.पु. रो. पृ. १०३). यास पेशव्यांनीं लिहिलेलें दुसरें एक पत्र वाचण्यालायक आहे (रा. खं. ६ ले. २४३) (ता. ३-१-१७५१). (म. रि. म. वि. २ पृ. १७०).

गोविंदराव गायकवाड—(स.१७६८–१८००) हा दमाजीचा पुत्र.

ता. १८-८-१७६८ रोजीं दमाजी मृत्यु पावला, आणि त्याच्या मुलांत तंटे लागले, ते तोडून माधवरावानें गोविंदरावास सरदारीचीं वस्त्रें दिलीं.

दादास कुमक केल्याबद्दल दंड तेवीस लक्ष, वस्त्रें देण्याबद्दल नजराणा एकवीस लक्ष, व खंडणीची बाकी, मिळून पन्नास लक्ष रुपये देण्याचा व चार हजार फौज घेऊन

मुलूखगिरीस येण्याचा करार गोविंदरावानें पेशव्यांस लिहून दिला (म. रि. म. भा. ४ पा. १५४).

याची व फत्तेसिंगाची लढाई होऊन फत्तेसिंगाचा जय झाला, त्यामुळें फत्तेसग गुजराथेंत कायम झाला. पण पुढें तो पुण्यास आला, तेव्हां तेथें रामशास्त्री यांचे मार्फत गोविंदराव व सयाजीराव यांच्या हक्काचा निवाडा करण्यांत आला. फत्तेसिंगानें नजराण्याची सर्व रक्कम देऊन वहिवाटीप्रमाणें चाकरी करण्याचें कबूल केल्यावरून माधवरावानें 'सनाखासखेल' पद व सरदारीचा मान त्याकडे कायम ठेविला, आणि यानें तीन लाखांची जहागीर घेऊन पुण्याजवळ दावडी येथें राहावें असें ठरलें. फत्तेसिंग याचा भाऊ होता.

हा दावडीस स्वस्थ होता; परंतु पूर्वीपासूनच याचा ओढा दादाकडे असल्यामुळें नारायणरावाचे मृत्यूनंतर दादास पेशवाई मिळाली, तेव्हां यानें पुनरपि उचल घेतली. सन १७७३ चे अखेरीस यास सेनाखासखेली देऊन फत्तेसिंगाशीं लढण्यास पाठविलें. पण त्या वेळीं फत्तेसिंगानें निकरानें सामना करून आपली बाजू राखिली. नंतर फत्तेसिंग इंग्रजांस मिळाला, म्हणून त्यास शह देण्याकरितां महादजीनें गोविंदरावास आपल्याजवळ आणिलें आणि बडोदें हस्तगत करण्याची युक्ति चालविली. महादजीनें याला हाताशीं धरून याची स्थापना पांचसहा हजार फौजेसह इंग्रजांस शह देण्याकडे केली. 'गोविंदरावावर श्रीमंतांची कृपा झाली, व फत्तेसिंगास गुजराथेंतील अंमल करू देणार नाहींत' अशी हवाल गुजराथेंत चालून, तिकडे या गायकवाड-बंधूंचे खटके उडूं लागले (आबा कृष्ण शेलूकर पाहा).

गोविंद राष्ट्रकूट--इंद्राचा मुलगा.

२. (स. ७७२-८३) हा पहिल्या कृष्ण राष्ट्रकूटाचा ज्येष्ठ पुत्र. बापाच्या मागून याला मालखेडचें राज्य मिळालें. फ्लीटच्या मतें याला राज्याधिकार कधींच प्राप्त झाला नव्हता. परंतु यानें कांहीं काल राज्य केलें असल्याचा पुरावा सांपडतो. स. ८१४ मधील कद्रु येथील शिलालेखांत याच्या राज्यारोहणसमारंभाचें विस्तृत वर्णन आहे. तसेंच दौलताबादच्या स. ७९३ सालच्या शिलालेखांत 'गोविंदराजास पदच्युत करून त्याचा धाकटा भाऊ ध्रुव गादीवर आला' असें वर्णन आढळतें. त्यावरून कांहीं कालपर्यंत कां होईना यानें मालखेडचें राज्य केलें, ही गोष्ट निर्विवाद आहे.

यानें पारिजात नांवाच्या राजाचा पाडाव करून गोवर्धन राजास साहाय्य केल्याचा उल्लेख आहे. पण पारिजात अगर गोवर्धन यांच्याबद्दल कसलीहि जास्त माहिती मिळत नाहीं.

राज्यपद प्राप्त झाल्यावर यानें आपला वेळ चैन व विलास यांमध्यें घालविण्यास सुरुवात केली. त्यामुळें याची कारकीर्द दिवसेंदिवस अप्रिय होत गेली. याचा धाकटा भाऊ ध्रुव हा या वेळीं खानदेश व नाशिक या प्रांतांचा सुभेदार होता. पण हा विलासी असल्यानें मालखेडचीं राज्यसूत्रेंहि मुख्यत्वेंकरून ध्रुवाच्याच हातांत होतीं. याची चैन उत्तरोत्तर वाढतच चालली हें पाहून त्याचें आयतेंच फावलें व त्यानें स्वतःच्या जबाबदारीवर व स्वतःच्याच नांवानें निरनिराळ्या सनदा देण्यास सुरुवात केली. यास लवकरच त्याचा कावा समजून आला; व यानें ध्रुवाकडून राज्यसूत्रें काढून घेऊन दुसऱ्यास प्रधान नेमिलें. याप्रमाणें अंतस्थ कलह वाढत चालला आहे हें पाहून मांडलिक राजेहि आज ध्रुवाचा पक्ष, तर उद्यां याचा, याप्रमाणें वेळ येईल तशी पगडी फिरवूं लागले. ध्रुवाला तरी हेंच पाहिजे होतें. त्यानें उघड उघड याशीं लढाई करण्याची तयारी दाखविली. 'आपल्या स्वतःच्या हितासाठी आपण ही लढाई आरंभिली नसून याच्या विलासीपणामुळें सबंध राष्ट्रकूटघराणें नामशेष व्हावयाची वेळ आली आहे. तेव्हां कुलाची कीर्ति कायम राहावी म्हणूनच मीं ही लढाई आरंभिली आहे' असें तो इतरांस सांगत असे. यानें लवकरच कांची, गंगवाडी, वेंगी व माळवा येथील राजांची मदत घेऊन ध्रुवास तोंड देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत याला यश न घेऊन ध्रुवानें मालखेडचें राज्य मिळविलें. ही लढाई स. ७८० मध्यें झाली असावी.

या लढाइनंतर यासंबंधीं कांहींच माहिती मिळत नाहीं. कदाचित् हा लढाईतच मरण पावला असावा अगर मरेपर्यंत ध्रुवाच्या कैदेंत असावा.

३. (स. ७८३-८४ पर्यंत) ध्रुव राष्ट्रकूटाचा हा मुलगा होय.स.७९४ मध्यें हा आपल्या बापानंतर गादीवर आला. यानें स्तम्भ अथवा कम्बय्य (भाऊ?) व बारा राजपुत्र असलेल्या एका संघाचा पराभव केला, आणि गुर्जरांची सत्ता कमी केली. याशिवाय यानें पूर्वचालुक्यांशीं युद्ध आरंभिलें.

स. ८१५ मध्यें याचा मुलगा अमोघवर्ष १ ला हा याच्यानंतर गादीवर आला (B). यानें स. ८०६ मध्यें लात व चापाल्कट यांचा नाश करून त्यांच्या प्रांतांच्या सुभेदारीवर आपला भाऊ इंद्रराज यास नेमिलें.

मयूरखंडीस शक वर्ष ७३२ वैशाख शुद्ध पौर्णिमेस ऋग्वेदी महीधरभट्टास व यजुर्वेदी माध्यंदिनशाखेच्या व्यासभट्टास भूमि दिली असा एक ताम्रपट भा. इ. सं. मं. च्या संग्रहांत आहे. त्यावरून हा शक ७३२ मध्यें राज्य करीत होता हें ठरलें. आजपर्यंत यानें राज्य केल्याचें शेवटचें वर्ष शक ७३० हें ज्ञात होतें. आतां ७३२ पर्यंत यांचेंच राज्य होतें, हे पुराव्यानें कळतें (विविधज्ञानविस्तार वर्ष ५८ अं. ३ पा. ९५ य. रा. गुप्ते यांचा लेख).

४. (स. ९१९–३४) तिसऱ्या इंद्र राष्ट्रकूटाचा मुलगा. हा आपल्या थोरल्या भावाच्या नंतर गादीवर आला. यानें आपली सर्व कारकीर्द चैन व विलास यांत घालविली. त्यामुळें सर्व प्रधानमंडळ याच्या विरुद्ध होतें. यानें एकंदर १५ वर्षे राज्य केलें. याचा चुलता तिसऱ्या अमोघवर्षानें सर्व मांडलिक राजांच्या मदतीनें बंड पुकारून याचा पाडाव केला (राष्ट्रकूट, पानें १०६-१०८).

गोविंद शिवराम खाजगीवाले—(मृ.स. १७७२) मूळचें उपनांव लिमये. हा एक अत्यंत हुशार व निःस्वार्थी गृहस्थ महत्त्वाच्या कारभारांत पेशव्यांजवळ असे. शत्रु व मित्र यास सारखाच मान देत; व आपल्या कार्यासाठीं गौरवून पत्रें लिहीत. याचा नांवलौकिक बराच वाढला होता. याला 'गोविंदराव तात्या' असेंहि लोक म्हणत असत. यानें वयाच्या १६ व्या वर्षीच खाजगीची माहिती मिळविल्यामुळें नानासाहेबांनीं यास इंग्रज, होळकर व निजाम यांजकडील वकिलीची कामगिरी दिली. याला स्वारीचा सरंजाम व तैनात मिळाली असून तीन गांवें इनाम मिळालीं. त्याचप्रमाणें पैठणचें कुलकर्णीहि मिळालें.

स. १७५९ च्या सप्टेंबरांत इंग्रज वकील पुण्यास आले असतां त्याशीं बोलणें गोविंदपंताचे मार्फत झालें.

गोविंदरावानें पुण्यास रामेश्वराचें देऊळ बांधलें. याची पत्नी याच्याबरोबर सती गेली. याला नीळकंठ नांवाचा मुलगा होता.

माधवराव महत्त्वाचे व्यवहारांत याचे सल्ल्यानें वागे. विशेषतः दादाजवळ राहून त्याचें मन संभाळून माधवरावाचे हेतु पार पाडण्याचें नाजूक काम याकडे होतें. सर्व पक्षांशीं गोडीनें वागून कारभार पाहण्यांत हा प्रमुख होता, हें तत्कालीन पत्रव्यवहारावरून दिसतें. यास लिहिलेलीं पत्रें उपलब्ध आहेत. स. १७६७ च्या जानेवारींत माधवरावानें सोलापूरचा किल्ला नाइकाचे हातून काढून याचे ताब्यांत दिला.

हा ता. २९–४–१७७२ रोजीं काळपुळीचे विकारानें मरण पावला.

गोविंदराव परांजपे—दुसऱ्या बाजीरावाचा मावसभाऊ होय. याच्याविषयीं खालील उल्लेख आहेः

'बाजीरावाचा मावसभाऊ गोविंदराव परांजपे यास नव्या तोफा पाडण्याची आज्ञा झाली. त्यावरून परांजपे यांनीं पर्वतीखालीं रमण्यांत तोफा ढाळण्याचा मोठा कारखाना जारी केला आहे.' (म.रि. उत्तर वि. ३ पृ.१९६).

गोविंदराव बुळे—होळकरांचा एक सरदार. यानें यशवंतरावास बरेंच साहाय्य केलें (म. रि. उ. ३ पृ. १७१).

गोविंद विठ्ठल महाजनि—(स. १८३६–?) हा सातारच्या प्रतापसिंहाचा दिवाण होय. ज्ञातिप्रकरणाचा तपास चालूं असल्यामुळें स. १८३६ मध्यें हा व दुसरे दोन गृहस्थ यांस रेसिडेंटानें अटकेंत ठेवलें आणि त्यांची मदत प्रतापसिंहास होऊं दिली नाहीं. पुढें तपास संपल्यावर याला सोडण्याऐवजीं साताऱ्याहून उचलून पुण्यास व तेथून नगरास सक्त नजरकैदेंत ठेवण्यांत आलें. गुन्हा (ज्ञातिप्रकरणविषयींचा) कबूल करावा म्हणून तेथें याचे फार हाल करण्यांत आले. पण अखेरपर्यंत यानें आपलें वचन सोडलें नाहीं. स. १८४१ त याची नगराहून सुटका झाली, पण साताऱ्यास राहण्याची बंदी झाल्यामुळें हा आरंभीं पुणें व पुढें आळंदी येथें राहिला (म. रि. उत्तर वि. ३ पृ. ६०४).

गोविंदस्वामी—(स. १५४२–९७) हिंदी कवि. हा विठ्ठलनाथाच्या अष्टछापमंडळांतील एक. याचा 'गोविंदस्वामी की कदंबखंडी' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. हा गवईहि होता.

गोविंद हरी पटवर्धन--(जन्म स. १६९८ सुमार–२१ नवं. १७५१) गोपाळ गोविंद पटवर्धनाचा बाप होय. हा नानासाहेब पेशव्यांचे तालमींत मुरलेला असून मोठा धूर्त व हिंमतवात् होता. कोणास काय जबाब लिहावा, कोणाचा काय कावा आहे, हें सर्व हा नीट जाणत असे. यानें मिरज झुंजविण्यांत दाखविलेली चतुराई व राज्यकारभारासंबंधानें यानें दर्शविलेले विचार आहेत, ते याच्या पत्रांतच वाचले पाहिजेत.

मिरजच्या वेढ्यांत शेवट गोड झाला असें दर्शवून पराभूत झालेला हा यजमानास नमस्कार करून गेल्यावर लिहितो "आमची लज्जा श्रीनें रक्षिली. चार खंडांत झुंजाचा लौकिक झाला.

धन्यास यश आलें. दीड महिना लढाई दिवसेंदिवस अधिकच याप्रमाणें चालली. श्रीमंतांची सारी फौज आश्चर्य करून राहिली. पुढें परिणाम श्री लावील."

गोविंद हरी आवेशाच्या भरांत सखारामबापूवर एकसारखा उगीचच चरफडत असे. 'देशस्थ व कोंकणस्थ' हा तंटाहि गोविंद हरीच्या लिखाणांत प्रखर दिसतो.

गोविंदाचार्य अष्टपुत्रे--या सुप्रसिद्ध पंडिताचे गोपाळचार्य कऱ्हाडकर हे शिष्य होत. याचे व्याकरणशास्त्रावर ग्रंथ आहेत. याचे पुत्र काशीनाथशास्त्री. ते काशींत जाऊन राहिले.

गोविंदानंद—यासच गोविंद असेंहि म्हणतात. श्रीशंकराचार्यकृत शारीरकभाष्यावर रत्नप्रभा नांवाची याची टीका आहे. नमनांतील चवथ्या श्लोकावरून याच्या गुरुपरंपरेचा बोध होतो. श्रीगौरीनायक म्हणजे शिवराम, त्याचा शिष्य गोपाळ सरस्वती व त्याचा हा गोविंदानंद होय.

२. (स. १५००-४०) हा गणपतिभट्टाचा मुलगा होय. हा आपणास कवि कंकणाचार्य असें म्हणवीत असे. हा वैष्णव होता असें याच्या प्रस्तावनेवरून दिसतें. हा बंगालमधील बाग्री गांवचा राहणारा होय. यानें मदनपारिजात, रुद्रधर, वाचस्पति यांचा उल्लेख केल्यावरून हा स. १५०० च्या नंतर झाला असला पाहिजे. शिवाय याचा उल्लेख रघुनंदनानें आपल्या आह्निकतत्त्व या ग्रंथांत केला आहे. त्यावरून हा स. १५६० च्या अगोदर होऊन गेला असला पाहिजे. तेव्हां याचा काल स. १५००-१५४० असा ठरतो.

यानें पुष्कळ ग्रंथ लिहिले. त्यांपैकीं दानकौमुदी, शुद्धिकौमुदी, श्राद्धकौमुदी, वर्षकृत्यकौमुदी असे चार ग्रंथ छापलेले आहेत. तिथिनिर्णय, व्रत, उत्सव, वगैरेंचे विवरण याच्या वर्षकृत्यकौमुदीमध्यें आलेलें आहे. याशिवाय यानें 'अर्थकौमुदी' ही टीका 'शुद्धिदीपिका' यावर केलेली आहे, आणि 'तत्त्वार्थकौमुदी' टीका शूलपाणीच्या 'प्रायश्चित्तविवेक' यावर केलेली आहे.

गोशाल मंखलीपुत्त—(मृ. ख्रि. पू. ४९६--४८३ सुमारें) प्रख्यात जैन साधु जो महावीर त्याचा हा एक प्रमुख प्रतिस्पर्धी होय. याला पालीसूत्रांमध्यें, मंखली गोशालो असें म्हटलें आहे. हा एका गोसाव्याचा मुलगा असून याच्या बापाचें नांव मंख आणि आईचें नांव भद्दा असें होतें. याचा जन्म गाईचे गोठ्यांत झाल्यामुळें याला गोशाल असें म्हणतात.

यानें राजगृह येथें प्रथम महावीराची गांठ घेतली व लगेच हा महावीराचा शिष्य झाला. तथापि दोघांचे विचार अगदी विरुद्ध होते. याचा जन्म एका गोसावी घराण्यांत झाला असल्याकारणानें यानें गोसाव्यांच्या करितां 'आजीविकं' नांवाचा पंथ सुरू केला व त्याचा हा संस्थापक झाला.

अशा रीतीनें महावीराशीं वितुष्ट आल्यानंतर हा श्रावस्ती येथें येऊन एका कुंभारणीच्या घरीं राहिला. येथें यानें आपलें वजन चांगलेंच राखलें (आवश्यक सूत्र पा. २१४). यानें आपण जैन स्वामित्वाच्या उच्च पदाला पोंचलों असें जगजाहीर केलें. हें वर्तमान महावीरास कळतांच त्यानें ताबडतोब श्रावस्ती येथें जाऊन याची भेट घेतली. त्या भेटींत महावीराला याच्यामध्यें पूर्वापेक्षां कांहींच फरक दिसला नाहीं. तेव्हां याला आपण आपल्या गुरूच्या इच्छेविरुद्ध कृत्य केल्याबद्दल फार वाईट वाटलें व पश्चात्ताप झाला. कांहीं जैन लोक असें म्हणतात कीं, गोशालाला इतका पश्चात्ताप झाला कीं त्या पश्चात्तापानें हा नरकांत न जातां (मेल्यानंतर) देवलोकांत गेला. यानें महावीराचा अन्य तऱ्हेनें अपमान केला.

गोष्ठा माहिल—जैन महावीराचा हा प्रतिस्पर्धी. महावीराचे विरुद्ध जे सात पाखंडी होते त्यांमध्यें याची गणना होते.

गोसावीनंदन (वासुदेव गोस्वामी)—(स. १६५०--१७००) मराठी कवि. याचें नांव वासुदेव असून, बापाचें नांव गोस्वामी व आईचें नांव नांगाई होतें. हा तंजावरकडील राहणारा असून गोपाळाश्रम गजाननास यानें गुरु केलें होतें. 'ज्ञानमोदक' नांवाचा याचा ग्रंथ असून शिवाय सीतास्वयंवर, अभंग, पदें वगैरे स्फुट काव्यें बरींच आहे. याचीं अष्टकें लहान मुलांना शिकतां येतील इतकीं साधीं, सरळ, सोपीं आहेत (महाराष्ट्र सारस्वत).

गौंदनाक महार—हा महुड्याचा महार. यानें आपला जीव समजूनउमजून बळी दिला व पाटलास पळून जाण्यास वाट दिली (महाराष्ट्र सारस्वत भा. १, पा. १९८).

गोंदा—नामदेवाच्या मुलांपैकीं एक. यानें नामदेवावर १६ अभंग केले आहेत. त्यांत विठ्ठलरखुमाई व नामदेव हे एकत्र जेवल्याचें पाल्हाळिक वर्णन आहे. यांत नामदेवानें महाद्वारीं समाधि घेतल्याचा निर्देश केला आहे.

गोंसाळु मार्तिस—(रामोजी शेणवी कोठारी पाहा).

गौडपादाचार्य—हा शुकाचा शिष्य व आद्य शंकराचार्याचे गुरु जे गोविंदपादाचार्य त्यांचा गुरु. पण शुक कोणता हें समजत नाहीं. कृष्ण द्वैपायन व्यासाचा पुत्र शुक असणें कालदृष्ट्या संभवनीय नाहीं. कदाचित् व्यासपुत्र शुक व हे यांच्यामधील परंपरा चालविणारांचीं नांवें नष्ट

झाल्यामुळें शुकानंतर एकदम यांचें नांव येत असावें. गुरुपरंपरा म्हणतांना 'व्यासं शुकं गौडपादं महान्तम्' अशीच परंपरा म्हणतात ही गोष्ट खरी आहे. कदाचित् शुक व हे यांच्यामध्यें झालेलीं माणसें यांच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें विशेष कर्तृत्ववान् नसल्यामुळें त्यांचीं नांवें गाळलीं असावींत.

उपनिषदांतील अद्वैतसिद्धांताचें प्रतिपादन करणाऱ्या प्राचीन आचार्यांत यांचेंच नांव मुख्यत्वेंकरून आढळतें. यांनें मांडुक्योपनिषदावर कारिकारूपानें व्याख्या केली आहे. हा व्याख्यारूप ग्रंथ अत्यंत लहान असूनहि त्याची कीर्ति मात्र फारच मोठी आहे. थोडक्यांत पण स्पष्टपणें या ग्रंथांत सिद्धांत मांडले आहेत. आपल्या प्रसादपूर्ण भाषेंत बौद्धांच्या पारिभाषिक शब्दांचाहि यानें मोठ्या कुशलतेनें उपयोग केला आहे. आणि निर्वाणापेक्षां शिवाशीं एकरूप होणाऱ्या जीवाचा मोक्ष कसा वेगळा आहे हें दाखविलें आहे. वेदांतांतील मायावाद प्रथम शंकराचार्यांनीं उत्पन्न केला अशी लोकांत प्रसिद्धी आहे, पण वास्तविक तो गौडपादाचार्यांनीं प्रथम प्रतिपादिला आहे. हें दिसणारें जग वास्तविक अभावरूप असूनहि मायेनें आहे असें वाटतें, हा सिद्धांत यानेंच प्रथम प्रतिपादिला. पण शंकराचार्यांनीं तो आपल्या अतुल प्रतिपादनशैलीनें असा लोकांपुढें मांडला कीं तो त्यांचाच सिद्धांत म्हणून लोकांत प्रसिद्ध झाला आणि तत्त्वज्ञानविचारांत त्याला कायमचें स्थान मिळालें.

यानें ब्रह्माशीं जीवाचा संबंध सांगतांना कल्पनावाद स्वीकारला आहे. पण पुढील ग्रंथकारांनीं आभासवाद, प्रतिबिंबवाद किंवा अवच्छेदवाद यांपैकीं कांहीं स्वीकारलें आहे.

याशिवाय याचे पुढील ग्रंथ आहेतः-१ अनुगीताभाष्य, २ उत्तरगीताभाष्य, ३ चिदानंदकैवल्यविलास (देवीमाहात्म्यटीका), ४ सांख्यकारिकाभाष्य.

याचा काल दासगुप्तांनीं स. ७८० च्या सुमारास धरला आहे.

गौडब्रह्मानंद—वाचस्पतिमिश्राच्या कल्पतरूवर गौडब्रह्मानंदी ही यांची टीका आहे.

गौतम बुद्ध—(जन्म ख्रि.पू. ५६३-४९०) बिहार प्रांतांत बस्ती जिल्ह्यांत कपिलवस्तु नांवाचें गांव आहे. तेथें इक्ष्वाकुवंशांतील शाक्य नांवाच्या शाखेंतील शुद्धोदन राजाचा हा पुत्र. कपिलवस्तु व देहदह यांच्यामध्यें असणाऱ्या तुंबिनीवनांत महामायेला सिद्धार्थ नांवाचा मुलगा झाला. तोच बौद्धधर्माचा संस्थापक गौतम बुद्ध होय.

याच्या जन्माबरोबर आणखी सहाजण उत्पन्न झाले ते याच्या पुढील कार्यांत साह्यकारी होतेः (१) यशोधरा-याची पत्नी, (२) छन्न-गौतमाचा सारथी, (३) कालुदायी-गौतमाचा बालमित्र, (४) कंथक-गौतमाचा आवडता घोडा, (५) बोधीवृक्ष-ज्याच्या खालीं तप करून गौतमाला ज्ञान झालें तें पिंपळाचें झाड आणि (६) ज्यांची लांबी १ ते ४ कोस होती अशा द्रव्यानें भरलेल्या चार पेट्या. याच्या पांचव्या दिवशीं यानें राज्य केलें तर हा चक्रवर्ति राजा व विरक्त झाला तर धर्मसंस्थापक होईल अशीं यासंबंधीं भविष्यें वर्तविण्यांत आलीं. सातव्या दिवशीं मायावती आजारी पडून वारली. मग या सात दिवसांच्या बालकाचें पालनपोषण गौतमीनें करण्याचें ठरविलें. गौतमी ही मायावतीची सवत असली तरी सख्खी बहीणच होती आणि तिलाहि मूल नव्हतें. गौतमीनें वाढविला म्हणून सिद्धार्थाला गौतम हें नांव पडलें. पुढें हा एकोणीस वर्षांचा झाल्यानंतर यशोधरेशीं याचा विवाह झाला. अत्यंत सुखांत वाढलेल्या याला जगांत दुःख असतें याची कल्पना सुद्धां नव्हती.

हा आपला सारथी छन्न याच्याबरोबर फिरावयास गेला असतां अनुक्रमानें म्हातारा, रोगी आणि प्रेत भेटलें आणि प्रत्येक प्राण्याला केव्हांतरी ही अवस्था प्राप्त होऊन दुःख भोगावें लागतें असें याला समजलें, तेव्हां याला अत्यंत वाईट वाटलें. असाच एकदां संन्यासी भेटला तेव्हां याला धर्माचरणानें निर्भयपणा प्राप्त होतो असें कळलें. तेव्हां निर्भयपणा प्राप्त होईल तें करण्याकडे याचा कल वाढत चालला; आणि यानें गृहत्याग करण्याचें ठरविलें. पुढें याला पुत्र झाला. तेव्हां हा 'राहु झाला, बंधन झालें,' असें उद्गारला. तेव्हां त्याचें नांवहि राहुल ठेवण्यांत आलें.

पुत्रजन्माचा राज्यांत उत्सव चालू असतां हा एकदां बाहेर हिंडावयास गेला, तेव्हां याच्या सुंदर रूपाकडे पाहून कृशागौतमी नांवाची एक स्त्री गच्चीवरून म्हणाली 'असा पुत्र ज्यांना आहे तीं मातापितरें धन्य होत. असा पति जिला आहे ती स्त्री धन्य होय.' रथांत बसून जाणाऱ्या याच्या कानावर हे शब्द आले. 'माझ्यामुळें मातापिता व पत्नी धन्य होत' असें ही म्हणते. 'जग धन्य' असें म्हणत नाहीं. मीं प्रव्रज्या घेतल्यावर ती तसेंहि म्हणेल. असा विचार करून यानें प्रव्रज्या घेण्याचें ठरविलें आणि गुरुदक्षिणा म्हणून कृशागौतमीकडे मोत्याचा कंठा फेकला; व रात्रीं सर्व झोपीं गेल्यावर छन्नाकडून कंथक घोडा आणविला; आणि झोपीं गेलेल्या यशोधरा व राहुल यांना, चुंबन घेतल्यास जागे होतील म्हणून दुरून पोटभर पाहून अरण्याचा

मार्ग पत्करिला. नंतर तीस योजनांवर अनोमा नदीच्या तीरावर आल्यावर अंगावरील अलंकार वगैरे छन्नाबरोबर देऊन त्याला परत धाडलें आणि आपल्या तलवारीनें लांब केस आखूड करून तपश्चर्येला आरंभ केला.

आळार कालाम, उद्रक रामपुत्र वगैरे प्रथम यानें गुरु केले, पण पुढें यानें स्वतःच विचार करून नियमपूर्वक विचाराला आरंभ केला. हा राजगृहांत भिक्षेला गेला असतां बिंबिसारानें गजसेनेवरील मुख्य जागा देऊं केली. पण यानें ती नाकारून आपला अभ्यास अधिक एकाग्रतेनें चालू ठेवला. लोकांचा त्रास होऊं नये म्हणून पांडव-पर्वतावरील जागा सोडून उरुवेला येथील अरण्यांत आला आणि फल्गूच्या तीरीं अत्यंत कडक तपश्चर्या केली. पाऊल उचलवेना अशी स्थिति झाली, तरी मनाचें समाधान होईना म्हणून आहार घेण्यास सुरुवात केली. याचा लोकांनीं तिरस्कार केला, लोभ उत्पन्न केले; आणि विकार उत्पन्न करण्याचा सुद्धां प्रयत्न झाला. पण सात वर्षेपर्यंत तपश्चर्या करीत असतां हा आपल्या विचारापासून केव्हांच ढळला नाहीं. जगांतील दुःख नाहींसें कसें होईल हा एकच प्रश्न याच्यापुढें होता. आणि त्याचे उत्तर बोधि-वृक्षाखालीं बसला असतां वैशाख शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं याला मिळालें. याला ज्ञानप्राप्ति झाली. जगांतील सर्व दुःखें आणि त्यांचें बीज यांचा नाश कशांत आहे, हें यास समजलें आणि हा गौतम बुद्ध झाला. धर्मप्रचाराचें काम जोरांत सुरू होऊन पोषाख व आचार यांसंबंधीं नियम करून संघाला व सांप्रदायाला व्यवस्थित रूप दिलें गेलें.

कपिलवस्तूहून याला सारखीं बोलावणीं येऊं लागलीं. पण बोलावणें पाठविलेला मनुष्य याचा उपदेश ऐकून याचा शिष्य व्हावा, अशी स्थिति नऊ वेळां झाली. तेव्हां याचा बालमित्र कालुदायी यास पाठविण्यांत आलें. तोहि याचा शिष्य झालाच, पण त्यानें याला कपिलवस्तूला आणलें. तेथें यानें न्यग्रोधवनांत वस्ती केली. भिक्षाहि स्वतःच मागे. यामुळें घरच्या मंडळींना अत्यंत दुःख झालें, पण त्यानें आपल्या निश्चयी पण मधुर उपदेशानें सर्वांना आपलें म्हणणें पटवून दिलें. राजवाड्यांतहि एक दिवस हा भोजनाला गेला. सर्वांनीं याचें दर्शन घेतलें. यशोधरा दर्शनाला आली नाहीं. तेव्हां हा आपल्या दोन शिष्यांसह तिच्या महालांत गेला आणि तिची भेट घेतली; आणि कुशल विचारलें. धर्मप्रसार करण्याचा तर याला ध्यासच लागला होता. अत्यंत कळकळीनें केलेल्या याच्या उपदेशाचा तात्काळ परिणाम होई. शुद्धोदन व गौतमी यांचा पुत्र नंद याला यानें यौवराज्याभिषेकाच्या दिवशीं भिक्षु बनवलें. आपण भिक्षु व्हावें असें नंदालासुद्धां वाटत नव्हतें. पण याच्या उपदेशाच्या प्रवाहांत हा कोणालाहि आपल्या इच्छे-प्रमाणें वागावयास लावी. याप्रमाणें यानें आपल्या सातआठ वर्षांच्या राहुलाला बौद्ध भिक्षु बनवलें; आणि शाक्य-वंशहि नाहींसा केला. यामुळें शुद्धोदनाला फारच दुःख झालें आणि आईबापांच्या संमतीशिवाय वीस वर्षांच्या आंतील कोणालाहि दीक्षा देऊं नये, असा नियम त्यानें गौतमाकडून मान्य करून घेतला. हा राजगृहाकडे परत फिरला. तेथें अनाथपिंडिक नांवाच्या अत्यंत धनाढ्य सावकारावर याच्या दान, शील, एकान्त वगैरेच्या उपदेशाचा परिणाम होऊन जेतवन नांवाचें अत्यंत रम्य उद्यान जमिनीवर सोन्याचीं नाणीं पसरून जितकीं नाणीं लागतील तितकीं नाणीं देऊन राजपुत्राकडून विकत घेतलें आणि तेथें भव्य विहार तयार केला.

भोवतालच्या प्रदेशांत हिंडून लोकांना उपदेश करण्याचें काम सतत चाललेलेंच असे. वर्जीसारख्या आडदांड लोकां-नाहि यानें कांहीं नियम घालून दिले होते. हा पाटलि-ग्रामास आला असतां सुनीथ व वस्सकार हे तेथें नगर-रचनेचें काम करीत असल्याचें यास कळलें, तेव्हां हें श्रेष्ठ नगर होईल असें यानें सांगितलें. तेथून हा ज्या द्वारानें कोटिग्रामास गेला, त्याला गौतमद्वार आणि जेथें गंगा उतरला त्या स्थानास गौतमतीर्थ म्हणूं लागले. हा अलीकडच्या तीरावर अन्तर्धान पावून पैलतीरास प्रगट झाला. कोटिग्रामास 'चार सत्यें' या विषयावरील याचें भाषण फारच मननीय झालें. वैशाली व बेहूणग्राम येथें मुक्काम असतां याची प्रकृति बिघडली. पण भिक्षुसंघाला भेटण्या-करितां मानसिक उत्साहानें यानें आपलें दुखणें ताब्यांत ठेवलें. पण पावसाळा संपल्यावर चापाळचैत्यगांवीं याची प्रकृति पुनः बिघडली. तेव्हां वैशालीस आला आणि 'माझी तत्त्वें हाच तुमचा गुरु. त्याप्रमाणें तुम्ही वागा' असा यानें भिक्षुसंघाला उपदेश केला. नंतर पाया नगरीस 'चुंद' नांवाच्या लोहाच्या आम्रवनांत असतां मोठा भोजनसमारंभ झाला. याला जवळच कुसिनारा येथील उपवनांत नेण्यांत आलें. शालवृक्षाखालीं याची शय्या घालण्यांत आली. शेवटीं 'भिक्षुहो, सर्व संस्कार व्ययधर्मी आहे. सावध-पणानें वागा' असा उपदेश करून यानें देह ठेवला. 'प्रिय वस्तूचा वियोग होणार' हा गौतमाचा उपदेश आठवून सर्वांनीं समाधान करून घेतलें. उटी, पुष्पमाला व वस्त्रें नेसवून गौतमाच्या शरिराला चंदनकाष्टांत अग्नि देण्यांत आला. शेवटीं गौतमाच्या अस्थींची लोकांकडून मागणी

आली, तेव्हां अस्थींचे आठ भाग करून त्या आठ भागांवर आठ स्तूप उभारण्यांत आले.

याच्या वेळीं वैदिकधर्म हिंसाप्रधान यज्ञयागादिकांमुळें आणि व्यावहारिक सुखलोलुपतेमुळें विकृत झाला होता. त्यांतच शरीरदंडनानें मोक्ष मिळतो, अशा चमत्कारिक कल्पना लोकांत पसरल्या होत्या. नीतिप्रधान जीवनाचें महत्त्व नष्ट झालें होतें. हें सुधारण्याचा यानें प्रयत्न केला. यानें सांगितलेला 'मध्यमा-प्रतिपदा' किंवा 'आर्य अष्टांगिक मार्ग' पुढीलप्रमाणें आहेः

विचारानें चांगलें वाईट, खरेंखोटें कळतें म्हणून आपणाला सम्यग्दृष्टीची जरूर आहे. आपल्या मनांतील संकल्पहि विचारपूर्वक केलेले असले पाहिजेत (२ सम्यक् संकल्प). आपलें बोलणें किंवा वागणें हेंहि विवेक व सत्य यांना धरून पाहिजे (३ सम्यग्वाचा, ४ सम्यक्कर्म), आपली उपजीविकाहि चोरी, चहाडी वगैरे वाममार्गानें चालवितां उपयोगी नाहीं (५ सम्यग् आजीव), आपल्या अंगच्या वाईट खोडी आपण टाकल्या पाहिजेत आणि चांगल्या समयीं लावून घेतल्या पाहिजेत (६ सम्यग् व्यायाम), तसेंच जगांतील आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली पाहिजे (सम्यक् स्मृति), हें सर्व करण्याकरितां चित्ताची शुद्धि करून एकाग्रता केली पाहिजे (सम्यक् समाधि).

याच्या धर्मांत विविध आचारांचा पसारा नसून तो सद्गुणसंवर्धनाचा किंवा आत्मशुद्धीचा साधा मार्ग आहे.

या धर्माचें आचरण करतांना पांच शीलें सांभाळावीं लागतातः १ हिंसा न करणें, २ चोरी न करणें, ३ खोटें न बोलणें, ४ ब्रह्मचर्य पाळणें, ५ मद्य न पिणें.

हा धर्म नवीन नसून यज्ञयागादि कर्मांच्या पसाऱ्यापेक्षां सदाचाराकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न आहे. त्याचा थोडक्यांत सिद्धांत असाः सर्व जग दुःखमूलक आहे. त्या दुःखाचें कारण अज्ञान व लोभ आहे. अशा दुःखांतून सुटण्याकरितां वरील आचार पाळा.

आजहि गौतमाला चीन, जपान, तिबेट, सिलोन हे देश पूज्य मानतात. अशोक व कनिष्कासारखे सम्राट् गौतमाचे एकनिष्ठ उपासक होते. शेंकडों ग्रंथ आणि शिल्पें याचा गौरव जगभर सांगत आहेत. सर्व जगाला अहिंसा व समता शिकविण्याच्या व पटवून देण्याच्या मानावरहि याचा पहिला हक्क आहे. वैदिक धर्मांतहि याला अवतार मानण्यांत येतें.

गौतमाबाई—ही मल्हारराव होळकराची बायको होय. ही नवऱ्यापूर्वीच ता. २९ सप्टेंबर सन १७६१ रोजीं आपल्या वयाच्या ६६ व्या वर्षी वारली (म. रि. उत्तरवि. २ पृ. ४).

गौतमी—हिचा उल्लेख नाशिक येथील शिलालेखांत आला आहे. ही गौतमीपुत्र शातकर्णीची आई. जुन्नरच्या शिलालेखांत ही शामक नांवाच्या गोवर्धन प्रांताच्या सुभेदारास सांगते कीं, पूर्वी माझ्या मुलांनीं दिल्याप्रमाणें १०० निवर्तनांच्या किंमतीचें हें दुसरें शेत मी आज अर्पण करितें (Bhand. p. 27).

२. गौतमबुद्धाची सावत्र आई व मावशी. मायादेवीची बहीण. मायादेवीच्या पश्चात् सिद्धार्थास हिनेंच वाढविलें.

गौतमीपुत्र आंध्र—(स. ११९ सुमार) याच्या कारकादींत आंध्र लोकांनीं इंडोपार्थियनांवर स्वारी केली होती (V. Smith, p. 220). हा स. ११९ च्या सुमारास नहपान क्षत्रपाला नष्ट करून गादीवर बसला. यानें गादीवर आल्यावर पूर्वीच्या जुन्या राजांचीं नाणीं पुन्हां पाडलीं व त्यांवर स्वतःच्या खुणा केल्या. याच्या ताब्यांत गोदावरी, बहार, माळवा, काठेवाड, गुजराथ आणि उत्तरकोंकण इ. मुलूख होते. यानें शक व पह्लव इ. जातिनष्ट लोकांची रूढि थांबवून जातिसंस्था पुन्हां सुरू केल्या. याला हिंदुधर्माचा अत्यंत अभिमान होता (V. Smith, p. 221). हा बुद्ध आणि हिंदुधर्माचा चहाता असल्यामुळें यानें दोघांनाहि देणग्या दिल्या होत्या. जुन्नरच्या २५ नं. च्या शिलालेखांत याचा धनकटकाधिप असा उल्लेख आढळतो. तेथें हा आपल्या विष्णुपालित नांवाच्या सेनापतीस सांगतो कीं, उषवदाताच्या (ऋषभदत्त) ताब्यांत असलेलें हें शेत मीं आजपासून बुद्धाला दिलें आहे (Bhandarkar, p. 27).

सातवाहन राजे शूद्र जातीचे होते, अशा अनेक दंतकथा प्रचलित आहेत. पण या दन्तकथा नाशिक येथील भद्रायणीय भिक्षुसंघाला गौतमीपुत्र सातकर्णीच्या आईनें केलेल्या दानाच्या शिलालेखांतील निर्देशावरून खोट्या ठरतात. तेथें गौतमीपुत्राला 'एक ब्राह्मण', 'क्षत्रियदर्पमानमर्दन', 'विनिवर्तित चातुर्वर्ण्यसंकर' अशीं विशेषणें लाविलीं आहेत. त्यावरून गौतमीपुत्र व सातवाहनकुल हें ब्राह्मण होतें असें ठरतें. यावरून हे शूद्र (राधामाधवविलासचंपू प्र.) किंवा कुमार होते वगैरे म्हणणें सर्वस्वीं चुकीचें ठरतें. शिवाजीमहाराजांनीं जें काम पुढें केलें तेंच काम यानें पूर्वी केलें होतें. यानें केवळ यवनांपासून राज्य घेतलें नाहीं, तर चातुर्वर्ण्याची पुनः स्थापना केली, असें याच्या वरील विशेषणांवरून वाटतें. याच्या आईचें नांव बालश्री व मुलाचें नांव पुलुमायि.

गौतमीपुत्र वाकाटक—हा पहिल्या प्रवरसेन वाकाटकाचा मुलगा. हा गादीवर आला नाहीं. याची आई भारशिव राजा भगवान्‌ची कन्या.

गौरी—विजयानगरच्या संगमवंशांतील पहिल्या बुक्करायाची पत्नी (दुसरी). हिचा पुत्र दुसरा हरिहर.

गौरीकान्त सार्वभौम—(स. १७२५ सुमार) एक नैय्यायिक. याचा जन्म गौर प्रांताच्या उत्तरेस झाला. यानें पुष्कळ निबंध लिहिल्यामुळें याजवर तेथील राजाची मर्जी बसली. याच्या 'आनन्दलहरीतरी,' या ग्रंथाची स.१७१४ तील हस्तलिखित प्रत उपलब्ध आहे. यावरून हा १७१४ चे पूर्वी होऊन गेला असला पाहिजे. याच्या उपरिनिर्दिष्ट ग्रंथांत तांत्रिक पूर्णानंदाच्या श्यामरहस्याचा उल्लेख आला आहे. तेव्हां हा त्याच्या मागाहून होऊन गेला असला पाहिजे. या तांत्रिक पूर्णानंदानें स. १५७१ त शाक्तकर्म नांवाचा ग्रंथ लिहिला. तेव्हां गौरीकान्त १७ व्या शतकाच्या सुरवातीस होऊन गेला असला पाहिजे. यानें खालील ग्रंथ लिहिले आहेत: (१) भावार्थदीपिका, केशवमिश्राच्या' ' तर्कभाषा या ग्रंथावरील टीका, (२) सद्युक्तिमुक्तावली, (३) आनंदलहरीतरी, (४) विदग्धमुखमंडनटीका. शिवाय 'विवादार्णवभंजन' नांवाचा धर्मशास्त्रावर याचा ग्रंथ आहे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४७८).

ग्रँट डफ—(स. १७८९-१८५८) याचें नांव जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ.

याचा जन्म बॅन्फ येथें ता. ८-७-१७८९ रोजीं झाला. आईचें नांव मार्गरेट डफ. स. १८०५ त हा मुंबईस येऊन तेथील ग्रेनेडियर पलटणींत नोकर राहिला. स. १८०८ त गुजराथेंतील बंडावे मोडण्याची लष्करी कामगिरी यानें केली. फार्शी भाषा चांगली शिकला म्हणून यास फार्शी दुभाष्याची जागा मिळाली. पुढें याची ग्रेनडियर फलटण पुण्यास आली, तिजबरोबर हाहि तेथें एल्फिन्स्टनजवळ येऊन राहिला. तेथें पॉटिंजर, ब्रिग्ज वगैरे याचे सहकारी बनले. स. १८१८ त सातारा रेसिडेन्सीवर याची नेमणूक झाली. स. १८२२ त हा निवृत्त होऊन स्वदेशीं परत गेला. मराठ्यांच्या इतिहासाचें साहित्य येथें तयार करून इंग्लंडांत गेल्यावर यानें सर्व भाग व्यवस्थित लिहून पहिली आवृत्ति स. १८२८ त प्रसिद्ध केली. हा ता. २३-९-१८५८ रोजीं मरण पावला (म. रि. उ. ३ पृ. ५३२). याच्या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीचा छपाईखर्च अंगावर पडून याला १७०० पौंड कर्ज झालें. मग यानें प्रकाशकांच्या सूचनेप्रमाणें कांहीं मजकूर काढून दुसरी आवृत्ति काढली. सध्यां बरीच दुरुस्त केलेली तिसरी आवृत्ति एस्. एम्. एडवर्डस् यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध झाली आहे.

ग्रीक राजांची वंशावळ

(हेंच सीरियन साम्राज्य होय).

सेल्यूकस निकेटर (मृत्यु ख्रि. पू. २८०).
|
अँटिओकस सार्टर (१९ वर्षे कारकीर्द. नंतर मृत्यु ख्रि. पू. २६१)
|
अँटिओकस थिओस.(याच्या वेळीं बॅक्ट्रिया व पार्थिया सीरियन साम्राज्यांतून बाहेर पडले).
|
अँटिओकस दि ग्रेट (पार्थियाचा राजा).
|
अर्सेकस (ख्रि. पू. २४८ मध्यें राज्यस्थापना).

बॅक्ट्रियाचा राजवंश

डायोडोटस् पहिला (२५० ख्रि. पू. राज्यस्थापना).
|
डायोडोटस् दुसरा (ख्रि. पू. २४५).
|
यूथिडीमस् (ख्रि. पू. २३२). (याच्यावर सीरियाचा राजा अँटिओकस् दि ग्रेट यानें स्वारी केली. ख्रि. पू. २०८ मध्यें हें युद्ध संपलें. बॅक्ट्रियाची स्वतंत्रता मान्य झाली).
|
अँटिओकस्

(यानें ख्रि. पू. २०६ मध्यें हिंदुस्थानांतील शालिशूकमौर्यावर स्वारी करून जय मिळवला).

ग्वाल—(स. १७९०) एक हिंदी कवि. हा मथुरेचा राहणारा असून याच्या बापाचें नांव ब्रह्मभट्ट सेवाराम असें होतें. हा जगदम्बेचा उपासक असून शिवजीची आराधना करीत असे. वि. सं. १८७९ मध्यें यानें मथुरा येथें शिवमंदिर बांधलें. दयाल हा याचा गुरु होय. कांहीं कारणामुळें गुरूनें याला हाकलून दिलें, तेव्हां यमुना नदीच्या कांठीं एका तपस्व्याच्या कृपेनें याच्या बुद्धीचा अपूर्व विकास होऊन याची कवित्वशक्ति जागृत झाली.

याला दोन पुत्र होते. ते दोघेहि बापाबरोबर कविता करीत असत. यानें एकूण ६०-७० ग्रंथ लिहिले असें म्हणतात. त्यांपैकीं खालील ग्रंथ प्रकाशित आहेत:

१ रसरंग, २ भक्तभावन, ३ नेहनिबाहन, ४ कुब्जाष्टक, ५ कृष्णाष्टक, ६ रामाष्टक, ७ गणेशाष्टक, ८ गणेशाष्टक (दुसरा), ७ राधिकाष्टक, १० गोपीपचीसी, ११ दृग-शतक, १२ श्रीकृष्णजी का नखशिख, १३ यमुनालहरी, १४ हमीरहठ, १५ कविहृदय विनोद. हे ग्रंथ प्रकाशित आहेत. याची कविता चमत्कारपूर्ण आहे (क. कौ. भा. १).

घ

घटखर्पर—विक्रमाच्या नवरत्नांतील एक.

घटोत्कच गुप्त– गुप्त वंशाचा संस्थापक श्रीगुप्त होय. श्रीगुप्ताचा हा पुत्र. याच्या नांवामागें महाराज असें पद लावलेलें आढळतें. त्यावरून हा कोणाचा तरी मांडलिक असावा. याचा पुत्र सुप्रसिद्ध चंद्रगुप्त होय.

२. (स. ४३५ सुमार) हा कुमारगुप्ताचा मुलगा. त्याच्या हयातींत हा माळव्याचा सुभेदार होता, असें कुमारगुप्ताच्या तुमैनगांव (ग्वाल्हेर राज्यांतील) गुप्त-संवत् ११६ (स. ४३५) मधील शिलालेखावरून दिसून येतें. कुमारगुप्ताच्या मागाहून हा गादीवर न येतां स्कंदगुप्त गादीवर आला.

घन आनंद—हा कायस्थ जातीचा असून निंबार्क संप्रदायाचा वैष्णव होता. हा दिल्लीचा राहणारा.

हा नागरीदासजीचा समकालीन होता. यांची मैत्री वृंदावन येथें घडून आली.

हा मुहम्मदशाहचा मुंशी असतां. सुजान नामक वेश्ये-बरोबर नेहमा मग्न असे. एकदां बादशहानें याला ध्रुपद गावयास सांगितलें पण यानें नकार दिला. आणि जेव्हां सुजाननें म्हणावयास सांगितलें, तेव्हां मात्र बादशहाकडे पाठ करून आणि सुजानकडे तोंड करून म्हणावयास सुरुवात केली. गाणें ऐकून राजा खुष झाला, पण त्यास आपला झालेला अपमान सहन झाला नाहीं. म्हणून बादशाहानें यास दिल्लीतून हाकून दिलें. जातांना त्यानें सुजानला आपणाबरोबर येण्याविषयीं विनविलें, पण तिनें नकार दिला. तेव्हां विरहामुळें व्याकुळ होऊन हा वृंदावनास आला आणि तेथें राधाकृष्णाच्या नामामध्यें रंगून गेला.

याच्या पुष्कळ छंदांमध्यें सुजानचा उल्लेख आहे. याच्या सवैय्ये छंद फार मनोहर आहेत. सुजानसागर, रसकेलिवल्ली, कृपाकाण्ड, कोकसार, विरहलीला, वगैरे ग्रंथ यानें लिहिले. याच्या कवितेंत प्रेम व विरह यांचें वर्णन फार मनोहर आहे. याची भक्तिरसांतील कविता फार मनोहर आहे (कविताकौमुदी भा. १).

जेव्हां नादिरशहानें मथुरा लुटली तेव्हां नादिरशहाचे शिपायानें याला मारिलें.

याशिवाय कृष्णभक्तीसंबंधीं एक मोठा ग्रंथ छत्र-पूरच्या सरकारी संग्रहालयांत आहे. विरहलीला हा ग्रंथ जरी व्रजभाषेंत असला तरी फार्सी छंदांत आहे. व्रज-भाषेंतील रसपूर्ण वर्णन करणारा हा कवि आहे. याच्या कवितेंतील मोठा गुण म्हणजे मार्दव होय. शृंगारिक कवींत याच्याइतका चांगला कवि व्रजभाषेंत झाला नाहीं.

घनश्याम चौंडाजीपंत—यानें कुमारविजय नांवाचें एक नाटक संस्कृतांत लिहिलें आहे. तें पंचांकी आहे; व त्यांतील कथा तारक-दैत्यावर कुमारानें जो विजय मिळ-विला तेथपर्यंत आली आहे. हा घनश्याम अथवा आर्यक महादेव व काशी यांचा पुत्र असून मराठा राजा तुकोजी याचा मंत्री होता.

यानें इतरहि अनेक नाटकें लिहिलीं. उ. 'उमरूक', 'मदनसंजीवन', एक ३ अंकी 'नवग्रह-चरित' व एक अन्योक्तिरूप 'चंड राहूदय' नाटक.

घनश्यामदास—हा महाकवि गोविंद कविराजाचा नातू. गोविंद कविराज हे १६१३ मध्यें मरण पावले. त्यावरून याचा काल त्यानंतर ठरतो.

हा भक्तिरत्नाकराच्या कर्ता जो घनःश्यामदास त्याहून भिन्न होय. हाहि कविता करीत असे (क. कौ. भा. ७).

२. (स. १५५०–१६५० सुमार) एक बंगाली कवि. याचें मूळ नांव नरहरि चक्रवर्ति असून घनःश्यामदास हें याचें उपनांव होय. हा सुविख्यात विश्वनाथ चक्रवर्तीचा शिष्य होय. वैष्णवसंप्रदायामध्यें याची भगवद्गीतेची टीका प्रमाण मानली जाते.

जरी हा ब्राह्मण होता तरी एका शूद्राचा परम भक्त होता. यानें त्याचें (शूद्राचें) जीवन मोठ्या श्रद्धेनें लिहिलें आहे. हें याचें करणें त्या वेळच्या कट्टर समाजाला पसंत पडलें नसतें, पण त्या वेळीं जातीविषयींचीं बंधनें ढिलीं होत चाललीं असून लोक, चरित्राच्या आणि गुणांसंबंधींच्या मोठेपणाला,जास्त मान देत असत, असें अनुमान केलें जातें.

यांचे खालील प्रधान ग्रंथ होतः—

१ नरोत्तम-विलास —(यामध्यें, ज्या श्रीनरोत्तमदासानें १६ व्या वर्षी संन्यास घेतला, त्या श्रीनरोत्तमदासाचें विस्तृत चरित्र दिलें आहे).

२ भक्तिरत्नाकर-हा मोठा ग्रंथ असून, हा १५ प्रकरणांमध्यें विभागलेला आहे. यामध्यें मुख्य मुख्य वैष्णव लेखक, कवि आणि पर्व यांचें वर्णन आलें आहे. यामध्यें सुमारें ४० संस्कृत ग्रंथांचा उल्लेख आला आहे.

याशिवाय याची फुटकळ कवितांची रचना पुष्कळ आहे.

घनश्यामदास नांवाच्या दोन व्यक्ति होऊन गेल्या. एक भक्तिरत्नाकर ग्रंथाचा कर्ता घनश्यामदास ऊर्फ नरहरी चक्रवर्ति. आणि दुसरा महाकवि गोविन्द कविराज यांचा नातू घनश्यामदास कविराज होय. दोघेहि कवि होते (क. कौ. भा. ७ वा).

घनार्णव चालुक्य—दानार्णव चालुक्याचें नामांतर.

घंटय्या कवि—तेलंगणांतील एक कवि. घंटय्या हें कुलदेवतेचें नांव होय. भक्तीमुळें तेंच यांचें नांव ठेविलें. यानें काशीखंडांतील सुराभांडेश्वराची कथा तेलंगी भाषेंत काव्यरूपानें वर्णिली आहे. या कथेचे पांच अध्याय आहेत. या कवीची स्वतंत्र ग्रंथरचना नाहीं. कांहीं संस्कृतभाषेंतील भाषांतरित ग्रंथ आहेत. काव्यमाधुर्यामुळें हा बराच लोकप्रिय आहे (परशा, तेलगू वाङ्मय, जनार्दन रामचंद्र--कविचरित्र).

घंटापा—यालाच वज्र घंटाप्पा असेंहि म्हणतात. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं बावन्नावा सिद्ध होय. हा जातीनें क्षत्रिय असून वारेन्द्राचा राहणारा होता. पण चतुरशीतिसिद्धप्रवृत्ति (तं. ८६।१) ग्रंथांत नालंदा लिहिलें आहे. याच्या वेळेस देवपाल (स. ८०९--४९) राजा होता. यानें आलिकालिमंत्रज्ञान (तं. ४८।७८) या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे.

घाघ—(ज. स. १६९५ सुमार) एक हिंदी कवि. हा कनोजचा राहणारा असून यानें लिहिलेला एकहि ग्रंथ अद्याप उपलब्ध नाहीं. याचे सामाजिक नीतिसंबंधीं छंद फार लोक-प्रिय आहेत. हा मोठा अनुभवी आणि प्रतिभावान् कवि होता (क. कौ. भा. १ ला).

घालीबखान—अदोनीचा किल्लेदार (२ इब्राहीम आदिलशाह पाहा).

घासीराम कोतवाल— (मृ. स. १७९१) हा गौडब्राह्मण असून (कनोजी ब्राह्मण--ज्ञानकोश) औरंगाबादचा राहणारा. याच्या बापाचें नांव शामळदास (सामळदास) असें होतें. नोकरी किंवा व्यापार करून आपलें नशीब काढण्याकरितां हा पुण्यास आला. गोड वर्तन आणि हुशारी यामुळें लौकरच याचा पुण्याच्या दरबारांत प्रवेश होऊन यावर नाना फडणिसाची मर्जी बसली.

हा लवकरच बढतीला चढून स. १७८२ मध्यें पुणें शहराचा कोतवाल झाला. खरोखरच हा लायक व कार्यदक्ष अधिकारी होता. यानें कोतवाली खातें सुधारून वाढविण्यांत अतिशय परिश्रम घेतले व नजरबाज (गुप्त पोलीस) लोक पुण्यांत ठेवून फंदफितुरास पुष्कळच आळा घातला (ज्ञानकोश). नानास फितुराच्या, दादाच्या व इतर ठिकाणच्या बऱ्यावाईट बातम्या सारख्या पाहिजे असत, किंबहुना अशा बातम्यांवरच त्याचा मुख्य कारभार चाले. त्यासाठीं त्यास आनंदराव काशीसारखीं (घासीरामाच्या अगोदरचा पुणें शहरचा कोतवाल) दुष्ट माणसें हाताशीं धरावीं लागत, आणि त्यांजबद्दल कागाळ्या आल्या तरी तिकडे कानाडोळा करणें भाग पडे. घासीरामाकडे पुण्याच्या कोतवालीचा कारभार पंधरा वर्षे राहिला. तेणेंकरून शहरांत प्रळय होऊन घासीरामाचा जाब कोणी घेईना. शिवाय घासीरामाची मुलगी ललिता-गौरी इच्या द्वारां घासीराम नानाची मर्जी संभाळतो असा बोभाटा झाला. यांत खरें तथ्य काय असेल तें असो. पुणें गॅझेटियर व मोरोबा कान्होबाचें पुस्तक 'घासीराम कोतवाल' यांत ही गोष्ट खरी मानलेली आहे.

घासीराम सुस्वरूप, बुद्धिमान् व भाषणांत साखर पेरणारा असल्यामुळें कोणाचेंहि मन तेव्हांच आकर्षण करून घेई. याच्या हातून कित्येक अन्याय झाले असले तरी शहरांत यानें पुष्कळ सुधारणा करून व्यवस्था राखिली यांत संशय नाहीं. यास सुप्रत केलेल्या कामांच्या यादीवरूनच हें निदर्शनास येईल. शहरांतील गुन्ह्यांची यादी आहे, त्यांत बैदफैली व स्त्रीविषयक गुन्हेच फार आहेत हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. याच्या जुलमाच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध असून त्यांवरून मराठींत 'घासीरामी जुल्म' ही म्हणच पडली आहे. गुन्ह्यांच्या यादीवरून असें वाटतें कीं, स्त्रीपुरुषविषयक अनीति त्या वेळीं फार माजली असावी. घासीरामाबद्दल लोकांत झालेल्या अप्रीतीचें हें एक कारण असूं शकेल. त्यांतून कदाचित् नाना फडणिसांच्या बळावर हा जुलमी व उन्मत्त बनला असावा. त्यामुळें पुढें याचा फारच वाईट रीतीनें अंत झाला.

यानें सवाई माधवरावाच्या लग्नाच्या वेळीं पुण्याचा बंदोबस्त उत्कृष्ट ठेविला आणि शहरांत 'नजरबाज' (गुप्त पोलिस) लोक ठेवून फंदफितुरी दाबांत ठेविली.

याबद्दल नानानें याची प्रशंसा करून यास व याच्या मुलांस वारंवार बक्षिसें दिल्याचे दाखले आहेत. त्यांत जीवनराम व सखाराम हीं दोन घासीरामाच्या मुलांचीं नांवें आढळतात (म. रि. उत्तर वि. २ रा पृ. ५०१-२).

याची अखेरची हकीकत त्या वेळच्या ऐकीव माहितीवरून अनेकांनीं अनेक तऱ्हांनीं दिलेली आज उपलब्ध आहे. परंतु अशा हकीकतींत काल्पनिक अंश व बाजारगप्पा बऱ्याच दिसतात. प्रत्यक्ष घडलेली हकीकत खालील पत्रांत उपलब्ध आहे. पत्र घासीरामाच्या मृत्यूनंतर दोन दिवसांनीं पुण्याहून बारामतीकर जोशांस लिहिलेलें आहे.

'पुण्याहून पस्तीस असामी तैलंग ब्राह्मण आपले देशास जाण्याकरितां निघोन घासीरामाचें तळ्यावर गेले आणि सायंकाळीं चार घटका दिवसास स्वयंपाक करावयास लागून अस्तमान दोन घटका रात्रीस भोजन केलें. नंतर चार घटका आटपाआटप करावयास लागली. तों इतक्यांत कोतवालचे प्यादे पांचसात जाऊन तितक्या ब्राह्मणांस भवानी पेठेंतील चावडीस आणून खणाचें भुयार आहे त्यांत पस्तीस असामी कोंडले. त्यांत वारा जाण्यास जागा नाहीं. सबब कोंडमारा होऊन एकवीस असामी मृत्यु पावले. तिसरे दिवशीं रा. मानाजी फाकड्यानें भुयाराचे कुलूप तोडून पाहिले आणि ब्राह्मण मेल्याचे वर्तमान श्रीमंतांस सांगून पाठविले. श्रीमंतानीं नानास घासीरामाची चौकशी करून पारिपत्य करण्यास सांगितले. तेव्हां नानानें वे. भटजीतात्यास चौकशी करण्यास सांगीतले. भटजीतात्यानीं घासीरामास ब्राह्मण कशाकरितां कोंडिलें व मारावयाचे कारण काय, जें खरें असेल तें सांग, असा प्रश्न केला. तेव्हां यानें उत्तर केलें जे चोर म्हणोन कोंडले, ते अफु खाऊन मेले. यांत माझें काहीं कृत्रिम नाहीं. इतकें होत आहे तों नानाचे वाड्यापाशीं हजार पंधराशें ब्राह्मण मिळोन नानाप्रकारच्या वल्गना करूं लागले. ब्राह्मणाच्या म्हणण्याप्रमाणें घासीरामास हत्तीच्या पायाशीं बांधून सर्व शहरभर फिरविलें. तरी पण ब्राह्मण नाखूष राहून ते पुन्हा नानाच्या वाड्याच्यापुढें जाऊन बहुतच गर्गशा करूं लागले आणि बोलत जे, त्यास जिवें मारल्याशिवाय आम्ही ऐकत नाहीं, व नानाचेंहि मत त्यास जिवे मारावयाचे. त्याजवरून बाळाजीपंत केळकर यानें याची बेडी तोडून उंटावर उलटे तोंड करून बांधून कोतवाल चावडीस आणला; आणि पांच पाट काढून शेंदूर डोकींत घालून पुनः उंटावर पूर्ववत्प्रमाणें घालून आठी पेठा फिरविला, आणि गारपिरावर नेऊन सोडला; आणि ब्राह्मणांस सांगितले जे, तुम्हांस पाहिजे तर सोडा किंवा मारा, असें सांगून हवालीं केले. त्याजवर सायंकाळच्या दोन घटका दिवस राहतां ब्राह्मणांनीं धोंडे घालून मारिला, (३१-८-१७९१) याप्रमाणें वर्तमान जालें.'

'ब्राह्मणांनीं घासीरामच्या बागेंतलीं कांहीं कणसें परवानगीशिवाय तोडलीं, तेव्हां घासीरामानें २५ प्यादे पाठवून ब्राह्मणांना पकडून स्वतःच्या (भवानी पेठेंतील) वाड्यांत भुयारांत कोंडलें. हें मानाजी फांकड्यास कळल्यावर त्यानें कुलूप तोडून ब्राह्मणांची मुक्तता केली. त्यांत १८ ब्राह्मण मेले होते. हें वर्तमान मानाजीनें नानास कळविलें. नानानें याला ब्राह्मणाशीं तसें वर्तन करण्याचें कारण विचारलें. तेव्हां यानें ते कामटी चोर होते, असें उत्तर दिलें. घासीरामानें नानाकडून ब्राह्मणास जाळण्याची परवानगी मिळविली पण मानाजीनें त्यास मुडदे उचलूं दिले नाहींत. तेव्हां नानानें यास चौकींत बसवून चौकशी चालविली. इतक्यांत हजार तैलंगी ब्राह्मण नानांच्या वाड्यापुढें जाऊन दंगा करूं लागले. न्यायाधीश अप्पाशास्त्री हे वाड्यांत जात असतां त्यांची शालजोडी व पागोटें ब्राह्मणांनीं फाडलें व मारामारी केली. शास्त्रीबुवांनां चौकशी करून घासीरामास देहान्त शिक्षा केली. तेव्हां याची धिंड काढली व भवानी पेठेच्या पलीकडे याला नेऊन सोडला. तेथें ब्राह्मणांनीं 'दगड उचलून मस्तकावर घालून जीवें मारला.' मग ब्राह्मणांचीं प्रेतें जाळलीं. घासीरामाच्या प्रेतास अग्नी दिला नाहीं. याच्या हाताखालील लोकांस व दोघा मुलांस कैद करून त्यांची मालमत्ता जप्त केली.' (खरे, ऐ. ले. सं. भा. ९).

यावरून ब्राह्मणांबद्दल खरा प्रकार घासीराम यास शेवटपर्यंत माहीत नव्हता असें दिसतें. चार्लस् मॅलेटहि म्हणतो, हा भयंकर प्रकार उघडकीस येईपर्यंत घासीरामाला त्याची माहिती नव्हती असें दिसतें. अशा प्रकारानें घासीरामाचा अंत झाला. पण याच्या अंगी कितीहि दोष असले तरी यानें पुण्याच्या पोलिसांना चांगलें वळण लाविलें एवढें खरें. यानें नवापुरा नांवाची भवानी पेठेच्या पूर्वेस एक नवी पेठ वसविली, आणि हडपसर रस्त्यावर एक बाग व तलाव यानें बांधिला होता.

घियासुद्दीन खल्जी—(मृ. स. १२००) हा माळव्याचा सुलतान महमूदखान खल्जीचा पुत्र. याची कारकीर्द चांगली झाली.

घियासुद्दीन जलालशाह—(स. १५५१) बंगालचा राजा.

घियासुद्दीन तुघ्लक—(स. १३२०-२५) दिल्लीचा बादशहा. हा प्रथम पंजाबचा सुभेदार होता. स. १३०६ त यानें मोगलांच्या स्वारीचा धुव्वा उडविला

म्हणून यास मलिक गाझी अशी पदवी मिळाली. हा धर्मनिष्ठ असल्यानें मुबारकच्या स्वैर कारकीर्दीत दिल्लीस कधींच गेला नाहीं. खुस्रवखानानें मुबारकचा वध केल्यावर याच्या मुलास घोडदळावरील मुख्य नेमलें. पण त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. त्यानें धार्मिक मुसलमानांना चीड येण्यासारखीं अनेक कृत्यें केल्यानें यानें त्याला पदच्युत करण्याचें ठरविलें. हा आपल्या साहाय्यकांसह दिल्लीवर चालून आला. तेव्हां त्यानें जोरानें तोंड दिलें, पण निभाव न लागल्यानें खुस्रवखान पळून जात असतां त्यास ठार करण्यांत आलें व खल्जी घराण्यांतील योग्य पुरुष न आढळल्यानें आपण वरील नांवानें बादशाहा झाला. खुस्रवखानानें अनुकूलता मिळविण्याकरितां वांटलेलीं बक्षिसें परत घेतलीं. खल्जी घराण्यांतील स्त्रियांचीं योग्य प्रकारें लग्नें लावून दिलीं.

यानें राज्यकारभार शिस्तीचा व लोकोपकारक करण्याची व्यवस्था केली. जप्त केलेल्या खासगी जमिनी परत केल्या. किल्ले, रस्ते व धर्मशाळा बांधल्या. शेतीची सुधारणा करण्याकरितां उत्पन्नाच्या एक दशांश सारा वसूल करावा, असा नियम केला. प्रत्यक्ष पाहून सारा आकारण्याची व्यवस्था केली. जमिनीची लागण वाढवून उत्पन्न वाढलें पाहिजे, केवळ सारा जास्त आकारून उत्पन्न वाढतां उपयोगी नाहीं अशी सक्त ताकीद केली. त्यामुळें ओसाड गांवें पुनः वसलीं आणि पडीक जमिनी लागवडीस आल्या. वसुलीच्या अधिकाऱ्यांचा लोकांना जाच होईनासा झाला. कारण त्यांना इनाम जमिनी देऊन त्यांच्या मुशाहिऱ्याची व्यवस्था करण्यांत आली.

हिंदूंच्या बाबतींत मात्र याचें धोरण जाचक होतें. हिंदु लोकांजवळ संपत्ति वाढल्यास त्यांच्यांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न होईल आणि त्यामुळें मुसलमानी सत्तेस धोका येईल असें याला वाटे. त्यामुळें हिंदु दरिद्री राहावेत अशी यानें व्यवस्था केली. वरंगळचा प्रतापरुद्रदेव काकतीय खल्जी घराणें नष्ट झालें म्हणून खंडणी पाठविना. तेव्हां यानें आपला युवराज मुहंमद यास सैन्यासह रवाना केलें, पण प्रथम त्याच्याच चुकीनें त्याचा अपजय आला. तरी यानें पुनः स्वारी करून वरंगळचें राज्य जिंकलें व तेथील राजास कैद केलें. वरंगळचें नांव सुलतानपूर असें ठेवलें (स. १३२३). नंतर यानें ओरिसांतील उत्कलवर स्वारी करून खूप लूट मिळविली.

पुढें बंगालच्या सुभेदारीच्या वारसा हक्कासंबंधीं तंटे उपस्थित झाले. नासिरुद्दीननें घियासुद्दीन बहादुरविरुद्ध याच्याकडे मदत मागितली. यानेंहि बुघ्राखानाच्या वेळेपासून स्वतंत्र झालेला प्रांत ताब्यांत येतो असें पाहून त्याला मदत केली. तेथें जाऊन नासिरुद्दीनला बंगालचा सुभेदार नेमलें. त्याच्या विरुद्ध पक्षाला पकडून ताब्यांत घेतलें आणि पूर्व बंगाल प्रांत मात्र दिल्लीच्या राज्यांत समाविष्ट केला.

इकडे युवराज मुहम्मदनें खजिन्याच्या जोरावर सैन्य वाढविलें. निजामुद्दीन अवलियाकडून लवकरच युवराज बादशाहा होणार, असें भविष्य जाहीर झालें. याच्याकडून त्याला दम भरला गेल्यावर याच्याकडे 'जनाब देहली तो बहोत दूर है' असा बंगालमध्यें प्रतिनिरोप रवाना झाला. शेवटीं याचे स्वागतार्थ यानें वसविलेलें तुघ्लकाबाद शहर सजविण्यांत आलें. तेथून पांच मैलांवर असणाऱ्या अफगाणपूर शहरीं एक लाकडी शामियाना उभारण्यांत आला. तो दिसण्यांत भक्कम पण एका ठिकाणीं बाहेर आलेल्या तुळईस धक्का लागतांच कोसळून पडेल असा केला. शेवटीं बंगालमधील आणलेल्या हत्तीची शर्यत लागली असतां हत्तीच्या धक्क्यानें शामियाना पडून हा ताबडतोब मेला; आणि राज्यावर येण्याची उत्कंठा लागलेला मुहंमद तुघ्लक गादीवर आला.

राजवंश स्थापन करणाऱ्या इतर राजपुरुषांप्रमाणें यास दिल्लीचें सुलतानपद प्राप्त होतांच यानें जवळच 'तुघ्लकाबाद' नांवाचें शहर वसविलें. हें शहर वसविण्यास व त्यांतील सरकारी इमारती बांधण्यास यानें स. १३२० मध्यें सुरुवात करून १३२३ चे आधीं थोडे दिवस म्हणजे तेलंगण प्रांत जिंकून साम्राज्यांत सामील करण्यापूर्वी थोडे दिवस तें पुरें केलें. तुघ्लकाबाद हें किल्लेवजा शहर आहे. त्यांत खजिना ठेवण्याच्या भव्य इमारती, राजवाडे, कचेऱ्या आहेत. बहुतेक राजवाडे सोनेरी मुलामा चढविलेल्या विटांचे बांधले असल्यामुळें सूर्यप्रकाशांत इमारती तळपूं लागल्या म्हणजे त्यांजकडे पाहणारांचे डोळे दिपून जात. याच शहरांत त्यानें जें एक कारंजें बांधलें त्याच्या भोंवतालच्या पुष्करणींत वितळविलेल्या सोन्याचा इतका रस ओतला कीं, ती सर्व पुष्करिणी भरीव सोन्याचीच दिसूं लागली. तुघ्लकशहाचें थडगें असलेली भव्य इमारत तांबड्या कुरुंदाची व पांढऱ्या पाषाणाची शहराजवळच बांधलेली आहे व या इमारतीस जाण्याकरितां बांधलेला रस्ता कमानीच्या पुलावरून नेला आहे. तुघ्लकाबाद शहरांत हल्ली वस्ती नाहीं. बहुतेक इमारती नष्ट झाल्या आहेत. भिंत व इमारतींचे अवशेष आहेत, त्यांवरून मात्र शहराच्या ऐश्वर्याची चांगली कल्पना येते.

२. (स. १० मार्च १३५१–२५ आगस्ट १३५१) खाजाजहाननें दिल्लीच्या तक्तावर बसविलेला एक मुलगा.

३. (स. १३८८–८९) हा दिल्लीच्या तुघ्लक घराण्यांतील फत्तेखानाचा पुत्र. हा आपला आजा फीरूजनंतर गादीवर आला. यानें पांच महिने राज्य केलें. याच्या भावानें यास ठार केलें.

घियासुद्दीन दामघानी—मदुरेचा राजा (१३४४). मदुरेस जलालुद्दीन अहसनशहानें स्वतंत्र राज्य स्थापिलें (स. १३३५), त्याचा खून करून तें राज्य अल्लाउद्दीन उदौजी नांवाचे अधिकाऱ्यानें १३४० चे सुमारास बळकाविलें. परंतु उदौजी एक वर्षानें लढाईत मारला गेला. त्याचे मागें त्याचा जांवई कुतुबुद्दीन फीरूझशहा मदुरेच्या गादीवर बसला. फीरूझनें ४० दिवस राज्य केल्यावर बंड उद्भवून त्यांत तो मारला गेला. तेव्हां घियासुद्दीन दामघानीनें हें लहानसें राज्य हस्तगत केलें. दामघानी मुहंमद-तुघ्लकाचे सैन्यांत साधा सैनिक होता. मिळविलेल्या राजपदावरील पूर्वीच्या घराण्याशीं संबंध जोडण्याकरितां घियासुद्दीन दामघानीनें मदुरेचा राज्यसंस्थापक अहसनशहा याचे मुलीशीं लग्न केलें. अहसनशहाची एक मुलगी इब्न बतूतास दिली असल्यामुळें इब्न बतूता आपल्या बायकोच्या बहिणीच्या नवऱ्याचे राज्यांत पाहुणचारास आला होता. त्यानें असें लिहिलें आहे कीं, दामघानी क्रूर व निष्ठुर होता त्याच्या बखरींत दामघानीनें केलेल्या हिंदूंच्या छळांच्या, कत्तलींच्या अनेक हकीगती लिहिल्या आहेत. त्याचप्रमाणें द्वारावतीपूरचा राजा तिसरा वीरबल्लाळ ८० वर्षांचा असतां त्याजवर स्वारी करून त्याचा पराभव केल्याची व पराभव केल्यावर त्यास पकडून त्याचें कातडें काढून त्यांत कोंडा भरून तें कोंडा भरलेलें शव मदुरेच्या भिंतीवर टांगून ठेवल्याचीहि हकीगत लिहिली आहे. या स्वारीवरून परत आल्यावर पंधरा दिवसांचे आंत याचा एकुलता एक मुलगा कॉलऱ्यानें वारला; व हा स्वतःहि लागलींच वारला (स. १३४४).

घियासुद्दीन पूर्वी—(स. १३६०–७४) बंगालच्या सिकंदराचा पुत्र. यास केंब्रिज हिस्टरीमधील वंशावळींत घियासुद्दीन अझमशाह असें म्हटलें आहे.

घियासुद्दीन बल्बन गुलाम—(बल्बन पाहा).

घियासुद्दीन बहादूर—स. १३१० मध्यें हा पूर्व बंगालचा सुभेदार झाला आणि स. १३१९ मध्यें सर्व बंगालचा सुभेदार झाला. मध्यें कांहीं काल हा नव्हता. स. १३२५ मध्यें याची पुनः नेमणूक झाली असावी.

घियासुद्दीन बाहमनी—हा महमूद सुलतानाचा वडील पुत्र होय. हा आपल्या बापानंतर सुलतान झाला.

गादीवर बसला तेव्हां याचें वय १७ वर्षांचें होतें. पुढें सुमारें अडीच महिन्यांनीं तारीख १४ जून सन १३९७ मध्यें याच्या एका दुष्ट व महत्त्वाकांक्षी गुलामानें एका मेजवानीच्या प्रसंगीं दगा करून याचे डोळे काढले. तेव्हां याचा धाकटा भाऊ शम्सुद्दीन याला गादीवर बसविलें.

घियासुद्दीन हुसेन—(स. १२११) बंगालचा सुभेदार.

घुसीता—ही बंगाल्यांतील वज्र घराण्यांतील असून खारवेलची पत्नी.

च

चक्र घराणें—हसनचक्र, १ गाझीशाह (स. १५६१), २ नासिरुद्दीन हुसेनशाह (स. १५६३–६४), ३ अलीशाह (स. १५६९–७०), ४ युसुफशाह (स. १५७८-७९), ५ याकुबशाह (स. १५८५). हें घराणें काश्मीरांत राज्य करीत होतें (काश्मीरांतील राजघराणीं पाहा).

चक्रधर—(स. ११९४–१२७३) श्रीचक्रधरस्वामी हे महानुभाव-पंथाचे आद्य संस्थापक होत. अनहिलवाड-(पट्टन)चा राजा भोला भीमदेव याच्या समकाळीं भडोच येथें मल्लदेव नांवाचा राजा राज्य करीत होता (लीलाचरित्र). त्यानें सिंधुराजचा बंधु सिंह (वस्तुपालचरित्र) यास दत्तक घेतलें होतें. हा सिंह (सोहडि) सिंघण–सेनापति खोलेश्वर याच्या हस्तें मारला गेला, असें आंबेगांवच्या श. ११५० च्या शिलालेखांत लिहिलेलें आहे. सिंह लहान असतांच मल्लदेवराजा मरण पावला. त्यानें मरतेवेळीं दत्तक पुत्र सिंह आणि राज्यसूत्रें प्रधान विशालदेवाच्या हातीं सोंपवून दिलीं होतीं. विशालदेव हा जातीनें सामवेदी लाड ब्राह्मण होता. त्यास बरेच दिवस पुत्रसंतान नव्हतें. पण पुढें श्रीदत्तात्रेय प्रभूंच्या वरप्रसादानें त्यास श. १११६ मध्यें हरिपालदेव नांवाचा एक पुत्र झाला. हा हरिपालदेव २२ वर्षांचा होता त्या वेळीं यादवराज सिंघ-

यानें श. ११३८ मध्यें भडोचवर स्वारी केली. या मोहिमेंत प्रधानपुत्र हरिपालदेवानें भाग घेऊन सिंघणास पराभूत केलें. शेवटीं तह होऊन परस्परांत शांति झाली. यानंतर श. ११४१ मध्यें सिंघणानें अनहिलवाडवर स्वारी केली. सिंघण आणि वीरधवल-लवणप्रसाद यांच्या उभय सैन्यांचा सामना भडोच येथें झाला. त्या वेळीं सुद्धां हरिपालदेवानें युद्धांत भाग घेतला होता. शेवटीं तहांत त्या युद्धाचें पर्यवसान झालें. सदरहू तहनामा 'लेखपद्धतिः' या ग्रंथांत सदर आहे. या युद्धानंतर श. ११४३, वृषभ संवत्सर, माघ शुद्ध द्वितीया, शुक्रवार (ता. २०-८-१२२१ इ.) या दिवशीं हरिपालदेवाचें निधन झालें. त्याचें प्रेत स्मशानांत नेलें असतां श्रीचांगदेव ऊर्फ श्रीचक्रपाणि (महानुभावपंथाचे तिसरे अवतार) यांनीं द्वारकेंत कामाख्या नामक हठयोगिनीच्या दुराग्रहामुळें देहत्याग करून हरिपालदेवाच्या मृतकायेंत प्रवेश केला (रत्नमाला, ३०). हरिपालदेव जिवंत झालेले पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें. पुढें यानीं श. ११४५ मध्यें रामयात्रेच्या मिषानें गृहत्याग करून ऋद्धिपूर (वऱ्हाड) येथें येऊन श्रीगोविंदप्रभु (महानुभावपंथाचे चौथे अवतार) यांच्याजवळून ज्ञानदीक्षेचा स्वीकार केला. त्यांनीं 'चक्रधर' असें नांव ठेवलें. पुढें निघून श्रीचक्रधरांनीं सातपुडा पर्वतावर १२ वर्षें निवास केला. नंतर त्यांनीं सुमारें ३५ वर्षें महाराष्ट्रभर संचार करून तत्कालीन परिस्थितीची पाहणी केली. त्या वेळीं धर्माचें स्थान कर्मकांडानें बळकावलें होतें. हेमाद्रीच्या 'चतुर्वर्गचिंतामणि' ग्रंथांत सांगितलेलीं दर दिवसाला दर तिथीला दहा दहा पांच पांच व्रतें करावींत, अमुक देवता अमुक पक्वान्नांनीं प्रसन्न होते या मिषानें अनेक पक्वान्नें तयार करून ब्राह्मण-भोजनें घालावींत, स्वतः पक्वान्नें चोखावींत, व यानेंच मोक्ष मिळतो, अशी लोकांची समजूत झाल्यामुळें निःश्रेयसाला देणारी कर्मभूमि ही भोगभूमि बनली होती. "देवान् देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि, आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।। मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ।। " या भगवद्वचनाकडे देवतांच्या उपासनेनें मोक्षाचें दुर्गम शिखर गांठतां येत नाही. अशा स्थितींत देवतांच्या उपासनेनें मोक्षाचें शिखर गांठूं इच्छीत असल्यामुळें दिशाभूल झालेल्या लोकांस मोक्षाच्या मार्गावर पोंचतें करण्याकरितां तसेंच शूद्रवर्ग यांनाहि मोक्षाचा मार्ग खुला करण्याकरितां, आणि मोक्षप्राप्तीच्या साधनांत संसारप्रवर्तक यज्ञयागादि प्रवृत्त वैदिक कर्मांची अनुपयुक्तता व संसारनिवर्तक ध्यानधारणासनादि निवृत्त वैदिक कर्मांची उपयुक्तता प्रतिपादन करण्याकरितां श्रीचक्रधरांनीं पैठण येथें श. ११९० त संन्यासदीक्षा घेऊन महानुभावपंथाची स्थापना केली. शेवटीं त्यांनीं श्रीनागदेव यांना आचार्यपदावर प्रतिष्ठित करून श. ११९४, अंगिरा संवत्सर, माघ वद्य ४, मंगळवार (ता. ७-२-१२७३) ला बद्रिकाश्रमीं प्रयाण केलें.

तत्त्वज्ञान—श्रीचक्रधरस्वामींनीं स्वतः कोणताच ग्रंथ लिहिलेला नाहीं. वेळोवेळीं प्रसंगानुसार त्यांनीं केलेल्या भाषणांतील उपदेशपर आणि तत्त्वज्ञानपर वचनांचा संग्रह म्हणून केशवराजसूरी यांनीं 'श्रीचक्रधरसिद्धांतसूत्रपाठ' या नांवाचा एक ग्रंथ लिहिलेला महानुभावपंथांत सध्यां विद्यमान आहे. त्यावरून श्रीचक्रधरस्वामींच्या तत्त्वज्ञानाचें आकलन स्थूलतः पुढीलप्रमाणें करितां येतें.

मोक्ष हें मानवजीवितांचें अंतिम ध्येय ठरलेलें आहे. त्याचा दाता परमेश्वरच असल्यामुळें तो ज्या क्रियेनें प्रसन्न होईल ती क्रिया आचरून त्यास प्रसन्न करून घेतलें म्हणजे तो संसारसागरांत पडलेल्या जीवांची जन्ममरणपरंपरेंतून सुटका करतो, असा श्रीचक्रधरस्वामींचा मुख्य सिद्धान्त आहे. प्रवृत्तिमार्गांत राहून समाजसेवेसारखें परोपकारकार्य करून परमेश्वरास जर प्रसन्न करून घेतलें तर प्रवृत्तिमार्गियांसहि मोक्ष मिळूं शकतो. नाहींपेक्षां

" सुखाभ्युदयिकं चैव नैःश्रेयसिकमेव च ।
प्रवृत्तं च निवृत्तं च द्विविधं कर्म वैदिकम् ।।
प्रवृत्तं कर्म संसेव्य देवानामेति साम्यताम् ।
निवृत्तं सेवमानस्तु भूतान्यत्यति पञ्च वै ।। " (अ.१२)

या मनुस्मृतिवचनानुसार मुमुक्षूनें निवृत्ति-संन्यासमार्गाचा अवलंब करून अर्थात् संसारप्रवर्तककर्मत्यागपूर्वक " सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज " या भगवदाज्ञेप्रमाणें परमेश्वरास शरण जाऊन मोक्षाची प्राप्ति करून घेतली पाहिजे. मोक्ष हा कांहीं विशिष्ट वर्गासाठीं नसून सर्वांच्या वांट्याचा असल्यामुळें तो साधण्यांत चातुर्वर्ण्याचा आणि स्त्रीपुरुषांचा भेदभाव आड येत नाहीं. चारहि वर्णांतील स्त्रीपुरुषांना संन्यास घेतां येतो. पण श्रीचक्रधरस्वामींनीं " रागःद्वेषःकामःक्रोधःमदःमत्सरः यांचा त्यागु याचि नांवे संन्यासु कीं बाइः " असें संन्यासाचें लक्षण प्रतिपादिलें आहे. जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर या चारहि पदार्थांचें कार्य-कारण-स्वरूप-लक्षणात्मक यथातथ्य ज्ञान, परमेश्वरावतारांची कायिक-वाचिक-मानसिक-भक्ति, आणि इहामुत्रफलोपभोगविरागरूप वैराग्य हें साधनत्रितय पदरीं असल्याशिवाय मोक्षाचा बालेकिल्ला हस्तगत करतां येत नाहीं.

श्रीचक्रधरस्वामी हे द्वैतवादी असून त्यांच्या मतें जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर हे चार पदार्थ स्वतःसिद्ध व अनादिकालापासून विद्यमान आहेत. त्यांपैकीं,

जीव—हे अनंत असून ते सर्व नित्य, केवल आणि अनाद्यविद्येनें युक्त आहेत. नित्य, केवल व अनादि असण्यामध्यें जीवाचें परमेश्वराशीं साम्य आहे खरें; पण या दोघांत मुख्य भेद हा आहे कीं, जीव हा प्रथमपासून अविद्यायुक्त आहे, तर परमेश्वर हा ज्ञानसंपन्न व मुक्त आहे. यामुळेंच जीवाला अविद्येचा नाश करवून घेण्यासाठीं परमेश्वराची भक्ति करून त्यास प्रसन्न करून घ्यावें लागतें.

देवता—प्रत्येक ब्रह्मांडांत ८१०१२५००९ देवता असून त्यांचे ८ वर्ग आहेत. प्रत्येक वर्गांतल्या देवतांची संख्या व स्वरूप पुढीलप्रमाणें आहे.

देवतांचें नांव	देवतांची संख्या	प्रत्येक देवतेचें स्वरूप
(१) कर्मभूमीच्या देवता	१३०००००००	५०० योजन
(२) अष्टदेवयोनि देवता	१३०००००००	५००० ,,
(३) अंतराळींच्या देवता	१३०००००००	५०००० ,,
(४) स्वर्गींच्या देवता	३३०००००००	५००००० ,,
(५) कैलास-वैकुंठ-सत्यलोकींच्या देवता	९०००००००	५००००० ,,
(६) क्षीराब्धीच्या देवता	१२५०००	५००००००
(७) अष्टभैरव देवता	८	५०००००००
(८) विश्वरूप देवता	१	५००००००००
	८१०१२५००९	

सर्व ब्रह्मांडांतील देवतांवर ईश्वराची मुख्य शक्ति माया ही एवढीच अधिकारिणी आहे. ती अपरिमित असून अनंत ब्रह्मांड व्यापून उरलीच आहे. या सर्व देवता मूळ अव्यक्त आहेत. माया वगळून सर्व देवतांना सृष्टिचक्र चालविण्याकरितां परमेश्वराच्या आज्ञेनें मूर्तिधारी व्हावें लागतें. या मूर्तिधारी देवतांना 'ब्रह्मांडस्थ देवता' असें नांव असून जीवाला त्याच्या कर्मानुसार स्वर्ग-नरक देणाऱ्या देवता याच होत. या ब्रह्मांडस्थ देवतांच्या स्वरूपापासून थोडा थोडा अंश देहधारी जीवाच्या देहांत प्रवेश करितो. त्या अंशरूप देवतांना 'पिंडस्थ देवता' म्हणतात. त्या प्रत्येक मनुष्याच्या देहांत मेदमांसरूपानें वास करतात. देवतांचे उच्च देवता व नीच देवता असे दोन विभाग पडतात. उच्च देवता, नीच देवतेला पाहते, म्हणजे उच्च देवतेला नीच देवतेचें दर्शन व ज्ञान होतें आणि दुसरीला पहिलीच्या अस्तित्वाची जाणीव असते. उच्च देवता नीच देवतेला व्यापून राहते. देवतेची उच्चनीचता तिच्या स्वरूपाच्या परिमाणावरून ठरते. सदरहू तपशिलावरून माया ही सर्वांत श्रेष्ठ देवता असून कर्मभूमींच्या देवता या सर्वांत कनिष्ठ देवता आहेत. परमेश्वराच्या खालोखाल मायेचाच बडिवार असून जीवाचे सारे व्यापार मायेच्या अनुरोधानें होतात. या देवतांची उपासना केल्यानें उपासकास सालोक्य, सामीप्य, सारूप्य आणि सायुज्य हे चार प्रकारचे मोक्ष प्राप्त होतात. पण ते सर्व मोक्ष अशाश्वत आहेत (देवानां चैव देहेषु ये मोक्षाः पुनरागताः—भविष्य पु. प्र. प. खं. ४, अ. ७, श्लो. २९). म्हणून मुमुक्षु असा महानुभाव पंथ हा देवतांची उपासना करीत नाहीं.

प्रपंच—श्रीचक्रधरस्वामींच्या मतें प्रपंच हा 'परिणाम' किंवा 'विवर्त' नसून तो एक स्वतंत्र पदार्थ आहे. तो कारणरूपानें अनादिसिद्ध असून अष्टभैरवदेवतास्वरूपस्थित आहे. प्रत्येक भैरवस्वरूपापासून आठ आठ भूतांचा समूह उत्पन्न होतो. 'भूत' म्हणजे ज्याला पुढें अवच्छेद जाऊं शकत नाहीं, असा प्रपंचाचा शेवटचा अंश. नैयायिकांचे परमाणु जसे विभाग पावूं शकत नाहींत, तद्वत्च हें भूतहि आहे. या आठ भूतांत पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतांचा आणि सत्त्व, रज व तम या तीन गुणांचा समावेश होतो. या आठ भूतांमध्यें एक 'कारणभूत' व सात 'समलभूतें' असतात. अष्टभैरवांपासून प्रत्येकीं आठ आठ अशीं एकंदर ६४ भूतें निर्माण होतात. या ६४ भूतांत सर्व मिळून ८ कारणभूतें व ५६ समलभूतें असतात. हीं कारणभूतें आधार असून, त्यांचीं समलभूतें हीं आधेय आहेत. प्रत्येक भैरवापासून निघणाऱ्या आठ भूतांच्या गटांत एक कारणभूत जरी नसलें, तरी त्याच्याशिवाय बाकीचीं सात समलभूतें निरुपयोगी होतात. असा कारणभूत व समलभूतें यांचा परस्पर संबंध आहे (वि. ज्ञा. वि. वर्ष ६०, अं. १२).

परमेश्वर—परमेश्वर हा सच्चिदानंदस्वरूप असून तो जीव, देवता आणि प्रपंच यांहून वेगळा आहे. तो अच्युत,

अविक्रिय, अव्यक्त, अमूर्त, शुद्ध, बुद्ध, नित्यमुक्त, निरभिमान, पर, केवल, नित्य, सर्वव्यापक, सर्वात्मक, सर्वातीत, सर्वकर्ता, सर्वसाक्षी असून सौंदर्य, लावण्य, सौभाग्य औदार्य, दया, माया, कृपा, करुणा आदिगुणांनीं युक्त आहे. निराकार व अव्यक्त परमेश्वराला जीवाचें कल्याण अकल्याण कांहींच करतां येत नसून जीवाला ज्ञान देण्याकरितां त्याला साकार व व्यक्तच व्हावें लागतें. साकार परमेश्वराच्या सन्निधानानें देहधारी जीव आत्मकल्याण करून घेतात. हें सन्निधान चार प्रकारचें आहेः दर्शन, अनुस्मरण, सेवा आणि संबंध. 'दर्शन' म्हणजे परमेश्वरावताराला पाहणें किंवा त्याच्या सान्निध्य असणें. 'अनुस्मरण' म्हणजे परमेश्वरावतार अविद्यमान असतां त्याचें स्मरण करणें. 'सेवा' म्हणजे परमेश्वरावताराची अगर त्याच्या संबंधित वस्तूंची सेवाचाकरी करणें. 'संबंध' म्हणजे परमेश्वरावताराचा संबंध झालेल्या माणसांचा व वस्तूंचा सहवास घडवून आणणें. या मार्गांनीं इष्ट हेतु साध्य करितां येतो.

ज्ञान—ज्ञानाचे शाब्द, सत्ता, सामान्य व विशेष असे चार प्रकार आहेत. हीं चारहि ज्ञानें अनुक्रमेंच परमेश्वर जीवास देतो. प्रथमतः जीवास शाब्दज्ञान प्राप्त होतें. त्यांत जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर या चारहि पदार्थांचें कार्य, कारण, स्वरूप व लक्षण यांचें नुसतें शाब्दिक अस्तित्वच जीवाच्या प्रत्ययास येतें. हें शाब्दज्ञान चरितार्थ झाल्यानंतर सत्ताज्ञान मिळतें. त्या वेळीं जीवास स्वतःचें स्वरूप व देवता, प्रपंच आणि परमेश्वर या सर्व पदार्थांचीं स्वरूपें करतलामलकवत् प्रत्यक्ष दिसूं लागतात. नंतर सामान्यज्ञान प्राप्त होतें. त्यानें इंद्रचंद्रादिकांपासून तों कर्मभूमीच्या देवतांपर्यंतच्या पिंडस्थ देवता जीवाच्या शरिरापासून पृथक् होऊं लागतात व शेवटीं विशेषज्ञान मिळतें. त्यानें ब्रह्मादिकांपासून तों विश्वरूपदेवतेपर्यंतच्या पिंडस्थ देवता जीवाच्या शरिरापासून वेगळ्या होऊं शकतात, व तें शरीर मेदमांसादि सप्त धातूंपासून मुक्त होतें. याप्रमाणें जीवानें विशेष ज्ञानाची पायरी चढली म्हणजे परमेश्वर आपल्या कृपाशक्तीनें त्याच्या अनाद्यविद्येचा छेद करून त्यास आपल्या परमेश्वरस्वरूपीं लीन करितो. परमेश्वरस्वरूपीं लीन झाल्यानंतरहि जीवेश्वरद्वैत कायमच राहतें, असा श्रीचक्रधरस्वामींचा ठाम सिद्धांत आहे.

परमेश्वरावतार—श्रीचक्रधरस्वामी हे स्वतःला परमेश्वराचा अवतार म्हणवीत असून, शिवाय श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रेय, द्वारावतीय श्रीचांगदेव ऊर्फ श्रीचक्रपाणी, आणि कृद्धिपुरीय श्रीगोविंदप्रभु या चौघांनाहि परमेश्वराचेंच अवतार मानीत होते

दत्तात्रेय—श्रीचक्रधरस्वामीकाळीं श्रीदत्तात्रेयाची अधुनिक, ब्रह्मा-विष्णु-महेश यांची एकवटलेली त्रिमुखी व षड्भुजा मूर्ति उदयास आलेली नव्हती. म्हणून शाण्डिल्योपनिषद् आणि श्रीजाबालदर्शनोपनिषद् यांत वर्णिलेल्या

भस्मोद्धूलितसर्वाङ्गं जटाजूटधरं विभुम्।
चतुर्बाहुमुदाराङ्गं प्रफुल्लकमलेक्षणम्॥ (शांडि.उ.)
दत्तात्रेयो महायोगी भगवान् भूतभावनः।
चतुर्भुजो महाविष्णुर्योगसाम्राज्यदीक्षितः॥
(श्रीजा. उ.)

या एकमुखी व चतुर्भुजी दत्तात्रेयाचीच उपासना करण्यास श्रीचक्रधरस्वामींनीं आपल्या अनुयायांना सांगतलें. यास्तव महानुभावपंथांत दत्तात्रेय हा एकमुखीच मानला जातो. भागवतकारांच्या मतें सुद्धां दत्तात्रेय हा ब्रह्मा-विष्णु-महेश यांचा एकवटलेला त्रिमुखी अवतार नसून तो विष्णूची अंशभूत अशी एकमुखी देवता आहे, हें

अत्रेः पत्न्यनसूया त्रीन् जज्ञे सुयशः सुतान्।
दत्तं दुर्वाससं सोममात्मेशब्रह्मसंभवान्॥
(स्कं. ४, अ. १, श्लो. १४)
सोमोऽभूत्ब्रह्मणोऽशेन दत्तो विष्णोस्तु योगवित्॥
(स्कं.४, अ. ११, श्लो. ३२)

या भागवतांतील श्लोकावरून स्पष्ट आहे.

आचार—श्रीचक्रधरस्वामींनीं संन्यासाश्रमीयांकरितां अतिशय कडक नियम घालून दिलेले आहेत. संन्याशानें पुत्र, मित्र, कलत्र, शिखा व सूत्र इत्यादिकांचा परित्याग करून निरालंबी होऊन अरण्यवास पत्करला पाहिजे. नित्य अटन करून खेडेगांवांत फक्त एक दिवस व शहरांत पांच दिवस निवास करावा. स्वतःकरितां पचनपाचन न करितां चातुर्वर्ण्यभिक्षा ग्रहण करावी. एकाच घरीं आहार घेतां कामा नये. नगर निर्धूम झाल्यानंतर तिसरा प्रहरीं भिक्षेस जावें. भिक्षेत आलेलीं सरस-निरस अन्नें एकत्र कालवून गोडी न घेतां शरीरधारणमात्रार्थ सेवन करावीत. देहाची अनास्था ठेवून तें अस्थिशेष करावें. कोणाचाहि पुजा पूरस्कार न स्वीकारावा. स्नान करावयाचें असल्यास पाण्यांत बुडीमात्र घेऊन बाहेर निघावें. फुलें व फळें लटकलेल्या झाडाखालीं सुद्धां बसूं नये. चित्रित देखील स्त्री डोळ्यांनीं पाहूं नये. निद्रा घ्यावयाची ती गांवाबाहेर पडक्या देवळांत किंवा झाडाखालीं घ्यावी. रोज एकाच स्थानीं किंवा एकाच झाडाखालीं राहूं नये. निजतांना ऐटींत हातपाय न ताणतां श्वानकुंडली घालावी.

आंथरुण व पांघरुण हीं दोन निरनिराळीं घेऊं नयेत. एकाच वस्त्रांत निर्वाह करावा. वस्त्रहि लांबलचक नसून अंग झाकण्यापुरतेंच दोनचार हात असावें. सारांश, संन्याशानें जिवंतपणींच मेल्यासारखें राहून अहोरात्र परमेश्वराचें अखंड स्मरण करीत संपूर्ण आयुष्य परमेश्वर-चरणीं अर्पण करावें.

चातुर्वर्ण्य—श्रीचक्रधरस्वामींच्या अनुयायांत संन्यासाश्रमीय आणि गृहस्थाश्रमीय असे दोन वर्ग आहेत. "चातुर्वर्ण्यं चरेद्भैक्ष्यम्: या शास्त्रासि अनुसरीजे: " या श्रीचक्रधरस्वामींच्या सूत्रावरून त्यांना कै. भावे आदि मंडळी चातुर्वर्ण्यविरोधक समजतात, पण ही त्यांची सर्वथा चूक आहे. चातुर्वर्ण्य भिक्षासंबंधीं सूत्र संन्यासाश्रमीयांकरितांच विदित असून तें अगदीं शास्त्रशुद्ध आहे. संन्यासाश्रमीयानें चारहि वर्णांची भिक्षा ग्रहण केली पाहिजे, यासंबंधानें "चतुर्षु वर्णेषु भैक्षचर्यां चरेत्" (काठक ब्राह्मण); "चतुर्षु वर्णेषु भिक्षाचर्यां चरेत्" (संन्यासोपनिषद्); "अभिशस्तपतितवर्जं चातुर्वर्ण्यं भैक्षं चरन्तः "(पाराशर-स्मृति),"भिक्षां चतुर्षु वर्णेषु विगर्ह्यान्वर्जयंश्चरेत्"(भागवत) इत्यादि श्रुति-स्मृति-पुराणादि धर्मशास्त्रांची आज्ञाच आहे. गृहस्थाश्रमीय अनुगृहीतवर्ग हा चातुर्वर्ण्यान्तर्गत संस्कारादि वैदिककर्में, आणि रोटीबेटीव्यवहाराचे निर्बंध कडकपणें पाळीत असल्यामुळें श्रीचक्रधरस्वामी हे चातुर्वर्ण्यविरोधक ठरूं शकत नाहींत.

पंथीयेतरांच्या गैरसमजाचें कारण—श्रीचक्रधरस्वामींनीं स्थापन केलेला महानुभावपंथ हा सद्बीजसंभूत असल्यामुळें त्याची धर्मध्वजा महाराष्ट्रापासून तों थेट पेशावरपर्यंतच नव्हे तर अफगाणिस्तानसारख्या तामसी, क्रूर व हिंस्र देशांतसुद्धां अहिंसेचें तत्त्व शिकवून त्यांना मद्यमांसापासून निवृत्त करून ' ला इलहा इलाल्लाहु' च्या जागीं श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रेय आणि श्रीचक्रधर यांचेंच भजन, पूजन व स्मरण करावयास लावलें ! पण शोकाची गोष्ट ही कीं, श्रीचक्रधरस्वामींच्या पश्चात् ८०-९० वर्षांनीं महानुभावपंथीयांनीं सांकेतिक लिपी तयार करून आपलें वाङ्मय कडीकुलुपांत अडकवून ठेवल्यामुळें या पंथाची बरीच हानि झाली. पंथाच्या अस्सल स्वरूपाची जाणीव करून देणारा श्रीचक्रधरस्वामींचा उपदेश पंथीयेतरांच्या कानीं न पडूं शकल्यामुळें त्यांच्या मनांत पंथीयांचे, सनातनधर्मी म्हणूनहि देवताभक्तीचा निषध करणें, देवतांच्या देवळांतसुद्धां न जाणें, काळीं वस्त्रेंच नेसणें इत्यादि बाह्याचार बोचूं लागून पंथीयांसंबंधानें भलत्याच गैरसमजुती रूढ होऊन बसल्या. गेल्या पंचवीस तीस वर्षांपासून जसजसें महानुभावी वाङ्मय उजेडांत येऊं लागलें तसतसें महानुभावपंथासंबंधानें विद्वानांचे गैरसमज नाहींसे होऊन सदरहू पंथ वैदिक पंथ असल्याबद्दल खात्री होऊं लागली आहे. महानुभावीय वाङ्मय प्रकाशन करण्याचें मुख्य श्रेय महंत श्रीदत्त-लक्षराज कवीश्वर महानुभाव यांनाच आहे. त्यांच्याच कृपाप्रसादानें महानुभावपंथाची जाणीव आज आपणांस होत आहे (श्री. बाळकृष्णशास्त्री महानुभाव).

२. (दिनकर ज्योतिषी पाहा).

चक्रपाणि—(स. १०५० सुमार) सुश्रुतसंहितेचा टीकाकार. पालराजांपैकीं सहनपाल राजाचा याला आश्रय होता असें यानें टीकेंत लिहिलें आहे. शिवाय गौडाधिप नयपालाचा आश्रित हा चक्रपाणि होता, असें याच्या चिकित्सासंग्रहाच्या शेवटीं म्हटलें आहे.

२. हा कऱ्हाडचा ब्राह्मण. याचा जन्म पुण्यानजीक फलटण येथें झाला. पिता--राजनायक, माता--राजाईसे. हा वेदविद्येत प्रवीण होता. याचें लग्न चाकण येथें कमळाईसेबरोबर झालें.२५ वर्षे फलटणला संसार केला. नंतर हे विरक्त स्थितींत द्वारकेस राहत असत. एलिचपूरच्या कामाख्येनें याला भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला तेव्हां यानें भ्रष्ट होण्यापेक्षां देहांत पत्करला (कामाख्या व १ चक्रधर पाहा).

३. भानुदासाचा पुत्र. एकनाथाचे हे आजे होत. यास सूर्य नांवाचा मुलगा होता.

४. स. १०७५ ते ११०० च्या दरम्यान हा कवि उदयास आला. गंगाधर कवीच्या शके १०५९ (स. ११३७) सालच्या शिलालेखांत त्याचा उल्लेख आला आहे, व श्रीधरदासाच्या सदुक्तिकर्णामृत (स. १०२५) नांवाच्या पुस्तकांत, ज्या चक्रपाणीच्या कविता आल्या आहेत तो हाच चक्रपाणी असावा असें दिसतें

५. (चांगदेव वटेश्वर पाहा).

चक्रपाणि दीक्षित—दशकुमारचरितशेष नांवाच्या दशकुमारचरिताच्या शेवटल्या भागाचा कर्ता.

चक्रपाणि व्यास वर्धनस्थ--(स. १५८३--१६४३) मराठी महानुभाव कवि. यांचें पूर्वाश्रमींचें नांव चांल्हण पंडित. जात सारस्वत ब्राह्मण. हे मूळचे राजपुतान्यांतले. यांनीं उपाध्यायाम्नांतील संतराज वर्धनस्थ (बीडकर) यांच्यापासून शके १५०५ मध्यें महानुभावपंथाची दीक्षा घेतली, व चक्रपाणि व्यास हें नांव धारण केलें. यांनीं संस्कृत, हिंदी व मराठी भाषांत ग्रंथरचना केली. संस्कृतमध्यें समुदायसूत्रपाठ, तसेंच मराठींत पाठांच्या लापिका, सरवळे, दृष्टांतस्थळ, यांशिवाय नित्यदिनी लीलास्तोत्र व

इतर श्लोक व ओवीबद्ध कवित्व आहे. हे वऱ्हाडांत ऋद्धपूर येथें राहत असत व तेथेंच शके १५६५ मध्यें समाधिस्थ झाले.

चक्रवर्मा—(स. ९१८–९३९) हा काश्मीरचा राजा होय. सुगंधा राणी तंत्री सैन्याच्या धोरणानें राज्य करीत असतां तंत्री सैन्यानें याला गादीवर बसविलें. शेवटीं डामर लोकांच्या साहाय्यानें तंत्री सैन्याचें यानें उच्चाटन केलें. शेवटीं डामरावरहि यानें जुलूम केला आणि व्यसनांत दिवस घालविले.

चक्काप्पा—एक तेलगू कवि. नेलोर जिल्ह्यांत मानार-पोलरनजीक तेटु गांवीं हा राहत असे. कलहस्ति येथील जमीनदार बंगारु याचम्मा नायडू याचा हा समकालीन होता. वय १६ वर्षांचें असतांच हा कविता करूं लागला. एकदां हा आपल्या गांवाहून दुसऱ्या एका खेड्यास चालला असतां बंगारूची व याची अकस्मात् गांठ पडली; व त्यानें यास अनेक प्रश्न केले. त्यांचीं उत्तरें यानें कविताबद्ध इतकीं सुंदर दिलीं कीं, तीं ऐकून तो जमीनदार फार संतुष्ट झाला. नंतर त्यानें यास सांगितलें कीं, आपण कृपा करून माझ्या दरबारीं यावें; आणि रामचंद्राच्या स्तुतिपर शंभर स्तोत्रें करावीं. त्याप्रमाणें यानें केलें. तेव्हां जमीनदार फार खूष झाला. याला विचारतां यानें फक्त ऐशीं शेर जोंधळे मागितले. पण जमीनदारानें याला वर्षासन करून देऊन याच्या गांवीं पोंचविलें. यानें बरेच लोकोपयोगी ग्रंथ केले आहेत. हा साठाव्या वर्षी मरण पावला. हा रामभक्त होता (परशा–तेलगू वाङ्मय).

चक्रायुध—(स. ८००–१६) कनोजच्या यशो-वर्म्यानंतर याचा उल्लेख आढळतो (स. ८००). याच्या बापाचें नांव इंद्रायुध असून त्याच्या वेळीं(स.७८३) कनोजचें राज्य बरेंच विस्तृत होतें. प्रयागच्या पश्चिमेकडील उत्तर हिंदुस्थानचा बहुतेक भाग या राज्यांत येई. यानंतर बंगालच्या राजांनीं वर्मराजांचा पराभव केला. याच्या मांडलिकांनींहि बंडें उभारलीं. अखेर राजपुतान्यांतील भीनपालचा गुर्जर प्रतिहार राजा नागभट्टानें वर्म घराण्याचा नाश केला.

चच—(स. ५९७–६३७) हा सिंध देशचा ब्राह्मण राजा. याच्या वंशाचा इतिहास ज्या फार्सी बखरींत लिहिला आहे, तिला चचनामा असें म्हणतात. अरबांनीं आठव्या शतकांत सिंध जिंकला त्या वेळचीहि माहिती चचनाम्यांत आहे. त्यावरून हा स. ५९७ मध्यें गादीवर बसला; आणि त्यानंतर पस्तीस वर्षांनीं म्हणजे स. ६३२ मध्यें अरबांची पहिली स्वारी झाली. यानें एकंदर चाळीस वर्षे राज्य केल्यावर याचा भाऊ चंद्र हा गादीवर बसला. चचनाम्यांतील बरींच वर्णनें काल्पनिक व ऐकीव असल्यानें ऐतिहासिक दृष्ट्या त्यांचें महत्त्व फारसें नाहीं. चच हा शूर होता. यानें आपल्या राज्याची सरहद्द काश्मीरपर्यंत भिडविली होती. हा सिंधमधील आरोर-गांवच्या शैलेज नांवाच्या अग्निहोत्री ब्राह्मणाचा मुलगा. हा प्रथम सिंधुराज साहसीच्या रामचंद्र नांवाच्या प्रधानाचा कारकून म्हणून राहिला आणि क्रमानें मुख्य प्रधान आणि शेवटीं राजा झाला आणि राणीशीं लग्न लावलें. याचाच मुलगा प्रख्यात दाहीर होय. यानें इस्कं-दिया व बाबिया हीं मुसलमानी संस्थानेंहि जिंकलीं होतीं. सिबिस्थानच्या व ब्राह्मणबादच्या (अघद लुहाणा) राजांना मांडलिक बनवून (लुहाणा लढाईत ठार झाल्यानें) लुहाणाच्या राणीशींच लग्न लावलें. लुहाणा हा बौद्धधर्मी होता. हा पक्का हिंदुधर्मी होता. त्यामुळें यानें ब्राह्मणबाद राज्यांतील बौद्धधर्मीय लोकांचा दर्जा कमी होईल असे करडे हुकूम सोडले होते.

चचिग—हेमाद्रीचा बाप.

चट्ट—(चट्टय पाहा).

२. पहिल्या षष्ठदेव कदंबाचें नामांतर.

चट्टल कदंब—(षष्ठदेव कदंब पाहा).

चट्टलादेवी—ही गोव्याच्या कदंबांपैकीं पहिल्या विजयादित्याची पत्नी. हिचा पुत्र जयकेशिन्.

चट्टय कदंब—हा हानगळ कदंबांपैकीं आदित्यवर्मन्चा पुत्र. याचे स. ९७२–७३, १०१२चे लेख प्रसिद्ध झाले आहेत (एपि. कर्ना. ८ सोरब ४५४–५५).

२. (षष्ठदेव कदंब पाहा).

चतुर कल्लिनाथ—हा विद्वान् ब्राह्मण विजय-नगरच्या प्रतापदेवरायाच्या पदरीं होता. या राजानें स. १४५६–७७ पर्यंत राज्य केलें. या राजाच्या आज्ञेनें यानें संगीतरत्नाकर ग्रंथावर संस्कृत भाषेंत टीका लिहिली. याच्या टीकेशिवाय तो ग्रंथ लागणें कठीण आहे. याचा संगीतावर एखादा स्वतंत्र ग्रंथ असावा.

चतुर साबाजी—या पुरुषाबद्दल खात्रीलायक माहिती मिळत नाहीं. कांहीं बखरींत हा निजामशाहींत तर कांहींत आदिलशाहींत झाला असें म्हटलें आहे. तसेंच याच्या कालाबद्दलहि नक्की माहिती नाहीं. शहाजीच्या वेळीं हा झाला व शहाजी व मुरार जगदेव यांच्या विरुद्ध पक्षास हा होता. याला शहाजीची भरभराट पाहवली नाहीं व हा त्यामुळें मोंगलांस मिळाला वगैरे गोष्टी बखरींतून आढळतात. याचें नांव साबाजी अनंत चतुर असें होतें. यानें जमिनीची मोजणी करून उत्कृष्ट धारबंदी अंमलांत

आणली. याची मोजणीची काठी सात हातांची होती. यानें ओसाड जमिनी कौल देऊन लागवडीस आणल्या. रयतेस तगाई, जनावरें दिलीं. बिरबलप्रमाणें याच्या चतुरपणाच्या अनेक गोष्टी प्रचलित आहेत. महाराष्ट्रसारस्वतांत तर याला पेशवाईअखेरचा म्हटलें असून यानें रावणगर्वपरिहार वगैरे काव्यें केल्याचें लिहिलें आहे (शिवप्रताप, शिवदिग्विजय, मराठी रियासत, महाराष्ट्रसारस्वत).

हा ब्राह्मण मूळचा विजापूरचा होता. हा अकबराच्या पदरीं असे. यास अकबरानें 'पांडवांचें जसें महाभारत तसें माझेंहि लिहीं' असें सांगितलें. तेव्हां हा होकार देऊन घरीं आला. पुढें सहा महिन्यांनी अकबरास भेटला. त्यानें महाभारताबद्दल विचारतां यानें एकांतांत भेट मागितली. भेटींत यानें विचारलें कीं, महाभारतांत द्रौपदीस पांच नवरे आहेत, त्याप्रमाणें आपणहि पांच इसमांचीं नांवें सांगावींत. तेव्हां त्यानें यास निरोप देऊन महाभारत लिहूं नको म्हणून सांगितलें.

हा शेणवी ब्राह्मण होता, असें लोकहितवादींनीं आपल्या ऐतिहासिक गोष्टींत लिहिलें आहे (आवृत्ति ति. पा. १६९).

याची बुद्धिमत्ता व विद्वत्ता अलोट असल्यामुळें यास चतुर साबाजी असें टोपण नांव पडलें (रा. मा. चं. पृ. ६७). शेवटीं याचा खून झाला.

चतुरसिंग गोसावी—चतुरसिंग भोसले कांगोरीच्या किल्ल्यावर कैदेंत असतां त्यास सोडविण्याचे कित्येक प्रयत्न झाले. ह्यानें कांहीं रामोशी जमा केले आणि चतुरसिंग भोसले कैदेंतून पळाला अशी बातमी उठवून हा मुलखांत दंगा करूं लागला; आणि प्रचितगड, वसंतगड वगैरे किल्ले हस्तगत करून असा घाट रचिला कीं, बाजीरावास काढून छत्रपतींचे नांवाखालीं मराठमंडळ जमवून पुनः राज्याची नवीन व्यवस्था करावी परंतु बापू गोखल्यानें हा बंडावा मोडला. नंतर इंग्रजांनीं याच्याकडून प्रचितगड किल्ला घेतला (म. रि. उ. वि. ३ पृ. ५१९).

चतुरसिंग भोसले—(मृ. स. १५-४-१८१८). याच्या वडिलांचें नांव त्रिंबकजी असें होतें. याच्या पत्नीचें नांव बबईसाहेब असें असून ती नारायणजी मोहिते याची कन्या होय. शाहूनें हें याचें लग्न साताऱ्यास ता. २६-११-१७८९ रोजीं केलें. यास बळवंत नांवाचा एक मुलगा होता. यशवंतराव होळकर दक्षिणेंत आला तेव्हां हा कांहीं काळपर्यंत त्यास सामील झाला होता. त्या वेळीं हा माने (फत्तेसिंग) याच्या तुकडीबरोबर पेशव्यांच्या मुलुखास उपद्रव देत फिरत होता. पुढें यानें हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत नोकरी केली. हा कांहीं दिवस नागपुरास रघूजी भोसल्याकडे होता. त्यानें यास दरमहा पंधरा हजार रुपयांची नेमणूक करून दिली होती.

परशुरामभाऊंच्या सैन्यानें सातारचा किल्ला ताब्यांत घेतला तेव्हां हा आपले लोक जमवून पाठलाग होत असतांहि कसाबसा कोल्हापूरच्या राजाकडे निसटून गेला. त्याच्या पाठलागावर असणारी रास्त्यांची व परशुरामभाऊंची फौज वारणा नदीच्या तीरावर तळ देऊन राहिली होती. कोल्हापूरकरांच्या मदतीनें छापा घालून रास्त्यांच्या फौजेचा यानें पूर्ण नाश केला; व परशुरामभाऊंचीहि फौज उधळून लावली (परशुरामभाऊ पटवर्धन पाहा).

पुढें यानें लपतछपत साताऱ्याजवळ येऊन तेथें ठेवलेल्या रास्त्यांच्या फौजेवर पुन्हां हल्ला केला व तीहि फौज उधळून लावली. या याच्या धाडसामुळें याला बरेच अनुयायी मिळाले. रास्त्यांच्या फौजेनें वेढलें असतां त्यांची फळी फोडून हा बाहेर पडला. या प्रयत्नांत याचे अर्धे अधिक लोक कामास आले. यांचें धाडस व संकटांतून पार होण्याची शिताफी वाखाणण्यासारखी होती. पुढें अमृतरावाच्या पुत्रास पेशवाईचीं वस्त्रें देण्याच्या कामीं यानें बरीच खटपट केली होती. असई येथें झालेल्या इंग्रजांच्या विरुद्ध लढाईंत हा मोठ्या शौर्यानें लढला. पुढें यानें होळकर, अमीरखान रजपूत यांच्या सैन्यांत थोडेथोडे दिवस नोकरी केली. स. १८१२ त त्रिंबकजी डेंगळ्यानें याला विश्वासघातानें कैद करून कोंकणांत रायगडानजीक कांगोरीच्या किल्ल्यांत ठेवलें. तेथेंच हा मरण पावला (खरे-ऐ. ले. सं. पु. १०, ११).

यानें राज्यासाठीं कष्ट मेहनत करून लढाया फार केल्या. मराठेशाहीच्या अखेरीस झालेल्या पराक्रमी पुरुषांपैकीं हा एक होय. हा मराठेशाहीकरितां एकनिष्ठपणें शेवटपर्यंत मोठ्या हिकमतीनें लढला.

चतुराजी गुहिलोत—(मृ. स. १६७३ जुलै ता. ७) हा राजपुतान्यांतील मंडोरचा राहणारा. हा कृषिविद्येंत निष्णात होता. हा जोधपूरचा जसवंतसिंग (पहिला) याच्याबरोबर काबूल येथें होता. याच्या मदतीनेंच जसवंतसिंगानें काबुली डाळिंबाचें बेणें मारवाडांत आणलें व त्यापेक्षांहि मिठासपणा त्यांत उत्पन्न केला. आजहि ते प्रसिद्ध आहेत. हा त्रेचाळीस वर्षांचा असतांना काबूल येथेंच मेला.

चतुर्धराचार्य—(नीलकंठ चतुर्धर पाहा).

चतुर्भुजदास—एक हिंदी कवि. हा विठ्ठलनाथाच्या अष्टछाप मंडळापैकीं एक कवि होय. याचे द्वादशयश,

भक्तिप्रताप आणि हितजूकोमंगल असे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याच्या फुटकळ पदांचा संग्रह मिळतो.

चतुर्वेदपृथूदकस्वामी—(स. १०४० पूर्वी) यानें ब्रह्मगुप्ताच्या ब्रह्मसिद्धांतावर टीका लिहिली आहे. भास्कराचार्यानें याचें नांव बरेच वेळां सांगितलें आहे. खंडखाद्यावर वरुणकृत टीका आहे. ती सुमारें शके ९६२ या वर्षीची आहे. तींत पृथूदकस्वामीचें नांव आलेलें आहे. यावरून हा शके ९६२ च्या पूर्वी झाला असावा हें सिद्ध होतें. ब्रह्मसिद्धांतावरील टीकेंत एके ठिकाणीं 'कन्यकुब्जेस्वनतभागाः' असें म्हटलें आहे. यावरून हा कान्यकुब्ज देशांतला किंवा खुद्द कनोजचा राहणारा असावा, असें दिसतें.

खंडखाद्यावर याची टीका असावी व तिचा कांहीं भाग पद्यात्मक असावा असें वरुणटीकेवरून दिसून येतें. यानें आपणास पृथुस्वामी म्हटलें आहे; तेव्हां यानें टीका करितेसमयीं चतुर्थाश्रम घेतला होता कीं काय याविषयीं शंका येते (भा. ज्यो.).

चत्तरस सिंद—(स. ११०६ राज्यारोहण) बेलगुट्टीचा राजा.

चन्नदेवी—(चन्नमादेवी) विजयनगरच्या आरविडु घराण्यांतील तिरुमल्लाची दुसरी बायको. तिरुमल्लाच्या राज्याभिषेकाच्या वेळीं हीच हजर होती.

चन्नप्पा—संगमवंशांतील चेन्नप्पाचें नामान्तर.

चन्नबसव—(स. ११६० नंतर) लिंगायत धर्माचा संस्थापक प्रख्यात बसवाचा हा भाचा. बसवानें काढलेल्या वीरशैव धर्माची यानें पूर्णपणें स्थापना केली. या चन्नबसवाचेंहि एक पुराण आहे. त्यांत कैलासदर्शन, नारददर्शन, चन्नबसवजन्म, जन्मोत्सव वगैरे अनेक तऱ्हांची माहिती दिली आहे.

नागलंबिकेनें गुरूची पूजा केली व प्रसाद भक्षण करून ती बिछान्यावर पडली. इतक्यांत महेश्वर तिजपुढें आविर्भूत होऊन त्यांनीं तिच्या उदरांतून वीरशैव लिंगायत धर्माचा प्रस्थापक जन्मणार आहे असें सांगितलें. हा घडलेला प्रकार तिनें सर्व बसवप्रधानास सांगितला, तो जाहीर केला. तेव्हां लोक बसवप्रधानाविषयीं निंदा करूं लागले; व राजास देखील हें कळल्यावर त्यानें नागलंबिकेस जबरीनें भेटण्याचा विचार केला. परंतु पोटांतून गर्भानें हुंकार देऊन तिच्या व स्वतःच्या दिव्यत्वाबद्दल खात्री दिली. परंतु एवढ्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. तेव्हां नागलंबिकेनें उदर फाडून दाखविलें तेव्हां एक दिव्य व तेजस्वी वेषधारी कुमार बाहेर पडला. तेव्हां राजाची खात्री होऊन त्यानें त्या बालकाची स्तुति केली. नंतर पालखींतून या बालकाची मिरवणूक काढली; व त्यानें लिंगायत लोकांबरोबर भोजन वगैरे केलें. रात्रीं नागलंबिका झोपीं गेली असतां महेश्वर व पार्वती यांनीं बालकाचें जातकर्म करून 'चन्नबसव' असें याचें नामाभिधान ठेवलें; व त्याच्याजवळ सुवर्णकलश व पाळणा ठेवून ते नाहींसे झाले.

चन्नबसवास सर्व शास्त्रें आपोआप प्राप्त झालीं. याचें दिव्य सामर्थ्य पाहून प्रधानानें याजकरितां दिव्य राजवाडा बांधला; व त्यांत चन्नबसव यास ठेविलें. बसवानें शिवतत्त्व जाणणारे सहा द्वाररक्षक सहा द्वारांवर ठेवून नित्य हजारों जंगमांचा यथास्थितपणें सत्कार केला. यानें अनेक वेळां राजास व प्रधानास संकटकाळीं योग्य सल्ला देऊन त्यांच्या संकटांचें निवारण केलें. तसेंच अनेक गरिबांचे यानें उत्तम आशीर्वाद घेतले. याच्या पुराणांतील १० प्रकरणें मुख्य आहेत (रॉयल ए. सो. पु. ३).

चन्नम्मा—ही धारवाडच्या जवळ असणाऱ्या कित्तूर गांवची एक शूर स्त्री. ही कित्तूर-चन्नम्म या नांवानें प्रसिद्ध आहे. हिनें शिवाजीला पकडून नेलें होतें अशी कर्नाटकांत प्रसिद्धी आहे. हिचे पोवाडे तिकडे अद्यापि गातात. याचप्रमाणें कित्तूरची रुद्रम्म व बेळवडीची मल्लम्म याहि स्त्रिया कर्नाटकांत शूर म्हणून प्रसिद्ध आहेत.

चमारिपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं चौदावा सिद्ध होय. हा जातीनें चर्मकार असून विष्णुनगर (पूर्वदेश) या देशांतील राहणारा होता. याच्या वेळेस महीपाल नांवाचा राजा होता (स. ९७४-१०२६). हा जालंधरचा शिष्य. यानें प्रज्ञोपाय-विनिश्चय-समुदय हा ग्रंथ लिहिला.

चरक—चरक आणि पतंजलि एकच असें चक्रपाणिदत्त टीकेंत, योगवार्तिकांत विज्ञानभिक्षु, पातंजलसूत्रवृत्तीच्या प्रारम्भीं भोज, मञ्जुषेंतील आप्तलक्षणावर नागेशभट्ट, भावमिश्र, इत्यादि आधारांवरून गणनाथसेन प्रत्यक्षशारीराच्या उपोद्घातांत म्हणतात (सुश्रुत पाहा).

चरणदास—(स. १७०२-१७८१) एक हिंदी कवि व संप्रदायप्रवर्तक. हा राजपुतान्यांतील दोहरा गांवीं जन्मला. याचें मूळचें नांव रणजितसिंह असून याच्या पित्याचें नांव मुरलीधर आणि आईचें नांव कुंजो असें आहे. शुकदेव हा याचा गुरु. सात वर्षांचा असतांना यानें घर सोडलें व दिल्लीला येऊन आपल्या आजोबाच्या घरीं राहिला. एकोणिसाव्या वर्षी याला वैराग्य प्राप्त झालें. त्या वेळीं याचे बावन्न शिष्य होते; व अनुयायी तर हजारों

होते. याच्या शिष्यांमध्ये सहजोबाई आणि दर्याबाई या दोघीजणी फार प्रेमळ होत्या. या दोघीजणी यांची सेवा फार उत्तम तऱ्हेनें करीत असत. या दोघींनी कविता केल्या असून 'बानी' नांवानें त्या प्रसिद्ध आहेत. यांचे 'ज्ञानस्वरोदय' आणि 'चरनदासकी बानी' या नांवांनी दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. हा वयाच्या ७२ व्या वर्षी दिल्ली येथें मरण पावला (क. कौ. भा. १). हा विद्वान् गृहस्थ वैश्य होता. लोकांस उपदेश करूं लागल्यावरून याचा वैष्णवांत एक निराळाच पंथ झाला (मु. रि भा. २, पृ. १५८).

चरितवर्मा—सिनचिउ नांवाच्या चिनी प्रवाशानें हिंदुस्थानांत धारण केलेलें नांव.

चर्पटीनाथ—गोरक्षनाथाचे शिष्य. याच्या पित्याचें नांव सुदर्शन व आईचें नांव लीलावती होय. हा जलक्रीडा करीत असतां पाण्यांत बुडाला असतां गोरक्षनाथानें यास वांचविलें. तेव्हां हा त्याचा शिष्य बनला; व पुढें मोठा योगी बनला.

चर्पटीपा—चौऱ्यांशी सिद्धांपैकीं एक. यालाच पचरिपा असेंहि म्हणतात. जात-कहार. चंपादेशचा राहणारा. हा मीनपा याचा गुरु होय. यानें चतुर्भूतभयाभिवासन क्रम (तं. ४८।८५) हा ग्रंथ लिहिला आहे.

चलीबी रुमीखान—अहमदनगरच्या हुसेन निजामशहाच्या तोफखान्यावरील मुख्य. एक सरदार.

हा आशियामायनरांतील राहणारा असून, युरोपांतील लष्करी खात्यांत तोफखान्याचें काम शिकून निपुण झाला होता (मु. रि. भा. १ पृ. २४४; ३०१; ३०२).

चवरि—यालाच जवरि किंवा अजपालिपा असें म्हणतात. हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं चौसष्ठावा सिद्ध. हा जातीनें कृष्णधृतर्वाणक होय. हा मगधदेशचा राहणारा. हा कण्हपाच्या तिसऱ्या पिढींपैकीं होय.

चव्हाण—उत्तरहिंदुस्थानांतल्या घराण्याबद्दल लिहितांना हा शब्द चौहान असा लिहिलेला असतो. त्यांची वंशावळ वेगळी उपलब्ध आहे (पृथ्वीराज चाहौन पाहा).

महाराष्ट्रांतील प्रसिद्ध चव्हाण घराणें:—

१ राणोजी, २ विठोजी (हिंमतबहादूर) ही पदवी शा.श. १६१० विभव स.१६८८ बेंगळूरच्या लढाईंत मृत्यु. उदाजी चव्हाण (स. १६९६-१७६२); विठोजी व प्रीतीराव हे सर्वच पुरुष महत्त्वाचे आहेत (काव्येतिहाससंग्रह पत्रें, यादी वगैरे ले. ९).

चष्टन क्षत्रप--(स.१२५-१३०) ध्सामोतिक (जामोतिक) चा पुत्र. याचीं बरींच नाणीं मिळालीं आहेत व कांहीं नाण्यांवर याला महाक्षत्रपहि म्हटलें आहे. पण याच्या पूर्वी होऊन गेलेल्या नहपान क्षत्रपाशीं याचा काय संबंध होता हें सांगतां येत नाहीं. मात्र नहपानानें घालविलेला बहुतेक प्रांत यानें परत मिळविला. याचा पुत्र जयदामा हा याच्या हयातीतच मेला. त्यामुळें जयदामाचा पुत्र रुद्रदामा हा याच्यानंतर गादीवर आला.

चंगीझखान— (जन्म स. ११६३;-मृत्यु स. १२२७) हा अत्यंत पराक्रमी निघाल्यामुळें मोगलांचा खरा इतिहास याचेपासूनच सुरू झाला आहे. याच्या जन्मापूर्वी म्हणजे सुमारें दहाव्या शतकापर्यंत मोगल हें नांव सुद्धां कोणास ठाऊक नव्हतें. तेव्हां हे लोक चीनची प्रजा म्हणून राहत असत. यांचा पहिला सरदार चीनपासून स्वतंत्र होऊन सन ११७५ मध्यें मरण पावला. त्या वेळीं त्याचा तेमुजिन नांवाचा मुलगा फक्त तेरा वर्षांचा होता.परंतु हाच मुलगा फार पराक्रमी निघाल्यावर त्यानें सन १२०६ मध्यें मोगलांची प्रचंड सभा भरवून चंगीझखान हें मोठें नांव धारण केलें. आरंभींआरंभीं यानें तार्तार लोकांच्या निरनिराळ्या टोळ्यांस जिंकून आपलें बळ वाढविलें, व मग फार मोठी फौज तयार करून तिला कवायत वगैरे शिकविली, आणि पुढें या फौजेच्या जोरावर हा भराभर देश जिंकीत चालला. सन १२१० पर्यंत पूर्वेस पूर्वसमुद्र, पश्चिमेस कास्पियन समुद्र व उत्तरेस व्होलगा नदी, इतका प्रदेश यानें सहज जिंकिला; आणि नंतर याची दृष्टि दक्षिणेकडे वळली व लागलीच बुखारा, काबूल, कंदाहार, सुरासान हे प्रांत यानें सर केले. यानंतर यानें आपला मोर्चा इराणाकडे वळविला व तो देशहि हस्तगत केला. त्या वेळीं याशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य काय तें चीनलाच होतें. म्हणून एकदां चीनवर स्वारी करण्याचें मनांत आणून हा चीनची प्रचंड भिंत ओलांडून आपल्या फौजेसह चिनांत एकदम शिरला व यानें पेकीन राजधानी काबीज केली आणि चीनचा उत्तर भाग आपले राज्यास जोडून दिला. तिकडे यूरोपखंडांतहि जमिनीवर जितकें दूरपर्यंत जातां येईल तितकें दूरपर्यंत याचें सैन्य मुलूख काबीज करीत गेलें. अफगाणिस्तानांत खारिजम् प्रांतावर सेल्जुक सुलतान मुहंमद हा राज्य करीत होता. त्याच्या ताब्यांत अरबस्तान, तुर्कस्तान, इराण हे देश मोडत असत. तत्कालीन पद्धतीप्रमाणें याचें राज्य बरेंच सुधारलेलें असल्यामुळें चंगीझखानाच्या रानटी टोळधाडीचा आपणांस उपद्रव होण्याची त्यास मुळींच भीति वाटत नव्हती, व म्हणून त्यानें चंगीझखानाच्या लोकांस आपल्या राज्यांत यारी देण्याचें नाकारिलें.

यावरून यानें आपले वकील सेल्जुक सुलतान मुहंमदाकडे पाठविले व नुकसानभरपाईची मागणी केली. सेल्जुकनें उलट त्या वकिलांचाच शिरच्छेद केला व याशीं लढण्यास आपली फौज एक लाखपर्यंत वाढवून जय्यत तयारी ठेविली. ही बातमी समजतांच यानें सात मुलांस बरोबर घेऊन सात लाख फौजेसह सेल्जुकवर स्वारी केली, व त्याशीं भयंकर युद्ध करून त्याचा पूर्णपणें पराजय केला. हा अत्यंत शूर, धाडसी आणि महत्त्वाकांक्षी होता. याच्याइतका बलाढ्य, क्रूर व निर्दय मनुष्य कोणीच झाला नसेल. हा एक मूर्तिमंत राक्षसच होता, असें म्हटले तरी चालेल. याच्या लष्कराएवढें मोठें लष्कर पृथ्वीवरील कोणाहि एका राजाच्या ताब्यांत आजपर्यंत नव्हतें. या लष्कराच्या जोरावर यानें जवळ जवळ सगळें जग जिंकिलें. याच्या राज्याची लांबी साडेपांच हजार मैल व रुंदी तीन हजार मैल होती. म्हणजे याच्या राज्यांत हिंदुस्थानासारखे पांच देश सहज सामावतील. हा इतका अडाणी होता की, विद्येची व धर्माची चेष्टा करी. आशिया खंडांतील अत्युत्तम पुस्तकालयांतील पुस्तकांचा उपयोग यानें आपल्या घोड्यांकरितां मऊ बिछाने करण्याकडे केला. एकदां यानें बायबलांची होळी केली. बुखाऱ्याच्या मशिदींत कुराणहि यानें घोड्याकडून तुडविलें. 'अग्निप्रलय पुरवला, पण चंगीझखानाची धाड नको,' असें लोकांना झालें होतें. हिंदुस्थानावर मात्र यानें स्वारी केली नाहीं; कारण याला तशी सवडच मिळाली नाहीं.

हा स. १२२७त कास्पियन समुद्राचे कांठी मरण पावला. हा मेल्यानंतर याच्या आत्म्याच्या सेवेला कोणीतरी राहिले म्हणून त्या वेळीं चाळीस कुमारिकांना बळी देण्यांत आले! असें सांगतात कीं, आपल्या आयुष्याच्या शेवटच्या तीन वर्षांत यानें एकंदर एक कोटी चाळीस लक्ष माणसांची कत्तल केली. यानें मरणसमयीं आपलें राज्य ओक्ताईखान, तुलुईखान, जूजीखान आणि झगताईखान अशा आपल्या चारहि मुलांस वांटून दिलें. याच्या मृत्यूनंतर बरोबर तीनशे वर्षांनीं पानिपतच्या लढाईत विजय होऊन हिंदुस्थानावर मोगलांचें राज्य स्थापन करणारा बाबर हा बापाकडून तैमूरलंगाचा व आईकडून याच चंगीझखानाचा वंशज होता, म्हणून त्याच्या राज्यास मोगली राज्य म्हणतात.

चंडश्री शातकर्णि—(स. २०८–११) आंध्रांतील एक राजा. याला चंद्र असेंहि म्हणत (Bhand. p. 50).

चंडीदास—हा साहित्यदर्पणकार विश्वनाथाच्या पितामहाचा म्हणजे नारायणाचा कनिष्ठ बंधु होता. यानें काव्यप्रकाशावर टीका लिहिली आहे.

२. एक बंगाली कवि. याचा जन्म बीरभूमि जिल्ह्यांतील छटना गांवीं झाला. हा आणि विद्यापति समकालीन होते. हा लहानपणींच नन्नुरा गांवीं जाऊन तेथें एका बाकुली देवीच्या मंदिरांत पुजारी राहिला. याचें घर पडक्या स्थितींत अद्यापपर्यंत आहे, पण मंदिर मात्र नवीन बांधलें गेलें आहे.

हे प्रेमाचे फार वेडे होते. पूर्व बंगाल्यांतील विलक्षण स्वभावाचे मनुष्यास 'चंडीदास' या नांवानें संबोधितात. याचें प्रेम रामी नांवाच्या एक परटिणीवर बसलें. समाजाची आणि बांधवजनांची पर्वा न करितां यांनीं रामीवर आमरण प्रेम केलें. रामीवर यांचें निस्सीम प्रेम होतें.

हें याचें वागणें त्या वेळच्या कट्टर ब्राह्मणसमाजाला नापसंत वाटून त्यांनीं याला बहिष्कृत केलें. तेव्हां याचा भाऊ नकुल यानें याला पुन्हां आपल्या जातींत घेण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं मात्र रामीवर प्रेम न करण्याची व तें सोडण्याची याला प्रतिज्ञा करावी लागली. पण जेव्हां हें वर्तमान रामीस कळलें तेव्हां ती दुःखित होऊन व लोकलज्जा सोडून याच्या पुढें येऊन उभी राहिली. आपल्या हृदयेश्वरीला पाहिल्यावर याला आपल्या प्रतिज्ञेचा विसर पडून हा तिच्या आराधनेंत तल्लीन झाला. तिच्या रूपामध्यें चतुर्भुज कालीचें दर्शन पुष्कळ सज्जन लोकांना झालें असें म्हणतात.

चंडीदास ब्राह्मण होता आणि रामी परटीण होती. प्रेमाचे राज्यांत जातगोत, उच्चनीच, यांचा प्रश्नच उद्भवत नाहीं, असें हे म्हणत. यांचें प्रेम निःस्वार्थी आणि पवित्र होतें. यांचा मृत्यु फार शोकजनक झाला. घराची तुळई डोक्यावर पडून हे मृत्यु पावले.

यांच्या कवितेचा प्रधान विषय म्हटला म्हणजे राधाकृष्णाचें प्रेम हा होय. यामध्यें पूर्वराग, शयन, अभिसार, सम्भोग हे सर्व आले आहेत. या गाण्यांत यांच्या हृदयाचे खरे उद्गार आहेत (क. कौ. भा. ७).

चंडेश्वर—(स. १३१४ सुमार) ह्याचा 'स्मृतिरत्नाकर' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. या ग्रंथाचे कृत्य, दान, व्यवहार, शुद्धि, पूजा, विवाद आणि गृहस्थ असे सात विभाग केलेले आहेत. सध्यांच्या तिर्हुत प्रांतांत चंडेश्वराच्या व्यवहाररत्नाकर यास हिंदु कायद्याचे बाबतींत अग्रस्थान मिळालेलें आहे. 'कृत्य-रत्नाकर' मध्यें

धार्मिक माहिती आलेली आहे. 'गृहस्थरत्नाकर' यामध्यें गृहस्थाश्रमाविषयीं सर्व माहिती दिलेली आहे. 'दानरत्नाकरामध्यें' दान करण्याचीं साधनें, कोणत्या प्रकारें दान, महादान करावें वगैरे सर्व प्रकारचे दानांविषयीं वर्णन आलेलें आहे. 'व्यवहाररत्नाकर' मध्यें दायभागाचें वर्णन केलेलें आहे. शिवाय यामध्यें न्यायाविषयींहि माहिती दिलेली आहे. आणि 'शुद्धिरत्नाकरा' मध्यें आशौच (जननाशौच, मृताशौच) याविषयीं माहिती आलेली आहे. कृत्यचिंतामणी हाहि याचाच ग्रंथ होय. ह्याशिवाय राजनीतिरत्नाकर, दानवाक्यावली, शिववाक्यावली आणि शैवमानसोल्लास असे ग्रंथ यानें लिहिलेले आहेत. 'राजनीतिरत्नाकर' यामध्यें राजाची व्याख्या, राजाचे निरनिराळे अधिकार, न्यायाधीशाचे अधिकार, सैन्य, खजिना, सेनापति, किल्ले, शत्रू, राजधोरणें, हेर वगैरे सर्व गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. यानें आपल्या ग्रंथांमध्यें पुष्कळ ग्रंथकारांचा आणि त्यांच्या ग्रंथांचा उल्लेख केलेला आहे.

हा वीरेश्वराचा पुत्र होय. कर्मादित्य, देवादित्य, वीरेश्वर, चंडेश्वर असा याचा वंशक्रम आहे. हा आपल्या बापाप्रमाणें व आजोबाप्रमाणें हरिसिंहदेव राजाचा मंत्री होता. युद्धमंत्री असल्याकारणानें यानें नेपाळप्रांत जिंकला. यानें आपली सुवर्णतुला वाग्वती नदीच्या तीरावर केली. हा आपणास महाराजाधिराज असें म्हणवून घेत असे. हा युद्धमंत्री असून मुख्य न्यायाधीश होता. यानें बऱ्याच मुसलमानी सरदारांचा पराभव केला असावा. याचा वचक बंगाली ग्रंथकारांवर चांगलाच बसला होता. मिश्रऋमिश्र, वर्धमान, वाचस्पतिमिश्र, आणि रघुनन्दन ह्या सर्व बंगाली ग्रंथकारांनीं याचा वारंवार उल्लेख करून याच्या ग्रंथांतून कांहीं उतारे घेतलेले आहेत. वीरमित्रोदय, रत्नाकर ग्रंथास पौरस्त्य-निबंध असें म्हणतो.

चंदन—(कविताकाल स. १७६२–९२) एक हिंदी कवि. हा एक बंदीजन असून नाहिलपुवायाँ (जि. शहाजहाँपुर) येथील राहणारा होय. हा गौड राजा जो केशरी त्याच्या पदरीं होता.

यानें 'शृंगारसागर','काव्याभरण','कल्लोलतरंगिणी' असे तीन ग्रंथ लिहिले आहत. यांशिवाय यानें केसरीप्रकाश, चंदनसतसई, पथिकबोध, नखशिख, नाममाला (कोश), पत्रिकाबोध तत्त्वसंग्रह, शीतवसंत, (कहानी) कृष्णकाव्य, प्राज्ञ-विलास असे एकंदर दहा ग्रंथ लिहिले आहेत.

याच्या फुटकळ कवितासुद्धां याच्या ग्रंथाइतक्या प्रसिद्ध आहेत. हा फार्सी भाषेंतील एक उत्तम शाहीर होता. याचा फार्सी भाषेंतील 'दीवानेसंदल' नांवाचा ग्रंथ कांहीं ठिकाणीं पाहावयास मिळतो.

चंदनदास—नंदराजाचा राक्षस नांवाचा प्रधान होता, त्याचा हा मित्र. एक सावकार (मुद्राराक्षस नाटक).

चंदना—ही महावीराची पहिली श्रमणा (शिष्याण) होय. महावीराला केवलीज्ञान प्राप्त झाल्यावर ही त्याची सेविका झाली.

जेव्हां हिच्या बापाची आणि शनातीक राजाची लढाई चालू होती, तेव्हां कांहीं चोरांनीं हिला पळवून एका धनाढ्य नांवाच्या सावकारास विकली. त्या सावकारानें हिचें पूर्वीचें नांव वसुमती होतें तें बदलून चंदना किंवा चंद्रबाला नांव ठेविलें. पुढें लवकरच सावकाराची बायको मूला ही चंदनाचा द्वेष करूं लागली. द्वेषाचें रूपांतर शेवटीं इतकें झालें कीं मूलानें हिचे केस कापले. तेव्हां तशा परिस्थितींत हिनें महावीराचे येथें स्वयंपाकिणीचें काम केलें व शेवटीं त्याची सेविका बनली.

चंदरभाव—(मृत्यु स. १६६२) पतियाला संस्थानांतील हा ब्राह्मण असून तेथलाच रहिवासी होता. दारा शुकोहच्या पदरीं हा मुन्शी म्हणून होता. यानें फार्सी भाषेंत बरीच ग्रंथरचना केली आहे. 'गुलदस्त', 'तुहफत्-उल-अनवार', 'तुहफत्-उल-फस्-हा', 'जम्मा-उल-फक्का,' हे याचे प्रमुख ग्रंथ होत. 'चारचमन' व 'मन्सात ब्राह्मण' या दोन पुस्तकांत यानें लिहिलेल्या पत्रांचा उल्लेख आहे. 'ब्राह्मण' या टोपण नांवाखालीं यानीं कित्येक वेळां काव्य रचिलें आहे.

बापाचें नांव रावणेन व गुरूचें नांव गुरूप्रसाद असें होतें. हा जालंदरी (जालपा) देवीचा उपासक होता. याला दोन बायका होत्या. एकीचें नांव कमला व २ री गौरी. याला २० मुलगे आणि एक मुलगी अशीं २१ अपत्यें होतीं. उपनांव राजोरा.

चंदवरदाई—हा एक हिंदी कवि होय. यानें 'पृथ्वीराजरासो' नांवाचें महाकाव्य केलें.

हा हिंदु सम्राट पृथ्वीराज चौहानाचा सामंत असून शिवाय राजकवि होता. हा ब्राह्मण (भट्ट जातीचा) असून याचें गोत्र जगान (राव) असें होतें. याचे पूर्वज पंजाबांत राहत असून याचा जन्म लाहोर येथें झाला. हा व महाराज पृथ्वीराज हे दोघे एकाच दिवशीं जन्मले व एकाच दिवशीं मेले, असें म्हणतात. हा षड्भाषा, व्याकरण, काव्य, साहित्य, छंदःशास्त्र, ज्योतिष, पुराण, नाटक, वैद्यक इत्यादि अनेक विद्यांत प्रवीण होतो. याचें व पृथ्वी-

राजाचें जीवन इतकें एक झालें होतें कीं हा युद्धामध्यें, समेमध्यें, यात्रेमध्यें वगैरे सर्व ठिकाणीं महाराजांबरोबर असे.

याचा पृथ्वीराजरासो हा ग्रंथ २००० पानांचा असून त्याचे ६९ अध्याय आहेत. हा ग्रंथ याचा मुलगा जाल्हन यानें पुरा केला, असा उल्लेख त्याचा ग्रंथांत आलेला आहे. यानें प्राचीन प्रचलित असलेल्या सर्व छंदांमध्यें कविता केल्या आहेत. हा ग्रंथ ऐतिहासिक नसून काव्यग्रंथ आहे, आणि सनाच्या सोळाव्या शतकांत पुरा झाला, असें कांहीं विद्वान् लोक म्हणतात. या ग्रंथांत ऐतिहासिक वर्णन नसून भाटांच्या कल्पनांचें वर्णन आहे, असें रायबहादुर पंडित गौरिशंकर ओझा म्हणतात. या ग्रंथांत व्याकरणाकडे दुर्लक्ष केलेलें आहे.

यानें पृथ्वीराज राजाचें संपूर्ण चरित्र आपली बायको गौरी हिला सांगितलें. ज्याप्रमाणें तुलसीदास 'चौपाई'-विषयीं प्रसिद्ध आहे, त्याप्रमाणें हा 'छप्पय'विषयीं फार प्रसिद्ध आहे.

याच्या 'रासो' (पृथ्वीराजरासो) मधील काव्यरस-रूपी पुष्प इतकें मनोहर आहे कीं त्याचा वास घेतला असतां मन अगदीं तल्लीन होऊन जातें. या ग्रंथामध्यें वीर आणि शृंगार-रसयुक्त कविताहि पुष्कळ आहेत. याची भाषा समजण्यास सोपी असून ती ज्याला संस्कृत व राजपुतानी भाषेचें चांगलें ज्ञान आहे त्यालाच समजते.

शहाबुद्दीन घोरीशीं झालेल्या अखेरच्या लढाईत पृथ्वीराज कैद केला जाऊन घोरीनें त्याला गझनीस नेलें, तेव्हां हाहि पृथ्वीराजाच्या बरोबर गझनीस गेला. शहाबुद्दीन घोरीच्या मरणानंतर दोघांनींहि आपापल्या हातांनीं आपआपला नाश केला असें इतिहास सांगतो.

याची एक दंतकथा सांगण्यांत येते ती अशीः—हा गझनीस गेला असतां एके दिवशीं शहाबुद्दीनास पृथ्वीराजाच्या शब्दवेधाची व निशाणबाजीची गोष्ट यानें सांगितली. शहाबुद्दीनानें एकावर एक सात तवे बांधून त्यांवर खडे मारले. पृथ्वीराजानें त्या आवाजाच्या अनुरोधानें सातहि तवे फोडले (कारण पृथ्वीराजाचे डोळे काढले होते). शेवटल्या तव्याच्या वेळीं शहाबुद्दीननें 'शाबास' असा शब्द उच्चारला. त्याबरोबर पृथ्वीराजानें त्या शब्दाच्या रोखानें बाण मारून शहाबुद्दीनाचें डोकें उडविलें. या वेळीं चंदानें प्रसंगावधान राखून पळून जाण्याचा विचार केला, परंतु तो न साधून शेवटीं परस्परांनीं परस्परांचा शिरच्छेद केला (बील).

चंदासाहेब—(मृत्यु स. १७५२ जून ३) याचें खरें नांव हुसेन दोस्तखान असें होतें. हा कर्नाटकच्या दोस्त अली नांवाच्या नबाबाचा जांवई होता. हा नबाबाची दिवाणगिरी पाहत असे. हा मूळचा गरीब, महत्त्वाकांक्षी, हुशार व धाडशी होता. याला शत्रू फार होते. म्हणून यानें आपलें संधान फ्रेंचांशीं अगोदरच बांधून ठेवलें होतें.

यानें त्रिचनापल्लीच्या राणीस मदत करण्याच्या मिषानें चिनाणापल्ली आपल्या ताब्यांत घेतली. रघूजीनें नबाबावर स्वारी करून त्यास लढाईंत ठार मारलें. या वेळीं हा सासऱ्याच्या मदतीस मुद्दामच गेला नाहीं. पुढें रघूजीस खंडणी देऊन दोस्तअलीचा मुलगा सफदरअली यानें तह केला. तो चंदासाहेबाचा द्वेषी नव्हता, पण चंदासाहेबानें आपल्या बापास मदत न केल्यामुळें त्याला याच्याविषयीं द्वेष वाटूं लागला. चंदाचा नाश करण्यास त्यानें रघूजीस सांगितलें. त्याप्रमानें रघूजीनें त्रिचनापल्लीस वेढा दिला; व तीन महिन्यांनीं त्यानें चंदासाहेबास कैद केलें (२६ मार्च १७४१). व याच्या थोरल्या भावास लढाईत ठार केलें. चंदासाहेब सात वर्षें कैदेंतच होता. पुढें डुप्लेनें सात लाख रु. दंड भरून चंदास सोडविलें; व अन्वरुद्दीनवर स्वारी करून अर्काटची गादी यास मिळवून दिली. याबद्दल डुप्लेस यानें पाँडेचरीजवळ ८१ गांवें दिलीं.

पुढें अन्वरुद्दीनाच्या दुसऱ्या मुलानें इंग्रजांची मदत घेऊन त्रिचनापल्ली काबीज केली. तेव्हां चंदानें त्रिचनापल्लीस वेढा दिला. परंतु हा वेढा उठविण्यासाठीं क्लाइव्हनें अर्काट येथें वेढा घालून तें घेतलें. तेव्हां यानें आपला मुलगा राजासाहेब यास अर्काट घेण्यास पाठविलें, परंतु त्याची डाळ शिजली नाहीं. पुढें मुहमंदअलीनें चंदास कोंडलें; तेव्हां चंदा आणि फ्रेंच यांचा पुरा पाडाव झाला. चंदा निसटून जात असतां मानाजी जगतापानें विश्वासघात करून यास ठार मारलें; व याचें शिर मुहमंदअलीकडे पाठवून दिलें (३ जून १७५२).

चंदुक—मंदोरच्या प्रतिहारवंशांतील यशोवर्धनाचा पुत्र. याचा पुत्र शीलुक.

चंदुपंडित—(स १२९७) हा श्रीहर्षाच्या 'नैषधीयचरित' या ग्रंथाचा टीकाकार होय. यानें आपल्या टीकेंत आनंदबोधाच्या न्यायमकरन्द ग्रंथांतील कांहीं उतारे घेतले आहेत. यानें आपली टीका स. १२९७ मध्यें लिहिली.

चंदुलाल—(मृत्यु स. १८४५) निजामाचा दिवाण. जात कायस्थ खत्री. राजा किसनप्रसाद हे चंदुलालचे वंशज होत. याला गोविंदबक्ष नांवाचा एक भाऊ होता. हे दोघेहि सर्वथैव रेसिडेंटाच्या तंत्रानें चालत. स. १८०८ मध्यें दिवाण मीर आलम मरण पावला. तेव्हां मुनीरुल्मुल्क यास नांवाची दिवाणगिरी देऊन कच्चा कारभार

यानें करावा, असें ठरलें. यानें निजामशाहीचा कारभार स. १८०८ पासून १८४३ पर्यंत ३५ वर्षे केला. इंग्रज रेसिडेंटाच्या कलानें वागून यानें शक्य तितक्या सुधारणा केल्या. यानें ता. ६-९-१८४३ त राजीनामा दिला व त्यानंतर हा ता. १५-४-१८४५ रोजीं मरण पावला. याला दररोज १ हजार रुपये तनखा होता (म. रि. उत्तर वि. ३, पृ. ३६६-६७).

याच्या पश्चात् याचा पुतण्या राजाराम बक्ष यानें निजामशाहीचा कारभार कांहीं दिवस केला.

चंदेल्ल घराणें—(नमुक चंदेल्ल पाहा).

चंद्र—(स. ६३७-४४) सिंधचा राजा. आरोर शहराजवळील एका खेड्यांतील देवळांत राहणाऱ्या कर्मठ व दरिद्री ब्राह्मणाचा चंद्र हा मुलगा व सिंधुराजा साहसीच्या मृत्यूनंतर सिंधमध्यें ब्राह्मणी राजवंश स्थापन करणाऱ्या चचाचा भाऊ. चचानें सिंधचें राजपद मिळवून आपली सत्ता सिंधमध्यें प्रस्थापित केल्यावर राज्यविस्ताराचें हेतूनें दोऱ्यावर जाण्याची तयारी केली व राजपालकत्वाच्या कामावर याची नेमणूक करण्याचें ठरविलें. चंद्र हा कर्मठ व विरक्त ब्राह्मण होता. याच्या पेशास अनुचित असें राजशासनाचें काम पत्करण्यास यानें तयार व्हावें म्हणून चचानें खालील पत्र लिहिलें: 'आपलें घराणें विरक्त संन्यासमार्गीयांचें आहे हें खरें. या घराण्याची अग्निहोत्रादि ब्रह्मकर्मनिष्ठाहि सुप्रसिद्ध आहे. पण नैष्कर्म्यव्रताचें आचरण करणाऱ्यास राजकुलांत जन्म येतो किंवा राजवैभव प्राप्त होतें. आपल्या कुलदैवतानें आपल्या वडिलांच्या पुण्याईमुळें आपणास राजपद दिलें आहे. आपण राजपालकाचें काम स्वीकारल्यास हें काम करीत असतां आपलीं धार्मिक कृत्यें, अनुष्ठानें, व्रतेंवैकल्यें पूर्ववत् करण्यास प्रत्यवाय येणार नाहीं.' चंद्रानें प्रथम नकारच दिला, तरी चचानें आग्रहपूर्वक अलोरला आणून यास राज्यपालक केलें.

चचाचे मृत्यूनंतर हाच राजा झाला. यानें ब्राह्मणधर्मास प्रोत्साहन दिलें व हिंदु आचारविचारांस चांगलें वळण लाविलें. हा संन्यासी वृत्तीचा ब्राह्मण असल्यामुळें राज्यकारभार चांगला चालविला तरी युद्धांत हा टिकाव धरूं शकणार नाहीं अशा समजुतीनें सिबिस्थान व कनोजच्या राजांनीं सिंधवर स्वारी केली. देवधनुष किल्ल्याजवळ येऊन त्यांनीं तेथें तळ दिला व देवधनुष ताब्यांत घेऊन यास शरण येण्यास पत्र लिहिलें. पण यानें युद्धाची तयारी केली व दाहीर व दाहरसीय या दोघां पुतण्यांच्या मदतीनें शत्रूंचा पराभव केला. चंद्र स्वतः जातीनें लढला. चंद्रानें ७ वर्षे राज्य केलें.

२. एक व्याकरणकार (चंद्रगोमिन् पाहा).

३. हा आर्यरक्षिताचा समकालीन होता. दशपूर येथें राहाणारे पुरोहित सोमदेव व बृद्रसोमा यांचा हा पुत्र होय.

चंद्रकीर्ति—(चंद्रगोमिन् पाहा).

२. हा जैन असून नागपूरच्या बृहद्गच्छांपैकीं होय. कौटीक या जैन तीर्थी हा राहत असे. गच्छाच्या संस्थापकापासून हा पंधरावा पुरुष. हर्षकीर्ति नांवाचा याचा एक शिष्य होता. हा सुबोधिका किंवा दीपिका या ग्रंथाचा कर्ता. याच्या ग्रंथावरून हा दिल्लीच्या इस्लामशाह सूर या सार्वभौम (स. १५४५-१५५३) राजाच्या पदरीं होता.

चंद्रगड कदंब—हा बनवासीच्या क्षेत्रवर्मा कदंबाचा पुत्र. याचें त्रिनेत्र कदंब असें दुसरें नांव आहे.

चंद्र गाहडवाल—(स. १०८०-११००) महीपाल गाहडवालांचा हा पुत्र. यानें आपल्या बाहुबलानें कान्यकुब्जाचें राज्य मिळविलें आणि देशास त्रासापासून मुक्त केलें. ही याची स्तुति गाहडवालांच्या प्रत्येक लेखांत येते. यानें नरपति, गजपति व त्रिशंकुपति यांस जिंकून पांचाल राजास जिंकलें (एपि. इंडि. १४ पा. १९२). पांचाल म्हणजे कनोज. या लेखांचा काळ स. १०९३-९९ पर्यंतचा आहे. याच्या मृत्यूनंतर एका लेखांत यासंबंधीं असें म्हटलें आहे कीं चेदीचा कर्ण मेल्यानंतर यानें पृथ्वीस संकटांतून मुक्त केलें (एपि. इंडि. १४ पा. १०३). यानें स. १०८० नंतर कनोज जिंकलें, असें अनुमान निघतें, असें चि. वि. वैद्य म्हणतात. याच्या शत्रूला लेखांत चपळ असें विशेषण लावलें आहे.

शिवाय यानें उत्तर हिंदुस्तानांतील क्षेत्रें काशी, कुशिक (कनोज), उत्तर कोशल (अयोध्या) व इंद्रस्थान (इंद्रप्रस्थ?) हीं आपल्या ताब्यांत घेतलीं असें वर्णिलेलें आहे. अर्थात् तुर्कांच्या स्वाऱ्यांपासून पवित्र क्षेत्रांचें रक्षण करणें हें हिंदु राजांचें कर्तव्य यानें बजावलें. ही चंद्राची स्तुति गाहडवालांच्या बहुतेक सर्व लेखांत दिलेली आढळते. यानें अनेक तुलादानें करून ब्राह्मणांस वांटलीं. हा धार्मिक व पराक्रमी असल्यानें यानें हिंदु भारताचें आयुष्य शंभर वर्षे वाढविलें. यानंतर याचा पुत्र मदनपाल गादीवर आला. याचा राज्यकाळ स. १०८० पासून ११०० पर्यंत आहे (हिं. भा. अ. ३ पा. ३२७). याच्या पत्नीचें नांव राल्हदेवी.

हा वैदिकधर्माचा मोठा उद्धारक म्हणून याची प्रशंसा केलेली आढळते (इंडि. अँटि. १८ पा. १५). कारण याला ब्रह्मदेवाचा अवतार म्हटलें आहे.

एका हस्तलिखितांत याचें नांव ब्रह्म असें दिलेलें आहे (हिं. भा. अ. पा. ३४०). याला चंद्रदेव असेंहि म्हणतात.

चंद्रगुणा—कुमारिलभट्टाची आई.

चंद्रगुप्त—(स. ३१९–३३५) गुप्त घराण्यांतील हा पहिला राजा होय. याचा लहानसा परगणा पाटलीपुत्राशेजारी असून स. ३१९ मध्यें हा स्वतंत्र झाला. याच वर्षी यानें आपला गुप्त शक सुरू केला.

हा घटोत्कच याचा मुलगा व गुप्त अथवा श्रीगुप्त याचा नातू होय. याचें लग्न लिच्छवीराजकन्या कुमारदेवी हिच्याशीं झालें होतें.

यानें हळूहळू आपलें राज्य वाढवून त्या राज्यांत गंगानदीचें खोरें, मगध, अलाहाबाद, तिर्हुत, बिहार आणि अयोध्या वगैरे प्रांतांचा समावेश केला. अशा प्रकारें यानें आपल्या लहानशा राज्याचें रूपांतर साम्राज्यांत केलें. ३३५ मध्यें याच्यानंतर याचा मुलगा समुद्रगुप्त हा गादीवर आला (B.).

२. (स. ३८०–४१३) हा गुप्तवंशांतील समुद्रगुप्ताचा पुत्र. हा या वंशांतील दुसरा चंद्रगुप्त होय. यानें विक्रमांक, विक्रमादित्य, श्रीविक्रम, अजितविक्रम, सिंहविक्रम व महाराजाधिराज इत्यादि बरेच किताब धारण केले होते. बंगालपासून बलुचिस्थानापर्यंत यानें विजय मिळविले. तसेंच गुजराथ, काठेवाड, कच्छ, माळवा व राजपुताना इत्यादि भागांवर राज्य करणाऱ्या शक जातीच्या पश्चिमी क्षत्रपांचें राज्य घेऊन स. ३९३ च्या सुमारास क्षत्रपांचें राज्य यानें नाहींसें केलें. यानें आपल्या पित्यापेक्षां अधिक राज्य मिळविलें व आपल्या राज्यांतील पश्चिम भागाची राजधानी उज्जयनी निश्चित केली. हा विद्वानांचा आश्रयदाता व विष्णूचा परमभक्त होता. प्राचीन दिल्ली शहरांत कुतुबमिनारच्या शेजारीं एक लोखंडाचा स्तंभ उभा आहे. तो मूळ या चंद्रगुप्तानें विष्णुपद नांवाच्या डोंगरावर विष्णुमंदिरापुढें ध्वज लावण्याकरितां तयार केला. तो अनंगपाल तोमरानें तेथून काढून येथें आणून स्थापन केला अशी प्रसिद्धी आहे. याचीं सोनें, चांदी व तांबें यांचीं नाणीं सांपडलीं आहेत. त्यांत सोन्याचींच अधिक आहेत (जा. ऐ. का. गु. डा. पृ. २४–६०. प्लेट ६–११). याच्या वेळचे जे शिलालेख मिळाले आहेत त्यांत गुप्तसंवत् ८२–९३ पर्यंतचे (स. ४०१–४१२) तीन मिळाले आहेत.

याच्या दोन राण्यांचा पत्ता लागतो. एक कुबेरनागा. कुबेरनागेला प्रभावती नांवाची कन्या झाली. ती वाकाटकांतील दुसऱ्या रुद्रसेनाला दिली होती. दुसरी राणी ध्रुवदेवी. ध्रुवस्वामिनी असें क्वचित् आढळतें. ध्रुवदेवीला दोन पुत्र झाले. एक कुमारगुप्त आणि दुसरा गोविंदगुप्त. कुमारगुप्त याच्या मागून राजा झाला.

फाहियान नांवाचा चिनी प्रवासी याच्या वेळीं मध्य एशियांतून हिंदुस्थानांत आला होता. त्याचा उद्देश संस्कृत भाषेचें अध्ययन करणें आणि महायानपंथाचे विनयपिटक वगैरे ग्रंथांचा संग्रह करणें हा होता. हा सुमारें पांच वर्षे हिंदुस्थानांत होता. त्यांतील तीन वर्षे तो पाटलीपुत्र येथें राहिला. त्यानें याच्या राज्यांतील लोकांची स्थिति वर्णिली आहे. तो म्हणतो, 'लोक सुखी, संपन्न व स्वतंत्र आहेत. प्राणदंड कोणालाच दिला जात नाहीं. अनेक वेळां अपराध करणारांचा एक हात तोडला जातो. मद्य व मांस यांचा प्रचार नव्हता. मांस चांडाळ गांवाच्या बाहेर विकतात. धर्मशाळा व औषधालयें यांची व्यवस्था चांगली होती. तसेंच विद्येचा प्रचारहि चांगला होता. '

चंद्रगुप्त मौर्य—(ख्रि. पू. ३२१–२९६) महापद्म नंदास अनेक वर्णांच्या स्त्रिया होत्या; त्यांपैकीं एका न्हावी जातीच्या स्त्रीपासून त्यास मुलगा झाला, त्याचें नांव धनानंद. या धनानंदानें आपल्या बदफैली आईच्या नवऱ्यास म्हणजे महापद्म नंदास ठार करून मगध देशचें राज्य बळकावलें. धनानंद जुलमी राजा होता. त्याच्या जुलमामुळें त्याच्या प्रजेंत असंतोष उत्पन्न झाला. धनानंदाच्या राज्यांतच चाणक्य या नांवाचा एक विद्वान्, चाणाक्ष व महत्त्वाकांक्षी ब्राह्मण होता. क्षत्रिय जातीच्या नसलेल्या स्त्रीपासून जन्मलेल्या धनानंदानें क्षत्रियत्वाचा हक्क बळकावून मगधाचें राज्य चालवावें हें त्यास सहन झालें नाहीं. राजाकडे तो तिरस्कारानें पाही.

धनानंदापूर्वी महापद्मनंदाची कारकीर्द चालू असतां, नंद घराण्यांपैकी दुसऱ्या एका पुरुषास मुरा नामक स्त्रीपासून एक मुलगा झालेला होता. त्याचें नांव चंद्रगुप्त. मुरेपासून झाला म्हणून यास मौर्य असें म्हणत असत. कित्येकांच्या मतें धनानंदासच हिमालयांतील मुरा नामक स्त्रीपासून झालेला पुत्र हा चंद्रगुप्त होय. हा मौर्यवंशांतील पहिला राजा होय. मुद्राराक्षस नाटकांत अमात्य चाणक्य चंद्रगुप्तास 'वृषला' या विशेषणानें संबोधीत असतो. यावरून चंद्रगुप्त धनानंदासच मुरेपासून झालेला मुलगा असावा. कारण धनानंद स्वतः वृषल म्हणजे क्षत्र स्त्रीला निकृष्ट वर्गांतील पुरुषापासून झालेला होता. मुरा क्षत्रिय असो वा शूद्र असो, महापद्म स्वतः शूद्र स्त्रीचा मुलगा असून

याच्या क्षत्रियत्वाविषयीं संशयवृत्ति निदान महापद्मनंदास धरण्याचें कारण नव्हतें. तथापि त्यानें यास हद्दपार करण्याचा हुकूम सोडून राज्यांतून घालवून दिलें. यानें आपल्या मातृभूमीस नमस्कार करून वनवास स्वीकारला.

धनानंदानें एकदां दरबार भरविला असतां, महत्त्वाकांक्षी चाणक्य अनाहूतच भर दरबारांत शिरला आणि प्रमुख स्थळीं जाऊन बसला. धनानंद अत्यंत संतापला; आणि आपल्या प्रधानांचें न ऐकतां त्यानें त्या वृद्ध ब्राह्मणास आसनावरून खालीं ओढण्याची आज्ञा केली. राजाच्या सेवकांनीं चाणक्यास ओढून खालीं आणलें. तेव्हां त्यानें अशी घोर प्रतिज्ञा केली कीं, 'नंदाचा वंश समूळ उच्छेदून टाकीन, तरच मी चाणक्य! तोंपर्यंत मी शिखाबंध करणार नाहीं,' असें म्हणून तो मगध देशांतून निघून गेला.

चंद्रगुप्त हद्दपारीचे दिवस कंठित असतां, त्याची व चाणक्याची अकस्मात् गांठ पडली. या भेटींत चंद्रगुप्तानें चाणक्याच्या मसलतीप्रमाणें वागण्याचें वचन देऊन पुढील मार्ग धरला. उत्तर हिंदुस्थानांतील बऱ्याच मुलखांत प्रवास करून अखेरीस चंद्रगुप्त हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरील पहाडी लोकांत येऊन राहिला. तेथें यानें पहाडी लोकांस कवाईत शिकवून त्यांचें सैन्य तयार केलें.

याच वेळीं युरोपांतील वैभवशाली अलेक्झांडर बादशहाची हिंदुस्थानवर स्वारी झाली. त्याच्याबरोबर पन्नास साठ हजार सैन्य होतें. ही गोष्ट ख्रि. पू. ३२७ मध्यें घडली. त्यानें प्रथम बॅक्ट्रिया म्हणजे काबूल, कंदाहार व हिरात प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. वाटेंतील प्रांत एकामागून एक त्याच्या ताब्यांत येत गेले. तक्षशिला वगैरे प्रांताचे राजे त्यास शरण आले. अलेक्झांडरनें कित्येक पहाडी लोकांचा पाडाव केला, परंतु चंद्रगुप्ताच्या कवायतींत तयार झालेल्या पहाडी सैन्याचा पराक्रम पाहून तो थक्क झाला. त्यानें चंद्रगुप्तास आपल्या बरोबर यावयास सांगितलें, त्याप्रमाणें अलेक्झांडरच्या स्वारींत कांहीं दिवस राहून, चंद्रगुप्तानें युरोपियन सैन्यव्यवस्था कशी काय असते, हें निरीक्षून ठेविलें. अलेक्झांडरनें पंजाबचा बराच भाग काबीज करून तेथील लोकांची कत्तल उडविली. जिंकलेल्या मुलखावर सत्रप अथवा सुभेदार नेमले. शरण आलेल्या राजांना मात्र धक्का लावला नाहीं. पण पुढें तीन वर्षें सारखे स्वारींवर असल्यामुळें थकलेल्या सैन्यानें बियास नदी ओलांडण्याचें नाकारलें, तेव्हां तो परतला; व बाबिलोन येथें ख्रि. पू. ३२३ च्या जूनमध्यें मरण पावला.

अलेक्झांडरच्या मृत्यूची बातमी चंद्रगुप्त मौर्यास कळतांच हा आपलें पहाडी सैन्य जमवून परकीयांच्या ताब्यांत गेलेले मुलूख परत मिळविण्याच्या खटपटीस लागला. ख्रि. पूर्वी ३२२ त यानें अलेक्झांडरच्या ताब्यांत गेलेले सर्व प्रांत जिंकून आपल्या ताब्यांत घेतले. चंद्रगुप्त या वेळेस फार तर पंचवीस वर्षांचा असावा.

याप्रमाणें परकीय राजांच्या अंमलाखालीं गेलेले यच्चयावत् प्रांत काबीज केल्यानंतर चंद्रगुप्तानें आपली दृष्टि मगध देशाकडे वळविली. यानें आपल्याजवळ पहाडी लोकांचें अफाट सैन्य कवाईत शिकवून तयार ठेवलेलें होतेंच. महापद्मनंदानें चंद्रगुप्त हीन कुळांत जन्मला म्हणून, यास हद्दपार केलें होतें. ही गोष्ट चंद्रगुप्ताच्या मनांत निरंतर डाचत होती. आणि नंदराजास मगध राज्याच्या सिंहासनावरून केव्हां खालीं पाडीन असें यास झालें होतें. या वेळेस मगधाच्या राज्यावर धनानंद राजा होता. धनानंद अत्यंत जुलमी असल्यानें त्याचे प्रजाजन गांजून गेले होत. यानें आपल्याकडे प्रजाजनांचें लक्ष वेधण्यास या परिस्थितीचा फायदा घेतला. यानें धनानंदावर स्वारी करून त्याला ठार मारलें. याप्रमाणें चंद्रगुप्तानें नंदांचा उच्छेद करून मगधाचें राज्य मिळविलें. हा ख्रिस्तपूर्व ३२१ मध्यें गादीवर बसला. उत्तर हिंदुस्थानांतील बहुतेक राज्यें याच्या ताब्यांत आलीं होतीं. याच्याएवढें विस्तृत राज्य याच्या पूर्वीच्या कोणत्याच राजानें मिळविलें नव्हतें. बंगालच्या उपसागरापासून अरबीसमुद्रापर्यंत मुलूख याच्या ताब्यांत होता. तसेंच दक्षिणेकडेहि यानें मुलूख जिंकला होता.

या चंद्रगुप्ताच्या उत्कर्षास कौटिल्याच्या अन्तर्गत शक्तीची जोड होती. चंद्रगुप्ताची व चाणक्याची गाठ पडल्या दिवसापासून चाणक्य मगधदेशांतील लोकांत असंतोषाचें व राजद्रोहाचें बीज पसरीत चालला. इतकेंच काय पण प्रसंग पडल्यास चंद्रगुप्ताचा पक्ष घेऊन धनानंदास राज्यच्युत करावयास त्यानें लोकांना प्रोत्साहन दिलें. चंद्रगुप्ताच्या हद्दपारींत चाणक्याचाच सल्ला यास मिळत गेला. चाणक्याच्या साहाय्याशिवाय मौर्यघराणें राज्यारूढ झालें असतें किंवा नाहीं याची शंका आहे. म्हणून चंद्रगुप्त मगधाचा राजा झाल्यापासून चाणक्य मुख्य प्रधान होता.

अलेक्झांडरचा यवन सेनापति सेल्यूकस होय. सेल्यूकसच्या मुलीशीं चंद्रगुप्तानें विवाह केला होता. याचा मुलगा अशोक. अलेक्झांडर म्हणजे सिकंदर,

अलेक्झांडरने जेव्हां पंजाब घेतला त्या वेळीं चंद्रगुप्त पंजाबमध्येंच होता. तक्षशिला हें चाणक्याचें राहण्याचें ठिकाण असून तेथेंच हे गुरुशिष्य राहत होते. सिकंदराशीं

याचें बोलणेंचालणेंहि झालें होतें. ग्रीक लेखक म्हणतो कीं, 'यानें सिकंदराशीं जरा धिटाईनें बोलणेंचालणें केलें. म्हणून सिकंदरनें याला मृत्यूची शिक्षा दिली, पण हा पळून गेला, म्हणून याचे प्राण वांचले.' प्लुटार्कनेंहि या दोघांची भेट झाल्याचें लिहिलें आहे. यावरून चंद्रगुप्त हा एक राजकारणी पुरुष म्हणून पश्चिमोत्तर सीमाप्रांतावर वावरत होता; आणि याला तेथील लढाऊ जातींचें साहाय्यहि होतें. सेल्यूकसनें त्या वेळीं याच्याशीं तह केल्याचेंहि जस्टिननें लिहिलें आहे. सिकंदर परत फिरल्यावर यानें तक्षशिला येथें बंडाचें निशाण उभारलें. तक्षशिलेजवळच्या पोरस आणि फिलिप्पोस या दोन क्षत्रपांचे खून झाले आणि बंडाला चांगला रंग आला. सिकंदरला ही बातमी कळल्यावर अत्यंत क्रोध आला व त्यानें सिंधूच्या तीरावरील आपल्या युडीमौस नांवाच्या सेनापतीला फिलिप्पोसचा उत्तराधिकारी नेमला नाहीं तोंपर्यंत त्याचें काम करण्याचा हुकूम केला. पण त्याला चंद्रगुप्ताच्या विरुद्ध कांहीं करितां आलें नाहीं. तिकडे सिकंदर मेल्यामुळें अँटिगोनस व सेल्यूकस या दोन सेनापतींमध्यें वारसासंबंधीं विरोध सुरू झाला. ख्रि. पू. ३१७ मध्यें जवळ असलेल्या अल्पशा सैन्यासह यूडीमौस अँटिगोनसला साहाय्य करण्याकरितां सिंधूच्या पार निघून गेला. अशा पद्धतीनें हिंदुस्थानच्या पश्चिमोत्तर सीमेवर चंद्रगुप्ताचें आधिपत्य स्थापित झालें. आणि देशाला स्वतंत्र केल्यामुळें लोकांतहि याबद्दल आदर वाढला.

सीमा प्रांतांत चंद्रगुप्त यशस्वी झाल्यानें याचें बल आतां वाढलें होतें. यवन, किरात, कांबोज, पारसीक, बाल्हीक इत्यादि जातींची बलिष्ठ सेना याच्याजवळ तयार झाली होती. तिच्या जोरावर यानें दिग्विजयाला सुरुवात केली. पश्चिम भारतांतील पर्वतक नांवाचा एक राजाहि जिंकलेलें अर्धे राज्य देण्याच्या अटीवर यानें आपला साहाय्यक बनवला होता. क्रमानें पाटलीपुत्राला वेढा देऊन बरेच दिवस झाल्यावर पुत्रासहित नंद ठार होऊन चंद्रगुप्त विजयी झाला.

नंद ठार झाल्यावर त्याचा मुख्य प्रधान राक्षस यानें नंदाचा भाऊ सर्वार्थसिद्धि यास गादीवर बसवून कारभार सुरू केला. मगधाच्या प्रबल राज्यांत शक्ति भरपूर होती. त्यामुळें घोर युद्धाला प्रारंभ झाला. चंद्रगुप्ताचें सैन्य परप्रांतांतून पैशाकरितां आलेलें होतें; आणि नंदाचें सैन्य देश, धर्म व राजा यांकरितां लढत होतें. हें जाणून चाणक्यानें आपल्या नीतीचा प्रयोग सुरू केला. आपला मित्र विष्णुशर्मा याला जीवसिद्धि क्षपणकाचा वेष देऊन राजा सर्वार्थसिद्धि व राक्षस यांच्या विश्वासांतील बनवलें व तद्वारां सर्वार्थसिद्धीला विरक्त बनवून वनांत पाठवून दिलें. राक्षस त्याला आणण्याकरितां स्वतः निघाला, पण चाणक्यानें त्याला पूर्वीच ठार केलें.

राक्षसानें चंद्रगुप्त आणि पर्वतक यांच्यांत भेद पाडण्याच्या इच्छेनें पर्वतकाला सर्व राज्याचें आमिष दाखवून आपल्या बाजूला वळवलें. पण त्याला एका विषकन्येकडून चाणक्यानें ठार मारवलें. तेव्हां राक्षसानें पर्वतकाचा मुलगा मलयकेतू यास हाताशीं धरलें. पण तोहि राक्षसाच्या विरुद्ध वागूं लागल्यामुळें आपल्या चंदनदास नांवाच्या मित्राचें प्राण वांचविण्याकरितां राक्षस चंद्रगुप्ताचा प्रधान झाला असें मुद्राराक्षस नाटकांत चंद्रगुप्ताच्या राज्यारोहणासंबंधीं दिलें आहे.

मगधसाम्राज्य चंद्रगुप्ताला मिळालें, पण त्या कृत्यांत याला कोणाचें साहाय्य झालें हें कळत नाहीं. चंद्रगुप्ताबद्दल बरीच माहिती ग्रीक लेखकांच्या लिखाणावरून मिळते. पण या लेखकांनीं हिंदुस्थानांतील स्थळें, गांवें, नद्या व व्यक्ति यांचीं नांवें अशीं कांहीं अपभ्रष्ट स्वरूपांत लिहिलीं आहेत कीं, तीं नांवें कोणत्या व्यक्तींचीं आहेत हें समजणें अत्यंत दुर्घट झालें आहे. हिंदुस्थानांतील नांवांचा उच्चार आणि या लेखकांनीं लिहिलेला उच्चार यांमध्यें अत्यंत फरक पडल्यानें इतर पुराव्याच्या अभावीं त्यांचें एकत्व ठरवणें दुर्घट झालें आहे. हिंदुस्थानांत तसा प्रामाणिक पुरावा उपलब्ध नाहीं. चंद्रगुप्ताबद्दल विशाखदत्ताचें मुद्राराक्षस नाटक आहे, आणि तें ऐतिहासिक घटनेवर उभारलें आहे. त्या नाटकांत पुष्कळच ऐतिहासिक भाग असला तरी तो सर्वस्वीं इतिहास आहे, असें म्हणतां येत नाहीं. तथापि त्यांतील नांवांचा ग्रीक लेखकांनीं लिहिलेल्या नांवांशीं मेळ घालण्याचा कांहीं तज्ज्ञांनीं प्रयत्न केला आहे. एकानें पारसीकाधिराज मेघास म्हणजे मॅगस्थनीज असें ठरविलें आहे. दुसऱ्यानें सेल्यूकस म्हणजे शैलाक्ष असें ठरविलें आणि विशाखदत्तानें शैलाक्ष लिहिण्याऐवजीं मेघाक्ष लिहिलें असें म्हटलें आहे. वास्तविक विशाखदत्त हा चंद्रगुप्तानंतर कितीतरी शतकें मागाहून झाला आहे. त्याच्या हातून चुका होणें अपरिहार्य आहे.

चंद्रगुप्तानें फार मोठें साम्राज्य संपादन केलें, मॅगस्थनीजच्या म्हणण्याप्रमाणें याच्या सैनेंत ६ लक्ष पायदळ, ३० हजार घोडेस्वार, २००० हत्ती व कमींत कमी ४ हजार रथ होते. शिवाय यानें आरमार उभारलें. याच्या जोरावर हा मध्ययुगांतील पहिला सम्राट् झाला.

चंद्रगुप्ताला चाणक्याच्या साहाय्यानें व स्वतःच्या कुशलतेनें मगधसाम्राज्याचा लाभ झाला. पण त्यानंतर याला पूर्वीचा सिकंदराचा सेनापति, पण आतां स्वतंत्र राजा झालेल्या सेल्यूकस निकेटरशीं युद्ध खेळावें लागलें. सेल्यूकसनें आपला प्रतिस्पर्धी ॲंटिगोनोस याला पराजित करून शेवटीं ठार केलें, आणि आपण पश्चिम व मध्य आशियाचा राजा झाला. तेव्हां त्याला साहजिकच पंजाब व सिंध या प्रान्तांवर स्वारी करण्याची इच्छा झाली. सिकंदरच्या स्वारीच्या वेळीं याची व त्याची भेट झाली होतीच. या वेळींहि सिंधूच्या तीरावर दोघांचें घनघोर युद्ध होऊन यानें त्याला पळावयास लावलें, पण शेवटीं पुढील अटींवर तह झालाः

(१) चंद्रगुप्तानें सेल्यूकसला पांचशें हत्ती द्यावेत.

(२) सेल्यूकसनें पॅरोपॅनिसडेई (काबूल), एरिया (हिरात), अर्कोशिया (कंदाहार) व जिडोशिया (मकरान) हे प्रान्त चंद्रगुप्ताला द्यावेत.

शेवटीं त्यानें आपली मुलगी याला देऊन कायमचें नातें जोडलें. यावरून चंद्रगुप्ताच्या राज्याच्या विस्ताराची कल्पना येते. या तहाप्रमाणें याच्या राज्याची सीमा हिंदुकूश (काकेशस) पर्वतापर्यंत जाऊन भिडली. त्यालाच ग्रीक लेखक पॅरोपोनिसस म्हणतात. तींच हिंदुस्थानची नैसर्गिक सीमा आहे. ती दोन हजार वर्षांपूर्वी फक्त एकदांच चंद्रगुप्तानें संपादली. मोगल किंवा इंग्रज यांना ती गांठतां आलेली नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांतील विजय मात्र चंद्रगुप्तानें केला कां याचा पुत्र बिंदुसार यानें केला, याबद्दल निश्चित पुरावा उपलब्ध नाहीं. अशोकानें धर्मविजय केल्याचा पुरावा दूरवरपर्यंत लेखादि रूपानें उपलब्ध आहे. पण त्यानें युद्धानें काश्मीर व कलिंग हेच फक्त देश जिंकले. त्यावरून दक्षिणहिंदुस्थान जिंकण्याचें काम मौर्यांपैकीं चंद्रगुप्तानें व बिंबिसारानेंच केलें असावें.

पाटलीपुत्र नगर अत्यंत सुंदर असून नऊ मैल लांब व दीड मैल रुंद होतें. त्याच्याभोंवतीं चारींहि बाजूंला लांकडी तट होता. त्याला चौसष्ट दरवाजे व ५७० बुरुज होते. भोंवतीं दोनशें हात रुंद व तीस हात खोल खंदक होता, त्यांत पाणी खेळवलें होतें.

याच्या सैनंत नऊ लक्ष शिपाई (पायदळ), तीस हजार स्वार, नऊ हजार हत्ती व हजारों रथ होते. राजा स्वतः राजसभेंत येऊन लोकांच्या फिर्यादी ऐकत असे. राज्याचीं कामें वेगळाल्या सभा स्थापन करून त्यांच्या द्वारें चालविलीं जात. कारागिरांचा अत्यंत सन्मान ठेवला जाई. यांचा कोणी हात, पाय तोडील किंवा डोळा फोडील तर त्याला प्राणदंड दिला जाई. प्रवासी लोकांच्या आरामाची व्यवस्था केली जाई. तसेंच रोग्यांची सेवाशुश्रूषा करण्याचीं औषधालयें स्थापून व्यवस्था केलेली असे. प्रवासी लोकांचा अंत्यसंस्कार करण्याची व्यवस्था असे; व त्याची संपत्ति वारसाकडे पोंचविली जाई. वर्षारंभाच्या दिवशीं विद्वानांच्या सभा भरत त्यांत जे लोक शेतकी, पशु व प्रजा यांच्या उत्कर्षाच्या चांगल्या सूचना करीत, त्यांना पुरस्कार देऊन सन्मान केला जाई. कालवे काढून शेतीची सोय केलेली असे. रस्त्यावर अंतर कळावें म्हणून कोसावर दगड रोंवलेले असत. चोरी अगदींच क्वचित् होई प्रायः सर्व व्यवहार तडजोडीनें आपसांत चालत (इंडि. ॲंटि. भा. ६, पृ. २३६-५०). मॅगॅस्थनीजनें आपल्या हिंदुस्थानविषयक इंडिका नांवाच्या पुस्तकांत वर दिल्याप्रमाणें पुष्कळच माहिती लिहून ठेवली होती. पण तो ग्रंथ सध्यां उपलब्ध नाहीं. पण त्यांतील उतारे स्ट्रेबो, आर्यन, प्लीनी इत्यादि ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांत उद्धृत केले आहेत तेवढेच फक्त मिळतात. चंद्रगुप्तानें नीति व पराक्रम यांच्या जोरावर विस्तृत राज्य संपादन केलें.

त्या वेळीं संघराज्यें किंवा गणराज्यें हि बरींच होतीं. त्यांपैकीं लिच्छविक, वृजिक, मल्लक, मद्रक, कुकुर, कुरु, पांचाल इत्यादि राज्यें प्रमुख दिसतात (कौ.अर्थ.११.१). हीं यानें नष्ट न करितां आपल्याला अनुकूल करून घेतलीं असावींत. कारण संघराज्यें नष्ट करण्यापेक्षां आपल्याला अनुकूल करून घेणें उत्तम, असें कौटिल्यानें अर्थशास्त्रांत म्हटलें आहे.

चंद्रगुप्तानें लोकोपयोगी कामें पुष्कळच केलीं असावींत असें दिसतें. पाटलीपुत्रापासून गिरनारपर्वत सुमारें एक हजार मैल दूर आहे. पण इतक्या लांबच्या प्रदेशांत गिरनार नदीला धरण बांधून कालवे काढण्याची व्यवस्था केली. धरण बांधून तयार केलेल्या तलावाचें नांव सुदर्शन असें ठेवण्यांत आलें. यानें आपला त्या प्रांतांतील प्रतिनिधि पुष्यगुप्त याच्याकडून तलाव बांधण्याची व्यवस्था केली होती (इंडि. ॲंटि. ७. २६०). पुढें अशोकानें याचे कालवे काढले. अशोकाच्या वेळीं त्या प्रांताचा अधिपति तुषाश्व होता. हा बंधारा ख्रि. पू. १५० पर्यंत तेथें होता. कारण रुद्रदामनने त्याची डागडुजी केली होती. यासंबंधीं जुनागड येथें खडकावर अशोकाच्या लेखाशेजारींच रुद्रदामनचा लेख खोदलेला आहे. तो लेख शक संवत् ७२ (वि. सं. २०७, स. १५०) मधील आहे. वरील तलाव बांधण्याचें काम करवणारा पुष्यमित्र किंवा पुष्यगुप्त हा वैश्य असून त्याच्या मुलीशीं चंद्रगुप्तानें लग्न केलेलें होतें.

हा मौर्य वंशांतीलच नव्हे तर हिंदुस्थानांत आजपर्यंत झालेल्या सर्व सम्राटांतील अद्वितीय होय. पण याच्या जन्मादिकांविषयीं निश्चित अशी माहिती मिळत नाहीं. तथापि जी विशेष संभवनीय आणि मान्य आहे ती पुढें देतों.

महापद्मनंदाला (धननंद) सुनंदा नांवाची पत्नी होती. तिच्यापासून त्याला नऊ मुलें झालीं. तीं नवनन्द म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यालाच मुरा नांवाच्या शूद्र जातीच्या स्त्रीपासून चंद्रगुप्त झाला. विष्णुपुराणावरील श्रीधरस्वामीच्या टीकेंत असें लिहिलें आहे. पण मुद्राराक्षसाचा प्रसिद्ध टीकाकार ढुंढिराज यानें उपोद्घातांत नंदवंशांतील राजाचें नांव सर्वार्थसिद्धि असें दिलें आहे. त्याला नऊ पुत्र झाले. त्यांना राक्षसाच्या नेतृत्वाखालीं राज्य करावयास लावून मौर्याला सेनापत्य दिलें. मौर्याला शंभर मुलें होतीं. त्यांत चंद्रगुप्त वडील होता. नंद आणि मौर्य यांच्यांत विरोध सुरू झाला. नंदांनीं मौर्यांना मारण्याचा प्रयत्न केला. त्यांत सर्व मेले, पण चंद्रगुप्त वांचला. पुढें विष्णुगुप्त चाणक्याचेंहि याला साहाय्य मिळालें.

पण महावंश नांवाच्या बौद्धांच्या पालीभाषेतील ग्रंथांत निराळी माहिती सांपडते. त्यांत म्हटलें आहे कीं, कालाशोकाला दहा मुलें होतीं. त्यांनीं बावीस वर्षे चांगलें राज्य केलें. त्याला आणखी नऊ मुलें झालीं. त्यांनींहि बावीस वर्षे राज्य केलें. यांतील शेवटला धननंद होता. या धननंदाचा चाणक्यानें नाश केला आणि मोरिय वंशांतील चंद्रगुप्ताला संपूर्ण जंबुद्वीपाचा राजा केला. ही कथा उत्तर बिहारमध्यें प्रसिद्ध असलेल्या अट्ठ कथेंत सविस्तर लिहिली आहे, असें महावंशांत म्हटलें आहे. मुद्राराक्षस नाटकांतहि हा नंदवंशांतील होता असें स्पष्टच म्हटलें आहे. पण महावंश म्हणतो कीं, हा मोरिय किंवा मौर्यवंशांतील होता.

मौर्य कोण होते यासंबंधीं महावंशांत पुढीलप्रमाणें माहिती मिळते. 'बुद्ध भगवान् जीवंत होते, तेव्हां विडूडभ राजानें शाक्यांच्या राष्ट्रावर स्वारी केली. शाक्यांच्या घराण्यापैकीं कांहीं लोक या त्रासानें आपला देश सोडून हिमालयांत जाऊन राहिले. तेथें त्यांना मोठें रमणीय व सुंदर स्थान राहण्यास मिळालें. घनदाट वृक्ष व सुंदर पाणी असल्यामुळें त्यांना तेथेंच राहण्याची इच्छा झाली. तेव्हां त्यांनीं एक नगर वसाविलें, या नगरांतील घरांची मांडणी मोराच्या मानेसारखी झाली. येथें मोर पुष्कळ असल्यामुळें मोरांचा ध्वनीहि सारखा चाललेला असे. यामुळें या नगराचें नांव मयूरनगर असें पडलें, व त्यामुळेंच त्या नगरांतील लोक व त्यांचे वंशज यांना मौर्य म्हणूं लागले.' मातेच्या नांवाचा सन्मान करण्याकरितां यानें आपणास मौर्य म्हणवून घेतलें किंवा मौर्य नांवाचा एक जात होती याबद्दल अशीं दोन मतें आहेत. यांपैकीं विशाखदत्तानें अनुसरलेलें पहिलें मत सर्वत्र पसरलेलें आहे. पण दुसरें मतहि महावंशासारख्या मान्य ग्रंथकारांनीं अनुसरलें आहे.

यानें एकंदर चोवीस वर्षे राज्य केलें, असें वायु व ब्रह्मांडपुराणांत लिहिलें आहे. महावंशांतहि इतकींच वर्षे राज्य केल्याचें दिलें आहे (५.१६-१८). फक्त मत्स्य पुराणांत चवतीस वर्षे राज्य केलें असें लिहिलें आहे. सर्व ऐतिहासिक लोकांनीं चोवीस वर्षेंच राज्य केल्याचें मान्य केलें आहे. श्रीनारायणशास्त्र्यांसारखीं कांहीं माणसें चवतीस वर्षांचाहि पुरस्कार करणारीं आहेत, पण त्यांना संमति मिळत नाहीं.

चंद्रगुप्ताच्या शेवटच्या कालाबद्दल निश्चित माहिती मिळत नाहीं. जैनधर्माप्रमाणें यानें आचार्य भद्रबाहु श्रुतकेवलीपासून जैनधर्माची दीक्षा घेतली व बारा वर्षे भयंकर दुष्काळ पडला म्हणून भद्रबाहूबरोबर दक्षिणेंत श्रवणबेलगोला (म्हैसूर) येथें जाऊन तेथें देह ठेवला. अनेक जैन ग्रंथांवरून असेंच ठरतें. डॉ. फ्लीट वगैरे कांहीं विद्वान् जैन ग्रंथांतील या कथांविषयीं संशय प्रदर्शित करतात. श्री. व्ही. ए. स्मिथनें आपल्या 'अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तींत जैनकथांचें खंडन केलें होतें, पण तिसऱ्या आवृत्तींत त्यांची सत्यता कबूल केली आहे. पण या गोष्टी सत्य असल्या तरी चंद्रगुप्तासंबंधीं नसून अशोकाचा नातू व कुनालाचा पुत्र संप्रति (दुसरा चंद्रगुप्त) याच्यासंबंधीं आहेत असें पुण्यश्रवणकथाकोष व राजावलिकथा या ग्रंथांतील माहितीवरून पं. सत्यकेतु विद्यालंकार यांनीं आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे तें बरोबर दिसतें (मौर्य साम्राज्य का इतिहास, पा. ४२३-४२५). डॉ. फ्लीटला पडलेल्या अडचणीचा यामुळें चांगला खुलासा होतो. त्याचें म्हणणें होतें कीं जैनकथांत चंद्रगुप्त हें नांव चुकून पडलेलें दिसतें, वास्तविक तेथें संप्रति हें नांव पाहिजे (इंडियन अँटिक्वरी २१).

यानें प्रथम राजकीय आरमार बांधून त्यावर निरनिराळे अधिकारी नेमून आरमाराची उत्तम प्रकारें व्यवस्था होईल अशी सोय केली. यानें आपल्या आरमाराचे सहा विभाग पाडले होते, असें मॅगॅस्थनीज म्हणतो.

याचें आरमार अशोक राजाच्या कारकीर्दीच्या शेवटापर्यंत टिकलें व पुढें त्याचा लय झाला (I. H. Q. Vol. No. 4, p. 647-49).

२. (संप्रति पाहा).

चंद्रगोमिन्--(स. ६२२ नंतर) हा बौद्धधर्मी होता. हा सिलोनहून परत येतांना यास पतंजलीचें व्याकरणमहाभाष्य प्रथम उपलब्ध झालें. यानें एक स्वतंत्र व्याकरण केलें आहे. तें चांद्रव्याकरण नांवानें प्रसिद्ध आहे. याचा प्रतिस्पर्धी चंद्रकीर्ति म्हणून होता. त्यानेंहि याचा सन्मान केला. काशिकावृत्तींत याचा निर्देश नाहीं व हेमचंद्रानें याचा निर्देश केला आहे. म्हणजे स. ६२२-११७२ च्या मध्यें हा झाला असला पाहिजे. याचीं लोकानंद व शिष्यलेखा नांवांचीं दोन संस्कृत नाटकें प्रसिद्ध आहेत. सिल्वन लेव्हीचें म्हणणें कीं, इत्सिंगनें निर्देश केलेला चंद्रदास व चंद्रगोमिन् एकच. असें असल्यास याचा काल बराच मागें जातो. तिबेटी भाषेंत याचे भाषांतर केलेले आणखीहि कांहीं ग्रंथ आहेत.

२. (स. ९२५ सुमार) याचा जन्म बंगालमध्यें वारेंद्र (राजशाही) येथें झाला. स्थिरमतीनें यास सूत्रें व अभिधर्मपिटकाचें ज्ञान दिलें. आचार्य अशोकानें यास बुद्धधर्माची दीक्षा दिली. हा मोठा कर्मठ होता.

३. एक तर्कशास्त्रज्ञ. हा वरील दोघांपेक्षां वेगळा होता. यानें न्यायालोकसिद्धि किंवा न्यायसिध्यालोक नांवाचा ग्रंथ लिहिला. याचें फक्त तिबेटी भाषांतर उपलब्ध आहे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ३३३-३९).

चंद्रदेव—(स.६४९) एका चिनी प्रवाश्यानें हिंदुस्थानांत हें नांव धारण केलें होतें. हा चीनमधील पिंगचाव येथील भिक्षु होता. हा स. ६४९ मध्यें भारतवर्षांत आला. बोधिसंघारामांत राहून नालंद येथें आला. तेथें कांहीं दिवस राहूनं हा राजसंघारामांत गेला. तेथें यानें अनेक ग्रंथांचें अध्ययन केलें. संस्कृत शिकून हा चीनला परत गेला होता.

चंद्र प्रद्योत—हा उज्जैनीचा एक राजा होय. याला वैशालीच्या चेतक राजाची मुलगी शिवा ही दिली होती. हा चंद्र प्रद्योत महासेन या नांवानें प्रसिद्ध आहे. याच्याजवळ फार सैन्य होतें. याची मुलगी वासवदत्ता ही वत्सच्या उदयन राजास दिली होती.

कौसंबीच्या शतानीक राजाची बायको मृगावतीची मागणी यानें शतानीकापाशीं केली. पण ती मागणी शतानीकानें नाकारली म्हणून यानें त्याच्यावर स्वारी केली. पण मध्येंच शतानीक वारला. जेव्हां महावीर कौसंबीला आले तेव्हां त्यांनीं प्रद्योतला मृगावतीची इच्छा सोडून देण्यास सांगितलें व याचें मन वळविलें.

हा जैनधर्मानुयायी होता. याचा जैन-तत्त्वांवर चांगला विश्वास होता. कारण यानें आपल्या आठी राण्यांना जैनधर्माची दीक्षा घेण्यास परवानगी दिली. यानें स्वतः आपण जैनधर्मीय आहों, असें जाहीर केलें होतें.

चंद्रबाला—चंदनेचें नामांतर.

चंद्रभट्ट—हा जातीचा ब्राह्मण असून दौलताबाद येथें राहत असे. एकनाथानें जी चतुःश्लोकी भागवतावर टीका लिहिली ती याचेच घरीं बसून लिहिली. हेच पुढें चांद बोधला या नांवानें प्रसिद्धीस आले, असें महिपतीनें लिहिलें आहे. शेख मुहंमद हे याचे शिष्य. यांची समाधि देवगिरी येथें कबरीसारखी बांधिली आहे.

चंद्रभान—शहाजहान बादशहाचा वजीर सादुल्लाखान वारल्यावर हा त्याच्या फार्सी पत्रव्यवहाराचें काम पाहूं लागला. हा फार्सीत पत्रें लिहिण्यांत अत्यंत हुशार होता (मु. रि. भा. २ पा. ३२२).

चंद्रमहत्तरगणि—(स. १२४३ पूर्वी) देवेंद्रसूरीच्या कर्मग्रंथापैकीं ७० श्लोकांचा ६ वा भाग यानें लिहिलेला आहे. याशिवाय कर्माचें तत्त्वज्ञान सांगणारा 'पंचसंग्रह' हा ग्रंथहि यानें लिहिला. देवेंद्रसूरी हा याचा गुरु होता. देवेंद्रसूरी गुजराथचा राजा वीरधवल व त्याचा भाऊ तेजःपाल याच्या वेळीं होता. त्यामुळें याचा काळ ठरतो.

चंद्रराज—या कवीनें संस्कृतभाषेंत मदनतिलक नांवाचें काव्य रचिलें आहे. यांतील ध्वनि व शब्द यांचे अनेक निरनिराळे प्रकार करून दाखवितां येतात.

याचा जन्म गुजराथेंत झाला व यानें पूर्णिमागच्छाची स्थापना केली (स. ११०२). हा जयसिंहसूरीचा शिष्य असून धर्मघोषाचा गुरु होता.

ह्यानें 'दर्शनमुखशुद्धि' अथवा 'सम्यक्त्वप्रकरण' नांवाचा ग्रंथ लिहिला. 'प्रमेयरत्नकोश' व 'न्यायावतारवृत्ति' हे दोन ग्रंथहि याचेच असावेत. 'न्यायावतारवृत्ति' ही सिद्धसेनदिवाकराच्या न्यायावतारावरील एक सुंदर टीका आहे.

चंद्रराव पवार—हा उदाजी पवाराचा सर्वांत धाकटा मुलगा.

हा राघोबादादाच्या बाजूस असून दादाला वेळोवेळीं मदत करीत असे. स. १७८० च्या डिसेंबरांत रनाळें येथें गणेशपंत बेहेरे यांची व याची लढाई होऊन त्यांत हा ठार झाला. (म. रि. उत्तर वि. १ ला २३८, २३९).

चंद्रवर्मा कदंब—हा बनवासीच्या मल्लिनाथ कदंबाचा पुत्र.

२. हा पहिला चंद्रवर्मा कदंबाचा पुत्र. याला पुरंदर नांवाचा दुसरा एक भाऊ होता.

'चंद्रराव' मोरे—मोरे हें घराणें आदिलशाहींत नोकरी करून उदयास आलें. त्यांना पराक्रमाबद्दल 'चंद्रराव' हा किताब व जावळीचें राज्य मिळालें. 'चंद्रराव' हें कोणाहि एका व्यक्तीचें नांव नाहीं. मोरे हे आपणांस विजापूरकरांचे एकनिष्ठ सरदार व 'जावळीचे राजे' म्हणवीत. जावळी ही सातारा जिल्ह्यांत, वायव्य दिशेचे टोंकास असून तेथून कोंकणांत उतरण्याचा मार्ग आहे. मोरे व शिवाजी यांमध्यें विरोध निरनिराळ्या कारणांनीं वाढत गेला. ज्या चंद्ररावाच्या (दौलतरावाच्या) गादीवर, एकदां शिवाजीच्या साहाय्यानेंच त्याचा दत्तकपुत्र अधिष्ठित झाला (स. १६४८) तोच (यशवंतराव मोरे) चंद्रराव पुढें स्वतंत्र होऊन शिवाजीच्या विरोधकांत समाविष्ट झाला (प.सा.६१७; ७०७; शिवदिग्विजय,पा.१३०-१३१; इतिहाससंग्रहांतील जावळीकर मोरें बखर, पा. २६).

चंद्रराव कृष्णाजीराव राजे यांस महाराज सांगून पाठवितात, 'तुम्ही मुस्तफद राजे म्हणविता. राजे आम्ही. आम्हां श्रीशंभूनें राज्य दिधलें आहे. तर तुम्ही राजे न म्हणावें.' यावर चंद्ररावानें पुढील उत्तर दिलें. 'तुम्ही काल राजे जाहलां. तुम्हास राज्य कोणें दिधलें ?..... तुम्हामध्यें पुरुषार्थ असला, तर उदईक याल, तर आजच यावें.' (ऐ. स्फु. ले. जा. ब. पृ. २६).

मावळांतील मोरे शिवाजीच्या विरुद्ध बागूं लागले, आणि शिवाजीचीं माणसेंहि फोडण्याचा प्रयत्न करूं लागले, तेव्हां शिवाजीनें मोरे यांचा मामा सिलीमकर, बांदल व कान्होजी जेधे यांना त्यांवर रवाना केलें (स. १६५५ अखेर). पण त्यांचा पराजय झाला, तेव्हां रघुनाथ बल्लाळ कोरडे यानें हल्ला केला तेव्हां हणमंतराव मोरे मारला गेला; आणि प्रतापराव मोरे विजापुरास पळून गेला. त्यामुळें जावळीचें ठिकाण शिवाजीचे हस्तगत झालें (ता. २७-१-१६५६). पुढें यशवंतराव मोरे रायगडावर बंदोबस्तानें राहिला. त्यावर स्वारी करून तीन दिवस लढावें लागलें. नंतर तह झाला. यशवंतराव व त्याचे पुत्र कृष्णाजी व बाजी गडाखालीं शिवाजीचे भेटीस आले. यशवंतराव मुख्य गुन्हेगार म्हणून व मुलांनीं फितुरी केली म्हणून सर्वांना ठार केलें. प्रतापराव मोरे शेवटपर्यंत वैर करीत राहिला. मोऱ्यांच्या निःपातासंबंधीं 'मिळाली बारभाई, बुडाली चंदरराई' अशी म्हण रूढ आहे.

चंद्रलेखा—कऱ्हाडच्या शिलाहार राजाची मुलगी. हिनें विक्रम उत्तरचालुक्यास वरिलें, असें बिल्हणानें वर्णिलें आहे. कल्हणानें असें लिहिलें आहे कीं, हिच्या विलक्षण सौंदर्याची कीर्ति ऐकून काश्मीरच्या हर्ष राजानें कर्नाटक जिंकून हिचें हरण करण्याचा निश्चय भर सभेंत केला (राजतरंगिणी ७. ११२४). पण ही गोष्ट खरी नसावी, असें म्हणतात (हि. भा. अं. पा. ३८७). ही नरसिंह शिलाहाराची मुलगी असावी.

चंद्रशेखर वाजपेयी—(जन्म स. १७९८) एक हिंदी कवि. पिता माणिराम. जन्मस्थान मुअज्जमाबाद. हे जोधपूरच्या नरेंद्रसिंहाचे आश्रित होते. यांचे ग्रंथ— १ विवेकविलास, २ रसिकविनोद, ३ हरिभक्तिविलास, ४ नखशिख, ५ वृंदावनशतक, ६ गृहपंचाशिका, ७ ताजक-ज्योतिष, ८ माधवीवसंत. पण यांची कीर्ति हम्मीर-हठानें झाली आहे. यांचें हिंदी भाषेवरील प्रभुत्व अपूर्व आहे. अनुप्रास साधूनहि हे अर्थहानि होऊं देत नसत.

चंद्रशेखर विद्यालंकार—यानें गोविंदचंद्राच्या टीकेवर टीका लिहिली.

चंद्रसूरि—(बारावें शतक) एक जैन लेखक. यानें आवश्यक सूत्रावर (स. ११६५) व निर्यावलि सूत्रावर टीका लिहिल्या (विंटरनिझ-हि. सं. पु. २).

चंद्रसेन जाधव—(मृत्यु स. १७५१) हा धनाजी जाधवाचा धाकटा मुलगा होता. धनाजीच्या पश्चात् शाहूनें सेनापतिपद याच्याकडे दिलें. हा विशेष कर्तृत्ववान् होता, परंतु पुढें याचा ओढा ताराबाईकडे असे. यानें व बाळाजी विश्वनाथानें पुढें चुरस लागली. नंतर त्यांचा तंटा विकोपास जाऊन दोघांची लढाई झाली आणि शाहूनें बाळाजीस आश्रय दिला. बाळाजीस शाहूनें आश्रय दिला त्या वेळेस यानें शाहूस निरोप पाठविला कीं, " स्वामीनी बाळाजीस माझ्या स्वाधीन करावें त्यांस आश्रय दिल्यास आम्हांस महाराजांचे पाय सुटतील." यावरून याचें मन बाळाजीविषयीं किती विरुद्ध झालें तें दिसतें. चंद्रसेन पांडवगड सोडून निघाला. याची व हैबतरावाची गांठ आंदकीच्या घांटाखालीं जेऊर येथें पडून एक लढाई झाली (स. १७११ मार्च). तींत याचा पुरा मोड झाला. तेव्हां चंद्रसेन उघडपणें प्रथम ताराबाईस व नंतर निजामास जाऊन मिळाला. त्याच सालीं यानें सेनापतिपद काढून शाहूनें याचा थोरला सावत्र भाऊ संताजीस दिलें. स. १७११ त ताराबाईनें याच्या मदतीनें कारस्थान उभारलें. प्रथम यानें एक पत्र ताराबाईस गेलें, तें येणेंप्रमाणें, " आमची निष्ठा

स्वामीच्या चरणीं; स्वामीची सेवा करावी व यशकीर्ती संपादावी. राजश्री जाधवराव (धनाजी) स्वामींच्या पायांव्यतिरिक्त दुसरें दैवत जाणत नव्हते. राज्यांत दुही निर्माण झाली ते प्रसंगीं त्यांनी प्रतिज्ञापुरःसर स्वामीसंनिध बोलोन स्वार झाले. यांचा (धनाजीचा) हेतु पुर्ण करावा हें अंतःकरणीं धरून आजपर्यंत याच मानीं राहून रा. आप्पा थोरात, दमाजी थोरात, संताजी पांढरे आदीकरून सामील करून घेऊन शाहूनीं केल्या लोभाची (दाखविलेल्या लालुचीची) आस्था न धरितां, त्यासहि वैमनस्य दर्शविले. मग आम्ही कटांत सरदार घेऊन प्रतिनिधी यांस विचारांत घेतले. खुशाली केली. आणि आम्ही आपली व पंडीत मशारनिल्हेची पत्रें पाठविली आहेत." या पत्रांत हा असें म्हणतो कीं "मी शाहूच्या पक्षाचा कधीच अंगिकार केला नाहीं."

याच्या पत्रास ताराबाईनीं खालील जबाब पत्रानें पाठविलाः "धनाजीचे पुत्र तुम्ही त्यांजसारखे कृतकर्मे आहां. तुम्हां व्यतिरिक्त त्यांचा संकल्प आणखी कोण शेवटांस नेवो. राज्याभिवृद्धीचा उपाय मायेचा सेवकाविना दुसऱ्याचे मनांत कसा येईल. तरी दूही निःशेष करून स्वामींचे शासन चालविण्याचा संकल्प सफल करावा. तुम्हांसारखे बुद्धि प्रगल्भ पराक्रमी पुत्र जाधवरावांस होऊन स्वामीचे सेवेशीं तत्पर झाले. तुमच्या भरंवशानें स्वामी निश्चित आहेत. गडकिल्ले यांस तुम्हीं कांहीं पत्रें पाठविलीं ही गोष्ट उत्तम केली. पुढेंहि ज्यास लिहिणें ते लिहावें. तुम्ही सांगितल्याप्रमाणें सर्वांनीं तुमच्या चित्ताचे ठायीं एकरूप होऊन महाकार्य संपादिले. सर्व गोष्टीनीं मातोश्रीसाहेब (ताराबाई) व स्वामी बहूत संतोषी आहेत. तुम्ही जे कर्तव्य लिहिले ते निःशेष करून संतोषावें वर्तमान लिहून पाठवावें." या पत्रावरून ताराबाईनें याच्या सल्ल्यानें भयंकर कारस्थान रचिलें असें दिसतें.

दमाजी थोरातानें शाहूशीं जो झगडा केला त्यांत त्यास चंद्रसेनाचें पाठबळ चांगलेंच होतें. शाहू व संभाजी यांच्या तंट्याचें बीज यानेंच पेरलें. चंद्रसेनाचे द्वारें संभाजीनें निजामाशीं संधान बांधलें. हा अभिमानी, हट्टी, एकदां स्वीकारलेली पद्धत कधींहि न सोडणारा व सेनापतित्वाच्या जोरावर शाहूस वाटेल तसा नाचविण्याची धमक बाळगणारा होता. हा माघार घेणारा नव्हता. संभाजी-पक्षहि निर्बल असल्यामुळें याच्या कर्तव्यास जागा राहिली नाहीं. अर्थात् आपला आग्रह तडीस नेण्याकरितां यास मुसलमानांकडे जावें लागलें. हा मुसलमानांस मिळालेला पाहून शाहूस कांहींच मार्ग उरला नाहीं. हा स. १७५१ मध्यें मरण पावला.

चंद्रसेनसूरि—(स. ११५० सुमार) हा चंद्रसेनसूरि जैनधर्मी असून प्रद्युम्नसूरीचा शिष्य होता. यानें स. ११५० त नेमिचंद्राचे मदतीनें ' उत्पादसिद्धिप्रकरण ' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथावर ह्यानें स्वतःच एक टीकाहि लिहिली आहे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. २११).

चंद्रात्मज कवि—(स.१७६५ सुमार) हा मराठी कवि अजून अप्रकाशितच आहे. याचीं दोन प्रकरणें आपचंद मठांत मिळालीं, एक उद्योगपर्व व दुसरें गोकर्णमाहात्म्य. उद्योगपर्वाचे एकंदर बारा अध्याय असून ओवीसंख्या सुमारें २००० आहे. गोकर्णमाहात्म्याचे एकंदर ६४ श्लोक आहेत. कवीचें गोत्र वशिष्ठ, वेद ऋग्वेद व शाखा आश्वलायन.

पिता-दुंदुभि. मुक्तेश्वर कवीला यानें नमन केलें आहे (मं. श. १८३४ पु. ४. २ ले. ५३).

चंद्रादित्य चालुक्य—(स.६५५-५९) बदामीच्या पश्चिम चालुक्य घराण्यांतील दुसऱ्या पुलकेशिन्चा पुत्र. कीलहॉर्नच्या मतें हा पुलकेशिन्चा सर्वांत वडील पुत्र होय. याच्या पत्नीचें नांव विजयमहादेवी होय.

चंद्रापीड कर्कोटक—(स. ६८७-६९५) काश्मीरचा राजा. याचा धाकटा भाऊ तारापीड यानें यास अभिचारानें म्हणजे मूठ मारून ठार केलें. यानें एकंदर ८ वर्षे ८ महिने राज्य केलें.

चंद्रोबेलब्बा—ही अमोघवर्ष राष्ट्रकूटाची मुलगी. ही बुतुग गंगास दिली होती. हिलाच अब्बलब्बे म्हणत असावेत.

चंपक—राजतरंगिणीकार कल्हणाचा पिता.

चंपकपा--हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं साठावा सिद्ध होय. हा जातीनें कहार असून चम्पादेशचा राहणारा. मीनपा याचा गुरु. यानें आत्मपरिज्ञान दृष्ट्युपदेश (तं. ४८-८६) हा ग्रंथ लिहिला.

चंपतराय—हा चंदेरीचा राजा रामचंद्रसा याचा चुलतभाऊ होय. हा महोबा येथें राज्य करीत होता. जहांगीर मरण पावल्यावर सर्व बुंदेले राजांनीं एकत्र होऊन दिल्लीपतीचें सार्वभौमत्व झुगारून देण्याचें ठरविलें. शहाजहाननें या वेळीं वाकीखान नामक सरदार याजवर पाठविला. परंतु चंपतरायानें अद्वितीय पराक्रम करून बादशाही फौजेस परतविलें. शेवटीं शहाजहाननें चिडून खानजहान लोदी, महाबदखान व अबदुल्ला अशा तिघांस यावर पाठविलें. तरीहि बुंदेल्यांनीं दाद न देतां मुसल-

मानी फौजेस जर्जर करून सोडलें. अखेर बादशहानें तहाचें बोलणें केलें. याच वेळीं यास कोंच परगणा जहागीर मिळाला; व उमरावांतहि जागा मिळाली. याच्याच पुढच्या पराक्रमानें औरंगजेब खूष होऊन त्यानें १२००० स्वारांची मनसबदारी यास बहाल केली, असें लाल कवि म्हणतो व पुढें लवकरच याचा त्यानें अपमान केला व आपल्याजवळून काढून टाकला. या अपमानाचा सूड घेण्यासाठीं यानें पुन्हां आपल्या सैन्याची जमवाजमव सुरू केली. परंतु बादशाही फौजेच्या अचानक हल्ल्यामुळें याचा नाइलाज होऊन हा धारातीर्थी मरण पावला. याचाच पुत्र छत्रसाल बुंदेला होय (मु. रि. भा. २ रा प्र. २५०).

चंपादे—एक हिंदी कवयित्री. बिकानेरचा राजा जो राजसिंह त्याचा भाऊ पृथ्वीराज त्याची ही दुसरी बायको होय. ही जैसलमेरचा राजा राव लहर याची मुलगी. हिनें हिंदींत कविता केल्या आहेत.

चाउही--एक चिनी प्रवासी. हा तिबेटमार्गे भारतवर्षांत आला होता. येथें आल्यावर महाबोधि संघारामांत व नालंदच्या विश्वविद्यालयांत यानें पुष्कळ वर्षे संस्कृत भाषेचें अध्ययन केलें. तेथून महायान सूत्रांचें अध्ययन करून हा दाववनसंघारामांत गेला व तेथें विनयपिटक व व्याकरणशास्त्र यांचें अध्ययन केलें. तेथेंच यानें तेथचा इतिहास चिनी भाषेंत लिहिला. याचा परलोकवासहि याच देशांत झाला. यानें हिंदुस्थानांत असतां श्रीदेव असें नांव धारण केलें होतें.

चाचा हितवृंदावनदास—(जन्म स. १७०७) एक हिंदी कवि. हा जातीचा गौड ब्राह्मण असून पुष्कर येथील राहणारा होता. हे राधावल्लभीय गोस्वामी हितरूपजींचे शिष्य होत. हे बहादुरसिंहाच्या आश्रयास असत. परंतु राजकुलांत तंटे होऊं लागल्यामुळें हे कृष्णगढ सोडून वृंदावनास आले; व अखेरपर्यंत तेथेंच राहिले. यांनीं एक लाखावर पद्यरचना केली असल्याचें प्रसिद्ध आहे, परंतु अद्यापपावेतों २०००० पदेंच फक्त उपलब्ध आहेत. त्यांत कांहीं छद्मलीलांचें वर्णन तर खरोखर अपूर्वच आहे. याची भाषारचनेवरील कसरत व अलंकाराचें तिला परिवेष्टण यांमुळें काव्य फारच चित्ताकर्षक वाटतें.

चाणक्य--(चंद्रगुप्त मौर्य पाहा).

चाफाजी टिळेकर— नारायणराव पेशव्यांचा खुनऱ्या. नारायणराव पेशव्यांच्या खुनाचे वेळीं हा त्यांना बांधण्याकरितां अंगावर पडल्यामुळें मारला गेला.

चामरस—(स. १४३० सुमार) कानडी कवि. मूळ ब्राह्मण होता, मग लिंगायत झाला. कुमार व्यास व हा यांची स्पर्धा होती. आपल्या आश्रयदात्या प्रौढदेवरायाच्या विनंतीवरून या दोघांनीं कानडींत महाभारत लिहिलें. त्यांत याचें काव्य अत्यंत सरस ठरलें. तेव्हां कुमार व्यासानें आपल्या पत्नीच्या म्हणजे याच्या बहिणीच्या द्वारा मत्सरानें याचा ग्रंथ नष्ट करवला. याला याचें उपास्य दैवत शिव स्वप्नांत आला व याला अन्य देवाची उपासना न करण्याविषयीं दृष्टान्त झाला. तेव्हां हंपी येथें विरूपाक्षमंदिरांत यानें वीरशैव धर्माची दीक्षा घेतली. नंतर प्रभुलिंगलीला नांवाचें काव्य कानडींत लिहिलें (अलंप्रभु पाहा). या ग्रंथामुळें याचें वर्चस्व राजसभेंत कुमार व्यासापेक्षां अधिक वाढलें, आणि शेवटीं तर याच्याकडूनच प्रौढदेवरायांनीं लिंगायतधर्माची दीक्षा घेतली, असें लिंगायत ग्रंथकार म्हणतात. तथापि याचें काव्य अत्यंत सरस आहे यांत शंका नाहीं. या प्रभुलिंगलीला ग्रंथाचें भाषांतर तेलगू व तामीलमध्यें काव्यरूपानें झालें आहे (क. क. च. भा. २ पा. ५९).

चामराज ओडीयार—(स. १६१७-३७) म्हैसूरच्या नरसराज ओडीयारचा हा पुत्र.

चामलादेवी कदंब—दुसऱ्या तैल कदंबाची पत्नी. हिचा पुत्र तैलप.

चामुंडमहाराज—(स. ११०० नंतर) एक जैन आचार्य. जिनसेनाचा शिष्य. यानें 'चारित्रसार' हा दिगंबर जैनांच्या दृष्टीनें मुक्तीचा मार्ग वर्णन करणारा ग्रंथ लिहिला (विंटरनिट्झ-हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर, भा. २).

२. (ग्रंथकाल स. १४९०) ज्वरतिमिरभास्कर या संस्कृत ग्रंथाचा कर्ता. यानें आपला ग्रंथ मेदपाठ ऊर्फ मेवाडच्या राजमल्ल गुहिलोताच्या आश्रयाखालीं लिहिला. याला कायस्थ चामुंड म्हणतात.

चामुंडराज सोळंकी—(स. ९९५-१००९) गुजराथच्या सोळंकी वंशांतील मूळराजाचा पुत्र. यानें माळव्याचा राजा सिंधुराज यास ठार मारलें आणि तेव्हांपासून या दोन घराण्यांत वैर सुरू होऊन त्यामुळें परस्परांचें फार नुकसान झालें. हा अत्यंत कामी होता म्हणून बाविणीदेवी (चाचिणीदेवी) नांवाच्या बहिणीनें याला पदच्युत करून याचा ज्येष्ठ पुत्र वल्लभराज यास गुजराथच्या सिंहासनावर बसवलें. याला वल्लभराज, दुर्लभराज व नागराज असे तीन पुत्र होते.

गझनीच्या महमूदानें सोमनाथपट्टणावर स्वारी केली तेव्हां चामुंडरायाची त्याजबरोबर लढण्याची तयारी नसल्यानें राजधानी मुलाच्या हवालीं करून हा अरण्यांत निघून गेला (रासमाला).

२. हा पश्चिम चालुक्य चवथ्या विक्रमादित्याचा सेनापति. हा वीर राजेंद्र चोलाकडून वेंगीच्या लढाईत मारला गेला.

चारित्रवर्धन—(ग्रंथकाल स. १३७२–८५ सुमार) हा विद्याधर अगर साहित्यविद्याधर या नांवानींहि प्रसिद्ध आहे. याच्या बापाचें नांव रामचंद्र भिषज असें होतें. यानें कुमारसंभव, नैषध, रघुवंश, राघवपांडवीय आणि शिशुपालवध यांवर टीका लिहिलेल्या आहेत.

यानें आपल्या टीकेंत पुष्कळ ग्रंथांचा व ग्रंथकारांचा उल्लेख केला आहे. त्यामध्यें 'दुर्घटवृत्ती' चा उल्लेख व उतारा यानें आपल्या कुमारसंभवावरील टीकेंत घेतला आहे. तेव्हां याच्या कुमारसंभवावरील टीकेचा रचनाकाल दुर्घटवृत्तीनंतर कांहीं वर्षांनीं असला पाहिजे. शरणदेवानें आपला 'दुर्घटवृत्ति' हा ग्रंथ स. ११७२ मध्यें लिहिला. यावरून याच्या कुमारसंभवावरील टीकेचा काल स. ११७२ च्या नंतर ठरतो.

दिनकराची रघुवंशावरील टीका ही चारित्रवर्धनाच्या रघुवंशावरील टीकेचाच संक्षेप (सारग्रंथ) होय, असें रा. नंदर्गीकर यांनीं म्हटलें आहे. दिनकरानें आपला स्वतःचा काल स. १३८५ असा दिला आहे.


चारित्रसुंदरगणि—हा जैन कवि पंधराव्या शतकाच्या मध्यांत झाला असावा. यानें 'महीपालचरित्र' हें महाकाव्याच्या धर्तीवरील व शीलदूत हें मेघदूताच्या धर्तीवरील काव्य, अशीं दोन काव्यें लिहिलीं. शीलदूताच्या समाप्तीचा काल यानें काव्याच्या शेवटीं दिला आहे. त्यावरून स. १४२० ठरतो (विंटरनिट्झ–हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर, भा. २).


चारुमती—सम्राट् अशोकाची मुलगी. ही आपल्या बापाबरोबर नेपाळांत यात्रेला गेली होती. ती परत न येतां तेथेंच संन्यासिनी बनून मठांत राहूं लागली. तिनें नेपाळांत एक देवपटना नांवाचें शहर आपल्या नवऱ्याच्या स्मरणार्थ वसविलें. तिच्या नवऱ्याचें नांव देवपाल क्षत्रिय असें होतें (Sketches from Nepal, Oldfield II, 198, 246–52).

(पूर्व) चालुक्य घराणें (वेंगीचें)—

१ (कुब्ज) विष्णुवर्धन १ ला (स. ६१५-६३३), २ जयसिंह १ ला वल्लभ (स. ६३३-६३), ३ इंदु भट्टारक (स. ६६३ सात दिवस राज्य केलें), ४ विष्णुवर्धन २ रा (स. ६६३-७२), ५ मंगी युवराज (स. ६७२-६९६), ६ जयसिंह २ रा (स. ६९६-७०९), ७ कोक्किली (स. ७०९), ८ विष्णुवर्धन ३ रा (स. ७०९-७४६), ९ विजयादित्य १ ला (स. ७४६-६४), १० विष्णुवर्धन ४ था (स. ७६४-९९), ११ विजयादित्य २ रा (स. ७९९-८४३), १२ (कलि)विष्णुवर्धन ५ वा (स. ८४३-८४४), १३ (गुणक)–विजयादित्य ३ रा (स. ८४४-८८), १४ चालुक्यभीम १ ला (स. ८८८-९१८), १५ विजयादित्य ४ था (स. ९१८), १६ अम्म १ ला (स. ९१८-२५), १७ (बेट)–विजयादित्य (स. ९२५), १८ युद्धमल्ल १ ला (स. ९२५), १९ विक्रमादित्य २ रा (स. ९२५), २० भीम (स. २२६-२७), २१ युद्धमल्ल २ रा (स. ९२७-३४), २२ चालुक्यभीम २ रा (स. ९३४-४५), २३ अम्म २ रा (स. ९४५-७०), २४ दानार्णव (स. ९७०-७३), २५ शक्तिवर्मन् (स. ९९९-१०११), २६ विमलादित्य (स. १०११-२२), २७ राजराज कुलोत्तुंग १ ला (स. १०२२-६३), २८ राजेंद्र (स. १०६३-१११२), २९ विक्रमदेव (स. १११२-२७), ३० कुलोत्तुंग २ रा (स. ११३४).

(पश्चिम) चालुक्य घराणें (बदामीचें)





चालुक्यभीम—(स. ८८८–९१८) पूर्व चालुक्य घराण्यांतील पहिल्या विक्रमादित्याचा मुलगा. स. ८८८ मध्यें हा विजयादित्यानंतर गादीवर आला. याला द्रोहांकुश अशी पदवी होती.

यानें राष्ट्रकूट राजा दुसऱ्या कृष्णराजाचा पराभव करून राष्ट्रकूट राजाकडून वेंगी परत मिळविली. स. ९१८ मध्यें याचा मुलगा विजयादित्य ४ था हा याच्यानंतर गादीवर आला (B.).

२. (स. ९३४–४५) पूर्व चालुक्य घराण्यांतील चवथ्या विजयादित्याचा हा मुलगा. स. ९३४ मध्यें हा, युद्धमल्ल २ रा यास हाकून देऊन, गादीवर आला. हा आपणास गंदमहेंद्र व विष्णुवर्धन सातवा असें म्हणवी.

यानें राजमार्तंड यास मारिलें व कंठिक विजयादित्य यास हांकून दिलें. त्याचप्रमाणें यानें चवथ्या गोविंद-राष्ट्रकूटाचा पराभव केला. इंद्रराज ३ रा याचा भाऊ अमोघवर्ष ३ रा हा याच्यानंतर गादीवर आला (B.).

चाल्हण पंडित—याला चाल्हेराज असेंहि म्हणत. हा फार विद्वान् असून याचा शिष्यसंप्रदाय फार मोठा होता. चक्रधर-नागदेव-भास्कराचार्य-नागांबा-कमळाकर-सीतांबा-चाल्हण-नृसिंह अशा याची परंपरा दिसते. याचे 'सत्त्वानुवाद,' 'ज्ञानप्रकाश' व 'शास्त्रसंबोधिनी-टीका' असे तीन ग्रंथ आहेत; हा चाल्हण पंडित स्वतःच्या ग्रंथरचनेपेक्षां आपला शिष्य जो नृसिंह त्याच्याच ग्रंथामुळें विशेष प्रसिद्ध आहे. या चाल्हणानें-किंवा चाल्हणाच्या नांवावर त्याच्या नृसिंह शिष्यानें-रचलेली एक श्रीमद्भगवद्गीतांटीका आहे. हिला चाल्हणसंकेत किंवा 'संकेतगीता' असें म्हणतात. हिच्यांत महानुभाव पंथाबाहेरील इतर टीकांचाहि उल्लेख आहे. असा उल्लेख महानुभाव पंथांत बहुतेक करीत नाहींत. नृसिंहाचें रुक्मिणीस्वयंवर शके १३२५ (स. १४०३) चै. शु. १५ ला लिहिलें. त्यावरून याच्या कालाचा तर्क होतो (म. वा. इ. २. ७४४).

२. (चक्रपाणी व्यास वर्धनस्थ पाहा).

चावडा—(वर्मलात पाहा).

चावुंडराज कदंब—(स. १०४८–४९) हा कदंब राजा होय, असें फ्लीट म्हणतो (इंडि. अँटि. १८७५ पा. १७९). सोमेश्वर प. चालुक्याचा मांडलिक म्हणून राज्य करीत होता.

चावुंडराय—(ग्रंथकाल स. ९७८) कानडी कवि. ब्रह्मक्षत्रियवंशांतील होता. हा गंगांपैकीं चवथ्या राजमल्लाचा (स. ९७४–८४) मंत्री आणि सेनापति व अजितसेनाचार्याचा शिष्य. नेमिचंद्र ऊर्फ सिद्धांत चक्रवर्तिनलाहि यानें गुरु केलें म्हणून उल्लेख केला आहे. श्रवणबेळगोळ येथें गोमटेश्वर नांवाचें यानें अपरिमित द्रव्यानें देऊळ बांधलें; व पुतळा उभारला. याला नागवर्मा नांवाचा भाऊ होता.

हा कवि होता, तसाच शूर होता. यानें गोविंदराजाचा पाठलाग केला व राचय्याला ठार केलें, अशी याची कीर्ति आहे. चामुंड शब्दाचा चावुंड हा कानडी उच्चार दिसतो.

ग्रंथ—चावुण्डरायपुराण (स. ९७८). यानें स्वतःच आपल्या ग्रंथावर टीका लिहिली आहे. त्यामुळें राजमल्लानें यास राम अशी पदवी दिली. याला अण्ण असेंहि म्हणत.

यांचें चावुण्डरायपुराण अथवा त्रिषष्टिलक्षणमहापुराण ग्रंथ प्रसिद्ध आहे. हें प्रायः गद्यरूप आहे. नृपतुंगाचे व त्यापूर्वीचे गद्य ग्रंथ कानडींत होते, पण त्यांपैकीं एकहि ग्रंथ उपलब्ध नाहीं. जुन्यांपैकीं उपलब्ध ग्रंथ चावुण्डाचाच होय. याच्या ग्रंथामुळें दहाव्या शतकांतील कानडी भाषा समजून येते (क. क. च. भा. १ पा. ४६).

चावुंडला कदंब—ही पहिल्या तैल कदंबाची पत्नी.

चाहमान—(स. ७००) चव्हाणाचा मूळ पुरुष. याला अनहिल असेंहि म्हणतात.

चांगदेव—(शके ११२८–स. १२०६) सुप्रसिद्ध लीलावतीकर्त्या भास्कराचार्यांचा हा नातू. हा सिंघण यादवाच्या पदरीं ज्योतिषी होता. याचा एक शिलालेख चाळीसगांवजवळ पाटण येथील भवानीच्या देवळावर आहे. या शिलालेखाच्या एकंदर २६ ओळी असून पहिल्या वीस संस्कृतांत व पुढील सहा मराठींत आहेत. यांत यानें आपल्या पूर्वीच्या नऊ पिढ्यांची माहिती दिली आहे व चांगदेवाच्या मठास दिलेलें दान नमूद केलें आहे. हा लेख ज्ञानेश्वराच्या पूर्वी ८४ वर्षांचा आहे.

२. हेमचंद्राचें पहिलें नांव.

चांगदेव ऊर्फ चांगा वटेश्वर—(समाधि स. १३२५) हे तापीतीरचे रहिवासी. खानदेशांत एदलाबादेजवळ चांगदेव नांवाच्या गांवीं यांचा जन्म झाला. तेथें चांगदेवाचें बांधलेलें देऊळ अद्यापि आढळतें. चांगदेव गांवाला पूर्वी सुंदरपूर म्हणत असें सांगतात. यांचें पहिले गुरु वटेश्वर व दुसऱ्या ज्ञानेश्वर महाराजांच्या भगिनी मुक्ताबाई. हे महायोगी होते; व योगबळानें समाधिस्थ होऊन हे मृत्युकाळ टाळीत. अशा पद्धतीनें हे चवदाशें वर्षे जगले होते असें वर्णन आढळतें. यांना अनेक सिद्धी अनुकूल होत्या. ज्ञानेश्वरांनीं रेड्याकडून वेद बोलविल्याची लोकोत्तर वार्ता यांच्या कानावर जाऊन यांना कौतुक वाटलें; व त्यांना यांनीं पत्र लिहिण्याचें योजलें. पण मायना तीर्थरूप लिहावा कीं चिरंजीव लिहावा हें न ठरून यांनीं कोरेंच पत्र शिष्याबरोबर पाठविलें. मुक्ताबाई आपल्या बाळपणानुरूप तें पत्र हातीं घेऊन म्हणाल्या कीं, 'चौदाशें वर्षे वांचून चांगदेव कोराचा कोराच राहिला.' यानंतर चांगदेव वाघावर बसून व हातीं सापाचा आसूड घेऊन ज्ञानेश्वरांदिकास भेटण्यास आळंदीस आले. ही भावंडें तेव्हां सहज भिंतीवर बसलीं होतीं. चांगदेव शिष्यांच्या जयघोषांत येतांच ज्ञानेश्वरांनीं भिंतीस 'चल बये' म्हणून आज्ञा केली. तों ती भिंत चालूं लागली. हा चमत्कार पाहतांच चांगदेव हतगर्व झाले. योगबळानें व्याघ्रसर्पासारख्या सचेतन प्राण्यांवर ते सत्ता चालवीत. पण अचेतन जड पदार्थांवरहि ज्ञानेश्वरांची सत्ता चालते हें पाहून चांगदेव त्यांना शरण गेले. ज्ञानेश्वर योगी असून आत्मनिष्ठ होते. केवळ योगाची अद्वैतानुभवापुढें मात्रा चालत नाहीं हें जाणून यांचा अभिमान गळाला व हे ज्ञानेश्वरांस शरण गेले. ज्ञानेश्वरांनीं यास 'चांगदेवपासष्टी' चा बोध केला तरी भक्तिमार्गातील सद्गुरुपण मुक्ताबाईकडेच गेलें. मुक्ताबाईनीं यास उपदेश केल्यामुळें ती माता व हे पुत्र अशी भावना होती. दोघांच्याहि अभंगांत ही गोष्ट व्यक्त झाली आहे.

याचे कांहीं अभंग आतांपर्यंत उपलब्ध होते; पण आतां तत्त्वसार नांवाच्या ओवीबद्ध ग्रंथाचा कांहीं भाग उपलब्ध झाला आहे. ग्रंथरचना काल शके १२३४ (स. १३१२) दिला आहे. ग्रंथरचनेचें स्थल हरिश्चंद्रगड हें नगर जिल्ह्यांतील अकोलें तालुक्यांतील हरिश्चंद्राचा डोंगर असावा. तत्त्वसारांत व चांगदेवपासष्टींत यांना चक्रपाणि म्हटलें आहे. याच्या या ग्रंथांत सिद्धपंथांतल्या योगसिद्धांचा नामावळि महत्त्वाचा आहे. ती ज्ञानेश्वरीतील परंपरेशीं जुळते. खेड्यापाड्यांतील ग्रामदेवतेच्या उत्सवप्रसंगीं 'चांगा भला' असा जयजयकार होत असतो. त्यांतील चांगा हा शब्द यांना उद्देशून आणि 'भला' हा शब्द सरस्वतीदेवीचा याच्यावर झालेल्या अनुग्रहाचा निदर्शक आहे असें तत्त्वसारांतील शारदास्तवनावरून वाटतें. असें असेल तर हे त्या कालचे सर्वांच्या आदरास पात्र झालेले महापुरुष होते हें उघड दिसतें. याचा समाधिशक १२४७ (स. १३२५) ज्येष्ठ शुद्ध ७ हा आहे. यांची समाधि पुणतांबें येथें गोदावरीच्या तीरीं आहे.

चांगा वटेश्वर, चांगा केशवदास आणि चांगा मरुद्गण हीं सर्व नांवें एकाच व्यक्तीचीं आहेत. चांगा वटेश्वर हें नांव गुरूच्या नांवाशीं संबद्ध आहे. चांगा केशवदास हें नांव वैष्णव झाल्यानंतरचें दिसतें. यानें स्थापन केलेल्या केशवराजाचें देऊळ अद्यापि पुणतांबें येथें आहे. तसेंच चांगा मरुद्गण हें नांव एका पौराणिक कथेशीं संबद्ध असल्याचें महीपतीनें आपल्या भक्तविजयांत दाखवले

आहे; आणि ती कल्पना चांगदेवाचे वंशज म्हणविणारे पुणतांब्याचे लोक मरुद्गण हें आडनांव लावीत असल्यामुळें सुचली असावी. आजहि मरुद्गण आडनांव तेथें चालू आहे. चक्रपाणि असें नांव चांगदेवाला उद्देशून चांगदेव-पासष्टींत वापरल्यासारखें दिसतें, पण तें नांव याचें होतें किंवा नाहीं, हें समजण्यास निश्चित साधन नाहीं. चांगा मुधेश मात्र याच्यानंतर दोनशें वर्षांनीं झालेला निराळा पुरुष आहे.

हा दर शंभर वर्षांनीं योग-सामर्थ्यानें जुना देह टाकून नवा देह धारण करी. अशीं याचीं चौदा समाधिस्थळें व चवदा नांवें कांहीं ठिकाणीं आढळतात.

चांगा मुधेश—(स. १५०५) नारायणडोह येथील एक कुलकर्णी मुधोपंत यानें सहकुटुंब तापी नदीतीरीं चांगदेव असतांना त्यांची सेवा केली. पुढें त्यांना चांगदेवाच्या वर-प्रदानावरून पुत्र झाला. त्याचें नांव चांगदेव ठेवलें. हाहि चांगदेवाप्रमाणेंच मोठा सिद्धपुरुष निपजला. विधवा स्त्रीस 'पुत्रवती भव' असा आशीर्वाद दिल्यावरून त्यानें तिच्या मृतपतीच्या अस्थींवर सिंचन केलेलें पाणी तिला प्यावयास देऊन तिला पुत्रप्राप्ति करून दिली. एका मुसलमान राजानें पंढरपुरास विठ्ठलमंदिराजवळ मशीद बांधली. लव-करच त्याची राणी मेली. तेव्हां यानें तेथें जाऊन असें सांगितलें कीं, मशीद पाडून टाकल्यास राणी जिवंत होईल. त्याप्रमाणें सर्व प्रकार घडून आला.

चांदखान—गुजराथचा सुलतान जो दुसरा मुज्फर, त्याचा हा पुत्र होय.

चांदबीबी—(स. १५४७-१५९९) ही विजापूरच्या अली आदिलशाहाची पत्नी व अहमदनगरच्या हुसेन निजामशाहाची कन्या.

चांदबीबी व अली यांचा विवाह झाल्यापासून विजा-पूरच्या बादशाहीचा चांगला उत्कर्ष झाला. हिनें आपल्या पतीस राज्यकारभाराच्या कामीं फार साहाय्य केलें. ही मूळची कुशाग्र, सद्गुणी व राज्यव्यवहारदक्ष होती. ही युद्धकलेंत चांगली निष्णात असून प्रत्येक स्वारीमध्यें घोड्यावर बसून आपल्या पतीबरोबर जात असे. हिला फार्सी, अरबी इत्यादि भाषांचें ज्ञान असून कानडी, मराठी इत्यादि भाषाहि समजत असत. संगीतशास्त्र व चित्रकला यांचीहि हिला चांगली माहिती होती.

स. १५८० त हिचा पति निपुत्रिक मरण पावला. मृत्यूपूर्वी त्यानें आपल्या बंधूचा मुलगा इब्राहीम यास गादीवर बसवून सर्व राज्यकारभार आपल्या पत्नीनें पाहावा अशी योजना केली होती. त्याप्रमाणें इब्राहीम यास गादीवर बसवून चांदबीबी सर्व कारभार हुशारीनें पाहूं लागली. पुढें हिच्या निरनिराळ्या प्रधानांनीं हिची मात्रा न चालूं देतां बंडें करण्याचा प्रयत्न केला; पण तो सर्व व्यर्थ गेला. एकदां प्रत्यक्ष विजापुरास हिच्या शत्रूंनीं वेढा दिला असतां तो हिनें आपल्या परा-क्रमानें परतविला.

पुढें अहमदनगरच्या गादीविषयीं तेथें तंटे सुरू झाले. मूर्तजा निजामशाहा हा आपल्या पुत्राकडून मारला गेला. परंतु पुत्र मिरान याचाहि पुढें लवकरच शिरच्छेद झाला. तेव्हां ही विजापुराहून अहमदनगरास आली. परंतु येण्या-पूर्वीच मिया मंजू नामक एका वजनदार मुत्सद्यानें शाहा-जादा मुराद यास मदतीस बोलावलें. तेव्हां मोगलांस कांहींतरी संधि पाहिजेच होती. त्यांनीं एकदम अहमद-नगरवर चाल केली. परंतु हिनें प्रसंगावधान राखून शाहाजादा मुराद याची कांहींएक मात्रा चालूं दिली नाहीं. मुराद हिच्या शौर्याची तारीफ करून व 'चांद-सुलताना' असा किताब देऊन परत गेला.

पुढें हिनें बहादुरशाहाचा पक्ष घेऊन व विजापुराहून मदत मागवून त्यालाच गादीवर बसवून त्याच्या नांवानें द्वाही फिरविली. पुढें कांहीं दिवस राज्यामध्यें शांतता झाली; आणि हिनें राज्यसुधारणेकडे लक्ष दिलें. पुढें अकबर बादशाह खुद्द मोठमोठ्या सरदारांसह नगरवर चालून आला. पण याहि खेपेस हिच्या प्रयत्नानें सर्व निजामशाही सरदार निकरानें लढले व मोगल सैन्याचा पराभव झाला. अबुल फज्ल यानें या घनघोर रणसंग्रामाचें विस्तृत वर्णन दिलें आहे.

स. १५९९ मध्यें दानियल हा प्रचंड सैन्यानिशीं पुन्हा नगरावर चालून आला. परंतु या खेपेस निजाम-शाही सरदारांत ऐक्य नांदत नव्हतें. त्यांनीं उलट चांद-बीबीवरच हल्ला केला. हमीदखान नामक पठाणानें हिचा राजवाड्यांत खून केला (स. १५९९). अर्थात् चांद-बीबीच्या मागें मोगलांस नगर जिंकून घेण्यास फारसा वेळ लागला नाहीं (ऐने-इ-अकबरी व बील).

चांद बोधला—(चंद्रभट व शेख मुहंमद पाहा).

चांद सुलतान—(स. १७०६-३८) देवगडचा प्रसिद्ध गोंड राजा स. १७०६ त वारल्यावर त्याचा मुलगा चांदसुलतान गादीवर बसला. याचे कारकीर्दीत नागपूर हें महत्त्वाचें ठाणें झालें. त्यामुळें नागपूर व आसपासचा

प्रदेश यांची एकदम सुधारणा झाली, व पुढें मराठ्यांच्या कारकीर्दीत तर नागपूर शहर फारच वाढलें. मोंगल अंमल या वेळीं मोडकळीस आला होता. त्यामुळें यानें मोगलांचाहि प्रदेश आपल्या अमलाखालीं आणला. वर्धा जिल्ह्यांतील पवनार हें एक महत्त्वाचें ठाणें होतें. तें यानें घेऊन वीस वर्षें आपल्या ताब्यांत ठेवलें.

कान्होजीशीं बेबनाव झाल्यावर रघुजी शंभर स्वारांनिशीं चांदसुलतानाकडे गेला. यानें रघुजीस ठेवून घेतलें. चांदसुलतान स. १७३८ मध्यें मरण पावला. मागें त्याच्या मुलांत गादीबद्दल तंटे झाले तेव्हां ह्याची बायको रतनकुवर ह्हिला रघुजीनें मदत केली (ना. प्रां. इ. ३०-६९).

चिक्कदेव--(स. १६७२-१७०४) म्हैसूर संस्थानांतील कैंपदेवराजाचा हा पुतण्या असून दोड्डदेवाचा मुलगा होय. माता--अमृतांबे.

हा स्वतः विद्वान् व शूर होता. यानें कानडी भाषेंत व संस्कृत भाषेंत अनेक ग्रंथ केले आहेत. हा संगीतज्ञहि होता. याच्या आश्रयास अनेक विद्वान् होते. तिरुमलार्य, सिंगरार्य, चिक्कुपाध्याय, होन्नम (स्त्री), शृंगारम्म (स्त्री), वेणु-गोपाळवरप्रसाद, तिम्मकवि, मल्लिकार्जुन, चितानंद कवि, मल्लरस हे सर्वच याचे आश्रित कानडींतील महत्त्वाचे ग्रंथकार आहेत.

यानें लिंगायतधर्म सोडून वैष्णवधर्म स्वीकारला. यानेंच तंजावरचा एकोजी (व्यंकोजी) राजा भोंसले याच्यापासून बंगलोर विकत घेतलें; व आणिक मुलूख मिळवून राज्य वाढविलें. यानें जमीनमहसुलाची पद्धति सुधारली व टपालाची नवी पद्धत सुरू केली.

हा आपल्या चुलत्याच्या बंदीशाळेंत तेरा वर्षे होता. यानें ऐतिहासिक साधनांचा संग्रह करून ठेवला.

हा कानडी कविहि होता. हा मेलुगोटेच्या नारायण (स्वामी)चा भक्त होता.

ग्रंथ—चिक्कदेवराजविजय (प्रार्थना), गीतगोपाल, भागवत, शेषधर्म, भारत.

पहिला ग्रंथ गद्य आहे. त्यांत मेलुगोटेच्या नारायणापाशीं प्रार्थना आहे; व श्रीवैष्णवमताचें सार आहे. याची भागवतावर कानडीमध्यें गद्यरूप टीका आहे. भागवताच्या टीकेला चिक्कदेवराजसूक्तिविलास असेंहि नांव आहे. भारताच्या शांतिपर्वापासून पुढील ग्रंथावर याची कानडींत टीका आहे. शेषधर्म ग्रंथावर याचीच टीका आहे.

पहिला व गीतगोपाळ हा ग्रंथ तिरुमलार्यानें करून याच्या नांवावर प्रसिद्ध केला. असावा गीतगोपालांत याचा पदसंग्रह आहे (क. क. च. भा. २ पा. ४५६).

चिक्करस—(स. १६४० सुमार) कानडी कवि. जैन. पिता–गिरिअप्पा, माता–तिम्मम्म.

ग्रंथ—सोण्णबेरेगौड याचें चरित्र.

हा सौण्णबेरेगौडाचा आश्रित होता. वरील चरित्रांस आपल्या चरित्रनायकानें संभाजीला जिंकल्याचें यानें लिहिलें आहे. तो आवतिनाडचा राजा व देवणापूरचा राहणारा होता (क. क. च. भा. २ पा. ५१३).

चिक्कराय आरविदु—(स. १६१४-१६१६) हा विजयनगरच्या दुसऱ्या वेंकटपति आरविदूचा मानलेला मुलगा. त्यानंतर कांहीं लोकांना यानें नोकरीवरून दूर केलें, तेव्हां जगरायानें बंड करून आपल्या भाच्याला गादीवर बसविलें आणि याला कैदेंत टाकलें. एकदां हा कैदेंतून पळून जात असतां हा पकडला गेला, तेव्हां जगरायानें याच्या वंशांतील लोकांची भयंकर कत्तल केली. त्यांत याचा मदतनीस एच्चम्मा नायक यानें एक वारस गुप्त रीतीनें सुरक्षित ठेवला आणि जगरायाचा पराजय केला. आणि सुरक्षित राजपुत्र रंगराय चवथा यास गादीवर बसविलें. यानें आत्महत्त्या केली (स. १६१६).

हा एका ब्राह्मण बाईचा मुलगा होय. विजयनगरच्या आरविदु घराण्यांतील दुसऱ्या वेंकटपतीचा मुलगा नव्हता, तेव्हां वेंकटाम्बा राणीनें एका ब्राह्मण बाईचा मुलगा आपसांत तडजोड करून आणला व तो आपल्यालाच झाला अशी कंडी पिकविली. त्याप्रमाणें बारसें वगैरे होऊन त्याचें नांव चिक्कराय असें ठेविलें. पुढें वेंकटराजानें याचें लग्न केलें, पण याला राजा मुलाच्या नात्यानें वागवीत नसे, राजा याला कधीं राजवाड्याबाहेर मोकळेपणानें जाऊं देत नसे, व शेवटीं याला राज्यहि मिळालें नाहीं, असा याचा इतिहास सांगतात.

चिक्कराय संगम—(स. १४२५ सुमार) विजयनगरच्या दुसऱ्या हरिहराचा हा ४ था मुलगा होय. याला बुक्क २ रा, विरूपाक्ष २ रा, देवराय १ ला, आणि जोम्मन असे चार भाऊ होते.

वरील चार भावांपैकीं बुक्क २ रा आणि देवराय १ ला हे दोघेच विजयनगरचे गादीवर आले.

चिक्कसंकण्ण—हा केलडीच्या सदाशिव नायकाचा मुलगा. याला दोड्डसंकण्ण नांवाचा एक भाऊ होता. पण तो सावत्र असावा.

हा आपला भाऊ दोड्ड संकण्ण याच्या नंतर गादीवर आला. यानें स. १६०३ पर्यंत राज्य केलें, असें सिवेल म्हणतो. यानें एकदां विजापूरचा सेनापति मझुलाखान

याचा पराभव केला, आणि आसपासच्या बऱ्याच राजांचा मोड केला होता.

चिक्कुपाध्याय—(स. १६७२) कानडी कवि. श्रीवैष्णव. गोत्र पौरुकुत्स. कृष्णयजुर्वेदी आपस्तंब शाखा. देवता-काञ्चीवरदराज. गांव-त्रिकदंबपूर (तेरणकांबी), पिता-रंगार्य, माता-नाचा, ग्रंथ-कमलाचलमाहात्म्य, हस्तिगिरीमाहात्म्य, कांचीमाहात्म्य इत्यादि यांनी अठ्ठावीस ग्रंथ केले आहेत.

हें घराणेंच कवि आहे. याचें मूळ नांव लक्ष्मीपति. पण चिक्कुपाध्याय या नांवानें याची विशेष प्रसिद्धी आहे. हा म्हैसूरचा राजा चिक्कदेवाचा मंत्री होता. हा विद्वत्तेचा चाहता, विद्वान्, उदार आणि मोठा चतुर होता.

याच्या ग्रंथांपैकी कांहीं गद्य, कांहीं पद्य व कांहीं चंपूरूप आहेत. याचीं तालबद्ध पदेंहि बरींच आहेत. जुन्या ग्रंथकारांत याच्याइतके ग्रंथ कोणींहि लिहिले नाहींत. शिवाय याचे ग्रंथ मोठेहि आहेत (क. क. च. भा. २. पा. ४६८).

चित्तखान—यानें विजापूरच्या अली आदिलशाहातर्फे विजयनगरच्या पेणुकोंडा राजधानीस वेढा दिला होता. त्या वेळीं जगदेवानें पराकाष्ठा करून राजधानीचें संरक्षण केलें; व मुसलमानांना वेढा उठवणें भाग पडलें. या वेढ्यांत चित्तखान हा कैद झाला.

चित्रभानु—बाणभट्टाच्या पित्याचें नांव.

चित्रमटिका—बंगालच्या पालराजांपैकीं मदनपालाची पत्नी. हिनें महाभारत ऐकवलें म्हणून एका ब्राह्मणास गांव दान दिलें (J. R. A. S. B. ६९. १.६६).

चित्रवर्मा—हा कुलूतदेशाचा अधिपति. हा मलयकेतूच्या बाजूस असतां चाणक्यानें याला द्रोही म्हणून मलयकेतूकडूनच ठार केलें. कुलूत देश म्हणजे दक्षिण हिंदुस्थानांतील (मुद्राराक्षस नाटक) चंद्रगुप्त मौर्याला मगधसाम्राज्य मिळवून देणाऱ्या साहाय्यकांपैकीं एक देश असावा.

चित्रावघराणें—(शिवरामभट चित्राव पाहा).

चिदंबरदास—(राजाराम पाहा).

चिदंबर दीक्षित—(जन्म स. १७५८) पेशवाईच्या अखेरीस कर्नाटकांत गुर्लहोसुर (कानडी 'गरु होस ऊर' गुरुराव्याचें नवें गांव) येथें या नांवाचे सिद्ध पुरुष होऊन गेले. हे शुक्ल यजुर्वेदीय काण्वशाखेचे ब्राह्मण असून यांच्या बापाचें नांव मार्तंड व आईचें नांव लक्ष्मीबाई असें होतें. यांचा जन्म शके १६८० कार्तिक वद्य ६ या दिवशीं झाला.

लहानपणापासून यांनीं लोकांना चमत्कार दाखविण्यास सुरुवात केली. यांना सरस्वती व सावित्री नांवांच्या दोन बायका होत्या. सहा मुलगे व एक मुलगी अशीं सात अपत्यें झालीं. मुरगोड येथें मोठी पाठशाळा स्थापन करून कांहीं वर्षें घालविल्यावर तळरकर देसायाच्या कांहीं प्रकरणावरून, मुरगोड येथें एक ब्रह्महत्या झाल्यामुळें, तात्काळ मुरगोडचें ठाणें उठवून चिदंबर महाराज तेथून बारा मैलांवर मलप्रभेच्या कांठीं जाऊन राहिले. त्यासच गुर्लहोसुर म्हणतात. पेशवे, रास्ते, गोखले व इतर सरदार चिदंबर दीक्षितांच्या सेवेंत येऊन राहत असत. त्यांनीं आपणासाठीं बांधलेले मोठमोठे वाडे अद्यापि तेथें दिसतात. निपाणीकर, नरगुंदकर वगैरे संस्थानिकहि चिदंबर प्रभूचे एकनिष्ठ शिष्यभावानें वागणारे सेवक झाले (महाराष्ट्रकविचरित्र भा. ५, पृ. १४८-१५१).

हे बापू गोखल्यांचे गुरु असून यांची समाधि गुर्लहोसूर येथें आहे. यांनीं निजात्मबोध नांवाचा ग्रंथ लिहिला व कांहीं पदें रचिलीं.

चिदानंद—हे पूर्णानंदशिष्य. गुरूंनीं यांच्या विनंतीवरून 'अवधूतगीता' रचिली. यांचें पूर्वीचें नांव बल्लाळ. कुशक्षेत्रांचे राहणार. पितृपरंपरा अशीः गणेश-गोविंद-बल्लाळ (चिदानंद). पूर्णानंद पाहा (सं. सू.).

चिदानंदस्वामी—एक साधुकवि. सांवतवाडी संस्थानांतील तेंडुली गांवीं हे राहत असत. तेथें यांची समाधि आहे. हे कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण होते. यांची गुरुगीतेवर 'स्वानंदलहरी' नांवाची ओवीबद्ध टीका आहे (ले. काल श. १६७४). हे शके १६३० मध्यें जन्मले व ८० वर्षांचे होऊन वारले. यांनीं अनेक ग्रंथ केले पण ते सर्व जळाले. चिदानंदलहरी छापून प्रसिद्ध आहे (महाराष्ट्रकविचरित्र, भा. ३, पा. १२७-१३६).

चित्-सुखाचार्य—हे श्रीमत्शंकराचार्यांच्या शिष्यांतील एक होत. यांची 'चित्सुखी' नांवाची टीका प्रसिद्ध आहे.

चिद्घनस्वामी—अचलबाबांचे शिष्य.

चिद्विलास—शंकराचार्यांचे एक शिष्य.

चिन्नतिम्म—हा विजयनगरच्या रामराय आरविदूचा मुलगा होय. हा रामरायास कोंडम्मा राणीपासून झाला. रायचूरच्या किल्ल्यांत यानें आपला जम चांगला बसविला

होता. याला कोंद नांवाचा एक भाऊ होता. तो अनेगोंदीचा सुभेदार होता. तिम्माचे कांहीं शिलालेख प्रसिद्ध आहेत. हा रायचूरचा सुभेदार होता.

चिन्नदेवी--विजयनगरचा पहिल्या कृष्णदेवरायाची ही बायको. व्यंकटाद्रीच्या राज्याभिषेकाच्या वेळीं कांहीं स्वतंत्र हक्क हिला पाहिजे होते. हिच्या पासून झालेल्या मुलीचें लग्न कृष्णदेवरायानें तिरुमल्लाशीं लाविलें होतें.

चिन्नबोम्म नायक—याच्या पित्याचें नांव चिन्नवीर. वेलोर येथील हा एक नायक होय. हा विजयनगरच्या आरविदु घराण्यांतील दुसऱ्या वेंकटपतिदेवरायाच्या कारकीर्दीपर्यंत जिवंत होता. यानें एक मोठा समारंभ करून अप्पय्य दीक्षितांना शिष्यवृत्ति दिली.

याचा मुलगा लिंगमा हा याच्यानंतर वेलोरच्या गादीवर आला. याच्या बापाचें नांव विरण्णा नायक असें होतें.

अप्पय्या दीक्षिताच्या शिवार्कमणिदीपिका ग्रंथाच्या शेवटीं चिन्नवीराचा पुत्र चिन्नबोम्म हा अप्पय्या दीक्षिताचा आश्रयदाता होता, असें सांगितलें आहे. याच्या शिलालेखाचे काल श. १४७१ व १४८८ आहेत (इंडि. ॲंटि., व्हा. १३, पा. १५५; एपि. इंडि. ३. २३८).

चिन्नभट्ट—यानें केशवमिश्राच्या 'तर्कभाषा' या ग्रंथावर टीका लिहिली आहे.

यानें आपली वरील टीका, विजयनगर येथील पहिल्या बुक्काचा भाऊ हरिहर, त्या हरिहर राजाच्या कारकीर्दीत लिहिली. यावरून याच्या टीकेचा रचनाकाल स. १४ व्या शतकाच्या पूर्वार्धांत येतो.

चिन्नविरन्ना—हा एक तेलगू कवि होय. तेन्नाली येथील हा कवि कोंडवेडु येथील अन्नवेम्मारेड्डी राजाच्या वेळीं उदयास आला.

याचा वडील भाऊ पेद्दविरन्ना नांवाचा होता. हे दोघेहि बंधु प्रत्यहीं दरबारांत जात असत. एकदां राजानें अशा अवघड विषयावर कवित्व करण्यास सांगितलें कीं, तशा विषयावर त्यापूर्वी कोणाहि कवीनें कवित्व केलें नव्हतें. पेद्दविरन्नानें एकदम थोडक्या अवधींत कवित्व करण्याचें कबूल केलें. पुढें घरीं आल्यावर आपल्या बायकोकडून चिन्नाला ही हकीकत कळविली. चिन्नानें देवीची प्रार्थना केली. तिनें चिन्नविरन्नासाठीं पांच सर्गांचें उत्तम काव्य लिहिलें. शेवटच्या पांच ओळी बाकी राहिल्या. पुढें ते पांच श्लोक पेद्दविरन्नानें करून तें काव्य राजाला अर्पण केलें. त्या दिवसापासून चिन्नविरन्नाची कवित्वाविषयीं चोहोंकडे ख्याती झाली (परशा-तेलगु वाङ्मय).

चिन्नवीर--चिन्नपोम्माचा पिता.

चिन्नव्यंकट—(व्यंकट ३ रा) विजयनगरच्या रामरायाजा हा नातू असून श्रीरंगरायाचा मुलगा होय. याला पेद्द व्यंकट नांवाचा एक भाऊ होता श्रीरंगरायाला हा लक्ष्मम्मा बायकोपासून झाला.

चिन्नसंकण्ण नायक--(स. १५६०-१५७०) हा इक्केरीच्या केळडी घराण्यांतील सदाशिव नायकाचा मुलगा.

चिप्पड जयापीड कर्कोटक(काश्मीर)--ललितापीडाचा अल्पवयी मुलगा. याचा मामा उत्पल व मम्म हे याचा कारभार पाहत. यालाच बृहस्पती म्हणत असावेत. दोन प्रधानांचे विरोधांत हा पदच्युत झाला.

चिमण कवि--(स. १८१३-७२) अकुळनेरचा मराठी कवि. हंसपद्धति ग्रंथाचा कर्ता.

चिमणलाल—पेशव्यांचा कलकत्त्याचा वकील. सेवकरामाचा पुत्र.

चिमणाजी कक्काजी भोसले— हा कक्काजी भोसल्याचा (भांबोरे येथील) थोरला मुलगा होय. याला आप्पासाहेब या नांवाचा एक भाऊ होता.

हा मोठा कर्ता व स्वभावानें भोळा होता. हा कोंकणांत लेकीस भेटण्याकरितां गेला असतां तेथेंच वारला, असें सांगतात. याला राघोजी ऊर्फ रावसाहेब व आबासाहेब या नांवाचे दोन मुलगे होते (मं. सप्तम सं. वृ. श. १८४१ पृ. ६९).

चिमणाजी दामोदर मोघे—(मृ. स. १७३१ सुमार) हा कोंकणांतील हरिहरेश्वराचा राहणारा. याच्या घराण्यास रिंगणवांवकर जहागीरदार असें म्हणतात. ताराबाईच्या वेळेस हा उदयास आला. शाहूनें यास आपणाकडे घेऊन पंडित राजाज्ञा हें पद दिलें. शाहूला सोडण्यापूर्वीपासून याचा शाहूशीं संबंध असावा. याचा व बाळाजी विश्वनाथाचा विशेष घरोबा होता. पेशवे मोघ्यास चिरंजीव लिहितात. स. १७२४ मध्यें शाहूनें यास निजामावर पाठविलें. याच साली झालेल्या सारंगपूरच्या लढाईत हा हजर होता. पण पुढें शाहूशीं याचा बेबनाव होऊन हा कोल्हापूरच्या संभाजीस मिळाला व तेथें याला कांहीं काल मुख्य मंत्र्याचें पद मिळालें (स. १७२९). डभईच्या लढाईत हा दाभाड्यातर्फे लढत असतां पाडाव झाला व याचा सरंजाम जप्त करण्यांत आला. तीन गांवें जहागिरीदाखल ठेवण्यांत आलीं. याचा पुत्र बळवंतराव; तोहि राजकारणांत वावरत होता (म. रि. म. २ व ३).

चिमणाजी नारायण पंतसचीव—(स. १७३७–१७५७) यांचा जन्म स. १७१३ त झाला. हे शंकराजी नारायणाचे दत्तक पुत्राचे पुत्र होत. यांस नारोशंकरनें दत्तक घेतलें. यांचे स्वभावाबद्दल व योग्यतेबद्दल लोकमत फार चांगलें होतें. यांनीं संस्थानची गादी नेऱ्याहून वाडा जळाल्यामुळें भोरास स. १७४० मध्यें आणली. भोरचे पंतसचीव म्हणण्याची प्रथा या वेळेपासून पडली. यांची कारकीर्द सुखाची गेली. चिमणाजी नारायण हे भोर येथें स. १७५७ त निवर्तले.

चिमणाजी बापूजी—(बाबाजी बापूजी मुद्गल पाहा).

चिमणाजी रखमांगद चिटणीस--(मृ. स. १७८०) हा रखमाजी गणेश चिटणिसाचा मुलगा. या घराण्याचें मूळ आडनांव रणदिवे होतें. सर्व सुभ्यांवर चिटणिशीचे कामावर या घराण्यातर्फे कारकून जात असत.

हा जानोजी भोंसल्याचे वेळेस चिटणिसीच्या कामावर होता. पेशव्यांनीं जानोजीवर स्वारी केली असतां जानोजीनें चिमणाजी रखमांगद यास पेशव्यांची समजूत करण्यासाठीं पुण्यास पाठवलें होतें.

हा देवाजीपंताचे पक्षाचा असल्यामुळें जानोजीचे कारकीर्दीचे अखेरीस जेव्हां देवाजीपंतावर जानोजीची गैरमर्जी झाली तेव्हां त्यानें ह्याला जबर दंड ठोठावला.

जेव्हां कांहीं पठाणांनीं मुधोजी भोंसल्यावर पैशासाठीं हल्ला केला, तेव्हां चिमणाजी त्याजबरोबर होता. यानें पठाणांशीं झटापट केली.

स. १७८० त चिमणाजी रखमांगद मरण पावला; व त्याचे जागीं त्याचे मामाचा मुलगा कृष्णराव माधव हा चिटणीस झाला (ना. प्रां. इ.).

चिमणाजी रघुनाथ पंतसचीव ऊर्फ धाकटे नानासाहेब—(स. १८३६–१८७१) यांचा जन्म १८३३ मध्यें झाला. हे तिसऱ्या वर्षी गादीवर आले. यांचें पालनपोषण व राज्यकारभार यांच्या मातोश्री गंगाबाई यांनीं केला. सातारचें राज्य नष्ट झाल्यामुळें सचिव १८४८ त इंग्रजांचे प्रत्यक्ष मांडलिक झाले. शंकराजी नारायणानंतर यांचीच कारकीर्द संस्मरणीय झाली. रामबागेच्या ओढ्यास धरण व पाणीव्यवस्था, आगीच्या वेळीं मदत, जळालेल्या राजवाड्याचें बांधकाम, नदीघांट, रस्ते, सरकारी इमारती व चावड्या, मामलेदार, फौजदार व मुन्सफ यांची नेमणूक व मोठा दानधर्म यांमुळें यांची कारकीर्द फारच सुखावह गेली. याच वेळीं राणीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. त्यामुळें संस्थानिकांस नवीन सनदा देऊन त्यांचे मुलखावरील हक्क व दत्तक घेण्याचा हक्क मान्य करण्यांत आला. ३९ व्या वर्षी हे वारले. हे उदार, हौशी व करारी होते.

चिमणाजी शंकरराव ऊर्फ नानासाहेब पंतसचीव—(राज्यकाल स. १७९८– १८२७) यांचा जन्म १७९१ त झाला. हे भोरच्या गादीवर ८ व्या वर्षी आले. नजराणा बराच मोठा भरावा लागला. खजिना रिकामा असल्यामुळें यांस वाठारच्या निंबाळकराकडून कर्ज काढावें लागलें. यांत व मातोश्री ताईसाहेब यांत वैमनस्य होतें. फौजबंद निंबाळकरानें दुहीचा फायदा घेऊन सचिवांस कैद केलें व भोरास घाशीराम कोतवाली गाजविली. रावबाजीनें बापू गोखल्याकडून सचिवांची सुटका केली व निंबाळकरास हाकून लावलें. यांचे कारकीर्दीत इंग्रज व पेशवे यांच्या लढाया झाल्या. स. १८१८ त रावबाजी पुणें सोडून पळाले तेव्हां हेहि त्यांबरोबर होते. लवकरच हे इंग्रजांस मिळाले. यांस पुत्रसंतान नव्हतें. सापत्न बंधु वामनराव यांचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव रघुनाथ चिमणाजी ठेविलें. हे स. १८२७ त निवर्तले.

चिमाजी आपा—(जन्म स. ? मृत्यु स. १७४० डिसेंबर १७) हा बाळाजी विश्वनाथाचा दुसरा मुलगा. दमाजी थोराताच्या कैदेंत हा बापाबरोबर कांहीं दिवस होता (स. १७१३). बापाबरोबर हा दिल्लीस गेला होता (स. १७१८-१९). पेशवाई मिळाल्यानंतर थोरल्या बाजीरावानें मोगलांच्या विरुद्ध चढाईचें धोरण स्वीकारलें, तेव्हां हा माळवा प्रांतांत मुलूखगिरीवर होता. तेथें हा उदाजी पवाराचा दिवाण म्हणून कांहीं दिवस काम करीत असे. तेव्हांपासून हा मोहिमावर जातीनिशा जाऊं लागला. आजपर्यंत अशी समजूत होती कीं, यानें गिरिधरबहादुरला सारंगपूरच्या लढाईत मारलें, पण आतां असें ठरलें आहे कीं, त्याला स. १७२८ च्या डिसेंबरांत यानें आमझरा येथें मारिलें (पे. द. १३. १५ –१६). आमझरा हें ठिकाण माळव्यांत मांडवगडाजवळ आहे. हीच याची पहिली लढाई होय.

यानें गुजराथ प्रांताची चौथाई कायम करून घेण्याकरितां स. १७२९ च्या पावसाळ्यानंतर स्वारी केली. यानें तडफेनें प्रांत काबीज करून खंडणी घेण्यास सुरुवात केली. आणि शेवटीं मराठ्यांच्या तडाख्यांतून सुटण्याकरितां सरबुलंदखानानें चौथाई सरदेशमुखीचे हक्क करार करून दिले. ही गोष्ट ता. १७–१०–१७२९ पूर्वी झाली.

नंतर माळव्याचा सुभेदार दयाबहादूरावर दोन स्वाऱ्या करून त्याला तिरलाच्या लढाईत यानें ठार केलें आणि माळवा हस्तगत केला (स. १७३०-३१).

यानंतर शाहूच्या आज्ञेनें सिद्दी सातावर कोंकणांत चालून गेला; आणि त्याला यानें ठार केलें (स. १९-४-१७३६).

मराठ्यांचें निजामाशीं युद्ध सुरू असतां हा निजामाला पायबंद घालण्याकरितां तापीतीरावर फौजबंद होऊन सज्ज होता.

यापुढें वसईच्या युद्धांत हा प्रमुख होता. पोर्तुगीज व मराठे यांचा बेबनाव स. १७३१ पासून असला तरी स. १७३७ मध्यें हें प्रकरण अगदीं निकरावर आलें. पोर्तुगीजांचा धार्मिक जुलूम हें या लढाईचें मुख्य कारण आहे. शिवाय पोर्तुगीजांचें चढाचें धोरण हेंहि या युद्धाचें कारण होय. या युद्धाची उठाबणी गंगाजी नाईक अणजूरकर व अंताजी रघुनाथ कावळे यांनीं केली. स. १७३७ मार्च २७ ला मराठ्यांनीं ठाण्याचा किल्ला घेतला. तेथील तोफांचा आवाज यानें बदलापुरावर ऐकला. पण भोपाळच्या लढाईमुळें इकडे पुनः दुर्लक्ष झालें. पण स. १७३७ च्या नवंबरांत पुनः जोराची मोहीम सुरू झाली. आणि माहीम काबीज झाल्यावर खानदेशांतून चिमाजी स्वतः येऊन लढाईत सामील झाला. पोर्तुगीज सेनापति पेड्रोमेलो यानें ठाण्यावर अचानक हल्ला केला, पण त्यांत तो मारला गेला (स. ६.१२.१७३८). या वेळीं मल्हारराव होळकरासुद्धां बहुतेक सरदार लढाईत सामील झाले होते. एकापुढें एक ठाणीं घेत मराठ्यांनीं तारापूरचें ठाणें शर्थीनें लढून घेतलें. तेथें बाजी भिमराव रेटरेकर पडला (ता. ८.१.३९). पुढें तीन महिने निकराची लढाई झाल्यावर वसईचा किल्ला ताब्यांत आला (ता १३ मे १७३९).

शेवटीं यास क्षयाचें दुखणें लागलें. वसई ताब्यांत तर येईना. तेव्हां यानें सरदारांना बोलावून सांगितलें; ' वसई ताब्यांत येत नाहीं. माझा हेतु वसई घ्यावी असा आहे. तरी तोफ डागून माझें मेलेलें शरीर तरी वसईच्या किल्ल्यांत पडेल असें करा.' तेव्हां वीरश्रीनें सर्वांनीं किल्ल्याचे बुरुज उडविले आणि वसईच्या किल्ल्यावर मराठ्यांचें निशाण फडकलें (काव्येतिहाससंग्रह प. या. ४९६).

या लढाईमुळें यांचें नांव अजरामर झालें आहे. मराठ्यांच्या महत्त्वाच्या व अत्यंत जुटीनें केलेल्या लढाईपैकीं ही एक लढाई होय. यांत मराठ्यांना फिरंग्याचा ३४० गांवें असलेला पाऊणशें मैल लांबीचा पट्टा, २० किल्ले व २५ लाखांचा दारूगोळा वगैरे साहित्य मिळालें. इतक्यांत बाजीराव वारल्याची बातमी आल्यामुळें हा पुण्यास आला आणि बाजीरावाचा धोरला मुलगा साताऱ्यास नेऊन यानें त्याला पेशवाईचीं वस्त्रें देवविलीं. त्याच वेळीं वसई जिंकल्याबद्दल याचा सन्मान करण्यांत आला.

पुढें स. १७४० मध्यें यानें दीव व दमण यांमधील रेवदंडा नांवाचें ठिकाण ताब्यांत घेतलें आणि वसईचा सर्व किनारा ताब्यांत घेऊन फिरंग्यांना गोव्यांत फक्त ठेवलें. तेथून परत आल्यावर याची आधींच ढासळलेली प्रकृति वाऱ्यानें अधिकच ढासळली आणि ता. १७-१२ १७४० रोजीं हा मृत्यु पावला.

याची पहिली बायको रखमाबाई. तिला ता. ३-८-१७३० रोजीं सदाशिवराव हा मुलगा झाला आणि ता. ३१-८-१७३० रोजीं पुणें येथें ती वारली. नंतर यानें दुसरें लग्न ता. ९-१२-१७३१ रोजीं केलें. तिचें नांव अन्नपूर्णाबाई. तिला बयाबाई नांवाची मुलगी झाली. ती गंगाधर नाईक ओंकारास दिली होती (ता. १४-४-१७४५). अन्नपर्णाबाई याच्याबरोबर सती गेली. तिचें वृंदावन पुणें येथें ओंकारेश्वराच्या दारासमोर आहे.

हा धोरल्या बाजीरावापेक्षांहि कांहीं बाबतींत श्रेष्ठ होता. बाजीरावास पेशवाई मिळाली तेव्हां यास त्याची मुतालिकी मिळाली होती. हा शूर, धोरणी, मनमिळाऊ व नीतिमान् होता. वसईच्या किल्ल्यांत सांपडलेल्या फिरंगी सरदाराच्या मुलीस यानें सन्मानानें परत पाठविलें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. शाहू व इतर सरदार याच्या मध्यस्थीनें बाजीरावाकडील कामें उरकून घेत. बाजीरावानें उत्पन्न केलेल्या अनेक प्रकरणांचा हाच निकाल लावी. याला गुजराथी लोक चिमणराजा म्हणत असत.

२. (जन्म स. ३०-३-१७७४, मृत्यु स.९-६-१८३०) हा रघुनाथराव पेशव्यांचा औरस पुत्र. याला सवाई माधवरावाच्या विधवा बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन पेशवाई चालविण्याचा नाना फडणीसाचा विचार होता. हें दत्तविधान म्हणजे सुनेच्या मांडीवर सासऱ्यानें दत्तक बसणें होतें. असें दत्तविधानहि आपटे वगैरे तत्कालीन शास्त्री लोकांची संमति मिळून झालें.पण हा पेशवा औट घटकेचाच झाला. याचें चरित्रहि हृदयद्रावक आहे (म. रि. उ० ३, पा. ५६४-६६).

चिमाबाई भोसले—मुधोजी भोसल्यांची बायको. नानाशीं तह करण्याकरितां मुधोजीनें दिवाकरपंतास पुण्यास पाठविल्यावर त्यानें बिंबाजीची समजूत काढण्याकरितां आपली बायको चिमाबाई हिची रवानगी केली. हिनें रायपुरास जाऊन बिंबाजीची समजूत केली,

व त्यास थांबविलें. स. १७९८ त चिमाबाई ही आपला मुलगा व्यंकोजी याजबरोबर जगन्नाथाचे यात्रेकरितां कटक प्रांतांत गेली. एक वर्षभर त्यांनीं तेथेंच मुक्काम केला व त्या प्रांतांत अव्यवस्था झाली होती ती मोडून टाकली. स. १७९० त ही दु. रघुजीच्या बरोबर गोदावरीच्या यात्रेस गेली होती. व पुन्हां स. १८०१ सालीं ही त्याजबरोबर याच यात्रेस गेली होती. स. १८०७-८ चे सुमारास हिनें व्यंकोजीबरोबर नर्मदेच्या उगमाजवळ अमरकंटकची यात्रा केली. स. १८१०-११ मध्यें व्यंकोजी काशीयात्रेस गेला असतां त्याजबरोबर हीहि गेली होती, असें बखर पान १८१ मध्यें लिहिलें आहे; परंतु चिमाबाई ही अगोदरच मरण पावल्यामुळें हें विधान चुकीचें दिसतें.

हिला रघूजी, खंडोजी ऊर्फ चिमणाबापू व व्यंकोजी ऊर्फ मन्याबापू असे तीन मुलगे होते व बाळाबाई, ठकूबाई व झिंगराबाई अशा तीन मुली होत्या (ना. प्रां. इ.).

चिंतामणराव पटवर्धन—(मृत्यु स. १८५१) सांगली संस्थानांतील पांडुरंगरावाचा मुलगा.

हेच खरे सांगली संस्थानचे संस्थापक होत. खर्ड्याच्या लढाईत हे हजर होते. याशिवाय यांनीं पुष्कळ कामगिऱ्या केल्या व आपलें नांव चांगलेंच प्रस्थापित केलें. यांच्याच वेळीं पटवर्धन घराण्यांत वांटण्या होऊन मिरज व सांगली हीं संस्थानें निर्माण झालीं.

चिंतामणि—पद्यसंग्रहावरून यांचे गुरु गोविंद होतेसें दिसतें. दैवत नरहरी. यांनीं मोरोपंतांस नमन केलें आहे. ग्रंथ–गोपीचंदाख्यान, सीतास्वयंवर, अभंग, पदें (सं.सू.).

चिंतामणि त्रिपाठी—(जन्म स. १६०८) हिंदी कवि. पिता रत्नाकर त्रिपाठी. हा भूषणचा भाऊ. यास बाबू रुद्रसाही, शहाजहान व जैनदी मुहंमद यांनीं आश्रय दिला. ग्रंथ–कविकल्पतरु, छंदविचार, काव्यविवेक, काव्यप्रकाश, रामायण. हा नागपूरच्या मकरंदशाहाचा आश्रित होता. याला मणिमाल म्हणत.

चिंतामणि दीक्षित—(स. १७३६-१८११ सुमार) हा ज्योतिषी पेशवाईत होऊन गेला. यास पेशवाईत १२५ रुपये दक्षिणा होती. याचें वसतिस्थान सातारा होय.

यानें सूर्यसिद्धांताची सारणी केली आहे आणि गोलानंद नांवाचा वेधयंत्राचा ग्रंथ शक १७१३ मध्यें केला आहे.

याचे वंशज सध्यां सातारा येथें आहेत. याचें गोत्र वत्स, पित्याचें नांव विनायक आणि पूर्वजांचें वसतिस्थान चिपळूण होतें (भा. ज्यो.).

चिंतो अनंत देवस्थळे—हा रघुनाथराव पेशवे [illegible] मदतनीस होता.

माधवराव व जानोजी भोसले यांच्या तहाच्या अटी ठरवण्यासाठीं यास व चिंतोपंत रायरीकरास पाठवलें होतें (ना. प्रां. इ.)

चिंतो चिमणाजी—एक बंडखोर ब्राह्मण. यानें सिकंदर आदिलशाहाच्या कारकीर्दीत बंड केलें.

चिंतो विठ्ठल रायरीकर—(मृत्यु स. १७८१) हे देशस्थ ऋ. ब्राह्मण घराणें. मुठे खोऱ्यांतील रायरीचे जोशी. सखारामबापूंचे वशिल्यानें मोरो विठ्ठल व चिंतो विठ्ठल या बंधूंचा प्रवेश दादाकडे होऊन त्यांच्याच पक्षाकडे हे सर्व काळ राहिले.

माधवरावास दादानें कैद केल्यावर चिंतो विठ्ठलास फडणिसी दिली, तीं माधवरावानें राक्षसभुवनानंतर काढून पूर्ववत् भानूंकडे सोंपविली. तरी पण दादांचा कारभार चिंतो विठ्ठलच पाहत असे. घोडपच्या लढाईत मोरो विठ्ठल मारला गेला, व चिंतो विठ्ठलाचा पाडाव झाला. हा किल्ले नगर येथें अटकेंत होता (मा. रो. २ पृष्ठ २४०). नारायणरावाचे वधानंतर याची सुटका होऊन पुनः याचें माहात्म्य वाढलें. परंतु यास रघुनाथराव दादाची बाजू सावरतां आली नाहीं. इंग्रजांचा पराभव होऊन दादा ठिकाणीं बसल्यावर ता. १९-४-१७८० रोजीं महादजीनें चिंतोपंतास गुजराथेंत पकडून उज्जनीस रवाना केलें, तेव्हांपासून हा बहुधा मरेपर्यंत बंदींतच होता. याची जिंदगीहि सर्व जप्त झाली.

'चिंतोपंत पळून गेले होते ते उज्जनींत एका ब्राह्मणाचे घरीं लपून राहिले. शोध करतां सांपडले. त्यांस व आणखी तिघांस अलंकार भूषणें घालून पुण्यास रवाना करितों. त्यांची बायको व लोक विष खाऊन मेली. दोघे कारकुनास मार दिला, ते मेले. पाटिलबाबांनीं त्यांचे पांच सहा बारगीर व एक कारकून मारिला. चिंतोपंतांचे पायीं बेड्या आहेत. अन्न खात नाहींत.' (१८-१०-१७८०).

'चिंतो विठ्ठल कैदेंत असतां किल्ल्यावर संन्यासी वारले' असा उल्लेख शकावलींत स. १७८१ चा आहे. याच्या कुटुंबाची स्थिति जाणून दुसऱ्या बाजीरावानें त्रिबक चिंतामण यांस पांच गांव इनाम दिले (स. १७९९).

या घराण्याचे कागद राजवाडे खंड १२-१३ यांत छापलेले असून त्यांत दादाच्या वनवासाचें वर्णन भरपूर आहे. यांचें घराणें पुणें येथें ओंकारेश्वरापाशीं स्वतःच्या वाड्यांत नांदत आहे.

पेशवे व जानोजी भोसले यांचें युद्ध संपल्यावर तहाची वाटाघाट करण्यासाठीं यास व चिंतो अनंत देवस्थळे यांस

जानोजीकडे पाठवलें होतें (ना. प्रां. इ. पा. १६४, म. रि. म. भा. ४, पा. २८२).

चिरंजीव भट्टाचार्य—(ग्रंथकाल स. १७०३) हा काश्यपगोत्री ब्राह्मण. याच्या घराण्याचा मूळ पुरुष दक्ष. दक्षाच्या वंशांत काशीनाथ नांवाचा पुरुष कुलदीपक झाला. तो सामुद्रिकविद्येंत निष्णात असल्यानें सामुद्रिकाचार्य या नांवानें विख्यात झाला. त्याला राजेन्द्र, राघवेन्द्र व महेन्द्र असे तीन पुत्र होते. त्यांपैकीं राघवेंद्राला भट्टाचार्य शतावधान अशी बहुमानदर्शक पदवी प्राप्त झाली. हे शीघ्र कवि होते. राघवेंद्राचे मंत्रार्थदीप व रामप्रकाश (कालनिर्णयावर) असे ग्रंथ आहेत. राघवेंद्राचा चिरंजीव भट्टाचार्य पुत्र होता. याचें वास्तविक नांव रामदेव किंवा यामदेव असें होतें. पण प्रेमाचें नांव चिरंजीव हेंच सर्वत्र रूढ झालें. सतीशचंद्र विद्याभूषण यांनीं आपल्या 'हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक' या पुस्तकांत (पा. ४८१) याची नैय्यायिकांत गणना केली आहे. पण याचे साहित्यविषयक ग्रंथाशिवाय इतर ग्रंथांचा पत्ता लागत नाहीं. यानें आपला काव्यविलास ग्रंथ स. १७०३ मध्यें बनवला.

याचे ग्रंथ –१ काव्यविलास, २ विद्वन्मोदतरंगिणी, ३ माधवचंपू, ४ वृत्तरत्नावलि, ५ शृंगारतटिनी, ६ कल्पलता, ७ शिवस्तोम.

चुखल–अभिनवगुप्ताचा पिता व वराहगुप्ताचा मुलगा.

चुल्लिकाभट्ट—याच्या एका वृत्तीचा रायमुकुटानें उतारा घेतला आहे.

चूडामण जाट—(मृत्यु स. १७२३) हा भरतपूरच्या जाटांचा मूळ पुरुष जो बिज त्याचा मुलगा होय. बापाचे मृत्यूनंतर हा जाटांचा पुढारी बनला व हा जाट लोकांचें मोठें सैन्य जमवून बादशाही प्रांत काबीज करूं लागला. डीग, कुंभेर वगैरे बळकट जागा याच्या हस्तगत झाल्यामुळें हा दिल्लीच्या बादशहासहि अवजड झाला. तेव्हां दिल्लीचा बादशहा फर्रुखसियर यानें जाट लोकांस जहागीर देऊन, संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला यश आलें नाहीं.

तेव्हां स. १७१८ मध्यें बादशहानें जयपूरचा राजा सवाई जयसिंग यास कांहीं सैन्य देऊन जाट लोकांवर पाठवलें. जाटांनीं धून व सिनसिनी हे दोन्ही किल्ले मोठ्या हिय्यानें लढवून जयसिंगाचें कांहीं चालूं दिलें नाहीं. पुढें सख्यदबंधूंनीं मत्सरबुद्धीनें जाटांशीं तह केल्यामुळें सवाई जयसिंगास वेढा उठवावा लागला. चूडामण यानें मुहम्मदशाहाविरुद्ध सख्यदबंधूंस चांगलें साहाय्य केलें.

स. १७२३ मध्यें याचें व याच्या मुलाचें भांडण होऊन यानें संतापाच्या भरांत आत्महत्या करून घेतली. यास बदनासिंग व मोहकमसिंग असे दोन पुत्र होते (इ. सं. ऐ. च. भा. २ पृ. १–२).

चूंडा—(स. १४२० सुमार) मेवाडचा राजा लक्षसिंह ऊर्फ लाखा याचा पुत्र. राठोड रणमल्लाची बहिण हंसाबाई हिच्याकरितां याला विनंति करण्यांत आली. तेव्हां याचा पिता सहज म्हणाला, 'मला म्हाताऱ्याला कोण विचारतो.' त्या बोलण्यावरून याला वाटलें कीं, आपल्या पित्याला लग्न करण्याची इच्छा आहे. पण रणमल्ल आपली मुलगी त्याला देण्यास तयार नव्हता. कारण याला दिली असतां ती पट्टराणी होणार होती व तिचा मुलगा राजा होणार होता. पण म्हाताऱ्याला मुलगी देण्यांत कांहींच फायदा नव्हता. हें जाणून यानें त्याची समजूत घातली. आपला राज्यावरील हक्क सोडून तशी एकलिंगजीची शपथ घेतली व प्रतिज्ञापत्रकहि लिहून दिलें. त्यामुळें हंसाबाईच्या मुलाला राज्य मिळेल अशी व्यवस्था झाल्यावर तिचें लक्षसिंहाशीं लग्न झालें. तिला मोकल नांवाचा मुलगा झाला. त्याच्या संरक्षणाची जबाबदारी लक्षसिंहानें याच्याकडे सोंपविली. हाहि ती चांगली पार पाडीत असे. पण रणमल्लानें याच्या विरुद्ध कागाळ्या करून हा मोकलला ठार करून राज्य घेऊं इच्छितो असें भासविलें. तेव्हां हंसबाईच्या इच्छेवरून मेवाडचा यानें त्याग केला व आपल्या भावासह मांडूच्या सुलतानाकडे जाऊन राहिला. त्यानें याला सन्मानपूर्वक ठेवून घेतलें व कांहीं जहागीरहि दिली. यानें आपला राघवदेव नांवाचा भाऊ फक्त मोकलच्या जवळ रक्षणार्थ ठेवला. याच्या मरणानंतर छोटा पुत्र काना मंडोवरचा राजा झाला. असा या पितृभक्त चूंडाचा इतिहास आहे.

चेतक—वैशालीचा राजा. याची मुलगी चेल्लना, ती बिंबिसाराची पत्नी, घराणें लिच्छवी. महावीराची आई त्रिशला ती याची बहीण.

चेतसिंग—(स. १७७०–१८१०) काशीचा राजा. इंग्रजांनीं स. १७७५ मध्यें याला लखनौच्या नबाबाच्या अंमलाखालून काढलें आणि स्वतंत्र केलें. हेस्टिंग्जनें याजकडून पिळून पैसा काढण्याचा प्रयत्न केला; व एकदां तर याला कैद केलें. तेव्हां हेस्टिंग्जच्या विरुद्ध काशीचे लोक झाले व त्याला पकडण्याकरितां त्याच्या वाड्याला वेढा दिला. पण हेस्टिंग्ज नागपूरकर भोसल्यांचे वकिलांच्या पालख्यांतून ब्राह्मणाचा वेष घेऊन पळाला. पुढें महादजी शिंद्यानें याला आश्रय दिला व पांच लक्षांची जहागीर

दिली. इंग्रजांनीं 'याला हुसकून द्या तर तहाला येतों' असा अंडर्सनबरोबर निरोप पाठविला, तेव्हां महादजीनेंहि 'पाहुण्याला काढून देणें बनणार नाहीं. वाटल्यास तहास येऊं नका' असा ठोक जबाब दिला. पुढें दौलतरावानेंहि याचा बचाव केला. याचा वंश अद्याप 'काशीनरेश' म्हणून शिंदेशाहींत लहानशी जहागीर भोगीत आहे. चेतसिंगानंतर हेस्टिंग्जनें महीपत नारायण नांवाचा पुरुष गादीवर बसविला. त्याचा वंश अद्यापि काशीजवळ गंगेच्या पलीकडे रामनगर येथें नांदत आहे.

चेन्न—विजयनगरच्या दुसऱ्या वेंकटदेवरायाचा सेनापति. यानें नेलोरच्या बंडखोर लिंगमानायकाचा पराजय केला.

चेन्नप्प—(स. १३९७) विजयनगरच्या मल्लिनाथ संगमचा पुत्र.

चेरमाण पेरुमाल—(मृ. स. ८३१) हा चेर वंशांतील एक राजा. हा राज्य करीत असतां अरबांनीं मलबार किनाऱ्यावर स्वाऱ्या केल्या. याचें राज्य पांड्य राजानें घेतल्यावर हा अरबांच्या बरोबर मक्केला गेला व तेथें यानें मुसलमानी धर्म स्वीकारला. व तेथेंच हा स. ८३१ मध्यें मेला. याच्या शिलालेखांत कोल्लम किंवा मलबार शक वापरीत. हा शक स. ८२४–८२५ सालीं सुरू झाला. कांहींचें म्हणणें हा शक यानें आपल्या राज्याभिषेकाच्या वेळीं सुरू केला; व कोल्लम अथवा क्विलान शहर त्या वेळीं स्थापिलें. याच्या नाण्यावर धनुष्यबाण व तरवार आढळते. यानें मृत्यूपूर्वी एक मुसलमान मौलवी चिट्ठी देऊन मलबारांत पाठविला. त्यानें राजाच्या मदतीनें मशिदी वगैरे बांधून मुसलमान धर्माचा प्रचार केला. याचें मुसलमान झाल्यावरचें नांव अबदुल रहिमान सोनिनी असें होतें. याचा परिणाम अद्यापहि त्रावणकोरच्या घराण्यावर दिसतो. मलबारमधील मुसलमानांना आज हिंदु कायदा लागू आहे याचें कारणहि हेंच असावें.

चेरुमा—(पुलया पाहा).

चेलप्परम्बु नम्बूतिरी—हा एक प्रसिद्ध तामीळ कवि होय. कालिकत येथील हा राहणारा. कालिकतचा राजा झामोरीन याच्या पदरी हा होता.

यानें पुष्कळ ग्रंथ लिहिले. शिवाय हा जन्मतःच कवि होता. याच्या कवित्वामुळें याला कोचीन, त्रावणकोर आणि झामोरीन या राजांकडून अगणित बक्षिसें मिळालीं.

चेलुकपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं चोपन्नावा सिद्ध होय. हा जातीनें शूद्र गांव भंगळपूर. अवधूतिपाचा हा शिष्य. यानें षडङ्गयोगोपदेश (तं.४।२१) हा ग्रंथ लिहिला.

चेलुवाम्बे—(स. १७२७ सुमार) कानडी कवयित्री. ग्रंथ—वरनन्दीकल्याण, व्यंकटाचलमाहात्म्यलालिपद, अलमेंलूमंगेलालिपद, तुलाकावेरीमाहात्म्यटीका.

ही म्हैसूरच्या महाराज दोड्डकृष्णराज (स. १७१३–१७३१) याची पट्टराणी. कळिलेकान्तनृप हा सेनापति दोड्डेन्द्राचा मुलगा. त्याची ही मुलगी. पहिला ग्रंथ नवऱ्याच्या आज्ञेनें लिहिला. हा ग्रंथ तिरुपति व्यंकटाच्या कृपेनें लिहिला आहे (क. क. च. भा. ३ पा. २३).

चेल्लना—बिंबिसार राजाची पत्नी व चेतकाची मुलगी.

चैच—विजयनगरच्या संगमवंशांतील पहिल्या बुक्करायाचा मंत्री. याचा मुलगा इरुग हा दुसऱ्या हरिहराचा सेनापति झाला.

चैतन्य—(स. १४८५-१५२७) हा एक प्रसिद्ध साधु होय. याला बुद्धाचा द्वितीयावतार समजतात. हा वासुदेव सार्वभौमाचा शिष्य.

याचा जन्म नदिया येथें झाला. यानें बंगाल्यांत भक्तीचें माहात्म्य वाढविलें. याचा जन्महि बंगाल्यांतच झाला. याला पूर्वेकडील ल्यूथर मानतात. हा स. १५२७ मध्यें जगन्नाथपुरीनजीक मरण पावला. याचें लग्न वल्लभाचार्याच्या मुलीशीं झालें.

यानें सर्व हिंदुस्थानभर प्रवास करून साधुसंतांच्या भेटी घेतल्या होत्या, असें चैतन्यचरित्रामृतांतील माहितीवरून दिसतें. यास बंगाली लोक गौरांगप्रभु असे म्हणतात. हा आपल्याकडील ज्ञानेश्वर–तुकारामांसारखा बंगाल्यांतील साधु व कवि होय.

चैचराज—कलिंग देशचा राजा. खारवेलच्या हाथिगुंफेतील शिलालेखांवरून हा मौर्यवंशांतील दशरथाच्या वेळीं गादीवर होता. हा मौर्यसाम्राज्यांतून स्वतंत्र झाला. यानें मगधावर स्वारी करून जय मिळवला. खारवेल याच्यापासून तिसरा पुरुष होय.

चोकिदेव कदंब—(स.१०३०नंतर) हा हानगळच्या जयवर्मा कदंबाचा मुलगा. याला जोकि म्हणत असत.

चोक्कराज चालुक्य—(कविराक्षस पाहा).

चोखामेळा—(मृत्यु स. १३३८) मराठी कवि व साधु. जात महार. याच्यावर नामदेवांच्या प्रेमळ कीर्तनाचा परिणाम होऊन हा त्यांना गुरु मानूं लागला. याची पत्नी सोयरा. मुलगा 'कर्ममेळा'. याला एक निर्मळा नांवाची बहीण होती. तीहि याच्या जवळच राहून आपला संसार चालवी. बंका महार हा याच्या बायकोचा भाऊ होता. याच्या घरीं विठोबा जेवला, याच्या बायकोचें बाळंतपण केलें वगैरे अनेक गोष्टी प्रसिद्ध

आहेत. असें हें सर्वच कुटुंब हरिभक्त होतें. हा विठ्ठलाचा एकनिष्ठ भक्त असून पंढरीवर याची अत्यंत श्रद्धा होती. पंढरीची वारी हा चुकवीत नसे. पंढरीच्या वारकऱ्यांचें हा भक्तिभावानें दर्शन घेई. शेवटीं मंगळवेढ्याच्या कुसाचें काम चालू असतां तें डासळून त्याखालीं सांपडून हा मेला. मग नामदेवानें याचें प्रेत शोधून काढलें आणि त्याला अग्नि दिला. आणि याच्या अस्थि भजन करीत मिरवत आणून विठोबाच्या देवळासमोर पुरल्या व त्यावर याची समाधि बांधली (शके १२६० वैशाख व. १३). वारकरी लोकांचा सांप्रदाय, याच्या समाधीचें दर्शन घेतल्यावर विठोबाचें दर्शन घ्यावें असा आहे. तोहि नामदेवानेंच घालून दिलेला असावा. याचें 'विवेकदर्पण' नांवाचें एक प्रकरण आहे व याच्या पत्नीचे कृष्णचरित्रांवर कांहीं अभंग आहेत. याशिवाय याचे कांहीं अभंग व पदें आहेत.

चोडप्पा नायक--(स. १४९९-१५१३) हा इक्कूरीच्या केलडी घराण्यांपैकीं होलांबेल बसप्पाचा मुलगा. यानें स. १५११ मध्यें इक्केरीस राजवाडा बांधला.

चोडसिंह—(स. ११३८-४८) हा अरिसिंहानंतर मेवाडच्या गादीवर आला. याच्यानंतर विक्रमसिंह आला.

चोरकवि—जयदेवांनीं इतर कवींबरोबर याचा मार्मिकपणें उल्लेख केला आहे.

चोरंगिपा—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं दहावा सिद्ध होय. हा जातीनें मछुआ असून कामरूप देशांत राहणारा होता. गोरक्षपा सिद्धाचा हा गुरुभाऊ होता. यानें 'वायुतत्त्वभाषानोपदेश' (तं. ४८।५२) हा ग्रंथ लिहिला.

चोल घराणें—१ पेरूनार किल्ली १ ला (स. १२५-५०), २ करिकाल चोल (स. १५०-८०), ३ नेडुमुंडू किल्ली (स. १८०-२००), ४ तोंडमान इलाम-तिरयण (स. २००), ५ पेरूनार किल्ली २ रा (स. २०० नंतर).

२ चोल घराणें—१ विजयालय (स. ८४६-८८०), २ आदित्य १ ला (स. ८८०-९०७), ३ परान्तक १ ला (स. ९०७-४७), ४ राजादित्य १ ला (स. ९४७-४९), ५ गंडरादित्य (स. ९४९-६५), ६ अरिंजय (स. ९६५), ७ परान्तक २ रा (स. ९६५), ८ आदित्य २ रा (स. ९६५-६९), ९ मदुरान्तक (स. ९६९-८५), १० राजराज १ ला (स. ९८५-१०१६), ११ राजेंद्र १ ला (स. १०१६-४३), १२ राजाधिराज १ ला (स. १०४३-५२), १३ राजेन्द्रदेव (स. १०५२-६३), १४ राजमहेन्द्र (स. १०६३), १५ वीरराजेन्द्र (स. १०६३-७०), १६ अधिराजेन्द्र (स. १०७० त मारला गेला), १७ (राजेंद्र २ रा) कुलोत्तुंग १ ला (स. १०६३-१११८), १८ विक्रमदेव (स. १११८-३३), १९ कुलोत्तुंग चोल २ रा (स. ११३३-४६), २० राजराज २ रा (स. ११४६-६३), यापुढील राजांच्या नात्याचा नीट संबंध लागत नाहीं. २१ राजाधिराज २ रा (स. ११६३-७८), २२ कुलोत्तुंग ३ रा (स. ११८६-१२१६), २३ राजराज ३ रा (स. १२१६-४६), २४ राजेंद्र ३ रा (स. १२४६-६७).

चोद—(स. ११८२) हा अमरावतीच्या कोट घराण्यापैकीं दुसऱ्या भीमाचा मुलगा. याला चोद असें म्हणत.

चोलराव—हा मुधोळ संस्थानच्या घोरपड्यांचा मूळ पुरुष होय. याचें मूळचें आडनांव भोसले होय. याच्या एका पूर्वजानें घोरपडीनें किल्ला सर केला त्यामुळें घोरपडे हें नांव त्यांना मिळालें.

हा आदिलशाहींत सरदार होता. आदिलशाहानें याला मुधोळची जहागीर, राजा किताब व मोरचेलाचा मान दिला. मुधोळकर हे सातकश वंशी होत. त्यांच्या एका पुरुषास २ बायका होत्या. एकींस ७ मुलगे झाले. तिच्या वंशाजास सातकस म्हणतात (बाजी घोरपडे पाहा).

चोलादित्य—हा कोलनू घराण्याचा संस्थापक होय.

चोहिंग—एक चिनी प्रवासी. हा सिनचिउ नांवाच्या चिनी प्रवाशाबरोबर हिंदुस्थानांत आला व पंजाबांत 'चिंची' विहारांत मेला.

चोंभा—(स. १३७८ सुमार) मराठी सरस कवि. रंगनाथस्वामी निगडीकर, शेखमुहम्मद वगैरे कवींनीं याला आपल्या संतमालिकेंत नमन केलें आहे. याचें 'उखाहरण' नांवाचें काव्य उपलब्ध आहे. पण तें त्रुटित आहे. याच्या ओंवीच्या पहिल्या, दुसऱ्या व चौथ्या चरणाच्या शेवटीं यमक असतें व दुसरा चरण प्रायः निर्यमक असतो.

२. (स. १६८६) समर्थांचा समकालीन मराठी कवि व संत. देवदासाचा मित्र (मं श. १८३५, वा. इ. ले.२०).

चौडरस—(स. १३०० सुमार) कानडी ब्राह्मण कवि. गोत्र भारद्वाज. गुरु-मनोहरप्रचुर. पिता-मधुसूदन. माता-मल्लव्वे, पत्नी-लक्ष्मी. सरसकवीश्वर या नांवानें याचा भाऊ यानें निर्देशिला आहे. हा पंढरीच्या विठ्ठलाचा भक्त. ग्रंथारंभीं हा सर्वांआधीं विठ्ठलाला नमन करतो.

ग्रंथ—अभिनवदशकुमारचरित. या ग्रंथाच्या चौदाव्या आश्वासांत पंढरी, तेथील विठोबा व भोंवतालचा प्रदेश यांचें तत्कालीन वर्णन केलें आहे; आणि कथानायकाकडून विठ्ठलाचें अष्टक म्हणविलें आहे. कदाचित् हा पंढरपूरचा असावा व याचें कुलदैवत विठ्ठल असावें.

याचा हा ग्रंथ दंडी कवीच्या संस्कृतमधील दशकुमार-चरितांचें कानडींत चम्पूरूप भाषांतर आहे. याच्या ग्रंथाचे तेरा आश्वास पूर्ण व चवदावा अर्धवट उपलब्ध आहे. उरलेला भाग अद्यापि उपलब्ध नाहीं. प्रत्येक आश्वासाच्या शेवटी कवीनें दिलेल्या अवतरणिकेंत विठ्ठलाचा निर्देश यानें अभंगविठ्ठल असा केला आहे. याचा ग्रंथ दंडीप्रमाणेंच ललित आहे (क. क. च. भा. १ पा. ४०३).

चौरंगीनाथ—हा रुद्रपूरच्या भुलेश्वर राजाच्या ज्येष्ठ स्त्रीचा पुत्र होय. याच्या सावत्र आईनें याची आई याच्याच वेळीं गरोदर असतांना, तिला नवऱ्याकडून अरण्यांत सोडविलें होतें. तेथें ती प्रसूत झाली असतां कांहीं दिवसांनीं त्या मुलाचे हातपाय तोडून भुलेश्वराच्या वेशीपाशीं याला चौरंगावर बांधून ठेविलें.

पुढें कांहीं दिवसांनीं मत्स्येंद्रनाथ तेथें आले व त्यांच्या कृपेनें याचे हातपाय याला परत मिळाले. त्या वेळेपासून हा त्यांचा शिष्य बनला; व पुढें याचें चौरंगीनाथ असें नांव ठेवण्यांत आलें (नाथ ली. अ. ६). याच्या या कथेचा निर्देश ज्ञानेश्वरी (१८. १७५३) व चांगदेवाच्या तत्त्वसार (८६८ ओवी) ग्रंथांत आहे.

छ

छत्र्य कदंब—(२ शिवचित्तदेव कदंब व षष्ठदेव पाहा).

छत्रपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं तेविसावा सिद्ध. जातीचा शूद्र व भगुनगरचा राहणारा. यानें शून्यताकरणदृष्टि (तं. ४८।४७) या नांवाचा ग्रंथ लिहिला.

छत्रसाल राठोड—(स. १७५८ नंतर) रतलाम संस्थानचा मूळ संस्थापक. रतनसिंहाचा हा पुत्र. याच्या कारकीर्दीत संस्थानचे तीन भाग पडून याचा वडील मुलगा केसरीसिंग यास रतलामचा भाग मिळाला.

छत्रसाल बुंदेला—(ज. स. १६५०–मृ. स. १७३३) याचा जन्म स. १६५० मध्यें झाला. वयाच्या चौदापंधराव्या वर्षीच आईबापांचा वियोग व राज्याची वाताहात झाल्यामुळें छत्रसाल मोठ्या असहाय स्थितींत सांपडला. कोठें तरी मोठ्या ठिकाणीं जाऊन उद्योग करावा असें यास वाटूं लागलें. त्या काळीं मोगल दरबारांत प्रवेश करून घेणें व कांहीं तरी अंगचा गुण दाखवून प्रसिद्धीस येणें एवढेंच काय तें ध्येय तरुणांपुढें असे. छत्रसालानें मोगल दरबाराकडे धांव घेतली व तो मीर्मा जयसिंगाचे पदरीं राहूं लागला. मीर्मा जयसिंगानें याच्या अंगची तरतरी व धडाडी पाहून यास आपल्याबरोबर घ्यावें किंवा इतर सरदारांबरोबर लढाया करण्याकरितां पाठवावें. एकदां नागपुराकडील देवगड किल्ला सर करण्याकरितां बहादुरखान नामक सरदाराबरोबर याची नेमणूक झाली. यानें देवगडच्या युद्धांत आपण स्वतः घायाळ होऊन किल्ला बहादुरखानास सर करून दिला. आपण जिवाची पर्वा न बाळगतां किल्ला जिंकून दिला याबद्दल बहादुरखान दरबाराकडे आपली शिफारस करील व लौकरच आपण मोठ्या पदवीला चढूं अशी छत्रसालास मोठी आशा वाटत होती. परंतु यास जेव्हां समजलें कीं, बहादुरखानानें आपण स्वतः किल्ला सर केला असें बादशहास कळविलें, व बादशहानें संतुष्ट होऊन त्या खानाची मनसब वाढविली व आपला नामनिर्देश देखील कोणीं केला नाहीं तेव्हां मात्र या मानी छत्रसालास फार वाईट वाटलें. हाच प्रसंग यास मोगल सेवेपासून निवृत्त करण्यास कारणीभूत झाला.

या वेळीं छत्रसालानें शिवाजीराजांची कीर्ति ऐकिली. शिवाजी नुकताच दिल्लीहून सुटून आला होता.

तेव्हां हा मोगल सरदाराबरोबर दक्षिणेंत आला व शिकारीचें निमित्त करून यानें शिवरायाची भेट घेतली. शिवाजीनें याची तेजस्विता पाहून दूरदृष्टीनें उत्तरेकडील आपला गमावलेला मुलूख काबीज करण्यास यास प्रवृत्त केलें. लाल कवीनें छत्रप्रकाश नांवाचें काव्य हिंदींत लिहिलें आहे, त्यांत हा प्रसंग सुरस वर्णिला आहे. त्याचा परिणाम छत्रसालावर फार झाला. या प्रसंगीं शिवाजीनें यास एक तरवार अर्पण केली.


छत्रसालानें लढायांवर लढाया करून मुलूख हस्तगत करण्यास सुरुवात केली. तहवरखाँ, अनवरखाँ, सदरुद्दीन, हमीदखांसारख्या शूर सरदारांचा पाडाव केला. बहलोलखानें तर लाजून आत्महत्त्या करून घेतली. मुरादखां, दलेलखां, सैद अफगाण, शाहकुली इत्यादि सरदारांस पराजित करून यमुना आणि चंबळा नद्यांच्या दक्षिण प्रांताचा म्हणजे सर्व बुंदेलखंडाचा हा मालक झाला.


स. १७०७ मध्यें बहादुरशहानें छत्रसाल बुंदेलखंडाचा अधिपति असल्याचें मान्य केल्यावरून छत्रसालानें त्यास लोहगड नांवाचा किल्ला जिंकून दिला.

स. १७३२ मध्यें अहमदशहा बंगश यानें छत्रसालावर स्वारी केली. त्या वेळीं छत्रसालाचें वय ८२ वर्षांचें होतें. स्वतःचे ठिकाणीं अवसान न राहिल्यानें व मुलांमध्यें तितका पराक्रमी कोणी नसल्यामुळें आपण संपादिलेला मुलूख यवनांचे तावडींत सांपडतो असें पाहून या वृद्धानें प्रसंगावधान राखून मोठी नामी युक्ति योजिली. यानें त्या वेळीं बाजीराव पेशव्याचें साहाय्य मागितलें. त्यासंबंधीं पत्रांत लिहिलेला दोहा पुढीलप्रमाणें प्रसिद्ध आहे.

जो गति ग्राह गजेन्द्र की सो गति जानहु आज ।
बाजी जात बुन्देल की राखी बाजी लाज ॥

बाजीरावानें बंगशाचा पूर्ण पराभव केला. तेव्हां छत्रसालानें बाजीरावास आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा दिला. याच्या दरबारीं भूषण गेला तेव्हां यानें त्या कवीचा सन्मान स्वतः त्याच्या पालखीला खांदा देऊन केला.





छत्रसिंह कायस्थ—(स. १६९९) एक हिंदी कवि. हे अटेर गांवचे राहणारे असून श्रीवास्तव कायस्थ होते. अमरावतीचा कल्याणसिंहाचा यास आश्रय होता.

छबिलाराम—(मृत्यु स. १७१९) हा नागर ब्राह्मण मुत्सद्दी होता. अजीमुश्शान मारला गेल्यावर हा जहांदरशहाच्या पक्षांला मिळाला; व नंतर फर्रूखसियरला मिळाला. यानें चूडामण जाटास वठणीवर आणलें. याचा मुलगा दयाबहादुर.

छलुए—महावीराचा प्रतिस्पर्धी.

छंदक—हा शुद्धोदन राजाचा पुत्र. हा गौतमबुद्धाचा सारथी होता.

छित्तराज शिलाहार—(स. १०२८) हा ठाण्याच्या शिलाहारांपैकीं वज्जडाचा मुलगा. हा आपला चुलता अरिकेसरीनंतर गादीवर आला. याचा एक स. १०२८ मधला लेख सांपडला आहे. तोच भांडुपचा शिलालेख या नांवानें प्रसिद्ध आहे (इंडि. अँटि. ५ वा, २७७). हा शब्द चित्तराजाचा अपभ्रंश दिसतो.

ज

जगजीवन—(स. १७१५ सुमार) मराठी कवि. गांव राजपूर (औरंगाबाद). ग्रंथ—विक्रमबत्तिशी, रामायण, ज्ञानमूळ (सं. सू.)

जगजीवनदास—(स. १६८२-१७६१) हा चंदेल ठाकूर जातीचा गृहस्थ 'सत्नामी' नामक हिंदु पंथाचा आद्यप्रवर्तक होय. उत्तर हिंदुस्थानांत ' सत्नामी ' या नांवानें ओळखिले जाणारे कमींत कमी तीन पंथ आहेत. त्यांपैकीं एका पंथाचा संस्थापक हा होय.

हा स. १६८२ सालीं लखनौपासून ४० मैलांवर असलेल्या सरदह गांवीं जन्मला. हा मूळ कबीर पंथाचा होता असें म्हणतात; व यानें काढलेला पंथहि त्याच पंथाप्रमाणें व्यापक आहे. यानें आपल्या पंथाचा ' अघविनाश ' नांवाचा पवित्र ग्रंथ पद्यात्मक रचला आहे. याशिवाय यानें ज्ञानप्रकाश, महाप्रलय व प्रथम-ग्रंथ इत्यादि पुस्तकें लिहिलीं. मरणापूर्वी सुमारें दहा वर्षे यानें सरदह गांव सोडलें व तेथून पांच मैलांवर असलेल्या

कोटवा गांवीं जाऊन राहिला. त्या ठिकाणीं हा स. १७६१ सालीं मरण पावला.

याचे निरंनिराळ्या जातींचे चार मुख्य शिष्य असून इतर चौदा शिष्य होते. या पंथांचे नुसत्या संयुक्त प्रांतांत सुमारें ७५,००० लोक आढळून येतात.

जगजीवन बाळकृष्ण हणमन्ते—हा भोसल्यांचा पिढीजाद नोकर.

जगजीवनराव—(स. १६३५-५८ सुमार) याच्या घराण्यास राजे उदाराम अशी पदवी होती. हा दे. ऋ. ब्रा. होता. याच्या वडिलांचें नांव उद्धवराव असें होतें. याची बायको रायबागन फार शूर होती. हा वाशीम येथें राहत असे (मं. त्रै. व. २. १ ते ४ ले. ४). तंजावरचे शिलालेखांत याचा मृत्यु स. १६५८ हा दिला आहे (मं. त्रै. व ४. पृ. ४९-५०).

जगजीवनस्वामी—अहमदाबादेजवळच्या रायपूरचा संन्यासी. हा शांकर शुद्धाद्वैतमताचा असे. यानें ज्ञानमूळ, ज्ञानगीता आणि नरबोध असे तीन ग्रंथ गुजराथी भाषेंत लिहिले (का. दो.).

जगज्जीवनराव परशुरामपंत प्रतिनिधि--(स. १७४६-५४) यांचें पूर्वीचें आडनांव कुलकर्णी असें होतें. हा श्रीपतराव ऊर्फ श्रीनिवासराव यांचा भाऊ होय. याचें दुसरें नांव दादोबा. याच्या भावानंतर शाहूनें यास प्रतिनिधीचीं वस्त्रें दिलीं (ता. १७-१२-१७४६). परंतु शाहू वारल्यामुळें यांचें व पेशवे यांचें न जमल्यामुळें पेशव्यांनीं यास किन्हईस कैदेंत टाकलें. पुढें दोन वर्षांनीं याला सोडण्यांत आलें. स. १७५१ मध्यें पेशव्यांनीं ताराबाईकडून याची मदत घेतली होती. कारण त्या वेळीं निजाम पुण्यावर चालून आला होता. स. १७५४ च्या भाद्रपदांत, २० आगष्ट रोजीं हा किन्हई येथें वारला. तेव्हां हा निपुत्रिक असल्यामुळें कृष्णाजी परशुरामाच्या नातवास-भवानरावास-प्रतिनिधि केलें (म. रि. म. वि. २).

जगज्ज्योतिर्मल्ल—(स. १६१७-३३) यानें संस्कृतांत हरगौरी नाटक केलें.

जगत्तुंग राष्ट्रकूट—तिसऱ्या गोविंद राष्ट्रकूटाचें नामांतर.

२. अकालवर्ष राष्ट्रकूटाचा मुलगा. हा गादीवर येण्यापूर्वीच मेला असावा, असें याचें नांव कांहीं ठिकाणीं गाळलें आहे त्यावरून दिसतें.

जगत्शेट—(स. १७३९ सुमार) याचें मूळ नांव फत्तेचंद असें होतें. हा मारवाडी बनीया. मुर्शीदकुलीखानाचा जांवई सुजाउद्दीनाचा हा सल्लागार होता.

अलीवर्दीखान बिहार प्रांताचा वसूल फत्तेचंद याचे दुकानाचे मार्फत दिल्लीस रवाना करीत असे. त्यामुळें याच्या दुकानाचें महत्त्व वाढून याच्या दुकानाच्या शाखा सर्व बंगालभर व दिल्लीपर्यंत पसरल्या व यास जगत्शेट असा किताब मिळाला. याची पेढी बंगाल्यांत फार प्रसिद्ध होऊन मराठ्यांच्या स्वारींत त्या पेढीवर मराठ्यांना अडीच कोट रुपयांची लूट पुढें मिळाली. अद्यापहि जगत्शेटचें दुकान बंगालमध्यें प्रसिद्ध आहे. अलीवर्दीखानास यानें मदत केली (ना. प्रां. इ).

जगत्सिंह गुहिलोत—(जन्म स. १६०७–मृत्यु स. १६५२) उदेपूरचा महाराणा. कर्णसिंहाचा मुलगा. राज्याभिषेक मार्च स. १६२८ मध्यें झाला. जहांगिरच्या स्वारीच्या वेळीं यानें पराक्रमानें राज्य राखलें. शहाजहानला यानें नजराणा देऊन खूष केलें. यानें चितोडची दुरुस्ती करून दोन महाल बांधले. याचे पुष्कळ शिलालेख उपलब्ध आहेत. जगन्नाथपंडितानें 'जगदाभरण' नांवाचें संस्कृत पन्नास श्लोकांचें काव्य यावर केलें व याला स. १६२७ च्या सुमारास अर्पण केलें. याला भारी किमतीचे घोडे बाळगण्याचा नाद होता. हा उदार व दूरदर्शी होता. मृत्यु १० आक्टोबर १६५२.

२. (जन्म डिसें. १७ स. १७०९–५ जून स. १७५१) उदेपूरचा महाराणा. हा संग्रामसिंहाचा मुलगा. याच्या वेळीं रजपूत व मोंगल कमजोर झाल्यानें मराठ्यांचा वर्चस्मा वाढूं लागला. याला त्यांना तोंड देण्यांत यश आलें नाहीं. नेकराम कवीनें 'जगद्विलास' काव्यांत याचें वर्णन केलें आहे. हा विलासी होता.

जगदीश तर्कालंकार--(स. १६२५ सुमार) प्रसिद्ध चैतन्याचा सासरा जो सनातनमिश्र त्याच्यापासून चौथ्या पिढींतील हा होय.

हा भवानंदसिद्धांतवागीशाच्या पाठशाळेंत गेला व तेथें यानें तर्कशास्त्राचा अभ्यास केला. आपण सार्वभौमाचे शिष्य आहोंत असें हा म्हणतो. हा सार्वभौम रामभद्र सार्वभौम होय. कारण न्यायरहस्याचा निर्देश करतांना हा आपल्या गुरूचा ग्रंथ आहे असें हा म्हणतो. यानें खालील ग्रंथ लिहिले आहेतः

(१) 'तत्त्वचिंतामणिदीधितिप्रकाशिका,' हा ग्रंथ जागदीशी या नांवानें प्रसिद्ध आहे. (२) 'तत्त्वचिंता-

मणिमयूख' गंगेशाच्या तत्त्वचिंतामणीवरील टीका. या टीकेचा कांहीं भागच तेवढा उपलब्ध आहे. (३) 'न्यायादर्श' अथवा 'न्यायसारावली'. (४) 'शब्दशक्तिप्रकाशिका'. (५) 'तर्कामृत'. (६) 'द्रव्यभाष्यटीका' अथवा 'पदार्थतत्त्वनिर्णय'. (७) 'न्यायलीलावतीदीधितिव्याख्या'. (८) 'काव्यप्रकाश-रहस्य' (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा.४६९-७०).

जगदीश्वर--हास्यार्णव नांवाच्या संस्कृत प्रहसनाचा कवी.

जगदेकमल्ल चालुक्य—(स.११३८-५०) तिसऱ्या सोमेश्वर पश्चिम चालुक्याचा पुत्र. याचा दुसऱ्या प्रोलानें पराभव केला. याच्यावर म्हैसूरच्या होयसलांनीं स्वाऱ्या केल्या. यानें बेलापूर जिंकलें.

जगदेव—बसवाचा मशालजी व बिज्जलास मारणारा.

जगद्धर—(स.१३५०सुमार) भवभूतीच्या मालती-माधवावरील टीकाकार. देवीमाहात्म्यटीका, भगवद्गीता-प्रदीप, रसदीपिका, मेघदूतटीका, तत्त्वदीपिनी, वासवदत्ता-टीका व वेणीसंहार यांवर याची टीका आहे. जगद्धराचा नातू विद्याधर हा प्रतापरुद्र काकतीयाचा समकालीन होता. यावरून जगद्धराचा काल निश्चित होतो.

२. बालबोधिनी, स्तुतिकुसुमांजलि व अपशब्द-निराकरण या तीन ग्रंथांचा कर्ता.

जगदेवराय—(स. १५६५) विजयनगरचा श्रीरंग (तिरुमल्लाचा मुलगा) राजाचा हा दुसरा जांवई.

यानें रामरायाचा भाऊ वेंकटाद्रीच्या मदतीनें मुसलमानांवर स्वारी केली होती. रामरायाचे वेळीं हा बंडखोरांचा एक पुढारी होता. जेव्हां अली आदिलशाहानें पेणुकोंडा राजधानीवर चाल केली त्या वेळीं यानें पुढारीपण स्वीकारून राजधानीचें संरक्षण केलें. पुढें यानें मुसलमानांच्या स्वारीच्या वेळीं बराच पराक्रम गाजविला.

जगदेवराव—(स. १५५८ सुमार) कुत्बशाहींतील एक मोठा सरदार. जमशीद कुत्बशाहा मेल्यानंतर त्याच्या बेगमेनें आपला अल्पवयी मुलगा सुभान यास गादीवर बसविलें; आणि सैफखान ऐनउल्मुलकास परत बोलावून त्याच्याकडे कारभार दिला. पण जगदेवरावानें जमशीदचा धाकटा भाऊ दौलतखान यास तख्तावर बसविण्याचा बेत ठरविला. भोंगिरास जाऊन यानें त्याची मुक्तता केली. इतक्यांत सैफखान गोवळकोंडयास आला; व त्यानें कारभार आपणाकडे घेऊन जगदेवरावावर स्वारी केली. यानें वऱ्हाडच्या तोफलखानाची मदत मागितली. पण सैफखानानें सिंग्राम येथें तोफलखानाचा पराजय केला. हा दौलतखानास घेऊन भोंगिरच्या किल्ल्यांत जाऊन बसला. बरेच दिवसांनीं सैफखानानें तो किल्ला घेतला. दौलतखानास पुनः तेथेंच कैदेंत ठेवलें व जगदेवरावास गोवळकोंड्यास आणलें. पण पुढें रामराजाच्या मदतीनें इब्राहीम गोवळकोंड्याच्या गादीवर येण्याच्या खटपटीला लागला. त्यानें फितुरी करून यास मुक्त केलें व यानें त्यास गोवळकोंड्याच्या गादीवर बसविलें (स. १५५० जुलै २७).

याचे उपकार स्मरून इब्राहीमनें यास मुख्य वजीर केलें. पण हा व याचा सहकारी रामराव यांच्या मनांतून वेडया दौलतखानास तख्तावर आणावयाचें होतें. म्हणून इब्राहीमनें रामरावाला ठार केलें. तेव्हां हा आपल्या भावासह मुलूख उध्वस्त करीत एलगुंडलवरून वऱ्हाडांत गेला, व इमादशहाच्या नोकरीस राहिला. तेथें यानें खानदेश वगैरे प्रदेश इमादशहास मिळवून दिले. पण तेथेंहि याचें न जमल्यानें तेथून स. १५५८ च्या सुमारास निघाला व जाळपोळ करीत एलगुंडलला आला. हें ऐकून कुत्बशाहानें याच्यावर मुस्तफाखानास पाठविलें. तेव्हां याचा पूर्ण पराजय होऊन हा विजयनगराकडे पळून गेला. हा मुरारिपंडिताचा पिता असावा.

शेवटीं रामरायाचा भाऊ व्यंकटाद्री व हा एक होऊन कुत्बशाहा व निजामशाहा यांचा यानें पराभव केला (मु. रि. भा. १, २८१-८३).

जगदेवराव जाधव—(स. १६२९) लखुजी जाधवाचा भाऊ. हा स. १६२९ च्या सुमारास मोंगलांतर्फे शहाजीशीं लढत होता. जेव्हां शहाजहाननें जिजाबाईस कैद केलें, त्या वेळीं यानें बादशहाकडून तिची सुटका करविली.

जगदेव परमार—(स.१०८० नंतर) हा उदयादित्य परमाराचा धाकटा मुलगा. हा अत्यंत शूर होता. चालुक्यांच्या आश्रयास असतां यानें गुजराथेंत, माळव्यांत व इतर देशांत अनेक पराक्रम केले (हि. भा. अ. ३, २६५).

जगदेव संभाजी पवार (धार)—(स. १७३१ सुमार) उदाजीचा भाऊ, मराठी लष्करांत एक सरदार होता. तिरला येथील लढाईंत यानें पराक्रम गाजविला (स. १७३१). हा भावाबरोबर नेहमीं लढाईवर जाई. याला दोन पुत्र असून त्यांचीं नांवें अनुक्रमें गोविंद व हरकोजी. पवारांचें हें घराणें महाराष्ट्रांत फार पुरातन, अतिविस्तृत व विख्यात आहे. हे मूळचे सुपें पेठ्यांतील कित्येक गांवचे पाटील शहाजीच्या जहागिरींत नांदत

असतां शिवाजीजवळ काम करून उदयास आले. हा शाहूच्या पदरीं राहून उदयास आला.

जगनिक—(स. १३०० सुमार) हा कालिंजरच्या परमार राजाचा भाट. याचा ग्रंथ उपलब्ध नसला तरी याचीं वीररसात्मक गीतें अजूनहि लोकप्रिय आहेत. आल्हा व ऊदा यांच्यावर याची कविता आहे.

जगन्नाथ—(ग्रंथरचनाकाल स. १६८५-१७७२ सुमार) मराठी कवि. श्रीधराचा रामविजय वाचून याला काव्याची स्फूर्ति झाली. हे पालकवाडी (जि.वर्धा)चे राहणारे. जात कोष्टी. यानें शशिसेनाकाव्य स्वतंत्र पद्धतीनें रचलें. याचें महाभारत लावर्णामध्यें आहे. शिवाय मारुतिजन्मवर्णन, भारत, रामायण इ. याचे ग्रंथ आहेत.

२. यांना बाबा म्हणत. हे ऋषीश्वर स्वामीचे शिष्य. शंकराचार्यकृत वाक्यसुधेवर यांची मराठींत ओवीबद्ध टीका आहे. शिवाय ग्रंथ-बोधवैभव, गीताटीका, पंचदशी-व्याख्यान, तत्त्वविवेक, श्रुत्युपदेश, ज्ञानबत्तिशी, दृक्-दृश्यबोध (सं. सू.).

३. (स. १७३१) सिद्धांतसम्राट् ग्रंथाचा कर्ता (भा. ज्यो.).

४. सारप्रदीप ग्रंथाचा कर्ता.

५. एक तेलंगी कवि (क. च.).

जगन्नाथ तर्कपंचानन—(मृ. स. १८०६) विवादभंगार्णव या ग्रंथाचा हा कर्ता होय. हा गंगेच्या तीरावरील त्रिवेणी गांवचा राहणारा होय. याच्या बापाचें नांव स्मृतर्कवागीश असें होतें. या ग्रंथाचा हिंदु कायद्या-बाबत कोर्टांत उपयोग करीत असत. कर्जफेड, भागीदारी, मजूर व मालक, नवराबायकोंचीं कर्तव्यें, वांटणी, वारसा वगैरेविषयींचें स्पष्टीकरण वरील ग्रंथांत आलेलें आहे.

जगन्नाथदास—तुळशीदासाचा गुरु.

जगन्नाथ पंडित—(स. १६२०-५० उत्कर्षकाल) एक महापंडित व कवि. पिता मेरुभट्ट, माता लक्ष्मी. हा तेलंगणांतील मुंगुंज (जि. गोदावरी) येथील राहणारा. याचें अध्ययन पित्यापाशीं झालें. वीरेश्वर शेषापाशींहि याचें कांहीं अध्ययन झालें होतें. गोत्र कौंडिण्य. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण.

हा अध्ययन झाल्यावर तरुणपणींच दिल्लीस शहाजहान बादशहाकडे गेला. त्याचे दरबारांत याचा सन्मान होऊन याला पंडितराज अशी पदवी मिळाली. शहाजहानचा आवडता खानखानन हाच बहुधा आसफविलासांतील आसफ असून यानें आसफविलासांत त्याच्या मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित केलें आहे. हा आसफ स. १६४३ मध्यें मरण पावला. जगदाभरणांत दाराशिकोह ऊर्फ दारा याची यानें स्तुति केली आहे.

अकबर, जहांगीर यांच्या दरबारांत याचा संबंध होता अशा आख्यायिका आहेत, पण त्या पुराव्यांनीं सिद्ध होत नाहींत. याचा अनेक राजांशीं संबंध होता असें याच्या ग्रंथांवरून दिसतें.

हा मोठा वादविवादकुशल असून यानें हिंदु व मुसल-मान पंडितांना वादांत जिंकलें होतें. तसेंच यानें एका यवनकन्येशीं दुसरा विवाह केला होता आणि तिच्यासह काशीचे ब्राह्मण याला पावन करून घेईनात, तेव्हां यानें गंगालहरी हें प्रासादिक स्तोत्र केल्यावर गंगेनें यास पावन करून घेतलें अशी आख्यायिका आहे.

गंगालहरीमुळें धार्मिक लोकांत, भामिनीविलासामुळें रसिक लोकांत आणि रसगंगाधरामुळें पंडित लोकांत हा अग्रगण्य समजला जातो. याचा कोटिक्रम निर्भीड व बिनतोड असतो व त्यांत क्वचित् मर्यादातिक्रमहि होतो.

याचे ग्रंथ-१ सुधालहरी (३० श्लोक. सूर्यमहिमा वर्णन करणारें स्रग्धरावृत्तांतील संस्कृत काव्य); २ अमृतलहरी (१० श्लोक. यमुनास्तुति), ३ करुणालहरी किंवा विष्णु-लहरी (६०श्लोक.विष्णुस्तुति), ४ लक्ष्मीलहरी (४१श्लोक. वृत्त शिखरिणी. लक्ष्मीस्तुति), ५ पीयूषलहरी किंवा गंगा-लहरी (५२ श्लोक. ५३ वा श्लोक क्वचित् आढळतो. हें काव्य फार प्रसिद्ध आहे), ६ यमुनावर्णनचंपू (काव्य-मालेंत प्रसिद्ध), ७ रसगंगाधर (सुप्रसिद्ध साहित्यग्रंथ), ८ मनोरमाकुचमर्दन (भट्टोजीप्रणीत मनोरमेचें खंडन), ९ अश्वधाटी (२६ श्लोक. राम नांवाच्या नातवाकरितां लिहिलेलें स्वतंत्र वृत्तांतील काव्य), १० प्राणाभरण काव्य (कुचबिहारच्या प्राणनारायण राजावरील काव्य. ५० श्लोक), ११ जगदाभरण (उदेपूरच्या जगत्सिंहाची स्तुति), १२ असफविलास (यामीनुद्दौला आसफखानस्तुति), १३भामिनीविलास (स्फुटश्लोकसंग्रह), १४ चित्रमीमांसा-खंडन (अप्पय्यादीक्षितप्रणीत चित्रमीमांसेचेंखंडन) १५ पंडितराजशतक (अनुपलब्ध), १६ अल्लोपनिषद्.

जगन्मित्रानंद—(मित्रयोगी) हा चौऱ्यांशीं सिद्धां-पैकीं असून प्रसिद्ध जयचंद गाहडवालाचा गुरु होय.

जगपाळराव निंबाळकर—(मृत्यु स. १६३०) मालोजी निंबाळकरास हा व दीपाबाई अशीं दोन अपत्यें होतीं. दीपाबाई मालोजी भोसले यास दिली असल्या-मुळें याचा व मालोजीचा घरोबा दिसतो. या घरोब्यामुळें भोसल्यानें आपला उदय करून घेतला. याच्या कोल्हापूरच्या स्वारींत मालोजी हजर असून

त्यानें चांगला पराक्रम गाजवला. जिजाबाईच्या लग्नाबाबत जाधवांनीं भोसल्यास चिडविल्यामुळें यानें भोसल्यांचा चांगलाच पाठपुरावा केला. हा भातवडीच्या युद्धांत हजर असून यानें चांगलाच पराक्रम केला. त्यांत आदिलशहाचा पाडाव झाला तरी यास २५ लक्ष रुपये इनाम मिळाल्याचा कैफीयतींत उल्लेख आहे. हा स. १६३० मध्यें मेला. याला वर्णगोजी असेंहि म्हणत.

जगमित्र नागा—(स. १३३० समाधिकाल) जगमित्र हें उपनांव व नागेश हें यांचें नांव होय. मराठी कवि व साधु. यांचीं कांहीं पदें व अभंग आहेत. यांची समाधि जोगाईच्या आंब्याजवळ परळी येथें आहे. भक्तविजयांतहि यांची एक गोष्ट दिली आहे (अ. १९).

जगराय—(स. १६१४-१६) हा विजयनगरच्या तिसऱ्या रंगराय आरविदूचा सरदार. याची कन्या वय्यम्मा ही वेंकटराय आरविदूला दिली होती.

वेंकटराय मरण पावल्यावर तिसरा रंगराय किंवा चिक्करराय हा विजयनगरचे गादीवर आला. तेव्हां यानें कट करून रंगरायाला कैद केलें व आपला भाचा गादीवर बसविला. पण एच्चम्मा नायकानें चिक्करायाचा पक्ष स्वीकारला व त्याच्या पुत्राचें म्हणजे चवथ्या रंगरायाचें संरक्षण करून याला देशोधडीस लावलें.

जटाधर—यानें 'फत्तेशाहप्रकाश' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्या वेळीं याचें वय ४८ वर्षांचें होतें व ग्रंथाचें आरंभवर्ष शक १६२६ हें होतें. याच्या पित्याचें नांव वनमाली व आजाचें नांव दुर्गमिश्र. याचें गोत्र गर्ग. हा सरहिंद प्रांतांतील राहणारा होता (भा. ज्यो.).

जतवर्म—(स. १०५० सुमार) हा बंगालच्या वर्मन् घराण्यांतील असून वर्मन् घराण्याचा संस्थापक. याची बायको कलचुरी घराण्यांतील कर्ण राजाची मुलगी वीरश्री होय.

याचा पुत्र सामलवर्म. सामलवर्माचा मुलगा भोज. त्याचे बेलव येथील शिलालेख प्रसिद्ध असून ते सध्यां डाक्का म्युझिअममध्यें आहेत (हरिवर्मा पाहा).

जतिल पांड्य—हा पांड्य घराण्यापैकीं पहिल्या राजसिंहाचा पुत्र. याला परांतक, श्रीवर, नेदुंज दैयन, तेन्नव-वानवन या पदव्या लावलेल्या आढळतात. हा आपला बाप राजसिंह पहिला यानंतर गादीवर आला.

मद्रास म्युझिअम व कै. रायबहादूर व्येंकय्या यांच्या मताप्रमाणें अन्नमलई लेखांमध्यें याचे पुष्कळ लेख आहेत (स. ७६९-७०). यानें पेन्नागदम येथें कदंबाचा पराभव केला. म्हैसूर संस्थानांत कांहीं कानडी शिलालेख आढळतात. त्यांत पल्लवांना कदंब म्हटलेलें असतें. यानें कांगू राजास कावेरीच्या उत्तरेस पळावयास लावलें. यानें कांचीनदीवर वेरूरमध्यें विष्णूचें एक देऊळ बांधलें. तें पर्वतासारखें उंच होतें असें वर्णन आहे. पण या मंदिराचा सध्यां मागमूसहि नाहीं. राजसिंह २ रा याच्या मागून गादीवर आला.

जनकोजी शिंदे—राणोजी शिंद्याचा बाप.

२. (मृ. स. १७६१) हा जयाप्पा शिंद्याचा मुलगा. ह्याचे आईचें नांव सखूबाई व बायको काशीबाई. ही निजामशाहीतील व्यंकटराव निंबाळकराची बहीण होय. ह्यानें स. १७५५ त मेडतें सर केलें. हा ज्या दिवशीं स्वारीवर गेला त्या दिवशींच ह्याच्या बापाचा खून झाला. उत्तरहिंदुस्थानचा कारभार शिंदे-होळकरांवर सोंपविला असतां रघुनाथराव येऊन घालमील करतो म्हणून मल्हारराव नजीबास कायम ठेवून कारस्थान करीत होता. त्यांत दत्ताजीमुळें हाहि सामील झाला.

ता. २२-११-१७५० रोजीं जनकोजीची अब्दालीशीं फार मोठी लढाई झाली व तींत यानें त्याचा पराभव करून त्याच्या सामानाचा फारच नाश केला.

शेवटीं हा पानपतच्या लढाईंत शौर्यानें लढला व मेला. त्या वेळीं याचें वय १७ वर्षांचें होतें.

जनजसवंत—(समाधि स. १६१७) शक १५३० मध्यें बागलाणचा सुभा प्रतापशा म्हणून होता. त्याचा पुरोहित जनार्दन. त्यांचे पुत्र जसवंत (यशवंत), राहणार मुल्हेर. यांचा छल होऊन यांची मोट बांधून प्रवाहांत टाकली असतां श्रीरामांनीं यांस तारिलें. निर्जल प्रदेशांत जल उत्पन्न केल्यामुळें यांना जळ जसवंत असेंहि म्हणतात. हीच कथा भक्तिविजयांत दिली आहे (अ. ३६). नंतर बोरठें (खानदेश) गांवीं वास. गुरु तुलसीदास. समाधिकाल शके १५७८ फाल्गुन शुद्ध ८ तापीतीर. यांचें चरित्र 'रघुनाथदास' यांनीं लिहिलें आहे. ग्रंथ-पदें, दोहरे वगैरे (सं. सू.). यांना तुळशीदासांनीं दिलेली मारुतिमूर्ति तळोदें तालुक्यांतील कुकुरमुंडेगांवीं आहे. यांचें कवित्व सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहीं आहे. तें सर्व हिंदी आहे (मे. अहवाल शके १८३४). यांचे अनेक चमत्कार प्रसिद्ध आहेत. हे माध्यंदिन शाखेचे यजुर्वेदी ब्राह्मण होते.

जनाजी आबाजी प्रभु—(आबाजी विश्वनाथ प्रभू पाहा).

जनाबाई—(समाधि स. १३५०) नामदेवाची दासी. नामदेवाच्या सहवासानें हीहि अभंग करी. हिचे अभंग फारच प्रेमळ आहेत. ही कोणत्याहि देवाचा धांवा कर-

तांना रंगून जाते. शेवटीं तर झाडलोट, दळणकांडण करण्यास विठोबा आपणास मदत करतो अशीहि हिची समजूत असे. हरिश्चंद्राख्यान, प्रल्हादचरित्र, कृष्णजन्म, बाळक्रीडा वगैरे हिचीं उपलब्ध प्रकरणें साधीं पण अत्यंत रसाळ आहेत.

गोदातीरीं गंगाखेड येथें दमा नांवाचा शूद्राच्या पोटीं हिचा जन्म झाला. आईचें नांव कर्दंड. आई मेल्यावर त्यानें हिला नामदेवांचे वडील दामा शेटजींना दिलें. ही तेथें असतां नामदेव जन्मास आले. त्यांना हिनें अंगाखांद्यावर खेळविलें, व शेवटीं तेच हिचे गुरु झाले. ही आपला उल्लेख 'नामयाची जनी' असा करिते. जुन्या ग्रंथांत हिचा समाधिकाल आषाढ व. १३, शके १२७२ असा दिला आहे. हिनें कांहीं कवित्व केलें, पण तें निर्भेळ स्वरूपांत उपलब्ध नाहीं. कारण त्यांत एकनाथादि उत्तरकालीन संतांचीं नांवें आढळतात.

जनार्दन—(स. १२५० सुमार) हा विजयानंदाचा शिष्य. रघुवंश व मेघदूत यांवरील एक टीकाकार. यानें 'तत्त्वालोक' नांवाचा वेदांतावर ग्रंथ लिहिला आहे. याचा हा तत्त्वालोक म्हणजे शारीरकभाष्याचा स्पष्टार्थ सांगणारा ग्रंथ होय. याचें नांव आनंदगिरि किंवा आनंदज्ञान असेंहि होतें. न्यायभूषण व तर्कसंग्रह नांवांचे याचे ग्रंथ आहेत. तर्कसंग्रह बडोदा ओ. सीरीजमध्यें प्रसिद्ध झालेला आहे. न्यायरत्नदीपालीवरील टीकेंत यानें नरसिंहदेव राजाचा निर्देश केला आहे. तो कलिंगाचा राजा (स. १२४५-६५) दिसतो. काव्यावरील टीकाकार व तत्त्वज्ञानावरील ग्रंथकार भिन्नहि असतील (कलकत्ता ओरि. जर्नल १, २०१-२०४).

जनार्दनपंत हणमन्ते—(मृत्यु स. १६८३) पिता नारायण. हा रघुनाथपंताचा भाऊ. शिवाजीनें याला सुमंताची जागा देऊन याची अष्टप्रधानांमध्यें योजना केली. शिवाजीच्या वेळचा शूर शिपाई व मुत्सद्दी. शिवाजीच्या महत्त्वाच्या घडामोडींत याचा संबंध आहे. शिवाजीशीं राज्यसंपादक म्हणून वागण्याचें हणमन्ते घराण्याचें नातें होतें. विजापूरच्या सीदी मसूदनें कर्नाटकांत बराच मुलूख शिवाजीस देऊन मोगलांशीं लढण्याकरितां त्याची मदत घेतली. त्या मुलखाची व्यवस्था त्यानें याच्याकडे सोंपविली. विजापूरच्या सर्जाखानास घेऊन दिलीरखान जेव्हां कर्नाटकांतील कोप्पळगडचा प्रदेश हस्तगत करण्यास गेला तेव्हां यानें त्याचा खरपूस समाचार घेतला (स. १६८०).

हा विरुद्ध वागतो म्हणून संभाजीनें शिवाजी मेल्यावर दहाबारा दिवसांत यास कैद केलें. पण पुढें याला सोडलें. हा रघुनाथपंत वारल्यावर एक महिन्यानें वारला (ता. २८-६-१३८३).

जनार्दन बाजीराव पेशवे—(जन्म ता. १०-७-१७३५-मृत्यु ता. २१-९-१७५०) हा बाळाजी विश्वनाथाचा नातू व नानासाहेब पेशव्याचा भाऊ. याची मुंज ता. २६-३-१७४० व लग्न भिडे यांच्या मुलीशीं ता. २०-४-१७४४ रोजी झालें. पत्नीचें नांव सगुणा. इतक्या अल्पवयांतहि यानें कांहीं महत्त्वाच्या कामांत भाग घेतलेला दिसतो.

जनार्दन शिवराम—(स. १७८०-९१) मद्रासच्या इंग्रजांकडील मराठ्यांचा वकील. दुसऱ्या माधवराव पेशव्यानें याची नेमणूक वकिलीचे कामावर केली. हा महाराष्ट्रीय ब्राह्मण असून याच्या बापाचें नांव शिवराम व आजाचें नांव कृष्णाजी होतें.

यानें स. १७८० ते १७९१ पर्यंतच्या काळांत मद्रासेहून पाठविलेलीं पत्रें सातारच्या म्यूझियममध्यें ठेवलेलीं आहेत. याचीं पत्रें फार उपयोगी असून त्यांमध्यें अगदीं बारीक गोष्टींचाहि उल्लेख आहे. हैदर, टिपू, निजाम, आर्काटचा नबाब, वेंकटगिरीचे नायक, व दक्षिण हिंदुस्थानांतील फ्रेंच व इंग्रज वगैरेंच्या राजकारणाविषयींची न मिळणारी माहिती यानें आपल्या कांहीं पत्रांत लिहून कळविली आहे. मद्रासचा गव्हर्नर लॉर्ड मार्कर्टने (Macartney) यास यानें इंग्रजीमध्यें लिहिलेलीं स. १७८५ सालचीं दोन पत्रें सांपडलीं आहेत (Journ. Ind. Hist., Vol. XI, 234; श्री. डी. बी. डिस्कळकर).

जनार्दनसुत—एक मराठी कवि. पदें केलीं (मं. वा. इ. श. १८३७ ले. १६४).

जनार्दनस्वामी—(स. १५०४-१५७५) एक महाराष्ट्र संतकवि. हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. खानदेशांतील चाळीसगांवचा देशपांडे. यांचा जन्म चाळीसगांवीं शके १४२६ मध्यें झाला. हे देवगडच्या मुसलमान किल्लेदाराचे कारभारी होते. हे गाणगापूरच्या नृसिंहसरस्वतीचे शिष्य. यांना दत्ताचा साक्षात्कार होता. यांनीं केलेली नृसिंहसरस्वतीची आरती प्रत्यहीं गाणगापुरीं म्हटली जाते. यांचीं पदें व अभंग उपलब्ध आहेत. हे शके १४९७ च्या सुमारास समाधिस्थ झाले. यांचे एका जनार्दन (एकनाथस्वामी) हे शिष्य होत. रामा, जनार्दन आणि जनीजनार्दन यांचा यांच्याशीं प्रत्यक्ष संबंध नाहीं. पंचीकरण नांवाचें एक कविताबद्ध प्रकरण

यांचें असावें (मं. त्रै. १२.२). याशिवाय श्रीदत्तस्तुति, उपदेश, समाधिप्रकरण हे ग्रंथ यांचे होत (सं. सू.).

जनाश्रय पुलकेशी वल्लभ—(स. ७३९) गुजराथेंतील तिसऱ्या चालुक्य घराण्यापैकी मंगळराजाचा भाऊ. ताजीक (अरब) लोकांनीं या सुमारास सिंध, काठेवाड वगैरे देशांत स्वाऱ्या केल्या. त्यानंतर ते नवसरी (गुजराथ)वर स्वारी करून गेले. त्या वेळीं या पुलकेशीनें त्यांचा पराभव करून त्यांना हाकलून दिलें (माबेल डफ).

जनीजनार्दन—(समाधि स. १८०१) मराठी कवि व साधु. उपनांव गोसावी. माध्यंदिनशाखा. मूळगांव बीड. तेथें वंशज आहेत. हे विजापूरकरांच्या पदरी असतां दुष्काळांत लोकांना धान्याची कोठारें लुटूं दिल्यामुळें नोकरी गेली. उपास्य गणपति. पैठणाजवळ गंगामसले येथें यांनीं गणपतीची स्थापना केली. यांचीं कांहीं वेदान्तपर, रामचरित्र व कृष्णचरित्रपर पदें उपलब्ध आहेत. कांहीं पदें हिंदी भाषेंतहि आहेत. यांचा निर्विकल्पग्रंथ यांनीं एका दिवसांत पुरा केला. ग्रंथ ओवीबद्ध असून कृष्ण व उद्धव यांच्या संवादात्मक आहे. याशिवाय महावाक्यविवरण व सीतास्वयंवर हे यांचे ग्रंथ होत. यांच्या मृत्युस्थानीं म्हणजे सरदाराचे भूमगांवीं व दुसरी बीडगांवीं शिष्यांनीं अस्थि नेऊन समाधि बांधली आहे.

जन्न—(स. १२०९) जैनधर्मी कानडी कवि. हा कम्मेवंशांतील होता. गोत्र काश्यप. गुरु गंडविमुक्त रामचंद्र देवमुनि. याचा पिता शंकर, हा होयसळ नारसिंहाचा कटकोपाध्याय होता. शंकराला सुमनोबाण अशी पदवी होती. आई-गंगादेवी. पत्नी-लकुमादेवी. मुलगा-रेचय. ग्रंथ-यशोधरचरित-अनंतनाथपुराण, शिवाय 'स्मरतंत्र' नांवाचा ग्रंथ लिहिला असावा असें मोहानुभवमुकुर (स. १४००) या ग्रंथावरून दिसतें. नरसिंह चोलाचा हा आस्थान कवि होता. शिवाय हा त्याचा सेनापति (दंडाधीश) व मंत्री होता. जन्न हा शब्द जनार्दन या शब्दाचा कानडी संक्षेप आहे. हा आपणास देशप्रभू (नाळप्रभु) जनार्दनदेव असें म्हणवून घेतो. यानें, जैनमंदिरें बांधलीं आहेत; आणि हा मोठा उदार होता. याला होयसळांपैकीं वीरबल्लाळानें (स. ११७३-१२२०) कविचक्रवर्ति अशी पदवी दिली होती व वीर नरसिंहाच्या वेळीं (स. १२२०-१२३५) यानें अनंतनाथपुराण लिहिलें (स. १२३०). स. ११९१ मधील चन्नरायपट्टणचा १७९ नंबरचा शिलालेख स. ११९७ मधील तरीकेरेचा ४५ नंबरचा शिलालेख यानें लिहिला आहे, असें त्या लेखावरून समजतें. याची कविता मधुर, गंभीर व सफाईदार आहे (क. क. च भा. १ पा. ३२९).

जन्नीकदेव—हा स. १२६९ पर्यंत गणपतीच्या व रुद्रम्बाच्या कारकीर्दीत मंत्री होता. याचा उल्लेख रुद्रदेवाच्या शिलालेखांत कृष्णा प्रांतांत गोपीनाथस्वामींच्या देवळांत शक ११९१ चा आढळतो.

२. (स. १२५९) हा म्हैसूरच्या कायस्थ घराण्यांतील गंगेयसाहिनींचा मुलगा. हा त्याचा मुलगाच होता किंवा काय याबद्दल संशय आहे.

जमशीद—काश्मीरचा राजा. शहामीरचा हा मुलगा. हा व याचा भाऊ शेरअली यांच्यामध्यें कलह होऊन याचा पाडाव झाला व शेरअलीस राज्य मिळालें.

जमशीद कुत्बशाहा—(स. १५४३-१५५०) गोवळकोंड्याच्या कुली कुत्बशाहाचा हा मुलगा.

विजापूरवर स्वारी करण्यासाठीं यानें बुऱ्हाण निजामास मदत केली. पण विजापूरचा सेनापति आसदखान यानें याचा पूर्ण पराभव केला. लहानमोठे पुष्कळ हिंदु राजे यानें आपल्या ताब्याखालीं आणिले. शेवटीं हा एकसारखा नाना प्रकारच्या विलासांत निमग्न राहूं लागला; आणि कांहीं भयंकर दुखणें येऊन स. १५५० त मरण पावला.

जमशीद बाहामनी—हुमायून बाहामनीचा पुत्र.

जमशेटजी बंमनजी—मुंबई येथें जहाजें बांधण्याचें काम करणारा धाडसी पारसी गृहस्थ (ऐ. च. पा. ११९).

जमालखान—(मृत्यु स. १७९८) मद्रासचा बॅरिस्टर जेम्स हालची पत्नी. पण ही संस्थानिकाजवळ राहून स्त्रियांचीं लष्करी पथकें तयार करी व स्वतःहि लष्करी थाटांत राही. म्हणून जमालखान नांवानें प्रसिद्ध झाली. ही प्रथम निजामाकडे होती. तेथून स. १७८८ च्या सुमारास पुण्यास आली; व एक पलटण उभारली. पण एका ब्राह्मण नोकरास फार मारल्यामुळें हिला लोहगडावर तुरुंगांत ठेवली. सात वर्षांनीं पेरानेंनें हिला सोडवलें (इ. सं. ३. २).

जमालशा—मूळ नांव विश्वनाथ. मनाचें समाधान होईना म्हणून गंगेंत जीव देऊं लागला असतां श्रीदत्तांनीं मलंगवेषानें तारिलें. तेव्हांपासून वेष फकीराचा. नांव बदलून जमालशा घेतलें. ग्रंथ-पदें. शिष्य-जनभट (सं. सू.).

जयकर्ण चालुक्य—(स. ११०२-११२१) कल्याणीच्या सहाव्या विक्रमादित्य चालुक्याचा हा मुलगा. हा आपणास 'त्रैलोक्यमल्ल' ही पदवी लावीत असे. याचा अल्पवयीच मृत्यु झाला.

जयकामदेव—हा नेपाळच्या ठाकुरी घराण्यांपैकीं लक्ष्मीकामदेवाच्या मागून गादीवर आला. त्याला मुलगा नसल्यामुळें नवाकोटच्या ठाकुरी घराण्यांतील हा पुरुष त्याच्या नंतर गादीवर आला.

जयकृष्ण—हा मौनी घराण्यांतील रघुनाथभट्टाचा मुलगा व गोवर्धनभट्टाचा नातू. यानें लघुसिद्धान्तकौमुदीवर एक टीका लिहिली (सिस्टिम ऑफ संस्कृत ग्रामर, पा. ५१).

जयकेशिन् कदंब—(स. १०५२) हा गोव्याच्या पहिल्या षष्ठदेव कदंबाचा मुलगा. स १०५२ मध्यें हा आपल्या बापानंतर गादीवर आला.

हा पश्चिम चालुक्य राजांचा प्रतिस्पर्धी होता. यानें अलुप आणि चोल यांना जिंकून कामदेवाची सत्ता झुगारून देऊन त्या ठिकाणीं चालुक्य-राज्य सुरू केलें. याच्यानंतर याचा मुलगा पहिला विजयादित्य हा गादीवर आला.

याची मुलगी गुजराथच्या कर्ण सोळंकीला दिली होती. तिचें नांव मयणल्लदेवी (मौनल किंवा मैनल). याचें सोमेश्वर चालुक्याशीं वैर होतें. हा चालुक्यांचा मांडलिक होता.

२. (मृत्यु स. ११४७) गोव्याच्या पहिल्या विजयादित्य कंदबाचा हा मुलगा.

कल्याणीच्या पश्चिम चालुक्य राजांचा हा प्रतिस्पर्धी होता. यानें पश्चिम चालुक्य राजा विक्रमादित्य ६ वा याच्या मुलीशीं लग्न लाविलें होतें. हा कोंकण, कवदिद्वीप, हय्य वगैरे देशांवर राज्य करीत होता. सिंद राजे आच २ रा व पेर्माडि १ ला यांनीं याचा पराभव केला.

स. ११४७ मध्यें हा मरण पावला. याच्यानंतर याचा मुलगा-शिवचित्त पेर्माडि (परमार्दिन्) हा गादीवर आला (B.). एके काळीं विष्णुवर्धन होयसळानें याचा पराभव केला होता (स. १११०).

३. (स. ११८७--१२१७) हा दुसऱ्या विजयादित्य कदंबाचा पुत्र. याची पत्नी महादेवी.

जयचंद्र गाहडवाल—(स. ११७०-११९३) हा कनोजच्या सम्राटांपैकीं शेवटचा राजा. याच्या पित्याचें नांव विजयचंद्र. विजयचंद्राच्या वेळींच सम्राटाचा मान अजमेरच्या चाहमानाकडे गेला होता.

पृथ्वीराजाशीं याची स्पर्धा होती. पण पृथ्वीराजापुढें याचें कांहीं चालत नसे. म्हणून शहाबुद्दीन घोरीची यानें मदत घेतली व मुसलमानी सत्ता हिंदुस्थानांत घेतली, असा याच्यावर आरोप आहे. शेवटीं त्यानें पृथ्वीराजाचा व याचाहि सर्वस्वीं नाश केला.

याची संयोगिता नांवाची रूपवती मुलगी स्वयंवर करण्यास सिद्ध झाली असतां यानें पृथ्वीराजाखेरीज सर्व राजांना स्वयंवराला बोलविलें; व पृथ्वीराजाचा एक पुतळा दारावर द्वारपाळ म्हणून करून ठेवला. पण संयोगितेनें त्या पुतळ्याच्या गळ्यांत माळ घालून पृथ्वीराजाला वरिलें; आणि पृथ्वीराजाहि सर्व राजांच्या संघांतून पराक्रमानें हिला घेऊन गेला, अशी प्रणयकथा लोकप्रिय आहे.

यानें राजसूय यज्ञ केला होता; व पृथ्वीराजानें त्याला हरकत केली होती. नैषधकाव्याचा कर्ता श्रीहर्ष याचा आश्रित होता. नयचंद्रसूरीनें रंभामंजरी नांवाची नाटिका केली आहे. तींत हा नायक आहे.

या घराण्याची दुसरी राजधानी बनारस होती. तीहि याच्या वेळीं लुटली व कत्तल केली गेली.

शेवटीं हा मुहम्मद घोरीशीं लढत असतां याचा हत्ती गंगेंत शिरला व हा बुडून मेला. जोधपूरचें सध्याचें राजघराणें आपणास याचे वंशज म्हणवितें.

जयतीर्थ—हे मध्वाचार्यांच्या वैष्णव सांप्रदायांतील एक प्रमुख आचार्य व विद्वान् ग्रंथकार. हे पंढरपूरजवळ मंगळवेढ्याचे देशपांडे होत. यांचें सगळें नांव धोंडो रघुनाथ देशपांडे असें आहे. यांच्या मातेचें नांव रखमाबाई. तेराव्या वर्षी यांचा विवाह झाला असून यांच्या पत्नीचें नांव भीमाबाई असें होतें.

हे सैन्यावरचे अधिकारी असतांना पंढरपूर येथें आले. तेथेंच मध्वाचार्यांचे चवथे शिष्य अक्षोभ्यतीर्थ यांचा मुक्काम होता. तेथेंच ऐन तारुण्यांत यांनीं अक्षोभ्यतीर्थापासून संन्यासदीक्षा घेतली; आणि यांना जयतीर्थ असें आश्रमनाम प्राप्त झालें. तरुण वयांत सर्व ऐश्वर्यें अनुकूल असतां यांनीं संन्यास घेतला, तेव्हां पत्नी, वडील वगैरे लोकांनीं यांना संन्यासापासून पुनः गृहस्थाश्रमांत आणण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा कांहींएक उपयोग न होतां यांनीं आपलें कार्य सुरू केलें.

यांचे ग्रंथ पाहतां त्यांवरून अगाध विद्वत्ता दिसून येते. पण यांनीं अध्ययन कोठें केलें वगैरे माहिती मिळत नाहीं. बाळपण व तारुण्याचा प्रारंभ सैन्यांत गेला असल्यामुळें लहानपणीं अध्ययन विशेष झालेलें नव्हतें. संन्यास घेतल्यानंतर यांनीं शास्त्रादिकांचें अध्ययन केलें असावें. यांनीं आपल्या तरल बुद्धीनें शास्त्रांचें सूक्ष्म अध्ययन केलें होतें यांत शंका नाहीं.

गुरूंच्या आज्ञेनें यांनीं संप्रदायवृद्धयर्थ देशोदेशीं संचार केला; आणि असंख्य जयपत्रें मिळवलीं. पुढें भीमानदीच्या तीरावर सरस्वतीची उपासना करून लेखणी व मध्वाचार्यांच्या ग्रंथावर टीका करण्याचा सरस्वतीदेवीचा आदेश यांना प्राप्त झाला. नंतर ककुर्विणी नदीच्या तीरावर गुरूंनीं समाधि घेतली, तेथें वृंदावन बांधून हे मरगोळास आले. आणि तेथील डोंगरावर बसून यांनीं आयुष्याच्या अखेरपर्यंत आपलें ग्रंथलेखनाचें काम केलें. आणि त्या ग्रंथामुळेंच यांचें नांव अजरामर झालें आहे.

यांनीं मध्वाचार्यांच्या बहुतेक ग्रंथांवर टीका लिहिली आहे. भगवद्गुणगान करणारीं स्तोत्रें मात्र वगळलेलीं आहेत. दशोपनिषद्भाष्यावरहि यांची टीका आहे. या टीकाग्रंथामुळें टीकाचार्य असेंहि यांना लोक म्हणतात. या टीकांशिवाय प्रमाणपद्धति वगैरे द्वैतमताचे आधारभूत असेंहि कांहीं सुंदर ग्रंथ यांनीं निर्माण केले आहेत. ही सर्व ग्रंथरचना अक्षोभ्यतीर्थ समाधिस्थ झाल्यावर झाली. यरगोळच्या डोंगरावरील गुहेंत राहून यांनीं ही ग्रंथरचना केली. हे ग्रंथरचना चालू असतां यदृच्छाप्राप्त भिक्षान्न सेवन करीत असत. शेवटीं जवळच नदीचे कांठीं मालखेड येथें यांनीं देह ठेवला. मालखेड हें गांव जी. आय. पी. च्या वाडी-स्टेशनजवळ आहे. तेथें यांची पुण्यतिथि दरसाल आषाढ वद्य ५ स होते.

यांच्या चरित्रासंबंधीं बरीच वेगळाली माहिती मिळत असली तरी जयतीर्थविजय हा पंचसर्गात्मक काव्यग्रंथ बराच विश्वासार्ह दिसतो. त्यांत विद्यारण्याचे हे समकालीन होते असें म्हटलें आहे. मध्वाचार्यानंतर ४९ वर्षांनीं हे पीठाधिपति झाले व यांनीं २२ वर्षे पीठाधिपत्य केलें. म्हणजे यांच्या पीठाधिपत्याचा काल भांडारकरांच्या मतें स. १३३५-१३४७ अगर मध्वाचार्यांचे इंग्रजी चरित्रकार पद्मनाभाचार्यांच्या मतें स. १३६६-१३८९ असा आहे.

वर निर्देश केलेल्या शिवाय यांच्या कांहीं प्रसिद्ध ग्रंथांचीं नांवें:—

(१) तत्त्वप्रकाशिका, (२) सुधा (द्वैतवेदांतावरील अत्यंत मान्य असा हा ग्रंथ आहे).

जयतुगिदेव परमार--(मृ. स. १२५६) माळव्याच्या परामारांपैकीं देवपालाचा ज्येष्ठ पुत्र. याचे दोन शिलालेख मिळाले आहेत त्यापैकीं राहतगड येथें वि. सं. १३१२ मधील (इंडि. ॲंटि. २०.८४) व दुसरा वि. सं १४ म्हणजे १३१४ मधील मिळाला आहे. दुसऱ्या लेखांत १३ हा आंकडा सोडलेला आहे. तो कोटा राज्यांतील अद्रु येथें सांपडला (भारतीय प्राचीनलिपिमाला, पृ. १२२ वरील ६). मेवाडांतील गुहिलवंशी राजा जैत्रसिंह याच्याशीं बांसवाडा राज्यांतील अर्थूणा येथें लढला होता.

जगत्पाळ--(जैत्रपाळ पाहा).

जयदामा क्षत्रप--(स. १२५) चष्टनचा पुत्र. हा चष्टन जिवंत असतांनाच मेला. याचा पुत्र रुद्रदामा.

जयदेव—(स. ९५० सुमार) यानें छंदःशास्त्र लिहिलें. अभिनवगुप्तानें याचा उल्लेख आपल्या ग्रंथांत केलेला आहे. यावरून अभिनवगुप्ताचे पूर्वी म्हणजे स. ९५० च्या सुमारास जयदेवाचा काल असला पाहिजे. तेराव्या शतकांतील गीतगोविंदाचा कर्ता जयदेव व पीयूषवर्ष किंवा पक्षधरमिश्र जयदेवाहून हा भिन्न होय.

हर्षटानें याच्या छंदःशास्त्रावर टीका लिहिलेली आहे. त्या टीकेची आणि जयदेवाच्या छंदःशास्त्राची नकल एकाच वेळीं म्हणजे स. ११३३ मध्यें झाली असावी. कारण वरील दोन्ही प्रती एकाच ठिकाणीं किलहॉर्न यास सांपडल्या (The Poona Orientalist, Vol. I, No. I, pages 33–37).

२. (स. १२०० नंतर) संस्कृत भाषेंतील सुप्रसिद्ध कवि. हा जगन्नाथपुरी प्रांतांत बिंदुबिल्व (जि. बीरभूम) या गांवीं जन्मला. याच्या पित्याचें नांव श्रीभोजदेव, मातेचें नांव राधादेवी किंवा रमादेवी होतें आणि पत्नीचें नांव पद्मावती होय. हा परम कृष्णभक्त असून यांचें 'गीतगोविंद' नांवाचें काव्य सुप्रसिद्ध आहे. चंद्रदत्तकृत भक्तमालेंत ३९-४१ सर्गांमध्यें याची माहिती आलेली आहे. पण ऐतिहासिक दृष्ट्या ती कितपत बरोबर आहे याबद्दल शंका आहे. बंगदेशाचा राजा लक्ष्मणसेन याच्या सभाद्वारावर एक शिलालेख आहे. त्यांत हा त्याच्या पदरीं होता असा निर्देश आहे. त्यावरून हा लक्ष्मणसेनाच्या काळीं होता असें ठरतें. म्हणजे याचा काळ अकराव्या शतकांत ठरतो.

याचे गीतगोविंद नांवाचे काव्यांत कृष्ण व गोपगोपी यांच्या लीला मनोवेधक रीतीनें वर्णिल्या आहेत. शिवाय याच्या काव्यांतील विशेष म्हणजे त्या रागदारीनें गातां येतात हें होय. याच्या अष्टपद्या गवयांकडून पुष्कळ ठिकाणीं ऐकावयास मिळतात.

गीतगोविंदावर कुंभराजाची रसिकप्रिया आणि शंकरमिश्राची रसिकमंजरी अशा टीका आहेत. याचीं देशी व परदेशी अनेक भाषांत भाषांतरें झालीं आहेत.

३. नामदेवाचा हा एक पंजाबांतील अनुयायी होय.

जयदेव परचक्रकाम—लिच्छवी घराण्यांतील दुसऱ्या शिवदेवाचा मुलगा. स. ७५८ मध्यें हा आपल्या बापानंतर पूर्व नेपाळच्या गादीवर आला. यानें गौड, ओरिसा, कलिंग आणि कोसल या देशांचा राजा जो हर्षदेव त्याच्या मुलीशीं लग्न लाविलें (B).

जयदेय पीयूषवर्ष--(स. १२००-१३०० सुमार) याच्या पित्याचें नांव महादेव व आईचें नांव सुमित्रा. प्रसन्नराघव नाटकाच्या प्रारंभीं व चंद्रालोकांत तसा स्पष्ट उल्लेख आहे (१. १४-१६५). हा न्यायशास्त्रांतहि निष्णात होता. गीतगोविंदकार जयदेवाहून हा निराळा आहे. याला अमृत वर्षाव करणारा अशा अर्थाचें पीयूषवर्ष हें उपपद होतें. चंद्रालोकावर गागाभट्टाची राकागम नांवाची टीका असून तींत पीयूषवर्ष हें जयदेवाचेंच दुसरें नांव होतें असें स्पष्ट म्हटलें आहे (मद्रास सरकारची हस्तलिखित ग्रंथावली, स. १९१८, पा. ८६५३ क्रमांक, ११८७७). केशवमिश्रकृत अलंकारशेखरांत (पान १७) कोणा जयदेवपंडिताचा उल्लेख असून त्यानें उत्कल देशाच्या राजाच्या सभेंतील पंडितांना आपल्या कुशल तर्कपद्धतीनें जिंकिलें असें म्हटलें आहे. हा उल्लेख वरील चंद्रालोककार जयदेवाचाच बहुधा असला पाहिजे. कारण हा तर्कवादकुशल असल्याचा प्रसन्नराघवांत निर्देश आहेच. शिंगभूपालाच्या रसार्णवसुधाकर या ग्रंथांत (पा. २५८, २७७) प्रसन्नराघवाचा नांवानें निर्देश आलेला आहे. तो ग्रंथ स. १३३० च्या सुमाराचा आहे. पीयूषवर्ष जयदेवालाचा पक्षधर म्हणत. हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिकमध्यें याची पुढील अधिक माहिती दिली आहे याचा जन्म दरभंग्याचे पूर्वेस १६ मैलांवर कमला नदीचे तीरावर असलेल्या सैसवगांवीं झाला. चुलता हरिमिश्रच याचा गुरु होता, असें तत्त्वचिंतामण्यालोकाच्या प्रारंभीं लिहिलेल्या ओळीवरून दिसतें. याचे न्यायशास्त्रांतील ग्रंथ-१ तत्त्वचिंतामण्यालोक, २ द्रव्यपदार्थ (द्रव्यकिरणावलिप्रकाशावरील), ३ लीलावतीविवेक (लीलावतीप्रकाशावरील). याचे दोन शिष्य-१ वासुदेवमिश्र (जयदेवाचा पुतण्या), २ रुचिदत्तमिश्र.

जयदेवमल्ल—हा नेपाळच्या ठाकुरी घराण्यांतील अभयमल्लाच्या मागून गादीवर आला. यानें शाखावालच्या मदतीनें नेवारा शक स. ८७९ मध्यें सुरू केला. हा कांतिपूर व ललितपट्टण येथें राज्य करीत असे.

जयदेवमिश्र—हा काश्मीराकडील कवि होता. यानें 'शब्दावलोक' नांवाचा व्याकरण विषयावर ग्रंथ रचिला (बुल्हर. का. शो.).

जयद्रथ—एक काश्मीरी कवि. महामहेश्वराचार्य व राजन् अशीं दोन नांवें यास होतीं. हा जयरथ कवीचा भाऊ असून कल्हणच्या मागून झाला. यानें 'हरचरितचिंतामणि' नांवाचा ग्रंथ संस्कृतांत लिहिला.

जयपाल—(स. ९६०-१००१) पंजाबचा राजा. हा काबूलच्या शाही घराण्यांतील भीमदेवाचा मुलगा. हा जातीनें ब्राह्मण होता. याचें राजधानीचें शहर सिंधूच्या पश्चिम किनाऱ्यावरील वहिंडा हें होतें. याच्या राजधानीच्या गांवाविषयीं निरनिराळीं मतें आहेत. परंतु आमच्या मतें त्याची राजधानी वहिंडा हीच होती. हा मोगलांपैकीं दत्तकुलांतील असून ह्याचें गोत्र भारद्वाज होतें.

ह्याची आणि सबक्तगिनाची स. ९८० चे सुमारास लढाई झाली. तींत याचा पक्ष जोरदार असल्यामुळें याच्या पुढें सबक्तगिनाचें कांहीं चालूं शकलें नाहीं. पण त्यानें पुनः याच्या मुलखावर स्वारी केली व त्या स्वारींत लोकांची कत्तल, जाळपोळ, देवळें पाडून मशिदी उभारणें इत्यादि गोष्टी केल्या.

पुढें स. १००१ मध्यें महमूद गझनीनें स्वारी केली. तेव्हां याचा पूर्ण पराभव झाला; व महमूदानें पुष्कळ सरदार व खुद्द जयपाल यास कैद केलें.

पुढें यानें आपलीं दोन मुलें ओलीस म्हणून महमूदाकडे ठेवलीं व स्वतःची सुटका करून घेतली. ह्याला झालेल्या पराभवाबद्दल फार वाईट वाटून ह्यानें अग्निकाष्ठें भक्षण करून प्राणत्याग केला. पुढें महमुदानें याचा मुलगा आनंदपाळ यास सोडून दिलें; व तो गादीवर बसला.

जयभट—(२ इंद्र राष्ट्रकूट पाहा).

जयमगोंड—यानें कलिंगत्तुपरणी हें तेलगू काव्य केलें असून तें विक्रम चोलाला अर्पण केलें आहे.

२. राजाधिराज चोलाचें नामांतर.

जयमल्ल राठोड—(२ उदयसिंग व टॉड पाहा).

जयरथ शृंगार—काश्मीर प्रांतांतील तत्त्ववेत्ता. हा स. १२०० च्या सुमारास उदयास आला. अभिनवगुप्ताच्या तंत्रालोक नांवाच्या ग्रंथावर यानें 'तंत्रालोकविवेक' नांवाची टीका लिहिली. याचा भाऊ जयद्रथ यानें रुय्यकाच्या अलंकारसर्वस्वावर अलंकारविमर्शिणी नांवाची टीका लिहिली.

जयराम—रमल ज्योतिषी. रमलामृत ग्रंथाचा कर्ता. ग्रंथकाल शके १६६७. औदिच्य ब्राह्मण (भा.ज्यो.४८९).

२. कादंबरीनीतिसाराचा टीकाकार.

जयराम घाटगे—दुसऱ्या रघूजी भोसल्याचे वेळेस त्याचा हा जबलपूरचा सुभेदार होता. हा सुभेदारीवर

असतां पेंढाऱ्यांनीं जबलपूरवर हल्ला करून याची मोठी दुर्दशा केली (ना. प्रां. इ. पृ. ३७१).

जयराम तर्कालंकार—(स. १७०३) याचा जन्म पूर्वबंगाल्यांत पबन जिल्ह्यांत झाला. याचा बाप पुतिआ हा दरबारचा पंडित होता. हा गदाधराचा शिष्य असून यानें स. १७०३ मध्यें शक्तिवादावर टीका लिहिली (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४८३).

जयरामजजांकित—(स. १८०६) या मराठी कवीचे 'साधुलक्षण,' 'पतिव्रता-स्तुति', 'सीतेचा व द्रौपदीचा धांवा',-'साधुमाहात्म्य', 'होरि-फाग' वगैरे लहान लहान ग्रंथ आहेत. या कवीचें भाषाप्रभुत्व नामांकित आहे. यानें केलेल्या काव्यांत शेवटच्या बाजीरावाबद्दल स्तुतिस्तोत्रें आहेत. हा कवि स.१८०६च्या सुमारास होता असें दिसतें. या कवीचीं कांहीं हिंदी कवनेंहि आहेत (मं. त्रै. ३.१).

जयराम न्यायपंचानन—(स. १७०० सुमार) हा रामभद्र सार्वभौमाचा शिष्य होता. यास न्यायपंचाननाचे ऐवजीं कधीं कधीं नुसतें पंचानन असेंहि म्हणतात. जोधपूरच्या अजितसिंहाच्या कारकीर्दीत स. १७१२ त भीमसेन दीक्षितानें लिहिलेल्या 'अलंकारसारस्थिति' व 'एकषष्टियअलंकारप्रकाश' या ग्रंथांत जयराम व देवनाथ तर्कपंचानन हे दोघे तर्कशास्त्रांतील प्रमाण होते असें म्हटलें आहे.

ज्याला नडिया येथील पंडितांकडून 'नवद्वीपाधिपति' अशी वंशपरंपरा चालणारी पदवी मिळाली होती त्या कृष्णनगर येथील राजा रामकृष्णाच्या आश्रयास जयराम असे. याचे ग्रंथ-(१) तत्त्वचिंतामणि-दीधिति-गूढार्थ-विद्योतन. शिरोमणीच्या दीधितीवरील उपटीका. (२) तत्त्वचिंतामण्यालोकविवेक. जयदेवाच्या आलोकावरील उपटीका. (३) न्यायसिद्धांतमाला (गोतमाच्या न्यायसूत्रांतील सूत्रें ४ ते ७ वरील टीका). (४) शब्दार्थमाला.

वैशेषिक तत्त्वज्ञानावर यानें खालील ग्रंथ लिहिले आहेत:— (५) गुण-दीधिति-विवृति. उदयनाचार्याच्या किरणावलीवरील टीकेवरील उपटीकेवरील उपटीका. (६) न्याय-कुसुमांजलि-कारिका-व्याख्या (उदयनाचार्याच्या कारिकेवरील टीका). (७) पदार्थ-भणि-माला अथवा पदार्थमाला-(हा जयरामाचा सर्वांत उत्तम ग्रंथ आहे. यावर जनार्दनव्यास व लौगाक्षिभास्कर यांनीं टीका लिहिल्या आहेत). (८) मम्मटाच्या काव्य प्रकाशावर यानें काव्यप्रकाश-तिलक नांवाची टीका लिहिली (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४७७-७८).

जयरामस्वामी—(स.१५९९-१६७२) कृष्णाप्पास्वामींचे शिष्य. गांव-कात्राबाज मांडवगण. उपनांव-कसरे. पिता-भिकाजी. माता-कृष्णाबाई. ग्रंथरचनास्थळ-वडगांव. हे मोठे सरस कवि होते.

ग्रंथ-दशमस्कंधटीका, रुक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर, अपरोक्षानुभव, शांतिपंचीकरण, ज्ञानीभक्तसंवाद, शिवाय पदें वगैरे. यांचे अनेक शिष्य आहेत.

२. हे पुणें प्रांताचे राहणारे होते. यांच्या उपलब्ध असलेल्या ग्रंथावरून हे व वरील रामदासी जयरामस्वामी असे एकच असावे अशी शंका येते.

ग्रंथ-जयबोध (दासबोधाची टीका) (सं. सू.).

जयरामात्मज—(स. १७०० नंतर) एक महाराष्ट्र संतकवि. हा गोसावीनंदनाच्या मागाहून होऊन गेला. यानें कोकिळगंगाधर, राघवचिद्घन, श्रीधर, अनंत यांचा आपले संतमालिकेंत उल्लेख केला आहे. याचे संतमालिका, द्रौपदीचा धांवा, घडियाळे, अंबेची आरती, रासमंडळ वगैरे ग्रंथ आहेत.

जयवर्मा कदंब—बनवासीच्या विजयवर्मा कदंबाचा पुत्र.

२. बनवासीच्या चट्ट कदंबाचा पुत्र.

३. एक अज्ञातवंशांतील राजा. विक्रमसंवत् ४६१ (स. ४०४) मधील मंदोसर येथें मिळालेल्या शिलालेखांत यास नरेंद्र (राजा) म्हटलें आहे.

जयवर्मा परमार—माळव्याच्या परमारांपैकीं यशोवर्म्याचा पुत्र. हा नांवाचा राजा होता. हा गुजराथच्या राजाच्या ताब्यांत होता. याचें नांव कांहीं ताम्रपत्रांत गाळलें आहे.

२. माळव्याच्या देवपाल परमाराचा दुसरा मुलगा. याचा एक शिलालेख वि. सं. १३१४ माघ वद्य १ मधील व एक दानपत्र वि. सं. १३१७ ज्येष्ठ शुद्ध ११ मधील मंडपदुर्ग म्हणजे मांडू येथून दिलेलें मिळालें आहे. त्यांत याच्या सांधिविग्रहिकाचें नांव मालाधर पंडित व महाप्रधानाचें नांव राजा अजयदेव असें दिलें आहे.

जयसिंह—(स. ७१७-७२४) सिंधच्या दाहीर राजाचा मुलगा. दाहीर मारला गेल्यावर यानें मुहम्मदास तोंड देण्याचा प्रयत्न केला. बहामनाबादेहून हा चित्तूरकडे हटला तेव्हां याच्या आईनें म्हणजे राणीबाईनें जोहार केला. पण दुसऱ्या लाडी नांवाच्या आईनें मुहम्मदाशीं निकाह लावला. मुहम्मदच्या जागेवर आलेल्या उमरनें याला

मुसलमान बनविलें. यानें खलीपाचीं मनधरणी केली असतांहि उमरच्या पुढला सुभेदार जुनैदनें स्वारी करून यास ठार केलें. याचा भाऊ छंच यानें जुनैदच्या विश्वासघाताबद्दल तक्रार चालविली असें दिसतांच त्यालाहि जुनैदनें ठार केलें.

२. (स. १७६३-१८३३) एक हिंदी कवि. रींवाचा राजा. अठरा ग्रंथ केले. रचना सरस. मोठा भगवद्भक्त वैष्णव.

ग्रंथ—कृष्णतरंगिणी, हरेचरितामृत, निर्णयसिद्धांत, गंगालहरी, हरिचरित्रचंद्रिका.

जयसिंह (मीर्झा) कच्छवाह— (स. १६२१-१६६७) मानसिंगाच्या वंशांतील हा प्रसिद्ध राजा असून अंबेर (अंबर) येथें राज्य करीत होता. मारवाडचा जसवंतसिंह व राजसिंह या तिघांचा त्या वेळीं एक विचार होता. मानसिंहाचा भाऊ जगत्सिंह याचा हा नातू होय. शहाजहान व औरंगझेब यांच्या पदरीं याचें वजन चांगलें होतें. शिवाजीस दिल्लीस नेण्याचें काम यानें युक्तीनें बजाविलें; व पुढें विजापूरच्या मोहिमेंत अपयश आल्यावरून बादशहानें याचा अपमान केला. तेव्हां दक्षिणेंतून परत येत असतां हा रस्त्यांत बऱ्हाणपुर येथें १२-७-१६६७ त मरण पावला.

जयसिंह (सवाई) कच्छवाह--(स. १६६९-१७४३) हा अंबरचा महासिंह कच्छवाहचा मुलगा. हा फार विद्वान् होता. यानें चव्वेचाळीस वर्षे राज्य केलें. चोहोंकडे बेबंदशाही सुरू असतां यास युद्धप्रसंग करून रजपुतांचें शौर्य दाखविण्यास पुष्कळ जागा होती. तरी शांततेनें व शहाणपणानें लोकांच्या कल्याणार्थ झटण्यामध्येंच याचें कर्तृत्व व्यक्त झालें. यानें राज्यास सुव्यवस्था लावून दिली, चांगले कायदे केले, शास्त्राध्ययनास उत्तेजन दिलें. यानेंच जयपूरच्या शहराची हल्लीची बांधणी स. १७२८ त तयार केली. याच्यापाशीं विद्याधर नांवाचा एक हुशार व विद्वान् बंगाली गृहस्थ होता. त्याच्या साहाय्यानें हा राज्यांतील सर्व सुधारणेच्या गोष्टी करीत असे. दिल्ली, उजनी, जयपूर, बनारस, मथुरा वगैरे ठिकाणीं यानें वेधशाळा व ज्योतिषशाळा स्थापिल्या. ग्रहांचे शोध लावण्याचीं नवीन यंत्रें यानें बनविलीं. बिनचूक वेध घेऊन यानें एक नवीन पंचांग चालू केलें. शास्त्रीय शोधांशिवाय रस्ते, धर्मशाळा वगैरे अनेक कामें प्रजेच्या हितार्थ यानें केलीं. हा लोकोत्तर राजा झाला असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. काशींतील भट्टकुलोपैकी रत्नाकरभट्टानें जयसिंहाच्या आज्ञेवरून जयसिंहकल्पद्रुम हा ग्रंथ लिहिला.

हा स. १७४३ त मरण पावला. हा दिल्लीकराचा सेनापति असून आंतून थोरल्या बाजीरावास साहाय्य करीत असे (पे. द. १४; अमीरखान पाहा). याचा थोरल्या शाहूशीं घरोब्याचा संबंध होता. हा स. १७०९त माळव्याचा नाझीम होता. ईश्वरसिंग याचा पुत्र होय.

सिद्धान्तसम्राट् या याच्या ग्रंथांत यास मत्स्यदेशाधिपति म्हटलेलें आहे. भारतीय मुसलमानी आणि युरोपियन ज्योतिषग्रंथांप्रमाणें दृक्प्रत्यय येत नाहीं म्हणून यानें नव्या वेधशाळा स्थापना केल्या आणि नवीं वेधयंत्रें करून वेध घेण्याचें यानें ठरविलें. त्याप्रमाणें जयपूर, इंद्रप्रस्थ, उज्जयनी, काशी, मथुरा येथें वेधशाळा स्थापिल्या. धातूंचीं यंत्रें लहान असतात व तीं झिजतात, वगैरे कारणांनीं यानें वेधोपयोगी अशीं पाषाणाचीं आणि चुन्याचीं मोठमोठीं बळकट यंत्रें तयार केलीं. त्यांत जयप्रकाश, यंत्रसम्राट्, भित्तीयंत्र, वृत्तषष्ठांश, इत्यादि कांहीं यंत्रें नवीं कल्पिलीं. त्यावर ७-८ वर्षे उत्तम ज्योतिष्यांकडून वेध घेऊन सिद्धान्तसम्राट् हा ग्रंथ संस्कृत भाषेंत आणि झिजमुहम्मद हा ग्रंथ अरबी भाषेंत लिहिला. त्या वेळीं दिल्लीचा बादशाह मुहम्मदशाह मोगल होता. त्याचें नांव वरील अरबी ग्रंथास दिलेलें आहे. तो ग्रंथ शा. श. १६५० मध्यें लिहिला. नंतर सिद्धान्तसम्राट् हा ग्रंथ जगन्नाथ नांवाच्या पंडिताकडून लिहून घेतला (स. १७३१). झिजमुहम्मदाला मिजस्ती असें म्हटलें आहे. त्यांत १३ अध्याय व १४१ प्रकरणें आहेत; व १९६ क्षेत्रांचा त्यांत विचार केलेला आहे. उलुखबेग इत्यादिकांचे कांहीं प्राचीन वेध घेऊन त्यांच्या व स्वतःच्या वेधांच्या तुलनेनें ग्रहगत्यादिक यानें काढलेलीं आहेत. हा ग्रंथ संपूर्ण स्वरूपांत शं. बा. दीक्षितांना मिळालेला नव्हता. याच्या वेधशाळा, वेध आणि ग्रंथ व त्यांतल्या अपूर्व गोष्टी यांचें सविस्तर वर्णन केलें तर एक ग्रंथच लिहावा लागेल. येथें इतकें सांगणें पुरे कीं, त्या वेळीं युरोपखंडांत ग्रहगतिस्थितीविषयीं जितकी सूक्ष्मता काढतां येत होती तीपेक्षांहि यानें अधिक सूक्ष्मता साधली होती, ही गोष्ट आपल्यास अत्यंत अभिमानास्पद आहे. याच्या पदरीं जरी अनेक पंडित होते व त्यांना परदेशीं पाठवूनहि हा माहिती आणीत असे, तथापि हा स्वतःहि वेधकुशल, गणितज्ञ, ज्योतिषज्ञ, आणि नवीन शोध करण्यांत कुशल असा होता. यानें आपल्या सिद्धान्तसम्राट् ग्रंथांत प्राचीन संस्कृत ग्रंथांचा निर्देश केलेला आहे. त्याचप्रमाणें

तैमूरलंगाचा नातू उलूघबेग याचा ग्रंथ (श. १३५९), बुझनस्सर याचा ग्रंथ, रोमकसिद्धान्त आणि बतलमजूस व अवरखस या यवनाचार्यांचाहि उल्लेख आहे.

युक्लिडच्या भूमितीच्या पुस्तकांचा संस्कृत ग्रंथ याच्या आज्ञेनें जगन्नाथानें केला (श. १६४१). रेखागणित असें त्याचें नांव आहे. कटर या नांवाचा आणखी एक ग्रंथ यानें नयनसुखोपाध्यायाकडून करविला आहे. तो युक्लिडच्या ग्रंथासारखाच, परंतु स्वतंत्र आहे. हा ग्रंथ अरबीमधून संस्कृतांत केलेला आहे (भा.ज्यो.२९२-९५).

याचे ग्रंथ आतां कोणी अभ्यासीत नाहींत, पण वेधशाळा उपयोग करण्यासारख्या स्थितींत ठेवल्या आहेत.

जयसिंह कदंब—जयवर्मा कदंबाचें नामांतर.

जयसिंह कलचुरी—(स. ११७०-८०) हा गयकर्णाचा पुत्र. याची राणी गोसलदेवी.

जयसिंह चालुक्य—(स. ५००) हा चालुक्यांचा मूळपुरुष. या घराण्याची पहिली राजधानी इंदुकांती. याच्या वंशांपैकीं दुसऱ्या पुलकेशीनें बदामी येथें राजधानी करून पश्चिमचालुक्य घराणें सुरू केलें; आणि त्याचा भाऊ कुब्ज विष्णुवर्धनानें वेंगी येथें पूर्वचालुक्य घराणें सुरू केलें. आणि जयसिंह नांवाच्या भावानें गुजराथमध्यें राज्य सुरू केलें.

२. (स. ६७१-९२) हा पहिल्या कीर्तिवर्मा चालुक्याचा पुत्र. यानें गुजराथमध्यें राज्य मिळवून चालुक्यांची शाखा सुरू केली. याला धराश्रय म्हणत. याचा पुत्र बुद्धवर्मा (विजयराज सोळंकी पाहा). यालाच कांहीं ठिकाणीं दुसऱ्या पुलकेशीचा पुत्र म्हटलें आहे. याला जगदेकमल्ल असेंहि म्हणतात. याच्या बायकोचें नांव सुग्गलादेवी होतें. यानें माळवा (भोजराज) व सप्तकोंकण घेतल्याचा उल्लेख आढळतो.

जयसिंह (पूर्व) चालुक्य—(स. ६३३-६६३) हा कुब्ज विष्णुवर्धनाचा पुत्र. याला सर्वासिद्धि व वल्लभ वगैरे पदव्या होत्या.

२. (स. ६९६-७०९) हा मंगीचा वडील मुलगा.

जयसिंह (पश्चिम) चालुक्य—(स.१०१८-१०४३) याच्या बापाचें नांव दशवर्मा (यशोवर्मा) आणि आईचें नांव भाग्यवती असें होतें. कल्याणीच्या पश्चिम चालुक्य घराण्यांतील जो विक्रमादित्य ५ वा अथवा अय्यण २ रा त्याचा हा भाऊ होय. स. १०१८ मध्यें हा आपल्या भावानंतर गादीवर आला.

यानें चोल राजा राजेंद्र चोल १ ला व चेर यांचा पराभव केला आणि परमार राजा भोज-देव याच्यावर स्वारी केली. कदम्ब घराण्यांतील याची बहिण अक्कादेवी हिचा मुलगा तोयिम-देव, आणि जयकेशिन्, इरिविबेडंग मारसिंह हे जयसिंहाचे प्रतिस्पर्धी होत. यानें स. १०४० पर्यंत राज्य केलें. यादव घराण्यांतील (सेऊणदेश येथील) जो भिल्लम २ रा त्याचें व याचें स. १०२५ च्या सुमारास भांडण होतें.

स. १०४४ मध्यें याचा मुलगा सोमेश्वर १ ला हा आपल्या बापानंतर राज्य करीत होता (B).

२. (स. १०७९-१०८१) कल्याणीच्या पश्चिम चालुक्यांपैकीं पहिल्या सोमेश्वराचा मुलगा. बनवासीचा प्रतिनिधि म्हणून प्रसिद्ध आहे.

जयसिंह चौहान—जालोरच्या मालदेव सोनगरे चौहानाचा हा मुलगा. राणा हंमीरानें याच्यापासून चितोडचें राज्य घेतलें. याला जेसा म्हणत.

२. सीसोदें येथील राणाशाखेपैकीं हा भीमसिंहाचा पुत्र. याचा पुत्र लक्ष्मसिंह.

जयसिंह परमार—(स. १०५५-१०५९) माळव्याच्या परमारांपैकीं भोजाचा उत्तराधिकारी. भोजाच्या मृत्युसमयीं धारानगरी शत्रूंच्या ताब्यांत होती. पण ते परत गेल्यावर हा माळव्याचा राजा झाला. याचें एक दानपत्र वि. सं. ११११२ (स. १०५५) मधील मिळालें आहे (एपि. इंडि. भा. ३ पृ. ४८-५०). तसेंच याचा एक शिलालेख वि. सं. १११६ मधील बांसबाडा राज्यांत पाणहेडगांवीं मंडलीश्वराच्या मंदिरावर लावलेला आहे. त्यांत याच्या शौर्याबरोबर याचा सामंत बागडचा परमार मंडलिक (मंडन) याबद्दल लिहिलें आहे कीं, त्यानें अत्यंत समर्थ सेनापति कन्ह याला पकडून त्याचे हत्तीघोडे यासह याला सुपूर्त केले (शिलालेख अप्रसिद्ध). कन्ह कोणाचा सेनापति होता, हें अद्यापि समजलें नाहीं. वि. सं. १११६ च्या नंतर फार वर्षे यानें राज्य केलें नसावें.

२. (जयतुगिदेव पाहा).

३. (स. १२६८) हा माळव्याच्या परमारांपैकीं दुसऱ्या जयवर्म्याचा उत्तराधिकारी. वि. सं. १३४५ मधील कोटा राज्यांत कवाळजीच्या कुंडावर एक शिलालेख आहे. तो रणथंभोरचा हंमीर चौहानच्या वेळचा आहे. त्यांत लिहिलें आहे कीं, हंमीरच्या पिता जैत्रसिंह यानें (मंडप) मांडूच्या जयसिंहाला खूप त्रास दिला. माळव्याच्या या राजाच्या योद्धयांना झपायताच्या घाटांत पराभूत केलें; आणि रणथंभोर येथें कैदेंत ठेवलें. याच्या वेळचा एक शिलालेख वि. सं. १३२६ वैशाख शुद्ध

सप्तमीचा मिळाला आहे (एपि. इंडि. ५. परिशिष्ट ले. २३२).

४. (स. १३०८-१३४२ सुमार) माळव्याच्या परमारांपैकीं दुसऱ्या भोजाचा उत्तराधिकारी. याच्या वेळचा एक शिलालेख ग्वाल्हेर राज्यांत उदयपुर येथें मिळाला आहे. तो वि. सं. १३६६ श्रावण वद्य १२ चा आहे (इंडि. अँटि. २०.८४). याच्या शेवटच्या दिवसांत सारा माळवा मुसलमानांच्या ताब्यांत गेला. त्यामुळें हिंदु राजांची स्थिति सरदारांसारखी झाली. क्वचित् वर डोकें काढीत.

जलालुद्दीन फीरूजशाह खल्जीनें वि. सं. १३४८ मध्यें उज्जयनी जिंकली व मंदिरें फोडलीं (ब्रिग, फिरस्ता १.३०१; इलियट ३ १४७). नंतर पुनः दोन वर्षांनीं माळवा लुटला. त्याचा पुतण्या अलाउद्दीननें भेलसा सर करून माळव्याचा पूर्वेकडील भाग जिंकला. अनुमानतः मुहम्मद तुघ्लकच्या वेळीं माळव्याचें परमारराज्य संपलें. 'मिरातें सिकंदरी' वरून समजतें कीं, मुहम्मद तुघ्लकानें वि. सं. १४०० च्या सुमारास माळवा जिंकला व अजीज हिमारच्या ताब्यांत दिला. तो प्रथम कंधारचा हाकिम (अधिकारी) होता.

जयसिंहराव—ही धनाजी जाधवाची पदवी (डफ).

जयसिंह लोहर—(स. ११२८-५१) काश्मीरचा राजा. हा सुस्सलाचा मुलगा. याच्याच वेळीं कल्हणानें राजतरंगिणी लिहिली. त्यामुळें याच्या कारकीर्दीचीं फारच विस्तृत वर्णनें कल्हणानें केलीं आहेत. सिल्हण नांवें अलंकार हे याचे सुप्रसिद्ध मंत्री होते. यानें भिक्षु किंवा भिक्षाचर यांचा पराभव केला. याच्या कारकीर्दींच्या वेळी काश्मीरचें राजघराणें विलयाला गेलें.

जयसिंह (सिद्धराज) सोळंकी—(स. १०९३ -११४२) याच्या आईचें नांव मयणल्लदेवी. ही याच्या लहानपणीं राज्यकारभार पाही. हा गुजराथच्या सोळंकी घराण्यांतील पहिल्या कर्णाचा पुत्र. यानें सिद्धराज अशी पदवी धारण केली होती. हा सिद्धराज जयसिंग या नांवानेंच विशेष ओळखला जातो. हा सोमनाथाच्या यात्रेला गेला असतां माळव्याच्या नरवर्मा परमारानें गुजराथेवर स्वारी केली. त्यामुळें परत आल्यावर यानें माळव्यावर स्वारी केली आणि बारा वर्षें लढत राहिला. या लढाईत नरवर्मा मरण पावला व त्याचा पुत्र यशोवर्मा गादीवर आला. याला यानें जिंकलें व कैद केलें. यामुळें माळवा गुजराथच्या राज्यांत सामील झाला (एपि. इंडि. भा. १०. पृ. ११६-१७). याबरोबरच चितोडचा किल्ला व त्याच्या आसपासचा प्रदेश, तसेंच बागड यांवरहि याचा अधिकार सुरू झाला (ना. प्र. प. भा. ३ पृ. वर टीप २), तो कुमारपालानंतर अजयपालापर्यंत चालू होता. आबूचे परमार व नाडौलचे चौहान हे पूर्वीपासून गुजराथच्या राजाच्या ताब्यांत होते. यानें महोबाच्या मदनवर्मा चंदेल्ल राजावरहि स्वारी केली होती. पण त्यांत याला जय मिळाला किंवा नाहीं हें संशयास्पद आहे. यानें सोरठवर स्वारी करून गिरनारच्या खंगार (दुसरा) यादव (चूडासमा) याला कैद केलें. बर्बर वगैरे जंगली जातींना अधीन करून घेतलें; व अजमेरच्या आना (अर्णोराज, आनाक, आनल्लदेव) चौहानावर विजय मिळवला. पण शेवटीं सलोखा होऊन आपली कन्या कांचनदेवी हिचें लग्न आनाबरोबर करून दिलें. कांचनदेवीचा पुत्र सोमेश्वर होय. सोमेश्वराला यानें लहानपणींच आपल्या घरीं आणलें व याचा देहान्त झाला तेव्हां त्याचें पालनपोषण याच्यानंतर गादीवर आलेल्या कुमारपालानें केलें. प्रसिद्ध जैन हेमचंद्राचार्याचा हा अत्यंत सन्मान करीत असे. याच्या दरबारांत 'वैरोचनपराजय'चा कर्ता श्रीपाल, कविशिक्षेचा कर्ता जयमंगळ (वाग्भट), गणरत्नमहोदधीचा कर्ता वर्धमान, तसेंच सागरचंद्र वगैरे विद्वान् लोक होते. श्रीपाल याच्या दरबारांतील मुख्य कवि होता. कुमारपालाच्या वेळींहि तें स्थान त्याच्याकडेसच राहिलें. वर्धमानानें सिद्धराजवर्णन नांवाचा ग्रंथ लिहिला होता (ना. प्र. प. भा. ३, पृ. ८ टीप्पण २). सागरचंद्रानेंहि सिद्धराजाची प्रशंसा करणारें काव्य लिहिलें असावें असें त्यांतील श्लोक गणरत्नमहोदधींत उद्धृत केले आहेत त्यावरून दिसतें (ना. प्र. प. ३. ९ वरील टीप). वि. सं. ११५०-११९९, स. १०९३-११४२ पर्यंत यानें राज्य केलें. याला पुत्र नव्हता. म्हणून याच्यामागें कर्णाचा वडील भाऊ क्षेमराज नांवाचा होता, त्याचा पुत्र देवप्रसाद, व देवप्रसादाचा नातू त्या त्रिभुवनपालचा पुत्र कुमारपाल गुजराथच्या सिंहासनावर आला. याला अनेक पुत्र असल्याच्या भाटांच्या वर्णनांतील गोष्टी हेमचंद्राच्या द्व्याश्रय काव्यावरून खोट्या ठरतात. याला चालुक्यवंशप्रदीप व गुजराथचें भूषण मानतात.

जयसिंहसूरि—(स. १२२९) एक जैन पंडित. वीरसूरीचा शिष्य व भडोचच्या मुनिसुव्रत देवालयाचा जीर्णोद्धार करविणारे आचार्य. 'हम्मीरमदमर्दन' नांवाच्या संस्कृत नाटकाचा कर्ता. वस्तुपालानें मुसलमानांपासून गुजराथचें रक्षण केल्याचें वृत्त त्यांत आहे.

जयंत—(स. १००० सुमार) तर्कशास्त्रज्ञ. चंद्राचा पुत्र. वृत्तिकार म्हणून याची प्रसिद्धी आहे. वादांत हा नेहमीं अजिंक्य असे. बौद्ध व ब्राह्मण पंडितांशीं यानें अनेक वेळां वाद केले. न्यायसूत्रावर न्यायमंजरी नांवाची याची टीका आहे. वाचस्पतिमिश्र व माघ यांचा यानें निर्देश केला आहे. तत्त्वचंद्र नामक व्याकरणांतील प्रक्रिया-कौमुदीवरील टीका ग्रंथाचा कर्ता. काव्यप्रकाशावरील टीकाकार. न्यायकणिका हा याचाच ग्रंथ होय.

जयादित्य—(स. ६६१-६६२) यानें पाणिनीच्या सूत्रावर काशिकावृत्ति नांवाची सुप्रसिद्ध वृत्ति लिहिली. पण अपुरी राहिली होती ती वामनानें पुरी केली. चिनी प्रवासी इत्सिंग यानें आपल्यापूर्वी ३० वर्षे हा मेला असें लिहिलें आहे. त्यावरून याचा काल स. ६६१-६६२ हा ठरला.

काशिकावृत्तीपैकीं ३।४।७।८ या अध्यायांतील काशिका-वृत्ति यानें लिहिली, असें बह्वल्यार्थात् (पा. सू.५-४-४२) या सूत्रावरील शब्दरत्नांत म्हटलें आहे.

जयापीड कर्कोटक—(स. ७७९-८०८) काश्मीर येथील वज्रादित्याचा हा मुलगा होय. स. ७७९ मध्यें हा काश्मीरच्या गादीवर आला.

गादीवर आल्यावर लवकरच हा हिंदुस्थानावरील (दक्षिण अथवा पूर्व हिंदुस्थान असावें) स्वारींत गुंतला. त्या संधीचा फायदा घेऊन याचा मेव्हणा जज्ज यानें कांहीं काळ काश्मीरची गादी बळकाविली. पण पुढें यानें जज्ज यास ठार मारून आपण गादीवर आला. त्याचप्रमाणें यानें कनोजचा राजा वज्रायुध यास पदच्युत केलें (B).

हा स. ८०८ मध्यें मरण पावला. याच्या नंतर याचा मुलगा ललितापीड हा काश्मीरच्या गादीवर आला (B). बंगाल्यांतील जयंत राजाच्या कमलादेवी नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; व परत जातांना कनोजचें बहुमोल सिंहासन काश्मीरास आणलें. पतंजलीच्या महाभाष्याच्या अभ्यासाला उत्तेजन दिलें; आणि अमरकोशाचा प्रसिद्ध टीकाकार क्षीरस्वामी याला आपल्या दरबारांतील व्याकरण-शास्त्राचा पंडित नेमलें. याच्या दरबारांतील पंडितांचा मुख्य उद्भटालंकार नांवाच्या साहित्यशास्त्रावरील ग्रंथाचा कर्ता उद्भट हा होता. त्याला हा दररोज १ लक्ष दिनार देत असे. ही निव्वळ अतिशयोक्ति दिसते. शिवाय याच्या दरबारांत मनोरथ, शंखदत्त, चटक आणि संधिमान हे कवि; व्याकरण व साहित्यशास्त्रावरील ग्रंथकार वामन, कुट्टनीमताचा कर्ता दामोधरगुप्त आणि थक्कीय हे होते. चोहोंकडचे विद्वान् यानें काश्मीरांत गोळा केले होते. हा अनेक राजांचा जेता असूनहि यानें सुशिक्षणाचा सूर्य अशा अर्थाचें विनयादित्य हें बिरुद धारण केलें होतें. याच्या साहाय्यकांत तुराणच्या मुम्मुनीचेंहि नांव आढळतें, हेंहि ध्यानांत घेण्यासारखें आहे. याच्या स्वाऱ्यांपैकीं नेपाळच्या स्वारींत याला हार खावी लागली; व तेथील अरसुंडी नामक राजाच्या हातीं सांपडून हा बंदींत पडला. पण ह्याच्या प्रधानानें याची सुटका केली. तेव्हां यानें नेपाला-धिपतीचा पराभव केला आणि मोठ्या विजयोत्साहानें काश्मीरांत परत आला. पण या कामीं प्रसिद्ध मंत्री मित्रशर्मा याचा पुत्र आणि स्वतःचा विश्वासू मंत्री देवशर्मा हे मेल्यामुळें याचें फार नुकसान झालें. पण शेवटीं मात्र हा मोठा जुलमी आणि ब्राह्मणांचा छळ करणारा झाला. एका नागानें याला सोन्याचा डोंगर दाखविण्याचें कबूल करून तांब्याचा डोंगर दाखविला. त्याचे ९९ कोटी दिनार पाडले तरी याची आर्थिक हलाखी दूर झाली नाहीं. शेवटीं तंबूचा सोन्याचा खांब डोक्यावर पडून हा मेला (स. ७८२). यानें एकूण ३१ वर्षे राज्यकारभार केला (म. भा. १.२.९५-९७).

जयाप्पा शिंदे—(मृ. स. १७५५) हा राणोजी शिंद्याचा ज्येष्ठ पुत्र होय. ह्याच्या बायकोचें नांव सखूबाई. यास चार मुली व एक मुलगा जनकोजी अशीं मुलें होतीं. ह्याला बाप मेल्यानंतर ६५॥ लक्षांचें उत्पन्न मिळालें. ह्यानें स. १७५० त बादशहाला पेशव्यांचे तर्फेनें मराठ्यांची मदत देतांना एक महत्त्वाचा करार केला. त्यांत मराठ्यांनीं बादशहास मदत द्यावी असें होतें. पण हें मराठ्यांचें वर्चस्व सहन न होणारा पक्ष दरबारांत उत्पन्न होऊन पानपतच्या युद्धाचा प्रसंग निर्माण झाला.

ह्यानें स. १७५१ त फर्रुखबादची लढाई करून रोहि-ल्यांचा मोड केला. ज्या वेळीं सुरजमल्लानें तेजराम यास जयाप्पा शिंद्याकडे पाठवून आपला बचाव मल्हारराबापासून करण्याविषयीं विनविलें, तेव्हां ह्यानें त्यांस आश्वासन दिलें. पण त्यामुळें ह्याचें व होळकराचें वैमनस्य वाढलें. पण पुढें ह्यानेंच सुरजमल्लाकडून ६० लक्ष रुपये होळकरास देवविले व तह घडवून आणला.

पुढें हा जोधपूरच्या रामसिंगास भावाविरुद्ध मदत कर-ण्यास गेला असतां त्याचा भाऊ बिजेसिंग यानें मारेकऱ्यां-कडून याचा खून केला. (स. ३०-६-१७५५). या वेळेस ह्याचा मुलगा जनकोजी हा मेडतें सर करण्यास स्वारीवर गेला होता.

जलालुद्दीन फीरूज खल्जी—(स. १२९०-१२९६) कैकूबादच्या वेळीं हा सामानचा सुभेदार होता.

पण निजामुद्दीनच्या वधानंतर याला सेनापति करण्यांत आलें. खल्जी घराणें मूळचें तुर्क असलें तरी तें फार दिवस अफगाणिस्थानांत राहत असल्यामुळें पठाण समजलें जाई; व तुर्क लोक त्याचा द्वेष करीत. त्यामुळें यांचें वर्चस्व हाणून पाडण्याकरितां त्यांनीं अनेक कारस्थानें केलीं. पण शेवटीं कैकूबादचा खून करवून व त्याचा गादीवर बसलेला अल्पवयी मुलगा कयूमार्सला पळवून नेऊन यानें दिल्लीचें राज्य बळकावलें; आणि फीरूज असें नांव धारण केलें. त्या वेळीं हा सत्तर वर्षांचा होता. मुसलमानांचें रक्त सांडूं नये म्हणून यानें अनेक बंडखोरांना केवळ हद्दपार केलें (झझ्झखान, उलूघखान पाहा). मुसलमानांचा क्षय होईल अशी भीति वाटली म्हणून रणथंभोरच्या स्वारीवरून न लढतां अपकीर्ति पत्करून हा परत फिरला (स. १२९१). याच्या उदार धोरणामुळें राज्यकारभारांत तुर्कांबरोबर पठाणांचाहि प्रवेश झाला. याला जुन्या मुसलमान राजघराण्याबद्दल आदर वाटे. असें होतें तरी सरदारांमध्यें याला पदच्युत करण्याच्या गोष्टी चालत. अशा गोष्टी करणाऱ्या लोकांना बोलवून यानें आव्हान देऊन 'छाती असेल तर खून करा' म्हणून आपली तलवार त्यांचे अंगावर फेंकली. पण सिद्दी मौलाला खलिपा करण्याचे प्रयत्नास मात्र यानें त्याला ठार करून विरोध केला. स. १२९२ मध्यें यानें मोंगलांचा पराभव केला व राहिलेल्या मोंगलांना मुसलमान बनवलें. ते नव मुसलमान याला कांहीं प्रकरणांत उपयोगी पडले. पुढें याचा पुतण्या अलाउद्दीननें माळव्यांतील भेलसा शहर घेतलें; आणि याला न कळवतां दक्षिण जिंकून अमूप लूट घेऊन आला. त्याचा सन्मान करण्याकरितां त्याच्यावर विश्वास ठेवून निःशस्त्र स्थितींत हा त्याला भेटण्याकरितां गेला असतां त्यानें याला ठार केलें.

जलालुद्दीन मसूदजानी—(स.१२५८) बंगालचा सुभेदार.

जलालुद्दीन मुहम्मद खल्जी—(स. १२०७–७३) हा जातीनें कुफिक मुसलमान होता. लहानपणीं हा बापासह बल्ख सोडून निशापुरास आला. तेथून ते दोघे तुर्कस्थानांत गेले. त्या वेळीं अलाउद्दीन राजा होता. त्याचा तो शिष्य बनला. जलालचा गुरु शम्सुद्दीन होता. जलालचा पट्टशिष्य हिसाम म्हणून होता. जलालनें दरवेशांचा एक पंथ स्थापिला. या पंथाला यांचेंच नांव असून तो पंथ तुर्कस्थानांत आहे. जलालनंतर हिसाम हा पंथाच्या गादीवर आला. जलाल हा कवि होता. त्याच्या काव्यग्रंथाचें नांव मनस्वी असून त्यांत कथा, पौराणिक गोष्टी, कुराणांतील प्रवचनें वगैरे निरनिराळे विषय होते. हा ग्रंथ सहा अध्यायांचा होता. याचा दुसरा ग्रंथ दीवाण आहे. मृत्यूच्या वेळीं त्यानें आपल्या शिष्यांस खालील गोष्टी सांगितल्याः 'ईश्वराची भीति बाळगा, ईश्वराची प्रार्थना करा, सत्समागम मिळवून जातीच्या उपयोगी पडा.' याचा मुलगा सुलतान हा कवि होता. हा स. १२७३ त मेला (इंडियन अँटिक्वरी, पु. ४).

जलालुद्दीन मुहम्मदशाह—(स.१४१४) बंगालचा राजा. याला जितमल्ल उर्फ जद्द असें म्हणत (जितमल्ल पाहा).

जलालुद्दीन याकूत—(स. १२३६) आफ्रिकन मुसलमान. रझियेशीं याचा प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून अनेक मुसलमानांनीं बंडें केलीं. शेवटीं भतिंदाच्या लढाईंत हा कैद झाला व हा मारला गेला.

जलालुद्दीन सयुती— (सं. १५५० सुमार) हा ईजिप्तचा रहिवासी होता.यानें सुमारें ४००ग्रंथ लिहिले होते. त्यांत लुब्ब-उल्-लुबाब हा ग्रंथ नांवाजण्यासारखा आहे. त्यांत अरबी ग्रंथकारांना ज्या लोकांनीं आश्रय दिला त्यांचीं चरित्रें आहेत. हें पुस्तक म्हणजे एक प्रकारचा ग्रंथकार-कोश आहे. कशफुस सलसल-उल्-वसफुझ-झलझल या नांवाचा ग्रंथ यानें केला आहे त्यांत स. ७१३ ते १५०० पर्यंतच्या भूकंपांची माहिती आहे (बील).

जल्हण—हा कृष्णदेव यादवाचा मंत्री. हा लक्ष्मीदेवानंतर मंत्री झाला.

जवानबख्त—(स.१७४९-१७८८) हा शहाअलमचा वडील पुत्र. याला अहमदशाहा अबदालीनें मोगल साम्राज्याचा राजप्रतिनिधि निवडलें होतें (स. १७६१). यानें हा कारभार स. १७७१ पर्यंत चालविला. याचें दुसरें नांव जहांदरशहा असें होतें. पुढें बापाशीं न पटल्यानें हा लखनौकडे पळाला. हेस्टिंग्जनें पांच लाखांची नेमणूक करून दिली; व हा बनारस येथें राहूं लागला. याचा वंश तेथें आहे. हा वयाच्या ३९ व्या वर्षी मेला. याचा 'बयाझ इनायात मुर्शिदझादा ' हा ग्रंथ ब्रिटिश म्यूझियममध्यें आहे.

२. हा दिल्लीचा शेवटचा बादशहा. बहादुरशहाचा धाकटा मुलगा. याला रंगून येथें बापाबरोबर राजकीय कैदी म्हणून धाडलें होतें. हा मरेपर्यंत तेथेंच होता (बील).

जवानसिंह गुहिलोत— (स. १८००–३८) उदेपूरचा राणा. हा भीमसिंहाचा मुलगा. मराठे व इंग्रज यांच्याशीं यानें लढाया केल्या. हा खर्चिक होता. हा डोकेंदुखीनें मेला.

जवाहीरमल्ल जाठ—(मृत्यु स. १७६८).

हा भरतपूरच्या सुरजमल्ल जाठाचा मुलगा. याचें दुसरें नांव जवाहीरसिंग असें होतें असें दिसतें. हा कर्तृत्ववान् असून लढाईत व राज्यकारभारांत कसलला होता. यास पुढें भरतपूरची गादी मिळाली, आणि त्याजबरोबरच मराठ्यांचे हर्षामर्षाचे प्रसंग उद्भवले.

स्थिरस्थावर झाल्यावर जवाहीरमल्लानें नजीबखानावर चढाई करून दिल्लींत त्यास कोंडिलें. नोव्हेंबर १७६४ पासून फेब्रुआरी १७६ • पावेतों अनेक लढाया मारून नजीबखानाचा संहार केला. आपल्या बापाच्या मरणाचा सूड घेतला.

स. १७६३ त नजीबखानानें सुरजमल्लावर हल्ला करून त्यास ठार मारलें होतें. या मोहिमेत यानें मल्हाररावाचें साह्य घेतलें होतें; नजीबखान मल्हाररावाचा मानसपुत्र असल्यामुळें त्याच्याच मध्यस्थीनें नजीबखानाचा बचाव झाला; आणि नजीबाला ठेचण्याचा हा प्रसंग वांया गेला.

पुढें जवाहीरमल्लानें सभोंवार अनेक युद्धप्रसंग करून आपलें राज्य व बल अतोनात वाढविलें. हिंदुस्थानांत मराठ्यांच्या ठाण्यास उपद्रव करून नर्मदेपावेतों यावें असा याचा बत होता. हा जयपूरच्या माधवसिंगास सामील करूं पाहत होता. परंतु माधवसिंगच याजवर चालून गेला.

ही लढाई मावंदा येथें जयपूरहद्दींत ता. १४-१२-१७६ : रोजीं झाली. दोन्ही पक्षांचा पुष्कळच संहार झाला. पण शेवटीं जाठास जय मिळाला.

जवाही मल्ल लढाईत मारला गेला नाहीं, याचा पुढें १७६८ त खून झाला, असें कानुंगोच्या जाठ इतिहासांत सांगितलें आहे पृ. २०७-२१८).

जसकरण-- सीसोदें येथील राणाशाखेंतील दिनकराचा पुत्र. याला यशःकरण, जसकर्ण असेंहि म्हणत. याचा पुत्र नागपाल.

जसवंत--कोंकणांतील पालिचा राजा व आदिलशाहीचा मांडलीक.

जसवंतसिंग राठोड—(स. १६३८--१६७८) हा मारवाडचा राजा गजसिंहाचा कनिष्ठ पुत्र होय. याचा वडील भाऊ अमरासह याला गजसिंहानें राज्य करण्यास अयोग्य ठरविलें होतें म्हणून पूर्वी ठरावल्याप्रमाणें हा गादीवर आला. याचा जन्म वि. सं. १६८३ माघ वद्य ४ मंगळवार (स. १६२७ जानेवारी ६) रोजीं बुरहानपुर येथें झाला. गादीवर आला तेव्हां हा अज्ञान होता. तेव्हां शहाजहान बादशहानें राजसिंह कूंपावत याला याचा मुख्य प्रधान व शिक्षक नेमलें. एकदां याला भ्रम झाला तेव्हां लोकांत अशी प्रसिद्धी झाली कीं, 'राजाला भूत लागलें असून एखाद्या सरदारानें आपलें शिर कापून दिल्याशिवाय तें शांत होणार नाहीं.' तेव्हां राजसिंहानें आपलें मस्तक कापून दिलें, अशी प्रसिद्धी आहे. म्हणून आजहि त्याच्या स्मारकभवनांत शेंकडों लोक दर्शनाला जातात. यानंतर महेशदास राठोड याचा दिवाण झाला.

याला काबूलवर स्वारी करण्यास पाठविलें. तेथून आल्यावर गोंडवाडयाकडे पाठविलें. तेव्हां याच्याबरोबर औरंगजेब होता. तेथें यानें चांगलाच पराक्रम दाखवला म्हणून बादशहानें याला अद्यापपर्यंत कोणालाहि न दिलेली महाराजा ही पदवी दिली.

पुढें बादशाही मिळविण्याकरितां शहाजहानच्या मुलांत जेव्हां तंटे लागले तेव्हां औरंगजेब व मुराद यांना तोंड देण्याकरितां याला माळव्याकडे रवाना केलें. उज्जयनीपासून पंधरा मैल दाक्षिणेकडे असलेल्या बिल्होचपुर (फतिहाबाद) गांवाजवळ वि. सं. १७१५ वैशाख व. ८ (स. १६५८ एप्रिल २५) रोजीं घोर युद्ध झालें. त्यांत याचे साथीदार कासिमखां वगैरे औरंगजेबाला मिळाले. त्यामुळें पराजय पावून आपल्या आठ हजारांपैकीं शिल्लक राहिलेल्या सहाशें रजपुतांसह याला जोधपूरला परत फिरावें लागलें. पण हा पराजय पावून आला आहे, असें समजतांच याच्या राणीनें जोधपूरच्या किल्याचे दरवाजे लावून घेतले आणि याला निरोप धाडला कीं, 'पराजित होऊन आलेल्या नवऱ्याचें मी तोंड पाहूं इच्छीत नाहीं.' तेव्हां याच्या अंगांत वीरश्रीनें संचार केला आणि नवी सेना जमवून यानें युद्धांत जय मिळविला. पहिल्या लढाईतून याला परत येण्याचें कारण मुसलमान फितूर झाले व याचा घोडा जखमी झाला हें होय.

पुढें लवकरच औरंगजेब बादशहा झाला (स. १६५८ जुलै ता. २३). औरंगजेबानें आपल्या विरोधी लोकांना नष्ट करण्याचा सपाटा चालविला. पण मीर्झा राजा जयसिंगाच्या द्वारां याला दिल्लीस बोलावून याच्याशीं सलोखा केला. हा अहमदाबाद, बऱ्हाणपूर, औरंगाबाद व काबूल येथील सुभेदार होता. पण यांचें औरंगजेबाशीं नीट जमत नसे. शेवटीं याला दूर करण्याच्या उद्देशानें काबूलचा सुभेदार नेमलें होतें. तेथेंहि यानें आपला दरारा चांगला बसविला होता. शेवटीं याला जमरूद येथें देवाज्ञा झाली (स.१६७८ डिसेंबर ७). याला औरंगजेबानें विष घालून मारलें असेंहि म्हणतात (दुर्गादास राठोड पाहा).

हा वीर होता तसाच साहित्यप्रेमीहि होता. यानें पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत:—

१ आनंदविलास, २ अनुभवप्रकाश, ३ अपरोक्ष-सिद्धांत, ४ सिद्धांतबोध, ५ सिद्धांतसार, ६ भाषाभूषण.

भाषाभूषण हा एक हिंदींतील अलंकारशास्त्रावरचा ग्रंथ आहे. पहिले पांच वेदांतपंचक या नांवानें जोधपूरराज्याकडून प्रसिद्ध झाले आहेत.

हा कविहि उत्तम होता. याचा दिवाण मुहणोत नैणसी हा होता. त्याचा 'मूता नेणसी ख्यात' प्रसिद्ध आहे. शेवटीं तो याच्या मर्जीतून उतरला व कैद केला गेला. त्यानें कैदेंत असतां आत्महत्या केली.

यानें आपल्याजवळ गुहिलोत चतुराजी हा कृषिविद्याविशारद ठेवला होता. त्याच्या संमतीनें यानें काबूलचे डाळिंब मारवाडांत लागवडीस आणले व ते आजहि प्रसिद्ध आहेत.

हा हिंदी साहित्यांतील मुख्य आचार्य मानला जातो. याचा 'भाषाभूषण' ग्रंथ अलंकारयुक्त असून प्रचलित पाठ्य ग्रंथ होय. हा ग्रंथ चंद्रालोक या ग्रंथाची छाया असून 'संक्षिप्तप्रणाली' या ग्रंथाचें अनुकरण आहे. हा ग्रंथ फार लहान आहे.

याच्या भाषाभूषण ग्रंथावर एकंदर तीन टीका आहेत. त्यांपैकीं एक अलंकाररत्नाकर व दुसरी गुलाब कवीची होय. भूषणचंद्रिका ही तिसरी टीका प्रतापसाहीची होय.

२. एक हिंदी कवि. हा वाघेल (बघेल) क्षत्रिय होय. तेरवां (कनोजचे जवळ) येथील एक राजा असून मोठा विद्याप्रेमी होता.

यानें 'सालिहोत्र' आणि 'शृंगारशिरोमणी' असे दोन ग्रंथ लिहिले. याचा दुसरा ग्रंथ शृंगाररसाविषयीं प्रसिद्ध आहे.

जयानंत—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं अठ्ठावन्नावा सिद्ध होय. हा जातीनें ब्राह्मण असून भंगलपूरचा राहणारा. यालाच जयनंदी असें म्हणतात. याची गुरुशिष्य-विषयक माहिती कळत नाही. याचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत; १ तर्कमुद्ररकारिका (तं. २४-६), मध्यमकावतारटीका. चर्यागीतिमधील याच्या कवितांवरून हा हिंदी भाषेतील कवि होता असें दिसतें.

जहाज फिरंगी—(स. १७८२) हा युरोपियन माणूस असून याचें खरें नांव जॉर्ज थॉमस असें होतें. मराठे लोक याला जहाज फिरंगी म्हणत. हा हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावर उतरल्यानंतर खलाशीपणा सोडून देऊन यानें महादजी शिंदे याच्या पदरीं सैनिकाची नौकरी पत्करली (स. १७८२). पुढें हा शिंद्यांची नौकरी सोडून देऊन सारधान येथील बेगम सुमरूच्या पदरीं राहिला. थोड्या दिवसांनीं लुटालूट करून कांहीं प्रांत बळकाविला. यानें आपलें मुख्य ठाणें हंसी येथें करून तेथें एक किल्ला बांधिला. मराठ्यांनीं त्रास दिल्यानंतर अनुप शहरीं असलेल्या एका इंग्रज तुकडीच्या आश्रयास गेला. तेथून पुढें हा युरोपास जाण्यास निघाला असतां गंगेच्या कांठीं मरण पावला. याचें चरित्र फ्रँकलन नांवाच्या एका इंग्रजानें लिहिलें आहे (बील).

जहानआरा—(स. १६१४-८१) ही शहाजहानची थोरली मुलगी होय. ही मुमताजमहालची मुलगी. ही विनोदी, उदार, विद्वान् आणि सुंदर होती. हिनें स.१६४३ मध्यें आग्र्यास एक लाल दगडाची मशीद बांधली. जहानआरा या शब्दाचा अर्थ जगाला भूषविणारी. ही शेवटपर्यंत अविवाहित होती. ही बाई सुस्वरूप व आनंदी वृत्तीची असे. बादशहाची हिजवर बहाल मर्जी असे. त्याच्या खान्याचे पदार्थ हिच्या देखरेखीखालीं तयार होत. बादशहा दरबारांतील प्रत्येक उलाढालींत हिचें मत घेत असे, व त्यामुळें हिचें दरबारमध्यें बरेंच वजन असे. सरदारांकडून वरचेवर देणग्या मिळाल्यानें हिजपाशीं अपार संपत्ति साठली होती.

दाराची हिजवर फार भिस्त असे. आपणांस बादशाही मिळाल्यावर आपण तुझें लग्न करून देऊं असें तो म्हणत असे.

हिच्या भव्य धर्मशाळा दिल्लींत आहेत व लाहोर शहराबाहेर एका साधूच्या क़बरेनजीक तिची कबर आहे. ती हिच्या म्हणण्याप्रमाणें अगदीं साधी बांधली आहे (मु. रि. भा. २, पृ. २१८).

जहांगीर—(स.१६०५-२६) अकबराच्या मरणानंतर त्याचा पुत्र सेलीम हा जहांगीर हें नांव धारण करून गादीवर बसला. हा विषयासक्त, स्वच्छंदी व स्वार्थसाधु होता. अकबराच्या वेळच्या अनुभविक कामगारांस यानें कायम ठेविलें. जकातीच्या नियमांत उपयुक्त फेरफार केले. अर्जदारांची दाद लागावी म्हणून यानें सांठ सोन्याच्या घंटा जिला अडकविल्या होत्या अशी सांखळी राजवाड्याबाहेर सोडली. जहांगीरला चार मुलगे होते. खुश्रू, पर्वीझ, खुर्रम् (शहाजहान) व शहर्यार. हे सर्व सावत्र बंधू होते. खुश्रू व यांचें कधीं पटलें नाहीं. जहांगीरची पहिली बायको जोधपूरच्या राजाची मुलगी होती. तिचें नांव जोधबाई. तिला खुश्रू व एक मुलगी झाली. दुसरी बायको बिकानेरच्या रामसिंग राजाची मुलगी. तिसरी राजा माल-देवाचा मुलगा उदयसिंग याची बालमती;

हिचाच मुलगा शहाजहान. चवथी पर्विझची आई. पांचवी राठोडची मुलगी व सहावी नूरजहान. हा गादीवर बसल्यावर याच्या वडील मुलानें याच्याविरुद्ध बंड उभारलें. परंतु यानें त्यास कैदेंत टाकलें. नूरजहान व तिचा भाऊ यांच्या मनांतून जहांगीरच्या पश्चात् खुर्रम् यास राज्यपद मिळावें असें होतें; म्हणून त्यांनीं खुश्रूचा नाश करण्याची खटपट चालविली. आसफखानाची मुलगी मुम्ताजमहाल ही खुर्रम् यास दिली होती. आपली पहिल्या नवऱ्यापासून झालेली मुलगी शेवटीं तिनें शहर्यार यास देण्याचें ठरविलें. नूरजहान नांवाच्या एका व्यापाऱ्याच्या मुलीचा पहिला नवरा ठार करून यानें तिला आपल्याशीं लग्न लावण्यास भाग पाडलें. पण तिनें याच्या स्वैर वर्तनास आळा घालून राज्यांत शिस्त उत्पन्न केली. एकदां तर युद्धांत भाग घेऊन तिनें मोहबतखानाच्या तडाख्यांतून यास सोडविलें. जहांगीरनें कॅ. हॉकिन्स यास सुरत येथें वखार काढण्यास परवानगी दिली. जहांगीरच्या राज्याचा वसूल ५० कोटी रुपये होता. जहांगीरचे शेवटचे दिवस फारच कष्टप्रद गेले. जहांगीर ता. २८ ऑक्टोबर १६२६ त मरण पावला. याच्या अंगीं कांहीं सद्गुण होते. हा शिकारींत व युद्धकलेंत प्रवीण होता. याला डामडौल फारच आवडे. आरंभीं याचा स्वभाव क्रूर होता. हा मद्यपी असून अफूचें सेवन करी. हा नियम मोडणारांस कडक शिक्षा देई. शिल्पकला व सृष्टिसौंदर्य यांची यास आवड होती. हा बेफिकीर होता. फलज्योतिषावर याचा विश्वास होता. याला तुर्की भाषा चांगली येत होती.

ह्यानें आपलें आत्मचरित्र लिहून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. यानें १२ वर्षांची हकीकत लिहिली आहे. पुढें याची प्रकृति नादुरुस्त झाल्यामुळें व याजवर मानसिक शांतताभंग करणारे दुःखाचे प्रसंग आल्यामुळें, यानें पुढील कारकीर्दीची हकीकत लिहिण्याचें सोडून दिलें. हें आत्मचरित्र 'तुझुक-इ-जहांगीरी' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्याच्या फार्सी भाषेंतील उत्कृष्ट प्रती लंडन येथें इंडिया ऑफिसमध्यें व ब्रिटिश म्यूझिअममध्यें आहेत. त्याचीं भाषांतरें विद्वान् आंग्ल पंडितांनीं केलीं आहेत. त्यावरून असें दिसून येतें कीं जहांगीर हा बाबर किंवा अकबर यांच्याप्रमाणें विद्वान् अगर लोकोत्तर पुरुष होता असें नाहीं. उलट याच्या अंगीं पुष्कळ दोष होते. परंतु यानें जें आत्मचरित्र लिहिलें आहे त्यांत यानें आपल्या कारकीर्दीचें खरें चित्र रेखाटल्यामुळें तें फार मूल्यवान् झालें आहे.

त्यांत विशेषेंकरून यानें आपल्या बापासंबंधानें जो वृत्तांत लिहिला आहे तो फारच महत्त्वाचा आहे. जहांगीर बादशहाचें चरित्र अगदीं सत्य व यथातथ्य वर्णिलें असल्यामुळें त्यास एक प्रकारचें मोहकत्व आलें आहे.

हा स्वतः मद्यपी होता, परंतु मद्य हें अनर्थकारक आहे, सबब तें आपल्या प्रजेनें घेऊं नये म्हणून यानें निर्बंधहि केला होता. हा सृष्टिसौंदर्याचा भोक्ता होता. याच्या अंगीं न्यायप्रियता हा सर्वांत उत्तम गुण होता. एकंदरींत याचें आत्मचरित्र फार महत्त्वाचें असून सतराव्या शतकाच्या प्रारंभीं हिंदुस्थानची कशी स्थिति होती हें ह्यावरून चांगलें नजरेस येतें.

याच्या कारकीर्दीचा पुढील इतिहास मुतामदखान ह्यानें लिहिला आहे. त्याचें नांव 'इकबालनामा' असें आहे. खेरीज मुहंमद हादी ह्यानें याच्या कारकीर्दीची बरीच माहिती लिहिली आहे; व कामगार हुसेनी ह्यानें 'मआसिर-इ-जहांगीरी' ह्या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. ह्या सर्व ग्रंथांच्या योगानें जहांगीर बादशहाचें संपूर्ण चारत्र अवगत होण्यासारखें आहे. ह्या सर्व ग्रंथांमध्यें याच्या आत्मचरित्राची योग्यता फारच अधिक आहे (ऐ. गो. पा. २९।३०). अलीकडे जहांगीरचें चरित्र श्री. वेणीप्रसाद यांनीं इंग्रजींत प्रसिद्ध केलें आहे तें महत्त्वाचें आहे.

जहांदारशाह मोगल—(स. १६६३-१७१३) मुहम्मद मुइज्जुद्दीन हें याचें नांव असून हा बहादुरशाहाचा वडील मुलगा व औरंगजेबाचा नातू होय. याचा जन्म १६६३त झाला. बहादुरशहा १७१२ त वारल्यावर त्याच्या मुलांत यादवी माजली. हा १७१२ त लाहोर येथें गादीवर बसला. हा दुर्बल, क्रूर, चैनी व उद्धट होता. यानें भावाच्या व चुलत्याच्या सर्व मुलांसा ठार मारलें. यानें एकदां लालकुंवर नांवाच्या नर्तकीला सारें राज्य अर्पण केलें होतें. यानें ९ महिने राज्य केलें. याला याचे पुतण्यानें लढाईत कैद केलें व स. १७१३ त याचा खून झाला (बील).

जंगीझखान—(स.१५८६सुमार) हा मुर्तजा निजामशाहाचा एक दिवाण होय. यानें व मुर्तजा निजामशहानें तोफलखान व इमादशहाचा वंशज ह्यांस जिंकून ठार मारलें; आणि वऱ्हाडचें राज्य अहमदनगरच्या निजामशाहीस जोडिलें. बेदरचें राज्य जिंकण्याचें याच्या मनांत फार होतें. तेव्हां बेदरच्या शहानें जंगीझखानास लांच वगैरे देऊन वश करण्याकरितां आपला वकील पाठविला. पण जंगीझखान पक्का राजनिष्ठ असल्यामुळें तो त्या लांचलुचपतीनें वश झाला नाहीं. तेव्हां बेदरच्या वकीलानें हरयुक्ति करून

मुर्तजा निजामशहाचे मनांत याचेविषयीं वाईट भरविलें. तेव्हां मूर्तजानें विषप्रयोग करून या वजीरास ठार मारिलें (मु. रि. भा. १).

जंबूस्वामी—(समाधि ख्रि. पू. ४६३) याचा राजगृहांत जन्म झाला. गोत्र काश्यप. याच्या पित्याचें नांव श्रेष्ठी वृषभदत्त असें असून आईचें नांव धारिणी असें होतें. महावीरानंतर हा ६४ वर्षांनीं वयाच्या ८० व्या वर्षी निर्याणाप्रत गेला. हा शेवटचा केवलिन् होता. हा एक जैन धर्माधिकारी होय. हा सुधर्मन् याच्यानंतर जैन धर्माधिकाऱ्याच्या गादीवर बसला. जे कांहीं महावीराचे प्रमुख शिष्य होते त्यांच्यापैकीं हा एक होय.

यानें एकंदर चव्वेचाळीस वर्षेपर्यंत जैनधर्मरक्षणाचें व प्रसाराचें काम केलें. यानें चंपानगरीस भेट दिली होती. याच्यानंतर प्रभव नांवाचा जैनधर्माधिकारी झाला.

जाकलदेवी— ही कक्क राष्ट्रकूटाची मुलगी व दुसऱ्या तैल चालुक्याची पत्नी.

जाजलि—(उज्वलदत्त पाहा).

जाजल्ल कलचुरी—(स. १११४-६८ ?) रत्नपुरच्या पहिल्या पृथ्वीदेव कलचुरीचा मुलगा. स. १११४ मध्यें हा आपल्या बापानंतर गादीवर आला.

यानें सुवर्ण-पुरच्या भुज-बलाचा पराभव केला. याच्यानंतर याचा मुलगा दुसरा रत्न-राज (रत्न-देव) हा गादीवर आला.

जात चोड--याचा उल्लेख तेलगू चोलराजांच्या शिलालेखांत सांपडतो. हा चोलांपैकीं पूर्वकालीन सम्राट् होता. यास करिकालाचा पुत्र असें म्हणत.

जातुकर्णी—भवभूति कवीची माता.

जानकीनाथ शर्मा—(स. १५५०) यानें 'न्यायसिद्धांतमंजरी' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ बहुधा स. १५५० त लिहिला असावा. त्यांत शिवादित्यमिश्र, मुरारिमिश्र व चिंतामणि यांच्याविषयीं उल्लेख आला आहे. जानकीनाथावर १२ लेखकांनीं टीका लिहिल्या आहेत. यास भट्टाचार्य चूडामणि अथवा न्यायचूडामणि असेंहि म्हणत असत (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४६६).

जान फेथफूल फ्लीट—(फ्लीट पाहा).

जान आल्बर्टड मंडेल्स्लो—(स. १६३८-४०) एक हिंदुस्थानांत आलेला युरोपियन प्रवासी.

जान ओव्हिंग्टन—(स. १६५३-१७३१) हिंदुस्थानांत आलेला युरोपियन प्रवासी.

जान फ्रायर (एम्. डी. कॅंब्रिज)—एक युरोपियन प्रवासी. हा स. १६७३ मध्यें हिंदुस्थानांत आला. त्या वेळीं इंग्रज व डच यांचें युद्ध सुरू झाल्यामुळें इंग्रजांचीं दहा जहाजें लढाईचें सामान घेऊन मद्रासेस आलीं. त्या वेळीं कंपनीचा डॉक्टर म्हणून हा हिंदुस्थानांत आला. प्रथम मच्छलीपट्टण येथें उतरला. मच्छलीपट्टण येथें इंग्रजांच्या वखारी होत्या तरी तें नगर गोवळकोंड्याच्या कुत्बशाहाच्या ताब्यांत होतें. किनाऱ्यावर अनेक ठिकाणीं परकीय लोकांना एतद्देशीय राजांनीं वसाहत करण्यास उत्तेजन दिलें. कारण येथील राजांच्या जवळ आरमार नसे असें याचें म्हणणें आहे. परदेशी लोकांशीं स्नेह ठेवल्यानें किनाऱ्याचें संरक्षण व आरमाराची मदत असे दोनहि हेतु साध्य होत. सुरतेस मुसलमान फकीरांचें असह्य वर्तन कसें अस याचेंहि यानें वर्णन केलें आहे. हा सुरतेहून मुंबईस, मुंबईहून जुन्नर, कारवार, गोकर्ण मार्गानें इराणांत गेला. तेथून १६८१ इसवींत हा युरोपमध्यें गेला. राज्याभिषेकाच्या वेळीं रायगडावर जें डेप्युटेशन गेलें होतें त्याबद्दलच्या कांहीं आठवणी डॉ. फ्रायर यानें नमूद करून ठेवल्या आहेत. रायगडावर राजवाड्याच्या द्वाराशीं दोन हत्ती होते. हत्तीसारखा अवजड प्राणी रायगडासारख्या कठीण किल्ल्यावर कसा चढवला असेल ? असा याला प्रश्न पडला. इंग्रज लोक रायगडावर शिवाजीकडे गेले तेव्हां त्यांचे खाण्याचे फार हाल होऊं लागले. गडावर मांस खाणारे कांहीं लोक होते. पण ते तोंडीलावण्यासारखें थोडें मांस खात. तेव्हां डेप्युटेशनमधल्या इंग्रजांनीं आपली तक्रार शिवाजीच्या कानावर घातली. तेव्हां शिवाजीनें तिघां इंग्रज प्रवाश्यांकरितां रोजीं अर्धा बोकड देण्याचा खाटकास हुकूम केला. किल्ल्याच्या खालीं राहणाऱ्या खाटकास जेव्हां ही हकीगत कळली तेव्हां रोजीं अर्धा बोकड उडवणाऱ्या या पाहुण्यांना पाहण्याकरितां म्हातारा खाटीक मुद्दाम कौतुकानें काठी टेकीत किल्ला चढून वर आला होता (बापूजी मार्तंड आंबेकर, रत्नाकर १९२७ वरून).

जान बॅप्टिस्टा टॅव्हर्नियर—(स. १६४१-६८) हिंदुस्थानांत फिरणारा परदेशी जव्हेरी.

जानराव गुजर—नागपूरच्या पहिल्या रघूजी भोसल्याच्या प्रमुख मराठी सरदारांपैकीं एक (ना. प्रां. इ. पा. १०६).

जानीबेग तर्खन मीर्झा—(स. १५८४-९९) हा ठठ्ठाचा नबाब स. १५८४ मध्यें झाला. हा आपल्या भेटीस येईल असें अकबरास वाटत होतें. तो न आल्यामुळें

अकबरानें अबदुल रहीम यास पाठविलें. पुढें जानीबेग अकबरास जाऊन भेटला. तेव्हां अकबरानें यास अमीरी दिली (बील).

जानी बेगम—ही दाराशुकोहची मुलगी व औरंगजेबाचा पुत्र अजमशाहाची पत्नी. धारूर येथें जनानखाना ठेवून अजम विजापुराकडे गेला. एकाएकीं संभाजीच्या सैन्यानें जनानखान्यावर हल्ला केला. तेव्हा हिनें गोषा टाकून मराठ्यांशीं निकरानें सामना केला, व मराठ्यांचा हल्ला परतविला. हिच्या संरक्षणार्थ अनिरुद्धसिंग हा होता. त्यानेंहि अपूर्व पराक्रम केला. त्याला हिनें मौल्यवान् कंठा देऊन गौरव केला (मार्च स. १६८३).

जानू भिंताडा—(मृत्यु स. १७६३ पूर्वी) हा पेशव्यांचा खिजमतगार. गांव भिवडी (ता. पुरंदरे). पानपतावर विश्वासराव पडला तेव्हां पार्वतीबाईवर जीवरक्षणार्थ सैरावैरां पळण्याचा प्रसंग आला. तेव्हां यानें तिचा जीव व अब्रू यांचें रक्षण केलें. याचें घराणें वरील ठिकाणीं असून मोकाशी आडनांवानें शेती करून असतें (मं. त्रै. ७. १८).

जानोजी(राव) ढमढेरे—तळेगांवचे पाटील. पेशव्यांच्या घराण्याशीं या घराण्याचें फार सख्य होतें. याची श्रीब्रह्मेंद्रस्वामींवर फार भक्ति होती. पेशव्यांबरोबर हे युद्धावरहि जात असत. राक्षसभुवनच्या वेळीं या घराण्यांत एक पंधरा वर्षांचा मुलगा होता. त्याच्या आईनें कोणीच नाहीं म्हणून, सर्व नको म्हणत असतां, रघुनाथरावदादाबरोबर त्याला पाठविलें. शेवटीं तो मुलगा युद्धांत पडला. श्री. माधवराव बाईच्या समाचारास गेले असतां बाई म्हणाल्या, 'स्वराज्याच्या कार्यीं मूल पडला उत्तम झालें.' असें हें घराणें होतें. हें घराणें शिवाजीमहाराजांपासून तळेगांवचे पाटील होते. यांचा वंश तळेगांव ढमढेरें येथें आहे. यांचें हस्ताक्षर प्रसिद्ध झालें आहे (लेखनालंकार).

जानोजी(राव) घुळप—(स. १७६३) याचें मूळचें नांव मोरे असें होतें. हा हरजीरावाचा मुलगा. यानें आरमाराची उत्कृष्ट कामगिरी करून पेशव्यांकडून वेळोवेळीं बक्षिसें मिळविलीं. थोरले माधवराव पेशवे यांनीं यास दक्षिणेंत स्वारीस पाठविलें होतें. प्रथम याला नंदीगडावर नेमलें, नंतर बाळापुरास नेमलें. याला हरबाजी नांवाचा एक मुलगा होता. स. १७६३ त हैदरावरील स्वारींत यांनीं मोठें आरमार व फौज नेऊन होनावर बंदरांतून सोंध्यावर चाल केली. याचा जमिनीवरील युद्धांत मोठा उपयोग झाला. याच्यावर माधवरावांचा मोठा भरंवसा होता (खरे ले. ९९५).

२. (स. १७८३) हा हरबाजीचा मुलगा. वडलांप्रमाणें हा अतिशय शूर होता. याची नेमणूक सुभा आरमारावरच पूर्वीप्रमाणें झाली. याचें मूळचें नांव मोरे असें होतें. इंग्रजांशीं झालेल्या दर्यायुद्धांत (१७८३ एप्रिल) यानें फारच पराक्रम केला त्याबद्दल पुष्कळ बक्षिसें यास मिळालीं. याला एक मुलगा झाला. त्याचें नांव हरबाजी होतें (म. रि. म. १ पृ. २७५).

जानोजी निंबाळकर—(स. १६९३-१७४८) हा फलटणच्या बणगोजीरावाचा मुलगा. हा पेशव्यांशीं मिळूनमिसळून वागे. याच्या मार्फत निजामाचा व पेशव्यांचा करार झाला. तो स. २३ मार्च १७५१ च्या पत्रांत दिला आहे (ले.५३४). पहिल्यांदा नानासाहेबांचें याच्याविषयींचें मत बरें होतें, परंतु पुढें त्यांचें मत याच्यासंबंधीं पुष्कळच फिरलें होतें. पुढें हा नबाबास मिळून स. २२-१०-१७५७ मध्यें औरंगाबादेस होणाऱ्या मोहिमेंत हजर होता. याला एक पुत्र असून त्याचें नांव मुधोजीराव.

२. (मृ. स. १७६३) हा निंबाळकर घराण्याचा मूळ पुरुष. याच्या बापाचें नांव सुलतानजी. हा पेशव्यांच्या बाजूचा होता. मोंगलाई आपल्या ताब्यांत येण्याकरितां यानें नानासाहेबांस मदत करून प्रयत्न केला. जानोजी नेहमीं करमाळें येथें राहत असे. पेशव्यांनीं निजामावर जी स्वारी केली तींत जानोजी निजामाच्या बाजूनें होता (राजवाडे खंड १, ३).

जानोजी ता. ६-८-१७६३ रोजीं मरण पावला. याची स्त्री सती गेली. याचा पुत्र दाजी हाहि लवकरच बीड येथें मरण पावला.

जानोजी भोसले—(मृत्यु स. १७७२) रघूजी भोसल्यास चार पुत्र होते. जानोजी, मुधोजी, बिंबाजी व साबाजी. जानोजी व साबाजी हे धाकटे स्त्रीचे असून जानोजी हा चौघांत वडील होता. मुधोजी व बिंबाजी हे वडील स्त्रीचे होते. रघूजीनें मरणापूर्वी, वडील पुत्र जानोजी यानें सेनासाहेबसुभ्याचा मुख्य अधिकार चालवावा व बाकीच्या तिन्ही पुत्रांनाहि राज्यांत वाटणी देऊन त्यांचा परामर्ष घ्यावा असें सांगितलें होतें.

"आम्ही वडील मातोश्रीचे. तेव्हां कनिष्ठ तुम्ही. दौलतीची मालकी आम्हाकडेस. तुम्ही आमचे आज्ञेंत वागावें." असें मुधोजीनें जानोजीस कळविलें. त्यांस कांहीं सरदारहि मिळाले.

तंटा चालू असतां त्याच्या मुधोजीशीं दोनतीन चकमकीहि झाल्या. शेवटीं नानासाहेब पेशव्यानें दोघांसहि पुण्यास बोलावून सेनासाहेब पद जानोजीकडेच ठेवून

चंद्रपूर व छत्तीसगड मुधोजीस देऊन सेनाधुरंधर असा किताब दिला. यानें स. १७५६ मध्यें सावनूरच्या लढाईंत चांगली कामगिरी केली.

जानाजीनें सलाबतजंगाची बाजू घेतल्यामुळें स. १७५७-१७५८ पर्यंत त्याचें निजामअल्लीशीं युद्ध झालें व १७५८ त त्या दोघांत एलिचपूर येथें तह होऊन वऱ्हाडांतील उत्पन्नापैकीं शेंकडा ४५ भोंसल्यांनीं घ्यावें व शेंकडा ५५ निजामानें घ्यावें असें ठरलें.

दोघां भावांचा तंटा पेशव्यांनीं वांटणी करूनहि पूर्णपणें िटला नाहा. दोघेहि आपआपल्या पक्षास मजबुती आणण्यासाठीं झटूं लागले. पुढें नांदगांवरहाटगांवच्या लढाईंत मुधोजीचा मोड केला. नंतर त्यांच्यामध्यें तह होऊन मुधोजीनें सर्व कारभार करावा, रघूजी कारंडे, निंबकजी राजे व पिराजी निंबाळकर या तिघांनीं दोघां भावांच दरम्यान राहून पुढें तंटा होऊं न द्यावा, असें ठरलें. उदगीर येथें लवकरच तह झाल्यामुळें यांच्या सैन्याचा पेशव्यांना उपयोग झाला नाहीं.

स. १७६० त यास फार कर्ज झाल्यामुळें हा सदाशिवरावाबरोबर पानिपतचे मोहिमेवर गेला नाहीं. स. १७६१ त सदाशिवरावाच्या पानिपत येथील पराभवाची बातमी कळण्यापूर्वीच जानोजी नानासाहेब पेशव्यांबरोबर सदाशिवरावास मदत करण्यास उत्तरेस गेला होता. परंतु मध्येंच भिलसा येथें पानिपतच्या पराभवाची बातमी नानासाहेबास कळून तो आजारी पडल्यामुळें जानोजीस पुढें जाण्याचें कारण उरलें नाहीं. नंतर हा बुंदेलखंडांत सागर, हट्टा या बाजूस राहिला होता, व तेथें यानें हिंदुपंत बुंदेले वगैरे संस्थानिकांना कायूंत आणलें.

नानासाहेबानें जानोजी व मुधोजी यांचीं भांडणें जरी मिटविलीं होतीं तरी सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें जानोजीस मिळालीं नव्हतीं. माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें देवितांना राघोबादादानें ताराबाईस विनंति करून जानोजीसहि सेनासाहेब सुभ्याची (ता. ६-८-१७८१ रोजीं) सनद देवविली (ऐ. प. ले. ४४३).

पुढें हा पेशव्यांविरुद्ध निजामाचे कटांत सामील झाला होता, व बाह्यात्कारी पेशव्यांशींहि सूत दाखवीत होता. ही धरसोडीची वर्तणूक यानें ह्यापुढेंहि कायम ठेवून कधीं निजामाकडे तर कधीं पेशव्याकडे वेळोवेळीं मिळून आपली पूर्ण फजीती करून घेतली.

पुढें पेशव्यांनीं होळकराकडून सामदामाचा, शिंद्याकडून दंडाचा व मुधोजीकडून भेदनीतीचा प्रयोग करून यास निजामाकडून फोडलें.

हा निजामास मिळाल्यामुळें माधवरावाचा याजवर रोष होता व हा आपल्या विरुद्ध आतां राघोबादादास मिळेल अशी त्यास भीति वाटत होती. तेव्हां राघोबा, हैदर व जानोजी यांचे विरुद्ध त्यांस निजामाचे मदतीची जरूर होती. त्यानें मोंगलांचा नवीन इदाण सय्यद लष्कर ऊर्फ रुकनुद्दौला याचे मार्फत निजामाशीं कायमच्या दोस्तीचा तह केला.

मोरो धोंडाजी हा मोंगलांचा सरदार वऱ्हाडांत होता. त्यावर भोसल्यांचे फौजेनें छापा घालून त्यास लुटलें. तेव्हां मोगल चिडून जाऊन त्यानें जानोजीविरुद्ध पेशव्यांकडे मदत मागितली. पेशव्यांसहि जानोजीचा काटा काढावयाचा होता. तेव्हां माधवरावानें रुकनुद्दौल्यासह यावर स्वारी केली (स. १७६५-६६).

पेशवे व मोगल यांच्या प्रचंड सेनेपुढें आपला निभाव लागणार नाहीं हें पाहून यानें त्यांच्याशीं तह करण्याची खटपट चालविली; व ता. १७-१-१७६६ रोजीं माधवरावाची व त्याचे दुसरे दिवशीं राघोबाची गांठ घेऊन त्यांच्याशीं दर्यापूरचे पूर्वेस खोलापूर येथें तह केला.

वरील मोहिमेंत रघूजी कारंड्याचा पुत्र राणोजी हा पेशव्यांस मिळाला होता. म्हणून लढाई आटोपतांच यानें त्यास कैद केलें. परंतु पुढें माधवरावानें त्यास याचे हातून सोडविलें.

स. १७६८ त माधवराव व राघोबा यांजमध्यें भांडण सुरू होतांच यानें राघोबास मदत करण्याचें कबूल करून सैन्य उभारलें. परंतु याचें सैन्य येण्याचे आंतच माधवरावानें राघोबाचा मोड करून त्यास कैद केलें; व भोसल्यावर स्वारी करण्याचा निश्चय केला. ही स्वारी स. १७६९ जानेवारी ते १७६९ जूनपर्यंत चालली. व ता. २३-६-१७६९ त माधवराव व हा यांचा ब्रह्मेश्वरनजीक कनकापूर येथें तह झाला. हा तहनामा ना. भों. का. प. ले. १९ व २८ (ऐ. प. ले. ११७-११८) मध्यें पूर्ण छापला आहे व ले. २५-२६ मध्यें मुधोजीनें पुढें त्यांत कांहीं फेरफार केला आहे. पण अशा प्रकरणानें कर्ज वाढून सैन्यावरचा दाब कमी होई.

यापुढें मात्र स. १७७० त पेशव्यांनीं हैदरवर स्वारी केली त्या वेळीं यानें बाबाजीस ५००० सैन्यासह करारा-प्रमाणें पेशव्यांबरोबर पाठवलें. स. १७७३ मध्यें थेऊर येथें माधवराव आजारी असतां हा त्यास जाऊन भेटला.

बंगाल वगैरे प्रांताची चौथाई रघूजीचे वेळेपासून भोसल्यास मिळत होती. पुढें बंगाल प्रांत इंग्रजांनीं

घेतल्यावर चौथाईचा भरणा बंद पडला. तेव्हां यानें इंग्रजांकडे चौथाई देण्याबद्दल वकिलांची व पत्रांची सारखी झोड उठवली. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. शिवभट साठे यासंबंधानें जोर दाखवी, म्हणून त्यास इंग्रजांनीं हलकेंच याच्या मार्फत ओरिसाचे सुभेदारीवरून काढून टाकून त्यास धमकावण्या देऊन गप्प बसवलें.

मद्रास व बंगाल हे प्रांत इंग्रजांचे ताब्यांत आले. परंतु ते तुटक असून त्यांच्या दरम्यान उत्तर सरकार व ओढ्या हे प्रांत होते. ते ताब्यांत आल्यास सर्व पूर्व किनारा इंग्रजांचे ताब्यांत आला असता. ओढ्या हा नागपूरकर भोसल्यांच्या क्षेत्रांतील भाग असल्यामुळें क्लाइव्हनें आपला वकील टॉमस मॉट यास त्या भागाची मागणी करण्यासाठीं स. १७६६ त नागपुरास पाठवलें. परंतु त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं.

पुढें शिवभट साठे ओढ्याचा कारभार पाहत असतां त्याचें व याचें वांकडें आलें. तेव्हां इंग्रजांनीं याचे मदतीस फौज पाठवली. या निमित्तानें त्याचा वकील उदेपुरी गोसावी इंग्रजांकडे राहूं लागला. परंतु स. १७६९ त कनकापूरचा तह होऊन हा पुन्हां मराठमंडळांत सामील झाल्यामुळें यास फोडण्याचा इंग्रजांचा डाव फसला.

खरें म्हटलें तर याचे व्यवहार पुण्याच्या दरबारशीं झाले, त्यापेक्षां खुद्द नागपुराकडे व बंगाल बहारओरिसांसंबंधानें पूर्वेच्या बाजूस मुर्शिदाबादच्या सुभ्यांकडे व इंग्रजांच्याकडे विशेष झाले. हें कळून येण्यासाठीं पर्शियन कॅलेंडर्सचे तीनहि भाग काळजीपूर्वक वाचावे. त्यांत स. १७५९ पासून १७७२ पर्यंतचे कागद आहेत.

यास मुलगा नसल्यामुळें यानें मुधोजीचा वडील पुत्र यास दत्तक घेण्याचें ठरवलें होतें; व त्यासच आपल्यामागें से. सा. सुभ्याचें पद द्यावें असें माधवरावास सांगितलें होतें. हा १६ मे १७७२ रोजीं पोटशूळाच्या व्यथेनें मौजे येरळ प्र. नळदुर्ग येथें मरण पावला. पहिल्या रघूजीचा शिक्काच याचे वेळेसहि सांपडतो (नागपूर प्रांताचा इतिहास, पृ. ११४-१८१).

२. हा रघूजीचा पुत्र नाहीं असें ठरवून नागपूरचें राज्य खालसा केलें व याला स. १८६७ च्या सुमारास ९० हजाराचें पेन्शन दिलें.

जानो विश्वनाथ (जनार्दन विश्वनाथ)—बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचे बंधु. हा शक १६२८ (स. १७०६) पर्यंत हयात होता (सप्तम सं. वृ. श. १८४१ पृ. १२७-२८).

जाफरखान—(स. १२९६-९९) अलाउद्दीन खल्जीच्या वेळीं पराक्रमी म्हणून उदयास आलेला त्याचा सेनापति. यानें मोंगलांचा अनेक वेळां पराजय केला, पण हा फार बलिष्ठ झाला; व अलाउद्दीननें उपेक्षा केल्यामुळें मोंगलांकडून मारला गेला.

२. (मृत्यु स. १६७०) हा सादिकखानाचा पुत्र. शहाजहानचा मीरबक्षी व औरंगजेबाचा मुख्य वजीर (स. १६६२). हल्लीं आग्र्यास याचें थडगें आहे (बील). हा शाहिस्तेखानाचा मेव्हणा. शिवाजीनें याचे मार्फत आपल्या सुटकेचा प्रयत्न केला.

३. (हसन गंगू पाहा).

४. (मृत्यु स. १६६२) शहाजहाननामा नांवाच्या बखरीचा कर्ता.

५. (मुर्शिदकुलीखान पाहा).

जाम अफ्रा—(मृत्यु स. १३३९) सिंधचा राजा. हा सुमेरवंशांतील रजपूत होता. स. १३३६ मध्यें दिल्लीचा ताबा झुगारून हा स्वतंत्र झाला.

जाम अर्लीशेर—(स. १३९३-१४०९) सिंधचा राजा.

जाम उनर—जाम अफ्राचें नामांतर.

जाम करान—(स. १३८८) सिंधचा राजा.

जाम चोभान—(स. १३३९-१३५३ मृत्यु) सिंधचा राजा. बंडखोर तघी चांभारला आश्रय दिल्यामुळें मुहम्मद तुघ्लक यावर चालून येत असतां ठठ्ठाजवळ मृत्यु पावला.

जाम जूत—जाम चोभानचें नामांतर.

जाम तिमाजी—(स. १३६७-१३८०) सिंधचा राजा. याच्या पुढच्या राजानें मुसलमानी धर्म स्वीकारला तेव्हांपासून हें घराणें मुसलमान झालें. यांची नांवांशिवाय अधिक माहिती मिळत नाहीं.

जाम तुघ्लक—सिंधचा राजा.

जाम निजामुद्दीन—(स. १३९१-९३) सिंधचा राजा.

२. (स. १४५० गादीवर आला) सिंधचा राजा. हा नंद नांवानें फार प्रसिद्ध आहे. याच्या वेळीं सिंधचा उत्तरभाग व भक्करचा किल्ला तुर्कांनीं जिंकला.

जाम फत्तेखान—(स. १४०९-२३) सिंधचा राजा.

जाम फीरूज—सिंधचा राजा. जाम निजामुद्दीननंतर हा गादीवर आला. स. १५२० मध्यें मुलतानच्या

शहाबेग अर्घूननें याजपासून सिंध प्रांत जिंकून आपल्या ताब्यांत घेतला. तेव्हां हा गुजराथच्या बहादुरशहाच्या आश्रयास गेला व जाम वंश संपला.

जाम बनी—(स. १३५३-६७) सिंधचा राजा. याला जाम बंहतीय असें केंब्रिज हिस्टरीमध्यें म्हटलें आहे. खंडणी देण्याचें नाकारल्यावरून यास फीरूझ तुघ्लकनें पकडून दिल्लीस नेलें, पण सन्मानानें वागवून सोडून दिलें.

जाम बंहतीय—(जाम बनी पाहा).

जाम सलातीन—(स. १३८०-९१) सिंधचा राजा. यानें मुसलमानी धर्म स्वीकारला. याला सलाउद्दीन म्हणतात.

जाम सलाउद्दीन—(जाम सलातीन पाहा).

जाम संजर—(स. १४२८ सुमार) सिंधचा राजा. हा राधन नांवानें प्रसिद्ध आहे.

जाम सिकंदर—(स. १४२७) सिंधचा राजा.

जामोतिक—घ्सामोतिकबद्दल असा पाठ वाचला जातो. घ्सामोतिक असेंहि कांहीं वाचतात. ब्राम्ही लिपींत घ व य यांच्यांत फार साम्य आहे. पण गौ. हि. ओझा यांच्या मतें घ्सामोतिक असें वाचावयास पाहिजे.

जाय—गणपतीचा मेव्हणा, सेनापति व प्रधान.

जार्ज थामस--(जहाज फिरंगी पाहा).

जालंदरपा--यालाच जालंधारक असें म्हणतात. हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं शेहेचाळिसावा सिद्ध होय. हा जातीनें ब्राह्मण. कण्हपा व मत्स्येंद्र याचे शिष्य होत. याचे प्राचीन मागधीभाषेंत सात ग्रंथ आहेत. याच्या कांहीं हिंदी कविता प्रसिद्ध आहेत.

जालंदरनाथ--कानीफनाथ व मैनावती यांचा गुरु.

जालोरचे परमार--(धरणीवराह पाहा).

जालौक मौर्य--(खि. पू. २३२) मौर्य वंशांतील सम्राट् अशोकाचा मुलगा. अशोकाच्या शेवटल्या दिवसांत ग्रीकांच्या हिंदुस्थानांत स्वाऱ्या सुरू झाल्या. त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां अशोकानें याची नेमणूक केली. यानें त्यांना जिंकून हाकलून दिलें (राजतरंगिणी १. १०७-११५). अशोकाच्या मृत्यूनंतर यानें काश्मीरांत स्वतंत्र राज्य स्थापन केलें. हा मोठा रणधुरंधर होता. यानें कान्यकुब्जापर्यंत विजय मिळवले होते (राजरङ्गिणी १. ११७). शालिशूकाच्या वेळीं (खि. पू. २०७-२०६) हा काश्मीरच्या गादीवर बसला. त्याला सव्वीस वर्षें झालीं होतीं.

जाल्होन--पंजाबमध्यें नामदेवाचे जे कांहीं अनुयायी होते त्यांपैकीं हा एक होय.

नामदेवाच्या मतांचा पुरस्कार करण्यांत यानें पुढारीपण घेतलें होतें. हा पंजाबमधील रहिवासी असल्यामुळें नामदेवानें याला पंजाबांतून पंढरपुरास आणलें. त्या वेळीं नामदेवानें याला भक्त मंडळींत भजनांत हिंडविलें, याबद्दल नामदेवानें स्वतः उल्लेख केला आहे (नाम.९३६.).

नंतर भक्तीच्या विद्यापीठांत प्रेमवृत्तीचें जिवंत शिक्षण देऊन यास परत पंजाबांत, त्याची पेरणी करण्याकरितां पाठविलें (मं. त्रै. ६. पृ. ८).

जिऊबाई—नानाफडणीसाची बायको.

जिऊ महाला—शिवाजी व अफजल यांच्या भेटीच्या वेळीं हा शिवाजीचा अंगरक्षक होता. सय्यदबंदा जेव्हां शिवाजीवर चाल करून आला तेव्हां यानें बंदा यास ठार केलें. जिऊबा हा कोंडवली येथील रहिवासी. याचें आडनांव सकपाळ. महाला म्हणजे न्हावी. जिऊबा हा जातीनें न्हावी होता. याचा मुलगा सीताराम. अफजलखानावर वाघनखें चालवून व बिचव्याचा वार करून मुंडी आसडून, चौथऱ्याखालीं उडी घालून शिवाजी राजे निघून गेले. तोंच सय्यदबंदानें शिवाजीजवळ येऊन शिवाजीवर चार वार केले. पण ते चारहि वार शिवाजीनें कातर करून चुकविले. पांचवा वार शिवाजीस मर्मभेदक होणार, इतक्यांत जिऊ महाला यानें फिरंगीनें खांद्यावर सय्यदबंद्यावर वार केला आणि हात हत्यारासह तोडला म्हणून, 'होता जिवा म्हणून वांचला शिवा' अशी म्हण वरील प्रसंगावरून पडली आहे. हुकुमाची अमर्यादा केल्यामुळें शिवाजीनें यास कामावरून दूर केलें (मंडळ-पंचम संमेलनवृत्त, पृ. १६-१९).

जिजाजी भोसले उमरावतीकर—हा राणोजी भोसले उमरावतीकर याचा मुलगा. हा १७७३ कुंभारीच्या लढाईंत मारला गेला (ना. प्रां. इ. १९७).

जिजाबाई--(स. १५९५-१६७४) लखुजी जाधवाची मुलगी व मराठी राज्याचा संस्थापक शिवाजी ह्याची आई. हिच्या आईचें नांव म्हाळसाबाई. ही चार वर्षांची असतांना जिजाबाईचें व शहाजीचें लग्न लावावें असें लखुजी जाधव म्हणाले. पुढें तें लग्न झालें. तिला संभाजी नांवाचा एक पुत्र होता. संभाजीच्या लग्नाच्या नंतर शिवाजीचा जन्म झाला (स. १६३०). या सालीं शहाजीनें तुकाबाईशीं लग्न केलें. तेव्हांपासून हिचें नवऱ्याशीं बरें नव्हतें. पुढें जिजाबाईस हिचा चुलता जगदेव यानें घरीं नेलें. मध्यंतरीं

मोंगलांनीं हिला पकडून पन्हाळ्यावर कैदेंत ठेवलें. पण पुढें जगदेवच्या सांगण्यावरून सोडिलें. या वेळीं शिवाजी गुप्तपणें शिवापुरीं होता (म्हालदारखान पाहा). राजकारणाचें शिक्षण हिला शहाजीकडून प्राप्त झालें होतें. महाबळेश्वरास ता. ६ जानेवारी १६६५ रोजीं जिजाबाईची तुळा झाली होती. हिनें गोपाळ श्रीधर महाबळेश्वरकर यांचा उपदेश घेतला होता (प. सा. ६३१). ही मानी, निश्चयी, धाडसी व स्वतंत्र वृत्तीची होती. शहाजीच्या सल्ल्यावरून ती शिवाजीसह पुणें येथें येऊन राहिली. हिनें शिवाजीस राजास आवश्यक असें शिक्षण दिलें. हिनें शिवाजीच्या मनांत राज्य स्थापविण्याची कल्पना बिंबावली. धार्मिक गोष्टीकडे हिनें त्याचें चित्त लावलें. ही स्वतः शूर असून हिला लिहितांवाचतां येत होतें. शहाजी कर्नाटकांत असतां ही पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहत असे. हिनें न्यायनिवाडेहि केले होते. बजाजी निंबाळकर मुसलमान झाला होता त्याला शुद्ध करवून हिनें त्याचा मुलगा महादजी यास शिवाजीची मुलगी सखूबाई दिली. आपण मनांत धरलेल्या स्वराज्य-स्थापनेचा हेतु जिजाबाईनें शिवाजीकडून पार पाडला. यामुळें शहाजीस आनंद झाला. पुढें थोडक्याच दिवसांत शहाजी वारला. जिजाबाई सती जाण्यास निघाली, पण शिवाजीनें आग्रहानें हास थांबाविलें. शिवाजीनें हिच्या तैनातीसाठीं एक स्वतंत्र खातें ठेविलें होतें. प्रजेचा परामर्ष शिवाजीपेक्षांहि ही जास्त घेत असे. ही स. १६७४ त पांचाड गांवीं (१७ जून) दिवंगत झाली.

२. (मृ. स. १७७३) ही कोल्हापूरकर पहिल्या संभाजीची बायको व ताराबाईची सून. या सासवासुनांचें वांकडें होतें. ही बाई फार हुशार व राजकारणी होती. संभाजी हिच्याच सल्ल्यानें वागे. हिनें भगवंतराव अमात्यास राजकारणविषयक लिहिलेलीं पत्रें प्रसिद्ध आहेत. ही स्वभावानें क्रूर, कडक शिक्षा करणारी, फार धोरणी, व संशयी अशी होती. कोल्हापूरचें राज्य स्थापण्याचें बरेंच श्रेय हिला आहे. ही हट्टी नसून प्रसंगीं तडजोड करून कार्य साधणारी होती. हिचें माहेर तोरगलकर शिंदे घराण्यांतील होतें. संभाजी निपुत्रिक मेल्यामुळें हिनें शिवाजी नांवाचा पुत्र दत्तक घेऊन राज्यकारभार आपल्या हाती घेतला. ही पन्हाळ्याच्या देवीला जिवंत माणसाचा बळी देत असे.

कोल्हापूर व सातारा या दोन गाद्या एकत्र करून घरांतील कलह कायमचा तोडावा असें पेशव्यांच्या मनांत फार दिवस होतें. ता. २०-१२-१७६० रोजीं कोल्हापूरकर संभाजी वारल्यावर दुसरा कोणीहि वारस नसल्यामुळें नानासाहेब पेशव्यानें संस्थान खालसा करण्यासाठीं फौज पाठविली. तेव्हां हिनें संभाजीची धाकटी राणी कुसाबाई गरोदर असल्याचें कळवलें.

पुढें "कुसाबाई वैशाख वद्य ७ इंदुवारीं पांच तास रात्रीस ता. २५-५-१७६१ रोजीं प्रसूत झाली. राजकुवर जन्मास आले. तुम्हां कारणे साखर पाठविली आहे. स्वीकार करणे." असें लिहिलें. वास्तविक पुत्र झाला नव्हता, कन्या जन्मास आली. तरी जिजाबाईनें हें लटकेंच कारस्थान केलें.

पुढें जिजाबाईनें दत्तक घेण्याचा फार हट्ट धरला; व अडचणींत असलेल्या माधवरावाकडून परवानगी घेतली.

तेव्हां तिनें शहाजीराजे खानवटकर यांचा मुलगा माणकोजी यास दत्तक घेऊन त्याचें नांव शिवाजी असें ठेवलें व त्यास सिंहासनारूढ केलें (२७-१७६२).

मनोळी व चिकोडी या दोन कोल्हापूर संस्थानांतील तालुक्यांतील पुष्कळशां गांवें पुंडांनीं लुटून बळकाविलीं. स. १७६४ त माधवरावानें खर्चाबद्दल घेऊन दोन्ही तालुक्यांचा अंमल सुळीत करून दिला. परंतु बाईजवळ पैसे नसल्यामुळें पुण्याचे सावकाराचें कर्ज काढून व त्यास दोन तालुके पशव्यांचे जामिनागरीनें तारण लावून देऊन रकमेची भरती केली.

पुढें पैशाची फेड वेळेवर न झाल्यामुळें व सावकारांचा तगादा लागल्यामुळें त्यांची फेड करण्याचं काम पेशव्यांनीं पटवर्धनास सांगितलें. त्यामुळें पटवर्धनांचा व जिजाबाईचा कलह झाला.

रवीरच्या शंकराचार्यांशींहि हिचा झगडा झाला. स्वामींच्या मठाशेजारीं हिनें संभाजीचें दहन जबरदस्तीनें करून त्या जागेवर मंदिर बांधलें.

'यवनांपेक्षां ब्राह्मण जातीचा द्वेष अतिशय. मातुश्रीस विपरीत काळासारखी बुद्धी निर्माण झाली आहे.' असें पटवर्धन लिहितात.

जिजाबाई ता. १७-१२-१७७३ रोजीं मरण पावली (म. रि. म. ४ पा. १३१-३७).

जिजाबा घाटगे—(स. १८०९ सुमार) नागपूरकर भोसल्यांचा जबलपूरचा सुभेदार. स. १८०९ मध्यें यास अमीरखान पेंढाऱ्यानें स्वारी करून लुटलें तेव्हां हा पळाला (ना. प्रां. इ.).

जितमल्ल--(स. १३९२-१४०९) बंगालच्या कंसाचा मुलगा.

यानें मुसलमानी धर्म स्वीकारला आणि जलालुद्दीन असें नांव धारण करून राज्य करूं लागला. याच्यानंतर याचा मुलगा अहमद हा गादीवर आला.

याला केंब्रिज हिस्टरीमधील वंशावळींत 'जदु उर्फ जलालुद्दीन मुहम्मद शाहा' असें म्हटलें आहे (मु. रि. भा. १ ला, पृ. ३२०).

जितेंद्रिय—(स. १०००-५०) याचा उल्लेख रघुनंदनाच्या दायतत्त्वामध्यें आलेला आहे.

याचें धर्माविषयांचें पुष्कळ लिखाण प्रसिद्ध आहे. यानें कालावरती एक पुस्तक लिहिलें आहे. जीमूतवाहनाच्या दायभागामध्यें याचा वारंवार उल्लेख आलेला आहे. विधवेला, नवरा नातलगापासून वेगळा राहिला किंवा न राहिला तरी त्याची मिळकत मिळते ह्या दायभागांतील उताऱ्याचें विवरण यानें केलें आहे.

जिन—(स. ९४० सुमार) यानें 'प्रमाण-वार्तिकालंकारटीका' या नांवाचा ग्रंथ लिहिला. तिबेटी भाषांतराचें काम विक्रमशिला येथील पंडित दीपंकर व तिबेटी भाषांतरकार या दोघांनीं मिळून केलें.

हा व स.९४०च्या सुमारास झालेल्या वागीश्वरकीर्तीचा समकालीन कोकण येथील जिनभ्रम हे दोघेहि बहुधा एकच होत (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ३३८).

जिनकीर्ति—(स. १४५० सुमार) एक जैन ग्रंथकार. सोमसुंदरच्या पांच शिष्यांपैकीं एक. यानें 'चंपकश्रेष्ठिकथानक' नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. 'धन्यशालिचरित्राचा' कर्ता जिनकीर्तिच होय. जिनकीर्तीनें 'दानकल्पद्रुम' हें नीतिपर काव्य व 'श्रीपालकथा' हें दोन ग्रंथ लिहिले (विंटरनिट्झ–हि. सं. लि. भा. २).

जिनचंद्रगणिन्—स. १०१५ मध्यें यानें 'नवपयप्रकरण' प्राकृतमध्यें लिहून त्यावर संस्कृतमध्यें टीका लिहिली. याशिवाय नवतत्त्वप्रकरणाचाहि हा लेखक आहे. हा स्वतःला 'देवगुप्त' असें म्हणवीत असे (विंटरनिट्झ).

जिनदत्तसूरि—(जन्म स. १०७४–मृ. स.११५३) जैन ग्रंथकार. हरिवल्लभसूरीचा शिष्य व हेमचंद्राचा समकालीन कवि. 'उपदेशरसायनरस' व 'कालस्वरूपकूलम्' हीं दोन उपदेशपर काव्यें व यानें एक चर्चरी अपभ्रंशभाषेंत लिहिलीं (विंटरनिट्झ–हि. सं. लि. भा. २).

याच्या पित्याचें नांव वाच्छिगमंत्री व आईचें नांव बाहडदेवी. हा द्रवडगोत्री होता. याचें मूळ नांव सोमचंद्र. संदेहदोलावली व इतर पुष्कळ ग्रंथ यानें तयार केले. हा अजमेर येथें मरण पावला.

जिनदास—(स. १४५० नंतर सुमार) जैन लेखक. हा व याचा गुरु सकलकीर्ति यांनीं ३९ सर्गांचा एक हरिवंश लिहिला आहे. त्यांपैकीं पहिले १४ सर्ग सकलकीर्तीनें लिहिले आणि बाकीचे यानें लिहिले.

जिनप्रबोध—(जन्म स. १२२७–१२८३) दुर्गप्रबोध व्याख्येचा कर्ता. साहश्रीचंद्र व सिरयादेवी यांचा हा पुत्र. मूळ नांव पर्वत.

जिनप्रभसूरि—(स.१३०० सुमार) जैन लेखक. यानें चतुर्विंशतिजैनस्तुति व इतर पुष्कळ काव्यें लिहिलीं. मानतुंगानें लिहिलेल्या भक्तामरस्तोत्रावर यानें टीका लिहिली. तीर्थकाम अथवा तीर्थप्रदीप हा ऐतिहासिक ग्रंथ लिहिला. फीरूझ (स. १२२०–१२९६) व हा मित्र होते अशी आख्यायिका आहे.

हा रुद्रपल्लीय गच्छांपैकीं होता. संघतिलकाचा हा विद्यागुरु होता. यानें 'सम्यक्त्वसप्ततिटीका' ग्रंथावर टीका केली आहे. यानें शाहि मुहंमदास जैन बनविलें.

जिनप्रभसूरीनें तीर्थकल्प लिहिला आहे. हा उदयपूरच्या समरसिंहाचा समकालीन होता (स. १२७३–१३०२).

जिनभद्रगणि क्षमाश्रमण—(स. ४८४-५८८) एक जैन तर्कज्ञ. यानें 'आवश्यक' या ग्रंथावर 'विशेषावश्यकभाष्य' या नांवाची टीका लिहिली. याचा जन्म स. ४८४ त झाला. हा क्षमाश्रमण या नांवानें विशेष प्रसिद्ध आहे. यानें स. ५२८ ते ५८८ पर्यंत मुख्य धर्माधिऱ्याचें काम केलें (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. १८१).

जिनमंडनोपाध्याय—यानें 'कुमारपालप्रबंध' नांवाचा ग्रंथ लिहिला.

जिनमित्र—(स. १०२५ सुमार) बुद्ध तर्कज्ञ. हा काश्मीरचा रहिवाशी होता; व सर्वज्ञदेव, दानशील, इत्यादि विद्वानांबरोबर हा तिबेटांत तेथील लोकांस संस्कृत ग्रंथांचें तिबेटी भाषेंत भाषांतर करण्यास मदत करण्यासाठीं गेला होता. हा स. १०२५ च्या सुमारास बंगालचा राजा महीपाल याच्या कारकीर्दीत होऊन गेला.

यानें तर्कज्ञानावर 'न्यायबिंदुपिंडार्थ' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथांत जिनमिश्रानें धर्मकीर्तीच्या न्यायबिंदूचें विवरण केलें आहे. या ग्रंथाची मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाहीं. परंतु त्याचें तिबेटी भाषांतर मात्र उपलब्ध आहे. तिबेटी भाषांतर सुरेंद्रबोधी च शुचेन येथील तिबेटी भाषांतरकार या दोघांनीं मिळून केलें (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ३४०).

जिनराज—(जन्म स. १५८९–मृ. स. १६४१) बोदिथ्य गोत्राचा, साह धर्मसी व धारलदेवी यांचा पुत्र.

हा ग्रंथकार म्हणून प्रसिद्ध आहे. यानें जैनराजी नांवाची नैषधीय काव्यावर एक वृत्ति लिहिली आहे.

जिनवल्लभ—(मृ. स. १२०९) हा जिनेश्वरसूरीचा पहिला शिष्य होय. यानें अभयदेवास गुरु करून पिंडविशुद्धिप्रकरण, गणधरसार्धशतक, षडशीति वगैरे ग्रंथ लिहिले.

बाराव्या शतकाच्या सुरुवातीस हा एक लेखक होऊन गेला. यानें 'उल्लासिक्रमभय ?' महावीरस्तोत्र, प्रश्नशत व इतर कित्येक विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिले. याच्या पंथांतील चरित्रें लिहिणारा जिनपतिसूरि याच्या मतानें यानें पाणिनीचें व्याकरण, महाकाव्यें, अलंकारशास्त्र वगैरेंचा अभ्यास केला होता (विंटरनिट्झ). हा चितोडमध्यें असे.

जिनसमुद्रसूरि—(जन्म स. १४५०-मृ. १४९९) कुमारसंभवावरील टीकाकार. यानें स. १४६५ ते १४९९ च्या मधील कालांत आपली कुमारसंभवावरील टीका लिहिली. गोत्र-पारष. पिता देकौसाह. माता देवलदेवी.

जिनसेन—(स. ८१५ सुमार) यानें जैनधर्मीयांचा 'हरिवंश' नांवाचा ग्रंथ लिहिला. याचा शिष्य गुणभद्र.

२. पहिल्या अमोघवर्ष (स. ८१५-७७) राष्ट्रकूटाचा मित्र. जैनआदिपुराणाचा लेखक. यानें पार्श्वाभ्युदय नांवाचें काव्य मेघदूतांतल्या पुष्कळशा ओळी घेऊन केलें आहे (विंटरनिट्झ).

३. स. ७८३ मध्यें यानें महाभारताचें जैन रूपांतर केलें (विंटरनिट्झ).

जिनेन्द्रबुद्धि—(स. ६०० सुमार) जैनेंद्र व्याकरणाचा कर्ता (पूज्यपाद पाहा).

२. (स. ६९१-७५०) यानें काशिकावृत्तीवर टीका लिहिली ती न्यास या नांवानें प्रसिद्ध आहे. चिनी प्रवासी इत्सिंग यानें आपल्या प्रवासवर्णनांत हिंदुस्थानांतील पठनपाठनाची माहिती देतांना जयादित्यकृत काशिकावृत्तीची माहिती दिली आहे आणि जयादित्याचा मृत्यू तीस वर्षांपूर्वी झाला असें म्हटलें आहे. पण न्यासाचा मात्र उल्लेख केला नाही. यावरून न्यास हा ग्रंथ स. ६९१ च्या नंतर व स. ७५० च्या पूर्वी केव्हां तरी झाला असावा.

यानें 'विशालामलयवतीनामप्रमाणसमुच्चयटीका' या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाचें तिबेटी भाषांतर झालें आहे असें हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिकमध्यें म्हटलें आहे (पा. ३४३).

जिवबादादा बक्षी—(मृत्यु स. १७९६) हा जातीचा शेणवी असून याचें आडनांव केरीकर असें होतें. हा महादजी शिंद्यांचा सेनापति व मुत्सद्दी. महादजीच्या सर्व प्रकरणांत हा प्रमुख असे.

हा दौलतराव शिंद्यांचा सेनापति असून स. १७९५ मध्यें दौलतराव शिंद्यांबरोबर खर्ड्याच्या लढाईत होता. शिंद्यांच्या कारभारी मंडळांत हा प्रमुख असून दौलतराव याच्याच अनुरोधानें चालत असे. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देण्याविषयीं यानें सल्ला दिला होता. पण बाळाजी विश्वनाथाचा औरस वंशज हयात असतां आपण दिलेला सल्ला चुकीचा आहे असें वाटल्यावरून यानें मरतेसमयीं दौलतरावास जवळ बोलावून त्यास 'आपण दत्तक घेण्याविषयीं दिलेला सल्ला चुकीचा आहे' असें सांगितलें असें डफ म्हणतो. यांचें विस्तृत चरित्र मराठींत प्रसिद्ध आहे.

जिवाऊ शिंदे—ही नेमाजी शिंदे याची बायको असून मोठी राजकारणी होती. ही मोठी कर्ती बाई असून हिला थोरले बाजीरावसाहेब यांनीं लिहिलेलें एक पत्र उपलब्ध आहे. त्यावरून ह्या बाईची योग्यता कळण्यासारखी आहे (जु. ऐ. गो. ४६).

जिवाजी खंडो चिटणीस—(मृत्यु स. ६-१-१७४३) हा खंडेरावाचा मुलगा. खंडेराव वारल्यावर शाहूनें यास कोंकणांतील जिंकिलेल्या मुलखाची चिटणीसी, जमेनिसी व कारखानविशी करून दिली (भा. व. प. या. ले. ६६, ७०, ७१). चिमाजीनें सिदीचा पाडाव केल्यामुळें (स. १९-४-१७३६) शाहू वगैरे मंडळींनीं याचें अभिनंदन केलें. हा ता. ६-१-१७४३ मध्यें मरण पावला (शा. म. च.). याला दोन पुत्र होते; एकाचें नांव रामराव व दुसऱ्याचें नांव देवराव होतें.

जिवाजी पवार—हा काळोजीचा पुत्र. हा देवासच्या एका पातीचा संस्थापक (तुकोजी पवार पाहा).

जिवाजी विश्राम—सावंतवाडीकरांचे कारभारी जिवाजी विश्राम व बंधु विठ्ठल विश्राम हे कोल्हापूरकर जिजाबाईस रांगण्याकडे सारखा त्रास देत असत. माधवरावानें यांचा बंदोबस्त केला. विठ्ठल विश्रामास कोप्पल किल्ल्यावर अटकेंत ठेवलें; आणि यास कोणी आश्रय दिल्यास त्याचा नाश केला जाईल अशी सर्वत्रांस धमकी दिली (म. रि. भा. ४, पा. १३६-३७).

जिवाशिवा—मराठी कवि. याच्या वडिलाचें नांव शिवराय असून आईचें नांव उमा असें होतें. याचें गोत्र काश्यप. हा आपल्यापुढें आपल्या गुरूचें नांव जें शिवा तें नेहमीं लावीत असे. पंढरपूरच्या जवळ असलेल्या क्षेमावती गांवांत हा राहत असे. यांनीं मराठींत महाभारताचीं कांहीं पर्वें लिहिलीं होतीं. हा कवि-मुक्तेश्वर-गोपाळ-श्रीधरांच्या (कवि) नंतरचा होता. यानें केलेल्या महाभारताचीं १२ पर्वें आहेत (मं. त्रै. व. ११. पा. २१ ले. ५).

जीमूतवाहन—(स. ११०० नंतर) संस्कृत भाषेंत धर्मशास्त्रावर ग्रंथ लिहिणारा एक पंडित. हा बंगाली होता. यानें कालविवेक, व्यवहारमातृका (न्यायमातृका) आणि दायभाग असे तीन ग्रंथ लिहिले. याच्या दायविभागावर रघुनंदनाची प्रख्यात टीका आहे.

याचा जन्म पारिभद्र घराण्यांत झाला. हा बंगालचा राजा विश्वकसेनाच्या पदरी न्यायाधीश होता. याचें गांव राधा. यानें ज्योतिषशास्त्राबद्दलहि बरीच माहिती दिली आहे. याच्या पूर्वी चौदा पिढ्या याच्या जातीचा दर्जा कमी झाला असल्यामुळें यानें आपल्या पोटजातीचा उल्लेख केला नाहीं.

जीवक—बिंबिसारास अंबपाली वेश्येपासून हा झाला. वैद्य व बुद्धाचा भक्त. यानें भिक्षूंकरितां चिकित्सालय स्थापन केलें होतें.

जीवदामा क्षत्रप—(स. १९७-१९८) हा दामघ्सद किंवा दामजदश्री याचा धाकटा पुत्र. याचीं नाणीं शा. श. ११९ आणि १२० चीं मिळालीं आहेत. याच्या नंतर याचा चुलता रुद्रसिंहाचा ज्येष्ठ पुत्र रुद्रसेन हा गादीवर आला. याला महाक्षत्रप असें लिहिलेलें आढळतें. हा रुद्रसिंह क्षत्रपाचा उत्तराधिकारी झाला.

जीवदेव—(स. १६५० नंतर) आपदेवाचा पुत्र; व अनंतदेवाचा धाकटा भाऊ. यानें आशौचनिर्णय व गोत्रप्रवरानिर्णय असे दोन ग्रंथ केले आहेत.

जीवन—गुजराथी कवि. पदें व शिक्षा ग्रंथाचा कर्ता.

जीवनपुरी गोसावी—(स. १७५०) हा उदेपुरीचा चेला. हा नागपूरचे मठावर होता. एका वेश्येच्या खुनावरून दुसऱ्या रघूजी भोसल्यानें याचा मठ लुटला व स्वतःचे साडेतीन लाखांचे रोखहि लुटले. शेवटी साताऱ्यावरून ताकीद गेल्यावर यास बंधमुक्त केलें (ना. प्रां. इ. पा. २३०).

जीवन्मुक्त—एक महाराष्ट्रीय संतकवि. निझामराज्यांत येकेहळळीजवळील अन्वार गांवीं यांचा मठ आहे. यांस तिकडे मुक्तेश्वर म्हणतात. हे ज्ञानेश्वरसंप्रदायी होते. ज्ञानेश्वरांनंतर यांचेंच नांव तिकडे घेतात.

जीवन्मुक्ति, गीताप्रभाकर व जीवन्मुक्तिवाक्य वगैरे ग्रंथ यांनीं केले आहेत (सं. सू.).

जीवविबुध—यानें संस्कृत भाषेंत नलानंद नांवाचें सप्तांकी नाटक लिहिलें आहे. स. १६६५ सालीं लिहिलेली याची एक हस्तलिखित प्रत हल्लीं उपलब्ध आहे.

जीवशर्मा—एक ज्योतिषी. वराहमिहिरानें याचा जातकांत उल्लेख केला आहे.

जीवितगुप्त—शेवटल्या अकरा गुप्त राजांपैकीं हा शेवटचा राजा होय. हा आठव्या शतकांतील पहिल्या भागांत राज्य करीत होता.

जुझर—बुंदेलखंडचा राजा.

जुमरनंदी—(स. १३२५ सुमार) क्रमादीश्वरानें सुरू केलेल्या व्याकरणशाखेचा पुरस्कर्ता. याच्यामुळें त्या शाखेला जौमरशाखा असें नांव पडलें.

जुनैद—(स. ७२४-७४३) खलिफा हिसामनें याला सिंधचा सुभेदार नेमिलें. इस्लामी धर्माची दीक्षा घेऊन व खलिफाचें मांडलिकत्व पत्करून निश्चित झालेल्या जयसिंहावर यानें स्वारी केली. स्वारींत जयसिंह मारला गेल्यावर त्याच्या भावास यानें सामोपचारानें विश्वासांत घेऊन भेटींत ठार मारलें.

जुरअत—(मृत्यु स. १८०८) एक उर्दू कवि. याचें नांव शेख कलंदर बक्ष किंवा यहिया अमान असें होतें. हा मीरचें अनुकरण करी. याचा एक दीवान प्रसिद्ध आहे.

जेज्जट—सुश्रुतटीकाकार डल्हन यानें उल्लेख केलेला वैद्यकावरील ग्रंथकार.

जेतारि—(स. ९४०-८०) बौद्ध तर्कज्ञ. याचा पिता गर्भपाद. हा मगधांतील पाल राजाचा मित्र सनातन याच्या दरबारीं वारेंद्र येथें राहत असे. आईबापांनीं हाकून दिल्यामुळें बौद्ध बनला आणि विक्रमशिला विद्यालयाची पंडित ही पदवी संपादन केली. दीपंकर व श्रीज्ञान अतिश यांनीं याच्याजवळ पांच शास्त्रांचा अभ्यास केला. याचे ग्रंथः—

१ हेतुतत्त्वोपदेश, २ धर्मधर्मिविनिश्चय, ३ बालावतारतर्क. या ग्रंथांचीं फक्त तिबेटी भाषांतरें उपलब्ध आहेत (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ३३७-३८).

जेसा—(जयसिंग पाहा).

जेंकिन्स रिचर्ड—(स. १८०७-२७) नागपूरचा रेसिडेंट. यानें सुमारें वीस वर्षे नागपूरचा कारभार केला. रघूजी होता तोंपर्यंत यांचें कांहीं चाललें नाहीं; पण अप्पासाहेबाच्या वेळीं नागपूरचें राज्य पूर्णपणें इंग्रजांच्या ताब्यांत गेलें. ता. २८-५-१८१६ रोजीं तैनाती फौजेचा तह झाला. बाजीराव हा इंग्रजांचा शत्रु असल्यामुळें तिकडून आलेली सेनासाहेबसुभ्याचीं वस्त्रें घेण्यासहि यानें बंदी केली; पण लढाईपर्यंत येऊन शेवटीं तह करणें भाग पडलें.

जेत—(इच्छनीकुमारी व भीमदेव बघेल पाहा).

जैतुगी यादव—(जैत्रपाळ यादव पाहा). जैत्रपाळ शब्दाचा जैतुगी हा उच्चार प्रांतिक दिसतो.

जैचकर्ण—हा ईडरच्या रणमल्लाचा पिता व लूणकरणाचा पुत्र. याला मेवाडच्या हंमीर गुहिलोतानें जिंकलें होतें. याला जैत्रेश्वर, जितकर्ण व जैतकरण असें म्हणत (एकलिंगमाहात्म्य व एकलिंगजीच्या दक्षिणद्वारावरील प्रशस्ति. रा. इ. पा. ५५०).

जैत्रपाळ—विक्रमादित्याचा मुलगा.

जैत्रपाळ यादव—(स. ११९१-१२१०) पांचव्या भिल्लम यादवाचा मुलगा. हा आपल्या बापानंतर गादीवर बसला. हाहि पराक्रमी होता. यानेंहि 'समस्त भुवनाश्रय महाराधराज' हीं बिरुदें आपल्यास लाविलीं होतीं. याला वेद, मीमांसा व तर्कशास्त्र यांचें चांगलें ज्ञान होतें. प्रसिद्ध मराठी आद्यकवि मुकुंदराज हा याच्याच पदरीं होता. कोणी म्हणतात कां, मुकुंदराजाचा उल्लेखित जैत्रपाळ हा चांद्याच्या बाजूचा दुसरा कोणी जयपाळ असावा. प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य याचा पुत्र लक्ष्मीधर हा याचा मुख्य पंडित होता. सेनापती शंकर नांवाचा ब्राह्मण होता. हें नांव जयत्पाळ किंवा जैतुगी असें लिहिलेलें आढळतें.

यानें पहिल्या प्रतापरुद्र काकतीयाच्या कारकीर्दीत सुरू झालेली लढाई पुढें महादेव काकतीयाशीं सुरू केली; व महादेवास ठार मारलें. गणपतीला कैदेंत ठेवलें. काकतीय लेखांमध्यें महादेव व यादव यांमधील युद्धाचा उल्लेख आढळत नाहीं. कारण त्याचा शेवट दोघांना फार हानिकारक होता. शेवटीं यानें कांहीं अटींवर गणपति काकतीयास आंध्रदेशाच्या गादीवर बसाविलें (सिवेल व आयंगार).

२. दुसऱ्या सिंघण यादवाचा पुत्र (कृष्णदेव यादव पाहा).

जैत्रसिंह गुहिलोत—(स. १२१२-१२५१) हा पद्मसिंहानंतर मेवाडच्या गादीवर आला. याबद्दल जयतल, जयसल, जयसिंह, जयंतसिंह किंवा जितसिंह असें लिहिलेलें आढळतें. हा मोठा योद्धा होता. तसेंच आसपासचे राजे व मुसलमान यांच्याशीं यानें अनेक लढाया करून विजय मिळविला होता असें चीरवा येथील शिलालेखावरून दिसतें. त्याच लेखांत नागदत्राचा तलारक्ष योगराज व त्याचे चार पुत्र यांची माहिती दिली आहे, चार पुत्रांचीं नांवें पमराज, महेन्द्र, चंपक आणि क्षेम अशीं होतीं. यांपैकीं महेन्द्राचा पुत्र बालाक हा कोट्टडक (कोटडा) घेत असतां राणक (राणा) त्रिभुवनशीं लढतांना जैत्रसिंगाच्यापुढें मारला गेला व त्याची स्त्री भोली त्याच्यासह सती गेली. त्रिभुवन हा गुजराथच्या दुसऱ्या भीमाचा उत्तराधिकारी होता. त्रिभुवनाची अत्यंत थोडी कारकीर्द असल्यामुळें ही लढाई वि. सं. १२९९ (स. १२४२-४३) च्या सुमारास झाली असली पाहिजे.

नाडौलच्या कीतू चौहानानें मेवाडचें राज्य कांहीं दिवस घेतलें होतें. त्याकरितां यानें नाडौलवर स्वारी केली. नाडौलचा याच्या वेळचा राजा कीतू चौहानाचा नातू उदयसिंग होता. त्याचा यानें जोराचा पराभव केला असें रावळ समरसिंहाच्या आबूच्या शिलालेखांत आहे. पण उदयसिंहाची नात व चाचिगदेवाची मुलगी रूपादेवी हिचा विवाह जैत्रसिंहाचा पुत्र तेजसिंहाशीं करण्यांत आला. जुनें वैर मिटविण्याकरितां हा प्रयत्न असावा.

शिवाय यानें माळव्याच्या परमारांशीं आणि मुसलमानांशीं लढाया केलेल्या दिसतात. नागद्याचा तलारक्ष योगराजाचा थोरला पुत्र पमराज नागदा पडल्यावर भूतालाच्या लढाईत सुलतानाकडून मारला गेल्याचा चिरव्याच्या शिलालेखांत निर्देश आहे. हा सुलतान म्हणजे शम्सुद्दीन अल्तमश असावा. हंमीरमदमर्दन नांवाच्या संस्कृत नाटकांत मालच्छीकार असें संस्कृत शैलीचें नांव दिलें आहे. कुतुबुद्दीन ऐबक या दिल्लीच्या बादशहानें गुलाम अल्तमश याला अमीर शिकार अशी पदवी सेनापति असतांना दिली होती. अमीरशिकार या शब्दाचें कवीनें संस्कृतीकरण केलेलें दिसतें. यानें त्याचा पराभव केला. ही लढाई टाडच्या म्हणण्याप्रमाणें नागोर येथें झाली नसून नागद्याजवळ झाली होती.

सिंध प्रांतांतल्या लोकांशीं याचें युद्ध झाल्याचा समरसिंहाच्या आबू येथील शिलालेखांत निर्देश आहे. पण ही लढाई नक्की कोणती हें समजत नाहीं. कदाचित् जलालुद्दीनानें अनहिलवाडा लुटला त्या वेळीं यानें त्याच्याशीं सामना दिला असावा. ती गोष्ट स. १२२३ मध्यें झाली.

दिल्लीचा सुलतान नासिरुद्दीन महमूदानें कनोजहून आपला पुत्र जलालुद्दीन यास दिल्ली येथें बोलावलें तेव्हां तो भीतीनें चितोडच्या डोंगराळ प्रदेशांत पळाला. सुलतानानें त्याचा पाठलाग केला, पण आठ महिने झाले तरी तो हातीं लागेना. तेव्हां त्याची सेना दिल्लीस परतली, असें तारीख फिरिश्ता ग्रंथांत लिहिलें आहे (ब्रिग्ज, फिरिश्ता १.२३८). त्या वेळीं मेवाडचा राजा हा होता. यानें त्याला मदत केली असावी. त्या वेळीं मेवाडांत सर्वांत प्रतापी हाच राजा होता. याची शत्रुपक्षानें प्रशंसा केली आहे. शम्सुद्दीन अल्तमशनें नागदा उध्वस्त केलें तेव्हां मेवाडची राजधानी चितोड झाली. त्यापूर्वी नागदा व आहाड अशा दोन ठिकाणीं राजधानी होती.

याच्या वेळचे दोन शिलालेख व दोन हस्तलिखित ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. पहिला वि. सं १२७० (स. १२१३) मधील एकलिंगमंदिराच्या चौकांत आहे (भावनगर इन्स्क्रिप्शन्, पृ. ९३ टिप्पण). दुसरा शिलालेख वि. सं. १२७९ (स. १२२२) वै. शु. १३ चा नाडेसमा गांवीं सूर्यमंदिरावर आहे (अप्रकाशित). त्यांत याची राजधानी नागदा व श्रीकरण अधिकाऱ्याचें नांव डूंगरसिंह लिहिलें आहे. याच्या वेळीं वि. सं. १२८४ (स. १२२८) फा. व ३० ला ओघनिर्युक्ति नांवाचें जैन पुस्तक ताडपत्रांवर आघाटपुरीं लिहिलें. तें सध्यां खंबायत शांतिनाथ मंदिरांत आहे. त्यांत याच्या महामात्याचें नांव जगत्सिंह लिहिलें आहे (पीटर्सनचा तिसरा रिपोर्ट, पृ. ५२). रावळ जयतसिंह (जैत्रासह) आण त्याचा आश्रित जयसिंह याच्या वेळी ठाकूर वयजलनें वि. सं. १३०९ (स. १२५३) माघ व. १४ रोजीं पाक्षिकवृत्ति नांवाचें पुस्तक आघाट येथें लिहिलें त्यांत जयसिंह (जैत्रसिंह) चा दक्षिण व उत्तर यांमधील राजांचा मानमर्दक म्हणून निर्देश आहे. त्यांत याचा श्रीकरणाधिकारी तल्हण दिला आहे (पीटर्सन, तिसरा रिपोर्ट, पृ. १३०). यावरून वि. सं. १२७०-१३०९ पर्यंत हा मेवाडचा राजा होता असें ठरतें. याचा पुत्र तेजसहाच्या वेळचा म्हणजे वि. सं. १३०७ (स. १२६१) मधील श्रावकप्रातक्रपणसूत्रचूर्णि नांवाचा ग्रंथ मिळतो त्यावरून वि. सं. १३०९-१७ पर्यंत याचा देहान्त ठरतो.

जनाबादी—औरंगजेबाची रखेली (हिराबाई पाहा).

जयट—कैय्यटाचा बाप.

जार्कीदेव कदंब—(चोकदेव पाहा).

जोगम कलचरी—हा कल्याणीच्या कलचुरी-घराण्यांपैका राजलचा मुलगा.

जोगा परमानंद—(समाधि स. १३३८) याचें नांव जोगा. गुरूचें नांव परमानंद. जात शूद्र. तेली असाहि निर्देश आहे. गांव बाशीं. तेथील भगवंताच्या दर्शनास जातांना हा गीतेचा एकेक श्लोक म्हणून साष्टांग नमस्कार घालीत जात असे. एकदां यास एक पीतांबर मिळाला. पीतांबर मळेल म्हणून हा जपून नमस्कार घालूं लागला त्यामुळें उशीर झाला. तेव्हां पीतांबराच्या लोभाबद्दल यानें कडक देहदंड घेतला.

याच्या ग्रंथाचें लेखन विसोबा खेचर करीत असे. म्हणजे हा नामदेव-समकालीन ठरतो. नवलक्ष साळ्या असें याचें टोपण नांव असावें. याची समाधि बाशीं येथें असून मार्गशीर्ष व. ४ स याचा उत्सव करतात. याचीं पदें, आरत्या व अभंग उपलब्ध आहेत. याची गुरुगुडी नांवाची कविता फार प्रसिद्ध आहे (म. सा. पू. पा. १६८).

जोगिपा—चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं त्रेपन्नावा सिद्ध. हा शबरीपाचा शिष्य. जात डोम. गांव उदंतपूर.

जोत्याजी केसरकर—हा संभाजीचा एक स्वामिभक्त सेवक कोल्हापूर प्रांतांतील पुंजाळ गांवचा पाटील. नेहमीं संभाजीजवळ असे. संभाजीच्या मृत्यूनंतर हा येसुबाईजवळ होता. तिचा पत्रव्यवहार हा करीत असे. शाहूचें लग्न करण्यांत ह्यानेंच पुढाकार घेतला होता. शाहूनें यास सरदेशमुखांच्या कारभारावर मुख्य अधिकारी नेमिलें.

जोधबाई—(लग्न स. १५८५) अकबराची एक रजपूत राणी. ही जोधपूरच्या मालदेवाची मुलगी. उदयसिंहानें ही अकबरास दिली. हिचें माहेरचें नांव जगत्-घोषिणी ऊर्फ बालमती. अकबराचें हिच्यावर प्रेम होतें. अकबराच्या मरणानंतर हिनें विष खाऊन प्राण सोडला. शहाजहान बादशहा हा हिचाच मुलगा (बील).

जोधराज—(ग्रंथकाल स. १८१७) एक हिंदी कवि. गौड ब्राह्मण. पिता बाळकृष्ण. याचें 'हम्मीररासो' काव्य फार ओजस्वी असून प्रसिद्ध आहे.

जोधसिंह—(स. १७६९ पूर्वी) हा सालूंबरच्या जैतसिंहाचा मुलगा. यानें स्वामिभक्तीनें महाराण्याकरितां शांतपणें विषप्राशन करून देह ठेवला. हा महाराण्याावरुद्ध सरदारांना मिळाला होता, असा याच्यावर आरोप होता. महाराण्यानें 'तूं नाहातर मीं विष प्यालें पाहिज' असें सांगतांच हा विष प्याला. तसेंच याचा पुत्र पहाडसिंग या गोष्टीबद्दल कांहींएक मनांत न आणतां महाराण्याच्या सेवेला हजर राहला (उदयपुर राज्यका इतिहास, पा. ११९५).

जोनराज—(ग्रंथकाल स. १७३०) संस्कृत ग्रंथकार. यानें 'किरातार्जुनीयम्' (स. १३७०), 'पृथ्वीराजविजय' व 'श्रीकंठचरित' यांवर टीका लिहिल्या आहेत. याच्या पित्याचें नांव नोनराज व आजाचें लोलराज.

यानें कल्हणाच्या नंतरचा राजतरंगिणीचा भाग लिहिला. स. १४१२ पर्यंत तो भाग आला आहे. हा कल्हणच्या मागून सुमारें दोनशें वर्षांनीं झाला.

जोना ऊर्फ उलुघबेग—(मुहंमद तुघ्लक पाहा).

जोयिदेव गुप्त—(जोम गुप्ताचें नामांतर).

२. (जोविदेव गुप्त पाहा).

३. हा तिसऱ्या विक्रमादित्य गुप्ताचा मुलगा.

जोविदेव गुप्त—(स. १२३८) हा आहवादित्य वीरगुप्ताचा मुलगा.

जोम्म गुत्त--(स.११८१ सुमार) हा गुत्त घराण्यांतील पहिल्या वीर विक्रमादित्याचा मुलगा.

जोम्मन संगम—(स.१३७५) हा विजयनगरच्या संगम घराण्यांतील दुसऱ्या हरिहराचा मुलगा. बुक्क दुसरा व देवराय पहिला हे याचे बंधु गादीवर आले होते.

जोम्मा--(स. १३५५-७९) पहिल्या बुक्कराय संगमाची पत्नी.

जौक—(स. १७८५-१८५२) एक ऊर्दू कवि. याचें नांव शेख मुहम्मद इब्राहीम जौक असें आहे. याचा गुरु गुलाम रसूल. 'खाकानी हिंद' ही याची पदवी (क. कौ. ४).

जौहर—यानें हुमायूनची हकीगत लिहून ठेवली आहे. हा त्याचा नोकर होता (गुल्बदन पाहा).

ज्योतिपंत महाभागवत—(समाधि स. १७८८) अथर्ववेदी देशस्थ ब्राह्मण. हे खटाव प्रांतांतील बुध मलवडी कर्यातीचे देशपांडे. वडिलांचें नांव गोपाळराव देशपांडे.

हे चांगले विद्वान् असून झांशी संस्थानचे दिवाण होते. पण एकदां एका ब्राह्मणाला शिक्षा करण्याचे कामीं मतभेद होऊन यांनी नोकरी सोडली. आणि आपली लाखों रुपयांची संपत्ति व आयुष्य काशीपासून रामेश्वरापर्यंत विठ्ठलाचीं मंदिरें बांधून भागवतधर्माच्या प्रचारांत आयुष्य खर्ची घातलें. यांनीं विठ्ठलाचों हजार देवालयें बांधलीं आणि त्यांची मालकी स्वतःच्या घराण्याकडे न ठेवतां लोकांकडे दिली. पुण्याच्या लकडीपुलाजवळील व मुंबईच्या विठ्ठलवाडींतील मंदिर त्यांपैकींच होय.

शिवाय समग्र भागवतावर एक अभंगात्मक व दुसरी ओवीबद्ध अशा दोन टीका लिहिल्या. शिवाय प्रवृत्ति-निवृत्ति-ऐक्यता-रत्नावली नांवाचा गद्य ग्रंथ लिहिला. यांना वेदव्यासांनीं ब्राह्मणरूपानें येऊन महाभागवत ग्रंथ दिला व तो चिंचणेर मठांत आहे अशी आख्यायिका आहे. समाधिशक, शके १७१० मार्गशीर्ष कृ. १३.

ज्योतिरीश्वर कविशेखर--(स. १४८७-१५०५). धूर्तसमागम नांवाच्या संस्कृत प्रहसनाचा कर्ता. तें विजयनगरच्या नरसिंहाच्या कारकीर्दीत लिहिलें.

झ

झझूखान--(स. १२८७-१२९१) हा इझ्झुद्दीन बल्बनचा मुलगा. कैकूबादच्या वेळीं हा सामानचा सुभेदार होता. खल्जीवंशाची सत्ता सुरू झाली तेव्हां राजकारणांत तुर्कांचें वर्चस्व कमी होऊन पठाणांचें वर्चस्व सुरू झालें, ही गोष्ट तुर्कांना सहन न होऊन त्यानीं याच्या नेतृत्वाखालीं बंड केलें (स. १२९१). पण बुर्दोनजवळ याचा पराभव होऊन याला पकडून हाल करीत फीरूजशाहापुढें आणलें. त्यानें याच्या गुन्ह्याकडे दुर्लक्ष करून यास सोडून दिलें. राजकारणाच्या दृष्टीनें या चुकीच्या वर्तनाबद्दल सरदारांनीं दोष देतांच 'अशाश्वत राज्यपदाकरितां शाश्वताकडे दुर्लक्ष करण्यास माझी तयारी नाहीं' असें त्यानें उत्तर दिलें.

झपरखान तुघ्लक--दिल्लीच्या फीरूझ तुघ्लकचा हा मुलगा. याला फत्तेखान व मुहंमद असे दोन भाऊ होते. याचा मुलगा अबु बकर स. १३८९ त दिल्लीच्या गादीवर आला. पण थोड्याच दिवसांत त्याला पदच्युत करण्यांत आलें.

झबेताखान रोहिला—(मृत्यु स. १७८५) हा नजीबखान रोहिल्याचा मुलगा. नजीबखानच्या मृत्यूनंतर यानें बादशहाकडून मीरबक्षीगिरी मिळवून मराठ्यांशीं लढाई करण्याची खटपट चालवली. नजीबखानाचे घराण्याचा सूड घेण्याचा महादजीचा संकल्प होता. त्यास अनुसरून त्यानें स. १७७२ त रोहिल्यांवर स्वारी केली. या युद्धाचा सर्व मारा यावर झाला. हा शुक्रतालच्या किल्ल्यांत राहिला असतां याजवर शिद्यानें तोफांचा मारा केला तेव्हां याची दाणादाण उडाली. हा स्वतः काळोख्या रात्रीं निसटून गंगेपलीकडे बिजनोर प्रांतात गेला. याचे पाठोपाठ मराठ्यांनीं जाऊन सर्व प्रांत लुटून उध्वस्त केला. पुढें हा नजीबगडास गेला. तेंहि ठिकाण मराठ्यांनीं हस्तगत केलें. याची बायकामुलें मराठ्यांचे हातीं लागलीं.

पुढें हा घोसगडास असतां नजफखानानें तो किल्ला काबीज करून यास कैद करून आग्र्याचे किल्ल्यांत ठेवलें. मल्हारराव होळकरापासून रोहिले हे होळकरांचे मानसपुत्र होते. तेव्हां यानें अहिल्याबाईकडे संधान बांधलें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. याचा मुलगा गुलाम कादर यानें व बापाचें बरें नव्हतें. बापानें मुलाची जहागीरसुद्धां जप्त केली होती. हा घोसगड येथें ता. २१-१-१७८५ त मरण पावला. तत्कालीन पत्रांतून यास जाबेतखान म्हटलें आहे (मं. त्रै. वर्ष ८, अं. ३, ले. २२, पृ. १४०).

झमानशाह—(मृत्यु स. १७९६ नंतर) हा अहमदशाह अब्दालीचा नातू व तैमूरशाहाचा मुलगा. हा काबूल कंदाहारचा राजा होता. हा स. १७९६ त हिंदुस्थानावर स्वारी करण्यास निघाला. परंतु यास काबूलकडे आपल्या भावांनीं बंड केल्याची बातमी समजल्यामुळें हा परत गेला. पुढें याच्या भावानें याचे डोळे काढून यास मारिलें. इंग्रजांनीं शहासुजास गादीवर बसविलें तेव्हां अफगाणांनीं याच्या नांवाची द्वाही फिरविली होती.

झामसिंग—हा गाविलगडचा पहिला रजपूत किल्लेदार. हा मूळचा बंगालचा रहिवासी. रघूजी भोसल्यानें याचें शूरत्व व इमानीपणा पाहून यास किल्लेदारांवर अधिकारी नेमिलें. याच्यानंतर याचा पुतण्या प्रमोदसिंग हा गाविलगडचा किल्लेदार झाला. वेलस्लीनें गाविलगड जेव्हां घेतला त्या वेळीं वेर्णासिंग हा किल्लेदार होता.

झामोरिन—हा 'सामुद्रिक' शब्दाचा इंग्रजी उच्चारामुळें झालेला अपभ्रंश.

झालिमसिंग—हा कोट्याचा रिजंट होता. शिंद्याबरोबर झालेल्या एका लढाईंत हा जखमी होऊन त्रिंबकजी इंगळ्याच्या हातीं लागला. त्रिंबकजीनें यास एका दूरच्या किल्ल्यांत ठेवून याच्या जखमांस औषधोपचार करून बरें केलें. यामुळें हा इंगळ्याचा मरेपर्यंत ऋणी राहिला. इंगळे घराण्याचा भाईचारा कोटा दरबार अद्यापपर्यंत मानीत आहे.

मेवाड दरबारला बंडखोरांनीं व फितुरी सरदारांनीं जेरीस भंडावून सोडलें होतें. त्यापासून दरबारची सुटका करण्याची याची इच्छा होती. म्हणून यानें महादजी शिंद्याला आपल्या मदतीस बोलाविलें. महादजीनें झालिमसिंगची मागणी कबूल करून अंबाजी इंगळ्याबरोबर मोठी फौज देऊन त्यास याबरोबर रवाना केलें, व आपण याच्या मागोमाग मारवाडची खंडणी वसूल करण्यासाठीं निघाला. याच्याबरोबर अंबाजी इंगळे चितोडला गेला व मेवाड दरबारांतील विरुद्ध असलेल्या सरदारांचा त्यानें मोड केला (रत्नाकर, ऑगस्ट १९३०, अं. ८, पृ. ६३७).

झियाउद्दीन बर्नी—बरन शहरीं जन्मास आला म्हणून यास बर्नी असें म्हणतात. मुहम्मद व फीरूझ तुघलकाच्या कारकीर्दीत हा पुढें आला. यानें 'तारीख-इ-फीरोजशाही' हा ग्रंथ केला आहे. त्यांत बल्बन ते फीरूज तुघलकापर्यंत माहिती आली आहे (बील).

झुल्फीकारखान—जातीनें मोंगल. याच्याच वंशांत झुल्फीकारखान नांवाचा सरदार होता. त्याची मुलगी ही शाहूची आई होय.

झुब्तुन्निसा—जन्म स. १६६० ही औरंगजेबाची चौथी मुलगी. हिच्या आईचें नांव नबाबबाई.

झुल्फीकारखान—(स. १६५७–१७१२) याचें मूळचें नांव ईतिकदकाहखान असें होतें. औरंगझेबाचा वजीर असहखान त्याचा हा मुलगा. औरंगझेबाच्या कारकीर्दीत यानें अनेक कामगिऱ्या केल्या. स. १६८९ त हा कोंकणच्या स्वारींत होता. रायगड फितुरीनें घेऊन बालशाहू व येसूबाई यांना धरून यानें औरंगझेबाच्या स्वाधीन केलें (स. १६९० च्या सुमारास). याबद्दल औरंगझेबानें याला झुल्फीकार ही पदवी दिली. नंतर हा राजारामास धरण्यासाठीं जिंजीला सहासात वर्षे वेढा घालून बसला (स. १६९१–९७). परंतु शेवटीं याच्या हातून राजाराम निसटला. तंजावर व त्रिचनापल्ली यांवर यानें स्वाऱ्या केल्या होत्या. यास अमीरउलउमरा नसरतजंग असा किताब होता.

पुढें याला मराठ्यांच्या बंदोबस्तासाठीं माळव्यांत पाठविण्यांत आलें (स. १७०५). तेथें याची व नेमाजी शिंद्याची झटापट उडाली. तिकडून याला वाघीनगिऱ्यावर पाठविलें असतांना यानें तें सर केलें (स. १७०६).

औरंगझेब मेल्यावर हा अजमशाहास येऊन मिळाला व नेमाजी शिंद्याच्या मदतीनें कामबक्षावर स्वारी करून त्याला लढाईंत ठार केलें (स. १७०८). परंतु पुढें अजमशहाचा बहादूरशहानें पराभव केल्यामुळें हा दक्षिणेंत पळून आला. पण बहादूरशहानें याला क्षमा केली व याला पदवी देऊन दक्षिणचा सुभेदार नेमला. स. १७१२ मध्यें याला फर्रुखसियर बादशहानें फांशी दिलें.

झुंझारराव कडू—बाजी पासलकरांचा साहाय्यक. यांना जाधव असेंहि म्हणतात.

झुंजारराव घाटगे—हा मराठा सरदार प्रथम पहिल्या रघूजी भोसल्याचे वेळेस पुढें आला. नंतर मुधोजी व साबाजी यांचे भांडणांत हा प्रथम साबाजीचे पक्षास मिळाला होता. परंतु पुढें मुधोजीनें यास साबाजीचे पक्षाकडून फोडून आपणांकडे वळवलें. स. १७७३ त कुंभारीचे लढाईंत हा मुधोजीकडून होता (ना. प्रां. इ. १०६; १९६).

झेबुन्निसा—(स. १६३८–१७०२) हिचा जन्म दौलताबादेस ता. १५ फेब्रुवारी स. १६३८ रोजीं झाला. ही औरंगजेबाची सर्वांत वडील मुलगी होय. लहानपणीं हिला हाफीजा मरियम नामक विदुषीचे हाताखालीं शिक्षणसंपादनार्थ ठेवण्यांत आलें होतें. हिची बुद्धिमत्ता दांडगी

असल्यामुळें हिनें कुराण ग्रंथ लहानपणींच मुखोद्गत केला होता. याबद्दल हिला औरंगजेबानें तीस हजार होन बक्षीस दिले. फार्सी व अरबी या भाषांतील अक्षरें काढण्यांत ही पटाईत होती. पुस्तकांचा हिचा संग्रहहि दांडगा असून, हस्तलेखांचा व जुन्या नव्या पुस्तकांचा संग्रह करण्याकरितां हिनें मोठमोठ्या पंडितांची योजना केली होती. ही उत्तम कवयित्री होती.

'दिवाण-ई-मकफी'–मकफी म्हणजे गुप्त असें हिचें फार्सी कवितेंतील नांव आहे–हा ग्रंथ हिनें लिहिला. औरंगजेबाचा मुलगा अकबर यानें आपल्या बापाच्या विरुद्ध बंड उभारिलें, या कामीं हिचें अंग असल्यानें, हिला जानेवारी स.१६८१त औरंगजेबानें सेलीमगडांत कैदेंत ठेविलें. पुढें हिचा अकबराशीं झालेला पत्रव्यवहार उघडकीस आल्यामुळें, हिचा चार लाखांचा तनखा बंद करण्यांत आला. हिची सर्व मालमत्ता जप्त करण्यांत आली. बंदीवासांत असतांना हिचे फार हाल झाले.

हिचा शंभू छत्रपतीशीं प्रेमसंबंध होता. हिनें त्यास मनानें वरल्यामुळें त्याव्यतिरिक्त दुसऱ्याशीं लग्न करणें अधर्म्य होय, अशी हिची समजूत झाल्यामुळें ही जन्मभर अविवाहित राहिली, व शंभू छत्रपतींचा मुलगा शाहू यास हिनें वात्सल्यप्रेमानें संभाळिलें. इतकेंच नव्हे, तर शाहूच्या सुटकेस हीच कारणीभूत झाली. हिनें संभाजीस वांचविण्यांत यावें अशाबद्दलचा हट्ट धरिला होता. ही संभाजीचे वधाचे वेळीं दक्षिणेंत आली नव्हती, वगैरे आख्यायिका आहेत.

ही दिल्ली येथेंच ता. २६ मे १७०२ रोजीं दिवंगत झाली. तेथेंच काबुली दरवाजाबाहेर जहानरहा बागेंत हिला पुरण्यांत आलें. नंतर हिची कबर व तीवरील शिलालेख हीं शिकंदरा येथें ठेवण्यांत आलीं. अद्यापहि ही कबर दाखविण्यांत येते (मं. वा. इ. श. १८३७ ले. ७३).

ही उत्कृष्ट कवयित्री असून हिच्या फार्सी कवितांचा संग्रह ईश्वरीप्रसाद माधुर यांनीं संपादून प्रसिद्ध केला आहे. हिनें दिल्लींत कुमारी मशीद बांधली. हिचा विवाह दारा शुकोहचा मुलगा सुलेमान शुकोहशीं ठरला होता. पण तो राजकीय अडचणीमुळें झाला नाहीं. शिवाजीमहाराजांशीं हिचा प्रेमसंबंध होता अशी आख्यायिका आहे; असें म्हणतात.

झेनखान कोक—(मृ. स. १६००) अकबराचा दूधभाऊ. पिता खाजा हिरवी. आई पिच्छाजान. याची चुलतबहीण जहांगीरला दिली होती. स. १५८८ मध्यें हा काबूलचा सुभेदार होता. हा कुशल तंतुवाद्य वाजविणारा होता. हा व अझीझ कोका एक असावेत.

झेनुल आबिद्दीन—(स. १४२३-७४) काश्मीरचा राजा सिकंदरचा मुलगा. आपला भाऊ अलीशहाचा पराभव करून हा गादीवर बसला.

२. (शादीखान पाहा).

झोट प्रतिहार—मंदोरच्या प्रतिहार वंशांतील शीलुकाचा पुत्र. यानें राज्यसुख भोगून शेवटीं गंगेंत मुक्ति घेतली. याचा पुत्र भिल्लादित्य.

ट

टॅव्हर्नियर—(जान बॅप्टिस्टा टॅव्हर्नियर पाहा).

टॉमस रो (सर)–(ज. स. १५८० मृ स. १६४४ नवं.) हा सुप्रसिद्ध इंग्लिश वकील. ज्या थोर इंग्रज पुरुषांनीं अंगच्या अनेक गुणांवर हिंदुस्थानांत इंग्रजी राज्याची इमारत उभारली, त्यांपैकीं हा पहिला होय.

टिक्कण—तेलगू कवि. यानें तेलगू भाषेंत महाभारत लिहिलें आहे. वारंगळच्या गणपतिमंदिरासमोर याचा व जैन पंडितांचा वाद झाला. त्यांत यानें जैनांचा पराजय केला.

टिपू सुलतान—(जन्म स. १७५३–मृत्यु स. १७९९ मे ४) म्हैसूरचा राजा. हा म्हैसूरच्या हैदरअलीचा वडील मुलगा. टिपू स. १७५३ मध्यें देवनहळ्ळी येथें जन्मला. याची आई ही मीर मोईनुद्दीन नामक एका प्रतिष्ठित सरदाराची मुलगी असून, तिचें नांव फकिरुन्निसा असें होतें.

गादीवर येण्यापूर्वीच हा लढाईत भाग घेत असे. मराठ्यांनीं हैदरवर केलेल्या सन १७७१ च्या मोहिमेंत यानें त्यांना तोंड दिलें होतें. पुढें हैदरनें याला मराठ्यांनीं घेतलेला मुलूख परत मिळविण्यासाठीं पाठविलें होतें (स.१७७३). त्याप्रमाणें यानें गुरमकोंडा व त्याच्या आसपासचा थोडासा प्रांत परत मिळविला (स. १७७४).

स. १७८० त हैदरावर इंग्रज चालून आले, त्या वेळीं इंग्रज सेनापति बेली याच्यावर टिपूनें कांची येथें एकाएकीं हल्ला करून बेलीचा पराभव केला; व त्याला त्याच्या साऱ्या फौजेसह बंदिवान केलें. इतक्यांत कर्नल ब्रेथवेट हा दुसरा इंग्रज सेनापति टिपूवर चालून आला; पण तंजावर येथें त्याचाहि पराभव करून, टिपूनें त्याला त्याच्या सैन्यासह कैद केलें.

हैदर वारल्यावर (१७८२ डिसें.) टिपू गादीवर आला. याचें व फ्रेंचांचें सूत असल्यानें जेव्हां अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धांत फ्रेंच लोकांनीं अमेरिकेस मदत केली, तेव्हां टिपूनेंहि फ्रेंचांना पाठिंबा दिला होता व फ्रेंचहि यास मदत करीत. इंग्रजांचा सेनापति आयर कूट हा टिपूवर आला असतां फ्रेंच सरदार बुसी हा टिपूच्या मदतीस आला होता. सालबाईचा तह आपणास मान्य आहे असें टिपू म्हणे, परंतु त्या तहांत हैदरानें इंग्रजांपासून घेतलेला मुलूख परत करावा ही अट मात्र हा मान्य करीना. त्यामुळें इंग्रजांनीं जलमार्गानें येऊन टिपूचा बेदनूर प्रांत घेतला. तेव्हां यानें एकदम त्यांच्यावर हल्ला करून व मंगलोर शहरास नऊ महिने वेढा घालून तें काबीज केलें व इंग्रज अधिकारी कैदेंत टाकिले.

अखेर इंग्रजांनीं तह करण्याकरितां आपले वकील टिपूकडे पाठविले. यानें प्रथम वकिलांचा उपमर्द करून मग (११ मार्च १७८४) त्यांच्याशीं मंगलोर येथें तह केला. या तहानें परस्परांनीं परस्परांचा घेतलेला प्रांत परस्परांस परत देण्याचें ठरलें. यानंतर मराठे व निजाम यांनीं आपले मुलूख परत घेण्याचें ठरविलें.

याचें धोरण नेहमीं आक्रमण करण्याचें असे. लढाई अंगलट येते असें दिसल्यास हा तह करी, पण हा तह कधींच पाळीत नसे. शत्रूची पाठ फिरतांच याच्या आक्रमणास सुरुवात होई. शिवाय नरगुंदकराची मुलगी जनानखान्यांत दाखल करणें, लोकांना सक्तीनें मुसलमान करणें वगैरे प्रकारहि हा करी. युद्ध करण्यांतहि हा लांबच्या दौडी करणें, रात्री अचानक छापा घालणें वगैरे प्रकार करी. त्यामुळें उत्पाती स्वभावाचा म्हणून याची प्रसिद्धी होती.

यामुळें कॉर्नवालीसनें निजाम व मराठे यांच्याशीं स्नेह वाढविला. तेव्हां यानें त्रावणकोरच्या तटबंदीवर हल्ला केला. त्यांत याला यश आलें नाहीं, पण त्यामुळें वरील तिघांची जूट अपरिहार्य झाली. लढाईस सुरुवात होऊन मेडोजनें बहुतेक मलबार घेतला आणि कॉर्नवालीस सेनापति झाला (स. १७९१). निजाम आणि मराठे (भाऊ व फडके) ठाणीं घेत त्यास येऊन मिळाले व श्रीरंगपट्टणकडे कूच झालें, पण युद्धाला जोर लागलेला पाहून यानें तह केला (२३ फेब्रु. १७९२); व दोस्तहि पदरांत पडलेला फायदा वांटून घेऊन परत फिरले.

पण यानें प्रयत्न सोडला नव्हता. नेपोलियनच्या मनांत हिंदुस्थानावर स्वारी करण्याचें आलें होतें; पण त्याला इकडची माहिती चांगली नव्हती. टिपूनें या बाबतींत त्याला पत्रें पाठविलीं होतीं व मदत देण्याचेंहि कबूल केलें होतें (स. १७९८). तसेंच यानें इराण, तुर्कस्थान वगैरे देशांतहि वकील पाठवून आपणास अनुकूल राजकारण करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

मात्र फ्रेंचांशीं टिपूनें दोस्तीचा तह करून व त्यांचीं पलटणें चाकरीस ठेवून इंग्रजांना हाकलून लावण्याचा उद्योग आरंभिला (जून १७९८). तेव्हां वेलस्लीनें याबद्दल खुलासा मागितला असतां टिपूनें त्याला धुडकावून लाविलें, त्यामुळें वेलस्लीनें टिपूशीं युद्ध पुकारलें (२२ फेब्रु. १७९९); व इंग्रज सैन्यानें टिपूच्या सैन्याचा एक दोन ठिकाणीं पराभव केला. नंतर इंग्रजी सैन्यानें श्रीरंगपट्टणावर दौड करून त्यास वेढा घातला. वेढा उठविण्यासाठीं टिपू शेवटपर्यंत मोठ्या शौर्यानें लढला. अखेर पट्टणाच्या वेशींत इंग्रजांना अडवीत असतां डोकींत गोळा लागून ठार झाला (४ मे १७९९). तेथील प्रेतांच्या खचांतून याचें प्रेत ओळखून काढून तें हैदरच्या कबरस्थानाजवळच लालबागेंत दुसऱ्या दिवशीं पुरण्यांत आलें. त्या वेळीं इंग्रजांनीं याला योग्य राजकीय मान दिला.

टिपूच्या मरणसमयीं याचें राज्य ३०,४०,००० होनांचें (१ कोटि ६ लक्ष रुपये) होतें. तें इंग्रज, मराठे व निजाम यांनीं आपसांत वांटून घेतलें व थोडेंसें म्हैसूरच्या पूर्वीच्या राजाच्या चामराज नांवाच्या वंशजाच्या स्वाधीन केलें. पट्टण घेतल्यावर इंग्रजांनीं टिपूच्या कुटुंबास आपल्या ताब्यांत घेऊन त्याच्या खर्चास २,४०,००० होनांचा मुलूख लावून दिला व त्यांना वेलोर येथें ठेवण्यांत आलें. पुढें वेलोर येथील शिपायांनीं इंग्रजांविरुद्ध बंड केलें (१० जुलै १८०६) त्यांत टिपूच्या मुलांचा हात असावा असें ठरवून इंग्रजांनीं त्यांची जहागीर जप्त केली आणि त्यांना कलकत्ता येथें नेऊन ठेविलें. विल्सन म्हणतो कीं, मुलें दंग्यांत सामील असल्याबद्दलचा पुरावा मुळींच मिळत नाहीं.

टिपूनें १७ वर्षें कारभार केला. याचा स्वभाव चंचल, लोभी, अविश्वासी, क्रूर व धर्मवेडा असा होता. बापानें तर याला वेडा ठरविलें होतें. याची हिंदु प्रजा यास कंटाळली होती. कारण यानें पुष्कळ हिंदूंस हालहाल करून

बाटविलें व जे बाटेनात त्यांना ठार केलें. एक नवीन धर्म स्थापन करून आपण त्याचा पैगंबर व्हावें अशी याची मनीषा होती. यानें नवीन कालगणना (वर्षाच्या महिन्यांचीं नांवें व आठवडा वगैरे) सुरू केली; त्याचप्रमाणें मापें, वजनें व नाणींहि नवीनच पाडलीं. हा स्वतःस फार शहाणा समजे. मात्र यानें आपला राज्यकारभार शिस्तवार चालविला व लष्करी आणि मुलकी सुधारणाहि केल्या. हा आपले हुकूम स्वतः लिहून काढी. फार्सी, कानडी व ऊर्दू या भाषा याला चांगल्याच अवगत होत्या. हा धर्मवेडा होता तरी पण संकटसमयीं ब्राह्मणांना अनुष्ठानें बसविण्यास व देवाची प्रार्थना करण्यास सांगे. हा आपल्या कैद्यांना फार क्रूरपणें वागवी. कलाकौशल्याचा व वाङ्मयाचा हा शोकी होता. यानें आपल्या राजवाड्यांत फार मोठा ग्रंथसंग्रह जमविला होता. त्यांत १० व्या शतकापासूनचे बरेचसे संस्कृत हस्तलिखित ग्रंथ होते. तसेंच कुराणाचीं भाषांतरें, मोगल इतिहासाच्या बखरी, हिंदुस्थानच्या इतिहासाच्या तवारीखा वगैरे ग्रंथहि होते. हा सर्व संग्रह कलकत्ता येथें नेऊन ठेवला असून त्याची यादी कॅप्टन स्टुअर्ट यानें केलेली छापली आहे. टिपूनें स्वतः दोन ग्रंथ तयार केले होते. त्यांत पत्रांचाच भरणा पुष्कळ आहे. एकाचें नांव फर्मान-बनाम-अलीराज असून दुसऱ्यास फतह-उल-मजाहिदीन म्हणतात. पैकीं दुसऱ्या ग्रंथाचा कांहीं भाग भाषांतरित करून मि० स्किस्प यानें छापिला आहे. टिपूचें खरें नांव फत्तेअल्लीखान असून याला बारा मुलें झालीं होतीं. त्यांपैकीं मुहंमद सुलतान (गुलाम महमूद) स. १८७७ त मरण पावला व मुहम्मद यासीन सुलतान हा सन १८४९ मध्यें मेला. बाकीचीं लहानपणींच वारलीं.

यानें स. १७८६ मध्यें आपणास 'पादशहा' असें पद धारण करून आपल्या म्हैसूरच्या राज्यास 'खुदादाद सरकार' असें नांव ठेविलें; आणि प्रांताप्रांतांचीं नांवें बदलून यानें स्वतःचें निराळें पंचांग केलें. एवढेंच नव्हे, तर यानें प्रत्येक मशिदीमध्यें मोंगल पादशाहाच्या नांवाचा खुतबा पढण्याची चाल होती ती मोडून, आपल्या नांवानें खुतबा पढण्याची चाल सुरू केली. टिपूचें सिंहासन फार मौल्यवान् व शोभिवंत होतें. तें अष्टकोनाकृति असून आठहि बाजूंस वाघांचीं तोंडें बसविलेलें व वाघाप्रमाणें पाय असलेल होतें. तें सर्व सोन्याचें असून वाघाचे दांत व डोळे रत्नांचे होते. टिपूस वाघ हें जनावर फार आवडे व तेंच याचें राजचिन्ह असे. " विजयी पुरुष हा ईश्वराचा वाघ आहे," असें वाक्य याच्या सर्व वस्तूंवर वाघाच्या तोंडासह कोरलेलें असे. समारंभपूर्वक हा या सिंहासनावर बसला नाहीं असें म्हणतात. लढाईनंतर हें सिंहासन व पुढें दिलल्या वस्तु विलायतेस ई. इं. कंपनीच्या अजबखान्यांत ठेविल्या. या सिंहासनावर मोत्याच्या झालरी, छत व त्यांवर एक रत्नजडित हुम्मा पक्षी होता. तो खबुतराएवढा असून त्याच्या छातींत राजकीय शिक्षा व कुराणांतील दोन वाक्यें कोरलेलीं आहेत. टिपूची रत्नजडित तलवारहि हल्लीं विंडसर कॅसलमध्येंच आहे. तिच्या मुठीवर वाघाचीं तोंडें असून तिच्या पात्यावर दोहोंकडे कुराणांतील वाक्यें कोरलेलीं आहेत. याशिवाय टिपूची बंदुक, शिरस्त्राण, निशाण वगैरे वस्तूहि वरील अजबखान्यांत आहेत. पट्टण येथील टिपूच्या कबरस्थानास पुढें डलहौसीनें हस्तिदंताची नकशी काढलेले शिसवी दरवाजे नजर केले. लालबाग व किल्ला यांच्या दरम्यान कावेरीतीरीं टिपूचा राजवाडा दर्यादौलतबाग नांवाचा आहे. येथें कांहीं दिवस वेलस्ली राहिला होता. हा संगमरवरी महाल फार सुंदर असून त्याच्या भितीवर नक्षी कोरलेली आहे. पूर्वी या नक्षींत सोनें भरलेलें होतें. भितीवर रंगीत चित्रें असून तीं बहुधा टिपूनें केलेल्या इंग्रजांच्या पराभवाचीं निदर्शक आहेत. त्यांतल्या त्यांत बेली हा टिपूला ससैन्य शरण आल्याचें चित्र उत्कृष्ट आहे. त्याची डागडुजी दोन वेळ झाली आहे.

टिपूकडील मराठ्यांच्या एका जासुदाचे बातमीपत्रांत खालील उल्लेख केला आहे--

टिपू खासा फौजेत आहे. मी आपले दृष्टीनें चाळीस पन्नास हाताचे तफावतीनें पाहिला. रंग गोरा मध्यम आहे. निळ्या घोड्यावर बसला होता. पागोटें चक्रिदार छिटी व अंगरखा पिवळा ताफ्ता व जुबा मोठ्या पटीचे मशूरचा व पिवळी शालजोडी. येणें प्रमाणें पोशाख होता. मिशा मध्यम गालांवर. कानाला केंसाच्या. येणें प्रमाणें पाहिला (इ. सं. ३ पृ. ५०).

टेकचंद मुनशी—एक फार्सी कवि. याचें कवितेतील नांव बहार. हा जातीनें खत्री होता. यानें 'बहार-अजम' आणि 'नवादीर-उल-मसादीर' हे दोन ग्रंथ लिहिले. पहिला फार्सी भाषेंतील म्हणीचा कोश आहे. तो यानें स. १७३९ मध्यें लिहिला.

टेरी—(स. १६१५-१८) एक प्रॉटेस्टंट इंग्रजी पाद्री. हा सर टामस रो याच्या वकिलातीबरोबर हिंदुस्थानांत होता. हिंदुस्थानांत विविध प्रकारचे भोज्य पदार्थ अत्यंत स्वस्त व विपुल आहेत हें पाहून या सशक्त व भोजनभाऊ गृहस्थास फारच आश्चर्य वाटलें.

टेलर—मुंबईकर इंग्रजांचा एक सेनापति.

ठ

ठकाबाई गुजर—ही दुसऱ्या रघूजी भोसल्यांची बहीण होय. ही नागपुरास नवलोजी गुजर यांस दिली होती. हिचा मुलगा गुजाबादादा गुजर हा मोठा कर्तबगार निघाला (ना. प्रां. इ. पृ. ३९५).

ठाकुरदासबुवा—(मृत्यु स. १८३०) साधु व मराठी कवि. कनोजी ब्राह्मण. नांव बालाप्रसाद. पिता नीळकंठ. उपनांव त्रिवेदी. गोत्र काश्यप. गांव-भागीरथीच्या कांठीं गुसाईजींचें शिवराजपूर. पंढरपुरास कीर्तन ऐकून बापू गोखले यांचा शिष्य बनला व यांना साताऱ्याकडील तारगांवचीं मोकासपणाची वृत्ति पेशव्यांकडून देवविली. यांना पहिल्या बायकोपासून एकनाथ व जगन्नाथ, दुसऱ्या बायकोपासून कृष्णनाथ व रामनाथ असे पुत्र झाले. यांचे ग्रंथ–सहजबोध, भगवद्गीतेवर अभंग, भागवत–द्वितीयस्कंधावर ओवीबद्ध टीका, शंकराचार्यकृत सप्तश्लोकीवर अभंग, यांशिवाय किरकोळ पदें व अभंग पुष्कळ आहेत. हे तारगांवीं राहत. मातृभाषा हिंदी (म. क. च. भा. ६ पृ. २१३-२२).

ठाकोरसिंग—जनरल गार्डर्ड यानें पुण्यास पाठविलेला बातमीदार. याला पुण्याचा कोतवाल घाशीराम यानें पकडल्यामुळें याच्याकडून अहमदाबादेकडे इंग्रज व दादासाहेब यांची पुण्यावर स्वारी करण्याची कशी तयारी चालली आहे व त्यांत हैदरनाईक वगैरे कशी मदत करीत आहेत हें कळून आलें (इतिहाससंग्रह ३. ३, ऐतिहासिक टिपणें पा. ३).

ड

डलहौसी, लॉर्ड—(स. १८१२-१८६०) इंग्लंडांतील एक मुत्सद्दी व हिंदुस्थानचा एक ग. जनरल. यानें इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत अढळ केलें. संस्थानें खालसा करणें, आगगाडी व तारायंत्र सुरू करणें वगैरे गोष्टी यानें केल्या.

डल्हण—सुश्रुतसंहितेवरील अकराव्या शतकांतील एक टीकाकार. याचा पिता भरत.

डंबरसिंह परमार—हा माळव्याच्या परमारांपैकीं कृष्णराजाचा पुत्र. याचा थोरला भाऊ वैरिसिंह गादीवर बसला. याला बांसवाडा राज्यांतील बागड इलाखा जहागीर होता.

डाक—(स. ५००-६०० सुमार) बंगाली कवि. याचा जन्म आसामच्या बावसी परगण्यांत झाला. गांवाचें नांव लोह. या नांवाची कोणी व्यक्ति होती किंवा नाहीं याबद्दल संशय आहे. डाक म्हणजे कविता करणारा असा अर्थ असेल. आसाम, बंगाल व ओरिसा यांमध्यें याचीं वचनें फार प्रसिद्ध आहे. भाषा अपभ्रंशासारखी आहे (क. कौ. ७).

डॉन डा आल्मिडो—हा पोर्तुगीजांचा गोव्याचा गव्हर्नर होय. स. १४९७ त पोर्तुगीज लोक व्यापाराच्या उद्देशानें हिंदुस्थानांत कालिकोट येथें वास्को डि गामा या सरदाराच्या बरोबर आले. गोवें येथील गव्हर्नर डॉन डा आल्मिडो याचा मुलगा लोरेन्झो आल्मिडो यानें दीव येथें गुर्जर नृपतींच्या सत्तेचा नाश केला. स. १५२७ मध्यें वांद्रें येथें हल्ला केला व मुसलमान अधिकाऱ्याचा नाश केला. स. १५२९ मध्यें उत्तर कोंकणांतील प्रसिद्ध ठिकाणें ठाणें, वांद्रा, करंजा व साष्टी हीं पोर्तुगीजांनीं घेतलीं. स. १५३३ मध्यें गुजराथच्या बहादुरशाहापासून वसई घेतली. तारापूर हस्तगत केलें. स. १५३३ मध्यें साष्टी व वसई प्रांत हस्तगत झाल्यावर त्यांनीं वसई, असेरी, तारापुर, माहीम, दवण व चौल येथें विशेष मजबूत किल्ले बांधले. स. १५५६ मध्यें अशेरी व मनोर घेऊन दमण व तारापूर यांमधील सुपीक प्रांत बळकावला. वसईचा किल्ला सोळाव्या शतकाच्या अखेरीस त्यांनीं बांधला.

डायोनीसियस—हा फिलाडैलफस टाल्मी या नांवाच्या इजिप्त(मिस्र)च्या राजाचा हिंदुस्थानांतील बिंदुसार मौर्याच्या दरबारांतील वकील होता. फिलाडैलफस टाल्मीचा राज्यकाल ख्रि. पू. २८५-२८७ पर्यंत आहे. यानें हिंदुस्थानांत असतां हिंदुस्थानविषयक वर्णन लिहिले होतें व तें स. च्या पहिल्या शतकापर्यंत उपलब्ध होतें. प्लिनीनें आपल्या लेखांत त्यांतील उतारे घेतले आहेत, पण सध्यां तें उपलब्ध नाहीं.

डुप्ले--(स.१६९७-१७५४) ह्याचा जन्म१६९७त झाला. त्याचा बाप जकातदार होता. पुढें ईस्ट इंडिया कंपनीच्या तंबाखूच्या व्यापाराचा मक्तेदार बनला. हा १८ व्या वर्षी हिंदुस्थानांत येऊन गेला. याला पुढें पाँडेचरीच्या कौन्सिलांत वरिष्ठ अधिकाऱ्याची जागा मिळाली. हिंदुस्थानांतील देशी राजकारणाचा अभ्यास करण्यांत यानें बराच वेळ घालविला. फ्रेंचांचा बंगालमधील व्यापार मंदावला होता. त्याकरितां यास चंद्रनगरच्या वखारीवर नेमलें. यानें व्यापार वाढवून पाटणा व कासीमबाजार येथें वखारी उघडल्या. स्वतः खाजगी व्यापार करून बराच पैसा मिळविला. याची राहणी साधी होती. यानें लांच देऊन पदवी मिळविण्याची खटपट केली, पण ती व्यर्थ गेली. पुढें याला गव्हर्नर नेमिलें. हा पाँडेचरीचा गव्हर्नर स. १७४२ ते १७५४ पर्यंत होता. चंदासाहेबानें पाँडेचरीच्या आसपासचीं ८० गांवें फ्रेंचांना देऊन खास डुप्ले यास जहागीर दिली. अंबूरच्या लढाईत डुप्लेचा विजय झाला. त्यामुळें इंग्रजांचें धाबें दणाणलें. डुप्लेला हिंदुस्थानांत फ्रेंच राज्य स्थापण्याची कल्पना परत देशीं जाण्यापूर्वी दोन महिने सुचली. यानें इंग्रजांवर १७५४ त शेवटचा विजय मिळविला (म. रि. म. वि. २ पृ. ३६०).

डेमेट्रियस—(ख्रि. पू. २००-१९०) हा ग्रीक राजांपैकीं यूथिडीमासाचा पुत्र. यानें ख्रि. पू. २०० मध्यें हिंदुस्थानावर स्वारी केली. त्या वेळीं हिंदुस्थानांत देववर्मा मौर्य पाटलीपुत्र येथें राज्य करीत होता. देववर्म्याचा पुत्र शतधनुषच्या वेळीं याचें राज्य हिंदुस्थानांत चांगलें विस्तृत असून स्थिर झालें होतें. हा अत्यंत प्रतापी राजा होता. यानें अफगाणिस्थानांत व हिंदुस्थानांत आपल्या नांवाचीं अनेक नगरें स्थापन केलीं. जुन्या अर्कोशिया प्रांतांत डेमेट्रियस पोलिस नांवाचें एक शहर होतें (राय चौधरीकृत पोलिटिकल हिस्टरी ऑफ एन्शन्ट इंडिया, पा. २०५). पतंजलिभाष्यांत लिहिलें आहे कीं, सौवीर देशांत दात्तामित्रि नांवाचें शहर होतें. दात्तामित्रि हें नांव याच्या नांवावरून पडलें असावें. पतंजलि हा पुष्यमित्र शुंगाचा समकालीन होता. याचा हिंदुस्थानांतील विजय शतधनुष मौर्याच्या वेळीं झालेला दिसतो.

हा बॅक्ट्रियाचा राजा होता. बॅक्ट्रिया म्हणजे सध्यांचा बाल्ख. यानें अफगाणिस्थान व पंजाबवर ख्रि. पू. १९० चे सुमारास राज्य मिळवलें.

डेंगिपा--हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एकतिसावा सिद्ध होय. हा जातीनें ब्राह्मण असून उडीसा प्रांतांत राहणारा होय. लुहिपाचा हा शिष्य होय.

डोम लुईज डा औटैड—(स. १५४२-७० सुमार) हा गोव्याचा पोर्तुगीज गव्हर्नर. यानें गिरसप्पाच्या भैरदेवीवर स्वारी करून होनावर शहर उध्वस्त केलें (स. १५६९). यानें टोलर व गंगोली देशच्या राजांचा पराभव करून त्यांना अधिक खंडणी देण्यास भाग पाडलें.

डोम डयुअर्ट डा मेनिझीस—(स. १५८४ पर्यंत) डोम लुईज नंतर हा गोव्याचा गव्हर्नर झाला. यानें सांगुइसरच्या नाइकाकडून गेलेला मुलूख परत मिळवला (स. १५८४).

डोम्भिपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं चौथा सिद्ध. देश मगध. जात क्षत्रिय. वीणापा व विरूपा हे दोघेहि याचे गुरु. कर्णरपा याचा शिष्य. याचे तंजूरमध्यें २१ ग्रंथ सांपडतात. त्यांत कांहीं हिंदी आहेत.

डयुड्रनेक—(स. १७७४-१८०३) फ्रेंच लष्करी अंमलदार. हा शिंदे होळकर यांच्याकडे वरील कालांत होता. शेवटीं इंग्रजांस मिळाला.

ढ

ढुंडिराज— (स. १५२५ सुमार) पार्थपूर- (दौलताबाद)चा ज्योतिषी. पिता-नृसिंह. याचे ग्रंथ-सुधारसटीका, ग्रहलाघवोदाहरण, ग्रहफलोत्पत्ति, पंचांगफल, कुंडकल्पना. जातकाभरण कर्ता व हा एकच असावा (भा. ज्यो. २७३-७४).

त

तघी चांभार—(स. १३४७-१३५०) हा गुजराथेंतील एक चांभार. यानें स. १३४७ चे सुमारास अनेक बंडखोर लोक वश करून बंडखोरांचा एक संघ स्थापन केला. या साहसी व चतुर गृहस्थानें मुहम्मद तुघ्लकाला अगदीं जेरीस आणलें. यानें गुजराथच्या पूर्वेकडील डोंगरी मुलखांतील राजेरजवाड्यांच्या साहाय्यानें पाटणवर स्वारी केली. पाटण जिंकल्यावर खंबायत लुटलें आणि यानें भडोचला वेढा दिला. मुहम्मद तुघ्लक भडोचकडे निघाला तेव्हां हा खंबायतकडे वळला. पाठीवर येणाऱ्या मुहंमद युसफ बुध्रा या बादशाही सरदाराचा सहज पराभव केला आणि मुहंमद तुघ्लकाच्या सैन्यावर हल्ला चढविला. मुहंमद अगदीं जेरीस आला. याला शेवटीं जामचा आश्रय मिळाला आणि तिकडे जात असतां मुहंमद तुघ्लक तट्टा शहराच्या अलीकडे तीस मैलांवर मृत्यु पावला (स. १३५१ मार्च २०) आणि पुढें हाहि लवकरच मरण पावला.

तरुण वाचस्पति—दंडीच्या काव्यादर्शावरील एक जुना टीकाकार.

तहमास्प आदिलशाहा—इब्राहीम आदिलशाहाचा मुलगा (१ ली आदिलशाह पाहा).

तळुवलदेवी—आहवादित्य वीर गुत्ताची मुलगी.

तंगुखान—(अमीर उमर पाहा).

तंमय मंत्री—हा विजयनगरच्या आरविदु घराण्यांतील श्रीरंग राजाचा मंत्री. श्रीरंग राजानंतर हा वेंकटपतिदेवरायाचा मंत्री झाला.

तंतिपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं तेरावा सिद्ध. हा ब्राह्मण होता. हा उज्जयनीस राहत असे. त्या वेळीं महीपाल नांवाचा राजा होता (स. ९७४-१०२६). हा जालंधराचा शिष्य. याच्या फक्त कांहीं कविता उपलब्ध आहेत.

तंधेपा—यालाच तंतेपा म्हणत. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं तेहेतिसावा सिद्ध. जात शूद्र. कौशांबीला राहत असे.

ताई तेलीण—ही एका तेल्याची बायको. पण प्रतिनिधि घराण्यांतील परशुराम श्रीनिवास यांजपाशीं राख राहिली. पुढें गोखल्यानें प्रतिनिधीस कैद करून मसूर येथें ठेवलें. तेव्हां हिनें मसूरवर हल्ला करून प्रतिनिधीस मुक्त केलें. त्यास पुन्हां पुणें येथें कैदेंत टाकलें. पुढें मराठ्यांनीं त्याचे सर्व किल्ले घेतले. वासोट्याचा किल्ला ताई तेलीण हिनें ८ महिने झुंजविला. धान्याच्या कोठारास आग लागल्यामुळें हिला शत्रूस शरण जाणें भाग पडलें. त्या वेळीं बापू गोखले हा हिच्या विरुद्ध पक्षाचा सेनापति होता. हिचें खरें नांव रमा. हिच्यासंबंधीं पुढील आर्या प्रसिद्ध आहे:

श्रीमंत पंतप्रतिनिधी यांचा किल्ला आजिंक्य वासोटा ।
तेलिण मारिल सोटा बापू गोखल्या संभाळ कासोटा ॥

ताईबाई कोल्हटकर—ही भास्करराम कोल्हटकराची बायको. भास्करपंत बंगालमध्यें ज्या वेळेस मारला गेला त्या वेळेस ही त्याचेजवळ होती. ही त्या गडबडींत पळून कांहीं लोक बरोबर घेऊन काशीस गेली. एका पठाणाच्या बायकोनें हिला डोलींत घालून काशीस पोंचविलें, अशीहि आख्यायिका आहे. ही त्या वेळीं गरोदर होती. हिला काशीसच एक पुत्र झाला. म्हणून त्याचें नांव काशीराव असें ठेवलें. तो पुढें मोठा होऊन प्रसिद्धीस आला (ना. प्रां. इ. पृ. ९६).

भास्करपंताचे मृत्यूनंतर रघुजी भोसल्यानें ताईबाईच्या नांवानें वऱ्हाडच्या सुभ्याचा कारभार करून दिला व हिच्यातर्फे कृष्णाजी गोविंद यास कारभारी नेमिलें.

ताउफांग—एक चिनी प्रवासी. हा पिंगचाल येथें राहणारा होता. हा चीनमधून नेपाळांत व तेथून भारतवर्षात आला. येथें अनेक तीर्थक्षेत्रांत हिंडून हा त्याच मार्गानें परत गेला.

ताजखान करराणी—(स. १५६४-७२) बंगालचा सुभेदार.

ताजखान रोहिला— हा एक सरदार होय. स. १७७५ मध्यें हरिपंतानें इसफावर सैन्य रवाना केलें. पण मराठी सैन्याशीं लढण्याची आपली ताकद नाहीं असें वाटून इसफ गढेमंडळाकडे पळून गेला, आणि तेथून माघारा शिवणीकडे येत असतां वाटेंत ताजखान व इसफ यांची गांठ पडली. इसफानें घोड्यावरून उडी टाकून, 'आतां माझी अब्रू वांचीव,' म्हणून ताजखानाचे पाय धरले. तेव्हां त्यास कैद करून ताजखानानें मुधोजीस लिहून पाठविलें (म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. २०-२१).

यानें इसफ यास कैद करण्यास मदत केल्यामुळें नाना फडणीसानें याला एक हजार रुपयांचा गांव ता. २१. ५. १७७६ रोजीं इनाम दिला (स. मा. रो. १. ७१)

ताजमहल—अबुल हसन कुत्बशाहाची पट्टराणी.

ताजुल्मुल्क—गुजराथच्या पहिल्या सुलतान अहमदशाहाच्या पदरीं हा एक धर्माधिकारी होता.

स. १४१४ मध्यें याच्याकडे हिंदूंच्या देवालयांचा व मूर्तांचा दरोबस्त नाश करण्याचें काम सोंपविलें होतें.

तात—मंदोरच्या प्रतिहारवंशांपकीं नागभटाचा ज्येष्ठ पुत्र. यानें जीवित अशाश्वत आहे, असें जाणून आपलें राज्य आपला धाकटा भाऊ भोज यास दिलें व आपण मांडव्याश्रमांत धर्माचरण करीत राहिला.

तातय्या—व्यंकटगिरीचा कुमार तातय्या यानें 'पारिजात' नांवाचें संस्कृत नाटक लिहिलें आहे, हें नाटक सत्यभामाविषयक असून त्यांत पांच अंक आहत.

तातार्चार्य—या कवीचा जन्म कांची येथें झाला. याचा उदय १५ व्या शतकांत झाला. 'सात्त्विकब्रह्मविद्याविलास' यानें केलेला आहे. याची बायको पतिव्रता असून याच्या मरणाच्या खोट्या वार्तेनें ती मृत्यु पावली. पुढें तातार्चार्यहि मरण पावले.

२. (स.१६३०नंतर) विजयनगरच्या दुसऱ्या वेंकटदेवराय आरविदूचा मंत्री व गुरु. पिता–श्रीनिवास. यानें 'पंचमतभंजन' नांवाचा ग्रंथ केला आहे.

तातार—सिंधुनदीवरील नीलबप्रांतांतील गुरुवर लोकांचा पुढारी. हा बाबरचा समकालीन होता. याचा चुलतभाऊ हाती. हातीनें याला ठार करून यानें राज्य घेतलें.

तातारखान—(स. १३९६ सुमार) गुजराथच्या पहिल्या मुज्फरशाहाचा पुत्र.

हा पराक्रमी होता. यानें राज्यवृद्धि करण्याच्या कामीं आपल्या बापास पुष्कळ कुमक केली. एकदां तर ह्या बापलेकांचें पटेनासें होऊन यानें बापास कैद करून स्वतः राज्य बळकाविलें. पण हा लवकरच मरण पावला आणि मुज्फरशाहा पुनः कारभार करूं लागला. याला अहमद नांवाचा एक मुलगा होता.

२. (स. १२६१–१२७५) बंगालचा सुभेदार. याला मुहम्मद तातारखान म्हणत.

३. तुघ्लकशाहाचा दत्तक पुत्र. मुहमदशाह तुघ्लकाचा प्रधान. हा तक्सीर-इ-तातारखानी नामक कुराणावरील टीकेचा कर्ता असून फतावी-इ-तातारखानी नांवाचा ग्रंथ यानें रचला.

तात्या जोग आळेकर—हा यशवंतराव होळकराचा कारभारी होता. यास मैनाबाईनें (यशवंतरावाच्या बायकोनें) स. १८१५ त दौलतराव सिंद्यांचे भेटीस पाठविलें, आणि चढावाचा व बचावाचा असा गुप्त तह घडवून आणिला. पुढें मैनाबाई व हा यांच्या हातांतील कारभार तुळसाबाई व बाळारामशेट यांनीं हिसकून घेतला (म. रि. उ. वि. ३ पृ० ३९५).

तानकांग—एक चिनी प्रवासी. हा आराकानपर्यंत आला. पुढें काय झालें याचा पत्ता नाहीं.

तानतरंग—तानसेनाचा मुलगा.

तानपाढक—एक साधु. यानें जालनापूरच्या स्वारींत शिवाजीला आशीर्वाद दिला. तेव्हां शिवाजीनें यास एक गांव इनाम दिलें (स. १६७९).

तानसेन—(स. १५६० सुमार) हा जातीचा गौड ब्राह्मण. याच्या बापाचें नांव मकरंद पांडे. हा ग्वालेरचा राहणारा. याच्या बापानें प्रसिद्ध अवलिया मुहम्मद घोषास पुत्र होण्यासाठीं नवस केला होता; व त्याच्या कृपाप्रसादानें हा झाला. याचें पूर्वीचें नांव तन्नामित्र असें होतें. ह्याची अनुकरण करण्याची शक्ति फार विलक्षण होती. हा कोणत्याहि प्राण्याचा आवाज हुबेहूब काढीत असे. एकदां हरिदास बाबा नांवाचे साधु याचे बागेंत आले असतां, ह्याची अनुकरण करण्याची शक्ति पाहून, त्यानें याच्या बापाजवळ याची मागणी केली व त्यांनीं सांगितलें कीं, 'मी याला उत्तम गाणें शिकवीन.' तेव्हां याचे बापानें यास त्यांचेजवळ दिलें. पुढें हा हरिदास बाबाजवळ पूर्ण गायनकला शिकला व परत ग्वालेरास आला.

पुढें याची कीर्ति अकबर बादशहास समजली, तेव्हां त्यानें यास आपल्या दरबारीं आणून, यास नवरत्नांत बसविलें व याचा अतिशय गौरव केला.

यानें अनेक रागांत अनेक ध्रुपदें व नवीन रागहि रचिले आहेत. यानें कांहीं ध्रुपदांत आपल्या आश्रयदात्या अकबराचें नांव घातलें आहे. हा वयाच्या ६३ व्या वर्षी मरण पावला. मियाचा मल्हार, मियाची तोडी, मियाचा सारंग इत्यादि राग यानें शोधलेले होत.

एकदां हा व अकबर बादशहा यांच्या गुरूचें गाणें ऐकावयास गेले असतां, अकबरानें यांस विचारलें कीं, 'तुझ्या व तुझ्या गुरूच्या गाण्यांत फरक कां ?' तेव्हां यानें उत्तर दिले कीं, 'बाबा हे आपल्या लहरीप्रमाणें गातात, पण मला मात्र आपल्या आज्ञेप्रमाणें गावें लागतें.'

तानाजी मालुसरे—(मृत्यु स. ४-२-१६७०) हा जातीन मराठा असून शिवाजीचा परम विश्वासू बाळमित्र होता. उमराठें हें याचें राहण्याचें गांव. लहानपणापासून शिवाजीबरोबर हा अनेक संकटांच्या प्रसंगांत होता. तानाजी हा १२ हजार पायदळाचा सुभेदार होता. जिजाईच्या मनांत कोंडाणा घेण्याचें होतें. त्यासाठीं

शिवाजीनें यास पाठविलें. तेथील सुभेदार उदेभानू हा फार शूर होता. तरी यानें दरवाजावरील लोकांस फितूर केलें. मागें एक सरळ कडा होता त्या बाजूनें घोरपड लावून बरेच लोक चढले. या लढाईंत हा मेला. एक हात मोडला असतांना यानें उदयभानूस मारलें. आपल्या मुलाचें रायबाचें लग्न टाकून हा कोंडाणा घेण्यासाठीं गेला, यावरून याची स्वामिनिष्ठा दिसून येते.

तानाशाह--(अबुल हसन पाहा).

तानीबीबी—पहिल्या इब्राहीम आदिलशाहाची मुलगी व आली बरीदची पत्नी.

तापीदास तवाहीदास--फ्रेंच कप्तानाच्या हाताखालील दलाल. पेठ रायबागचा राहणारा. यानें फ्रेंचांच्या तर्फे शिवाजीकडे व्यापारास सवलती मागितल्या होत्या, त्यावरून शिवाजीनें सौदागरी करून सर्फराज (श्रीमंत) होणें, म्हणून दाभोळ बंदरीहि व्यापार करण्यास यास परवानगी दिली. सुरत व राजापूर येथें फ्रेंचांच्या वखारी होत्याच (रा. खं. ८. ८).

ताबाँ—एक ऊर्दू कवि. हा मजहरचा समकालीन होता. याचा दीवान प्रसिद्ध आहे (क. कौ. ४).

तारादेवी— ही टोडाच्या सुरताण सोलंकीची कन्या. सुरताणचें राज्य लष्कर पठाणानें घेतल्यावर तो चितोडच्या रायमल्लाकडे आश्रयास येऊन राहिला. रायमल्लाचा पुत्र जयमल्ल यानें हिला मागणी घातली. पण त्या बाबतींत विरोध होईल असें वाटल्यावरून त्यानें चितोडचा आश्रय सोडून तो रातोरात परत जाऊं लागला. जयमल्लानें पाठलाग केला व हातघाईवर प्रकरण येऊन त्यांत जयमल्ल मारला गेला. पुढें हिचें लग्न जयमल्लाचा धाकटा भाऊ पृथ्वीराज याच्याशीं झालें. शेवटीं त्याच्याबरोबर ही सती गेली.

तारानाथ—हा तिबेटी लामा होता. यानें स. १६०८ मध्यें हिंदुस्थानांतील बुद्धधर्माचा इतिहास लिहिला आहे. त्यांत अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा निर्देश सांपडतो. बारेन्द्राधिपति देवपाल व शर्मपाल यांचे वेळीं धीमन् व त्याचा मुलगा बिठपाल हे उत्तम शिल्पकलाभिज्ञ, चित्रकार व ओतारी असल्याची माहिती यानें दिली आहे (हि. का. १.७३).

तारापीड ककोंटक—(स. ६९०-९९) हा चंद्रापीड ककोंटकानंतर गादीवर आला.

ताराबाई भोसले—(जन्म स. १६७५-मृत्यु स. १७६१ डिसेंबर) छत्रपति राजारामाची बायको. हिच्या वडिलांचें नांव हंबीरराव मोहिते असून ही राजारामाची दुसरी बायको होती. हिचें लग्न स. १६८९ च्या सुमारास झालें. हिचें सासरचें नांव सीताबाई होतें, परंतु तें लोपून ताराबाई हेंच नांव प्रख्यात झालें. हिला विशाळगडीं स. १६९१ त शिवाजी या नांवाचा पुत्र झाला. पुढें राजाराम मरण पावला. त्या वेळेस शिवाजी हा दहा वर्षांचा होता. तेव्हां त्याला रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचीव, धनाजी जाधव सेनापति यांच्या मदतीनें हिनें गादीवर बसवून राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं व राजसबाई (सवत) व तिचा मुलगा संभाजी या दोघांस कैदेंत टाकलें. त्यामुळें गृहकलह वाढला; व त्याचा परिणाम होऊन सरदारांत फाटाफूट झाली.

हिनें परशुराम त्रिंबकास प्रतिनिधी करून त्याच्याकडे सर्व किल्ल्यांच्या बंदोबस्ताचें काम सोंपवून दिलें, व स्वतः कोणत्याहि किल्ल्यांत न राहतां वेळ पडेल त्याप्रमाणें जागा बदलण्याचें ठरविलें. याच वेळीं धनाजी, निंबाळकर, भोंसले, दाभाडे, चव्हाण वगैरे सरदारांनीं मोंगलांच्या मुलखांत शिरून सर्व ठिकाणांहून चौथाई, सरदेशमुखी व घासदाणा या नांवाखालीं पैसा गोळा करण्याचा क्रम आरंभला (स. १७००).

इकडे शाहूनें हिला कळविलें होतें कीं, मी बादशहापासून निघून स्वदेशीं परत येतोंच. परंतु त्याला न जुमानतां हिनें आपल्या मुलास गादीवर बसाविलें व शाहूशीं विरोध सुरू केला. शाहूनें बादशहा मरण पावल्यावर बहादुरशाहाकडून आपली सुटका करून घेतली (स.१७०७). त्या वेळेस शाहूस परसोजी भोसले, हैबतराव निंबाळकर व नेमाजी शिंदे वगैरे सरदार मिळाले. शाहूनें ताराबाईस कळविलें तरीसुद्धां ही आपल्या हातची सत्ता सोडण्यास बिलकुल तयार नव्हती. म्हणूनच ती शाहू हा कोणीतरी तोतया आहे असें म्हणूं लागली; व हिनें रामचंद्रपंत निळोपंत, धनाजी, परशुराम त्रिंबक, आंग्रे यांच्याजवळून स्वामिभक्तीची शपथ घेववून शाहूस तोंड देण्याचें ठरविलें. धनाजी, खंडो बल्लाळ व परशुराम त्रिंबक यांची शाहूवर रवानगी झाली. परंतु शाहूनें खंडो बल्लाळ व धनाजीस आपल्याकडे वळवून घेतलें व पुण्याच्या उत्तरेस बावीस मैलांवर खेडकडूस येथें दोन्ही पक्षांतील चकमकींत पराभव पावून परशुराम त्रिंबक साताऱ्यास गेला (स. १७०८). पुढें धनाजीच्या मदतीनें शाहूनें २।३ किल्ले घेतले. त्यांत साताऱ्यास जाऊन स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. तेव्हां ताराबाई साताऱ्याहून पन्हाळ्याकडे पळून गेली. परंतु शाहूनें तो पण किल्ला घेतला, म्हणून ही मालवणास पळून

गेली. शाहूनें बेरच किल्ले व मुलूख घेतले, त्यामुळें ताराबाईचा पक्ष निर्माल्यवत् झाला (स. १७१२).

पुढें परत पन्हाळ्याच्या किल्लेदारानें तो किल्ला हिच्या स्वाधीन केला. हिनें वाडीकर सावंताच्या मदतीनें आणखी कांहीं किल्ले परत घेतले. हिनें पन्हाळा व कोल्हापूर हीं दोन राहण्याचीं ठिकाणें कायमचीं केलीं. या वेळीं मात्र हिच्या पक्षानें परत जोर धरला. धनाजी मारला गेला व चंद्रसेन जाधवहि शाहूकडून ताराबाईस येऊन मिळाला. शिवाय थोरात, चव्हाण, निंबाळकर, अमात्य, प्रतिनिधी, पांढरे, आंग्रे ही सर्व मंडळी हिच्या पक्षाकडे होती. परंतु पुढें परत हिची सर्वच बाजू एकदम ढांसळली. कारण, शाहूनें सैन्य जमवून हीस तोंड दिलें व हिच्याकडच्या कांहीं सरदारांना फितवलें. हिचा मुलगा शिवाजी यास तर वेडा ठरविलें. त्यामुळें शाहूचा पक्ष परत बळकटच झाला. इतक्यांत स. १७१२ त हिचा मुलगा देवीनें मरण पावला. त्यामुळें कोल्हापुरास बरीच क्रांति झाली. रामचंद्रपंतानें हिच्या सवतीच्या मुलास–संभाजीस–गादीवर बसवून हिला व हिच्या सुनेला कैदेंत टाकलें.

शाहूला मुलगा नसल्यामुळें पुढें त्यानें दत्तक घेण्याचें ठरविलें. ही बातमी हीस कळली तेव्हां 'तें दत्तविधान मी होऊं देणार नाहीं' असें ही म्हणूं लागली; व नंतर शिवाजीचा मुलगा रामराजा हा जिवंत असल्यामुळें त्यासच दत्तक घ्या म्हणून हिनें शाहूस आग्रह केला. तेव्हां शाहूनें तें कबूल केलें. मध्यंतरीं संभाजीचें आणि शाहूचें न पटल्यामुळें शाहूनें त्याच्याशीं लढाई करून त्याचा पराभव केला व सगळ्यांस कैदेंत टाकलें (स. १७३०).

रामराजास गादीवर बसवून सुद्धां ज्या वेळेस हिच्याकडे कारभार आला नाहीं तेव्हां हिनें रामराजा हा माझा नातू नव्हेच असें चोहोंकडे पसरविलें. परंतु या कामीं हिला फारसें यश आलें नाहीं.

ही पुढें भलतीं कारस्थानें करूं लागली. रामराजा गादीवर असतांना हिनें कारस्थानांचा तर अगदीं कळसच केला. हिनें त्यास शेवटीं कैद केलें. तो शेवटपर्यंत म्हणजे हिच्या मरणापर्यंत कैदेंतच होता. ही स. १७६१ च्या डिसेंबर महिन्यांत मरण पावली. त्या वेळीं हिचें वय ८६ वर्षांचें होतें. हिच्या चरित्राकडे अद्यापि योग्य दृष्टीनें पाहिलें जात नाहीं. नवऱ्याच्या मागें औरंगजेबाला तोंड देण्याचें कार्य हिनें अधिकच तडफेनें पार पाडलें. मोगली मुलखावर हल्ले चढवून मराठ्यांचा आर्थिक प्रश्न सोडविण्याचें काम हिच्याच कारकीर्दीत सुरू झालें. मराठेशाहींतील अव्वल दर्जाच्या मुत्सद्यांची जूट हिनें शेवटपर्यंत टिकविली होती. आणि पराक्रमांत हिनें केव्हांच हार खाल्ली नाहीं. पण औरंगजेब मेल्यावर शाहूला स्वराज्याची सनद देऊन सोडण्यांत आल्यामुळें चार पिढ्या खर्ची घालून वाढविलेलें स्वातंत्र्याचें रोपटें दुहीच्या किडीनें जमीनदोस्त झालें. या वेळीं मराठ्यांचें साम्राज्य नष्ट होऊन दिल्लीच्या मांडलिकाचें राज्य सुरू झालें. या दृष्टीनें हिच्या व हिच्या भोंवतालच्या थोर पुरुषांच्या वर्तनाकडे पाहिलें असतां त्यांत हीनतेपेक्षां उज्ज्वलताच परिणामकारक रीतीनें दिसते. शेवटीं हिचें कांहींच चालेना तेव्हां हिनें शाहू व पेशवे यांच्यावर राज्यहिताच्या दृष्टीनें विश्वास दर्शविला होता (पे. द. ३०. २२७). हेंहि ध्यानांत घेण्यासारखें आहे.

तारिगोप्पुल दत्त मंत्री—हा मातला अनंत याचा भाऊ व विजयनगरच्या आरविदु घराण्यांतील दुसऱ्या वेंकटपतिदेवरायाचा मंत्री. याचा भाऊ मातला अनंत हाहि वेंकटपतिदेवरायाचा सरदार व मंत्री होता.

यानें 'चंद्रभानुचरित्रम्' हा ग्रंथ लिहिला. यामध्यें यानें आपल्या भावाचा उल्लेख केला आहे.

तालप चालुक्य—(स. ९२५) हा चालुक्यांपैकी पहिल्या भीमाचा चुलता जो युद्धमल्ल पहिला त्याचा पुत्र. याच्या नांवाचा उल्लेख तारप, तालप, (तैलप्प) असा निरनिराळ्या ठिकाणीं आहे. हा पांचव्या विजयादित्याला गादीवरून काढून गादीवर आला. याला विक्रमादित्य दुसरा यानें गादीवरून काढलें. यानें एक महिनाच कारभार केला. तालप व विक्रमादित्य (दुसरा) यांच्या झटापटींत तालप ठार झाला, असें एके ठिकाणीं म्हटलें आहे (९२५).

तावयुंग—हिंदुस्थानाकडे आलेला एक चिनी प्रवासी. याच्या प्रवासवृत्तावरून सुंगयुन व हु-एन्-त्संग यांच्या प्रवासवृत्ताच्या संकलनकारानें योग्य स्थलीं टीपा दिल्या आहेत व मतभेद दाखवला आहे. त्यावरून याचा पत्ता लागतो. हा फाहियाननंतर आला होता. पण नक्की केव्हां आला याचा पत्ता लागत नाहीं. हा पेशावरच्या पुढें आला नव्हता.

तावलिन—एक चिनी प्रवासी. हा किंगचाव येथें राहणारा होता. हा समुद्रमार्गें कलिंगांत (ओरिसांत) आला, व तेथून ताम्रलिप्त (आसाम) येथें गेला. तेथून वज्रासन व बोधिवृक्ष (गया) यांचें दर्शन घेतलें. पुढें हा गयेहून नालंद येथें आला. नालंद येथें दोन वर्षें राहून हा दक्षिणेकडे गेला. भारतवर्षांत असतां यानें शीलप्रभ असें नांव घेतलें होतें.

तिक्क चोंड चोल--(स.१२३३) हा तेलंगणांतील चोल घराण्यांतील एक पुरुष. यानें सोमेश्वर होयसलाचा चंपापुरी येथें पराभव केला. शंबूराजास यानें जेरीस आणलें, कांची जिंकली व चोलांना राज्य मिळवून दिलें. याचा हा निर्देश कांजीवरच्या शिलालेखांत आढळतो.

तिक्कन सोमयाजी--(स. १२५० सुमार) तेलगू-भाषेंतील हा महाकवि आहे. नन्नयभट्टानंतर झालेल्या कवींत हा श्रेष्ठ होता. यास ' कविब्रह्म ' अशी पदवी आहे. याची वर्णनशैली फारच अप्रतिम आहे. युद्ध-वर्णनांत हा फारच वाकबगार होता. हा तेराव्या शतकाच्या मध्यकालीं होता. यानें यज्ञ केल्यामुळें यास सोयमाजी हें नांव प्राप्त झालें. याचीं दोन काव्यें उपलब्ध आहेत. उत्तररामायण व विराटपर्वापासून स्वर्गारोहणापर्यंत भारताचीं पंधरा पर्वें. याला तेलगू व संस्कृत भाषा चांगल्या येत होत्या. तेलंगी भाषेंतील शब्दप्रयोगाविषयीं हा अत्यंत प्रमाण मानला जातो. हा कवि, मंत्री व सेनापति होता. हा नेल्लूर येथील सूर्यवंशी मनुसिद्धि नांवाच्या राजाचा मंत्री होता. या राजाचा व कवीचा कालनिर्णय कै. रावबहादुर कंपकूरिवीरेशलिंगं यांनीं आपल्या ' आंध्रकवुलचरित्रम् ' या ग्रंथांत केला आहे.

तिप्पम्मा--विजयनगरच्या तुलुव घराण्यांतील नरसिंहरायाची ही एक पत्नी. हिच्यापासून नरसिंहरायास वीर नरसिंह नांवाचा मुलगा झाला.

तिमय्या साती--एक तेलंगी कवि. याच्या पित्याचें नांव चिमासींसाती व आजाचें बक्कळगोरय्या. कन्यकापुराण नांवाचा एक करुणरसभरित ग्रंथ यानें तेलंगी भाषेंत लिहिला आहे (कविचरित्र).

तिमाजी ऊर्फ त्रिमल्ल हणमंते--हा हणमंते घराण्याचा मूळ पुरुष. शूर व पराक्रमी. याला दोन पुत्र होते. एक बाळकृष्ण व दुसरा नारायण (म. रि. म. १ पृ. ४२०).

२. याच्या पित्याचें नांव रघुनाथ. यानें अशौचनिर्णय नांवाचा एक संस्कृतांत ग्रंथ रचिला. हा कोल्हापूरकर संभाजीचा प्रधान होता (स. १७२३). याला दोन पुत्र असून त्यांचीं नांवें अनुक्रमें गंगाधर व रघुनाथ अशीं होतीं. याला त्रिमल्ल म्हणत (म. रि. म. १ पृ. ४२८).

तिमाप्पा वडार—पेशवाईच्या अखेरीच्या सुमारास वडार लोकांत हा मनुष्य प्रसिद्धीस आला होता. वडार लोकांची यानें एक टोळी बनविली होती. हा प्रथम सांगलीकराच्या सैन्यांत शिलेदारी करीत असे. त्रिंबकजी डेंगळ्यानें इंग्रजांच्या कैदेंतून पळून जाऊन जेव्हां बंड उभारलें तेव्हां त्यास जे लोक मिळाले त्यांत हा होता. पुढें त्रिंबकजीचा बंदोबस्त झाल्यावर चिंतामणराव सांगली-कराच्या मध्यस्थीनें यास माफी मिळाली.

तिम्म—(चिन्नतिम्म व त्रिम्मप्प पाहा).

तिम्मण नायक—हा कर्नाटकांतील चित्रदुर्ग संस्थानचा राजा. हा कृष्णदेवराय तुलुवाचे वेळीं होता. कृष्णदेवरायानें विजयनगर राज्याच्या दक्षिणभागांतील मुसलमानांचें वर्चस्व याच्या मदतीनें नाहींसें करण्याचा प्रयत्न केला. हा शूर होता.

तिम्म नायडू—विजयनगरच्या राज्यांतील उदरिपी-कोंड संस्थानचा पहिला राजा.

तिम्मय मंत्री—विजयनगरच्या आरविदु घराण्यांतील श्रीरंग राजाचा हा प्रधान होता. सरकारी सर्व खात्यांचा हा मुख्य होता.

तिम्मरस—(स. १६५० सुमार) कानडी ब्राह्मण कवि. गोत्र-भारद्वाज. ऋग्वेदी आश्वलायन. बाप-बुळ्ळरप्प, गांव-पालकुरिके.

ग्रंथ-मार्कंडेयरामायण. हा ग्रंथ यदुगिरीच्या नारायण-देवाच्या देवळांत बसून लिहिला आहे.

याची लेखनशैली, यमक, अनुप्रास वगैरेंनीं युक्त आहे (क. क. च. भा. २ पा. ४०८).

तिम्मराज—(स. १४५८--७८) हा म्हैसूरच्या राजांपैकीं हिरेबेट्टादचा मुलगा. याला आरनेरल चामराज (आर्बेरल चाम २ रा-सिवेल) नांवाचा पुत्र होता (ज्ञा. को.).

तिम्मार्य--हा साहली गांवचा राहणारा. हा बाल-कवि होता. यानें आनंदरामायण लिहिलें.

तिम्मांबा-- ही रंगराजाची पत्नी व विजय-नगरच्या सदाशिवराय तुलुवाची माता.

तिरुनावुक्करशु--एक शैव साधु. याचा पहिल्या महेंद्रवर्मन् पल्लवानें खून केला.

तिरुपतिमल्ला नायक—(अय्या दीक्षित पाहा).

तिरुमल्ल आरविदु—(राज्यारोहण स. १५७०--मृत्यु स. १५७८) हा श्रीरंग व तिरुमल्लाम्बा यांचा मुलगा. तालीकोटच्या लढाईंत मेलेला रामराय व व्यंक-टाद्रि हे याचे भाऊ होत. याची पत्नी व्यंगलाम्बा (वेंगला) ही कृष्णदेवराय तुलुवाची मुलगी.

व्यंकटाद्रि तुलुवाचा प्रधान सलाकमच्या विरुद्ध हा व रामराय या दोघां भावांनीं कारस्थानें सुरू केलीं. सला-कमनें यांना कैद करण्याचें ठरविलें तेव्हां हे पळाले. सैन्य जमवून विजयनगरवर स्वारी करून सलाकमला ठार केलें;

आणि सदाशिवराय तुलुवाला गादीवर बसवून रामराय मुख्य प्रधान झाला.

हे तिघेहि भाऊ राज्यसंरक्षणाकरितां व वाढविण्याकरितां अत्यंत झटत, तरी सदाशिवरायाला वागविण्याबद्दल त्यांच्यांत मतभेद असे. सदाशिवरायाला तुरुंगांत टाकल्याबद्दल एकदां तर दोघां भावांनीं रामरायाविरुद्ध बंड केलें होतें.

राक्षसतागडीच्या लढाईंत रामराय मारला गेला तेव्हां हा सदाशिवरायाचा प्रधान झाला. पण रामरायापेक्षांहि यानें सदाशिवरायाला वाईट रीतीनें वागविलें. त्याला चंद्रगिरि येथें तुरुंगांत टाकलें. विजयनगर ही राजधानी बदलून पेणुकोंडा ही राजधानी केली (स. १५६७ सुमार) आणि शेवटीं तर यानें किंवा याच्या मुलानें सदाशिवरायाचा खून केला. सदाशिवरायाचा खून याचा मुलगा व्यंकटपतिदेवरायानें केला असावा आणि याची त्याला अनुकूलता असावी असें दिसतें.

नंतर हा स्वतः गादीवर बसला. तेव्हां याचें वय नव्वद वर्षांचें असावें. तेव्हां यानें आपल्या राज्याचे कर्नाटक, तामील आणि तेलगू असे तीन सुभे केले आणि आपल्या तीन मुलांना त्या प्रांतांवरील सुभेदार नेमलें. मुसलमानांच्या स्वाऱ्यांना तोंड देण्याचें काम याला सारखें करावें लागे. हा स. १५७८ मध्यें मृत्यु पावला.

याच्या वेळीं तुलुव घराण्यांतील सदाशिवरायाचा खून होऊन आरविदु घराणें उदयास आलें. आरविदु घराण्यांतील हा पहिला राजा होय.

२. (स. १६००--१४ सुमार) हा विजयनगरच्या पहिल्या तिरुमल्ल आरविदूचा नातू व पहिल्या रामाचा मुलगा. याच्या आईचें नांव नरसिंगम्मा. याचा भाऊ श्रीरंग. तो विजयनगरचा राजा होता. हा श्रीरंगपट्टणचा कारभार पाहत असे.

स. १६०० च्या सुमारास म्हैसूरच्या राजाधिराज ओडीयारनें याला खंडणी देण्याचें बंद केलें; आणि याला जिंकून बायकोसह तालकड येथें जाणें भाग पाडलें. आणि श्रीरंगपट्टणचें राज्य म्हैसूरच्या राज्यांत समाविष्ट झालें.

याला अलमेलम्मा आणि रंगाम्मा अशा दोन बायका होत्या. पुत्र नव्हता. हा स. १६१४ पर्यंत जिवंत असावा.

तिरुमल्ल नायक—(स. १६२३--१६५९) यानें त्रिचनापल्ली सोडून मदुरेस ठाणें दिलें. हा मदुरेच्या मुक्त कृष्णप्प नायकाचा पुत्र. याच्यावर विजयनगरच्या राजानें स्वारी केली, तेव्हां यानें कुत्बशाहशीं तह करून त्याच्या मदतीनें त्याचा पराभव केला. परंतु त्याच वर्षी हा मरण पावला. नायक घराण्यांतील हा सर्वांत मोठा राजा होता. हा देशद्रोही असल्यामुळें याच्या राज्यांत व दक्षिणेंत मुसलमानांची सत्ता स्थापन झाली.

तिरुमल्लादेवी—विजयनगरच्या कृष्णदेवरायाची पत्नी. हिची मुलगी सदाशिवरायाचा प्रधान रामरायास दिली होती. तिचें नांव तिरुमल्लांबिका. हिचे पुत्र कृष्णप्प व पेद्दतिम्म.

तिरुमल्लार्य--(स. १६४५--१७०६) कानडी कवि. हा श्रीवैष्णव. कौशिक गोत्र. पिता अळसिंगरार्य. माता सिंगम्मा. ग्रंथ-अप्रतिमवीरचरित, चिक्कदेवरायविजय, चिक्कदेवराजवंशावलि, चिक्कदेवराजशतक. शिवाय चिक्कदेवराजाच्या नांवावर असणारे चिक्कदेवराजविन्नप व गीतगोपाळ यांचेच दिसतात. यांचें शतक उपलब्ध नाहीं.

याचा जन्म श्रीरंगपट्टण येथें झाला (स. १६४५). हा चिक्कदेवराजाचा मंत्री होता. मदुरेच्या नायकाची पत्नी मंगम्मा तिचाहि हा बरेच दिवस मंत्री होता. याला तिरुमल्ल अयंगार असेंहि म्हणतात. याचा भाऊ सिंगरार्य हाहि कानडी कवि होता.

अप्रतिमवीरचरित हा अलंकारग्रंथ आहे (क. क. च. भा २. पा. ४६२).

तिरुमल्लांबिका—ही श्रीरंगाची बायको असून विजयनगरच्या रामरायाची आई होय. श्रीरंगास हिच्यापासून रामराय, तिरुमल्ल आणि व्यंकटाद्रि असे तीन मुलगे झाले. त्यांपैकीं रामराय हा पुढें विजयनगरचा मंत्री झाला; व त्याच्या पश्चात् तिरुमल्ल यानें त्याची जागा घेतली; व शेवटीं तो राजा झाला.

(रामरायाच्या बायकोचेंहि नांव तिरुमल्लांबिका होतें. पण ती सदाशिवराय राजाची चुलतबहीण होती. तेव्हां ही तिच्याहून अगदीं भिन्न होय.)

२. विजयनगरच्या रामरायाची पत्नी; व सदाशिवरायाची चुलत बहीण.

३. विजयनगरच्या रामरायाचा पुत्र कोंद त्याची पत्नी.

तिरुमंगई आलवार--(स. ८००--५० सुमार) तेलगू कवि. याला शेवटचा आलवार म्हणतात. याचा जन्म तंजावर जिल्ह्यांतील कुरुगूर येथें झाला. जात कलार. यानें एकदां ब्राह्मणाचें वऱ्हाड लुटलें, पण पश्चात्ताप पावून त्या ब्राह्मणापासून नारायणमंत्राचा उपदेश घेतला. यानें श्रीरंगम् येथील देवळाचा जीर्णोद्धार केला. अकराव्या शतकांत चोलकेरल राजांनीं याच्या

काव्याचें पठण करण्याची व्यवस्था केलेली आढळते. याच्या काव्यांत कोच्छेंगत नांवाचा चोलराजा व कांचीचा राजा परमेश्वर विण्णगर (पल्लव) यांचें वर्णन आहे. हा राजा दुसरा परमेश्वरवर्मन् पल्लव असावा. हा दंतिवर्मन् पल्लवाचा समकालीन असावा. याचा ज्ञानसंबंदर या शैवाबरोबर वाद झाल्याची दंतकथा आहे.

तिरुव्हयन श्रीकंतन—हा तिसऱ्या कृष्ण राष्ट्रकूटाचा मांडलिक (ग्रामम् शिलालेख).

तिलक—(स. १०३५) हा पंजाबांतील न्हाव्याचा मुलगा. देखणा व कर्तबगार असून यास हिंदी व फार्सीयन या दोन्ही भाषा चांगल्या येत. प्रथमतः यानें मसूद १ ला याचे कारकीर्दीत पंजाबचा सुभेदार अरियारुक याच्या राज्यकारभारांतील दुष्कृत्यांची चौकशी करावयास मसूदनें पाठविलेल्या अबुल हसन याजकडे नोकरी पत्करली व पुढें चढत चढत हा प्रधानमंडळांतील एक प्रधान झाला. मसूदनें पंजाबचे सुभेदारीवर अहमद नियल्तिगिनची नेमणूक केली होती. अहमद नियल्तिगिननें स्वतंत्र गादी स्थापण्याची महत्त्वाकांक्षा धरून आपण गझनीच्या महमूदचे वंशज आहोंत असें सांगून बंड उभारलें, पण तें यानें मोडलें.

तिलकाचार्य--(स. ११८०--१२४० सुमार) तर्कशास्त्रावर ग्रंथ करणारा एक जैन आचार्य. हा श्वेतांबरपंथी चंद्रगच्छशाखेचा होता. हा चंद्रप्रभसूरीच्या मालिकेंत धर्मघोष, चक्रेश्वर, व शिवप्रभ यांच्या मागून होऊन गेला. यानें पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. आवश्यकलघुवृत्ति (स. १२३९), प्रत्येकबुद्धचरित (स.१२०४) हे याचेच ग्रंथ होत (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. २१२).

तिलोपा—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं बाविसावा सिद्ध होय. जात ब्राह्मण. भगुनगर गांव. हा नारोपाचा गुरु. तंजूरमध्यें याचे अनेक ग्रंथ सांपडतात. त्यांत कांहीं मागधी हिंदींत आहेत.

तिष्य—हा कोरांग राजाचा पुत्र. याच्या आईनें यास विष घालून मारलें. आईचें नांव दुराचरणी.

तिष्यरक्षिता—मौर्यवंशांतील सम्राट् अशोकाची पत्नी.

तिस मोग्गलि पुत्त—(मोग्गलीपुत्त पाहा).

तीर गोंड वेंकम्मा—ही एक ब्राह्मण कवयित्री. ही लहानपणीच विधवा झाली. हिचे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. वेंकटाचलमाहात्म्य व राजयोगसार.

तीर्थंकर—जैनांचे चोवीस तीर्थंकर पुढीलप्रमाणें आहेत. त्यांच्या मूर्तीवर ओळखीकरितां घातल्या जाणाऱ्या खुणा पुढें कंसांत दिल्या आहेत. १ ऋषभदेव (वृषभ), २ अजितनाथ (गज), ३ संभवनाथ (तुरग), ४ अभिनंदन (वानर), ५ सुमतिनाथ (क्रौंचपक्षी), ६ पद्मप्रभु (कमल), ७ सुपार्श्वनाथ (स्वस्तिक), ८ चंद्रप्रभ (चंद्र), ९ सुविधिनाथ (मकर), १० शीतलनाथ (श्रीवत्स), ११ श्रेयांसनाथ (गेंडा), १२ वासुपूज्य (महिष), १३ विमलनाथ (वराह), १४ अनंतनाथ (ससाणा), १५ धर्मनाथ (वज्र), १६ शांतिनाथ (हरिण), १७ कुंथुनाथ (बकरा), १८ अरनाथ (नन्द्यावर्त), १९ मल्लिनाथ (कलश), २० मुनिसुव्रत (कांसव), २१ नमीनाथ (नीलोत्पल), २२ अरिष्टनेमि (शंख), २३ पार्श्वनाथ (सर्प), २४ महावीर (सिंह).

यांच्यापैकीं शेवटले दोन ऐतिहासिक पुरुष होते, हें आतां पुराव्यांनीं सिद्ध झालें आहे. त्यांचीं चरित्रें त्यांच्या नांवांवर दिलीं आहेत. बाकीच्या तीर्थंकरांचीं चरित्रें प्रायः सारखींच असल्यामुळें दिलीं नाहींत.

तीवर—अशोक मौर्याला काश्वाकीचे ठिकाणी झालेला पुत्र.

तीसगुत्त—जैनांच्या महावीर तीर्थंकराविरुद्ध असणारा एक पाखंडी. शेवटीं तर महावीरावर यानें हल्ला केला (जैनिझम् इन् नॉर्थ इंडिया).

तुका नागेश—याची परंपरा–गोविंद–शंकर–विश्वरूपघनाचार्य–ज्ञानघनाचार्य–ज्ञानोत्तमशिव-ज्ञानगिरी–सिंहगिरी–ईश्वरतीर्थ–नृसिंहतीर्थ–विद्यातीर्थ-भारतीतीर्थ-विद्यारण्य–महदानंद–देवतीर्थसरस्वति–नृसिंहसरस्वति-ब्रह्मानंदसरस्वति–नागेशात्मज तुका.

ग्रंथ—विश्वकर्ममाहात्म्य.

तुकाबाई भोसले—ही शहाजी राजांची द्वितीय पत्नी. हिचा मुलगा एकोजी. ही मूळ मोहित्यांच्या घराण्यांतील. हिचा भाऊ सुप्याचा संभाजी मोहिते. मोहिते घराणें शिवाजीच्या विरोधकांत होतें. ही शहाजीची आवडती होती (वार्षिक इति. शके १८३६ क्र. ७).

तुकाराम—(जन्म स. १६०८–वैकुंठवास स. १६४९) हा महाराष्ट्रीय संत व कवि देहू येथें स. १६०८ म्हणजे शके १५३० मध्यें जन्मला. तुकारामाचें उपनांव मोरे असून आंबोले किंवा आंबले असेंहि आडनांव लावतात (मं. श. १८३५ वा. इ. ले. ८९). यांचें आजोळ लोहगांवीं मोझे यांच्याकडे होतें. पुण्याशेजारीं लोहगांवीं तुकोबाचें देऊळहि आहे (मं. तृतीय

संमे. पा. १४१–१४३). याचे पूर्वज देहूचे राहणारे. जातीनें कुणबी असून वाण्याचा धंदा करीत. याच्या वडिलांचें नांव बोल्होबा असें होतें. बोल्होबाच्या आठव्या पिढींतील मागील पुरुष विश्वंभर म्हणून होता. त्यानें देहूस विठ्ठलाचें देऊळ बांधलें होतें. याच्या आईचें नांव कनकाई. याला एक धाकटा व एक थोरला असे दोन भाऊ होते. तुकारामानें दुकानाचें कामकाज व एकंदर संसार उत्तम रीतीनें केला.

याचा सुखानें चाललेला प्रवृत्तिपर आयुष्यक्रम निवृत्तिपर होण्यास तशींच कारणें घडून आलीं. हा १७ वर्षांचा झाला तेव्हां याचे आईबाप निवर्तले. वडील बंधूच्या पत्नीचाहि याच वेळीं अंत झाला. यामुळें मूळांतच विरक्त असलेला वडील बंधु अधिक विरक्त होऊन तीर्थयात्रेस निघून गेला; व त्याच्या कुटुंबाचा भार यावर पडला. याच सुमारास भयंकर दुष्काळ पडून चारपांच रुपयांस शेर धारण झाली (स. १६३०–३२). तुकारामाचीं गुरेंढोरें अन्नावांचून पटापट मरण पावलीं. तुकारामाच्या पहिल्या बायकोनें अन्न अन्न म्हणून प्राण सोडला. याचा मुलगाहि याच सुमारास वारला. नंतर याचें दुसरें लग्न झालें. याची दुसरी बायको जिजाबाई व्यावहारिक बुद्धीची असल्यामुळें तुकारामाला तिजपासून सुख मिळेना. याचा परिणाम तुकारामाचें प्रपंचांतून पूर्ण लक्ष उडण्यांत झाला. जगाची नश्वरता व कष्टमय स्थिति याची त्याला जाणीव होऊन सहजच त्याचीं परमार्थाकडे दृष्टि वळली.

तुकारामानें आपल्या विठोबाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला व तो आपला सर्व काळ भागवतधर्मांय ग्रंथांच्या अध्ययनांत, भजनांत, कवित्व करण्यांत व ध्यानधारणेंत घालवूं लागला. भंडाऱ्या डोंगरावर तुकारामानें एकनाथी भागवताचीं १००० पारायणें केलीं. एकनाथी भागवत व तुकारामाचे अभंग यांत कित्येक ठिकाणीं समान विचार व शब्दरचना आढळून येण्याइतकें त्या ग्रंथावर याचें प्रभुत्व होतें. याची बायको कर्कशा होती तरी ती याला तेथें भाकरी पोहोंचविण्याची स्वतः व्यवस्था करी. भजनांत व अध्ययनांत काळ घालवीत असतां साक्षात्काराचा अनुभवहि याला येऊं लागला. भंडाऱ्यापेक्षांहि निवांत असलेल्या भामचंद्राचे डोंगरावर उपाधि टळावी म्हणून हा गेला असतां तेथें याची निर्गुण समाधि लागून याला ईश्वरी साक्षात्कार झाला. निर्गुण ब्रह्म हा विठ्ठलाचा किंवा जगज्जीवन प्रभूचा आत्माच वश झाल्यावर सगुण-साक्षात्काराला तरी अवकाश कोठला ? नामदेवानें पांडुरंगासहित येऊन तुकारामाला दर्शन दिलें व कवित्व करण्याचा मार्ग दाखविला.

केशव चैतन्य हा तुकारामाचा मोक्षदाता सद्गुरु होय. पण त्यानेंहि यास नामदेवाप्रमाणें स्वप्नांतच साक्षात्कार दिला.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं भागवतधर्माचा पाया घातला व तुकाराममहाराजांनीं त्यावर कळस चढवून भागवतधर्माची इमारत पूर्णत्वास नेली. वेदाप्रमाणें भागवतधर्माचे वाङ्मयहि ज्ञानपूर्ण आहे.

अत्यंजापासून तों थेट ब्राह्मणापर्यंत सर्वांना समान लेखून भेदाभेदाच्या अमंगळ भ्रमाचा विटाळ होऊं न देता " तुका म्हणे एका देहाचे अवयव " या वचनाप्रमाणें सर्व जगताला एकच विराट पुरुष मानणारीं वेदवचनें भागवतधर्मानें प्रत्यक्ष कृतींत उतरविलीं. भक्तीसारख्या सुलभ आत्मशुद्धीच्या व नाम सर्वमुखीं करून मन एकाग्र करण्याच्या साधनाचा व " मुखीं नाम हातीं मोक्ष " अशी स्वतः ग्वाही देऊन भक्तिरसाचा इतका पूर वाहविला कीं, तुकारामानें या कार्याचा कळस करून अखिल महाराष्ट्र समाज व अॅबटसारखे पाश्चिमात्य जिज्ञासूहि भक्तीच्या चंद्रभागेंत न्हावविले. त्यांत त्या काळीं रामेश्वरभट वाघोलीकरासारखे वैदिक कर्ममार्गी सच्चे कर्मठ प्रामाणिक ब्राह्मणहि होते व सालोमालोसारखे तोतये पोटभरू साधूहि होते. रामेश्वरभटाला वेदगुपित अंत्यजापर्यंत नेऊन पोहोंचविणें खरोखरच अब्रह्मण्य वाटलें. परंतु तुकारामाच्या विश्वव्यापक भागवतधर्माच्या झेंड्यापुढे त्याची समजूत पडतांच त्यानें मानच तुकविली. पण हे कास नुसत्या तोंडच्या उपदेशानें पार पडलें नाहीं. रामेश्वरभटानें अभंगांच्या पोथ्या तुकारामास इंद्रायणींत बुडविण्यास सांगितलें. तुकारामानें ब्राह्मणाला ईश्वरमूर्ति समजून रामेश्वरभटांची आज्ञा शिरोधार्य केली व स्वहस्तें अभंगांच्या बाडांना इंद्रायणींत बुडवून स्वतः १३ दिवस तेथें निर्वाण मांडलें व प्रत्यक्ष पांडुरंगानें वर येऊन स्वतः वह्या वर धरून परत तुकारामास दिल्या. याबद्दल तुकारामाचे अभंग असल्यामुळें शंकेला जागा नाहीं. बिचारा रामेश्वरभट लीन होऊन तुकारामचरणीं नम्र झाला.

सालोमालो हा तुकारामाचे अभंग चोरी व शेवटच्या चरणांतील " तुका म्हणे " च्या ऐवजीं " सालो म्हणे " असें करून स्वतःच्या नांवावर कीर्तनांत म्हणून लोकांस फसवी. हा सदेह वैकुंठाला गेला, अशी जुन्या काळापासून समजूत आहे.

याचे अभंग सुमारें सहा ते आठ हजार उपलब्ध आहेत. यांशिवाय श्लोक, पदें व ओव्याहि आहेत. बालक्रीडा नांवाचे

एक प्रकरण आहे. याचे अभंग साध्या मराठींत असून त्यांत भक्तीची परमोच्च स्थिति दृष्टीस पडते. याशिवाय प्रचलित सामाजिक दोषांवरहि यानें तडाखे ओढले आहेत. त्यामुळें याच्या अभंगांचा प्रचार आबालवृद्धांच्या तोंडीं झाला आहे.

फुटो हें मस्तक, तुटो हें शरीर । नामाचा गजर, सोडूं नये ॥

अशा याच्या निश्चयी चारित्र्याचा व अभंगांतील शिकवणुकीचा महाराष्ट्रांतील सामान्य जनतेवर फार परिणाम झाला आहे. महाराष्ट्रांतील स्त्री, शूद्र व अस्पृश्य समाजधर्माच्या एका निश्चित व अचल भूमिकेवर आहे याचें श्रेय याला आहे.

तुकारामबाबा वर्दे—(स. १५७१) मराठी कवि. सारस्वत ब्राह्मण. पिता अमृतराव, गांव जुवा (गोवें). पत्नी दुर्गाबाई. यांनीं भर्तृहरीच्या तीनहि शतकांचे दशकांना वेगळालीं नांवें देऊन समश्लोकी भाषांतर केलें आहे. शतकत्रयास सुभाषितरत्नावली असें जुनें नांवहि यांनीं कायम ठेवलें आहे. वामनपंडित व हे समकालीन होते, पण यांची कविता त्यापूर्वीची असावी (महाराष्ट्रकविचरित्र, भा. १, पा. २२७-३५).

तुका ब्रह्मानंद—(स. १६५०) श्रीशिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीत विश्वब्राह्मण (सुवर्णकार) कुलामध्यें तुका ब्रह्मानंद या नांवाचा एक मोठा विद्वान् योगी होऊन गेला. हा सातारा येथें राहत असे. याच्या वडिलांचें नांव नागनाथ असून उपनांव कर्मार होतें. म्हणून पूर्व वयांत याला तुका नागनाथ कर्मार असें म्हणत. याचा उपनयनविधि होतांच लहानपणीं याच्या वडिलांनीं याच्याकडून वेदाध्ययन, संस्कृत व्याकरणशास्त्र व अलंकारशास्त्र यांचा अभ्यास करविला. नंतर देवशिल्पांत (देवमूर्तिसंबंधी विद्या) हा निपुण झाला.

वडिलांच्या पश्चात् याच्याकडे सरकार-कचेरीतील शिलेदारांचे म्हणजे खजिनदाराचें काम आलें. पुढें शिवाजीमहाराजांची अनुज्ञा मिळतांच श्रीब्रह्मानंदस्वामींच्या अनुग्रहाने याने मुहूर्तावर संन्यासदीक्षा धारण केली. ब्रह्मानंदांनी याला 'तुका ब्रह्मानंद' हें नांव दिलें. त्या आश्रमांत याने वेदांताचें परिपूर्ण अध्ययन करून प्रस्थानत्रयादि ग्रंथांचें परिशीलन केलें.

हा उत्तम कवि होता. यानें भर्तृहरिकृत शतकत्रयावर समश्लोकी टीका केली आहे. याचें शतकत्रयांचें भाषांतर तुकारामबाबा वर्दे यांच्याप्रमाणें दशकवार विभाग पाडून केलें आहे. याचें भाष्यटीका, वेदांतरहस्य, शतकत्रयसमश्लोकी, सप्तशतीची टीका, प्रणवाष्टक, नाटकरामायण, गीतगोविंद समश्लोकी, व विश्वकर्ममाहात्म्य वगैरे अनेक ग्रंथ यानें लिहिले आहेत. वरीलपैकीं प्रणवाष्टक व गीतगोविंद हे दोन ग्रंथ छापून प्रसिद्ध झालेले आहेत. अंतकाळीं तुकाब्रह्मानंद यानें सातान्यानजीक माहुली येथें कृष्णा-वेण्णा-संगमावर आपला देह ठेविला. त्या ठिकाणीं महाराजांनीं याची समाधि, घाट व देवालयहि बांधलें आहे (महाराष्ट्रकविचरित्र भा. ५, पृ. ७०-८१).

तुका विप्र—(स. १७८८ नंतर मृत्यु) मराठी कवि व सत्पुरुष. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. सातारा जिल्ह्यांतील रहिमतपूरचे जोशी कुलकर्णी. गुरु विप्रनाथस्वामी. सकाळीं कृष्णातीरीं स्नानसंध्या व दुपारीं भागवतपुराण असा यांचा कार्यक्रम असे. यांच्या घराण्यांत अनेक विद्वान् व अधिकारी पुरुष होऊन गेले. यांच्या घराण्यास मोगलाईत अंजनावती नांवाचा गांव इनाम आहे. होळकरांचे फत्तेसिंग माने यांच्या शिष्यांपैकीं होत. यांना रंगनाथस्वामी निगडीकरांची कविता विशेष आवडे. यांचें देहावसान अंजनावतीस झालें. यांचा प्रयाणशक राजवाडे यांनीं १६९० ठरविला असला तरी ज्योतिपंतदादा महाभागवतांच्या मृत्यूचा उल्लेख करणारे हे शके १७१० नंतर मृत झाला असले पाहिजेत (मं. अह. शके १८३४ पृ. ७९-८०). यांनीं तुकारामाचा सव्वा लक्ष अभंग करण्याचा संकल्प पुरा केला असें म्हणतात. यांचे कांहीं अभंग तुकारामाच्या अभंगांत मिसळून गेले आहेत.

यांचे ग्रंथ- आत्मसिंधु, सुदामचरित्र, भानुदासचरित्र, कालियामर्दन, आरती कीर्तनरंगाची (सं. सू.). यांनीं शके १७०१ मध्यें मुरुड येथें कीर्तन केल्याचा निर्देश सांपडला आहे (मं. त्रै. १२. ले. २८).

तुका सुंदरदास—(ग्रंथकाल स. १६७७) मराठी कवि. यानें 'नासिकेतोपाख्यान' नांवाची एक पोथी लिहिलेली आहे. तिचे २१ अध्याय आहेत या याच्या गुरूचें नांव श्यामसुंदर भारती असें होतें (मं. त्रै. व. १२.८ ले. ३३). याचे कांहीं अभंग आहेत (सं. सू.).

तुकोजी राजे—(तंजावरचे) (स. १७२८-१७३५) सरफोजी राजे वारल्यानंतर त्यांचे कनिष्ठ बंधु तुकोजी हे तंजावरच्या गादीवर बसले.

तुकोजी राजे हे सरफोजी राजापेक्षांहि अधिक राजकारणपटु व कुशाग्रबुद्धि असून मोठे विद्याभिलाषी होते. यांना संस्कृत, तामील, मराठी व फार्सी इत्यादि भाषा अवगत होत्या. त्यामुळें दूरदूरचे विद्वान् पंडित व फकीर

लोक यांच्या भेटीसाठीं येत असत. अद्यापि तंजावर येथें अशी एक दंतकथा प्रसिद्ध आहे कीं, कोणी फकीर अरबस्थानांतून तुकोजी राजांचे भेटीस आला, आणि त्यानें आपला प्रसाद म्हणून, यास 'नागिणी,' आणि 'पद्मिणी' अशा दोन तरवारी नजर केल्या. त्या तरवारी मद्रास येथील सरकारी पदार्थसंग्रहालयामध्यें पुष्कळ वर्षे होत्या. यास एकंदर सहा स्त्रिया होत्या.

यांस चार औरस पुत्र व एक दासीपुत्र होता. यांच्यानंतर यांचा मुलगा बाबासाहेब, व्यंकोजी ऊर्फ एकोजी हें नांव धारण करून गादीवर बसला (तं. रा. घ. पृ. ५६-५७).

तुकोजीराव पवार—हे धारच्या आनंदराव पवाराचे चुलतबंधु असून देवासकर म्हणून प्रसिद्ध आहेत. यांच्या पित्याचें नांव काळोजी पवार. तुकोजीरावांना जिवाजी म्हणून आणखी एक बंधु होते. माळव्याच्या मुलुखाची वांटणी झाली तेव्हां या दोघांस देवासचें राज्य मिळालें (२२ जुलै १७३२). त्यावरून यांच्या कामगिरीची कल्पना येते.

तुकोजी सकपाळ—(स. १६५८-१६९०) कुलाब्याच्या आंग्र्यांचा हा पहिला प्रसिद्ध पुरुष होय. हा स. १६५८ मध्यें शिवाजीकडे बारगिरी करून होता.

तुकोजी होळकर—(जन्म स. १७२५; मृत्यु स. १७९७) हा होळकरांच्या वंशांतील जानोजीचा मुलगा. हा मल्हारराव होळकरांचा दत्तक पुत्र असें आपणास शिक्क्यांत व कागदपत्रांतहि म्हणवतो; आणि या गोष्टीस इतर लोकहि संमति दर्शवितात. पण प्रत्यक्ष दत्तविधान झालेलें नव्हतें.

अहल्याबाईनें होळकरांच्या राज्याचा बंदोबस्त पाहावा; आणि यानें सेनापति होऊन मराठी राज्याची कामगिरी पार पाडावी, अशी कामाची विभागणी होती. पण यामुळें घोड्यावर बसणारा एक आणि लगाम धरणारा दुसरा असें होई. ही स्थिति पेशव्यांना व यांना पुष्कळ जाणवे, पण अहल्याबाईनें आपल्या हातांतील सत्ता केव्हांहि सोडली नाहीं.

पण यामुळें याला स्वतंत्रपणें केव्हांहि कारभार करितां आला नाहीं. इकडे नानाचा आणि तिकडे बाईच्या कर्ज्या अमलांतून केवळ मुलखगिरीवर सैन्याचा खर्च भागविण्याचे दिवस आतां राहिले नव्हते. त्यामुळें हा नेहमीं ओढगस्त स्थितींत असे.

बाई आणि हा यांचे यामुळें बरेच खटके उडाले. पेशव्यांचीहि तुकोजीच्या हातांत एकमुखी कारभार असावा अशी इच्छा होती. पण अहल्याबाईची दूरदृष्टि या बाबतींत यशस्वी झालेली दिसते.

याला स्वतंत्रपणें कारभार कधींच करतां आला नाहीं. कारभाऱ्यांच्या हा आहारीं जात असे. नारो गणेशाची यानें केलेली विटंबना केव्हांहि समर्थनीय ठरत नाहीं. हा दारूहि अत्यंत पीत असे. तसेंच राजकारणासारख्या बाबतींतहि क्षुद्र रखेल्यांच्या मर्जीप्रमाणें वागण्याची याची वृत्ति अगदींच अक्षम्य होती.

याची पत्नी रखमाबाई. तिचें व अहल्याबाईचें जमत नसे.

स. १७६९ पासून महादजी शिंद्याबरोबर हा पांच वर्षे दिल्लीकडे होता. पण यानें नजीबखानास पाठिंबा दिल्यामुळें शिंद्याचा सर्व बेत फसला. तसेंच पुढें स. १७७१ मध्यें नजीबाचा पुत्र झबेताखान मराठ्यांच्या अटकेंत असतां त्यास यानें सोडलें. स. १७७४ मध्यें हा दक्षिणेंत आला. हा पहिल्यापासून राघोबादादाच्या पक्षांत असे. त्याप्रमाणें बारभाईच्या कारस्थानाच्या वेळींहि राघोबाकडे मिळाला, पण पुढें फुटला. स. १७७७-७८ च्या सुमारास याला हरिपंत फडक्याच्या मदतीस कर्नाटकांत जाण्यास सांगितलें. पण तें यानें नाकारलें व मोरोबाचा पक्ष प्रबळ केला. पण याला महादजीच्या द्वारा नानानें आपणाकडे वळविलें. स. १७७८ मध्यें हा महादजी व हरिपंत यांच्याबरोबर इंग्रजाशीं लढण्यास गेला होता. स. १७८० मध्यें हा महादजीबरोबर गुजराथेंत इंग्रजाशीं लढण्याकरितां गेला होता. स. १७८१ सालच्या बोरघाटांतील इंग्रजाशीं झालेल्या लढाईंत सैन्याचें आधिपत्य हरिपंत व याकडे होतें. स. १७८६ मधील टिपूवरील लढाईंत यानें चांगला पराक्रम केला. स. १७८७ सालीं हा उत्तरेकडे महादजीच्या मदतीस म्हणून गेला, पण यानें त्याच्या कामांत सारख्या अडचणी उत्पन्न केल्या. स. १७९० मध्यें इस्माईलबेगचीं गांवें यानें लुटल्यानें महादजीचें व त्याचें वांकडें आलें.

डी बायन शिंद्याचा सेनापति होता. तेव्हां यानें शिंद्यावर वरचष्मा करण्याकरितां डिबूड्रनेक या फ्रेंच अधिकाऱ्यास ठेवून कवाईती फौज तयार करण्यास आरंभ केला (स. १७९२). शिंदे-होळकरांची ही तेढ विकोपाला जाऊन दोन्ही फौजांची स. १७९२ सालीं कोठ्याच्या उत्तरेस लाखेरीवर मोठी लढाई झाली व याच्या सैन्यास हार खावी लागली आणि मराठेशाहीचा आब उघडपणें नाहींसा झाला. तेव्हां यानें चिडून शिंद्यांचें उज्जयनी शहर लुटलें. पुढल्या वर्षी याला अर्धांगवायु झाला

(स. १७९३). तथापि हा खर्ड्याच्या लढाईत पेशव्यांनीं मुद्दाम बोलावल्यावरून हजर होता (१७९४). पुढें अहल्याबाई वारली व हा ता. १५-८-१७९७ रोजीं पुणें येथें वारला.

याचा वडील मुलगा काशीराव हा जन्मतांच हातापायानें लुळा होता व धाकटा मल्हारराव बाल्य होता. काशीराव नांवाचा पुतण्या मात्र तल्लख होता. यशवंतराव व विठूजी हे याचे दासीपुत्र होत.

तुघ्रलबेग—(स. १०३७-६३) हा सेल्जुक तुर्क होय. हा व याचा भाऊ चारग बेग ह्यांनीं गझनीच्या ताब्यांतील तुर्कस्थानचा प्रदेश जिंकून तेथें आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें. स. १०५१ त यानें बगदाद शहरांत प्रवेश करून तेथें आपण सुलतान झाला. पुढें दुसऱ्या अनेक तुर्क टोळ्या यास सामील झाल्या, आणि स. १०५७ त यानें विस्तृत सेल्जुक राज्याची स्थापना केली (मु. रि. १. ४१).

तुघ्रील—(स. १०५२) महमूद गझनवीचा गुलाम. महमूदचा मुलगा इझ्झुद्दौलानें यास सीस्थानचा सुभेदार नेमिलें. पण यानें तयारी करून इझ्झुद्दौल्यावर स्वारी करून व राजघराण्यांतील दहा माणसांसह त्यास ठार मारून गादी बळकावली. पण ४० दिवस राज्य केल्यावर याचा खून झाला.

२. (स.१२७५) बंगालचा सुभेदार (बल्बन पाहा).

तुतातित—(कुमारिलभट्ट व तौत पाहा).

तुलसीदास—(जन्म स. १५३१–मृत्यु स. १६२१) हिंदी भाषेंतील महाकवि. यांचा जन्म राजापूर येथें झाला. यांच्या पित्याचें नांव आत्माराम दुबे व आईचें नांव हुलसी. यांचें पहिलें नांव रामबोला असें होतें. हे जातीनें सरयुपारीण ब्राह्मण होते. लाला सिताराम म्हणतात, हे सनाढ्य ब्राह्मण होते. यांचा जन्म एका अत्यंत गरीब स्थितींतल्या कुटुंबांत झाला, हें यांच्या ज्यायोकुलमंगल, इत्यादि कवितावलींतील लिहिण्यावरून समजतें. यांच्या गुरूचें नांव नरहरिदासजी होय. रामायणाच्या आरंभीं तसा यांनीं उल्लेख केला आहे असें वाटतें. वाटतें म्हणण्याचें कारण तेथें 'बंदऊँ गुरूपद, कृपासिन्धु नररूप हरि' असे शब्द आहेत.

यांच्या जन्मवेळीं मूळ नक्षत्र असल्यामुळें आणि यांना जन्मतःच दांत वगैरे असल्यामुळें आईबापांनीं यांचें पालनपोषण न करतां सोडून दिलें होतें. पण ईश्वरेच्छेनें यांचें पालनपोषण झालें, आणि शेवटीं नरहरिदासासारखा गुरुहि भेटला, असें यांच्या कवितावली, विनयपत्रिका वगैरेंत आलेल्या उल्लेखावरून दिसतें. यांना विशेष प्रकारचें शिक्षण कोणीं दिलें होतें असें दिसत नाही. नरहरिदासाबरोबर हे काशीस आले. आणि तेथें स्वामी रामानंदजीच्या मठामध्यें राहूं लागले. रामानंदजीनें रामोपासनेचा सांप्रदाय पूर्वीच सुरू करून ठेविला होता आणि त्याची या वेळेला भरभराट होती. पंचगंगा घांटावरील स्वामी रामानंदजीच्या मठांत हे राहत असतां शेष–सनातनजी नांवाच्या महापंडितांची व यांची गांठ पडली. आणि त्यांच्यापासूनच वेदवेदांगदर्शन, पुराण, इतिहास वगैरेंचें ज्ञान यांना प्राप्त झालें. आणि नंतरच यांचें लग्न वगैरे झालें असावें.

यांचा विवाह दीनबंधु पाठक यांची कन्या रत्नावली हिच्याशीं झाला. रत्नावलीवर यांचें अत्यंत प्रेम होतें. रत्नावली माहेरी गेली असतां हेहि वियोग सहन न होऊन तिच्या घरीं गेले. पतीची आसक्ति पाहून तिला लाज वाटली. तिनें यांना सांगितलें—

लाज न लागत आपु को, दौरे आयहु साथ ।
धिक् धिक् ऐसे प्रेमको, कहा कहौं मैं नाथ ॥
अस्थि चरम मय देह मम, तामें जैसी प्रीति ।
तैसी जो श्रीराम महँ, होति न तौ भवभीति ॥

या बोलण्याचा तुलसीदासजींवर अत्यंत परिणाम झाला आणि हे एकदम तेथून थेट काशीस गेले आणि विरक्त होऊन राहिले. बिचाऱ्या रत्नावलीला काय माहीत कीं आपल्या बोलण्याचा असा परिणाम होईल ! पण यामुळें तुलसीदासजींच्या प्रेमाचा प्रवाह दुसरीकडे वळला आणि त्यांचें नांव अजरामर झालें.

स्त्रीच्या बोलण्यावरून विरक्त झाल्यावर हे काशीस कांहीं दिवस राहिले. नंतर अयोध्येंत बराच मुक्काम केला व नंतर सर्व हिंदुस्थानभरच्या तीर्थयात्रा केल्या. सुमारें २० वर्षे हे तीर्थयात्रा करीत होते असें म्हणतात. यानंतर हे चित्रकूटावर येऊन पुष्कळ दिवस राहिले. तेथून यांची कीर्ति चहूंकडे पसरली आणि अनेक संतमहंत यांच्या दर्शनास येऊं लागले. याच वेळीं यांची ग्रंथरचनाहि सुरू झाली. अनेक विद्वान् लोक यांच्याशीं चर्चा करण्याकरितां येत असत. त्या वेळीं सर्वांत श्रेष्ठ भक्त व महात्मा असें यांना लोक मानीत. अशी प्रसिद्धी आहे कीं, सुप्रसिद्ध पंडित मधुसूदनसरस्वतीहि यांच्याशीं चर्चा करण्याकरितां आले होते व त्यांनीं शेवटीं प्रसन्नतेनें पुढील उद्गार काढले:

आनंदकानने कश्चिज्जङ्गमस्तुलसीतरुः ।
कविता-मंजरी यस्य रामभ्रमरभूषिता ॥

याच्या मित्रमंडळींत नबाब अबदुल रहिम खानखाना, महाराज मानसिंग, नाभाजी आणि मधुसूदनसरस्वती इत्यादि मोठे लोक असत. रहिम आणि हे यांच्यामध्यें बराच सहवास असे. परस्परांच्या दोहोऱ्यांवरून आजहि हें दिसून येतें. काशींतील तोडरमल्ल नांवाच्या जमीनदाराशीं यांचा विशेष स्नेह होता. तो मेल्यानंतर यांनीं कांहीं दोहोरे केलेले आहेत. त्यावरून तुलसीदासांचा त्याच्याबद्दल विशेष अनुराग दिसून येतो. व्रजभाषेतील सुप्रसिद्ध कवि नंददासजी तुलसीदासांचे सख्खे भाऊ होते असें म्हणतात. सूरदासजी, नाभाजी व केशवदासजी या तिघांच्याहि भेटी तुलसीदासांशीं झाल्या होत्या. यांनीं केलले ग्रंथ पुढील-प्रमाणें उपलब्ध आहेत.

१ रामचरितमानस (तुळशीदासरामायण), २ कवित्त रामायण, ३ दोहावली, ४ रामगीतावली, ५ रामाज्ञा, ६ विनयपत्रिका, ७ बरवै रामायण, ८ रामलला नहछु, ९ वैराग्यसंदीपनी, १० कृष्ण-गीतावली, ११ पार्वती-मङ्गल, १२रामसतसई,१३ हनुमदबाहुक,१४जानकीमङ्गल. यांपैकीं रामचरित हा ग्रंथ सर्वांत मोठा असून अत्यंत लोकप्रिय आहे. याच्या कोट्यवधि प्रती आजपर्यंत खपल्या आहेत. हा इतका लोकप्रिय ग्रंथ आहे कीं, गरीबाच्या झोंपडीपासून ते राजाच्या महालापर्यंत या ग्रंथाचें पठणश्रवण केलें जातें. या ग्रंथानें तुलसीदासांना अमर केलें आहे. रामचरितमानससारखा हिंदुस्थानांत दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाचा प्रचार नाहीं. यांचा देहांत वि. सं. १६८० (स. १६२२) श्रावण शु॥ ७ ला असी आणि गंगा यांच्या संगमावर झाला. सर्वमान्य झालेले जन्ममरणाचे संवत आम्हीं दिलेले आहेत.

यांच्या रामचरितमानस या ग्रंथाचा मराठींत व इंग्रजीमध्येंहि अनुवाद झालेला आहे (क. कौ. १; शब्द-सागर प्रस्ता.).

अर्वाचीन कालांतील साधु व तत्त्वज्ञानी रामतीर्थ हे खास यांच्याच वंशांतील होत.

२. मराठी शाहीर. यानें आपल्या कवितेनें तानाजी मालुसरे यास अमरपद दिलें. हा पोवाडा सरस असून समकालीन असावा.

तुषास्प—हा यवन होता. अशोक मौर्याच्या वेळीं हा सुराष्ट्राचा-काठेवाडचा प्रांताधिकारी होता. प्रांताधिकाऱ्यांना राजा हें पद लावीत असें जुनागड येथें सांपडलेल्या रुद्रदामनच्या लेखावरून ठरतें.

तुळजाजी भोसले—(स. १८०७ सुमार) अक्कलकोटच्या भोसले घराण्यांतील शहाजीचा हा दुसरा मुलगा. याचा भाऊ फत्तेसिंह हा अक्कलकोटच्या गादीवर आला. तेव्हां यांचें व फत्तेसिंगाचें भांडण होऊन फत्तेसिंगानें यास अटकेंत ठेविलें. पुढें लवकरच हा पेशव्यांकडे पळून गेला व यानें आपल्या भावाविरुद्ध पुण्याच्या दरबारीं तक्रार केली. थोड्याच दिवसांनीं सदाशिवरावभाऊ व माणकेश्वर यांच्या मध्यस्थीनें भावाभावांत सलोखा होऊन यानें सातारा जिल्ह्याच्या खटाव तालुक्यांतील कुर्ली वगैरे ८१०० रुपये उत्पन्नाचीं गांवें घेऊन १८०७ सालीं स्वस्थ बसण्याचें कबूल केलें.

तुळजो राम—हा ब्राह्मण रघूजीचा प्रख्यात सरदार होता. हा यमाजी शिवदेवाच्या कुटुंबापकीं असावा. शाहूनें याला रघूजीजवळ नेमला होता. रघूजीनें यास देवगडप्रांतीं फौजेचे बंदोबस्तासाठीं नेमला होता (म. रि. म. वि. २, पृ. ७९).

रघूजीनें पवनी हें ठाणें घेतल्यावर तेथें तुळजोरामपंतास नेमलें. स. १७४८ त १७५१ या वेळेस रघूजीनें ओरिसा प्रांतावर स्वारी केली तेव्हां त्याजबरोबर तुळजोराम हा हजर होता. ह्यानें बंगाल कर्नाटकपर्यंत स्वाऱ्या केल्या. रघूजीच्या सर्व स्वाऱ्यांत हा रघूजी करांड्याप्रमाणें प्रमुख सरदार होता (ना. प्रां. इ.).

तुळशी—(स. १५५६ सुमार) सारस्वत ब्राह्मण. जुनागडनजीक कुतलपूरचा राहणारा. यानें गुजराथींत ध्रुवाख्यान केलें.

तुळसीबाई—(खून ता. २०-१२-१८१७) ही यशवंतराव होळकराची एक आवडती राख होती. दुसऱ्यास माहे पाडण्याचा गुण हिच्या अंगीं होता. हिनें होळकरशाहीचा कारभार १० वर्षे केला. ही कारभार पाहूं लागल्यावर सरकारसारा नीट वसूल होईना. राज्यव्यवस्था नीट चालेना. हिचा पुढें खून झाला.

ही राख नव्हती, असें ही घरांतल्या माणसांवर सत्ता चालवीत असे व सहीशिक्का वापरीत असे, वगैरे कारणांवरून सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आढळतो (होळकरशाहींतील ऐ. स्त्रियांचा पत्रव्यवहारमधील टीपा पाहा, पा. १२३).

तुळाजी ऊर्फ तुळजा राजे—(स.१७६३-१७८७) तंजावरचा राजा. याचे बापाचें नांव प्रतापसिंह. याला इंग्रज, हैदर व अर्काटचा नबाब असे तीन प्रमुख शत्रु होते. याचा व अर्काटचा नबाब मुहम्मदअल्लीचा मेलूरच्या कालव्याच्या दुरुस्तीविषयीं तंटा लागला असतां, इंग्रजांच्या मध्यस्थीनें तो मिटला (स.१७६४). हैदरानें याच्याशीं स.१७६९ त लढाई केली असतां, यानें हैदरास चार लाख रुपये व

चार हत्ती दिले. हें पाहून मुहम्मदअल्लीनें स. १७७१ त इंग्रजांच्या मदतीनें याच्यावर चाल केली, परंतु यानें मुहम्मदअल्लीशीं तह करून त्यांत इंग्रजांचें नांव सुद्धां घेतलें नाहीं. यामुळें इंग्रजांना राग येऊन त्यांनीं जनरल स्मिथ यास १७ सप्टेंबर १७७३ रोजीं याजवर पाठविलें व यास कैद करून, तंजावर संस्थान खालसा केलें. परंतु ही गोष्ट कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांना नापसंत पडून, त्यांनीं यास फिरून ११ एप्रिल १७७६ रोजीं सन्मानानें गादीवर बसविलें. पुढें यानें स. १७८७ पर्यंत इंग्रजांच्या मदतीनें राज्यकारभार करून, हा निपुत्रिक राजा स. १७८७ मध्यें मरण पावला. यानें भोंसल्यांच्या वंशांतील एक मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव शरफोजी असें ठेविलें. यानें मोहनाबाई, राजसबाई व राजकुंवरबाई अशा तीन बायका केल्या; नंतर मुलाकरितां सुलक्षणाई व मोहनाबाई अशा आणखी दोन बायका केल्या. पण एकोपासूनहि यास मुलगा झाला नाहीं (तं. रा. घ. प. ८५--९५).

तुळाजी आंग्रे—(मृत्यु स. १७८७) हा कान्होजी आंग्रे यांचा रक्षापुत्र. याच्या आईचें नांव गहिनीबाई. स. १७३५ मध्यें याचे सावत्रबंधु संभाजी व मानाजी यांच्यांत यादवी सुरू झाल्यामुळें हा कुलाब्यास न येतां सुवर्णदुर्गास राहिला. सुवर्णदुर्ग याच्या ताब्यांत आणि विजयदुर्ग त्याच्या ताब्यांत अशी व्यवस्था दिसते.

संभाजी आंग्रे दौलतीवर असतां हा त्याचा कारभारी होता. स. १७३४ मध्यें हा संभाजीबरोबर हबशापासून अंजनवेल घेण्याकरितां गेला होता. पेशवे व आंग्रे यांचें वैर जुनेंच दिसतें. बसईच्या लढाईंत आंग्र्यांचा भाग दिसत नाहीं. तेव्हां पोर्तुगीज नष्ट झाले, पण इंग्रज घरांत शिरले. स. १७४० मध्यें हिराकोटाजवळ संभाजी आंग्र्यांच्या व पेशव्यांच्या लोकांत जी झटापट झाली, तींत हा जखमी होऊन पेशव्यांच्या हातीं सांपडला व पुढें संभाजी मेल्यावर (स. १७४१ डिसें.) याचें व पेशव्यांचें सडकून वैर जुंपलें. स. १७४२ मध्यें यानें अंजनवेलचा किल्ला घेतला. त्यानंतर शाहूनें यास सरखेल ही पदवी दिली.

आरमाराच्या जोरावर इंग्रजांचें एकहि जहाज सुरक्षित न जाऊं देणाऱ्या आणि पेशव्यांची सत्ता न जुमानणाऱ्या तुळाजीविरुद्ध दोनहि सत्ता एक झाल्या. पेशव्यांनीं याच्याकडे रत्नागिरी व सुवर्णदुर्ग हे दोन किल्ले मागितले. पण 'यानें सुईच्या अग्राइतकी जमीन देणार नाहीं' असें उत्तर दिलें. स. १७५५ च्या मार्चांत दोघांनीं याचे कांहीं किल्ले घेतले व याचें आरमार पळवून लावलें. हा ठराविक खंडणी देत असे. ती आली नाहीं म्हणून वकील पाठविला, त्याची यानें नाककान कापून विटंबना केली. त्यानंतर स. १७५६ फेब्रुवारींत लढाई होऊन याचें आरमार जळून खाक झालें. सर्व किल्ले पेशव्यांनीं घेतले. आणि याला पेशव्यांच्या स्वाधीन व्हावें लागलें (रामाजी महादेव पाहा).

तुरुंगांत असतांहि पेशव्यांना यानें फंदफितुरी करून अत्यंत त्रास दिला. एकदां यानें चंदनवंदनच्या तुरुंगांतून नानासाहेबांच्या मृत्यूनंतर पुणें लुटण्याचा अयशस्वी प्रयत्न केला (रा. खं. १. २८९). वंदन, सोलापूर, राजमाची, विसापूर, नगर, चाकण, दौलताबाद वगैरे किल्ल्यांत याला ठेवलें होतें. अखेर हा सोलापूरच्या किल्ल्यांत मेला (भा.व. श.पु.७७). याचीं बायकामुलें तुरुंगांत याच्याजवळच असत.

'हा निमगोरा, उंच, भव्य, देखणा व अत्यंत रुबाबदार असे. याला पाहिल्याबरोबर मूर्तिमंत धैर्याची कल्पना मनांत येते. याची कृतीहि रूपास साजेशी होती. कोणतेंहि जहाज याच्या तावडींतून सुटत नसे. इंग्रज याला थरथर कापत. हा अत्यंत संपन्न आणि कुशल होता.' असें याचें एका इंग्रजानें वर्णन केलें आहे.

याला नष्ट केल्यानें शिवाजीमहाराजांपासून वाढत आलेलें मराठ्यांचें आरमार नष्ट झालें. समुद्राच्या बाजूनें इंग्रजांचा वर्चस्वा कायमचा बसला, आणि मराठी राज्याचा मृत्यु जवळ आला. यानंतर मराठ्यांची आरमारी बाजू आनंदराव धुळपांनीं राखण्याचा प्रयत्न केला. खंडोजी माणकरहि याच्या प्रतिस्पर्ध्यांपैकीं एक होय. याच्या सहा स्त्रियांपैकीं एक सती गेली. संतति नाहीं.

तुळया पवार—(मृत्यु स. १७८०) रघुनाथरावाचा हुजऱ्या. नारायणरावाच्या खुनांतील मुख्य. हा प्रथम हैदरकडे पळाला. त्याशीं तह झाला तेव्हां गोव्याकडे पळाला. पण पोर्तुगीजांनीं यास पेशव्यांच्या ताब्यांत दिलें. तेव्हां यास देहांत शासन झालें.

तेजकंठ—(स. ११५० सुमार) काश्मीरचा राजा जयसिंह लोहरच्या वेळीं काश्मीरांत हा वकील होता. याला कोंकणच्या राजा अपरादित्यानें आपला वकील म्हणून पाठविलें होतें. यावरून हा ११ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत व नंतरहि होता. हा वकील उत्कृष्ट विद्वान असल्यामुळें मंख कविकृत श्रीकंठचरित्र हें कसें उतरलें आहे, ह्याची परीक्षा करण्यास ग्रंथकर्त्याचा भाऊ जो अलंकार त्यानें जमा केलेल्या तीस पंडितांत हा एक परीक्षक होता (श्रीकंठचरित सर्ग २५, श्लो. १०९-१११).

तेजपाल—मंत्री आशराजाला कुमारदेवी नांवाच्या विधवेपासून झालेला मुलगा. वस्तुपाल नांवाचा याला एक भाऊ होता (वस्तुपाल पाहा). महीतट (महीकांठा) देशचा राजा घुघूळ नांवाचा होता. घुघूळाची राजधानी गोध्रा होती. घुघूळ गुजराथमधून जाणाऱ्या येणाऱ्या व्यापाऱ्यांचा माल लुटीत असे. राणा वीरधवलानें सांगतलें असतांहि ऐकेना. उलट त्यानें वीरधवलाकडे काजळाची डबी व लुगडें पाठवून दिलें. त्यामुळें वीरधवलानें तेजपालाला त्याच्यावर सैन्यासह पाठविलें. घुघूळानें जोरानें तोंड दिलें, पण शेवटीं यानें त्याला पकडून वीरधवलाकडे आणिलें. वीरधवलानें काजळाची डबी घुघूळाच्या गळ्यांत बांधली आणि पूर्वी पाठविलेली साडी त्याला नेसविली. तेव्हां लज्जेनें चूर होऊन घुघूळ जीभ चावून मरण पावला.

तेजबहादर—(स. १६६५) शिखांचा नववा गुरु. यांना मुसलमानांनीं अत्यंत हाल करून ठार मारल्यामुळें शिखांत नवचैतन्य निर्माण झालें. बलिदानतिथि वि. सं. १७२२ मार्ग. शु. ५.

तेजसिंह गुहिलोत—(स. १२६१-६५ सुमार) जैत्रसिंहानंतर मेवाडच्या गादीवर हा आला. यानें परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर अशीं बिरुदें धारण केलीं होतीं.

धोलक्याचा राणा वीरधवल बघेल मेल्यानंतर त्याचा धाकटा मुलगा वीसलदेव यास वस्तुपाल मंत्र्यानें गादीवर बसविलें. त्यानें वि. सं. १३०० (स.१२४३-४४)च्या सुमारास त्रिभुवनपालापासून गुजराथचें राज्य घेतलें. त्याच्या वि. सं. १३१७ (स. १२६०-६१) मधील दानपत्रांत मेवाडच्या राजावर स्वारी केल्याचा निर्देश आहे (इंडि. ॲंटि. ६. २१०). चीरव्याच्या शिलालेखांत जैत्रसिंहानें नेमलेल्या चितोडचा तलारक्ष श्रीभिमसिंह प्रधानासह चितोडच्या पायथ्याशीं झालेल्या युद्धांत कामीं आल्याचा निर्देश आहे. तें वीसलदेव व तेजसिंह यांचें युद्ध असावें.

याची राणी जयतल्लदेवीनें चितोडवर शामपार्श्वनाथाचें मंदिर बांधलें. हिचा पुत्र समरसिंह. तेजसिंहाची दुसरी राणी रूपादेवी असावी. हिचा बुडतऱ्याच्या विहिरीवर शिलालेख आहे. ही जालोरचा चाचिकदेव चौहान व लक्ष्मीदेवी यांची मुलगी होती. ही क्षेत्रसिंहाची माता (एपि. इंडि. ४. ३१३-१४).

याच्या वेळीं वि. सं. १३१७ (स. १२६१) माघ शु. ४ ला श्रावक प्रतिक्रमणसूत्रचूर्णि नांवाचें पुस्तक आघाटदुर्ग (आहाड) येथें ताडपत्रावर लिहिलें गेलें. तें आज अनहिलवाडा येथें सुरक्षित आहे. त्यांत याच्या महामात्याचें नांव समुद्धर असें दिलें आहे.

याच्या वेळचे दोन शिलालेख मिळाले आहेत. पहिला चितोडजवळ घाघसा गांवच्या बावडीवर आहे. तो वि. सं. १३२२ (स. १२६५) कार्तिक शु. १ रविवारचा आहे. त्यांत पद्मसिंहापासून तेजसिंहापर्यंत वंशावळ आहे. तसेंच बावडी बांधणाऱ्या डिडू जातीच्या रत्नाच्या पूर्वजांचें वर्णन आहे. ही प्रशस्ति भुवनचंद्राचा शिष्य रत्नप्रभसूरीनें केली आहे. दुसरा शिलालेख गंभीरीनदीच्या पुलावर आहे. त्यांत चैत्रगच्छचे आचार्य रत्नप्रभसूरि यांच्या उपदेशावरून याच्या वेळीं याचा राजपुत्र कांगाच्या पुत्रानें तो बांधिल्याचें लिहिलें आहे (बंगा. ए. सो. ज. ५५. १. ४६-४७).

तेजसिंह हा वि. सं. १३२४-३० (स. १२६६-७३) च्या दरम्यान वारला.

तेन्नालि रामलिंग—(जन्म स. १४६२) तेलगू कवि. जन्मस्थळ तेन्नालि. पिता-रामय्या. माता-लक्ष्मम्मा. यानें आपल्या आश्रयदात्याकरितां वैष्णवपंथ स्वीकारला. तेव्हांपासून याला रामकृष्ण म्हणूं लागले. वैष्णव होण्यापूर्वी यानें लिंगपुराण लिहिलें आहे. हा विजयनगरच्या कृष्णदेवरायापासून वेंकटतुलुवापर्यंत आश्रित होता. त्याच्या आश्रयास असतां यानें पांडुरंगमाहात्म्य नांवाचें रसाळ काव्य लिहिलें आहे. याचा स्वभाव अत्यंत थट्टेखोर होता. त्यासंबंधीं याच्या अनेक आख्यायिका आहेत (क. च.).

तेरु वेल्लुवर—हा प्रख्यात कवयित्री अव्वैयारचा भाऊ. हा उत्तम कवि होता. मैलापूरच्या वेल्लुवर नामक पुरुषानें यास वाढविलें. तेथें हा चांगला विद्वान् झाला. पुढें वयांत आल्यावर मथुरा शहरांत गेला. तेथें वेदशेखर राजाच्या दरबारांतील एकूणपन्नास पंडितांस यानें जिंकले. सनेकर म्हणून मुख्य पंडितसुद्धां याच्यापुढें पराभूत झाला. हा जरी नीच जातीचा होता तरी यास तामीळ विद्वालयांत परवानगी मिळून याचा फार सत्कार झाला. प्रसिद्ध व्याळुवर नामक याच्या ग्रंथांत यानें माणसाच्या आयुष्यातील निरनिराळ्या स्थितींचें वर्णन श्लोकबद्ध केलें आहे. हा ग्रंथ सर्वत्र दक्षिण हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. एलिस साहेबानें याचें इंग्रजींत भाषांतर केलें आहे. वेल्लुवर याने ह्याचें संगोपन केलें म्हणून आपल्या नांवापुढें यानें वेल्लुवर हें नांव जोडलें. यानें नीतिपर कविता पुष्कळ केल्या. हा त्याच्या इतर भावंडांप्रमाणें अविवाहित होता (क. च.).

तैमूरलंग—(जन्म स. १३३६–मृत्यु स. १४०५) हा जातीनें तुर्क होता. याच्या बापाकडे कुश प्रांताचा कारभार होता. कांहीं लोक म्हणतात कीं हा चंगीझखानाचा वंशज होता. याच्या आईचें नांव तकीना खातून. हा धाडसी व तीव्र बुद्धीचा होता. हा २५ व्या वर्षी तुर्कस्थानचा राजा झाला. संकटसमयीं धैर्य खचूं न देतां हातीं घेतलेलें काम पुरें करणें हा याचा मोठा गुण होय. पुढें शत्रूचा पाडाव करून यानें समरकंदचें राज्य मिळविलें. हिंदुस्थानावर स्वारी करून तेथील हिंदु लोकांस बाटवून त्यांचीं देवळें उध्वस्त करण्याचा याचा बेत होता. यानें स. १३९८ त दिल्लीचें बादशाहीपद स्वीकारिलें. हा डिसें. १० ला दिल्लीजवळ आला आणि मार्च १९ ला सिंधुनदी ओलांडून यानें हिंदुस्थानला कायमचा रामराम ठोकला. लुटालूट केली. बगदाद प्रांतांतील बंडाळी मोडण्यासाठीं हा निघून गेला. जातांना यानें लोकांची कत्तल करून अगणित द्रव्य मिळविलें. हा एका लढाईत लंगडा झाल्यामुळें यास लंग हें नांव पडलें. मनुष्यजातीचा शत्रु म्हणून याची प्रसिद्धी आहे. हा जन्मापासून संकटांत वाढलेला असल्यामुळें सोशिक व कावेबाज होता. हिंदुस्थानांत मोंगलबादशाहीस यानें सुरुवात केली. याची टापटीप, व्यवस्था, काम करण्याची शैली उत्तम होती.

तैमूरशाह अब्दाली—हा तिसऱ्या पानिपतच्या युद्धांतील प्रसिद्ध अहमदशाहा अब्दालीचा मुलगा. हाहि बापासारखाच उद्योगी होता. गादीवर येतांच यानें वजीर शहावलीखान यास ठार मारलें. अंत मद्यप्राशनानें विकार होऊन हा ता. १८–५–१७९३ मध्यें मरण पावला. याचा पुत्र जमानशाहा (म. रि. म. ३ पा. २१०).

तैलणसिंह—(२ कीर्तिवर्मा कदंब पाहा).

तैल (तैलप) कदंब—(स. १०५० सुमार) हा बनवासीच्या जयवर्मा कदंबाचा पुत्र. यानें चावुंडलादेवीशीं लग्न केलें आणि तिच्यापासून याला कीर्तिदेव हा पहिला मुलगा झाला.

२. (स. ११४७–११६०) हा बनवासीच्या कदंबांपैकीं दुसऱ्या तैलाचा मुलगा. हा चामलदेवीपासून झाला. याचें तैलण किंवा माउली तैलण असेंहि नांव आढळतें.

तैल (पश्चिम) चालुक्य—हा तिसऱ्या कीर्तिवर्मा पश्चिम चालुक्याचा मुलगा होय. याला विक्रमादित्य ३ रा या नांवाचा एक मुलगा होता.

२. (स. ९७३–९९७) हा चवथ्या विक्रमादित्य (५) चालुक्याचा मुलगा. यानें कक्क राष्ट्रकूटापासून पुनः आपलें राज्य मिळविल्यामुळें पश्चिम चालुक्यांची सत्ता पुनः साधारणतः दोनशें वर्षांनीं स्थापित झाली. यालाहि विक्रमादित्य पदवी होती. तसेंच याला पहिला आहवमल्ल म्हणत. याला कल्याणीच्या शाखेचा पहिला पुरुष असें फ्लीट म्हणतो व याची कारकीर्द स. ९७३–९९७ अशी तो देतो. यानें माळव्याच्या मुंज राजाला ठार मारलें. यानें कक्क राष्ट्रकूटाची मुलगी जाकलदेवी हिच्याशीं लग्न लावलें व कल्याणी येथें पुनः आपलें राज्य स्थापिलें (शके८९६ श्रीमुखनामसंवत्सरें). या वेळीं याच्या हाताखालीं चेदी, चोल, हानगळ, बेळगोळ, कुंतल वगैरे प्रांत होते. हा 'नुर्मदीतैल' अथवा 'त्रैलोक्यमल्ल' या नांवानेंहि संबोधिला जातो.

यानें राष्ट्रकूट दुसरा कक्क किंवा चवथ्या अमोघ वर्षाला जिंकलें आणि रणस्तंभ (रण–कम्भ) यास कैद केलें. नंतर यानें परमार घराण्यांतील मुंज (वाक्-पति-राज २ रा) यास ठार मारलें आणि पश्चिम गंग राजा पंचल-देव याचा जीव घेतला. त्याचप्रमाणें यानें चोलांवरती हल्ले केले. कुंतल देशाचा कांहीं प्रांत जिंकला आणि अशा रीतीनें हा सर्व राष्ट्रकूट राज्याचा गुजराथ खेरीज करून मालक झाला.

स. ९९७ मध्यें याचा मुलगा सत्याश्रय (सत्तिग, इरि–विभुजंग) हा याच्यानंतर गादीवर आला (B.).

३. (स. ११५०–११६२) कल्याणीच्या पश्चिम चालुक्य घराण्यांतील (दुसऱ्या) जगदेकमल्ल चालुक्याचा हा भाऊ होय. स. ११५० मध्यें हा आपल्या भावाच्यानंतर गादीवर आला.

कलचुरी राजा बिज्जल, कदम्ब (गोव्याचे) राजा शिवचित्त पेरमादि, विजय, पांड्य, सिंदव चावुंड २ रा वगैरे राजे याचे प्रतिस्पर्धी होते. कलचुरि राजा बिज्जल यानें याचा बराच प्रांत बळकाविला होता. याचा पराभव काकतीय प्रोल राजानें केला होता. स. ११६२ मध्यें हा मरण पावला. याच्यानंतर याचा मुलगा सोमेश्वर ४ था हा गादीवर आला (B.).

हा प. चालुक्य घराण्यांतील (कल्याणीचे) तिसऱ्या सोमेश्वराचा मुलगा होय. याला त्रैलोक्यमल्ल तिसरा असें म्हणत. याचा सेनापति बिज्जण (बिज्जल) कलचुरी यानें याला स. ११५७ पर्यंत कैदेंत ठेवलें होतें. त्यानें कल्याणी सोडून अण्णेगिरी ही राजधानी केली व स. ११६२ मध्यें कलचुरींची स्वतंत्र सार्वभौम सत्ता स्थापिली.

तोटकाचार्य—आद्य शंकराचार्यांचा शिष्य. यानें लिहिलेले ग्रंथः—१ शंकरदेशिकाष्टक, २ श्रुतिसारसमुद्धरणम् सटीकम् (१७९ श्लोकांचा ग्रंथ).

तोडरमल्ल—(स. १५३५–१५८९) हा अकबर-बादशहाच्या दरबारांतील एक सुप्रसिद्ध दिवाण. कांहींच्या मतें हा टंडण नामक क्षत्रिय कुलांत जन्मला. हा प्रथम अकबर बादशहाच्या दरबारांत एक कारकून म्हणून होता; परंतु आपल्या अंगच्या गुणामुळें हा प्रसिद्धीस आला. याला अकबरानें स. १५६७ मध्यें अयोध्येचा शिकंदरशहावर पाठविलें असतां, यानें त्याचा पूर्ण पराभव केला. ह्या विजयाबद्दल याला अकबरानें दिवाणाची पदवी दिली. हिंदी कवि म्हणून तोडर, संस्कृत लेखक म्हणून टोडर व राजकारणी पुरुष म्हणून तोडरमल्ल अशा निरनिराळ्या नांवांनीं हा संबोधिला जातो. यानें गुजराथमध्यें जमिनीची मापणी करून तिचें वर्गीकरण केलें व जमीनमहसुलाची पद्धत घालून दिली. यानें राज्यांत, मुलकीखात्यांत हिंदी भाषेच्या ऐवजीं फार्सी भाषेचा उपयोग केला. यानें वसुलाची पद्धत घालून दिली तिला ' अस्सल–इ–जमा–इ–तुमारे ' असें नांव आहे.

यास अकबरबादशहानें ' वकील-उस-सलतनत,' आणि ' मुश्रीक-इ-दिवान ' असे दोन मोठे अधिकार दिले. हा कट्टा हिंदुधर्माभिमानी होता. याला धारू नांवाचा एक मुलगा होता. हा वयाचें ५४ व्या वर्षी लाहोर येथें मरण पावला.

हा तोडरानंद ग्रंथाचा कर्ता. टोडरानंद या ग्रंथांत निरनिराळीं प्रकरणें पाडून त्यांत श्राद्ध, व्यवहार, प्रायश्चित्त व विवाह वगैरे गोष्टींची चर्चा केली आहे आणि त्यांनाच श्राद्धसौख्य, व्यवहारसौख्य अशीं शेवटीं 'सौख्य' शब्द जोडून नांवें दिलीं आहेत. यानें ' श्राद्धसौख्य व विवाहसौख्य ' हें ग्रंथ लिहिले. यानें हिंदी भाषेंतहि पुष्कळ कविता केल्या.

तोतारंबी—अप्पय दीक्षितांची ब्राम्हणेतर पत्नी. हिच्या पित्याचें नांव श्रीरंगराजाचार्य. पुत्र-रंगराजाध्वरी.

तोयिमदेव कदंब —(स. १०४० सुमार) हा कदंब घराण्यांतील एक राजा. हा वनवासी व पानुंगळ जिल्ह्यांत राज्य करीत होता.

तोयिंग—एक चिनी यात्रेकरू. हा वीई देशचा राहणारा होता. इसवी सनाच्या पांचव्या शतकांत हा हिंदुस्थानाकडे निघाला होता व गांधारापर्यंत येऊन परत गेला. याचा निर्देश सुंगयुन या चिनी प्रवाशानें शेनशी किंवा सुदान पर्वताच्या वर्णनाच्या वेळीं व पोकीन विहाराच्या वर्णनांत केला आहे. त्यावरून याचा पत्ता लागतो.

तोरमाण—(स. ४९९–५१६) हूण वंशांतील अत्यंत प्रतापी राजा. मध्य आशियामध्यें राहणाऱ्या एका आर्य जातीचें नांव हूण असें आहे. लाहोरच्या अजबखान्यांत याचा एक लेख आहे. त्यांत याला ' महाराजाधिराज, षाही जऊव्ल ' असें म्हटलें आहे (एपिग्राफिका इंडिका भाग ११, पा. २३९). जऊव्ल हें याच्या कुलाचें नांव असावें. महाराजाधिराज हा संस्कृत भाषेंतील किताब आहे. षाही हा मध्य आशियांतील भाषेमधील किताब आहे. कुशानवंशांतील राजांच्या नांवांमागेंहि षाही हा किताब लावलेला आढळतो. यावरून कुशानवंशाचीच हूण ही एक शाखा आहे असें कांहीं विद्वानांचें अनुमान आहे. अल्बेरूनीचें म्हणणेंहि वरील अनुमानाला पोषक असेंच आहे. अल्बेरूनी आपल्या ' तहकीके हिंद ' या ग्रंथांत काबूल-(उदभांडपुर)च्या शाही नांवाच्या हिंदु राजाच्या वर्णनांत लिहितो–शाहीवंशाचा मूळ पुरुष बर्हतकीन नांवाचा होता. याच वंशांत कनिक (कनिष्क) नांवाचा राजा झाला. त्यानें पुरुषावर (पुरुषपुर, पेशावर) येथें एक विहार (बौद्धमठ) बांधला. त्याला लोक कनिकचैत्य म्हणतात. या वंशांत साठ राजे झाले. शेवटला राजा लघुतोरमाण (लघु तोरमाण) त्याला मारून त्याचा वजीर ब्राह्मण (?) कल्लर लल्लिय यानें त्याचें राज्य घेतलें. हा कल्लर लल्लिय ब्राह्मण नसून तंबर रजपूत असावा, असें पं. गौ. हि. ओझा म्हणतात. अल्बेरूनी शाहिवंशी राजांना तुर्क म्हणजे तुर्कस्थानांतील मूळ रहिवाशी मानतो; व त्यांची उत्पत्ति तिबेटांत झाली असें समजतो. भूतानमधील लोक आजहि तिबेटी लोकांना ' हूणिया ' या नांवानें संबोधितात. यावरून कुशान व हूण हे एकच होत. तसेंच मध्य आशियामधून हिंदुस्थानांत आले असले तरी मूळचे तिबेटांतील होत असें दिसतें. हूणांपैकीं तोरमाण हा पंजाबांतून दक्षिणकडे आपल्या राज्याचा विस्तार करीत असतां गुप्तांपैकी कुमारगुप्ताशीं याचें युद्ध झालें. त्यांत कुमारगुप्त मारला गेला. पण कुमारगुप्ताचा पुत्र स्कंदगुप्त यानें मोठ्या शौर्यानें लढून याचा पराजय केला. पण बुधगुप्ताच्या वेळी स. ४९९ च्या नंतर तोरमाणानें गुजराथ, काठेवाड, राजपुताना, माळवा वगैरे जिंकून आपल्या राज्यांत सामील केला. याचें राज्य गांधार, पंजाब व काश्मीर वगैरे भागांवर आधींच होतें. नंतर थोड्याच दिवसांत याचा देहान्त होऊन याचा पुत्र मिहिरकुल (मिहिरगुप्त) गादीवर आला. हा स. ५१० मध्यें मरण पावला.

तोरमाण आणि मिहिरकुल या दोन हूण राजांची माहिती मिळते. याशिवाय आणखीहि हूण राजे पंजाब वगैरे भागांत होऊन गेले असले पाहिजेत. पण त्यांची नीट माहिती मिळत नाहीं. मोघम युद्ध वगैरे झाल्याचे निर्देश आढळतात. स्थानेश्वरचे आणि कनोजचे वैसवंशी राजे प्रभाकरवर्धन व राजवर्धन हूणांशीं लढले होते (एपि.

इं. भा. १, पृ. ६९). तसेंच माळव्याचा परमार राजा [illegible] (सीयक) (एपि. इंडि. भा. १, पृ. २२५), [illegible] (कलचुरि) वंशज राजा कर्ण (एपि. इंडि. भा. २, पृ. ९), परमार राजा सिंधुराज (एपि. इंडि. भा. १, पृ. २२८), राष्ट्रकूट (राठोड) राजा कक्कल (कर्कराज) (इंडि. अँटि. भा. १२, पृ. २६८) यांनीं हूणांशीं युद्ध केल्याची माहिती त्यांच्या शिलालेखांवरून मिळतें. सध्यां [illegible] राज्याचा अवशेष नाहीं. राजपुताना व गुजराथ [illegible] कुणबी लोक हूण जातीचे आहेत असें अनुमान [illegible]. ते उत्तम शेतकरी आहेत हें प्रसिद्ध आहे.

हूण हिंदुस्थानांत येण्यापूर्वी त्यांनीं इराणचा खजिना [illegible], व तो ते इकडे घेऊन आले. त्यामुळें इराणांतील [illegible] वंशांतील राजांचीं नाणीं राजपुताना वगैरे भागांत [illegible] जागीं जमिनींत गाडलेलीं आढळतात. मिहिर-[illegible]नेंहि बहुतेक तशींच आपलीं नाणीं पाडलीं. हूणांचें [illegible] नष्ट झालें तरी विक्रमाच्या बाराव्या शतकापर्यंत [illegible] नाणीं इतर राजांनीं पाडलीं. पण त्यांचा आकार [illegible] होत गेला व त्यांवरील राजाचा चेहरा ओळखूं [illegible] झाला. लोक त्यांवरील आकृतीला गाढवाचा खूर [illegible] त्याला गधिया म्हणूं लागले. वास्तविक त्याचा [illegible] कांहीं संबंध नाहीं. वरील दोन राजांच्या नांवां-[illegible] इतर हूण राजांचीं नांवें व माहिती मिळत नसली [illegible] ते येथें मांडलिक म्हणून नांदत असावेत असें म्हणावें [illegible]. त्यांच्याशीं पुढील लोकांचीं झालेलीं युद्धें, [illegible] यांवरून संबंध दाखवितां येतो, हें वर आलेंच आहे. [illegible]संबंधावरूनहि वरील म्हणण्याला पुष्टि मिळते.

[illegible]च्या गुहिलवंशी राजा अल्लट (स. ९५३) याची [illegible] हरियदेवी हूण वंशांतील होती (इंडि. अँटि. भा. [illegible], पृ. १९१). तसेंच चेदीचा कलचुरी वंशज राजा [illegible]देवाचा पुत्र कर्ण(स. १०४२)चा विवाह हूण-[illegible] आवल्लदेवीशीं झाला होता (एपि. इंडि. भा. २, [illegible].). कुमारपालप्रबंध व भाटांचीं पुस्तकें यांत हूणांची [illegible] ३६ वंशांत केली आहे.

[illegible] हरिगुप्त नांवाचा एक जैन आचार्य गुरु होता. [illegible]नें जैनधर्माचा फैलाव याच्या राज्यांत केला. यानें [illegible] गुरु केला होता त्याअर्थी हा जैनधर्म स्वीकारलेला [illegible] जैनांबद्दल सहानुभूति बाळगणारा असला पाहिजे. [illegible] ५१६ मध्यें मरण पावला. हें नांव तोहराय असेंहि [illegible] (जैनिझम इन नॉर्थ इंडिया).

[illegible] कमलुक लल्लीयपुत्र (रा. त. ५. २३३).

तोरराय—(तोरमाण पाहा).

तोष—एक हिंदी कवि. तोषनिधि असें याचें नांव आहे. हा चतुर्भुज शुक्लाचा पुत्र. हा अलाहाबाद जिल्ह्यांतील सिंगरौर येथील राहणारा. यानें नायिकाभेदावर 'सुधानिधि' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे (स. १७३३). विनयशतक व नखशिख असेंहि याचे ग्रंथ ऐकूं येतात.

तोषनिधि—(तोष पाहा).

तोंडमाण इळनीरयन—नेडूचा पुत्र. हा त्याला एका नागकन्येपासून झाला होता. हा पुढें कांचीचा प्रसिद्ध सम्राट् झाला. याची प्रशस्ति पेरुंबाणारीप्पदाई काव्यांत वर्णिलेली आहे. याच्या वेळीं कावेरापट्टन व उरैयूर राजधान्या समुद्राच्या वादीनें वाहून गेल्या. शेंणुत्तुवन चेर राजानें याच्यावर स्वारी करून याचा पराभव केला व याचें बहुतेक राज्य कावीज केलें. पुढें पांड्य व पल्लव यांचें प्राबल्य वाढल्यानें चोल घराणें हतप्रभ झालें. याची हकीगत आढळत नाहीं.

तौत—हा काश्मीरी पंडित अभिनवगुप्ताचा अलंकार-शास्त्रांतील गुरु होता. काव्यकौतुक वगैरे याचे ग्रंथ आहेत. "इति तौताः" असें म्हणून कुमारिलभट्टसांप्रदायाच्या मताचा निर्देश करण्याची पद्धति आहे. तुतातिक म्हणून कुमारिलाचा निर्देश श्रीकंठचरित्रांत आढळतो (२५. ६५-६६).

तौतुक—इंदुराज कवीचा आजा.

तौसनी—एक कवि. मनोहरदासाचें हें कवितेंतील नांव आहे. हा हिंदु होता तरी यास मुहम्मद मनोहर किंवा मींझा मनोहर असें म्हणत. याचा पिता लोणकरण (मिठाचा व्यापारी). हा सांबरचा राजा होता. हा अकबराच्या वेळीं होता.

त्यागवल्ली—कुलोत्तुंग चोलाची तिसरी पत्नी व पट्टराणी. हिला लोकमहादेवी मधुरान्तकी असेंहि म्हणत असत.

त्रिअंपारा—(स. १६०५ चा सुमार) कोचीनचा राजा. यानें पोर्तुगीज लोकांस प्रथम आश्रय दिला; व त्यांच्या आश्रयानें कालिकतच्या झामोरिनचा पराजय केला.

त्रिकमदास—(स. १७३४) गुजराथी कवि. नागर ब्राह्मण. रुक्मिणीविवाह व डाकोरनाथ या विषयांवर यानें बरीचशी काव्यरचना केली.

त्रिनयन पल्लव—(सहावें शतक) करिकाला-चोलाचा समकालीन. यानें कांची सुवर्णानें मढविली.

त्रिनेत्र कदंब—(चंद्रगड पाहा).

त्रिपुरारि साहिनी—(स. १२७२-७३) हा म्हैसूरच्या कायस्थ घराण्यापैकीं जक्कीगदेवाचा मुलगा. याचा धाकटा अंबदेव.

त्रिभुवनपाल सोळंकी—अनहिलवाडच्या सिद्धराज जयसिंहाचा चुलतभाऊ. याचाच मुलगा कुमारपाल हा सिद्धराजानंतर राजा झाला.

२. हा अनहिलवाडच्या दुसऱ्या भीमदेव सोळंकीचा पुत्र. यानें दोन वर्षे राज्य केलें. हा दुर्बल असल्यानें वीसलदेव वाघेलानें याचें राज्य स.१२४३मध्यें घेतलें. यानें मेवाडच्या जैत्रसिंह राजाबरोबर कोट्टडबु (कोटडा)च्या जवळ लढाई केली (ना. प्र. प. ३, पृ. २ टिपण).

त्रिभुवनमल्ल कदंब—हा गोव्यांतील कदंबांपैकीं तिसऱ्या जयकेशिन् कदंबाचा मुलगा. याची पत्नी माणिक्यदेवी व पुत्र शिवचित्तदेव.

त्रिभुवनमल्ल चालुक्य—पश्चिम चालुक्यांपैकीं विभुविक्रमाचें नामान्तर.

त्रिभुवनमल्ल होयसल—(विनयादित्य होयसल पाहा).

२. (बिट्टिदेव होयसल पाहा).

त्रिभुवन वीरदेव चोल—हा चोलांपैकीं तिसऱ्या राजेन्द्राचा पुत्र. हा शेवटचा चोल राजा होय. यानें स. १३३२ पर्यंत राज्य केलें.

त्रिम्मप्पा—याला वय्याम्बा या बायकोपासून सेव्वाप्पा हा मुलगा झाला. हा तंजावरचा राजा होता. याचें तिम्म असें नांव आहे.

त्रिलोचनपाल चालुक्य—हा लाट देशांतील चालुक्य घराण्यांतील राजा. हा स. १०५१ मध्यें हयात होता.

त्रिलोचनपाल प्रतिहार—रघुवंशी प्रतिहारांपैकीं राज्यपालाचा उत्तराधिकारी. याच्या वेळचें एक दानपत्र मिळालें आहे तें वि. सं. १०८४ (स. १०२७) मधील आहे (इंडि. अँटि. भा. २, पृ. २३७).

त्रिलोचनपाल शाही—(स. १००९-२१) पंजाबांतील शाही घराण्यांपैकीं जयपालाचा दुसरा मुलगा. स. १००९ मध्ये गादीवर आला. यानें गझनीच्या महमूदाविरुद्ध लढण्याकरितां काश्मीरच्या संग्रामराज लोहरची मदत मागितली, त्याप्रमाणें त्यानें तुंग नांवाचा आपला प्रधान मदतीस पाठविला. पण त्यानें गनिमी कावा सोडून तुर्कांना उघड तोंड दिल्यामुळें पराजय पावून यास पळून जावें लागलें; आणि गांधार मुसलमान झाल्यामुळें शाही घराण्याचें नांवहि नष्ट झालें. रुद्रपाल वगैरे याचे मुलगे काश्मीरच्या राजाच्या आश्रयास होते, असें राजतरंगिणीवरून दिसतें (म. यु. भा. १, २. ६७).

इलियटनें तर्क केल्याप्रमाणें तौशीच्या लढाईत काश्मीरच्या सरहद्दीवर पराभव झाल्यानंतर त्रिलोचनपाल हा कनोजचा राजा राज्यपाल याच्या आश्रयास येणें शक्य आहे. अल्बेरुनीनें त्रिलोचनपाल स. १०२१ (हि. ४१२) मध्यें मरण पावला, असें म्हटलें आहे. राहिब नदीवरील लढाई त्या साली झाली असावी आणि त्रिलोचनपाल हा त्या लढाईत शौर्यानें लढून पडला असावा (मध्ययुगीन भारत ३. ११९).

त्रिलोचनपाल सोळंकी—हा लाट देशच्या सोळंकीवंशांपैकीं वत्सराजाचा पुत्र. याचें एक ताम्रपत्र शा. श. ९७२ (स. १०५१) पौष कृष्ण अमावास्येचें मिळालें आहे.

त्रिविक्रम—नलचंपू व मदालसाचंपू यांचा कर्ता.

त्रिशला—(महावीर पाहा).

त्रिंबक अनंत ऊर्फ दादा नाईक भिडे—(मृ. स. १८५२) एक मराठी कवि. हा चित्पावन नित्युंदिन गोत्री ब्राह्मण. याचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील गणपतीचे पुळें होय. हा प्रथम पुणें येथें व नंतर ग्वालेर येथें राहूं लागला. याला स्वप्नांत दीक्षा मिळाल्यामुळें हा एकनाथास गुरु मानूं लागला. याचीं कांहीं पदें प्रसिद्ध आहेत. त्यांवरून हा एक सरस कवि दिसतो. हा पंढरपुरास मरण पावला.

त्रिंबकजी गव्हाणे—पहिल्या रघूजी भोसल्याचा प्रमुख सरदार.

त्रिंबकजी डेंगळे—(मृत्यु स. १८२९) हा दुसऱ्या बाजीरावाच्या पदरीं हेर म्हणून होता. पुढें यास बाजीरावानें खूष होऊन खास तैनातींतील जागा दिली. हा इंग्रज-द्वेष्टा व मराठी राज्य बांचविण्यासाठीं धडपडणारा पुरुष होता. ह्यास एकंदर १२ बायका होत्या. त्रिंबकजी ठाण्याहून इंग्रजांच्या कैदेंतून निसटला व याने बंड केलें. तेव्हां इंग्रजानें यास पकडून देणारास दोन लक्षांचें बक्षीस व हजाराचें गांव इनाम देऊं केलें. ह्याचे मूळ ठिकाण संगमनेर तालुक्यांत निंबगांव जाळी हें असून तेथें अद्यापि ह्याचा वंश नांदत आहे. ह्यास गणपतराव नांवाचा एकच मुलगा होता. शेवटीं हा ता.१६ आक्टोबर १८२९ रोजी सकाळीं ८ वाजतां चुनारगड किल्ल्यांत इंग्रजांच्या कैदेंतच मृत्यु पावला. त्रिंबकजी हा लहानसा, ठेंगू व चिडखोर गृहस्थ होता (गो. स. सरदेसायांची माहिती; गंगाधरशास्त्री पटवर्धन पाहा).

त्रिंबकजीच्या साथीदारांचा उल्लेख पुढीलप्रमाणें आहे: १ बापु गायकवाड सेटफलकर, २ भोगाजी, ३ रविराव

शिंदे केणीकर, ४ तिमापा वोतुरी, ५ माहादजीपंत नातेपोतेकर, ६ गोधाजी डेंगळे, ७ सयाजी मुळे, ८ आप्पाजी कुरवाबीकर, ९ निंबाजी जाधव फलटणकर, १० महिपतराव डेंगळा, ११ बापु बरडकर, १२ दाजी उधले (मं. अहवाल श. १७३४).

त्रिंबक भास्कर—हा शिवाजीमहाराजांचा पुरंदर किल्ल्यावरील सुभेदार होता. शिवाजीनें तासकरी नेमण्याकरितां याच्याकडे दोन ब्राह्मण पाठविले व त्यांना दरमहा तीस लारी (एक नाणें) देण्याविषयीं दंडवतपूर्वक लिहिलें आहे (स. १६७० एप्रिल १३; श. १५९२ वैशाख शु.४) असें प. सा. सं. १३०३ वरून दिसतें. सिद्दी जोहारानें पन्हाळ्यास वेढा दिला असतां नेताजी पालकरानें पन्हाळ्यांत मदत पोंचविण्याचा प्रयत्न केला. तो फसला तेव्हां याला तेथील मुख्य सेनापति नेमून याच्यावर लढण्याची जबाबदारी सोंपविली व शिवाजीमहाराज खुबीनें निघून गेले (शि. भा. २६. ५४–५५). पुढें पन्हाळा यानें शिवाजीच्या आज्ञेनें त्याच्या ताब्यांत दिला आणि त्याला मेटून त्याशीं मैत्री जोडण्याचा प्रयत्न केला (शि. भा. १८. ५७). नंतर हा राजगडास निघून आला. पुढें यानें शृंगारपुरच्या स्वारींत चांगला पराक्रम केला (श. १५८३ वैशा.). म्हणून याला प्रभावली प्रांताचा अधिकारी नेमलें. हा कुशल योद्धा होता (शि. भा. ३२. २).

त्रिंबकराव अमृतराव कदम (बांडे)—याची मुलगी पहिले सयाजीराव गायकवाड यांस दिली होती.

त्रिंबकराव दाभाडे—(मृत्यु स.१७२९ एप्रिल १) हा सेनापति खंडेराव दाभाड्यांचा मुलगा. स. १७२९ त सरबुलंदखानाकडून मराठ्यांस गुजराथची चौथाई व सरदेशमुखी मिळाली. त्याचा मोकासा दाभाड्यास दिला. पुढें बाजीरावानें त्याच्या प्रांतांत ढवळाढवळ केल्यामुळें व शाहूचें त्याजविषयींचें मन, निजामास सामील आहे म्हणून, कलुषित केल्यामुळें बाजीरावाशीं त्याचें वितुष्ट आलें. शेवटीं डभईस ह्या दोघांची लढाई होऊन तींत त्रिंबकराव मारला गेला. स.१७५० त नानासाहेबानें गायकवाडाशीं संगनमत करून गुजराथ बांटून घेतला व दाभाड्यास निर्माल्यवत् केलें (वि. वि. ज्ञा. वि. व. ६२ अं. ११ पृ. ४२४–२५). त्रिंबकरावाचा मृत्यु हा पेशव्यांच्यावरील एक कलंक आहे. या बाबतींत पुढील उतारे पाहावेत. " लढाई शिकस्त झाली नंतर भावशिंगराव टोके याचे बारगिरानें दगा करून जोडगोळ्या मारिल्या त्या मस्तकी राहिल्या. त्यायोगें मृत्यु रणीं हत्तीवर पावले " (रा. खं. ३.१६६). मानाजी जाधव लिहितात " चिमाजी आपा म्हणतात त्रिंबकराव दाभाडे मारला. महाराजानी काय केलें " (पे. द. १७. ३०).

२. (मृत्यु स. १७६६) हा दाभाड्यांचे घराण्यांतील यशवंतरावाचा मुलगा. हा पेशव्यावर व गायकवाडावर रुष्ट होऊन औरंगाबाद येथें निजामाच्या आश्रयास जाऊन राहिला. त्यावरून याचीं वतनें व इनाम पेशव्यांनीं जप्त केलें. पुढें राक्षसभुवनावर निजामाचा पाडाव झाला. तेव्हां दाभाड्यांचीं वतनें व सेनाखासखेली पेशव्यांनीं दमाजी गायकवाडास दिली; आणि दाभाड्यांच्या कुटुंबाचा परामर्षाह गायकवाडांनीं करावा असें ठरलें (ता. २४–९ १७६३). यावरून हा जास्तच रुष्ट होऊन मुलखांत धामधूम करूं लागला; आणि पुढें वैताग करून औरंगाबादेजवळ घृष्णेश्वराचे मंदिरांत जाऊन राहिला. तेथेंच हा स. १७६६ त मरण पावला.

त्रिंबकराव पटवर्धन—(स. १७३६–७२) कुरुंदवाडच्या गादीचे संस्थापक. हरभटांचे तिसरे पुत्र. प्रथम कापशीकर राणोजी घोरपड्यांकडून कुरुंदवाडगांव यांचेकडे कर्जात आला.

२. (स. १८००) कुरुंदवाडपैकीं रघुनाथरावाचा मुलगा.

त्रिंबकराव (मामा) पेठे—(मृत्यु स.१७७४ एप्रिल) हा विसाजी कृष्ण पेठे यांचा मुलगा. बाळाजी विश्वनाथाचा जांवई व्यंकटराव घोरपडे याची मुलगी वेणूताई त्रिंबकरावास दिली होती. शाहुछत्रपतीच्या मृत्यूनंतर पेशव्यांच्या कारभारांत हा त्यांचा मुख्य हस्तक होता. याची बहीण रखमाबाई चिमाजीआप्पास दिली होती. मामांचे वडील नागपूरकरांच्या पदरीं होते.

माधवराव व रघुनाथराव यांच्या भांडणांत मामा माधवरावाचे बाजूस होते. दादाचे पक्षास मिळून सखारामबापू कारभार नीट करीना तेव्हां माधवरावानें तो त्याजवळून काढून त्रिंबकराव मामास दिला (ता. १२.२. १७५१). पण तो यास कांहीं महिनेहि संभाळतां आला नाहीं.

कर्नाटकांतील हैदरवरील स्वारींत माधवरावानें याकडे मुख्य कारभार सोंपविला होता (१७७०–७२ जून). त्याच्या दोन वर्षांच्या कारभारांत रणशौर्याचे, धाडसाचे, व अनेक अणीबाणीचे प्रसंग उद्भवले. हा अनुभवी व राज्यहिताविषयीं अत्यंत दक्ष होता. परंतु याचा स्वभाव तुसडा असल्यामुळें लोक याजवर नाराज असत. गोड बोलून सर्वांवर छाप बसविण्याची कला यास नव्हती. 'गुरुमकोंडा सर केल्यापासून लवकरच गर्व होऊन मनुष्य तृणप्राय

समजतात. हरभरी झाले आहेत. कोणी माणूस खातेरत येत नाहीं' असें याजबद्दल वर्णन आहे. परंतु माधवरावाचें मत याजविषयीं चांगलें होतें. 'मामांनीं फार संभाळिलें. याच्या एक दोन गोष्टी फार चांगल्या आहेत. पुढेंहि काम यांवरच आहे.' असें माधवराव लिहितो. दोन वर्षे शिकस्त करून मामानें माधवरावाचे संकल्प पूर्ण करून मरणसमयीं त्याचें मन निश्चित केलें.

दादासाहेबांच्या कारकीर्दीत बारभाईच्या कारस्थानांत मामा प्रमुख होते. हेच त्या वेळीं सेनापति होते. मामाला भोसल्यावर दादानें पाठविलें होतें. हे तिकडे न जातां दादावर स्वारी करण्याची वाट पाहत बसले (स. १७७४ डिसेंबर). पुढें कारभाऱ्यांनीं भोसले, फडके व मामा यांना दादावर पाठवलें. त्यांची गांठ पंढरपुराजवळ कासेगांव येथें पडली. मामानें घाई व उतावीळ करून दादावर हल्ला केला. त्यांत मामा फार जखमी होऊन पाडाव झाला (२६ मार्च १७७४). पुढें ८ वे दिवशीं जखमा असाध्य होऊन खडकतचे मुक्कामीं मामा मरण पावले. आनंदीबाईनें पकडल्यावर याची फार निंदा केली. तेव्हांचें मामांचें सडेतोड उत्तर प्रसिद्ध आहे. मामांचा मुलगा विश्वासराव हा पुढें पेठयांच्या पथकाचा मुख्य झाला.

त्रिंबकराव रेटरेकर—हा भिमराव रेटरेकराचा वंशज असून नेहमीं दुसऱ्या बाजीरावाबरोबर असे. बाळाजीपंत नातूंनीं यांना पुष्कळ आमिष दाखविलें, परंतु हा इंग्रजांना मिळाला नाहीं. पेशवाई बुडाल्यानंतर याची जहागिरी गेली, परंतु याचीं बाणेदार वर्तणूक लक्षांत घेऊन एल्फिन्स्टनसाहेबांनीं याला कांहीं गांवांची जहागीर देऊन त्यास तिसऱ्या प्रतीचे सरदार केलें (इ. सं. १.११ जु. ऐ. गो. २३).

त्रिंबक विनायक—(स. १७७४ सुमार) पेशव्यांचा प्रमुख सरदार. कोकणचा कारभार पाही. साष्टीवर इंग्रजांशीं लढण्यास गेला.

त्रिंबक रघुनाथ हणमन्ते—हा रघुनाथराव हणमंत्यांचा पुत्र. यानें 'आशौचनिर्णय' नांवाचा ग्रंथ संस्कृतभाषेंत लिहिला. तो त्र्यंबकी नांवानें लोकांत प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ संभाजीच्या कारकीर्दीत लिहिला असावा (मं. वार्षिक वृत्त १८३६, क्र. १५).

त्रिंबक सोनदेव डबीर—हा सोनोपंत डबीराचा मुलगा. हा शिवाजीबरोबर आग्र्यास गेला होता. शिवाजी तेथून आल्यानंतर त्याच्या मागून याची सुटका झाली (स. ३. ४. १६६९). याचा पुत्र रामचंद्र हा राज्याभिषेकाच्या वेळीं शिवाजीचा सुमंत होता. हा शिवाजीच्या अत्यंत विश्वासांतला होता. सोनोपंताची स. १६६५ सालीं तुला झाली आणि याचा मुलगा रामचंद्र हा राज्याभिषेकाच्या वेळीं सुमंत होता. यावरून याच्या राज्यकारभारांतील कारकीर्दीची कल्पना येते.

त्रिंबकशास्त्री—(मृत्यु स. १८२२) भाष्यभानुप्रभा ग्रंथाचा कर्ता.

त्रिंबक सदाशिव ओढेकर—यानें राक्षसभुवनच्या लढाईत चांगला पराक्रम गाजविला. हे मूळच्या चांदवड जवळच्या रोहडयाचें राहणारे.

त्रिंबक सदाशिव (नाना) पुरंदरे—हा बहुधा सातारचे कारभारावर असून स. १७६४ त माधवरावाचे स्वारीबरोबर कर्नाटकांत गेला होता. हा अंबाजी पुरंदऱ्याचा पुतण्या होता. हा साताऱ्यास राहून पेशव्यांची चांगली कामगिरी बजावीत असे. हा नेहमीं स्वारीवर जात असे (म. रि. म. ४ पा. १६७; म. रि. म. २ पा. २५६).

त्र्यंबकराज—(ग्रंथकाल स. १५७२-१५८०) हे सिद्धेश्वर संप्रदायाचे मूळपुरुष होते. हे एकनाथाच्या कालीं होऊन गेले. यांच्या बालबोध ग्रंथास बालावबोध असेंहि नांव आहे. कृष्णदेव-भैरव-त्र्यंबकराज असा यांचा वंशक्रम आहे. हे देवीचे उपासक असत. यांनीं सप्तशृंगीच्या डोंगरावर जाऊन देवीस प्रसन्न करून घेतल्यावर श्रीसिद्धेश्वर यांनीं यास पंचवचनात्मक उपदेश केला. या पांच वचनांच्या आधारें यानें बालबोध किंवा बालावबोध नांवाचा ग्रंथ रचला. हा ग्रंथ लिहिण्यास शके १४९४ मध्यें प्रारंभ करून तो शके १५०२ मध्यें संपविला. हाच ग्रंथ या त्र्यंबकराजापासून सातवा पुरुष बापजी पंडित यानें निरंजनमाधवास शिकवला. या ग्रंथाची निरंजनमाधवानें शके १७८४ मध्यें केलेली प्रत रा. ल. रा. पांगारकर यांस मिळाली आहे. या ग्रंथाचें तीन खंड असून ओवीसंख्या ५२४० आहे. यांत ४५ कथनें आहेत. हा ग्रंथ मोठा प्रौढ असून त्यांत वेदान्तादि शास्त्रांचा फार खुलासा केला आहे. शिवपूर्वकालीन लोकस्थितीचें ज्ञान होण्यास हा ग्रंथ उपयुक्त आहे (म. क. च. १ पा. ३२७ टीप). हल्लीं प्रसिद्ध असलेला त्र्यंबकी हा वैद्यशास्त्रावरील व धर्मशास्त्रावरील ग्रंथ याचाच असावा.

थ

थगनपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एकोणिसावा सिद्ध. जात शूद्र. हा शांतिप्पाचा गुरु. ग्रंथ-दोषकोष-तत्त्वदीपिका (तं. ४८।६).

थानकवि—(ग्रंथकाल स. १७९०) हिंदी कवि. याचें नांव थानराय निहाळराय. यानें 'दलेलप्रकाश' नांवाचा रीतिग्रंथ (बसवाडा) राजा दलेलासहाच्या नांवानें लिहिला.

थिवेनाट—(स. १६६६) युरोपियन प्रवासी. हिंदुस्थानांत आला होता. यानें औरंगजेबाचा जुलूम वर्णिला आहे.

थॉमस स्टीफन—(स. १५४९-१६१९) मराठी ख्रिस्तपुराणाचा कर्ता.

थोटेपंत—(परशुराम भवानराव पाहा).

द

दत्त—याच्या कविता चांगल्या आहेत. त्यांत साळोत्रावर कांहीं श्लोक, श्लोकबद्ध चिलयाचरित्र व कांहीं शृंगारिक श्लोक आहेत (मं. त्रै. ४. २ ले. ४४).

२. पद, अभंग करणारा मराठी कवि (मं. वा. इ. श. १८३७ ले. १२५).

३. (कवीचा काळ स. १७७२ सुमार) एक हिंदी कवि. हा माढी येथील ब्राह्मण असून चरखारीच्या खुमानसिंह राजाच्या दरबारीं होता. यानें 'लालित्यलता' नांवाचें एक अलंकारयुक्त पुस्तक लिहिलें आहे. त्यांत अनेक कवींचा उल्लेख आहे.

दत्त उपाध्याय—(स. १२७५-१३१० सुमार) धर्मशास्त्रावरील संस्कृत ग्रंथकार.

याचा 'आचारादर्श' हा ग्रंथ बनारस व मुंबई येथें प्रसिद्ध झालेला आहे. छन्दोगाह्निक, पितृभक्ति, शुद्धिनिर्णय, श्राद्धकल्प, समयप्रदीप, व्रतसार, वगैरे ग्रंथ यानें लिहिले. 'छन्दोगाह्निक' हा ग्रंथ सामवेदीय लोकांकरितां लिहिला आहे. यामध्यें दररोजच्या कर्तव्यकर्माविषयीं माहिती दिलेली आहे. 'पितृभक्ति' हा ग्रंथ यजुर्वेदीय लोकांकरितां लिहिला आहे. या ग्रंथांतील उतारे रुद्रधरानें वारंवार घेतलेले आहेत. 'श्राद्धकल्प' हा ग्रंथ त्यानें सामवेदीय लोकांकरितां लिहिला आहे. गोविंदनंदनानें आपल्या श्राद्धक्रियाकौमुदीमध्यें याच्या ग्रंथांतून वारंवार उतारे घेतलेले आहेत.

दत्तदेवी—गुप्तवंशांतील समुद्रगुप्ताची पत्नी. हिचा पुत्र दुसरा चंद्रगुप्त.

दत्तभाऊ ऊर्फ दत्तनाथ—(जन्म स. १७१३ मृत्यु स. १८४९) मराठी कवि. हा राक्षसभुवनचा राहणारा. याच्या बापाचें नांव नारायण असून हा माध्यंदिन शाखेचा यजुर्वेदी ब्राह्मण. याचें गोत्र भारद्वाज. याच्या आईचें नांव लक्ष्मीबाई होतें. याच्या गुरूचें नांव अनंतनाथ. यानें योगविद्येंत बरेंच प्राविण्य मिळविलें होतें. हा महादजी शिंद्याबरोबर पाथरगडच्या लढाईत हजर होता. पुढें यानें उज्जयिनी येथें एक मठ स्थापन केला. याच्या मठाच्या खर्चाकरितां ४०० रु. चें वार्षिक उत्पन्न हल्लीं शिंद्यांच्या राज्यांतून चालू आहे. याला ज्योतिषहि समजत असल्यामुळें, हा महादजीस मोहिमेवर जातांना भविष्य सांगत असे. याचे गुरु समाधिस्थ झाल्यावर, यानें तीर्थाटन करण्यास सुरुवात केली. हा शेवटीं वयाच्या १३६ व्या वर्षी शके १७७१ त मरण पावला (म. क. च. भा. ६ पा. २२३-३५).

दत्तमिश्र—(सनाचें चौदावें शतक) हा नेपाळचा राजा देवसिंहाच्या कारकीर्दीत होऊन गेला. याच्या बापाचें नांव नागेश्वर मित्र असें होतें. यानें 'एकाग्निदानपद्धति' नांवाचा ग्रंथ लिहिला. यानें शिवाय आणखी एक दोन ग्रंथ लिहिले असावेत असें वाटतें.

दत्ताजी त्रिमल—हा शिवाजीमहाराजांबरोबर आग्र्यास गेला होता. हा त्यांच्या विश्वासांतील एक अधिकारी. हा प्रथम पागेकडे होता. हा मोहिमांवरहि जात असे. रोज जी कांहीं हकीगत खास शिवाजीविषयीं घडून येई ती लिहून ठेवण्याचें व खाजगी खात्यावर देखरेख

करण्याचें काम याच्याकडे होतें. यानें समर्थांचा गुरूपदेश घेतला होता (रा. खं. ६; हणमंतस्वामीची बखर). हा मांत्रपदावर शाहूच्या आगमनापर्यंत होता. शिवाजी जेव्हां हैदराबादला गेला त्या वेळीं त्याच्याबरोबर हा गेला होता.

दत्ताजी शिवदेव सोमण (राजाज्ञा)—(मृत्यु स. १७३१) स. १७०८ मध्यें शाहून याला मुतालिक नेमलें व पुढें राजाज्ञा केलें (म. रि. म. १ पृ. १०३).

दत्ताजी शिंदे—(मृत्यु स. १७६० जानेवारी १०) पानिपतच्या ज्या पहिल्या लढाया झाल्या त्यांतील हा एक प्रमुख वीर होय. हा राणोजी शिंद्यांचा मुलगा. यानें लाहोरचा बंदोबस्त केल्यावर मराठ्यांचें वर्चस्व दिल्लीत कायमचें बसणार असें नजीबखानास वाटून त्यानें दत्ताजीस गंगेवर पूल बांधण्याचें आमिष दाखविलें व दुसरीकडे अहमदशाह अब्दालीस हिंदुस्थानांत येण्याची निकड लाविली. नजीबखानानें ह्याच्या मदतीनें सुजावर स्वारी करण्याचें ठरविलें. तेव्हां जनकोजीला हें आवडलें नाहीं. परंतु गोविंदपंत बुंदेल्यानें मात्र दुजोरा दिला. शेवटीं हा स्वस्थ आहे असें पाहून नजीबानें मुसलमानांची जुट केली व नोव्हेंबरांत अब्दालीस दत्ताजीवर आणून ह्यास कैचींत पकडलें, तेव्हां नजीबाचें कपट ध्यानांत येऊन ह्या दोघांची लढाई शुक्रतालच्या पुलावर सुरू झाली. प्रथम शिवाजी शिंदे व त्याचा मुलगा हणमंतराव पडला. नंतर अब्दाली कुरुक्षेत्रावर आला. तेव्हां २२ डिसेंबरला अब्दालीशीं याची झटापट सुरू झाली. ह्याला त्या वेळेस जयपुरास निघून जातां आलें असतें, पण ह्यास तें भ्याडपणाचें वाटलें. यानें पाठविलेल्या भोईटे, बुंदेले व अंताजीपंत यांना अब्दालीनें उलट खाऊन यमुनेच्या अडचणींत लोटलें व त्यांचें सैन्य कापून काढलें. या भयंकर कत्तलीमुळें याचें देहभान सुटलें आणि पुढील लढाईचा प्रसंग अवेळीं उद्भवला. शुक्रतालवर अब्दाली, अहंमदखान बंगश, सुजा व नजीबखान एकत्र झाले. परंतु मल्हारबा जयपूरच्या हद्दींत होता, व ऐनवेळींहि तो ह्यास येऊन मिळाला नाहीं. भागीरथीबाईनें यास युद्धापासून निवृत्त करण्याचा किंवा दमानें घेण्याचा सल्ला पुष्कळांकरवीं देऊन पाहिला, पण उपयोग झाला नाहीं. यमुनेवर १०-१-१७६० रोजीं तीन घटका दिवस आला तेव्हां संक्रांतीचा तिळगूळ वांटून यानें अब्दालीवर चाल केली, व शेवटीं बदाऊच्या घाटावर घनघोर संग्राम झाला.त्यांत ह्यास बरगडींत गोळी लागून हा ठार झाला. हा मरतांना कुत्बशाहानें विचारलें कीं, ' पटेल लढेंगे क्या ' तेव्हां यानें उत्तर दिलें ' बचेंगे तो और भी लढेंगे ' ह्या आख्यायिकेवरून ह्याच्या शूरत्वाची कल्पना येईल. ह्या लढाईंत सातआठ हजार मनुष्य जाया झालें. ह्याचा नोकर राजाराम चोपदार यानें यमुनेच्या कांठीं दत्ताजीचें शव दहन केलें. पानपतच्या प्रचंड संहारानें दत्ताजीचें हें अचाट कृत्य लोपून गेलें आहे. गनिमी कावा सोडला व जनानखाना बरोबर बाळगला, ह्यामुळें हा शत्रूच्या तडाख्यांत जाऊन पडला. पहिल्या लढाईस शुक्रतालची लढाई व दुसऱ्या दोन्ही लढायांस बदाऊच्या घाटावरील लढाई असें म्हणतात.

दत्तात्रय गोसावी—हे समर्थ रामदासांचे शिष्य व कल्याणस्वामींचे बंधु. यांचा मठ सातारा जिल्ह्यांत शिरगांवीं होता.

दत्तात्रयभट्ट—पद्यरूपानें मराठी भाषेंत अमृतार्णव नामक ग्रंथाचा कर्ता.

दत्तोपाध्याय—हा काश्मीराकडील कवि. समयप्रदीप नांवाच्या संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

दबीर—(स. १७८१-१८५३) एक ऊर्दू कवि. याच्या बापाचें नांव गुलामहुसेन. हा मीरजमीरचा शिष्य. हा अनीस कवीचा समकालीन होता. हा अंध झाला असतां, याचे डोळे दुरुस्त झाले (क. कौ. भा. ४).

दमाजी गायकवाड—(मृ. स. १७२०) हा गायकवाड घराण्याचा मूळ पुरुष होय. याचें राहण्याचें गांव पुणें जिल्ह्यांत धावडी हें असून हा दाभाड्याच्या सैन्यांतील एक सरदार होता. स. १७२० त बाळापूर येथें झालेल्या लढाईंत विशेष पराक्रम केल्यामुळें यास शाहूमहाराजांनीं ' समशेरबहादर ' ही पदवी बहाल केली. त्याचप्रमाणें सेनापतीच्या मुतालिकीच्या कामावर याची नेमणूक केली.

२. (मृत्यु स. १८-८-१७६८) पिलाजीच्या मरणानंतर यानें जोधपूरपर्यंत स्वाऱ्या केल्या. यानें कंठाजी कदम यास गुजराथ सोडावयास लाविलें. यानें अबदुल अझीझ व फकीरउद्दौला हे गुजराथचे सुभेदार म्हणून आले असतांना त्यांचा पराभव केला. कारण मोमीनखान सुभेदार असतांना यास आपले हक्क गाजवतां येत होते. रघूजी भोंसले व बाळाजी बाजीराव यांच्या तडजोडीमध्यें दमाजीनें माळव्याच्या वसुलीचा हिशेब द्यावा असें ठरलें. पुढें हा ताराबाईस मिळून स.१७५१ त नींब येथें पेशव्यांविरुद्ध लढून त्यांचा पराभव केला, तेव्हां नानासाहेबांनीं अचानक हल्ला करून ह्याचा पराभव केला; व यास पुण्यास आणून ठेविलें, व पुढें सोडून दिलें. पानपतच्या लढाईंत हा भाऊसाहेबास मिळाला. तांदुळज्याच्या

लढाईत हा हजर होता. हा मूळ दाभाड्याचा हस्तक असल्यामुळें दाभाडे व पेशवे यांच्या वादांत ह्याची स्थिति कांही दिवस मोठी चमत्कारिक झाली होती.

दमाजी थोरात—(स. १७१०–१८) शाहूच्या कैदेस हा एक बंडखोर होता. उदाजी चव्हाणाचा व बाळाजी शाहूस फार त्रास झाला. स. १७१२–१३ त शाहूच्याविरुद्ध संभाजीच्या बाजूनें हा लढल्यामुळें बाळाजीस याच्या बंदोबस्तास जावें लागलें, परंतु विश्वासघात करून दमाजीनें त्यास पकडलें व नंतर त्याच्या बायका व पुत्रास ओलीस ठेवून त्यास सोडून दिलें. शेवटीं सोडून देंड भरून मंडळी सोडवली. दमाजीस सामोपचारानें वश करावें अशी शाहूची फार इच्छा होती, परंतु बाळाच्या उद्दामपणामुळें यश आलें नाहीं. पुढें बाळाजीनें चाकरवर स्वारी करून यास कैद करून पुरंदरला ठेविलें, परंतु शाहूच्या इच्छेवरून सोडून दिलें. परंतु यानें पुन्हां बंड केल्यामुळें यास परळी येथें ठेविलें व शेवटीं तेथेंच हा मरण पावला (भा. व. श. पृ. ४,७). थोरातास शाहूच्या विरुद्ध झगडण्यांत चंद्रसेनाचें पाठबळ होतें (ए. सं. २ पृ. ३६).

दयाबहादुर—(मृत्यु स. १७१३) उत्तर मोंगलाईत जे थोडे हिंदु कामगार स्वपराक्रमानें प्रसिद्धीस आले त्यांत याच्या कुटुंबाची गणना होते. हे ब्राह्मण असून अलाहाबादेकडे राहत होते. यांचें दुसरें नांव दयाराम होतें. हा व याचा भाऊ छबिलाराम हे बहादुरशहाचा मुलगा अजीमुश्शान याच्या पदरीं होते. याला एक मुलगा असून त्याचें नांव राजा गिरधर होतें. बहादुरशाह मेल्यावर (स. १७१२) त्याच्या मुलांत गादीविषयीं जो कलह माजला. त्यांत अजीमचा पक्ष घेऊन हा लढत असतां ठार झाला. हा माळव्याचा एक सुभेदार होता.

२. (मृत्यु ता. १२–१२–१७३१) हा राजा गिरधरराव मुलकमाऊ होता. हा पुष्कळ दिवस माळव्याचा सुभेदार होता. हा मराठ्यांच्या विरुद्ध बागे व जयपूरकर जयसिंगाचा फार द्वेष करी.

बाजीरावानें निजामाशीं तंटा चालविल्यानें त्यांना मालमत्तेकडे लक्ष देण्यास सवड झाली नाहीं. या वेळीं बाजी पुरंदर, नंदलाल मंडलोई वगैरे सरदार मराठ्यांच्या विरुद्ध फोडण्याचा प्रयत्न केला होता, परंतु तो अयशस्वी व होळकर यांनीं याचा प्रयत्न हाणून पाडला.

मालकम म्हणतो कीं, यानें रयतेस इतकें पिळून काढलें कीं, रयतेनें व ठाकुर जमीनदार यांनीं थेट बादशाहाकडे अनेकदां दाद मागितली, परंतु त्याचा उपयोग होईना. म्हणून जयसिंगामार्फत ते सर्व मराठ्यांस मिळाले.

पेशवे ब्रह्मणपुरास होते, तेथून बेत ठरल्याप्रमाणें नंदलालनें मल्हारराववास बारा हजार फौजेनिशीं अकबरपुरास नर्मदा उतरवून माळव्यांत आणलें. हें याला समजतांच यानें तांडाघाट दाबला, परंतु नंदलालनें आगाऊ इशारत दिल्यानें मल्हारराव मांडवगडच्या भैरव घाटानें वर आला व एकाएकीं (धारनजीक) तिरला गांवीं याच्यावर छापा घातला. या लढाईत हा ठार झाला.

दयाबाई—(स. १७६०) हिंदी कवयित्री. चरणदासाची शिष्याण व सहजोबाईची गुरुबहीण. या दोघांची कविता वाणी नांवानें प्रसिद्ध आहे. शिवाय हिचा दर्याबोध नांवाचा ग्रंथ आहे (क. कौ. १).

दयाराम—(स. १८२३) गुजराथी कवि. हा डभईचा साठोदरी ब्राह्मण. यानें राधाविलास दानलीला, रासलीला, गीतामाहात्म्य, भक्तिपोषण व संतसरमा हे ग्रंथ केले. काव्याचें परमोच्च स्वरूप नरसी मेथा व प्रेमानंद यांच्याप्रमाणें याच्याहि काव्यांत पाहावयास मिळतें. मूळ नांव दयाशंकर, परंतु वल्लभाचार्याच्या संप्रदायाची दीक्षा घेतल्यानंतर दयाराम हें नांव यांस प्राप्त झालें. हा मोठेपणीं कृष्णभक्त झाला. हा वयाच्या ४० व्या वर्षापर्यंत फार चैनी होता. हा देखणा असून बाईलवेडाहि असे. हा गायकहि होता. याच्या काव्याचे (१) धार्मिक, (२) नैतिक व (३) शृंगारिक असे तीन विभाग पडतात. याच्या काव्यामुळें एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत गुजराथी काव्याला नवीन वळण लागलें असें म्हटलें असतां चूक होणार नाहीं.

२. दयाराम (गवळी)–फर्ग्युसियरच्या कारकीर्दीतील एक सुप्रसिद्ध योद्धा (बंगाल ॲन्युअल स. १८३३).

दयाळनाथ—(जन्म स. १७८८–समाधि स. १८३६) एक मराठी कवि. हा मूर्तिजापूरचा रहिवासी. याचें मूळ नांव हरि. देवनाथाचा हा शिष्य. याची कांवता मराठी व उर्दू भाषेंत आहे. हा मौतसगोत्री व यजुर्वेदी ब्राह्मण. याच्या बापाची सर्व संतति अल्पायुषी मरूं लागली, तेव्हां यानें आपलें शेवटलें अपत्य हरि नांवाचा मुलगा पांच वर्षांचा होतांच देवनाथ महाराजांच्या चरणीं वाहिला. याच मुलास देवनाथ 'दयाळ्या' या नांवानें संबोधूं लागले. याच्या बायकोचें नांव राधाबाई असें होतें (म. क. च. भा. ५).

हा एकनाथसांप्रदायी असून नाथांपासून १४ वा पुरुष होय. याची गुरुपरंपरा-गोपाळनाथ-गोविंदनाथ-देवनाथ-दयाळनाथ अशी आहे. यानें 'राधाविलास' या नांवाचा ग्रंथ लिहिला (सं. सू.).

दयितविष्णु—हा बंगालच्या पालवंशीय राजांपैकीं पहिला पुरुष होय.

दर्द—(स. १७१५-१७८३) एक ऊर्दू कवि. याचें नांव ख्वाजा मीर, याच्या गुरूचें नांव शाहगुलशान. हा जानजानाँ मजहर याचा समकालीन होता. हा गायनविद्येंत चांगला प्रवीण होता. हा शिष्टाचाराविषयीं फार दक्ष असे. यानें खालील पुस्तकें लिहिलीं-१ दीवान (उर्दू-मध्यें गजलें, तरजी अबन्द आणि रुबाईया), २ दीवान फार्सी, ३ रिसाला इसराइस्सलवत, ४ वारदाते दर्द, ५ इल्मुल्किताब, ६ बाकयाने दर्द इत्यादि ग्रंथ लिहिले (क. कौ. ४).

दर्या इमादशाह—(स. १५२९-१५६०) बऱ्हाडच्या इमादशाही घराण्यांतील अलाउद्दीन इमादशाहाचा ज्येष्ठ पुत्र.

दर्याखान रोहिला—(मृ. स. १६३१) मोगलांचा बंडखोर सरदार. हा सिरोंजजवळ मारला गेला (क. कौ. भा. ४ था).

दर्याबाई निंबाळकर—दुसऱ्या शिवाजीची मुलगी व रामराजाची बहीण. पेशव्यांनीं हिला आपल्याकडे वळवून घेतलें. शाहूनेंहि हिचा उदारपणें परामर्श घेतल्याचा निर्देश आहे (पे. द. ८. ३६).

ही बरीच कारस्थानी बाई असून रामराजाला पेशव्याविरुद्ध सल्ला देण्याचें काम ही परिणामकारक करूं लागल्यामुळें हिला सर्कीनें साताऱ्याहून पेशव्यांनीं घालवून दिलें (पे. द. ६. ९४).

दर्याबाई भोसले—ही नागपूरकर जानोजी भोसल्याची स्त्री. ही फार कारस्थानी होती. मुधोजी व साबाजी यांच्या भांडणांत दर्याबाई कधीं कधीं दोन्हीकडेहि मिळे. हिच्यामुळें भोसल्यांच्या घरांत गृहकलह शिरला.

हिनें मुधोजीचा मुलगा रघूजी यास दत्तक घेतलें होतें. जानोजीचे पश्चात् ही रघूजीसह अकोटास राही. हिनें रघूजीस गादी मिळूं नये म्हणून आपण गरोदर असल्याचेंहि खूळ पिकविलें होतें.

बाराभाईचें कारस्थानांत दर्याबाई व रघूजी यांनीं भाग घेतला होता. त्या वेळीं रुक्नुद्दौला यानें बाई पुण्याकडे जात असतां वाटेंत बऱ्हाणपूर येथें हिला लुटलें.

दर्विश आदिलशाह—विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील दुसऱ्या इब्राहीमचा मुलगा. हाच वडील मुलगा असून यालाच विजापूरचें राज्य वास्तविक मिळावयाचें. पण मुत्सद्यांनीं याचा हक्क नष्ट करून याला आंधळा केलें व मुहम्मदला गादी दिली. याची मजेदार हकीगत बुसातिनेसलातिनवरून शिवभारताच्या प्रस्तावनेंत दिली आहे (पा. ७५).

दर्शक—मगधच्या बिंबिसाराचा पुत्र. हा आपल्या बापाच्या हयातींतच राज्यकारभार पाहत असे.

दलपत—गुजराथी कवि. नागर ब्राह्मण. यानें देवींचे वर्णन गुजराथींत लिहिलें आहे (संवत् १८८७).

२. यानें खुमानरासो या हिंदी ग्रंथांत चितोडच्या महाराणा प्रतापसिंहापर्यंत माहिती दिली आहे. पण शिवसिंहसरोजानुसार या ग्रंथाचा कर्ता कोमी भाट असून हा त्याच्या फक्त परिशिष्टाचा कर्ता आहे.

दलपति—नृसिंहप्रसादतीर्थसार नांवाच्या संस्कृत भाषेंतील ग्रंथाचा कर्ता.

दलपतिराज—(स. १४९०-१५१२ सुमार) संस्कृत भाषेंतील ग्रंथकार.

याचा 'नृसिंहप्रसाद' हा धर्मशास्त्रावरील ग्रंथ प्रसिद्ध आहे. या ग्रंथाचे संस्कार, आह्निक, श्राद्ध, काल, व्यवहार, प्रायश्चित्त, कर्मविपाक, व्रत, दान, शान्ति, तीर्थ आणि प्रतिष्ठा असे १२ भाग केलेले आहेत. वरील प्रत्येक भागाच्या सुरुवातीस नृसिंहाचें नामोच्चारण केलेलें आहे. यानें आपल्या ग्रंथामध्यें दुसऱ्या पुष्कळ ग्रंथांचा आणि ग्रंथकारांचा उल्लेख केलेला आहे. यानें संवत्सर आणि कालदीप याविषयीं माहिती संस्कारसार यांमध्यें दिलेली आहे. आह्निकामध्यें दिनचर्येविषयीं विवेचन केलेलें आहे. तीर्थक्षेत्रांविषयीं माहिती याच्या तीर्थसारांमध्यें आलेली आहे.

याच्या बापाचें नांव कलभ असें होतें. याचें दुसरें नांव दलपति असून हा भारद्वाजगोत्री होता. हा सूर्यपंडित याचा शिष्य असून यवनांचा राजा जो अहमद किंवा पहिला बुर्हाण निजामशाहाचा मुख्य प्रधान होता. हा आपणास महाराजाधिराज असें म्हणवून घेत असे (काणे).

दलपतिराय—(स. १५७६) हा 'पत्रप्रशस्ति' 'यावनपरिपाटी-अनुक्रम' या ग्रंथाचा कर्ता होय.

२. (स. १७३५) एक हिंदी कवि. अहमदाबादचा राहणारा. बंसीधराच्या साहाय्यानें यानें 'अलंकाररत्नाकर' नांवाचा ग्रंथ लिहिला.

दशरथ मौर्य—(खि. पू. २२५-२२६) मौर्य-वंशांपैकीं कुनालाचा पुत्र. ब्रह्मांड व वायु पुराणांत कुनालाचा पुत्र बंधुपालित दिला आहे. बंधुपालित ही याची पदवी दिसते. याच्या वेळीं याचा भाऊ संप्रति याच्या हातांत सर्व सत्ता होती. म्हणूनहि याला बंधु-पालित म्हणत असावेत. याच्या वेळीं कलिंगदेश पुनः स्वतंत्र झाला असें हाथिगुम्फेंतील खारवेलच्या शिलालेखा-वरून कळतें. हा स्वतंत्रता मिळवणारा कलिंगदेशचा राजा चैत्रराज होय. चैत्रराजापासून खारवेल तिसरा पुरुष होय. खारवेलचा काल हाथिगुम्फेंतील लेखावरून निश्चित आहे. तो खि. पू. १७३ वर्षी गादीवर आला. त्यापूर्वी दोन पिढ्यांकरितां पन्नास वर्षे धरल्यास याच्याच कार-कीर्दीत चैत्रराज स्वतंत्र झाला असला पाहिजे. पण त्याबद्दल इतर पुरावा उपलब्ध नाहीं. यानें कोरलेल्या गुहा दान केल्याबद्दल तीन लेख गयेजवळ नागार्जुन डोंगरावर आढळतात.

दशवर्मा चालुक्य—हा पश्चिम चालुक्यांपैकीं दुसऱ्या तैलाचा मुलगा. याची पत्नी भागवती. याला विक्रमादित्य पांचवा, अय्यण दुसरा, अक्कादेवी व जयसिंह तिसरा हीं मुलें होतीं.

दक्षमित्रा—नहपान क्षत्रपाची कन्या व उषवदाताची पत्नी.

दंडिन्—(स. ६४०-६४५ सुमार) कथासाराचा कर्ता. या ग्रंथांत यासंबंधीं पुढील माहिती आढळते. कांचीकडील प्रांतांत आनंदपुरांत एक कौशिक ब्राह्मणाचें कुटुंब राहत होतें. तें मूळदेवानें स्थापिलेल्या नासिक्य देशांतील अकालपुरांत आलें. तेथें नारायणस्वामीला दामोदर या नांवाचा मुलगा झाला. या दामोदराला तीन मुलें झालीं. त्यांतील दुसरा जो मनोरथ त्याला चार मुलें झालीं. पैकीं वीरदत्तानें गौरीशीं लग्न केलें. याच जोडप्यास दंडिन् झाला. हा लहानपणींच पोरका झाल्यामुळें श्रुत आणि सरस्वती यांनीं त्याचें संगोपन केलें. काव्य, स्थापत्य-कला यांचेंहि त्यास ज्ञान दिलें. अशा तऱ्हेनें कथा व कथासार यांवरून अवंतीसुंदरीचा लेखक दंडिन् याचा वंशवृक्ष खालीलप्रमाणें होतोः

नारायण-दामोदर (भारवि), मनोरथ, वीरदत्त-गौरी, दंडिन् (हि. क्रा. १.३२).

यानें दशकुमारचरित, काव्यादर्श व छन्दोविचिति असे तीन ग्रंथ केले आहेत. हा स. ६००-६५० च्या सुमारास झाला असें मानण्याविरुद्ध अवन्तिसुन्दरीकथे-खेरीज कांहीं नाहीं (पा. ७८).

दंतदेव—शीलभद्राचें मूळचें नांव.

दंतिदुर्ग राष्ट्रकूट—(स. ७४५-७५८ सुमार) मालखेडच्या राष्ट्रकूट वंशांतील पहिल्या इन्द्राचा पुत्र. हा स. ७४५ सुमारास गादीवर आला असावा. यानें राज्यावर आल्याबरोबर कांची, कलिंग, श्रीशैल, कोसल, मालव, लाट, टंक व सिंध येथील राजांचा भराभर पाडाव करून टाकला (एपि. इंडि. ९. २४). पहिल्या इंद्राच्या वेळेस सर्वांत बलिष्ठ असलेलें जे दक्षिणेंतील चालुक्य राज्य त्याच्या मुळावर घाव घालून त्याला खिळखिळें करण्यास यानें सुरुवात केली. चालुक्याचा पूर्ण पाडाव करण्याचें श्रेय कांहीं शिलालेखांत याला दिलेलें आहे; तरी कांहीं-मध्यें तें श्रेय याच्यामागून गादीवर आलेल्या याच्या चुल-त्याला म्हणजे पहिल्या कृष्णाला दिलें आहे. पण कांहीं असलें तरी चालुक्य सत्तेवर पहिला जोराचा आघात दंतिदुर्ग यानेंच केला हें निर्विवाद आहे.

दंतिदुर्गानें राज्यावर आल्यावर प्रथम कोसल राजाचा पाडाव करून आपलें राज्य वाढविण्यास सुरुवात केली. त्यापैकीं याच्या हातून प्रारंभींच पराभूत झालेले राजे म्हणजे सिरपूरचा उदयन व श्रीवर्धनचा जयवर्धन हे होत. या वेळीं दंतिदुर्गानें नंदीवर्मा पल्लवाचें साहाय्य घेतलें होतें.

याप्रमाणें पूर्वदिशेला विजय संपादन करून स्थिर-स्थावरता मिळाल्यानंतर याचें लक्ष भडोंच व गुर्जर चालुक्य या राजांकडे वळलें. हीं दोन्ही राज्यें आधींच मुसलमानीं स्वाऱ्यांमुळें कमजोर झालीं होतीं. त्यामुळें यानें अनायासें हीं दोन्ही राज्यें खालसा करून आपल्या राज्यास जोडलीं. गुजराथच्या राज्यावर दंतिदुर्गानें दुसऱ्या कर्क नांवाच्या आपल्या नातलगास सुभेदार नेमलें.

एकंदरींत पाहतां याची कारकीर्द अत्यंत धामधुमीची झाली. त्यांतहि विशेष हें कीं प्रत्येक लढाईत याला जयच मिळत गेला. हें याच्या पराक्रमाचें व त्याच-प्रमाणें मुत्सद्देगिरीचेंहि द्योतक आहे. यानें 'नुसती भुवई उचलून चालुक्य राजा कीर्तिवर्मा याचा पराभव केला' असें एके ठिकाणीं म्हटलें आहे (इंडि. अँटि. ९. ३). पराक्रम व मुत्सद्देगिरी यांबरोबरच कालाची अनुकूलताहि याच्या जोडीला असल्यानें दिग्विजयाचें काम याला फार सोपें झालें होतें.

याचीं धार्मिक मतें अत्यंत कर्मठ व जहाल होतीं. उज्जयिनीस असतांना यानें स्वर्गप्राप्त्यर्थ हिरण्यगर्भ महा-दानाचा समारंभ मोठ्या थाटानें साजरा केला. तसेंच स. ७५४ या वर्षी त्यानें रथसप्तमीला सुवर्णतुलेचें दान

केलें होतें. तसेंच हा अत्यंत मातृभक्तिपरायण होता. आईच्या स्मरणार्थ यानें बरीच जमीन ब्राह्मणांस दान केली होती.

याचा मरणकाल नक्की सांगतां येत नाहीं. परंतु याच्यानंतरचा राजा पहिला कृष्ण स. ७५८ मध्यें राज्य करीत असल्याचा उल्लेख आहे. त्यावरून हा स. ७५४ ते ७५८ या कालाच्या दरम्यान केव्हां तरी मरण पावला असावा असें दिसतें. मरणसमयीं याचें वय जास्तींत जास्ती तीस वर्षांचें असावें. एवढ्या लहान वयांत यानें जी अतुल कीर्ति संपादन केली तीवरून याच्या कर्तबगारीची बरोबर कल्पना येते. याच्यामागून याला पुत्रसंतान नसल्यानें याचा चुलता पहिला कृष्ण गादीवर आला.

'दंतिदुर्गाची कारकीर्द जुलमी होती; व त्याला पदच्युत करून त्याचा चुलता पहिला कृष्ण गादीवर आला' असें कांहींचें मत आहे, पण तें चुकीचें दिसतें. या चुकीचें कारण पुढीलप्रमाणें दिसतें. दुसऱ्या कृष्णा बेगम्रा येथील शिलालेखांत 'तस्मिन् दिवं प्रयाते वल्लभराजेऽकृत-प्रजाबाधे। श्रीकर्कराजसूनुर्महीपतिः कृष्णराजोऽभूत ॥' असा एक उल्लेख आहे. दौलताबादच्या शिलालेखांत 'अकृतप्रजाबाधे' याऐवजीं 'कृतप्रजाबाधे' असा दंतिदुर्गा-संबंधीं पाठ आहे, व याच पाठावरून वरील चुकीचें मत झालें असावें असें वाटतें. कारण हा पाठ चुकीचा आहे, हें पैठण अगर तळेगांव येथील शिलालेखांवरून चटकन ध्यानांत येण्यासारखें आहे.

दाऊदखान कररााणी—(स. १५७२–७६) बंगालचा राजा.

दाऊदखान कुरेशी—हा अरब सरदार होता. जयसिंग व दिलेरखानाबरोबर दाक्षिणेंत आलेला मातबर मोगल सरदार. जयसिंग दक्षिणेंत आल्यावर दिलेरखानास पुरंदरच्या वेढ्याचें काम दिलें व त्याच्या हाताखाली हा होता. पण दिलेरखानाच्या हाताखालीं काम करण्यांत हा कुचराई करूं लागल्यामुळें यास सिंहगड, राजगड, रोहिडा वगैरे किल्ले घेण्याच्या कामगिरीवर पाठविलें. आणि ते किल्ले घेऊन हा यशस्वी झाला आणि ता. १९ मे १६६५ रोजीं पुण्यास आला. पुढें स. १६७० त शिवाजीची मोहीम सुरू होतांच हा आपल्या ७००० सैन्यासह निघाला. २८ मार्च १६७० ला अहमदनगरला आला; आणि शिवाजीनें काबीज केलेली पारनेर, जुन्नर हीं ठाणीं परत घेतलीं. याबद्दल याची तारीफ होऊन यास बऱ्हाणपूरचा सुभेदार नेमण्यांत आलें (सरकार-शिवाजी १९१). दिंडोरीच्या लढाईत शिवाजीनें याचा पराभव केला (१०.१६७०).

दाऊदखान पन्नी—(मृ. स. १७१५) औरंगजेबाचा नोकर. हा बहादूरशहाच्या कारकीर्दीत दक्षिण प्रांताचा सुभेदार होता. फर्रुखसियरच्या कारकीर्दीत, याची व अलीशहाची बऱ्हाणपुरास लढाई होऊन त्यांत हा मारला गेला.

दाऊदखान फारूकी—(स. १५०३–१५१०) हा खानदेशांतील राजा. निजामशाहानें याच्यावर स्वारी करून याला पकडून ठेविले. यानें खंडणी देण्याचें कबूल केल्यावर यानें याला सोडून दिले.

२. हा गुजराथच्या कुत्बशहाचा चुलता. त्याच्यानंतर राज्यकारभार पाहूं लागला. पण नालायक ठरून, याचा सावत्र भाऊ तक्तनशीन झाला.

दाऊद बाहमनी—बाहमनी वंशांतील पहिल्या अहमदशाहाचा पुत्र.

२. (मृ. स. १३७८ मे) एक बहामनी राजा. हा मुजाहिदशाहाचा चुलता. हा आपल्या पुतण्याला ठार मारून गादीवर बसला. पुढें हा गुलबुर्गा येथें जुम्मा-मशिदींमध्यें नमाज पढण्यास जात असतां याचा खून झाला.

दाग—एक ऊर्दू कवि. हा सोजचा मुलगा. हा स्वतः सुंदर असून सौंदर्योपासक होता. तरी कामवासनेमुळें वांया गेला (क. कौ. ४ पा. २२१).

दाजीबा जोशीराव—(स. १८००–१८६५ सुमार) हा जातीनें ब्राह्मण. हा मोठा संस्कृतज्ञ व ज्योतिःशास्त्रज्ञ होता. हा कोल्हापूरचा राहणारा. याच्या बापाचें नांव बाळजोशी. यानें पुढील ग्रंथ लिहिले:—संस्कृत ग्रंथ—१ चित्तविनोद (स. १८२३), २ चित्तानंद (स. १८२६), ३ रामेश्वरयात्रा (स. १८२८), ४ लक्ष्यालंकार (स. १८२९), ५ लक्ष्मीवर्णन (स. १८३०), ६ कार्तिक-स्वामीयात्रा (स. १८३०), ७ गणपतीवर एक सं. ग्रंथ (स. १८३२), ८ संस्कृत भाषेवर एक ग्रंथ (स. १८२५), ९ ज्योतिर्लिंगयात्रा (स. १८३९), १० विश्वगुणादर्शटीका (स. १८४२) ११ गोकर्णयात्रा (स. १८४२), १२ अष्टविनायकयात्रा (स. १८४०), १३ करवीरमाहात्म्यटीका (स. १८५०). यांशिवाय लहानलहान स्तोत्ररूप ८ संस्कृत ग्रंथ आहेत.

यानें केलेले प्राकृत ग्रंथ—१ करवीरमाहात्म्य, २ मल्हारीमाहात्म्य, ३ कार्तिकमाहात्म्य, ४ गालवाख्यान, ५ ईशस्तोत्र, ६ वीरभद्रमाहात्म्य, ७ सीताजन्म, ८

एकादशीमाहात्म्य, ९ सुलोचनाख्यान, १० शिवपार्वती-विवाह, ११ मारुतीबलरामयुद्ध (आर्या), १२ वीरभद्र-माहात्म्य (ओवी), १३ रामअंजनीभेट (आर्या), १४ चोपडाईजोतीबा, १५ कृष्णदान (आर्या), १६ अहि-मह्याख्यान, १७ वत्सला, १८ मयूरध्वजाख्यान, १९ श्रियाळाख्यान, २० चंद्रहासचरित्र, २१ अंबाबाईवर (आर्या), २२ अद्भुतरामायण (आर्या), २३ मारुतिस्तुति, २४ लहुकुशाख्यान (आर्या), २५ केदार-माहात्म्य (आर्या). याचे हे ग्रंथ त्यांच्या संग्रहालयांत असून अप्रसिद्ध आहेत (महाराष्ट्र कविचरित्र भाग १, पा. ४५१).

दाजीबा लिमये—हा परशुरामभाऊ पटवर्धनांच्या विश्वासांतला वकील. नानाफडणवीसाच्या कारकीर्दीत याला मोठमोठ्या अधिकाराच्या जागा मिळाल्या होत्या. डफनें याला त्या वेळच्या परिस्थितीचा इतिहास लिहि-ण्यास सांगितल्यावरून यानें त्याप्रमाणें इतिहास लिहून ठेवला आहे. याच्या इतिहासाचा डफला फार उपयोग झाला असें डफनें म्हटलें आहे (डफ भा. २ पा. ३०० फुटनोट).

दाजीराव देशपांडे—(नारायणस्वामी पाहा).

दादंभट विन पिलंभट भट—शिवाजीनें स.१६६४ मध्यें याला मालवणच्या सिंधुदुर्ग किल्ल्याचा उपाध्या केला. पुढें याच्या प्राप्तीचा अर्धा वांटा मागण्यासाठीं कृष्णंभट नांवाचा कोणी वंशज आला. पण सिंधुदुर्गाचा मुख्य अधिकारी चंद्रोजी घाटगे, यानें याच्या तर्फेनें निवाडा दिला, ता. २ मे स. १७२१ (का. सं. प. या. ४२१ जुनीप्रत).

दादंभट माधवगांवकर—(ग्रंथकाल स. १७१९) हा चित्पावन ब्राह्मण. यानें ' किरणावली ' नांवाची सूर्य-सिद्धांतावर टीका लिहिली (भा. ज्यो. पा.).

दादाजी—(स. १७३४) याला संभाजीनें तुंगभद्रा वगैरे प्रदेशांवर सुभेदार नेमलें. हा रामदुर्ग संस्थानच्या रामराव दादाजीचा पुतण्या. रामरावाचा पुत्र योगी-राजानें यास मारलें.

दादाजी कृष्ण लोहोकरे—कान्होजी जेध्याचा कारभारी. हा तळेगांव ढमढेरे येथील राहणारा. शिवाजीचा कल्याणचा सुभेदार. हा शहाजीबरोबर मुस्त-फाच्या कैदेंत होता.

दादाजी नरस प्रभु—कान्होजी जेध्याचा कुलकर्णी.

दादाजी बापूजी रांझेकर—हा शामराज नीळकंठ रांझेकराचा चुलत भाऊ. यानें कल्याण जिंकलें (ता. २४-१०-१६४७).

दादू दयाल—(स. १५४३-१६०२) एक हिंदी कवि. हा अहमदाबादचा राहणारा. यानें एक निराळा पंथ स्थापन करून, त्या पंथास दादूपंथ असें नांव दिलें. याचा गुरु कबीर असावा. हा नराना येथें मरण पावला. यानें पुष्कळ पदें गुजराथी, हिंदी व पंजाबी भाषेंत केलीं आहेत. दरवर्षी याची यात्रा फाल्गुन शु॥ ४ पासून ते १२ पर्यंत भरते. याच्या पंथांत दोन प्रकारचे लोक असत. या पंथाचे लोक एकमेकांस भेटले, तर ते ' सत्त-राय ' असें म्हणत.

दादू नरसू काळे—मोगलांचा एक मुत्सद्दी. हा दुर्गा-देवीच्या दुष्काळांत लोकांच्या फार उपयोगी पडला.

दादोजी कोंडदेव—(स. १५७७-१६४७) शिवाजीचा शिक्षक व मलठणचा कुलकर्णी. यानें शिवाजीस मर्दुमकीचें व जमीनमहसुलाचा हिशोब वगैरेचें शिक्षण दिलें. हा वर्तनानें अत्यंत पवित्र, पापभीरु व त्याच-प्रमाणें निश्चयीहि होता. यानें शहाजीच्या पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहिली. यानें तेथील जमिनीची मोजणी केली व बंदोबस्तासाठीं लष्कर ठेविलें. यानेंच शिवाजीचें लग्न निंबाळकरांच्या सईबाईशीं केलें. शिवाजीस शिक्षण दिल्यामुळें ह्यास ७०० होनांची बढती मिळाली. ह्याचा मुलगा कृष्णाजी ह्यावर विजापूर दरबारकडून बंड-खोरीचा गुन्हा लागू करण्यांत आला. ह्यानेंच शिवाजीच्या स्वतंत्र राज्यस्थापनेच्या कल्पनेस पुष्टि दिली असें दिसतें (मं. वार्षिक १८३७ ले.१७२). पुढील पिढींत उदयास आलेले ब्राह्मण मुत्सद्दी याच्या हाताखालीं तयार झालेले होते, असें न्या. रानडे यांनीं आपल्या मराठी सत्तेच्या उत्कर्षांत म्हटलें आहे.

दादो जोगदेव बर्वे—हा जोगदेवभटांचा वडील मुलगा. याचा वंश पुणें, नाशिक व सातारा जिल्ह्यांत आहे. याला दोन मुलगे व एक मुलगी होती. मुलांचीं नांवें अनुक्रमें मल्हारपंत व त्रिंबकपंत होतीं. मुलीचें नांव राधा-बाई असून ती बाळाजी विश्वनाथास दिलेली होती (म. रि. म. १, पृ. ४२८).

दानशील—(जन्म स. १०२५ सुमार) बुद्ध तर्कज्ञ. दानशील अथवा दानश्रील याचा जन्म स. १०२५ च्या सुमारास बंगालचा राजा महीपाल दुसरा हा राज्य करीत असतां झाला. हा परहितभद्र, जिनमित्र, सर्वज्ञदेव व तिलोपा यांचा समकालीन होता. हा तिबेटांत गेला होता व यानें संस्कृत ग्रंथांचें तिबेटी भाषांतर करण्यास मदत केली.

यानें तर्कज्ञानावर 'पुस्तकपागोपाय' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाची मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाहीं. परंतु त्याचें तिबेटी भाषांतर मात्र उपलब्ध आहे (हि. इं. लॉ., पा. ३४०-४१).

दानार्णव चालुक्य—हा चालुक्यांपैकीं दुसऱ्या अम्माचा वडील सावत्र भाऊ होता. याला घनार्णव असेंहि म्हणत. कांहीं लेखांत यानें तीस वर्षे राज्य केलें असें आहे (स. ९७३-१००३). परंतु पुष्कळ लेखांत यानें तीनच वर्षे राज्य केलें व बाकीचीं सत्तावीस वर्षे चोलराजांच्या स्वाऱ्यांच्या अंदाधुंदींत गेलीं व त्या वेळीं वेंगी देशावर कोणीहि राजा नव्हता असें आहे. तसेंच कांहीं लेखांवरून असें अनुमान निघतें कीं, सदर अवधींत चोल राजांनीं हा मुलूख जिंकला असावा (स. ९७०-९७३).

दानियल मीर्झा—(जन्म स. १५७२) अकबर बादशहाचा तिसरा मुलगा. याचा जन्म शीख जातीच्या दानियल नामक एका दरवेशाच्या घरीं स. १५७२त झाला. त्यामुळें यास हें नांव मिळालें. हा फार दारूबाज होता. याची आई राजा बिहारीमल्ल कच्छवाहाची मुलगी. निजामशाही जिंकण्याकरितां अकबरानें यास पाठविलें. अहमदनगर मोंगलांनीं घेतलें. पण लवकरच बऱ्हाणपुर मुक्कामीं हा वारला. अकबराचें याच्यावर फारच प्रेम होतें. याला दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाची एक मुलगी दिली होती.

दानिश्मदखान—याचें मूळ नांव मुल्ला शफी. हा इराणी व्यापारी होता. हा स. १५४६ मध्यें सुरतेस आला. शहाजहान बादशाहानें यास आपल्या पदरीं ठेवलें. औरंगजेबाच्या कारकीर्दीत यास पांच हजारांची मनसब देण्यांत आली (बील).

दामघ्सद क्षत्रप—हा रुद्रदामन्चा ज्येष्ठ पुत्र. याला दामजदश्री असेंहि म्हणत. याला सत्यदामा व जीवदामा असे दोन पुत्र होते.

दामजदश्री क्षत्रप—हा रुद्रसेन महाक्षत्रपाचा दुसरा मुलगा. हा महाक्षत्रप झाला नाहीं.

२. हा दामसेन महाक्षत्रपाचा चवथा मुलगा. हा महाक्षत्रप होता. याचीं नाणीं शा. श. १७२-१७६ पर्यंतचीं मिळालीं आहेत.

३. (दामघ्सद क्षत्रप पाहा).

दामलवाड—(मृत्यु स. १६४७ मार्च) हा शिवापा बिदनूरकर याचा सरदार. धारवाडच्या ठाण्याचा अमलदार. खवासखानाचें आदिलशाहीशीं बिनसलें तेव्हां तो फौजबंद निघून धारवाडास आश्रयार्थ आला. पण यानें त्यास आंत घेतलें नाहीं (अ. घ. इ.). स. १६४६-४७ च्या विजापूरकरांच्या स्वारींत हा शिवापा नाईकातर्फे लढत होता. यानें मुस्तफाखानाचें 'लष्कर फोडून भग्न केलें' व आसदखानास जखमी केलें. परंतु सिद्दी रैहानच्या पिछाडीच्या हल्ल्यांत हा ठार झाला (रा. मा. चंपू. ८४-८५). हा श्रीरंगरायाचा सेनापति होता. वेलोरच्या लढाईंत हा पडला (शहाजी ६९).

दामसेन क्षत्रप—हा रुद्रसिंहाचा तिसरा मुलगा. याचीं चांदीचीं नाणीं शा. श. १४५-१५८ पर्यंतचीं मिळालीं आहेत. हा महाक्षत्रप होता. याला चार पुत्र होते. त्यांचीं नांवें अनुक्रमें पुढीलप्रमाणें आहेतः १ वीरदामा, २ यशोदामा, ३ विजयसेन, ४ दामजदश्री दुसरा. याचा उत्तराधिकारी यशोदामा झाला. त्यावरून वीरदामा अल्पवयी मेला असावा असें दिसतें.

दामाजीमंत—हा पंढरपुराजवळील बेदरच्या बादशहाच्या अंमलाखालीं असलेल्या मंगळवेढ्यास २० वर्षे ठाणेदार होता. हा मोठा विठोबाभक्त होता. एकदां दुष्काळांत ब्राह्मणांस सरकारी धान्य दिल्यामुळें ह्यास पकडून बेदरास आणण्याचा हुकूम बादशहानें केला. परंतु वाटेंत ह्यास गीतेंत धान्याच्या पैशाची पावती मिळाली व एकदम सोडून देण्याचा बादशहाचाहि हुकूम त्याच वेळेस आला. पुढें हा नोकरीचा राजीनामा देऊन बायकामुलांसह पंढरींस येऊन राहिला (भक्तिवि. अ.४०). वरील गोष्टीसंबंधींचें थोडेसें काव्य प्रसिद्ध आहे (मं. चतुर्थ सं. वृत्त). दामाजीपंताच्या गोष्टीस ऐतिहासिक पुरावा आहे (विठ्या महार पाहा).

दामाजी माणकेश्वर सुपेकर देशपांडे—यास आम्भी (मोरगांवाजवळ) येथें शके १६५८ अधिक ज्येष्ठ वद्य ६ बुधवारीं देवाज्ञा झाली. हा बाळाजी विश्वनाथापासून पेशव्यांच्या पदरीं असलेला सरंजामी सरदार, दमाजी थोरातास पकडून सुटका करण्याच्या कामीं उपयोगी पडला होता. यासच आपाजी माणकेश्वर म्हणत.

दामो कवि—(कविताकाल स. १४५८) एक हिंदी कवि होय. यानें लक्ष्मणसेनपद्मावती यांची कथा लिहिली आहे.

दामोदर—(स. १४१७) एक ज्योतिषी. याचा 'भटतुल्य' नामक ग्रंथ आहे. त्यांत आरंभवर्ष शके १३३९ आहे. याच्या पित्याचें नांव पद्मनाभ.

यानें त्रिप्रश्नाध्यायांत बराच विस्तार केला आहे. याचीं ८० पद्यें आहेत. त्यांत कांहीं प्रश्नहि आहेत. प्रश्नांत पलभा बरेच वेळां आली आहे. प्रथमार्ध-सिद्धांतांत नक्षत्र-

योग नाहींत यावरून या बाबतींत याचा स्वतंत्र शोध दिसून येतो (भा. ज्यो.).

२. काश्मीराकडील एक सरकारी कामदार. मंख कवीच्या काव्याचा परीक्षक. हा कंसवध नाटकाचा कर्ता.

३. (स. १२७८) हा महानुभावांपैकीं असून यानें वत्सहरण नांवाचें काव्य केलें.

४. काकतीयांच्या प्रतिस्पर्ध्यांपैकीं एक पराक्रमी राजा (एन्शन्ट डेक्कन व्हा. १, पा. २८७).

५. (हनुमान् पाहा).

दामोदरगुप्त—(स. ५६४-६००) मगध येथील दुसऱ्या गुप्त घराण्यांतील दुसऱ्या कुमारगुप्ताचा हा मुलगा. हा आपल्या बापानंतर गादीवर आला.

स. ५६४ मध्यें याच्या बापानें मौखरी घराण्यांतील ईशानवर्मनवर केलेली मोहीम तशीच पुढें यानें चालू ठेविली. पण त्या लढाईत हा मारला गेला.

याच्यानंतर याचा मुलगा महासेनगुप्त हा मगधाच्या गादीवर स. ६०० मध्यें आला (B.).

दामोदरपंडित—(स. १२७२ पंथस्वीकार) हा महानुभावपंथांतील एक विद्वान् व गायनपटु गृहस्थ होता. ह्याची स्त्री हिरावा हीहि विदुषी होती. वृद्धपणीं दोघेंहि संन्यास घेऊन नागदेवाचार्याजवळ राहिलीं. यानें 'वत्सहरण' कथेवर एक ग्रंथ लिहिला. त्याचप्रमाणें याचे आणखी पांचसहा मराठी, हिंदीमिश्रित, हिंदी व संस्कृत ग्रंथ आहेत.

दामोदर भारवि—(स. ६०५-५०) नारायणस्वामीचा मुलगा. हा गंगवंशांतील राजपुत्र दुर्विनीत याजबरोबर राहत असे. यानें पल्लव राजा सिंहविष्णु याजकडे एक आर्या पाठविली त्यामुळें सिंहविष्णूनें यास आपले दरबारीं बोलविलें व पुढें हा तेथेंच राहिला. हा विष्णुवर्धनाचा स्नेही होता. यास तीन मुलें होतीं, पैकीं मनोरथ हा एक होता (हि. का. १. ३२-३३).

हा नासिक प्रांतांतून निघाल्यावर दुर्विनीताजवळ कांहीं दिवस राहिला. दक्षिण गंगकुलांत या नांवाचा एकच राजा होऊन गेला. गंगकुलांत किंवा अन्य कुलांत हें नांव पुनः आढळत नाहीं. म्हणून भारवीस आश्रय देणारा दुर्विनीत हाच असावा. हा स. ६०५ पासून ६५० पर्यंत राज्यावर होता (Dubreuil's Deccan, p. 107). शिवाय यानें आपल्या शिलालेखांत 'किरातार्जुनीयपञ्चदशसर्गटीकाकारः' असें विशेषण लावून घेतलें आहे. त्यावरून 'किरातार्जुनीययुद्धम्' या भारवीच्या काव्यावर पंधरा सर्गांपर्यंत यानें टीका लिहिली असें दिसतें (म्हैसोर आर्कालॉजिकल रिपोर्ट १९१९, पा. ३६. इंडि. अँटि. व्हा. ५, पा. २३७; व्हा. ७, पा. १७४). भारवीचा आश्रयदाता त्याच्या काव्यावर टीका करतो म्हणजे भारवीचा आशय त्या टीकेंत चांगलाच व्यक्त झाला असेल. शिवाय यावरून काव्याची महतीहि ध्यानांत येते. राजशेखरानेंहि उज्जयनींत याची परीक्षा होऊन याचा मोठा सन्मान केला असें लिहिलें आहे (काव्यमीमांसा १). स. ६३४ व्या सालीं जाहीर झालेल्या पुलकेशीच्या ऐहोळ शिलाशासनांत कालिदास-भारवीची एका कवीस उपमा दिली आहे. त्यावरून हा तत्पूर्वी चांगला प्रसिद्ध होऊन शिलालेखांत उपमा देण्याच्या योग्यतेस पोंचला होता. दुर्विनीतापासून हा कांचीचा पल्लव सिंहविष्णु याजजवळ गेला. नंतर हा चालुक्यांपैकीं द्वितीय पुलकेशीचा धाकटा भाऊ (कुब्ज) विष्णुवर्धन याचा आश्रित होता. साधारणतः हा कवि स. ६१० च्या सुमारास महाराष्ट्रांत चालुक्याच्या दरबारीं, ६२० मध्यें कर्नाटकांत गंगाच्या पदरीं व ६२५ च्या आसपास तामिळ देशांत पल्लवांच्या पदरीं होता. शेवटीं कांचीच यानें आपलें निवासस्थान केलें (वि. वि. लक्ष्मणरावांचा लेख स. १९२३).

दामोदर महादेव हिंगणे—याचें दुसरें नांव दादासाहेब. हा व याचे सर्व बंधू फार पराक्रमी होते. यांनीं आपल्या कर्तबगारीनें दिल्लीची वकिलात भरभराटींत आणली. स. १७५० ते १७६० पावेतों हे सर्वजण बंधू दिल्लीकडील सर्व उलाढालींत अग्रेसर होते. रोहिले, जाट, रजपूत, नबाब व वजीर यांच्यावर यांची चांगलीच छाप होती. अंताजी माणकेश्वर पेशव्याचे तर्फे फौज घेऊन होता तेव्हां त्याचें व यांचें पटत नाहीं म्हणून रघुनाथरावाचें व यांचें वांकडें आलें (रा. खं. १. १, ३. २३३; खं. ६. १९८. ४९७-४९९). रघुनाथरावाचें एक खरमरीत रागाचें पत्र सुद्धां आहे (ले. ३८३). भेलशाच्या स्वारीसंबंधानें उल्लेख याच्या एका पत्रांत आहे. हें पत्र २३ जून स. १७४५ त भेलशाच्या लष्करांतून लिहिलें आहे (रा. खं. ६ ले. १७४).

हा रामराजाचे राज्यारोहण-प्रसंगीं निजामाकडील कांहीं कारस्थानासंबंधानें साताऱ्यास आलेला असून त्या प्रसंगास हजर होता.

दामोदरमित्र—(हनुमान् पाहा).

दामोदरसेन—(२ प्रवरसेन पाहा).

दायंव्यास कवीश्वर— एक महानुभाव. यांनीं १२५ ओव्यांचें एक स्तोत्र लिहिलें आहे,

त्यास निर्वेदस्तोत्र असें म्हणतात. तें लाहोर येथें जयंतराज यांनीं छापून प्रसिद्ध केलें आहे. हें निर्वेदस्तोत्र महानुभावांच्या नेहमीं प्रचारांत आहे (म. वा. इ. २. ७३८).

दायीम रट्ट—हा सौंदत्तीच्या रट्ट घराण्यांपैकीं पहिल्या कार्तवीर्याचा पुत्र. याच्याबद्दल दावरी असाहि पाठ आहे.

दारा शुकोह—(जन्म स. १६१५–मृत्यु स. १६५९) शहाजहान पादशाहाचा वडील व आवडता पुत्र. मुम्ताजमहाल ही दाराची आई. याला लढाईतील डावपेंच माहिती नव्हते. हा सर्व धर्म सारखे लेखी. यानें औरंगजेबाशीं प्रथम लढाईत विजय मिळविला, पण पुढें याचें सैन्य फितूर झाल्यामुळें यास पळून जावें लागलें. आणि शेवटीं देशद्रोही व धर्मद्रोही म्हणून यास औरंगजेबानें क्रूरपणें ठार मारलें (औरंगजेब पाहा). हा विद्वान् होता. यानें मुहम्मद पैगंबराचें ' सफीनत-उल-औलिया ' नांवाचें चरित्र लिहिलें आहे. हा कविहि होता.

हा रूपानें देखणा व मोठा हौशी होता. जहांगीर शहाजहानवर नाखूष झाला होता. तेव्हां हा व औरंगजेब यांना त्यानें आपणाकडे ओलीस ठेवलें होतें. जहांगीर मेल्यानंतर या दोघांची मुम्ताज बेगमशीं भेट झाली. हा मोठा विद्याप्रेमी होता. यानें मुसलमानी धर्माचें शिक्षण सरमद नांवाच्या मुसलमान फकीरापासून मिळवलें होतें. तसेंच हिंदूंच्या वेदांताचा अभ्यास लालदास नांवाच्या एका हिंदु योग्यापाशीं केला होता. बायबलच्या नव्या व जुन्या करारांचेंहि यानें अध्ययन केलें होतें. याला मुसलमान व हिंदु अशा दोनहि धर्मांत सत्यांश दिसत असे. हें याच्या ' मजमूअह-इ-बाहरियान ' या नांवाच्या ग्रंथांत लिहिलें आहे. यानें पंडितांच्या साहाय्यानें अनेक उपनिषदांचें फार्सीत भाषांतर केलें होतें. यानें केलेल्या पंचवीस उपनिषदांच्या भाषांतराचें नांव 'सिर्र-उल-असरार' असें होतें. बाबा लालदासाशीं याच्या ज्ञानविषयक गोष्टी होत. त्या ' बाबा लालसे बातचीत ' या नांवानें प्रकाशित झाल्या आहेत. मुसलमान संतांच्या चरित्रसंग्रहाला ' सफीनत-उल-औलिया ' असें नांव असून दाराचा धर्मगुरु मियामीर याचें जीवनचरित्र ' सफीनत-उल-औलिया ' या नांवानें प्रसिद्ध आहे. अशा याच्या व्यापक क्षेत्रावरून हा धार्मिकदृष्ट्या अकबराचा शिष्य होता असें दिसतें.

दारिकपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं सत्याहत्तरावा सिद्ध होय. हा ओरिसाचा राजा. हा लूहिपाचा शिष्य. यानें आपल्या गुरूच्या सांगण्यावरून गणिका-दारिका (वेश्येची कन्या) हिची सेवा केली. यानें केलेले ग्रंथ– १ ओड्डियान-विनिर्गत-महागुह्यतत्त्वोपदेश (तं. ४६-६), २ तथतादृष्टि (४८-४८), ३ सप्तमसिद्धांत. याच्या कांहीं हिंदी कविताहि आहेत.

दावर बख्श—(मृ. स. १६२८) हा दिल्लीच्या मोगल घराण्यांतील खुस्रवचा मुलगा. हा शहाजहान बादशहाकडून मारला गेला. याचें दुसरें नांव बुलकी.

दावर मलिक—(स. १३५१–५८) घियासुद्दीनाचा नातू. याच्या आईचें नांव खुदावंद झादा. हिनें घियासुद्दीन तुघ्लक वारल्यावर आपल्या मुलास गादी मिळावी म्हणून सरदार लोकांचें मन वळविण्याचे प्रयत्न करून पाहिले. पण त्याचा कांहीं उपयोग न होऊन फीरूझशहास गादीवर बसविलें. तेव्हां हिनें त्यास घरीं मेजवानीस बोलावून ठार मारण्याचा कट केला व त्यास घरीं जेवावयास बोलाविलें. पण यास आपल्या आईचें कृत्य पसंत न पडून यानें तो कट उघडकीस आणून दिला. अशा प्रकारें याला गादीवर बसविण्याची खटपट यानेंच वांया घालविली.

दावरी—(दायीम पाहा).

दावलजी सोमवंशी—हा शाहूच्या कारकीर्दीत प्रसिद्धीस आला. शाहूनें यास स. १७२७ चे सुमारास सरलष्करपद दिलें. स. १७१७ मध्यें दाभाड्यानें मोंगलांचा पूर्ण पराभव केला त्या वेळीं हा दाभाड्यांचा मदतनीस होता (रा. खं. २ पृ. २८). माळवाप्रांत जिंकण्याच्या कामांत यानें बाजीरावास पुष्कळ मदत केली.

दास (भिकारीदास)—(काव्यकाल स. १७२७–४९) एक हिंदी कवि. हा योंगा (जि. प्रतापगड) गांवचा राहणारा असून हा श्रीवास्तव कायस्थ होय. याच्या बापाचें नांव कृपालदास असें होतें. यानें केलेले ग्रंथ—१ रससारांश, २ छंदार्णव पिंगल, ३ काव्यनिर्णय, ४ शृंगारनिर्णय, ५ नामप्रकाश (कोश), ६ विष्णुपुराणभाषा, ७ छंदप्रकाश, ८ शतरंज, ९ शतिका आणि अमरप्रकाश (संस्कृत अमरकोशाचें हिंदी पद्यामध्यें भाषांतर). हा प्रतापगडचा सोमवंशी राजा पृथ्वीसिंहाचा आश्रित होता. याचा काव्यनिर्णय हा ग्रंथ फारच प्रसिद्ध आहे; व त्यांत यानें पृथ्वीसिंहाचा उल्लेख केलेला आहे (क. कौ. ५).

२. हा मराठी कवि होता. यानें ' गुरुगीता ' नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्या ग्रंथांत १५१ ओव्या आहेत. ग्रंथांत लिहिलेल्या भाषेवरून शके १६८० नंतर हा ग्रंथकार होऊन गेलेला असावा. हा ग्रंथ कऱ्हाडास मिळाला (मं. श. १८३६ वा. इ. ले. ७०).

दासबाळा—ओवीबद्ध 'कबीर' आख्यान करणारा मराठी कवि. ओव्या ५९ (मं. श. १८३७ वा. इ. ले. १२०).

दासोदिगंबर—उद्धवचिद्घनाप्रमाणें यानेंहि भक्तचरित्रें गायिलीं आहेत. याच्या त्या ग्रंथाचें नांव 'संतविजय' असें आहे. या ग्रंथाचीं ३४ प्रकरणें असून त्यांत अनेक संतांची माहिती सांगितली आहे. त्यांत कवीनें नाभाजींच्या ग्रंथाचा उल्लेख केला असून त्याच्या ग्रंथाचा उपयोगहि पुष्कळ करून घेतला आहे. यानें आपली कोणतीहि माहिती किंवा आपला ग्रंथरचनेचा काळहि आपले ग्रंथांत दिला नाहीं. मात्र महिपतिबावांनीं हा ग्रंथ लिहिला असावा असें वाटतें.

दासोपंत देशपांडे—(स. १५५१-१६१५) एक मराठी कवि. हा गाल्वगोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. बेदरच्या बाहामनी पातशाहींतील नारायणगांवचा राहणारा. याच्या बापाचें नांव दिगंबरपंत; आईचें नांव पार्वतीबाई. हा दिगंबरदत्तोपासक व नाथसांप्रदायी होता. यानें पुष्कळ प्राकृत व संस्कृत ग्रंथ केले आहेत. त्यांपैकीं कांहीं खालील आहेतः १ गीतार्णव (अध्याय १८), २ गीतार्थबोध, ३ अवधूतराज, ४ ग्रंथराज, ५ प्रबोधोदय (पूर्वार्ध), ६ प्रबोधोदय (उत्तरार्ध), ७ स्थूलगीता, ८ वाक्यवृत्ति (गद्य), ९ पंचीकरण (अडीच हात पासोडीवर लिहिलेलें), १० सदार्णव, ११ दत्तात्रेयमाहात्म्य, १२ गीताभाष्य (अ. १८), १३ सार्थगीता, १४ अवधूतगीता, १५ अनुगीता, १६ दत्तात्रेयसहस्रनामस्तोत्र, १७ दत्तात्रेयदशनामस्तोत्र, १८ दत्तात्रेयद्वादशनामस्तोत्र, १९ दत्तात्रेयषोडशनामस्तोत्र २० दत्तात्रेयशतनामस्तोत्र, २१ नामामृतस्तोत्र, २२ गीतास्तोत्र, २३ प्रबंधस्तोत्र, २४ गीतप्रबंधस्तोत्र, २५ सिद्धदत्तात्रेयस्तोत्र २६ शिवस्तोत्र, २७ गुरुस्तोत्र, २८ षोडशस्तोत्र, २९ शीतज्वरनिवारणस्तोत्र, ३० भक्तकवच, ३१ वज्रपंजरकवच ३२ सहस्रनामटीका, ३३ दत्तात्रेयनामावळी, ३४ दश, द्वादश व शतनामावली, ३५ मंगलमूर्ति, ३६ वाचिकपूजा, ३७ महापूजा, ३८ मानसिकपूजा, ३९ वेदोक्तपूजा, ४० वैदिकपूजा, ४१ मंत्रपूजा, ४२ सिद्धमालामंत्रस्तोत्र, ४३ उषःकालस्तोत्र, ४४ षोडशअवतारस्तोत्र, ४५ वेदपादाख्य, ४६ षड्गुरुस्तोत्र, ४७ षोडशदलयंत्र, ४८ अत्रिपंचकप्रधानयंत्र. यांपैकीं कांहीं ग्रंथ प्राकृत व कांहीं संस्कृत आहेत (महाराष्ट्रकविचरित्र, भा. १, पृ. १३-३४). हा एकच सत्पुरुष असा दिसतो कीं ज्यानें संस्कृत व प्राकृत या दोहींमध्यें सारखीच व पुष्कळ ग्रंथरचना केली. याची प्रसिद्धी एकनाथाच्या खालोखाल आहे. यानें शके १५३७ मध्यें माघ व. ६ स समाधि घेतली. या वेळेस याचें वय ६४ वर्षांचें होतें. याची समाधि जोगाईच्या आंब्यास आहे.

दाहरसीय—(स. ६४६-५६ सुमार) हा सिंधच्या राजा चचाचा मुलगा. चचाच्या मागें त्याचा भाऊ चंद्र सात वर्षें गादीवर होता. चंद्र वारल्यावर चचाचा एक मुलगा अरोरास गादीवर बसला. चंद्राचा मुलगा धुराज ब्राह्मणाबादेस गादीवर आला. पण तो एक वर्षांतच मेल्यानंतर हा त्याच्या गादीवर बसला. याची एक बाई नांवाची बहीण होती. तिचें लग्न ज्याच्याशीं होईल तो सिंधचा राजा होईल असें भविष्य असल्यामुळें दाहरनें आपल्या बहिणीशीं कृतक लग्न लावलें, पण तें याला पसंत नव्हतें. नंतर हा देवीनें मेला.

दाहिर—(स. ६४५-७१२) सिंधचा हिंदु राजा. हा चचाचा मुलगा. जात ब्राह्मण. याचा उच्चार दाहर असाहि केलेला आढळतो. सिंध प्रांताला लागून असणाऱ्या खिलापत प्रांताचा सुभेदार हज्जाजशीं झालेल्या तक्रारींत यानें त्याला अनेक वेळां पराभूत केलें होतें. तेव्हां इमाद उद्दीन मुहम्मद नांवाच्या सतरा वर्षें वयाच्या सेनापतीस याच्यावर तयारीनिशीं रवाना करण्यांत आलें. तो शिराझ मक्कान मार्गें येऊन देबाळ बंदरापाशीं लढाईच्या तयारीनें राहिला. यानेंहि जोरानें तोंड देण्याचा प्रयत्न केला. पण रावरजवळच्या लढाईंत एक जळता बाण याच्या हत्तीवर टाकल्यानें हत्ती बिथरला व तळ्यांत शिरला. हत्ती बिथरूं लागल्यामुळें हा घोड्यावर बसत असतां एका अरबाच्या तलवारीला हा बळी पडला; व धारातीर्थीं पडल्यावर हिंदूंच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें सर्वांनीं पळ काढला. आणि हिंदुस्थानांत मुसलमानांचा प्रवेश होऊन जाळपोळ, लुटालूट, रक्तपात आणि जबरीनें मुसलमान करण्याचें युग सुरू झालें. अनेक हिंदु स्त्रियांस दमास्कसला पाठविलें आणि याची राणी लाडी हिच्याशीं मुहम्मदानें निक्का लावला.

दिद्दा—काश्मीरच्या दिर्वार घराण्यांतील एक राणी.

दिनकर—(स. १३८५) हा एक रघुवंजावरील टीकाकार होय. याची वरील टीका ही चरित्रवर्धनाच्या रघुवंशावरील टीकेचाच संक्षेप (सारग्रंथ) होय, असें रा. नंदर्गिकर यांनीं म्हटलें आहे.

२. (स. १८१८) यानें गूढप्रकाशिका नांवाची टीका मुकुंद दैवज्ञाच्या 'उपचारसार' या नांवावर केली आहे.

३. (स. १७५८) 'शिवरात्रि' वगैरे लिहिणारा मराठी कवि (मं. श. १८३६ वा. इ. ले. ८२).

४. दिनकर व श्री. माधवराव पेंडसे यांनीं लिहिलेले बरेचसे ग्रंथ पुणें येथील आनंदाश्रमांत आहेत. हा

पुण्याचाच रहिवासी होता. याच्या पित्याचें नांव अनंत व गोत्र शांडिल्य होय. यानें ग्रहविज्ञानसारणी, मासप्रवेशसारणी, ग्रहणांकजाल वगैरे ९ ग्रंथ लिहिले आहेत (भा. ज्यो.).

५. याचे खेटकसिद्धि आणि चंद्रार्की असे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. या ग्रंथांतून ग्रहांचें स्पष्टीकरण केलेलें आहे. चंद्रार्की ग्रंथाचे एकंदर श्लोक ३३ आहेत. तींत फक्त चंद्रसूर्यस्पष्टीकरणार्थ फळसारण्या ग्रंथासमावेत असाव्या असें दिसतें. यानें 'गुर्जरप्रदेशबीज' असें म्हणून एक बीजसंस्कार दोन्ही ग्रंथांत दिला आहे. त्यासच कोठें कोठें रामबीज म्हटलेलें आढळतें (भा. ज्यो. पा. २७७).

दिनकर गोसावी—यांना बहिणाजी असेंहि म्हणत. यांच्या पित्याचें नांव नरहर गोसावी. नगरजवळ भिंगार येथील पाठक उपनांवाच्या शुक्लयजुर्वेदी ब्राह्मणाच्या कुळांत यांचा जन्म झाला. पाठक आतां 'मुळे' असें आडनांव लावतात. यांचे पूर्वज भगवद्भक्त असून नरहर पाठक हे चांगले वेदशास्त्रसंपन्न असून गणपतीचे उपासक होते. यांच्या मातेचें नांव द्वारकाबाई. पुढें यांनीं भिंगारच्या पूर्वेस १३-१४ कोसांवर डोंगरांत वृद्धेश्वर (म्हातारदेव) देवाचें स्थान आहे, तेथें बारा वर्षे तपश्चर्या केली. तेथें शके १५७५ च्या फाल्गुनी पौर्णिमेस यांना समर्थ रामदासांचा साक्षात्कार झाला; व पुढें एक वर्षानें भातवडी येथें समर्थांनीं अनुग्रह दिला; व सीतायुक्त राममूर्ति दिली. ती तींसगांवीं स्थापिली आहे. हे समर्थांच्या चौदा महंतांपैकीं एक होता. यांचा ग्रंथ स्वानुभव-दिनकर (समाप्तिकाल स. १६९४). हा यांचा ग्रंथ सत्कार्योत्तेजकसभेनें प्रसिद्ध केला आहे (ओवीसंख्या ६७५०). याशिवाय अभंग व पदें ७५० आहेत. यांची हिंदीतहि कांहीं कविता आहे. यांनीं भागवतग्रंथ केल्याचा निर्देश सांपडतो. यांचा पुत्र रामचंद्र. शके १६१७ पर्यंत दिनकरांचा उल्लेख सांपडतो. पुढें रामचंद्राचा उल्लेख येतो (म. क. च. भा. ३, पा. ८०-१००).

दिनचिंतामणि—कुलोत्तुंग चोलाची पत्नी.

दिलशाद आगा—(इस्माईल आदिलशाह पाहा).

दिलावरअली—(मृत्यु स. १९-६-१७२०) माळव्याचा सुभेदार. हा खांडवा येथें निजामाशीं लढत असतां पडला (मु. रि. भा. २, पृ. ३९९).

दिलावरखान—(२ इब्राहीम आदिलशाह पाहा).

२. (अमीशाह व हुशंगशाह पाहा).

दिलेरखान—आदिलशाही बुडाल्यावर हा औरंगझेबाकडे आला. हा मराठ्यांविरुद्ध पुष्कळ वेळां लढला. यानेंच शिवाजीस फसवून दिल्लीस नेलें. ही याची पदवी आहे. याचें नांव अबदुल.

दिल्लीचे बादशाह

तुर्कवंश

१ शहाबुद्दीन घोरी (स. ११९२).

गुलामवंश

१ कुतुबुद्दीन ऐबक (१२०६), २ आरामशाह (आरम) (१२१०), ३ शम्सुद्दीन अल्तमश (१२१०), ४ रुक्नुद्दीन फीरूजशाह (१२३६), ५ रझिया (बेगम) (१२३६), ६ मुइजुद्दीन बहरामशाह (१२४०), ७ अलाउद्दीन मसूदशाह (१२४२), ८ नासिरुद्दीन महमूदशाह (१२४६), ९ घियासुद्दीन बल्बन (१२६६). १० मुइजुद्दीन कैकूबाद (१२८७).

खल्जीवंश

१ जलालुद्दीन फीरूजशाह (१२९०), २ रुक्नुद्दीन इब्राहीमशाह (१२९६), ३ अलाउद्दीन मुहम्मदशाह (१२९६), ४ शहाबुद्दीन उमरशाह (१३१६), ५ कुतुबुद्दीन मुबारकशाह (१३१६), ६ नासिरुद्दीन खुसरोशाह (१३२०).

तुघ्लकवंश

१ घियासुद्दीन तुघ्लकशाह पहिला (१३२०), २ मुहम्मद (१३२५), ३ फीरूजशाह (१३५१), ४ घियासुद्दीन तुघ्लकशाह (दुसरा) (१३८८), ५ अबूबकरशाह (१३८९), ६ मुहम्मदशाह (१३८९), ७ सिकंदरशाह (१३९४), ८ महमूदशाह (१३९४), ९ नसतरशाह (१३९५), १० महमूदशाह (दुसऱ्यांदा) (१३९९), ११ दौलतखां लोदी (१४१२).

सैयदवंश

१ खिजरखां (१४१४), २ मुइजुद्दीन मुबारकशाह (१४२१), ३ मुहम्मदशाह (१४३४), ४ आलिमशाह अलाउद्दीन (१४४३).

लोदीवंश

१ बहलोल लोदी (१४५१), २ सिकंदर लोदी (१४८६), ३ इब्राहिम लोदी (१५१७).

मोगलवंश

१ बाबर (१५२६), २ हुमायून (१५३०).

सूरवंश

१ शेरशहा (१५३९), २ इस्लामशाह (१५४५), ३ मुहम्मद आदिलशाह (१५५२), ४ इब्राहीम सूर (१५५३), ५ सिकंदरशाह (१५५५).

मोगलवंश (दुसऱ्यांदा)

१ हुमायून (दुसऱ्यांदा) (१५५५), २ अकबर (१५५६), ३ जहांगीर (१६०५), ४ शाहजहान (१६२८), ५ औरंगजेब (आलमगीर) (१६५८), ६ बहादूरशाह (शाहअलम पहिला) (१७०७), ७ जहांदरशाह (१७१२), ८ फर्रुख्सियर (१७१३), ९ रफिउद्दरजत (१७१९), १० रफिउद्दौला (१७१९), ११ मुहम्मदशाह (१७१९), १२ अहमदशाह (१७४८), १३ आलमगीर (दुसरा) (१७५४), १४ शाहजहान (दुसरा) (१७५९), १५ शाहआलम (दुसरा) (१७५९), १६ अकबर (दुसरा) (१८०६), १७ बहादुरशहा (दुसरा) (१८३७).

दिवाकर—(जन्म स. १६०६) हा गोलग्राममध्यें राहणाऱ्या नृसिंहाचा पुत्र. याचें बहुतेक अध्ययन याचा चुलता शिव याजपाशीं झालें.

वयाच्या १९ व्या वर्षी यानें 'जातकमार्गपद्म' नांवाचा जातक ग्रंथ केला. केशवी जातकपद्धतीवर ह्यानें प्रौढमनोरमा नांवाची टीका शके १५४८ मध्यें केली. त्यानंतर जातकपद्धतीवर 'गणिततत्त्वचिंतामणि' नांवाची टीका लिहिली. त्याचप्रमाणें पंचांग-साधक मकरंद ग्रंथावर याची 'मकरंदविवरण' नांवाची सोदाहरण टीका आहे. व्याकरण, काव्य, साहित्य इत्यादिमध्यें हा प्रवीण होता (भा. ज्यो.).

२. भास्कर कवीचा पिता. आचारार्क ग्रंथाचा कर्ता.

दिवाकर पुरुषोत्तम ऊर्फ देवाजीपंत चोरघोडे– (स. १७०१-१७८१) हा महाराष्ट्रांतील साडेतीन शहाण्यांपैकीं एक. हा ऋ. दे. ब्राह्मण असून नागपूर प्रांतांतील नरखेडचा राहणारा.

हा प्रथम कोन्हेरराम कोल्हटकराकडे असून अंगहुशारीनें भोसल्यांच्या कारभारांत उदयास आला. चिमुरला यांनीं बांधलेलीं कांहीं देवालयें आहेत. पण हा नरखेडचाच राहणारा होय. भोसले हे नेहमीं पैशाच्या अडचणींत असत. यांनीं अनेक सावकार आपल्या लगामी ठेवून भोसलेशाहीचा सर्व कारभार मोठ्या चातुर्यानें आपल्या ताब्यांत ठेवला होता.

हा जानोजी भोसल्याचा मुख्य कारभारी. हा जानोजी भोसल्यास रघुनाथदादाशीं व निजामाशीं कारस्थानें करण्याचा सल्ला देतो म्हणून हा जानोजी भोसल्याचे तर्फेनें पेशव्याशीं बोलणें करण्यासाठीं आला, तेव्हां याला पेशव्यांनीं पकडून कैदेंत ठेविलें. पण तेथेंहि जानोजी पुण्यावर चाल करणार असा खोटा पत्रव्यवहार माधवरावाच्या हातीं पडेल असा तयार करून यानें आपली सुटका करून घेतली (स. १७६९). इंग्रज नेहमीं यास जाळ्यांत पकडण्यास पाहत असत. पण हा कसलेला मुत्सद्दी त्यांच्या जाळ्यांत सांपडला नाहीं असें दिसून येतें. पुढें हा मुधोजीचा कांहीं दिवस कारभारी झाला. हा वयाचे ८० व्या वर्षी मरण पावला. मरतेसमयीं यास मूल नव्हतें (ना. प्रां. इ.).

दिवाकरसेन वाकाटक—(स. ३९५-४०५) हा दुसऱ्या रुद्रसेन वाकाटकानंतर गादीवर आला. हा प्रभावती गुप्ताचा हस्तक होता.

दिंडिक—(स. ८४०-७८) गंग-बाण घराण्यांतील दुसऱ्या शिव-माराचा मुलगा. जेरिंग आणि नाग-दंत या राजपुत्रांचें राष्ट्रकूट घराण्यांतील पहिल्या अमोघवर्षाच्या हल्ल्यापासून यानें संरक्षण केलें. पुढें स. ८७८ मध्यें पांड्य घराण्यांतील वर-गुण याचा पराभव केला. याच्यानंतर याचा मुलगा मारसिंह १ ला हा गादीवर आला (B.).

दिं(दिङ्)नाग—(स. ५०० सुमार) एक नैयायिक. दक्षिण हिंदुस्थानांत कांचीनगरीजवळ सिंहवक्त्र नांवाच्या गांवीं याचा जन्म झाला. हा ब्राह्मण असून यानें बौद्धधर्माची दीक्षा घेतली आणि हा नागदत्त नांवाच्या बौद्धाचा शिष्य झाला. नागदत्त हा वात्सीपुत्रीय नांवाच्या हीनयान सांप्रदायांपैकीं होता. यानें या सांप्रदायाचें चांगलें अध्ययन करून हा महायान सांप्रदायांत शिरला; व आचार्य वसुबंधूचा शिष्य झाला. वसुबंधूजवळ यानें सर्व महायान सांप्रदायाच्या ग्रंथांचें अध्ययन केलें. महायानविद्येची अधिष्ठात्री देवता मंजुश्री याला प्रसन्न झाली आणि तिच्या कृपनें हा त्या विद्येंतील असामान्य पंडित झाला. याची कीर्ति ऐकून याला नालंदा येथें बोलावलें गेलें व तेथें यानें सुदुर्जय नांवाच्या ब्राह्मण पंडिताचा पराजय केला. अशाच अनेक पंडितांचा पराजय केला म्हणून यास तर्कपुंगव अशी पदवी मिळाली. ओरिसा व महाराष्ट्रांत हिंडून यानें अनेकांच्या मतांचें खंडन केलें. महाराष्ट्रांत हा ज्या बिहारांत राहत असे त्याला आचार्यविहार असें म्हणत. ओरिसा प्रांतांत भाद्रपालित नांवाच्या राजमंत्र्याला यानें बौद्धधर्माची दीक्षा दिली. हा विद्वान्, बुद्धिमान् आणि मोठा आचारशील होता. नालंदाच्या विद्यालयांत यानें सर्वांचा पराजय केला म्हणून यास पंडितोष्णीष नांवाचें एक अपूर्व शिरोभूषण मिळालें होतें.

याचा सुप्रसिद्ध ग्रंथ 'प्रमाणसमुच्चय' हा होय. आंध्र देशांत वेंगीच्या जवळ असणाऱ्या निर्जन पर्वतावर हा ग्रंथ

यानें लिहिला. 'प्रमाणसमुच्चय' हा ग्रंथ म्हणजे यानें वेळोवेळीं शास्त्रविषयक केलेल्या श्लोकांचा संग्रह होय. सर्व श्लोक अनुष्टुप् वृत्तांत आहेत.

या ग्रंथाचें तिबेटी भाषांतर झालेलें आहे, त्यावरूनच याचा पत्ता लागतो. हेमवर्मा नांवाचा एक भारतीय बौद्ध पंडित होता. त्यानें या ग्रंथाचें तिबेटी भाषेंत भाषांतर केलें. प्रमाणसमुच्चयाचे खालील परिच्छेद आहेतः

१ प्रत्यक्ष, २ स्वार्थानुमान, ३ परार्थानुमान, ४ त्रिरूपहेतु, ५ प्रत्यक्ष, उपमान व शब्दखंड, ६ जात्युत्तरविचार.

ईश्वरकृष्ण आणि दिङ्नाग यांच्यांत तीव्र विरोध होता. यासंबंधीं पुढील आख्यायिका आहे. दिङ्नागानें प्रमाणसमुच्चयाला पहिला श्लोक लिहिला तो त्याच्या गैरहजरींत ईश्वरकृष्णानें अनेक वेळां फाडून टाकला. तेव्हां यानें श्लोक लिहून श्लोक फाडणाराला वादाचें आव्हान लिहून ठेवलें. तेव्हां ईश्वरकृष्णाशीं वाद होऊन त्यांत त्याचा पराभव झाला. शर्तीत ठरल्याप्रमाणें त्यानें बौद्धधर्माचा स्वीकार न करितां याच्या मठाला आग लावून दिली. त्यामुळें दिङ्नागालाहि पश्चात्ताप झाला. एका माणसाला आपल्या मताकडे आपणास वळवतां आलें नाहीं, मग जगावर आपण काय परिणाम करणार ? असा विचार मनांत येऊन यानें 'प्रमाणसमुच्चय' ग्रंथ लिहिण्याचें सोडलें. पण मंजुश्रीनें प्रेरणा दिल्यावरून यानें तो ग्रंथ पुरा केला.

ब्राह्मण नैयायिक उद्योतकरानें न्यायवार्तिकाच्या प्रारंभीं यास कुतार्किक म्हटलें आहे. वाचस्पतिमिश्रानें याला 'भ्रांत भदंत' म्हटलें आहे. मल्लिनाथानें याला 'अद्रिकल्प' असें विशेषण दिलें आहे. कुमारिलभट्ट, पार्थसारथी, सुरेश्वराचार्य तसेंच प्रभाचंद्र व विद्यानंद या जैनांनीं याच्याविरुद्ध लिहिलें आहे. अशा आघातामुळें याचे ग्रंथ भारतांतून नष्ट झाले तरी तिबेटांत सुरक्षित आहेत.

हा स. ५०० च्या सुमारास हयात असावा. याचे गुरु आचार्य वसुबंधु स. ४८० मध्यें जिवंत होते. याच्या दोन ग्रंथांचा अनुवाद स. ५५७–५६९ मध्यें चिनी भाषेंत झाला. हा आंध्र देशांत जन्मास आला तेव्हां दक्षिणेत पल्लवांचें आधिपत्य होतें. पल्लव राजे बहुतेक बौद्ध होते.

कालिदासानें मेघदूताच्या चौदाव्या श्लोकांत (दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावलेपान्) दिङ्नागाचा निर्देश केला आहे, असें दक्षिणावर्त व मल्लिनाथ यांनीं म्हटलें असलें तरी तसें वाटत नाहीं. सतीशचंद्र विद्याभूषण व प्रो. मिराशी यांचेंहि असेंच मत आहे (वंगीयसाहित्यपरिषद्पत्रिका, ऑगष्ट १९१५).

डॉ. कीथ, प्रो. मक्डोनेल वगैरेंच्या मतें दिङ्नाग स. ४०० च्या सुमारास होऊन गेला.

याचे ग्रंथ—१ प्रमाणसमुच्चय, २ न्यायप्रवेश, ३ हेतुचक्रहमरु (?), ४ प्रमाणसमुच्चयवृत्ति, ५ प्रमाणशास्त्रप्रवेश, ६ आलंबनपरीक्षा, ७ आलंबनपरीक्षावृत्ती, ८ त्रिकालपरीक्षा, ९ कुन्दमाला (नाटक).

पण हे सर्व ग्रंथ तिबेटी भाषांतरावरून संस्कृत भाषेंत होते असें ठरतें (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ७८–८०). संस्कृत कुन्दमाला नाटक मात्र मद्रास येथें प्रसिद्ध झालें आहे. भवभूतीचें उत्तररामचरित्र याच्याच नाटकावरून लिहिलें आहे असें कांहीं लोक म्हणतात.

दीन कवि– (स. १७०० सुमार) मराठी कवि. याचें 'पंचीकरण' नांवाचें एक काव्य आहे. या ग्रंथाचीं १८ प्रकरणें आहेत. हा कवि तुकारामबोवांच्या अनुग्रहीत बहिणाबाईंचा शिष्य होता (मं. वा. इ. शके १८३७ ले. १४९).

दीनकृष्णदास—ओरिसा प्रांतांत राहणारा व रसकल्लोल ग्रंथाचा कर्ता.

दीनदयाळगिरि—(मृत्यु स. १८६५) एक हिंदी कवि. संस्कृत पंडित, स्थल बनारस. ग्रंथ-कल्पद्रुम, बागबहार, अनुरागबाग, दृष्टान्ततरंगिणी, वैराग्यदिनेश, अन्योक्तिकल्पद्रुम (क. कौ. १).

दीप—हिंदुस्थानांत आलेल्या चिनी प्रवाश्यानें हें नांव धारण केलें होतें. हा चीनमधून ब्रह्मदेशांत गेला. तेथें प्रव्रज्या घेऊन यानें दीप असें नांव धारण केलें. ब्रह्मदेशांतून हा लंकेला गेला व तेथून ताम्रलिप्त येथें आला. येथें यानें बारा वर्षे संस्कृत विद्येचें अध्ययन केलें. नंतर हा कुशनगरच्या परिनिर्याणस्तूपाच्या दर्शनाला गेला असतां तिकडेच मेला.

दीपंकर श्रीज्ञान—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं होय. हा वैशालीचा (बसाढ, जि. मुजफरपूर). हा कांहीं वर्षे भूतानमध्यें होता. यानें भूतानी भाषेंत कांहीं ग्रंथ लिहिले आहेत. त्यामुळें याला पुष्कळ द्रव्य मिळालें. यानें चर्यागीति (तं. १३।४४), धर्मगीतिका (तं. ४८।३४) व धर्मधातुदर्शनगीति (तं. ४७।४७), वज्रासनवज्रगीति वगैरे ग्रंथ लिहिले आहेत. हा बंगाली ब्राह्मण होता. हा हिमालयावरून तिबेटांत गेला. यानें तेथें बौद्धधर्माचा प्रसार केला.

दीपाबाई भोसले—तंजावरच्या थोरल्या व्यंकोजीची राणी. व्यंकोजी जेव्हां वडिलार्जित जहागिरीचा वांटा शिवाजीस देईना तेव्हां हिनें रघुनाथपंत हणमंते यांच्या मध्यस्थीनें सर्व प्रकरणाचा समाधानकारक निकाल लाविला. शिवाजीनें हिची स्तुति केली आहे. ही इंगळ्यांची मुलगी. हिच्या पोटीं शहाजी, सरफोजी व तुकोजी हे पुत्र झाले.

२. (१ उमाबाई भोसले पाहा).

दुर्गासिंह—(स. १००० सुमार) निरुक्तावरील टीकाकार.

२. (स. ११४५) हा जैन नव्हता. हा सव्यदी गांवचा स्मार्त ब्राह्मण. यानें गुणाढ्याला अनुसरून चंपूमध्यें पंचतंत्र लिहिलें आहे.

दुर्गादत्तमिश्र—(स. १५१५ सुमार) तत्त्वज्ञानाच्या न्याय व वैशेषिक विभागावर यानें न्यायबोधिनी नांवाचा ग्रंथ लिहिला.

दुर्गादास—बोपदेवाच्या व्याकरणविषयक काव्यकल्पद्रुमावर यानें धातुदीपिका नांवाची संस्कृतमध्यें टीका लिहिली.

दुर्गादास राठोड—(स. १६३८–१७२१) हा जोधपूरच्या जसवंतसिंहाचा दिवाण अजकर्ण ह्याचा मुलगा. हा अत्यंत थोर मुत्सद्दी, सदाचारी व शूर होता. औरंगजेबानें जसवंतसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र अजितसिंह ह्यास हस्तगत करण्याचा प्रयत्न केला तेव्हां यानें तो प्रयत्न निष्फळ केला, व अजितसिंहास मारवाडची गादी मिळवून देण्याचें काम अंगावर घेतलें. औरंगजेबाचा पुत्र अकबर यानें मारवाडवर स्वारी केली असतां त्याचें मन वळवून त्यास बादशहाविरुद्ध बंड करावयाला लावण्यास हाच कारणीभूत झाला. पण तो प्रयत्न अयशस्वी झाला. तेव्हां रजपूत नाहींतर मराठ्यांच्या साहाय्यानें औरंगजेबाच्या सत्तेला शह देण्याचा यानें व्यूह रचला, पण त्यांतहि याला म्हणावें तसें यश आलें नाहीं व अकबराला हिंदुस्थान सोडावें लागलें (संभाजी पाहा). अकबराचीं दोन मुलें, एक मुलगा व एक मुलगी, ह्याच्या ताब्यांत होतीं त्याबद्दल बादशहास फार खंत वाटे. ह्यानें दोन्ही मुलांस उत्तम प्रकारें शिक्षण दिलें होतें. पुढें बादशहाची व दुर्गादासची तडजोड होऊन जोधपूरचें राज्य त्याबद्दल बादशहानें अजितसिंहाचे हवालीं करावें व दुर्गादासनें दोन्ही मुलें बादशहाचे हवालीं करावीं असें ठरलें होतें. परंतु दोन्ही मुलें ताब्यांत आल्यावर बादशहानें ह्यास मेडत्याची जहागीर, नक्त नेमणूक, तीन हजारी मनसब व एक लाख रुपये देऊन राज्य देण्याचें नाकारलें; तेव्हां ह्यानें व अजितसिंहानें बादशहाशीं झगडा करून स्वपराक्रमानें राज्य परत मिळविलें. दुर्गादासाबद्दल खालील वचन रजपुतांत अद्यापि सर्वांमुखीं रूढ आहे: " ए माता पूत एसा जिन, जेसा दुर्गादास. "

दुर्गाबाई नाईक बारामतीकर—(लग्न स. १७७३) ही राघोबादादा पेशव्याला जानकीबाई नांवाच्या पहिल्या बायकोपासून झालेली कन्या. ही बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या पांडुरंग नांवाच्या मुलास दिली होती. आपल्या आईबापांनीं नारायणरावाला मारलें हें हिला आवडलें नाहीं. ही बारभाईच्या पक्षाची होती. हिचें लग्न स. ७-१२-१७७१ रोजीं झालें. ज्ञा. को. वि. ७ मध्यें ही आनंदीबाईची मुलगी म्हटलें आहे तें चूक आहे (पेशव्यांची बखर).

दुर्गाबाई भोसले—ही शरीफजी भोसल्यांची बायको. ही विजयराज विश्वासराव नांवाच्या जुन्नरच्या मराठे सरदाराची मुलगी.

२. कोल्हापूरच्या छत्रपति संभाजीची ही बायको होय. संभाजी मृत्यु पावल्यावर त्याची दुसरी बायको जिजाबाई हिनें स. १७६२ त दत्तक घेऊन कोल्हापूरचे गादीवर बसविलेला शिवाजी केवळ पांच वर्षांचा होता. ता. १७–२–१७७३ रोजीं जिजाबाई वारली. तोंपर्यंत तेथील कारभार तीच करीत होती.

जिजाबाईच्या मरणसमयीं शिवाजी जरी पंधरा वर्षांचा झाला होता तरी राज्याचें काम पालक नात्यानें जिजाबाईची सवत दुर्गाबाई ही पाहूं लागली होती, व हिच्या हुकमतीखालीं कच्चा कारभार येसाजी कुसाजी शिंदे पाहत होता. स. १७७७ मध्यें महादजीनें कोल्हापूरकरांचे राज्यावर स्वारी केली. महाराणी दुर्गाबाई कोल्हापुरांत राहून महादजीशीं टक्कर देण्याची कसून मेहेनत करीत होती.

ही मरण पावली तेव्हां शिवाजीमहाराजाचें वय २१ वर्षांचें असून, पुढें त्यानेंच सर्व कारभार आपल्या हातीं घेतला (म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. ४५६, ४६४).

दुर्गावती राणी—(स. १५६४) चंदेल्ल रजपूतवंशीय महोबाचा राजा सालवाहन याची ही कन्या. ही फार सुंदर होती. गढामंडळ येथील रजपूत कच्छवाहशाखीय दलपत या राजास ही दिली होती. हा लग्नानंतर ४–५ वर्षांनीं मेला. हिनें नारायण नांवाच्या आपल्या मुलाच्या नांवानें राज्य चालविलें. अकबरानें निष्कारण हिच्यावर आसफखानास सैन्य देऊन पाठविलें. ही हत्तीवरून लढत होती. लढाईत आपला निभाव लागत नाहीं असें पाहून हिनें खंजीर खुपसून आपला प्राणत्याग केला (मु. रि. भा. २ रा, पृ. ६७).

दुर्जय काकतीय—हा करिकाल काकतीयाचा पुत्र.

दुर्लभदेवी—ही पश्चिम चालुक्यांपैकीं पुलकेशीची पत्नी.

२. (दुर्लभराज सोळंकी पाहा).

दुर्लभराज सोळंकी—(राज्यकाल स.१००९-२१) गुजराथच्या चामुंडराज सोळंकीचा हा पुत्र. हा आपला थोरला भाऊ वारल्यानंतर गादीवर आला. याचें लग्न नाडौलचा राजा महेंद्र चौहान याच्या दुर्लभदेवी नांवाच्या बहिणीशीं झालें होतें. गझनीच्या महमूदानें भीमदेवाचा पराभव करून याला अनहिलवाडच्या गादीवर बसविलें. यानें लाट देशावर स्वारी केली. हा साधुवृत्तीनें राहत असे. याचा उत्तराधिकारी याचा धाकटा भाऊ नागराज याचा पुत्र भीमदेव झाला.

दुर्लभवर्धन कर्कोटक—(स. ६०२-६७) काश्मीरचा राजा. हा राज्य करीत असतां ह्युएनत्संग काश्मीरांत आला.

दुर्विनीत गंग—(सनाचें पांचवें शतक) दक्षिण गंगकुलांतील एक राजा. याच्या शिलाशासनांत याला 'शब्दावतार' नांवाचा व्याकरणग्रंथ लिहिणारा, पैशाची भाषेंतील बृहत्कथेचें संस्कृतांत भाषांतर करणारा व भारवीच्या किरातार्जुनीय काव्याच्या पंधरा सर्गांवर टीका लिहिणारा अशीं विशेषणें लाविलीं आहेत (म्हैसूर आर्कालॉजिकल रिपोर्ट, १९१९, पा. ३६, इंडि. अँटि. ५.२३७; ७.१७४). देवनंदीचा शिष्य.

दुलह—(जन्म स. १७०३; काव्यकाल स. १७४२) एक हिंदी कवि. हा कालिदास त्रिवेदीचा नातू व उदयनाथाचा पुत्र. याचा 'कविकुलकंठाभरण' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. अलंकाराविषयीं हा प्रमाण मानला जातो. हा मार्मिक होता.

दूला रहिमानशाहा—(ईल पाहा).

दृढप्रहार यादव—(स. ८८० प्रारंभ) सेऊणदेश येथील यादव घराण्याचा संस्थापक.

यानें द्वारवतीहून येऊन चंद्रादित्यपूर (चांदूर) स्थापन केलें, असें म्हणतात. याच्यानंतर याचा मुलगा सेऊणचंद्र हा गादीवर आला (B.).

याच्या पित्याचें नांव सुबाहु दिसतें. यानें प्रथम महाराष्ट्रांत प्रवेश केला. हा प्रथम गिरनार येथें होता. सेऊण देश म्हणजे खानदेश होय. यांच्यापैकीं भिल्लमानें देवगिरीस साम्राज्य स्थापन केलें. नाशिकजवळचें श्रीनगर ऊर्फ सिन्नर ही यांची राजधानी. पण दुसरें मत चंद्रादित्यपूर ही राजधानी होय.

दृढबल—अग्निवेशतंत्रावर चरकानें संस्कार केला व चरकसंहितेवर यानें संस्कार केला, असें सध्यांच्या चरकसंहितेंत लिहिलें आहे.

दृष्टिज्ञान—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एक. यानें गीतिका (तं. ४८.१९), वज्रगीतिका (तं. ४८-१८) वगैरे ग्रंथ लिहिले.

देल्हण—आबूच्या परमारांपैकीं प्रतापसिंहाचा मंत्री. यानें स. (वि. सं.१३४४) मध्यें पाटनारायणाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला; व त्यावर ध्वजादंड चढवला (रा. इ.).

देव—काशींतील देव घराण्यापैकीं वैद्यनाथ पायगुंड्याचा हा जांवई होता.

२. खरतरगच्छांतील विसावा पुरुष.

३. यानें सुविधप्रदीप्तपक्षगच्छाची स्थापना केली.

४. (स. १२००) यानें 'कुसुमावली' नांवाची एक सुंदर कादंबरी (चंपू ?) लिहिली आहे.

५. दक्षिणेंतील महापांडित असें ह्युएनत्संग म्हणतो.

६. (जन्म स. १६७२) हिंदी कवि. हा इटाव्याचा सनाढ्य ब्राह्मण. ग्रंथ-- १ भावविलास, २ अष्टयाम, ३ भवानीविलास (भवानीदत्त वैश्याच्या नांवावर), ४ कुशलविलास, ५ देवचरित्र, ६ संस्कृतधर्मशास्त्रसार, ७ क्षेमचंद्रिका, ८ जातिविलास, ९ रसविलास, १० सुखसागर, ११ पालसविलास वगैरे ग्रंथ यानें लिहिले. याच्या ७२ ग्रंथांपैकीं एवढेच उपलब्ध आहेत. हा मोठा कवि आहे.

देवकीनंदन—(ग्रंथकाल स. १७८३-९९ सुमार) एक हिंदी कवि. हा कनोजजवळच्या मकरंदनगर गांवचा राहणारा. याच्या बापाचें नांव सबली शुक्ल असें होतें.

यानें वि. सं. १८४१ (स.१७८४) मध्यें 'शृंगारचरित्र' आणि वि. सं. १८५७ (स. १८००) मध्यें 'अवधूतभूषण' असे ग्रंथ लिहिले. याशिवाय यानें 'सरफराजचंद्रिका' हा ग्रंथ लिहिला. रट्टामऊ (जि. हरदहि) चा राजा जो अवधूतसिंह त्याच्या पदरीं असतांना यानें 'अवधूतभूषण' हा ग्रंथ केला. 'शृंगारचरित्र' यामध्यें रसभाव, नायिकाभेद आणि अलंकारहि आलेले आहेत.

देवगुप्त—तोरमाण (हूणांचा राजा) याचा जो गुरु जैन आचार्य हरिगुप्त, त्या हरिगुप्ताचा हा एक शिष्य होय.

हा मोठा विद्वान् आणि कवि होता. हा एक गुप्त राजघराण्यांतील होय. हर्षचरित्रांत असें आहे कीं हा देवगुप्त आणि माळव्याचा राजा हे दोघे एकच होत, कारण माळव्याच्या राजाचें नांव देवगुप्त असेंच होतें, पण याविषयीं निश्चितता नाहीं. कारण हा देवगुप्त जैनधर्मानुयायी असून जैन आचार्य हरिगुप्ताचा शिष्य होता.

२. (स. ६९९ सुमार) माळव्याच्या गुप्तांपैकीं हा माधवगुप्ताचा नातू. हा हर्षवर्धनाचा मित्र होता. याचा वध काश्मीरच्या ललितादित्यानें केला, ही गोष्ट वाक्पतीनें आपल्या ' गौडवहो ' या काव्यांत वर्णिली आहे. प्रथम हा शरण गेला असतां परिहासपूरनामक परिहासकेशवाच्या मंदिरांत शपथपूर्वक अभयवचन दिलें होतें, पण शेवटीं वध केलाच. पण त्याच्या स्वामिभक्त सेवकांनीं शारदादर्शनाच्या मिषानें काश्मीरांत प्रवेश करून ललितादित्य तेथें नसल्यानें परिहासकेशव समजून रामस्वामीच्या रौप्यमूर्तीचे कणाएवढे तुकडे केले.

देवण्णभट्ट--(स. ११२५-१२२५ सुमार) याचा ' स्मृतिचंद्रिका ' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ धर्मशास्त्रावर लिहिला आहे. यामध्यें संस्कार, व्यवहार, श्राद्ध, आशौच, वगैरेविषयीं माहिती दिलेली आहे. यानें प्रायश्चित्तावरहि बरेंच लिहिलें आहे. यानें स्मृतिचंद्रिकेमध्यें बहुतेक सर्व स्मृतिकारांचा उल्लेख केला आहे. विज्ञानेश्वराचाहि मोठ्या आदरपूर्वक उल्लेख केला आहे. कांहीं ठिकाणीं स्मृतिचंद्रिका व मिताक्षरा यांमध्यें भेद आहे. यानें स्मृतिचंद्रिकेमध्यें पुष्कळ ग्रंथांची व ग्रंथकारांची चिकित्सा करून त्यांच्या तत्त्वांचा नीट विचार करून नंतर आपलीं मतें दिलेलीं आहेत.

हा एक दक्षिणेकडील ग्रंथकार होता. दक्षिणेंत याच्या ग्रंथाला न्यायखात्यामध्यें फार मान दिला जातो. जरी याच्या ग्रंथाला दक्षिणेंत अग्रस्थान मिळालेलें असलें तरी याचा दर्जा, खुद्द मद्रास इलाख्यांतसुद्धां, मिताक्षरेहून कमी ठरतो. मुलाच्या पश्चात् आईबाप वारस ठरतात हें मिताक्षरेंतील मत यास पसंत नसून त्यावर यानें चिकित्सा केली आहे.

देवदत्त--एक शाक्यकुमार. हा आनंदादिकांबरोबर बुद्धदेवाकडे जाऊन त्यांचा शिष्य झाला होता. यानें भिक्षु लोकांच्याकरितां कठिण नियम केले, ते भिक्षूंवर लादून हा त्यांचा प्रमुख होऊं इच्छीत होता. पण बुद्धानें ते नियम मान्य केले नाहींत व याला प्रमुखत्वहि प्राप्त झालें नाहीं. त्यामुळें यानें आपला वेगळा संप्रदाय स्थापन केला आणि हा बुद्धापासून वेगळा झाला. यानें राजा अजातशत्रूला आपल्या कब्जांत घेतलें होतें आणि त्याचा पिता बिंबिसार याला त्याच्याकडून तुरुंगांत टाकलें. बिंबिसार हा बुद्धाचा भक्त होता. यानें बुद्धालाहि मारण्याचा प्रयत्न केला होता. हा आपल्या नखांत विष भरून बुद्धाला मारण्याकरितां गेला होता व वाटेंतच श्रावस्तीच्या तलावांत बुडून मेला. पालीग्रंथाप्रमाणें हा बुद्धाकडे क्षमा मागण्यास जात होता. याचे अनुयायी फाहियान याला आडळले होते. ते शाक्यसिंहाखेरीज सर्व बुद्धांना मानीत.

देवदत्ता—(महावीर पाहा).

देवदास (दादेगांवकर)—(स. १६०८-१६४८ सुमार) एक मराठी कवि. हा दादेगांव मठाचा मूळ संस्थापक. हा चैतन्यशिष्य देवदासाहून भिन्न होय.

' समर्थांची कविता, खंड १ ला ' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत धुळ्याचे रा. शंकरराव देव यांनीं व्यंकटेशस्तोत्राचा कर्ता देवदास व दादेगांव मठाचा संस्थापक देवदास हे दोघे भिन्न आहेत असें सिद्ध केलें आहे. रा. पांगारकर यांस ज्या पांचशें हिंदुस्थानी कविता मिळाल्या आहेत, त्यांवरून देखील हा चैतन्यशिष्य देवदासाहून निराळा आहे असें सिद्ध झालें आहे.

२. (चैतन्यशिष्य)—(स. १६५८-१६९८ सुमार) हा रामदास स्वामींचा शिष्य. हा व देवदास दादेगांवकर हे दोघे भिन्न होत. यानें १ ' व्यंकटेशस्तोत्र ', २ ' संतमालिका ' (स्तोत्र) अथवा ' करुणामृत ' (स्तोत्र), ३ 'गजेंद्रमोक्ष' इत्यादि काव्यें लिहिलीं. याचें कुलदैवत गिरीचा व्यंकोबा. याचें व्यंकटेशस्तोत्र अत्यंत प्रासादिक असून महाराष्ट्रांत लोकप्रिय आहे. प्रख्यात संतचरित्रकार उद्धवचिद्घन हा याचा समकालीन होता. याचे मुसलमानांसंबंधीं त्वेषाचे उद्गार वाचण्यासारखे आहेत (महाराष्ट्रकविचरित्र, भा. १ ला, पृ. २६२-६९). याला देवीदासहि म्हणत.

३. एक मराठी कवि. यानें भगवद्गीतेवर सुमारें अडीच हजार ओव्यांची टीका लिहिली आहे. या ग्रंथाची भाषा सुगम व सरळ आहे (मं. वा. इ. श. १८३७ ले. १६२).

देवनंदी—(पूज्यपाद पाहा).

देवनाथ—(स. १७५४-१८२१) एक मराठी कवि व महासाधु. वऱ्हाडांत शाहणूर नांवाच्या नदीतीरीं सुजी अंजनगांवीं स. १७५४ च्या सुमारास यांचा जन्म झाला. हे ऋग्वेदी वसिष्ठ गोत्री ब्राह्मण. यांना व्यंकटराव नांवाचा वडील भाऊ व सुंदरपंत नांवाचा धाकटा भाऊ होता. प्रथम वयांत यांना मल्लविद्येचा नाद असून यांनीं विवाह केला होता किंवा नाहीं याविषयीं मतभेद आहे. हे मारुतीचे उपासक असत. गोविंदनाथ नांवाच्या नाथपंथी सत्पुरुषानें यांना अनुग्रह दिला. हे सहज काव्य निर्माण करीत. हे कीर्तनास उभे राहिले म्हणजे पदें, अभंग, लावण्या जें काय सुचेल तें म्हणत. मुद्दाम कविता रचावयास हे कधींहि बसले नाहींत.

यांची सगळी कविता प्रासंगिक आहे. एकदां म्हटलेली कविता पुनः म्हणण्याचा प्रसंग यांना कधींच आला नाहीं. हे बडोद्यास असतां यांच्या आश्रयास चार ब्राह्मण राहिले. त्यांपैकीं दोघांनीं हे कीर्तन करीत असतां रचलेल्या कविता लिहून ठेवण्याचा प्रघात सुरू केला. त्यामुळें यांची कांहीं कविता उपलब्ध आहे. श्री. सवाई माधवराव पेशव्यांच्या मातोश्री गंगाबाई यांनीं यांचा अनुग्रह घेतला होता. यांनीं हिंदुस्थानांत बराच प्रवास केला होता. कीर्तनकार, वेदांती आणि साक्षात्कारी असा यांनीं लौकिक संपादला होता. शेवटीं यांनीं ग्वाल्हेर येथें कीर्तन करीत असतां मंडपाला आग लागली. तेव्हां निर्भयपणें न. गडबडतां कीर्तन पुरें केलें. इतक्यांत एका कुत्सित गृहस्थानें यांना म्हटलें 'नैनं दहति पावकः' तेव्हां यानें त्या गृहस्थाचा हात धरून 'पाहूं या अनुभव' असें म्हटलें. पण ब्राह्मण गयावया करूं लागल्यामुळें त्याला सोडून आपण 'तुज काय म्हणावें आम्ही । दयाळू नाथ जगाचा तूं स्वामी ।' हें पद म्हणून तेथेंच देह ठेवला (स. १८२१).

यांची बहुतेक कविता कटाव व पदें या स्वरूपांत असून यांतील थोडी काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झाली आहे. बाकीची सुर्जी येथील मठांत आहे. यांची कविता हिंदी व मराठी भाषांत असून अत्यंत रसाळ आहे. श्रावणाख्यान व कृष्णजन्म अशीं दोनच प्रकरणें आहेत. बाकी सर्व पदें व कटाव असें आहे. यांचें 'अमोल काया जाइल वाया' हें पद प्रसिद्ध आहे.

रंगनाथ व गोपाळनाथ या यांच्या दोन शिष्यांची कविता बरीच आहे (म. क. च. भा. १पा. ४०९-४३९).

देवनाथ ठक्कर— (स. १५६२) जयदेवानें गंगेशाच्या तत्त्वचिंतामणीवर लिहिलेल्या आलोकांतील उणेपणा भरून काढण्यासाठीं यानें 'तत्त्वचिंतामण्यालोकपरिशिष्ट' या नांवाचा ग्रंथ लिहिला (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४६०-४६१).

देवपाल—(स. ८२५-५० सुमार) बंगाल्यांतील पालांपैकीं धर्मपालाचा पुतण्या. हा त्यानंतर गादीवर आला (म. यु. भा. २, २३२).

हा पाल घराण्यांतील तिसरा राजा. हा सर्व पाल राजांत अतिशय बलिष्ठ होता. याचा सेनापति लवसेन यानें आसाम व कलिंग यांवर स्वारी करून ते देश जिंकले. हा बुद्धधर्माचा उपासक होता. यानें ४८ वर्षे राज्य केलें (J. A. S. B. Vol. I. XIII Part I, 1894 p. 41; Schiefer's Taranath p. 208-14). याचसुमारास जेजाकभुक्तीचा राजा यशोवर्मा चंदेल्ल यानें याचें मांडलिकत्व झुगारून दिलें. यानें ओरिसा जिंकला.

लोकेश्वरशतकाचा लेखक वज्रदत्त हा याचा आश्रित होता. आणि तारानाथाच्या मतें पंचक्रमतंत्राच्या तिसऱ्या भागाचा लेखक शाक्यमित्र हा याचा समकालीन होता (विंटरनिट्झ-हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर, भा. २).

याचा प्रधान धर्मपाणि. याच्या वेळीं वीरदेव नांवाच्या बौद्धभिक्षूनें एक इंद्रशिला पर्वतावर व दुसरें वज्रासन पर्वतावर अशीं मोठीं मंदिरें बांधलीं. यानें स. ८९० पर्यंत म्हणजे सुमारें ४० वर्षे राज्य केलें (मुंगेरचा ताम्रपट).

देवपाल परमार—(स. १२१८-४३ सुमार) माळव्याच्या परमारांपैकीं अर्जुनवर्म्याला पुत्र नव्हता म्हणून धाकट्या घराण्यांतील महाकुमार हरिश्चंद्रवर्म्याचा दुसरा पुत्र देवपाल हा माळव्याचा राजा झाला. यानें साहसमल्ल अशी पदवी धारण केली. याच्या वेळचे तीन शिलालेख आणि एक दानपत्र मिळालें आहे. याचा पहिला शिलालेख वि. सं. १२७५ होशंगाबाद जिल्ह्यांत हरसोडा गांवीं मिळाला आहे (इंडि.अँटि.२०. ३११). ग्वाल्हेर राज्यांतील उदयपुर येथें दोन मिळाले आहेत. ते अनुक्रमें वि. सं. १२८६ व १२८९ मधील आहेत (इंडि. अँटि. २०. ८३). याचें एक दानपत्र मांधाता येथें मिळालें आहे तें वि. सं. १२९८ भाद्रपद शुद्ध १५ चें आहे (एपि. इंडि. ९. १०८-१३). याच्या वेळीं वि. सं. १२८८-८९ मध्यें दिल्लीचा सुलतान शम्सुद्दीन अल्तमश यानें माळव्यावर स्वारी करून वर्षभर लढाई कली व ग्वाल्हेर येथें जय मिळवला, भेलसा व उज्जयनी घेतली व उज्जयनींचें मंदिर फोडलें. पण माळवा सुलतानाच्या ताब्यांत आला नाहीं. लूट करून सुलतान गेल्यावर माळव्याचा राजा देवपाल व राहिला (ब्रिग्ज, फिरिश्ता, पृ. १२०-२३). याच्या वेळीं वि. सं. १२८५ मध्यें नलकच्छपुर, धारपासून वीस मैलांवर असणारा नालकच्छगांव येथें 'जिनयज्ञकल्प' ग्रंथ, तसेंच वि. सं. १२९२ मध्यें 'त्रिषष्टिस्मृति' ग्रंथ यांची रचना केली व वि. सं. १३०० मध्यें सटीक धर्मामृतशास्त्र या ग्रंथाची रचना केली. तेव्हां धारचा राजा हा नसून जयतुगिदेव होता असें त्या ग्रंथाच्या शेवटच्या प्रशस्तींत म्हटलें आहे (श्लोक २८-३१). यावरून वि.सं. १२९८-१३०० पर्यंत याचा मृत्यु झालेला दिसतो. याला जयतुगिदेव व जयवर्मा असे दोन पुत्र होते ते क्रमानें राजे झाले (रा. इ.).

देवपाल प्रतिहार— (स. ९४८) कनोजच्या रघुवंशी प्रतिहारांपैकीं महीपालाचा पुत्र. याच्या वेळचा

म्हणजे वि. सं. १००५ (स. ९४८) चा एक शिलालेख मिळाला आहे. त्यांत यास परमभट्टारक, महाराजाधिराज व परमेश्वर असें म्हटलें आहे. याला क्षितिपालदेवाचा उत्तराधिकारी म्हटलें आहे. जर हा महीपालदेवाचा पुत्र असेल तर हा लहान असतां याचा चुलता विनायकपालानें राज्य लाटलें तें महेंद्रपालानंतर यास मिळालें.

देवप्रभसूरि—हा १२०० च्या सुमारास यानें 'पांडवचरित्र' नांवाचा ग्रंथ लिहिला. यांत संपूर्ण महाभारताची गोष्ट थोडक्यांत आणली आहे व कांहीं बदल केला आहे. त्यांत जैन अरिष्टनेमीची गोष्टहि घातली आहे (विंटरनिट्झ).

देवबोध—यानें महाभारताच्या काश्मीरी प्रतीवर टीका केली.

देवभद्र—(स. ११५० चा सुमार) हा जैन तर्कज्ञ हेमचंद्रसूरि व श्रीचंद्रसूरि या दोघांचा शिष्य होता. यानें ' न्यायावतारा'च्या ' वृत्तीवर ' न्यायावतारटिप्पण ' नांवाची टीका लिहिली आहे. याच्या या टीकाग्रंथांत ' विंध्यवासिन् ' धर्मकीर्ति, धर्मोत्तर, ज्ञानश्रीमित्र, इत्यादिकांचे उतारे आले आहेत (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. २११).

देवभूति शुंग—शुंग घराण्यांतील शेवटचा राजा. हा अतिशय कमकुवत असल्यामुळें याचा वसुदेव कण्व नांवाच्या ब्राह्मण प्रधानानें वध करून शुंग घराण्याची समाप्ति केली.

देवरनाय नींगरू—हा मचयसाहिनीचा पुत्र. यानें ओरिसाच्या गणपती राजापासून काकतीय वंशाचा बचाव केला. स. १३१४ मध्यें गणपतीनें वारंगळाला मोठ्या सैन्यासह वेढा दिला तेव्हां यानें त्याचा योग्य रीतीनें बचाव केला (एन्शन्ट डेक्कन, भा. १, पा. ३०३).

देवराज—रघुवंशी प्रतिहारांपैकीं नागभट्टाच्या बहिणीचा दुसरा मुलगा व ककुस्थाचा धाकटा भाऊ. हा परम वैष्णव होता. याच्या राणी भूमिकादेवीपासून वत्सराजाचा जन्म झाला.

२. बुंदी संस्थानचा राजा. याचें मूळ राज्य नाडोल येथें होतें. पण स. १३४२ च्या सुमारास यानें बुंदी शहर घेतलें. तेव्हांपासून याचा वंश तेथें राज्य करीत आहे.

देवराय संगम—(स. १४०६-१४२२) हा विजयनगरच्या दुसऱ्या हरिहर संगमाचा मुलगा व त्याच घराण्यांतील दुसऱ्या बुक्करायाचा भाऊ. याला एकंदर चार भाऊ होते. हा आपला भाऊ दुसऱ्या बुक्कराया च्या मागाहून विजयनगरच्या गादीवर आला. याला ' हेमाम्बिका ' आणि ' मल्लयव्वी ' अशा दोन बायका होत्या.

यानें एकदां शेतकऱ्याच्या रूपवती मुलीच्या प्राप्तीसाठीं सुलतानाशीं लढाई केली, असें फेरिस्तानें वर्णन केलें आहे. वरील लढाईंत यास हार खावी लागून मोठा अपमानास्पद तह करणें भाग पडलें. तहाप्रमाणें राजानें आपली मुलगी सुलतानास दिली असें फेरिस्ता म्हणतो. याच्यानंतर याचा मुलगा वीरविजय हा विजयनगरचे गादीवर आला.

२. (स. १४२२-४६) हा विजयनगरच्या वीरविजय संगमाचा पुत्र. याला सिद्धला व पोन्नला अशा दोन बायका होत्या.

याच्या कारकीर्दीत फार लढाया झाल्या. हा गादीवर आल्यावर फीरूझ बाहमनीबरोबर स. १४१९ मध्यें युद्ध सुरू झालें. सुलतानानें पानगळ किल्ल्यावर हल्ला करून लढाईस सुरुवात केली. शेवटीं हिंदु-मुसलमानांची लढाई होऊन तींत मुसलमानांचा पूर्ण पराभव झाला. पण यापुढील मुसलमानांच्या लढाईंत याला हार खावी लागून याला दिल्लीच्या सुलतानास मोठा नजराणा पाठवावा लागला.

नंतर यानें एक विद्वान् लोकांची सभा बोलावून त्या (सभेंत) ' आपणास वेळोवेळीं मुसलमानांचें थोडें सैन्य असतांहि हार खावी लागते. ' हा विषय चर्चेकरितां घेतला. तेव्हां सर्व लोकांचें मत असें पडलें कीं, मुसलमानांचे घोडे मजबूत व बळकट असतात आणि त्यांच्या सैन्यांत तिरंदाज लोक आहेत, व त्याच्या उलट आपली परिस्थिति आहे. हें मत ऐकल्यावर यानें आपल्या सैन्यांत मुसलमान तिरंदाज घेण्याचा हुकूम फर्माविला व आपल्या सैन्यास तिरंदाजीचें शिक्षण देण्याचे प्रयत्न सुरू केले. याची सबंध कारकीर्द मुसलमानांशीं लढण्यांत गेली.

हा अल्पवयींच गादीवर बसला. याला महाराजाधिराज राजपरमेश्वर अशीं पूर्ण सम्राट्पदद्योतक बिरुदें लाविलेलीं कांहीं शिलालेखांत सांपडतात. याचा नागण्णा नांवाचा महाअमात्यांपैकीं एक अमात्य होता.

देवराव महादेव हिंगणे—(मृत्यु स. १८०७ जून) महादेवभट हिंगण्याचा स. १७४४ त खून झाल्यावर त्याचे चार मुलगे, दामोदर, बापूजी, पुरुषोत्तम व देवराव दिल्ली व इतर ठिकाणीं वकिलातीच्या कामावर होते. रघुनाथरावच्या दिल्लीवरील स्वारींत त्याचा हिंगण्यांशीं बेबनाव झाला, त्याचें कारण समजत नाहीं. हिंगण्यांनीं रघुनाथरावास मेजवानी दिली, त्या वेळीं " दादासाहेब कोणते ? " असें विचारीत ते पंक्तींतून फिरले, म्हणजे त्यांच्या डोळ्यावर द्रव्याचा धूर आला

होता, अशी आख्यायिका आहे. यावरून यांच्या द्रव्यावर रघुनाथरावचा डोळा असावा असें अनुमान होतें. तीस वर्षांच्या पिढीजाद अनुभवानें हिंगण्यांची इभ्रत व ऐपत दिल्लींत फार मोठी असून, शत्रुमित्रावर छाप बसवून मराठशाहीचा पुरस्कार करण्यांत ते फार दक्ष होते. राजधानींतील पक्ष, घडामोडी, निरनिराळ्या व्यक्तींचे स्वभावविशेष व कावे इत्यादिकांचा योग्य विचार करून चौकसपणानें ते आपला मार्ग ठरवीत असत. फौजेच्या खर्चास अंताजीपंत पैसा मागूं लागला, तो हिंगण्यांनीं दिला नाहीं. तेव्हां अंताजीनें रघुनाथरावाचें मन बिघडविलें असावें. हिंगण्यांचीं कित्येक पत्रें मोठीं त्वेषाचीं आहेत (रा. खं. ६.५४५). होळकर—हिंगण्यांच्या हिशेबाचे कागद स.१७५२ ऑक्टोबरचे आहेत (रा. खं. ६.२५८, २६९ व २७३). हिंगण्यांचे सवालजबाब एकत्र पाहावयास मिळत नाहींत. परंतु लेखांक ४९९ आर्जवाचाच असून त्यांत हिंगण्यांची मागणी दाखल आहे. ले. ३८३ चें पत्र जरी स. १७५८ सालचें आहे, तरी त्यावरून रघुनाथरावचा हिंगण्यावरील राग चांगला व्यक्त होतो. हिंगण्याबरोबरील तंट्यास मूळ कारण अंताजी माणकेश्वर असून, पैशावरून अंताजीशीं हिंगण्याचा तंटा स.१७५० पासूनच वाढत गेला.

महादेवभटाचे चारहि मुलगे मोठे पराक्रमी निघाले. रघुनाथरावाशीं त्यांचें वांकडें आल्यामुळें त्यांची बरीच वाताहत झाली (रा. खं. १.१; ३.२३३; ६.१९८; ४९७, ४९९). तथापि हिंगण्यांशिवाय पेशव्यांचें चालणारें नव्हतें आणि माधवरावानें पुरुषोत्तम व देवराव यांस पुनः स. १७६९ त दिल्लीच्या वकिलातीवर स्थापिलें. पुरुषोत्तम महादेवानें हें काम चांगलें करून नाना फडणिसाची मर्जी संपादिली. तो स. १७८२ त दिल्ली येथें मृत्यु पावला (का. सं. प. या.२९३ जु. प्र.). यानंतर महादजी शिंद्यानें स्वतः दिल्लीचा कारभार हातीं घेतल्यावर हिंगण्यांचे वकिलीची जरूर राहिली नाहीं, आणि त्यांचे घराण्यास उतरती कळा लागली. तींतून ते सावरले नाहींत. पुरुषोत्तम मध्यंतरीं दादास सामील झाल्यामुळें माधवरावाचे रोषास पात्र झाला.

उत्तरकालीन दिल्लीच्या कारभाराचीं म्हणजे स. १७८०–९५ पर्यंतचीं हिंगण्यांनीं नाना फडणिसास लिहिलेलीं पत्रें इ. सं. त छापिलीं आहेत तीं वाचण्यालायक आहेत. इंग्रजांच्या हालचालीचा व दिल्लीतील बादशाहीच्या स्थितीचा त्यांवरून चांगला बोध होतो.

कनिष्ठ बंधु देवराव महादेव, अहिल्याबाई व तुकोजी होळकर यांचा तंटा मिटविण्याकरितां नानांचे सांगण्यावरून महेश्वरास गेला होता. त्या वेळीं यानें केलेल्या कामाचीं पत्रें 'होळकर दरबारांतील हिंगण्याची वकिली' या नांवानें इ. सं. त प्रसिद्ध झालीं आहेत. मराठ्यांचा वकील या नात्यानें देवराव स. १७६९ च्या सप्टेंबरांत बादशहासंबंधीं बोलणें करण्याकरितां सुजाउद्दौल्याकडे गेला होता.

पेशवे व हा यांत विरोध आल्यानें हा चंद्रचूडाकडे निंबगांवीं येऊन राहिला; व तेथेंच समाधिस्थ झाला. तेथें याची समाधि आहे. समाधीचा दिवस स. १८०७ जून २७ (श. १७२९ ज्येष्ठ व. ७ शनवार) असा एका विश्वसनीय टांचणावरून ठरतो.

याचे वंशज नाशिक जिल्ह्यांत चांदोरी येथें आहेत. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांत नागपूरकर देवाजीपंत चोरघोडे याची गणना नसून तो हा देवराव हिंगणेच होय, असें कांहीं संशोधकांचें म्हणणें आहे (मं. इ. वृ. १८३५ ले. ४४).

देवराव मेघश्याम लपाटे—हा राजज्ञाचा मुतालीक होता. हा दे. ऋ. ब्रा. होता. शाहूच्या अखेरीस हा राज्यकारभारांत होता. हा आनंदराव सुमंताचा व्याही होता. हा पेशव्यांचा विरोधी असून शाहूच्या अंतरंगांतला मुख्य इसम होता.

देवर्धि (क्षमाश्रमण) गणि—(सनाचें पांचवें शतक सुमार) एक मोठा जैनधर्मोपदेशक. हा वलभीच्या पहिल्या ध्रुवसेन मैत्रकाचा समकालीन होता. नंदीसूत्र, अनुयोगद्वारसूत्र यांसारख्या सिद्धान्तग्रंथांचा याला कर्ता म्हणण्यापेक्षां संग्राहक म्हणणें जास्त योग्य होईल (जैनिझम इन् नॉर्थ इंडिया). पांचव्या किंवा सहाव्या शतकांत वलभी येथें भरलेल्या जैनपरिषदेचा हा अध्यक्ष होता. त्या वेळीं नष्ट होऊं पाहणाऱ्या जैन-आगमांच्या पुनरुज्जीवनार्थ यानें फार श्रम केले. तेथें यानें लोकांच्या तोंडीं होते ते ग्रंथ 'एकादशांग' या नांवानें लिहून काढले. याच्या नंदीसूत्रांत चोवीस तीर्थंकर व अकरा गणधर यांची व एका थेरावलीची माहिती आहे. त्यांत दूसगणि हा याचा गुरु होता असें सांगितलें आहे.

देवलदेवी—(स. १३१८–२२) खिजरखानाची पत्नी असतां हिला राजपत्नीत्वाचा मान मिळाला नाहीं. पण त्यानंतर गादीवर आलेल्या मुबारिक खुस्रवानें गादीवर येतांच हिच्याशीं निका लाविला. पण घियासुद्दीन तुघ्लकनें मात्र हिला हालांतून सोडवून खुस्रवला निका लावण्याच्या कामीं मदत करणारास शिक्षा केल्या (कर्ण बघेल, खिजरखान खल्जी व अलफखान पाहा).

२. गुजराथच्या सोळंकीपैकीं त्रिभुवनपालाची मुलगी; व कुमारपालाची बहीण. हिला अजमीरच्या अर्णवराज चौहानाला दिली होती.

देववर्मा कदंब—यांचें व याच्या पित्याचें नांव देवगिरीच्या शिलालेखांत आढळतें. हा मानवगोत्री व जैनधर्मी होता.

देववर्मा चंदेल्ल—हा विजयपालाचा पुत्र; त्याच्या मागून गादीवर आला.

देववर्मा मौर्य—(ख्रि. पू. २०६-१९९) मौर्यवंशांतील शालिशूकानंतर हा मगधदेशाच्या गादीवर आला. भागवत व विष्णु या पुराणांत यांचें नांव सोमशर्मा असें दिलें असून याला शालिशूकाचा पुत्र म्हटलें आहे. पण वायु व ब्रह्माण्डपुराणांत यास इंद्रपालिताचा पुत्र म्हटलें आहे.

याच्या वेळीं ग्रीकांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर चालू होत्या. ख्रि. पू. २०० मध्यें बॅक्ट्रियाचा राजा डेमोट्रियस (यूथिमासचा पुत्र) यानें हिंदुस्थानावर स्वारी केली होती व त्यानें हिंदुस्थानच्या पश्चिमोत्तर भागावर सत्ता स्थापन केली.

देवशर्मा—हा अवंती नगरच्या सुमंत ब्राह्मणाचा पिता. यानें छत्तीस वर्षेपर्यंत देवीचें आराधन केलें असतांहि ती प्रसन्न झाली नाहीं. मग तिची प्रसन्नता विक्रमादित्यानें करून दिली (नाथलीला).

देवसूरि—(स.१०८६-११६९) हा देवसूरि जैनधर्मी श्वेतांबरपंथी असून मुनिचंद्रसूरीचा शिष्य होता. यानें तर्कज्ञानावर ' प्रमाणनयतत्त्वालोकालंकार ' नांवाचा ग्रंथ लिहून त्यावर स्वतःच ' स्याद्वाद-रत्नाकर ' नांवाची टीका लिहिली. गुजराथेंत अनहिलपुरपट्टण येथें जयसिंहदेवाच्या दरबारीं याचा व दिगंबरपंथी कुमुदाचार्य यांचा बायकांना निर्वाणपद मिळावितां येतें कीं नाहीं यावर वादविवाद होऊन त्यांत ह्यानें कुमुदाचार्याचा पराभव केला; व स्त्रियांनाहि निर्वाण मिळावितां येतें असें सिद्ध केलें (उपदेशमालाटीका). स. ११४७ मध्यें यानें एक मंदिर (चैत्य) बांधून (फलवर्धिग्राम) तेथें मूर्ति स्थापन केली व अरसाणा येथें नेमिनाथाची मूर्ति बसविली. ह्याच्या ग्रंथाची मांडणी माणिक्यनंदीच्या 'परीक्षामुखसूत्र' व 'प्रमेयकमल मार्तंडा' या ग्रंथांप्रमाणें आहे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक बॉल).

देवसेन भट्टारक—(स. ८९४-९५०) हा जैन तर्कज्ञ रामसेनाचा शिष्य असून यानें 'न्यायचक्र', ' दर्शनसार ' इ. ग्रंथ लिहिले.

देवसेन वाकाटक—(स. ४८५-९०) हा वाकाटकांपैकीं नरेंद्रसेनाचा पुत्र.

देवस्वामि—(स. १०००-१०५० सुमार) गार्ग्यनारायणाच्या टीकेचा उतारा हेमाद्रीनें घेतला आहे. या गार्ग्यनारायणानें देवस्वामिनच्या भाष्याचें अनुकरण केलें आहे.

यानें आश्वलायन श्रौतसूत्रावर भाष्य लिहिलें. भट्टोजीच्या चतुर्विंशतिमत यावरील टीकेंत याच्या मताचा उल्लेख केलेला आहे. स्मृतिचंद्रिकेमध्यें व्यवहार आणि अशौच यांविषयींचे याचे उतारे घेतलेले आहेत. याच्या मताप्रमाणें कुमारी मुलगी मेल्यास तिचें दहा दिवस सुतक पाळावें लागत असे. श्राद्धावरील याचीं मतें स्मृतिचंद्रिकेमध्यें आलेलीं आहेत.

यानें पूर्वमीमांसेच्या १२ अध्यायांवर थोडक्यांत टीका केलेली आहे. आणि संकर्षकाण्ड यामधील चार अध्यायांवर थोडक्यांत भाष्य लिहिलें आहे.

देवानंद—(स. १८४७ सुमार) काठेवाडांतील मुळी गांवचा गुजराथी कवि शिक्षा वगैरे ग्रंथाचा कर्ता.

देवानांप्रियतिष्य—हा सिंहलद्वीपचा राजा. हा प्रथम वैदिक होता. नंतर बौद्ध झाला. हा स. पूर्वी ३०७ वर्षे होता. याच्याच वेळीं महेंद्र व संघमित्रा हीं सिलोनमध्यें बौद्धधर्माचा प्रसार करण्यास गेलीं. दीपवंश व महावंश या दोन महाकाव्यांत या प्रसंगाचें वर्णन व सिलोनच्या राजांचा इतिहास दिला आहे (विंटरनिट्झ).

देवीदास—यानें राजनीति ग्रंथ संस्कृतांत लिहिला. हा काश्मीरी होता.

२. गुजराथी कवि. हा सोजंत्रा गांवीं राहत असे. यानें गोकुळ, मथुरा-वृंदावन इत्यादि ठिकाणची कृष्णलीला गुजराथींत वर्णिली आहे (काव्यदो.).

३. (देवदास पाहा).

देहनागादेवी–रघुवंशी प्रतिहारांपैकीं भोजाची माता.

देवेंद्रगणि—स. अकराव्या शतकांतील एक जैन टीकाकार. महाभारताचें जैन रूपांतर; उत्तराध्ययनावरील टीका (स. १०७३) व भववैराग्यशतक हे याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत (विंटरनिट्झ).

देवेन्द्रबोधि—(स. ६५० सुमार) यानें ' वार्तिकपंजिका ' नांवाची धर्मकीर्तीला अनुसरून टीका लिहिली (धर्मकीर्ति पाहा).

दोखंधिपा—यालाच द्विखंडि असें म्हणतात. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं पंचविसावा सिद्ध होय. जात ब्राह्मण

असून मणिधर (बघेलखंडांतील मैहरा) येथील राहणारा होय. हा सरहपा याच्या तिसऱ्या पिढींतील होय. यानें चतुरक्षरोपदेश (तं. ४२।१७) व महायानावतार (तं. ४८।६०) हे दोन ग्रंथ लिहिले.

दोद्दकृष्णराज ओडियार--(स. १७१४-३१) म्हैसूर संस्थानांतील कंठीरवराजाचा हा पुत्र होय.

दोद्द संकण्ण—(स. १५६० सुमार) हा केलडीचा सदाशिव नायकाचा मुलगा. याला चिक्कसंकण्ण या नांवाचा एक भाऊ होता. पण तो सावत्र असावा.

सदाशिव नायकाचा भाऊ जो भद्रप्पा नायक त्याच्यानंतर हा इक्केरीच्या गादीवर आला. याची कारकीर्द फार लहान आहे. याला, एका जंगम पुरोहितास मारल्याच्या आरोपावरून विजयनगरच्या रामरायानें पदच्युत केलें. त्यानंतर हा तीर्थयात्रा करण्यास गेला.

दोरव्वे आरसी—ही पिरीयचत्तरसाची पत्नी, व जोगरसाची आई. ही कलाभिज्ञ होती (एन्शन्ट डेक्कन).

दोवागर—(१ इब्राहीम आदिलशाह पाहा).

दोस्तअली—(स. १७३२ त नबाब पद) हा सादतखानाचा पुतण्या व कर्नाटकाचा नबाब होय. स. १७४० मध्यें मराठ्यांनीं कर्नाटकवर स्वारी करून दासुळचेरी घाटाजवळ याचा पराभव करून यास ठार मारिलें. यास सफदरअली नांवाचा एक मुलगा होता. याची मुलगी चंदासाहेबास दिली होती.

दोस्त मुहम्मदखान—(मृत्यु स.१७४० चा सुमार) हा तिन्हा अफगाण मुसलमान असून भोपाळ संस्थानचा संस्थापक होय. हा प्रथम औरंगजेबाचा नोकर होता, परंतु पुढें यास माळव्याची सुभेदारी व भैरसिया आणि नाशिराबाद येथील सरंजामी मिळाली. याच्या मागून याच्या मुहंमद नांवाच्या अज्ञान औरस पुत्रास पदच्युत करून याच्या यार-मुहंमद नांवाच्या दासीपुत्रानें गादी बळकाविली.

२. (स. १८०७-२१) पेंढाऱ्यांचा नायक.

दौलतखान—(२ खवासखान पाहा).

२. (इब्राहीम लोदी पाहा).

दौलतखान लोदी—(स. १४१३-१४) दिल्लीचा बादशाहा.

दौलत बाबुराव—हा सखाराम हरीचा पुतण्या. राघोबादादाचा हा एक हस्तक असून नारो शंकरानें फत्तेसिंगाचे मदतीस गुजराथेंत फौज पाठविली, तिला दादाच्या तर्फेनें यानें अडथळा केला (का. सं. प. या. ले. ५२).

दौलतराव शिंदे—(स. १७८०-१८२७) हा तुकोजीचा नातू व आनंदरावाचा मुलगा. महादजी शिंदे मेल्यावर याचें दत्तविधान करून पेशव्यांनीं यास शिंद्याचे गादीवर बसविलें (स. १७९४). याचा मुख्य कारभारी जिउबादादा बक्षी व तो मेल्यावर बाळोबा पागनीस. यानें दुसऱ्या बाजीरावाला गादीवर बसविण्याविषयीं त्याच्याशीं करार केला होता व त्याबद्दल सव्वा कोट रुपये घेण्याचें ठरलें होतें. पुढें हा पुण्यास आल्यावर यानें बाजीरावाचे सांगण्यावरून नानास कैद केलें (स. १७९७). पुढें ठरलेली रक्कम बाजीरावाकडून यास न मिळाल्यामुळें यानें पुण्यांतील लोकांचा अनन्वित छळ केला; व पैसे वसूल केले. याचें व बायांचें म्हणजे महादजी शिंद्यांच्या बायकांचें न पटल्यामुळें याचें त्यांच्याशीं युद्ध झालें व तींत याचा पराभव झाला, व शेवटीं यानें तह केला. याचें व यशवंतराव होळकराचें वितुष्ट होतें. तेव्हां याची व यशवंतरावाची नर्मदा नदीजवळ लढाई होऊन, तींत याचा पराभव झाला (स. १८०१). लॉर्ड वेलस्लीनें याच्याशीं तैनाती फौजेची पद्धत स्वीकारण्याबद्दल पुष्कळ वाटाघाटी केल्या, पण शेवटीं स. १८०३ मध्यें लढाई होऊन अहमदनगर येथें याचा पराभव झाला. पुढें याचा इंग्रजांशीं तैनाती फौजेचा तह होऊन त्यांच्या सर्व अटी यानें नाखुषीनें कबूल केल्या. पुढें यानें यशवंतराव होळकराची भरतपुरास जाऊन गांठ घेतली व समेट घडवून आणिला.

स. १८१४ मध्यें यानें व यशवंतराव होळकरानें मिळून भोपाळवर चाल केली; पण इंग्रजांचा विरोध होऊन यांचा पराभव झाला.

यानें व परशुरामभाऊंनीं मिळून निजामवर चौथाईच्या वसुलीकरितां स्वारी केली, व त्यांत यास पेशव्याकडून पाऊण कोट रुपये मिळाले. यास बायजाबाई नांवाची बायको होती. ती फार सुंदर होती. यास नाच, गाणें, वाघाची शिकार व कुस्त्या वगैरे गोष्टींचा फार नाद असे. यास पतंग उडविण्याचाहि फार नाद असे.

एकंदरींत हा शूर व प्रबळ असून देखील याच्या गैरवर्तनानें याच्या शूरपणाचा व सैन्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. अठराव्या शतकाचे अखेरीस मराठेशाहीचें राज्य एकदम कोसळलें, त्यास दुसरीं कांहींहि कारणें असलीं तरी पेशवा बाजीराव व फौजबंद दौलतराव शिंदे या दोन उल्लू व्यक्तींचा सहा वर्षांतील बेबंदशाही कारभार हाच मुख्यतः कारण होय.

दौलतशाह—(स.१६३१सुमार)वऱ्हाडाच्या इमादशाही घराण्यांतील दर्या इमादशाहाची ही मुलगी. अहमदनगरच्या पहिल्या हुसेन निजामशाहाला ही दिली होती.

द्यानतराव—(स. १६२४-५७) हा मुहम्मद व दुसरा अली आदिलशाहाच्या वेळीं मुख्य प्रधान होता. हा अत्यंत थोर मुत्सद्दी. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून कऱ्हाडच्या देशपांड्यांचा पूर्वज होय.

द्रोणसिंह मैत्रक—(स.५२६ पूर्वी) हा वल्लभीच्या मैत्रकवंशांतील भट्टार्काचा मुलगा. हा आपल्या भावानंतर गादीवर बसला. याला महाराज व चक्रवर्तीनें सिंहासनाधिष्ठित केलेला अशीं विशेषणें लावली आहेत.

द्रोहार्जुन चालुक्य—(भीम चालुक्य पाहा).

द्विजदेव (मानसिंहमहाराज)—एक हिंदी कवि. हे अयोध्येचे महाराज असून उत्तम कविताकार होते. यांनीं केलेलें ऋतूंचें वर्णन फारच बहारीचें आहे.

द्विवेद गंग—बृहदारण्यकाच्या माध्यंदिनप्रतीवर यानें 'मुख्यार्थप्रकाशिका' नांवाची टीका लिहिली आहे. वेबरनें आपल्या शतपथब्राह्मणाच्या शेवटीं तें संक्षेपानें छापलें आहे.

ध

धडफळे घराणें—पद्मो विश्वनाथ-कृष्णाजी-बाबाजी-(बापूजी) रंगो (यानें पिंपळे गुरव येथील वतन व पाटीलकी संपादन केली. हा स. १६२९ मध्यें पुण्याचा ठाणेदार होता) -कृष्ण-(यांना पुत्र दोन). (१) राघो, (२) नारो. (१) राघोकृष्ण-गोविंद-मल्हार-राघो-मुद्गल ऊर्फ दादोपत-त्रिंबक-(यांना पुत्र दोन) (१) भैरव, (२) गोविंद. (१) भैरव-रामचंद्र-याचे पुत्र चार. त्रिंबक, दत्तात्रय, रघुनाथ व महादेव हे हयात आहेत. (२) गोविंद त्रिंबकचे वामन-याचे तीन पुत्र बाळासाहेब, भालचंद्र (बी. ई.) व जगन्नाथ हयात आहेत.

(२) नारो कृष्ण-(यांना पुत्र दोन)-(१) विनायक नारायण, (२) गणेश नारायण.

(१) विनायक नारायण (मृत्यु शके १६४८ ज्येष्ठ शु. ३ पराभवसं.)-राघो-बाहिरो-बाजीराव-(यांना पुत्र तीनः)-(१) बाळकृष्ण, (२) माधव, (३) केशव. (१) बाळकृष्ण-गणेश-बाळकृष्ण (काशीस), (२) माधव-बळवंत-कृष्णराव हयात आहेत. (३) केशव-कोंडो-(यांना पुत्र दोन) १ बाजीराव, २ गणपति हयात आहेत.

(२) गणेश नारायण (मृत्यु शके १६४८ आश्विन शु. २ पराभवसं.). (यांना पुत्र तीन)-(१) अंताजी (मृत्यु शके १६५२ श्रावण ब ९ रविवार), (२) नीळो (मृत्यु शके १६४३ भाद्र. व. ४ शुक्र.), (३) चिंतो (मृत्यु शके १६५० आश्विन शु. २ कीलक. सोमवार).

(१) अंताजी-जगन्नाथ-(यांना पुत्र तीन)-१ नरसिंग, २ विठ्ठल, ३ अमृत.

१ नरसिंग— ०

२ विठ्ठल-नारो-(यांना पुत्र तीन)-१ माधव, विठ्ठल, ३ सखाराम (इंदुरास गेला).

३ अमृत-गणेश-(यांना पुत्र दोन)-१ सखाराम, २ बाळाजी (मृत्यु स. १९०८)-गणेश (नथोबा) हयात आहे.

(२) निळो गणेश-कल्याण-(यांना पुत्र दोन)-१ रामचंद्र (नाशिक). २ काशिनाथ-मोरो-(यांना पुत्र दोन)-१ काशिनाथ, २ गंगाधर (मृत्यु स. १९०९)-(यांना पुत्र तीन)-१ गणेश (मृत्यु स. १९०६ सुमार). २ नरहरि (हयात), ३ रामचंद्र (मृत्यु स.१९१४सुमार).

(३) चिंतो गणेश-(मृत्यु शके १६५० आश्विन शु. २ कीलक सोमवार)-लक्ष्मण-(यांना पुत्र दोन)-१ सखाराम, २ बाबाजी.

१ सखाराम-(यांना पुत्र चार)-१ अमृत, २ निळो, ३ रंगो, ४ सदाशिव.-निळो-(मृत्यु स. १८६१ सुमार)-(यांना पुत्र दोन)-१ रामचंद्र, २ नारायण (नारायण रघुनाथ चित्राव (अमृतेश्वर) यांना दत्तक. दत्तक घरचें नांव विष्णु नारायण चित्राव. मृत्यु स. १९०४ डिसें. ४).

१ रामचंद्र-वामन—(मृत्यु स. १८७८)-रंगो-(मृत्यु स. १९१८ ऋषिपंचमी. यांचे दोन बंधु-लक्ष्मणराव व सखारामपंत हयात आहेत.)-१ दत्तात्रेय (विष्णु नारायण चित्राव (अमृतेश्वर) यांना दत्तक. दत्तकविधानानंतरचें नांव सिद्धेश्वर विष्णु चित्राव) २ गणेश (हयात), ३ रामचंद्र (हयात).

यांचा मूळ पुरुष औरंगाबादेकडून प्रथम पुण्यास आला. कांहींच्या मतें तो पिंपळे गुरव येथें आला असें आहे. यांच्या घराण्यांत रंगो बाबाजी हा एक प्रमुख असून मलिकंबराच्या वेळीं पुण्याचा ठाणेदार होता. स.१६२९च्या

मोठ्या दुष्काळानंतर पुण्याची वस्ती वाढवून व पेठा स्थापून जमाबंदी वगैरे काम यानेंच केलें (धडफळे यादी मं.वा.इ. १८३५, पृ. ३७५). याच घराण्यांतील नारो कृष्ण हा शितोळ्याकडून कांहीं पैशासंबंधी महत्त्वाच्या कामाकरितां शिवाजीमहाराजांकडे गेला असल्यासंबंधींचें पत्र प्रसिद्ध असून त्यावरून शिवाजीच्या हस्ताक्षराचा शोध लागला आहे (लेखनालंकार). पुढें पेशव्यांच्या वेळीं पुणें शहराची पुनर्रचना करण्यांत रंगोपंताच्या वंशजांचें प्रमुख अंग होतें. थोरल्या बाजीरावाच्या वेळीं विनायक नारायण व गणेश नारायण व मल्हार गोविंद धडफळे प्रमुख होते (रा. खं. ३ ले. १६६). बाळाजी विश्वनाथ पेशवे यांस थोरातानें हिंगणगांवच्या गढींत कैदेंत ठेविलें असतां, मोरो विश्वनाथ व गणेश नारायण धडफळे यांनीं जामीनगिरी पत्करून त्यांना सोडविलें. थोरल्या बाजीरावांना पुण्यांतील धडफळ्यांचें घर स्वतःचेंच घर वाटे. पुढें बाजीराव पुण्यास आल्यावर प्रथम धडफळ्यांच्या वाड्यांत राहत असे. नंतर शनिवारवाडा बांधण्यांत आला व त्याचें कामहि धडफळ्यांकडेच दिलेलें होतें. या घराण्यांतील मंडळींनीं पुण्याजवळ पाषाण व पिंपळें गुरव येथील पाटिलक्या व इनामें मिळविलेलीं आहेत व तीं आजहि त्यांजकडे चालू आहेत. पुण्यांतील त्यांचे वाडे अजून पूर्वीच्या ठिकाणीं शितोळे यांच्या वाड्यालाच लागून आहेत. धडफळे यांची रोजनिशी लिहिण्याची पद्धत जुनी दिसते. पेशवे व पुरंदरे यांच्या रोजनिश्या ही वास्तविक धडफळे यांच्या रोजनिशीचीच पुनरावृत्ति असल्याचें आतां सिद्ध झालें आहे. या घराण्यांत शिवभक्ति विशेष दिसून येत असून पाषाण येथें लक्ष्मण चिंतामण यांनीं बाधलेलें एक वाकेश्वर नांवाचें सुंदर शिवालय व घाट आहे. त्यास थोरले शाहू महाराज यांनीं पूजेअर्चेकरितां धडफळे यांच्या मूळ जमिनीवरील पट्टी माफ करून त्या इनाम करून दिल्याच्या सनदा आहेत. त्याचप्रमाणें पिंपळे गुरव येथेंहि एक देऊळ आहे. या घराण्यांत इतिहासलेखनाचा व्यवसाय पिढ्यान्पिढ्या चालत असल्याचें धडफळे यादीवरून दिसून येतें. हें काम केवळ स्वयंस्फूर्तीनें चाले. शितोळे देशमुखाचा या घराण्याशीं अनेक पिढ्या निकट संबंध असून यांच्याशिवाय त्या घराण्यांतील पानहि हालत नसे. यांचा व शितोळ्यांचा संबंध दर्शवणारा पत्रव्यवहार प्रसिद्ध आहे (रा. खं. १५।१६।१७।१८). राजाश्रय किंवा लोकाश्रय नसतांना देशाच्या इतिहासाची काळजी वाहून तो लेखनिविष्ट करण्याची तत्परता फक्त याच घराण्यांतील लोकांनीं अनेक पिढ्या चालू ठेवलेली दिसते. हें घराणें गणपतिभक्तहि असून चिंचवडच्या देवांचें अनुग्रहीत आहे.

धनपति--माधवकृत शंकरविजयाचा टीकाकार.

धननंद—नवनंदांपैकीं शेवटला.

धनपाल—(ग्रंथकाल स. ९७३) उज्जयिनी नगरींत सर्वदेव नांवाचा काश्यपगोत्री ब्राह्मण राहत असे. त्याला धनपाल व शोभन या नांवांचे दोन पुत्र असून सुंदरी नामक एक कन्या होती. त्या काळीं माळवा प्रांतावर मुंज राजाचें आधिपत्य असे. धनपाल कांहीं कारणामुळें धारा नगरींत (धार) राहूं लागला. सर्वदेवाचा आचार्य महेंद्रसूरीशीं परिचय झाला, व आचार्यांनीं त्याच्यावर केलेल्या उपकारांची फेड म्हणून सर्वदेवानें आपला पुत्र शोभन याला आचार्यांच्या स्वाधीन केलें व शोभनानें जैनधर्माची दीक्षा घेतली. ही गोष्ट धनपालास आवडली नाहीं. इतकेंच नव्हे तर जैनसांप्रदायी साधूंचे विहार माळव्यांत न होतील अशी यानें खटपट केली. परंतु पुढें शोभनाच्या प्रभावानें धनपालानेंहि जैनधर्माचा स्वीकार केला. हा सर्व शास्त्रांत निष्णात होता. यानें लिहिलेले ग्रंथ उपलब्ध आहेत तेः—(१) प्राकृतलक्ष्मीनाममाला; (२) तिलकमंजरी; (३) ऋषभपंचाशिका. यांपैकीं प्राकृतलक्ष्मीनाममाला म्हणजे पाइअलच्छीनाममाला होय. हा कोश लिहिला तेव्हां हा जैनधर्मीय नव्हता. कारण या कोशांत प्रारंभीं ब्रह्मदेवाची स्तुति केली असून श्रीजिनाच्या तीन नांवांशिवाय कोणताहि जैनसांप्रदायाचा शब्द कोशांत आलेला नाहीं (तित्थाहिवई, जिणो, अरहा—हीं तीन नांवें होत). तिलकमंजरी लिहिली तेव्हां यानें जैनधर्माचा स्वीकार केला असावा; कारण या ग्रंथांत प्रारंभीं श्रीजिनाचें स्मरण केलें आहे. हेमचंद्राला याच्या विद्वत्तेबद्दल फार आदर वाटत असे. हेमचंद्रानें एकवार कुमारपालासमक्ष याची स्तुति केली असून शिवाय आपल्या कोशांच्या टीकेंत " व्युत्पत्तिर्धनपालतः " असा आदरयुक्त निर्देश केला आहे. महेंद्रसूरि, वादिवेताल, शांतिसूरि व श्रीमेरुतुंगसूरि यांच्या प्रबंधांवरून याची विशेष माहिती मिळेल असें वाटतें.

पाइअलच्छीनाममाला हा कोश गाथावृत्तांत रचलेला आहे. हा कोश सर्व प्राकृत शब्दांचा नसून बहुशः कवि काव्यांमध्यें ज्या शब्दांचा उपयोग करितात ते शब्द या कोशांत संग्रहित केले आहेत. अर्थात् या शब्दांत तद्भव, तत्सम व देशी असे तिन्ही प्रकारचे शब्द आहेत. देशी शब्द निराळे दिलेले नाहींत. सर्व शब्द प्रथमान्त (एक किंवा अनेकवचनी) असल्यामुळें शब्दांचें लिंग सहजी

समजतें. कोशांत अव्ययांचाहि अंतर्भाव केलेला आहे, शब्द अमरकोशाप्रमाणें वर्गवारीनें किंवा अकारविल्ह्यानें दिलेले नाहींत. कांहीं समानार्थक शब्द कोशांत एकत्र दिले आहेत तर कांहीं गाथार्धांत व गाथाचरणांत दिले आहेत व तशा सूचनाहि योग्य ठिकाणीं केल्या आहेत. या ग्रंथाचा रचनाकाल वि. सं. १०२९ (स. ९७३) दिला आहे.

धनपाल हा महाकवि विक्रमसंवत् १००० च्या सुमारास होऊन गेला. हेमचंद्राच्या देशीनाममालेइतकेंच महत्त्व धनपालानें रचिलेल्या पाइअलच्छीनाममाला या कोशाचें आहे. या कोशानंतर सुमारें १५० वर्षांनीं देशीनाममाला लिहिलेली आहे (विविधज्ञानविस्तार, व. ६१, अं. ९-१०, पृ. २५१-५२).

हा कोश यानें आपली बहिण सुंदरी हिच्याकरितां केला (बी. बी. आणि मंडळी, भावनगर, यांनीं प्रसिद्ध केलेल्या या कोशाच्या प्रस्तावनेवरून).

धनंजय—(स. ९९७ सुमार) विष्णूचा पुत्र. हा मुंजाच्या सभेंतील एक सभासद होता. याच्या दशरूपक नांवाच्या ग्रंथावर अवलोक नांवाची टीका करणारा धनिक याचा भाऊ होता. मुंजाचा वध चालुक्य तैलपदेव यानें स. ९९७ च्या सुमारास केला (इंडियन अँटि. १२, २१०). रूपक म्हणजे नाटक. याच्या दहा प्रकारांचें विवेचन दशरूपकांत चांगलें आढळतें.

२. हा तिसऱ्या हलायुधाचा बाप होय. याचा उल्लेख बंगालचा राजा लक्ष्मणसेन याच्या कारकीर्दीत आला आहे. हा लक्ष्मणसेनाचा धर्माध्यक्ष व न्यायाधीश होता.

३. या काश्मीरी पंडितानें 'नाममाला' नांवाचा संस्कृत कोश केला आहे.

धना जाट—भरतपूरच्या राजाचा भाट व कवि.

धनाजी जाधव—(जन्म स. १६५०–मृत्यु स. १७१०) शंभुसिंगाचा मुलगा धनाजी. हा लखुजी जाधवाच्या वंशांतला होता. याचा जन्म १६५० त झाला. हा उंबराणीच्या लढाईत पुढें आला (स.१६७३). हा हंबीरराव मोहिते यांच्या हाताखालीं होता. धनाजीच्या सैन्यांत उत्तम शिस्त नव्हती. पण हा आपल्या लोकांना प्रिय होता. धनाजीस मोंगलांचें सैन्य घाबरे. हा कुशल सेनापति होता. हीं माणसें प्रतिसृष्टि निर्माण करतील असा शिवाजीनें यांचा गौरव केला होता (सावनूर युद्ध). हा अखेरपर्यंत कोल्हापूरच्या विरुद्ध होता. शाहूनें राज्यपद स्वीकारल्यावर वसुलाच्या खात्याची सर्व देखरेख याच्याकडे सोंपविली. ती यानें बाळाजी विश्वनाथ व अंबाजीपंत पुरंदरे यांना नेमून पार पडली.

स. १७१० मध्यें रांगण्याच्या मोहिमेवरून परत येत असतां वारणातीरीं वडगांव येथें हा वृद्ध व अनुभवी सेनापति मृत्यु पावला. याचे पायास जखमेचा व्रण होता. तें दुखणें अधिक होऊन वरील स्वारींत याचा अंत झाला. याला संताजी, चंद्रसेन व शंभुसिंग असे तीन पुत्र होते. प्रथम चंद्रसेन, नंतर संताजी व त्यानंतर शंभुसिंग हे मराठ्यांचे सेनापति झाले होते.

हा शिवाजीच्या तालमींत तयार झाला असून शूर व एकनिष्ठ होता. याचे वंशज सध्यां माळेगांवीं (बारामती) येथें आहेत. लढाईच्या कामाशिवाय इतर बाबतींत विशेष मन घालण्याचा याचा स्वभाव नव्हता.

धनाजी जाधवाच्या कर्तबगारीविषयीं ताराबाईचा अभिप्राय 'जाधवराव कैलासवासी स्वामीचे संपूर्ण कृपेस पात्र झाले ते आपल्या कर्तृत्वावरी व हुकूमबारदारी एकनिष्ठेवरी झाले, राज्याभिवृद्धीविषयीं त्यांहीं कांही सामान्य कसाला, श्रमसाहस केला नाहीं. जीविताची तमा न धरितां स्वामिकार्यींच तत्पर राहून, कैलासवासी स्वामींनीं जे समयीं हुकूम केला, ते समयीं कर्नाटकांत फौजानीं धाऊन जाऊन, स्वामीस प्राप्त झालीं संकटें निरसन करून, स्वामिगौरवाचें सुख त्याहींच अनुभविलें व सेवाधर्मेकरून त्याहींच कैलासवासी स्वामींस संतुष्टविलें. तेव्हां स्वामीस मशारनिल्हेविना दुसरे प्रिय कीं प्राण (कोणी) होते असें नाहीं. सर्व प्रकारें कार्यास येतील हा भरंवसा दृढ मनीं मानिला होता. औरंगजेबासारखा शत्रु पराभव पावल्याचें यश मशारनिल्हेस प्राप्त झालें' (भारतवर्ष, द्वितीयावृत्ति, पत्रयादी, अं. ५०).

धनिक—(स. ९९७ नंतर) विष्णूचा पुत्र. हा दशरूपककार धनंजयाचा भाऊ असावा. यानें दशरूपकावर अवलोक नांवाची टीका केली आहे. टीका धनंजयाच्या मागून बऱ्याच वर्षांनीं केलेली असावी. कारण यांत धनंजयाचा आश्रयदाता मुंज राजा मारला गेल्यावर गादीवर आलेल्या सिंधुराजावर लिहिलेल्या नवसाहसांक चरित्रांतील उतारे आले आहेत. याच्या काव्यनिर्णय नांवाच्या ग्रंथाचा निर्देश याच्या टीकेंत आला आहे. याचा पुत्र वसंताचार्य.

धनेश्वरदेवेंद्र—हा भास्कराचार्यांच्या लीलावती ग्रंथावर लीलावतीभूषण नामक टीकेचा कर्ता.

धरणीधर काशीनाथ—वैय्याकरणसर्वस्व नामक संस्कृतमधील ग्रंथाचा कर्ता.

धरणीवराह परमार—(स. ९९७ सुमार) आबूच्या परमारांपैकी कृष्णराजाचा पुत्र. कनोजच्या रघुवंशी प्रति-

हाराचें राज्य निर्बळ होत चालल्यामुळें सामंत स्वतंत्र होऊं लागले. मूलराज सोलंकीनें आपला मामा चावडावंशी सामंतसिंह (भूयड) याला मारून त्याचें राज्य घेतलें. आणि आपण गुजराथच्या राजधानी पाटण (अनहिलवाड) येथील गादीवर बसला. मूलराजानें याच्यावरहि स्वारी केली होती. तेव्हां हा जोधपूर राज्यांतील हस्तिकुंडी (हथुंडी) येथील राष्ट्रकूट राजा धवल यास शरण गेला असें वि. सं. १०५३ (स. ९९७) मधील धवलाच्या लेखावरून दिसतें (एंप. इंडि. भा. १०.२१). मूलराजानें वि. सं. १०१७-१०५२ पर्यंत राज्य केलें. अर्थात याच्यामध्यें केव्हां तरी त्याची स्वारी याच्यावर झाली असावी. राजपुतान्यांत अशी प्रसिद्धि आहे कीं याला नऊ भाऊ होते, आणि त्यांत यानें आपलें राज्य वांटलें होतें. म्हणून नऊ राजधान्यांना नऊ कोटी मारवाड म्हणत असत. याविषयीं एक छप्पयहि प्रसिद्ध आहे. पण त्यांत सत्यता दिसत नाहीं.

२. (स. १०८७ सुमार) आबूच्या परमार घराण्यापैकीं एक राजा. जोधपूर राज्यांत जालोर येथें वि. सं. ११४४ (स. १०८७) मधील एक शिलालेख मिळाला आहे. त्यांत १ वाक्पतिराज, २ चंदन, ३ देवराज, ४ अपराजित, ५ विज्जल, ६ धारावर्ष, ७ वीसल. वीसलची राणी मेरळदेवी हिनें सिंधुराजेश्वराच्या मंदिरावर सुवर्णकळस चढवला अशी माहिती मिळते. ही शाखा कोणत्या राजापासून निघाली हें सांगतां येत नाहीं. पण काळाच्या दृष्टीनें जालोरची शाखा धरणीवराहापासून निघाली असावी (राजपूतानेका इतिहास, पा. १८२).

धरपट्ट मैत्रक—(स. ५३५-३९) हा वल्लभीच्या मैत्रक वंशांतील भट्टार्काचा मुलगा. हा आपला भाऊ ध्रुवसेन याच्यामागून गादीवर बसला.

धरसेन मैत्रक—(स. ५०० सुमार) भट्टार्कानंतरचा वल्लभीचा राजा.

२. (स. ५६९-५८९) हा गुहसेनाचा पुत्र. हा आपल्या बापाच्या मागून गादीवर आला. याचे पांच दानलेख सांपडले आहेत. त्यांपैकीं दोहोंत याला महासामन्त अशी पदवी आहे.

३. (स. ६२० अखेर) हा खरग्रहाचा पुत्र.

४. (स. ६४५-६४९) वल्लभीच्या मैत्रक घराण्यांतील जो ध्रुवसेन दुसरा त्याचा हा मुलगा होय. स. ६४५ मध्यें हा आपल्या बापानंतर वल्लभीच्या गादीवर आला.

स. ६४७ मध्यें यानें गुजराथची राजधानी भृगुकच्छ (भडोच) ही आपल्या ताब्यांत घेतली. याच्यानंतर डेरभट याचा मुलगा ध्रुवसेन ३ रा हा स. ६४९ त गादीवर आला (B.). हा सर्व वल्लभी राजांत बलिष्ठ होता असें दिसतें. गुप्तशक ३३० (स. ६४९) मधील याच्या एका ताम्रपटांत महाराजाधिराज व चक्रवर्ति अशा याला पदव्या लावल्या आहेत. पण याचे वंशज महाराजाधिराज म्हणवीत. याच्या कारकीर्दीत भट्टिकवीनें सुप्रसिद्ध भट्टिकाव्य लिहिलें.

धराजयसिंहवर्मन् (पश्चिम) चालुक्य—(स. ६५५-६६९) पहिल्या विक्रमादित्याचा हा धाकटा भाऊ होय.

स. ६५५ च्या सुमारास हा गुजराथमध्यें आपल्या भावाचा प्रतिस्पर्धी म्हणून राज्य करीत होता. याला आणखी कांहीं भाऊ होते तेहि असेच ठिकठिकाणीं राज्यें करीत होते. ह्याचा मुलगा श्रयाश्रय शिलादित्य हा स. ६६९ त आपल्या बापानंतर गुजराथच्या गादीवर आला (B.).

धर्मकाल—तिबेटी ग्रंथावरून असें दिसतें कीं हा ख्रि. शकाच्या दुसऱ्या शतकांत बौद्ध धर्माच्या प्रचाराकरितां चीन देशांत गेला होता.

धर्मकीर्ति आचार्य—(स. ६३५ चा सुमार) हा जातीनें ब्राह्मण. याच्या बापाचें नांव परिव्राजक कोरुनंद. हा 'मित्रलय' येथें जन्मला. यानें वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत तत्त्वज्ञानाचा गाढ अभ्यास केला व पुढें हा बुद्ध साधूंच्या प्रवचनास जाऊं लागला. पुढें यास त्यांच्या धर्माची शिकवण पसंत पडून यानें बुद्धधर्म स्वीकारला व बुद्धधर्माचें ज्ञान प्राप्त करून घेतलें. तीर्थसंप्रदायाच्या सर्व खोल तत्त्वांचा अभ्यास करण्यासाठीं, हा दक्षिणेंतील ब्राह्मण कुमारिल याजकडे गेला; व सर्व तत्त्वें शिकून तेथून हा निघाला. परत येतेवेळीं कणादपंथाच्या लोकांना व तीर्थसांप्रदायी लोकांना वादामध्यें जिंकून, कित्येकांस बुद्धधर्म स्वीकारण्यास भाग पाडिलें. याच्या तैलबुद्धीचें एक उदाहरण द्यावयाचें झाल्यास, हा एकदां ईश्वरसेनाच्या घरीं गेला असतां, यानें 'प्रमाणसमुच्चय' ग्रंथ ऐकला. तेव्हां हा ईश्वरसेनाइतका तरबेज झाला व ज्या वेळेस दुसऱ्यांदा ऐकला त्या वेळेस याला त्या ग्रंथांतील दोष कळून आले. म्हणजे ईश्वरसेन हा ह्या ग्रंथाचा खोल अभ्यास केलेला मनुष्य पण त्याला देखील या ग्रंथांतील दोष कळत नसत, ते याला कळूं लागले.

यानें केलेले तर्कज्ञानावरील संस्कृत ग्रंथ-१ प्रमाणवार्तिककारिका (प्रमाणसमुच्चयावर टीका), २ प्रमाणवार्तिकवृत्ती (प्रमाण-वार्तिक-कारिकेवर उपटीका), ३ प्रमाणविनिश्चय, ४ हेतु-बिंदु-विवरण, ५ तर्कन्याप अथवा

वादन्याय, ६ संतानांतरासिद्धि, ७ समबंधपरीक्षा, ८ समबंधपरीक्षावृत्ति (समबंधपरीक्षावर टीका), ९ न्याय-बिंदु-वाद करण्याची पद्धत वगैरे ग्रंथ लिहिले. ह्या सर्व ग्रंथांच्या मूळ संस्कृत प्रती उपलब्ध नाहींत; पण प्रत्येक ग्रंथाचें तिबेटी भाषांतर उपलब्ध आहे (उद्योतकर पाहा); (हिस्टरी ऑफ इंडियन् लॉजिक, पा. १०३-११८).

२. वासवदत्तेचा टीकाकार शिवराम यानें याचा अलंकार नांवाचा ग्रंथ असल्याचें म्हटलें आहे. पण त्याला दुजोरा मिळत नाहीं. या नांवाचा एक बौद्ध ग्रंथकार होऊन गेला. त्याचे श्लोक शार्ङ्गधरपद्धति व सुभाषितावलि या ग्रंथांत आले आहेत. त्यांत त्याचें नांव भदन्त धर्मकीर्ति असें आलें आहे. पण वरील व हा एक होता असें मानण्यास प्रमाण नाहीं. याच्या अलंकारावरील ग्रंथाचें नांव 'बौद्धसंगति' असें आहे.

३. (स. ६९५) बौद्ध आचार्य, शंकराचार्याचा शिष्य सुरेश्वराचार्य हा याचें नांव घेऊन एक मत उल्लेखित करतो. चिनी प्रवासी फाहियान हा धर्मकीर्ति आपला समकालीन असल्याचें लिहितो (म. भा. २. ३१०).

धर्मकुवर—(अमीरखान पाहा).

धर्मघोषसूरि—(स. ११५०-१२१०) जैन पंडित. शतपदी व षट्पदिका ग्रंथाचा कर्ता.

धर्मदास—(स. १५१७) एक हिंदी कवि. कबीराचा हा मुख्य शिष्य. हा कबीर वारल्यावर वरील सनांत त्याच्या गादीवर बसला. ग्रंथ अमरसुखनिधान. हा अत्यंत त्यागी होता.

धर्मदासगणि—हा महावीर या जैन साधूचा समकालीन होय. यानें 'उपदेशमाला' हा जैनवाङ्मयांतील ग्रंथ लिहिला. त्यामध्यें नीतिविषयक चर्चा केली आहे.

धर्मनाथ—जैनांचा पंधरावा तीर्थंकर (तीर्थंकर पाहा).

धर्मपा—चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं छत्तिसावा सिद्ध. जात ब्राह्मण. देश विक्रमशिला. हा कण्हपा व जालंधर यांचा शिष्य. यानें कलिभावनामार्ग (तं. ४८।७९), सुगत-दृष्टिगीतिका (तं. ४८।९) व हुंकारचित्तबिंदुभावनाक्रम (तं. ४७।७४) हे ग्रंथ लिहिले.

धर्मपाल—(स. ६००-६३५ सुमार) ह्या तर्कज्ञाचा जन्म मद्रास इलाख्यांत द्रवीड प्रांतांतील कांचीपुरम् म्हणजे हल्लींचें कंजीवरम् येथें झाला. ह्याला आठ भाऊ असून त्यांमध्यें हा वडील होय. हा नालंदा विश्वविद्यालयांत शिकला व तेथेंच स. ६३५ पर्यंत मुख्य होता. धर्मपाल व भर्तृहरि यांनीं पाणिनीच्या व्याकरणावर वेदवृत्ति नांवाची एक वृत्ति लिहिली. याचे ग्रंथ-(१) आलंबनप्रत्यय-ध्यानशास्त्रव्याख्या, (२) विद्यामात्रासिद्धि-शास्त्र-व्याख्या, (३) शतशास्त्रवैपुल्यव्याख्या. शेवटच्या ग्रंथाचें भाषांतर स. ६५० त चिनी भाषेंत झालें. यानें कोशांबी येथें पाखंडी लोकांचें खंडन केलें.

२. (स. ७८६-८५०) बंगाल्यांतील पालराजांपैकीं हा गोपालाचा मुलगा. खालिमपूर व भागलपूर दानपत्रांवरून असें दिसतें कीं, यानें कनोजचा सम्राट् इंद्रराजाचा पाडाव करून कनोजच्या राज्यपदावर चक्रायुधाची स्थापना केली. यावरून असें ठरतें कीं याची कारकीर्द स. ८००-८२५ पर्यंत असावी. पण पुढें वत्सराजाचा मुलगा नागभट यानें चक्रायुधाबरोबर याचाहि पराजय करून कनोज घेतलेलें दिततें. पण याच्याकरितां राष्ट्रकूटांपैकीं तिसऱ्या गोविंदराजानें नागभटाचा पराभव केला. पण कनोज मात्र त्याच्याकडेसच राहिलें. गोविंदराज (तिसरा) हा याचा सासरा होता. भागलपूरलेखावरून असें दिसतें कीं याची पत्नी रणदेवी ही राष्ट्रकूटांपैकीं परबल राजाची मुलगी होय. परबल म्हणजे गोविंदराज, असें कीलहॉर्ननें सिद्ध केलें आहे (इंडि. ॲंटि. २१. २५०). गोविंदराजानें पराजय केल्यानें नागभटानें याच्यावर स्वारी केली नाहीं (म. यु. भा. २. २३२).

कनोजच्या आमराजानें धर्मपालाच्या बप्पभट्टि नांवाच्या राजपंडिताला आपल्या दरबारांत घेतलेलें पाहून त्यास राग आला, व वादामध्यें ज्याचा पंडित हरेल त्याचें राज्य दुसऱ्यानें घ्यावें अशी दोघांची पैज लागली. धर्मपालाचा पंडित हरला, परंतु आमराजानें ह्याचें राज्य परत दिलें. धर्मपालानें पुढें गौड व बंगाल प्रांत जिंकले.

धर्मप्रभसूरि—(स. १२७३-१३३५) जैन आचार्य. कालिकाचार्यकथेचा कर्ता.

धर्मरक्ष—(खि. पू. १०० सुमार) हा काश्यप मतंगाबरोबरच चीन देशांत गेला असावा, असें दिसतें. हा एका राजाच्या आश्रयाला होता. त्याच्या मर्जीविरुद्ध गुप्तपणें हा चीनमध्यें गेला. यानें तिकडे अतिशय चांगला प्रचार करून बुद्धधर्माला चीनमध्यें स्थिर केलें; व इकडून सारखे धर्मप्रचारक तिकडे जाऊं लागले. ही परंपरा सम्राट् हर्षाच्या निधनकालापर्यंत चालू होती असें दिसतें.

धर्मराजाध्वरि—(स. १५५० सुमार) हा तेलंग ब्राह्मण असून, मंथनकालीचा राहणारा होता. शंकराचार्यानुसारी वेदांतपरिभाषा हा संस्कृत ग्रंथ यानें केलेला आहे.

२. हा कंदार माणिक्यंचा राहणारा. यानें रुचिदत्ताच्या

तत्त्वचिंतामणिप्रकाशावर टीका लिहिली आहे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४८५).

धर्मरिपा—यालाच धर्वरिपा असें म्हणतात. हा जातीनें ब्राह्मण होता. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं अठ्ठेचाळिसावा सिद्ध होय. हा कामरूपदेशांत राही. विरूपाच्या (३) चौथ्या पिढीतील हा होय.

धर्मोत्तराचार्य—(स.८४७ सुमार) बौद्ध तर्कशास्त्रज्ञ. हा कल्याणरक्षित व काश्मीरच्या धर्माकरदत्ताचा शिष्य. याचे ग्रंथ-१ कर्मकीर्तीच्या न्यायबिंदूवर न्यायबिंदुटीका, २ प्रमाणपरीक्षा, ३ अपोहनामप्रकरण, ४ परलोकसिद्धि, ५ क्षणभंगसिद्धि, ६ प्रमाणविनिश्चयटीका, इत्यादि.

धवल—(स. ९३९ सुमार) राजपुतान्यांतील हाथुंडीच्या राठोड राजा मंमटाचा हा मुलगा. मुंजानें मेवाडवर स्वारी केली तेव्हां हा मेवाडच्या बाजूनें युद्धांत होता (एपि. इंडि. भा. १०. २०).

धहुलि—यालाच धहुरि असें म्हणतात. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं सत्तरावा सिद्ध होय. हा जातीनें शूर असून धेकरदेशचा राहणारा होय. यानें शोकदृष्टि हा ग्रंथ लिहिला (तं. ४०।४४).

धंग चंदेल्ल—(स. ९५४-१००२) यशोवर्म्याच्या (स.९२५ ते ९५०) नंतर चंदेल्लांचा अतिपराक्रमी पुरुष धंग राजा राज्य करूं लागला. खजूराहो लेखांत या राजाच्या राज्यविस्ताराच्या मर्यादा दिलेल्या आहेत. धंग राजाच्या कारकीर्दीतील बरेच लेख सांपडले आहेत. स. ९९८ च्या लेखांत याची तुलना हम्मीराबरोबर केलेली आहे. सबक्तगिनाबरोबर झालेल्या संग्रामांत यानें विशेष पराक्रम गाजविला असें दिसतें. फेरिस्त्यानेंहि याला दुजोरा दिला आहे. तो म्हणतोः-'लाहोरच्या जयपाळाच्या मदतीस कालंजर राजा मोठ्या सैन्यानिशीं व खजिन्यासह धांवून गेला.' या लेखावरून हिंदूंचा जय झालेला दिसतो. याचे बरेच लेख सांपडले आहेत. याची कारकीर्द फार मोठी असून हा दीर्घायुषी होता. यानें गंगायमुनेच्या प्रवाहांत जिवंत जलसमाधि घेतली (एपि. इंडि. १. १४६). सारांश, धंग हा चंदेल्ल वंशांत विख्यात वीर पुरुष होऊन गेला यांत शंका नाहीं.

हा मोठा शिवभक्त होता. याच्या दानपत्राच्या आरंभीं ' ॐनमः शिवाय ' अशीं अक्षरें सांपडतात.

धंधुक परमार—(स. १०४२ पूर्वी) आबूच्या परमारांपैकीं महीपालाचा पुत्र. यानें गुजराथच्या पहिल्या भीमदेव सोलंकीचें मांडलिकत्व स्वीकारलें नाहीं, म्हणून त्यानें याच्यावर स्वारी केली. तेव्हां हा आबू सोडून धारच्या भोजाच्या आश्रयाला गेला. भोज त्या वेळीं चितोडला राहत होता. त्या वेळीं आबूचा दंडपति प्राग्वाटवंशी (पोरवाड) महाजन विमलला नेमलें. त्यानें याला चितोडहून बोलावून त्याचा भीमदेवाशीं समेट करून दिला, आणि त्याच्या आज्ञेनें आबूवर देलवाडा येथें विमलवसती (विमलवसही) नांवाचें क्रोडो रुपये खर्चून आदिनाथाचें मंदिर बांधलें. हें वि. सं. १०८८ (स. १०३१) मध्यें बांधलें असें जिनप्रभसूरिविरचित तीर्थकल्पांतील अर्बुदकल्पावरून समजतें. कारागिरीच्या बाबतींत याच्या तोडीचें मंदिर हिंदुस्थानांत नाहीं. धंधुकच्या राणीचें नांव अमृतदेवी. यास तिच्यापासून पूर्णपाल नांवाचा पुत्र व लाहिनी नांवाची कन्या झाली होती. यास कृष्णराज नांवाचा आणखी एक पुत्र होता. त्याच्या मातेचें नांव उपलब्ध नाहीं. लाहिनीचें लग्न चचपुत्र विसहराजाशीं झालें.

धम्मपाल—सुमंगलविलासिनी या दीघनिकायाच्या अठ्ठकथेवर लीनत्थवण्णना नांवाची टीका आहे. तिच्या कर्त्याचें नांव शेवटीं धम्मपाल असें दिलें आहे. परंतु हा कोण व याचा काळ कोणता यासंबंधीं कांहींच पत्ता लागत नाहीं. परमत्थदीपनी वगैरे टीकांचा कर्ता धम्मपाल व हा धम्मपाल हे एकच असल्यास याचा काळ इसवी सनाच्या सहाव्या शतकांत पडतो. हें खरें असल्यास हा बुद्धघोषाचार्याच्या मागाहून लवकरच झाला असें दिसतें. याला ब्राह्मणांच्या ग्रंथांचें बरेंच ज्ञान असावेंसें वाटतें. तथापि अठ्ठकथेचा अर्थ समजण्यास याची टीका उपयुक्त असली तरी मूळ दीघनिकायाचा अर्थ लावण्यास याची फारशी मदत होत नाहीं (दीघनिकायाचें मराठी भाषांतर, कै. चिं. वै. राजवाडेकृत प्रस्तावना).

धाडियप्पा यादव—(स. ८०० सुमार) हा यादव घराण्यांतील सेऊणचंद्राचा मुलगा होय. हा आपल्या बापानंतर गादीवर बसला.

२. (स. ८४० सुमार) हा यादव घराण्यांपैकीं बाद्दिग किंवा बड्डिग याचा मुलगा.

धानुष्कयज्वा किंवा **धन्वयज्वा**—वेदाचार्याच्या सुदर्शनमीमांसेंत पृष्ठ ५।७।५६ वर अशा नांवानें तीनहि वेदांवरील भाष्यकार असणाऱ्या व्यक्तींचा निर्देश आहे. हा वैष्णवसांप्रदायाचा आचार्य आहे.

धामग—हा वृद्ध ब्राह्मण सुंदरेश्वर नामक महादेवाचा भक्त होता. यास त्याचा साक्षात्कार असे. चंपकमार राजानें आपल्या स्त्रीच्या केसास असणारा सुगंध ' स्वाभाविक किंवा कृत्रिम ' असें पुसलें असतां सेतेकरास सांगतां न

आलेलें उत्तर यानें सांगितलें, त्यावरून राजानें लावलेलें बक्षिस यास मिळालें (कविच.).

धारवार प्रभु कळंबेकर—पूर्वी हा चंद्रसेनाच्या फौजेंत होता. पुढें हा शाहूस मिळाला. स. १७२० च्या अखेरीस चंद्रसेन जाधवानें शाहूचे प्रदेशावर स्वारी केली असतां यानें पुष्कळ पराक्रम करून त्याचा पराभव केला. हा मरण पावला तेव्हां याची सरदारी शाहूनें याच्या बंधूस दिली (शा. च. पृ. ४२).

धारावर्ष परमार—(स. ११६२-१२१८) आबूच्या परमारांपैकीं यशोधवलाचा वडील पुत्र. हा अत्यंत पराक्रमी राजा होता. गुजराथचा राजा कुमारपाल यानें उत्तरकोंकणचा राजा मल्लिकार्जुन शिलाहारावर दोन स्वाऱ्या करून त्याला ठार केलें. त्याबरोबर हाहि होता व यानें आपला पराक्रम तेथें दाखवला (एपि. इंडि. भा. ८, पृ. २११). 'ताजुल मआसिर' नांवाच्या फारसी तवारिखेवरून समजतें कीं, वि. सं. १२५३ पौष किंवा माघ (स. ११९६) महिन्यांत कुतुबुद्दीन ऐबकनें अनहिलवाड्यावर स्वारी केली. त्या वेळीं आबूच्या खालीं कायद्रागांवाजवळ मोठी लढाई झाली. त्या वेळीं हा गुजराथच्या दोन सेनापैकीं एकीचा सेनापति होता. या लढाईत गुजराथची सेना पराजित झाली. पण त्याच जागीं त्याच्यापूर्वी जी लढाई झाली होती तींत शहाबुद्दीन घोरी जखमी होऊन पडला होता (इलियट-हिस्टरी ऑफ इंडिया, भा. २, पृ. २२९-३०). हा त्या लढाईंतहि होता. याच्या वेळीं गुजराथेवर कुमारपाल, अजयपाल, मूलराज (दुसरा) आणि भीमदेव (दुसरा) हे चार सोळंकी राजे झाले. राजा भीमदेव दुसरा हा लहान असतां त्याचे मंत्री आणि सरदार यांनीं त्याचें राज्य बळकावलें (कीर्तिकौमुदी २. ६१), आणि स्वतंत्र झाले, तेव्हां हाहि स्वतंत्र झाला. पण गुजराथवर दक्षिणचा यादवराजा सिंघण आणि दिल्लीचा सुलतान शम्सुद्दीन अल्तमश यांनीं स्वारी केली, तेव्हां धोलक्याचा बघेल सामंत वीरधवल आणि त्याचा मंत्री पोरवाड महाजन वस्तुपाल आणि तेजपाल यांच्या आग्रहावरून मारवाडच्या इतर राजांबरोबर हाहि गुजराथच्या राजाला साहाय्य देण्यास तयार झाला (नागरी प्र. प. ३, पृ. १२३-१२४ व तेथील टीपा). पाटनारायण येथील मंदिरावर वि. सं. १३४४ (स. १२८७) मधील एक शिलालेख आहे त्यांत लिहिलें आहे कीं, हा एका बाणानें तीन म्हशी मारीत होता. याची साक्ष आबूवर अचलेश्वराच्या मंदिराबाहेर मंदाकिनीच्या मोठ्या कुंडावर याची धनुष्यासहित दगडी मूर्ति उभी आहे. तिच्या पुढें तीन म्हशी असून त्यांच्यांत समान रेषेंत आरपार छिद्र आहे. याच्या राण्यांपैकीं दोन राण्या नाडोळच्या केल्हण चौहानाच्या मुली होत्या. एकीचें नांव शृंगारदेवी आणि दुसरीचें नांव गीगादेवी. त्यांपैकीं गीगादेवी याची पट्टराणी होती. याच्या वेळचें एक दानपत्र व कांहीं शिलालेख आहेत. त्यांचा काळ वि. सं. १२२०-१२७६ पर्यंत आहे. त्यावरून यानें ५७ वर्षें राज्य केलें असें दिसतें.

पृथ्वीराजरासो या ग्रंथांत लिहिलें आहे कीं, आबूचा परमार राजा सलख याची कन्या इच्छनी नांवाची होती. तिच्याशीं गुजराथच्या दुसऱ्या भीमदेवानें लग्न करण्याची इच्छा केली. पण सलख व त्याचा पुत्र जैतराव यानें तसें न करितां तिचें लग्न पृथ्वीराज चौहानाशीं करून दिलें. तेव्हां भीमानें आबूवर स्वारी करून सलखला ठार मारलें. पण पृथ्वीराजानें जैतरावास राज्य मिळवून दिलें. पण ही सर्व कथा कल्पित आहे, कारण आबूवर सलख किंवा जैतराव हे राजे कधींच झालेले नाहींत.

धारिणी—मालविकेस आधार देणारी एक राणी (अग्निमित्र पहा).

धावक—एक संस्कृत कवि. रत्नावली, नागानंद व प्रियदर्शिका हीं श्रीहर्षाच्या नांवावर असणारीं नाटकें यानें लिहिलीं असें राजशेखरानें लिहिलें आहे. मम्मटाच्या काव्यप्रकाशांतील दुसऱ्या उल्लासांत 'श्रीहर्षादेर्धावकादीनामिव धनम्' असें वाक्य आहे. याचा आश्रयदाता श्रीहर्ष म्हणजे कनोज व ठाणेश्वर येथील सम्राट् हर्षवर्धन असल्यास तो सातव्या शतकांतील आहे. उज्जयनीचा हर्षविक्रम हा याचा आश्रयदाता असण्याचा फार संभव आहे. भास व धावक हेहि एकच होत, असें राजशेखरानें लिहिलें आहे. पण वास्तविक हे भिन्न असून हा गैरसमज दिसतो (वि. वि. ५७. ७, पा. २८७-२८८).

धीमन—धर्मपालाच्या कारकीर्दीतील एक प्रसिद्ध कारागीर. हा दगड, धातु वगैरेवर चित्रें काढी. याच्या वेळचें कांहीं काम अद्यापि उपलब्ध आहे असें म्हणतात (His. of Fine Art in India, p. 305-7). याच्या मुलाचें नांव वीटपाल. हाहि कारागीर होता.

धीरा भगत—(स. १८२६ सुमार) हा गुजराथी कवि भाटजातीचा होता. याचीं गुजराथींत पदें वगैरे पुष्कळ आहेत (काव्यदोहन).

धुंडिराज बाजी पेशवे—(जन्म स. १८२४-मृत्यु ता. ६-१०-१८५८ नेपाळांत) यास नानासाहेब असेंहि म्हणत. इंग्रजांनीं स. १८५७ सालच्या बंडांत भाग

घेण्याच्या संशयावरून याच्या भावाला आपल्या स्वाधीन करण्याविषयीं लिहिलें, पण यानें तसें करण्याचें साफ नाकारलें. हाच सुप्रसिद्ध शेवटला नानासाहेब पेशवे होय. शेवटीं हा बंडांत सामील झाला व याला ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत राज्याभिषेकहि झाला होता.

धुंडिराज लक्ष्मण व्यास—राजव्यवहारकोशाचा कर्ता.

धेतन—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एक. यानें बिजरत्नदीप्ति ग्रंथ लिहिला.

धोकरिपा—हा जातीनें शूद्र. हा सालीपूरचा असून चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एकोणपन्नासावा. यानें 'प्रकृतिसिद्धि' ग्रंथ लिहिला (तं. ४८।७५).

धोभिपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं अडतिसावा सिद्ध. जातीचा धोबी, सालीपूरचा राहणारा.

धोयी—हा संस्कृतज्ञ पंडित बंगालचा राजा लक्ष्मणसेनाचा आश्रित होता. पवनदूत या संस्कृत काव्याचा कर्ता.

धोंडजी वाघ—(मृत्यु स. १८०० सप्टें.) एक बंडखोर. मूळ हिंदु. मागाहून मुसलमान झाला होता (धोंडोपंत वाघ पाहा).

धोंडो अनंत ऊर्फ **रुस्तुमराव वाकनीस**—हा शाहूच्या अखेर रामराजा गादीवर बसण्याच्या सुमारास होता. यानें मध्यंतरीं रामराजास लपविण्याच्या कामीं पुष्कळच मदत केली. तसेंच त्याला गादीवर बसण्याकरितां पानगांवाहून नीट संभाळून आणण्याच्या बाबतींतहि खूप मदत केली (म. रि. म. २, पृ. १४५-६२).

धोंडोपंत गोखले—(मृत्यु स. १८०० जून) हा बापू गोखल्याचा चुलता. हा कर्नाटकाचा सर सुभेदार होता. यास धोंडजी वाघानें ठार मारलें. याच्या बायकोचें नांव लक्ष्मीबाई. वाघाचा सूड घेतल्याशिवाय याची क्रिया करण्यास लक्ष्मीबाईनें हरकत घेतली, तेव्हां बापूनें वाघाचें मुंडकें भावजयीस नजर केलें.

ध्रुवदास—(स. १६२० सुमार) एक हिंदी कवि. हा हितहरिवंशजीचा शिष्य होय. हा वृंदावन येथें राहत असे. यानें एकूण ४० ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं कांहींचीं नांवें खालीलप्रमाणें—१ वृंदावनसत, २ सिंगारसत, ३ रसरत्नावली, ४ नेहमंजरी, ५ रहस्यमंजरी, ६ सुखमंजरी, ७ रतिमंजरी, ८ वन-विहार, ९ रंग-विहार, १० रस-विहार, ११ आनंद-हास्य-विनोद, १२ रंग-विनोद, १३ नृत्य-विलास, १४ रंग-विलास वगैरे ग्रंथ याचे आहेत. यानें नाभाजीच्या भक्तमालिकेचें अनुकरण करून 'भक्तनामावली' हा ग्रंथ लिहिला.

ध्रुवदेवी—गुप्तवंशांतील दुसऱ्या चंद्रगुप्ताची पत्नी. हिचे पुत्र कुमारगुप्त व गोविंदगुप्त.

ध्रुवभट परमार—(स. ११०० सुमार) आबूच्या परमारांपैकीं एक. हा कृष्णानंतर व रामापूर्वी झाला असावा.

२. सातव्या शिलादित्य मैत्रकाचें नामांतर.

३. दुसऱ्या ध्रुवसेन मैत्रकाचें नामांतर.

ध्रुवराज राष्ट्रकूट—(स. ८६७-८८८) राष्ट्रकूट घराण्यांतील गुजराथचा सुभेदार जो अकाल-वर्ष त्याचा हा मुलगा होय. स. ८६७ मध्यें हा आपल्या बापानंतर गुजराथच्या गादीवर आला.

यानें मिहिर (प्रतिहार घराण्यांतील भोजदेव राजा) याचा पराभव केला. याच वेळीं याचा भाऊ दन्तिवर्मन् अपरिमित-वर्ष हा स. ८८८ मध्यें गुजराथच्या सुभेदारीवर होता. कृष्णराज हा बहुतेक दन्तिवर्मनाचा मुलगा होय (B.).

ध्रुवसेन मैत्रक—(स. ५२६) हा वल्लभीच्या भट्टार्क मैत्रकाचा तिसरा मुलगा, या वेळीं जैनधर्माचा विशेष प्रचार होता. हूणांचा मांडलिक.

२. (स. ६२९-४५) हा खरग्रह मैत्रकाचा पुत्र. (बालादित्य) वल्लभीच्या घराण्यांतील तिसऱ्या धरसेन मैत्रकाचा भाऊ. स. ६२९ मध्यें हा आपल्या भावानंतर गादीवर आला.

स. ६३५ मध्यें ठाणेश्वरच्या हर्षवर्धनानें याचा पराभव केला, तेव्हांपासून हा हर्षवर्धनाचा प्रतिस्पर्धी बनला. त्याच वेळीं यानें हर्षवर्धनाच्या मुलीशीं लग्न लाविलें. स. ६४५ मध्यें याचा मुलगा धरसेन ४ था हा याच्यानंतर गादीवर आला (B.).

३. (स. ६५०-५६) चौथ्या धरसेन मैत्रकाला संतति नसल्यानें त्याचा एक नातलग तिसरा ध्रुवसेन म्हणून गादीवर बसला.

धोंडो मल्हार पुरंदरे—(आपा पुरंदरे पाहा).

न

नखीबाबा— (स. १८१९) हा माळव्यांतील तपस्वी ब्राह्मण. हा राजकारणांत भाग घेई. मालकम-साहेबांनीं याला हयातीपर्यंत ३०० रु. पेन्शन करून दिलें होतें (मं. त्रै. व. ११. २).

नजफरखान—(मीर्झा नजफरखान पाहा).

नजमुद्दोला दबीरुल्मुल्क मीर्झा असदुल्लाखा— (गालिब पाहा).

नजीबखान रोहिला—(मृत्यु स. ३१-१०-१७७०) हा दुआबांतील सहारणपूरचा जहागीरदार असून हाच स. १७६० च्या पावसाळ्यांत मराठ्यांच्या फौजा उत्तरेंत नाहींतसें पाहून अबदालीस हिंदुस्थानांत आणण्यांत प्रमुख होता. गाजीउद्दीनाचा विश्वासघात करून हा अबदालीस मिळाला. मीरशहाबुद्दीनानें रघुनाथराव पेशवे व होळकर यांची मदत घेऊन हा दिल्लींत प्रबळ झाला होता म्हणून ह्याचा पाडाव केला. हा कारस्थानी होता म्हणून रघुनाथ-राव याला मारणार होता, परंतु मल्हारराव‌ानें मध्यस्थी करून वांचविलें (भा. सा. ब. पृ. ३५). पेशवे प्रबळ होऊं नयेत म्हणून जनकोजी शिंद्यासहि होळकरानें नजीबास वांचविण्याचा कानमंत्र दिला. यानें गंगेवर पूल बांधण्याचें आमिष दत्ताजीस दाखविलें, व अबदालीस निकडीनें हिंदुस्थानांत आणलें; व दत्ताजीला होळकरादिकांपासून वेगळा गांठून ठार केलें. पानिपतच्या युद्धानंतर मराठ्यांचें लक्ष उत्तरेकडे नसतांना जाठ व नजीबखान ह्यांनीं उचल खाल्ली. स. १७६३ त यानें दिल्लीजवळ सुरजमल्ल जाठाचा पराभव करून त्यास ठार मारिलें. सुरजमल्लाचा मुलगा जवाहीरमल्ल यानें ह्याच्याशीं अनेक लढाया करून याच्या सैन्याचा संहार केला. ह्या वेळेस नजीबास होळकरानें साहाय्य केलें. स. १७७० त मराठ्यांनीं नवलसिंगाचा पराभव केलेला पाहून यास मोठी धास्ती पडली व हा पुन्हां कारस्थानें करूं लागला. शेवटीं ह्यानें पानिपतपूर्वी दुआबां-तील जितका मुलूख मराठ्यांचे ताब्यांत होता तेवढ्याच्या सनदा शहाजाद्याकडून मराठ्यांस आणून दिल्या व हा मराठ्यांचे लष्करांत, स्वतःचा मुलगा झबेताखान यासह तुकोजी होळकराचे विचारानें येऊन राहिला. पुढें हा नजीबगडास जातांना वाटेंत मरण पावला.

नजीर—(स. १७३८-१८१९) एक ऊर्दू कवि. हा मोठ्या लोकांना शिकवून उपजीविका करी. मुलांना हा लोण्या कविता करून देई. मुसलमान झाल्यावरहि हा आपल्या कवितेंत हिंदु देवतांची स्तुति करी. हा इतर ऊर्दू कवींपेक्षां वेगळा आहे. हा गरीबांबद्दल सहानुभूति दाखवी. याला लोक साधु मानीत. याचीं पुस्तकें-आदमीनामा, रोटीनामा, हंसनामा, जोगीनामा (क. कौ. ४).

नजीरुद्दीन कवाचा—(स. १२१० सुमार) शहा-बुद्दीन घोरीचा तुर्की गुलाम. मुलतानचा सुभेदार. कुतुबुद्दीन ऐबकचा जांवई. यानें सिंधचा बराच भाग जिंकला होता. पण शम्सुद्दीननें स्वारी केली तेव्हां हा पळाला (बील).

नट्टा चंदेल्ल—ही हर्ष चंदेल्लाची बहीण व कोक्कल कलचुरीची पत्नी.

नदसी अकसा—ही मथुरेच्या राजुल क्षत्रपाची पट्ट-राणी. हिनें मथुरेंत एक बौद्धस्तूप व मठ बांधला. त्यावर एक प्राकृत लेख आहे. त्यावरून हिच्या बापाचें नांव 'अधसिअ कुसुमअ' आणि मातेचें नांव 'अबुहोला'. नदसीचा पुत्र खरोस्ट.

नन्न रट्ट—हा सौंदत्तीच्या रट्ट घराण्याचा मूळ पुरुष. याला कंठेय भारद व नन्नपय अशा पदव्या होत्या.

नन्नदेव पांड्य—इंद्रबळ पांड्यानंतरचा राजा.

नन्नदेव राष्ट्रकूट—हा कर्क राष्ट्रकूटाचा मुलगा. याचा मुलगा संगरगण.

नन्नयभट्ट—एक तेलगू ब्राह्मण कवि. हा स. ११ व्या शतकांत होऊन गेला. यानें प्रथमतः लहानपणीं वेदा-ध्ययन करून नंतर शास्त्राभ्यास केला. हा याज्ञिक क्रियेंत चांगला निष्णात असे. यानें स्वतः सोमादि यज्ञहि केले होते. यानें एक तेलंगी भाषेचें जें व्याकरण केलें आहे त्यास 'आंध्रकौमुदी' असें नांव आहे. यानें नारायण-भट्ट नामक एका तैलंग ब्राह्मणाच्या साहाय्यानें महा-भारताच्या पहिल्या दोन पर्वांचें तेलंगींत जें भाषांतर केलें तें फारच उत्कृष्ट झालेलें आहे. तिसऱ्या पर्वास सुरुवात केल्यावर हा वारला. नंतर तें बालसरस्वतीनें पुरें केलें. याला पूर्व चालुक्याचा आश्रय होता. हा शैव होता. याच्यामुळें शैव मताचा जोर वाढला. राजमहेंद्रीच्या नरेंद्र राजाचा याला आश्रय होता.

नन्नुक चंदेल्ल—याचा राज्यारोहणकाल स. ८३१ असा ठरला आहे. त्या काळीं हर्ष-शक चालू होता. हाच या घराण्याचा मूळ पुरुष होय. स. ८३१ मध्यें पडत्या सम्राटाशीं एखादी लढाई होऊन त्यांत नन्नुकास विजय

मिळाला असावा व त्यानें परिहारास हुसकावून देऊन बुंदेलखंडांत चंदेल्लांची राज्यस्थापना केली.

चंदेल्ल (महोबा) घराणें—

१ नन्नुक (स. ८३१), २ वाक्पति (स. ८४५), ३ जयशक्ति (स. ८६०), ४ विजयशक्ति (स. ८८०), ५ राहिल (स. ९००), ६ हर्ष (स. ९१०), ७ यशोवर्मन् (स. ९३०), ८ धंग (स. ९५०), ९ गंड (स. १०००), १० विद्याधर (स. १०२०), ११ विजयपाल (स. १०३०), १२ देववर्मन् (स. १०४०), १३ कीर्तिवर्मन् (स. १०६०), १४ सल्लक्षण (स. ११००), १५ जयवर्मन् (स. १११०), १६ पृथ्वीवर्मन् (स. ११२०), १७ मदनवर्मन् (स. ११२५), १८ परमर्दिदेव (स. ११६५), १९ त्रैलोक्यवर्मन् (स. १२०३), २० वीरवर्मन्-राणी-कल्याणदेवी (स. १२४५), २१ भोजवर्मन् (स. १२८७).

यापुढें चंदेल्ल घराण्याचा धांग लागत नाहीं. पण कीरतसेनानें शीरशहास विरोध केला आणि प्रसिद्ध पराक्रमी राणी दुर्गावती हिनें अकबराच्या सेनापतीशीं लढाई देऊन रणांगणावर देह ठेविला. या दोन हकीगती मिळतात. हल्लीं चंदेल्लांचे वंशज बंगाल्यांतील प्रसिद्ध गिधोरचे महाराज होत.

नमिसाधु—हा धर्मानें श्वेतांबर जैन असून शालिभद्र नांवाच्या गुरूचा शिष्य होता. यानें रुद्रटाच्या काव्यालंकारावर स. १०६८-६९ मध्यें टीका लिहिली. याची टीका थोडक्यांत पण मुद्देसूद असून तींत अनेक ग्रंथांतील अवतरणें आहेत.

नम्मालवार—याची जात वेल्लाळ. याचा जन्म ताम्रपर्णी नदीच्या कांठीं तिनेवेल्ली जिल्ह्यांत झाला.

नयचंद्रसूरि—यानें रंभामंजरी नांवाची नाटिका महाराष्ट्रीत लिहिली असून तींतील नायक जयचंद्र गाहडवाल आहे. त्याच्या स्तुतिपर वैतालिकाच्या तोंडी एक पद्य मराठींत आहे. त्यावरून हा महाराष्ट्रीय कवि असावा.

नयपाल—(स. १०३८-५९ सुमार) हा बंगाल्यांतील पाल घराण्यापैकीं पहिल्या महीपालाचा मुलगा. अतिश नांवाचा बौद्धधर्माचा प्रचारक याच्या कारकीर्दीत स. १०४२ मध्यें तिबेटास गेला (हि. भा. अ. पा. ३४४). पण दुसरीकडे याचा काल स. १०६९-८४ असा आढळतो.

नयसेन—(स. १११२) हा १२ व्या शतकांत होऊन गेलेला कानडी कवि. यानें 'धर्मामृत' नांवाचा ग्रंथ स. १११२ त मुलुगंद (जि. विजापूर ?) येथें लिहिला. गुरु-गुणचंद्र. यानें एक व्याकरण लिहिलें असावें असें नागवर्मा याच्या म्हणण्यावरून दिसतें, पण तें उपलब्ध नाहीं. धर्मामृत (काव्यरत्न) या नीतिग्रंथांत चौदा प्रकरणें असून त्यांत धैर्य, सत्य, न्याय वगैरे सद्गुणांबद्दल उत्तम भाषेंत विवेचन केलें आहे. धर्मामृताशिवाय या जैन कवीचा कोणताहि ग्रंथ उपलब्ध नाहीं (क. क. च. भा. १, पा. ११७).

कानडी ग्रंथलेखनाला सुरुवात करून संस्कृत शब्दांचा मुक्तहस्तानें उपयोग करणाऱ्या ग्रंथकारांना कवि कोण म्हणेल ? कानडींत संस्कृत शब्द मिसळणें म्हणजे तुपांत तेल मिसळणें होय, असें यानें म्हटलें आहे.

नरपति—सीसोदें येथील राणाशाखेंतील माहपाचा पुत्र. याचा हरसू व नरु या नांवांनींहि उल्लेख येतो. याचा पुत्र दिनकर (रा. इ.).

नरभट—मंदोरच्या प्रतिहारांपैकीं रज्जिलाचा पुत्र. हा अत्यंत शूर असल्यामुळें यास पेल्लापेल्लि असें म्हणत (रा. इ.).

नरवर्धन—हा वैसवंशी रजपूत पुष्यभूतीचा पुत्र. याच्या पत्नीचें नांव वज्रिणीदेवी. पुत्र राज्यवर्धन.

नरवर्मा—अज्ञातवंशज सिंहवर्म्याचा पुत्र. याच्या वेळच्या एका शिलालेखांत याला महाराज म्हटलें आहे. त्यावरून हा मांडलिक असावा. याचा नातू गुप्तवंशी कुमारगुप्ताचा मांडलिक होता. त्यावरून हा दुसऱ्या चंद्रगुप्ताचा मांडलिक असणें शक्य आहे (एपि. इंडि. भा. १२, पृ. ३२०-३२२).

२. मेवाडच्या गादीवर हा शुचिवर्म्यानंतर आला. याच्यानंतर कीर्तिवर्मा आला.

नरवर्मा परमार—(मृ. स. ११३४) माळव्याच्या परमारांपैकीं उदयादित्याचा दुसरा मुलगा. हा आपला भाऊ लक्ष्मदेवानंतर गादीवर आला. प्रबंधचिंतामणिमध्यें याला यशोवर्मा असें म्हटलें आहे तें चूक आहे (सिद्धराज). जयसिंह हा आपल्या मातेसह सोमनाथाच्या यात्रेला गेला होता. तेव्हां यानें गुजराथवर स्वारी केली. तेव्हां जयसिंहाचा मंत्री सांतु तेथील कारभार पाहत होता. त्यानें याला 'कोणच्या अटीवर परत जातां ?' म्हणून विचारलें असतां यानें राजाच्या यात्रेचें पुण्य मिळत असल्यास परत जाण्याचें कबूल केलें. सांतूनें तें मान्य केलें व हा परत आला. पण ही गोष्ट जयसिंहाला आवडली नाहीं व तो याच्यावर चालून आला; व याचें राज्य दडपीत धारानगरीपर्यंत येऊन पोंचला. बांसवाडा राज्यांत तळवाडा गांवांत

एका देवळांत गणपतीच्या आसनावर जयसिंहाच्या वेळचा एक लेख कोरला आहे. त्यांत भीम, कर्ण व जयसिंह अशी वंशावळ आहे व जयसिंहानें नरवर्म्याला पराभूत केल्याचें लिहिलें आहे (राजपुताना म्युझियम्, अजमेर, स. १९१४–१५ चा वृत्तांत, पृ. २, ले. ४). ही स्वारी बारा वर्षें चालली होती. अशांत वि. सं. ११९० कार्तिक शुद्ध ८ ला हा परलोकवासी झाला. याचा पुत्र यशोवर्मा गादीवर आला व त्यानें युद्ध पुढें चालविलें.

नरवर्मा विद्वान् होता. त्याच्या वेळची वि. सं. ११६१ (स. ११०४) मधील नागपूरची प्रशस्ति यानें स्वतः केली आहे. उदयादित्याचा वर्ण व नाम आणि धातु यांच्या प्रत्ययाचा नागबंध यानें वरील ठिकाणीं कोरला आहे. जैन व वेदमतावलंबी यांच्यांत याच्या वेळीं शास्त्रार्थ होत. जैन पंडित समुद्रघोष व वल्लभसूरि यांचा यानें सन्मान केला होता. याच्या वेळचे दोन शिलालेख मिळाले आहेत (वि. सं. ११६१ मधील नागपूरचा (एपि. इंडि. भा. २, पृ. १८२–८८) व ११६४ मधील मधुकरगड येथील (एपि. इंडि. भा. ५ चें परिशिष्ट ले. सं. ८२).

नरवाहन गुहिलोत—(स. ९७१–७७) हा मेवाडच्या गादीवर अल्लटानंतर आला. हा अल्लटाचा पुत्र होता. शक्तिकुमाराच्या वि. सं. १०३४ (स. ९७७) च्या शिलालेखांत ' कलांचा आधार, विजयाचें निवासस्थान, क्षात्रयांचें उत्पत्तिस्थान, वैभवाचें घर आणि विद्येची वेदी ' असें याचें वर्णन आहे. याची राणी जेजय चौहानाची मुलगी होती (इंडि. अँटि. भा. ३९, पृ. १९१). मयूराचा पुत्र श्रीपति हा याचा अक्षपटलाधीश होता (आहाडचा अप्रकाशित शिलालेख). याच्या वेळची वि. सं. १०२८ (स. ९७१) ची एक प्रशस्ति मिळाली आहे. तींत याच्या वीरतेची प्रशंसा आहे (मुंबई ए. सो. ज. भा. २२, पृ. १६६–६७; ना. प्र. प. १, २५६–५९).

नरसा नायक तुलुव— (स. १४९८–१५०५) हा विजयनगरच्या साळुव घराण्यांतील नरसिंहरायाचा महामंत्री होय. नरसिंहरायाचे दोन पुत्र अल्पवयी असल्याकारणानें त्यानें याला आपल्या पश्चात राज्यकारभार पाहण्यास सांगितलें. पुढें ते दोघेहि राजपुत्र मारिले गेले. तेव्हां यानें राजपद बळकाविलें. हा स. १४९८ च्या सुमारास गादीवर बसला व सुमारें पांच वर्षे राज्य केलें. याच्यानंतर याचा पुत्र वीरनरसिंह गादीवर बसला.

याच्या बायका तिप्पाजी, नागला आणि ओबाम्बिका. कृष्णदेवराय तुलुव याच्या दुसऱ्या बायकोचा पुत्र होय.

नरसा नायडू—(स. १६०० सुमार) विजयनगरच्या राज्यांतील उदिरिपिकोंड संस्थानच्या तिम्म नायडूचा मुलगा. यानें किल्ल्याची दुरुस्ती करून त्याभोंवतीं तट बांधले आणि आपली राजधानी वसवून आपला राजवाडा बांधला, वगैरे सुधारणा केल्या.

नरसिंगमा—विजयनगरच्या तिरुमल्ल आरविदूची पत्नी.

नरसिंगराव धायगुडे—पेशवाईतील हा एक सरदार असून प्रथम राघोबादादाचे बाजूस होता. पण जेव्हां हरिपंतानें राघोबादादाचा पाठलाग सुरू केला, तेव्हां यानें दादाचा पक्ष सोडला. त्यामुळें दादाचें लष्कर फारच घाबरें झालें. याचा महाल अंबे निजामाकडे गेला म्हणून हा रुसून निघून जाणार होता. तेव्हां हरिपंतानें याची समजूत केली. तरीपण हा स्वस्थ न बसतां पेशव्यांच्या मुलखांत उपद्रव करूं लागला, तेव्हां नानानें याची जहागिरी जप्त करून याला कैद केलें (स. १७८८ च्या सुमारास). हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होता.

नरसिंगराव वेरुळकर—हे हैदराच्या दरबारीं पेशव्यांचे वकील होते. हे फार्सी भाषेंत मोठे निपुण होते. यांचे चिरंजीव आनंदराव नरसी. नरसिंगराव हें टिपूच्या वेळींहि श्रीरंगपट्टण येथें होते (ऐतिहासिक टिपणें पा. ५). यांच्या मृत्यूची बातमी असलेलें पत्र वरील ठिकाणीं छापलें आहे, पण त्यावर साल नाहीं.

नरसिंह—एकनाथाचा समकालीन व सामुद्रिकग्रंथाचा कर्ता.

नरसिंह कलचुरी—हा गयकर्ण व मुल्हणदेवी यांचा पुत्र.

नरसिंह कवि— ' शिवनारायणमंजमहोदयं ' नाटिकेचा कर्ता. यानें आपला आश्रयदाता जो केओन्झरचा मंजराजा शिवनारायण याचें वैभव वर्णिलें आहे.

नरसिंह गंग—(स. १२५३–१२५६) हा पूर्व गंग घराण्यांतील अनंगभीमाचा मुलगा. याच्या बायकोचें नांव सितादेवी असावें. याच्यानंतर याचा मुलगा वीरभानू १ ला हा गंगाच्या गादीवर आला.

२. (स. १२७५–१३०६) कलिंगच्या गंग घराण्यांतील पहिल्या वीरभानूचा मुलगा. हा आपणास ' प्रताप अनन्तवर्मन् ' असें म्हणवीत असे. याच्यानंतर याचा मुलगा दुसरा वीरभानू हा गादीवर आला.

३. (स. १३२५–५० मधून) मधून कलिंगच्या गंग घराण्यांतील दुसऱ्या वीरभानूचा मुलगा. हा आपणास ' गजपति ' असें म्हणवीत असे. याच्यानंतर

याचा मुलगा वीरभानू ३ रा हा गादीवर आला. याचा राज्याभिषेककाल स. १३२२–३ असा आहे.

४. (स. १३७८–१३९७) त्रिकलिंगच्या प्राच्य गंगांपैकी शेवटला राजा. याचा स. १३८५ मधला लेख उपलब्ध आहे. तिसऱ्या वीरभानूचा मुलगा. बायकोचें नांव पार्वती व मुलाचें नांव वीरभानु चौथा.

नरसिंह गुप्त—(स. ४६८–७२) हा मगध येथील राजा होय. याचा पिता पुरगुप्त, पण हा स्कंदगुप्तानंतर गादीवर आला. स. ४७२ पासून पुढील काल राज्यक्रांतीचा दिसतो.

यानें स. ५२८ मध्यें मध्यप्रांताचा राजा यशो-वर्मन् (स. ५३३–३४) याच्या साहाय्यानें मिहिरकुलाचा पराभव केला व त्याला कैद करून हिंदुस्थानाबाहेर हाकून दिलें. पण मिहिरकुलानें काश्मीरच्या राजाशीं मैत्री करून याला पुढें गादीवरून पदच्युत केलें. इतक्या उलाढाली केल्यावर मिहिरकुल मरण पावला. याच्यानंतर याचा मुलगा दुसरा कुमारगुप्त हा स. ५३० मध्यें गादीवर आला (B.). यालाच बालादित्य म्हणत.

नरसिंह ठक्कुर—यानें मम्मटाच्या काव्यप्रकाशावर ' नरसिंह-मनीषा ' नामक टीका लिहिली आहे. याच्या टीकेंत चंडीदास, लाटभास्करमिश्र, सुबुद्धिमिश्र, मधुमतीकार (रविभट्टाचार्य), कौमुदीकार इत्यादि पूर्वीच्या काव्यप्रकाश-टीकाकारांचीं नांवें आढळतात. हा मोठा नैयायिक होता.

नरसिंह(वर्मा) पल्लव—(स.६३०–६६८) हा जरी दुसऱ्या पुलकेशी प. चालुक्याचा मांडलिक होता तरी स. ६४२ मध्यें यानें त्याचा पराभव करून वातापी शहर लुटलें. पण त्याचा पुत्र विक्रमादित्यानें कांचीवर स्वारी करून चालुक्यांचा दरारा पुनः बसवला.

२. (स. ६९०–७१५) हा पहिल्या परमेश्वर पोतवर्मन्‌चा पुत्र.

नरसिंह(देव) बुंदेला—(मृत्यु स. १६२६) हा मधुकरशाहा बुंदेल्याचा मुलगा. हा अकबराचे कारकीर्दीत जहांगीरचा नोकर होता. यानें अकबराच्या आज्ञेनें अबुल फज्ल यास ठार मारलें. जहांगीरनें यास चार हजारी मनसबदार केलें.

नरसिंह(राय) साळुव—(स. १४८६–१४९२) हा विजयनगरच्या तिसऱ्या विरूपाक्ष संगमाचा सेनापति. यानें त्याला पदच्युत करून राज्य बळकावलें.

२. (स.१४९२–१५०५) यानें नातें उपलब्ध नाहीं. शेवटीं याला पुत्र नसल्यानें यानें आपला महामंत्री नरसा नायकाकडे मरतेसमयीं राज्य सोंपविलें. यानें घराणें शाल्व ऊर्फ साळुव. या तेलगू शब्दाचा अर्थ ससागा असा आहे. याच्या नांवामागें इम्मडी (दुप्पट) व वीर हे सन्मानाचे शब्द लावलेले असतात. यानें रायचूर व मुद्गल हे बळकट किल्ले आदिलशाहापासून घेतले. हा फार शूर व लोकप्रिय होता.

नरसिंह होयसल—(स. ११४१–७३) हा (विष्णुवर्धन) बिट्टिदेवाचा पुत्र. याच्या नांवामागें वीर किंवा विजय हे शब्द लावलेले असतात. याची पदवी जगदेकमल्ल. याची पत्नी एचलादेवी.

२. (स. ११७३–१२२०) हा वीरबल्लाळ होयसळचा मुलगा. यानें देवगिरीच्या यादवांना जिंकलें होतें. याला दोन बायकाः काळला व पद्मला. जांवई तिसऱ्या राजराज चोलास यानें पल्लवाकडून बंधमुक्त केलें. याचा आश्रित कानडी जन्न कवि. जन्नानें अनंतनाथपुराण याचे वेळीं लिहिलें. जन्नाला कविचक्रवर्ति ही पदवी बल्लाळानें दिली.

३. (स. १२५४–९१) हा सोमेश्वर होयसल व विज्जलादेवी यांचा पुत्र. यानें देवगिरीच्या यादवांना हाकून लावलें.

नरसिंहाचार्य कालगांवकर—(स. १७७० नंतर) हा विद्वान् शिरोमणि कृष्णाचार्याचा नातू. हा त्यागी, विद्याव्यासंगी होता (भा. व. खं. ३, ऐ. गो. १४–१५).

नरसी मेथा—(स. १४१५–८१) मीराबाईच्या समकालीन पण तिच्यापेक्षां हा श्रेष्ठ कवि होय. हा जुनागड येथील नागर ब्राह्मण. लहानपणींच याचे आईबाप वारल्यामुळें याचा प्रतिपाल याच्या चुलतभावानेंच केला. हा शिवोपासक असून बालपणापासून याचा कृष्णभक्तीकडे ओढा फार असे. साधूंच्या संगतींत भजन करण्यांत याचा वेळ जात असे. कांहीं वेळां हा स्वतः स्त्रियांच्या वेषांत गर्भ्याचा नाच करीत असे. ही गोष्ट याच्या आप्तांना आवडली नाहीं. इतकेंच काय पण त्याचा परिणाम इतका झाला कीं, नरसीच्या या कृत्यांची वार्ता ऐकून त्याला देऊं केलेली आपली मुलगी सुद्धां एकानें देण्याचें नाकारलें. यानें कृष्णभक्ति हें आपलें अंतिम ध्येय ठरविलें होतें व त्यांत हा सदा चूर होता. याची कविता रसाळ असून त्याचे दोन भाग पडतातः (१) शृंगारपर, (२) भक्तिपर.

नरसो गोविंद बोधले—पंढरपूरनजीक भटउंबऱ्याचे राहणार. ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. रामराजापासून पेशवाईअखेर यांचे पुरुष मराठेशाहींत पराक्रम

करीत होते. यांचे अस्सल कागद मं. तृ. सं. वृ. पृष्ठ २८ व ५७ येथें छापलेले पाहावे. यानें बारभाईविरुद्ध दादास कसून साह्य केलें (खरे ले. २१२४-५०).

नरहर बल्लाळ रिसबूड—(मृत्यु स. १६-२-१७६९) हा नागपूरचा सुभेदार असून प्रसिद्ध विठ्ठल बल्लाळ सुभेदार याचा मामा होता. जानोजी व मुधोजी यांचे भांडणांत इतर प्रसिद्ध सरदारांबरोबर हा जानोजीस मिळाला. पेशव्यांनीं जानोजीवर स्वारी केली असतां जानोजीची कुटुंबांतील मंडळी गाविलगडास असल्यामुळें त्यांचे रक्षणाकरितां जानोजीनें यास त्या बाजूस पांच हजार सैन्यानिशीं ठेवलें. पंचगव्हाण येथें याचा मुक्काम असतां पेशव्यांचे फौजेनें याजवर छापा घातला. त्या लढाईत हा मारला गेला (पे. द. २०. २२४).

नरहरि—मराठी कवि. ग्रंथ—शकुनवंती (ले. का. १६९५), गंगारत्नमाला.

२. मराठी कवि. ग्रंथ—शतकत्रय.

३. (जन्म स. १५०५) एक हिंदी कवि.

एकदां एक कसाई गाईला घेऊन जात असतां, गाय कसायाच्या हातून सुटून याच्या घरीं येऊन लपली. तेव्हां यानें ती गाय कसायास परत देण्याचें नाकारलें व एक कविता करून ती गाय अकबरापुढें नेली. तेव्हां त्यानें आपल्या राज्यामध्यें गोवध बंद केला. यानें 'नीतिविषयक' दोन ग्रंथ लिहिले आहेत (क. का. भा. १ ला).

नरहरि चक्रवर्ति—(घनश्यामदास पाहा).

नरहरितनय—मराठी कवि. ग्रंथ-मार्कंडेयचरित्र, ध्रुवचरित्र (सं. सू.).

नरहरितीर्थ—(समाधि स. १२९२) माध्वसांप्रदायाच्या पीठावरील एक आचार्य. यांचें पूर्वाश्रमांतील नांव शामशास्त्री. यांचे वडील कलिंगदेशच्या राजाच्या मुख्य मंत्र्याचें काम करीत होते. पुढें यांनीं कलिंगदेशचा कारभार हांकला (शके ११८६). यांचे गुरु आनंदतीर्थ (मध्वाचार्य) बदरिकाश्रमीं कायमचें वास्तव्य करण्याकरितां निघून गेल्यावर (शके ११९७) पद्मनाभतीर्थ त्यांच्या गादीवर होते व पद्मनाभतीर्थांच्या समाधीनंतर ९ वर्षेपर्यंत त्या गादीचें काम यांनीं पाहून श्रीमुख संवत्सरीं दशममासीं शुद्ध सप्तमीस हे समाधिस्थ झाले.

नरहरिदास—मराठी व रामदासी कवि. हा कोरेगांव व संगम माहुली येथें राहत असे. यानें 'अभंगरामायण' नांवाचा एक ग्रंथ लिहिला. हा कोरेगांवच्या बोकिलांपैकीं असावा (मं. पो. वृ. श. १८३४, ले. ४२).

गुरुपरंपरा—समर्थ-अनंत-मेरु- श्वेतगोविंद -नागेश-राजाराम-महादेव-हरिदास-नरहरि.

नरहरि धुंडिराज मालु—याचे कांहीं अभंग व पदें असून 'मालुतारण' व 'भक्तिकथामृत' असे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याचा ग्रंथ दिसावयास उत्तम असला तरी प्रसिद्ध माहितीखेरीज अधिक दिलेली माहिती कल्पित म्हणजे खोटी आहे (मं. तृतीय सं. श. १८३७, पा. १२०).

हे जातीचे सोनार. गुरुपरंपरा-मालो-नरहरि-महिपति (ताराबादकराहून भिन्न). भक्तिकथामृत ग्रंथाऐवजीं सं. सू. कारानें भक्तिकथासार असा ग्रंथ दिला आहे.

नरहरि महीपति—(समाधि स. १८२३) ह्या संतकवीनें मराठी भाषाद्वारें तत्त्वज्ञानाची अपूर्व कामगिरी बजाविली. ह्याचें आडनांव केरसुणे असून हा देशस्थ ऋग्वेदी विश्वामित्रगोत्री ब्राह्मण होय. याचे वडील पेशव्यांचे कारकून होते. यांचें मूळचें नांव सखाराम असून पुढें नाथपंथाची दीक्षा घेतल्यावर ह्यांना महीपतिनाथ हें नांव प्राप्त झालें. बालपणींच आईबाप वारल्यानें वडील बंधूनें ह्यांचें पालन व १२ व्या वर्षी लग्न केलें. हें कुटुंब लवकरच वारलें. पुढें लवकरच ह्यांना वैराग्य प्राप्त होऊन हे आळंदीस गेले. ह्यांचे गुरु शिवदिन-केसरी-शिष्य-नरहरी हे होत. हे 'ढोलीबुवा' संप्रदायाचे संस्थापक होत. ह्यांच्या कीर्तनाची छाप बरीच पडत असे, त्यामुळें यशवंतराव होळकरांनीं दोन गांवें, यशवंतरावची मुलगी भीमाबाईनें एक गांव व पेशव्यांनीं कांहीं द्रव्य यांस दिलें. परंतु यांनीं द्रव्याचा स्वीकार केला नाहीं. दौलतराव शिंद्यांनीं यांना गुरु केलें. ह्यांची अप्रसिद्ध कविता मठांत आहे. ह्यांचें अभंगात्मक विस्तृत भक्तचरित्रहि उपलब्ध आहे. ह्यांनीं ग्वाल्हेरला समाधि घेतली (महाराष्ट्र कविचरित्र भाग ६, पृ. १८३-२१२).

नरहरि मोरेश्वर—(स. १७२८-१७७८) याच्या वडिलांचें नांव मोरोजी नरहरी असून यानें रामदास-संप्रदायी भीमस्वामी यांजपासून गुरूपदेश घेतला. हा निजामशाहींतील बालाघाटाजवळ बीड परगण्यांतील (वीट) ईट गांवचा राहणारा. तुळापुरची भवानी ही याची कुलदेवता. ह्यास बजाजी असेंहि म्हणत. ह्यांचीं उद्योग, भीष्म, द्रोण व कर्ण हीं भारताचीं चार पर्वें उपलब्ध असून, त्यांपैकीं द्रोणपर्व मात्र प्रसिद्ध झालें आहे. ह्यानें मुक्तेश्वराचें बरेंचसें अनुकरण केलेलें दिसतें (म. क. च. भा. २ रा, पृ. २६-३५).

उद्योगपर्वांत यांची थोडी माहितीहि आढळते. त्यावरून उद्योगपर्वाचा रचनाकाल शके १६८१ प्रमाथीनाम संवत्सरे

कार्तिक शु. २ (यमद्वितीया) असा येतो. त्या दिवशी हें पर्व संपलें (मं. वार्षिक १८३७ पा. १८६-८८). यांची भाषा चांगली आहे.

हेच नरहरि रामदासी असावेत. परंपरा—समर्थ-भीमस्वामी-नरहरि (श. १६५०-१७००). रामदासी नसल्यास भक्तविजयांत मोरेश्वर तांबवेकर (श. १६००) यांचा निर्देश आहे त्यांचे हे शिष्य काय ?

ग्रंथ-आर्याटीका, रामजन्म (१६९०), शतमुखरावणवध, भारत (उद्योग, भीष्म, द्रोण, कर्ण पर्वे, अभंग वगैरे), (सं. सू.).

नरहरि (राघवात्मज)—मराठी कवि. सौंदळ प्रांत गोत्र अत्रि. उपनाम नाफडे, माता जानकी, पिता राघव, गुरु व सांप्रदाय-श्रीमहालक्ष्मी. ग्रंथ-समश्लोकीगीता (सं. सू. पुर.).

नरहरि रामदासी—मराठी कवि. वामनाच्या धर्तीवर कविता करणारा. ग्रंथ—गंगावर्णन, कात्यायनीव्रत, नौकानयन, दानव्रत (सं. सू.).

नरहरि रुद्र—शिवाजीनें दक्षिण दिग्विजय करतांना पन्नास हजार लांच घेऊन अबदुल्लाखानें वेलोर शिवाजीच्या ताब्यांत दिला (सरकार-शिवाजी-३४८). वेलोरजवळ दोन टेकड्या होत्या; तेथें किल्ले बांधून त्यांचीं नांवें साजिरा व गोजिरा अशीं ठेवलीं व नरहरि रुद्रास हवालदार नेमलें. हा पुढें राजारामाच्या कारकीर्दीत महत्त्वास चढून यास सेनाकर्ते हें पद मिळालें (स. प. पृ. १८२).

नरहरिसुत—मराठी कवि. एकनाथचरित्रकार मुकुंदराजाचें चरित्र करणारा (सं. सू.).

नरहरि सोनार—(समाधि स. १३१४-माघ कृ. १ शके १२३५) प्रथम हा देवगिरीस व नंतर पंढरीस राहिला. वडिलांचें नांव दिनानाथ. प्रथम कट्टा शैव पण पुढें विष्णुदास होऊन भागवत धर्माची दीक्षा घेतली. हा ज्ञानेश्वराचा समकालीन असून त्याजवर याचा फार भाव होता. ह्याच्या नांवावर ३०-४० अभंग आहेत. हा लिंगायत होता, असें भक्तविजयांत म्हटलें आहे (अ. २०). ह्याची समाधि पंढरीस आहे (म. सा. १. १६६-६७).

नरेंद्रकवि—(स. १२८८) हा महानुभाव सांप्रदायापैकीं असून यानें रुक्मिणीस्वयंवर नांवाचा काव्यग्रंथ लिहिला आहे (शके १२१०). यानें तो रामदेवराव जाधव यास वाचून दाखविला होता.

नरेंद्रगुप्त—एक बंगालचा राजा. याला शशांक असेंहि म्हणत. यानें राज्यवर्धनाला आपल्या महालांत नेऊन विश्वासघातानें ठार मारलें. पुढें हर्षवर्धनाच्या भंडी नांवाच्या मंत्र्यानें याचा सूड घेऊन याला ठार केलें (हर्षचरितम्).

नरेंद्रदेव—(स. ७००) हा नेपाळच्या ठाकूरी वंशांतील राजा. हा चंद्रकेतुदेवाच्या मागून गादीवर बसला. हा बौद्धधर्माचा अभिमानी होता.

नरेंद्रसेन वाकाटक—(स. ४३५-७०) हा दिवाकरसेन वाकाटकाच्या मागून गादीवर बसला. प्रवरसेन ऊर्फ दामोदरसेन हा याचा पिता होय.

नरेंद्रादित्य—(स. ३००-४००) काश्मीरचा राजा. यानें अमरावतीचें सुंदर देवालय बांधलें.

नरोत्तमदास—(ज. स. १४९२-मृ. स. १५४४) एक हिंदी कवि. सितापूर जिल्ह्यांतील बाडीचा राहणारा. ग्रंथ-१ सुदामचरित्र, २ ध्रुवचरित्र (अप्रसिद्ध).

नऱ्होजी जाचक—हा पहिल्या रघूजीच्या प्रमुख मराठे सरदारांपैकीं एक होय. रघूजीच्या मृत्यूनंतर त्याचे मुलगे जानोजी व मुधोजी यांच्यांत भांडणें सुरू झालीं. तेव्हां हा जानोजीचे बाजूस होता. स. १७५७ ते ५८ त जानोजीच्या निजामअलीशीं झालेल्या युद्धांत हा जानोजीकडून हजर होता.

हा मूळचा वर्धा जिल्ह्यांतील राहणारा. हा बारभाटींच्या किल्ल्यावर पहिला किल्लेदार होता. याचे वंशज वर्धा जिल्ह्यांत आवीं तहसलींत सोरठा वगैरे गांवचे मालगुजार आहेत (ना. प्रां. इ.).

नलिनपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं चाळिसावा सिद्ध. जात क्षत्रिय. राहण्याचें ठिकाण सालीपुत्र. यानें धातुपाद नांवाचा ग्रंथ लिहिला (तं. ४८-६८).

नल्लकवि—कौशिकगोत्री छंदोग बालचंद्र मखींद्रपुत्र. याचा जन्म कुंभकोणमूच्या जवळ कंडरमाणिक्य अग्रहारांत झाला होता, व तो रामनाथमखींद्र व सदाशिवब्रह्मेंद्र यांचा शिष्य होता. यानें 'सुभद्रापरिणय' नाटक व 'शृंगारसर्वस्व' भाग लिहिला.

नल्लसिंहभट्ट—(स. १३००) विजयपाल राजाच्या लढाईचें वर्णन केलेला 'विजयपालरासो' नांवाच्या ग्रंथाचा कर्ता असून एक हिंदी कवि म्हणून हा प्रसिद्ध आहे. ह्यानें लिहिलेल्या हम्मीरपर्यंतच्या वीररसप्रधान काव्याचा इतिहासाला फार उपयोग होतो.

नवलक्ष साळ्या—जोगा परमानंदाचें नामांतर.

नवलसिंह—हा हिंदी कवि. झांशीचा राहणारा व समभर नरेश हिंदुपति याचा आश्रित होता. याचा कल भक्ति व ज्ञान यांकडे विशेष होता. ह्याचे ग्रंथ-रासपंचा-

ध्यायी, रामचंद्रविलास, नामचिंतामणि, अध्यात्मरामायण, सीतास्वयंवर, पूर्व शृंगारकांड, जन्मखंड.

नवलोजी गुजर—दुसऱ्या रघूजी भोसल्याची बहीण ठकाबाई यास दिली होती. याचा पुत्र गुजाबा.

नसीब पूर्वी—(राज्यारोहण स. १५२३) बंगालचा सुलतान. अलाउद्दीन पूर्वीचा पुत्र.

नसीम—(स. १८१०–१८४२) एक ऊर्दू कवि. याचें नांव पंडित दयाशंकर कौल. गांव लखनौ. याचें 'गुलजार नसीम' हें काव्य प्रसिद्ध आहे. शिवाय एक दीवाणहि आहे (क. कौ. ४).

नसीरखान—गुजराथचा सुलतान जो मुज्फर २ रा त्याचा हा एक मुलगा होय.

नहपान क्षत्रप—याचें राज्य दक्षिणेंत नाशिक, पुणें, गुजराथ, काठेवाड, माळवा व राजपुतान्यांत पुष्करच्या उत्तरेच्या भागापर्यंत होतें. याला शा. शक ४१–४५ पर्यंत शिलालेखांत क्षत्रप असें लिहिलें आहे (एपि. इंडि. भा. १०, ले. ११३३–३४). पण याचा मंत्री अयम (अर्यमन्) याच्या शा. शक ४६ च्या लेखांत यास महाक्षत्रप म्हटलें आहे (एप. इंडि. भा. १०, परिशिष्ट ले. ११७४). याची कन्या दक्षमित्रा ही दीनीकपुत्र उषवदाताला दिली होती. उषवदात याचा सेनापति होता. शेवटीं आंध्र राजापैकीं गौतमीपुत्र शतकर्णीनें याला ठार करून याचें बहुतेक राज्य घेतलें असें दिसतें (रा. इ.). याची राजधानी जुन्नर येथें होती (इंडि. अँटि. ऑगस्ट १९३६).

नंद—बुद्धदेवाचा सावत्र भाऊ. याला बुद्धदेवानें आपला शिष्य केला होता. हा लहान होता तेव्हां हा बुद्धदेवाशीं खेळत असे. लिच्छवींच्या राजानें शाक्यांच्या राजधानींत एक हत्ती भेट म्हणून धाडला होता. त्याला ठोसा मारून देवदत्तानें ठार केलें, तो रस्त्यांत पडला असतां यानें त्याला बाजूला ओढून टाकला. गौतम-बुद्धानें त्याचें शेपूट धरून त्यास नगराबाहेर फेंकलें. त्या वेळीं नंद व बुद्ध यांचें वय दहा वर्षांचें होतें.

२. (दुसरा जाम निझामुद्दीन पाहा).

नंदकुमार—एक बंगाली ब्राह्मण. वीरभूम जिल्ह्यांत स. १७२० त जन्मला. सुजाउद्दौलाच्या हाताखालीं हा नोकर होता. हा नबाबाचा नोकर असून इंग्रजांस आंतून फितुर असे. नंदकुमाराच्या मनांत त्याची वझिरी आपणास मिळावी असें होतें. हेस्टिंग्ज नंदकुमार यास कामापुरता हातीं घेई. त्यानें (नंदकुमारानें) हेस्टिंग्जवर बेगमांकडून लांच खाल्ल्याची फिर्याद आणली. सभासदांनीं हेस्टिंग्ज यास लांचाची रक्कम परत करण्यास हुकूम दिला. त्यामुळें तो नंदकुमारावर चिडला. त्यानें यावर आपल्या-विरुद्ध कट केल्याची फिर्याद आणली. त्यांत तो निर्दोषी सुटला. यावर त्यानें ६ वर्षांपूर्वी खोटा दस्तऐवज केल्याची फिर्याद आणली. त्यंत यास फांशीची शिक्षा देण्यांत आली.

नंददास—हा सुरदासजींचा समकालीन होता. एक हिंदी कवि. याचें लक्ष सिंधुनद गांवांतील एका रूपवती कन्येवर बसलें होतें,पण गोसावी विठ्ठलनाथाच्या सदुपदेशानें याचा तो मोह सुटला. पुढें यानें त्यांना गुरु केलें. यानें लिहिलेलीं पुस्तकें–१ रास-पंचाध्यायी, २ अनेकार्थमाला ३ रुक्मिणी-मंगल, ४ हितोपदेश, ५ दशमस्कंध, ६ भागवत, ७ दानलीला, ८ मानलीला, ९ ज्ञान-मंजरी, १० अनेकार्थ-मंजरी, ११ रूप-मंजरी, १२ नाम-मंजरी, १३ नाम-चिंतामणि, १४ मालारस-मंजरी, १५ विरह-मंजरी, १६ नाममाला, १७ नासकेतु–पुराण (गद्य) आणि १८ शामसगाई, १९ भ्रमरगीत.

नंदन—मंख कवीच्या श्रीकंठचरित्राच्या परीक्षणार्थ काश्मीर येथें जमलेल्या तीस पंडितांपैकीं एक.

नंद पंडित—(स. १५९५–१६३०) संस्कृतमधील धर्मशास्त्रकार. याचे ग्रंथ–१ विद्वन्मनोहर (पराशरस्मृति-टीका), २ प्रमिताक्षरा किंवा प्रतीताक्षरा (मिताक्षरा-टीका), ३ श्राद्धकल्पलता, ४ स्मृतिसिंधु (महेंद्र घराण्यां-तील हरिवंशवर्मन्च्या सांगण्यावरून), ५ तत्त्वमुक्तावलि, ६ केशववैजयन्ती किंवा वैजयन्ती (यांत कर्नाटकांतील विजयपूरच्या ब्राह्मणराजवंशांची माहिती आहे. कोंडप नायकाचा पुत्र केशव नायकाच्या नांवानें हा ग्रंथ आहे), ७ दत्तकमीमांसा, ८ नवरात्रप्रदीप, ९ हरिवंशविलास, १० काशीप्रकाश, ११ तीर्थकल्पकता, १२ शुद्धिचंद्रिका, १३ कालनिर्णयकौतुक, १४ ज्योतिःसारसमुच्चय, १५ स्मार्तसमुच्चय.

याचा पूर्वज लक्ष्मीधर हा बिदरचा राहणारा. तेथून तो काशीस गेला. लक्ष्मीधरापासून हा सहावा पुरुष. हा विनायक पंडित या नांवानेंहि प्रसिद्ध आहे. याच्या पित्याचें नांव रामपंडित (काणे).

नंदराज—(स. १७५७–६०) म्हैसूरचा दिवाण.

नंदलाल मंडलोई—(मृत्यु स. १७३१) इंदूरचा मोठा जमीनदार. मूळ गांव कंपेल (इंदूरजवळ). पिता चुडामण. गौड ब्राह्मण. गोत्र भारद्वाज. याच्या सदतीनें मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश झाला. याचा व जयसिंगाचा स्नेह होता. याचा पुत्र तेजकर्ण. याच्या मागें राव असें गौरवार्थ लावतात.

नंदीवर्धन—महावीर जैनाचा भाऊ. पत्नी चेतककन्या ज्येष्ठा.

नंदीवर्मन् पल्लव—(स. ५२५–५०) एक राजा.

२. (स. ७१७–७७९) कोंजेवर्मन् येथील पल्लव घराण्यांतील हिरण्याचा हा मुलगा. हा स. ७१० च्या सुमारास राज्य करीत असून त्या वेळीं याची भरभराट होती.

यानें पूर्व चालुक्य घराण्यांतील तिसऱ्या विष्णुवर्धनाचा प्रांत जिंकला. याशिवाय यानें पल्लव राजा चित्र-माय यास ठार मारिलें आणि साबर उदयन व निषाद पृथ्वीव्याघ्र यांचा पराभव केला. यानें एकंदर ५० वर्षे राज्य केलें (B.). पश्चिम चालुक्य राजा विक्रमादित्य २ रा यानें याचा पराभव करून, कोंजेवरम् शहरांत शिरून भयंकर जुलूम केला (B.). (उदयचंद्र पाहा. २ रा परमेश्वरवर्मन् पाहा).

३. (स. ८३०–५४) दंतिवर्मन् पल्लवाचा मुलगा. पत्नी शंखद. अमोघवर्ष राष्ट्रकूटाला याची मुलगी दिली होती.

नाग—मंख कवीचे परीक्षक जे तीस पंडित त्यांतील एक वैय्याकरण व अलंकारशास्त्रज्ञ.

नाग गुहिलोत—(स. ६२६–८८) उदेपूरच्या गादीवरील महेंद्रानंतर गादीवर आला. ख्यातांत याला नागादित्य म्हटलें आहे. नागदानगर यानें वसविलें अशी लोकप्रसिद्धि आहे. शिलालेखांत नागद्याला नागन्हद किंवा नागद्रह लिहिलेलें आढळतें. कदाचित् त्यापूर्वीच्या नागांचा संबंध नागद्याशीं असेल.

नागण्णा—विजयनगरच्या दुसऱ्या देवराय संगमाचा महामात्य. याला धन्नायक किंवा धननायक अशी पदवी होती.

नागचंद्र—(स. ११००) हा कानडी कवि अभिनवपंप या नांवानेंहि प्रसिद्ध आहे. गुरु बाळचंद्रमुनि. हा जैन होता. द्वारसमुद्राच्या पहिल्या बल्लाळ राजाच्या पदरीं कांति नांवाची विदुषी होती तिच्या व याच्या संवादाच्या कविता व समस्या उपलब्ध आहेत. त्यावरून याचा वरील काल ठरतो.

ग्रंथ—१ रामचंद्रचरित्रपुराण (पंपरामायण), २ मल्लिनाथपुराण, शिवाय जिनमुनितनय, जिनाक्षरमाले इत्यादि अनेक ग्रंथ यानें केले असें देवचंद्रा (स.१८३८) नें आपल्या राजावलिकथेंत लिहिलें आहे. परंतु प्रसिद्ध झालेल्या 'जिनमुनितनय' या ग्रंथाचें वरील दोन्ही ग्रंथांशीं बिलकुल साम्य नाहीं. त्यामुळें कोणीतरी याच नांवाच्या आधुनिकानें तो ग्रंथ केलेला दिसतो. हस्तलिखितांत अभिनव नागचंद्र असें नांव आहे. उपलब्ध जिनाक्षरमाले हा ग्रंथ पोन्नाचा असावा. शिवाय याचाहि एखादा असेल.

मल्लिनाथपुराण विजापूरला मल्लिनाथमंदिरांत लिहिलें (क. क. च. भा. १, पा. १०१).

नागरिदास—(कविताकाल स. १७२२–१७६१, मृत्यु स. १७६४) हा कृष्णगड(राजपुताना)चा राजा व एक हिंदी कवि. ह्याच्या बापाचें नांव राजसिंह असून हा राठोड क्षत्रिय होता. ह्याचें मूळचें नांव सावंतसिंह. हा कवि असूनहि शूर होता. ह्यानें मराठ्यांच्या मदतीनें भावापासून गादी मिळविली. पण गृहकलहामुळें ह्याला पुढें वैराग्य आलें, व हा वृंदावनास गेला. ह्याचे ग्रंथ–शृंगारसार, गोपीप्रेमप्रकाश, पदप्रसंगमाला, व्रजवैकुंठतुला इत्यादि. पुष्कळ लहान लहान भक्तिप्रधान काव्यें यानें केलीं आहेत (क. कौ. १).

नागदेवाचार्य—(स. १२?६–१३०२) हा चक्रधर कृष्णाचा शिष्य. हा महानुभावपंथाचा संघटनाचतुर प्रचारक होता (चक्रधर पाहा).

नागपाल—सीसोदें येथील राणाशाखेंतील हा जसकरणाचा पुत्र. याचा पुत्र पूर्णपाल.

नागबोधिपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं शहात्तरावा सिद्ध. हा जातीनें ब्राह्मण असून नागार्जुनाचा शिष्य होता. यानें अदियोग भावना नांवाचा ग्रंथ लिहिला.

नागभट प्रतिहार— (स. ७२५–४०) रघुवंशी प्रतिहारांपैकीं हा पहिला पुरुष आहे. याच्यापासून या वंशाची वंशावळ मिळते. याला नागावलोक असेंहि म्हणतात. भडोच जिल्ह्यांतील अंकलेश्वर तालुक्यांतील हांसोट येथें दुसऱ्या भर्तृवट्ट (भर्तृवृद्ध) चौहानाचें दानपत्र वि. सं. ८१३ (स. ७५६) मधील मिळालें आहे. त्यावरून तो नागावलोकाचा सामंत होता असें दिसतें. त्या दानपत्रांतील नागावलोक व हा नागभट एकच असावा (एपि. इंडि. भा. १२, पा. २०२–३). यावरून असें दिसतें कीं याचें राज्य मारवाडपासून भडोचपर्यंत होतें. याच्यावर मुसलमान बलुची लोकांनीं स्वारी केली होती, पण तींत मुसलमान बलच (बलुची) पराभूत झाले. ही स्वारी सिंधाकडून झाली होती (प्रतिहार राजा भोजदेवाची ग्वाल्हेर प्रशस्ति, आर्किऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया, १९०३–४ चा रिपोर्ट, पृ. २८०).

याची राजधानी मंडोर (जोधपुराजवळील) होय. स्मिथच्या मतें याची राजधानी भिन(ल)माल ही होय. अरबांनीं सिंध घेतल्यावर त्यांनीं मारवाडवर मोर्चा

वळविला, त्या वेळीं नागभटानेंच त्यांची लाट थोपवून बाप्पा रावळाप्रमाणें कीर्ति मिळविली.

२. (स. ८१५-३२) रघुवंशी प्रतिहारांपैकीं वत्सराजाचा पुत्र. याला नागावलोक असेंहि म्हणत. यानें चक्रायुधाचा पराजय करून कनोजचें राज्य घेतलें. याच्या वेळेपासूनच यांची राजधानी कनोज असावी. आंध्र, सैंधव, विदर्भ (वऱ्हाड), कलिंग व बंगाल येथील राजांना यानें जिंकलें. तसेंच आनर्त, मालव, किरात, तुरुष्क, वत्स आणि मत्स्य इत्यादि राजांचे डोंगरी किल्ले यानें घेतले, असें ग्वाल्हेरच्या प्रशस्तींत लिहिलें आहे (आर्कि. सर्वे ऑफ इंडिया, १९०३-४ रिपोर्ट, पा. २८०). राजपुतान्यांत ज्याची विशेष प्रसिद्धि आहे व ज्यानें पुष्करचे घाट तयार केले अशी प्रसिद्धि आहे तो नाहडराव म्हणजे हाच नागभट असावा. याच नांवाचा मंदोरचा प्रतिहार तो नव्हे. याच्या वेळचा एक शिलालेख वि. सं. ८७२ (स. ८१५ चा जोधपूर राज्यांतील कचकला येथें मिळाला आहे (एपि. इंडि. भा. ९, पृ. १९९-२००). हा भगवतीदेवीचा परम भक्त होता. याला ईसरादेवी नांवाच्या राणीपासून रामभद्र नांवाचा पुत्र झाला वि. सं. ८९० भाद्रपद शुद्ध ५ ला हा मेला, असें जैन चंद्रप्रभसूरीनें आपल्या प्रभावकचरितांत लिहिलें आहे.

३. मंदोरच्या प्रतिहारवंशांपैकीं नरभटाचा पुत्र. याला नाहड असेंहि म्हणत. यानें जोधपूर राज्यांतील मेडंतकपुर (मेडता) ही आपली राजधानी केली. याची राणी जज्जिकादेवी. तिच्यापासून यास तात व भोज असे दोन पुत्र झाले.

नागराज— (ग्रंथलेखनकाल स. १३३१) यानें 'पुण्यश्रवांस' नांवानें पौराणिक पुरुषांच्या ५२ कथा लिहिल्या आहेत.

नागरीदास—वल्लभाचार्यांचा शिष्य.

२. स्वामी हरिदासाच्या शिष्यपरंपरेंतील एक.

३. हा गोस्वामी हितहरिवंशाच्या श्रीकृष्णचैतन्य महाप्रभूच्या संप्रदायांतील एक.

नागलंबिका—लिंगायत धर्मसंस्थापक बसवाची दुसरी बहीण. चन्नबसवाची आई.

नागला—विजयनगरच्या नरसिंहराय तुलुवाची दुसरी बायको.

२. हा पश्चिम चालुक्य सहावा विक्रमादित्य याचा सेनापति चामुंडराजाची मुलगी व इरुगई याची पत्नी होय. वेंगीच्या लढाईत वीर राजेन्द्र चोलानीं हिचें नाक कापलें.

नागवर्धन—हा जयसिंह पश्चिम चालुक्याचा पुत्र. हा गुजराथच्या शाखेचा संस्थापक. हा आपणास 'जयाश्रय-त्रिभुवनाश्रय' वगैरे पदव्या लावी.

नागवर्मा—(स. ९८४ सुमार) कानडी कवि व छंदःशास्त्रकार. हा जैन होता. गांव-वेंगीप्रांतांतील वेंगीपिळु, गोत्र-कौंडिण्य, पिता-वेण्णमय्य, माता-पोळकब्बे. गुरु-अजितसेनदेव. वेण्णमय्य-दाममय्य-वेण्णमय्य-पोळकब्बे-नागवर्मा.

हा योद्धाहि असावा. याला राचमल्लाचा भाऊ रक्कसगंग (स. ९८४) याच्या वेळीं चावुंडरायाचा आश्रय होता.

यानें 'छंदोबुंधि' हा छंदःशास्त्रावरील ग्रंथ बायकोला सांगितलेला आहे. बाणाच्या कादंबरीचा 'कर्नाटक कादंबरी' हा चंपूरूप संक्षिप्त अनुवाद यानें केला आहे.

२. (स.११४५ सुमार) कानडी कवि. पिता-दामोदर. जैन होता. याला जगदेवमल्ल चालुक्याचा आश्रय होता. याच्या वृद्धावस्थेंत हा जन्नाचा गुरु होता. ग्रंथ-काव्यावलोचन (अलंकारशास्त्र), वस्तुकोश (संस्कृत कर्नाटक निघण्टु), कर्नाटकभाषाभूषण (व्याकरण). जन्नाच्या लिहिण्यावरून असें दिसतें कीं यानें एक जिनेंद्रपुराण लिहिलें असावें. नाकिग असेंहि याचें नांव होतें.

३. (स. १०७०) कानडी कवि, ब्राह्मण व अद्वैती पंडित. ग्रंथ-चंद्रचूडामणिशतक. दुसरा सोमेश्वर (प) (भुवनैकमल्ल) चालुक्याचा उदयादित्य नांवाचा मांडलिक होता. त्याचा हा सांधिविग्रहिक होता. आदिपंपाला हा गुरु म्हणतो (शिकारपूर नं. १२९ या शासनावरून). यानें बलिपूर येथें घाट व देवळें बांधलीं आहेत.

नागार्जुन—(ख्रि. पू. ३३-स. ३०० सुमार) हा दक्षिण हिंदुस्थानांतील एक ब्राह्मण. नंतर हा बौद्ध झाला. हा रसायन, वैद्यक, वेदान्त आणि मंत्रविद्या यांत अत्यंत निष्णात होता. हा प्रथम जैन होता, नंतर बौद्ध झाला असें म्हणतात. हा पश्चिम हिंदुस्थानांतील मोठा पंडित होता, असें हु-एन्-त्संग म्हणतो. सुश्रुतसंहितेचा प्रतिसंस्कर्ता हाच होय असें डल्हन आपल्या टीकेंत म्हणतो. बौद्ध पंडित आर्यदेवाची व याची मुलाखत झाली होती. याला अदृश्य होण्याची विद्या येत होती. याचा चरित्रकार कुमारजीव म्हणतो, याला ज्योतिष व अनेक मौल्यवान् वस्तु तयार करतां येत होत्या.

बौद्धांच्या महायान पंथांतील माध्यमिक तत्त्वज्ञानाचा हा संस्थापक होता. याचा जन्म आंध्रराजा सद्राह याच्या कारकीर्दीत विदर्भ देशांत महाकोसल येथें झाला. यानें आपल्या आयुष्याचीं बरींच वर्षें कृष्णानदीचे बाजूस

असलेल्या श्रीपर्वतावरील एका गुहेंत विचारांत घालविलीं. यानें राजा भोजदेवास बुद्धधर्माची दीक्षा दिली असें म्हणतात. हा खि. पू. ३३ या वर्षी होऊन गेला असें म्हणतात. पण तारानाथांचें म्हणणें हा स. ३०० मध्यें झाला असावा. कुमारजीवानें स. ४०१ मध्यें याच्या चरित्राचें चिनीत भाषांतर केलें आहे.

माध्यमक तत्त्वज्ञानावरील याचे ग्रंथ—१ माध्यमिककारिका, २ युक्तिषष्टिकारिका, ३ विग्रहव्यवरात्निकाटिका, ४ विग्रहव्यवहर्तिवृत्ति (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक). यानें कानडींत व संस्कृतांत रसविद्येवर अनेक ग्रंथ केले आहेत. यानें माध्यमिक कारिकेवर 'अकुतोभया' नांवाची संस्कृतांत टीका लिहिली होती, पण ती सध्यां उपलब्ध नाहीं. याशिवाय मुक्तिषष्टिका, शून्यतासप्तति, प्रतीत्यसमुत्पादहृदय, महायानविंशक, धर्मसंग्रह, सुहृल्लेख इत्यादि अनेक ग्रंथ याचे नांवावर मोडतात. सुहृल्लेखांतील सुहृत म्हणजे सातवाहन असें चिनी प्रवासी इत्सिंग म्हणतो. हा सातवाहन म्हणजे गौतमीपुत्र यज्ञश्री (स. १६६–१९६) हा होय. प्रज्ञापारमितासूत्रशास्त्र, दशभूमिविभाषाशास्त्र, एकश्लोकशास्त्र या टीका निःसंशय नागार्जुनाच्याच होत. परंतु तिबेटी भाषेंतील 'प्रज्ञादंड' ही याचीच असेल असें सांगतां येत नाहीं (विंटरनिट्झ–हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर, भा. २).

नृपतुंग (स. ८१४–७७) नांवाच्या कानडी भाषेंतील कवीच्या (कविराजमार्ग) नांवाच्या छंदःशास्त्रावरील ग्रंथांत कानडींतील प्राचीन गद्य ग्रंथकारांचीं नांवें सांगतांना याचें नांव दिलें आहे. त्यावरून यानें कानडींत गद्यग्रंथ लिहिला असावा असें दिसतें (क. क. च. भा. १, पा. ११).

हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं सोळावा सिद्ध होय. हा जातीनें ब्राह्मण असून कांची प्रांतांतील राहणारा होता. हा सरहाचा शिष्य (सिद्धांची माहिती).

यानें आपल्या जागीं आर्यदेवाची नेमणूक केली. शेवटीं याचा वादांत पराजित झालेल्या प्रतिस्पर्ध्यानें खून केला. नागपूरजवळ रामटेकपाशीं याची एक गुहा आहे.

नागावलोक—नागभटाचें नामांतर.

नागी—नामदेवाची दासी. हिचा निर्देश गोंदाच्या अभंगांत आहे.

नागेश—(स. १६७८ सुमार) मराठी कवि. याचें समग्र नांव नागेश मोरेश्वर मुळे जोशी. हा वत्सगोत्री माध्यंदिन शाखेचा यजुर्वेदी ब्राह्मण. याचें आराध्यदैवत श्रीभांडेश्वर. गांव भिंगार. याचा बाप पंचांग वर्तवणारा चांगला ज्योतिषी होता. आई जानकी. याची रचना वामनासारखी यमकबद्ध आहे. याचे ग्रंथ—सीतास्वयंवर, चंद्रावळ, रुक्मिणीस्वयंवर, रसमंजरी, शारदाविनोद (मं. शके १८३४ चा अहवाल, पा. ५८–५९).

नागेशभट्ट वेंकटेशभट्ट—(स. १७४१–८२) एक विद्वान् सारस्वत ब्राह्मण. यांचे पूर्वज मास्तीचे उपासक होते. त्यांत यांनीं व्यंकटेशाच्या उपासनेची भर घातली. यांनीं धर्मशास्त्र व ज्योतिष यांवर पांचसहा मोठाले ग्रंथ लिहिले असें म्हणतात. त्यांपैकीं 'स्मृत्यर्थमुक्तावलि, तांत्रिकमुक्तावलि, आगमग्रंथ' हे तीन ग्रंथ धर्मशास्त्रविषयक असून 'आर्यातंत्र, आर्याकौतुक, महाबळसिद्धांत' हे तीन ग्रंथ गणितविषयक आहेत. यांपैकीं शेवटले दोनतीन ग्रंथ उपलब्ध नाहींत (सारस्वत-रत्नमाला भाग पहिला, पां. २४–२९).

नागोजी घाटगे—(मृ. स. १६३३) स. १६२६ मध्यें इब्राहीम आदिलशहानें यास सरदेशमुखी व झुंजारराव हा किताब दिला.

नागोजीभट्ट—(स. १७००–५० सुमार) काशींतील एक महापंडित महाराष्ट्रीय ब्राह्मण. हा शिवभट्टाचा मुलगा होय. याचीं काळे व उपाध्याय अशीं दोन उपनामें आढळतात. यानें आपल्या पन्नासाव्या वर्षी सप्तशतीवर टीका लिहिली. हा वयाच्या ६२ व्या वर्षी काशीस वारला.

यानें रसमंजरी नांवाची टीका स. १७१३ त लिहिली असा उल्लेख आलेला आहे.

यानें व्याकरण, साहित्य, धर्म, योग, इत्यादि शास्त्रांवर ग्रंथ लिहिले आहेत. आचारेंदुशेखर, तिथींदुशेखर, तीर्थेंदुशेखर, प्रायश्चित्तेंदुशेखर, श्राद्धेंदुशेखर वगैरे ग्रंथ धर्मशास्त्रावर लिहिले आहेत.

महाभाष्यप्रदीपोद्योत, शब्देंदुशेखर (लघु व बृहत्), परिभाषेंदुशेखर, वैयाकरणसिद्धांतमंजूषा वगैरे ग्रंथ व्याकरणावर लिहिले आहेत. याशिवाय यानें अशौचनिर्णय, कुण्डपद्धति, गोत्रप्रवरनिर्णय, चंडीप्रयोग, सापिंडीमंजरी आणि काव्यप्रदीपोद्योत इत्यादि अनेक शास्त्रांत अनेक ग्रंथ लिहिले आहेत.

हा शृंगवेरपूरच्या बिसेन घराण्यांतील रामराजाचा आश्रित होता. हा हरि दीक्षितांचा शिष्य. त्याचप्रमाणें हा शंकरभट्टाचाहि शिष्य होता, असा उल्लेख आलेला आहे. यानें आपला शब्दरत्न नांवाचा व्याकरण विषयावरील एक ग्रंथ आपल्या गुरूस (हरि दीक्षित) अर्पण केल्याचा उल्लेख आला आहे. शब्दरत्न हा ग्रंथ भट्टोजी दीक्षिताच्या प्रौढ मनोरमेवरील टीका होय.

नागोजी रताजी माने—(स. १६९०-९७) हा म्हसवडचा. विजापूरकरांचा नामांकित सरदार. पुढें औरंगजेबास मिळाला. हा राजारामास येऊन मिळाला व यानें संताजीचा खून केला त्याबद्दल औरंगजेबानें यास इनाम दिलें (जेधे शकावली).

नाचनसोम—(स. १३००-१४००) तेलगू कवि. उत्तरहरिवंश काव्याचा कर्ता. यास ' सर्वज्ञ ' म्हणतात. उत्तम कवीचे गुण याच्या काव्यांत आहेत (तेलगू वाङ्मय, पा. १९).

नाची—इलेश्वरोपाध्याय नांवाच्या तेलगू पंडिताची ही मधली मुलगी. हा बालविधवा होती. हिनें संस्कृतांत एक नाटक र[illegible]लें. त्यांत हिनें आपल्या जन्मापासून ते वैधव्य प्राप्त होईपर्यंतची हकिकत दिली आहे. ही शास्त्रांतील अनेक विषयांत पारंगत होती. संस्कृत नाटकांतील वीररसप्रधानवर्णन वाचून हिच्या बापानें त्या नाटकास ' नाची ' हें नांव दिलें.

नाचीराज—(स. १४०० सुमार) या कानडी ग्रंथकारानें अमरकोशावर कानडी भाषेंत टीका लिहिली. ती टीका नाचीराजीय या नांवानें प्रसिद्ध आहे (क. क. च. भा. २, पा. ४०६).

नाजी—(ग्रंथकाल स. १७४०) ऊर्दू कवि. याचें नांव सय्यद मुहम्मद शाकिर. नाजी उपनांव होय. याच्या दीवानांतील निंदात्मक कविता चांगल्या आहेत. नादिरशाहानें दिल्लीवर स्वारी करून मुहम्मद मोगलाच्या सैन्याची केलेली कुठधाण यानें चांगली वर्णिली आहे (क. कौ. भा. ४).

नाझुकशाह—(स. १५३९ सुमार) काश्मीरचा राजा फत्तेशाहचा मुलगा.

नाथ (हरिनाथ)—(काव्यकाल स. १७६८) एक हिंदी कवि. हा गुजराथी ब्राह्मण काशीस राही. यानें ' अलंकारदर्पण ' नांवाचा एक छोटासा ग्रंथ लिहिला.

नाथदास—(स. १६८० सुमार) एक मराठी कवि. 'मनश्चंद्रबोध' या ओवीबद्ध ग्रंथाचा कर्ता. ' रामचंद्र नाही घरी काय मी करूं' या प्रसिद्ध पदाचे कर्ते. 'विक्रमरास' हा हरिदास कवीचा ग्रंथ आहे. हरिदास व नाथदास कदाचित् एक असतील (म. क. च. भा. ३, पा. ५५-५८).

नादिरशाहा—(जन्म स. १६८७-१७४७) याचें दुसरें नांव तहमास्पकुली ऊर्फ नादिरकुलिखान. याचा जन्म स. १६८७ त खोरासानांत झाला. याचा बाप धनगर होता. लहानपणापासून याचें आयुष्य साहसांत गेलें. याचा स्वभाव क्रूर, विध्वंसक, परहिताविषयीं निष्ठुर व मानवी संस्कृतीला विरोधी असे. हा १७ व्या वर्षी उझबेगाच्या कैदेंत होता. यानें अनेक लढाया करून इराणची हद्द वाढविली. तसेंच तुर्कांपासून आपले प्रांत परत घेतले. यानें पुढें अफगाणिस्थान काबीज केला. हा सुनीपंथी होता. यानें इराणामधील सर्व शिया लोकांस आपला पंथ स्वीकारण्यास भाग पाडलें. नादिरशहानें दिल्लीतील लोकांची कत्तल करण्याचा हुकूम आपल्या लोकांस सोडला. त्यांत २ लाख लोक मेले. दोन महिनेपर्यंत यानें दिल्लींत साडेचौदा कोटी रुपयांची लुटालूट केली. उत्तरोत्तर हा लोकांस अधिक छळत असे. यानें शियापंथी मुसलमानांस कोठेंच थारा दिला नाहीं. अफगाण लोक याच्या छळास फारच कंटाळले होते. याचा पुतण्या अलीकुलीखानानेंच याचा खून केला. याचा जन्म गरीब कुळांत झाला असून यास विद्या येत नव्हती; तरी हा आपल्या अकलेच्या जोरावर पुढें आला व अनेक राज्यांची यानें उलथापालथ केली (बील). हा जातीचा इराणी नसून तुर्क होता.

नाथा—हा सुप्रसिद्ध सुतार मंडन याचा भाऊ. यानें वास्तुशास्त्रावर 'वास्तुमंजरी' नांवाचा ग्रंथ लिहिला.

नानक (गुरु)—(ज. स.१४६९-मृ. स. १५३८) हा शीखपंथाचा आद्य संस्थापक होय. हा पंजाबमधील तलवंडी येथील राहणारा. याच्या बापाचें नांव कालू व आईचें नांव तृप्ता. याच्या बायकोचें नांव सुलक्षणी असून तिला श्रीचंद व जयचंद असे दोन पुत्र झाले. हा जातीनें क्षत्रिय होता. ह्याची लहानपणापासूनची वागणूक अगदीं विरक्त माणसासारखी होती. याला शाळेंत जरी घातला होता तरी याचें शाळेंत मुळींच लक्ष नसे. हा नेहमीं तत्त्वज्ञानाच्या गोष्टी लोकांना सांगत असे. हा नेहमीं (वयानें लहान होता तरी) तत्त्वविचारांनीं परिपूर्ण अशीं काव्यें करी. त्यामुळें याच्याशीं कोणी वाद करण्यास तयार नसे. याचे व्रतबंधाचे वेळीं यानें उपाध्यायाला जानवें घालूं दिलें नाहीं. याच्या बापानें याला व्यापार करण्यास पैसे दिले असतां यानें ते सर्व गोरगरिबांस वांटून टाकले. हें पाहून याचे बापानें याला हाकलून दिलें; तेव्हां यानें दौलतखान नांवाच्या सुभेदाराजवळ पंडित या नात्यानें नोकरी धरली. याच वेळेस मर्दाना नांवाचा खाजगी नोकर याचेजवळ होता; व पुढें तो नानकाचा पट्टशिष्य बनला.

नानकानें आपल्या तेजस्वी वाणीनें व निरनिराळ्या चमत्कारांनीं दौलतखानास शिष्य बनविलें. पुढें यानें त्याची नोकरी सोडून देऊन, आपल्या मताच्या प्रसारार्थ निरनिराळ्या गांवीं पर्यटन करण्यास सुरवात केली. एकदां हा हरिद्वारास असतांना यानें तेथील ब्राह्मण नदींतून ओंजळी भरून पाणी पूर्वेकडे टाकीत आहेत असें पाहिलें. तेव्हां

यानें पश्चिमेकडे पाणी टाकण्यास सुरुवात केली. तेव्हां यास 'हें तूं काय करतोस?' असें ब्राह्मणांनीं यास विचारले तेव्हां यानें ब्राह्मणांना उलट तोच प्रश्न केला. तेव्हां ते म्हणाले, 'आम्ही पूर्वजांस पाणी देतों.' तेव्हां हाहि म्हणाला, मी माझ्या शेंदोनशें कोस दूर असलेल्या शेताला पाणी देतों. तेव्हां सर्व ब्राह्मण हंसले. तेव्हां हा म्हणाला, माझें पाणी जर शेतावर जात नाहीं तर तुमचें पाणी तरी तुमच्या पूर्वजांना कसें पोहोंचेल? अशा प्रकारें अनेक युक्तिवाद करून यानें लोकांना आपले शिष्य केलें. यानें हिंदुस्थान, सिलोन, अफगाणिस्थान वगैरे देशांतून पायीं प्रवास केला.

यानें आपला मरणकाळ लोकांना अगोदरच सांगून ठेवला होता. त्यामुळें याच्या मरणकाळीं पुष्कळ हिंदु व मुसलमान जमले होत; व त्यांनीं याचे सांगण्याप्रमाणें याच्या शवाचा अंत्यविधि दोघांच्या पद्धतीप्रमाणें केला. याची समाधि अमृतसर येथें आहे.

याच्या धर्माचीं मुख्य तत्त्वें (१) जातिभेद असूं नये, (२) मूर्तिपूजा करूं नये, अशा प्रकारचीं होतीं. याच्या पंथाला शीख असें म्हणतात. याच्या पंथाचें वैशिष्ट्य असें आहे कीं हिंदु व मुसलमान जातींनें दोन नाहींत, प्रत्येकानें हातांत कडें, डोक्यांत कंगवा व जवळ कट्यार ठेवावी. याच्या पंथाचा प्रसार मुख्यतः पंजाबमध्यें विशेष आहे.

याच्या नांवावर प्रसिद्ध असलेला 'ग्रंथसाहेब' हा ग्रंथ शिखांचा धर्मग्रंथ आहे. या ग्रंथाचा कांहीं भाग पंजाबी (गुरुमुखी) भाषेंत व कांहीं भाग हिंदी भाषेंत आहे. हा ग्रंथ अनेक गोष्टींच्या संग्रहासारखा आहे. त्यांत याचीं फासीं पदें व नामदेवाचे अभंग वगैरे आढळतात.

शिखांच्या दहा गुरूंचीं नांवें—

१ नानक, २ अंगद, ३ अमरदास, ४ रामदास, ५ अर्जुन, ६ हरगोविंद, ७ हररायदेव, ८ हरकिशनदेव, ९ तेगबहादूर, १० गुरु गोविंदसिंग.

नाना करांडे—(मृत्यु स. १७७५) हा रघूजी करांड्याचा दिवाण होता. याजवर साबाजी भोंसल्याचा फार लोभ होता. स. १७७५ त पांचगांवचे लढाईंत हा साबाजीकडून हजर होता. त्या वेळेस याला महिपतिराव सुभेदारानें भाल्यानें भोसकून ठार मारलें. हा साबाजीकडे चिटणीसाचें काम करीत असे (ना. प्रां. इ. पृ. २०६–२०७).

नाना पाठक—या गुर्जर पंडितानें नागोजीभट्टाच्या ग्रंथाचें खंडण केलें आहे. नागोजीखंडणकार म्हणून याची प्रसिद्धि आहे, पण याचे ग्रंथ शोधावयास पाहिजेत.

नाना पुरंदरे—(त्रिंबक सदाशिव पुरंदरे पाहा).

नाना फडणीस—(जन्म स. १७४२ फेब्रु. १२–मृत्यु स. १८००) मराठेशाहीच्या अखेरच्या कालांतील एक थोर मुत्सद्दी. याचें नांव बाळाजी जनार्दन भानु. हा नाना फडणीस या नांवानें सर्वत्र प्रसिद्ध आहे. याची माता रखमाबाई. ती मेहेंदळ्याच्या घरांतील. याचा जन्म साताऱ्यास झाला. याला १४ व्या वर्षी घराण्यांत चाल असलेल्या फडणिशीचीं वस्त्रें मिळालीं (स.१७५६ नवं.२९).

हा त्याच सालीं हैदरवरच्या स्वारींत गेला. पुढें तीन वर्षें पुण्यास राहून तीर्थक्षेत्रें पाहण्याच्या उद्देशानें पानपतच्या स्वारीवर गेला. पण पळापळ झाल्यावर 'शुद्ध लंगोटी लावून' 'गवतांत लपून' व 'बोरीचा पाला खाऊन' प्रवास करीत असतां वेष पालटून आलेली याची स्त्री यशोदाबाई ही भेटली. आई नाहींशी झाली. तिच्या शोधार्थ हिंगण्यास लिहिलेल्या पत्रांत 'ती शुद्ध असल्यास तिला पाठवावी, बाटली असल्यास परभारें गंगेस देह अर्पण करण्यास पाठवावी,' असें वाक्य आहे. शेवटीं चवदा महिन्यांनीं हा पुण्यास आला (१७६१ जुलै).

नारायणरावाच्या खुनापर्यंत मालक जागेवर असल्यानें कारभाऱ्यांना पूर्ण स्वातंत्र्य नव्हतें. पण नारायणरावाचा खून झाल्यामुळें कारभारी लोकांची जबाबदारी वाढली. माधवरावानें मरतेवेळीं केलेली व्यवस्था मोडून नारायणरावाचा खून करण्यांत आला; आणि रघुनाथराव पेशवा झाला. पण ही गोष्ट सखाराम बापूसारख्या कारभारी म्हणून प्रमुखपणें वावरणाराला सहज मान्य करणें शक्य नव्हतें. त्यानें रघुनाथरावाचा कारभारीपणा नाकारला आणि रघुनाथरावाला पदच्युत करून माधवरावाच्या वंशाला गादीवर आणण्याचें 'बारभाईचें कारस्थान' उभारलें. निजामावरील स्वारीच्या निमित्तानें रघुनाथरावाला सैन्यासुद्धां पुण्याबाहेर काढण्यांत आलें; आणि प्रथम गंगाबाईच्या नांवें आणि नंतर माधवरावाच्या नांवानें राज्यकारभार सुरू करून रघुनाथरावाचा पेशवाईवरील हक्क नष्ट केला. अशा प्रकारें बारभाईचें कारस्थान यशस्वी झालें आणि नाना प्रमुखपणें कारभार करूं लागले.

पण या राज्यक्रांतीचा फायदा दादाच्या साहाय्यानें इंग्रजांनीं घेण्याचें ठरविलें. त्यांनीं मराठ्यांचा सव्वीस लक्षांचा मुलूख काबीज केला. तेव्हां साष्टी, भडोच वगैरे सहा लक्षांचा मुलूख इंग्रजाला दिला आणि दादाला आपल्या ताब्यांत घेण्याचा पुरंदरचा तह घडवून आणला (स. १७७६). तसेंच हरिपंताकडून हैदर आणि महादजीकडून कोल्हापूरकरांचा बंदोबस्त केला (स. १७७७).

पण घरांत व बाहेर व्यवस्था लावल्यानें नानाला मिळालेला मोठेपणा कोणालाच सहन झाला नाहीं आणि नानाचा घरांतला प्रतिस्पर्धी मोरोबा फडणीसानें दादाला पेशवाईवर आणून नानाला व बाल पेशव्याला कैद करण्याचें ठरविलें; आणि त्यांत बहुतेक मुत्सद्दी व सेनापति सामील झाले. इंग्रज व निजाम यांचीं माणसें अशा संधीचा फायदा घेण्यास नेहमीं सज्ज असत. पण नाना मोठ्या शिताफीनें कटवाल्यांनीं कैद करण्याच्या वेळेला पुणें सोडून पुरंदरला निघून गेला. मोरोबानें पार्वतीबाईकडून कारभाऱ्याचीं वस्त्रें घेतलीं, इंग्रजांच्या वकिलाकडून आनंदाची बातमी म्हणून मुंबईस रवाना झाली. पण बापूच्या मध्यस्थीनें नानांनाहि कारभारीपणावरून दूर होण्याचें ठरविलें आणि आपल्या हातीं बाल पेशवा व पुरंदर हें ठेवलें. पण शिंदे, फडके वगैरे मंडळी सैन्यासह जवळ येतांच होळकराला फितूर करून मोरोबाला कैद करण्यांत आलें व नाना पुनः मुख्य कारभारी झाले (स. १७७८ जुलै ११). या वेळीं इंग्रजांनीं उचल केली तेव्हां तळेगांवीं त्यांचा पूर्ण पराभव केला. पण दादा हातांत घेतल्याशिवाय इंग्रज स्वस्थ बसणारा नव्हता. शेवटीं नानाच्या मुत्सद्दीपणानें चहूंकडून तंबी बसतांच सालबाईचा तह होऊन साष्टीखेरीज मराठ्यांचा सर्व मुलूख व दादासाहेब यांना इंग्रजांनीं मराठ्यांच्या ताब्यांत दिलें व सहा वर्षें चाललेलें युद्ध संपून नाना स्थिर झाला (स. १७८२).

यापुढील नानाचा कारभार मोठ्या डौलाचा झाला. सर्वत्र समतोलपणा राखण्याच्या कामीं नानांनीं अपूर्व यश संपादन केलें. सालबाईचा तह झाल्यानें महादजीचा उत्तरेकडील उद्योग निर्वेध सुरू झाला आणि इंग्रजांवर मात करून दिल्लीची बादशाही महादजीनें पूर्ण ताब्यांत घेतली. बादशाहाला महिना ६५ हजारांचा तनखा घेणारा करून वकील मुतलकीच्या आणि मीरबक्षीगिरीच्या सनदा घेतल्या (ता. ८-१२-१७८४). बादशाहींत हा मान पूर्वी एकदां फक्त निजामुल्मुकला लाभला होता. याच सनदा पुढें संगमावर मोठा दरबार भरून तोफांच्या सलामींत पेशव्यांना अर्पण केल्या (ता. २२-६-१७९२). अशा प्रकारें दिल्लीच्या राजकारणांत अपूर्व यश लाभल्यावर दक्षिणेंत खर्ड्याची लढाई झाली आणि पूर्वी कधीं मिळाला नव्हता एवढा मराठ्यांना निजामावर जय मिळाला (स. १७९५ मार्च). मराठ्यांच्या सत्तेला आजपर्यंत कधींहि न लाभलेला हा परमोच्च बिंदु होय.

पण येथून पुढें मात्र नानाच्या नशीबानें उलट खाल्ली आणि मराठी राज्याचे ग्रह फिरले. महादजी शिंदे व हरिपंत फडके हे नानाचे डावे उजवे हात आणि मराठेशाहीचे आधारस्तंभ कालाच्या तडाख्यांत सांपडले. सवाई माधवरावाच्या आत्महत्येमुळें मराठेशाहीवर मृत्युयोग ओढवला (स. १७९५). आणि नानाचा वीस वर्षांचा उद्योग जमीनदोस्त होऊन पुनः पहिल्यापासून आरंभ करण्याची वेळ आली.

बाजीराव रघुनाथाशीं असलेला विरुद्ध संबंध लक्षांत घेऊन यानें त्याचा धाकटा भाऊ चिमाजी यास यशोदाबाईचे मांडीवर दत्तक देऊन आपण कारभार करण्याचें ठरविलें. पण शिंद्याच्या मदतीनें रावबाजीनें पेशवाई मिळविण्याचा प्रयत्न केला. बाळोबा पागनीस हा शिंद्याचा प्रमुख कारभारी होता. त्यानें परशुरामभाऊ पटवर्धन या नानाच्या एका विश्वासांतील सेनापतीसच नानाच्या विरुद्ध उभें केलें. तेव्हां नाना साताऱ्यास गेला आणि तेथून वाई व पुढें महाडाकडे रवाना झाला (स. १७९६ मार्च २१). इकडे रावबाजी आपल्या ताब्यांत राहणार नाहीं असें वाटल्यावरून त्याला अटक करून भाऊच्या नेतृत्वाखालीं चिमाजीला यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन पेशवाईचा कारभार सुरू झाला. परशुरामभाऊ महाडाकडेहि नानाला पकडण्याकरितां जाता, पण पावसाळ्यामुळें त्याचा निरुपाय झाला. पण तेवढ्या अवधींत नानानें स्वकीयांचें साहाय्य व परकीयांची मदत घेण्याची खटपट सुरू केली. शिंद्यांपैकीं एक पक्ष नानास सामील झाला; आणि दोन कोट रुपये व सव्वीस लक्षांची जहागीर कबूल करून नानानें शिंद्याला फोडलें. खर्ड्याच्या लढाईतील यश मातीमोल करून निजामाला आपल्या ताब्यांत घेतलें आणि इंग्रजालाहि नानानें वळवलें होतेंच. अशा पद्धतीनें पैशाच्या व बुद्धीच्या जोरावर नानानें महाडचें कारस्थान उभारलें आणि दौलतराव शिंद्याकडून नूतन पेशवा चिमाजी आणि बाळोबा पागनीस यांस कैद केलें. बाजीराव रघुनाथाला पेशवा केलें आणि आपण पुनः कारभारी झाला (स. १७९६ डिसें.). पण पैसा हातांत येत नाहीं असें पाहून वानवडीस मेजवानीस बोलावून दौलतरावानें यास कैद केलें (स. १७९७ डिसें. ३१). पुढें नगर किल्ल्यांत पाठविलें (स. १७९८ एप्रिल ६). पण दोन कोट रुपये घेऊन याला मुक्त केलें (स. १७९८ जुलै १८). पण या सर्व ध्येयशून्य स्वार्थी कारवायांचा परिणाम याच्यामागें दोन वर्षांत वसईच्या तहानें मराठ्यांचें स्वातंत्र्य नष्ट होण्यांत झाला. शेवटीं शके १७२१ च्या माघ वद्यांत ज्वर येऊं

लागून फाल्गुन वद्य तृतीयेस गुरुवारीं मध्यरात्रीं नानाचें देहावसान झालें (स. १८०० मार्च १३). यानें नऊ लग्नें केलीं, पण याला मरतेसमयीं संतति नव्हती. याची नऊ वर्षांची नववी पत्नी जिऊबाई मागें होती. शेवटीं तिला उदरनिर्वाहाकरितां आणि स्वसंरक्षणाकरितां इंग्रजांचा आश्रय करावा लागला आणि दत्तक घेऊन नानाचा वंश चालू झाला. नानानें घाट, देवालयें वगैरे अनेक बांधली त्यांपैकीं पुण्यांतील बेलबाग विशेष प्रसिद्ध आहे.

नाना रंगानें काळसर आणि अशक्त प्रकृतीचा होता. याच्या तोंडावर खिन्नतेची छाया होती आणि त्याचा शेवटहि निराश स्थितींत झाला. यानें आपलें आत्मचरित्र माधवरावाला पेशवाईचीं वस्त्रें मिळेपर्यंत लिहिलें असून त्यांत कामुकपणाचा दोष स्पष्टपणें लिहिला आहे (काव्येति. १९२ नवी प्रत).

नानासाहेब पेशवे—(बाळाजी बाजीराव व धुंडिराज बाजी पाहा).

नान्यदेव—(मृत्यु स. ११५४ चा सुमार) हा एक कर्तबगार राज्यसंस्थापक कर्नाटकांत कर्णाट घराण्यांत होऊन गेला. यानें मिथिला (उत्तर बिहार) व नेपाळ येथें राज्य स्थापलें. हा अनेक पदव्यांनीं विभूषित होता. यानें माळवा, सौवीर, गौड व वंग येथील राजांचा पराभव केला, परंतु विजयसेनानें याचा पराभव यास करून कैद केलें. याचा श्रीधर नांवाचा युद्धकौशल्यनिपुण व शांतताप्रिय प्रधान होता (I. H. Q., vol. VII, No. 4, p. 679–689). हा नेवार लोकांसमवेत नेपाळांत येऊन यानें भाटगांव येथें ५० वर्षें राज्य केलें. नेवार शक ता. २० आक्टोबर ८७९ मध्यें सुरू झाला.

नाभाजी—(ग्रंथकाल स. १६४२) याला हिंदी ग्रंथकार नाभादासजी असें म्हणतात. जात नागर ब्राह्मण. पण कांहींनीं याला डोम व कांहींनीं क्षत्रिय म्हटलें आहे (कविताकौमुदी, हिंदीशब्दसागरप्रस्तावना). हा मूळ रामभद्राचलाजवळ राहणारा. लहानपणींच याला घेऊन याचे आईबाप व्यवहारधंद्यानिमित्त ग्वाल्हेर प्रांतीं गेले. थोडेच दिवसांत याचा बाप वारला. दुष्काळांत आईनें यास सोडलें. तेव्हां कीळदास व अग्रदास नांवांच्या दोन साधु पुरुषांनीं कमंडलूंतील पाणी पाजून याला आपले मठांत नेलें. तेथें याचें पोषण केलें. हा दोनहि डोळ्यांनीं आंधळा होता. पुढें याला अग्रदासांनीं उपदेश दिला व नांव 'नारायणदास' असें ठेविलें. परंतु नाभाजी या नांवानेंच याची प्रसिद्धि झाली. यानें 'भक्तमाला' या नांवाचा एक ग्रंथ मूळ ग्वाल्हेरी भाषेंत रचला (स. १६४२). यांत संतांची विशेष माहिती न देतां नामावली दिली आहे. मूळ भक्तमाला ग्रंथाच्या १९७ छप्पा आहेत. या छप्पांवर म्हणजे मूळ भक्तमाला ग्रंथावर याच्या प्रियदास नांवाच्या शिष्यानें भक्तिरसबोधिनी नांवाची टीका लिहिली. ही टीका संवत् १७६९ (श. १६३५) मध्यें लिहिली. या प्रियदासाचे टीकेवर मराठींत श्रीमार्तंडबुवांनीं 'भक्तिप्रेमामृत' नांवाची टीका लिहिली. या ग्रंथाला सामान्यत्वें 'भक्तमाला' म्हणतात. हा शके १६०० च्या सुमारास होऊन गेला. यापूर्वीच्या संतांचा याच्या ग्रंथांत उल्लेख आहे. याच्या रामचरित्रावरील पद्यसंग्रह नुकताच सांपडला आहे. यानें दिलेल्या शेंकडों संतांपैकीं ज्ञानदेव, नामदेव, सेना न्हावी व आणखी एखाददुसऱ्या संताखेरीज बाकीचे सर्व महाराष्ट्राबाहेरचे आहेत. एकनाथ, रामदास, तुकाराम यांच्यासारख्या महाराष्ट्रांतील अत्यंत प्रसिद्ध संतांचाहि याच्या ग्रंथांत निर्देश नाहीं. असें असूनहि मराठी ग्रंथकारांनीं याच्या भक्तमालेंतून शेंकडों संतांचीं नांवें व चरित्रें घेतलीं आहेत. ज्ञानदेव, नामदेव वगैरे महाराष्ट्रीय संतांचीं चरित्रेंहि याला किंवा प्रियदासाला अगदीं बेताचींच माहीत होतीं असें दिसतें. याच्यापासून ऐतिहासिक माहिती बिलकुल मिळण्यासारखी नाहीं. तथापि महाराष्ट्रांतील संतचरित्रकारानें याचें नांव गौरवार्थ घेतल्यासारखें दिसतें (मं. तृतीयसंमेलन १८३७, पा. १०८–११०).

नामदारखा—एलिचपुरचा नबाब. स. १८०३ मध्ये आडगांवचे लढाईत याचें लष्कर इंग्रजांचे बाजूनें सलाबतखानाचे हाताखालीं हजर होतें (ना. प्रां. इ. ३३४).

नामदेव—(जन्म स. १२७०–मृत्यु स. १३५०) महाराष्ट्रांतील सगुणोपासना-प्रधान भागवतधर्माचा आद्यप्रवर्तक संत, प्रचारक व कवि. याच्या पूर्वजांचें मूळ ठिकाण श्रीक्षेत्र कऱ्हाडनजीक कृष्णातीरीं असलेलें नरसी ब्राह्मणी हें गांव होय. यास हल्लीं कोळें अथवा बहे नरसिंगपूर असें म्हणतात. मोंगलाईंतील परभणी जिल्ह्यांतील नरसी ब्राह्मणी ही नव्हे व तेथें असलेली नामदेवाची समाधि दुसऱ्या नामदेव नांवाच्या व्यक्तीची समजणें भाग आहे (पं. ना. पाटसकरकृत बालभक्त नामदेव महाराज). याचे पूर्वज जातीनें शिंपी होते व ते शिंप्याचा अगर कापड विकण्याचा धंदा करीत. दामाशेटीस गोणाबाईचे पोटीं हें पुत्ररत्न स. १२७० (प्रभवनाम संवत्सरे कार्तिक शुद्ध ११ स) रविवारीं सूर्योदयसमयीं पंढरपूर मुक्कामीं झालें. याच्या घरांत विठ्ठलभक्ति मूळचीच होती व तीमुळेंच याचीं मातापितरें पंढरपुरा-

राहत होती. यास लहानपणापासूनच विठ्ठलभक्तीचा छंद लागत चालला. याचें बालपण पंढरपुरांत गेल्यामुळें याच्या मनोवृत्तीस आयतीच योग्य परिस्थिति मिळून हा विठ्ठलाचा निस्सीम व एकनिष्ठ उपासक बनला. योगांतील मानसिक एकाग्रतेची अवस्था व तदंगभूत यौगिक सामर्थ्य याला याच्या या एकनिष्ठ उपासनेनेंच प्राप्त झालें. याच्या सात वर्षांच्या वयाच्या सुमारास दामाशेटीला परगांवीं जावें लागलें असतां यानें याच सामर्थ्यानें नुसता डोळे मिटून विठ्ठलास नैवेद्य न दाखवितां प्रत्यक्ष देवाला जेवूं घालण्याचा चमत्कार करून दाखविला व तेव्हांपासून पंढरपूरची विठ्ठलमूर्ति याची जड उपासनामूर्ति न राहतां प्रत्यक्ष जीवाभावाचा त्याचा जिवलग सखा बनली व याचें प्रत्यंतर याच्या अभंगांत सर्वत्र ओतप्रोत संचरलेलें दिसून येतें.

वयाच्या बाराव्या वर्षाचे सुमारास गोविंदशेट सौदागरकर यांची मुलगी राजाई हिच्याबरोबर याचा विवाह झाला. वयाचे १७ व्या वर्षाचे सुमारास याला नारायण नांवाचा पुत्र झाला. त्यानंतर सुमारें दोनदोन वर्षांचे अंतरानें विठा, महादा, गोंदा अशीं याला मुलें झालीं.

स. १२९१ मध्यें म्हणजे वयाच्या २१ व्या वर्षी ज्ञानेश्वरादि भावंडांची कीर्ति याच्या कानावर येऊन हा आळंदीस आला. आळंदीस संतमंडळींचा परिचय होऊन सर्वानुमतें गुरूपदेशाकरितां विसोबा खेचर चाटी (यजुर्वेदी ब्राह्मण)याजकडे याची रवानगी झाली. केवळ सगुण उपासनेनें एकांगी अतएव कच्चा असलेला हा घट्ट अध्यात्मज्ञान देऊन विसोबांनीं याला पक्का करून परत ज्ञानेश्वरमंडळाकडे पाठवून दिला. नंतर संतमंडळासह ज्ञानेश्वरासमवेत हा तीर्थयात्रेस निघालां. त्या वेळीं याचें वय २२ वर्षांचें होतें.

यात्रा करीत असतां ठिकठिकाणीं यानें वसाहती स्थापन करण्याचें अद्‌भुत कार्य केलें. हें साधण्याकरितां तद्देशीय भाषांत हा कवनें करी व त्यांच्या आधारें कीर्तननिरूपण करी. प्रवासांत कीर्तन करण्याचें काम याजकडे होतें. अद्‌भुत प्रेमानें व रसाळ वाणीनें याचीं कीर्तनें परिणामकारक होत. अनुकूल परिस्थिति दिसून येतांच भागवतधर्माचें बीजारोपण करून एका लहानशा वसाहतीचा हा तेथें पाया घाली.

वसाहतीबरोबरच तद्देशीयांना आपले अनुयायी बनविण्याचें कार्यहि याला सहजसाध्य झालेलें होतें. ज्ञानेश्वरमंडळ, विसोबा खेचर, परिसाभागवत इत्यादि संतमहंतांसमवेत यानें प्रभास, द्वारका, मेवाड व काशी करून तापीतीरावरून भागवतधर्माचा झेंडा यशस्वी रीतीनें नाचवून परत पंढरपुरास आणला. तेथें या भक्तमंडळींनीं यात्रेचें माउंदें घातलें. इतकें हिंडून पंढरपुरासारखी बहार कोठेंहि नाहीं, हा याचा निश्चय दृढ झाला. नंतर ही सर्व मंडळी आळंदीस आली. आतां ज्ञानेश्वराचा निर्वाण-सोहळा नजीक आला होता. ज्ञानेश्वरादि संतांच्या समागमांतील हीं सहा वर्षें हा नामदेवाच्या चरित्रांतील अपूर्व भाग होय. या सहा वर्षांत पंढरपूर, नेवासें, आळंदी, पैठण, त्र्यंबकेश्वर, सासवड, मंगळवेढें, अरण, तापीतीर असा हा अफाट महाराष्ट्र प्रदेश संतांच्या अपूर्व अध्यात्मगंगेच्या महापुरानें प्रतिगंगातीर बनला होता. भक्तगणांच्या समुदायांत नामदेव-ज्ञानेश्वराची भक्त व ज्ञानी ही जोडी हरिहरांप्रमाणें शोभत होती. या वैभवाग्रावर असतांनाच ज्ञानेश्वरांनीं समाधि घेऊन वैकुंठपुरीं पताका लावण्याचा पहिला मान मिळविला. त्या वेळचे याचे अभंग हृदयस्पर्शी आहेत.

पंजाबांत बहोरदास, जयदेव, जाल्होन व लद्धा यांनीं याच्या मतांचा पुरस्कार करण्यांत पुढारीपण घेतलें. जाल्होन नामदेवाबरोबर महाराष्ट्रांत आला, तर उलट तारापुरचा केशव या महाराष्ट्रीय वारकऱ्याला पंजाबांत कार्य करण्यास नामदेवानें रवाना केलें. नामदेवाचें नांव व काव्यें आजहि पंजाबांत दृढमूल आहेत. शिखांच्या ग्रंथसाहेबांत नामदेवाचीं सुमारें ५० पदें ठिकठिकाणीं गुंफलेलीं आढळतात. शिवाय नामदेवी कवितांचा संग्रह घोमान (पंजाबांत) येथील हस्तलिखित जुन्या बाडांत सांपडतो. तेथें हा संग्रह " मुखवाक " अगर " नामदेवकी मुखबानी " या नांवानें प्रसिद्ध आहे. गुरुमुखींत लिहिलेलें " नामदेवकी जन्मसाखी " या नांवाचें सुमारें चारशें पानांचें एक प्राचीन चोपडें देवस्थानच्या भक्तवर्गांत मान्य झालेलें आहे. पंजाबांतील वारकरी वैष्णव, (बाबा नामदेवाचीं) वसंतपंचमी ही नामदेवाची जन्मतिथि व माघ शुद्ध द्वितीया ही याची पुण्यतिथि म्हणून पाळतात व तत्प्रीत्यर्थ माठाले उत्सव करितात.

याच्या सहवासानें याच्या घरांतील मंडळींस सगुणभक्तीचें वळण लागून तींहि भक्तिप्रेमानें रंगलेलीं असत. त्यांपैकीं कित्येकांचे अभंग उपलब्ध आहेत. महाराष्ट्रांतील भागवतधर्माच्या ज्ञानमंदिरांत उषःकालीं नामदेवाच्या चौघड्याबरोबर जनाबाईनें सुंदर सनईची साथ करून घरच्या माणसांनीं त्याला सूर धरल्याचें मनोहर दृश्य दिसून येतें. गोरोबा कुंभार, चांगा केशवदास, चोखामेळा याच्या भक्तिनादानें मुग्ध झालेले आहेत. तुकोबासारख्या महाभागवतास नामदेवांच्या अभंगवाणीनें स्फूर्ति मिळाली. याच्या भागवतधर्माच्या शीतल छायेचा

आस्वाद घेऊन नानक व नरसी मेहता ह्यांसारखे सत्पुरुषहि स्वतःस धन्य समजून याचे चरणीं लीन झाले आहेत. नरसी मेहत्याचा काळ स. १४१५-८१ निश्चित झाला आहे, व नामदेव हे समकालीन ठरविणें निराधार ठरलें आहे (इच्छाराम देसाईकृत नरसी मेहता-काव्यसंग्रह). पंढरपूरच्या महाद्वाराची १ ली पायरी नामदेवपायरी म्हणून दाखवितात, ती नामदेवाच्या समाधीची जागा होय.

नामदेव मूळचा सगुण उपासक. ज्ञानेश्वरांसारख्या संतांच्या संगतींत याच्या सगुण भक्तीला ज्ञानाची जोड मिळून हा ज्ञानोत्तर भक्तिमार्गीय संत बनला. " संतसंगें मज पालट हा झाला " असे याचे उद्गार आहेत. ' ब्रह्म अविनाश आनंदघन । याहूनि चरण गोड तुझे ।। परात्पर वस्तु जे का अपरंपार । तियेचा साक्षात्कार पाय तुझे ।।.' अपरोक्ष साक्षात्कार नामदेवाला पंढरीच्या विठोबाचें सांवळें कृष्णरूप ध्यानीं ध्याऊन म्हणजे ध्यानयोगाच्या मार्गानें प्राप्त झाला, ही गोष्ट याच्या ईश्वरी साक्षात्कारांतील विशेष होय व हा मार्गच महाराष्ट्रीय भागवतधर्माचा राजमार्ग होऊन बसला आहे.

याची वाणी मृदु व कोमल आहे. लोकांना अधिकारी वाणीनें उपदेशामृत पाजण्याच्या अभिनिवेशाचें प्रखर तेज तींत नसून प्रेमळ अंतर्मुख वृत्तीच्या शीतल चांदण्याची बहार याच्या अभंगांत दृग्गोचर झालेली आहे. तुकोबांचा सडेतोडपणा त्यांत न आढळतां हळुवार कानउघाडणीच्या प्रेमळ अमृताचे मधुतुषार त्यांत अनुभवाला येतात. याचें वाङ्मय आकर्षक व अंतर्भेदी झालेलें आहे. प्रेमळ भक्तिरूपी मृदु मखमालीच्या पार्श्वभूमीवर " देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं माझा भावो " हें तीव्र स्वरूपाचें ब्रीदवाक्य जरतारी कामाप्रमाणें उठावदार व मोहक दिसतें.

नामा पाठक—(स. १३७८ सुमार) ज्ञानेश्वर-समकालीन प्रसिद्ध कान्हो पाठक यांचा हा नातू होय. यानें ' नामरत्नमाला ' नांवाचें प्राकृत ओवीबद्ध एक प्रकरण लिहिलेलें आहे त्यांत ९९ ओव्या आहेत (मं. श. १८३६ वा. इ. ले. ५१).

याशिवाय भरतभेट, अश्वमेध (९५ प्रसंगांचा मोठा ग्रंथ) हे ग्रंथ आहेत. एकनाथानें केलेल्या संतमालेंत याचा निर्देश आहे.

नामा विष्णुदास—(ग्रंथकाल स. १५९५) नामदेव याच नांवाचे अनेक ग्रंथकार मराठींत होऊन गेले. त्यांपैकीं नामा विष्णुदास याचीं लहानसहान अनेक प्रकरणें असून सबंध अठरा पर्वें महाभारत आहे. मराठी भाषेंत अठरा वर्षें महाभारत लिहिणारा हा पहिलाच ग्रंथकार दिसतो. हा एकनाथाच्या जरा पूर्वी होऊन गेला असेल किंवा त्याचा समकालीन असेल. याच्या ग्रंथाच्या प्रती शके १५३० पासून व नंतरच्या केलेल्या आढळतात. हा मुक्तेश्वराच्या पूर्वी होऊन गेला व याचें महाभारत मुक्तेश्वरानें पाहिलें होतें असें खास दिसतें. बुधबावनी व कपोताख्यान हीं प्रकरणें याचीं नसावींत.

नामदेव व विष्णुदास नामा हे दोन भिन्न कवि आहेत, असें शुकाख्यानाच्या शेवटच्या ओव्यांवरून दिसतें (मं. श. १८३३ चा अहवाल, पा. १२२). शुकाख्यान विष्णुदासानें श. १५१७ मध्यें संपविलें आहे. नामदेवाचा गुरु विसोबा खेचर होता आणि विष्णुदासानें कपोताख्यानाच्या प्रारंभीं आपल्या गुरूचें नांव रायभारती असें दिलें आहे. त्याअर्थी हे दोघे भिन्न आहेत हें निश्चित (मं. षाण्मासिक वृत्त, श. १८३४, ले. ५५).

नायक बक्षु—(स. १४८२-१५३६) हा ' मान-कुतूहल ' ग्रंथ लिहिणाऱ्या मानराज तुवराच्या (स. १४८६-१५१६) पदरीं होता. मानराजाच्या मृत्यूनंतर हा कालिंजर येथें गेला. तेथून पुढें गुजराथच्या बहादुर-शाहाच्या (स. १५२६-३६) दरबारीं होता. तेथें ' तोडी ' रागाचा नवा प्रकार तयार करून त्यास आपल्या आश्रयदात्याचें यानें नांव दिलें. तोच राग सध्यां ' बहादुर-तोडी ' नांवानें प्रसिद्ध आहे.

नार्यानप्प नायक—कृष्णप्पा नायकाचा पुत्र. यानें जमिनीची सुधारणा करून विहिरी, तळीं व तलाव बांधले. हा विजयनगरच्या दुसऱ्या वेंकटपति देवरायाचा समकालीन होता.

नारायण—(स. १३०० सुमार) यानें शाकटायनाच्या ' उणादिसूत्रावर ' प्रक्रियासर्वस्व नांवाची टीका लिहिली आहे. आणि ती मद्रास विश्वविद्यालयाच्या संस्कृत ग्रंथावलींत प्रसिद्ध झाली आहे. ती बरीच विस्तृत असून भोजाच्या म्हणण्याचा त्यांत बराच उपयोग केला आहे.

२. (भट्ट, मृगराजलक्षण)—(स. ७५० सुमार) हा सुप्रसिद्ध वेणीसंहार नाटकाचा कर्ता व आद्य बंगाली गौड ब्राह्मण घराण्याचा संस्थापक होय. हा बंगालच्या तत्कालीन राजाच्या कृपाछत्राखालीं होता. हा स. ७ व्या शतकानंतर होऊन गेला असावा. हा भागवत किंवा पंचरात्र पंथाचा असावा. बंगालच्या राजास बुद्धधर्माच्याविरुद्ध ब्राह्मणधर्माचा प्रसार करण्यास यानें मदत केली. काव्यालंकारसूत्रवृत्तीचा वामन व आनंदवर्धन हे आपल्या लिखाणांत वेणीसंहारांतील

उताऱ्याचा उपयोग करून याजविषयीं आदर दाखवितात. हा भवभूतीचा समकालीन होता (वेणीसंहार by K. N. Dravid).

३. हा नामदेवाच्या चौघां मुलांतील एक. हा आपला 'नामयाचा नारा' असा अभंगाच्या शेवटीं निर्देश करतो.

४. तुकारामाच्या तिघां मुलांतील धाकटा. तुकाराम वैकुंठाला गेल्यावर याचा जन्म झाला. तुकारामाच्या मुलांपैकीं हाच पुढें नामांकित होऊन योग्यतेस चढला.

५. एक मराठी कवि. याला 'नवरस नारायण' म्हणतात. याचा ग्रंथ शैल्यपर्व. हा महानुभाव असावा (मं. १८३६ वा. इ. ले. ४४).

६. (कुमार व्यास पाहा).

नारायण काण्व—हा काण्व घराण्यांतील तिसरा राजा होय. हा भागवत व विष्णु यांच्या मतें भूमिकाचा, वायुमतें भूतिमित्राचा, ब्रह्मांड व मत्स्य यांच्या मतें भूमिमित्राचा पुत्र होय. याच्यासंबंधीं पुराणाशिवाय ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाहीं. यानें १२ वर्षे राज्य केलें

नारायण गोविंद टकले—(कायगांवकर, दीक्षित पाटणकर पाहा).

नारायण (ऊर्फ नानाजी) कृष्ण जोशी (बारामतीकर)—हा नागपुरास भोंसल्यांचा सरदार रघूजी करांडे याचा कारभारी होता. जानोजी व मुधोजी यांचे भांडणांत करांडे हा मुधोजीच्या पक्षास गेल्यामुळें हाहि मुधोजीच्या पक्षास गेला. त्यामुळें जानोजीचा याजवर रोष होता (पे. द. २०, पा. ९०,९५,९६ पाहा).

नंतर मुधोजी व साबाजी यांच्या भांडणांत हा साबाजीच्या पक्षास मिळाला. पांचगांवचे लढाईत (ता. २६-१-१७७५) हा साबाजीचे पक्षास होता. हा एका स्वतंत्र अंबारींत असतांना मुधोजीनें बंदुकीची गोळी मारून यास ठार केलें. याचे वंशज साताऱ्यास आहेत (ना. भो. बखर, पा. ११६).

नारायण त्रिमल हणमंते—(मृत्यु स. १६५३) हा प्रथम मलिकंबरच्या हाताखालीं तयार झाला. नंतर लुखजी जाधवाच्या पदरीं होता. शिवाजीनें यास मुजुमदार केला. शिवाजीमहाराज व त्यांचे वडील शहाजी राजे ह्यांच्या पदरीं जे अत्यंत स्वामिनिष्ठ, राजकारणचतुर, निःस्पृह आणि सत्यप्रिय असे मुत्सद्दी उदयास आले, व ज्यांनीं वंशपरंपरेनें मराठ्यांच्या गादीची इमानेंइतबारें सेवा केली, त्यांमध्यें याची गणना फार उच्चस्थानीं केली पाहिजे. यांनीं शहाजी राजे यांची एकनिष्ठेनें नोकरी केली. शहाजी राजे यांनीं यास कर्नाटकांतील जहागिरीचा कारभार सांगितला. ग्रँट डफ साहेबांनीं "नारोपंत हनुमंते" म्हणून ज्याचा नामोल्लेख आपल्या इतिहासांत केला आहे, तेच हे नारोपंत हणमंते होत. यास शहाजीमहाराजांनीं स. १६४९।५० मध्यें दिलेली सनद उपलब्ध झाली आहे. हा स. १६३७ त शहाजीराजाबरोबर कर्नाटक प्रान्तीं गेला असून तेथें हा बंगलूर येथें राहत होता. रघुनाथ व जनार्दन हे याचे दोन पुत्र (ऐ. च. पृ. १०३).

नारायणदेव—(स. १५०० सुमार) एक बंगाली कवि. हा विजयगुप्ताचा समकालीन होता. हा मैमनसिंह जिल्ह्यांतील किशोरगंज प्रांतांतील बोरा गांवचा राहणारा होय. याच्या बापाचें नांव नरसिंहदेव असून हा जातीनें कायस्थ होता. याचे पूर्वज प्रथम मगधचे राहणारे होत. त्यांच्या पश्चात् हा राठ देशांत आला व तेथून यानें मैमनसिंह प्रांत गांठला. याचे वंशज अद्यापपावेतों बोरा गांवीं आहेत. याचा 'मनसा-मंगल' हा ग्रंथ प्रधान असून फार लोकप्रिय आहे. याची कविता सरस आणि मधुरवाणीयुक्त आहे (क. कौ. भा. ७).

२. (स. १३९६ सुमार) हरिश्चंद्रपुराण नांवाच्या हिंदी काव्याचा कर्ता.

नारायणपाल—(स. ८७५–९००) हा बंगाल्यांतील पालघराण्यापैकीं पहिल्या विग्रहपालाचा मुलगा. याच्याच कारकीर्दीत भागलपूर येथील दानलेख लिहिला गेला. पण या लेखावरून याचा काल ठरवितां येत नाहीं. कारण त्यांतील कालमानपद्धति शकावर अवलंबून नसून ल्या घराण्यांतील राजांच्या कारकीर्दीच्या वर्षसंख्येप्रमाणें दिली आहे. तथापि याचा राज्यकाल सुमारें स. ८७५–९०० असावा (म. यु. भा. २, पा. २३३). स. ९०२–९५६ असा याचा काल भागलपूर व गरुडस्तंभावरील याच्या शिलालेखावरून निघतो.

नारायण बहाळे—(नारो व्यास पाहा).

नारायणबाबा—ज्ञानसागर, शांतिसागर इत्यादि सात ग्रंथांचे कर्ते. विष्णुबोवा ब्रह्मचारींचे परमगुरु.

नारायणभट्ट—(जन्म स. १५१३–१५७० नंतर) हा रामेश्वरभट्टाचा मुलगा होय. रामेश्वरभट्ट हा पैठणाहून काशीस जात असतां स. १५१३ (श. १४३५ चैत्र) मध्यें याचा जन्म झाला. याचा लौकिक काशींत मोठा आहे. यानें काशींत महाराष्ट्रीयांची वसाहत स्थापन केली. यानेंच काशीतील विश्वेश्वराचें मंदिर बांधिलें. हा काशीस असतां दुष्काळ पडला तेव्हां यानें भागीरथींत अनुष्ठान

करून पाऊस पाडविला, त्यामुळें मुसलमान अधिकाऱ्यानें याचा हा प्रभाव पाहून विश्वेश्वराचें पाडलेलें मंदिर पुन्हां बांधण्याची परवानगी दिली, असें म्हणतात. विद्वत्तेमुळें व दयाळूपणामुळें याला 'जगद्गुरु' अशी पदवी होती. सर्व हिंदुस्थानांतील विद्वान् याला आपला पुढारी मानीत. हा मोठा मीमांसक होता. याचे बारा ग्रंथ मार्तंड या नांवानें प्रसिद्ध असून त्यांतील 'मुहूर्तमार्तंड' हा स. १५७१ त लिहिला. यानें बंगाल व बहार येथील पंडितांना जिंकलें. तीर्थविधि कसा करावा याबद्दलचा 'त्रिस्थलीसेतु' नांवाचा ग्रंथ यानें लिहिला. याचा व राजा तोडरमल्ल याचा चांगला स्नेह होता. यानें वेदान्त विषयांत अनेक संन्याशांशीं वाद करून त्यांना जिंकलें. अकबराच्या दरबारीं याची मोठी प्रतिष्ठा होती. याच्या प्रयोगरत्नासच नारायणभट्टी नांव आहे. यानें वृत्तरत्नाकरावर उत्कृष्ट टीका लिहिली (स. १५४५). याचे मुलगे रामकृष्णभट्ट व शंकरभट्ट असे होते. ते दोघेहि विद्वान् असून त्यांचे ग्रंथ सर्वमान्य आहेत.

याच्या शिष्यांपैकीं ब्रह्मेन्द्रसरस्वती व नारायणसरस्वती ही जोडी प्रसिद्ध आहे.

यांचें घराणें भट्ट या नांवानें काशींत प्रसिद्ध असून या घराण्यांत एकापेक्षां एक असे विद्वान् लोक सारखे उत्पन्न झाले. त्यामुळें अद्यापहि भट्ट घराण्यास काशी येथें मान आहे.

याचा भरभराटीचा काल स. १५४० पासून स. १५७० पर्यंत होता.

यानें धर्मशास्त्रावर उत्कृष्ट ग्रंथ लिहिले आहेत. अयननिर्णय, आरामोत्सर्गपद्धति, आतुरसंन्यासविधि, जीवच्छ्राद्धप्रयोग, आहिताग्निमरणदाहादिपद्धति, महारुद्रपद्धति, किंवा रुद्रपद्धति, काशीमरणमुक्तिविवेक, गोत्रप्रवरनिर्णय, तिथिनिर्णय, तुलापुरुषदानप्रयोग, दिव्यानुष्ठानपद्धति, मांसमीमांसा, कालनिर्णयकारिकाव्याख्या, वृषोत्सर्गपद्धति, लक्षहोमपद्धति, आणि विष्णुश्राद्धपद्धति हे ग्रंथ याचे होत. हे महाराष्ट्रांतील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांचें घराणें होय.

नारायणभट्टतिरी—(जन्म स. १६ व्या शतकाचा मध्य) केरल प्रांतांतील महान् संस्कृत कवि व व्याकरणकार. मलबारांत तिरुनावयजवळ नील नदीच्या कांठीं हा मेप्पुत्तूर घराण्यांतील मातृदत्त या मीमांसकाचा मुलगा. हा संस्कृत वाङ्मयाच्या ज्ञानामुळें लोकप्रिय झाला. रविवर्मा आणि वीरकेरलवर्म या कोचीन नरेशांच्या दरबारीं हा होता. ह्याचे ग्रंथ—राजसूय, दूतवाक्य, सुभद्राहरण, पांचालीस्वयंवर, निरनुनासिक, स्वाहासुधाकर, नृगमोक्ष, दक्षयाग, कैतियाष्टक, वामनावतार, रासविलासकाव्यम्, नारायणीयम् आणि श्रीपादसप्तती (इंडि. हिस्टॉरिकल क्वॉ., मार्च १९३३, पृ. २२-२९).

नारायणराज चोल—(स. १३३७-१३५६) विजयनगरच्या इतिहासांत याचा निर्देश येतो.

नारायणराव घोरपडे—(मृत्यु स. १७७०) इचलकरंजीच्या व्यंकटराव राजाचा मुलगा. यानें संस्थानची अतिशय भरभराट केली. नानासाहेब व भाऊसाहेब पेशव्यांना मुलूखगिरी करतांना ह्यानें मदत केली तेव्हां ह्यास धारवाडची सुभेदारी मिळाली. ह्याच्या मुलाचें नांव व्यंकटराव.

२. (मृत्यु स. १८२७) हा इचलकरंजीच्या व्यंकटराव घोरपड्यांचा दत्तक पुत्र. यानें संस्थानची भरभराट केली. करवीरकरांशीं ब्रिटिशांच्या मध्यस्थीनें तह घडवून आणला. यानें खर्ड्याच्या लढाईंत पेशव्यांना मदत केली.

नारायणराव पारसनीस (पुणें)—कृष्णरावाचा मुलगा. यानें पेशवाईअ बेरपर्यंत पारसनीसाचें काम केलें.

नारायणराव बल्लाळ पेशवे—(स. १७५५-१७७३) हा पांचवा पेशवा व नानासाहेबाचा धाकटा पुत्र होय. याचा जन्म ता. १०-८-१७५५ रोजीं झाला. याच्या पत्नीचें नांव गंगाबाई असून हा कृष्णाजी हरी साठ्यांचा जांवई होता. माधवरावाचे मृत्यूनंतर नारायणराव व राघोबादादांनीं एकविचारानें चालण्याचें ठरविलें होतें. याची बापूवर मर्जी नव्हती. हा हलक्या लोकांच्या आहारीं गेला होता. याचा कारभारी बाबाजी बर्वे होय. याच्या कारकीर्दीत कृष्णाजी धुळपानें फिरंग्यांचा पराभव केला (स. १७७३). दादा व आनंदीबाई यांच्या मसलती आपल्या विरुद्ध आहेत असें कळतांच यानें पुरी चौकशी न करतां दादास सहकुटुंब कैद केलें. पुढें दादानें हैदराच्या वकिलाच्या मदतीनें सुटकेचा अयशस्वी प्रयत्न केला. याच सुमारास चांद्रसेनीय कायस्थांचें एक प्रकरण उपस्थित झालें (ऐ. ले. संग्रह भा. ४, पृ. १९५६-६०). त्यांत कायस्थांचे विरुद्ध यानें निकाल दिला. तेव्हां कायस्थांनीं खवळून नारायणरावास कैदेत टाकायचें व राघोबास गादीवर बसवावयाचें असा कट केला. ह्या कटांत लक्ष्मण काशी, व्यंकट काशी, सखाराम हरी, सखाराम बापू, भवानराव प्रतिनिधी, सदाशिव रामचंद्र शेणवी व विठ्ठ रायरीकर हे प्रमुख होते. परंतु पुढें आनंदीबाईच्या संमतीनें नारायणरावास ठार मारावयाचें असा पोटकट झाला. त्याची माहिती राघोबास नव्हती. पुढें आनंदीबाईनें 'ध' चा 'मा' करून सुमेरसिंग, खरकसिंग, व मुहंमद इसब या तीन गारद्यांकरवीं यास ठार मारलें. गारद्यास या कामा-

साठी साष्टी, नगर व पुरंदर हे तीन किल्ले व पांच लक्ष रुपये देऊं केले होते. ह्याचा विश्वासू खिदमतगार चाफाजी टिळेकर हाहि नारायणरावास वांचवीत असतां मारला गेला. याचा स्वभाव तापट, उद्दाम व स्नानसंध्याशील असून पोरवयामुळें याला भारदस्तपणा व सारासार विचार कमी होता. आईच्या देखरेखीखालीं याचा संस्कृत, व्याकरण, काव्य वगैरेचा अभ्यास झाला (म. रि. म. वि. ४).

नारायणराव बक्षी—दौलतराव शिंद्यांचा कारभारी. याला सर्जेराव घाटग्यानें अंगाला बाण बांधून ठार मारलें.

नारायणराव रामराव भावे—(मृ. स. १८२७) रामदुर्ग संस्थानचा अधिपति. पत्नी राधाबाई.

नारायणस्वामी—(स. १७५९) यांचें दुसरें नांव दाजीराव देशपांडे (कोळेवाडीकर). पिता-रामचंद्र. पत्नी-धोंडूबाई. जन्मभूमि-कऱ्हाड (मं. १८३७ वा. इ. लें. १४०).

नारायणाचार्य—हा 'संकल्पसूर्योदय' नाटकाचा टीकाकार.

नारायणाचार्य गजेंद्रगडकर—हे राघवाचार्याचे चिरंजीव होत. यांचे वेदान्त व न्याय या विषयांवर फार मार्मिक ग्रंथ आहेत. यांचे महावाक्यार्थखंडन व ब्रह्मानंदीखंडन हे ग्रंथ फार मोठ्या योग्यतेचे आहेत.

नारो आनंदराव—हा पेशव्यांचा एक सरदार होय. स. १७७४ मध्यें रघुनाथराव पळून इंग्रजांकडे गेला. तेव्हां फत्तेसिंगाशीं लढून गोविंदराव गुजरातेंत अंमल बसवीत होता आणि फत्तेसिंगाचा पाठपुरावा बारभाई करीत होते. पुढें नारो आनंदराव याचे हाताखालीं बारभाईंनीं फत्तेसिंगाचे मदतीस आणखी फौज पाठविली, पण ती पोहोंचण्यापूर्वीच खुद्द दादांची स्वारी माळव्यांतून जानेवारी स. १७७५ त बडोद्यापाशीं येऊन पोहोंचली (रा. खं. १०. १५५; म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. ३४).

नारो आप्पाजी तुळशीबागवाले—(मृ.स.१७७५) तुळशीबाग संस्थानचे मूळ संस्थापक व पुणें प्रांताचे सरसुभेदार. हे मूळचे पाडळी गांवचे कुलकर्णी. यांचें उपनांव खिरे. हे खाजगीवाल्यांच्या पदरीं राहिले. तुळशीबागेच्या ठिकाणीं त्या वेळीं खरोखरीचा 'तुळशी' बाग होता व हा खाजगीवाल्यांकडे होता. नारायणाकडे तेथील तुळशी आणण्याचें काम होतें. यांवर खाजगीवाल्यांची मर्जी बसून हा यांस बहाल केला. नारोपंतानें मग रामाची स्थापना केली. तुळशीबाग संस्थानास पेशवे यांची पहिली देणगी शके १६८५ त मिळाली (मं. इतिवृत्त १८३७).

स. १७६३ त माधवराव पेशव्यानें वढू गांव इनाम दिला. यानें जमा-बंदीचे कामांत नवीनच क्रांति घडवून आणली. मलिकंबराचे तोडीचाच पेशवाईत या कामांत नारो आपाजीचा लौकिक झाला. निजामानें पुणें जाळल्यावर त्याची फिरून रचना माधवरावानें नारोपंताकडूनच करविली. याचा राजकीय व्यवहारांत ठिकठिकाणीं संबंध आला आहे. हा ता. ६-३-१७७१ रोजीं मरण पावला (म. रि. मध्य वि. ४, पृ. २८०-८१).

नारो गणेश शोचे—(मृत्यु स. १७९२-९३ सुमार) प्रथम अहल्याबाई होळकराचा कारभारी. नंतर पुढें बाईशीं बेबनाव होऊन तुकोजीचा कारभारी झाला. पण त्याच्याशींहि ह्याचें पटलें नाहीं. हा रांझ्याचा राहणारा व देशस्थ ब्राह्मण. ह्याच्या वडिलांचें नांव गणेश बापूजी व चिरंजीवाचें नांव गणपतराव. खानदेशांत यानें स. १७७६ सालीं कोळ्यांचा दंगा चालू असतांना स्वारी केली, पण ती अयशस्वी झाली. ह्याचें होळकर घराण्यांतील बायकांवर फार वजन होतें व त्यामुळें याजजवळ बराच पैसा सांचला होता. त्याचा लोभ तुकोजीस सुटून त्यानें नारोजीचा भयंकर छळ केला व शेवटीं ठार मारिलें. याच्या बायकोचें नांव महेश्वरी. मल्हारराव्याच्या वेळेपासून ३० वर्षें हा गृहस्थ उत्तरेंतील राजकारणांत मुरलेला असून धनलोभी असला तरी होळकरशाहीच्या हितास जपणारा होता (म. रि. उ. वि. २, पृ. २२-२४).

नारो गंगाधर मुजुमदार—शाहूच्या सांगण्यावरून हा धनाजी जाधव याचे फौजेंत गेला. तेथें बाळाजीस भेटला व शाहूचा निरोप सांगितला. नंतर शाहूबरोबर साताऱ्यास आला. तेथें शाहूला मदत केली. पुढें शाहूनें शके १६३५ मध्यें माघमासांत, यास मुज्मूचें पद व वस्त्रें दिलीं.

नारोपंत हणमंते—(नारायण त्रिमल हणमंते पाहा).

नारोपा—(मृत्यु स. १०३९) हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं विसावा सिद्ध होय. हा जातीनें ब्राह्मण असून मगध देशांत राहणारा होता. याच्या वेळेस महीपाल नांवाचा राजा होता (स.९७४-१०२६). यानें भिक्षु होऊन नालंदा येथें शिक्षण घेतलें व विक्रमशिला विहारमध्यें पूर्वद्वारचा महापंडित झाला. हा शांतिपाचा गुरु होता. तंजूरमध्यें याचे २३ ग्रंथ आहेत, त्यांपैकीं खालील कांहीं मागधी हिंदीमध्यें आहेतः (१) नाडपंडितगीतिका, (२) वज्रगीति. हा एक उत्कृष्ट हिंदी कविहि होता.

नारो महादेव— (सतराव्या शतकाचा उत्तरार्ध) इचलकरंजी संस्थानचा संस्थापक. हा मूळचा रत्नागिरी

जिल्ह्यांतील वरवडेकर जोशांच्या घराण्यांतील असून याचे वडील महादेवपंत सावंतवाडी संस्थानांतील म्हापणचे कुलकर्णी. वडील बालपणींच निवर्तल्यामुळें आईसमवेत हा बाहिरेवाडीस आला. येथें संताजीनें यास ठेवून घेऊन याच्या शिक्षणाची व्यवस्था केली. राजारामाच्या कारकीर्दीत यानें संताजीस फार मदत केली. त्याच्यावरील भक्तीमुळें ह्यानें घोरपडे आडनांव धारण केलें. संताजीनें ह्यास मिरजेची सरदेशमुखी व इचलकरंजी आणि आजरें हीं गांवें इनाम दिलीं. याचा मुलगा व्यंकटराव हा बाळाजी विश्वनाथाचा जांवई होता.

नारो बाबाजी अभ्यंकर—हा एक जुना भरंवशाचा हरकामी गृहस्थ असून दौलताबादचा किल्लेदार होता. स.१७७५ च्या नोव्हेंबरांत हा मरण पावला (म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. ५५).

नारो राम मंत्री—हा कोचरें गांवचा कुलकर्णी. सारस्वत ब्राह्मण होता. स. १७०७ च्या सुमारास हा धनाजीजवळ येऊन राहिला. स. १७१३ त शाहूनें यास मंत्रिपदाचा अधिकार दिला. हा विशेष कर्तृत्ववान् नव्हता. हा स. १७४८ त वारला (अष्टप्रधानांचा इतिहास; शाहू-महाराज रोजनिशी; राजवाडे खं. ६).

यास नारबा मंत्री असें म्हणत. हा आपल्या बंधूसह सातारा जिल्ह्यांत मागणी येथें राहत असे. अद्यापि हा गांव त्या घराण्याकडे इनाम चालतो. हा सुस्वभावाचा असून पेशव्याशीं उघड विरोध करीत नसे. हा मरण पावल्यावर यानें आपल्या भावाचा मुलगा घनश्याम यास दत्तक देऊन त्याचे नांवानें शाहूनें मंत्रिपद चालविलें (म. रि. म. वि. ३, पृ. ३१३).

नारो व्यास—(ग्रंथकाल स. १३६३) एक महानुभाव. यांना बहाळे नारो व्यास असेंहि म्हणत. यांचा श्रीऋद्धिपूरवर्णन हा ओवीबद्ध उत्कृष्ट काव्यग्रंथ शके १२८५ (स. १३६३) मध्यें पूर्ण झाला. हा ग्रंथ सटीप संपादन करून प्रसिद्ध झाला आहे. यांचा हा ग्रंथ महानुभावांच्या प्रसिद्ध सात ग्रंथांपैकीं एक आहे. हें काव्य प्रसिद्ध संस्कृत काव्यांच्या तुलनेस उतरतें. याचें विस्तृत विवेचन म. वा. इ. भाग पहिला यांत पांगारकरांनीं केलें आहे.

नारो शिवदेव पोंक्षे—नाना फडणिसाचा महादजीकडे असणारा हस्तक (म. रि. उ. वि. १, पृ. १०२).

नारो शंकर सचिव—(स. १७०८–१७३६) हे अज्ञान असतांच यांना सचिवपद मिळालें. दमाजी थोराताची पुंडाई मोडण्यास यांना पाठविलें असतां हे कैद झाले. तेव्हां बाळाजी विश्वनाथानें यांस सोडविलें. पुरंदर किल्ल्याजवळ असलेल्या बेलसर गांवच्या कुलकर्ण्याकडून दृष्टांतानुसार श्रीरामाच्या मूर्ति यांना मिळाल्या. तेव्हांपासून सचिवांचें कुलदैवत 'श्रीराम' झालें. रामनवमीचा उत्सव तेव्हांपासून चालू आहे. यांचा मृत्यु पे. द. २२. ३३३ मध्यें शके १६५८ ज्येष्ठ व. ११ बुधवार दिला आहे; व स्थल भोर सांगितलें आहे.

नारो शंकर दाणी राजेबहाद्दर—(मृत्यु स. १७७५) हा शूर, पराक्रमी व तलवारबहाद्दर होता. हा प्रथम उदाजी पवाराच्या हाताखालीं शिलेदार होता. माळव्यांत मराठ्यांनीं जी प्रथम हालचाल सुरू केली, त्या वेळीं (स. १७२०) याचा उल्लेख उदाजीबरोबरच आढळतो. नंतरचा (स. १७३० त) याचा उल्लेख मल्हारराव होळकराच्या पदरीं असल्याबद्दलचा सांपडतो. मल्हाररावानें याला इंदूरचा सुभेदार नेमलें होतें.

स. १७४२ त यानें ओर्च्छा हें ठिकाण घेतलें, तेव्हां यालाच त्या प्रांताचा सुभेदार नेमण्यांत आलें. यानें झांशीस राहून हा कारभार १४ वर्षे केला. या वेळीं यास जरीपटका, साहेबी नौबत व १५ लाखांचा सरंजाम मिळाला होता. पुढें याच्याबद्दल कागाळ्या आल्यावरून यास पेशव्यांनीं परत बोलाविलें (स. १७५७). नंतर यानें गुजराथच्या व सावनूरच्या लढायांत पराक्रम गाजविल्यानें व पुढें दत्ताजी शिंद्यांच्या मध्यस्थीनें पेशव्यांची गैरमर्जी नाहींशी होऊन हा पुन्हां उत्तरेकडे गेला (स. १७५७).

राघोबादादानें आपल्याकडे पेशवाईचा कारभार घेतला तेव्हां भवानराव प्रतिनिधीवर पेशव्यांची इतराजी झाल्यानें कांहीं दिवस प्रतिनिधीचें काम स. १७६२ त यास देण्यांत आलें होतें. हा बहुतेक दादांचा पक्षपाती असे.

याच्या ताब्यांत दिल्ली असतांना याला बादशहानें राजेबहाद्दर हा किताब दिला. कारण यानें बादशाहाचें रक्षण केलें होतें. शिवाय बादशाहानें यास मालेगांव हा गांव जहागीर देऊन इतर गांवेंहि सरंजामादाखल दिलीं होतीं. स. १७४० त मालेगांवांत यानें एक किल्ला बांधला. स. १७४७ मध्यें यानें नाशिक येथील रामेश्वराचें देऊळ बांधलें. येथें एक प्रचंड घंटा आहे त्यास नारोशंकरी असें म्हणतात. याच्याकडे शिंद्यांची दिवाणगिरी होती (स. १७६६). पण ती रघुनाथरावाच्यामुळें गेल्यानें हा अगदीं उद्विग्न झाला याला दोन पुत्र होते. पैकीं एकाचें नांव राघोपंत असून दुसऱ्याचें नांव त्रिंबकराव. निजामाशीं

लढतांना माधवराव पेशव्याचे वेळेस यांनीं केलेलें काम स्वतःच विस्तारानें लिहून ठेविलें आहे (भा. व. १ प. या. १. २). शिवाय याची एक बखर रा. राजवाडयांनीं छापली आहे (खं. १ पृ. ३१०). हा स. १७७५ मध्यें मरण पावला.

नार्मद—(स.१३७८सुमार) सांप्रतच्या सूर्यसिद्धांतावर टीका किंवा त्याच्या आधारें रचलेला ग्रंथ नार्मदाचा असावा असें सूर्यसिद्धांतविचारांत लिहिलें आहे. या नार्मदाचा काल शके १३०० असावा.

नासिख—(मृत्यु स. १८३६) एक ऊर्दू कवि. याचें नांव इमामबक्ष नासिख असें आहे. याच्या पित्याचें नांव खुदाबक्ष असून याचा जन्म लखनौ येथें झाला. यास अरबी व फार्सी भाषांचें ज्ञान उत्तम होतें. याचे एकंदर तीन दीवाण (कवितासंग्रह) आहेत. त्यांचीं नांवें–१ दफ्तरे परेशान, २ नज्म सिराज, ३ मौलूद शरीफ (क. कौ. ४).

नासिरजंग—(स. १७३७–५०) हा निजामुल्मुक असफजहाचा मुलगा. याची व याच्या बापाची लढाई झाली, तींत याचा पूर्ण पराभव झाला. हा मुजफरजंगाचा पराभव करून गादीवर आला. ता. ५-१२-१७५० मध्यें फ्रेंचांशीं लढत असतां हा दग्यानें मारला गेला.

नासिरशाह—(स. १४२७-२९) बंगालचा राजा. हा बंगालचा सुलतान जो अहमद त्याचा मुलगा. याला कें. हि. मध्यें ' नासिरुद्दीन महमूदशाह ' म्हणतात.

नासिरसाह—(स. १५००-१५१० सुमार) हा बीलवी वंशांतील असून माळव्यांतील घियासशहा खल्जीचा मुलगा, असें यानें लिहिलेल्या ' नासिरसाही कड्काली ' या ग्रंथांत लिहिलें आहे. हा ग्रंथ हिंदीमध्यें आह. तेव्हां हा ग्रंथ यानें किंवा याच्या आश्रयाखालीं असलेल्या एखाद्या पंडितानें लिहिला असावा.

नासिरुद्दीन—(स. १३१८ सुमार) बंगालचा सुभेदार. बुघ्राखानानें आपला मुलगा कैकूबाद दिल्लीचा सुलतान झाल्यावर आपण स्वतंत्र असल्याचें जाहीर केलें, व तीच परंपरा रुक्नुद्दीन कैकोस, शम्सुद्दीन फीरूज व त्याचा युवराज शिहाबुद्दीन बुघ्रापर्यंत चालली. पण शिहाबुद्दीन बुघ्रा व त्याचा धाकटा भाऊ घियासुद्दीन बहादूर यांच्यामध्यें बंगालच्या गादीबद्दल तंटे सुरू झाले. बुघ्रा मारला गेला, तेव्हां त्याचा धाकटा भाऊ नासिरुद्दीननें दिल्लीच्या घियासुद्दीन तुघ्लकाची मदत मागितली. त्यानें स्वतः बंगालमध्यें येऊन याच्या प्रतिस्पर्ध्याला पकडून याला सुभेदार म्हणून कायम केलें. मुहम्मद तुघ्लक गादीवर आल्यावर त्यानें याच्या जागीं मलिक बिदार कादरखानची नेमणूक केली.

२. बंड करून दौलताबादचा सुलतान झाल्यावर इस्माईलनें धारण केलेला किताब.

३. हा मुबारक खल्जीचा वजीर. हाच पुढें दिल्लीचा बादशहा झाला.

नासिरुद्दीन कबाचा— (स. १२०५–१२२८) शहाबुद्दीन घोरीचा मुलतानचा सुभेदार व कुत्बुद्दीन ऐबकाचा जांवई. हाहि स्वतंत्र झाला होता.

नासिरुद्दीन खल्जी—(स. १५००-मृ. स. १५१२) घियासुद्दीन खल्जीचा पुत्र. माळव्याचा सुलतान.

नासिरुद्दीन खुसरोशाह खल्जी—(स. १३२०) दिल्लीचा बादशाह. याला घियासुद्दीन तुघ्लकनें ठार करून राज्य बळकावलें.

नासिरुद्दीन दामघानी— (स. १३४४–५६) हा घियासुद्दीन दामघानीचा पुतण्या. त्याच्या वेळीं हा दिल्लीकडे हलक्या नोकरीवर होता. मदुरेच्या गादीवर येतांना महमूद गाझी दामघानी असें नांव घेतलें. यानें विरुद्ध जाण्याचा संभव असलेल्या सर्वांचा वध केला. इब्न बतूताहि याचे राज्यांतून निघून गेला.

नासिरुद्दीन नुस्रतशाह—(स. १५१८) बंगालचा राजा.

नासिरुद्दीन महमूदशाह—(नासिरशाह पाहा).

नासिरुद्दीन महमूदशाह गुलाम—(१० जून १२४६–१२६६) दिल्लीचा बादशहा. शम्सुद्दीन अल्तमशचा मुलगा. ४० तुर्की सरदारांनीं आपला संघ स्थापून त्या द्वारां दिल्लीचें राज्यपद तुर्कांना अनुकूल ठेवण्याचा प्रयत्न चालविला. रझियाला पदच्युत करून याला तुरुंगांतून मुक्त करून गादीवर बसविण्यापर्यंत उलाढाली यांनींच केल्या. याच्या कारस्थानी आईनें याला राज्यावर बसविण्याकरितां बोलावणें आलें तेव्हां विरोध टाळण्याकरितां आजारी म्हणून औषध देण्याकरितां दिल्लीस आणलें, व गादीवर बसविलें. हा बल्बनचा जांवई होता. तोच याच्यानंतर गादीवर आला. याच्या एकपत्नीव्रतासंबंधीं बखरकारांनीं लिहिलेल्या गोष्टी खऱ्या नाहींत, तथापि इतरांच्या तुलनेनें हा जरा धार्मिक होता.

नासिरुद्दीन महमूदशाह तुघ्लक—(स.१३९४-१४१३) दिल्लीचा बादशाहा. हा सुलतान मुहम्मदाचा मुलगा. याला दिल्लींतील प्रमुख लोकांनीं गादीवर बसविलें. हा एकंदर १० वर्षें राज्यावर होता, पण खरी

सत्ता याच्या हातांत न येतां याला नेहमीं आपल्या वजीराचे तंत्रानें चालावें लागत असे. याचे वेळीं याच्या दोघां सरदारांचें (सादतखान व मुखबरखान) न पटल्यामुळें राज्यांत नेहमीं भांडण होत असे. याचेच कारकीर्दीत तैमूरलंगानें दिल्लीवर स्वारी केली होती (स. १३९८). हा स. १४१३ त कैथल येथें मरण पावला.

नासिरुद्दीन मुहम्मदशाह—(स. १४४२) बंगालचा राजा.

नासिरुद्दीन हैदर—(स. १८२७-३७) अयोध्येचा नबाब. हा विषप्रयोगानें मेला.

नासिरुद्दौला निजाम—(स. १८२९-१८५७) हा हैद्राबादचा राजा. हा मीर्झा शिकंदरशाह निजामाचा मुलगा. याचें दुसरें नांव फर्खुंद अलीखान.

नाहडराव—(२ नागभट प्रतिहार पाहा).

निकितीन—(स. १४०० नंतर) हिंदुस्थानांत आलेला रशियन प्रवासी.

निचुल—एक आचार्य. कालिदासानें आपल्या मेघदूत काव्याच्या चौदाव्या श्लोकांत श्लेषानें याचा निर्देश केला आहे, असें दक्षिणावर्त व मल्लिनाथ यांनीं आपल्या टीकेंत म्हटलें आहे. हा रामगिरीच्या जवळ राहत असून कालिदासाचा सहाध्यायी होता. हा कालिदासाच्या काव्यावरील आक्षेप दूर करीत असे. पण श्लेषानें असा उल्लेख केला नसावा, असें पुष्कळांचें मत आहे.

निजामअली निजाम—(स. १७६१-१८०२) हा निजामुल्मुल्क असफजाहचा चवथा मुलगा. यानें सलाबतची सत्ता बळकावून त्याचा खून केला. यानें पेशव्यांशीं राक्षसभुवन येथें लढाई केली, पण तींत याचा पूर्ण पराभव झाला. यानें बारभाईंच्या कारस्थानांत १३ लाखांची जहागिरी मिळविली. मराठ्यांनीं आपल्या चौथाईच्या २ कोट रुपयांची मागणी निजामाकडे केली, पण यानें ती मागणी नाकारली, त्यामुळें मराठ्यांनीं याचा खर्ड्याच्या लढाईत पूर्ण पराभव केला. इंग्रजांनीं यास टिपूच्याविरुद्ध मदत केल्याबद्दल ५३०००० रु. चा प्रांत दिला. यानें हेस्टिंग्ज़ला एक पत्र ता. २३-७-१७७८ रोजी पाठविलें, त्यांत यानें 'राघोबाच्यावर विश्वास न ठेवतां, पेशव्यांशीं तह केला हें चांगलें केलें' असें लिहिलें आहे. यानें इंग्रजांशीं तैनाती फौजेचा तह केला आणि हा पूर्णपणें इंग्रजांचा अंकित झाला (स. १८००).

निजामखान—गुजराथच्या सुलतान घराण्यांतील शकरखानाचा मुलगा.

२. हा गुजराथच्या मोमिनखानाचे मागून गादीवर आला, पण याचा त्याच्या मुलानें खून केला.

३. माळव्याच्या घोरी घराण्यांतील उस्मानखानाचा हा मुलगा (कें. हि. मधील वंशावळीवरून).

निजामखान लोदी—(स. १४८६-१५१७) लोदी घराण्यांतील बहलोलचा मुलगा गादीवर आला त्या वेळेस यानें शिकंदरशाहा हें नांव धारण केलें.

निजामशाह बाहामनी—(स. १४६१-६३) बाहामनी राजवंशांतील हुमायूनशाहाचा पुत्र.

हा बापाचा खून झाल्यावर गादीवर आला. ह्या वेळीं याचें वय ८ वर्षांचें होतें. याच्या कारकीर्दीत माळव्याच्या सुलतानानें बेदरवर स्वारी केली. हा आपल्या लग्नाच्या दिवशीं मरण पावला.

निजामशाही घराणें (अहमदनगर व परांडा)—निजामुल्मुल्क बहिरी (स. १४६०-८९), १ 'मलिक' अहमद-निजामशाहा (स. १४८९-१५०८), २ बुर्हाण १ ला (स. १५०८-१५५४, बायको-मर्युम, विजापूरच्या युसुफ अदिलशाहाची मुलगी), ३ हुसेन (स. १५५४-१५६५, याचे भाऊ १ शहाताहरि, २ अबदुलकादरि, ३ अबदुलकादर, ४ हसन, ५ शाहअली, याचा मुलगा १० वा मुर्तझा २ रा), ४ मुर्तझा १ ला (स. १५६५-१५८८, याचा मुलानें खून केला. याचे भाऊ-१ बुर्हाण २ रा, शहाकासिम, बहिणी बीबी जमाली, इब्राहीम कुत्बशाहाची पत्नी व चांदबीबी विजापूरच्या अली आदिलशाहाची बायको), ५ मिरान हुसेन (स. १५८८-१५८९), ६ इस्माईल (स. १५८९-१५९०), ७ बुर्हाण २ रा (स. १५९०-९५), ८ इब्राहिम (स. १५९५), ९ बहादर (स. १५९५-१६००), १० मुर्तझा २ रा (स. १६०१-७), ११ बुर्हाण ३ रा (१६०७-३०), १२ हुसेन २ रा. (स. १६३०-३३), १३ मुर्तझा ३ रा (स. १६३३-३७).

स. १६३७ नंतर अहमदनगरचें राज्य दिल्लीच्या साम्राज्यांत सामील झालें.

निजामुल्मुल्क बहिरीनें तिसऱ्या मुहम्मद बहामनीकडून महमूद गवानास ठार मारविलें व बहामनी राज्याचीं पांच छकलें झालीं; आणि त्याच्या अहमद निजामशाहा नांवाच्या मुलानें बहामनी राज्याचा पराभव करून अहमदनगर येथें स्वतंत्र राज्य स्थापून निजामशाहीची

राजधानी केली. बहादूरशाहानंतर या घराण्याची राजधानी परांडा झाली.

निजामशाही घराणें—(औरंगाबाद व हैदराबाद). १ निजामुल्मुल्क (स. १६७१-१७४८), २ नासीरजंग (स. १७४८-५०), ३ मुजफरजंग (स. १७५०-५१), ४ सलाबतजंग (स. १७५१-६१), ५ निजामअली (स. १७६१-१८०३), ६ मौर्झा शिकंदरजाह (स. १८०३-१८२९), ७ नासिरुद्दौला (स. १८२९-१८५७), ८ अफझुलुद्दौला (स. १८५७-१८६९), ९ मीर माहूबअलीखान (स. १८६९-१९१२), सर उस्मानअलीखान बहादुर फत्तेजंग (स. १९१२).

निजामुद्दीन—(कैकूबाद पाहा).

निजामुद्दीन अवलिया शेख—(स. १३२५ सुमार) खुस्रवखानाचा धर्मगुरु. ज्या वेळेस घियासुद्दीन तुघ्लकनें खुस्रवला पदच्युत करून आपण गादीवर बसला, त्या वेळेस त्यांनीं याजपाशीं खुस्रवखानानें दिलेली देणगी मागितली, तेव्हां यानें ती नाकारली. त्यामुळें तो याच्यावर रागावला. यानें घियासुद्दीन तुघ्लकाचा मुलगा उलुघखानास आपला शिष्य केलें व त्यास घियासुद्दीन तुघ्लक स्वारीवर गेला आहे, असें पाहून एक पोकळ लांकडी घर बांधण्यास सांगितलें, व घियासुद्दीन स्वारीवरून आल्यावर त्या घरांत येईल असा बेत केला. ठरल्याप्रमाणें घियासुद्दीन त्या घरांत गेला व त्यांत चिरडून मेला.

निजामुल्मुल्क—(स. १२४२ त खून) इल्तत्मशचे कारकीर्दीत जो ४० सरदारांचा संघ होता, त्यांतील हा एक प्रमुख सरदार. हा बहरामचे कारकीर्दीत पुढारी होता. यानेंच बहरामाकडून बद्रुद्दीन संकर नामक प्रमुख सरदाराचा खून करविला. पुढें याचें व बहरामचें न पटल्यामुळें हा बहरामचा खून करण्यास पाहत होता. मोंगल लोकांनीं ज्या वेळेस हिंदुस्थानावर स्वारी केली, त्या वेळेस बहरामाचे तुर्की सरदार मोंगलावर चालून गेले, पण यानें बहरामाला असा गुप्त निरोप पाठविला कीं, सर्व तुर्की सरदार असंतुष्ट असून राजाला पदच्युत करण्याच्या विचारांत आहेत. तेव्हां बहरामानें अदूरदृष्टीनें याला सर्व तुर्की सरदारांचा वध करण्यास हुकूम दिला. तो यानें सर्व तुर्की सरदारांस दाखविला. तेव्हां सर्व तुर्की सरदार दिल्लीस परत गेले व बहरामचा १० मे १२४२ त खून केला. अशा तऱ्हेनें यानें बहरामाचा सूड घेतला. पण पुढें याचें कारस्थान उघडकीस येऊन याचा सर्व सरदारांनीं ता. २८ आक्टोबर १२४२ त खून केला.

२. (ऊर्फ सुलतान अलाउद्दीन)—(स. १३३४) काराचा सुभेदार. सुलतान मुहम्मदानें यास कारा प्रांतावर सुभेदार नेमलें. पण पुढें यास आपण ठरविलेली वसुलाची रक्कम देतां न आल्यामुळें, यानें सुलतानाविरुद्ध बंड केलें; व कारास राज्य स्थापन केल्याचें जाहीर केलें. पण औध प्रांताचा सुभेदार ऐन-उल्मुकानें याचा वध करून याचें कातडें सुलतानाकडे पाठविलें (कें. हि.).

३. (स. १६७१-१७४८) याचें मूळ नांव कमरुद्दीन, यास औरंगजेबानें चिनकुलीचखान ही पदवी दिली. हा झुल्फीकारखानाच्या मृत्यूनंतर दख्खनचा सुभेदार झाला. हा फर्रुखसियरच्या कारकीर्दीत स. १७२३ त प्रथम औरंगाबादेस व नंतर हैद्राबादेस स्वतंत्रतेनें कारभार पाहूं लागला. हा थोर मुत्सद्दी ७७ वर्षांचा होऊन मरण पावला (मुबारिझखान पाहा).

निजामुल्मुल्क (मलिक नाईब) बहिरी—(स. १४६०-१४८९) अहमदनगरच्या निजामशाही घराण्यांतील अहमद निजामशाहाचा हा बाप होय.

तिमाप्पा नामक एका ब्राह्मणाचा हा पुत्र होय. अहमदशहाचे फौजेनें विजयनगरच्या राजाबरोबर लढाई करून याला कैद करून आणलें, तेव्हां पुढें हा मुसलमान झाला. याचा मुलगा अहमद यानें अहमदनगरच्या निजामशाहीची स्थापना केली (मु. रि. भा. १ ला, पृ. २४२).

हा बहामनी राज्यांतील एक सरदार होता. यानें तिसऱ्या मुहम्मद बाहमनीकडून महम्मूद गवानाचा खून करविला; आणि त्यामुळेंच बहामनी राज्याचीं पांच छकलें झालीं (अहमद निजामशाह बहिरी पाहा).

निजानंद—याचा 'ज्ञानाब्धितरंग' नांवाचा ग्रंथ उपलब्ध आहे. तो शक १६३० सर्वधारी संवत्सरीं मार्गशीर्ष वद्य दशमीस मुक्तावली (माहुली ?) येथें संपविला. यानें निजानंद-श्रीकृष्ण-एकनाथ अशी खूप मोठी शंकरापर्यंत गुरुपरंपरा दिली आहे (मं. वार्षिकवृत्त श. १८३६ क्र. ११).

निजानंदस्वामी—प्रसिद्ध रंगनाथ स्वामींचे वडील जे गोपाळपंत त्यांचें संन्यास घेतल्यानंतरचें नांव. हे पूर्णानंद स्वामींचे शिष्य व शिवरामस्वामींचे गुरुबंधु. हे पुढें रंगनाथस्वामींचे गुरुहि झाले.

नित्यानंद—(ग्रंथकाल स. १६२५ सुमार) एक बंगाली कवि. वैष्णवसंप्रदायांत 'पतितपावन' नांवानें प्रसिद्ध. हे वैद्य जातीचे असून ह्यांचा जन्म श्रीखंड गांवीं झाला. वडिलांचें नांव आत्मारामदास. ह्यांचे ग्रंथ-

महाभारताचा अनुवाद, शीतलामंगल व प्रेमविलास (क. कौ. भा. ७ वा).

२. (ग्रंथकाल स. १६३९) एक ज्योतिषी. याचा पिता-देवदत्त व आजा नारायण. गोत्र मुद्गल. कुरुक्षेत्रानजीक इंद्रपुरीचा राहणारा. ग्रंथ-सिद्धांतराज.

निरंजन—(ग्रंथकाल स. १५५४) पंढरपूरचा राहणारा. यानें ' गणेशगीते'वर टीका लिहिली. यानें आपली परंपरा पुढीलप्रमाणें दिली आहेः शंकराचार्य-हस्तामलक-भास्कर-लयानंद-सिद्धानंद-आनंदानंद-परमानंद-काशीराज-निरंजन (म. सा.).

निरंजनबुवा—(समाधि स. १८५५) हा परळी वैजनाथाच्या पूर्वेस कळंब गांवचा राहणारा. याच्या बापाचें नांव श्रीधरपंत श्रोत्री, व आईचें नांव लक्ष्मी. याचें पूर्वीचें नांव अवधूत होतें. हा नोकरी सोडून रघुनाथ भाजी नांवाच्या साधूचें दर्शन घेण्यास नाशिक येथें गेला व त्यांनाच गुरु केलें. यास रामकृष्ण, योगीराज, विष्णु, वासुदेव असे चार पुत्र होते. यानें केलेले कांहीं ग्रंथ— ' अमृतानुभवावर गद्य टीका '. याचीं ' पतिव्रताख्यान ', ' गोंधळी ', ' केशवचैतन्यकथाकल्पतरु ', हीं प्रकरणें काव्यसंग्रहांत प्रसिद्ध आहेत (म. क. चरित्र भा. ५, पृ. १७८-८५).

निरंजनमाधव—(ग्रंथकाल स. १७५८-१७७३) एक सुप्रसिद्ध मराठी कवि. याचें मूळ नांव बनाजी माधव असें होतें व हा राजकारणांत याच नांवानें प्रसिद्ध आहे. हा गोदावरीनदीवरील रामडोहोचा राहणारा. हा दे. ऋ. ब्राह्मण असून याचें गोत्र विश्वामित्र. याच्या बापाचें नांव महादो बनाजी व आईचें नांव भागीरथी. याच्या बायकोचें नांव गंगाबाई व गुरूचें नांव लक्ष्मीधर बरवे. नानासाहेब पेशव्यांनीं याला तंजावर, श्रीरंगपट्टण वगैरे संस्थानांत मोठीं हुद्याचीं कामें सांगितलीं, त्यामुळें हा फार व्यवहारचतुर व राजकारणनिपुण झाला. संस्कृत, मराठी, कानडी व हिंदुस्थानी या चार भाषांचें यास उत्तम ज्ञान होतें. याचे गुरु लक्ष्मीधर हे वैकुंठवासी झाले, हें कळल्यावर यानें सात दिवस पाणी देखील तोंडांत टाकिलें नाहीं. पुढें यास स्वप्नांत दृष्टांत देऊन 'तुला माझी भेट होईल' असें सांगितलें. पुढें नानासाहेब पेशव्यानें याच्या मदतीस गणेशसुत बापजी पंडितास नेमिलें. पुढें दृष्टांताप्रमाणें हाच याचा गुरु झाला. यानें आपल्या ग्रंथाच्या आरंभीं या दोन्ही गुरूंस वंदन केलें आहे. याच्या हातून पुष्कळ मोठमोठीं राजकारणें झालीं, पण याचा मुख्य विषय अध्यात्मचिंतन होय.

मराठींत जे उत्तम कवि होऊन गेले त्यांतील निरंजनमाधव हा एक होय. तथापि इतर कवींप्रमाणें याची कविता फारशी प्रसिद्ध नाहीं. याच्या रचनेचा मुख्य काल शके १६८०-१६९५ हा होय. यानें १ ज्ञानेश्वरीविजय (अ. ५, श्लोक २१८) नामक ग्रंथांत ज्ञानेश्वरांचें चरित्र दिलें आहे. २ ज्ञानेश्वरसमाधि (अ. १२, श्लोक ७६३) हा ग्रंथ नामदेवांच्या अभंगांच्या आधारें शके १६८७ पार्थिव संवत्सरांत केला. ३ चिद्बोधरामायण (श्लोक ४२२ बालकांड), ४ रामकर्णामृत (१११), ५ निरोष्ठ रामायण (श्लोक ४५) व ६ मंत्ररामचरित्र (श्लो. १५) हे याचे ग्रंथ रामवर्णनपर आहेत. याचे छंदःशास्त्रावर पुढील तीन ग्रंथ आहेतः—७ वृत्तमुक्तावली (श्लो. १५०), ८ वृत्तवनमाला (श्लो. १११) व वृत्तावतंस (श्लो. २५१) हे अनुक्रमें शके १६८३, १६८९, व १६९४ या सालांत रचिलेले आहेत. याचा सुभद्राचम्पू (मराठी सुंदर काव्य, सर्ग ७, श्लो. ३८०) हा शके १६९० मध्यें रचिलेला आहे. ११ सांप्रदायपरिमळ (उद्गार ५ ओवी १००० आहे). १२ अद्वैतामृत, १३ बोधभानु. ह्या दोन टीका स्वात्मानंदप्रकाश ग्रंथावर आहे. हा शके १६८५ मध्यें रचिला. याशिवाय यांचीं कांहीं स्फुट प्रकरणें, स्तोत्रें व पदें आहेत. वामनपंडितांच्या धर्तीवर यानें बहुतेक काव्यरचना भिन्नभिन्न वृत्तात्मक श्लोकांत केली आहे. शुद्धाशुद्धतेकडे याचें फारसें लक्ष नाहीं, तरी याच्या काव्यांत प्रसाद चांगला असून याच्या वाणीचा ओघ अगदीं अस्खलित आहे. हा मोठा वेदांती व योगी असून परम भक्त होता. साहित्यशास्त्र यानें चांगलेंच पाहिलेलें दिसतें. वृत्तावतंस ग्रंथ तर यानें नथ्थभट नामक नागर ब्राह्मणाच्या मतानुसारें केला आहे (म. क. च. भा. १ ला, पृ. ३२२-४४).

प्रो. पोतदार यांनीं १९२८सालीं साहित्यपत्रिकेंत 'सांप्रदायपरिमळ ग्रंथ ' ' निरंजनमाधवाचा नसावा, तो त्याचा शिष्य निरंजनदास याचा असावा ' अशी शंका अभ्यासी जनांपुढें ठेविली. पण रा. पांगारकरांनीं हा ग्रंथ निरंजन माधवाचाच आहे असें आपलें ठाम मत कारणांसह दिलें आहे. यांचें घराणें सध्यां पुणें येथें शनवार पेठेंत अमृतेश्वराजवळ पारसनीस या नांवानें प्रसिद्ध आहे.

निरंजनस्वामी—(स. १५५९-१६४९) हे समर्थ रामदासस्वामींचे शिष्य. हे कऱ्हाडचे राहणारे. यांची गणेशगीता प्रसिद्ध आहे.

निरुपम राष्ट्रकूट— मालखेडच्या राष्ट्रकूटांपैकीं तिसऱ्या अमोघवर्षाचा धाकटा मुलगा. हा गादीवर आला

नव्हता. याचा मुलगा कोकल किंवा कर्क दुसरा हा खोत्तिगानंतर गादीवर आला.

निर्गुणपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं सत्तावनावा सिद्ध होय. जात शूद्र. देश पूर्व. शरीरनाडिकाबिंदुसमता (तं. ४८।४) हा याचा ग्रंथ.

निराजी रावजी—याचा मुलगा प्रल्हाद निराजी होय. निराजी हा शिवाजीमहाराज आग्रा येथून निसटून आले त्या वेळीं हजर होता. हाच गोवळकोंड्यास तानाशा कुत्बशाह व महाराज यांचा तह झाला तेव्हां महाराजांतर्फे तहावर सही करणारा होता. निराजी हा विष्णुवर्धन गोत्री देशस्थ ऋ. ब्राह्मण. जुन्नरचे देशपांडे घराण्याशीं याची सोयरीक होती. याला शिवाजीनें न्यायखात्याचें मुख्य नेमलें होतें.

निर्ग्रंथ—याला नातपुत्र असेंहि म्हणतात. हा एका शेतकऱ्याचा पुत्र होता. जैन लोक पार्श्वनाथाच्या अनुयायाला नातपुत्र म्हणतात. यानें विषमिश्रित भात खाण्याकरितां बुद्धदेवास बोलावलें होतें असें फाहियान म्हणतो.

निर्भयराम—पिटकन गांवचा चतुर्वेदी ब्राह्मण. यानें वरसी मेहेत्याच्या मुलीचें लग्न गुजराथींत कविताबद्ध लिहिलें आहे (का. दो.).

निर्मळ पाठक—(स. १४०० सुमार) वडवाळ सिद्ध नागेशाचा शिष्य. याचें ओवीबद्ध पंचतंत्र उपलब्ध आहे (म. सा.).

निलंविका—बसवाची बहीण पद्मावती, तिचा हा पुत्र.

निवृत्ति अवधूत—' दशनामविधान ' या ओवीबद्ध ग्रंथाचा कर्ता (मं. श. १८३६ वा. इ. ले. ८५).

निवृत्तिनाथ—(जन्म स. १३५१–समाधि स. १३७७ त्र्यंबकेश्वरीं) ज्ञानेश्वरमहाराजांचे वडील बंधु व गुरु.

निश्चलपुरी—यानें गागाभट्टकृत शिवराज्याभिषेकप्रयोगांतील कांहीं दोष दाखवून तांत्रिक पद्धतीनें ललिता नवमी (आश्विन शु. ५)स केलेल्या दुसऱ्या राज्याभिषेकाची माहिती असलेला असा ' श्रीशिवाजीराज्याभिषेक-कल्पतरु ' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला. याचा ग्रंथ बखरींत असून ' तारीख-इ-शिवाजी ' मध्यें याचें नांव अक्लपुरी असें लिहिलें आहे.

अप्पाजीरावाचा मृत्यु, काशीबाई नांवाच्या राजपत्नीचा मृत्यु, मल्लिकार्जुनेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार वगैरे बाबतींची माहिती यांत आहे. राज्याभिषेकाच्या वेळीं मंत्रोक्त विवाह झाले ते पूर्वीच्याच बायकांशीं झाले असें या ग्रंथांत सांगितलें आहे. यावरून बाकीचे जे ग्रंथकार म्हणतात कीं, महाराजांनीं उतार वयांत अनेक नवीं लग्नें केलीं हें त्यांचें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. ग्रंथांत आलेला कालोल्लेख गणितदृष्ट्या बिनचूक आहे. हा ग्रंथ संस्कृत भाषेंत आहे (मं. त्रै. व. ११. १, ले. ६).

निष्कलंक वज्र—चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एक. यानें भारतीय ग्रंथाचे भूतानी व लिच्छवी भाषांत अनुवाद केले आहेत. याचेबरोबर जगन्मित्र नंद हे होते. यानें बंधविमुक्तिशास्त्र (तं. ४८।१२३) या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे.

निष्कुळानंद—(स. १८५७) काठेवाडांत गढडा गांवचा राहणारा कवि. भक्तचिंतामणि, यमदंड, वचनविधि, कल्याणनिर्णय, शिक्षापत्री, अजी विनय, हरिस्मृति, हरिचरण, स्नेहगीता, हृदयप्रकाश, चिन्हचिंतामणि, मनगंजन, चौसष्टपदी, सारसिद्धि, हरिबाळगीता, पुरुषोत्तमप्रकाश, चातुर्यगुणग्राहक, धीरज आख्यान आणि भक्तिविधि, इतके यांचे ग्रंथ गुजराथी भाषेंत आहेत.

निळो बल्लाळ चिटणीस—खंडो बल्लाळाचा धाकटा भाऊ. याला शाहूनें पेशव्यांची चिटणिशी दिली होती.

निळोबा—(स.१६५८सुमार) मराठी साधु कवि.देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. नगर जिल्ह्यांतील पिंपळनेरचा कुलकर्णी. पिंपळनेर गांव यानें वसविलें, असें महीपतीनें म्हटलें आहे. हा तुकोबाच्या चौदा टाळकऱ्यांपैकीं एक होता. याची कविता बरीच आहे. हा शके १५८० च्या सुमारास विद्यमान होता. हा फाल्गुन शुद्ध प्रतिपदेस पिंपळनेर येथें समाधिस्थ झाला. त्या दिवशीं पिंपळनेर येथें मोठा उत्सव होतो. तुकारामम्महाराजांनीं वैकुंठवासी झाल्यावर यांनीं त्यांच्या विरहानें बेचाळीस दिवस उपवास केला. तेव्हां त्यांच्याकडून साक्षात्कार होऊन यांना अनुग्रह मिळाला. तुकारामानंतर प्रमुख शिष्य म्हणून गादीचा मान यांच्याकडे आला. निळोबाचे शंकरस्वामी शिरूरकर आणि शंकरस्वामीचे मल्लाप्पा आप्पा वाशीचे लिंगायत वाणी. वाशीकरच सध्यां तुकारामाची गादी चालवणारे आहेत. भक्तविजयाच्या ५६ व्या अध्यायांत यांच्या एकनिष्ठतेची कथा दिली आहे. यानें तुकारामाचें चरित्र अभंग वृत्तांत गायिलें आहे आणि पांडुरंगवर्णन, पंढरीमाहात्म्य वगैरे प्रकरणें अभंगात्मक केलीं आहेत (म. क. च. भा., ३, पा. ६८–८०).

निळो मोरेश्वर—(नीलकंठ मोरेश्वर पिंगळे पाहा).

निळो राम अत्रे—हा दे. क्र. ब्रा. होता. हा शिवाजी-महाराजांपाशीं मोठ्या प्रतिष्ठेनें वावरत असे. 'निळोराम अत्रे पूर्वी हिंदुराव सरलष्कर याजकडे सबनीस असतां स्वामीकार्यावरी चीज जाले. सबब याचा मुलगा गणेश निळकंठ याच्या कुटुंबाचा योगक्षेम चालला पाहिजे. याज-करितां कैलासवासी राजश्री राजाराम साहेब चंदीचे मुक्कामी कृपाळू होऊन मौजे गराडे येथील एक चाहूर जमीन कुलबाब कुलकानू इनाम देते झाले.' निळोराम कोणत्या लढाईंत स्वामीकार्यीं चीज झाले, हें माहीत नाहीं (मं. त्रै. व. ५. १-४. ले. २).

निळो सोनदेव बहुतकर—(मृत्यु स. १६७२) हा आपला वडील बंधु आबाजी सोनदेवापेक्षां लिहिण्याच्या वगैरे कामांत फार हुशार असे. यानें कोंकणची उत्तम व्यवस्था लावली. यानें सिद्दीच्या लढ्यांत प्रमुख भाग घेतला. शिवाजीनें याच्याकडे भोर किल्ल्याची सबनिशी दिली. राज्याभिषेकाच्या पूर्वी याच्याकडे मुज्मूंचें काम होतें. शिवाजी दिल्लीस गेला तेव्हां ज्या तिघांवर राज्याची जबाबदारी सोंपविली होती त्यांपैकीं हा एक होता. हा स. १६७२ मध्यें मरण पावला.

निहाल—मुद्गल शहरीं एका सोनाराची निहाल नांवाची एक रूपवती मुलगी होती. विजयनगरच्या राजानें हिच्या बापाकडे हिची मागणी केली. पण ही गोष्ट मुलीस पसंत पडली नाहीं. तेव्हां राजानें मुलीस पकडण्यासाठीं फौज घेऊन मुद्गल शहरावर हल्ला केला. पण निहाल पळून गेली. तो मुलूख बहामनी राजा फीरूजशाहाचा असल्या-मुळें त्यास मोठा राग आला; आणि त्यानें विजयनगरच्या देवराय राजाशीं लढाई करून त्याचा पूर्ण पराभव केला व देवराय राजाच्या मुलीशीं आपण लग्न लावलें. त्या वेळीं फीरूजशहानें हिचें लग्न शहाजादा हसनखान याजबरोबर लाविलें (मु. रि. भा. १ ला).

निंबराज बाबा—(लिंबराज पाहा).

निंबार्क—(स. ११५० सुमार) नीमावत पंथाचा संस्थापक व एक वैष्णवधर्मप्रसारक होय. कोणी प्रख्यात गणिती व ज्योतिषी जो भास्कराचार्य तो हाच असें म्हणतात. एके दिवशीं संध्याकाळीं सूर्यास्तानंतर अन्नग्रहण न करणारा एक अतिथि याचे घरीं आला. तेव्हां यानें अतिथीसाठीं सूर्याला निंबाच्या झाडांत अडकवून ठेविलें. म्हणून याला निंबार्क (निंब-अर्क) म्हणूं लागले.

हा जातीनें तैलंगी ब्राह्मण असून बल्लारी जिल्ह्यांतील निम्ब (सांप्रतचें निम्बापूर) गांवीं राहत असे. याच्या बापाचें नांव जगन्नाथ असून आईचें नांव सरस्वती होतें. ब्रह्मसूत्रांवर एक लहानसें भाष्य म्हणून 'वेदान्त-पारिजातसौभर' नांवाचा ग्रंथ व 'सिद्धान्तरत्न' किंवा 'दशश्लोकी' नांवाचा एक छोटासा ग्रंथ असे दोन ग्रंथ यानें लिहिले. याच्या संप्रदायाचे लोक सर्व हिंदुस्थानभर पसरलेले असून मथुरेच्या आसपासचा मुलूख व बंगाल यांमध्यें तर या लोकांची संख्या मोठी आहे. यांचीं मतें रामानुज-पंथाच्या टेंकलई पीठाच्या मतांच्या जवळ-जवळ येतात.

निंबाळकर घराणें (फलटण)—१ जगदेवराव ऊर्फ निंबराज पवार (स. १२४४–१३२७), २ निंबराज नाईक दुसरें (स. १३२७–४९), ३ वणंग भूपाळ (स. १३४९–१३७४), ४ वणंगपाळ (स. १३७४–१४००), ५ वणगोजीराव १ ला (स. १४००–३०), ६ मालोजीराव १ ला (स. १४३०–३५), ७ बाजीसाहेब (स. १४३५ ६५), ८ पोवारराव नाईक (स. १४६५–८०), ९ बाजी नाईक (स. १४८०–१५१२), १० मुधोजी नाईक १ ला (स. १५१२– १५२७), ११ बाजी धारराव (स. १५२७–६०), १२ मालोजी नाईक २ रा (स. १५६०–७०), १३ वणगोजीराव २ रा (स. १५७०–१६३०), याची बहीण दीपाबाई, हिचें लग्न मालोजी भोसल्याशीं झालें. १४ मुधोजी नाईक २ रा (स. १६३०–४४), १५ बजाजीराव (स. १६४४–७५), यास तीन अपत्यें:—१ जगदेवराव, २ साबाजी, ३ सईबाई. हिचें शिवाजीशीं लग्न झालें. १६ वणगोजी ३ रा (स. १६७६–९३), याला दोन अपत्यें:—मुधोजीराव, महादाजीराव, (यास शिवाजीनें मुलगी दिली). १७ जानोजीराव (स. १६९३–१७४८), १८ मुधोजीराव ३ रा (स. १७४८-६५), १९ बजाजी (स. १७६५–७४), २० मालोजीराव ३ रा (स. १७७४–७७), २१ सगुणाबाई (स. १७७७–९१), २२ जानराव (१७९१–१८२५), २३ साहेबजीबाई (स. १८२५–५३), २४ मुधोजीराव बापूसाहेब (स. १८६०), २५ मालोजीराव नाना-साहेब (चालू).

याशिवाय निजामशाहींतील रावरंभा निंबाळकरांचें घराणें निराळें आहे (भूम व वाशी, जि. बीड).

नील—(ख्रि. पू. ११८२) 'नीलमतपुराण' या ऐतिहासिक ग्रंथाचा कर्ता. राजतरंगिणींत आधार म्हणून याच्या ग्रंथाचा निर्देश आहे. हा काश्मिरी होता.

नीलकंठ—(स. १५८७) एक ज्योतिषी. याच्या आईचें नांव पद्मा. याचा 'तोडरानंद' म्हणून एक ग्रंथ

आहे त्याचें वर्णन इतर ग्रंथांत आलें आहे. त्या ग्रंथांतील उपलब्ध भागांतील श्लोकसंख्या १००० असून त्यांत यात्राप्रकरण मात्र आहे. अकबराचा प्रधान तोडरमल्ल यावरून हें नांव दिलें असावें असें वाटतें. तोडरमल्लानें धर्मशास्त्रावर लिहिलेला तोडरानंद हा ग्रंथ वेगळा दिसतो.

नीलकंठानें तिथिरत्नमाला, प्रश्नकौमुदी अथवा ज्योतिषकौमुदी या नांवाचा प्रश्नग्रंथ आणि दैवज्ञवल्लभा हे ज्योतिषग्रंथ केले आहेत व जैमिनीसूत्रटीका केली आहे. यानें अशा बऱ्याच टीका लिहिल्या आहेत.

२. मृच्छकटिकाच्या दहाव्या अंकाचा कर्ता.

. . (नीळकंठ चतुर्धर) यानें समग्र महाभारतावर टीका लिहिली आहे. याचें नांव नीळकंठ चतुर्धर (चौधरी) असें आहे. हा सतराव्या शतकांत होऊन गेला. हा महाराष्ट्रीय होता. यानें अनेक कोशादि ग्रंथांच्या साहाय्यानें आपली टीका लिहिली. हा पुणतांब्याचा राहणारा (कोपरगांव). हल्लीं याचे वंशज काशीस आहेत.

यानें सप्तशतीवर 'सुबोधिनी' नांवाची टीका लिहिली. त्या टीकेंत यानें आपणास चतुर्धरमिश्र असें म्हणवून घेतलें आहे. तसेंच आपल्या टीकेस भाष्य म्हटलें आहे.

४. भवभूति कवीचा बाप.

५. शंकरमंदिरसौरभ ग्रंथाचा कर्ता.

६. (लेखनकाल स. १६५६) चिमनीचरित्र या संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

७. चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एक. यानें अद्वयनाडिकाभावनाक्रम (तं. ४८।६) या नांवाचा ग्रंथ लिहिला.

नीलकंठ दिक्षित—(ग्रंथकाल स. १६३६ सुमार) भारद्वाजगोत्री नारायण दिक्षित व भूमिदेवी यांचा पुत्र. कलिविडंबन, गंगावतरण वगैरे यानें लिहिलीं आहेत. हा आपल्या बुद्धिप्रभावामुळें मदुरेच्या राजाचा प्रधान झाला. यानें नीलकंठ नांवाचा एक चंपु लिहिला असून त्यांत राजा तन्हेच्या देशांचें वर्णन आहे (स. १६३६). हा अप्पया दिक्षिताच्या भावाचा नातू होय. यानें 'नलचरित' नांवाचें संस्कृत नाटक लिहिलें असून त्याच्या प्रास्ताविक भागावरून अप्पय्या दिक्षित वगैरेंची माहिती मिळते.

नीलकंठ धर्मपूरकर—(ग्रंथकाल स. १५८७) प्रसिद्ध ज्योतिषी. याच्या पित्यानें कामधेनु टीका लिहिली. 'ताजिकनीलकंठी' हा याचा ग्रंथ. त्यांत फार्सी व अरबी शब्दांचा भरणा आहे (भा. ज्यो.).

नीलकंठभट्ट— (स. १६१०-४५ सुमार) हा नारायणभट्टाचा नातू होय. याच्या बापाचें नांव शंकरभट्ट असे होतें. भरेह येथील राजा भगवंतदेवानें याला आश्रय दिला होता. त्याच्या आश्रयास राहिल्यावर यानें 'भगवंतभास्कर' नांवाचा ग्रंथ लिहिला. हा कमलाकर भट्टाचा चुलत भाऊ होय. त्याची व याची नेहमीं स्पर्धा चाले. दोघांचीं मतें पुष्कळ ठिकाणीं विरुद्ध आहेत.

याचा 'भगवंतभास्कर' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. या ग्रंथाचे १२ विभाग केलेले आहेत. संस्कार, आचार, काल, श्राद्ध, नीति, व्यवहार, दान, उत्सर्ग, प्रतिष्ठा, प्रायश्चित्त, शुद्धि, शान्ति, असे ते विभाग होत. हे सर्व मयूख नांवानें प्रसिद्ध आहेत.

याशिवाय यानें व्यवहारतत्त्व आणि कुंडोद्द्योत असे ग्रंथ लिहिले आहेत.

याची लेखनशैली फार चांगली आहे. ह्यानें मीमांसेचा अभ्यास केला होता. याची बरोबरी करणारे संस्कृत लेखक फार थोडे होऊन गेले.

नीलकंठराव पटवर्धन—(स. १७७१ सुमार) हा कुरंदवाडच्या त्रिंबकराव आप्पाचा पुत्र. स. १७७१ मधील हैदरावरील स्वारींत हा प्रसिद्धीस आला.

नीलकंठ महादेव—(आबा पुरंदरे पाहा).

नीलकंठ मोरेश्वर पिंगळे—(मृत्यु स. १७०८जाने.) हा मोरोपंत पिंगळे पेशवे यांचा पुत्र. संभाजीनें यास कैदेंत ठेविलें होतें. संभाजीस असें वाटलें कीं, हा राजारामास गादीवर बसविण्याच्या खटपटींत आहे. मोरोपंत वारल्यावर यास सोडून पेशवा केलें. यानें राजारामास जिंजीस चांगली मदत केली.

जिंजीमुळें मराठी राज्याचा बचाव झाला, व जिंजी प्रांत राखण्याचें जबरदस्त काम यानें चांगलेंच बजावलें म्हणून राजारामानें पेशवाईपद यास दिलें. स. १७०७ च्या सुमारास शाहू व ताराबाईचा झगडा सुरू होता, तेव्हां हा ताराबाईचा प्रधान होता. शाहूनें याचा भाऊ बहिरोपंत पिंगळे यास पेशवाई दिली.

नीलकंठ येसाजी महाडकर—हा प्रभु जातीचा असून शिवाजीमहाराजांचा पारसनीस होता. हा शिवाजीबरोबर आग्रा येथें असतां शिवाजीच्या फार उपयोगी पडला. याचीं मुलें बाबाजी व गोविंदराव होत (म. रि. मध्य. ५, पा. ४३३).

नीलकंठशास्त्री विनायकभट्ट थत्ते—(स. १८१८-३१ सुमार) पेशवाईच्या अखेरच्या कालांतील प्रसिद्ध पंडित. यांचें पुणें येथें अध्ययन झाल्यावर रामशास्त्री प्रभुणे यांनीं यांची खर्चाची व्यवस्था करून यांना काशीस पाठविलें. यांनीं बाळंभट्ट पायगुंडे यांच्यापाशीं व्याकरणावरील शेखर ग्रंथाचें अध्ययन करून शेखराची

परंपरा महाराष्ट्रांत आणली. यांची परंपरा महाराष्ट्रांत आजहि गजेंद्रगडकर व अभ्यंकर या घराण्यांनी चालविली आहे (थत्ते घराण्याचा इतिहास, पा. १२२).

नीलग्रीव—(स. १७५९ पूर्वी) यानें 'वेताळ-पंचविशी' नांवाचा एक मराठी अपूर्ण ग्रंथ लिहिला. भाषा अतिशय जुनी दिसते (मं. श. १८३६ वा. इ. ले. ८७).

नीलम्मा—ही बसवाची बायको होय. हिनें लिंगायत-मताचा प्रसार करण्याकरितां बरीच खटपट केली.

नीलांबरशर्मा—(जन्म स. १८२३–मृत्यु स. १८८३) हा गंगा-गंडकी संगमापासून दोन कोसांवर पाटणा येथें राहणारा मैथिल ब्राह्मण होय. याच्या बापाचें नांव शंभुनाथ (शर्मा) असून यानें काशीच्या पाठशाळेंत अध्ययन केलें. अलवारचा राजा शिव याच्या सभेंत हा मुख्य ज्योतिषी होता. याचा वडील बंधु जीवनाथ. याचा 'गोलप्रकाश' नांवाचा पांच अध्यायांचा ग्रंथ संस्कृतांत आहे. तो शके १७९३ मध्यें काशी येथें बापूदेव यानें छापला. भास्करीय कांहीं ग्रंथांवरहि यानें टीका केल्या आहेत (भा. ज्यो.).

नुनिज फेरनाओ—(स. १३४२ सुमार) हा एक कालगणनात्मक अभ्यास करणारा पोर्तुगीज इतिहासकार. यानें विजयनगरच्या राज्याचा बराच इतिहास लिहून ठेविला आहे. याच्या मतें देवराय राजानें विजयनगर राजधानीची स्थापना केली. परंतु देवराय व होयसळ राजा बल्लाळ ३ रा हे एकच होत, असें रे. एच्. हेरास यांनीं आपलें मत दिलें आहे.

नुस्तीगीन—(स. १०५२) पंजाबचा सुभेदार. यानें मसूदचा १ ला मुलगा फर्रुखशाह यास गझनीच्या गादीवर बसविलें व जेव्हां वघरबेग दाऊदनें गझनीवर स्वारी केली, त्या वेळेस यानें त्याचा पराभव केला.

नुस्रतखान—(स. १३५० सुमार) हा गुजराथच्या सुलतानांचा मूळ पुरुष, वजीह-उल्-मुल्कचा तिसरा मुलगा.

२. (स. १२९४-१३००) अलाउद्दीन खल्जीचा एक सरदार. जेव्हां बाटग्या मोगल लोकांनीं अलाउद्दीनाचे सैन्यांत बंड केलें, त्या वेळेस यानें त्या बंडाचा मोड केला. पुढें यानें हम्मीरदेवाच्या रथंभोर किल्ल्यावर हल्ला केला असतां त्या लढाईत हा मरण पावला व याच्या सैन्याचा पराभव झाला.

नुस्रतशाह तुघ्लक—(स. १३९५-९८) हा फत्तेखान तुघ्लकाचा पुत्र.

नुस्रती—एक मुसलमान कवि. हा विजापूरच्या आदिलशाहीतील दुसऱ्या अलीच्या कारकीर्दीत कवि होता. यानें 'गुल्शने इश्क' व 'अलीनामा' असे दोन ग्रंथ लिहिले. तारीख-इ-अली या ग्रंथापेक्षां अलीनाम्यांत मोंगलांशीं झालेल्या संग्रामाचें वर्णन विस्तृत आहे.

'तारीख-इ-सिकंदरी' या याच्या काव्याचा 'बुसातिनुस्सलातीन' मध्यें निर्देश आहे, पण तें अद्यापि अनुपलब्ध आहे.

नुसुद्दीन—(मसूद खल्जीचें नामांतर).

नूरजहान—(जन्म स. १५७३–मृत्यु स. १६४५) (जहांगीर व मोहबतखान पाहा).

नूर मुहम्मद—(काव्यकाल स. १७२४) हिंदी कवि. गांव सबरहद. दिल्लीच्या मुहम्मदशाहाचा समकालीन. काव्य इंद्रावती.

नूरुद्दीन इस्मायली—(स. १२३७) काफीर पंथाचा तुर्की इसम. हा इस्मायली पंथाचा पुढारी. यानें आपल्या वक्तृत्वानें सर्व लोकांस मुसलमान धर्माविरुद्ध बिथरविलें व यानें स्वतःच्या पुढारीपणाखालीं मशिदींमधील पुष्कळ मुसलमानांची कत्तल केली.

नृवर्मा प्रतिहार—(स. १२४७ सुमार) हा विग्रहपुत्र मलयवर्म्याचा भाऊ. याचें ग्वाल्हेर राज्यांत कुरेठा येथें एक दानपत्र सांपडलें आहे. तें वि. सं. १३०४ चैत्र शु. १ चें आहे. याच्या मागें यज्वपालचे वंशज जजपेल्लवंशी परमादि राजाचा पुत्र चाहडदेव यानें प्रतिहारापासून नलगिरी (नरवर) आदि घेतलें. आतां रघुवंशी प्रतिहारांपैकीं बुंदेलखंडांतील नागौदचें राज्य, अलिपुरा, तसेंच कांहीं किरकोळ जहागिरी राहिल्या आहेत. नागौदच्या राजाची भाटाकडून मिळणारी वंशावळ पाहतां त्यांतील पहिलीं नांवें कृत्रिम घरलेलीं आहेत.

नृसिंह—(चाल्हण पंडित पाहा).

२. (जन्म स. १५८६) एक ज्योतिषी. हा गोलग्रामांतील दिवाकराचा नातू होय. याचें अध्ययन बहुतेक याच्या विष्णु आणि मल्लारि या चुलत्यांपाशीं झालें. यानें 'सौरभाष्य' नांवाची सूर्यसिद्धांतावर टीका लिहिली आहे.

सिद्धांतशिरोमणीवरहि यानें टीका लिहिली आहे. तिची ग्रंथसंख्या ५५०० आहे. ह्या दोन्ही ग्रंथांवरून हा चांगला ज्योतिषज्ञ असावा असें दिसतें. हा मोठा मीमांसक होता, असें याचा पुत्र दिवाकर यानें लिहिलें आहे (भा. ज्यो.).

३. हा कानडी कवि. 'कर्णरसायन' नामक मांधातृ-चरित्राचा कर्ता.

नृसिंहतीर्थ—ईश्वरतीर्थाचे शिष्य. यांचे शिष्य विद्यातीर्थ.

नृसिंहदेव--वीरबल्लाळ राजाचा बाप.

२. वीरबल्लाळ-पुत्र. जयपाळाचें नामान्तर.

नृसिंहदेव रायलू--(स १५०८) हा कृष्णदेवाचा पिता (अलसानी पेदन्न पाहा).

नृसिंह दैवज्ञ—भास्कराचार्यकृत गणिताध्याय व गोलाध्याय यांवरील टीकाकार.

नृसिंह पंचानन—(स. १६७५ सुमार) यानें जानकीनाथाच्या भूषा ग्रंथावर ' न्यायसिद्धांतमंजरीभूषा ' नांवाचा ग्रंथ केला. यानें गोविंदाची स्तुति केली आहे. हा गोविंद रुद्राचा पुत्र असावा.

नृसिंहसरस्वती—(समाधि श. १३८० स. १४५८) गुरुचरित्रांत ज्यांचें चरित्र वर्णिलें आहे ते हे स्वामी. अध्याय ११ ते ५१ पर्यंत यांचें चरित्र वर्णिलें आहे. यांचा जन्म करंजनगर (कारंजा–वऱ्हाड) येथें झाला. हे वाजसनेय शाखेचे होते. जन्मनाम–शालिग्राम. माता–अंबाभवानी, पिता–माधव. यांनीं बाराव्या वर्षी संन्यास घेतला व काशीक्षेत्रांत कृष्णसरस्वती यांस गुरु केलें. यांनीं सर्व भरतखंडभर तीर्थयात्रा केली असें वर्णन आहे. पुढें कृष्णाकांठीं वास्तव्य झालें. शिरोळ (औदुंबर) येथें यांनीं ब्राह्मणाचा मृत पुत्र उठवला. यापुढें यांचें वास्तव्य भीमेच्या कांठीं गाणगापूर येथें झालें. तेथेंच हे निजधामास जाईपर्यंत होते. तेथें असतां यांनीं मृत ब्राह्मण जिवंत केला व बादशहाचा स्फोट (फोड) बरा केला, असें वर्णन आहे. ब्राह्मणांचा कर्मठपणाचा आचार यांनीं टिकवण्याचा प्रयत्न केला. हे श. १३८० (स. १४५८) माघ कृ. प्रतिपदा शुक्रवारीं निजधामीं गेले. गुरुचरित्रांत बेदरच्या बादशहाच्या–हा अलाउद्दीनशाहा बाहमनी ठरतो–पायाचा फोड बरा केल्यानें यांची बेदरांत थाटानें मिरवणूक काढल्याची गोष्ट आहे. यांस मरणापूर्वी दोन वर्षांपासून कोडास फोड झाला होता, तो हकीमास बरा करितां येईना, असें वर्णन फेरिस्ता करतो. शेवटीं त्यांतच स. १४५७ मध्यें त्यांचा अंत झाला. दोघांच्या कालांत मेळ आहे, पण हिंदूंच्या धर्माला मुसलमानानें मान दिला हें फेरिस्त्यानें लिहिलें नाहीं. कदाचित् दुसऱ्या एखाद्या तवारिखेंत हें सांपडावें (मं. वार्षिक. १८३७ पा. १२३-१२४).

नृसिंहाश्रममुनि—(ग्रंथकाल स. १५००) हा शंकराचार्यांच्या वेदान्तावरील विवरणभावप्रकाशिका या ग्रंथाचा कर्ता होय.

नेकुसियर मोगल—(मृ. स. १७१९) औरंगजेबाचा नातू व अकबराचा मुलगा.

नेडूमुंडुकिल्ली चोल—(स. १८०-२००) हा चोल सम्राट् करिकालाचा पुत्र किंवा नातू असून त्याच्या मागून राजा झाला. करिकाल वारल्यानंतर चेरपांड्यांनीं चोल राज्यावर स्वारी केली, परंतु यानें त्यांचा कारियारू येथें पराभव केला. या वेळीं कांची हें चोल साम्राज्याचें उत्तर प्रांतांतील मुख्य ठिकाण होतें.

नेताजी पालकर—(स. १६३३-७६) माणकोजी दहातोंड्यांच्या मृत्यूनंतर स. १६३३ मध्यें शिवाजीनें नेताजी पालकर यास सरनोबतीची जागा दिली (प. सा. ९५४). याचें ठिकठिकाणच्या शिलेदार लोकांवर चांगलें वजन होतें. एकदां मोगलांनीं पाठलाग केल्यामुळें यास रोजीं ५० मैल मजल मारावी लागली (प. सा. ९२३).

हा सातारा जिल्ह्यांतील खंडोबाच्या पालीचा राहणारा होता. स. १६५९ मध्यें अफझुलखानाच्या लोकांवर तुटून पडून यानें त्यांची सरसहा कत्तल केली. हा शत्रूशीं गनिमी काव्यानें लढत असे. यानें दक्षिणेंतील मुसलमानी मुलुखांत बंडाळी करून पुष्कळ खंडणी वसूल केली. हा मोगलांच्या मुलुखांत यशस्वीपणें लुटालूट करून प्रत्येक पावसाळ्याच्या आरंभीं अगदीं नियमितपणें परत येत असे. एके प्रसंगीं सैन्याच्या पिछाडीचें संरक्षण करण्याच्या कामगिरीवर असतां, यानें बराच नांवलौकिक संपादिला. काफीखान म्हणतो कीं, जयसिंग दक्षिणच्या मोहिमेंत असतांना (स. १६६५-१६६७) त्यानें नेताजी पालकरास कैदेंतून औरंगझेबाकडे दिल्लीस पाठविलें (प. सा. ११२६). तेथें यास बाटविण्यांत येऊन याला मुर्शिद हा किताब देण्यांत आला व याचें नांव मुहंमद ठेविलें (१६६६ एप्रिल). परंतु पुढें हा शिवाजीकडे परत आला. नऊ वर्षें मुसलमान राहून यानें प्रायश्चित्त घेतलें, आणि पुन्हां हा हिंदुधर्मांत (प. सा. १८६३) दाखल झाला (ता. १९-६-१६७६). येसाजी कंकास या सुमारास सरनोबती मिळाली होती.

शिवाजीचे पश्चात् यानें संभाजीची नोकरी केली. हा स. १६८१ मध्यें बागलाणांत लढत असल्याचा उल्लेख सांपडतो. त्यानंतर हा वृद्ध होऊन मेला असावा. याची न्यायनिवाडे करण्याच्या बाबतींत ख्याति होती असें दिसतें (शिवाजी पा. १७२).

नेदुंजेलियन पांड्य—(स. १७३-१९१) हा पांड्य घराण्यांतील पहिला राजा होय. हा दुसऱ्या शतकांत झाला. त्यामुळें तो नेडुमुंडूकिल्ली चोल (करिकाल चोलाचा नातू) राज व चेंकुत्तुवन चेरराज, आणि सिंहलद्वीपचा पहिला

गजबाहु यांचा समकालीन होता. गजबाहु याचा काल स. १७३–१९१ बहुतेक ठरला आहे.

२. (स. २००) हा पांड्य घराण्यांतील वेरि-वेरशेलियन याचा मुलगा होय. स. २०० मध्यें हा आपल्या बापानंतर गादीवर आला.

याच्या कारकीर्दीच्या सुरवातीसच, परंपरेनुसार, किल्लि-वलवन यानें याच्या राज्यावर स्वारी केली. यानें चेर व चोल यांच्याविरुद्ध हल्ला चढवून त्यांची आलंगानम् येथें धुळधाण उडविली. याच्यानंतर उग्र-पेरू-वलुडि हा गादीवर आला (B.).

नेमाजी शिंदे—(स. १६९०–१७१०) एक मराठा सरदार. संभाजीला कंटाळून हा औरंगजेबास जाऊन मिळाला होता. पुढें जिंजीस राजाराम असतांना हा राजारामास परत येऊन मिळाला (स. १६९०). महाराष्ट्रांत औरंगजेबाच्या फौजांचा पराभव करण्याकडे जी मंडळी गुंतली होती, तींत हा एक प्रमुख होता. मोहिमेवरून परत येतांना प्रत्येक प्रांतांत आपल्या एकेक सरदाराची नेमणूक (खंडणी वसुली व बंदोबस्तासाठीं) राजारामानें केली. त्यांत नेमाजीकडे खानदेश आला होता. पुढें शाहूची सुटका होईपर्यंत हा बहुधा खानदेशांतच सुभेदार असावा.

शाहू दक्षिणेंत आला त्या वेळीं त्याला पहिल्यानें मिळालेल्या मंडळींत हाहि होता (स. १७०७). पुढील सालीं बहादुरशहानें कामबक्षावरील स्वारींत शाहूची मदत मागितली असतां त्यानें यासच पाठविलें. नेमाजीनें हैद्राबादनजीक लढाई करून कामबक्षाचा शेवट केला (स. १७०८). हुसेन अली दख्खनचा सुभेदार होण्यास आला असतां बऱ्हाणपुरास दाऊदखान पन्नीची व हुसेनची लढाई झाली. त्या वेळीं नेमाजी हा जवळच राहून लढाईचा परिणाम पाहत होता. कारण बादशहानें व हुसेननें दोघांनींहि मराठ्यांकडे मदतीचा संदर्भ लावून ठेविला होता व शाहूनें त्यासाठींच नेमाजीची नमणूक खानदेशांत केली होती (राजारामाची बखर).

नेमिचंद्र कवि—(स. ११५० सुमार) न्यायशास्त्रज्ञ. हा जैन असून याचा जन्म गुजराथेंत झाला. हा वैरस्वामीचा शिष्य व सागरचंद्राचा गुरु. सागरचंद्राचा दुसरा शिष्य माणिक्यचंद्र.

२. (स. ११७०) कानडी भाषेंतील आद्य कादंबरीकार. यानें लीलावती कादंबरी चंपूपद्धतीनें लिहिली. यानें नेमिनाथपुराण लिहिलें.

नेमिदत्त—या ब्रह्मचारी गृहस्थानें 'आराधनाकथाकोष' नांवाचा ग्रंथ केलेला आहे. तो ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाचा आहे. हा ऐतिहासिक ग्रंथ जैनधर्मीयांचा असून संस्कृत भाषेंत आहे.

नेवाज—(ग्रंथकाल स. १६७९) एक हिंदी कवि. जात ब्राह्मण. अंतर्वेदीचा राहणारा. हा अजमशाहाच्या पदरीं होता. यानें गद्यपद्यमय शाकुंतल नाटक लिहिलें. हा शृंगारी कवि होता.

२. हा हिंदी कवि बिलग्रामचा जुलाह होता. हा शाकुंतल नाटकाचा कर्ता जो नेवाज त्याच्याहून भिन्न होय.

३. हा हिंदी कवि गाजीपूरच्या भगवंतराय खीची याच्या पदरीं होता.

नोघन किंवा नयघनी—(स. ११०० सुमार) हा सुराष्ट्राचा अहीर राजा. राजधानी जुनागड. यास सिद्धराजानें मारलें असें प्रबंधचिंतामणींत म्हटलें आहे.

नोबिली रॉबर्ट—(ज. स. १५७७) जेसुईट मिशनरी. यानें उच्चवर्णीय हिंदूंची राहणी स्वीकारून त्यांना बाटविण्याचा प्रयत्न केला.

नोहलादेवी—केयूरवर्ष कलचुरीची पत्नी. हिनें नोहलेश्वर नांवाचें देऊळ बांधलें. त्यावरील लेखावरून बौद्ध भिक्षूप्रमाणें लकुलीश मताचे संन्यासीहि देवळांतून राहत, असें दिसतें (म. यु. भा. २, २२४).

न्यार्कस—(ख्रि. पू. ३२७) सिकंदरचा एक सेनापति. सिकंदर हिंदुस्थानांतून परत जात असतां त्यानें आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एका भागावर याला मुख्य नेमून जलमार्गानें याला इराणकडे रवाना केलें.

न्यायव्यास ब्राईदेकर—(ग्रंथकाल स. १३५३) एक महानुभाव. हे उपाध्य आम्नायांतील होत. श्रीचक्रधरांपासून यांची सहावी पिढी येते. जनोपाध्ये यांची प्रसिद्ध शिष्यीण आणि उपाध्य आम्नायप्रवर्तक कमळाउसेचा हा शिष्य होय. यांनीं शके १२७५ च्या सुमारास लीलाचरित्र या ग्रंथावर हेतुस्थळ या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्यें श्रीचक्रधरांनीं निरनिराळीं सूत्रें कोणत्या प्रसंगीं व काय हेतूनें सांगितलीं याचें विवरण आहे, म्हणून या ग्रंथास हेतुस्थळ म्हणतात. हा ग्रंथ गद्यांत आहे. याच्या नांवावर अनेक संस्कृत व मराठी ग्रंथ आहेत. त्यांत स्मृतिवृद्धाचार, लीलाप्रयुक्ति, सिद्धांतस्थळ इत्यादि प्रमुख आहेत. यानें वऱ्हाडलिपी आणि सुंदरीलिपी या दोन लिपी तयार करून प्रचारांत आणल्या. सगळलिपीच्या खालोखाल सुंदरीलिपीमध्यें लिहिलेले बरेच ग्रंथ आढळतात (म. वा. इ. २. ७३१),

प

पटु—मंख कवीच्या काव्याचा परीक्षक काश्मीरी पंडित.

पडिहार—राजपुतान्यांत प्रतिहाराबद्दल पडिहार असा शब्द उच्चारितात.

पजनेस—(जन्म स. १८१४) एक हिंदी कवि. 'पजनेसप्रकाश' नांवाचा एक याचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे (क. कौ. भा. १).

पडदुल्लाखान—(स. १७१८) हा एक मोगलांकडचा अंमलदार होता. स. १७१७ त यानें कऱ्हाड येथें थोराताचा बंडावा चालू असतांना, मोगलांची बाजू चांगलीच संभाळली. स. १७१८ त तह झाल्यावरसुद्धां हा निघून जात नव्हता. शेवटीं शाहूनें बाळाजीस घेऊन कऱ्हाडवर स्वारी केली, आणि कऱ्हाड व इसलामपूर काबीज करून यास घालवून दिलें.

पद्मगुप्त (परिमल)—हा माळव्याच्या मुंज परमाराच्या दरबारीं कवि होता. यानें 'नवसाहसांकचरित्र' नांवाचें काव्य संस्कृतांत लिहिलें. याला परिमल कालिदास असेंहि म्हणत. धनिक व मम्मट यांनीं याचे उतारे घेतले आहेत.

पद्माकर—(जन्म स. १७५२–मृ. स. १८३२) एक हिंदी कवि. पिता–मोहनलालभट्ट. तेलंगी ब्राह्मण. हा जयपूरच्या जगत्सिंगाच्या पदरीं होता. याचे ग्रंथ–जगद्विनोद, गंगालहरी, हिम्मतबहादरबिरदावली, पद्माभरण, आलिजाप्रकाश, भाषाहितोपदेश, प्रबोधपचासा, रामरसायन (क. कौ. भा. १).

पद्मणांक—(स. १३८५) कानडी कवि. हा केरेय पद्मरसाचा वंशज होता. याचा ग्रंथ पद्मराजपुराण.

पद्मनाभ—(स. १३९८) नार्मदाचा पुत्र. याचा ग्रंथ यंत्ररत्नावली. या ग्रंथाचा दुसरा अध्याय ध्रुवभ्रमयंत्र म्हणून प्रसिद्ध आहे. यावर याचीच टीका आहे.

२. काश्मीराकडील कवि. भुवनेश्वरी स्तोत्राचा कर्ता.

३. कबीराचा शिष्य. हा रामभक्त होता. यानें नामस्मरणबलानें कित्येक लोकांच्या व्याधि दूर केल्याच्या गोष्टी भक्तविजयाच्या चोविसाव्या अध्यायांत आहेत. हा काशींत राहत असे.

पद्मपादाचार्य—यानें पञ्चपादिका नांवाचा शंकराचार्यांच्या मताला पुष्टि देणारा ग्रंथ केला (शा. श. ८५०). ही टीका फक्त चतुःसूत्रीपुरतीच आहे. हा शंकराचार्याचा एक प्रमुख शिष्य. यानें शंकराचार्यांना अनेक प्रसंगांतून वांचविलें. याचे इतर ग्रंथ—आत्मानात्मविवेक, प्रपंचसार.

पद्मप्रभु—(तीर्थंकर पाहा).

पद्मसिंह गुहिलोत—(राज्यकाल स. १२११–१३) मेवाडच्या गादीवर हा मथनसिंहानंतर आला. यानें टांटेड जातीच्या उद्धरणाच्या आठ पुत्रांपैकीं वडील मुलगा योगराजाला नागद्याची तलारता (कोतवाली) दिली. याच्यानंतर याचा पुत्र जैत्रसिंह मेवाडचा राजा झाला.

पद्मावती—बुद्धाची माता.

२. गीतगोविंदकर्त्या जयदेवाची पत्नी.

३. बिज्जल कलचुरीची पत्नी.

४. लिंगायतधर्मसंस्थापक बसवाची पत्नी.

पद्माकर गुप्त—(स. ९४० सुमार) हा बुद्धतर्कज्ञ भट्टीपालाच्या वेळीं होऊन गेला. ह्याचे ग्रंथ—धर्मकीर्तीच्या 'प्रमाणवार्तिका' वरील 'प्रमाणवार्तिकालंकार' नांवाची टीका व सहावलंब–निश्चय (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पानें ३३६–३३७).

पद्माक्षी—(भर्तृहरि पाहा).

पद्मिनी—(स. १३०३) मलिक मुहंमद जायसीनें पद्मावत नांवाचें अत्यंत सुंदर काव्य अवधी हिंदींत लिहिलें आहे. त्याला आधार म्हणून घेतलेलें कथानक ऐतिहासिक असलें तरी कवीनें त्यावर आपल्या कविकल्पनांचाहि पूर्ण अंमल बसविला आहे. त्यामुळें त्यांतील नेमका ऐतिहासिक भाग वेगळा काढणें कठीण झालें आहे. पद्मावत काव्याचें कथानक पुढीलप्रमाणें आहे. सिंहलद्वीपांत गंधर्वसेन नांवाचा राजा होता. त्याला आपल्या चंपावती नांवाच्या पट्टराणीपासून पद्मावती (पद्मिनी) नांवाची अत्यंत रूपवती कन्या झाली. तिच्यापाशीं हीरामन नांवाचा चतुर पोपट होता. तो पिंजऱ्यांतून सुटला व एका शिकाऱ्याच्या हातांत सांपडला. त्यानें एका ब्राह्मणाला विकला व ब्राह्मणानें एक लाख रुपयाला मेवाडचा राजा रत्नसिंह याला विकला. रत्नसिंहाची राणी नागमती हिनें एक दिवस शृंगार केला आणि 'माझ्यापेक्षां सुंदर कोणी जगामध्यें आहे ?' असा पोपटाला प्रश्न केला. तेव्हां पोपट म्हणाला, 'हंस नसले म्हणजे बगळे आपणच हंस

आहों असें मानतात.' रत्नसिंहाला या पोपटाच्या तोंडानें पद्मिनीच्या रूपगुणाची माहिती मिळाली. तेव्हां योग्याचें रूप घेऊन रत्नसिंह या पोपटाबरोबर सिंहलद्वीपाला गेला. तेथें गेल्यावर पोपटानें तिच्या कानावर रत्नसिंहाचे रूपगुण घालून 'हाच पति तुला योग्य आहे' असें सांगितलें. प्रसंगानें मंदिरांत दृष्टिभेट होतांच दोघांचें प्रेम बसलें व गंधर्वसेनानेंहि सर्व समजून उभयतांचा विवाह करून दिला. असे कांहीं दिवस तेथेंच गेल्यावर विरही नागमतीनें पक्षिद्वारां संदेश पाठविला. रत्नसिंहहि तुफान वगैरे आपत्तींतून मेवाडला सुरक्षित परत आला. राघवचेतन नांवाच्या ब्राह्मणानें दिल्ली येथें अलाउद्दीनपुढें पद्मिनीच्या रूपाची तारीफ केली. तेव्हां तो चितोडवर चालून आला. त्यांत गोरा, बादल वगैरे सामंतांसह रत्नसिंह मारला गेला व पद्मिनी सती गेली. गोरा व बादल या दोन व्यक्ती पद्मिनीचे चुलता व पुतण्या होते, असें ख्यातावरून कर्नल टॉड वगैरे म्हणतात. पण या दोन व्यक्ती नसून एकाच व्यक्तीचें हें नांव आहे, असें ओझाजी मानतात. सिंहलद्वीपाशीं जायसीनें चुकीनें संबंध जोडला आहे. वास्तविक ही चितोडच्या पूर्वेस सिंहोली नांवाचें गांव आहे तेथील राजाची मुलगी पद्मिनी असण्याचा फार संभव आहे, असेंहि ते म्हणतात. नागरीप्रचारिणी सभेनें प्रसिद्ध केलेल्या जायसी ग्रंथावलीच्या प्रस्तावनेंत पंडित रामचंद्र शुक्लानेंहि असेंच लिहिलें आहे. रत्नसिंहाची कारकीर्द एक वर्षाची आहे, त्यांत सहा महिने युद्धांत गेले, हें सर्व लक्षांत घेतां सिंहलद्वीपाशीं संबंध बरोबर दिसत नाहीं.

हिच्या अभिलाषानें दिल्लीचा सुलतान अलाउद्दीन यानें चितोडवर स्वारी केली, पण अलाउद्दीनास हिची प्राप्ति झाली नाहीं. शेवटीं अलाउद्दीनानें हिचें प्रतिबिंब आरशांत पाहण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें करून अलाउद्दीन वेढा उठवून परत गेला. परंतु पुन्हां त्यानें दुसरे वर्षी चितोडवर स्वारी केली त्या वेळीं पद्मिनी सती गेली.

पनहपा—ह्यालाच उपानहपा असें म्हणतात. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एक. जात-चमार. यानें चर्यादृष्ट अनुत्पन्नतत्त्वभावना (तं. ४८।९३) हा ग्रंथ केला.

पन्ना दाई—महाराणा सांगा याचा पुत्र उदयसिंह याला हिनें आपला पुत्र बळि देऊन वांचविलें. सांगाचा पुत्र पृथ्वीराज, याला रखेलीपासून वणवीर नांवाचा पुत्र झाला. त्यानें राज्य मिळविण्याकरितां विक्रमादित्यास ठार केलें, हें कळतांच त्याचा धाकटा भाऊ उदयसिंह यास हिनें महालाबाहेर घालविलें आणि आपला मुलगा उदयसिंगाच्या पलंगावर निजविला. वणवीरानें येऊन विचारतांच हिनें पलंगावर उदयसिंग असल्याचें दर्शविलें. त्यानें तात्काळ त्यावर तलवार चालविली. पन्ना उदयसिंहाला घेऊन सुरक्षित स्थलीं निघून गेली (२ उदयसिंह पाहा).

परकेसरीवर्मन् मधुरान्तक उत्तम—(स.९६९-८५) हा दुसऱ्या आदित्य चोलाचा चुलत चुलता होय.

परगद बेट—हा त्रिभुवनमल्लाचा पुत्र. बेटानें यास आपला प्रधान केलें. हा पुढें प्रोलाच्या सुद्धां कारकीर्दीत होता.

परगस—हा लखनौचा राहणारा असून नृत्य व भाव यांत वाकबगार होता.

परबल राष्ट्रकूट—(स. ८६१) हा कर्कराष्ट्रकूटाचा मुलगा होय. स. ८६१ मध्यें हा मध्य हिंदुस्थानांत राज्य करीत होता. याची मुलगी रण्णा-देवी ही बंगालच्या धर्मपाल राजास दिली होती (B.).

परमगुप्त—नेपाळच्या गोपाळ घराण्यांतील जयगुप्ताचा मुलगा.

परमर्दि कलचुरी—(स. ११२८ सुमार) हा जोगम कलचुरीचा पुत्र. हा तर्दवाडी प्रांताचा राजा. हा तिसऱ्या सोमेश्वर चालुक्याचा मांडलिक होता.

परमर्दि कदंब—(स. ११४७-८२) याला शिवचित्त असें म्हणत. हा गोव्याच्या जयकेशिन् कदंबाचा पुत्र. कलचुरीचा मांडलिक चंडुगिदेवानें याच्यावर हल्ला केला असावा असें दिसतें. याची पत्नी कामदेवाची मुलगी कमलालया.

परमर्दि चंदेल्ल—(स. ११६७-१२०३) याच्या वेळीं पृथ्वीराज चौहाणानें चंदेल्लांचा पराभव केला व महोबा घेतलें. कुतुबुद्दीननें याजवर स्वारी करून कालंजरला वेढा दिला तेव्हां यानें तह केला, पण खंडणी देण्यापूर्वीच हा मेला. तेव्हां प्रधानानें कालंजर कुतुबुद्दीनच्या ताब्यांत दिला. याच्यानंतर स. १२०३ मध्यें चंदेल्लघराणें बहुतेक संपलें. याला मुसलमान लेखक परमार म्हणतात.

या नांवाचे दोन राजे होते. एक कुन्तल देशचा आणि दुसरा बुंदेलखंडच्या चंदेल्लांपैकीं होता. पृथ्वीराज चौहाणानें परमर्दि चंदेल्लाचा पराभव केला होता (वि. सं. १२३९-स. ११८२). प्रबंधचिंतामणिकारानें हे दोघे एकच मानले आहेत तें चूक आहे.

परमर्दि (पेर्माडि, पेर्मादि किंवा पर्माडि) हें नांव किंवा उपनाम धारण करणारे दक्षिणेंत बरेच राजे होऊन गेले. परंतु सिद्धराज जयसिंहाचा समकालीन कुन्तल देशचा परमर्दि राजा म्हणजे कल्याणचा सहावा राजा

विक्रमादित्य सोलंकी असला पाहिजे. जिनमंडनोपाध्याय-याच्या कुमारपालप्रबंधांत जयसिंहानें योगिनींच्या समोर जी तलवार चावली होती ती कल्याण कटकच्या म्हणजे कल्याणच्या पेर्माडि (परमर्दि) कडून आल्याचें लिहिलें आहे (नागरीप्रचारिणीपत्रिका ६·३ सोलंकी राजा जयसिंह सिद्धराज या लेखांतील टीपांवरून पा. ३०१).

परमस्वामी (नृसिंह)—(मृत्यु स. १११७) चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एक सिद्ध. याला भारतीय सिद्ध पंडित असें म्हणत. हा स. १०९१ मध्यें भूतान, स. ११०० मध्यें चीन व स. १११२ मध्यें पुनः भूतानमध्यें परत आला. भूतानमध्यें याला फा-दम्-पा (=सत्पिता) असें म्हणत. याचा देहान्त स. १११७ मध्यें झाला. याचे दोहाचित्तगुह्य (तं. ४८।७३), महामुद्रारत्नाभिगीत्युपदेश (तं. ४८।१०५), वज्रडाकिनीगीति (तं. ४८।१०), सकलसिद्धवज्रगीति (तं. ४८।११३) इतके ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

परमानडी गंग—(स. १०७५ सुमार) हा या घराण्यांतील राचमल्ल याचे मागून गादीवर आल्याचा उल्लेख आहे. याचा उल्लेख १०२१ च्या बेलूरच्या शिलालेखांत आलेला आहे. पण त्यामध्यें याच्या कारकीर्दीविषयीं माहिती आलेली नाहीं. हा पश्चिम चालुक्य दुसऱ्या सोमेश्वराचा मांडलिक होता, व वनवासी, सातळीग व मणदळी या प्रांतांवर राज्य करीत होता.

परमानंद गोविंद निधिवासकर (नेवासकर)—(ग्रंथकाल स. १६६१ नंतर) संस्कृत कवि. यानें शिवभारत नांवाचा ग्रंथ संस्कृतमध्यें केला आहे. तो शिवाजीच्या समकालीन असून त्यावरून शिवाजीच्या चरित्रावर बराच प्रकाश पडतो. त्याचें भाषांतर प्रथम पारसनीस यांनीं केलें; पण तें छापून झालें नव्हतें. पुढें दिवेकर यांनीं भाषांतर करवून छापून प्रसिद्ध केलें.

परमानंद चक्रवर्ति—(स. १४०० सुमार) परमानंद चक्रवर्ति भट्टाचार्य हा बंगाल्यांत राहणारा असून यानें मम्मटाच्या काव्यप्रकाशावर ' विस्तारिका ' नामक टीका लिहिली आहे. या टीकेंत सुबुद्धिमित्र, दीपिकाकर्ता जयंतभट्ट, दर्पणकर्ता विश्वनाथ यांचीं नांवें आढळतात. प्रतापरुद्र ग्रंथाचा कर्ता वैद्यनाथ याचेंहि नांव टीकेंत आढळतें. हा नैयायिक होता.

परमानंददास—(स. १५४८ सुमार) एक हिंदी कवि. कान्यकुब्ज ब्राह्मण. ग्रंथ–ध्रुवचरित, दाललीला. वल्लभाचार्याच्या अष्टछापमंडळांतील अत्यंत लोकप्रिय कवि.

परमानंददास कवि कर्णपूर—(लेखनकाल स. १५४३) हा वैद्य शिवानंदसेनाचा पुत्र असून ह्यानें 'चैतन्यचंद्रोदय' हें प्रख्यात अन्योक्तिरूप नाटक लिहिलें. हा चैतन्याचा शिष्य होता. ह्याच्या नाटकाचा प्रयोग ओरिसा प्रांताचा राजा प्रतापरुद्र (स. १४९६–१५३९) ह्याच्या आज्ञेनें करण्यांत आला.

परमार्थ—एक बौद्ध भिक्षु. ज्या वेळीं चीनच्या एका बौद्धधर्मी राजानें एक धार्मिक मंडळ महायान पंथाच्या ग्रंथप्राप्तीसाठीं हिंदुस्थानांत पाठविलें होतें त्या वेळीं गुप्त राजानें या परमार्थास चीनमध्यें पाठविलें.

परमारघराणें (आबू)—१ सिंधुराज (धूमराजाचा वंशज), २ उत्पलराज, ३ आरण्यराज, ४ कृष्णराज, ५ धरणीवराह, ६ महीपाल (देवराज, स. ९९९), ७ धंधुक, ८ पूर्णपाल (स. १०४२–१०४५), ९ कृष्णराज दुसरा (स. १०६०–१०६६), १० ध्रुवभट, ११ रामदेव, १२ विक्रमसिंह (स. ११४४), १३ यशोधवल (स. ११४५), १४ धारावर्ष (स. ११६३–१९; याचा भाऊ प्रल्हादन), १५ सोमसिंह (स. १२३०–३६), १६ कृष्णराज तिसरा, १७ प्रतापसिंह (स. १२८७), १८ विक्रमसिंह (स. १२९९).

२. (माळवा आणि बागड) १ कृष्णराज (उपेंद्र), २ वैरिसिंह, ३ सीयक, ४ वाक्पतिराज, ५ वैरिसिंह (दुसरा), ६ श्रीहर्ष (सीयक दुसरा; स. ९४२–७२), ७ मुंज (स. ९७४–९३), ८ नवसाहसांक, ९ भोज (स. १०१९–४२), १० जयसिंह (स. १०५५–५९), ११ उदयादित्य (स. १०५९–८६), १२ लक्ष्मदेव, १३ नरवर्मा (स. ११०४–३३), १४ यशोवर्मा (स. ११३४–३५), १५ जयवर्मा, १६ अजयवर्मा, १७ विंध्यवर्मा, १८ सुभटवर्मा, १९ अर्जुनवर्मा (स. १२१०–१५), २० देवपाल, २१ जयतुमिदेव जैत्रमल्ल, २२ जयवर्मा (दुसरा; स. १२५७–६०), २३ जयसिंह (तिसरा; स. १२६९), २४ अर्जुनवर्मा (दुसरा), २५ भोज (दुसरा), २६ जयसिंह (चौथा; स. १३०९).

परमेश्वरवर्मन् पल्लव—(स. ६७०–९०) याला नंदीवर्मन् असेंहि म्हणतात. याचें राज्य तामील देशावर होतें. हा दुसऱ्या महेंद्रवर्मन् पल्लवाचा मुलगा. यानें विक्रमादित्य पश्चिम चालुक्याचा पराभव केला.

२. (स. ७१५–१७) याच्यानंतर पल्लवाच्या दुसऱ्या शाखेकडे राज्य गेलें. हा दुसऱ्या नरसिंहवर्मन् पल्लवाचा मुलगा. याचें राज्य पल्लवांपैकीं दुसऱ्या शाखेतील नंदवर्मनूनें घेतलें.

परम्मदेव सिंहराज यादव—(स.१०६९-११०० सुमार) हा यादव घराण्यांतील एक राजा. हा दुसऱ्या सेउणचंद्रानंतर गादीवर आला.

परशुराम—(स. १८१८ सुमार) हा महाराष्ट्रीय शाहीर. हा जातीचा शिंपी; नाशिक जिल्ह्यापैकीं सिन्नर तालुक्यांतील बावीचा राहणारा. याच्या कवनावर जुन्या कवींची छाप दिसते. पौराणिक आख्यानें, मल्हारराव होळकर, खंडेराव होळकर, गायकवाड वगैरे ऐतिहासिक व्यक्तींवर व मुंबईकर इंग्रजांवरहि एक याच्या लावण्या व पोवाडे आहेत. याशिवाय याच्या शृंगारिक व बैठकींच्याहि लावण्या आहेत. याचा स्वतःचा तमाशा असे. तो घेऊन हा हिंडे व त्यांत स्वकृत कवनेंच म्हणे. पैशाची यानें फारशी पर्वा केली नाहीं. एकदां कोपरगांवीं रावबाजींचा मुक्काम असतां, त्रिंबकजी डेंगळ्यानें याची हजिरी श्रीमंतांपुढें लाविली. तेव्हां त्यांनीं खूष होऊन यास इनाम देण्याचें ठरविलें, परंतु ' माझ्या सुईदोऱ्याला हयाती असो ' असें म्हणून यानें तें घेण्याचें नाकारलें. बाबा देवपूरकर हा याचा मोक्षगुरु होता. त्याच्यापुढें मात्र हा लावणी म्हणत नसे. ' उदईक आम्हीं मरणार तरी आमच्यापुढें (नाच्या) पोऱ्यावर साज घालून चालावें ' असें यानें सांगितलें. त्याप्रमाणें हा दुसऱ्या दिवशीं मेल्यावर याची ही इच्छा तृप्त करण्यांत आली (महा. सारस्वत).

परशुराम त्रिंबक पंतप्रतिनिधि—(जन्म स. १६६०–मृत्यु स. १७१८) हा सातारा जिल्ह्यांतील वर्धनगडाखालील किन्हई गांवचा कुलकर्णी होय. हा त्र्यंबकपंत व स्त्री लक्ष्मीबाई यांच्या पोटीं स. १६६० मध्यें जन्मला. हा औंध संस्थानचा मूळ संस्थापक होय.

यानें वयाच्या १४ वे वर्षी कुलकर्ण सोडून विशाळगडीं जाऊन निळो सोनदेव अमात्य यांच्या पदरीं नोकरी पत्करली. पुढें राजाराम महाराज जेव्हां जिंजीकडे गेले तेव्हां पंतांना अमात्यांच्या पदरीं सरदारी देऊन ठेविलें (स. १६९०). जिंजीस असतांना महाराजांनीं पंतांना " समशेरबहादरजंग " पदवी दिली. मोंगलांशीं तोंड देण्यासाठीं यांचीहि योजना झाली होती. यानें पन्हाळा मोठ्या शर्थीनें मोंगलांपासून घेतला (स. १६९२) आणि मिरज ते रांगण्यापर्यंतचा सारा मुलूख सोडविला. हा जसा शूर तसा भगवद्भक्तहि होता. हा संस्कृतव्युत्पन्न असून कीर्तन करी व स्वतः काव्यहि करी. राजाराम महाराजांनीं यास प्रतिनिधिपद तात्पुरतें (स.१६९९ त) दिलें. मध्यंतरीं पंतांचें प्रतिनिधिपद काढून तिमाजीपंत हणमंते यास तें देऊन पंतांना पेशव्याचें पद दिलें. नंतर शाहूमहाराजांनीं पंतांस प्रतिनिधिपद " एकनिष्ठपणाची सीमा केली, महत्कार्य करून राज्यरक्षण केलें, म्हणून वंशपरंपरेनें वतनी करून दिले. " ताराबाईनें शाहूच्या विरुद्ध राजनिष्ठ राहण्याबद्दल ज्यांच्याकडून शपथा घेतल्या होत्या त्यांपैकीं हा होय. शेवटीं त्याकरितां यास तुरुंगवासहि पत्करावा लागला.

पण खटावकरांच्यावर केलेल्या स्वारींत याचा दुसरा मुलगा श्रीपाद यानें चांगली तरवार गाजविल्यानें महाराजांनीं पंताला कैदेंतून सोडवून वंशपरंपरेनें प्रतिनिधिपद पुनः दिलें (स.१७१४). यापुढें पंतांवर महाराजांची मर्जी सतत बसली व पंतांनींहि राज्याची सेवा इमानानें केली, त्यामुळें महाराजांनीं याला वेळोवेळीं इनामें दिलीं.

यांचा मृत्यु सातारा येथें शके १६४० मध्यें झाला. यांचें व यांच्या पत्नीचें वृंदावन संगममाहुलीस आहे. यांना पांच मुलगे व दोन मुली होत्या.

परशुराम त्रिंबक प्रतिनिधि यांचे चिरंजीवांनीं कोल्हापुरकरांचा पक्ष घेतल्यामुळें प्रतिनिधींवर शाहूमहाराजांची इतराजी झाली. शाहूच्या हुकुमावरून त्यास ठार करणार इतक्यांत खंडोबल्लाळ चिटणीस तेथें आले, व त्यांनीं खटपट करून प्रतिनिधींचा जीव वांचविला. या वेळेपासून प्रतिनिधींच्या घराण्यांत श्राद्ध होई त्या वेळीं इतर ब्राह्मणांबरोबर खंडोबल्लाळ चिटणीसाच्या घराण्यांतील एका प्रसिद्ध मनुष्यास आमंत्रण होत असे. ही गोष्ट मल्हार रामराव चिटणीसकृत शाहूचरित्राच्या प्रकाशकांनीं टीपेंत दिली आहे. ही चाल औंध येथें प्रतिनिधीकडे अद्यापि चालू आहे असें कळतें.

परशुराम भवानराव ऊर्फ थोटे पंत—(जन्म स. १७७७–मृत्यु स. १८४८) औंधचे श्रीनिवास ऊर्फ भवानराव यांना हा काशीबाईपासून झालेला मुलगा.

हा अल्पवयी असल्यामुळें नाना फडणिसानें याचा कारभारी म्हणून कृष्णराव सातारकर यास नेमिलें. हा खर्ड्याच्या लढाईंत होता. यानें रामोशी चाकरीस ठेवून मुलुखांत दंगाधोपा आरंभला. मादक पदार्थांचें व्यसन याला जडलें असून हा माणसांच्या कानांत व नाकांत दारू घालून त्यांचा छळ करीत असे. तमासगिरांचा याला छंद लागला. " रमा (ताई) तेलीण " म्हणून यानें एक नाटकशाळा बाळगली होती. ती फार शूर होती. पुढें पेशव्यांनीं बापू गोखले यास याच्यावर पाठवून याला कैद

केलें (स. १८०७). पुढें स. १८१२ मध्यें याला कैदमुक्त करून २ लक्षांची जहागीर दिली. परंतु याची वृत्ति पालटली नाहीं. पेशवाई गेल्यानंतर पंतांना सातारकर छत्रपतींच्या निसबतीस नेमून दिलें. तेव्हां मात्र याची वृत्ति स्थिर झाली. अखेर हा स. १८४८ त वारला. याला औरस संतति नसल्यानें भाऊबंदांपैकीं एक मुलगा दत्तक घेऊन त्याला गादीवर बसविलें व शेवटचे छत्रपति शहाजी राजे यांनीं त्याला पदाचीं वस्त्रें दिलीं.

याची रक्षा ताई तेलीण फार धाडसी व शूर होती. बापू गोखल्यानें याचें बंड शांत करून पुण्याकडे पाठ फिरविली नाहीं तोंच ताई तेलणीनें फौज जमवून वासोटा किल्ला घेतला आणि काशीताईच्या मदतीनें मसूरच्या गढींत अडकून पडलेल्या याला सोडविलें. याचें म्हणणें असें कीं, 'आम्हीं छत्रपतींचे नोकर आहोंत. बाजीरावाची आज्ञा आम्हीं मानणार नाहीं. छत्रपतीस सुद्धां बाजीराव अन्यायानें वागवीत आहेत. सबब त्यासच गाडून टाकलें पाहिजे.' असा पुकारा करून वारणा आणि निरा नद्यांच्या दरम्यान पंतानें उपद्रव आरंभला. याच्या या विचारसरणीमुळें व कर्तबगारीमुळें त्या बाजूचे पुष्कळ साहसी लोक याचे साह्यकारी झाले.

अशा स्थितींत बापू गोखल्याला बाजीरावानें याच्यावर पुन्हां रवाना केलें. तेव्हां वसंतगडाखालीं या साहसी गृहस्थानें बापू गोखल्यावर उघड हल्ला चढविला. कोणेगांवच्या रानांत ता. २७-३-१८०६ रोजीं उभयतांची लढाई होऊन चौदा जखमा झाल्या, आणि याचा उजवा हात तुटून यास गोखल्यानें पकडून नेलें. त्या वेळेपासून यास 'थोटे पंत' असें नांव पडलें. याला लक्ष्मीबाई व रमाबाई या नांवांच्या दोन बायका होत्या (म. रि. उ. ३, पा. ३६१-६४).

परशुरामभाऊ पटवर्धन—(जन्म स. १७३९–मृत्यु स. १७९९) हा सवाई माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दीतील मराठी सेनापति होता. याचें मूळचें गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील कोतवडें. मूळ पुरुष हरभट. हे घाटावर आल्यावर इचलकरंजीकरांचे उपाध्याय बनले. हरभटांचा सहावा पुत्र रामचंद्रपंत व त्याचे पुत्र परशुरामभाऊ होत. रामचंद्रपंत हे पुण्यास पेशव्यांजवळ असत. पुढें त्यांना वसई किल्ल्याची फडणविशी मिळाली, व स. १७४३ मध्यें भागीरथीकांठीं शिवपुरास ते वारले. परशुरामभाऊंचा जन्म स. १७३९ मध्यें झाला. बाप वारल्यानंतर मग भाऊंची मुंज झाली. बापाचें पथक भाऊकडे आलें. सावनूर (स. १७५५–५६)च्या मोहिमेंत भाऊ प्रथम लढाईवर गेले. मुख्य सरदारी गोपाळराव पटवर्धन करीत असत. मरणापूर्वी त्यांनी भाऊस 'माझें नांव तूंच रक्षण कर' असें सांगितलें होतें. थोड्याच दिवसांनीं गोपाळराव पटवर्धन वारले. त्यानंतर भाऊंस सरकारचाकरी करण्यासाठीं नेहमीं पुण्यास राहावें लागे व मोहिमेवर जावें लागे. हैदरावरील एका स्वारींत भाऊंची एकामागून एक तीन घोडीं मेलीं, तरीहि भाऊंनीं शौर्य गाजवून हैदराचा पराभव केला. त्यामुळें पेशव्यांनीं यांना वीस हजारांची तैनात दिली. पटवर्धनी फौजेवर भाऊंची मुख्य सरदारी स. १७७७ सालीं सुरू झाली. स. १७८१ सालच्या आरंभीं इंग्रज सेनापति गॉडर्ड यानें बोरघाट काबीज करून मुख्य सैन्यास खंडाळा येथें पाठविलें व तो स्वतः खोपवली येथें राहिला. तेव्हां भाऊंनीं कोंकणांत उतरून गॉडर्डच्या सैन्यास अतिशय त्रास देऊन व त्याचें मुंबईशीं असलेलें दळणवळण बंद पाडून त्याचा पुरा पराभव केला, व त्यास पिटाळून लावलें. खर्ड्याच्या लढाईंत हा मुख्य सेनापति होता (स. १७९५).

स. १७९६ मध्यें यांचें व नानांचें वितुष्ट आलें. कारण शिंदे व बाजीराव यांच्या स. १७९६ च्या करारास हे जामीन झाले. पुढें यांनीं नानास बराच त्रास दिला. पण नानानें यांस कैद करविलें (स. १७९६). नंतर स. १७९८ मध्यें याची सुटका होऊन हा पट्टणकुडीच्या लढाईवर गेला, व त्याच लढाईंत लढत असतां मरण पावला (स. १७९९). शेवटीं नारो हरि करंदीकर यानें याला मंत्राग्नि देण्याचा प्रयत्न केला, पण शेजारच्या खेड्यांतील ब्राह्मण मंत्रशत्रु असल्यानें तो सिद्धीस गेला नाहीं.

मराठेशाहींत व विशेषतः पेशव्यांच्या कारभाराचें हृद्गत ओळखून आत्मिक भावनेनें तिचा पुरस्कार करणारा भाऊसारखा दुसरा इसम झाला नाहीं. तथापि शेवटीं अधिकारलालसेनें हा नानाच्या विरुद्ध झाला आणि इंग्रजांशीं सर्वांआधीं संधान ठेवून यानें तह केला.

मरणसमयीं यांचें वय साठीच्या अंदाजांत असावें. म्हणजे नाना व भाऊ जवळ जवळ समवयस्क होते. ता. १५-४-१७९९ च्या पत्रांत 'भाऊनें चहा, बुंद व चहादाणी मागविली व चहाचा प्याला आणि बुंद पाठविलें ते पावलें' असा उल्लेख आहे. त्यावरून चहा-कॉफीचा प्रघात पटवर्धन मंडळीस टिपूच्या स्वारीपासून इंग्रजांच्या सहवासानें लागलेला दिसतो. याची बयाबाई नांवाची मुलगी होती (म. रि. उत्तर वि. ३, पृ. २१–२३–८५–९१).

हा कांहींसा ठेंगणा, सावळ्या वर्णाचा व पुष्ट होता. शौर्याबद्दल याची ख्याति विशेष होती. याचे काळेभोर डोळे व उत्साहपूर्ण चर्या पाहतांच याच्या शौर्यादि गुणांची ओळख एकदम पटत असे. कारस्थानापेक्षां लढवय्या म्हणवून घेण्याची याला अधिक हौस असे. टिपूच्या युद्धांत मराठ्यांच्या बाजूनें यानें बरीच कामगिरी केली. परशुरामभाऊ व हरिपंत हे दोघे वाटेल त्या संकटांत नानाकडे धांवत येऊन त्याची कामगिरी जिवास जीव देऊन तावडतोब उठवीत, म्हणूनच नानाचा कारभार उरके.

अनंतफंदी या कवीनें माधवग्रंथ नांवाचें एक ऐतिहासिक काव्य लिहिलें आहे. याचीं अस्सल साधनें बाजीराव रघुनाथानें कवीला पुरविलीं होतीं. त्यांत यानें बाजीराव रघुनाथाला फसवून शिंद्याच्या लष्करांत कसें पाठवून दिलें, चिमाजीअप्पास त्याचे इच्छेविरुद्ध जबरदस्तीनें नेऊन त्याचा उपमर्द कसा केला व यशोदाबाईची अवहेलना करतांना भाऊच्या मनास यत्किंचित् दिक्कत कशी वाटली नाहीं इत्यादि गोष्टींचें वर्णन दिलें आहे. तें अंगावर शहारे आणणारें आहे. फंदीनें वर्णिलेल्या या गोष्टी ऐतिहासिक साधनांच्या द्वारें सिद्ध होत असल्यामुळें राजकारण किंवा नीति या दृष्टीनें बिलकुल समर्थनीय नाहींत (महाराष्ट्र कविचरित्र, भा. २, पा १३६; अनंतफंदी पाहा).

परशुराममिश्र— एक काश्मीरी पंडित. मथुराचंपूचा कर्ता.

परसा भागवत—याला परिसा भागवत असेंहि म्हणतात. हा जातीचा ब्राह्मण असून पंढरपूरचा राहणारा होता. हा मोठा भगवद्भक्त असे. परसा भागवताचें नामदेवाच्या ठिकाणीं फार प्रेम होतें. यानेंहि कांहीं पदें केलीं आहेत. याचे जवळ परीस असल्याची गोष्ट भक्तविजयांत दिली आहे.

परसोजी भोसले—(नागपूरकर, मृत्युस.१७०९) पहिला सेनासाहेब सुभा. हा मुधोजी भोसल्याचा मुलगा होय. हा प्रथम शिवाजीचे सैन्यांत नोकरी करूं लागला व पुढें हळुहळू बराच प्रसिद्धीस आला.

प्रतापराव गुजराप्रमाणें ह्यानें वऱ्हाड व गोंडवण प्रांतांत स्वाऱ्या करून तिकडे मराठ्यांचा अंमल बसविण्याचा प्रयत्न केला. राजारामास यानें फार मदत केली, व वऱ्हाड गोंडवणांत आपला अंमल बसवला. त्यामुळें राजारामानें स. १६९९ त त्यास 'सेनासाहेब सुभा' हा किताब व सरंजाम देऊन वरील प्रांतांतील चौथाई व सरदेशमुखी वसुलीचें काम देऊन तशी सनद दिली. परसोजीनंतर हा वऱ्हाडांत भाम येथें येऊन राहिला.

स. १७०७ मध्यें शाहू मोगलांचे कैदेंतून सुटून आल्यावर त्यास जे मराठे सरदार मिळाले त्यांत परसोजी हा प्रथम मिळाला. परसोजीचा भाऊ बापूजी यास ताराबाईनें आपणाकडे वळवून घेऊन परसोजीसहि वळविण्यासाठीं त्यास शाहूकडे पाठवलें. शेवटीं शाहू खरा असें ठरल्यावर परसोजी व बापूजी त्यांस एका ताटांत घेऊन जेवले, तेव्हां कोणासच शंका न राहून सर्व मराठे सरदार शाहूस मिळून त्यांचें काम सुकर झालें.

शाहूस परसोजीनें फार मदत केली म्हणून तो यशस्वी झाल्यावर स. १७०७ मध्यें त्यानें परसोजीस " सेनासाहेब सुभा " हें पद व वऱ्हाड, गोंडवण प्रांतांचा अंमल कायम करून त्यास वंशपरंपरेची नवीन सनद दिली.

वरील सनदेप्रमाणें वऱ्हाडांत येऊन परसोजीनें कारभार केला. तो त्यानंतर साताऱ्यास गेला व तेथून परत येत असतां कृष्णा व वेण्णा यांचे संगमावर माहुलीजवळ स. १७०९ मध्यें मरण पावला. तेथें याची समाधि आहे, व तिचे पूजेअर्चेकरितां कान्होजीनें शाहूपासून इनाम जमीन देवाविली आहे.

परसोजीचा शिक्का—श्रीमछिव प्रसन्न परसोजी (गोल शिक्का रा. खं. १५, पा. १०२, नागपूर प्रांताचा इतिहास).

२. (मृत्यु स. १८१७) हा दुसऱ्या रघूजीचा एकुलता एक मुलगा. याचें लग्न काशीबाई मोहिते हिच्याशीं झालें होतें.

परसोजी ऊर्फ बाळासाहेब हा शरिरानें व मनानें पंगू व भ्रमिष्ट होता, त्यामुळें रघूजीच्या मृत्यूनंतर पुढील परिस्थितीबद्दल काळजी वाटूं लागली. व्यंकोजीचा मुलगा अप्पासाहेब गादी बळकावण्यासाठी टपलेला होता. अशा परिस्थितींत मुख्य गादी परसोजीकडे असावी व कारभार पूर्वीप्रमाणें मुत्सद्यांनीं करावा असें ठरलें.

परसोजी इतका वेडा होता कीं, रघूजीचे मृत्यूनंतर क्षौर केल्यावर कैक दिवस तो 'माझ्या मिशा काय झाल्या' म्हणून विचारीत होता असें म्हणतात.

परसोजीस बाळासाहेब व क्वचित् बाबासाहेबहि म्हणत असत. बाप मेला तेव्हां याचें वय ३८ वर्षांचें होतें. यास राज्यकारभाराचा बिलकुल अनुभव नव्हता. लहाणपणीं याचें शरीर चांगलें होतें. परंतु तरुणपणीं अनेक व्यसनांमुळें याचें शरीर दुर्बल झालें होतें. निरनिराळ्या रोगांवर केलेल्या उपचारामुळें याचे शरीरावर कायमचा परिणाम झाला. अर्धांगवायूमुळें कमरेखालचा भाग पंगू झाला होता, व डोळ्यांनींहि हा आंधळा झाला होता. हा पूर्णपणें वेडा नसला तरी ' खानापीना और चैन करना '

यापलीकडे याला राज्यकारभारांत कांहींच कळत नव्हतें. रघूजीनें यास राज्यकारभाराचें ज्ञान यावें म्हणून बराच प्रयत्न केला होता. स्वारीवर अगर फिरतीवर असतां तो यास बरोबर नेत असे. मुत्सद्यांबरोबर खलबत करतांना, व निरनिराळ्या प्रांतांचे हिशेब समजून घेतांना तो यास जवळ बसवीत असे. ही माहिती रघूजीजवळ असलेल्या माधवरावाच्या दोन वकिलांनीं त्यास लिहिलेल्या पत्रावरून कळते (मंडळांतील अप्रकाशित पत्र). परसोजी ता. १–२–१८१७ रोजीं मरण पावला. त्यास त्याचा चुलत-भाऊ आप्पासाहेब यानें आपल्या हस्तकांकडून गळा दाबून मारलें, अशी अफवा होती (नागपूर प्रांताचा इतिहास). परसोजीचे मृत्यूनंतर काशीबाई सती गेली.

३. रुस्तमजी भोसल्याचा धाकटा मुलगा. परसोजी हा स्वभावानें जरा भोळसर होता. यासच पुढें सातारचे थोरले शाहू महाराज यांची चुलत आजी म्हणजे शहाजी-राजे यांचे वडील चिरंजीव संभाजीराजे यांची बायको मकाऊसाहेब जिंजीकरीण यांनीं आपणास मूल नाहीं म्हणून वंशवृद्धि होण्याकरितां दत्तक घेतलें. जिंजीच्या घराण्यांतील भोसले हे याच पुरुषाचे वंशज होत. याला खेलोजी नांवाचा एक वडील भाऊ होता (मं. सप्तम सं. वृ. पृ. ६८).

४. हा विठोजी भोसल्याचा मुलगा व शहाजीचा चुलत-भाऊ असून नांदनज व भांबोरें या दोन गांवीं राहत असलेल्या भोसल्यांचा मूळ पुरुष होय.

निजामशाहीचे अखेरीस जेव्हां शहाजी अहमदनगर सोडून विजापुराकडे जावयास निघाला तेव्हां त्यानें आपला चुलता विठूजी याच्या सहा मुलांची जागजागीं व्यवस्था लाविली. त्यांतून परसोजी यास त्यानें निजामशाहींतील मालोरी हा गांव दौलताबादकराकडून दिला. त्यामुळें परसोजी हा निजामशाहींतच राहून मोठमोठालीं जिम्मेदारीचीं व पराक्रमाचीं कामें करून चांगलाच नांवलौकिकास चढला.

त्या वेळेस वऱ्हाडांत व खानदेशांत बंडखोर लोकांच्या टोळ्या जागोजाग रयतेस त्रास देत होत्या. त्या लोकांचा बीमोड करण्याकरितां सरकारांतून याची योजना करण्यांत आली. वऱ्हाड व खानदेशांत जाऊन त्या ठिकाणचीं बंडें मोडून नर्मदा ओलांडून हा काशी-बनारसपर्यंत गेल्याचा उल्लेख आहे. याच कामगिरीबद्दल याला वऱ्हाडांतील जळगांव–जामोद या गांवची देशमुखीची सनद मिळाली.

यानें ठिकठिकाणीं वसाहती केल्या व औरंगाबादेस एक पुरा वसविला. तो अद्याप याचे नांवावर परसुपुरा म्हणून चालत आहे. याला सयाजी नांवाचा एक मुलगा होता. तो आपल्या बापाप्रमाणेंच कर्तृत्ववान् होता (मं. सप्तम सं. वृ. पृ. ६६–६७).

पराक्रम पांड्य—(१ कुलशेखर पांड्य पाहा).

पराक्रम बाहु—(रामचंद्र कवि भारती पाहा).

२. (स. ११९५) हा सिंहलदेशचा राजा. यानें सिंहली सैन्यासह पांड्य राजावर स्वारी केली होती.

पराक्रमराज—(३ सुंदर पाहा).

परान्तक चोल—(स. ९०७–५३) हा पहिल्या आदित्य चोलाचा मुलगा होय. याला परकेसरीवर्मा व वीर-नारायण वगैरे पदव्या होत्या. यानें आपला राज्यविस्तार बराच केला. यानें केरळराजकन्येशीं विवाह केला. यानें पांडयराज, बाणराज व वैडुंबराज यांचा पराभव केला. ही गोष्ट स. ९१० च्या सुमारास झाली. याच्या कारकीर्दीत सर्वत्र शांतता नांदत असल्यानें धार्मिक चळवळीस बराच जोर आला. कालमुख व पाशुपतादि शैवपंथांना व वैष्णवपंथांना राजदरबारीं मान्यता मिळाली. हा स्वतः शैव असल्यानें यानें चिदंबरच्या शंकराच्या देवळाची सर्व पटई सोन्यानें मढवली होती, असें सांगतात. यानें आपल्या वयाच्या सदतिसाव्या वर्षी सिलोनवर स्वारी केली. याला पांच पुत्र होते, त्यांपैकीं तिघांनीं राज्य केलें. राजकेसरीवर्मन् ऊर्फ राजादित्य हा याचा ज्येष्ठ पुत्र. गंडरादित्तन, अरिंजय अथवा अर्जुन मधुरकोंड, उत्तमशीली, अरिकुलकेसरिन् हे याचे दुसरे पुत्र होत.

स. ९४४ च्या पूर्वी यानें तिसऱ्या कृष्ण राष्ट्रकूटाशीं लढाई करून त्यांत राष्ट्रकूट राजाचा पराभव केला. वरील लढाईंत विजयी झाल्यावर यानें 'वीरचोल' ही पदवी धारण केली. स. ९५३ पर्यंत याचे उल्लेख शिलालेखांत सांपडतात, त्यावरून स. ९५३ हाच याच्या कारकीर्दीचा शेवटचा सन ठरतो (एपि. इंडि. १९-८१-८७). याच्या पत्नीचें नांव कोक्किलानडी (२ पृथ्वीपति गंग पाहा).

२. (स. ९६५). हा अरिंजयाचा पुत्र. याला सुंदर परकेसरी म्हणत. याच्या वेळीं वीर पांड्यानें उचल केली, परंतु यानें त्याचा चेवूर येथें पराभव केला. याच्यानंतर याचा मुलगा आदित्य दुसरा ऊर्फ करिकाल राजकेसरी हा राजा झाला.

परान्तक वीरनारायण पांड्य—(स. ८६२-९००) श्रीमार पांड्याचा पुत्र व वरगुणवर्मनचा धाकटा भाऊ. याला मारंजदयन अशी पदवी होती. यानें उग्राला जिंकलें. याचा पुत्र राजसिंह.

२. (स. १४२२) हा कुलशेखर पांड्याचा पुत्र.

परिचेहेरा—(परि-चेहेरा) ही सोनगडच्या राजाची कन्या होय. ही फार सुंदर होती. सोनगडचा राजा दिलावरखानास शरण आला, तेव्हां खानानें राजाकडून हिला दुसऱ्या (बेदरचा) अलाउद्दीनशहाकरितां नजर म्हणून आणलें. हिच्यावर शहाची अत्यंत मर्जी बसली, आणि हिला त्यानें परिचेहेरा (परीप्रमाणें चेहेरा असलेली) असें नांव दिलें (मु. रि. १, २२६).

परिमल—(पद्मगुप्त पाहा).

परिमलदेवी—(स. ७१३ सुमार) सिंधमधील दाहीर राजाची कन्या. दाहीर स.७१३ चे सुमारास लढाईत पडल्यावर त्याच्या कुटुंबांतील ज्या दोन मुलींस मुहंमदानें विजयाचा अहेर म्हणून खलिफा वलीद याजकडे पाठविलें त्यांपैकीं धाकटी बहीण. या बहिणीच्या रोमांचकारक हकीगतीकरितां 'सूर्यदेवी' पाहा.

पर्वतक—हा भारताच्या पश्चिमेकडील भागाचा एक प्रबळ राजा होता. चंद्रगुप्तानें मगधाचें राज्य जिंकण्याकरितां याचें साहाय्य घेतलें होतें व याला जिंकलेल्या राज्यांपैकीं अर्धा भाग देण्याचें कबूल केलें होतें. पण राक्षसानें चंद्रगुप्ताकरितां केलेल्या विषकन्येच्या प्रयोगानें हा मरण पावला. हा पोरस किंवा त्याचा पुत्र असावा.

पर्वीझ मोगल—(जन्म स. १५८९-१६२५) जहांगीर मोगल बादशहाचा मुलगा.

पलंत पांड्य—हा उच्चंगीच्या पांड्य घराण्यांपैकीं चेदि किंवा चेतराजाचा मुलगा.

पल्लव घराणें—१ बप्पा (स. २२५-२५०), २ शिवस्कंदवर्मन् १ ला (स. २५०-७५), ३ बुद्धवर्मन् (स. २७५-३००), ४ बुध्यन्कुर (स. ३००-२५), ५ विष्णुगोप १ ला (३२५-३५०), ६ स्कंदवर्मन् २ रा (स. ३५०-७५), ७ कुमारविष्णु १ ला (स. ३७५-४००), ८ बुद्धवर्मन् २ रा (स. ४००-२५), ९ कुमारविष्णु २ रा (स. ४२५-५०), १० स्कंदवर्मन् ३ रा, ११ वीरवर्मन्, १२ विजयस्कंदवर्मन् ४ था (स. ४५०-४७५), १३ सिंहवर्मन् १ ला (स. ४७५-५००), १४ स्कंदवर्मन् ५ वा (स.५००-२५), १५ नंदिवर्मन् १ ला (स. ५२५-५०), १६ सिंहवर्मन् ३ रा (स. ५५०-७५), १७ सिंहविष्णु (स. ५७५-६००), १८ महेंद्रवर्मन् १ ला (स.६००-३०), १९ नरसिंहवर्मन् १ ला (स. ६३०-६८), २० महेंद्रवर्मन् २ रा (स. ६६८-७०), २१ परमेश्वर पोतवर्मन् १ ला (६७०-६९०), २२ नरसिंहवर्मन २ रा (स. ६९०-७१५), २३ परमेश्वर-पोतवर्मन् २ रा (स. ७१५-१७), २४ नन्दीवर्मन् २ रा (स. ७१७-७७९), २५ दन्तिवर्मन् (स. ७७९-८३०), २६ नन्दीवर्मन् ३ रा (स. ८३०-८५४), २७ नृपतुंग (स. ८५४-८८०), २८ अपराजित (स. ८८०-८९८). यांचें राज्य कृष्णेच्या दक्षिणेस आणि कांचीच्या दक्षिण भागांत होतें. हे क्षत्रिय होते.

महाराष्ट्रांतील महारमांगांप्रमाणें तामीळ देशांत आज परैय्या व पल्ल अशा जाती आहेत. पल्ल हे मांगांसारखे आहेत. कर्नाटकाच्या खालीं दक्षिणेंत सर्वत्र खालच्या वर्गांत बलगै (उजव्या हाताकडचे) आणि यडगै (डाव्या हाताकडचे) असा भेद आढळतो. हा ग्रामसंस्थेंतील दर्जाचा मान दिसतो. पल्लवांचा व त्यांचा कांहीं संबंध नाहीं.

२. (नोलंदवाडी)—१ मंगल (स. ७००), २ सिंहपोत (स. ८१०), ३ चारुपाल्वेर (स. ८३० सुमार), ४ पोरल्बोर जोलम्ब १ ला (स. ८४०-५३), ५ महेन्द्र १ ला (स. ८५३-८९७), ६ अय्यपदेवनन्नीग (स. ८९७-९२०), ७ अन्निग (स.९३१-९३६), ८ दिलीपय्य (स.९४२-९६६), ९ नन्नीनोलंब (स.१०००सुमार), १० पोरलचोर २ रा (स. १००० सुमार), ११ वीरमहेन्द्र २ रा.

पवार घराणें (धार)—१ संभाजी, २ उदाजी, ३ आनंदराव (स. १७२९-३६), ४ यशवंतराव (स. १७३६-६१), ५ खंडेराव (स. १७६१-८०), ६ आनंदराव २ रा (स. १७८०-१८०५), ७ रामचंद्रराव (स. १८०५-१८०८), ८ रामचंद्रराव २ रा द. (स. १८०८-३३), ९ यशवंतराव २ रा द. (स. १८३३-५७), १० आनंदराव ३ रे द. (१८५७-९८), ११ उदाजीराव द. (स.१८९८-९), १२ आनंदराव (चालू).

२. (देवास)—काळोजी-१ तुकोजी (स. १७२८-५३), २ कृष्णाजी द. (स. १७५३-८९), ३ तुकोजी दुसरा (स. १७८९-१८२७), ४ रुक्मांगद (स. १८२७-६०), ५ कृष्णाजी (स. १८६९-९९), ६ तुकोजी तिसरा (स.१८९९-१९३५), ७ विक्रमसिंह(चालू).

३. (देवास) काळोजी-१ जिवाजी (स. १७२८-७५), २ सदाशिव (स. १७७५-९०), ३ रुक्मांगद

(स. १७९०-१८१७), ४ आनंदराव (स. १८१७-४०), ५ हैबतराव (स. १८४०-६४), ६ नारायण (१८६४-९२), ७ मल्हारराव द. (स. १८९२-१९३४), ८ सदाशिवराव खासेसाहेब पवार (चालू).

पशुपति—' कारकपरीक्षा ' नामक संस्कृत ग्रंथाचा कर्ता. हा काश्मीराकडील होता.

२. (स. ११५० सुमार) हा तिसऱ्या हलायुधाचा भाऊ होय. यानें ' श्राद्धकृत्यपद्धति ' आणि ' पाकयज्ञपद्धति ' असे दोन ग्रंथ संस्कृतांत लिहिले आहेत. हाहि आपल्या भावाप्रमाणें आपल्याला आवसथिक ही पदवी लावीत असे.

पंकजपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एकावन्नावा सिद्ध होय. हा नागार्जुनाचा शिष्य. जात ब्राह्मण. गांव लाखपुत्र. याचे कांहीं ग्रंथ आहेत.

पंडित राघवोपाध्ये—(स्वळो व्यास पाहा).

पंडितराव—संभाजीस पन्हाळा किल्ल्यावर अटकेंत ठेविलें होतें. परंतु तो अटकेंतून बाहेर पडला, व आपण सिंहासनावर बसला. तेव्हां पूर्वीचें अष्टप्रधानमंडळ मोडून नवीन एक मंडळ स्थापन केलें. त्यांत ह्यास त्यानें प्रधान केलें. हा मोठा मुत्सद्दी होता. यास धर्मादाय इनामांच्या देणग्या देण्याचा अधिकार संभाजीच्या कारकीर्दीत होता (मं. श. १८३७ वा. इ. ले. ५१).

पंताजी गोपीनाथ बोकिल—दे. ऋ. ब्रा. जमदग्नि गोत्र. शिवाजीकडून अफजलखानाकडे हेजिबीस गेलेल्या वकिलाचें नांव. मराठ्यांची बखर करणाऱ्या ग्रँड डफनें यास अफजलखानाचा वकील बनवून, यानें आपल्या धन्याशीं बेइमान दाखविलें, त्याबद्दल शिवाजीनें यास हिवरे गांव इनाम दिला असें लिहिलें आहे (व्हा. १ पा. १३८-१४१ आर. चेम्बर अँड को.ची प्रत १९१२). पण ही माहिती अगदीं चूक असून हा अफजल प्रकरणाच्या पुष्कळ पूर्वीपासून शिवाजीचा चिटणीस होता व हिवरे गांवचें वतनहि पूर्वीच याच्या एका घराण्याकडे होतें, असें उपलब्ध कागदांवरून दिसतें (मं. सप्तम सं. १-६ पत्र पा. ५९). बखरींत हा जिजाबाईबरोबर सोंगट्या खेळत असे, असें घरोब्याचें वर्णन आहे. पोवाड्यांत 'पंताजी तो काका' असें म्हटलें आहे. वरील कामगिरीबद्दल याला भोळी व मांडकी या गांवीं एक एक चावर जमीन व मांडकी येथें सेटेपणाचें वतन दिलें. शिवाजीनें दिलेल्या देणगीचे कागदपत्र पुनः शाहूनें यास करून दिले आहेत. याच्या घराण्यांपैकीं सखारामबापू हा मोठा मुत्सद्दी म्हणून पुढें प्रसिद्धीस आला.

पंप—(ग्रंथकाल स. ९४१) हा दिगंबर जैनपंथी असून मूळचा वेंगी प्रांतांत राहणारा होता. यानें आपला आश्रयदाता जो दुसरा अरिकेसरिन् चालुक्य याच्या सांगण्यावरून ' भारत ' किंवा ' विक्रमार्जुनविजय ' हा चंपूरूप ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ लिहिल्याबद्दल यास दुसऱ्या अरिकेसरिनें बन्नेसहस्र या देशविभागांतील धर्मऊरु हें गांव बक्षिस दिलें. यानें आपल्या ग्रंथांत दुसऱ्या अरिकेसरिनपर्यंतच्या पुरुषांची माहिती दिली आहे. आदिपुराण हा ग्रंथ श. ८६३ (स. ९४१) मध्यें पुलिगरे-हल्लींचें लक्ष्मेश्वर येथें सुंदर कानडींत रचला. याच्या या भारताच्या, राइसनें संपादलेली व कर्नाटक साहित्यपरिषदेनें संपादलेली अशा दोन प्रती आढळतात (द. म. इ. सा. खं. २, पा. ३६ टीप). यानें आदिपुराण नांवाचा चम्पूरूप ग्रंथ लिहिला असून त्यांत पहिल्या तीर्थंकराचें चरित्र लिहिलें आहे. हा वेंगी येथील ब्राह्मण घराण्यांत जन्मला आणि प्रथम याच्या पित्यानें जैनधर्म स्वीकारला.

पंपानें आदिपुराण हा आपला ग्रंथ प्रथम लिहिला आणि तो कानडी भाषेच्या दृष्टीनें सर्वोत्कृष्ट समजला जातो. यानें लिहिलेलें भारत आदिपुराणानंतर लिहिलेलें आहे. आणि तें काव्यहि उत्कृष्ट असलें तरी आदिपुराणाइतकें तें सरस नाहीं, असा रसिकांचा अभिप्राय आहे. याच्या या काव्यामुळें याच्या पूर्वीच्या इतर कवींचीं काव्यें मागें पडलीं असें केशिराज व नागवर्मा या प्रसिद्ध कानडी ग्रंथकारांनीं म्हटलें आहे. हा नुसता कवि नसून अरिकेसरिनचा सेनापतीहि असावा. याच्या भारतांत यानें अर्जुन हा नायक मानला आहे. अर्जुन व अरिकेसरिन् यांची तुलनाहि केली आहे. हा आदिपंप म्हणून कर्नाटकांतील लोकांच्या ओळखीचा आहे (क. क. च. १).

पंपा—विजयनगरच्या दुसऱ्या हरिहर संगमाची पत्नी.

पान-चा-ओ—(ख्रि. पू. १०२-७३) हा चिनी सेनापति अतिशय शूर व मुत्सद्दी होता. यानें स. पूर्वी ७३-१०२ चे दरम्यान चिनी साम्राज्याची हद्द रोमन साम्राज्यापर्यंत नेऊन भिडविली. यानें खोतान ते कास्पियन समुद्रापर्यंत मुलूख जिंकले. दुसऱ्या कदफिसेसनें पाठविलेल्या शी सेनापतीचा यानें पराभव करून हिंदुस्थानांतूनहि खंडणी वसूल केली (२ कदफिसेस पाहा). याच्या मृत्यूनंतर कनिष्कानें चीनवर स्वारी केली (V. Smith, pp. 268-6, 278, 294).

पाफम—(स. १७८१) हा एक इंग्रज सेनापति होय. स. १७८१ मध्यें हेस्टिंग्सनें महादजीस पायबंद घालण्याकरितां माळव्यांत इंग्रज सैन्य पाठविलें. तेव्हां

हाहि बंगालची अडीच हजार फौज व थोड्या तोफा घेऊन फेब्रुवारींत काल्पीवर यमुना उतरून गोहदच्या राण्याचे मदतीस आला. तेथें यानें लाहरचें ठाणें घेऊन लगोलग ग्वाल्हेरवर चाल करून तोहि किल्ला फितुरीच्या साधनानें घेतला.

पाराशर दादाजी वाघ—(मृत्यु ता. १८-११-१८०२) हा एक होळकरांचा कारभारी होय.

होळकरांचा पूर्वीचा कारभारी नारो गणेश हा गेल्यानंतर राज्याचा कारभार हा पाहत असे. याच्याविषयीं उल्लेख हिंगण्यानें आपल्या ता० २४-१-१७९४ च्या पत्रांत खुलासेवार केला आहे (महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें). स. १७६१ मध्यें हा पानिपतच्या लढाईंत हजर होता (म. रि. मध्य वि. ३, पृ. १८३). भवानी शंकर म्हणतो—'पाराशर दादाजी वकिलीच्या कामांत लायक, सुज्ञ आणि उत्तम भाषण करणारा होता. होळकर दरबारांत हा वागलेला असून त्यानें पेशव्यापाशीं आपली कामगिरी चातुर्यानें व लीनतेनें केली. परंतु बाजीरावानें याचा उपयोग करून घेतला नाहीं. '

याचें उपनांव गोहलकर असून हा साकुरें येथील राहणारा होय. याच्या मुलाचें नांव दादो पाराशर असून याचे वंशज इंदुरास आहेत. नारो गणेशच्या हाताखालीं रावजी महादेव फडणीस होता. त्याचे मार्फत हा होळकरांचे नोकरींत आला. लाखेरी व पाटण येथील लढायांत हा तुकोजीबरोबर हजर होता. याचें व दुसऱ्या मल्हारराव‌ाचें वांकडें होतें. अर्थात् हा काशीराव होळकराचे तर्फेनें पुण्यांस राहत असे. मल्हारावाचे मृत्यूनंतर हा यशवंतरावाकडे आला. याचा बाप दादाजी महादेव हा चिमाजी आपाबरोबर वसईच्या स्वारींत होता. याला दोन स्त्रिया होत्या. त्यांनीं दोन निराळे पुत्र दत्तक घेतले. पैकीं एक साकुरीकर इनामदार व दुसरे वाघ असे दोन वंश आज इंदुरांत नांदत आहेत. पानिपतावरील मोहिमेंत खजिना घेऊन चुकून अब्दालीच्या छावणींत जाणारा पाराजीपंत तो हाच असावा (म.रि.उत्तर वि. ३ पृ. २०९). हा पुण्यास यशवंतराव होळकरातर्फे बाजीरावाशीं बोलणें करण्यास आला असतां ज्वर येऊन कार्तिक व. ८ गुरुवार (ता. १८-११-१८०२) रोजीं मरण पावला.

पार्थ उत्पल—हा काश्मीरच्या उत्पल घराण्यामध्यें जे दुर्बल व जुलमी राजे निघाले त्यांपैकीं एक होय. याच्या कारकीर्दीत स. ९१७-१८ सालीं काश्मीरांत इतका भयंकर दुष्काळ पडला कीं, " वितस्ता (झेलम) नदी प्रेतांनीं भरून गेली, व जमीन हाडांनीं आच्छादून गेल्यामुळें सर्वत्र स्मशानभूमीसारखा देखावा दिसूं लागला.' असें एक ब्राह्मण बखरकार म्हणतो.

पार्वतीबाई शिंदे—ही नरसिंग घाटगे यांची मुलगी व महादजी शिंदे यांची बायको. हिची मुलगी शितोळ्यांकडे दिलेली बाळाबाई.

पार्वतीबाई पेशवे—(मृत्यु स. १७८३) सदाशिवरावभाऊ पेशवे यांची पत्नी. ही बाई स. १७८३ मध्यें मृत्यु पावली. ही सरळ व सुस्वभावी असून, सवाई माधवरावांच्या बाळपणांत हिनें त्याची चांगली काळजी घेतली होती. ही मृत्यु पावल्याचें वृत्त नानांनीं महादजीस लिहिलें. तेव्हां महादजीनें हिच्यासंबंधीं काढलेले उद्गार वाचण्यासारखे आहेतः 'मातुश्री होती तोपर्यंत श्रीमंत राजश्री रावसाहेब याजविषयीं, घरांतील बंदोबस्ताविषयीं खातरजमा होती. सांप्रत बंदोबस्तास खातरजमेचे कोणी दिसत नाहीं' (ऐतिहासिक टिपणें ३७).

ही पानपताच्या पळांतून सुरक्षित आली. सदाशिवरावभाऊ जिवंत आहे अशा समजुतीनें ही शेवटपर्यंत सौभाग्यचिन्हें धारण करीत असे. सदाशिवराव भाऊंचा तोतया हिला दाखवून ठार करण्यांत आला.

पार्श्वदेवगणि—(स. ११३३) ह्या जैन तर्कज्ञानें 'न्यायप्रवेशा'वर 'न्यायपंजिका' नांवाची टीका लिहिली. यानें अमरदेवसूरीस नेमिचंद्राचा 'आख्यानमणिकोश' या ग्रंथावर टीका लिहिण्यास मदत केली (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पान २१०).

पार्श्वनाथ—(ख्रि. पू. ७५० सुमार) हा जैनांचा तेविसावा तीर्थंकर होय. हा ऐतिहासिक पुरुष असून एकूण शंभर वर्षे जगला.

यांनीं जैनधर्म उन्नत केला आणि त्या धर्माचें अस्तित्व स्थिर करण्याचें आणि चोहोंकडे फैलाव करण्याचें काम महावीरानें आणि त्यांच्या शिष्यांनीं केलें.

बनारसचा राजा जो अश्वसेन त्याला वामा राणीपासून पार्श्वनाथ हा मुलगा झाला. तोच पार्श्वनाथ तेविसावा जैन तीर्थंकर होय. याचें आयुष्य शंभर वर्षे होतें. त्यांपैकीं सत्तर वर्षे यानें निर्वाणाच्या शोधार्थ घालविलीं. महावीराचे आईबाप याचे पूजक आणि श्रमणांचे अनुयायी होते.

हा इक्ष्वाकु घराण्यांतील होता. याची बायकोसुद्धां एक राजकन्या होती. त्यामुळें याचा दोन्हीकडूनहि राजघराण्यांशीं संबंध येतो. कुशस्थल येथील प्रसेनजित् राजाची मुलगी प्रभावती याची बायको होय. महावीराचे वेळीं मगधचे आसपास बहुतेक सर्व लोक याचे अनुयायी

होते. महावीराचे आईबापसुद्धां याचेच अनुयायी होते. गुहेच्या प्रत्येक कमानीवर दोन सर्पांचीं डोकीं खोदणें, ही पार्श्वनाथाची खूण होय. नागाच्या फणेमुळें (या खुणेमुळें) पार्श्वनाथ मूर्ति अति सुलभ रीतीनें ओळखिली जाते.

एकदां हा शिकारीस गेला असतां अरण्यांत कलिंग देशाचा राजा प्रभावती नांवाच्या कन्येस पळवून नेत होता. त्या वेळीं यानें प्रभावतीची कलिंग (यवन) राजापासून सुटका केली व नंतर तिच्याशीं लग्न लावलें. यावरून हा शिपाईगिरी बाण्याचा पुरुष होता असें दिसतें.

हा महावीराचे पूर्वी २०० वर्षे होऊन गेला किंवा ख्रि. पू. ७५० च्या सुमारास झाला. शेवटीं यानें समेत शिखरावर देह ठेवला.

पालक प्रद्योत—एक राजा.

पालकुरिकेसोम—(स. ११९५) याचा जन्म गोदावरी जिल्ह्यांत पालकुरिक येथें झाला. यानें संस्कृत, तेलगू व कानडी भाषांत लेखन केलें. याचें कानडीत सोमेश्वरशतक आहे.

पाल घराणें (बंगाल)—१ गोपाल (स. ७८०–८००), २ धर्मपाल (स. ८००–२५), ३ देवपाल द. पुतण्या (स. ८२५–५०), ४ विग्रहपाल दत्तक पुतण्या (स. ८५०–७५), ५ नारायणपाल (स. ८७५–९००), ६ राज्यपाल (स. ९००–९२५), ७ गोपाल २ रा (स. ९२५–९५०), ८ विग्रहपाल २ रा (स. ९५०–९७६), ९ महीपाल १ ला (स. ९८०–१०२६), १० नयपाल (स. १०३२–१०३६), ११ विग्रहपाल ३ रा (स. १०३६–१०८०), १२ महीपाल २ रा (स. १०८०–१०८२), १३ शूरपाल (स. १०८२–१०८४), १४ रामपाल (स. १०८४–११३०), १५ कुमारपाल (स. ११३०–११३६), १६ राज्यपाल, गोपाल ३ रा (स. ११३६–११४०), १७ मदनपाल (स. ११४०–११६४), १८ गोविंदपाल (स. ११६४–११८०), १९ महेंद्रपाल (स. ११८०). यांची राजधानी मोंघीर व नंतर पौंड्रवर्धन होती. जात क्षत्रिय (हि. क्वा. मार्च स. १९२९, हिस्टरी ऑफ पाल; गंगामासिकांतील लेख, सारनाथाचा शिलालेख).

पांडुदास—काश्मीरकडील एक कवि. श्रीधर नांवाचा कवि याच्या आश्रयास होता.

पांडुरंग केशव दाढी—(ग्रंथकाल स. १८२५) एक महाराष्ट्र कवि. हा १०० वर्षांपूर्वी नागपुरास होऊन गेला. याचा 'अद्भुतरामायण' हा एकच ग्रंथ उपलब्ध आहे. त्यांत ओव्या व दिंड्या असे दोन छंद आहेत. याची कविता सामान्य प्रतीची आहे. वरील ग्रंथ श. १७४७ श्रावणमास मृगुवारीं एकादशीस समाप्त झाला (महाराष्ट्रकविचरित्र, भा. २, पा. २०२).

पांडुरंग गणेश कालू—हा प्रसिद्ध भवानी काळो यांचा पुतण्या होय. याजकडे भोसल्यांच्या सैन्याची बक्षीगिरी होती, व ती याचेच घराण्यांत पुढें चालली. बक्षिगिरी म्हणजे पैशाची व्यवस्था ठेवण्याचें काम होय (ना. प्रां. इ.).

पांडुरंगराव पटवर्धन (सांगली)—(मृत्यु स. १७७८) हा सांगलीच्या पटवर्धन घराण्यांतील हरभटचा नातू व गोविंद हरीचा तिसरा मुलगा होय.

याला पेशव्यांनीं कैदेंत टाकलें, तेव्हां याची जहागीर याचा मुलगा हरिहरराव याजकडे चालू ठेविली (स. १७७८).

याचा सावशीचे लढाईंत पाडाव झाल्यामुळें हा बंकापूर येथें हैदराचे कैदेंतच जखमांनीं मरण पावला (म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. ४४८).

पांड्य घराणें—१ नेंदुजेलियन १ ला (स. १५०), २ वेरिं–वेर–शेलियन (स. १९०), ३ नेदुंजेलियन २ रा (स. २००), ४ उग्रपेरुवलुदी (स. ३०० सुमार), ५ नन–मारण (स. ४०० सुमार), ६ कडुंगण (स. ५७५), ७ मारवर्मन् (स. ६००), ८ जयंतवर्मन् (स. ६२५), ९ मारवर्मन् २ रा (स. ६५०), १० कोच्चदैयण (स. ६७५), ११ राजसिंह १ ला (स. ७००), १२ जटिल परांतक (स. ७७०), १३ राजसिंह २ रा (स. ८०० सुमार), १४ वरगुण १ ला (स. ८२५), १५ श्रीमार (स. ८३०), १६ वरगुण २ रा (स. ८६२), १७ परांतक (स. ९०० सुमार), १८ राजसिंह ३ रा (स. ९०७–१६).

यांशिवाय पांड्य नांव धारण करणारे पुष्कळ राजांचा उल्लेख आढळतो. पण त्यांची वंशावळ जुळवतां येत नाहीं. उच्चंगी, नोळंबवाडी व कांची वगैरे ठिकाणीं यांचीं राज्यें होतीं.

पांड्याधिराज—(कुलशेखर पाहा).

पिच्छाजान—(झैनखान कोक पाहा).

पिटुग रट्ट—हा सौंदत्तीच्या पृथ्वीरामानंतर गादीवर आला.

पिठोरा—पृथ्वीराज चौहानाचें नामांतर.

पितामह—(ख्रि. पू. ४०० सुमार) सिद्धांतग्रंथ रचणाऱ्यांत पितामह हा सर्वांत प्राचीन आहे. यानें वेदांग-ज्योतिषाप्रमाणें सूर्य व चंद्र यांचें गणित करण्याची रीत

दिली होती असें वराहमिहिरकृत पंचसिद्धांतिकेवरून दिसतें; त्याचप्रमाणें याच्या ग्रंथांत मंगळ, बुध वगैरे ग्रहांचेंहि गणित करण्याची रीत होती, असें ब्रह्मगुप्ताच्या एका वाक्यावरून दिसतें. त्याअर्थी सूर्यचंद्राच्या गणिताच्या पुढें ग्रहगणिताचा पाया पितामहाच्या वेळीं पडला होता. याचा ग्रंथ सध्यां उपलब्ध नाहीं. वराहमिहिरानें याचे फक्त दोनच श्लोक दिले आहेत.

ग्रीक ज्योतिषी हिपार्कस याच्या पूर्वी हिंदुस्थानांत ज्योतिर्गणित अस्तित्वांत होतें हें म्हणण्यास पितामहाच्या ग्रंथाचा आधार उपयोगीं पडण्याजोगा आहे. मात्र पितामहानंतर ग्रीस देशांत होऊन गेलेल्या ज्योतिष्यांची माहिती रोमक व पौलिश सिद्धांताच्या स्वरूपानें भारतीय गणित्यांना होती (माटेकृत विज्ञानबोध–चरित्र खंड, पृ. ४३–४४).

पिनव्वोबमाम्ब—विजयनगरच्या दुसऱ्या वेंकटपति देवरायाची पत्नी.

पिरली—या तामिळी ब्राह्मणानें अज्ञानतः एका अंत्यज मुलीशीं लग्न लाविलें होतें; पुढें तिला टाकून हा बरींच वर्षे यात्रा करीत फिरला. पण पुन्हां तिची गांठ पडून तिच्या सद्वर्तनाची व पावित्र्याची याला प्रचीति आली. शेवटीं हा तिजसमवेत राहूं लागला, पण मुलें मात्र सांभाळीत नसे. अव्हेय्यर, अपग्गा, कपिलर इत्यादि याचीं मुलें होत. यांपैकीं बहुतेक मुलें तामिळी वाङ्मयांत ग्रंथकार व कवि म्हणून प्रसिद्ध आहेत.

पिरिय नायक—(स. १६८७ पूर्वी) अबुल हसन पदच्युत झाल्यावर दक्षिणेंत राज्य स्थापण्याचा यानें थोडा प्रयत्न केला. अबुल हसनलाहि यानें मदत केली होती. पण त्यानंतर याचा किल्ला ता. २८ नवंबर १६८७ रोजीं मोगलांच्या हातीं जातांच यालाहि मोगली चाकर व्हावें लागलें.

पिलाजी गायकवाड—(स. १७२१–१७३२ खून) हा जनकोजीचा पुत्र व दमाजीचा पुतण्या होय. दमाजी मरण पावल्यावर स. १७२१ त याची दमाजीच्या जागींच नेमणूक झाली. हा खानदेशांत नवापूर येथें राहत होता. परंतु पवारानें हरकत घेतल्यामुळें यानें सोनगड येथें किल्ला बांधून ठाणें दिलें. हें ठिकाण बरेच दिवस गायकवाडांची राजधानी होतें.

यानें प्रथम सुरत प्रांतावर स्वारी केली, चौथाई मिळविली व तेथें आपला गुमास्ता ठेविला. स. १७२५ त सरबुलंदचा पराभव केला. सरबुलंद यानें गुजराथची सरदेशमुखी व चौथाई थो. बाजीरावास दिली. डभईच्या लढाईत याचा एक मुलगा मारला गेला व हाहि जखमी झाला. पुढें यशवंतराव दाभाड्यास सेनापतीचीं वस्त्रें देण्यांत आलीं व याची मुतालिकीची जागा कायम करून 'समशेरबहादर' हा किताब दिला. अभयसिंगाचें व पिलाजीचें सख्य नसल्यामुळें वारंवार झटापटी होत. त्यांत अभयसिंगानें मराठ्यांचा बडोद्याचा किल्ला काबीज केला. परंतु पिलाजीनें इतरत्र बरेच जय मिळविले. तेव्हां कायमचे करारमदार करून टाकण्यासाठीं याच्याकडे अभयसिंगानें आपले वकील पाठविले व विश्वासघातानें कपटव्यूह रचून एका मारवाड्याचे मदतीनें डाकोर येथें पिलाजीचा खून केला (स. १७३२). हा शूर, धोरणी, व बाणेदार होता आणि याचेंच उदाहरण पुढें याचे घराण्यास प्रोत्साहक झालें.

पिलाजी जाधव—(स. १७०७–मृत्यु स. १७५१) याच्या वडिलांचें नांव चांगोजी असून आईचें नांव हंसाई होतें. संपूर्ण अर्ध शतकापावेतों हरएक महत्त्वाच्या प्रसंगीं मराठी राज्याची सेवा केलेला आणि छत्रपति शाहूची समग्र कारकीर्द पाहिलेला असा हा फक्त एकच प्रमुख सरदार ल्या वेळचा दिसतो. यांच्या घराण्यास वाघोली व वाडी हीं गांवें इनाम असल्यामुळें हल्लीं त्यांचीं वाघोलीकर व वाडीकर अशीं दोन कुटुंबें आहेत. देवगिरीच्या जाधवांशीं यांचा कांहीं संबंध असला पाहिजे, परंतु त्या वेळची वंशावळ उपलब्ध नाहीं.

स. १७०७ मध्यें शाहू दक्षिणेंत आला तेव्हां त्यास जी मंडळी सामील झाली तींत हा होता. चंद्रसेन जाधव बाळाजी विश्वनाथाचे पाठीस लागला, तेव्हां यानें व यमाजी धुमाळानें चंद्रसेनाशीं लढून बाळाजीची सुटका केली. दमाजी थोरातानें दंगा चालविला, तेव्हां त्याचा पराभव करून यानेंच त्यास पकडून साताऱ्यास शाहूपुढें आणला. यावरून यास शाहूनें दिवे व नांदेड येथील इनाम दिलें. या वेळेपासून हा सरंजामी सरदार बनला. हा बाळाजी विश्वनाथाबरोबर दिल्लीस गेला होता आणि तेथून पुढें प्रत्येक महत्त्वाच्या मोहिमेंत हा हजर असे. स. १७२४ त निजामाच्या औरंगाबादेकडील प्रदेशावर यानें मराठ्यांचा अंमल बसविला. निजामुल्मुकाशींहि यानें राजकारण बांधलें होतें, आणि निजामाकडून यास इनाम गांवेंहि मिळालीं आहेत. नानासाहेब पेशव्यांनीं तर यास बहुतेक निजामावर देखरेख ठेवण्याचीच कामगिरी दिली होती.

स. १७२८ त माळव्यावर चिमाजीआप्पानें स्वारी केली तेव्हां त्यांच्याबरोबर हा होता आणि तेव्हांपासून दयाबहादर व मुहंमद बंगष यांजबरोबर युद्धांत व बाजी-

रावानें छत्रसालास मदत करण्याकरितां बुंदेलखंडावर स्वारी केली तींत हा हजर होताच. बाजीरावास झांशी प्रांत मिळाला तेव्हां यासहि तिकडे पांच गांवें इनाम मिळालीं. पुढें कांहीं दिवस बाजीरावाशीं याचा बेबनाव झाला होता (रा. खं. ६. ४९ व शकावली). बाजीरावाचे व याचे खटके वारंवार उडत. रा. खं. ६ ले. १९ त बाजीरावानें याची माफीच मागितली असें लिहिलेलें आढळतें. बाजीरावानें याचा सरंजामहि जप्त केला होता, पण शाहूमहाराजांनीं परत देविला.

स. १७३५ त शाहूनें यास कोंकणांत पाठविलें. यांनीं वाणकोट काबीज करून गोवळकोट व अंजनवेल हस्तगत करावीं अशी शाहूची आज्ञा होती, असें हा ता. १७-४-१७३५ च्या एका पत्रांत लिहितो (भा. व. श. पृ. १०; ब्र. च. ले. २७८; इ. सं. ३.२ ऐ. च. ७).

भोपाळच्या लढाईंत यानें फारच महत्त्वाची कामगिरी केली (स. १७३८). जंजिरा, दिल्ली व वसई वगैरे मोहिमांत हा हजर होता. यानें वसईची लिहिलेली हकीकत वाचण्यालायक आहे. तसेंच याचीं अनेक पत्रें वाचनीय आहेत.

वसईची मोहीम जरी स. १७३९ त झाली तरी तिकडील प्रदेशांत बंदोबस्त व व्यवस्था करण्याकरितां ५-७ वर्षे हा वसईकडे असून जव्हार वगैरे उत्तर कोंकणांतील प्रदेश जिंकण्याचें काम करीत होता.

स. १७४४-४५ त यानें उत्तरेकडे स्वारी करून ता. २२ मार्चला भेलसा हस्तगत करून भोपाळच्या फैज महंमदखान याजबरोबर तह केला.

पेशव्यांचा याच्याशीं केवढा घरोबा होता, हें तीं सर्व पत्रें वाचलीं असतां चांगलें कळून येतें. प्रथम चिमाजीचा व पुढें नानासाहेबांचा याच्याशीं मोठा लोभ असून नानासाहेब यास काका म्हणे. यास पोटशूळाची व्यथा असून त्याच कारणानें हा वाघोलीस ता. ३-७-१७५, मध्यें मरण पावला. यास एक मुलगा असून त्याचें नांव सटवोजी असें होतें. याच्या मरणसमयीं नानासाहेब पेशवे याच्या सांत्वनोपचारासाठीं वाघोलीस गेले होते.हा शिंदे-होळकरांहून जुना व पेशव्यांच्या विरुद्ध पक्षांत कधीं सामील झाला नव्हता, तरीसुद्धां इतरांच्या मानानें हा इतका मागें कां पडला तें समजत नाहीं. याचा मुलगा व पुतण्या सुभानजी याच्यासारखेच पराक्रमी निघाले होते. याच्या घराण्यांतील एक मुलगी बडोद्याचे माजी महाराज गणपतराव गायकवाड यांस स. १८५० सालीं देण्यांत आली. त्यासंबंधानें याचे वंशज बडोद्यास आले. त्यांस हल्लीं तेथें नेमणूक आहे.

पिलाजी नीळकंठ—(स. १६६१) शिवाजीचा सेनापति. शिवभारतांत नीळकंठाला राजा असें पद लावलें आहे. सूर्यराव सुर्वे यांनीं संगमेश्वर येथें मराठी सैन्यावर मध्यरात्रीं अचानक हल्ला केला तेव्हां हा पळत होता, पण तानाजी मालुसरे यांनीं याला दगडाला बांधून ठेवलें आणि आपण उजाडण्याच्या आंत शत्रूचा फडशा पाडला.

पिलाजी शिर्के—शृंगारपूरच्या सुर्व्यांचा हा कारभारी होय. ठिकठिकाणचे पाळेगार दस्त करतांना सुर्व्यांवरहि शिवाजीनें शस्त्र धरिलें. तेव्हां हा शिवाजीकडे वकिलीस आला. परंतु उभयतांचे करारमदार बनले नाहींत. म्हणून शिवाजीनें सुर्व्यांस बुडविलें. त्या वेळीं ही शिर्के मंडळी हबसाणांत पळून गेली (चि. ७१); परंतु शिवाजीनें यास अभयपत्र देऊन आपणापाशीं ठेविलें. ता. २९ एप्रिल स. १६६१ रोजीं शिवाजीनें शृंगारपूर घेतलें. याच पिलाजी शिर्क्यांची कन्या येसूबाई ही संभाजीची बायको होय.

पिंगला—(भर्तृहरि पाहा).

पिंगलीसुरण—हा गंदीकोटच्या राजाचा आश्रित कवि. याचे ग्रंथ–' कलपूर्णोदयमु ', ' राघवपांडवीय ', ' गरुडपुराण '.

पीट्रो डि ला व्हेल—(स. १६२३-२४) हिंदुस्थानांत आलेला इटालियन प्रवासी.

पुण्यकुमार—(स. ६५० सुमार) हा रेनांदु येथील चोल घराण्यांतील महेंद्रविक्रमाचा पुत्र. याचें राज्य कडाप्पा जिल्ह्यांत व नेलोरच्या कांहीं भागावर होतें.

पुण्यराज—भर्तृहरीचा वाक्यपदीय ग्रंथावरील टीकाकार.

पुतळाबाई—ही शिवाजीमहाराजांची चौथी पत्नी. हिचा विवाह शके १५७५ (स. १६५३) मध्यें रायगडास झाला. ही पालकरांची कन्या (शि. नि.).

पुत्तलिपा—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं अठ्याहत्तरावा सिद्ध होय.

पुनर्वसु आत्रेय—(ख्रि. पू. ५५०) हा हिमालयाच्या पायथ्याशीं राहणारा साधु होता. यानें ख्रि. पू. ५५० च्या सुमारास बौद्ध वैद्य जीवक यास आयुर्विद्या शिकविली. हा मूळचा तक्षशिला (पंजाब) येथें राहणारा असून यानें चरकसंहिता हा ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथाचें मूळ नांव आयुर्वेद असें होतें. याच्या संहितेचे आठ भाग

असून त्याला स्थान नांव आहे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पृ. ११-१२).

पुरगुप्त—(स. ६४८) स्कंधगुप्तानंतर गादीचा वारसा पुरगुप्ताकडे आला. याचीं नाणीं उत्कृष्ट असून त्यांवर प्रकाशादित्य असें नांव आढळतें. याच्या राणीचें नांव वत्सदेवी होय.

गुप्तवंशांतील कुमारगुप्ताला अनंतदेवीपासून झालेला मुलगा.

पुरमन—भरतपूर संस्थानच्या ब्रिजाचा ७ वा मुलगा होय. यानें सिनसिनींच्या व थूनच्या जाटांचें धुरीणत्व स्वीकारून तेथें किल्ले बांधिले, व नंतर बंडाळी करण्यास सुरुवात केली. स. १७१४ सालीं फर्रुखसियरनें याची बंडाळी बंद करण्याचा प्रयत्न केला. याच्या नंतर याचा मुलगा मोखमसिंह हा गादीवर आला.

पुरंदर कदंब—हा बनवासीच्या चंद्रवर्मा कदंबाचा पुत्र.

पुरंदरदास—(मृत्यु स. १५६४) कानडी कवि. ब्राह्मण. यांचें गांव सासवडजवळचा पुरंदरगड होय. माध्वसांप्रदायी. गुरु-व्यासराय. उपदेशकाल स. १५२५. ग्रंथ-' पुरंदरदासाचें कीर्तन ' या नांवानें याचा पदसंग्रह प्रसिद्ध आहे. याच्या पदांत विष्णुस्तुति व तत्त्वज्ञान असतें. हा गाणाराहि होता.

हा प्रथम सराफीचा धंदा करीत असे. पुढें कृष्णाच्या साक्षात्कारानें विरक्त झाला; आणि आपली सर्व संपत्ति दान दिली. यापुढील आयुष्य विठ्ठलनामसंकीर्तन करीत व त्यावर स्वतः पदें रचून तीं पदें गात घालविलें. विरक्त झाल्यानंतर हा पुष्कळ वर्षे पंढरीसच भिक्षा मागून राहत असे. हा प्रथम स्मार्त असून नंतर माध्व झाला असें सांगतात. यानें आपल्या पुष्कळ पद्यांत अद्वैताचें खंडण केलें आहे. हा स. १५३८ मध्यें विजयनगर येथें होता, आणि स. १५६४ मध्यें वैकुंठवासी झाला, असें मि. किटेल यानें लिहिलें आहे; आणि कर्नाटक कविचरित्रकार आर्. नरसिंहाचार्य यानेंहि याच्या विरुद्ध लिहिलें नाहीं (क. क. च. भा. २, पा. २३२).

याच्या पदाच्या शेवटीं पुरंदर विठ्ठल असें असतें. हा कर्नाटकाचा तुकाराम आहे. शिक्षित किंवा अशिक्षित कानडी लोकांना याचें एखादें तरी पद येत असतें. शिवाय एकनाथाचेहि कांहीं गुण यांत होते.

पुरीबाई—डाकुराजवळ उमरेट नांवाच्या गांवची बाई. या गुजराथी स्त्रीनें केलेलें ' सीतास्वरूपवर्णन ' नांवाचें काव्य प्रसिद्ध आहे.

पुरुकौशिन्—यानें स. ५९-८० पर्यंत राज्य केलें.

पुरुहूत—पांड्यांपैकीं वंशप्रदीपाचा पुत्र.

पुरुषोत्तम—यानें वल्लभ मताला अनुसरून ' प्रकाशितामृततरंगिणी ' नांवाची गीतेवर टीका लिहिली आहे. गुजराथी प्रिंटिंग प्रेसनें छापलेल्या गीतेवरील अनेक टीकांत ही टीका छापली आहे.

२. ' निजगुजसप्तक ' नांवाच्या मराठी ग्रंथाचा कर्ता. गुरु-नारायण (मं. त्रै. १२. ४. ले. ३०).

३. अकबर बादशहाचा सल्लागार. याच्यामुळें अकबरानें फार्सीबद्दल संस्कृत शब्द प्रचारांत आणले (मु. रि. २. ९८).

४. कलिंगाचा राजा. हारावली, त्रिकांडशेष व एकाक्षरी असे तीन कोश यानें केले.

पुरुषोत्तम दाजी पटवर्धन—(जन्म स. १७२९ सुमार-मृत्यु स. १७७६) हा एक पेशवाईतील प्रसिद्ध पुरुष होय. कृष्णंभट पटवर्धनाचा द्वितीय पुत्र.

हा सदैव आपल्या कामांत दक्ष व निर्भीड असे. जेव्हां गंगाबाई ही माधवरावासह पुरंदरास होती तेव्हां त्यांचेजवळ याला ठेवण्यांत आलें होतें. तेथें हा दारांत ढालतलवार घेऊन दिवसां सदा पहून असे व रात्रौ चौकीपहारे करीत सारी रात्र फिरत असे.

पेशव्यांनीं केलेल्या बहुतेक लढायांत हा हजर होता. लढाईत पेशव्यांना याचा फार उपयोग होत असे. कारण सांगितलेलें काम हा उत्तम रीतीनें पार पाडीत असे.

याची दृष्टि मोठी चाणाक्ष, धूर्त व चौकस असे. हा तापट आणि मानी होता. हा बराच विनोदी व थट्टेखोर असून कित्येक वेळां याच्या थट्टेचा अतिरेकहि होत असे. यास अंबें हा गांव श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे यांनीं इनाम दिला होता. यास दोन स्त्रिया असून पहिलीपासून एक कन्या झाली; व दुसऱ्या कुटुंबापासून हरिहरराव, कृष्णराव, विठ्ठलराव, रामराव व सदाशिव असे पांच पुत्र व पांच कन्या झाल्या (रा. अ. लागू कृत पुरुषोत्तम दाजी पटवर्धन अंबेकर चरित्र).

पुरुषोत्तम महादेव हिंगणे—(देवराव महादेव हिंगणे पाहा).

पुलकेशी (पश्चिम) चालुक्य—(स. ५५०-५६६) हा पश्चिम चालुक्यांच्या घराण्यापैकीं रणरागाचा पुत्र. पुलकेशी हा शब्द पुलिकेशी असाहि लिहिलेला आढळतो. यास वल्लभ अशी पदवी होती. हाच खरोखर या(बदामी)च्या पश्चिम चालुक्य घराण्याचा संस्थापक होय. याला सत्याश्रय व रणविक्रम असेंहि म्हणत. याच्या राणीचें नांव दुर्लभदेवी असें होतें.

कदंबवंशांतील एका शाखेची राजधानी बनवासी ही यानें जिंकल्याबद्दल ऐहोळ येथील शिलालेखांत निर्देश आहे. यानेंच बदामी (वातापी) काबीज केली. यानें अश्वमेध केला होता.

२. (स. ६१०-५५) पश्चिम चालुक्य घराण्यांतील पहिल्या कीर्तिवर्मन्‌चा हा मुलगा होय. स. ६१० मध्यें हा आपला चुलता मंगलीश याच्यानंतर गादीवर आला. याचें नांव सत्याश्रय पुलकेशी.

यानें गंग, आलुप, मौर्य (कोंकण), लात (दक्षिण गुजराथ), गुजर (उत्तर गुजराथ), कलिंग, कोसल, पल्लव (काँजेवरमचे) वगैरे राजांचा पराभव केला. याशिवाय यानें ठाणेश्वरच्या हर्षवर्धनाचा मोठा पराभव केला. हर्षाच्या पराजयाचें साल प्लीट स. ६१२ आणि स्मिथ व वैद्य स. ६२० मानतात. पण लाहणेर ताम्रपटावरून तो स. ६३०-३४ मध्यें झाला असावा (मं. त्रै. १३ पृ. १२-१३). परंतु शेवटीं पल्लव घराण्यांतील नरसिंहवर्मन् १ ला यानें वातापी घेऊन (स. ६४२) पुष्कळ वेळां पुलकेशीचा पराभव केला व याला ठार केलें.

स. ६५५ मध्यें याचा मुलगा पहिला विक्रमादित्य हा याच्यानंतर गादीवर आला (B.).

३. (स. ७३८ सुमार) लाट देशांतील जहागिरदार जयसिंहवर्म्याचा तिसरा पुत्र. हा मंगळराजानंतर गादीवर आला. हें घराणें बदामीच्या सोलंकीपैकीं होतें. हा गादीवर आल्यावर यानें अवनिजनाश्रय असें बिरुद धारण केलें. हा राजा असलेल्या कालांतील एक ताम्रपट कलचुरि संवत् ४८० (वि. सं. ७८६-स. ७३८) मधील मिळाला आहे. त्यांत पुढील माहिती मिळते. ताजिकांनीं (अरबांनीं) तलवारीच्या जोरावर सैंधव (सिंध), कच्छेल्ल (कच्छ), सौराष्ट्र (दक्षिण काठेवाड), चावोकट (चावडे), मौर्य, गुर्जर आदि राज्यें नष्ट करून दक्षिणमध्यें जात असतां प्रथम नवसरीवर स्वारी केली. त्या लढाईंत भयंकर लढाई होऊन ताजिकांवर जय मिळाला. त्यांच्या शौर्यावर खूष होऊन शौर्यप्रेमी वल्लभानें (बदामीचा सोलंकी राजा विजयादित्य किंवा विक्रमादित्य दुसरा यानें) त्यांना ' दक्षिणापथसाधार ', ' चलुक्किकुलालंकार ', ' पृथ्वीवल्लभ ' व ' अनिवर्तकनिवर्तयितृ ' अशीं चार बिरुदें अर्पण केलीं.

अरबांची ही लढाई खलीफा हेशामच्या वेळीं सिंधचा अधिकारी हाकीम जुनैदच्या सेनेनें केलेली असली पाहिजे. कारण खलीफा हेशामचा काळहि हि. १०५-१२५ (वि. सं. ७८०-७८८, स. ७२४-७४३) पर्यंतचा आहे. पुलकेशीला वि. सं. ७८८-७९६ (स. ७३१-७३८) यांच्या मध्यें राज्य मिळालें. ' फुतूहुल् बुल्दान् ' नांवाच्या अरबी तवारिखेंत लिहिलें आहे कीं, जुनैदनें आपलें सैन्य मरवाड (मारवाड), मंडळ (काठेवाड), दामलज (कामलेज जि. सुरत असावें), बरूस (भडोच), उज्जेन, मालिबा, बहरिमद (?), अलबेलमान (भीनपाल), जन्न (गुर्जर देश) यांवर पाठविलें होतें (इलियट हिस्टरी ऑफ इंडिया १. ४४१-४२). पुलकेशीनंतर राठोडांनीं लाट देश सोलंकीपासून जिंकला आणि ही शाखा संपली.

पुलिन किंवा **पुलिंद**—महाकवि बाणभट्टाचा पुत्र आणि कादंबरीच्या उत्तरार्धाचा कर्ता. (डॉक्टर स्टेनस् मॅन्युस्क्रिप्ट्स्, पृ. २९९; श्रीधर रा. भांडारकर यांचा दुसऱ्या दौऱ्याचा रिपोर्ट, पृ. ३९). पहिल्या ठिकाणीं पुलिन असें नांव असून दुसऱ्या ठिकाणीं पुलिन्द असें नांव आहे. नाथद्वारला एका हस्तलिखितावर पुलिंद असें पं. गौरीशंकर हि. ओझांना सांपडलें होतें (ना. प्र. स. १. २३६).

पुलोमायी आंध्र—(स. १०० सुमार) एक राजा.

२. (स. १२३-१५६) हा गौतमीपुत्र आंध्राचा मुलगा. कान्हेरी, नाशिक, कार्ले व उमरावती येथें याचे शिलालेख आहेत. त्यांत 'राज वासिष्ठपुत्र श्रीपुलोमायी' असें म्हटलें आहे. कान्हेरीच्या लेखांत यास ' श्रीवासिष्ठीपुत्र श्रीशातकर्णी ' असें म्हटलें आहे. नाण्यावरहि प्रायः असाच निर्देश आहे. पहिल्या रुद्रदामन् क्षत्रपानें याचा दोनदां पराभव केला. त्याचा हा जांवई झाला होता.

३. (स. १५६-१६३) याला शिवश्री पुलोमायी म्हणत. याचीं नाणीं व शिलालेख उपलब्ध आहेत. नाण्यांवर 'वासिष्ठीपुत्र शिवश्री शातकर्णी' असें यास म्हटलें आहे.

४. (स. २०१-२११) याचीं कांहीं नाणीं आहेत.

पुष्कराक्ष—हा काश्मीर देशाचा राजा. हा मलयकेतूच्या बाजूला असतां द्रोही म्हणून त्यानें याला ठार केलें, असें मुद्राराक्षसावरून कळतें. चंद्रगुप्ताला मगधसाम्राज्य मिळवून देणाऱ्या साहाय्यकांपैकीं हा एक असावा.

पुष्पगुप्त वैश्य—चंद्रगुप्ताच्या वेळचा सुराष्ट्र (काठेवाड)-चा अधिकारी. यानें तेथें सुदर्शन तलाव बांधला. याच्या मुलीशीं चंद्रगुप्त मौर्याचें लग्न झालें होतें (इंडि. अँटि. भा. ७, पृ. २६०-६२).

पुष्पदंत—जैनांचा नववा तीर्थंकर (तीर्थंकर पाहा).

पुष्यभूति—हा श्रीकंठ प्रदेशाचा (ठाणेश्वरचा) राजा.

हा शिवभक्त होता. याचा पुत्र नरवर्धन (हर्षचरित निर्णयसागर प्रत, पृ.९४-९६). हा बैसवंशी रजपूत होता.

पुष्यमित्र शुंग— (ख्रि. पू. १८३-१४८) ख्रि. पूर्वी १८५ चे सुमारास मौर्य घराण्यांतील शेवटला राजा बृहद्रथ याचा यानें वध करून शुंग घराण्याची स्थापना केली. हा मौर्यांचा सेनापति होता. याचा पुष्पमित्र असाहि उल्लेख आढळतो, परंतु पुष्यमित्र हाच उच्चार बरोबर असावा. या घराण्यांतील बऱ्याच राजांनीं आपल्या नांवापुढें मित्र असा शब्द जोडलेला आढळतो. याचें कारण म. म. हरप्रसादशास्त्री असें देतात कीं, शुंग घराणें पारसिक असून सूर्याचें उपासक असावें. परंतु हें घराणें सामवेदाचें उपासक असून यज्ञ करीत असे. एवढेंच नव्हे, तर यांनीं बुद्धधर्माच्या विरुद्ध ब्राह्मणधर्म पुन्हां स्थापण्याचा प्रयत्न केला. पुष्यमित्र हा ब्राह्मण असून राजगुरूच्या घराण्यांतील होता; आणि मौर्य घराण्यांतील शेवटचे राजे कमकुवत असल्यामुळें परकीय लोकांनीं राज्य घेऊं नये म्हणून यानें शेवटच्या राजाचा वध करून राज्याची स्थापना केली. कलिंगच्या खारवेल राजानीं याच्यावर दोनदां स्वारी करून याचा पूर्ण पराभव केला व राजधानींतून ऋषभदेवाची मूर्ति नेली.

यानें एक अश्वमेध यज्ञ करून अश्वाच्या रक्षणार्थ आपला नातू वसुमित्र यास पाठविलें होतें; आणि तेव्हां यानें सिंधूच्या बाजूस यवनांस जिंकलें (मालविकाग्निमित्र, अंक ५). यानें दोन अश्वमेध केले होते, यास अयोध्येच्या शिलालेखाचा पुरावा उपलब्ध झाला आहे. अश्वमेध केल्यावरहि हा सेनापति शब्द लावी (एपि. इंडि., २०. ५४).

यानें मगधापासून जालंदरपर्यंत बुद्धांचे सर्व विहार जाळून टाकले व बौद्धांना ठार केलें. तेव्हां कांहीं बौद्ध भिक्षू पळून दुसऱ्या राजांच्या हद्दींत राहावयास गेले (खारवेल पाहा).

याच्या मृत्यूनंतर याचा पुत्र अग्निमित्र गादीवर बसला. यानें बृहद्रथ मौर्याला ठार करून राज्य मिळवलें, असें सर्वत्र लिहिलेलें आढळतें. पण त्याचा तपशील बाणाच्या हर्षचरितांत स्कंदगुप्तानें हर्षाला केलेल्या उपदेशांत पुढीलप्रमाणें आढळतो: " सैन्याची पाहणी करण्याच्या मिषानें मूर्ख बृहद्रथ राजाला बोलावून सेनापति पुष्यमित्रानें त्यास ठार केलें. "

याच्याच कारकीर्दीत पतंजलीनें आपला व्याकरणभाष्य नांवाचा ग्रंथ लिहिला आणि याच्या हातून यज्ञ करवला, असें महाभाष्यांतील निर्देशावरून दिसतें.

पुहकर—(काव्यकाल स.१६१५) हिंदी कवि. प्रतापपुऱ्याच्या मोहनदास कायस्थाचा मुलगा. काव्यरसरतन. याच्या सरस काव्यरचनेमुळें जहांगीरनें याला बंधमुक्त केलें.

पुंडरीक विट्ठल—(ग्रंथकाल स. १५७६) ' रागमाला ' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता. पिता-धर्म व माता-नागांबा. अकबराच्या वेळच्या मानसिंहाचा भाऊ माधवसिंह राजाचा यास आश्रय होता. रागमालेशिवाय यानें नर्तननिर्णय, रागमंजरी, शीघ्रबोधिनी, नाममाला व षड्रागचंद्रोदय हे ग्रंथ लिहिले. 'यावनपरिपाटीअनुक्रम'चा कर्ता दलपतिराय यासहि याचा आश्रय होता.

पूज्यपाद—(स. ६०० सुमार) जैनांचा प्राचीन गुरु व कानडी ग्रंथकारांनीं पूज्य मानलेला प्राचीन आचार्य. चामुण्डरायानें याच्यासंबंधीं कवि, तार्किक, व्याकरणकार, गगनगमनसामर्थ्यवान् व पूज्य आचार्य असा उल्लेख केला आहे. पण कानडी वाङ्मयांत याचा एकहि ग्रंथ आज उपलब्ध नाहीं. श्रवणबेळगोळच्या शासनावरून (क्र.६४) असें दिसून येतें कीं याला प्रथम देवनंदी असें म्हणत. नंतर याच्या बुद्धिमाहात्म्यामुळें यास जिनेंद्रबुद्धि असें म्हणूं लागले. नंतर याच्या अत्यंत पूज्यतेमुळें पूज्यपाद असें म्हणूं लागले (श्रवणबेळगोळा २५४). हा वैद्यशास्त्रांतहि प्रवीण होता (श्रवणबेळगोळ २५८). हा पूर्वविदेहांत जाऊन परलोकवासी झाला. नैनेंद्रव्याकरण आणि पाणिनीच्या सूत्रावरील जिनेंद्रबुद्धीचा न्यास-ग्रंथ यानेंच केला आहे, असें राजवली कथाकार देवचंद्र चुकीनें म्हणतो. जिनसेनानें हरिवंशाच्या प्रारंभीं जिनेंद्रव्याकरणाचा उल्लेख केला आहे. जिनसेनाचा काळ स. ७८३ निश्चित झालेला आहे. अकलंकदेव (स. ७५०). जयादित्यवामनानें (स. ७०० सुमार) काशिकेंत जैनेंद्रसूत्रें उद्धृत केलीं आहेत. यावरून पूज्यपादाचा काळ स. ६०० असावा (क. क. च. भा. १, पा. ५). याशिवाय यांचें समाधिशतक (संस्कृत) व कल्याणकारक (संस्कृत) हे ग्रंथ दिसतात. पहिल्या ग्रंथावर मेघचंद्राचें (स. ११४८) कानडी व्याख्यान उपलब्ध आहे, व दुसरा वैद्यकाचा ग्रंथ असून त्याचें जगद्दळ सोमनाथकृत कानडींत भाषान्तर असून त्याचें नांव कर्नाटककल्याणकारक असें आहे. जगद्दळ सोमनाथानें पूज्यपादाच्या कल्याणकारक नांवाच्या संस्कृत ग्रंथाविषयीं असें म्हटलें आहे कीं, बाहर, सिद्धसार, चरक इत्यादि वैद्यकग्रंथांपेक्षांहि पूज्यपादाचा कल्याणकारक ग्रंथ चांगला आहे. यांतील औषधयोजना मद्य, मांस व मधु (मध) यांनीं वर्जित आहे (क. क. च. भा. १, पा. १५९, १६५).

पूर्णदास ऊर्फ बाबा उसपकर (राजाध्यक्ष)—(स. १७८८ सुमार– स. १८७०) हा कौंडिण्यगोत्री सारस्वत ब्राह्मण असून वयाच्या ५० व्या वर्षी ह्यानें सावंतवाडी संस्थानांतील उसप तर्फा, तेथील बंडामुळें सोडला व हा बक्षीच्या आश्रयास केरी येथें येऊन राहिला. येथें केरीकरांनीं याच्या चरितार्थाची सोय करून दिली. हा सात्त्विक वृत्तीचा व मनमिळाऊ असून ह्याचा प्रपंचापेक्षां परमार्थाकडेच ओढा होता. याला दत्तसंप्रदायांतील एका सत्पुरुषाचा उपदेश झाला व तेव्हांपासून याच्या अंगीं कवित्वशक्तिहि वास करूं लागली. ह्यानें 'ज्ञानधन', 'स्वात्मानुभव' व 'पूर्णसार' हे ओवीबद्ध ग्रंथ लिहिले (म. क. च. भा. १, पृ. ४६३).

पूर्णपाल—सिसोदें येथील राणाशाखेपैकीं हा नागपालाचा पुत्र. याला पुण्यपाल, पुणपाल व कर्णपाल असेंहि म्हणत. याचा पुत्र पृथ्वीमल्ल.

पूर्णपाल परमार—(स. १०४२–४५) आबूच्या परमार घराण्यापैकीं धंधुकाचा पुत्र. याच्या वेळचे तीन शिलालेख मिळाले आहेत. त्यांपैकीं दोन वि. सं. १०९९ (स. १०४२) मधील आणि तिसरा वि. सं. ११०२ (स. १०४५) मधील आहे. उत्पलराजापासून पूर्णपालापर्यंतची वंशावळ वि. सं. १०९९ मधील शिलालेखांत दिली आहे. याचा उत्तराधिकारी धाकटा भाऊ कृष्णराज झाला.

पूर्णप्रज्ञ—मध्वाचार्यांचें नांव.

पूर्णब्रह्म—(ग्रंथकाल स. १७८९) मराठींत श्लोकबद्ध 'रसप्रकरण' हें सोनें तयार करण्याचें प्रकरण यानें लिहिलें (मं. शके १८३६ वा. इ. ले. ५३).

पूर्णया—(स. १७३५ सुमार– स. १८१५) हा माध्वसंप्रदायी वैष्णव ब्राह्मण असून ह्याचा जन्म मद्रास इलाख्यांत झाला. ह्याचे आईबाप प्रथम शैव होते, परंतु माध्वसंप्रदायी पूर्णस्वामीवर त्यांची भक्ति जडल्यावर ते वैष्णव झाले. हैदरअल्लीच्या सैन्यांत हा प्रथम नोकर होता, परंतु पुढें हा हैदरचा एक प्रमुख मुत्सद्दी झाला. ह्यास तामील, कानडी, मराठी व हिंदुस्थानी भाषा येत. हैदरानें ह्यास खजिन्याचा व सैन्यास सामान पुरविणाऱ्या खात्याचा मुख्य अधिकारी नेमून मरुहळ्ळी हें गांव इनाम दिलें. हैदरच्या प्रत्येक स्वारींत हा असे. हैदरच्या मृत्यूनंतर त्याच्या मृत्यूची बातमी ह्यानें सैन्यांत गडबड होऊं नये म्हणून गुप्त ठेविली, व टिपू आल्यानंतर ती बातमी बाहेर प्रसिद्ध केली. टिपूची ह्याजवर फार मर्जी होती, परंतु ह्यास मुसलमान करण्याची टिपूची इच्छा दिसतांच हा तेथून युक्तीनें निसटला. स. १७९२ त कॉर्नवालीसच्या श्रीरंगपट्टणच्या स्वारींत ह्यानेंच टिपूचा खजिना वांचविला. पुढें हा इंग्रजांचा दोस्त झाला. म्हैसूरचें राज्य पूर्वीच्या हिंदु राजघराण्याकडे देण्यांत आल्यावर तेथें ह्यासच दिवाण नेमलें. तेथें ११ वर्षांत ह्यानें २॥ कोटी रु. शिल्लक टाकले. ह्याचा मुलगा सर कृष्णमूर्ति हाहि म्हैसूरचा दिवाण होता.

पूर्णवर्मन् मौखरी—(स. ६१२–६२८) मौखरी वंशांतील अवंतिवर्मन्चा हा पुत्र होय. याला गृहवर्मन् नांवाचा एक भाऊ होता. त्याच्यानंतर हा गादीवर आला.

यानें आपल्या पदरीं बौद्ध लोकांना आश्रय दिला होता. बौद्ध धर्माविषयीं याला आदर वाटत असे. याच्या वेळीं मौखरींच्या सत्तेस उतरती कळा लागून याच्यानंतर मगध येथें माधवगुप्त हा राज्य करूं लागला (मौखरी by E. A. Pires, p. 129–133).

पूर्णानंद—(स. १५७८–१६२८ सुमार) सहजानंदांचा शिष्य (पूर्वाश्रमींचा नारायण). यानें अवधूतगीतेवर एक टीका लिहिली आहे. ही टीका आपला एक शिष्य चिदानंद (बळवंत गोविंद बुळबुळे) याचेसाठीं लिहिली, असें कवि म्हणतो. याचा 'शिवपार्वतीपरिणय' या नांवाचा एक ग्रंथ आहे. त्या टीकेचे एकंदर सात अध्याय आहेत (मं. श. १८३५ वा. इ. ले. २७ व १८३६ वार्षिक इ. ले. २६). हा कऱ्हाडचा असावा.

पृथाबाई—अजमेरच्या दुसऱ्या पृथ्वीराजाची ही कन्या. दिल्लीच्या पृथ्वीराज चौहानाची नव्हे. हिचा विवाह मेवाडचें राज्य घालविणाऱ्या डुंगरपूरच्या सामंतसिंहाशीं झालें. सामंतसिंहास समतसी म्हणत.

पृथिवीसेन क्षत्रप—हा रुद्रसेन महाक्षत्रपाचा ज्येष्ठ पुत्र. हा महाक्षत्रप झाला नाहीं. क्षत्रपच राहिला. यांच्यांत क्रमानें भावाला राज्याचा वारसा मिळण्याची पद्धत होती. त्यामुळें मुलाला राज्याधिकार न मिळतां भावाला मिळे. भाऊ नसला तर मुलाला मिळे.

पृथुयशस् गंग—हा पश्चिम गंग घराण्यांतील शिवमाराचा पुत्र. याचा आश्रय अमोघवर्ष दिंडिकोजेरिगनें घेतला. यानें वरगुण पांड्याचा श्रीपूर येथें पराभव केला.

पृथ्वीधर—याला पेथडकुमार असेंहि म्हणत. हा जैनधर्मी असून धारच्या शेवटल्या जयसिंह परमाराचा मंत्री होता. रत्नमंडनगणीनें केलेल्या 'सुकृतसागर' नांवाच्या ग्रंथांत याच्या अनेक सत्कृत्यांचें वर्णन केलें आहे. याच्या पित्याचें नांव दोदाशाहा असें असून हा श्वेतांबरी जैन होता. हा नांदुरी येथील राहणारा होय. हें नांदुरी म्हणजे खान.

देशांतील नंदुरबार असावें. हा दारिद्र्याला कंटाळून नेमाड-मधून माळव्यांतील मांडवगडीं आला व तेथें मीठमिरचीच्या दुकानदारीपासून वाढत जाऊन शेवटीं जयसिंह परमाराचा दिवाण झाला. याचा गुरु धर्मघोषमुनि यानें दारिद्र्यावस्थेंत याच्याकडून शपथ घेवविली होती कीं, श्रीमंती आल्यास मी आपल्या संपत्तीचा विनियोग धर्मकृत्यांत करीन. त्याप्रमाणें यानें शेंकडों जैनमंदिरें बांधलीं. खुद्द मांडव येथें सातशें मंदिरें बांधलीं व तीनशें मंदिरांवर सोन्याचे कळस चढवले. मांडव येथें अनेक मोठाल्या मशिदी पाहिल्या म्हणजे या गोष्टीची आजहि खात्री पटते.

याच्या मनांत आलें कीं, रामचंद्रराव जाधवाच्या राजधानींत देवगिरींत एक जैन मंदिर बांधावें. पण राजा व त्याचा प्रधान हेमाद्रि हे वैदिक असल्यामुळें ही गोष्ट शक्य नव्हती. पण यानें ओंकारमांधाता येथें हेमाद्रीच्या नांवानें ब्राह्मणभोजनें घातलीं आणि त्या जोरावर देवगिरीस जाऊन राजाकडून परवानगी मिळवली. हेमाद्रीनें हरकती केल्या असतां युक्तीनें त्यांचा परिहार केला, अशा अनेक गोष्टी सुकृतसागरांत आढळतात (मं. त्रै.६ पा.१९–२२).

पृथ्वीपति गंग—पश्चिमगंगांपैकीं अविनीताचा पुत्र.

२. (स. ८४०–८७८) हा पश्चिम गंग घराण्यांतील दुसऱ्या शिवरामाचा पुत्र. यास दिंडिक असें म्हणत. हा पहिला अमोघवर्ष राष्ट्रकूट व अपराजित पल्लव यांचा समकालीन होता. हा वरगुण पांड्याशीं लढतांना मृत्यु पावला.

३. (स. ९००–४०) हा पश्चिम गंगांपैकीं दुसऱ्या मारसिंहाचा पुत्र. याला शैंबियन मावलि वाणराय अशी पदवी पहिल्या परांतक चोलानें दिली व बराचसा देश बहाल केला.

पृथ्वीमल्ल—हा सीसोदें येथील राणाशाखेपैकीं पूर्णपालाचा पुत्र. याला पेथड, फेखर, व पृथ्वीपाल असेंहि म्हणत. याचा पुत्र भुवनसिंह.

पृथ्वीराज—हा मेवाडच्या महाराणा रायमलचा पुत्र. याची पत्नी तारादेवी. पृथ्वीराजाबरोबर ही तोड येथें जाऊन पठाणांशीं झालेल्या युद्धांत हिनें जातीनें भाग घेतला (रा. इ. पा. ७७).

२. (स. १५०० सुमार) एक हिंदी कवि. बिकानेरचा राजा राजसिंहाचा भाऊ. याची पत्नी किरणमयी. यानें अकबराच्या संमतीनें प्रतापसिंहास लिहिलेल्या पत्रांतील कांहीं दोहे अद्यापि प्रसिद्ध आहेत (क. कौ. १).

पृथ्वीराज गुहिलोत—(स. १५०९ सुमार) मेवाडचा राणा रायमल्लाचा पुत्र. यानें संग्रामसिंह नांवाच्या आपल्या भावावर हत्यार उपसल्यामुळें रायमल्लचा यावर कोप होता. म्हणून हा कुंभलगड येथें राहत असे.

याचा भाऊ राजमल्ल टोडाच्या सुरताणचा पाठलाग करीत असतां मारला गेला. नंतर त्यानें आपली मुलगी तारादेवी याला दिली; व याच्या साहाय्यानें लल्लाखां पठाणाला ठार करून टोडाचें राज्य सुरताणला परत दिलें. अजमेरचा सुभेदार मल्लखा चालून आला त्यालाहि यानें ठार केलें; व त्याचा किल्ला गढबीठली ताब्यांत घेतला व मग कुंभलगडला आला.

सारंगदेवानें केलेली कामगिरी पाहून महाराण्यानें त्याला कित्येक लाखांची जहागीर दिली होती. त्याबद्दल यानें पित्याकडे तक्रार केली. पित्यानें 'तुला पसंत नसेल तर तुझें तूं पाहा' असें कळविलें, तेव्हां यानें सारंगदेवाच्या मैसरोडगडावर स्वारी केली. तेव्हां तो तेथून पळाला आणि सूरजमलचा साहाय्यक झाला. ते दोघे मांडूच्या सुलतान नासिरुद्दीनकडे मदत घेण्याकरितां गेले. गंगारामकृत हरिभूषण महाकाव्यांत म्हटलें आहे कीं, 'महाराणा रायमल्लनें दरबारांत सांगितलें कीं, सूर्यमल्लच्यामुळें फार दुःख होतें. तो जिवंत आहे तोंपर्यंत मला राज्यहि सुखदायक होऊं शकत नाहीं.' तेव्हां यानें त्याला मारण्याचा विडा उचलला. सुरजमल व सारंगदेव यांनीं सुलतानाच्या साहाय्यानें चितोडवर स्वारी केली. त्या युद्धांत अगदीं यानें शेवटीं येऊन लढाईचा रंग पाटलविला. दुसऱ्या दिवशीं पुनः युद्ध होऊन याचा जय झाला. सुरजमल सादडीला गेला; आणि सारंगदेव बाठरडे येथें राहण्यास गेला. पुढें सुरजमलनें कांठल येथें जाऊन नवें राज्य स्थापन केलें. तें प्रतापगड या नांवानें सध्यां प्रसिद्ध आहे. महाराण्यानें सारंगदेवाचा पुत्र जोगा यास बाठरडा आदि जहागीर देऊन संतुष्ट केलें. पृथ्वीराजाला आनंदाबाई नांवाची एक बहीण होती. ती सिरोहीचा राव जगमाल यास दिली होती. तो तिला त्रास देई. यानें तेथें जाऊन त्याची समजूत घातली. या वीरपुरुषाचा तेथें सन्मानहि चांगला झाला. पण परत निघतांना याला तीन गोळ्या दिल्या, आणि त्यांची फार प्रशंसा केली. सरळहृदय पृथ्वीराजानें कुंभलगड जवळ आल्यावर त्या तोंडांत टाकल्या. पण त्या गोळ्या विषारी असल्यामुळें याचा देहान्त झाला. याच्याबरोबर याच्या सोळा स्त्रिया सती गेल्या.

पृथ्वीराज चौहान—(स. १०७८–९३) हा विग्रहराज ऊर्फ तिसऱ्या बीसलचा मुलगा. याच्या आईचें नांव राजदेवी.

२. (स. ११६३–सुमार) हा जगदेवाचा पुत्र. जगदेव हा सोमेश्वराचा थोरला भाऊ होता. याच्यानंतर सोमेश्वर गादीवर आला. वीसलदेवाचा मुलगा अपरगांगेय हा अज्ञान असल्यामुळें हा गादीवर आला.

३. (११६८–९२) राय पिठोरा असें याचें दुसरें नांव होतें. याचें चरित्र चंदभाटाच्या रासामध्यें विस्तृतपणें दिलें आहे. पण तें ऐतिहासिक दृष्ट्या संशयित आहे. दुसरें एका काश्मीरी पंडितानें लिहिलेलें 'पृथ्वीराजविजय' नांवाचें संस्कृत काव्य आहे, पण त्यांत याची शेवटपर्यंत हकीकत आलेली नाहीं. तें पृथ्वीराजाच्या दरबारांतीलच एका पंडितानें लिहिलेलें दिसतें, त्यामुळें त्यांतील कांहीं भाग विश्वसनीय वाटतो. याशिवाय हंमीर नांवाचें एक काव्य प्रसिद्ध झालें आहे. त्यांत पृथ्वीराजाच्या एका हंमीर नांवाच्या वंशजाची हकीगत वर्णिली आहे. यांशिवाय कांहीं समकालीन लेखहि आढळतात. दिल्लीच्या अनंगपाळाचीं मुलगी याची रासाप्रमाणें माता होती. पण वरील दोन्ही काव्यांत याची माता हैहय राजपुत्री कर्पूरदेवी दिली आहे. हा लहानपणीं अज्ञान होता, त्या वेळीं याची आई राज्यकारभार पाहत असे. गौरीशंकर ओझांनीं याचा जन्म स. ११६८ मानला आहे. याचा जन्म अनहिलवाड येथें झाला (पृथ्वीराजविजय). याची पहिली राणी इच्छिनी व शेवटली राणी संयोगिता. रासाप्रमाणें हें शेवटलें लग्न स. ११८१ त झालें. याच्या शूर सेनापतीचें नांव कैमास व भुवनैकमल्ल. यानें भीम चालुक्य, परमर्दिदेव चंदेल्ल (स. ११८२) व जयचंद गाहडवाल यांचा पराभव केला. अजमेर आणि दिल्ली अशीं याच्या राजधानीचीं ठिकाणें होतीं.

याच्या वेळीं स. ११७५ मध्यें शिहाबुद्दीन घोरीनें हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. प्रथम त्यानें मुलतान व उच्छ जिंकलें. स. ११७८ मध्यें अनहिलवाडच्या भीम बघेलानें धर्मवेडानें लढणाऱ्या याचा चांगलाच पराभव केला. तरी त्यानें स. ११७९ मध्यें पुनः पेशावरवर स्वारी करून खुस्रव मलीकच्या सुभेदारापासून तें शहर जिंकून घेतलें; व स. ११८१–८५ पर्यंत लाहोरपर्यंतचा मुलूख ताब्यांत घेऊन आपली सत्ता स्थिर केली. स. ११९०–९१ त दिल्लीच्या पृथ्वीराज चौहानाचें भातिंदा नांवाचें ठाणें घेतलें. पण पृथ्वीराजानें मोठ्या सैन्यानिशीं येऊन कर्नूलजवळील तरौरी येथें शिहाबुद्दीन घोरीचा पराभव केला आणि त्याला याचा भाऊ गोविंदरायानें जखमी करून पळावयास लावलें; व तेरा महिने भातिंद्यास वेढा देऊन तें ठाणें परत घेतलें. पण स.११९२ मध्यें शिहाबुद्दीननें याला पुनः तरौरीजवळ गांठलें; आणि बाजूवर व पिछाडीस हल्ले करून पळाचें ढोंग करून याच्या सैन्यास संध्याकाळीं चार वाजेपर्यंत दमविलें. हिंदु थकल्यावर ताज्या दमाच्या सैन्याकडून याचा पराभव केला. पृथ्वीराजहि हत्तीवरून उतरून घोड्यावरून पळत असतां सरस्वती नदीजवळ मुसलमानांचे हातीं लागून मारला गेला.

तेव्हां दिल्लीपर्यंतचा मुलूख मुसलमानांच्या ताब्यांत गेला. अजमेर फक्त करभार घेऊन याच्या मुलाच्या ताब्यांत दिलें. हिंदूंचा शेवटला पराक्रमी सम्राट् म्हणून याचें नांव पूज्य मानलें जातें.

चौहानाची वंशावळ—१ दुर्लभ (स. ९७७), २ गोविंद (स. ९८८), ३ वाक्पति (स. १००३), ४ वीर्यराम, ५ श्रीचंद्र अथवा चामुंड (स. १०३३), ६ गोपेंद्र, ७ विग्रहराज ऊर्फ वीसल ३ रा (स. १०६३), ८ पृथ्वीराज १ ला (स. १०७८), ९ अजयदेव (स. १०९३), १० अर्णोराज अथवा आना, ११ विग्रहपाल अथवा वीसल ४ था, १२ पृथ्वीराज २ रा, १३ सोमेश्वर १४ पृथ्वीराज ३ रा (स. ११६९–९२).

इतके दिवस मुसलमानांचा हिंदुस्थानांत कायमचा प्रवेश होईल कीं नाहीं, याची शंका होती, तिचें निराकरण या प्रसंगानें झालें व हिंदूंचें साम्राज्य नाहींसें झालें (चंदवरदाई पाहा).

पृथ्वी-राम रट्ट—(स. ९४०) रट्ट घराण्यांतील मेरडाचा हा मुलगा. स. ९४० च्या सुमारास हा सौंदत्ती येथें राष्ट्रकूटांचा प्रतिस्पर्धी म्हणून राज्य करीत होता.

यानें सौंदत्तीच्या रट्ट घराण्याची स्थापना केली. याच्यानंतर याचा मुलगा पित्तुग हा गादीवर आला (B.).

हा मैळापतीर्थ साधूच्या करीयपंथाचा एक उपदेशक होता.

पृथ्वीव्याघ्र—हा निषादांपैकीं मुख्य होता. यास पूर्व चालुक्य राजा विष्णुवर्धन (स.७०९–७४६) याच्या राज्यांतून उदयचंद्र पल्लवसेनापति यानें पराभूत करून हाकून दिलें (नंदीवर्मन् पल्लवमल्ल पाहा).

पृथ्वीषेण वाकाटक—(स. ३४०–३९०) हा वाकाटकवंशांपैकीं पहिल्या रुद्रसेनाचा पुत्र. यानें प्रथम कुन्तलदेश जिंकला (अजिंठा शिलालेख). हा गुप्तांपैकीं समुद्रगुप्ताचा समकालीन होता.

२. (स. ४४५–६५) हा वाकाटकवंशांतील दुसरा पृथ्वीसेन होय. हा नरेन्द्रसेनाचा पुत्र.

पृथ्वीसिंग—(स. १७४७–८६) हा बांसडा

संस्थानांतील एक राजा होय. हा कुशलसिंहाच्यानंतर होऊन गेला.

यानें सुंठचें संस्थान लुटून नैर्ऋत्येकडील चिलकारी किंवा शेरगड हा जिल्हा घेतला. अठराव्या शतकाच्या शेवटीं हें संस्थान मराठ्यांच्या ताब्यांत असून धारच्या राजाला खंडणी देत होतें. हा सुद्धां प्रसिद्ध राजा होऊन गेला.

२. (रसनिधि पाहा).

पेदोबमाम्बा—विजयनगरच्या दुसऱ्या वेंकटपतिदेवाची ही बायको होय. हिच्या बापाचें नांव जिलेल्ला रंगराजा असें होतें.

पेद तिम्म आरविदु—(स. १५६५ सुमार) हा विजयनगरच्या रामराय आरविदूचा मुलगा. निजामशाहाचे विरुद्ध लढतांना हा प्रसिद्धीस आला.

पेद्यार्य—मल्लिनाथ कोलाचलाचा थोरला मुलगा. याचा धाकटा भाऊ कुमारस्वामिन्. कुमारस्वामिन्नें आपल्या प्रतापरुद्रयशोभूषणावरील रत्नापण टीकेच्या शेवटीं याच्या विद्वत्तेची फार प्रशंसा केली आहे. याला पेद्दीभट्ट असेंहि म्हणत.

पेद व्यंकट आरविदु—(स. १६३०–४२) हा विजयनगरच्या रामराय आरविदूचा नातू व श्रीरंगरायाचा मुलगा. हा दुसऱ्या राम आरविदूनंतर गादीवर आला. पत्नी बंगारा.

पेम्मासनी पेद तिम्मराज—विजयनगरच्या श्रीरंगरायाचा व दुसऱ्या व्यंकटाद्रीचा मंत्री.

पेरमादि सिंद—(स. ११४४) हा सिंद घराण्यांतील दुसऱ्या आचुगीचा मुलगा.

यानें दुसऱ्या जयकेशी कदंबाचा पाठलाग केला व त्यास पळवून लाविलें; आणि होयसळांचें राज्य घेतलें. यानें होयसळ बल्लाळ राजा बिट्टिग आणि विष्णुवर्धन यांचा पराभव करून त्यांची राजधानी द्वारसमुद्र ही घेतली असावी.

पेरॉन—(स. १७५५–१८३४) हा फ्रेंच मनुष्य शिंद्यांच्या लष्करांत डीबाईनचा दुय्यम अधिकारी होता. याचें मूळ नांव पीअरे कुईलीअर. हा एक फ्रेंच व्यापारी होता. ह्याचें गलबत मलबार किनाऱ्यावर फुटल्यामुळें हा तेथून उत्तरेस गेला व ग्वाल्हेरच्या राज्यांत सैन्यांत शिपाई राहिला.

पुढें (स. १७९०) डीबाईनच्या हाताखालीं गेला. नंतर याला कानूंदच्या किल्ल्यावर पाठविलें. तेथें डीबाईनच्या कुमकेस आलेल्या इस्मायल बेगचा यानें पराभव केला व स. १७९२ त तो किल्ला आपल्या हातीं घेतला. यानंतर याची बढती झाली व स. १७९६ त याला सर्व सैन्याचा सेनापति केलें. नंतर हा स्वदेशीं जाऊन आला.

शिंद्यांच्या मनांत स. १८०२ सालीं याच्याबद्दल संशय आला. हा दौलतरावाच्या विरुद्ध इंग्रजांशीं अलीगडच्या लढाईपासूनच फितुरी करूं लागला (स. १८०३) व लढण्याऐवजीं मागें मागें हटूं लागला. त्यामुळें शिंद्यानें याची सेनापतीची जागा व जहागीर जप्त केली, व अंबाजी इंगळ्यास दिली. याचा व पेरॉनचा द्वेष होता. अखेर पेरॉन आपणच इंग्रजांना मिळाला व आपली सर्व मालमत्ता घेऊन इंग्रजी मुलखांतून लखनौस गेला. शिंद्यांच्या इंग्रजांबरोबरील या वेळच्या सर्व लढायांत पेरॉननेंच फितुरी करून शिंद्यांचा नाश केला. यानें एकदां उजैनच्या लढाईंत दौलतरावानें बोलाविलें असतां सैन्यच धाडलें नाहीं. हा पुष्कळ पैसा घेऊन फ्रान्समध्यें परत गेला व स.१८३४ सालीं मेला.

पेरुनर किल्ली चोल—(स. १२५–५०) हा चोलांचा पूर्वज. यानें राजसूय यज्ञ केला. यानें पहिल्या आदन चेराशीं युद्ध केलें. त्यांत हा मारला गेला.

२. (स. १२०० सुमार) हा चोलांपैकीं एक राजा. यानें सेय चेराशीं युद्ध केलें. राजसूय यानें केला असावा.

पेरुभट्ट—हा जगन्नाथ पंडिताचा पिता व गुरु. हा ज्ञानेंद्र भिक्षूपासून वेदान्त, महेंद्रापासून न्यायवैशेषिक, खंडदेवापासून मीमांसा, व वीरेश्वर शेषापासून महाभाष्य शिकला होता (रसगंगाधर उपो.).

पेरु मानडी—गंगमंडळांतील एक राजा. याचा राजाधिराज चोलानें पराभव केला व तेथील जैनमंदिरें लुटलीं.

पेरुंजिंग पल्लव—(स. १२४४–६४) एक पल्लव राजा. यानें तिसऱ्या रामराजा चोलाविरुद्ध बंड करून त्यास पकडलें. परंतु म्हैसूरच्या दुसऱ्या नरसिंह होयसलनें आपल्या जांवयाला म्हणजे रामराज चोलाला सोडवलें.

पेर्मादि कलचुरी—(स. ११२८) हा कल्याणीच्या कलचुरि घराण्यांपैकीं जोगमचा पुत्र. हा तिसऱ्या सोमेश्वर पश्चिम चालुक्याचा मांडलिक होता.

पेर्मादि (पेम्म) सिंद—(स. ११४४–६३) येलबुर्ग येथील सिंद घराण्यांतील दुसऱ्या आचचा मुलगा. स. ११४४ मध्यें हा आपल्या बापानंतर गादीवर आला.

यानें कुल-शेखर, चट्ट, गोव्याचा दुसरा जयकेशिन् कदंब, विष्णु-वर्धन वगैरेंचा पराभव केला. स. ११६३

मध्यें याचा धाकटा भाऊ चावुंड २ रा हा गादीवर आला (B.).

पेर्मादि शिवचित्त कदंब—(स. ११४७–४८) हा गोव्याच्या कदंब घराण्यांतील दुसऱ्या जयकेशिन्‌चा पुत्र. कामभूपाची मुलगी कामलादेवी ही याची पत्नी होती.

पेशवे घराणीं—(छत्रपतींचीं).

१. रांझेकर—१ शामराज नीळकंठ रांझेकर (स. १६५६–५९).

२. नरहरि आनंदराव (स. १६६१ आगष्ट-१६६२ एप्रिल).

३. पिंगळे—मोरो त्रिमल पिंगळे (स. १६६२–८२), २ नीळकंठ मोरेश्वर पिंगळे (स. १६८२–१७०८), ३ बहिरव मोरेश्वर पिंगळे (स. १७०८–१३).

४. भट–१ बाळाजी विश्वनाथ (स. १७१४–२०), २ बाजीराव बल्लाळ (स. १७२०–४०), ३ बाळाजी बाजीराव (स. १७४०–६१), ४ माधवराव बल्लाळ (स. १७६१–७२), ५ नारायण बल्लाळ (स. १७७२–१७७३ आगष्ट खून), ६ रघुनाथराव बाजीराव (स. १७७३ आगष्ट–सुमार वर्ष), ७ गंगाबाई नारायणराव (स. १७७४), ८ सवाई माधवराव नारायणराव (स. १७७४–९५ आक्टोबर २७), ९ चिमाजी माधवराव (रघुनाथरावाचा दुसरा मुलगा. दत्तक स. १७९६ मे–आगष्ट), १० बाजीराव रघुनाथ (स. १७९६–१८१८ पलायन. मृ. १८५१), ११ धुंडिराज बाजी ऊर्फ नानासाहेब (स. १८५७).

पोचीराजु—तिसऱ्या प्रतापरुद्र काकतीयाचा मुख्य प्रधान.

पोटय्या—(ग्रंथकाल स. १४६६) एक संस्कृत कवि. हा जातीचा ब्राह्मण होता. गोदावरीच्या तीरीं राजमहेंद्री प्रांतांत कादंबरी म्हणून गांव आहे, तेथें हा राहत असे. स. १४६८ मध्यें यानें एक मोठा ग्रंथ लिहिला. त्याचें नांव ' प्रसंगरत्नावली ' असें आहे, व त्यांत ८३ प्रकरणें आहेत. कविचरित्रांत या सर्व प्रकरणांचीं नांवें लिहिलीं आहेत.

पोन्न—(स. ९५०) कानडी कवि. हा जैन होता. पोन्न, पोन्निग, पोन्नमय्य, सवण, कुरुळ-गळ सवण अशा नांवांनीं याला संबोधितात. याचा गुरु–इंद्रनंदी. कृष्णराज राष्ट्रकूटानें यास उभयचक्रवर्ति अशी पदवी दिली होती. ग्रंथ–शांतिपुराण, जिनाक्षरमाले.

शांतिपुराणांतल्या एका उल्लेखावरून असें दिसतें कीं, याचा ' रामकथा ' अथवा ' भुवनैकरामाभ्युदय ' नांवाचा एक चौदा आश्वासांचा ग्रंथ असावा. पण तो उपलब्ध नाहीं. याचा आश्रयदाता कृष्णराज हा राष्ट्रकूटांपैकीं तिसरा असावा. कानडींतील पम्म, पोन्न व रन्न यांना रत्नत्रय असें म्हणतात.

शांतिपुराणांत जैन तीर्थंकर सोळावा शांतिनाथ याचें चरित्र चंपूच्या पद्धतीनें वर्णिलें आहे. जिनाक्षरमाले हे वर्णक्रमानें कपासून ळपर्यंत वर्ण प्रारंभीं व अंतीं येतील अशा पद्धतीनें केलें आहे (क. क. च. भा. १, पा. ४०).

पोरस—(ख्रि. पू. ३२७) हा मध्य पंजाबचा राजा होता. सिकंदरची हिंदुस्थानावर स्वारी आली तेव्हां हा राज्य करीत होता. तक्षशिलेचा आम्भी ऊर्फ आम्फिस व इतर क्षुद्र राजे सिकंदरच्या आपण होऊन स्वाधीन झाले. पण हा तसा राजा नव्हता. सिकंदर झेलम उतरून आल्यावर त्यानें याला नजराणा घेऊन येण्याचा निरोप धाडला. पण यानें ' सेना घेऊन येतों ' म्हणून उलट कळवलें. याची सेनाहि मोठी व व्यवस्थित होती. याच्या सैन्याचे मोर्चे झेलमच्या किनाऱ्यावर लागले. सिकंदरनें सर्व धोरण पाहून नीतीचा अवलंब केला. एका अंधाऱ्या रात्रीं पाऊस पडत असतां आपल्या छावणीपासून १६ मैलांवर झेलम ओलांडली. रात्रीची वेळ असल्यामुळें पोरसचें सैन्य गैरसावध होतें. तरी याला बातमी कळतांच यानें आपल्या मुलाला दोन हजार सैन्यासह सिकंदरला अडविण्यास पाठविलें, पण सिकंदरच्या सैन्यानें त्याचा सहज पराभव केला. पांचशें ठार झाले व बाकीचे पळाले. पोरसला हें कळतांच हा आपल्या विशाल सैन्यासह पुढें झाला व तुंबळ युद्ध झालें. पण शेवटीं सिकंदरचा जय झाला व हजारों लोकांसह याला कैद करण्यांत आलें. कैद केलेल्या याला जेव्हां सिकंदरच्या पुढें उभें केलें, तेव्हां सिकंदर म्हणाला, ' तुझ्याशीं आम्हीं कसें वागावें ? ' पोरसनें निर्भयपणें उत्तर दिलें, 'राजे राजाशीं वागतात तसें. ' या उत्तरानें सिकंदराचा पोरसाबद्दल अत्यंत अनुकूल ग्रह झाला. सिकंदरनें यालाच पुनः जिंकलेल्या राज्याचा अधिकारी नेमलें व इतरहि भोंवतालचीं राज्यें याच्या अधिकारांत दिलीं. यामुळें या दोघां पुरुषांची मैत्री दृढ झाली व सिकंदरला एक मोठा साहाय्यक मिळाला. सिकंदर हिंदुस्थानांतून परत जातांना त्यानें यास व्यास नदीपासून झेलम नदीपर्यंतच्या प्रदेशाचा क्षत्रप नेमलें. हा मोठा लोकप्रिय होता. याचा पुढें खून झाला. त्यामुळें भारतीय लोकांत मोठा असंतोष पसरला.

पोल काकतीय—(प्रोल काकतीयाचें नामांतर).

प्रकाशमति—(सुयेनचिउ पाहा).

प्रकाशवर्ष—(स. १००० सुमार) हा ' रसार्णवालंकार ' ग्रंथाचा कर्ता होय. हा भामह, दंडिन् व बहुतेक आनंदवर्धनानंतर झाला.

' सुभाषितरत्नभांडागारम् ' मध्यें याचे अनेक श्लोक आढळतात. शिशुपालवध काव्यावर वल्लभदेवाची टीका आहे. त्या टीकेच्या ४ थ्या सर्गाच्या शेवटीं त्यानें असें म्हटलें आहे कीं ' मीं प्रकाशवर्षापासून अर्थ समजावून घेतला व त्याप्रमाणें अर्थ लिहिला. '

प्रकाशात्ममुनि—(ग्रंथकाल स. १२७८) यानें पद्मपादाचार्यानें केलेल्या पञ्चपादिका ग्रंथावर विवरण नांवाची टीका लिहिली.

प्रकाशात्मन्—(स. १२००) ' शाब्दनिर्णयदीपिका ' ग्रंथाचा कर्ता.

प्रकाशेंद्र—हा क्षेमेंद्राचा पिता.

प्रजयभट्ट—हा राजतरंगिणी ग्रंथाच्या चौथ्या भागाचा कर्ता पंडित. यांत अकबर बादशहाच्या कारकीर्दीपर्यंत वर्णन आलें आहे.

प्रतापमल्ल बघेल—(स. १२६० पूर्वी) गुजराथच्या वीरधवल बघेलचा पुत्र. हा कुमारपाल सोळंकीच्या मुलीचा मुलगा (अजयपाल पाहा).

प्रतापराजा—(ग्रंथकाल स. १२००) ' संगीत चूडामणि ' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता, असें नैषधाच्या टीकेंतील उताऱ्यावरून ठरतें.

प्रतापराव गुजर—(मृत्यु स. १६७४ फेब्रु. २४) विजापूरकराचा बहलोलखान शिवाजीवर निघाला तेव्हां शिवाजीनें त्यावर याला रवाना केलें. उंबराणी येथें उभय पक्षांची गांठ पडली. उंबराणी मिरज व विजापूर यांच्या दरम्यान आहे. लढाई सूर्योदयापासून अस्तमानपर्यंत झाली. दोहींकडील लष्कर बहुत जाया झालें. नबाब (बहलोलखान) याची शिकस्त होऊन तिकोट्यास राहिले (का. स. प. या. ४३८). पाण्यावांचून तर बहलोलचा जीव टेंकीस आला. म्हणून यास शिवाजीच्या मुलखास हात लावणार नाहीं असें वचन देऊन तो तिकोट्यास परत गेला. तेथें त्यास विजापूरकडून ताज्या दमाचें कांहीं सैन्य मिळालें. तेव्हां तो प्रतापरावावर पुनः चालून आला आणि नेसरी येथें लढाई होऊन तीमध्यें हा पडला (ता. २४ फेब्रुवारी १६७४). एका खिंडींत सहा घोडेस्वारांनिशीं लढत असतां हा मारला गेला (प. सा. १६२५). कदाचित् कचाट्यांत सांपडलेल्या बहलोलला सोडलें म्हणून शिवाजीनें याला दोष दिला असेल व त्यामुळें हा बेहोष होऊन लढला असेल. याला प्रथम कडतोजी असें म्हणत (प. सा. १४२१). पण हा मोठ्या योग्यतेस चढल्यानंतर प्रतापराव नांव प्राप्त झालें असावें. यांचा एक हिंदु व दुसरा मुसलमान असे दोन वंश आहेत. रायगडच्या युद्धाच्या वेळीं याचा एक वंश बाटलेला दिसतो. याचें वतनगांव भोसरी (जु. ऐ. गो.).

प्रतापरुद्र काकतीय—(स. ११६३–९९) हा काकतीयांपैकीं दुसऱ्या प्रोलाला मुप्पलादेवीपासून झाला. याची पत्नी पद्मादेवी. यानें मछुगी यादवाचा पराजय केला. चोदोद शहर जाळलें.

२. (स. १२९१–१३३०) याचा पिता महादेव व माता मुम्मुडि किंवा मुम्मुदाम्बा. हा रुद्राम्बानंतर गादीवर आला. यानें यादव घराण्यांतील सेवण राजाचा मोड केला असें वर्णन आहे. हा सेवण म्हणजे स. १२७१ पासून १३०९ पर्यंत देवगिरीच्या सिंहासनावर असलेला रामदेव राजा होय. याला स. १२९१–९३ पर्यंत कुमार रुद्रदेव महाराज म्हणत. याला नवलक्ष धनुर्धरस्वामी असेंहि म्हणत असत.

प्रतापरुद्रयशोभूषणावर मल्लिनाथाचा पुत्र कुमारस्वामिन्ची रत्नापण नांवाची टीका आहे. विद्यानाथानें याच्याच नांवानें प्रतापरुद्रीय किंवा प्रतापरुद्रयशोभूषण हा अलंकारशास्त्रावरील ग्रंथ केला. मध्य प्रांतांतील बस्तर संस्थानचे राजे आपणांस याचे वंशज म्हणवितात.

स. १३०८ मध्यें दिल्लीच्या अलाउद्दीन मुहम्मद खल्जी बादशाहानें युवराजामार्फत याजवर स्वारी केली. पण त्यांत यश आलें नाहीं. तेव्हां स. १३०९ मध्यें मलिक काफूरला यावर रवाना करण्यांत आलें. तेव्हां प्रयत्न करूनहि याला यश आलें नाहीं. तेव्हां यानें पुष्कळ संपत्ति देऊन तह केला. ' वरंगळच्या भिंती चिखलाच्या होत्या तरी त्यावर भाले परत फिरत ' असें वर्णन आहे. या वेळीं मुसलमानांनीं देवळें वगैरे पाडून फार नुकसान केलें. पण स. १३२१ मध्यें यानें खंडणी देण्याची नाकारली तेव्हां घियासुद्दीननें आपला मुलगा मुहम्मद तुघ्लकास पाठविलें व मोठी लढाई होऊन याला पकडून दिल्लीस आणलें. स. १३२३ मध्यें याचें राज्य संपलें.

प्रतापरुद्रदेव गजपति—(स. १४९७–१५३९) हा संस्कृत धर्मशास्त्रकार व कटक येथील राजा.

यानें ' सरस्वतीविलास ' हा ग्रंथ लिहिला असा उल्लेख आलेला आहे. यानें कांहीं पंडितांना बोलावून त्यांच्याकडून सामाजिक व धार्मिक कायद्यांविषयीं ग्रंथ तयार करून घेतला. कवि स्वतः सुद्धां आपण लिहिलेल्या ग्रंथाचा टीकाकार असूं शकतो, असें याचें मत होतें.

याशिवाय यानें व्यवहारकांड आणि आचारकांड हे ग्रंथ लिहिले. न्यायदानाची पद्धति, कोर्टे, दस्तऐवज, दायविभाग, साहस, वगैरेंचें विवरण याच्या व्यवहारकांडामध्यें आलेलें आहे. यानें कांहीं ठिकाणीं विज्ञानेश्वरांचीं मतें स्वीकारलीं आहेत व कांहीं ठिकाणीं त्यांची चिकित्सा केली आहे. हिंदु कायद्याच्या बाबतींत याच्या 'सरस्वतीविलास' ग्रंथाचा दाक्षिणेंत उपयोग केला जातो. शिवाय यानें प्रतापमार्तंड किंवा प्रौढप्रतापमार्तंड, निर्णयसागर आणि कौतुकचिंतामणि हे ग्रंथ लिहिले. याचा 'कौतुकचिंतामणि' हा ग्रंथ धर्मशास्त्रावर लिहिलेला नाहीं.

प्रतापसिंह—(स. १७६१ सुमार) अलवार संस्थानचा राजा. हा पराक्रमी होता. मराठ्यांनीं रणथंभोरच्या किल्ल्याला वेढा दिला असतां, यानें तो उठविला. यानें दुसऱ्या शहाआलम बादशहास मदत केली असतां, त्यानें याला माचेरीची सनद दिली.

प्रतापसिंह कच्छवाह—(स. १७७९-१८०३) जयपूरचा राजा. हा कलाकौशल्याची अभिरुची जाणणारा होता. यानें भागवताचा ग्रंथ सचित्र तयार करवून घेतला. नाना फडणविसानें शिंद्यांचे दिवाण आपाजीराम दाभोलकरास हा ग्रंथ शोधून इकडे पाठविण्यास सांगितलें होतें (१५ ऐ. टि. २४).

प्रतापसिंह गुहिलोत—(जन्म स. १५४०, राज्यारोहण स. १५७२, मृत्यु स. १५९७) हा महाराणा प्रतापसिंह किंवा राणा प्रतापसिंह या नांवानें प्रसिद्ध आहे. हा मेवाडचा महाराणा दुसरा उदयसिंह याचा पुत्र. याचा जन्म वि. सं. १५९७ ज्येष्ठ शुद्ध ३ रविवार (ता. ९ मे स. १५४०) रोजीं सूर्योदयानंतर घ. ४७ प. १३ नें झाला (चंडूचा जन्मपत्रिकासंग्रह). उदयसिंहाचें भटियाणी राणीवर विशेष प्रेम असल्यामुळें याचा हक्क बाजूला ठेवून त्यानें तिचा मुलगा जगमाल यास आपल्यामागें राज्याधिकारी नेमलें होतें, पण ही गोष्ट अयोग्य व सर्वांना असंमत असल्यामुळें यालाच राज्याभिषेक करण्यांत आला. त्यामुळें जगमाल नाखूष होऊन अकबराला जाऊन मिळाला. त्यानेंहि जहाजपूरचा परगणा जहागीर देऊन त्याला ठेवून घेतलें.

या वेळीं सिरोहीचा राजा देवडा सुरताण व त्याच्या कुटुंबांतील देवडा बीजा यांच्यांत भांडणें चाललीं होतीं. एकदां बिकानेरचा राजा रायसिंह सिरोहीला आ असतां त्याला हें सर्व कळलें. त्यानें अर्धे राज्य अकबह देत असल्यास देवडा बीजाला येथून घालवून च असें सांगितलें. त्याप्रमाणें केल्यावर सिरोहीचें मिळालेलें अर्धे राज्य अकबरानें मेवाडच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या जगमालला दिलें. दोघे एकत्र राहणें अशक्य असल्यामुळें तंटा सुरू झाला. जगमालनें बादशाही मदत आणविली, पण त्या युद्धांत जगमाल मारला गेला व देवडा सुरताण विजयी झाला.

गुजराथ जिंकल्यावर मीर्झा मुहम्मद हुसेन व सरदार इख्तियार उल्मुल्क यांनीं तेथेंच केलेलें बंड मोडून बादशहा अकबर परत आल्यावर मानसिंहाबरोबर सैन्य देऊन त्याला दिग्विजयाकरितां पाठविलें. त्याला प्रथम डुंगरपुर व उदयपुर इकडे पाठविण्यांत आलें होतें व त्याला असें सांगण्यांत आलें होतें कीं, जो आमची सत्ता स्वीकारील त्याचा सन्मान करावा व जो स्वीकारणार नाहीं त्याला शिक्षा द्यावी. प्रथम तो डुंगरपुर येथें आला व त्यानें तें जिंकलें. येथील राजा रावळ आसकरण डोंगरांत निघून गेला. पुढें तो उदयपुरास येऊन त्यानें महाराण्यास बादशाही सेवा स्वीकारण्याविषयीं पुष्कळ सांगून पाहिलें. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. एकदां त्याला यानें उदयसागरवर मेजवानी दिली. तेथें महाराणा स्वतः न येतां त्यानें आपला पुत्र अमरसिंहास पाठविलें. अमरसिंहानें महाराण्याच्या पोटांत दुखत असल्यामुळें आपण भोजन करावें असें सांगितलें. पण यामुळें मानसिंहाला राग आला; व तो म्हणाला कीं, या पोटांतल्या दुखण्यावर माझ्यापाशीं चांगलें औषध आहे. आतांपर्यंत मीं चांगुलपणा दाखविला पण यापुढें सावध राहा. स्वाभिमानी महाराण्यानेंहि त्याला योग्य उत्तर दिलें. यामुळें मानसिंग रागावून तेथून निघून गेला. महाराण्यानें अन्न यवनसंपर्कानें दूषित झालें असें समजून तलावांत फेंकून दिलें आणि जमीन नवी करून गंगाजलानें शुद्ध केली. हें सर्व अकबराला कळतांच त्यानें मानसिंगालाच पाठवून याचा गर्वपरिहार करून आपल्या अधीन करून घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें मानसिंह सैन्यासह आला व त्यानें मांडवगड, मोही, खमणोर अशा मार्गानें बनास नदीच्या किनाऱ्यावर आपला तळ टाकला. महाराण्यानेंहि डोंगराच्या आश्रयानेंच युद्ध करण्याचें ठरविलें. एक दिवस मानसिंह शिकारीला गेल्याची बातमी महाराण्याला देऊन दगा करण्याचा एकानें सल्ला दिला. पण यानें कपटानें किंवा धोक्यानें शत्रूला मारणें हें सच्चा क्षत्रियाचें काम नव्हे, असें सांगितलें.

पर हल्दीघाटीहून जवळच खमणोर येथें दोनहि सैन्यांचें मोठें युद्ध झालें (स. १५७६ जून). गोगून्दा येथून सात कोसांवर डोंगराच्या घाटापाशीं हें स्थळ आहे.

राण्यानें आपल्या सैन्याचे दोन भाग केले होते. एकीचा सूर अफगाण हा मुख्य होता व दुसरीचा स्वतः राणा हा मुख्य होता. यानें जोराचा हल्ला करतांच मानसिंहाचें सैन्य पळूं लागलें. शेवटीं बादशाही सैन्याला बादशहा आला अशी बातमी उठवून कसें तरी सैन्य एकत्र करावें लागलें. महाराण्याचा घोडा चेटक जखमी झाला म्हणून तोहि परत फिरला. पण बादशाही सैन्याला त्याचा पाठलाग करण्याची छाती झाली नाहीं. उलट डोंगराआड राणा दबा धरून बसला आहे, अशा बातमीनें बादशाही सैन्य घाबरलेलें होतें. मुक्कामावर आल्यावर सुद्धां राण्याचा केव्हां हल्ला होईल याचा नेम नसल्यानें व खंदकाची व्यवस्था केल्याशिवाय त्यांना स्वस्थपणा येईना. पण यानें त्यांची रसद मारण्याचा सारखा सपाटा चालवला, त्यामुळें अन्नावांचून लोक तडफडून मरूं लागले. आंबे खाण्यास मिळत, पण त्यामुळें आजार वाढे. शेवटीं अशा स्थितींत चार महिने राहून बादशहानें परत बोलावलें, म्हणून हें सर्व सैन्य परत गेलें. दोनहि पक्षांच्या लोकांनीं या युद्धांत आपला जय झाला असें म्हटलें आहे. पण महाराण्यासारख्या छोट्या मुलुखाच्या राजाला व विशेष धन व माणसें अनुकूल नसलेल्या राजाला हा फारच मोठा जय होता असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. पण यामुळें बादशहा अधिकच क्रुद्ध झाला.

इकडे राण्यानें रजपुताना अधिक संघटित करून गुजराथ वगैरे बादशाही मुलूख लुटण्यास सुरुवात केली. बादशहानें त्यावर सरदार पाठविले, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. खुद्द बादशहा शिकारीच्या मिषानें मेवाडांत आला, पण बादशहा येतांच हा डोंगरांत निघून गेला; व बादशहानें पाठलाग करण्यास पाठविलेल्या सरदारांचा जोराचा पराभव केला. बासवाड्याला बादशहा सहा महिने राहिला, पण यानें त्याची पर्वा केली नाहीं. पुनः बादशहानें मेवाडवर सेना पाठविली, पण राणा त्यांना दाद देईना. एकदां याच्या सैन्यानें बादशाही सेनेवर हल्ला केला. त्यांत अमरसिंहानें बैरामखानाचा पुत्र मिर्झाखा याच्या स्त्रिया पकडल्या, पण यानें त्यांचा बहिणीप्रमाणें सन्मान करून त्यांस परत पाठविलें. यामुळें याच्याबद्दल मिर्झाखा याच्या मनांत व सर्व लोकांवर याचा फारच वचक बसला. यानें मेवाडांतून आग्र्याकडे जाणारा बादशहाचा लष्करी रस्ता बंद केला; व बादशाही सर्व ठाणीं काबीज केलीं. यानंतर शहाबाजखानच्या सेनापतित्वाखालीं स्वारी करण्याच्याकरिता रस्त्यावर कांटेरी बाभळी वाढल्या. माणसांच्या ण्यांत आली. राजा भगवानदास व मानसिंग यांना रजपूत म्हणून परत पाठविण्यांत आलें. पुढें येऊन केळबाडा घेतला. कुंथळगडावर हल्ला केला असतां याच्या सैनिकांनीं बादशाही सैन्यांतील चार हत्ती जिंकले. पण किल्ल्याची नाकेबंदी झाल्यास किल्ल्यावर अडकून पडावें लागेल हें जाणून यानें अक्षयराजाचा पुत्र भाण यास किल्लेदार नेमून आपण सैन्यासह बाहेर पडला; आणि राणपुरला गेला. किल्ल्यांतील तोफ अकस्मात् फुटल्यामुळें युद्धसाहित्य जळालें; व आंतील लोकांना दरवाजा उघडून बाहेर यावें लागलें. त्यांत भाण वगैरे पराक्रमी लोक लढतलढत मेले. व शत्रूंनीं किल्ला घेतला. महाराण्याचा पाठलाग केला, पण जय न आल्यामुळें राय सुरजन हाडा याचा मुलगा दूदा याला पकडून शत्रु परत फिरला. महाराण्यानें छप्पन्न प्रांतांकडे मोर्चा वळवला. लुणा राठोडापासून तो प्रान्त घेतला व तेथें आपलें वसतिस्थान केलें. तेथें त्या वेळीं बांधलेला महाल व चांमुडेचें मंदिर अद्यापि आहे.

या वेळीं भामशाहानें माळव्यावर स्वारी करून राण्याला आर्थिक मदत केली. दिवेर हें बादशाही ठाणें यानें ताब्यांत घेतलें व कुंभलगडहि परत घेतला. याप्रमाणें बादशहाच्या ताब्यांत गेलेलीं डुंगरपूर व बांसवाडा हीं राज्यें महाराण्याकडे परत आलीं.

अकबर बादशहाला महाराण्याच्या चढाईची बातमी कळतांच त्यानें पुनः शहाबाजखाला पाठविलें; व त्याला बजावलें कीं, महाराण्याला जिंकल्याशिवाय आल्यास तुझें डोकें उडवलें जाईल. तो मेवाडमध्यें येतांच महाराणा डोंगरांत निघून गेला. तीन महिने तो मेवाडमध्यें हिंडत होता, पण शेवटीं अत्यंत त्रस्त होऊन त्याला परत फिरावें लागलें. जागोजाग त्यानें आपले अधिकारी नियुक्त केले होते.

या वेळीं महाराण्यानें शेतकऱ्याला सपाट जमिनीवर शेती न करण्याचा हुकूम जारी केला; व फक्त पहाडावरील योग्य ठिकाणीं शेती करण्याविषयीं फर्माविलें व याविरुद्ध वर्तन करणाराला प्राणदंडाची शिक्षा ठेवली. याचा परिणाम असा झाला कीं मोगलांनीं नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना चारादाण्यासुद्धां सर्व पदार्थ अजमेरकडून आणावे लागत आणि ते योग्य बंदोबस्त न ठेवतां आणण्याचा प्रयत्न केल्यास रजपूत लुटून फस्त करीत. एका शेतकऱ्यानें हा हुकूम न मानल्यामुळें त्याचें डोकें उडवण्यांत आलें. यामुळें शेतकरी लोकांनीं देशत्याग केला व ते परप्रांतांत जाऊन राहिले.

यामुळें जेथें धान्य उगवत होतें तेथें गवत वाढलें. लागल्या. तसेंच दक्षिणेतून उत्तरेकडे जाणारा रस्ता

धोक्याचा झाल्यामुळें व्यापार अजिबात बसला. या परिस्थितीचा महाराण्यावर पुष्कळच परिणाम झाला असला पाहिजे. पण याचा निश्चय बिलकुल ढळला नाहीं. म्हणूनच महाराणा आणि रजपूत यांची कीर्ति अजरामर झाली आहे.

वि. सं. १६४० श्रावण शु. १२ (स. १५८३ ता. २१ जुलै) रोजीं महाराण्याचा पुत्र अमरसिंह याला कर्णसिंह नांवाचा मुलगा झाला. याबद्दल उत्सव करण्यांत आला.

महाराण्यानें आपला बादशहाकडे गेलेला मुलूख स्वारी करणाऱ्या सरदारांच्या पाठोपाठ परत घेण्याचा क्रम ठेवला होता. पण यानें लांबच्याहि मुलुखावर आक्रमण करण्यास सुरुवात केली, तेव्हां बादशहानें वि. सं. १६४१ मार्गशीर्ष शुद्ध १४ (स. १५८४ ता. ६ डिसेंबर) रोजीं जगन्नाथ कछवाह याला चांगलें सैन्य देऊन पाठविलें. त्यानें प्रथम मांडवगड, मोही वगैरे ठाणीं घेतलीं, पण तीं राण्यानें ताबडतोब परत घेतलीं. जगन्नाथ सुमारें दोन वर्षे मेवाडांत फिरत होता. एकदां तर तो राण्याच्या निकट पोहोंचला होता, पण कांहीं करूं शकला नाहीं. शेवटीं निराश होऊन वि. सं. १६४३ (स. १५८६) मध्यें तो काश्मीरकडे निघून गेला.

अशा प्रकारें यावर खुद्द अकबर एकदां व इतर सरदार यांनीं अनेक वेळां स्वाऱ्या केल्या, पण त्या सर्व निष्फळ झाल्या. पण येथून पुढें महाराण्याचा देहांत होईतों अकरा वर्षेपर्यंत स्वारी झाली नाहीं; याचें कारण अकबराला पंजाबकडे सारख्या लढाया खेळाव्या लागत होत्या. महाराण्यानें चितोड व मांडल खेरीज सर्व मेवाड एकाच वर्षांत परत घेतला. मानसिंह व जगन्नाथ यांच्या स्वाऱ्यांचा बदला घेण्याच्या इराद्यानें आंबेर भागावर स्वारी केली व तेथील संपन्न मालपुरे हें नगर लुटलें. येथून पुढलें याचें आयुष्य सुखानें गेलें. त्यांत आपला मुलूख यानें आबाद केला, व बरोबर राहिलेल्या व मदत केलेल्या सरदारांना उच्च पदवीला चढवून त्यांचा गौरव केला.

महाराण्यावर प्रबळ बादशाहीशीं युद्ध सुरू केल्यामुळें अरण्यवास पत्करण्याची वेळ आली. त्यांत याला अनेक कष्ट सहन करण्याचे प्रसंग आले असतील, याबद्दल शंका नाहीं. लोकांत त्यासंबंधीं अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. रानांत खाण्याकरितां केलेली भाकरी मांजरानें नेल्यामुळें याची मुलगी आकांत करूं लागली. अनेक लढायांनीं व हालअपेष्टांनीं ज्याचें मन द्रवलें नाहीं त्याचें मन मुलीच्या रडण्यानें द्रवलें व त्यानें बादशहाशीं तह करण्याविषयीं पत्र लिहिलें. बादशहाला तें पत्र मिळतांच त्यानें जय झाला म्हणून मोठा उत्सव केला. पण राण्यानें पुढें तह केला नाहीं वगैरे प्रसिद्ध असलेल्या गोष्टींना ऐतिहासिक आधार किंवा महत्त्व नाहीं. तथापि त्यांमुळें राण्याच्या परिस्थितीचें चित्र डोळ्यापुढें स्पष्ट उभें राहतें. पण वरच्या आख्यायिकेंत रंगवल्याप्रमाणें राण्याची स्थिति केव्हांच केविलवाणी नव्हती.

शेवटीं महाराण्यानें आपल्या सर्व विश्वासू लोकांकडून मेवाडच्या गादीची प्रतिष्ठा कायम ठेवण्याविषयींच्या शपथा घेतल्यावर आपला प्राण सुखानें सोडला. चावंड येथें यानें देह ठेवल्यावर याचा अग्निसंस्कार तेथून दीड मैलांवर बंडोलीच्या एका ओढ्याच्या कांठीं झाला. तेथें पांढऱ्या दगडाची बांधलेली छत्री सध्यां जीर्ण दशेंत आढळते (वि. सं. १६५३ माघ शु. ११).

अकबरलाहि हीं बातमी कळतांच अत्यंत दुःख झालें. सर्व भरतखंडांत या देशाभिमानी व स्वातंत्र्यप्रिय राजाला अत्यंत पूज्य मानतात. याला अकरा राण्या व सतरा मुलगे होतेः अमरसिंह, भगवानदास, सहसा (सहसमल), गोपाल, कचरा, सांवळदास, दुर्जनसिंह, कल्याणदास, चांदा (चंद्रसिंह), शेखा, पूरणमल (पूरा), हाथी, रामसिंह, जसवन्तसिंह, माना, नाथा व रायभाण.

२. (जन्म स. १७२४–मृत्यु स. १७५४) उदेपूरचा राजा. हा जगत्सिंहाचा पुत्र. याला राजसिंह नांवाचा एकच पुत्र होता. हा बापाच्या मरणाच्या पूर्वी घरांतील कांहीं भानगडीमुळें कैदेंत होता व बाप मेल्यावर याला जैतसिंहानें सोडवून ता. ५ जून स. १७५१ त गादीवर बसविलें. याचें मराठ्यांचे फौजेपुढें कांहीं चालत नसे. हा स्वभावानें चांगला होता.

प्रतापसिंह भोसले— (स. १७४०–१७६३) तंजावरचा राजा. तंजावरचा राजा तुकोजी याचा हा दासीपुत्र. याला तुळाजी व अमरसिंग अशीं दोन मुलें होतीं. तंजावरचे दरबारांत सय्यदखान व सय्यद कासीम हे दोघे सरदार प्रबल होते व ते याच्या विरुद्ध सारखीं कारस्थानें करीत. त्यांना असें वाटूं लागलें कीं, ही राजसत्ता आपल्या हातांत असावी. म्हणून यानें सय्यद कासीमच्या मदतीनें सय्यदखानास ठार मारलें. हें चंदासाहेबास समजतांच त्यानें याजवर चाल केली. पण सातारच्या शाहूच्या मदतीनें यानें चंदासाहेबाचा पूर्ण मोड केला (स. १७४०). याची व अर्काटचा सुभेदार अन्वरुद्दीन याची खंडणीविषयीं लढाई होऊन त्यांत त्याचा पराभव झाला.

पुढें इंग्रजांच्या मदतीनें सयाजी ऊर्फ शहाजी नांवाच्या इसमानें गादीवर आपला हक्क सांगितला. तेव्हां यानें

त्यास देवीकोटचा किल्ला व ३१५००० रु. उत्पन्नाचा मुलूख दिला (स. १७४९). गुत्तीकर मुरारराव घोरपडे यानें मुद्दाम कुरापत काढून तंजावरवर स्वारी केली. पुढें मुहम्मद अलीच्या मध्यस्थीनें यानें त्यास ३ लक्ष रुपयांची खंडणी देऊं केली. याची व फ्रेंचांची लढाई झाली तींत फ्रेंचांनीं याचें कावेरीचें धरण उध्वस्त केलें, तें परत यानें दुरुस्त केलें. पुढें इंग्रजांची मदत घेऊन यानें फ्रेंचांशीं लढाई करून त्यांचा पराभव केला व त्यांच्या मदतीनें मुहम्मद अलीचें सख्यत्व जोडलें. एकंदरींत याची कारकीर्द धामधुमीची व उलाढालीची गेली (तं. रा. घ. पृ. ८५).

प्रतापसिंह (छत्रपति) भोसले—(स. १७९२–१८४७) हा सातारच्या छत्रपति घराण्यांतील धाकट्या शाहूचा वडील पुत्र; चतुरसिंग भोसले यानें पेशव्यांच्या ताब्यांतून प्रतापसिंहास सोडविण्याची इंग्रजांकडे खटपट केल्यानें चतुरसिंगास त्रिंबकजीकडून रावबाजीनें पकडून कागोरिस कैदेंत ठेवलें (स.१८११). तेथें तो स. १८१६ त वारला. पुढें प्रतापसिंहानें व त्याच्या आईनें गुप्त कारस्थानें करून इंग्रजांची मदत मागितली व ती एल्फिन्स्टननें आनंदानें देण्याचें आश्वासन दिलें. या सुमारास रावबाजी व इंग्रज यांच्यांत उघड उघड बेबनाव झाला होता व खडकीच्या लढाईची पूर्वतयारी चालली होती. शेवटीं अष्टी येथें इंग्रजांची व पेशव्यांची लढाई होऊन, बापू गोखले पडले; व पेशवे पुढें निसटले. या प्रसंगीं अगाऊ सांकेतिक सूचना असल्यानें प्रतापसिंह हा मुद्दामच मराठ्यांच्या लष्करांच्या मागें राहिला होता. पेशवे गेल्यावर स्मिथ यानें याला आपल्या ताब्यांत घेतलें व बोलेसर येथें एल्फिन्स्टनकडे रवानगी करून दिली. त्यानें प्रतापसिंहास आणलें. तत्पूर्वीच ८ दिवस इंग्रजांनीं सातारा घेतला. मग पुढील आशयाचा जाहीरनामा काढला: "बाजीराव राज्याचे उपयोगी नाहींत. थोडके दिवसांत त्यांचा ठिकाणा नाहीं असें होऊन छत्रपति सातारकर बाजीरावसाहेब यांचे कैदेंत आहेत. त्यांस सोडवून त्यांचें राज्य त्यांजकडे चालेल. ते दौलतीचे खावंद मुखत्यार आहेत. जो मुलूख महाराजांकडे होईल त्यांत न्यायइनसाफ, हुकमत व अंमल करतील. गेलें तें राज्य पेशव्यांचें, महाराजांचें राज्य अबाधितच आहे." याप्रमाणें इंग्रजांनीं सर्व मराठी राज्य स्वतःच्या ताब्यांत घेऊन राज्याच्या मालकास फक्त १२ लक्षांचा मुलूख दिला व १४ पेट्यांचा एक जहागिरदार बनविलें. ग्रँड डफ याला साताऱ्यास रेसिडेंट म्हणून याच सुमारास नेमण्यांत आलें. प्रतापसिंहानें साताऱ्यास स. १८२२ त एक नवीन राजवाडा बांधला व युवतेश्वराहून नळ आणून शहरांत ठिकठिकाणीं पाणी खेळविलें (स.१८२७) आणि जलमंदिर राजवाडाहि बांधला (स. १८२९).

पुढें इंग्रज आपल्याला निर्माल्यवत् मानतात व आपल्यावर निरनिराळ्या अपमानकारक नवीन अटी लादतात, हें प्रतापसिंहाच्या लक्षांत येऊन यानें त्यांच्याविरुद्ध खटपट सुरू केली. पुढें मुंबईचा गव्हर्नर कारनॅक यानें कांहीं अटी सांगून त्या कबूल करण्यास व माफी मागण्यास सांगितलें, परंतु ते प्रतापसिंहानें ऐकलें नाहीं. त्यामुळें इंग्रजी पलटणें पुण्याहून निघून साताऱ्यास आलीं (आगष्ट १८३९). त्या वेळीं बळवंतराव सेनापती यानें इंग्रजांशीं लढण्याची तयारी केली; परंतु प्रतापसिंहानें त्यास मनाई केली. अखेरीस प्रतापसिंहास पदच्युत करून (सप्टेंबर) निंबास नेऊन ठेवलें. स. १७५७ च्या बंडांत याचा संशय घेऊन याला कराचीस नेऊन ठेवलें. प्रतापसिंहानें आपलें राज्य परत मिळविण्याची पुष्कळ खटपट केली. विलायतेस माणसें पाठविलीं, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर हालअपेष्टेंत मराठ्यांच्या शेवटल्या छत्रपतीला मृत्यु आला (मं. अहवाल १८३८).

प्रतापसिंह परमार—(स. १२८७) आबूच्या परमारांपैकीं तिसऱ्या कृष्णराजाचा पुत्र. याच्याबद्दलचा पाटनारायणच्या मंदिरावर वि. सं. १३४४ चा शिलालेख मिळाला आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, यानें जैत्रकर्णाचा पराभव केला. आणि दुसऱ्या वंशांत गेलेल्या चंद्रावतीचा उद्धार केला. यावरून अबूवर परमारांची राजधानी चंद्रावती नांवाची होती व ती जैत्रकर्णानें जिंकली होती पण ती यानें परत घेतली असें दिसतें. हा जैत्रकर्ण म्हणजे मेवाडचा जैत्रसिंह असावा. याचा मंत्री देल्हण नांवाचा ब्राह्मण होता.

प्रतापादित्य कर्कोटक—(स. ६३७–८७) हा दुर्लभवर्धनानंतर काश्मीरच्या गादीवर आला. याच्या न्यायप्रियतेच्या व प्रजाहिततत्परतेच्या पुष्कळ गोष्टी कल्हणानें राजतरंगिणींत सांगितल्या आहेत.

प्रतिहार इंदुराज—हा जयापीड राजाचा सेनापति. हा भट्टोद्भटाच्या ग्रंथावरील टीकाकार होता, असें राजतरंगिणीमध्यें कल्हणानें लिहिलें आहे.

प्रद्युम्नसूरि—(स. ९८० सुमार) हा जैनधर्मी असून श्वेतांबरपंथाच्या राजगच्छ शाखेचा होता. ह्याचा तर्कशास्त्रावरील वादविवादांत हातखंडा असे. यानें वेणकपट्टणच्या राजासमोर दिगंबरपंथीयांचा पराभव केला. यानें

८४ वेळां वादविवादांत जय मिळविला. 'पार्श्वनाथ' ग्रंथाचा कर्ता जो माणिक्यचंद्रसूरि याचा हा ११ वा पूर्वज व अभयदेवसूरीचा गुरु (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पान ३५-३६).

प्रद्योतनपद्मनाभमिश्र—(ग्रंथकाल स. १५७८ सुमार) वाघेल घराण्यांतील जो वीरभद्र (स. १५९२-१५९३) राजा त्याच्या दरबारीं असलेला एक प्रसिद्ध कवि. गोवर्धनमिश्र व विश्वनाथ यांचा भाऊ जो बलभद्र त्याचा हा मुलगा.

यानें वीरचम्पू किंवा वीरभद्रचम्पू हा ग्रंथ स. १५७८ मध्यें लिहिला. १ किरणावलीभास्कर (बनारसच्या सरस्वतिभवनामध्यें प्रसिद्ध झाला), २ तत्त्वचिंतामणि-परीक्षा, ३ तत्त्वप्रकाशिकाटीका, ४ राद्धान्तमुक्ताहार आणि याचेवरील काणादरहस्य, ५ वर्धमानाच्या न्यायनिबंध-प्रकाशावरील वर्धमानेन्दू ही टीका. शरदागम ग्रंथाचा कर्ता प्रद्योतनभट्टाचार्य आणि हा हे एकच आहेत, असें डॉ. विद्यासुधाकर हरदत्त शर्मा यांचें मत आहे (Dr. S. Krishnaswami Aiyangar Commemoration Volume 1936, 51). शरदागम हें चंद्रालोकावरील एका टीकेचें नांव आहे. याचीच कामसूत्रावर एक टीका असून ती स. १५७१ मध्यें लिहिलेली आहे.

प्रभाकर—(स. १७५४-१८४३) या मराठी शाहीर कवींचें समग्र नांव प्रभाकर जनार्दन दातार. हा चित्पावन ब्राह्मण. मूळ गांव मुरुड (जि. रत्नागिरी). पुण्यांत फडांत कारकून. हा पुण्यांतील गंगू-हैबतीच्या फडांत सामील झाला. याला पेशव्यांचा आश्रय दिसतो. हा चांगला कवि होता.

पोवाडे—१ रंगाचा पोवाडा, खर्ड्याची लढाई, सवाई-माधवरावाचा मृत्यु, शिवाय बाजीरावावर ३ पोवाडे, लावण्या—बाजीराविलास (३५-३६) (ऐ. पो. प्रस्ता. ८९-९७).

प्रभाकरभट्ट—(स. ५००-६०० सुमार) हा केरळ प्रांतांतील एक कवि व सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानी. हा वेदनात्तू येथील कीत्तोलीमान घराण्यांत जन्मास आला. हा जरी पुष्कळ हुशार व अभ्यासू होता, तरी याच्या गुरूनें यास कधींहि शाबासकी दिली नाहीं. त्यामुळें हा चिडून, गुरूचा खून करण्यासाठीं त्याच्या घरांत लपून राहिला. पण जेव्हां आपल्या गुरूकडून स्वतःची गुणप्रशंसा त्याच्या बायकोशीं करतांना यानें ऐकली, तेव्हां यानें पुढें येऊन गुरूचे पाय धरले; व ठरलेल्या विचाराची क्षमा मागून प्रायश्चित्त मागितलें. गुरूनें यास 'अग्नींत दहन करून घेणें' हें प्रायश्चित्त सांगितलें. ठरल्याप्रमाणें यानें गुरूच्या सांगण्यावरून श्रीकृष्णाचें नांव घेत उडी टाकली; व जशाचा तसा बाहेर आला. यानें 'भूतिधारणखंडनम्' हा ग्रंथ लिहिला (I. H. Q. Vol. V. No. 4. 676-80).

२. 'रसप्रदीप' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

३. (स. ४३२ सुमार) सेतुबंध काव्याचा कर्ता. हा काश्मीरचा राजा होता. बाणभट्टानें हर्षचरिताच्या प्रारंभीं याच्या सेतुबंध काव्याचा निर्देश केला आहे. दंडीनेंहि याच्या काव्याचा उपयोग केला होता (मातृ-गुप्त पाहा).

४. (जन्म स. १५६४) प्रसिद्ध मीमांसक. पिता-माधवभट्ट. ग्रंथ-शास्त्रदीपिका. आजा-रामेश्वरभट्ट. भाऊ-विश्वनाथ व रघुनाथ.

प्रभाकरवर्धन—(स. ५८०-६०५) बैसवंशी रजपुतांपैकीं आदित्यवर्धनाला महासेनगुप्तेचे ठिकाणीं झालेला पुत्र. याला प्रतापाशिव असेंहि म्हणत. याची राजधानी ठाणेश्वर. याच्या पूर्वीच्या लोकांना महाराज म्हटलेलें आढळतें (एपि. इंडि. भा. ४५, पृ. २१०). त्यावरून ते गुप्ताचे मांडलिक असावेत. पण याला परमभट्टाकारक व महाराजाधिराज असें म्हटलेलें आहे (एपि. इंडि. भा. ४, पृ. २१०). त्यावरून हा स्वतंत्र राजा झाला होता, असें दिसतें. हर्षाच्या ताम्रपत्रांत याला अनेक राजांना नमवणारा व हर्षचरित्रांत हूण, गांधार, सिंधु, गुर्जर व लाट या देशांस जिंकणारा, असें म्हटलें आहे (हर्ष-चरित पृ. १२०). हा सूर्याचा परम भक्त होता व दररोज आदित्यहृदयाचा पाठ करीत असे.

याच्या राणीचें नांव यशोमती. याला तिच्यापासून राज्यवर्धन व हर्षवर्धन असे दोन पुत्र आणि राज्यश्री नांवाची एक मुलगी झाली. याचा जांवई म्हणजे राज्य-श्रीचा पति मोखरीवंशांतील अवन्तिवर्म्याचा पुत्र ग्रह-वर्मा होय. ग्रहवर्म्याला ठार करून राज्यश्रीला माळव्याच्या राजानें बेड्या घालून तुरुंगांत टाकलें असतां आणि थोरला मुलगा राज्यवर्धन उत्तर हूणांशीं लढण्याकरितां गेला असतां प्रभाकरवर्धन मरण पावला. याच्यानंतर राज्य-वर्धन गादीवर आला.

प्रभाचंद्र—(स. ८२५ सुमार) हा एक जैनधर्मी कवि होता. यानें माणिक्यनंदीच्या 'परीक्षामुखसूत्रा'वर 'प्रमेयकमलमार्तंड' व अकलंकाच्या लघीयशास्त्रावर 'न्यायकुमुदचंद्रोदय' नांवाच्या टीका लिहिल्या. हा माणिक्यनंदीचा शिष्य होता. निर्णयसागर मुद्रणालयांतून प्रसिद्ध झालेल्या प्रमेयकमलमार्तंडाच्या प्रस्तावनेंत

पं. वर्शाधर यानें याचा काळ स.१११५असा दिला आहे, पण तो बरोबर नाहीं.

प्रभावती—वीतभयच्या उदयनची पत्नी. लिच्छवी राजकन्या. पार्श्वनाथ तीर्थंकराची पत्नी.

प्रभावती गुप्ता—(विवाहकाल स. ३९५). गुप्तांपैकीं दुसऱ्या चंद्रगुप्ताला कुबेरनागा नांवाच्या स्त्रीपासून झालेली ही मुलगी. ही वाकाटकवंशांतील दुसऱ्या रुद्रसेनाला दिली होती. हिचे पुत्र दिवाकरसेन व दामोदरसेन. आणखी एक तिसरा पुत्र असावा. हिच्या पुत्रांपैकीं एकाला तो अल्पवयी असतां प्रवरसेन दुसरा असें नांव देऊन गादीवर बसविलें. सर्व कारभार मात्र हीच पाहत असे. दरबारांत गुप्त अधिकाऱ्यांचें वर्चस्व असून हिलाहि आपल्या माहेरच्या घराचा अभिमान होता. हिच्या ताम्रलेखांत आपल्या पूर्वीचे वाकाटकांचीं नांवें न देतां गुप्तांचीं दिलेलीं आढळतात.

प्रो. पाठक व रा. ब. का. ना. दीक्षित यांनीं छापलेल्या ताम्रपत्रांत दिवाकरसेनाचें नांव असून तो प्रभावती गुप्तेचे पदरीं असल्याचा उल्लेख आहे. भा. इ. सं. मंडळांत प्रसिद्ध झालेल्या हिच्या लेखांत ही दामोदरसेन व प्रवरसेन यांची जननी असल्याचा दाखला असून तो प्रवरसेनाच्या १९ व्या वर्षी दिलेला आहे. हीं विधानें महत्त्वाचीं आहेत. प्रवरसेनाचे राज्याचे अठरावे वर्षी त्याचे सांगण्यावरून सिबानीची देणगी दिलेली आहे, असें फ्लीटच्या गुप्तांच्या शिलालेखाच्या पुस्तकांत लिहिलें आहे (पा.२४३-२४९). प्रो. पाठक व दीक्षित यांना उपलब्ध झालेलें शासन तेरावे वर्षी देण्यांत आलें. हें वर्ष दुसऱ्या रुद्रसेनाच्या राज्याचें असावें किंवा दिवाकरसेनाच्या कारकीर्दीचें असावें याबद्दल त्यांस संशय आहे (एपि. इंडि. व्हा. १५, पा. ४१). दुसऱ्या लेखांतील देणगी प्रवरसेनाच्या राज्याच्या १९ व्या वर्षी हिनेंच दिलेली आहे. तेथें दिवाकरसेनाचें नांव नाहीं (मं. ३.२-४ पा. ९२).

प्रभुनंदन—(काव्यकाल स. १७४१) मराठी १०१ श्लोकांमध्यें श्रीखंड्याचें चरित्र लिहिणारा कवि (मं. त्रै. ४. २ ले. ५१).

प्रभुलिंग—(अलंप्रभु पाहा).

प्रयागजी अनंत फणसे पनवेलकर—(स. १६४९-१७०८) हा प्रभु गृहस्थ स. १६४९ पासून शिवाजीपाशीं होता, व तेव्हांपासून सातारा व परळी या दोन परगण्यांची सुभेदारी याजकडे होती. साताऱ्याचे किल्ल्यांत युवतेश्वर महादेव म्हणून सोमेश्वराची मूर्ति आहे, तिची स्थापना प्रथमतः प्रयागजीनें केली. युवत म्हणजे कळकीचें झाड. प्रयागजीस दृष्टांत होऊन युवताच्या झाडींत सोमेश्वर प्रगट झाला. म्हणून युवतेश्वर असें नांव पडलें. सातारा शहर राजधानी झाल्यापासून प्रयागजीचें महत्त्व विशेष वाढलें, व याच्या अंगचे गुण निदर्शनास आले. स. १६९९ मध्यें ब्रह्मपुरी सोडून औरंगजेब बीस दिवसांनीं वसंतगडापाशीं येऊन तो किल्ला तीन दिवसांत घेऊन मिरजेवरून पन्हाळा सोडून साताऱ्याकडे वळला. तिकडे औरंगजेब वळेल अशी कल्पना नसल्यामुळें बंदोबस्त व धान्य जुजबी होतें. बादशहा उत्तरेस करंजेगांवीं, अजमशहा पश्चिमेस शहापुराजवळ आणि दुसऱ्या दोन बाजूंस तर्बियतखान व सर्जेखान हे मोर्चे लावून बसले होते. अशी नाकेबंदी असतांनाहि या वीरानें किल्ला मोठ्या चतुराईनें लढवला. किल्ल्यावरून दगड लोटून, गोळ्यांचा वर्षाव करून आणि साप, विंचू वगैरे भरलेले रांजण खालीं फेकून यानें मुसलमानांना त्रस्त केलें. किल्ल्यांतून हा लढत असतां बाहेरच्या मराठे सैन्यांनीं भोंवतालचा मुलूख बेचिराख करून भोंवतालचा बीस कोसपर्यंत मुलूख निरुपयोगी करून टाकला. त्यांतूनहि जें येई तें लुटण्याचा क्रम चालूच होता. असे तीनचार महिने गेले. आंतल्या लोकांना परशुराम त्रिंबक परळीच्या बाजूनें थोडासा धान्याचा पुरवठा करी. पुढें तर्बियतखानानें ईशान्येच्या मंगळाईच्या बुरुजाखालीं दोन मोठे सुरुंग तयार केले. ते कसे उडतात हें पाहण्याकरितां बुरुजावर लोक येऊन उभे राहिले. प्रथमतः सुरुंगास बत्ती दिल्याबरोबर भयंकर कल्लोळ होऊन, डोंगराचा एक मोठा खडपा वरील बुरुजासह एकदम जोरानें वर आकाशांत उसळून किल्ल्यांत पडला. त्याबरोबर मराठ्यांचे शेंकडों लोक प्राणास मुकले, आणि आंत घुसण्याकरितां मुसलमान पुढें झाले. तों त्यांच्यावर दुसऱ्या सुरुंगानें उडालेला भाग पडला. त्यामुळें त्यांचे दोन हजार लोक मेले. प्रयागजीचे खूप लोक मेले, पण तो मातीच्या ढिगाऱ्याखालीं सांपडूनहि सुखरूप वांचला; आणि हुरूप येऊन मराठे वीरश्रीनें लढूं लागले. बादशहानें स्वतः धीर दिल्यानें मुसलमान लढत होते. पण किल्ल्यांतील सामग्री संपली, राजाराम वारला. तेव्हां परशुराम त्रिंबकनें आपण होऊन अजमशाहाच्या ताब्यांत किल्ला दिला. अजमशाहाच्या मार्फत किल्ला सर झाल्यामुळें किल्ल्याचें नांव अजमतारा ठेवण्यांत आलें. तें अद्यापि चालू आहे. हा प्रकार राजारामाचे मृत्यूनंतर एक महिन्यानें स. १७०० च्या एप्रिल महिन्यांत घडला. पण पुनः किल्ला मराठ्यांच्या ताब्यांत

आला तेव्हां याचीच तेथें नेमणूक झाली. शाहू परत आल्यावर हा त्यास मिळाला आणि लवकरच मृत्यु पावला. याचा पुत्र जोतिबा ऊर्फ अप्पाजी. त्याचे मुलगे दोन रावजी व बाबाजी. हे बडोदें राज्यांत प्रसिद्धीस आले.

प्रल्हादनदेव परमार—(स.१२२५सुमार) आबूच्या परमारांपैकीं यशोधवलाचा पुत्र. याच्या विद्वत्तेची व शौर्याची प्रशंसा सोमेश्वर कवीच्या कीर्तिकौमुदी काव्यांत आढळते. तसेंच वस्तुपालानें बांधलेल्या लूणवसही नांवाच्या अबूवर देलवाडा गांवच्या नेमिनाथमंदिरावरील वि. सं. १२८७ मधील प्रशस्तीतहि याचें वर्णन आहे. तसेंच मेवाडचा सामंतसिंह गुहिल व गुजराथचा अजयपाळ सोलंकी यांच्या युद्धांत यानें मोठ्या शौर्याने अजयपालाला मदत केली (इंडि. ॲंटि. भा.५३पृ.१००-१०२). या लढाईंत अजयपाल जखमी झाला होता. यानें लिहिलेलें 'पार्थपराक्रमव्यायोग' नांवाचें संस्कृत नाटक मिळालें आहे. व्यायोग हा नाटकाचा एक प्रकार असून त्यांत एखादी प्रसिद्ध घटना व युद्ध असतें. तें नाटक 'गायकवाड ओरिएंटल सीरीज' मध्यें छापलें आहे. यानें आपल्या नांवानें वसविलेलें प्रल्हादनपुर हें पालनपुर या नांवानें गुजराथेंत प्रसिद्ध आहे.

प्रल्हाद शिवाजी बडवे—(समाधि स. १७१८) हा मराठी कवि पंढरपुरास राहत असे. याच्या गुरूचें नांव राघव. हे स्वतः उत्तम कीर्तन करीत; आणि यांचे शिष्य गोपाळ व सदाशिव हे दोघे मागें राहून आलाप काढीत. शिवाजीमहाराजांनंतर औरंगजेबानें महाराष्ट्रांत कहर केला तेव्हां पंढरपूरच्या विठोबाचा उच्छेद करण्याची त्यास बुद्धि झाली. अशा वेळीं प्रल्हादबुवांनीं पांडुरंगाला आपल्या बळदांत लपवून ठेवलें व आलेला प्रसंग टाळून आपलें नांव तत्कालीन संतमंडळांत दाखल केलें. हे मोठे प्रेमळ होते आणि पांडुरंग यांच्याशीं बोलत असे असें सांगतात. पुढें औरंगजेब वारल्यावर स. १७०९ मध्यें पुनः मंदिरांत पांडुरंगाची स्थापना झाली ती अद्यापपर्यंत अढळ आहे. यापूर्वीहि एकदां असा मूर्ति हलविण्याचा प्रसंग आला होता (भानुदास पाहा). हे मोठे साधु होते, तसेंच कविहि होते. यांनीं ज्ञानेश्वराच्या अमृतानुभवाचें संस्कृतमध्यें भाषांतर केलें, यावरून यांचें संस्कृतभाषेवरील प्रभुत्वहि ध्यानीं येतें. या संस्कृत ग्रंथाशिवाय मराठी भाषेंत यांचीं पुढील प्रकरणें उपलब्ध आहेतः १ अहल्योद्धार (ओव्या ४६), २ सीतास्वयंवर (ओव्या ७६), पांडुरंगमाहात्म्य (ओव्या १७९), यांशिवाय २५ पदें व दोन आरत्या आहेत. यांचें काव्य प्रासादिक आहे. हे शके १६४० माघ कृष्ण एकादशीला स्वर्गवासी झाले. यांची समाधि विठोबाच्या देवळांत आहे. मोरोपंतानें आपल्या सन्मणिमालेंत यांना स्थान दिलें असून बाबापाध्यांच्या सारखे विद्वान् यांच्या समाधीचें नित्य दर्शन घेत असत (म. क. च. १, पा. ३०७-३१४).

प्रवरसेन वाकाटक--(स. २८४-३४४) वाकाटकवंशापैकीं विंध्यशक्तीचा मुलगा. विंध्य मगधाच्या महाराजगुप्ताचा समकालीन असावा. यानें अग्निष्टोम, आप्तोर्याम इत्यादि श्रौत याग केलेले होते. हा भारद्वाजगोत्री ब्राह्मण होता. याची राजधानी बुंदेलखंडांतील अजगढाजवळील चनकापूरी (सध्यां नाचना) होय. हा वाकाट गांवचा राहणारा म्हणून वाकाटक नांव पडलें. यानें आपलें राज्यचिन्ह गंगा मानलें आहे. याच्या नाण्यावर गंगायमुनाद्वार अंकित आहे. झेंड्यावरहि गंगा होती. हा समुद्रगुप्तापेक्षांहि मोठा होता. याला सम्राट् म्हणत. याचें वर्णन कल्किअवतारासारखें आहे.

२. (स. ३९५-४२०) हा वाकाटकवंशांतील दुसऱ्या रुद्रसेनाला गुप्तवंशांतील चंद्रगुप्ताची कन्या प्रभावती हिच्यापासून झाला. याच्याच दरबारांत कालिदास कवि चंद्रगुप्ताचा वकील म्हणून आला होता. यालाच कुंतलेश म्हटलें आहे. आणि यानेंच कालिदासाच्या साहाय्यानें सेतुबंध (दहमुहबहोदशमुखवध) नांवाचें प्राकृत काव्य केलें. या काव्याचे पंधरा अध्याय आहेत. हा शिवोपासक होता.

प्रविलसेन—पुरुषभीरूचें नामान्तर.

प्रवीणराय--ही एक हिंदी कवयित्री व ओछेडच्या इंद्रजित सिंहाची वेश्या होय. ही केशवदासाची शिष्या असून त्यानें हिच्यावर 'कविप्रिया' हें पुस्तक लिहिलें. ही गायनवादन व काव्यरचनेंत निपुण असून स्वतःला पतिव्रता म्हणत असे. हिला अकबरानें बोलाविलें होतें, परंतु इंद्रजित सिंहाकडे हीस परत पाठविलें. हिच्या छंदयुक्त कविता आहेत.

प्रशस्तपाद—हा कणादाच्या वैशेषिक सूत्रावरील प्रशस्तभाष्य या ग्रंथाचा कर्ता.

प्रसाधनादेवी--रघुवंशी प्रतिहारांपैकीं विनायकपालाची पत्नी. दुसऱ्या महेंद्रपालाची माता.

प्रसेनजित्--कुशस्थलच्या नरवर्मनचा मुलगा (पार्श्वनाथ, अजातशत्रु व बिंबिसार पाहा).

प्रज्ञावर्ग--हुईलुन या चिनी प्रवाशानें भारतवर्षांत असतां हें नांव धारण केलें होतें.

प्राज्यभट्ट--'राजावलीपताका' नांवाच्या ग्रंथाचा कर्ता. प्रजयभट्ट व हा एकच किंवा काय तें कळत नाहीं. अक-

बरानें काश्मीर जिंकलें तेथपर्यंतचा इतिहास यांत आला आहे. श्रीवदानंतर काश्मीरचा इतिहास यानें लिहिला.

प्राणचंद चौहान—(स.१६११ चा सुमार) एक हिंदी कवि. संवादात्मक रामायण नाटकाचा कर्ता.

प्राणनाथ—(स.१७००सुमार) याला श्रीप्राणनाथप्रभु असेंहि म्हणत. हा क्षत्रिय जातीचा साधु औरंगजेबाच्या उत्तर आयुष्यांत उदयास आला. यानें हिंदुमुसलमानांचें ऐक्य करण्याची खटपट करून नवीन पंथ स्थापिला. बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल हा याचा शिष्य होता. यानें वारंवार प्रोत्साहन देऊन व आशीर्वचनें पाठवून मोगलांशीं लढतांना बुंदेल्याच्या मनांत स्वेष उत्पन्न केला. छत्रसाल व हा म्हणजे बुंदेलखंडाचे रामदास व शिवाजीच होत (पारसनीसकृत बुंदेलखंड व प्रो. सरकारकृत औरंगजेब, भा. ३, पृ. ६९०).

प्राणमंजरी—ही प्रेमनिधीची तिसरी पत्नी होय.

प्रियादास—(नाभाजी पाहा).

प्रीतमदास—(जन्म स. १७३०) गुजराथी कवि. जात भाट. ग्रंथ–सारसगीता, ज्ञानकक्को, गुरुमहिमा. साध्या भाषेमुळें यांचीं पदें लोकप्रिय आहेत (का. दो.).

प्रेमचंद—(स.१७९६) हिंदी कवि. ग्रंथ–चंद्रकला.

प्रेमदास—हा मराठी ग्रंथकार एकनाथाच्या वेळीं होता. याचा गद्यपद्यात्मक मूळस्तंभ ग्रंथ प्रसिद्ध आहे.

प्रेमनिधिपंथ—(ग्रंथकाल स. १५९१) याच्या पित्याचें नांव उमापति व आईचें नांव उद्योतमती. हा काशीचा राहणारा. हा मलयवर्माच्या आश्रयास होता. याच्या गुरूचें नांव दिनकर. यानें केलेले ग्रंथ. १ अन्तर्यागरत्न, २ काव्यदीपदानपद्धति, ३ घृतदानपद्धति, ४ दीपदानपद्धति, ५ दीपप्रकाश, व त्याची टीका शब्दप्रकाश, ६ प्रयोगरत्न, ७ प्रयोगरत्नक्रोड, ८ प्रयोगरत्नसंस्कार, ९ प्रयोगरत्नाकर, १० बहिर्यागरत्न, ११ भक्तव्रातसंतोषक, १२ भक्ततरंगिणी, १३ मूळप्रकाश, १४ लवणदानरत्न, १५ शक्तिसंगमतंत्रटीका, १६ मल्लादर्श (शिवतांडवटीका), १७ शब्दार्थचिंतामणि, १८ सुदर्शन (तंत्रराजटीका) (नागरीप्रचारिणी पत्रिका).

प्रेमानंद— (स. १६७६) हा गुजराथी जातीचा चातुर्वेद मोढ ब्राह्मण. हा बडोदें येथील राहणारा. यानें केलेले गुजराथींतील ग्रंथः १ भागवत–दशमस्कंध–संपूर्ण, २ उखाहरण, ३ सुधन्वाआख्यान, ४ नलोपाख्यान, ५ सुदामचरित्र, ६ नरसी मेहताची हुंडी, ७ श्राद्धविधि, ८ रणयज्ञरामायण, ९ मामेरू (काव्यदो.).

२. (स. १६३६–१७३४) एक गुजराथी कवि. यानें गुजराथी भाषेची किंमत लोकांस पटवून दिली. याचीं ३२।३३ काव्यें उपलब्ध आहेत. याचीं बरींचशीं काव्यें रोज गायिलीं जातात.

प्रेमानंदस्वामी—(ज. स. १७७९–१८४५) हा काठेवाडांतील गधडा गांवचा रहिवासी. यानें कृष्णलीलांचें वर्णन काव्यांत केलें. याची ' थल ' नांवाची कविता फारच प्रसिद्ध आहे. याच्या काव्यांत विशेष हें आहे कीं, यानें स्वतःला राधा समजून कृष्णाला आपला वल्लभ मानलें आहे.

प्रेमाबाई—(स. १६५८ सुमार) हिचीं कांहीं मराठी पदें व अभंग पुष्कळ लोकप्रिय आहेत. हिचें चरित्र ' भक्तलीलामृतां'त वर्णिलें आहे (अ. ४२). ही अत्यंत कृष्णभक्त होती. ' माझा भरत देखिला काय ' हें पद हिचें आहे (म. क. च. भा. ३, पा. ५९–६०).

प्लिनी—सनाच्या पहिल्या शतकांतील इतिहासलेखक.

प्रोवी—(रुद्रदेव पाहा.)

प्रोल काकतीय—(स. १०७५ सुमार) हा दुर्जय काकतीयाचा मुलगा.

२. (स. ११९७–६३) हा बेट्ट काकतीयाचा पुत्र. यानें अनमकोंडा ही राजधानी बदलून वारंगळ ही राजधानी केली. याला पोल, प्रोलराज, प्रोळराज किंवा प्रोदराज असेंहि म्हणत. याला जगतीकेसरिन् अशी पदवी होती. पत्नीचें नांव मुप्पलादेवी.

हा या घराण्यांतील पहिला स्वतंत्र राजा होय. यानें तिसरा तैलप पश्चिम चालुक्य (स. ११५१–६३), दुसरा जगदेकमल्ल पश्चिम चालुक्य, सहावा विक्रमादित्य चालुक्य यांना जिंकलें. पहिला बल्लाळ होयसल व विष्णुवर्धन बिट्टी यांना धुडकावून लावलें व त्यांचे प्रांत काबीज केले. मंत्रकूट देशचा राजा गुंडाचा पराभव केला व त्याला ठार केलें. मंत्रकूट देश म्हणजे गोदावरी प्रांतांतील मंतेन भाग होय.

ओरिसाच्या गणपति राजानें वारंगळवर स्वारी केली तेव्हां आपल्या मुलाकडून हा चुकून मारला गेला. याच्यामागून याचा थोरला मुलगा पहिला प्रतापरुद्र गादीवर आला (एन्शंट डेक्कन, पा. २७७).

फ

फकीरुद्दीन—(कदरखान पाहा).

फत्ते अलीखान—हें टिपु सुलतानाचें मूळ नांव.

फत्तेउल्लाह इमादशाह—(मृ. स. १४८४) वऱ्हाडचा सुभेदार. हा मूळचा ब्राह्मण असून, विजयनगरांत राहत असे. याला तेथून धरून आणून मुसलमान केलें व इमादउल्मुल्क हा किताब व वऱ्हाडची सुभेदारी दिली. हा स. १४८४ त इमादशाहा असें नांव धारण करून, स्वतंत्र कारभार पाहूं लागला; व त्याच वर्षी मरण पावला.

फत्तेखान—(स. १६२९) निजामशाहीतील मलिकंबराचा पुत्र. हा बापाप्रमाणें शहाणा नसल्यामुळें याचा बाप मेल्यानंतर मुर्तजा निजामशाहानें यास जुन्नर येथें कैदेंत टाकिलें (स. १६२९). पण परत यास सोडून आणल्यावर, निजामशाहानें यास कारभार चालविण्याचा अधिकार दिला. पण यानें मुर्तजा निजामास कैद करून त्याच्या हुसेन नांवाच्या मुलास तक्तावर बसविलें. पुढें मोगलांचा सरदार महाबतखानानें फत्तेखान व हुसेन या दोघांस पकडून नेलें, पण शहाजहानकडून यास उत्तरहिंदुस्थानांत नेमणूक मिळाली (मु. रि. १, २५७-५८).

२. (मृ. स. १५०७) हा काश्मीरच्या आदमखानाचा मुलगा. यानें आपल्या घराण्यांतील मुहम्मद नांवाच्या राजास कैद करून गादीवर बसला. पण त्यानें सिकंदर लोदीची मदत घेऊन याचा पराभव केला; तेव्हां हा हिंदुस्थानांत पळून गेला व तिकडेच मरण पावला.

३. हा गुजराथचा सुलतान मुज्फरशाहाचा मुलगा.

फत्तेखान घोरी—माळव्याच्या घोरी घराण्यांतील हुशंगशाहाचा मुलगा.

फत्तेखान तुघ्लक—हा दिल्लीच्या फीरूझ तुघ्लकचा मुलगा. याला घियासुद्दीन व नस्मतशाहा अशीं दोन मुलें होतीं. त्यांपैकीं घियासुद्दीन दिल्लीच्या तक्तावर बसला (स. १३८८).

फत्तेखान बाहामनी—हा पहिल्या मुहम्मद बाहमनीचा मुलगा व मुजाहिदाचा भाऊ.

फत्तेखान लोदी—हा बहलोल लोदीचा मुलगा. याला निजामखान, मुबारक, आलम, याकूत, मूसा व जलालखान असे सहा भाऊ होते. त्यांपैकीं निजामखान गादीवर आला.

फत्तेसिंग गायकवाड—(स. १७७१-९०) हा दमाजीचा मुलगा व गोविंदराव गायकवाडाचा भाऊ होय (गोविंदराव गायकवाड पाहा).

स. १७७१ त माधवरावानें (पेशवा) यास ' सेनाकर्ते ' पद देऊन वडील बंधु सयाजी यास याचा मुतालीक म्हणून बडोद्याच्या सरदारीवर बसविलें. यानें कर्नाटकच्या स्वारींत चांगलें काम करून माधवरावाची शाबासकी मिळविली होती.

हा गुजराथेंत दादाचे विरुद्ध लढत होता. पण स.१७८० मध्यें इंग्रज सेनापति गॉडर्ड यानें यास अडचणींत गांठून याजकडून डभईजवळ कुंदेला गांवीं तह करून घेतला. इतकेंच नाहीं तर वर दक्षिणा म्हणून सिनोर व भडोच हे गांव फुकटांत मिळविले.

पुढें दादाच्या चिथावणीनें यानें गोविंदरावाशीं लढाई सुरू करून बारभाईंशींहि विरोध आरंभिला. स. १७७७ चे आरंभीं उभय बंधूंत लढाई होऊन गोविंदरावाचा मोड झाला.

फत्तेसिंग भोसले अक्कलकोटकर—(स.१७०७-६०) श्रीछत्रपति शाहूमहाराज हे स. १७०७ मध्यें मोगलांच्या कैदेंतून मुक्त होऊन ज्या वेळीं दक्षिणेंत आले, त्या वेळीं त्यांच्या प्रवासामध्यें, पारद, परगणे शिवणें (शिवरी, जि. औरंगाबाद) येथील सयाजी लोखंडे नामक पाटलानें, सुरळीतपणें शाहूमहाराजांस रूजू न होतां, मोगलाई तर्फेनें गांव भांडविला. त्याची व शाहूमहाराजांची चांगली चकमक उडाली. ह्या लढाईंत लोखंडे पाटील रणांगणीं पडले. त्या प्रसंगीं सयाजी पाटलांची स्त्री आपलें राणोजी नांवाचें लहान अर्भक घेऊन गर्दीमध्यें शाहूमहाराजांच्या पालखीजवळ गेली, व आपलें बालक त्यांच्या पायांवर घालून महाराजांस म्हणाली कीं, ' या बालकास वांचवावें. अन्यायी होते ते मारले गेले. हें मूल आपणांस वाहिलें आहे.'

शाहूमहाराजांस दया येऊन त्यांनीं याचा स्वीकार केला. झुंजामध्यें फत्ते झाली म्हणून ह्या बालकाचें नांव त्यांनीं फत्तेसिंग ठेविलें, याचें पालन शाहूमहाराजांची आवडती राख विरूबाई हिनें केलें. विरूबाई मेल्यावर तिची क्रिया यानें केली. तिची जिंदगी व तिच्या खर्चाकरितां तोडून दिलेला अक्कलकोटचा परगण्याचा भाग तिच्यानंतर याला मिळाला. शाहूमहाराजांच्या सर्व कागदपत्रांमध्यें फत्तेसिंग भोसले यास ' चिरंजीव ' असेंच

अपत्यवाचक विशेषण लाविलें आहे. हे फत्तेसिंग भोसले मराठ्यांच्या इतिहासांत फार प्रसिद्ध आहेत. शाहू-महाराजांनीं फत्तेसिंग भोसले यांच्या भावास पारद हा गांव स. १७१५ चे सुमारास इनाम करून दिला.

याची कारकीर्द बरीच मोठी झाली. यानें बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व बाळाजी बाजीराव ह्या तिन्ही पेशव्यांच्या कारकीर्दी पाहिल्या, व स्वतंत्रपणें व त्यांच्याबरोबर अनेक मोहिमांमध्यें आपलें शौर्य व्यक्त केलें. कोल्हापूर, कर्नाटक, बुंदेलखंड, भागानगर, त्रिचनापल्ली वगैरे प्रांतांवर यानें स्वाऱ्या केल्या व मराठ्यांची सत्ता प्रस्थापित करण्याचे कामीं उत्कृष्ट साहाय्य केलें. शाहू-महाराज वारल्यावर उदास होऊन हे अक्कलकोटासच राहिले. ह्यांचा व नानासाहेबांचा पुढें बेबनाव झाला होता असें दिसतें. हे स. १७६० मध्यें मृत्यु पावले (ऐ. गो. पृ. ५–७).

२. (मृत्यु स. १८२२) हा अक्कलकोटच्या शहाजी भोसल्याचा मुलगा होय.

शहाजीस तुळजाजी नांवाचा आणखी एक मुलगा होता. त्याचें व फत्तेसिंगाचें भांडण होऊन तुळजाजीस यानें अटकेंत ठेविलें. पण त्यानें कैदेंतून पळून जाऊन पुण्याच्या दरबारीं तक्रार केली. थोड्याच दिवसांनीं सदाशिवराव भाऊ माणकेश्वर यांच्या मध्यस्तीनें भावाभावांत सलोखा होऊन तुळजाजीनें सातारा जि., खटाव तालुक्यांतील कुर्ला वगैरे ८१०० रुपये उत्पन्नाचा मुलूख घेऊन स.१८०७ सालीं स्वस्थ बसण्याचें कबूल केलें.

फरनालूब—हा एक फिरंगी उत्तम वैद्य होता. जेव्हां विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील इब्राहीम दुसरा हा स. १६२० मध्यें भगेंद्र रोगानें आजारी होता, तेव्हां फरनालूब या उत्तम वैद्याचें वर्तमान राजास समजलें. राजानें त्यास बोलावून औषधोपचार सुरू केले, पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. शेवटी स. १६२७ मध्यें इब्राहीम वारला. तेव्हां खवासखानानें फिरंगी वैद्याचें नाक व खालचा ओंठ कापून टाकून यास हद्दपार केलें. नंतर हा हुषार वैद्य आपल्या नोकराचें नाक व ओंठ कापून आपल्या नाका-ओंठावर चिकटवून विजापुरांत येऊन बरेच दिवस राहिला होता.

फरीदखान—(शेरशाहा सूर पाहा).

फर्खुद अलीखान—(नासिरुद्दौला निजाम पाहा).

फर्ग्युसन जेम्स—(स. १८०८–१८८६) शिल्पकलेवरील स्कॉटिश ग्रंथकार. स.१८३५–१८४२ सालच्या दरम्यानच्या काळांत यानें प्रसिद्ध प्राचीन शिल्पावशेषांबद्दल सुप्रसिद्ध अशा हिंदुस्थानांतील अनेक स्थळीं प्रवास करून पुढें प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या शिल्पविषयक ग्रंथाकरितां पुष्कळ साहित्य जमविलें. यानें इंग्लंडमधील लोकांच्या मनांत भारतीय शिल्पकलेबद्दल पुष्कळ आवड उत्पन्न केली. स. १८४३ सालीं यानें 'दक्षिण हिंदुस्थानांतील खडकांत खोदलेलीं देवालयें' हा निबंध वाचला. त्यामुळें प्राचीन हिंदु देवालयांतील जुन्या शिल्पकामाची खरी कल्पना व किंमत शिल्पसंशोधकांस कळूं लागली. याचाच परिणाम म्हणून ईस्ट इंडिया कंपनीनें निरनिराळ्या प्रांतांच्या मुख्याधिकाऱ्यांना आपल्या प्रांतांतील अवशेषांची पाहणी, मोजणी वगैरे करण्याकरितां लायक व हुषार माणसें नेमण्याबद्दल शिफारस केली.

प्रवासांत सूक्ष्म निरीक्षण करून जमविलेल्या साहित्याचा 'भारतीय व पौरस्त्य शिल्पकलेचा इतिहास' हा सर्वमान्य ग्रंथ लिहितांना फर्ग्युसन यानें पुष्कळ उपयोग केला. यानें स.१८४८ त 'हिंदुस्थानांतील प्राचीन बौद्धशिल्प' हा लेख प्रसिद्ध केला; व लगेच 'हिंदु प्रिन्सिपल्स ऑफ ब्युटी इन् आर्ट' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. पुढें यानें 'दि हँड-बुक ऑफ आर्किटेक्चर' हा सुप्रसिद्ध ग्रंथ हातांत घेतला. फर्ग्युसन यास केवळ भारतीय नव्हे तर पूर्व किंवा पश्चिम या दोन्ही दिशांकडील देशांमध्यें जो प्राचीन कलेचा स्मारकावशिष्ट भाग दृष्टीस पडे त्याकडे याचें लक्ष आकर्षिलें जात असे. याचा 'वनस्पती व सर्प यांची उपासना' हा सर्वमान्य ग्रंथ हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीच्या अखत्यारींत तयार झाला असून तो इंडिया ऑफिसनें स.१८६८ सालीं प्रकाशित केला. १८६९ सालीं फर्ग्युसन यानें 'सेक्रेटरी ऑफ वर्क्स अँड बिल्डिंग्ज' ही जागा पत्करूनहि त्यानें आपलें लेखनकार्य शेवटपर्यंत चालू ठेविलें होतें.

फर्नांडिस—(स, १५९६) हा जेजुईट धर्मोपदेशक स. १५९६ त मदुरा येथें आला व तेथील राजा कुमार कृष्णप्पा नायक दुसरा याच्या परवानगीनें तेथें यानें जेजुईट पंथाचें देऊळ बांधलें. यानें तेथें मोफत हॉस्पिटल सुरू करून धर्मप्रसारास सुरुवात केली, पण यास यश आलें नाहीं. तेव्हां हें काम यशस्वी होण्याकरितां रॉबर्ट डी नोबीली हा आला व तेव्हांपासून धर्मोपदेशकांचें प्रस्थ दक्षिण हिंदुस्थानांत माजलें.

फर्रुखझाद गझनवी—(स. १०५३–५९) हा पहिल्या फर्रुखझाद गझनवीचा मुलगा.

फर्रुखसियर मोगल—(स. १७१३–१९) हा बहादुरशहाचा नातू व अजी-मुश्शानचा मुलगा होय.

बहादुरशहाचा मुलगा जहांदर हा क्रूर व दुर्व्यसनी असल्यानें यानें (जहांदरचा पुतण्या) त्याचा खून करून गादी बळकाविली.

याची कारकीर्द 'सय्यद बंधूंचीं कारस्थानें' या नांवानें प्रसिद्ध आहे. पुढें सय्यद बंधूंनीं याला ठार करून लागोपाठ दोन इसम गादीवर बसविले, म्हणून त्यांना 'किंग-मेकर्स' (राजा बनविणारे) असें म्हणतात.

फाजिलखान—(स. १६६०) हा अफजुलखानाचा मुलगा व दुसरा अली आदिलशाहाचा सेनापति असून यानें पन्हाळगडांतून शिवाजी सुटल्यावर त्याचा पाठलाग केला.

फाजिलशाह—(स. १८५०) एक हिंदी कवि. हा करीमचा नातू व शाह करीमचा पुत्र होय. हा छत्रपूरनरेश प्रतापसिंहाचा आश्रित होता. यानें प्रेमरतन नांवाची कथा लिहिली आहे. त्यांत नूरशाहचें कथानक आहे. ही कथा सुफी कवींच्या पद्धतीनुसार नाहीं.

फातिमखानुम ऊर्फ मासाहेबा— कुत्बशाही घराण्यांतील अबदुल्ला कुत्बशाहाची मुलगी. हिचें लग्न मीर्झा निजामउद्दीन अहमदाशीं झालें.

फातिमा सुलतान ऊर्फ बादशहासाहेबा—(लग्न स. १६०५) ही दुसऱ्या इब्राहीम आदिलशहाची मुलगी. हिचें लग्न सतराव्या वर्षी शहा हबीबुल्ला बिन शाह बदुल्ला हुसेनी या श्रेष्ठ कुलांतील पुरुषाशीं झालें.

फारुकी घराणें—(खानदेश) ऐनुद्दीन मुहम्मद खाजाजहान–१ मलिकराज (स. १३८२),–२ (मलीक) नसीरखान (स. १३९९),–३ (मिरन) आदिलखान पहिला (स. १४३७),–४ मुबारकखान पहिला (स. १४४१),–५ आदिलखान २ रा (स. १४५७); याचा भाऊ) ६ दाऊदखान (स.१५०१)–७ गज्नीखान (स. १५०८),–८ हसनखान (स. १५०८), हा पहिल्या मुबारकखानाचा मुलगा.–९ आलमखान (स. १५०८), १० आदिलखान ३ रा (आलमखान. स. १५०९), ११ (मिरान) मुहम्मदशाह १ ला (स. १५२० गुजराथचा सुद्धां राजा).–१२ अहमदशाह (स. १५३७), १३ मुबारकशाह २ रा (स. १५३७)–१४ मुहम्मदशाह २ रा (स. १५६६), १५ हसनशाह (स. १५७६ –७७), १६ आदिलशाह ४ था (स. १५७७–७८), १७ बहादुरशाह (कादरखान); (स. १५९७–१६०१) (केंब्रिज हिस्टरी).

फाहियान—(स. ३९९–४१३) गुप्त घराण्यांतील दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या वेळीं हिंदुस्थानांत आलेला चिनी प्रवासी. हा मध्य आशियांतून आला व ताम्रलिप्तीच्या भागांतून परत गेला. संस्कृत भाषेचें अध्ययन करणें व विनयपिटकादि महायान पंथाच्या ग्रंथांचा संग्रह करणें हा याच्या यात्रेचा उद्देश होता. हा स्वात, गांधार, तक्षशिला, पेशावर, मथुरा, कनोज, श्रावस्ती, कपिलवस्तु, कुशीनगर, वैशाली आदि फिरत पाटलिपुत्राला आला. तेथें अशोकानें तयार केलेला महाल पाहून याला असे महाल मनुष्य बनवूं शकत नाहींत, हे असुरानें केले असले पाहिजेत, असें वाटलें. तीन वर्षें पाटलिपुत्रांत राहून यानें संस्कृताचें अध्ययन केलें. नंतर फिरत ताम्रलिप्ती येथें आला. तेथें दोन वर्षें राहिला. यात्रेंत पुस्तकें, ग्रंथ यांचा संग्रह करून समुद्रमार्गानें चीनला गेला.

हा चीन देशांत शानन्सी नांवाच्या प्रदेशांत उंयाङ्ग येथें जन्मास आला. हा तीन वर्षांचा असतांच याला बौद्धधर्माची दीक्षा देण्यांत आली व त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें यास शाक्यपुत्र फाहियान म्हणूं लागले.

चवदा वर्षें हा भारतांत हिंडत होता. यानें लिहिलेल्या प्रवासवृत्ताचें महत्त्व ऐतिहासिक दृष्ट्या फार आहे. त्याचें हिन्दी, इंग्रजी, फ्रेंच वगैरे भाषान्तर झालें आहे. हिन्दी भाषान्तर जगन्मोहवनर्मा यांनीं केलें आहे.

फार्मर—(स. १७७९) तळेगांवच्या लढाईनंतर तह करण्याकरितां आलेला इंग्रज वकील.

फालुदखाद ऊर्फ **पोलादखान**—आग्रा येथें शिवाजी कैदेंत असतां त्यावर तीन महिने तोफखान्यासह पाहरा करणारा अधिकारी.

फिर्दौसी—(स. ९९८–१०३० सुमार) हा एक प्रसिद्ध कवि होय. गझनीचा जो महमूद त्याच्या पदरीं हा होता व त्याच्याच आश्रयाखालीं हा प्रसिद्धीस आला. हा शाहानामा नांवाच्या इराणच्या प्राचीन राजवंशाचा काव्यमय इतिहासग्रंथाचा महाकवि. याचा जन्म खोरासानमधील तूस शहरीं झाला. याचा ग्रंथ फार्सी भाषेंत आहे, आणि तो आपल्या इकडील महाभारताप्रमाणें लोकप्रिय आहे. याच्या शाहानामा ग्रंथांत साठ हजार कविता आहेत. शेवटीं मात्र ठरल्याप्रमाणें साठ हजार सुवर्णमुद्रा देण्याचे ऐवजीं साठ हजार रौप्यमुद्रा देऊन महमूदानें याचा हिरमोड केला. त्या वेळीं यानें त्याच्या नीच कुलामुळें फिरलेल्या बुद्धीबद्दल तीव्र टीका करण्याकरितां लिहिलेल्या कवितेमुळें तर शाहानामा आणि महमूद यांचे संबंध कायमचे व अविस्मार्य झालेले आहेत. हल्लीं ही कविता शाहानाम्याच्या सर्व आवृत्तींवर प्रामुख्यानें छापलेली असते.

फिलाडैलफस टाल्मी—(राज्यकाल ख्रि. पू. २८५–२४७) मिस्र म्हणजे इजिप्त देशाचा राजा. याचा सरदार डायोनीसियस हा बिंदुसार मौर्याच्या दरबारांतील वकील होता.

फिलिप्पोस—हा शिकंदरचा एक सेनापति होता. याला त्यानें परत जातांना सिन्धूच्या पश्चिमेकडील भागाचा क्षत्रप नेमलें होतें. पण याचा पुढें खून झाला.

फीरूज पूर्वी—(स. १४६१) हा बंगालचा सुलतान. याची राजधानी गौड.

फीरूझखान—(स. १४११) हा गुजराथचा सुलतान पहिला मुज्फरशाहाचा मुलगा. याला तातारखान, हैबतखान, सादतखान, शेरखान व फत्तेखान असे पांच भाऊ होते.

फीरूझ लोदी—(स. १४८६ सुमार) हा लोदी घराण्यांतील मलिक बहरामचा मुलगा. याला सुलतानशाह, काला, मुहम्मद व मलिकख्वाजा असे चार भाऊ व शाहिनखान नांवाचा एक पुत्र होता.

फीरूझशाह तुघ्लक—(ज. स. १३०९) हा दिल्लीचा बादशाहा. हा तुघ्लक घराण्यांतील राज बसिपाहसालारचा मुलगा. याची आई रजपूत होती. यानें राज्यांत पुष्कळ सुधारणा केल्या. यानें राज्यांत शेतसारा ठरवून वसूल वाढविला. हा हिंदुधर्माचा फार द्वेष्टा होता. याला प्रथम घियासुद्दीनानें लहानाचा मोठा केला व नंतर मुहम्मद तुघ्लकानें यास चांगलें शिक्षण दिलें. यानें बंगालवर दोन स्वाऱ्या केल्या, व यमुनेचा कालवा बांधला. याचेकडे नजराणा पाठविणारा प्रत्येक प्रांतिक कामगार दहापासून शंभरांपर्यंत देखणे व धष्टपुष्ट गुलाम पाठवीत. हा गुलामांस शिक्षण देऊन त्यांना कामावर नेमी.

फीरूझशाहा बाहमनी—(मृ. स. १४२२) हा एक बाहमनी राजा. हा दाऊदखानाचा चुलतभाऊ शम्सुद्दीनास पदच्युत करून गादीवर बसला (स.१३९७). याच्या व हिंदु राजांच्या वरचेवर लढाया होत. यानें विजयनगरच्या देवरायाचा पराभव करून, त्यास अपमानास्पद तह करावयास भाग पाडलें, व त्याच्या मुलीशीं लग्न केलें. याचें परधर्मीयांशीं वर्तन कठोरपणाचें होतें. हा उदार होता. याचा शिक्षक मीर-फैज-उल्ला अंजू यास यानें वजीर केलें. यानें भीमेच्या काठीं फीरूजबाद नांवाचें शहर वसविलें. याच्यानंतर याचा भाऊ अहमदशाहखान खानान गादीवर बसला.

फुकी—(स. ७१२) दाहीरचा मुलगा. दाहीर मारला गेल्यावर यानें आरोरास राहून मुहंमदास तोंड देण्याची तयारी ठेविली होती. याची अशी समजूत होती कीं, दाहीर मेला नसून पुन्हां प्रयत्न करून पाहण्याकरितां तो कोठेंतरी अज्ञातवासांत असावा. मुहंमदानें याची खात्री करण्याकरितां दाहीरची राणी लादी, जिनें मुहंमदाशीं निका लावला होता, तीस याकडे पाठविलें. परंतु तिनें इस्लामी धर्म स्वीकारून पतीच्या शत्रूशीं लग्न लाविल्याबद्दल यानें तिची निर्भर्त्सना केली. पुढें फुफीची खात्री झाली कीं दाहीर खरोखरच युद्धांत कामी आला. अशी खात्री झाल्यावर रात्रीचाच आरोरहून याने पळ काढला.

फुगो—(स. १७७०) ऊर्दू कवि. ह्याचें मूळ नांव अशरकअलीखां असें असून हा अहंमदशाह बादशहाच्या पदरीं होता. परंतु अहमदशाहा अब्दालीच्या स्वारीनंतर यानें दिल्ली सोडली.

हा नदीबाचा शिष्य असून कांहीं दिवस सुजाउद्दौल्याजवळ होता. पण त्याच्याशीं याचें पटलें नाहीं. ह्यानें शेवटचें आयुष्य आजीमाबादेस घालविलें. यानें ऊर्दूचें श्रेष्ठत्व वाढवून एक दीवान लिहिला. हा हजरजबावी असून मोठा बाणेदार होता (क. कौ. भा. ४ था).

फेरिश्ता— (स. १५७०–१६१४) याचें नांव मुहम्मद कासीम असें होतें. हा ' तारीख-इ-फेरिश्ता ' या इतिहासाचा कर्ता होय. याचा जन्म कॅस्पिअन समुद्रकिनाऱ्यावर असणाऱ्या आस्त्रबाद गांवीं स.१५०० किंवा १५५० मध्यें झाला.

याच्या बापाचें नांव ' गुलाम अली हिंदु शाह ' असें असून तो फार विद्वान् होता. गुलाम अलीनें हा अल्पवयी असतांना आपली मातृभूमि सोडली आणि प्रवास करीत करीत हिंदुस्थानांत आला. हिंदुस्थानांत आल्यावर अहमदनगरच्या मुर्तझा निजामशाहा १ ला यानें गुलामला आपला मुलगा मिरान हुसेन याला फार्सी शिकविण्याकरितां ठेविलें. पण लवकरच गुलाम मरण पावला आणि याचा आधार गेला.

स. १५८९ मध्यें मुर्तझा निजामशाहा १ ला मरण पावल्यावर हा (फेरिश्ता) विजापूरच्या दिलावरखानाकडे (इब्राहिम आदिलशहा २ ऱ्याचा प्रधान) गेला. दिलावरखानानें याचा स्वीकार करून याला आपल्या पदरीं ठेविलें. ज्या इतिहासामुळें याची प्रसिद्धि झाली, तो इतिहास यानें दिलावरखान याचे सांगण्यावरून स. १६१४ मध्यें लिहिला.

याच्या मृत्यूचा काळ अनिश्चित आहे. यानें आपल्या

ग्रंथाला 'गुल्शन-इ-इब्राहिमी' किंवा 'नौरसनामा' असें नांव दिलें आहे. 'गुल्शन-इ-इब्राहिमी' हें नांव ग्रंथ अर्पण केलेल्या राजाचें होय. पुढें 'गुल्शन-इ-इब्राहिमी' या ग्रंथाचा 'तारीख-इब्राहिमी' या नांवानें उल्लेख होऊं लागला.

याला इब्राहीम आदिलशाह व विजयनगरचे इतर राजे यांच्याकडून ऐतिहासिक साधनें पुरवलीं जात.

फैज मुहम्मद—भोपाळ संस्थानांतील जो यारमुहंमद त्याचा हा पुत्र होय. याचा वजीर हिंदु होता. हा विरक्त असल्यामुळें याचा दिवाण बाजीराम कारभार करीत असे. ह्याला पुत्रसंतान नव्हतें.

फ्रान्सिस बर्नियर—(स. १६५५-६७) युरोपियन प्रवासी. हा हिंदुस्थानांत आला त्या वेळेस दिल्लीस शहाजहान बादशहा राज्य करीत होता. हा स. १६५५ पासून ते स. १६६७ पर्यंत हिंदुस्थानांत होता, याची औरंगजेबाचा वजीर फज्लखानाशीं फार मैत्री होती, व यानें त्यास अनेक सुंदर लॅटिन ग्रंथांचीं भाषांतरें करून दिलीं. औरंगजेबानें राज्यप्राप्तीकरितां जीं कारस्थानें केलीं, त्या कारस्थानांचीं वर्णनें यानें युरोपांत गेल्यावर लिहून ठेविलीं (मु. रि. भा. २, पान ३६९).

फोंड सावंत—(स. १६१५ सुमार) हा मांग सावंताचा मुलगा होय. सावंतवाडीचा राज्यसंस्थापक जो खेम सावंत पहिला तो या फोंड सावंताचा मुलगा होय.

२. (स. १६६५-७५) हा खेम सावंताचा पुत्र व लखम सावंतानंतर गादीवर आला.

३. (राज्यकाल स. १७०९-३७) हा दुसऱ्या खेम-सावंतानंतर गादीवर आला. याला कोल्हापूरकर, आंग्रे व पोर्तुगीज यांच्याशीं लढावें लागलें म्हणून यानें इंग्रजांशीं तह केला (स. १७३०).

४. (राज्यकाल स. १८०८-१८१२) यास तिसऱ्या खेम सावंताच्या दुर्गाबाई नांवाच्या पत्नीनें दत्तक घेतलें.

फौलादखान—(राज्यप्राप्ति स. १७७८-१८०७ सुमार) हा भोपाळच्या हयात मुहम्मदाचा शिष्य. हा मूळ गोंड मागाहून मुसलमान झाला. यानें इंग्रजांशीं दोस्तीचा तह केला.

फ्रँसिस—कलकत्ता येथील वॉरन हेस्टिंग्सच्या कौन्सिलांतील एक कौन्सिलर. हा हेस्टिंग्सच्या विरुद्ध असे.

फोंटेबोना—(मृ. स. १६२६) एक युरोपियन चित्रकार. हा विजयनगरच्या आरविदु घराण्यांतील दुसऱ्या वेंकटराय आरविदूच्या दरबारीं होता. यानें राजाचा स्वतःचा फोटो काढून देऊन, त्याबरोबरच येशूचें चित्र राजास नजर केलें. त्यामुळें राजा खूष होऊन त्यानें यास जरीचे कपडे बहाल केले.

ब

बक्काराय—हा विजयानगरच्या हरिहरराय राजाचा भाऊ होय.

बखतराम—पेशवाईंतील उत्तम मूर्तिकार. पुण्यांतील खुन्या मुरलीधर, बेलबागेंतील विष्णूची मूर्ति, कुबेंदवाडची मूर्ति इत्यादि प्रसिद्ध मूर्ती यानें केल्या.

बखतबुलंद—(मृ. स. १७०६ सुमार) देवगडचा राजा. देवगडच्या गोंडराजांचा मूळ पुरुष जातबा, त्याचा मुलगा कोकशहा व त्याचा हा बखतबुलंद होय. कोकशहानंतर हा गादीवर बसला. याचें मूळचें नांव बखतशाहा. याचे भावांनीं याचे विरुद्ध बंड करून यास देवगडाहून हाकून दिलें. तेव्हां हा पळून औरंगजेबाकडे गेला. "तूं मुसलमान होशील तर मी तुला मदत करतों," असें औरंगजेबानें सांगितलें. बखतबुलंद यानें निरुपायानें ती गोष्ट कबूल केली, पण पुढील अटी घातल्याः "मुसलमान झाल्यावर मुसलमानांशीं रोटीव्यवहार करीन पण बेटीव्यवहार करणार नाहीं. गोंडांच्याच मुली करीन." याप्रमाणें करार ठरल्यावर हा मुसलमान झाला व मदत घेऊन परत आला व आपलें राज्य परत मिळवलें.

हल्लीं नागपुरास बखतबुलंद याचा वंश आहे व आतांपर्यंत गोंडांशींच त्यांचे लग्नसंबंध होतात. लग्नविधि हिंदु व गोंडी पद्धतीनें होऊन नंतर मुसलमानी विधि करतात.

बखतबुलंद पराक्रमी निघाला. यानें उत्तरेकडून व पूर्वेकडून वऱ्हाडच्या सरहद्दीपर्यंत आपलें राज्य वाढविलें. नागपूर हें शहर ह्यानेंच वसविलें. राजापूर बारसा नांवाच्या बारा वाड्या होत्या त्या एकत्र करून रस्ते पाडून पेठा वसविल्या व तट बांधला. नागपूर हें नांव सुद्धां ह्यानेंच दिलें.

गड्याच्या नादीरशहावर दोघां पठाणांनीं आणलेलें संकट यानें मदत देऊन टाळलें. याचे नंतर याचा मुलगा चांदसुलतान गादीवर बसला (ना. प्रां. इ. पा. २९).

बखतावरसिंग—(अलवार) (मृ. स. १८१५) अलवारचा राजा जो प्रतापसिंह त्याच्यानंतर हा अलवारच्या गादीवर आला. यानें आपला मुलूख जास्त वाढविला. मराठ्यांशीं झालेल्या लढाईंत हा इंग्लिशांच्या बाजूनें लासवारीच्या लढाईंत हजर होता.

बच्याजी रघुनाथ मेहेंदळे—(स. १७९१ सुमार) हे बहिरो रघुनाथ मेहेंदळे म्हणून जे इंग्रज रेसिडेंट सर चार्लस मालेट ह्यांजकडे पेशव्यांच्यातर्फे वकील होते, त्यांचे धाकटे बंधु होत. हे पेशव्यांच्या वतीनें लॉर्ड कॉर्नवालीस ह्यांच्याबरोबर (स. १७९१ साली) टिपूच्या मोहिमेवर गेले होते. यांनां ह्या मोहिमेसंबंधाचीं पुष्कळ बातमीपत्रें लिहिलीं असलीं पाहिजेत.

बजाजी निंबाळकर—(स. १६३९–१७०५) हा जगपाळाचा नातू आणि मुधोजीचा कनिष्ठ पुत्र होय. विजापूरचा इब्राहिम आदिलशाहा मृत्यु पावल्यानंतर निंबाळकरांनीं इतरांप्रमाणें दरबारचें सेवावृत्तीचें जूं बाजूस सारून मुलुखांत आवाडाव सुरू केली. परंतु विजापूरच्या लष्करानें मुधोजीचा पाडाव करून त्यास सातारच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें. त्या वेळीं बजाजी हा आपल्या बापाबरोबर दहा वर्षे अटकेंत होता. शहाजीच्या साह्यानें या बापलेकांची सुटका झाली, आणि यास पूर्ववत् फलटणची जहागीर मिळाली (स. १६३९). बजाजीची बहीण सईबाई हिचें लग्न शिवाजीशीं ता. १६ मे १६४० रोजीं झालें.

मुधोजीनें फलटण संस्थान एकट्या बजाजीच्या नांवानें करून त्याप्रमाणें बादशाही सनदाहि आणविल्या (स. १६४१). पुढें विजापूरकरांना निंबाळकरापासून त्रास होऊं लागला, तेव्हां विजापूरकरांनीं निंबाळकरावर सैन्य पाठवून युद्ध सुरू केलें. त्यामध्यें मुधोजी मारला जाऊन बजाजीचा पाडाव झाला, आणि यास विजापुरीं नेण्यांत आलें (स. १६४४). तेथें बादशहानें याला मारण्याचा हुकूम सोडला. पण मुसलमानी धर्म स्वीकारण्याचें कबूल केल्यावर याला जीवदान मिळालें. बादशहानें आपली मुलगी यास देऊन याची फलटणची जहागीर यास पुनः परत दिली. हा फलटणास परत आल्यावर (स. १६५१) जिजाबाईनें यास आपल्या दर्शनास बोलाविलें व यास शुद्ध करून स्वधर्मांत घेतलें. याची मुसलमान बायको विजापुरीं मृत्यु पावली. परंतु कैद होऊन विजापुरीं जाण्यापूर्वी याची धर्मपत्नी सावित्रीबाई म्हणून होती तिच्यापासून याला महादजी नांवाचा एक मुलगा झाला होता. सावित्रीबाई हा विजापुरीं असतांच मरण पावली म्हणून यानें फिरून दोन लग्नें केलीं. त्यांपासून यास गोरखोजी, वणगोजी व मुधोजी असे तीन मुलगे झाले. बजाजीनें शिवाजीस गुप्तरूपें पुष्कळ साह्य केलें. शिवाजीनें आपली मुलगी सखूबाई ही महादजीस दिली; आणि अशा रीतीनें बजाजीच्या धर्मांतराविषयीं कांहीं लोकांच्या मनांत जी मळमळ होती, ती नष्ट झाली. अफझलखान शिवाजीवर येतांना (स. १६५९) त्यानें याला पकडलें आणि हत्तीच्या पायाखालीं देणार तों नाईकजी राजे पांढरे यांच्या मध्यस्थीनें ६० हजार होन देऊन मोकळे केलें (प. सा. ७९६; १७९७).

बजाजीनें आपणास मिळावें म्हणून औरंगजेबानें स. १६६९ त यास पत्र लिहिलें, पण हा त्यास सामील झाला नाहीं. फलटणास याच्या नांवाचा एक घुमट आहे त्यास 'लांडेबजाजीचा घुमट' असें म्हणतात. बजाजी स. १७०५ पर्यंत जिवंत असल्याचें नमूद आहे (रा. खं. ८.५३).

बजाबा पुरंदरे—(स. १६६२–) हा एक पेशवाईंतील कर्तबगार पुरुष होय. याचा महिपत त्रिंबक या नांवानें उल्लेख करितात. स. १६६२ मध्यें जी व्यवस्था ठरविण्यांत आली होती, त्या व्यवस्थेप्रमाणें याला पेशव्यांचा मुतालीक नेमण्यांत आलें होतें (म. रि. मध्यवि. ४. पृ.३३). जेव्हां नानानें मोरोबास कैद केलें त्या वेळेस बजाबा पुरंदरे त्याच्याच जोडीस कैदेंत गेला. पुढें यानें दादास चिथवण्याचें काम जोरांत चालविलें. हा एकदां म्हणाला कीं, " आम्ही मरून जाऊं, पण दीनवाणी होऊन नानापुढें करुणा भाकणार नाहीं." (म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. ११७,१३९).

बज्र—(स. १००४) उछचा राजा. उछला दहाव्या शतकांत भातिया म्हणत. महमूद गझनीनें जयपाळाविरुद्ध यास लढण्यास बोलावलें असतां हा गेला नाहीं, म्हणून त्यानें याच्यावर स्वारी केली. यानें जोराचा प्रतिकार केला, पण शेवटीं पळून जाऊन आत्महत्त्या केली. याचें शिर मुसलमानांचे हातीं पडलें. याच्या सैन्याची सरसहा कत्तल करण्यांत आली.

बडीग चालुक्य—(अरिकेसरिन् पाहा).

बदनसिंग जाट—(मृत्यु स. १७७५) याचा पुत्र सुरजमल्ल जाट. चूडामण जाट मृत्यु पावल्यावर याचा भाऊ मोहकमसिंहानें याला तुरुंगांत टाकलें व गादी

बळकाविली. पण यानें सवाई जयसिंगाच्या मदतीनें दीगचा किल्ला घेतला व 'दीगचा राजा' हा किताब मिळवला. याच्यामुळें गंगनगर येथें जोधपूरच्या अभयसिंगाशीं लढतांना जयसिंगाला यश मिळालें (स. १७३९). हा फार शूर व कर्तबगार होता.

बदाऊनी—(अबदुल कादिर बदाऊनी पाहा).

बद्दिग राष्ट्रकूट—(स. ९३७-३८) तिसऱ्या वर्षाचें नामांतर.

बद्रुद्दीन सुंकर—(स. १२४०-१२४१) सुलतान मुइज्जुद्दीन बहराम यानें ऐतिगिनचा खून करवून बद्रुद्दीन सुंकर यास त्याची मुख्य वाकनिसाची जागा दिली. पुढें हा चढेलपणें वागूं लागला व शेवटीं यानें सुलतानाचा खून करण्याचा कट केला. परंतु मुख्य वजीर निजामुल्मुकनें ही खबर बहरामास दिली. तेव्हां बहरामानें यास प्रथम बडतर्फ केलें व नंतर तुर्की सरदारांत याचें वजन फार आहे म्हणून यास बुदौनचा सुभेदार नेमिलें. स. १२४१ मध्यें हा परवानगी न घेतां दिल्लीस आला. तेव्हां सुलतानानें बेशिस्त वर्तनाबद्दल ह्यास ठार मारिलें.

बनबारी—(स. १६३३-४३) एक हिंदी कवि. यानें जसवंतसिंगाचा वडील भाऊ अमरसिंह याची कथा फारच तेजस्वी भाषेंत वर्णिली आहे.

बनसीपुरी गोसावी—उदेपुरी गोसाव्याचा गुरु. याचा मठ साताऱ्यास होता (ना. प्रां. इ.).

बनाजी माधव—(निरंजन माधव पाहा).

बनारसीदास—(जन्म स. १५८६) हा हिंदी कवि व जैन जव्हारी जौनपूरचा राहणारा असून याच्या बापाचें नांव खड्गसेन असें होतें. हा तरुणपणीं रोगट व दुर्वर्तनी होता. परंतु उत्तर आयुष्यांत सुधारला. बनारसीविलास, नाटक-समयसार, नाममाला अर्द्ध कथानक, बनारसी पद्धति, मोक्षपदी ध्रुव-वंदना, कल्याण मंदीर भाषा, वेदनिर्णय-पंचाशिका, मारगनविद्या वगैरे याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. याची रचनाशैली भरदार आहे.

२. जहांगीर बादशहाच्या दरबारांतील एक मुत्सद्दी.

बनुबाई गुजर—ही दुसऱ्या रघूजी भोसल्याची मुलगी होय. हिला नाना गुजर यास दिली होती. हिचा मुलगा बाजीबा ऊर्फ बाजीराव यास बांकाबाईचे सल्ल्यानें ता. २५-६-१८१८ रोजीं परसोजी भोसल्याची बायको दुर्गाबाई हिच्या मांडीवर देऊन त्याचें नांव तिसरा रघूजी ठेवलें, व त्यास २६-६-१८१८ रोजीं गादीवर बसविलें (ना. प्रां. इ., पा. ४८३).

बप्पन कवि—तेलंगी कवि. आंध्रप्रयोगरत्नाकर ग्रंथाचा कर्ता (क. च.).

बप्पभट्टि—(स. ७५१) कनोजच्या चक्रायुधाच्या दरबारांतील पंडित. यानें धर्मपालाचा पंडित वर्धनकुंजरचा पराभव केला.

बयाबाई आपटे—(जन्म स. १८४७) ही दुसऱ्या बाजीरावाची कन्या असून हिचा जन्म ब्रह्मावर्तास झाला. हिचें लग्न स. १८५५ सालीं ग्वाल्हेर येथील सरदार बाबासाहेब आपटे यांचे चिरंजीव रावसाहेब आपटे यांच्याबरोबर झालें. परंतु रावसाहेब स.१८८३ मध्यें निवर्तले व यांना वैधव्यदशा आली. शेवटचें आयुष्य यांनीं परमेश्वरभक्तींत काशीला दुर्गाघाटावरील आपल्या वाड्यांत घालविलें. इंदूर दरबाराकडून यांस नेमणूक मिळत असे.

बयाबाई भोसले— ही पहिल्या रघूजीची आजी म्हणजे बापूजी भोसल्याची बायको होय. हिच्यापासून बापूजीस बिंबाजी, संताजी व राणोजी ऊर्फ सवाई संताजी असे तीन मुलगे झाले.

बयाबाई रामदासी—(स. १७०० सुमार) रामदासस्वामींची शिष्याीण. हिंदी व मराठी कवयित्री. हिनें कांहीं आर्याहि केल्या आहेत. हिची हिंदी भाषा मराठीपेक्षांहि ठसकेदार आहे.

बरीदशाही घराणें (बेदर व अहमदाबाद)—१ कासीम बरीद १ ला (स. १४९२), २ अमीर अली बरीद (स. १५४२), ३ अली बरीद (स. १५४९), ४ इब्राहीम बरीद (स. १५७९), ५ कासीम बरीद २ रा (स. १५८६), ६ अमीर बरीद (स. १५८९), ७ मीर्झा अली बरीद २ रा (स. १६०१), ८ अली बरीद २ रा (स. १६०९-१९).

बर्क—(स. १७२९-९७) हा एक इंग्रजांचा कर्तबगार पुरुष होय. हा इंग्लंडमध्यें राहत असे. दादानें याच्याकडे लष्करी मदत मागण्यासाठी आपल्या हणमंतराव व मणियार पारशी या दोन वकिलांना इंग्लंडमध्यें पाठविलें होतें. बर्कनें त्यांची बरदास्त ठेवून, इकडून फौजेची मदत मिळणें शक्य नाहीं (स. १७७९) अशा जबाबानिशीं त्यांस परत पाठविलें. त्यासंबंधाचें बर्कचें दादास आलेलें पत्र प्रसिद्ध आहे (रा. खं. १२.-२२९-२३४)

बलदेव—(स.११६०सुमार) हा विज्जल कलचुरीचा

प्रधान. हा ब्राह्मणजातीचा होता. हा बसवाचा मामा असून यानें आपली मुलगी बसवाला दिली होती.

बलभद्र—अद्वैतसिद्धिकार मधुसूदनसरस्वती यांचा एक शिष्य. याच्या विनंतीवरून त्यानें श्रीशंकराचार्यांच्या दहा श्लोकांवर सिद्धान्तबिन्दु नांवाची टीका लिहिली, असें टीकेच्या शेवटीं लिहिलें आहे.

२. (स. ९६६) एक ज्योतिषी. पृथूदकाच्या ब्रह्मसिद्धांतावरील टीकेंत याचें नांव आढळतें. भट्टोत्पलकृत बृहत्संहिताटीकेंतहि बलभद्राच्या नांवावर कांहीं श्लोक दिसतात. याचा स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध नाहीं.

बलभद्रमिश्र—(जन्म स. १६००. कविताकाल स. १६४०) एक हिंदी कवि. जात सनाढ्य ब्राह्मण. गांव ओर्च्छा. पिता काशीनाथ पंडित. हा प्रसिद्ध केशवदासाचा भाऊ. याचे ग्रंथ–नखशिखशृंगार, बलभद्रीव्याकरण, हनुमन्नाटक, दूषणविचार, भागवतभाष्य वगैरे. याची रचना प्रौढ व परिमार्जित आहे.

बलवर्मा सोलंकी—(स. ८९४-९९) हा सोरठच्या सोलंकींपैकीं अवनिवर्म्याचा पुत्र. यानें विषढाला जिंकलें आणि जज्जप वगैरे राजांना ठार मारून पृथ्वीवरून हूणवंश नाहींसा केला. यानें वलभी संवत् ५७४ (वि. सं. ८५०, स. ८९४) माघ शु. ६ ला स्वतः पराक्रमानें संपादक केलेले ८४ गांव असलेल्या नक्षिसपुर (सोरठ–काठेवाडांत) प्रदेशांतील जयपुर गांव तरुणादित्य नांवाच्या सूर्यमंदिराला अर्पण केलें. हा कनोजच्या पडिहार राजा भोजदेवाचा पुत्र महेन्द्रायुध (महेन्द्रपाल) देवाचा सामंत आणि सौराष्ट्रांतील एका भागाचा राजा होता. याचा पुत्र अवनिवर्मा दुसरा होय.

बलीभद्र शुक्ल—(स. १६२३) कुंडतत्त्वप्रदीप या १५९ श्लोकांच्या ग्रंथाचा कर्ता. स्तंभसुर्तीर्थपत्तनचा राहणारा.

बल्बन गुलाम—(स. १२६६–८६) शम्सुद्दीन अल्तमशनें याला गुलाम म्हणून विकत घेतलें आणि वाढत जाऊन शेवटीं हा दिल्लीचा बादशहा झाला. याचें नांव बहाउद्दीन बल्बन किंवा घियासुद्दीन बल्बन किंवा उलुघखान. हा नासिरुद्दीन महमूदशाहानंतर त्याच्या इच्छेवरून तक्तनशीन झाला. घियासुद्दीन हें गादीवर बसतांना धारण केलेलें नांव होय.

अलाउद्दीन मसूदच्या वेळेपासून हा सारखा यशस्वी होत गेला. यानें गेलेला मुलूख परत मिळविल्यामुळें नासिरुद्दीन महमूदशाहानें याला आपली मुलगी देऊन जांवई केलें (स. १२४९); आणि शेवटीं तर मुलगा नसल्यामुळें यालाच आपल्या गादीचें वारस बनवलें. मधल्या काळांत अनेक बरेवाईट प्रसंग येऊन हा पराक्रमानें निभावला होता. याला तुर्क व हिंदु यांच्याशी सारखें झगडावें लागलें. दिल्लीच्या आसपास जंगल असल्यानें त्यांत राहून मिओ लोक दिल्ली शहरांत धुमाकूळ घालीत. त्याकरितां जंगल तोडून यानें मिओंच्या कत्तली केल्या, आणि दिल्ली ते बंगालपर्यंत सर्व व्यवहार सुरळीत चालेल अशी व्यवस्था केली. शेरखान संकरला ठार केलें, बंगालच्या तुघ्रीलचें बंड स्वतः मोडलें आणि भयंकर कत्तल करून दहशत बसविली. रस्त्यानें व बाजारांत दोनहि बाजूंस शूळ उभारून लोकांना ठार केलें.

हा मोठा क्रूर होता. शरीरानें ठेंगू व कुरूप असे. भपकेबाज दरबार भरवून वजन पाडण्याची याची पद्धत असे. यानें लाखावर लोक कत्तल करून मारले. यानें जवळ पुष्कळ विद्वान् बाळगले होते. यानें शेतीची सुधारणा केली.

बल्लाळ यादव—(स.१२०० सुमार) हा यादवांपैकीं अमरमल्लुगीचा पुत्र. याचा पुत्र जैतुगि किंवा जैत्रपाळ पहिला होय.

बल्लाळ शिलाहार—(स. १०७५ सुमार) हा कोल्हापूर येथें राज्य करीत असलेल्या तिसऱ्या शिलाहार घराण्यापैकीं मारसिंहाचा पुत्र व पहिल्या भोजाचा भाऊ. यानें पहिल्या भोजानंतर राज्य केलें.

बल्लाळ सेन—(स. ११५८–११७०) हा सेन घराण्यापैकीं तिसरा राजा होय. हा पाल राजांचा द्वेष करी. हा स्वतः हुषार असून याच्या पदरीं संस्कृत पंडित होते. हा विजयसेनाच्यानंतर गादीवर आला. यानें चातुर्वर्ण्याची पुनर्घटना केली. यानेंच बंगालचे चार भाग पाडले असें म्हणतात. यानें मिथिला जिंकून आपल्या राज्याला जोडली.

यानें 'आचारसागर' आणि 'प्रतिष्ठासागर' असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. यांशिवाय यानें 'दानसागर' हाहि एक ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथामध्यें दानाविषयीं सर्व माहिती आलेली आहे. शिवाय 'दानसागर' यामध्यें महाभारताविषयीं व पुराणांविषयीं अतिशय महत्त्वाची माहिती आलेली आहे. यानें पुराणांतील पुष्कळ उतारे घेतलेले आहेत. याचा 'अद्भुतसागर' हा अपूर्ण राहिलेला ग्रंथ याचा मुलगा लक्ष्मणसेन यानें पूर्ण केला. या ग्रंथाचा उल्लेख निर्णयसिंधु यामध्यें आलेला आहे.

रघुनंदन म्हणतो कीं, 'दानसागर' हा ग्रंथ याचा

(बल्लाळसेन) नसून तो अनिरुद्धाचा होय. हा ग्रंथ बल्लाळानें आपल्या गुरूच्या (अनिरुद्ध) लळ्यानें लिहिला आहे, असा उल्लेख दानसागर याच ग्रंथांत आलेला आहे.

बल्लाळ होयसळ—(स. ११००-११०६) म्हैसूर प्रांतांतील द्वारसमुद्र येथें राज्य करणाऱ्या यादव घराण्यांतील विनयादित्याचा नातू व विष्णुवर्धनाचा थोरला भाऊ. हा एरेयंग याचा मुलगा. याचा दुसऱ्या प्रोलानें पराभव केला.

२. (स. ११७३-१२२०) होयसळ घराण्यांतील जो नरसिंह १ ला त्याचा हा मुलगा होय. हा स.११७३ मध्यें आपल्या बापानंतर 'महामंडलेश्वर' म्हणून राज्य करूं लागला.

स. ११८१ मध्यें यानें उच्छंगीस वेढा दिला आणि पांड्य राजा काम-देव यास पराजित केलें. पुढें स. ११९२ मध्यें यानें पश्चिम चालुक्याचा सेनापति बम्म (बर्म-रस) याचा पराभव केला. यानें स. १२२० पर्यंत राज्य केलें. यानें 'महाराजाधिराज' ही पदवी घेतली. याला वीर बल्लाळ असें म्हणतात (B.).

होयसळ घराण्यांतील एक राजा. याचा देवगिरीच्या यादव घराण्यांतील जैत्रपाल सिंघणानें पराभव केला.

३. (स. १२९२-१३४२) हा होयसळ घराण्यांतील तिसऱ्या नरसिंहाचा पुत्र तिसरा बल्लाळ याला स. १२९२ मध्यें राज्याभिषेक झाला. मदुरेच्या घियासुद्दीन दामघानीनें यास त्रिचनापल्ली येथें ठार मारलें.

हा होयसळ घराण्यांतील बहुतेक शेवटचाच पण मुसलमानांच्या आक्रमणाचें संकट ओळखणारा आणि त्याला यशस्वीपणें तोंड देणारा राजा होय. कारण याच्यानंतर गादीवर आलेला राजा बल्लाळ ४ था हा तुसता नामधारीच राजा असून तो सुद्धां कांहीं दिवस गादीवर नव्हता.

याच्या वेळीं दिल्ली येथें खल्जी घराणें राज्य करीत होतें. स. १३१० मध्यें अलाउद्दीन खल्जीचा सेनापति मलिक काफूरनें याच्यावर स्वारी करून याची द्वारसमुद्र ही राजधानी काबीज केली आणि याला कैद करून दिल्लीस नेलें. पुढें तीन वर्षांनीं याची सुटका होऊन हा परत दक्षिणेंत आला. नंतर स. १३१६ मध्यें आपली राजधानी परत मिळविली. पुनः स. १३२६ त दिल्लीच्या मुसलमानांनीं दक्षिणेंत स्वारी केली. तेव्हां मुसलमानांच्या स्वाऱ्यांपासून आपला बचाव व्हावा म्हणून यानें आपल्या राज्याची उत्तरेकडील सरहद्द मजबूत करण्याचें ठरविलें. त्याकरितां स्वतःचें वास्तव्य उत्तरेकडे पाहिजे म्हणून राजधानीस योग्य असें स्थळ पाहण्याच्या उद्योगास हा लागला. पुढें कांहीं दिवसांनंतर हा एकदां तुंगभद्रेच्या तीरावरून चालला असतां एके ठिकाणीं ससा कुत्र्याचे मागें लागल्याचें दृश्य याच्या नजरेस पडलें. तेव्हां त्या जागेंत कांहींतरी विशेष असलें पाहिजे असें यास वाटल्यावरून यानें त्या ठिकाणीं आपली राजधानी स्थापन करण्याकरितां तेथें नवीन शहर वसाविलें. उपलब्ध असलेल्या सर्व माहितीवरून असें दिसतें कीं, या नवीन वसविलेल्या शहराचे ठिकाणीं पूर्वीचें जुनें शहर अगर एखादें गांव नव्हतें. पण तेथें कदाचित् विरूपाक्षाचें देऊळ असण्याचा संभव आहे. या नवीन वसविलेल्या शहरास यानें आपल्या मुलाचें 'श्रीवीरविजयविरूपाक्षरूप' हें नांव ठेवलें. परंतु याच्या मुलाचें खरें नांव विजय असल्यामुळें त्यामध्यें नगर या शब्दाची भर पडून तें शहर 'विजयनगर' या नांवानें सर्वश्रुत झालें. स. १३३९ मध्यें हा विजयनगर येथें असल्याचा उल्लेख आला आहे.

याच्यावर एकसारख्या मुसलमानांच्या स्वाऱ्या होत होत्या, त्यामुळें याला आपली राजधानी सारखी बदलावी लागे. स. १२९९ मध्यें याची द्वारसमुद्र ही राजधानी होती. ती स. १३१८ त अरुणसमुद्र येथें नेली व लगेच पुनः स. १३१९ त द्वारसमुद्र येथें आणावी लागली. यानें पुढीलप्रमाणें आपल्या राजधान्या बदलल्याः

स. १३२८ मध्यें द्वारसमुद्र (Ep. Carm. XII, Tm, 55). स. १३३० मध्यें विरूपाक्षपट्टण (Ep. Carn. V, Ak, 66). स. १३३३ मध्यें होसबेट (Ep. Carn. IX Ni, 9). स. १३३४ मध्यें द्वारसमुद्र (Ep. Carn. IX Cn, 7). स. १३३९ मध्यें विजयविरूपाक्षरूप (Ep. Carn. IX Ht. 43). स. १३४० मध्यें होसनाड (Ep. Carn. IX DB, 13). स. १३४२ मध्यें उण्णामलेपट्टण (Ep. Carn. IX Bn, 121). स. १३४२ मध्यें विरूपाक्षपाद (Ep. Carn. IX Dv, 21). स. १३४३ मध्यें उण्णामलेपट्टण (Ep. Carn. IX Bn, 41).

अशा प्रकारें याला मुसलमानांकडून त्रास झाल्यामुळें यानें उत्तर सरहद्दीवर मुसलमानांचे हल्ले परतविण्यासाठीं संगम घराण्यांतील पहिल्या हरिहराची नेमणूक केली व त्याला महामण्डलेश्वर ही पदवी बहाल केली. स. १३४२ मध्यें हरिहरानें उत्तरेकडे एकी करून मुसलमानांचे हल्ले परतविले. त्यामुळें याला समाधान वाटून यानें यापुढें निर्भयपणानें राज्य केलें. यानंतर यानें दक्षिणेकडील व पूर्वेकडील शत्रूंकडे आपला मोर्चा वळविला. परंतु स. १३४२ मध्यें हा मरण पावल्यामुळें याला त्यांचें

पारिपत्य करतां आलें नाहीं. नंतर याचा प्रधान हरिहर १ ला प्रबळ झाल्यामुळें विजयनगरच्या गादीवर आला. परंतु त्याच्यापूर्वी याचा मुलगा बल्लाळ ४ था हा स. १३४२ पासून १३४६ पर्यंत गादीवर होता. पण तो नुसता नामधारीच राजा होता. हरिहर १ ला हा संगम घराण्यांतील असल्यामुळें याच्यानंतर विजयनगर येथें संगम घराणें राज्य करूं लागलें.

याचा भाचा व मंत्री वल्लप्पास हरिहरानें आपली मुलगी दिली होती. याशिवाय इतर आधारांच्या साह्यानें होयसळ व संगम हीं घराणीं एकाच यादव घराण्याच्या शाखा आहेत, असें सिद्ध झालें आहे (The Beginnings of Vijayanagara History by Rev. H. Heras S. J.; M. A.).

तिसऱ्या बल्लाळानें (होयसळ) बसविलेल्या नवीन शहरांचा पुढीलप्रमाणें उल्लेख केलेला आढळतो.

विद्यानगर, कुंजरकोण, हस्तिनी, होसपट्टण, विजयनगर, हस्तिनीवति, विजय, विजयाचें नगर, विजयनगरी, हस्तिनपूर, हस्तिनति, विद्यानगरी, विजयानगरी, अनेगोंडी, हंपे-हस्ति-नावति, हम्पे, हम्पेंतील विद्यानगरी.

वरील नांवांनीं विजयनगरचा उल्लेख आरविदू घराण्याच्या शेवटच्या राजापर्यंतच्या लोकांनीं केलेला आहे (The Beginnings of Vijayanagar History).

संगम घराण्यांतील मूळ पुरुष जो संगम तो यादव घराण्यांतील होता (Ep. Carn; III Ml, 121). संगमाचे पूर्वज केशवदंडनाथाच्या वंशांतले होते. यादववंशांतील कांहीं पुरुष यादवांचे मुख्य प्रतिनिधि म्हणून दक्षिणेंत राज्यकारभार करीत. पुढें याच प्रतिनिधींपैकीं सळ नांवाच्या वीरपुरुषानें एक वाघ मारल्यानें तो आपणास होयसळ असें म्हणवूं लागला. याच्याच वंशास पुढें होयसळ वंश असें नांव मिळालें. या सळ राजाचा प्रधान कशवदंडनाथ हा यादववंशांतील होता असाहि उल्लेख होयसळांच्या लेखांत आला आहे. ज्या वेळीं होयसळ वंश सुरू झाला त्या वेळींच केशिराजाचा वंश सुरू झाला, असा निर्देश एका लेखांत आहेत (Ep. Carn., V Cn, 244). यावरून यादवांच्या ज्या कांहीं शाखा दक्षिणेंत आहेत त्या सळ राजाच्या वंशज होत असें दिसतें. केशिराजाचे वंशज सुद्धां आपणाला होयसळ म्हणवीत असत. होयसळ घराण्यांतील शेवटचा राजा जो बल्लाळ ३ रा त्याच्या भाचाला संगम घराण्यांतील पहिल्या हरिहरची मुलगी दिली होती. हें लग्न तिसऱ्या बल्लाळ राजाच्या हयातींतच झालें. अशा प्रकारें होयसळांचे अन्तापर्यंत होयसळांचे व संगम घराण्याचे संबंध घडत असत (The Beginnings of Vijayanagar History. pp. 78–93).

४. (स. १३४२–४६) हा कर्नाटकचा राजा होता. स. १३४४ मध्यें कृष्णनायकानें (प्रतापरुद्राचा मुलगा) यास मुसलमानांविरुद्ध बंड करण्यास बोलाविलें. यास तें कबूल होऊन, यानें ताबडतोब तट बांधून एक नवीन शहर वसविलें व त्यास 'विजयनगर' (जयाचा देश) हें नांव दिलें. नंतर मोठें सैन्य घेऊन वारंगळ येथें जाऊन तेथील मुख्य इमुदुलमुल्क यास दौलताबाद येथें परत जाण्यास भाग पडलें. पुष्कळ हिंदु राजे यास मिळून, दक्षिण हिंदुस्थानांतून सर्व मुसलमान लोकांना पळवून लाविलें.

बसव—(स. ११६० सुमार) कानडी कवि, व लिंगायत धर्माचा प्रचारक. हा कर्नाटकांतील इंगळेश्वराजवळील बागेवाडीस जन्म पावला. हिंगभट-मंडिगेमादिराज हे याचे अनुक्रमें आजा व वडील होत. आई-मदांबिके. बहीण–नागांबिका. नागांबिकेचा पुत्र–चन्नबसव. याच्या मामाचें नांव बलदेव. हा आराध्य ब्राह्मण होता.

ग्रंथ—षट्स्थलवचन, शिखारत्नवचन, मंत्रगौप्य व कालज्ञानवचन.

याचा मामा बलदेव हा बिज्जलाचा (स. ११५६–११६७) प्रधान होता. बलदेवाची मुलगी गंगांबिके ही बसवाची पत्नी होय. याला नीललोचने म्हणजे नीलम्म नांवाची दुसरी एक पत्नी दिसते. नीलम्मचेहि कानडींत 'प्रसादसंपादन' व 'कालज्ञान' या नांवाचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. बलदेवाचा भाऊ सिद्दणमंत्री त्याची ही मुलगी होय. याचा पुत्र बालसंगय्य. हा जिवंत असतांच बालसंगय्य मृत्यु पावला. याला नंदीश्वराचा अवतार वीरशैव ग्रंथांत म्हणतात. बलदेवानंतर हाच बिज्जलचा मंत्री झाला व त्या जोरावर कर्नाटक व आंध्र देशभर वीरशैवमताचा प्रचार केला. याचा शेवटला ग्रंथ पदसंग्रहासारखा आहे (क. क. च. भा. १, पा. १७४).

हा बिज्जल राजाचे वेळीं होता. परंतु बिज्जल राजा जैन मतांचा असल्यामुळें यानें बिज्जलाकडे आपल्या साथीदारास जैनाचा वेष देऊन पाठविलें. त्या साथीदाराबरोबर यानें राजास विषारी फळें दिलीं होतीं. राजानें त्या फळांचा वास घेतांक्षणींच तो बेशुद्ध पडला. परंतु थोड्या वेळानें पुनः सावध झाला. सावध झाल्यावर त्यानें याला पकडून आणण्याची आज्ञा केली. तेव्हां राजाच्या भीतीनें हा पळून जाऊन यानें एका विहिरींत जीव दिला. याच्या

पश्चात् याचे बायकोनें विष ग्रहण केलें (भांडारकर भा. ३, पृ. १३१).

बसवलिंग—(स. १६११) वीरशैव कवि. गुरु–चेन्नमल्लेश. ग्रंथ–शिवाधिक्यपुराण.

बसवलिंग कवि—(स. १६७९) कानडी कवि. पिता–गुरु नामधेय. गुरु–मलेय शांतेश्वर. षडक्षरदेव कवीचा समकालीन. ग्रंथ–कोट्टरू बसवेश्वरपुराण, या ग्रंथांत कोट्टरूच्या बसवेश्वर नांवाच्या शिवभक्ताचें चरित्र आहे (कॅ. क. च. भा. २, पा. ५००).

बहरामखान—काश्मीरच्या मुसलमानी वंशांतील शाहीखानाचा हा मुलगा होय.

बहराम गझनवी—(स. १११८–११५२) हा गझनीचा सुलतान तिसऱ्या अलाउद्दौलाचा मुलगा. यानें संजराचे मदतीनें स. १११८ त अर्सलानचा पराभव गझनी येथें करून आपण तक्तावर बसला. याला गझनीच्या तक्तावरून दोनदां पळून जावें लागलें. शेवटीं हा गझनी येथें मरण पावला.

बहरामशाह—(स. १३३०) बंगालचा सुभेदार.

बहलूलखान—(मृ. स. १६७३) विजापूरकरांचा सरदार. यानें प्रतापराव गुजराला ठार केलें. पण हंबीरराव मोहिते यांनीं याचा पराभव केला (अबदुल करीम पाहा). याला मु. रियासतींत बुहलूल असें म्हटलें आहे.

बहलूल लोदी—(राज्यकाल स. १४५१–८६) हा लोदी घराण्यांतील होय.

स. १४४१ मध्यें हा लाहोरचा सुभेदार होता. यानें प्रथम पंजाबप्रांत बळकावून मग स. १४५१ त दिल्लीचें तख्त मिळविलें. यानें त्यासाठीं तीन वेळां दिल्लीवर स्वाऱ्या केल्या होत्या. पैकीं दोहींत याचा पराभव झाला. यानें आपल्या राज्याची मर्यादा वाढविली. याचा आजा सुलतानचा सुभेदार होता. यानें प्रथम सर्व पंजाबप्रांत हाताखालीं घातला. हा प्रांत मिळाल्यामुळें याच्या राज्याची मर्यादा वाढली. हा शूर व उदार होता.

बहादुरशाह फारुकी—(स.१५९७–१६०१) हा खानदेशच्या फारुकी राजा आदिलखानाचा किंवा अलीचा पुत्र. यानें बहादुरपूर नांवाचें नवीन शहर स्थापन करून, तेथें राज्य स्थापन केलें. अकबरानें याच्यावर स्वारी करून, यास कैद केलें व खानदेशचें राज्य खालसा केलें.

बहादुरशाहा—(स. १५२६–१५३६) हा मुज्फरशाहाचा दुसरा मुलगा. गुजराथचा सुलतान. हा उदार व दयाळू होता. यानें अहमदनगर लुटलें. यानें माळव्यांतील सुलतान मुहम्मद खल्जीस पकडून अहमदाबादेस आणलें (स. १५२९). यानें चितोड जिंकला होता (कर्णावती पाहा). यानें पोर्तुगीजांवर फौज पाठवून त्यांचा पराभव केला. यास फिरंग्यांनीं भेटीस बोलाविलें असतां त्यांनीं समुद्रांत लोटून दिलें (नायक बछु पाहा).

२. (खानजहान कोकलताश पाहा).

३. (मृत्यु स. १६९७) याचें खरें नांव मीर मलिक हुसेन असें असून हा औरंगजेबाचा दूधभाऊ होता. याला प्रथम बहादूरशहा ही पदवी बहाल करण्यांत आली. पुढें सात हजारीच्या पदावर असतांना खानजहान बहादुर कोकलताश झफरजंग हा किताब यास मिळाला. शिवाजीनें अहमदनगरापर्यंत स्वारी केली त्या वेळीं याची नेमणूक बादशहातर्फे दक्षिणेंत करण्यांत आली. परंतु दक्षिणेंत यश येईनासें दिसतांच त्याच्या बदलीं शहाजाद्यास पाठवून यास परत बोलावण्यांत आलें. पुढें कांहीं दिवसांनंतर पुन्हां याची दक्षिणेंतील सुभेदारी कायम करून सत्तर हजार फौजेनिशीं दक्षिणेंत पाठविण्यांत आलें. तरीहि महाराजांच्या फौजेपुढें टिकाव लागला नाहीं. तेव्हां गुप्त तह करून दोघांनीं विजापूरकरावर स्वारी करून त्यांचा पराभव केला. हा पुन्हां उत्तरेस जाऊन आला व मराठ्यांच्या मागें लागला. या वेळीं संभाजी गादीवर होता. याचा पराभव होऊन मराठ्यांचा नाद सोडणें यास भाग पडलें. पुढील ४० वर्षे बहादूरगडावर काढून स. १६७५ मध्यें यानें हैदराबाद शहर लुटलें. हा तारीख-ई-आसाम ही बखर लिहून १६९७ त मेला.

बहादुरशाहा निजाम—(स. १५९५–१६००) हा इब्राहीम निजामाचा पुत्र. चांदबीबीनें यास अहमदनगरच्या गादीवर बसविलें. मोगलांनीं याचा पराभव करून अहमदनगर जिंकलें व याला कैद केलें.

बहादुरशाहा मोगल—(स. १७०७–१२) हा दिल्लीचा बादशहा. हा औरंगजेबाचा वडील मुलगा. याचें मूळ नांव मुअज्जम ऊर्फ शहाअलम असें होतें. याच्या कारकीर्दीत शीखांनीं मोगलांविरुद्ध फारच उचल खाल्ली होती, व यानें त्यांचा योग्य बंदोबस्त केला. यानें कामबक्षावर स्वारी करून जय मिळविला (स. १७०८). हा गादीवर येण्यापूर्वी संभाजीवर चालून गेला होता पण पराभूत होऊन, हा परत अहमदनगरास गेला (स. १६८४). औरंगजेबानें याला ' गोवळकोंड्यावर पाठविलें असतां, यानें तेथील राजास तुझा बचाव करीन ' असें वचन दिलें. हें औरंगजेबास कळल्यावर, त्यानें यास व याचे पुत्रास भेटीस बोलावून कैदेंत टाकिलें. पुढें हा कैदेंतून सुटल्यावर अफगाणिस्थानच्या सुभेदारीवर याची

नेमणूक झाली. याचे जवळ निकोलो मनूची हा व्हेनिसचा प्रवासी डॉक्टर होता.

बहिणाबाई—(समाधि स. १७००) हिचें माहेर वेरूळच्या पश्चिमेस देवगांवीं होतें. हिच्या पित्याचें नांव आऊदेव कुलकर्णी. माता जानकी. पित्याचें गोत्र मौनस. हिचा नवरा शिवापूरचा ज्योतिषी. त्याचें गोत्र गौतम. पहिली बायको मेल्यावर तिसाव्या वर्षी हिच्याशीं त्याचें लग्न झालें. पण त्याला पुढें घर सोडून हिच्यासह भिक्षा मागत हिंडावें लागलें. पंढरपूर, शिंगणापूर, रहिमतपूर व कोल्हापूर असा यानें प्रवास केला. प्रवासांत जयराम गोसावी यांचीं कीर्तनें ऐकत राहत होते. तिथें हिला तुकोबांचे अभंग ऐकून तुकोबांच्या दर्शनाचा ध्यास लागला. पण तुकोबासारख्या शूद्राचा ध्यास हिच्या नवऱ्याला आवडेना. हिला सोडून जाण्याचेंहि त्यानें ठरविलें, पण ती गोष्ट घडून आली नाहीं. पुढें देहूस जाऊन तुकोबाचें यानें दर्शन घेतलें. तुकोबाचा अनुग्रह हिला पूर्वीच स्वप्नांत मिळाला होता. संबाजी नांवाचा साधु देहूस राहत असे. त्याला शूद्र तुकारामाचें वाढत चाललेलें महत्त्व बिलकुल आवडत नसे. तो आपला द्वेष बऱ्याबाईट मार्गानें प्रगट करीत असे. त्याचा अनुभव हिलाहि आला. हिनें ७२ व्या वर्षी शिवपुर येथें आपला देह ठेवला (श. १६२२ अश्विन शु. १). हिचा पुत्र विठोबा. यापूर्वीच्या बारा जन्मांची हकीगतहि हिनें आपल्या स्वतः अभंगरूपानें लिहिलेल्या आत्मचरित्रांत दिली आहे, आणि तेरावा जन्म बहिणाबाई या नांवानें झाला. त्याचीहि देह ठेवीपर्यंतची माहिती हिनें आपल्या अभंगरूप चरित्रांत दिली आहे. त्यावरून असें वाटतें कीं हे हिचे आत्मचरित्ररूप अभंग हिच्या सांगण्यावरून किंवा आपल्या स्वतःच्या माहितीप्रमाणें कोणीं तरी लिहिले असावेत. वर दिलेला समाधिशक हिचा पुत्र विठोबा यानें केलेल्या बहिणाबाईच्या आरतींत आढळतो. तुकारामबोवाचे नातू यांनीं लिहिलेल्या तुकारामचरित्रांत बहिणाबाईची तुकारामावरील निष्ठा व स्वप्नांत अनुग्रह झाल्यापासून प्रत्यक्ष दर्शन झाल्याशिवाय अन्न न घेण्याची हिची प्रतिज्ञा, आणि हिनें अठरा दिवस उपवास करून एकोणिसावे दिवशीं देहू येथें दर्शन घेऊन पारणें केलें, इत्यादि हकीगत आढळते. बाईची गुरुपरंपरा अशी—आदिनाथशंकर—मत्स्येंद्रनाथ-गोरक्षनाथ-गहिनीनाथ-निवृत्तिनाथ-ज्ञानेश्वर-सच्चिदानंदबाबा-विश्वंभर-राघवचैतन्य-केशवचैतन्य-बाबाजीचैतन्य-तुकाराम-बहिणाबाई. यांच्या उपलब्ध कविता श्री. उमखाने यांनीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केल्या आहेत. यांचा 'ज्ञानप्रकाश' नांवाचा ग्रंथ आहे (म. क. च. ६, पा. ९८–१६२).

बहिरजी जाधव नाईक—हा बहिरजी नाईक या नांवानें प्रसिद्ध असणारा शिवाजीचा सुप्रसिद्ध हेर. याच्या बातमीवरून शिवाजीनें ४ आक्टोबर स. १६७० रोजीं सुरत लुटली. ४५ कोटी होन व चार हजार घोडीं शिवाजीस मिळालीं (सभा ६४).

बहिरंभट—(अहमदशाह निजाम बहिरी पाहा).

बहिरोपंत मोरेश्वर पिंगळे—(स. १७०८–१७१३) हा नीळकंठाचा भाऊ होय. स. १७०८ मध्यें शाहूनें याला पेशवाईपद दिलें. कारण याचा भाऊ नीळकंठ हा स. १७०८ जानेवारीमध्यें वारला. हा स. १७१४ पर्यंत पेशवा होता. शाहु-ताराबाईच्या झगड्यांत अर्थात् हा शाहूकडून होता. आंग्रे हे ताराबाईचे साथीदार होते. शाहूनें स. १७१३ च्या सुमारास यास फौज देऊन बंदोबस्तासाठीं कोंकणांत पाठविलें, परंतु आंग्रे, यांनीं याचा पराभव करून यास कैदेंत ठेविलें. पुढें याची सुटका बाळाजी विश्वनाथानें केली. त्याच वेळीं पेशवाईपद याच्याकडून काढून शाहूनें बाळाजीस दिलें.

बहीरनाक सेननाक—पुरंदर किल्ल्याचें काम शेवटास जाईना, म्हणून एक दिवस बादशहास दृष्टांत झाला कीं, आपली ज्येष्ठ सून व पुत्र या बुरुजांत बळी देऊं, तेव्हां याचें काम तडीस जाईल. तेव्हां बहीरनाक याने आपला पुत्र नाथनाक व सून देवकाई यांस त्या किल्ल्याच्या बुरुजांत गाडलें, तेव्हां काम तडीस गेलें.

पुढें बहीरनाक यास त्याच किल्ल्याचा किल्लेदार नेमून त्यास दोनशें पांच होन दिले व दोन गांवें दिलीं.

बहीरनाक महाराच्या या अविचारानें त्याच्या घराण्यास 'अविचारे' असें आडनांव पडलें. हल्लीं हें घराणें सासवड तालुक्यांत भिवंडी गांवीं बादशाही उत्पन्न खात आहे. अविचारे याचा मराठी उच्चार अवचरे असा सध्यां आढळतो.

बहोरदास—पंजाबामध्यें जे नामदेवाचे अनुयायी होते त्यांपैकीं हा एक होय. नामदेव प्रथम पंजाबांत गेला असतां तेथें त्याच्या मतांचा पुरस्कार करण्यांत पुढारीपण यानें घेतलें होतें. पंजाबमधील नामदेवाच्या समाधीची पूजा व उत्सव हीं सर्व कृत्यें बहोरदासच स्वतः पुढाकार घेऊन करीत असे. हें विधान पंजाबमधील 'जन्मसाखी' (एक जुनें चोपडें) मध्यें केलें आहे (मं. त्रै. ६, १–४. पृ. ९).

बळवंत गणपत मेहेंदळे—(मृत्यु, स. १७६०) नानासाहेबांच्या विरुद्ध ताराबाई व दमाजी गायकवाड वगैरे असतांना ज्या मंडळींनीं दमाजीचा गेंड्याच्या माळावर पराभव केला त्यांत हा एक प्रमुख होता (स. १७५१). यास स. १७५७ सालच्या स्वारींत पेशव्यानें मागें ठेवून दिलें तेव्हां यानें तिकडे स्वतंत्र उद्योग केला. कर्नाटकांतील भागावर स्वारी करून, होसकोटें, मुळबागल व कडपनाथ हीं ठाणीं काबीज केलीं. यानें अर्काटच्या नबाबाशीं ता. २४-९-१७५७ मध्यें युद्ध करून त्याचा पराभव केला व त्याचें कडपें शहर लुटलें. पुढें यानें म्हैसूरच्या स्वारींत बरीच मदत केली.

पानपतच्या घनघोर संग्रामांत हा सदाशिवराव भाऊच्या पक्षास होता. यानें पुष्कळ पराक्रम करून शेवटीं हा लढाईत ता. ७-१२-१७६० रोजीं गोळी लागून मरण पावला.

त्या वेळच्या परिस्थितीचें एक पत्र नाना फडणिसानें लिहिलेलें होतें. त्यांत नानानें याच्याविषयीं खालील उल्लेख केलेला आढळतोः

" ता. ७-१२-१७६० रोजीं बळवंतराव गणपत यास छातींत गोळी लागली. तसेच घोड्याखालीं पडले. तों त्यांजकडील माणसें धांवलीं. त्यांतील एकानें तोंडावर तरवारीचा वार केला. दुसऱ्यानें गळा कापून शीर नेऊं लागले, तो पांच सात राऊत धांवून सोडविलें. अर्धा गळा कापला होता, तसेंच आणून दहन केलें. समागमें स्त्रीनें अग्निप्रवेश केला. "

बळवंत माणकेश्वर चाफळकर—(स. १८०२ सुमार) हा रामदासी पंथाचा असावा असें दिसतें. यानें वटपूर येथें एक मराठी ' योगवासिष्ठसार ' नांवाचा ग्रंथ लिहिला होता. हा वटपूरचा राहणारा असावा. ग्रंथांत तीन प्रकरणें असून एकंदर १०१ ओव्या आहेत (मं. सं. १८३६ वा. इ. ले. ५५).

बळवंतराव धोंडदेव—(मृत्यु स. १७८५) महादजी शिंद्यांचे सरदार. महादजी शिंद्यांच्या सरदारांपैकीं बळवंतराव हे एक प्रसिद्ध सरदार होते. ह्यांवर पाटीलबाबांची मेहेरबानी असे. ह्यांचें नांव शिंद्यांकडील पत्रव्यवहारांत अनेक वेळां आढळून येतें. यानें स. १७८२ मध्यें चंदेरी घेतली. हे मथुरा मुक्कामीं ११ जुलै १७८५ रोजीं मृत्यु पावले. ह्यांस पुत्र नव्हता. सबब महादजी शिंदे यांनीं यांस दत्तक पुत्र दिला. त्याचें नांव रघुनाथराव ठेविलें (ऐ. टि. भा. ४, पृ. ५४).

बळवंतराव भवानी काळो—हा भवानी काळोचा दुसरा मुलगा होय. हा बापाप्रमाणें शूर होता. यास दुसऱ्या रघूजीनें टिपूवरील दुसऱ्या मोहिमेंत पाठविलें होतें.

बळवंतसिंग—(मृत्यु स. १७७०) बनारसच्या चेतसिंग राजाचा हा पिता होय. याच्या बापाचें नांव मनसाराम असें होतें. मनसारामानें बनारस येथें आपलें बस्तान बसविल्यावर स. १७३८ मध्यें जौनपुर, चुनार, व बनारस या परगण्यांची जहागीर मुलगा बळवंतसिंग याचे नांवानें बादशहापासून संपादन केली. त्याच वेळीं बळवंतसिंगास राजाबहादूर हा किताब मिळाला. स. १७३९ त बाप मरण पावल्यावर यानें बनारसजवळ गंगापुर येथें आपलें ठाणें केलें, आणि भागीरथीच्या दक्षिण कांठावर ठिकठिकाणीं किल्ले व गढ्या बांधून आपली मजबुती केली. अशा रीतीनें स. १७५४ मध्यें बनारसची जहागीर याचे नांवानें स्वतंत्र झाली; त्या वेळीं तिचें उत्पन्न ३५ लाख होतें. स. १७६३ त बादशहा व सुजाउद्दौला यांनीं बंगाल प्रांतावर स्वारी केली, तींत बळवंतसिंग त्यांस सामील झाला. परंतु ' बक्सार 'चे लढाईत बादशहाचा पराभव झाल्यावर बळवंतसिंगानें इंग्रजांचा आश्रय करून त्यांजकडून जहागिरीची सनद घेतली. पुढें बळवंतसिंग स. १७७० त मरण पावला आणि त्याचा मुलगा चेतसिंग जहागिरीचा कारभार पाहूं लागला (म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. ३५३).

बहिरा पिसा—प्रथम याचा गुरु चिंतामणि असून मुसलमानाचा पुनः हिंदु झाला तेव्हां याचा गुरु वडवानळचा नागनाथ झाला असें दिसतें (मं. अहवाल शके १८३४ पा. ६६-७०). हाच बहिरंभट जातवेद असावा. याची कुलस्वामिनी म्हाळसा. गोत्र कौंडिण्य. यानें केलेली भागवताच्या दशमस्कंधावरील टीका अर्धवट उपलब्ध आहे. ही टीका श्रीधराच्या आधारें केली आहे. हा मुसलमानाचा हिंदु झाला. वगैरे गोष्ट भक्तविजयांत दिली आहे (अ.४४). हा ज्ञानेश्वराचा समकालीन असावा.

बंकेय—(१ अमोघवर्ष पाहा).

बंदा—(मृत्यु स. १७१६) शीखधर्मगुरु गोविंदसिंगाचा तोतया. गोविंदसिंगाच्या मृत्यूनंतर सुमारें दोन वर्षांनीं एक तोतया उत्पन्न होऊन आपण गोविंदसिंगच आहोंत असें प्रतिपादूं लागला व तोच तोतया ' बंदा ' या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध झाला. या वेळीं दिल्लीस बहादुरशाहा राज्य करीत होता. हा तोतया मूळचा कोण होता हें शेवटपर्यंत कोणासहि समजलें नाहीं. यानें प्रथम आपण गोविंदसिंगच आहों असें सांगून, पक पत्रक प्रसिद्ध केलें व त्यांत ' गुरु गोविंद-

सिंग जंबियाचे वारानें मृत्यु पावले; परंतु मरतांना त्यांनीं असें सांगितलें कीं लवकरच मी पुन्हां जिवंत होऊन शिखांचें राज्य प्रस्थापित करतों. म्हणून मी जिवंत होऊन स्वातंत्र्याचा झेंडा उभारतांच, सर्व शीख लोकांनीं या झेंड्याखालीं जमावें व परलोकीं मुक्ति प्राप्त करून घ्यावी.' व हें आज्ञापत्र सर्व शिखांत पसरविलें. तें आज्ञापत्र पाहतांच, सर्वत्र धर्मजागृति होऊन, याच्या झेंड्याखालीं दिल्लीपासून तीस मैल असलेल्या खरखोडा गांवीं पांचशें अनुयायी जमले, व नंतर अनुयायांची संख्या वाढत जाऊन, हा चाळीस हजार शीखांसह सरहिंदवर चालून गेला व तेथील सरदार वझीरखान मारला जाऊन, शिखांच्या ताब्यांत सरहिंद आलें. पूर्वी सरहिंद येथें मुसलमानांनीं मुसलमानेतरांवर जितके अत्याचार केले होते तितक्यांची बंद्याच्या शीख शिष्यांनीं सव्याज फेड केली. पण यांत विशेष हा होता कीं, मुसलमानांच्या मशिदी शिखांकडून न पाडतां मुसलमानांकडूनच पाडविल्या. या वेळीं मुसलमान लोक इतके घाबरून गेले होते कीं, त्यांनीं आपला धर्म सोडून नांवें बदलून शीख धर्माचीहि दीक्षा घेतली होती. पुढें यास कांहीं लढायांत अपयश आलें तरीहि, यानें चिकाटीनें आपला उपक्रम चालू ठेवला व मुखसिलसपूर येथें किल्ला बांधून त्यास लोहगड असें नांव दिलें व तेथें स्वतःस राज्याभिषेक करवून घेऊन 'सचा पादशहा' हें नांव धारण केलें. पण पुढें याचा हा धुमाकूळ फार दिवस न चालून शेवटीं स. १७१६ मध्यें अबदुस्सपदखानानें याला पकडून ठेविलें व यास बजाविलें कीं, 'जर तूं मुसलमान होत असलास तर तुला जीवदान मिळेल, नाहींतर तुझा प्राण घेतला जाईल.' तेव्हां यानें मुसलमान होण्याचें नाकारून आपण मरणास तयार आहोंत असें सांगितलें. शेवटीं त्यानें याचा अत्यंत क्रूरपणानें वध केला.

बंदी सुलतान— (स. १७००सुमार) अबुल हसन कुत्बशाहाचा मुलगा. हा औरंगजेबाच्या गोटांत राहत असे. दक्षिणी सरदार याला बादशहासारखा मुजरा करीत; म्हणून याला दरबार बंद करण्यांत आला होता.

बंधनकवि—तेलगू कवि. पालीगर राजांचा आश्रित कवि. याचा राजनीतीवरील ग्रंथ प्रसिद्ध आहे (क. च).

बंधुपालित—(दशरथ मौर्य पाहा).

बंधुवर्मा--(स.४३६) अज्ञात वंशीय विश्ववर्म्याचा पुत्र. याच्या वेळचा एक शिलालेख वि. सं. ४९३ (स. ४३६) चा मंदोसर येथें मिळाला आहे. त्यावरून हा पहिल्या कुमारगुप्ताचा सामंत असल्याचें दिसतें. याच्यामागें या वंशाची माहिती मिळाली नाहीं (फ्लीट गु. इं. पृ. ७४–७६).

२. एक वैश्य. हरिवंशाभ्युदय व नीतिवैराग्यपर दुसऱ्या एका ग्रंथाचा कर्ता.

बंसीधर—(काव्यकाल स. १७३५) एक हिंदी कवि. अहमदाबादचा एक ब्राह्मण. यानें 'अलंकाररत्नाकर' हा ग्रंथ दलपतिरायाच्या साहाय्यानें लिहिला.

बाउक प्रतिहार—(स. ८३७) मंदोरच्या प्रतिहारवंशांतील कक्काचा भट्टिवंशांतील महाराणी पद्मिनीपासून झालेला पुत्र. जेव्हां शत्रूचें अतुल सैन्य नंदावल्लाला ठार करून भूअकूप येथें आलें आणि आपल्या पक्षांतील द्विजनृपकुलांतील प्रतिहार राजे निघून गेले, तसेंच मंत्री आणि धाकटा भाऊ यांनींहि सोडलें, तेव्हां एकट्या बाउकानें घोड्यावरून उतरून तलवार हातांत घेतली आणि नवमंडलांतील सर्व समुदाय उधळून लावला, मयूर राजाला ठार केलें, त्याच्या लोकांना ठार केलें आणि मग आपली तरवार म्यान केली. ही वि. सं. ८९४ मधील जोधपूर-प्रशस्ति यांनींच खोदविली. ही लढाई कोणची ?

बांकाबाई—(स. १७८१–१८५८) ही दुसऱ्या रघूजी भोसल्याची चवथी बायको. ही फार कारस्थानी असून आप्पासाहेबांचे वेळेस व नंतर प्रसिद्धीस आली. रघूजी भोसल्यानंतर त्याचा मुलगा परसोजी नागपूरच्या गादीवर बसला. तो वेडसर असल्यामुळें नागपूर संस्थानचा कारभार हिनें चालवावा कीं रघूजीचा पुतण्या आप्पासाहेबांनीं चालवावा याबद्दल तंटा सुरू झाला. प्रथम इंग्रज आप्पासाहेबांचे बाजूनें होते. तेव्हां हिनें स. १८१७ त सिताबर्डी येथें त्यांच्याशीं लढाई केली. पुढें इंग्रजांनीं आपल्या भेदनीतीमुळें व रेसिडेंटाच्या गोड गोड भाषणांमुळें हिला पूर्णपणें आपल्या कह्यांत आणून नागपूरचें राज्य खालसा केलें. हिनें तें परत मिळविण्याची पुष्कळ खटपट केली, पण तिचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. पुढें इंग्रजांनीं जानोजीचा दत्तक मान्य करून त्याला व हिला कांहीं उत्पन्न चालू केलें. ही वयाचे ७७ व्या वर्षी मरण पावली.

बाचलादेवी—ही पांड्य राजकन्या असून दुसऱ्या [illegible] कदंबाची पत्नी.

बाजी कदम—(स. १७०७) हा संभाजी निंबाळकराचा हस्तक होता. त्यानें यास मुद्दाम पुण्यास ठेवून दिले.

"शके १६२९ च्या वैशाख मासीं (मे १७०७) बाजी कदम व गुंडाबा नाईक सेखदार हे नबाब आसफजाकडील सरदार रंभाजी निंबाळकर यांजकडून

आले. त्यांनीं पुण्यांत अंमल बसवून ठाणें घेतलें. आठ वर्षें अंमल पुण्यास होता." पुढें हा पेशव्यांच्या पक्षास मिळाला (रा. खं. २ रा, पृ. २६).

बाजी गंगाधर—(बाजीपंत अण्णा जोशी) हा पेशव्यांचा सरदार. कोंकणांत बेलापुराकडे होता.

बाजी नाईक जेधे—(जन्म स. १६२८–१७००) याचा जन्म शके १५५० कार्तिक व. ५ स झाला. हा कान्होजी नाईकांचा मुलगा. याच्या आईचें नांव सावित्रीबाई असें होतें. ही जन्माची तारीख (जे.) शकावलींत दिलेली आहे (मं. त्रै. व. १०, १. ले. ४). याला शिवाजीनें सर्जेराव अशी पदवी दिली होती. हा शिवाजीबरोबर दिल्लीस गेला होता.

बाजी पासलकर—(स. १६४०–१७१७) हा पुणें जिल्ह्यांतील मुसें खोऱ्याचा देशमुख. मावळांतील देशमुखांचे वतनी तंटे मोडण्यांत हा प्रमुख असे. फलटणचा बणगोजी नाईक निंबाळकर माळव्यांतील ह्या देशमुखाची मर्जी संभाळून असे. देशमुखांस कर्जाबद्दल किंवा चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन राहून त्यांच्या उपयोगी पडत असे. अशा इभ्रतींचा बाजी पासलकर हा मावळा देशमुख शिवाजीस आढळतांच त्यास त्यानें हाताशीं धरलें. ज्या प्रमुख मंडळींचें शिवाजीस चांगलें पाठबळ होतें त्यांपैकीं बाजी हा एक होय. शिवाजीचें विजापूरकरांशीं युद्ध सुरू असतां शिवाजीनें एके समयीं (स. १६६०) बाजी पासलकर यास वाडीच्या सावंताचा बंदोबस्त करावयास सांगितलें होतें. तेथें यानें बराच पराक्रम केला. याचें नांव स. १६४०–१७१७ पर्यंत आढळतें. त्यानंतर तुळाजी व रामाजी यांचीं नांवें येतात. हे बहुधा त्याचे पुत्र असावेत.

बाजी प्रभु देशपांडे—(मृत्यु स. १६६०) बाजीचा बाप पिलाजी. हा हिरडस मावळचा देशकुलकर्णी व कृष्णाजी नाईक बांदल हा देशमुख होता. या दोघांनीं मावळांत जबरदस्ती करून इतर देशमुखांकडून दाईते घेतले. बाजी हा नांवाजलेला वीर व दांडपट्टा वगैरेंत निष्णात होता.

कृष्णाजीच्या मागें त्याची बायको दीपाई हिनें देशपांडे घराण्याचा पूर्वापार घरोबा विशेषतः बाजीचा भाऊपणा जाणून आपला सर्व कारभार बाजीकडेच सोंपविला.

दादाजीच्या मृत्यूनंतर लगेच बाजीनें खास शिवाजीची भेट घेतली, व शिवाजीनेंहि आपल्या नूतन आरंभिलेल्या कार्यास या पुंड देशमुखांची सेना उपयोगांत आणण्याचें मानस धरून इनामाची व्यवस्था करून देऊन बाजीस व त्याच्या हाताखालील बांदलाच्या १०,००० सैन्यास मिळवून घेऊन आपल्या तैनातीस खास फौज म्हणून ठेविलें. कृष्णाजीनंतर बाजी हाच माणूस मावळांत जबरदस्त कर्ता समजला गेला व त्या प्रांतांत याचें चांगलें वजन वाढलें.

यानें शिवाजीच्या पडत्या काळांत अतिशय मदत केली. स. १६६० त मोगल, आदिल, सिद्दी, सावंत वगैरेंनीं शिवाजीला चोहों बाजूंनीं कोंडून टाकण्याचा व त्याचें महाराष्ट्रांतून उच्चाटन करण्याचा बेत केला व त्याच्यावर सर्व बाजूंनीं चढ केली. त्या वेळीं ह्यान आपल्याकडून शिकस्त करून शिवाजीस बराचसा धीर दिला, व शेवटीं यानें छत्रपति शिवाजीसाठीं घोडखिंडीमध्यें शत्रूंशीं लढतांना आपला प्राण सोडला (१३ जुलै स. १६६०–शके१५८२). राहिलेल्या मावळे लोकांनीं मोठ्या आनंदानें शत्रूच्या अफाट सैन्याला धीरानें व निकरानें तोंड देत देत यांचें शव रांगण्यावर नेलें.

बाजी भिवराव रेटरेकर—(मृत्यु स. १७३९ जाने. ८) हें देशस्थ घराणें पेशव्यांचें ऋणानुबंधी होतें. भिवराव रेटरेकर व बाळाजी विश्वनाथ यांचा स्नेह होता. बाजी हा पेशव्यांचे सैन्यांत एक पथकी होता. याचा पुत्र बापूजी बाजी नानासाहेबांच्या वेळीं अनेक कामगिरींवर होता. नानासाहेबांच्या विरुद्ध ताराबाई व दमाजी गायकवाड वगैरे असतां ज्या मंडळींनीं दमाजीचा गेंड्याच्या माळावर पराभव केला त्यांत तो प्रमुख होता (स.१७५१).

पौष वद्य ११ रोजीं हा तारापूरच्या हल्ल्यांत मारला गेला (रा. खं. ३ अ. १६७).

बाजी महादेव प्रभु देशपांडे—(स. १७०९–९९ सुमार) हा अठराव्या शतकांतील एक प्रमुख वीर असून महादजी रघुनाथ देशपांडे तर्फ मुठें खोरें यांचा पुत्र होय. याच्या आईचें नांव यशोदाबाई असून ह्याचा जन्म उरवडें गांवीं झाला. हा त्या वेळच्या युद्धविद्येमध्यें चांगला निपुण असून ह्याचें अक्षरहि फार चांगलें होतें. ह्याचा बाणेदारपणा पाहून पेशव्यांनीं प्रथम ह्यास १० स्वारांची व नंतर २५ स्वारांची शिलेदारी दिली.

स. १७५२ मधील बाळाजी बाजीरावाच्या औरंगाबादेवरील मोहिमेंत, स. १७५३ मधील नानासाहेबांच्या कर्नाटकावरील स्वारींत, स. १७५८ च्या अटकेवरील स्वारींत, स. १७६३ मध्यें थोरले माधवराव ह्यांनीं निजामावर केलेल्या स्वारींत, व स. १७७५ सालीं मुधोजी भोंसल्यावर मोंगलांनीं स्वारी केली असतां मोंगलांविरुद्ध केलेल्या लढाईंत ह्यानें फार पराक्रम करून दाखविला. नंतर नारायणरावाचे खुनानंतर पेशवाईंत राहणें बरें न

वाटून यानें बडोद्याचे गायकवाडाचे पदरीं नोकरी धरली. गोविंदराव गायकवाडास गादी मिळवून देण्याचे कामीं यानें मदत केली होती, तेव्हां त्यानें कृतउपकार स्मरून ह्यास फौजेंत सरदारी दिली.

पुढें स. १७९३ सालीं मानाजी गायकवाड मृत्यु पावले व गोविंदराव पुण्यास गेले. ही संधि पाहून गोविंदरावाचा पुत्र कान्होजी ह्यानें गादी बळकावली व कडोंच्या मल्हारावाच्या मदतीनें ६० हजार फौज जमवली. ह्या कठीण प्रसंगीं युक्तीनें बाजी प्रभू ह्यांनीं मल्हारराव व कान्होजी यांजमध्येंच भांडण लावून दिलें. तेव्हां कान्होजी सातपुड्याकडे पळाला व आपला निभाव लागत नाहीं हें पाहून मल्हाररावानें गोविंदरावाशीं तह केला. अशा तऱ्हेनें बाजी प्रभूनीं आपली मुत्सद्देगिरी लढवून मोठ्या युक्तीनें लढाईचा प्रसंग टाळला. अशा रीतीनें गायकवाडी राज्यामध्येंहि आपलें शहाणपण व बुद्धिचातुर्य व्यक्त करून, बाजी प्रभू यांनीं बडोदें येथें चांगला लौकिक मिळविला.

बाजी मोरेश्वर—हा देशस्थ ब्राह्मण, उपनांव वाघ कीं कोकणस्थ भावे, रामशास्त्र्याचा शिरस्तेदार मोरेश्वर हरि याचा मुलगा हें समजत नाहीं. स. १७९१ मध्यें रघुनाथ चिमणाजी सचीव वारला आणि त्याचा पुत्र शंकराजी हा गादीवर बसला. त्याच्या सावत्र आईच्या सांगण्यावरून नानानें यास कारभारी नेमून पाठविलें. हरिपंत फडक्यांनीं व सचीवांनीं याजविषयीं नापसंती दाखविली, पण नानानें तिकडे लक्ष दिलें नाहीं, आणि सचीवाचे जुने सर्व लोक बदलून आपले मार्फतीचे लोक ठेविले. नंतर सचीव जेजुरीस असतांना त्यांजवर नानानें गारदी वगैरे सरंजाम देऊन ह्यास रवाना केलें. तेथें दोघांची लढाई होऊन सचीवास व सखाराम बापूच्या कन्येस जखमा झाल्या आणि त्यांचें सर्व वित्त लुटून नेलें. नानास ही गोष्ट कळतांच त्यानें तिकडे कानाडोळा केला परंतु महादजीनें चौकशी करून हा अपराधी असल्याचें सिद्ध केलें व यानंतर बाजी मोरेश्वर व त्याचे साथीदार यांस कडक शिक्षा झाल्या. नानाचा लांचखाऊपणाहि या प्रकरणामुळें सिद्ध झाला (म. रि. उ. वि. भा. २, पृ. ३९५-४०२).

बाजीराजे घोरपडे—(जन्म स. १६०५-१६६४) बाजी घोरपडे व शिवाजी भोसले हे मूळ एकाच कुळांतील भाऊबंद असून अस्सल रजपूत होत. भोसले व घोरपडे घराण्यांचा मूळ पुरुष जो सज्जनसिंह हा राज्यलाभ न झाल्यामुळें नाखुष होऊन दक्षिणेंत आला (स. १३३४ च्या सुमारास). सज्जनसिंहाच्या वंशांतील भैरवजी नांवाचा कोणीएक मनुष्य होऊन गेला (१३९७ सुमारास). या भैरवजीसच भोसाजी म्हणत आणि त्यावरूनच भोसले नांव रूढ झालें असावें. सन १४६० पर्यंत या भोसले कुळांतले कर्णसिंह व शुभकृष्ण हे भाऊ एकत्र होते. पण ते फुटून स. १४६९ च्या सुमारास कर्णसिंहानें आपल्या भीमसिंह नामक मुलासह कोंकणांतील एक असाध्य पहाडी किल्ला ' घोरपड ' लावण्याची युक्ति लढवून जिंकला व ' राजे घोरपडे बहादर ' हा किताब मिळविला, म्हणून तेथपासून त्यांचें व त्यांच्या वंशजांचे आडनांवच घोरपडे पडलें. शुभकृष्णाचे वंशज भोसलेच राहिले. तेव्हां शुभकृष्ण हा शिवाजीमहाराजांच्या भोसले कुळाचा मूळ पुरुष होय.

याचा जन्म स. १६०५ मध्यें झाला असून हा विजापूरच्या आदिलशाहीचा नोकर होता. याच वेळीं भोसले घराण्यांतील शहाजी हा निजामशाहीचा नोकर होता. आणि निजामशाही व आदिलशाही यांच्यांत वितुष्ट असल्यामुळें बाजी घोरपडे व शहाजी यांची समरांगणांत खणाखणी झाली. पुढें जिंजीचा वेढा चालू असतां या बाजी घोरपड्यानें शहाजीस कैद केलें. पुढें अफजलखानाबरोबर आलेल्या विजापुरी सरदारांत घोरपडे होताच. अखेर स.१६६४ सालीं शिवाजीचें कोंकणांत खवासखानाशी युद्ध चालू होणार होतें, तेव्हां बाजी घोरपडे रसद व फौज घेऊन खवासखानाच्या मदतीस जाण्याच्या तयारींत असतां, शिवाजीनें याच्यावर (बाजी घोरपड्यावर) अचानक हल्ला केला. तेव्हां फार मोठें रण होऊन त्यांत बाजी घोरपडे मारला गेला.

याचा मृत्यु सन १६६४ असून मृत्युसमयीं हा ५९ वर्षांचा होता. हा पुरुष आपल्या इतर पूर्वजांप्रमाणेच विलक्षण शौर्यशाली व एकनिष्ठ सेवक होता (चित्रमय शिवाजी, भाग १ ला, पृ. ६८).

बाजीराव गुजर—(३ रघूजी भोसले पाहा).

बाजीराव गोविंद बर्वे—हा राघोबादादाचा मेहुणा होय. स. १७७७ त हैदराजवळ जी मंडळी (मराठे सरदार) होती त्यांत हाहि होता. हा दादाचा फार अभिमानी होता. पुढें नानानें हैदराशीं तह केला, तेव्हां बाजीरावास हैदरानें स. १७८० च्या मे महिन्यांत आपल्याजवळून काढून लाविलें, तेव्हां हा पुनरपि दादाजवळ सुरतेस गेला. तेथून स. १७८१ चे आरंभी दादानें यास महेश्वर येथें अहल्याबाईचे आश्रयास पाठविलें. महेश्वरीं आल्यावर बाईनें यास कांहीं दिवस सन्मानानें वागविलें. परंतु तेथें याचीं घोडीं, जवाहीर वगैरे

जखून बातांहत झाली. त्यामुळें फौज बाळगण्याची सोय राहिली नाहीं. बवें महेश्वरास आल्याचें नानास समजतांच त्यानें बाईकडे माणसें पाठवून बर्व्यास पुण्यास पाठविण्याबद्दल तगादा लाविला. तेव्हां बर्व्यानें बाईस विनंति केली कीं, 'आम्हांस पुण्यास पाठवूं नका. एक वर्षभर आमची निष्ठा पाहून मग आपल्या विद्यमानें पक्का बंदोबस्त पुणेंकरांशीं करून बिदा करावें.' प्रथम बाईनें यास बरेंच ताणलें, पण मागाहून तो गयांवयां करूं लागल्यावर एक दोन वर्षे तिनें यास आपणाजवळ बंदोबस्तानें ठेविलें. एक वेळ बाईनें यास पुण्यास जाण्याची निकड केली, परंतु हा ऐकेना. 'आपण पुण्यास जिवंत जाणार नाहीं, प्रेत रवेपार करावें.' असें यानें उत्तर केलें. अहल्याबाईनें नानाकडे मध्यस्थी करून तीनचार हजार रुपयांचा गांव द्यावयाचा करार ठरवून यास आदरानें निरोप देऊन पुण्यास पाठविलें. पुढें आणखी खटपट किंवा दंगे करण्याची बर्व्याची उमेद होती. महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांतील भाग २ चे अं. २७–३५ वगैरे कित्येक लेख बाजीराव बर्व्याचा स्वभाव दाखविण्याजोगे आहेत. हा स. १८०८ मध्यें मरण पावला (म. रि. उत्तर वि. ३).

बाजीराव बल्लाळ पेशवे—(जन्म स. १७०० आगष्ट १८, कारभारकाल स. १७२०–४०) हा बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचा वडील पुत्र. याचें दुसरें नांव बिसाजी असें होतें. याचा जन्माचा सन पटवर्धनसंग्रहांतून दिला आहे (मं. त्रै. १६. ३). याचें लग्न स. १७१३ चे सुमारास चासकर महादजी कृष्ण जोशी यांची मुलगी काशीबाईशीं झालें.

स. १७१३ त दमाजी थोरातानें बाळाजीस अडकवून ठेविलें होतें. त्या वेळीं हाहि त्याजबरोबर होता. सय्यदांचे मदतीस दिल्लीस गेला असतांहि हा त्याजबरोबर होता (स. १७१८–१९). तेथून परत आल्यावर याची स्वानगी खानदेशांत सय्यदांचे मदतीस झाली. बाळाजीच्या हयातींतच याची हुषारी शाहूनें पाहिल्यामुळें, कोणाचेहि विरोधास न जुमानतां यास बाळाजीचे मृत्यूनंतर लौकरच पेशवाईचीं वस्त्रें दिलीं (ता. १७ एप्रिल १७२०).

याचे कारकीर्दीचे, पहिला ११ वर्षांचा व दुसरा ९ वर्षांचा असे दोन खंड पडतात. बाळाजीनें आरंभिलेला उद्योग यानें पुढें चालविला. परंतु त्यांत याला दरबारी मंडळीचा व खुद्द शाहूचाहि अडथळा होऊं लागला. निजाम, मराठी राज्यांतील सरदारांत दुही वाढवूं लागला. त्यामुळें प्रथम त्याची खोड मोडणें यास भाग पडलें. या कामीं याचीं पहिलीं ११ वर्षें गेलीं व त्यांत यानें कर्तबगारी दाखवून शाहूचा विश्वास संपादन केला (स. १७३१). निजामाबरोबरच यानें कोल्हापूरकर संभाजी, चंद्रसेन जाधव, त्रिंबकराव दाभाडे यांचाहि बंदोबस्त केला. नंतर पुढील नऊ वर्षांत यानें चौथाई व सरदेशमुखीच्या नांवाखालीं माळवा व गुजराथ हाताखालीं घातला. नादिरशाहाची स्वारी व स्वतःचें अल्पायुष्य ह्या दोन गोष्टी नसत्या तर दिल्लीस बाजीरावाच्या हयातींतच मराठ्यांचें वर्चस्व प्रस्थापित झालें असतें.

निजाम बाळापूरच्या लढाईंत जय पावल्यानें दक्षिणेंत सुभेदार होऊन आला (स. १७२० ऑगष्ट). परंतु सय्यदास मदत करायची ठरल्यामुळें पेशव्यांनीं त्यास अडविण्याचा प्रयत्न केला. नंतर शाहूच्या सल्ल्यानें यानें सावर्ड्यास निजामाची भेट घेतली. ह्या भेटीपासून कांहींहि फलप्राप्ति न झाल्यामुळें यानें त्याच्या मुलखांत उपद्रव सुरू केला. भडबुंज्या मोगल वगैरे मंडळींचा यानें याच वेळीं पराभव केला (स. १७२०–२१). नंतर बऱ्हाणपूरच्या सुभेदारावर माळव्यांतून आलेल्या दाऊदखानाचाहि यानें मोड केला. याच लढाईंत मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे पुढें आले.

नंतर स. १७२१–२४ या तीन सालांत यानें पवार, शिंदे व होळकर यांच्या करवीं माळवा, बागलाण व खानदेश हे प्रांत थोडे थोडे हस्तगत केले. माळव्यावर तर याच्या तीन स्वाऱ्या झाल्या होत्या. माळव्याचा मोगली नायब सुभेदार राजा गिरिधर होता, आणि त्याच्यावर सवाई जयसिंग सुभेदार होता. परंतु गिरिधर जयसिंगाचे विरुद्ध वागे म्हणून जयसिंगानें नंदलाल मंडलोई याचेमार्फत मराठ्यांस माळव्यांत आणलें. चिमाजीआपानें प्रथम गिरधर बहादरास आणि नंतर एक महिन्याच्या आंत दयाबहादरास आमझरा येथें ठार करून माळवा हस्तगत केला (डिसेंबर स. १७२८; पे. द. १३. १५-१६). बाजीरावानें राज्याची व्यवस्था (वसुलाची व फौजेची) बाळाजीनें घालून दिल्याप्रमाणें कडकपणें अमलांत आणिली, व जुनी बचावाची पद्धत सोडून चढाईचें धोरण स्वीकारलें. यामुळें माळव्यांत यास आपल्या कार्यक्रमाची जागा करावी लागली. या वेळीं मोगल बादशाही दुर्बल असल्यामुळें एकदम चढाई करून तेथें मराठ्यांचें वर्चस्व स्थापावें व तसें केल्यानें घरची भांडणें आपोआप मिटतील असें याचें स्फूर्तिदायक मत होतें. परंतु प्रतिनिधि वगैरे दुसऱ्या पक्षाचें म्हणणें याचे विरुद्ध होतें. अखेर बाजीरावाचेंच म्हणणें शाहूला कबूल करणें भाग पडलें.

कर्नाटकांत फत्तेसिंग व प्रतिनिधि यांस शाहूनें खंडणी वसूल करण्यासाठीं धाडलें असतां बाजीरावहि त्यांचेबरोबर होता. परंतु हा त्या वेळेस फत्तेसिंगाच्या हाताखालीं होता (स.१७२५–२७). यापुढें विरोधी पक्षाचे त्रासानें कर्नाटकांत लक्ष न घालतां यानें आपलें लक्ष उत्तरेकडे वळविलें; पण यामुळें इकडे निजामानें फारच बंडाळी आरंभिली. तो चौथाई देईना व कोल्हापूरकर संभाजीस शाहूविरुद्ध उठवून, 'तुम्हीं आपसांतील तंटा मोडा, मग खऱ्या मालकास चौथाई देईन' असें त्यानें शाहूस कळविलें. तेव्हां शाहूनें बाजीरावास निजामावर पाठवलें. या वेळीं गनिमी काव्यानें न चालल्यानें उघड लढाई देऊन अखेर निजामाचा पालखेड येथें यानें पराभव केला (स.१७२७ दसऱ्यानंतर). निजाम जेरीस येऊन त्यानें मुंगी येथें तह केला (ता.१०–३–१७२८). औरंगजेबाच्या हाताखालीं तयार झालेल्या निजामासारख्या कसलेल्या सेनापतीचा बाजीरावानें पराभव केल्यामुळें याचा बराच लौकिक झाला. पुढें संभाजीतर्फे शाहूचे राज्यांत बंडाळी करणाऱ्या उदाजी चव्हाणाचाहि यानें बंदोबस्त केला.

स. १७२९ च्या मार्च महिन्यांत बाजीराव बुंदेलखंडांत छत्रसालच्या मदतीस गेला व ता. ३० मार्च रोजीं यानें मुहम्मदखान बंगश याचा जैतपुरी येथें पराभव केला व ४ मे रोजीं कायमखा बंगष याचा पराभव करून हा जुलैस साताऱ्यास परत आला. येथून पुढें बाजीरावाकडे सर्व हिंदुस्थानचें लक्ष वेधूं लागलें.

कांहीं दिवस पुणें सुपें येथें राहून (आगष्ट–फेब्रु.) यानें उंब्रेज येथें कोल्हापूरकरांशीं लढाई दिली (स. १७३० फेब्रु.).

गुजराथेंतील चौथाईवसुलीचें काम प्रथम दाभाड्यांचें होतें. तें बाजीरावानें आपल्याकडे घेतल्यानें त्रिंबकराव दाभाडे नाराज झाला, व तो संभाजीस आणि निजामास मिळाला. अखेर बडोद्याजवळ डभईस दोघांचें युद्ध होऊन त्रिंबकराव मारला गेला (स. १७३१ एप्रिल). यानंतर बाजीराव व निजाम यांची सुरतजवळ दमण येथें लढाई होऊन तींत निजामाचा पराभव झाला (लेटर मोगल्स, भा. २, पा. २५०–५२; पे. द. १०. ३४).

श्रीपतराव प्रतिनिधीनें मोगलांकडून रायगड जिंकल्यामुळें शाहूनें त्याकडे अंजनवेल जिंकण्याचें काम सोंपविलें (पु. द. १. १०२), पण यानें त्याचा वर्चष्मा होतो असें पाहून त्याचा मुद्दाम भेद करून पाडाव केला (पे. द. ३. १०, १२, १९, ३७, ४५).

या वेळीं जंजिरा घेण्याची आलेली संधि फुकट गेली. यानंतर बाजीराव या सिद्दीप्रकरणांत स. १७३५ पर्यंत कोंकणांत होता. पुढील वर्षी हा माळव्यांत गेला व तिकडेच वर्षभर होता (स. १७३७).

मध्यंतरीं आंग्रे (मानाजी व संभाजी) बंधूंत भांडणें सुरू झालीं तीं बाजीरावानें साधारण मिटवलीं, त्यामुळें संभाजी आंग्रे हा बाजीरावाचे विरुद्ध पक्षास मिळाला. या कलहांत पेशव्यांनीं भर घातल्यामुळें आंग्र्यांचें आरमारी बळ कमी दर्जाचें झालें.

या सुमारास इंग्रजांनीं शाहू व बाजीराव यांच्यांत फूट पाडण्याचा प्रयत्न केला पण तो फुकट गेला व गॉर्डनें स्वच्छ सांगितलें कीं शाहूवर पेशव्यांचा दाब विशेष आहे.

मध्यंतरीं स. १७३६ च्या नवंबरांत हा उत्तरेच्या स्वारीवर निघाला. हा अटेरव भदावर लुटून यमुनेपर्यंत गेला. तेथें स. १७३७ त सादतखान, मुहंमद बंगष वगैरे सरदारांनीं पुष्कळ फौज घेऊन याला अडविण्याचा प्रयत्न केला, पण यानें थेट दिल्लीपर्यंत जाऊन आपला शह बसविला. पुढें राजपुतान्यांतून हा स. १७३७ च्या जूनमध्यें पुण्यास आला.

बाजीरावाचें हें आक्रमण बंद पाडण्यासाठीं दिल्लीच्या मुत्सद्यांनीं निजामास बोलावून याचा बंदोबस्त करण्याचें काम त्याच्याकडे सोंपविलें. त्याप्रमाणें निजाम दिल्लीकडून परत येत असतां बाजीराव निजामावर चालून गेला. दोघांची लढाई भोपाळजवळ १५ डिसें. १७३७ रोजीं होऊन तींत पराभव झाल्यानें निजाम शरण आला. त्यामुळें नर्मदा–चंबळा–दुआब मराठ्यांना मिळाला. नंतर बाजीराव पुण्यास परत आला (१७३८ जुलै). या वेळीं हा हिंदुस्थानांत अजिंक्य झाला आणि उत्कर्षाच्या शिखराला पोंचला; आणि मराठ्यांकडून सर्व हिंदुस्थानचीं सूत्रें हालूं लागलीं.

यानंतर नादिरशहानें दिल्लीवर स्वारी केली. मराठ्यांची इच्छा बादशहास मदत करण्याची होती. त्याप्रमाणें वसई जवळजवळ फत्ते झाल्यावर बाजीराव उत्तरेस निघाला. पण नादिरशहा अगोदरच निघून गेला होता. बादशहाने यास पूर्वीचे करार कबूल केल्यावरून हा परत साताऱ्यास आला (स. १७३९ जुलै).

इकडे निजाम नासिरजंगानें ठरलेली जहागीर देण्याची टाळाटाळ चालविल्यामुळें बाजीरावानें त्याच्यावर आपला मोर्चा फिरवला (स. १७३९ डिसेंबर) व त्याचा औरंगाबादेजवळ पराभव करून पूर्वीची व आणखी जहागीर मिळविली (स. १७४० फेब्रुवारी). यानंतर हा उत्तरेकडे जात असतां नर्मदाकांठीं खरगोण जिल्ह्यांतील रावेरखेडी

येथें ताप येऊन व तापांतच नर्मदेंत पोहल्यामुळें मृत्यु पावला.

बाजीरावाविरुद्ध फत्तेसिंग भोसले, प्रतिनिधी व रघूजी भोसले वगैरे मंडळी सतत २० वर्षे शाहूजवळ कागाळ्या करीत, त्यामुळें बाजीरावास फार त्रास होई. परंतु हा त्यांतून स्वतःच्या पराक्रमामुळेंच बाहेर पडे.

याची भूमिका पेशव्याची नसून सेनापतीची होती; आणि सैन्याच्या जोरावरच याच्या ताब्यांत सर्व सत्ता आली. छत्रपति सोडून दिल्लीच्या बादशहाचेंहि सेनापतित्व स्वीकारून मराठ्यांना विरोध करण्याची याची इच्छा दिसते (पे. द. १५.८६).

बाजीरावाच्या कारकीर्दीत तेजस्वी सरदारांची एक मालिकाच निघाली. शिंदे, होळकर, बुंदेले, पवार, गायकवाड, हिंगणे, कोल्हटकर वगैरे अनेक ब्राह्मण व मराठे सरदार पुढें येऊन त्यांनीं वऱ्हाड, माळवा, बुंदेलखंड, दिल्ली वगैरे उत्तरेकडील प्रांतांत मराठ्यांचें वर्चस्व स्थापिलें.

स्वारीच्या खर्चामुळें बाजीरावास कर्ज फार झालें. त्याबद्दलचीं याचीं पत्रें याचे गुरु ब्रह्मेंद्रस्वामी यांना लिहिलेलीं वाचण्यासारखीं आहेत. खुद्द ब्रह्मेंद्रस्वामीहि आपल्या कर्जाचा पेशव्यांना तगादा लावीत.

बाळाजी, रामचंद्र, जनार्दन, रघुनाथराव असे याला चार पुत्र व समशेरबहादर हा मस्तानीचा पुत्र होय.

प्रत्यक्ष शाहू व पेशव्यांच्या कुटुंबांतील मंडळी चिमाजी आपाच्याच मार्फत याच्याकडून कामें करून घेत. बाजीरावाचा स्वभाव शिपाईबाण्याचा असे. मनमिळाऊ नसे. मस्तानीशीं जास्त संघटन झाल्यानें राज्यकारभाराकडे याचें दुर्लक्ष होऊं लागलें. तिच्या सहवासानें याला मद्यमांसाचाहि नाद लागला होता; आणि घरांतल्या मंडळीपुढें हा एक प्रश्न पडला होता (पे. द. ९. ३०-३४).

बाजीरावानें पुण्यास शनवारवाडा बांधण्यास प्रारंभ करून (स. १७३० जाने.) एक वर्षांत (स. १७३१) तो पुरा केला. त्यास १६११० रु. खर्च आला.

बाजीराव रघुनाथ पेशवे—(जन्म ता. १७-१-१७७५-मृत्यु ता. १४-१-१८५१) हा रघुनाथराव-दादा व आनंदीबाई यांचा मुलगा. जन्मस्थळ धार. नानाफडणीस होता तोंपर्यंत याचें आयुष्य कोपरगांव येथें कैदेंतच गेलें. पण तेथूनहि सवाई माधवरावाशीं पत्रव्यवहार करून आपल्याबद्दल सहानुभूति व नानाबद्दल तिरस्कार यानें त्याच्या मनांत बिंबविलीं, आणि शेवटीं त्यानें आत्महत्या केल्यावर प्रथम दत्तकाचा केलेला विचार बाजूस सारून नानानें याच्याशीं संगनमत केलें. आणि शेवटीं महाडचें कारस्थान करून चिमणाजी माधवाला दूर सारून याला पेशवा बनवलें.

पण पुढें नानाचें महत्त्व कमी होत जाऊन हा सैन्यासहित असणाऱ्या शिंद्याच्या पूर्ण छापेंत गेला. पुढें नाना वारला (स. १८००) आणि शिंदाहि यशवंतराव होळकराच्या वाढत्या जोराचा बंदोबस्त करण्याकरितां पुणें सोडून निघाला. शिंद्याचें सैन्य पुणें प्रांतांतून बाहेर पडतांच यशवंतराव होळकराचा जोर पाहून पुण्याहून काशीराव होळकर त्यास जाऊन मिळाला, आणि विठोजीनें बंड सुरू केलें. तेव्हां यानें होळकरांचा सरंजाम जप्त करून विठोजीला अविचारानें क्रूरपणें हत्तीच्या पायीं देऊन ठार मारलें (स. १६-४-१८०१). त्यामुळें संतापून यशवंतराव होळकरानें पुण्यावर चाल करून याचा पराभव केला (हडपसर ता. २५-१०-१८०२). तेव्हां हा घाबरून महाडाहून वसईस गेला आणि तेथें यानें उतावळेपणानें कोणासहि न विचारतां इंग्रजांशीं तैनाती फौजेचा तह केला (ता. ३१-१२-१८०२). इंग्रजांचें संरक्षण मिळाल्यानें याला स्वस्थता लाभली. तेव्हां यानें सरदारांच्या तैनाती जप्त करून उत्पन्न वाढविण्यास सुरुवात केली. याचवेळीं रे. क्लोज जाऊन एल्फिन्स्टन आला (स.१८१०जून) आणि त्यानें तैनातदार सरदारांचा व बाजीरावाचा संबंध तोडला (स. १८१२ जुलै ७). पुढें गंगाधरशास्त्र्याच्या खुनानें हा इंग्रजांच्या डोळ्यावर आला. तेव्हां शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले वगैरे मोठ्या सरदारांवरील बाजीरावाचें स्वामित्व एल्फिन्स्टननें साफ नष्ट केलें व त्याच्याशीं दळणवळण ठेवण्यासहि बंदी केली (ता. १३-६-१८१७). पण याविरुद्ध वर्तन घडतांच युद्धावर प्रसंग आला. युरोपमध्यें नेपोलियनसारखा प्रतिस्पर्धी चीत केल्यामुळें इंग्रजहि आतां हिंदुस्थानांत आपली सत्ता वाढविण्यास सज्जच होता. इंग्रजांशीं दोन हात करण्याच्या बाबतींत बापू गोखल्याशिवाय याला कोणाचीच अनुकूलता नव्हती, तथापि ब्रह्मदेशच्या बादशहाचेंहि साह्य मिळविण्याचा यानें प्रयत्न केलेला दिसतो. पण खडकी व एरवड्याची लढाई होऊन पराजय झाल्यामुळें बाहेरच्या लोकांचें साहाय्य मिळवून इंग्रजांना तोंड देतां येईल तर पाहावें अशा बुद्धीनें यानें पलायनास सुरुवात केली. कोरेगांव व अष्टी येथें पराजय झाला व बापू गोखलेहि पडला तेव्हां गुप्त रीतीनें बेत ठरवून हा नागपूरच्या बाजूला गेला, पण तिकडे उपयोग होईना. शिवणी येथें पराभवच पदरीं आला. शेवटीं बरोबरचे लोक सोडून जाऊं लागले. शिंद्यांच्या मुलखांत पोंचण्याचा संभव दिसेना, तेव्हां

बन्हाणपूरचे बाजूस अशीरगडचे उत्तरेस धूळकोट येथें गेला; आणि तेथें इंग्रजांनीं याला पूर्णपणें घेरलें; आणि शेवटीं यानें माल्कमला राज्याची सोडचिठ्ठी लिहून दिली व कोठें तरी क्षेत्रांत राहण्याचें कबूल केलें (ता. २-६-१८१८). आणि यानंतर हा ब्रह्मावर्तास (बिठूर) येथें राहिला.

यानें एकंदर अकरा लग्नें केलीं, त्यांपैकीं सहा दक्षिणेत पेशवाईवर असतां आणि पांच राज्यच्युतीनंतर बिठूर येथें. यांशिवाय लाला परदेशी यांचे लेकीशीं कट्यारीबरोबर लग्न केल्याचा निर्देश आहे. यांशिवाय याच्या मर्जीतल्या अनेक स्त्रिया होत्या. संतति झाली, पण ती फार दिवस जगली नाहीं. तेव्हां यानें माधव नारायण भटाचा मुलगा धोंडू यास ता. ७-६-१८२७ रोजीं दत्तक घेतलें. याशिवाय त्याचेच भाऊ सदाशिव, गंगाधर व पांडुरंग यांना दत्तक घेतलें. धोंडू हाच पुढें नानासाहेब पेशवे नांवानें स. १८५७ सालच्या बंडांत प्रसिद्धीस आला. यांपैकीं शेवटला पांडुरंग ऊर्फ रावसाहेब हा लक्ष्मीबाईस सामील झाला म्हणून त्यास ब्रह्मावर्त येथें फाशीं दिलें. यांच्यापैकीं तात्या टोपे या येवल्याच्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणास बंडवाला म्हणून शिप्री येथें फाशीं दिलें (स.१८५९ एप्रिल १८). झांशीच्या लक्ष्मीबाईनें रणांत देह ठेवला. बाकीचीं माणसें नेपाळांत गेलीं.

यानें नऊ वर्षांपुढें कोणतीहि मुलगी अविवाहित राहूं देऊं नये, असा सक्त हुकूम काढला होता (पेशव्यांच्या रोजनाम्यांतील थोडी माहिती, पा. २१४). नैतिकदृष्ट्या या वेळीं मराठ्यांचा व विशेषतः ब्राह्मणांचा कमालीचा अधःपात झाला होता.

बाझ बहादुर—(राज्यकाल स. १५५४-१५६४) हा पठाण माळव्याचा शेवटचा बादशहा असून हा फार विलासी, मृगयाकुशल, व संगीतलोलुप होता. ह्याची राजधानी मांडवगड उर्फ मंडू येथें असून ह्याच्या राणीचें नांव रूपमती असें होतें. ह्या दोघांची प्रणयी जोडपें म्हणून प्रसिद्धि आहे. याचें राज्य मोगलांनीं जिंकल्यामुळें ह्यांचा प्रेमसंबंधाचा दुःखपर्यवसायी शेवट झाला. ह्यानें रूपमतीच्या सांगण्यावरून नर्मदेचा प्रवाह, १२०० फूट उंच असलेल्या मांडवगडावर अफाट पैसा खर्च करून आणला व तेथें एक रेवाकुंड बांधलें. हीं दोघेंहि कवि होतीं. जनानखाना शत्रूच्या हातांत जाण्याचा प्रसंग आला असतां यानें राण्यांचा वध केला (रूपमती पाहा; जु. ऐ. गो. भा. २, पृ. २१-२४).

बाणभट्ट—(स. ६४८ सुमार) संस्कृत महाकवि. हा वात्स्यायनगोत्री ब्राह्मण. कुबेर-पाशुपत-अर्थपति-चित्रभानु-बाण असा याचा वंशक्रम आहे. याच्या मातेचें नांव राज्यदेवी. याच्या चवदाव्या वर्षाच्या आंत याचे आईबाप वारले. नंतर ठाणेश्वरच्या हर्षवर्धनाचा (स.६०६-६४८) यास आश्रय मिळाला, असें यानें आपल्या हर्षचरित्रांत लिहिलें आहे.

याचे ग्रंथ-कादंबरी (पूर्वार्ध), हर्षचरित. पुढील ग्रंथ याचेच आहेत किंवा नाहीं याबद्दल मतभेद आहे.

पार्वतीपरिणयनाटक, नागानंदनाटक (यांचें नसून धावकाचें असावें असें म्हणतात.) चंडिकास्तोत्र. याच्या मुकुटताडितक नाटकाचा निर्देश गुणविनयगणीनें आपल्या नलचंपूच्या टीकेंत केलेला आहे. क्षेमेंद्रानें आपल्या औचित्यविचारचर्चेत कांहीं पद्यांचा विचार बाणाच्या नांवावर घेतलेला आहे. त्यावरून बाणानें एक पद्यमय कादंबरीहि लिहिली होती असें कळतें, पण ती आज उपलब्ध नाहीं.

बाणाजी शेट्या—कृष्णाजी शेट्यानंतर दौलतराव शिंदे यांनीं यास आपला कारभारी केला.

बाणेश्वरशर्मा—(स. १००० सुमार) रामदेव तर्कवादी भट्टाचार्य याचा पुत्र व विष्णुसिद्धांत भट्टाचार्य याचा पौत्र. बाणेश्वर शर्मा यानें 'नंदघराण्याचा अधःपात' या विषयावर ' चंद्राभिषेक ' म्हणून एक नाटक संस्कृतांत लिहिलें आहे.

बादर्स्टन—(स. १७७८-८२) एक इंग्रज वकील. जेव्हां हेस्टिंग्जनें सातारची गादी मुधोजी भोसल्यास मिळवून देण्याची खटपट चालविली तेव्हां गॉडर्डनें याला मुधोजीकडे नागपुरास पाठविलें (स. १७७८ डिसें.). स. १७८२ मध्यें गॉडर्डनें यास पुण्यास वाटाघाटीकरितां पाठविलें, परंतु अंडरसन महादजीजवळ तेंच काम करीत असल्यामुळें ह्यानें १२ मार्च १७८२ रोजीं पुणें सोडलें. जातांना नानानें ह्यास शिफारसपत्र दिलें होतें. हा फार्सी भाषाभिज्ञ होता.

बादशाहा बीबी—ही दुसऱ्या अली आदिलशाहाची मुलगी.

बापू कान्हो फडणीस सातारकर—हा सातारकर छत्रपतीच्या पदरीं असून चतुरसिंग भोंसल्याचा उजवा हात होता. मालकमसाहेबाच्या सांगण्यावरून बापू कान्हो यानें स. १८१८ मध्यें त्या वेळचा इतिहास मालकमसाहेबास लिहून दिला (ना. प्रां. इ. पा.१९३).

बापू गोखले—(जन्म स. १७७७, मृत्यु स. १८१८) बापूंचें मूळ गांव तळेखाजण हें होय. यांनीं जवळच पिरंदवण गांवीं मल्लिकार्जुनाचें देऊळ बांधलेलें आहे. तळेखाजणास बापूंच्या वाड्याचा चौथरा फक्त शिल्लक आहे.

बापूंचें नांव नरहर गणेश. यांच्या धोंडोपंत नांवाच्या चुलत्यास प्रथम परशुरामभाऊ पटवर्धन यांचे हाताखालीं सरंजाम मिळाला. आपल्या पराक्रमानें ते बदामीच्या लढाईंत विशेष प्रसिद्धीस आले, तेव्हां स्वतंत्र सरंजाम देऊन श्रीमंतांनीं धारवाडच्या सुभ्यावर पाठविलें. धोंडजी वाघाच्या हातून त्यांचा (चुलता) पाडाव झाल्यावर त्यांची सरदारी याला मिळाली. धोंडजी वाघाचा वेलस्लीनें पराभव केल्यानें मराठ्यांचे राज्यांत धुमाकूळ घालण्यास त्यानें सुरुवात केली.

मराठी राज्याचे हे अखेरचे सेनापति होते. यांना एक भाऊ होता, परंतु तोहि वरील लढाईंत मरण पावला. बापूंना दोन पुत्र होते. पैकीं एक लहानपणींच वारला व दुसरा अष्ट्यावरील इंग्रजांच्या मोहिमेंत कामास आला. पुढें यानें बऱ्याच मोठमोठ्या लढायांत प्रामुख्यानें भाग घेतला. त्यांपैकीं हालिदाळच्या लढाईंत याला बऱ्याच जखमा झाल्या. शेवटीं यानें इंग्रजांच्या मदतीनें धोंडी वाघास ठार मारलें. बारभाईंचें व बावनपागे यांचीं बंडें बापूंनींच हाणून पाडलीं. नंतर प्रतिनिधी व ताई तेलीण ह्यांचा पराभव करून बापू पुण्यास गेले. तेथें पेशव्यांना त्यांच्या-बद्दलची कोणीं चहाडी सांगितल्यावरून बापूंना सरंजामी प्रांताच्या सोडचिठ्ठ्या मागण्यांत आल्या. त्या विलंब न लावतां बापूंनीं दिल्यामुळें पेशवे खूष झाले व त्यांनीं १२ लाखांचा सरंजाम देऊन लढाईचें झालेलें १६ लाखांचें कर्ज फेडण्याचें आपल्या अंगावर घेतलें. पुढें चतुर-सिंगाच्या बंडाचा मोड करण्याचेंहि बापूंवरच सोंपविलें व तें काम यांनीं यशस्वी रीतीनें पार पाडलेंहि.

बापू हे स्वामिनिष्ठ सेनापति होते. त्यांनीं लढाईतून कधींच पाय काढला नाहीं. गणेश-खिंडीच्या लढाईत यांचा घोडा ठार झाला तरी हे पायउतार होऊन लढत होते. अखेर पेशव्यास सासवडास जाण्यास सांगून त्यांची पिछाडी संभाळीत यांनीं इंग्रजांस तोंड दिलें. ब्राह्मण-वाडीजवळ बापूंचा मुलगा बाबासाहेब वारला. त्या वेळीं त्याची १२ वर्षांची स्त्री सती गेली. पुढें कोरेगांव मुक्कामींहि इंग्रजांशीं बापूंनीं सामना दिला.

२० फेब्रुवारी स. १८१८ रोजीं श्रीमंत भोजनास बसले असतां स्मिथ चालून आल्याचें बापूंनीं कळविलें. पण पेशवे न उठतां उलट यांनाच बोलल्यामुळें बापूंनीं "जय झाल्यास परत येऊं नाहीं तर हें शेवटचेंच दर्शन" असें म्हणून अवघ्या ५० असामींसह स्मिथवर निकराचा हल्ला केला. त्यांतच बापूंचा अंत झाला. पाच्छापुरकर बखरींत "बापूंचा शेवट काय झाला याचा पत्ता लागत नाहीं" असें आहे.

बापूंचा जन्म स. १७७७ त झाला होता; व वयाच्या ४० व्या वर्षी वरीलप्रमाणें त्यांचा शेवट झाला (खरे खं. ११, डफ पु. ३; आपटे-गोखले घराण्याचा इतिहास).

बापूजी खंडोजी चिटणीस—सातारच्या छत्रपतीचा चिटणीस खंडो बल्लाळ याचा हा एक पुत्र.

बापूजी नाईक—स. १७७५ चे पूर्वी थोडे दिवस बापूजी नाईक हा ओरिसाच्या सुभेदारीवर होता असें दिसतें. परंतु याची सुभेदारी एक दोन महिन्यांपेक्षां जास्त दिवस राहिली नाहीं. याचा पिता अनंत असावा (ना. प्रां. इ० पा० ३५३).

बापूजी प्रभु—(बापूजी सोमाजी दिघे पाहा).

बापूजी भीमराव पारसनीस—(मृत्यु स. १७३६) पुणें येथील पारसनीस घराण्यांतील भीमरावजीचा हा मुलगा.

थोरले बाजीराव पेशवे यांनीं याला साताऱ्याहून पुण्यास आणून ठेविलें. मृत्यु श. १६५८ आश्विन शुद्ध १२ च्या सुमारास (पे. द. २२. ३२५).

बापूजी बाजी रेडरेकर—(बाजी भिवराव रेटरेकर पाहा).

बापूजी महादेव हिंगणे—(मृत्यु स. १७६१) यानें स. १७४९ त पेशव्यांच्या तर्फेनें नासिरजंगाची भेट घेतली. त्या वेळेचें वर्णन ता. ७।२।१७४९ च्या पत्रांत आहे (रा. खं. ६ ले. १९२). याला एक पुत्र असून त्याचें नांव माधव असें होतें.

बापूजी मुद्गल—खेडेबारेचा देशपांडे. पुणें प्रांताचा हवालदार. यानें कोंडाणा घेण्याच्या कामीं शिवाजीस मदत केली. याचेच पुत्र बाबाजी व चिमणाजी शाहिस्तेखानाच्या वेळीं प्रसिद्ध झाले.

बापूजी मुधोजी भोसले नागपूरकर—(मृत्यु स. १७१७-२२ सुमार) भोसल्यांचा मूळ पुरुष मुधोजीचा हा वडील मुलगा होय. परसोजीप्रमाणें हाहि शिवाजीचे सैन्यांत नोकरीस होता (१ परसोजी भोसले पाहा).

ह्याच्या पूर्वचरित्रापैकीं कांहीं अज्ञात भागावर धावडशीकर ब्रह्मेंद्रस्वामींचे पत्रव्यवहारावरून प्रकाश पडतो. बापूजी यास जंजिऱ्याचे सिद्यानें पकडून कैद केलें होतें असें दिसतें. ब्रह्मेंद्रस्वामींचें वजन व पत्र-व्यवहार सर्वत्र होता. त्यांनीं मध्यस्थी करून बापूजीस सोडविलें (ब्र. च. २९५).

बापूजी विठ्ठल चाफेकर—दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या प्रभावळींतील एक गृहस्थ. हा प्रथम नाना पुरंदऱ्यांच्या लष्करांत कारकून होता. नंतर स्वतंत्र

पाग्या झाला. बाजीराव वसईकडे गेल्यावर हा साताऱ्याकडे फौज धरून राहिला होता. हा पुढें वेलस्ली तहान्वयें बाजीरावाच्या मदतीस आला व त्याच्या सैन्यांत जाऊन दाखल झाला.

बापूजी श्रीपत चित्राव—(मृत्यु स. १७३९) काण्व ब्राह्मण. थोरल्या बाजीरावाच्या वेळचा पुणें प्रांताचा सुभेदार. नंतर पुरंदरचा सबनीस. याचा मुलगा श्रीपत बापूजी. फुटक्या बुरुजाजवळ याचा वाडा होता. यानें आपला भाचा शामराव अंबाजी किरकोळे याचा मुलगा श. १६५७ सालीं दत्तक घेऊन त्याचें नांव श्रीपतराव असें ठेवलें. जेजुरीच्या पेशव्यांच्या तलावाचें काम याच्या देखरेखीखालीं झालें. हा शके १६६१ च्या आश्विन वद्य नवमीस पुण्यास वारला. याची धाकटी बायको गऊबाई सती गेली (रा. खं. ६ पृ. १२७). स. १७३७ च्या उन्हाळ्यांत ठाण्याची मोहीम करावी असें चिमणाजीनें याच्या व मोरशेट, वासुदेव जोशी यांच्या सल्ल्यानें ठरविलें (म. रि. म. १ पृ. २९४). बाजीरावाच्या पदरच्या प्रख्यात लोकांत याची गणना असे. हा प्रथम शंकराजी नारायण सचीवाचा पुरंदरचा अधिकारी असे. बाळाजी विश्वनाथाकडे आल्यावर त्यानेंहि यास त्या जागीं ठेविलें (सोहनीकृत पेशवे बखर, रा. खं. ६, पुरंदरे भा. ३). तत्कालीन कागदपत्रांत बापूजीपंत नाना किंवा नुसते नाना असा यांचा उल्लेख येतो.

बापूजी सोनाजी दिघे—हा रोहिड खोऱ्यांतील सुभेदार. राजारामाचे वेळेपासून शंकराजी नारायण सचीवाचे बरोबर मोगलांशीं लढत असून यास 'पदाती सेनासाहस्री' हा किताब मिळाला. यास परसोजी भोसल्यानें राजारामहाराजांपासून आपल्या जमेनिशीचे कामावर नेमून घेतलें होतें. यानें शाहू खानदेशांत येतांच त्याचा पक्ष स्वीकारण्याविषयीं परसोजीचें मन वळविलें व इतरहि पुष्कळांना शाहूस अनुकूल केलें. याचें दुसरें नांव बाबूजी प्रभु. हा भोसल्यांच्या दरबारीं पुष्कळ वर्षें प्रमुख होता. ह्यानेंच हैबतराव निंबाळकर व नेमाजी शिंदे वगैरे सरदार शाहूस अनुकूल करून दिले. पुढें शाहूनें वचन दिल्याप्रमाणें यास स. १७०८ मध्यें दोन गांव इनाम करून दिले (ऐ. गो. पृ. १९).

बाप्पा रावळ—(स. ७१३-७३) बाप्पा हा चितोडच्या मोरी राजाचा मांडलिक होता. रावळ म्हणजे लहानसा राजा. उदेपूरच्या उत्तरेस नागदा म्हणजे नागह्रद नामक जें लहानसें गांव आहे तेथें बाप्पा राज्य करीत होता. मूळच्या वल्लभी राजघराण्याची एक शाखा प्राचीन काळीं ईडर येथें प्रस्थापित झाली. व तिच्या कित्येक उपशाखा पसरल्या. त्यांपैकीं बाप्पा रावळाची उपशाखा होय. बाप्पा रावळ हा अत्यंत स्वधर्माभिमानी होता, व यास गोहिंसक अरबांचा अत्यंत संताप येत असे. यानें प्रथम अरबांचे हल्ले परतविले. या विजयानें बाप्पा रावळ अत्यंत विख्यात झाला, आणि होतां होतां यास चितोडचें सार्वभौमपद प्राप्त झालें.

गुहिलोत घराण्याची स्थापना, राजपुतान्यांत बाप्पानें केली. बाप्पा रावळ हा दीर्घायुषी होता. यानें अनेक भार्या वरिल्या होत्या व यास संततीहि बरीच झाली. हा इतका दीर्घकाल जगला कीं, राज्यकारभारास कंटाळून यानें युवराजाच्या स्वाधीन सर्व अधिकार केले व आपण शिवोपासक यति झाला. दंतकथादिकांचा विचार करतां बाप्पा रावळाची कारकीर्द स. ७१३ पासून ७७३ पर्यंत केव्हां तरी सुरू झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. याचीं नाणीं उपलब्ध आहेत.

याच्या वेळीं मेवाडांत परमार राजे राज्य करीत होते.

बाप्पुक—एक राजा. तिसऱ्या अमोघवर्ष राष्ट्रकूटाचा पुत्र. कृष्णानें यास आज्ञाभंगाबद्दल ठार केलें (भांडार. पा. १०३-४).

बाप्पट पाल—(स. ७८० पूर्वी) हा पालवंशीय द्वितीय पुरुष होय.

बाबर—(स. १४८३-१५३०) दिल्लीचा पहिला मोगल बादशाहा. हा बापाकडून तैमूरलंगाचा व आईकडून चेंगीजखान मोगलाचा वंशज होता. तैमूरच्या काबूल या राजधानींत यास राज्याभिषेक झाला; आणि त्या ठिकाणीं आपला नीट बंदोबस्त करण्याच्या उद्योगास हा लागला. स. १५१९ त बाबरानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली.

दौलतखान लोदी यानें स. १५२४ त बाबराची मदत मागितली. बाबरास हेंच पाहिजे होतें. हा तात्काळ हिंदुस्थानांत आला, व इब्राहिमखानाच्या फौजेबरोबर लढून यानें पंजाब प्रांत घेतला. पुढें बाबरानें जसजशी संधि सांपडेल तसतशा स्वाऱ्या करून हिंदुस्थान काबीज केला.

बाबरासारख्या बलिष्ठ माणसास आपल्या देशांत राहूं देऊं नये म्हणून संगराण्यानें युद्धाची तयारी केली. बाबरहि सैन्यानिशीं तयारीतच होता. शिक्री येथें लढाई होऊन संगराण्याचा पराभव झाला (१६ मार्च सन १५२८).

बाबर हा हिंदुस्थान व आशिया यांस जोडणाऱ्या साखळींतील मध्यवर्ती दुवा होय. बारा वर्षांचा असतांना बाप वारला तेव्हांपासून मरेपर्यंत बाबरानें एकंदर छत्तीस वर्षे

राज्य केलें. यानें आपलें चरित्र इत्थंभूत आणि उत्कृष्ट लिहून ठेवलें आहे. हा २६ डिसेंबर स. १५३० रोजीं मरण पावला. याचा उच्चार बाबुर, हा शुद्ध समजतात.

बाबाजी—(केशवचैतन्य पाहा).

बाबाजी घाटगे झुंजारराव—रघूजीच्या प्रमुख सरदारांपैकीं एक (ना. प्रां. इ. पा. १०६).

बाबाजी नाईक पुंडे—(मृत्यु स. १६७५) हा श्रीगोंद्याचा शेषोबा नाईकाचा नातू. शेषोबा नाईक 'परम भले द्रव्यवान् होते. मालोजी भोसल्यास देवीचा दृष्टांत होऊन भूमिगत द्रव्य सापडलें. तें त्यानें शेषोबाच्या घरीं ठेवलें. शेषोबानें द्रव्य ठेवून घेतलें आणि सांगितलें कीं, 'तुम्हास दौलत राज्य प्राप्त झालियावर तुमची पोतदारी वतनी आम्हास परंपरागत करून द्यावी' (चि. २०). पुढें हा बाबाजी नाईक शिवाजीतर्फे विजापूर दरबारीं वकील होता. स. १६७२ मध्यें विजापूरकरांशीं झालेला तह मोडल्यामुळें हा परत आला. हा स. १६७५ मध्यें वारला.

बाबाजी नीळकंठ महाडकर—(स. १७३१ सुमार) हा प्रभु जातीचा असून कोल्हापूरचे सुमंताचा मुतालिक होता. यानेंच जिजाबाईचे सल्ल्यानें स. १७३१ मध्यें संभाजी व शाहू यांचा तह घडवून आणला. याचा मुलगा रामचंद्र हा कोल्हापूरचा सुमंत झाला. तेव्हां भाऊ गोविंदराव नीळकंठ याजकडे पारसनिसी राहिली (म. रि. म. १, पा. ४३३). रामचंद्राला हल्ल्याळ परगणा इनाम करून दिला. त्याच्या सनदेंत बाबाजी व गोविंदराव यांबद्दल पुढील मजकूर आहेः 'हे (दोघे) पुरातन राज्यांतील प्रमुख सेवक. थोरले महाराजापासून मातबर स्वामिकार्ये करून कृपा संपादित आले. संस्कृत, फार्सी, हिंदी व कानडी विद्येमध्यें निपुण. त्यांचे पुत्र तुम्हीं त्याजप्रमाणें सर्वविद्यानिपुण. नबाब निजामुल्मुल्क यांची व स्वामींची भेट झाली ते समयीं उभयपक्षीचे मध्यस्तींत फार्सी विद्येचें निपुणतेनें व बुद्धिकौशल्यें करून निजामाशीं संतोषी केलें. (सनद ता. ११-१०-१७३८, का. प्र. इ. साधनें पृ. ८७-९०). यालाच बाबाजी प्रभु किंवा बुवाजी (बोवाजी) नीळकंठ प्रभु पारसनीस असें म्हणत.

बाबाजी बापूजी मुद्गल—हा खेडेबाऱ्याचा देशपांडे. याला चिमणाजी बापूजी नांवाचा एक भाऊ होता. या दोघांनीं शास्तेखानाच्या माळ्याला वश करून शिवाजीचा लालमहालापर्यंत प्रवेश करून दिला. शिवाजीच्या लोकांना 'चौकी पाहऱ्याकरितां गेलेले लोक' अशी बतावणी करून पहाऱ्यांतून आंत घेतलें. यांनीं गडबड करणाऱ्या कांहीं खोजांना ठार केलें. खानाचीं बोटें तुटल्यावर गडबड झाली, तेव्हां खुणेच्या कर्ण्यानें सर्वांनीं दंगल केली आणि आंबील ओढ्यांतून सर्व निघून गेले. या कामगिरीबद्दल यांना पालख्या देऊन सन्मान झाला. हा छाप्याचा प्रसंग ५ एप्रिल १६६३ रोजीं घडला (सभा. ३३).

बाबाजी राम होनप—(स. १६७८ सुमार) हा मोरो तानदेवाचा चुलता. याला देशकुलकर्ण ३६ गांवचें असल्यानें आपाजी नामदेव व नामाजी कृष्ण हे पितापुत्र गुमास्ते नेमले. पण मालकाचें लक्ष राजकारणांत असल्यानें हे मालक होऊं लागले. स. १६७७ मध्यें हा दिलीरखानास बऱ्हाणपुरास जाऊन मिळाला. दुसऱ्या वर्षी संभाजीहि पेडगांव येथें दिलीरखानाकडे दाखल झाला. तेव्हां शत्रूस मिळण्याच्या या वृत्तीस आळा घालण्याकरितां याला पुरंदर येथें बोलावून देशपांडेपण दिलें (स. १६७८).

बाबाजी सटवोजी डफळे—(स. १७००) सटवोजीनें सातारच्या मंगळाईच्या बुरुजावर औरंगजेबाचें निशाण लावलें म्हणून यास जत व करजतीची जहागीर मिळाली. त्या सटवोजीचा हा मुलगा.

बाबा दीनदयाल—(स. १८०२-५८) हा एक गोसावी असून हिंदी कवि होता. हा प्रथम महंत कुशागिरीच्या व नंतर दिल्लीच्या विनायकाच्या आश्रयास होता. ह्याचें हिंदी व संस्कृत भाषेवर चांगलें प्रभुत्व होतें. याचा विशेष भर अन्योक्तीवर असून याच्या यमकास धरून श्लेषमय कवितांहि बऱ्याच आहेत. याच्या प्रसिद्ध पुस्तकांपैकीं पुढील उपलब्ध आहेतः अन्योक्तिकल्पद्रुम, अनुरागबाग, वैराग्यदिनेश, विश्वनाथनवरत्न, दृष्टांततरंगिणी.

बाबाराव गोविंद करमाळेकर—(स. १७८४-९१) सालबाईच्या तहानें इंग्रजांशीं महादजीचें वजन सिद्ध झाल्यावर हा निजामानें महादजीकडे ठेवलेला वकील.

बाबासाहेब आपटे—(मृत्यु स. १८८१) हे शिंद्यांचे सुप्रसिद्ध सरदार व दुसऱ्या बाजीरावाचे व्याही होत. स. १८५७ मध्यें हे माळव्यांत शिंद्यांच्या वतीनें सुभेदार होते. सर रॉबर्ट हॅमिल्टन यांनीं याविषयीं सरकारी रिपोर्टांत प्रशंसोद्गार काढले आहेत. हे घोड्यावर बसण्यांत फार निष्णात असून जयाजीराव शिंद्यांची यांजवर फार मेहेरबानी होती.

बाबासाहेब भोसले—(मृत्यु स. १७३७) तंजावरच्या एकोजीनंतर त्याचा मुलगा बाबासाहेब हा व्यंकोजी ऊर्फ एकोजी हें नांव धारण करून गादीवर बसला, परंतु एका वर्षांतच तो मरण पावला. हा जाल्या संशयी वृत्तीचा

होता. तशांत यास पदच्युत करण्याचीं कारस्थानें भावांनीं केल्यामुळें ह्याची संशयी वृत्ति बळावून हा जवळजवळ वेडा झाला होता. ह्याच्या संशयी वृत्तीचें वर्णन 'भोसले-वंशचरित्र' शिलालेखांत केलें आहे. ह्याच्या अशा वृत्तीमुळें राज्यकारभार विस्कळित झाला व दरबारांत स्वार्थपटु आणि मतलबी लोकांचें प्राबल्य वाढलें. ही संधि साधून चंदासाहेबानें स्वारी केली, परंतु जुन्या सरदारांच्या शौर्यापुढें त्याचा निभाव न लागून तो कांहीं खंडणी घेण्याचें मान्य करून निघून गेला. पुढें हा भ्रमिष्ट होऊनच मरण पावला. ह्यास अपत्य नसल्यामुळें ह्याच्यामागून याची बायको सुजनाबाई हीच गादीवर बसली (तं. रा. घ. पृ. ५८).

बाबूजी नाईक जोशी बारामतीकर—(जन्म स. १६९५–मृत्यु स. १७७७) केळशी, जि. रत्नागिरी येथील केशव रुद्र जोशी यांचे नातू. जन्म काशीस, पण वडिलांबरोबर पैठण, औरंगाबाद वगैरे ठिकाणच्या पेढ्यांवर कामकाज करीत. बाळाजी विश्वनाथ सेनाकर्ते यांची कन्या भिऊबाई यांचे कनिष्ठ बंधु आबाजी यांस दिली होती. (स. १७१२). दिल्ली दरबारांत 'स्वराज्याच्या' सनदा आणण्याकरितां गेलेल्या मंडळींत हे होते (स. १७१९). निजामाकडे पेशव्यांच्यातर्फे वकील असतां (स. १७२७) छत्रसालाकडून बाजीरावास मदतीस आणण्याचे कामीं यांनीं फार महत्त्वाची कामगिरी केल्यामुळें पुढें यांना माळव्याची सुभेदारी मिळाली आणि याच सुमारास (१७३१–३२) शिंदेहोळकरांकडील हुजुरपोतदारीचा दरक मिळाला. पुण्यास आल्यावेळीं यांना शनिवार, कसबा, सोमवार या पेठांची चौधरकी अर्पण करण्यांत आली (स. १७३३). राधाबाई पेशवे यांच्याबरोबर हे कार्शायात्रेस गेले होते (स. १७३५–३७). या काळांत राजपुतान्यांतील सर्व रजपुतांना एकत्र करून त्यांच्या सहाय्यानें दिल्लीची चकत्यांची पाच्छाईच समूळ उखडून टाकून तेथें हिंदुपदपातशाही स्थापन करण्याचें एक प्रचंड राजकारण यांनीं शिजविलें. परंतु शाहूच्या मोगलाईबद्दलच्या आपुलकीच्या धोरणामुळें तें सर्व फुकट गेलें; तथापि या वेळेपासून शाहूचा लोभ बाबुजीवर त्यांच्या मुत्सद्दीपणामुळें व शौर्यामुळें पहिल्यापेक्षां अधिक जडला; मात्र पेशव्यांचें व त्यांचें बिघडत चाललें (स. १७३८–३९).

पेशव्यांच्या विरोधी खटपटीस कंटाळून बाबुजीनीं शाहूकडून कर्नाटकमामलत मागून घेतली, पण ती यशस्वी होऊं नये अशी अंतस्थ खटपट पेशव्यांनीं केली; हेंच धोरण त्यांनीं स. १७४७ पर्यंत, बाबूजींच्या कर्नाटकांतील सर्व मोहिमांत चालू ठेविलें. मध्यंतरीं बाजीराव वारल्यानंतर, पेशवाईसारखीं महत्त्वाचीं पदें वंशपरंपरागत एकाच घराण्यांत कायम ठेवण्याची त्या वेळीं प्रवृत्ति नसल्यामुळें आणि आपण ज्या आपत्तींच्या चक्रव्यूहांत सांपडलों आहों त्याचा भेद करावयाचा असेल तर पेशवेपद मिळविणें हा एक उपाय आहे अशी स्वतःच्या मनाची समजूत झाल्यामुळें, बाबूजी हे कर्नाटकांतून साताऱ्यास परतले. तथापि हें राजकारण सिद्ध न होतां पेशव्यांचा विरोध मात्र जास्त वाढला.

तथापि शाहूचें प्रेम व भरंवसा बाबूजींवर असल्यानें दमाजी गायकवाडाच्या खुळांत, त्यांना गुजराथकडे पाठविलें (स. १७४३). त्या वेळीं यांनीं सोनगड घेऊन, अमूप पैका दरबारीं दाखल केला. तेव्हां प्रसन्न होऊन शाहूनें यांना बारामती महालाची (हा महाल खास छत्रपतींचा होता) जहागीर देऊन पुन्हां कर्नाटकावर पाठविलें. तथापि पूर्वीप्रमाणेंच या खेपेसहि पेशव्यांनीं बाबूजींनीं या चार (१७४३–४७) वर्षांत केलेली सर्व देशाक्रमणाची योजना अनेक सूक्तासूक्त मार्गांनीं हाणून पाडली (पे. द. २८. ७३; २९.२). ही बाबूजींची योजना त्यांच्या मागील रजपूत मराठे एक करण्याच्या योजनेप्रमाणेंच होती. म्हणजे कर्नाटकांतील सर्व हिंदूंना एकत्र मिळवून तिकडील मुसलमानांना नामशेष करण्याची होती. पण पेशव्यानें मुसलमानांपैकींच निजामास आपल्याकडे मिळवून घेऊन त्याचेकडून बाबूजींच्या मोहिमेंत अनेक प्रकारें अडथळे उत्पन्न करविले; एवढेंच नव्हे तर आपल्या सरदारांना 'नाईकांचे पाय मागें ओढावे' असे संदेश पाठवून, पुण्याहून त्यांना सैन्य-रसद इ० ची मदतहि धाडली नाहीं. या कृत्यानें पेशव्यांनीं 'मोगलाई मसलत' करून मूळ ध्येयालाच विसरल्यासारखें केलें.

तथापि तें मनांत न ठेवतां बाबूजींनीं सचिवाकडून सिंहगड पेशव्यांना मिळवून दिला. शाहूप्रमाणें रामराजासहि बाबूजींची स्वामिनिष्ठा पसंत पडल्यामुळें त्याने बाबूजींना आणखी मोठी सोलापूरचा किल्ला व प्रांत आणि सांगोले इ० मुलखाची जहागीर दिली (स. १७५३). याच वर्षी सुप्रसिद्ध मोरोपंत कवि यांच्या पदरीं येऊन राहिले.

पेशव्यानें बाबूजीविरुद्ध अस्तनींत ठेवलेल्या निजामाने पेशव्यासच त्रास देण्यास सुरुवात केल्यामुळें त्याचेशी युद्धाचा प्रसंग येऊन त्या कामीं अखेर पेशव्यांना बाबूजीचीच नेमणूक करावी लागली आणि त्यांनीं नळदुर्गसारखा बिकट किल्ला घेऊन मोहीम लाभदायक [illegible]

दिली (स.१७५८). तथापि ही मोहीम पुढें चालूच राहिली आणि तिचा शेवट उदगीरच्या लढाईत झाला: याहि लढाईत मराठ्यांच्या सैन्याची एक बगल बाबूजीच्याकडे होतीच (स. १७६०). पुढें राक्षसभुवनापर्यंतच्या प्रत्येक प्रकरणांत यांचा प्रमुख भाग होता (स. १७६३).

पुढें पेशव्यांनीं कर्नाटकावर स्वारी केली, त्या वेळीं बाबूजी त्यांचेबरोबर होते. त्या वेळीं बाबूजींच्या प्रतिस्पर्ध्याचें म्हणणें ऐकून पेशव्यानें त्यांचेवर हैदराशीं फितूर झाल्याचा आरोप करून, त्यांचेकडील सोलापूर किल्ला काढून घेतला (स. १७६७). पण पुढें आपली चूक कळून आल्यावर पेशव्यानें बाबूजींशीं टोकें येथें जाऊन समेट केला.

माधवरावांच्या मृत्यूनंतर थोड्याच काळानें राघोबादादांची मुलगी दुर्गाबाई हिचें लग्न बाबूजीचे चिरंजीव पांडुरंगराव यांचेशीं झालें (स. १७७३).

यानंतर वृद्धपणामुळें बाबूजीनीं व्याप आटोपून बारामतीस निरंतरचें वास्तव्य केलें. त्यांचा अंत तेथेंच शके १६९९ आश्विन शुद्ध ५ (ता. ६।१०।१७७७) रोजीं झाला. यांचा वंश सध्यां पुणें येथें बावडेकर या नांवानें शनवार पेठेंत नांदत आहे (मा. ग. बावडेकर).

बाबूराव आंग्रे—(मृत्यु स. १८१३) हा दौलतराव शिंद्याचा मामा. कुलाब्यास रघूजीचा मुलगा मानाजी व त्याचा चुलता यांचा तंटा लागून त्यांत हा दौलतराव शिंद्याचा मातुल असल्यामुळें याचे साह्यार्थ शिंद्यांचीं पलटणें मानाजीवर चालून गेलीं. ता. ५-२-१७९७ रोजीं बाजीरावानें कोंकणच्या मामलेदारांस हुकूम पाठविले कीं यास दारूगोळ्याचा पुरवठा करून मानाजीची जप्ती करावी. यास इंग्रजांनीं हरकत केली. तेव्हां ता. १९-५-१७९७ रोजीं पेशव्यानें यास साह्य करण्याविषयीं त्यांसहि पत्रें लिहिलीं. शिंद्यांच्या फौजेनें कुलाबा हस्तगत केला आणि मानाजीस पकडून याचे हवालीं केलें. यानें त्यास कैदेंत ठेविलें. पुढें दसऱ्याचे मुहूर्तावर (ता. २०-९-१७९७) बाजीरावानें यास सरखेलीचीं वस्त्रें दिलीं. हा पुढें दौलतरावाजवळ सरदारी करून असे. बायांचे युद्धांत व समेटांत हाच प्रमुख होता. इंग्रजांचें युद्ध झाल्यावर कांहीं काळ यानें दौलतरावाचा कारभार केला. हा पुढें हिंदुस्थानांतून देशीं येत असतां ता. १-९-१८१३ रोजीं जांबगांव येथें मरण पावला. ब्राउटनच्या लेखांत याचें वर्णन पुष्कळ आहे (म. रि. उ. वि. ३).

बाबूराव काशी—हा गोविंदराव गायकवाडाचा एक हस्तक होय.

बाबूराव केशव ठाकूर—हा पेशवाईतील एक प्रसिद्ध मुत्सद्दी, अनेक नाजुक कामगिरीवर पाठविला जात असे. कोल्हापुरांत कात्यायनीचा नळ बाबुरावानें आणिला व अनेक धर्मकृत्यें केलीं. याचा वाडा सातारानजीक लिंब येथें आहे. हा मूळ कशेळी गांवचा कुलकर्णी असून देशावर येऊन प्रसिद्धीस आला. राजापुरप्रांतांत ठाकूर देसाई राहतात ते याच घराण्यापैकीं होत. याला लक्ष्मण नांवाचा एक भाऊ होता (खरे पृ. ४०९६; ४४९०).

बाबूराव कोन्हेर कोल्हटकर—(स. १७५५) पहिल्या रघूजीच्या मृत्युसमयीं हा नागपुरास आला. जानोजी भोसले व मुधोजी भोसले यांचे तंट्यांत हा जानोजीचे बाजूस होता. तथापि दोघांत मध्यस्थीहि करी. जानोजीनें त्रिंबकजी भोसले यास व बाबुराव कोन्हेर यास सेनासाहेबसुभ्याचीं वस्त्रें आणण्याकरितां पुण्यास पेशव्यांकडे पाठविलें होतें. हा जानोजी भोसल्याची दिवाणगिरी करीत असे.

हा झाशी येथें राहिला होता. गणेश संभाजी खांडेकर या गृहस्थानें पुढें झांशीची मामलत याजकडून घेतल्याचा दाखला आहे. याचेच मार्फत गणेश संभाजीचा जानोजी भोसल्याकडे प्रवेश झाला (ना. प्रां. इ.).

बाबूराव दाभाडे—(मृत्यु ता. ५-१२-१७३६) हा यशवंतराव दाभाड्याचा भाऊ होय. याला सवाई बाबुराव असें म्हटलें आहे.

याला सेनाखासखेलचें पद दिल्याचा निर्देश आहे (रा. खं. ३. १६७).

हा फार पराक्रमी असून यानें अनेक पराक्रमाचीं कामें करून मोठा लौकिक संपादन केला. याला शाहूनें सुरतच्या मोहिमेवर पाठविलें होतें. यानें एकूण पुष्कळ लढाया केल्या, त्यांपैकीं अहमदाबादेवरील स्वारी ही याच्या आयुष्यांतील शेवटची होय. 'बाबुराव दाभाडे सेनाखासखेल यांस समाधान वाटत नव्हतें. याजकरितां सोनगडीहून पुढें लोहनेरास रवाना केलें. औषध उपाय व दैवी उपाय बहूतच जाले. ईश्वरें कोणासच यश न दिलें. मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी मंदवारीं देहावसान झालें.' असें याचा भाऊ यशवंतराव दाभाडे यांनीं चिमाजी आपास कळविलें आहे (पे. द. १२. ९३).

बाबूराव पाटणकर—पेशवाईतील राघोबाच्या पक्षाचा सरदार.

बाबूराव मल्हार बर्वे—(अंताजी मल्हार बर्वे पाहा).

बाबूराव विश्वनाथ वैद्य—(स. १७७५ सुमार) हा पेशव्यांचा नागपूरकर भोसल्यांकडील वकील. याचा पुत्र नारायण.

बाबूराव हरि गुप्ते—(स. १७६३) पेशवाईतील हा एक सरदार असून सखाराम हरीचा बंधु होय. अंबेगांवचे कुलकर्णी.

यानें राक्षसभुवनच्या लढाईंत शौर्यानें लढून आपल्या आंगची शिपाईगिरी प्रगट केली. त्या वेळीं याला पुष्कळ जखमा झाल्या होत्या (स. १७६३). जेव्हां निजामानें बसालतजंगावर स्वारी केली त्या वेळीं माधवरावानें निजामाच्या मदतीस यास फौज देऊन पाठविलें होतें (म. रि. मध्य वि. ४). पुढें यानें दादाचा पक्ष स्वीकारला.

बायजाबाई शिंदे—(स. १७८४-१८६३) ही सर्जेराव घाटग्याची मुलगी व दौलतराव शिंद्याची बायको. ही रूपानें फार सुंदर होती म्हणून हिला 'सौंदर्यलतिका' असें म्हणत. दौलतराव शिंद्यानें सर्जेराव घाटग्यास पुष्कळ पैसा व अधिकार दिल्यामुळें त्यास हिला शिंद्यास देणें भाग पडलें; व शिवाय दौलतराव तरुण, ऐश्वर्यवान् व रंगेल असल्यामुळें हिनें त्यालाच वरिलें. दौलतराव मरण पावल्यावर हिनें जनकोजी नांवाच्या मुलास दत्तक घेतला पण त्याचें व हिचें न पटून ही ग्वाल्हेर सोडून आग्र्यास जाऊन राहिली. हिनें आपल्या वडिलांची एक छत्री पुष्कर गांवांत बांधली आहे.

बायझीदखान कर्राणी—(स.१५७२) बंगालचा सुभेदार.

बॉयड—(स. १७९५-९७) प्रथम निजाम व नंतर पेशव्याकडे नोकर.

बारप—(स. ९७५) सोलंकीवंशांतील निंबार्काचा पुत्र. हें नांव बारप किंवा बारप्प लिहिलेलें आढळतें. प्रबंधचिंतामणीमध्यें लिहिलें आहे कीं मूळराज सोलंकीवर सपादलक्षीय सांभरचा विग्रहराज चौहान दुसरा यानें स्वारी केली, याच वेळीं तेलंगणचा राजा तैलप याचा सेनापति बारपनेंहि मूळराजावर स्वारी केली. त्यांत हा मारला गेला व दहा हजार घोडे व अठरा हत्ती मूलराजाच्या हातीं लागले. द्व्याश्रयकाव्यांत लाटेश्वर द्वारपालाला मूलराजपुत्र चामुंड राजानें मारल्याचें लिहिलें आहे (सर्ग ६, श्लो. ३९-९५). कीर्तिकौमुदींत लिहिलें आहे कीं, मूलराजानें लाटेश्वराचा सेनापति बारपाला मारून त्याचे हत्ती घेतले (२. ३.). तैलप सोलंकीनें राठोडांचें राज्य घेतलें. त्यांत लाट देशहि घेतला. तो सेनापति बारपाला त्यानें दिला असेल. त्यामुळें याला सेनापति किंवा राजा म्हणणें योग्य होईल. पण सुकृतसंकीर्तनमध्यें लिहिलें आहे कीं, मूलराजानें कनोजच्या राजाच्या सेनापति बारपच्या मार्फत हत्ती घेतले (२.५.).

यावरून हा सेनापति तैलपाचा कां कनोजच्या राजाचा ? पण हा तैलपाचा सेनापति असावा. एक तर हें नांव दक्षिणेकडील आहे व याचा वंशज त्रिलोनपाल याच्या ताम्रपत्रांत याला लाट देशाचें राज्य मिळाल्याचें लिहिलें आहे. याचा पुत्र गोग्गिराज.

यानें राष्ट्रकूटांशीं सोयरीक केली होती. यानें मूळराज सोलंकी याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला. तेव्हां मूळराज हा कंथकोटकडे पळून गेला. पण त्यानें मोठ्या सैन्यानिशीं कांहीं दिवसांनीं बारप्पावर स्वारी केली. या लढाईंत बारप्प हा ठार झाला. याच्यानंतर गोंगीराज, कीर्तिराज, वत्सराज व त्रिलोचनपाल हे राजे लाट देशावर राज्य करीत होते.

बारसिंग—(स. १३७५) अलवार संस्थानाधिपति चवदाव्या शतकाच्या उत्तरार्धांत अंबर येथें उदयकरण नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याचा वडील मुलगा बारसिंग हा अलबार घराण्याचा मूळ पुरुष मानला जातो.

हा आपल्या बापाशीं भांडून राज्यावरचा हक्क सोडून जयपूर संस्थानांत नोकरीस राहिला. तेथें यानें व याच्या वंशजांनीं सुमारें ३०० वर्षे नोकरी केली. कल्याणसिंगाला कामगिरीबद्दल जयसिंगाकडून माचेरीची जहागीर मिळाली. चार पांच पिढ्यांनंतर प्रतापसिंह यानें अलवार संस्थान मिळविलें. वयाच्या सतराव्या वर्षी जयपूर संस्थानांत सैन्यांत नोकरी धरून उनिगारा येथील उपद्रवी नरूक लोकांना धाकांत आणून यानें नांवलौकिक मिळविला.

बारिया अरब—(स. १२४६) या नांवाचा पठाण स. १२४६ मध्यें पुण्यावर चालून आला. कुंभारी व कासारी हीं दोन गांवें नदीकांठीं होतीं, आणि यासच त्या वेळीं पुणें म्हणत. या गांवांत पुणेश्वर ऊर्फ केदारेश्वर आणि नारायणेश्वर हीं दोन देवळें होतीं. कदाचित् पुणेश्वरावरून पुणें नांव अस्तित्वांत आलें असावें. यानें हीं देवळें पाडून मशिदी उभारल्या, व देवळाचीं उत्पन्नें मशिदीस लावून दिलीं. त्या मशिदी थोरला शेकसल्ला व धाकटा शेकसल्ला या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. पुढें मराठेशाहींत या नारायणेश्वराची स्थापना पुरंदरच्या पायथ्याशीं नारायणपेठ वसवून झाली. यानें पुण्यास कोट बांधला (स. १२९०). कुंभारवेशीजवळ त्याच्या खाणाखुणा दिसतात. निजामशहाकडे पुणें असतां मुरार जगदेवानें पुण्यावर स्वारी करून पुणें जाळलें, गड उध्वस्त केला

(स. १६२२-२३). स. १६३६ नंतर दादाजी कोंडदेवानें येथें वस्ती करविली आणि शिवाजीसाठीं लालमहाल वाडा बांधला.

बार्बकशाह लोदी—हा सुलतानशाह लोदीच्या मुलीचा मुलगा. याला ख्वाजा बायझीद या नांवाचा एक भाऊ होता.

२. (स. १४६०) (रुक्नुद्दीन बार्बकशाहा पाहा).

बार्लो, सर जॉर्ज—(स. १७६२-१८४७) हिंदुस्थानचा एक गव्हर्नर जनरल.

ह्याच्या वेळीं झालेली विशेष गोष्ट म्हणजे वेलोर येथील शिपायांचा दंगा (१० जुलै स. १८०६) होय. या वेलोरच्या बंडामुळें यास गव्हर्नर जनरलच्या जागेवरून कमी करून याच्या जागीं लॉर्ड मिंटोची नेमणूक झाली. पुढें कांहीं दिवस हा मद्रासचा गव्हर्नर होता. स. १८१२ सालीं याचा कारभार पसंत न पडल्यामुळें यास विलायतेस बोलाविण्यांत आलें.

बाल—(स. ११०० पूर्वी) एक संस्कृत धर्मशास्त्रकार. याच्या ग्रंथाचें नांव बालरूप असावें. व्यवहार व काळ यांवर याचा ग्रंथ असावा.

बालकृष्ण—याचें एक तैत्तिरीय संहिताभाष्य आहे. स. १८३८ मध्यें कलकत्ता येथें सूचिपत्र प्रसिद्ध झालें. त्यांत फोर्ट विलियम वगैरे ठिकाणच्या संस्कृत पुस्तकांची यादी छापली आहे. त्यांत पृष्ठ ५६ वर याच्या भाष्याचा निर्देश आहे.

बालकृष्ण तिमाजी हणमंते—हे भोसल्यांचे पिढीजाद नोकर होते. जिजाबाईचे गरोदरपणीं हे तिच्याजवळ शुश्रूषेसाठीं शिवनेरीवर होते.

बालकृष्ण वासुदेव हणमन्ते—याचें दुसरें नांव अबूराव. हा शाहूचा अमात्य होता. याचा पुत्र जगजीवन.

बालचंद्रसूरि—(१४ वें शतक) हा गुजराथेंतील मोधेरक गांवचा राहणारा असून याचें मूळ नांव मुंजाल असें होतें. यानें हरीभद्रसूरीकडून धर्मोपदेश व जैनधर्माची दीक्षा घेतली. याच्या बापाचें नांव धरादेव व आईचें नांव विद्युत् असें होतें. हा हरिभद्रसूरीच्या मागून त्याच्या गादीवर बसला. याच्या गुरूचें नांव पद्मादित्य असून यानें करुणवज्रायुध, वसंत विलास व असदाच्या विवेकमंजरी आणि उपदेशकंदलीवरील टीका हे ग्रंथ लिहिले.

बालमती—(उदयसिंह राठोड पाहा).

बालसरस्वती—(स. १०५० नंतर) हा नन्नयाचा शिष्य व राजेंद्राचा पुत्र. एक तेलगू कवि. जात ब्राह्मण. यानें आंध्रकौमुदीवर आंध्रसभा नांवाची उत्तम टीका लिहिली आहे.

बालहर्ष कलचुरि—(स. ९१० सुमार) एक राजा. हा मुग्धतुंगाच्यानंतर गादीवर आला.

बालीलखान—(स. १६०० सुमार) विजापूरच्या दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाचा सेनापति.

बालेचुरो—हा आंध्रभृत्य घराण्यांतील पुलुमायीचा सुभेदार. हा पुलुमायीनें जिंकलेल्या दक्षिण प्रदेशावर राज्य करीत असे. यालाच विलीवायकुर नांवानें उल्लेखिलेलें आहे (भांडारकर, पा. ३७).

बाहड—(स. ११४२ सुमार) हा अनहिलपट्टणच्या सोळंखी घराण्यांतील सिद्धराज जयसिंहाचा दत्तक पुत्र. सिद्धराजाचा जांवई सपादलक्षाचा म्हणजे अजमीरचा अर्णवराज यानें याला गादीवर बसविण्याची खटपट केली. परंतु पुढें झालेल्या लढाईत अर्णवाचा पराभव झाला असावा. कारण पुढें दोघांत संधि होऊन हा अर्णवाच्या आश्रयास गेला. विजयी झालेल्या कुमारपालानें अर्णवाला आपली देवलदेवी नांवाची बहीण दिली.

स्तंबतीर्थाचा (खंबायत) सरदार उदयन याचा हा मुलगा. याचा वाग्भट नांवाचा एक भाऊ होता. वाग्भट हा कुमारपालाचा मंत्री होता; पण हा मात्र त्याच्या विरुद्ध असे.

२. 'वाग्भटालंकार' कर्त्या वाग्भटाचें प्राकृतांतील नांव.

बाहमनी घराणें—(राजधानी गुलबर्गा. आठव्या पासून बेदर.) १ अलाउद्दीन-हसन (गंगू बहामनी) (स. १३४७-५८), २ मुहंमद १ ला (२ फेब्रुवारी १३५८-२१ एप्रिल १३७५), ३ मुजहीद (२१ एप्रिल १३७५-१६ एप्रिल १३७८), ४ दाऊद (स. १३७८ मारला गेला), ५ महमूद १ ला (स. १३७८-१३९७), ६ घियासुद्दीन (स. १३९७ खून), ७ शम्सुद्दीन (स. १३९७ पदच्युत), ८ फीरूज (स. १३९७-१४२२), ९ अहमद १ ला (स. १४२२-३५), १० अलाउद्दीन २ रा (स. १४३५-१४५८), ११ हूमायून (स. १४५८-६१), १२ निजाम (स. १४६१-६३), १३ मुहमद २ रा (स. १४६३-१४८२), १४ महमूद २ रा (स. १४८२-१५१८), १५ अहमद २ रा (स. १५१८-२१), १६ अलाउद्दीन ३ रा (स. १५२१-२३ खून), १७ वली-उल्ला (स. १५२३-१५२५), १८ कलीमुल्ला (स. १५२५-१५२७).

बाहुक धवल—(स. ८७५ सुमार) सोरठ येथें राज्य करणाऱ्या सोलंकी घराण्यांपैकीं राजेन्द्राचा पुत्र. यानें धर्म नांवाच्या राजाचा नाश केला. हा पालवंशांतील धर्मपाल असावा. राजाधिराज व परमेश्वर अशीं उपपदें धारण करणाऱ्यांना यानें जिंकलें. तसेंच कर्नाटकच्या सैन्याचा पराजय केला. त्या वेळीं कर्नाटकावर राठोडांचें राज्य होतें. याचा पुत्र अवनिवर्मा.

बाहुबली—प्रथमतीर्थंकर ऋषभनाथाचा हा पुत्र. याचाच प्रचंड पुतळा चामुंडरायानें श्रवणबेळगोळा येथें गोमटेश्वर या नांवानें बसविला.

बाळंभट्ट पायगुंडे—(स. १७३०–१८२०) बालकृष्ण हा वैद्यनाथ आणि लक्ष्मीबाई यांचा मुलगा होय. याचा उपाकृतितत्त्व, हाहि ग्रंथ प्रसिद्ध आहे. याशिवाय यानें धर्मशास्त्रसंग्रह, जीवत्पितृकर्तव्यनिर्णय असे ग्रंथ लिहिले आहेत. बालकृष्णानेंच बालम्भट्टी ही मिताक्षरेवरील टीका लिहिली आणि आपल्या आईचें शांतवन करण्याकरितां त्यानें ती आपल्या आईच्या नांवानें प्रसिद्ध केली असा उल्लेख आलेला आहे.

बाळा बहिरु—(स. १७६१–१७८५) सुप्रसिद्ध साताप्पा शिलारखान्याचा हा दुसरा मुलगा होय. याचें मूळ नांव बाळा असून बाळा बहिरु असें जोड नांव पडण्याचें कारण बहिरु रंगारी, बाळाच्या बैठकीला नेहमींचा जिगर दोस्त असे. बाळानें लावणी करावी व ती बहिरूनें म्हणावी किंवा बहिरूची लावणी बाळानें म्हणावी अशा या दोघांच्या दाट स्नेहामुळें त्यांच्या तमाशाचें नांव बाळाबहिरूचा तमाशा असेंच पडलें म्हणून हे स्वतःच तसें जोडनांव लावूं लागले. बाळाबहिरूचा स्वतंत्र असा लावण्यांचा संग्रह प्रसिद्ध नाहीं. परंतु साताप्पाप्रमाणेंच बाळाबहिरुच्याहि कांहीं लावण्या होनाजीच्या नांवावर शाळिग्रामांनीं छापल्या आहेत. ' आस्त्री प्रलयंगता तुझी ग बुध नाहीं कामाची ' ही सुप्रसिद्ध उत्कृष्ट लावणी बाळाबहिरूचीच आहे. त्या लावणींत वर्णिलेल्या कर्नाटकच्या स्वारीच्या प्रसंगावरून थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीपासून बाळाबहिरूचा फड पुण्यांत गाजत असावासा दिसतो. याच्या फडाचे व सगनभाऊच्या फडाचे साम्ने त्या वेळींहि होत असावेसें दिसतें. एका लावणीच्या शेवटीं सगनभाऊ म्हणतो कीं, ' फोडिलें रंगाच्याचें मडकें ' तें बहुधा या बहिरु रंगाच्यास अनुलक्षून असावें.

बाळाबहिरूचा पोवाडा असा एकच उपलब्ध आहे व तो नानाफडणिसाचा होय. आजतागायत गोंधळ्यांच्या तोंडांत जे पोवाडे शिल्लक राहिले आहेत त्यांपैकीं हमखास नेहमीं म्हटल्या जाणाऱ्यांपैकीं तो आहे. त्या पोवाड्यावरून उघड असें दिसतें कीं, सवाईमाधवरावाची जवळजवळ सर्व कारकीर्द बाळाबहिरूनें पाहिली होती व तेथपर्यंत कवनें करण्याचा याचा उद्योग सुरू असावा (ऐतिहासिक पोवाडे, य. न. केळकर कृत, प्रस्तावना, पृ. ८०–८१). याची समाधि सासवड येथें आहे.

बाळाजी अंगाजी—(ग्रंथकाल स. १७६७) यानें ' विवेकसार ' नांवाच्या एका संस्कृत ग्रंथाचें मराठींत भाषान्तर केलेलें आहे. संस्कृत ग्रंथाचा मूळ कर्ता श्री. वासुदेव यतींद्र हा होता. या ग्रंथाचें तैलंग भाषेंत भाषांतर केलेलें आहे (मं. त्रै. व. ११.२ ले. १९).

बाळाजी आवजी चिटणवीस—(स. १६४८–१६८१) याचे वडील आबाजी हरी सुजुमदार, उपनांव चित्रे. याच्या वडिलांस पोत्यांत घालून समुद्रांत फेंकून दिलें, व ह्याला लहानपणीं गुलाम म्हणून विकावा अशी आज्ञा करण्यांत आली. पण मामांनीं ह्याचें पालनपोषण केलें.

पुढें वयांत आल्यानंतर त्यांना अज्ञातवासाचा कंटाळा वाटूं लागला. याच सुमारास (स. १६४८) शिवाजीनें राजापुराकडे मोहीम करण्याचें ठरविलें. तें ऐकून तेथील कसबेदारांनीं जीं कांहीं सामोपचाराचीं पत्रें पाठविलीं त्यांतच बाळाजीनीं शिवाजीला एक गौरवपर पत्र लिहून आपला मनोदय कळविला. याचें लेखनकौशल्य पाहून शिवाजी यास घेऊन गेला, व पुढें ता. १६ आगष्ट स. १६६२ रोजीं यास चिटणीशी दिली.

बाळाजीवर जशी मुख्य राजकीय दप्तराची जबाबदारी होती तसेंच याच्यावर नेहमीं नाजूक वकिलातींचींहि कामें करण्याची विशेष प्रसंगीं जबाबदारी येई व तीं हा नेहमींच सफाईनें पार पाडी.

बाळाजीला १३ आक्टोबर १६७३ रोजीं पालखीचा सन्मान मिळाला. बाळाजीची लेखनशैली इतकी साधी, स्पष्ट व पूर्ण असे कीं त्यामुळें राजकीय हुकुमांत कधींहि घोटाळा उडत नसे. हा दूरदर्शी व चाणाक्ष होता. पण पुढें याला कलुशा दादजी रघुनाथ यांनीं खोडसाटपणानें गुंतवून संभाजीस खोटेंच सांगून याला मारण्याचें अर्धवट आज्ञा घेतली. व बाळाजी याचा भाऊ चिमणाजी यास परळीखालीं स. १६८१ च्या आगष्टांत ठार मारले. बाळाजीची स्मृति फारच तीव्र होती. हा राजकारणांत फारच दक्ष असे.

बाळाजी गोविंद खेर—(स. १७७८ सुमार) हा एक पेशवाईतील सरदार होय. बुंदेलखंडांतील गोविंद-

पंत बुंदेल्याचा मुलगा असून याला गंगाधर नांवाचा एक भाऊ होता. हा व याचा भाऊ गंगाधर हे आपापसांत भांडत असल्यामुळें बुंदेले राजे चंदेल झाले; त्यांस विसाजी कृष्णानें नरम करून ताळ्यावर आणलें. यानें स. १७७८ मध्यें इंग्रजी फौज पुण्यावर चाल करून येत असतां ती फौज काल्पीवरच अडवून धरिली, व काल्पी-सुद्धां आपला सर्व प्रदेश हस्तगत केला.

बाळाजी जनार्दन जामगांवकर (जांबगांवकर)—हा महादजीचा एक कारकून होय. जेव्हां महादजीनें नवीन ताज्या दमाची कांहीं फौज जामगांवाहून तयार करून मागितली, तेव्हां यानें मोठी शिताफी करून फौज जमा करून ताबडतोब रवाना केली (स. १७८८च्या आरंभीं).

बाळाजी नाईक भिडे—(स. १७८० सुमार) पेशवाईतील हा पुण्यांतला प्रसिद्ध सावकार होय. फत्तेसिंग गायकवाडास जेव्हां पेशव्यांचें देणें फार झालें तेव्हां हा पेशव्यांकडे फत्तेसिंगास जामीन राहून एक प्रकारें त्याच्या वकिलाचेंहि काम पुण्यास करी.

बाळाजीपंत ठोसर—(मृत्यु स. १७९०) हा नाना फडणविसाचे विश्वासांतला असून सवाई माधवराव पेशव्यांचे पदरीं होता.

बाळाजीपंत दामले—हा पेशव्यांचा एक सरदार होय.

बाळाजीपंत महादेव भानु—(मृत्यु स. १७१९) हा बाळाजी विश्वनाथाबरोबर देशावर आला. बाळाजीस पेशवेपद मिळाल्यावर त्यानें यास शाहूकडून फडणीसी देवविली (स. १७१३). दिल्लीस जाण्याच्या कारस्थानांत बाळाजीनें यास आपल्याबरोबर घेतलें.

दिल्लींत ता. २८-२-१७१९ रोजीं अमीनखानाशीं मराठ्यांची मारामारी झाली तींत १५०० मराठे कापले गेले, त्यांत संताजी भोसले व हा हे दोघेजण मृत्यु पावले. याच्या कुटुंबास इनामें दिलीं. याचा पुत्र जनार्दन व नातू नाना फडणीस होय.

हा चौथाईच्या सनदा घेऊन पेशव्याचे पालखींत बसून जात असतां दिल्लीतील लोकांनीं याला मारलें, ही आख्यायिका खरी नाहीं. मात्र मराठे सनदा घेऊन जातात हा प्रकार त्या लोकांस आवडला नाहीं ही गोष्ट खरी.

बाळाजी बाजीराव (ऊर्फ नानासाहेब) पेशवे—(जन्म स. १७२१ डिसें. ८, पेशवेपद स. १७४० जून २५, मृ. स. १७६१ जून २३) हा थोरल्या बाजीरावाचा पुत्र होय. याचा जन्म स्थल मौजे सातें (नाणेमावळ) येथें झाला, व मुंज स. १७२८ च्या जानेवारींत झाली, आणि स. १७३० च्या जानेवारींत गोपिकाबाईशीं लग्न झालें.

स. १७३९ त शाहूनें मिरजेवर स्वारी केली, तींत हा होता. ही याची पहिलीच खेप असावी. तेथून पुण्यास परत आल्यावर मस्तानीचें प्रकरण विकोपास गेलें, व चुलत्या (आपा) पुतण्यांनीं बाजीराव-मस्तानीची ताटातूट केली. बापलेकांचें पटत नसे. शेवटीं बाजीराव उत्तरेस गेला व तिकडेच वारला (स. १७४० एप्रिल). तेव्हां नानासाहेब कुलाब्यास मानाजी आंग्र्याच्या मदतीस आपासह गेला होता. हा तेथें क्रिया वगैरे करून, पुण्यास आला व आपासह साताऱ्यास गेला (जून); तेथें याला १२ दिवसांनीं पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं (२५ जून १७४०). पुढें लवकरच चिमाजी आपा वारला (डिसेंबर १७४०). याच सुमारास शाहूच्या पश्चात् कोल्हापूरकर संभाजीस सातारच्या गादीवर बसविण्याचा करार संभाजी व नानासाहेब यांच्यांत झाला होता, पण तो सिद्धीस गेला नाहीं.

यानें २१ वर्षें कारभार केला, त्यांत शाहूच्या मृत्यूपर्यंतच्या काळांत (स.१७४९) पेशवे केवळ छत्रपतींचे हस्तक होते, मात्र पुढील काळांत सर्वतोपरी राज्याचे मुखत्यार झाले. त्यांत पहिलीं तीन वर्षें (स.१७५०-५२) रामराजाशीं मिळतें घेण्यांत गेलीं, परंतु तें जमलें नाहीं म्हणून पुढील ९ वर्षें सर्व भार पेशव्यानें आपल्यावर घेतला. शाहूच्या हयातीपर्यंत यानें सुरंजभेलसें (स.१७४०-४१), माळवा, प्रयाग, बंगाल (स. १७४२-४३), भेलसें (स. १७४४-४५), कर्नाटक पहिली लढाई (स. १७४६-४७), नेवाई (स. १७४७-४८) इतक्या स्वाऱ्या केल्या.

हा कारभार होण्यापूर्वी बाबूजी नाईक हा कर्नाटकाच्या सुभेदारीहून अपेशी ठरून आल्यानें व तो, रघूजी भोसले, शाहूची थोरली राणी, मुतालिक, दाभाडे, गायकवाड वगैरे मंडळी याच्याविरुद्ध मसलती करीत असल्यानें, पेशव्यानें त्या मसलती वारून, नाईकाची समजूत पाडून व कर्नाटकावर सदाशिवरावभाऊ यांस पाठवून तिकडील सर्व बंदोबस्त केला व पोर्तुगीजांनीं वसई ते गोवें या दरम्यान ज्या किरकोळ घालमेली केल्या त्यांचाहि बंदोबस्त केला (स. १७४७). याच सालच्या पहिल्या दोनतीन महिन्यांत वर सांगितलेल्या विरुद्ध पक्षाच्या कारवाईनें व स्वतःच्या कर्जाच्या चिंतेनें शाहूनें नानासाहेबांस पेशवाईपदावरून दूर केलें होतें, परंतु विरुद्ध पक्षांतील याच्याइतका कर्तबगारीचा एकहि माणूस पुढें न आल्यानें पुन्हां नानासाहेबांना पेशवाईचीं वस्त्रें दिलीं

(एप्रिल स. १७४७). याच सुमारास भाऊसाहेब कर्नाटकच्या स्वारीतून परत आला. नंतर थोड्याच दिवसांनीं शाहूची प्रकृति बिघडल्यानें मोठी फौज घेऊन हा साताऱ्यास आला (आगस्ट स. १७४९) व शाहूचा अंत होऊन रामराजास गादीवर बसवून मग परत पुण्यास आला (एप्रिल स. १७५०). शाहूनें यास लिहिलेल्या २ याद्या म्हणजे मराठी साम्राज्याच्या सूत्रचालकत्वाच्या सनदाच होत.

रामराजाच्या राज्यारोहणापासून पानपतापर्यंत (स.१७५०-६१) अकरा वर्षांत मराठी राज्याचें चालकत्व पेशव्यांकडे होतें. ब्राह्मण व मराठे सरदारांनीं याच मुदतींत निकराचा उद्योग केला. तंजावर ते दिल्ली व अटक ते कलकत्ता पावेतों सर्व हिंदुस्थानाला मराठ्यांनीं याच कालांत आटोप घातला. नानासाहेबानें प्रथम दोनतीन वर्षांत आपल्या विरोधी पक्षाचा बंदोबस्त करून, नंतर राज्यकारभाराचें मुख्य ठिकाण पुण्यास केलें.

शाहूच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत ताराबाई पेशव्यावर रुसून सिंहगडास गेली व खटपटी करूं लागली, परंतु पेशव्यानें तिची समजूत काढली व सिंहगड सांचवांकडून स्वतःकडे घेतला (जुलै १७५०). आणि रघुजी प्रतिनिधी वगैरे सरदारांची व त्यांच्या प्रांताची स्वतंत्र व्यवस्था करून दिली. प्रतिनिधीनें सांगोल्यास पेशव्यांविरुद्ध लढाई दिली होती, पण तींत त्याचाच पराभव झाला (आक्टोबर). सांगोल्यास सदाशिवराव भाऊनें रामराजापासून राज्यव्यवस्थेची जी योजना करून घेतली, तीमुळें नानासाहेबांच्या मनांत भाऊबद्दल विकल्प आला व त्यास रामचंद्र बाबानें भर दिली. परंतु नानासाहेबांनीं पडतें घेऊन व भाऊस कारभारी नेमून हें घरभांडण मिटविलें.

इकडे ताराबाईनें पेशव्यांविरुद्ध मोठें कारस्थान उभारलें व प्रतिनिधी, नाईक वगैरेंकडून राज्यांत बखेडा माजविला. दमाजी गायकवाडानें तर पुण्यापर्यंत चालून येऊन (पुणें सोडून) साताऱ्यास कूच केलें. तेथें मात्र नाना पुरंदऱ्यानें गेंड्याच्या माळावर त्याचा पराभव केला. पुढें पेशव्यानें त्याला कैदेंत ठेवून त्याच्याकडून निम्मी गुजराथ आपल्या नांवाची करून व त्यानें आपल्या हातांखालीं वागण्याचें कबूल केल्यावर त्याला सोडलें (स. १७५२).

स. १७५१ मध्यें यानें निजामाचा कुकडीवर (घोडनदी येथें) पराभव केला. याच वेळीं गाजिउद्दीनास मदत करून त्याच्या मोबदल्यांत तापी-गोदा-दुआब पेशव्यानें मिळविला, परंतु त्याच वेळीं गाजीचा खून झाल्यानें सर्व निजामशाही स्वतःच्या आटोक्यांत आण-ण्याची पेशव्याची संधि फुकट गेली (आक्टोबर १७५२). तरी पण सलाबतजंगाकडून वरील दुआब आपल्याकडे लिहून घेतला. या तहास भालकीचा तह म्हणतात. याच प्रसंगीं नानासाहेबानें " आम्हीं गनीम लोक शिवाजीमहाराजांचे शिष्य आहों. " असे बाणेदार उद्गार काढले आहेत. पुढें ४।५ वर्षें निजामाचा व पेशव्यांचा सलोखा होता. याच वेळीं दिल्लीचा बादशहा दुसरा आलमगीर यानें, मुखत्यारीनें आपलें व बादशाहीचें संरक्षण करावें आणि त्याकरितां सैन्य ठेवावें व खर्चास चौथाई द्यावी असा मराठ्यांशीं करार केला (स. १७५४ आक्टो. १४). पण ही गोष्ट यापूर्वी दोन वर्षें झाली असें आतां ठरलें आहे (स. १७५२ मे).

सावनूरच्या लढाईंत निजामानें पेशव्यांस मदत केली होती, पण पुढें त्यांचें याच्याशीं फाटत चाललें. पेशव्यानें शिवनेरी काबीज केली (१७५७ मे). हा किल्ला पुष्कळ वर्षें मोगलांच्या ताब्यांत होता व तो मिळविण्याची खटपट बाळाजी विश्वनाथापासून चालली होती. तत्पूर्वी निजामानें पेशव्यांस कबूल केलेली २५ लक्षांची जहागीर न दिल्यानें सिंदखेडास उभयतांत लढाई झाली (१७५७ आगष्ट १७५८ जाने.). या लढाईंत १६ वर्षांचा विश्वासराव हा मुख्य होता, व त्याला संभाळण्यास दत्ताजी शिंद होता; आणि मागून खुद्द नानासाहेब व भाऊ हे पाठपुरावा करीत होते. दक्षिण मोकळी करणें हें एक धोरण नानासाहेबाचें होतें. त्यामुळेंच ही लढाई मुख्यत्वें झाली. लढाईंत निजामाचा पराभव होऊन २५ लक्षांची जहागीर व नळदुर्ग मराठ्यांस मिळाला. सिंदखेडच्या लढाईंत इब्राहिमखान गारद्याचा पराक्रम पेशव्यानें पाहिल्यामुळें त्याला आपल्या पदरीं ठेविलें (स. १७५९).

पुढें इंग्रजांचा जम कर्नाटकांत बसूं लागलेला पाहून निजामानें प्रथम फ्रेंचांशीं व नंतर इंग्रजांशीं सख्य जोडलें, हें पेशव्यांस खपलें नाहीं; निजाम हा आपल्या हातांतील बाहुलें बनावा अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळें त्याला कायमचा गाडण्यास पेशव्यानें स. १७५९ त प्रारंभ केला. याच वेळीं नगर व दौलताबाद हे किल्ले यानें मसलतीनें मिळविले. कबूल केलेली दहा लाखांची जहागीर व नगर-परांडा किल्ले देत नाहीं म्हणून निजामावर ही स्वारी आहे असें प्रसिद्ध केलें. निजामाची लढाईची तयारी चांगली नव्हती, उलट पेशव्यांची उत्कृष्ट होती. शिवाय इब्राहिमखानाचीं पलटणें नुकतींच पदरीं ठेवलीं होतीं. दादा, भाऊ व विश्वासराव या तिघांनीं या लढाईंत भाग घेऊन निजामाचा पराभव करून साठ लक्षांचा प्रांत व अशा-

गड वगैरे किल्ले घेतले आणि निजामास बहुतेक संपुष्टांत आणलें (जाने. मार्च १७६० उदगीर). वास्तविक यानें उत्तरेपेक्षां दाक्षिणेकडेच जास्त लक्ष घातलें होतें. त्यामुळें कांहीं लेखक याला दोषहि देतात.

भालकीच्या (स. १७५२) तहानंतर हा धारवाड, रायचूर, श्रीरंगपट्टण इकडे गेला व खंडण्या वसूल करून परत फिरला (१७५३ जून). यानंतर यानें बहुतेक दरवर्षी स्वाऱ्या केल्या. दुसरी स्वारी बागलकोट ते हरिहर (१७५४ जून), तिसरी बेदनूरची (१७५५ एप्रिल), चवथी सावनूरची (१७५६ जुलै), पांचवी श्रीरंगपट्टणची (१७५७ जून), सहावी मेहेंदळ्याची (१७५८), सातवी पटवर्धन–रास्त्यांची (१७५९) व आठवी पटवर्धन–बिनिवाल्यांची (१७६०). पहिल्या ५ स्वाऱ्यांत स्वतः नानासाहेब हजर होता.

यामुळें मराठी राज्याची हद्द कृष्णेपासून तुंगभद्रेपर्यंत पुढें सरकली. रघूजी भोसला बंगाल सर करीत असतां यानें बादशाहाच्या वतीनें त्याच्याशीं युद्ध पुकारून आपसांत दुही उभी केली.

नंतर मानाजी व तुळाजी आंग्रे-प्रकरणांत इंग्रजांस घरांत घेण्याची याची अक्षम्य चूक झाली (स.१७५५–५६).

स. १७५८–५९ च्या सुमारास पेशव्यांची सत्ता कळसास पोहोंचून ते आतां हिंदुस्थानांत सार्वभौम सत्ता स्थापणार असें दिसतांच याच्याशीं गोडी राखण्याकरितां इंग्रजांनीं आपला वकील पुण्यास पाठविला होता.

भाऊसाहेब पानपतकडे गेल्यानंतर दसरा झाल्यावर नानासाहेब निजामावर नजर ठेवण्यासाठीं नगरच्या बाजूस आले (डिसेंबर स. १७६०). भाऊसाहेबांचें शेवटचें पत्र (१४ नाव्हेंबरचे) पेशव्यास मिळालें. एका पत्रांत विश्वासरावानें ४० हजार फौज व १ कोटी रु. पैका तावडतोब मागतला, तेव्हां महादोबा पुरंदऱ्यानें पेशव्याला तावडतोब निघण्यास सांगतलें. पण पानपतसारख्या प्रकरणाकडे याला लक्ष द्यावेंसें वाटलें नाहीं (पे.द.२.१३३).या सुमारास यानें पैठणच्या बाखरे या देशस्थ सावकाराच्या मुलीशीं लग्न लावलें (डिसेंबर), आणि हा उत्तरेकडे निघाला. पानपतच्या पराभवाची बातमी आल्यावरहि आणखी लग्न करण्याचा याचा विचार होता (रा. खं. ३. २१२). भेलश्यास यास पानपतच्या पराजयाची बातमी कळली (२४ जाने. १७६१) व पुढें जास्त जास्त हकीकत समजत गेली; त्यामुळें याचा धीर खचला शेवटीं मल्हारजी होळकर भेटला व खरें वर्तमान समजलें. जर नानासाहेब पुढें जाता, तर अब्दालीचा पराभव झाला असता, पण हा परत फिरला (२२ मार्च).

यानें भाऊचा फार ध्यास घेतल्यानें मधून मधून याला भ्रमाचे झटके येऊं लागले. जूनच्या आरंभीं हा पुण्यास आला. शिंदे, होळकर, पवार वगैरेंनीं युद्धांत कुचराई केली, म्हणून त्यांचे महाल जप्त करून त्यांस ठपकाहि दिला (पे. द. २. १४३). याची प्रकृति दिवसेंदिवस क्षीण झाली, पुत्रशोक व बंधुशोक जबर झाला. हवा–फेरासाठीं स्वारी पर्वतीस गेली (१८ जून), परंतु उतार न पडतां २३ तारखेस दीड प्रहर रात्रीं याचें देहावसान झालें. लकडीपुलाजवळ सार्थक केलें व तेथें वृंदावन बांधलें.

व्यापार, धंदे वगैरे धनोत्पादनाच्या बाबीकडे या पेशव्याचें लक्ष नव्हतें. यानें पर्वतीवर देवदेवेश्वराचें देऊळ बांधलें. तसेंच पर्वतीचें तळें बांधलें व पुणें शहराच्या नवीन पेठा वगैरे वसवून वस्ती वाढविली. सारांश, पेशवाईचा माध्यान्हकाळ म्हणजे नानासाहेबाची कारकीर्द होय. हा उत्तम संस्कृतज्ञ, कलमबहादर, धोरणी व अत्यंत हिशेबी होता. हा कोठेंहि असला तरी सर्व ठिकाणचे व्यवहार स्वतः उलगडीत असे. श्रीरंगपट्टणास राहून दिल्लीचा, तर बुंदेलखंडांतून कर्नाटकाचा हा कारभार करी. बापाच्या वेळेच्या अर्धवट कामांची तड लावण्यांत याचीं पहिलीं ३।४ वर्षे गेलीं. उत्तरेकडील आपलें वर्चस्व हलूं नये म्हणून यानें तिकडे लागोपाठ तीन स्वाऱ्या केल्या व शत्रुमित्रांवर छाप बसाविली. याचा मुक्काम ३।४ दिवसांवर कोठेंच होत नसे, इतकी याची तडफ होती. स्वभावतः याचा कल तडजोडीचा असे, परंतु प्रसंगीं कडकपणाहि हा धरी. बाबूजी नाईक, रामचंद्र बाबा शेणवी, महादोबा पुरंदरे, रघुजी भोसले, दमाजी गायकवाड वगैरे बरेच लोक चुरशीनें अथवा घमेंडीनें याशीं विरोध करीत, परंतु यानें सर्वांना ताब्यांत आणलें होतें. याचे विरोधी शाहूजवळ याच्या चहाड्या सांगत, शाहूच्या राज्यांत कलह चाले, या सर्व गोष्टींकडेहि याला लक्ष देऊन उपाय करावे लागत. त्यासाठीं यानें भाऊसाहेब व दादासाहेब यांना साताऱ्यास ठेविलें होतें.

बाळाजी विश्वनाथ पेशवे—(जन्म स. १६६०-मृत्यु स. १७२० एप्रिल) याचा बाप विश्वनाथ व आजा शिवाजी ऊर्फ परशुराम हे दोघे शिवछत्रपतींचे नोकर असल्याचें उपलब्ध झालें आहे. श्रीवर्धनवर हबशांचा अंमल होता. भटांवर हबशांचा कांहीं कारणामुळें क्रोध झाल्यानें स. १६७० च्या सुमारास त्यांची देशमुखी जप्त झाली.

तेव्हां हा तेथून निघून दाभोळ, चिपळूणकडे गेला. तिकडेच याचें पहिलें लग्न झालें.

स. १६७९ मध्यें बाळाजी आपल्या राधाबाई नामक पत्नीसह देशावर आला. राधाबाई याची दुसरी बायको होय. ही डुबेरकर बवें घराण्यांतील असून तिला बाजीराव, चिमाजी व अनुबाई अशीं तीन अपत्यें झालीं.

बाळाजीचा थोरला भाऊ जानोजी याला जंजिऱ्याच्या सिद्द्यानें गोणत्यांत बांधून समुद्रांत बुडविल्यामुळें भीतीनें गांगरून जाऊन बाळाजी घाटावर पळून आला ही आख्यायिका आतां जानोजीच्या उपलब्ध झालेल्या स. १७०६ सालच्या हस्तलेखानें खोटी ठरली आहे.

बाळाजी प्रथम वरघाटीं सासवडास अंबाजी पुरंदऱ्याकडे आला. तेथून साताऱ्यास येऊन महादजी कृष्ण जोश्याच्या मार्फत शंकराजीपंत सचिवांकडे नोकरीस राहिला. पुढें याची हुशारी पाहून सेनापति धनाजीनें यास आपल्याकडे घेतलें. वाढत वाढत जाऊन पुणें प्रांताचा हा सरसुभेदार झाला (स. १६९९–१७०२) व नंतर दौलताबाद प्रांताचाहि सरसुभेदार झाला (१७०७ पर्यंत). भीमाकाठीं औरंगजेबाची छावणी असतां यानें बादशहाच्या कैदेंत असलेल्या शाहूची व्यवस्था बादशहाच्या मुलीकडून उत्तम ठेवविली (१६९५–९९). यावरून शाहू व बाळाजी यांचा संबंध बराच जुना होता. बहुतेक याच वेळीं शाहूची व याची शपथक्रिया होऊन पुढील गोष्टींचें सूतोवाच झालें असावें.

ब्रह्मेंद्रस्वामीनें बाळाजीस शाहूस मिळण्याचा सल्ला दिला व बाळाजीनें मागाहून धनाजीस शाहूकडे ओढलें. खेडच्या लढाईंत धनाजी जर नसता तर शाहूचें राजकारण टिकलें नसतें; त्यामुळें शाहूची मर्जी यावर बसली.

शाहूच्या राज्याभिषेकापासून धनाजीच्या मृत्यूपर्यंत (स. १७१०) यानें फारशा उलाढाली केल्या नाहींत; या काळांत हा वसुली काम पाहत असावा. धनाजीचे मृत्यूनंतर त्याचा मुलगा चंद्रसेनाची व याची चुरस होऊन चंद्रसेन ताराबाईचे पक्षास जाऊन मिळाला (ऑगस्ट १७११). या वेळीं शाहूनें चंद्रसेनाविरुद्ध बाळाजीचा पक्ष घेतला.

या सुमारास बाळाजीजवळ सारी दोन हजार फौज होती; ती अपुरी जाणून यानें जास्त फौज वाढवून राज्याचा बंदोबस्त चालविला; त्याबद्दल शाहूनें यास सेनाकर्ते ही पदवी दिली (ऑगस्ट स. १७११) व २५ लक्षांचा सरंजाम दिला.

पुढें यानें ताराबाईस हतप्रभ करण्यासाठीं धाकट्या शिवाजीस वेडा ठरवून धाकट्या संभाजीकडून ताराबाई व शिवाजीस कैदेंत टाकविलें. यामुळें ताराबाईचें महत्त्व व कारस्थानें लटकीं पडलीं व शाहूचें आसन स्थिर झालें (स. १७१२). स. १७१३ त बाळाजीनें कृष्णराव खटावकरानें ताराबाईचे वतीनें चालविलेली बंडाळी मोडली व शाहूजवळ रदबदली करून परशुरामपंतास कैदेंतून काढून पुन्हां प्रतिनिधीपद देवविलें.

हिंगणगांवच्या दमाजी थोरातानें धामधूम चालवल्यामुळें बाळाजी त्याजवर चालून गेला. परंतु दमाजीनें यास पकडून कैदेंत ठेवून फार छळलें. अखेर दंड भरून याची सुटका झाली (स. १७१३). नंतर यानें सय्यदाची मदत घेऊन ४ वर्षांनीं दमाजीचा सपशेल पराभव केला (स. १७१८); आणि सचीवास त्याचे कैदेंतून सोडविलें व त्याबद्दल त्याजकडून स्वतःसाठीं पुरंदर किल्ला मागून घेतला.

ताराबाईचा पक्ष घेऊन बंडाळी करणाऱ्या कान्होजी आंग्र्यावर शाहूनें पेशवा बहिरोपंत पिंगळे यास पाठवलें. परंतु कान्होजीनें त्याचा पराभव करून त्यास कैदेंत ठेविलें. तेव्हां बाळाजीस आंग्र्यावर धाडण्यांत आलें. यानें सामोपचारानें कान्होजीची समजूत घालून त्यास शाहूकडे वळविलें, पेशव्याची सुटका केली व लोहोगड आपल्यास मागून घेतला (स. १७१३ ऑक्टोबर). तेव्हां शाहूनें बहिरोपंतास पेशवाईचे पदावरून काढून मांजरीगांवीं बाळाजीस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं (१६ नवं. स. १७१३).

ताराबाईच्या वेळीं बादशाही मुलखांत आक्रमण करण्याचें जें धोरण सुरू झालें होतें तेंच आतां यानें पुढें चालू केलें. कारण त्याशिवाय नवीन पुढें येणाऱ्या पराक्रमी लोकांस कामाला लावणें शक्य नव्हतें.

उत्तरेंत फर्रुखसियर बादशाहा व सय्यदबंधू यांच्यांत भांडणें चालू होतीं. तेव्हां बादशहानें सय्यदांविरुद्ध मराठ्यांची मदत मागितली, तेव्हां बाळाजीच्या सांगण्यावरून दाभाडे, सोमवंशी व निंबाळकर वगैरे सरदारांनी खानदेश–गुजराथेंत धुमाकूळ माजविला. तेव्हां नाइलाजानें हुसेनअलीनें मराठ्यांशीं तह करून बादशहाविरुद्ध कारस्थानें चालविलीं (स. १७१८). या तहानें शिवाजीच्या स्वराज्याखेरीज आतांपर्यंत जिंकलेला सर्व मुलूख मराठ्यांस मिळाला, आणि चौथाई–सरदेशमुखी सर्व दक्षिणेत वसूल करण्यास सांपडली. त्यामुळें शाहूचा जम चांगला बसला. यानेंहि राज्यव्यवस्था सुरळीत लाविली. मराठ्यांचें लक्ष गृहकलहांतून काढून बाहेरच्या उद्योगांत लाविलें. बादशहाचें १५ हजार फौजेनिशीं रक्षण कर-

ण्याचें काम पेशव्यांनीं आपल्याकडे घेऊन त्याला आपल्या हातीं आणिलें. इंग्रजांची तेनाती फौज व ही योजना एकच होय. एकंदरींत या तहानें मराठी राज्यास नवें क्षेत्र व कामगिरी मिळाली.

पुढें सय्यदांचा व बादशहाचा तंटा विकोपास जाऊन त्यांनीं मराठ्यांची मदत मागितली. यानें सातारचा तह पुरा करून घेण्याचे करारावर दिल्लीस प्रयाण केलं (स. १७१८ नवंबर). बादशहा घाबरून जाऊन, हुसेन व मराठे माळव्यांत असतांनाच त्यांच्या मागण्या कबूल केल्या. परंतु तहांत कबूल केल्याप्रमाणें शाहूचीं बायकामाणसें परत मिळाल्याशिवाय मराठे मागें जाईनात. अखेर हुसेन व मराठे हे दिल्लीस गेले (स. १७१९ फेब्रु.). सय्यदांनीं मराठ्यांचे मदतीनें बादशहा फर्रुखसियर यास पदच्युत करून रफिउद्दरजत याला तख्तावर बसवलें (२८ फेब्रु.). यानंतर शाहूची मातुश्री व बायकामुलें यांना पेशव्यांच्या हवालीं केलें. तसेंच ठरल्याप्रमाणें चौथाईसरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदाहि बादशाही शिक्कामोर्तब करून हवालीं केल्या (मार्च). यानंतर हा साताऱ्यास परत आला (जुलै). दिल्लीच्या चकमकींत नागपूरकर संताजी भोसले व बाळाजीपंत भानू हे दोघे ठार झाले, त्याबद्दल यानें नुकसानभरपाई घेतली. सय्यदांपासून रोज ५० हजार रुपये खर्चास मिळत. त्यांपैकीं निम्मे शिल्लक टाकून बाळाजीनें ती सर्व शिल्लक सरकारी खजिन्यांत टाकली, व फौजेच्या देण्याचा बोभाटाहि राहूं दिला नाहीं. याप्रमाणें या दिल्लीच्या पहिल्या स्वारीपासून मराठ्यांस पुष्कळ फायदा झाला. विशेषतः दिल्लीच्या बादशाहीसहि मदत करूं शकेल अशी एक प्रबळ सत्ता दक्षिणेंत असल्याचें जाहीर झालें, आणि प्रत्येक महत्त्वाच्या राजकारणांत मराठ्यांचा प्रवेश झाला.

यानंतर बाळाजीनें राज्यकारभाराची सर्व व्यवस्था उत्तम प्रकारें लावून दिली. चौथाईवसुलीच्या मुलूखगिरीसाठीं निरनिराळे प्रदेश सरदारांना वांटून देण्यांत आले. एकानें दुसऱ्याच्या प्रांतांत जाऊं नये असें ठरविलें. साहोत्रा, नाडगौडा वगैरे बाबी निरनिराळ्या म्हणजे प्रत्येक सरदाराच्या प्रांतांत येत असल्यानें एकमेकांवर एकमेकांचा दाब राही, परंतु पुढें या पद्धतीस सरंजामी व पिढीजात स्वरूप येऊन तिचा मध्यवर्ती सत्तेवर वाईट परिणाम झाला. मात्र या पद्धतीनें मराठ्यांच्या राज्याचा सर्वत्र झपाट्यानें प्रसार झाला. उलट पेशव्यांच्या या व्यवस्थेनें शिवाजीची अष्टप्रधानांची राज्यपद्धति नष्ट होऊन तिला एकमुखी स्वरूप आलें. ही एकमुखी पद्धति तिच्या कर्त्याच्या गुणदोषांप्रमाणें चांगली-वाईट असूं शकते. राष्ट्र वर्धिष्णु व्हावयास लागलें म्हणजे जी एक प्रकारची धडाडीची व जोराची उचल करावयाची असते, तींच या पद्धतीनें बाळाजीनें व पुढील पेशव्यांनीं केली होती, आणि तींस मोगलपक्षपाती लोकांचा विरोध होऊं नये म्हणून बादशाही परवानगी मिळविली होती.

बाळाजीनें राज्यकारभाराची शिस्त बसविल्यावर एकदां इस्लामपुराकडे स्वारी केली (नोव्हेंबर). पुढल्या साली थोरल्या बाजीरावाचें लग्न केल्यावर (मार्च स. १७२०) एकाएकीं याचें सासवड येथें देहावसान झालें (१ एप्रिल). हल्लीं तेथें याचें वृंदावन आहे.

बाळाजी हरी (मज्यालसी) मेंडजोगी—शहाजीनें शिवाजीबरोबर दिलेल्या विश्वासूक माणसांपैकीं एक. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. गोत्र कौशिक. हा चांदवड (जि. नाशिक) येथील आपल्या वतनी चिटणिशीवर गुमास्ता ठेवून रोजगारानिमित्त शहाजीबरोबर कर्नाटकांत गेला; आणि तेथें शहाजीचा विश्वास संपादून शिवाजीबरोबर पुण्यास आला. जेधे करिन्यांत यास मज्यालसी म्हटलें आहे. इकडे आल्यावर यानें पुणें प्रांतांतील वडगांव, नेबरज, कोंढीत, चांदखेड, पिरगुट इत्यादि अकरा गांवचें कुलकर्ण संपादिलें. पुणें शहरांतील पेठ मलकापूर ऊर्फ रविवारचें कुलकर्णहि यानें मिळविलें. पुण्यांत कासारविहिरीजवळ याचे वाडे होते. याच्या हयातींतच याचा मुलगा रघुनाथ बल्लाळ हा पायदळाचा सबनीस झाला होता. याचा दुसरा मुलगा नरहरपंत याजकडे शिवाजीमहाराजांनीं स्वाराची बक्षीगिरी सांगितली ती त्याच्या वंशजाकडे सातारचें राज्य जाईतों कायम होती (म. मं. बखर). याचा वंशवृक्ष दिलेला आहे (मं. त्रै. ८. १-२, पृ. १००-१०१).

बाळाबाई शितोळे—(लग्न स. १७७६) ही प्रसिद्ध महादजी शिंदे यांची मुलगी होय. हिच्या आईचें नांव पार्वतीबाई असून ही लाडोजी देशमुख ऊर्फ नरसिंहराव शितोळे याची बायको होती. हें लग्न स. १७७६ त झालें. हिला दोन मुलगे असून त्यांचीं नांवें अनुक्रमें सिधोजी व लक्ष्मण अशीं होतीं. शिवाय हिला तीन मुली होत्या. महादजीच्या पश्चात् हिच्या घरांत भाईबंदीचे तंटे सुरू झाले. त्याच्या निरसनासाठीं हिनें नानास पितृतुल्य भावनेनें लिहिलेलीं पत्रें उपलब्ध आहेत.

बाळाराम कौशारामशेट आगरवाले—(खून स. १८१५) हा यशवंतराव होळकराचा मदतनीस असून त्यास प्रत्येक मोहिमेंत हा मदत करीत असे. हा शूर व

धाडशी होता. हा यशवंतरावाच्या मरणसमयीं त्याच्याजवळ होता. पुढें यशवंतराव मरण पावल्यावर कांहीं दिवसांनीं मैनाबाई व तात्या आळेकर यांच्या हातांतील कारभार यानें व तुळसाबाईनीं हिसकून घतला. स. १८०५ त यशवंतरावाचा व इंग्रजांचा तह यानें घडवून आणला. तेव्हांपासून यशवंतरावाची मर्जी याजवर फार बसली. यानें हातांत घेतलेला कारभार सुरळीत चालविला. हा सर्व पक्षांना प्रिय होता. पुढें तुळसाबाईनेंच स. १८१५ त याचा खून करविला (म. रि. उ. वि. ३, पृ. ३९५-४०७).

बाळाराव गोविंद—(स. १७०० नंतर) महादजी शिंद्याचा हा एक कारभारी होता. भाऊसाहेबांच्या (सदाशिवरावभाऊ) तोतयाचें पारिपत्य करण्याकरितां याला महादजीनें फौज बरोबर देऊन कोंकणांत पाठविलें होतें. पुढें महादजी शिंद्यावर कारभाऱ्यांची इतराजी झाली होती, सबब त्यांची समजूत करण्याकरितां त्यानें आपला वकील बाळाराव गोविंद यास पुण्यास पाठविलें (म. रि. उ. वि. १ ला, पृ. १३). नंतर हा तुकोजीच्या व अहिल्याबाईच्या समजुतीसाठीं इंदुरास स. १७८० च्या सप्टेंबरांत गेला. तुकोजीस भेटून पुढें महेश्वरास बाईजवळ दीड महिना राहून परत उज्जनीस गेला.

बाळाराव गोविंद हा पुष्कळ दिवस महादजीचा कारभारी व सल्लागार असून मोठ्या नेकीनें काम करणारा हुशार असा गणला जात असे. याचें नांव मराठी कागदांत ठिकठिकाणीं आलें आहे, यास प्रचारांत रावजी असें म्हणत. प्रथम याचा वडील बंधु चिमणाजी गोविंद यास पेशव्यांनीं पाटण (राजपुताना) येथें कमाविसदार नेमलें; त्याच वेळीं लालाजी बळाळास कोठ्यास नेमिलें. बाळाजी जनार्दन म्हणून जांबगांवास महादजीचा कारभारी होता, त्यास हा बाळाराव गोविंद 'चिरं. बाळोबा' असें लिहितो, अर्थात् तो याचा आप्त असावा. त्याची वडील बहीण बाळाराव गोविंदास दिलेली असावी, असें पत्रव्यवहारांत नजरेस येतें (म. रि. उत्तर वि. २, पृ. १४, ४४४).

बाळीबाई ऊर्फ दीपाबाई—ही शिवाजीची मुलगी होती. हिच्या आईचें नांव सोयराबाई असें होतें. ही विसाजीराव नांवाच्या एका सरदाराला दिली होती (शिवाजी-निबंधावली १, पृ. २२५).

बाळोजी तात्या पागनीस—(मृत्यु स. १८००) हा सारस्वत ब्राह्मण मुत्सद्दी दौलतराव शिंद्याचा कारभारी होता. दुसऱ्या बाजीरावास पेशवाईवर बसविण्याकरितां यानें बरेच प्रयत्न केले. नानांचा विचार दुसरा दत्तक घेण्याचा होता, त्यास यानें अगदी विरोध केला. जिउबादादा वक्षीनंतर शिंदे यांचा मुख्य कारभारी हाच झाला. बाजीराव गादीवर बसल्यावर तो पुनः नानाकडे संधान बांधूं लागला व दौलतरावास कबूल केलेला पैसा देईना म्हणून यानें परशुरामभाऊस नानांच्या विरुद्ध फोडून बाजीरावास कैद केलें, व चिमाजीस गादीवर बसविलें. पुढें नानांनीं कारस्थान करून बाजीराव व दौलतराव यांस याच्या विरुद्ध आपल्याकडे वळवून घेतलें. परशुरामभाऊंच्या साह्यामुळेंच यास पुण्यांत महत्त्व प्राप्त झालें. दौलतरावाचें याच्याविषयीं मन कलुषित होऊन त्यानें यास कैदेंत टाकलें शिंद्यांच्या बाया त्रास द्यायला लागल्या तेव्हां दौलतरावानें याची पुन्हां ता. २२-४-१७९९ त सुटका केली. यानें पत्र पाठवून बायांस पुण्यास बोलाविलें. यानें बायांचें ते प्रकरण तात्पुरतें मिटविलें. पुढें कांहीं दिवसांनीं दौलतरावानें यास अटक केली. बाजीरावानें सर्जेराव व बाबाजी पाटणकर यांजबरोबर दौलतरावांस सांगून पाठविलें कीं, "बाळोबा पागनीस तुम्हांस व आम्हांस दगा करून दोहींकडे दत्तक घ्यावयाचें करीत आहेत, याजकरितां सदरहूची चौकशी न करतां त्यांस कैद करा. हे तुम्ही न कराल तर आम्ही प्राण देतों." त्यावरूनच दौलतरावास संकट पडून वरील अटक करावी लागली. यास नगरच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें. नगरास निघतांना याच्या कुटुंबाचे दौलतरावांनीं अत्यंत हाल केले, तेव्हां "याच्या बायकोनें कपाळ फोडून घेतलें. दोन घटका तिचा प्राण कासावीस झाला."

नगरास हा ता. १-११-१८०० रोजीं मरण पावला. हा हुशार असून धाडसी पुरुष होता (म. रि. उ. वि. ३, पृ. १५).

बाळोजी सुभानजी कुंजीर—(मृत्यु स. १८१७) हा सासवडपासून चारपांच कोसावर असणाऱ्या वाघापूरचा पाटील. वाघापूर हा गांव बाळाजी विश्वनाथापासून अंबाजी पुरंदऱ्याच्या घराण्याकडे इनाम आहे. हा पुरंदऱ्याच्या गांवचा पाटील असल्यामुळें याचा त्याजकडे नौकरसंबंध जडला. त्र्यंबक सदाशिव पुरंदऱ्याच्या कारकुनाच्या यादींत याचें नांव आढळतें. हा कांहीं दिवस पुरंदऱ्याच्या खानदेशांतील गांवचा कमावीसदार होता. पुरंदऱ्यांच्या पदरी राहिल्यामुळें याला पेशवेदरबार परिचित होण्यास चांगलाच अवसर सांपडला. हा पुरंदऱ्यांच्या एका शाखेचा कांहीं दिवस कारभारीहि होता. शिंद्यांच्या कैदेंतील बाजीरावाच्या चिठ्याचपाट्या महादास नाना फडणीसास

पोंचवून त्याची बाजू रंगविण्याची महत्त्वाची कामगिरी केल्यामुळें हा रावबाजीचा नानाच्या मृत्यूनंतर मुख्य दिवाण झाला. पेशव्यांची दिवाणगिरी मराठा जातींच्या गृहस्थाकडे गेली ती याच्याकडेसच. वसईचा तह ठरत असतां बाजीरावानें याला शिंद्याकडे पाठविलें.

यानें मागील कारकीर्दीतील सर्व लोकांचा नाश करून व कित्येकांचा सूड उगवून हजारों जन्मीच्या सनदा दिल्या. एकंदरींत याचा अनियंत्रित असा अंमल होता (मं. त्रै. वर्ष ११. १ ले. ४४). हा स. १८१७ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारास पंढरपुरास वारला.

बिजरस—एक चालुक्य राजपुत्र (कामवीररस पाहा).

बिजेसिंग—(जयाप्पा शिंदे पाहा).

बिज्जल—(स. १२५० सुमार) हा सेनापति खोलेश्वराचा मुलगा असून सिंघणाचा दुसरा सेनापति जो राम त्याचा हा भाऊ होता. हाहि आपल्या बापाप्रमाणें व भावाप्रमाणें सिंघणाचा सेनापति होता. यानें कोंकण व दक्षिण महाराष्ट्र देश जिंकले. त्या देशांचा कारभार हाच पाहत असे.

बिज्जल कलचुरी—(स. ११५६-११६८) हा कलचुरीचा पुत्र. यानें तर चालुक्य सार्वभौमसत्तेसहि हात घातला होता. परंतु चवथ्या सोमेश्वर चालुक्यानें (स. ११८३) पुन्हां आपली सत्ता स्थापिली आणि त्यानंतर मात्र या कलचुरींचा मागमूस लागत नाहीं. कारण पुढें होयसळ बल्लाळ यादव यानें कल्याणीचें सर्व राज्यच पादाक्रांत केलें (स. ११८४). हा तैल तिसरा (चालुक्य) याचा सेनापति होता. पण तैलाला एकीकडे ठेवून यानें महाराजाधिराज अशी पदवी धारण केली (स. ११५९). नंतर कल्याणी राजधानी झाली. याची पहिली राजधानी आण्णीगिरी होती.

हा जैन होता, आणि या वेळीं कर्नाटकांत बौद्ध व जैन धर्माविरुद्ध लागलीच वीरशैवधर्माची एक लाट उसळली होती. त्याचा फायदा घेऊन एका बसव नांवाच्या ब्राह्मण प्रधानानें हळेमग व मधुवरस् या दोघां साधूंचे डोळे काढल्याचा याच्यावर आरोप ठेवून याचा वध केला (स. ११६७). याचा मुलगा सोविदव (सोमेश्वर अगर रायमुरारी) याच्यासाठीं यानें राज्यत्याग केला, अशी एक गोष्ट आढळते (बेळगांव शिला.) व ती बहुधा खरी असावी. तसें असल्यास याच्या वधाची मागील गोष्ट खोटी ठरते. याचें विज्जल असेंहि नांव आहे.

बिट्टीग—(बिट्टिदेव पाहा).

बिट्टिदेव होयसळ—(स. ११०६-४१) हा एरेयंग होयसळचा मुलगा होय. हा या घराण्यांतील पहिला प्रसिद्ध राजा होऊन गेला. यानें द्वारसमुद्र शहर स्थापून तेथें स. ११०६ पासून ११४१ पावेतों राज्य केलें. आरंभीं या राजाचा आश्रय जैनधर्मास होता आणि याचा प्रधान गंगराज यानें पुष्कळ जैन मंदिरें बांधिलीं. परंतु रामानुजानें (स. १०१७-११३७) सुरू केलेल्या भक्तिमार्गाचा याच्यावर परिणाम बिट्टिदेवावर होऊन हा वैष्णवधर्माचा उपासक बनला. यानें स्वतः आपलें नांवहि विष्णुवर्धन असें धारण केलें. यानें व याच्या अनुयायांनीं होयसळ यादवांची सत्ता पुष्कळच वाढविली. ह्याला विष्णुवर्धन, उदयादित्य, बिट्टीग, त्रिभुवनमल्ल २ रा, भुजबलगंग, वीरगंग आणि विक्रमगंग असें देखील म्हणत.

बिलासखां—तानसेनाचा पुत्र व उत्तम गायक. बिलासखानी तोडीचा उत्पादक.

बिल्हण—(स. १०३०-११०० सुमार) हा काश्मीरांतील प्रवरपूर शहराजवळच्या खोनमुख गांवचा राहणारा असून पातंजल महाभाष्यावर टीका लिहिणारा जो ज्येष्ठकलश त्याचा पुत्र होय. हा प्रथम मथुरा, वृंदावन, काशी, सोमनाथपट्टण, सेतुबंध इत्यादि ठिकाणें पाहून व तेथें सन्मान मिळवून नंतर चालुक्यांची राजधानी कल्याणी येथें गेला. तेथील राजा कुंतलेंदु त्रैलोक्यमल्ल (सहावा विक्रमादित्य पश्चिम चालुक्य) व त्याचा पुत्र विक्रमांकदेव यांनीं यास पुष्कळ द्रव्य व विद्याधिपति ही पदवी दिली. तेथें यानें 'विक्रमांकदेवचरित' हें महाकाव्य रचिलें. गुर्जर देशचा राजा वीरसिंह याची मुलगी 'शशिलेखा' हिजवर याचें प्रेम जडलें होतें तें राजास न आवडून त्यानें यास सुळावर चढविण्याचा हुकूम दिला. सुळावर चढविण्यापूर्वीहि यानें शशिलेखेचें स्मरण केलें. तें पाहून राजानें याची शिक्षा माफ करून शशिलेखेशीं याचें लग्न केलें. पुढें दोघांनीं आपला काळ सुखांत घालविला (विठ्ठलकविकृत बिल्हणचरित्र). यानें चौरीसुरतपंचाशिका हें खंडकाव्य, कर्णसुंदरी नामक नाटिका व रामचरित्र किंवा रामस्तुति हें काव्य लिहिलें.

बिरसकूट (कर्नल)—(स. १७८८ सुमार) इंग्रज प्रवासी. यानें आग्रा व दिल्ली हीं ठिकाणें पाहून तेथील नकाशे उतरून घेतले. याची व महादजी शिंद्यांची भेट झाली होती.

बिल्वमंगल—हा द्रविड असून विष्णुस्वामीच्या गादीवरील शेवटचा पुरुष. पुढें वल्लभाचार्यांनीं याच्या सांप्रदायाचा जीर्णोद्धार केला (विष्णुस्वामी पाहा).

बिहारीदास पांचोली—उदेपूरच्या संग्रामसिंह गुहिलोतचा दिवाण.

बिहारीमल्ल कच्छवाह—(दानियल मीर्झा पाहा).

बिहारीलाल—(स. १६०३-१६६३) ह्या प्रख्यात हिंदी कवीचा जन्म ग्वाल्हेरजवळील बसुवा गोविंदपुर गांवीं झाला असून यानें आपलें बालपण बीती (बुंदेलखंड) येथें व तरुणपण मथुरा येथें घालविलें. हा जयपूरच्या जयसिंह राजाच्या दरबारीं होता. याच्या बिहारीसतसई या शृंगाररसयुक्त ग्रंथास अद्याप फार मान असून त्यावर आतांपावेतों अनेक टीका लिहिल्या गेल्या आहेत. याचा एक एक दोहा हिंदी साहित्यांतील रत्न समजलें जातें.

बिन्दुसार मौर्य—(ख्रि. पू. २९८-२७२) मौर्य-वंशांतील चंद्रगुप्ताचा पुत्र. याला विष्णुपुराणांत बिंदुसार म्हटलें आहे, पण भागवतांत वारिसार म्हटलें आहे. पण वायु व ब्रह्मांड यांत यास भद्रसार म्हटलें आहे. कलियुगराजवृत्तांत, दीपवंश व महावंश यांत यास बिंदुसार असेंच म्हटलें आहे. ग्रीक लेखकांनीं याचें नांव एमित्रोचेटस असें लिहिलें आहे. डॉ. फ्लीटच्या मतानें याचें संस्कृत रूप अमित्रघात किंवा अमित्रखाद असें होतें. हें याचें दुसरें नांव असावें.

याच्यासंबंधीं पुढीलप्रमाणें परिशिष्टपर्वात माहिती दिली आहे. चंद्रगुप्तावर विषप्रयोग झाल्यास त्याला विष-बाधा होऊं नये म्हणून त्याच्याकडून चाणक्यानें विषमिश्रित अन्न खाण्याची संवय करवली होती. पण एकदां चंद्रगुप्ताची पत्नी विषमिश्रित अन्न खावयास बसली असतां तिच्यावर परिणाम होऊन ती मृत्युमुखीं पडली. पण ती गरोदर असल्यामुळें पोट फाडून मूल बाहेर काढावें लागलें. मूल बाहेर काढल्यावर असें आढळून आलें कीं त्याच्या डोक्या-वर विषाचा एक बिंदु लागला आहे. म्हणून चाणक्यानें याचें नांव बिंदुसार ठेवलें (परिशिष्टपर्व ८.४३६-४४५).

सोळाव्या शतकांतील तिबेटी लेखक तारानाथ यानें असें लिहिलें आहे कीं यानें चाणक्याच्या साहाय्यानें सोळा राजांना जिंकलें. पण हे सोळा राजे कोणते हें सांगतां येत नाहीं. दक्षिणेवर नंदांची सत्ता होती. त्यांचें राज्य चंद्र-गुप्तानें घेतल्यामुळें चंद्रगुप्ताची सुद्धां दक्षिणेवर सत्ता असावी. पण कदाचित् दक्षिणेंतील आंध्रराजांनीं वर्चस्व स्थापण्यास सुरुवात केली असेल व त्यांना यानें जिंकलें असेल. अशोकाचें दक्षिणेवर वर्चस्व होतें, त्याचा प्रारंभ बिंदुसारानें असा केलेला दिसतो.

याचा प्रधान चाणक्य होता, ही गोष्ट तारानाथानें लिहिली आहेच. शिवाय जैनग्रंथांतहि ही गोष्ट आली आहे. पण परिशिष्टपर्वात असें लिहिलें आहे कीं, चंद्रगुप्त मेल्यावर चाणक्यानें याला सांगून सुबंधु नांवाचा प्रधान केला. सुबंधु मनांतून चाणक्याचा द्वेष करीत होता. त्यानें याला चाणक्याच्या विरुद्ध कांहीं गोष्टी सांगितल्या. पण शेवटीं त्या खोट्या ठरल्या, तेव्हां सुबंधूनें राजाची व चाणक्याची क्षमा मागितली. पण चाणक्याला मात्र या गोष्टीचें वाईट वाटून तो वनांत तपश्चर्येला निघून गेला.

याच्या कारकीर्दीत दोन वेळां तक्षशिलेला बंडें झालीं. पहिलें बंड मोडण्याकरितां यानें अशोकाला धाडलें. अशोक तेथें गेला असतां लोकांनीं त्याचा सत्कार केला. लोक म्हणाले, 'आम्ही राजा किंवा राजपुत्र यांच्या विरुद्ध नाहीं, पण अमात्य आम्हाला त्रास देतात' (दिव्यावदान पृ. ३७१).

दुसऱ्या बंडाच्या वेळीं यानें आपला दुसरा पुत्र सुषिमा याला पाठविलें. बहुतेक या वेळीं अशोक उज्जयनीस असावा. या बंडाच्या गोष्टी ऐतिहासिक दिसतात.

बिंबाजी भोसले—(स. १६२५ सुमार) हा नाग-पूरच्या मुधोजीचा बाप व पहिल्या परसोजीचा आजा.

२. (स. १७०० सुमार) पहिल्या रघूजीचा बाप-पत्नी काशीबाई.

३. (मृत्यु स. १७८७) हा पहिल्या रघूजीच्या वडील स्त्रीचा धाकटा मुलगा होय. मुधोजी व जानोजी यांची पेशव्यांनीं तडजोड केल्यावर यास छत्तीसगड मिळाला. कटक प्रांताचा सुभेदार शिवभट साठे हा तिकडील खजिना घेऊन छत्तीसगडावरून जात असतां त्यास यानें अडकवलें. ताराबाई व पेशवे यांच्या भांडणांत याचें अंग होतें.

स. १७७९ त मुधोजीचा पुणें दरबारशीं बेबनाव झाल्या-वर नानानें यास त्याच्याविरुद्ध चिथावणी देऊन गृहकलह उभा केला. नानानें यास ३२ लक्षांचा मुलूख व बऱ्हाण-पूरचा किल्ला द्यावा असें कबूल केलें. बिंबाजी हा छत्तीस-गडांत रतनपुरास राहत असे. हा १७-१२-१७८७ रोजीं मरण पावला. यास पुत्र नव्हता. याच्या २ स्त्रियांपैकीं उमाबाई ही सती गेली.

बिंबाजी वंजाळ—पहिल्या रघूजीचा प्रमुख सरदार.

बिंबिसार (श्रेणिक) शिशुनाग—(ख्रि. पू. ५२८-५००) मगध येथील शैशुनाग घराण्यांतील हा एक राजा असून ख्रि. पू. ५२८ मध्यें हा मगधच्या गादीवर आला.

यानें अंग (भागलपूर आणि मोंघीर जिल्हे) देश काबीज करून आपलें वर्चस्व वैशाली येथील लिच्छवी घराण्यांतील व कोसल येथील राजघराण्यांतील राजकन्येशीं लग्नें करून वाढविलें असें म्हणतात. याला लिच्छवी घराण्यांतील राजकन्येपासून अजातशत्रु (कूनिक) नांवाचा मुलगा झाला.

पुढें ख्रि. पू. ५०९ मध्यें याचा मुलगा अजातशत्रु यानें याला ठार मारिलें (B.). याला श्रेण्य किंवा हर्यणक म्हटलेलें आढळतें. यावरून हा शिशुनागवंशांतील नसावा (हि. क्रा. १. ८६-८७). याला श्रेणिक असेंहि म्हणत. हा जैनधर्माचा पुरस्कार करी, असें जैनग्रंथ म्हणतात.

बीका—हा राठोड रजपूत मारवाडच्या राव जोधाचा सहावा पुत्र असून बिकानेर संस्थानचा मूळ पुरुष होय.

बीर—(काव्यकाल स. १७२१) एक हिंदी कवि. हा दिल्लीचा श्रीवास्तव कायस्थ. ग्रंथ-कृष्णचंद्रिका, नायिकाभेद. शिवाय कांहीं वीररसात्मक कविता आहेत.

बीरबल—(स. १५२८-१५८३) हा अकबराच्या दरबारांतील कविराय व मंत्री होता. औदार्याबद्दल तसेंच गानकौशल्य व काव्यनैपुण्य यांबद्दल हा फार प्रसिद्ध आहे. धार्मिक मुसलमानांकडून याचा द्वेष केला जात असे. याचें कारण त्यांच्या मतें इस्लामाविषयीं अकबराचें मत दूषित करण्याचा यानें प्रयत्न केला.

याचें मूळचें नांव महेशदास असून हा काल्पीचा कनोजी ब्राह्मण होता. अकबराच्या दरबारीं प्रथम गरिबीनें राहत असे, पण हा चलाख व तीव्र बुद्धीचा म्हणून प्रसिद्ध होता. अकबरानें याला कविराय ही पदवी दिली. आपल्या खास देखरेखीखालचें काम याचेकडे सोंपविलें. स. १५८३ सालीं युसुफझायी लोकांच्या विरुद्ध झैनखान कोका याला मदत करण्यासाठीं अकबरानें याला पाठविलें. पण हा तेथें ठार मारला गेला. अकबराला याच्या मृत्यूबद्दल अतोनात दु.ख झालें.

यानें अकबरपूर नांवाचें एक शहर वसविलें होतें व हा तेथेंच राहत असे. 'बीरबलनामा' नांवाचा ग्रंथ यानें लिहिला. त्यांत अकबर व बीरबल यांच्याविषयीं अनेक विनोदी गोष्टी आढळून येतात.

बीसलदेव—(स. ११५५) हा एक हिंदी कवि असून नरपति नाल्ह ह्या कवीचा समकालीन होय. यानें बीसलदेवरासो नांवाचा वीरगीतानें भरलेला एक ग्रंथ लिहिला आहे. याचें लग्न परमार घराण्यांतील भोज राजाच्या मुलीशीं झालें होतें. याच्या भाषेंत परकी शब्द बरेच आढळतात.

बुक्क संगम—(राज्यकाल स. १३५५-७७) यदुकुळांतील संगमाच्या पांच पुत्रांपैकीं एक हरिहर ऊर्फ हरियप, कंप, कंपण्ण ऊर्फ शंकर, बुक्क ऊर्फ बुक्कण, मारप व मुद्दप हे ते पांच बंधु होत. या प्रत्येकाला युवराज म्हणून वेगळाल्या प्रांतांवर नेमून त्यांच्या साहाय्यानें हरिहर राज्य करीत असे. बुक्काची युवराज म्हणून नेमणूक होयसण देशावर झाली होती. होयसणमधील होसपट्टण येथें यानें आपली राजधानी केली होती (एपि. कर्ना. व्हा. ११ ले. २ पा. २-३). हा होयसण देश म्हणजे द्वारसमुद्राच्या प्रतापचक्रवर्ति होयसळ राजांच्या सत्तेखालील प्रदेश होय. हे राजे आपल्या विरुदावलींत 'होयसण भुजबळ श्रीवीर' अशीहि भाषा वापरीत असत (एपि. कर्ना. व्हा. ६ नं. १०५ पा. १२२). होयसण हा शब्द होसण असाहि लिहिलेला आढळतो (एपि. कर्ना. ५ नं. २५६ पा. ५२१). म्हैसूर संस्थानांतील सांप्रतचा हसन जिल्हा हाच तो प्रदेश असून हसन हे होसण शब्दाचें अपभ्रष्ट रूप असावें. होयसळ राजांची मूळची राजधानी जी वेलापुरी किंवा बेलापूर (बेलूर) ती याच जिल्ह्यांत असून त्यानंतरची सुप्रसिद्ध राजधानी द्वारसमुद्र (हळेबीदु) हीहि बेलापुरापासून अवघ्या दहा मैलांच्या अंतरावर आहे (बॉंबे गझे. व्हा. १, पा. ४९१). विजयनगरचें साम्राज्य स्थापण्यापूर्वी हरिहरादि बंधु होयसळ राजांचे मांडलिक होते (एपि. इंडि. व्हा. ३, पा. ११५). होयसळ साम्राज्याच्या अवशेषावरच यांचें विजयनगरचें साम्राज्य उभारलें गेलें.

हरिहरानें सगळ्याच भावांना एका एका प्रांताचें युवराज नेमलें होतें. त्यांत यालाहि युवराज नेमलें होतें. पण इतरांपेक्षां त्याची मदार याच्यावर विशेष असे (एपि. कर्ना. व्हा. ५, पा. ५२०). आणि शेवटीं तर हरिहर वृद्ध झाल्यामुळें हाच सर्व कारभार पाही, आणि लोकहि बुक्कानें चालविलेलें राज्य असेंच म्हणत (एपि. कर्ना. व्हा. ९, पा. १५५, पा. १७२).

बुक्काचें नांव एवढें गाजण्याला आणखीहि एक कारण होतें. तें म्हणजे पांचहि बंधूंमध्यें हा फार पराक्रमी असून हिंदुधर्माचा मोठा अभिमानी व पुरस्कर्ता होता. त्या काळच्या बऱ्याच लेखांत इतर बंधूंपेक्षां बुक्काच्या शौर्याची फारच वाखाणणी केलेली आढळते. पांच पांडवांमध्यें जसा अर्जुन तसा संगमाच्या पांच पुत्रांमध्यें बुक्कराय असें म्हणण्याचा त्या वेळीं प्रघात पडला होता (एपि. कर्ना.

व्हा. ६, पा. १७२). याची तरवार रणांगणांत नाचूं लागली म्हणजे मुसलमानांचीं तोंडें वाळून निस्तेज होत असें म्हटलें आहे (एपि. कर्ना. व्हा. ६, पा. १७६). हा तलवार चालवूं लागला म्हणजे सर्व दिक्चक्र हालत असे. शत्रु-राजांना हा वज्राच्या तडाख्याप्रमाणें भासे. याच्या भीतीनें राजे दडून राहत किंवा कांपत कांपत याला प्रणाम करून अभिमानाचा तोरा सोडून देत. याला विरोध करण्यास कोणीच समर्थ नव्हता (एपि. कर्ना. व्हा. ११, पा. २). यानें द्वारसमुद्रादि शेंकडों राजधान्या शत्रूच्या दाढेंतून सोडवून राज्य निष्कंटक केलें व सात अंगांनीं परिपूर्ण अशा साम्राज्यावर हा सत्ता चालवूं लागला (एपि. कर्ना. व्हा. ४, पा. ९८). या वर्णनावरून हाच साम्राज्य-संस्थापक असावा असें वाटतें. स. १३५५ च्या फेब्रुवारीच्या सुमारास हरिहर निपुत्रिक मरण पावल्यामुळें वडीलपणाच्या अनुक्रमानें साम्राज्याचा अधिकार कंपराय्याच्या हातांत यावयाचा, परंतु तो तसा आलेला दिसत नाहीं. याचें कारण बहुधा तो आसन्नमरण असावा. बिटुगुंटच्या ताम्रपटांत म्हटलें आहे कीं, हरिहरच्या मागून कंपनानें चिरकाल पृथ्वीचें राज्य केलें (एपि. इंडि. व्हा. ३, पा. २५), परंतु त्यांत सत्यांश नाहीं. तो हरिहरामागून अवघ्या तीनचार महिन्यांच्या अवधींत म्हणजे स. १३५५ च्या मे महिन्यांत मरण पावला. त्याच्या पश्चात् साम्राज्याचीं सूत्रें कंपाच्या मुलाच्या हातांत जावयास पाहिजे होतीं, पण तसें न होतां तीं बुक्काच्या ताब्यांत आलीं.

साम्राज्याचा मुख्यत्वें उदय मुसलमानांच्या दक्षिणेंतील आक्रमणाला पायबंद घालून प्राचीन हिंदु संस्कृति व परंपरा कायम राखण्यासाठींच झाला असल्यामुळें मुसलमानांच्या वाढत्या सत्तेला टक्कर देण्याचें काम महत्त्वाचें होतें. तें काम बुक्कासारख्या अनुभवी व शूर माणसाखेरीज होणें शक्य नव्हतें.

स. १३५५–१३७७ पर्यंत सुमारें २२ वर्षे बुक्कानें राज्य केलें. या अवधींत यानें अनेक लढाया मारल्या, शत्रूंना दहशत बसविली व राज्यकारभाराची व्यवस्था उत्तम लावून साम्राज्याला मजबुती आणली. पण या सर्वांपेक्षां याचें महत्त्वाचें काम म्हणजे वेदभाष्य होय. बुक्करायानें हें काम केलें. याबद्दल सर्व हिंदु लोक आणि वेदाभ्यासक याचे ऋणी आहेत. विजयनगरचें साम्राज्य नष्ट झालें, पण त्यानें वेदविषयक केलेली कामगिरी आजहि ताजी असून तिचा फायदा सर्वांना होत आहे. आणि वेद आहेत तोंपर्यंत याच्या भाष्याचें महत्त्व कमी होण्यासारखें नाहीं. यामुळें चवदाव्या शतकांतील बऱ्याच लेखांत याला 'वैदिकमार्गप्रवर्तक' ही पदवी लावली आहे, आणि ती योग्य आहे. धर्मग्रंथांच्या पुनरुज्जीवनांत बुक्काला माधवाचार्याची पुष्कळ मदत झाली. तो स्वतःला बुक्करायाचा कुलगुरु म्हणवतो. यानें चीन देशांत आपला वकील पाठविला होता.

२. (स. १४०४–१४०६) हा विजयनगरच्या दुसऱ्या हरिहर संगमाचा पुत्र. त्याच्यानंतर हा गादीवर आला.

दुसऱ्या हरिहरानंतर गादीवर बसलेल्या या राजानें विजयनगर शहराची पुष्कळच सुधारणा केली. नवे कोट व बुरुज बांधविले. कोट व शहर पुष्कळच वाढविलें, आणि ते कोट दूरवर पोहोंचविले. शिवाय सर्वांत प्रमुख काम म्हणजे, यानें तुंगभद्रेला एक भला मोठा बांध (धरण) बांधला आणि तेथून पांच कोस पक्के पाट बांधून, शहरांत पाण्याची समृद्धि करून दिली, असें नूनीजनें वर्णन केलें आहे.

मुसलमानांशीं याच्या लढाया झाल्या त्यांचा तपशील दिलेला नाहीं. मात्र यानें गोवें, चौल, आणि दाभोळ काबीज केलें, आणि कारोमांडल किनाऱ्यावरील प्रदेश पूर्ण ताब्यांत आणले.

बुघ्राखान बिन बल्बन—(स. १२८२–९२) हा घियासुद्दीन बल्बनचा मुलगा. हा फार चैनी व रंगेल होता. याचा बाप आजारी पडला असतांना हा दिल्लीस गेला. तेव्हां याला तेथें कडक शिस्तींत राहण्याचा कंटाळा आल्यामुळें, हा शिकारीचें निमित्त काढून निघून गेला. तेव्हां बल्बननें याचा गादीवरील वारसा हक्क काढून कैकुस्त्रवला गादीवर बसविण्यास सरदारांस सांगितलें. पुढें यानें आपल्या हक्काचें समर्थन न करतां, यानें बंगालमध्यें ' नासिरुद्दीन महमूद बुघ्राशाह ' असा किताब धारण करून नवीन राज्य स्थापिलें. या वेळेस याचा मुलगा कैकुबाद दिल्लीच्या गादीवर होता. कैकुबाद स्वैराचारानें राज्य चालवूं लागल्यामुळें, त्याची कानउघाडणी करण्यासाठीं, हा सैन्यासह स्वारी करण्याचे हेतूनें दिल्लीवर चालून आला. पुढें याची व मुलाची भेट होऊन, यानें त्यास सावधगिरीनें राज्य चालविण्यास सांगून हा परत बंगालला गेला. याला मु. रियासतीमधील वंशावळींत ' बोगराखान ' असें म्हटलें आहे (१ नासिरउद्दीन पाहा).

बुधगुप्त—(स. ४७६–४९९) गुप्तवंशांतील दुसऱ्या कुमारगुप्ताचा उत्तराधिकारी. याच्या वेळचा एक शिलालेख

सारनाथ येथें मिळालेल्या एका मूर्तीच्या आसनावर कोरलेला आहे. तो गुप्त सं. १५७ (स. ४७६) मधला आहे (भारतीय प्राचीन लिपिमाला, पृ. १७४ टि. २). त्याचा सारांश 'बुधगुप्ताच्या वळों म्हणजे महाराज सुरश्मिचंद्र कालिंदी व नर्मदा यांच्या मधल्या प्रदेशावर राज्य करीत होता, तेव्हां गुप्त सं. १६५ (स. ४८५) आषाढ शुद्ध १२ रोजीं महाराज मातृविष्णु आणि त्याचा धाकटा भाऊ धन्यविष्णु यांनीं येथें विष्णूचा ध्वजस्तंभ तयार केला. या राजाचीं चांदीचीं नाणीं मिळालीं आहेत त्यांवर गुप्त सं.१७४; १७५ आणि १८० (स. ४९३; ४९४; ४९९) हे आंकडे आहेत. याच्या कारकीर्दीच्या शेवटल्या दिवसांत गुप्तांच्या राज्याच्या पश्चिमेकडील भागावर हूणांचें राज्य झालें व पूर्वेकडील भाग गुप्तांच्या अधिकाराखालीं राहिला. एरणगांवच्या शिलालेखावरून पुढील माहिती कळते. महाराजाधिराज तोरमाण राजाच्या पहिल्या वर्षाच्या फाल्गुन मासाच्या दहाव्या दिवशीं मृत महाराज मातृविष्णूचा धाकटा भाऊ धन्यविष्णु यानें आपल्या राज्यांतील एरिकेण (एरण) येथें भगवान् वराहाचें मंदिर बांधलें. वर आलेंच आहे कीं, गुप्त संवत् १६५ (स. ४८४) मध्यें मातृविष्णु व धन्यविष्णु जिवंत होते व बुधगुप्ताच्या आश्रितांपैकीं होते. हा गुप्त सं. १८० (स. ४९९) पर्यंत राज्य करीत होता असें याच्या नाण्यांवरून कळून येतें त्यानंतर हूणांपैकीं तोरमाणानें गुप्तांचा प्रदेश जिंकला आणि धन्यविष्णूला तोरमाणाचें मांडलिक होणें भाग पडल. अशा रीतीनें स. ४९९-५१० मधल्या काळांत राजपुताना, गुजराथ, माळवा व मध्यप्रदेश यांवर गुप्तांचें राज्य जाऊन हूणांचें राज्य झालें. बुधगुप्ताच्या अवशिष्ट राज्याचा उत्तराधिकारी भानुगुप्त झाला.

बुद्धघोषाचार्य—विसुद्धिमग्ग व अठ्ठकथा (मनोरथपूरणी) या ग्रंथाचा कर्ता. ही अठ्ठकथा मूळाचा अर्थ समजण्यास अत्यंत उपयुक्त आहे. तथापि यांनाहि कांहीं ठिकाणीं अनेक अर्थ द्यावे लागले आहेत. महावंस व बुद्धघोषसुप्पत्तिमध्यें यांची माहिती आली आहे.

बुद्धधर्म—एक प्रवासी. हा तुषार देशचा राहणारा होता. हा चीनमध्यें अनेक ठिकाणीं हिंडून भारतवर्षांत आला. ईत्सिंग या चिनी प्रवाशाची व याची भेट नालंद येथें झाली होती. नालंदला पुष्कळ दिवस राहून हा चीन देशाला परत गेला होता.

बुद्धमित्र—(स. १००० सुमार) यानें 'वीरशोळीयम्' नांवाचें तामीळ भाषेचें व्याकरण केलें. याला वीर राजेन्द्र चोल याचा आश्रय होता.

बुद्धवर्मा (प.) चालुक्य—(स. ५७२) पश्चिम चालुक्यांच्या घराण्यांतील जयसिंहाचा मुलगा हा गुजराथशाखेचा संस्थापक. याचा पुत्र विजयराज (विजयवर्मा). हा स. ५७२ च्या सुमारास हयात होता. याच्या वंशाची माहिती मिळत नाहीं.

बुद्धिसागर—भोजाचा मित्र.

बुद्धिसेन—बोधाचें नांव.

बुबुजीखानूम—(स. १५१० सुमार) ही एका हिंदूची मुलगी. अली आदिलशहानें हिचा भाऊ मुकुंदराव ह्याचा पराभव करून, हिला पळवून आणिलें व हिला 'बुबूजी खान' किताब देऊन हिच्याशीं लग्न केलें. हिला इस्माईल नांवाचा मुलगा झाला. बुबूजीखानूम हें बुबूजीखान शब्दाचें स्त्रीलिंग आहे (इस्माईल आदिलशाह पाहा).

बुर्बक—(स. १४२९-४५) बंगालचा राजा.

बुर्हाण इमादशाह—(स. १५७२) हा बऱ्हाडच्या दर्या इमादशाहाचा मुलगा. हा लहान वयांतच बऱ्हाडच्या गादीवर बसला. याच्याच काळांत मूर्तझा निजामशाहानें बऱ्हाडवर स्वारी करून याला व याचे वंशजाला ठार करून बऱ्हाडचें राज्य अहमदनगरच्या राज्यास जोडलें व इमादशाहीचा शेवट केला.

बुर्हाण उल्मुल्क बाबी—गुजराथचा सुलतान. यानें तिसऱ्या महमूदाचा खून करून, आपण गादीवर बसला. पण शेरखान नांवाच्या अमीरानें यास ठार मारलें (मु. रि. १, पा. २१).

बुर्हाण निजामशाह—(स. १५०८-१५५४) हा अहमदनगरचा निजाम. यानें विजापूरच्या इस्माईल आदिलशाहाच्या मर्युम नांवाच्या मुलीशीं विवाह केला. हा अहमद निजामाचा मुलगा. हा फार हुशार होता. कंबरसेन नांवाचा ब्राह्मण याचा प्रधान होता. शाहा ताहीर नांवाचा एक विद्वान् याच्या पदरीं होता. यानें आपल्या राज्यांत शियापंथाचा प्रसार केला.

२. (स. १५९०-९५) हा अहमदनगरच्या हुसेनचा पुत्र. अकबरच्या मदतीनें आपला मुलगा इस्माईल याला कैद करून हा गादीवर बसला.

३. (स. १६०७-३०) मलिकंबरानें मुर्तझास पदच्युत करून, यास गादीवर बसविलें. हा हुशार नसल्यामुळें राज्यांत गोंधळ माजून राज्य बुडण्याची वेळ आली होती, पण शहाजीनें निजामशाही वांचविली.

बुवाजी पवार (धार)—(स. १६९०) हा

कृष्णाजी पवाराचा मुलगा. याला राजारामानें विश्वासराव अशी पदवी दिली.

२. (स. १७३० सुमार) दुसऱ्या कृष्णाजी पवाराचा मुलगा. हा थोरल्या बाजीरावाबरोबर माळव्यांत होता.

३. (स. १७५० सुमार) राणोजी पवाराचा मुलगा.

बुसी—(स. १७१८–१७८५) फ्रेंच सेनापति. याचा जन्म फ्रान्समध्यें झाला. हा डुप्लेच्या हाताखालीं होता. यानें सावनूरच्या लढाईत पेशव्यास मदत केली (स. १७५५). हा पांदीचरीस मेला.

बृहद्रथ मौर्य—(ख्रि. पू. १८४) हा मौर्य चंद्रगुप्ताच्या वंशांतील देववर्म्याचा दुसरा पुत्र. याचा शुंगवंशांतील पुष्यमित्र हा सेनापति होता. त्यानें याला ठार करून याचें राज्य बळकाविलें. पुराणांत यासंबंधीं निर्देश आहे त्यावरून पुढीलप्रमाणें माहिती मिळते. पुराणांत याला शतधन्वन्‌चा पुत्र असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ हा शतधन्वन्‌नंतर गादीवर आला असा आहे. शतधन्वन् हा याचा थोरला भाऊ होय. याला कसें मारलें त्याचा निर्देश हर्षचरित्रांत आला आहे. त्यावरून, यास सैन्य दाखविण्यास म्हणून नेलें आणि ठार केलें असें दिसतें. यानें सात वर्षे राज्य केलें असें दिसतें.

बेगम सुमरु—(मृ. स. १८३६) ही एका मुसलमान उमरावाची मुलगी असून वाल्टर रेनहार्ट नांवाच्या युरोपियन सैन्याधिकाऱ्याची पत्नी होती. ही शूर असून मोठी राजकारणी स्त्री होती. हिचा नवरा मेल्यानंतर हिच्या ताब्यांत नवऱ्याच्या सारधाना संस्थानचा कारभार व सैन्याची मालकी आली. हिनें आपल्या सैन्यांत ४१ फ्रेंच व युरोपियन लोक ठेवून सैन्याची चांगल्या तऱ्हेनें सुधारणा केली. गुलाम कादरनें दिल्लीस बंड केलें असतां, हिनें दिल्लीचा बादशहा शहाआलमास मदत करून, त्यास संकटांतून सोडविलें. तेव्हां बादशाहानें हिला मिरत प्रांतांतील बरींच गांवें जहागीर दिली. हिनें आसई येथील लढायांत शिंद्यास मदत केली. शेवटीं स. १८०३ मध्यें इंग्रज सेनापति लेकनें दिल्ली घेतल्यावर ही इंग्रजांस मिळाली व शेवटपर्यंत इंग्रजांस राजनिष्ठ राहिली. शेवटीं हिनें ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता.

बेटावर्धन—द्वारसमुद्र शहराचा राजा. हा रामानुजाचार्यांच्या वेळेस तेथें होता.

बेट्ट काकतीय—(सन ११०० सुमार) हा काकतीय वंशापैकीं पहिल्या प्रोलाचा मुलगा. हा आपणास त्रिभुवनमल्ल म्हणवीत असे. हा पश्चिम चालुक्यांपैकीं सहाव्या विक्रमादित्याचा मांडलिक होता. हा तेलंगणांत कांहीं काळ स्वतंत्रपणें राज्य करीत असे. याची राजधानी अनमकोंडा. याचा मुलगा दुसरा प्रोल होय.

बेट्ट चालुक्य—चालुक्यांपैकीं पांचव्या विजयादित्याचें नामांतर.

बेट्टद ओडीयार—(स. १५१३–५२) म्हैसूरचा राजा. पिता हिरे किंवा आरुबेरळु चामराज.

२. (स. १५७६–७८) म्हैसूरचा राजा. पिता दोड्ड चामराज. हा हेरिचामराजानंतर गादीवर आला. हा शूर पण अविचारी असल्यानें यास आप्तांनीं पदच्युत केलें.

बेनी—(स. १६४३ सुमार) हा हिंदी कवि असनीचा भाट होय. याच्या फुटकळ कवितांवरून यानें 'नखशिख' व 'षड्ऋतु' हे ग्रंथ लिहिले असावे. हा थट्टामस्करीच्या कविता करण्यांत कुशल होता.

बेनी प्रवीन—(स. १८०० सुमार) हा हिंदी कवि लखनौच्या गाजीउद्दीन हैदराचा दिवाण दयाकृष्ण कायस्थाचा पुत्र नवलकृष्ण ऊर्फ लालनजीचा आश्रित होता. यानें नवरसतरंग, शृंगारभूषण व पुढें नानाराव राजाच्या पदरीं असतांना 'नानारावप्रकाश' हे अप्रकाशित ग्रंथ व कांहीं फुटकळ कविता लिहिल्या. याचें वादकौशल्य पाहून बेनी बंदीजाननें यास 'प्रवीण' ही पदवी दिली. पुढें रोगानें पछाडल्यामुळें हा अबूस गेला व तेथेंच मेला. याचा पहिला ग्रंथ सुंदर असून त्यांत नायिकाभेद, रसभेद व भावभेद यांचें संक्षिप्त निरूपण आहे.

बेनी बंदीजन—(ग्रंथकाल स. १७९२–१८२३) हा हिंदी कवि बैंती(जि. रायबरेली)चा राहणारा व अयोध्येचा वजीर टिकैतरायचा आश्रित होय. यानें टिकैतराय-प्रकाश, रसविलास, भँडौवा-संग्रह वगैरे ग्रंथ लिहिले. शेवटचा ग्रंथ हा हास्यरसपूर्ण आहे.

बेली—(स. १७८०) एक इंग्रज सेनापति. याचा हैदरनें मद्रासपाशीं पराभव केला.

बेंटिंग, लॉर्ड विल्यम—(स. १७७४–१८३९) हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल व पोर्टलंडच्या तिसऱ्या डचूकचा मुलगा. हा लष्करांत लेफ्टेनंट्-कर्नलच्या हुद्यापर्यंत गेला. यानें हिंदुस्थानांत अनेक महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणल्या.

बेरीसाल—(ग्रंथकाल स. १७६८) हा हिंदी कवि ब्रह्मभट्ट असून असनीचा राहणारा होय. तेथें अद्याप याचे वंशज आहेत. यानें एक दोहाबद्ध 'भाषाभरण' हा

ग्रंथ लिहिला. यांत अलंकारांचीं दिलेलीं उदाहरणें फार सुंदर आहेत.

बोधगिरी—विश्वरूपाचार्यांचा शिष्य व ज्ञानगिरीचा गुरु.

बोधलेबुवा—(माणकोजी बोधला पाहा).

बैजु बावरे—अकबराचे कारकीर्दीत साधुवृत्तीनें राहणारा परंतु मानी असा एक प्रसिद्ध गवई.

बैताल—(जन्म स. १६७७) हा हिंदी कवि विक्रमशाहाचे दरबारीं असून यानें कांहीं स्फुट छंद व 'विक्रमसतसई' हा ग्रंथ लिहिला.

बैसवंश—हें घराणें सूर्यवंशी मानलें जातें. त्याचा वंशवेल पुढीलप्रमाणें आहे. राजधानी ठाणेश्वर.

पुष्यभूति
|
नरवर्धन = वज्रिणीदेवी.
|
राज्यवर्धन = अप्सरादेवी.
|
आदित्यवर्धन = महासेनगुप्ता.
|
१ प्रभाकरवर्धन = यशोमती.
| (स. ५८०–६०५)

२ राज्यवर्धन (मृत्यु स. ६०६) | राजश्री (कन्या) (मौखरी वंशांतील ग्रहवर्म्याशीं विवाह) | ३ हर्षवर्धन (मृत्यु स. ६४८)

या घराण्यांत शेवटले तीन पुरुष स्वतंत्र राजे झाले. हर्षवर्धन तर मोठाच सम्राट् होता. बैस या वंशाच्या नांवावरून हे वैश्य होते, असा कांहींनीं तर्क बसविला आहे, पण तो चुकीचा दिसतो.

हर्षानें आपल्या राज्याभिषेकाच्या वेळीं श्रीहर्षशक सुरू केला (स. ६०६ आक्टो.). हर्षाच्या मृत्यूनंतर त्याचें राज्य त्याच्या अर्जुन नांवाच्या प्रधानानें काबीज केलें, पण त्याला चिनी व तिबेटांतील लोकांनीं कैद करून नेलें.

बोधा—(कविताकाल स. १८३०–१८६०) एक हिंदी कवि. राजापूरचा राहणारा. हा सरवरिया ब्राह्मण असून याचें मूळ नांव बुद्धिसेन होतें. हा पन्नाच्या राजाजवळ होता. परंतु दरबारांतील सुभान नामक वेश्येवर हा आसक्त झाल्यामुळें यास हाकून देण्यांत आलें. पुढें यानें 'विरहवारीश' हा ग्रंथ राजास अर्पण केला. तो राजास फार आवडून याच्या इच्छेवरून सुभानेला त्यानें यास अर्पण केलें. नंतर यानें 'इश्कनामा' हा ग्रंथ लिहून त्यांत तिची प्रशंसा केली. पन्ना येथेंच हा मरण पावला (क. कौ. भा. १).

२. हा हिंदी कवि फिरोजाबाद(जि. आग्रा.)चा राहणारा. तेथें अद्याप याचे वंशज आहेत. सध्यां दुर्मिळ असलेला 'बागविलास' नामक काव्यग्रंथ यानें लिहिला (क. कौ. भा. १).

बोमणदेव—बिज्जल राजास मारणारा. बसवाच्या तीन मशालजींतील एक.

बोम्मण पोतराजू—मल्लज कवीचा बाप. तेलंगी ब्राह्मण.

बोपदेव—(स. १२६०–१३२५) हा हेमाद्रीचा परमस्नेही होता. हे दोघे देवगिरीच्या रामराव यादवांचे वेळीं होऊन गेले. बोपदेवानें व्याकरणावर दहा प्रबंध, वैद्यकावर नऊ, तिथिनिर्णयावर एक, साहित्यावर तीन व भागवततत्त्वोक्तीवर तीन यांप्रमाणें ग्रंथ लिहिले आहेत. कित्येक लोक हाच वैष्णव भागवताचा कर्ता मानतात, ही त्यांची अगदीं चुकीची समजूत आहे. कारण भागवतांतील रहस्य सांगण्यासाठीं यानें हरिलीला, मुक्ताफल व परमहंसप्रिया हे तीन प्रबंध लिहून, यांशिवाय या सर्वांवर 'मुकुट' नांवाचा ग्रंथ लिहिला. यावरून यानें वैष्णवभागवत लिहिलें नाहीं. याच्या बापाचें नांव केशव, यानें 'सिद्धमंत्र' नांवाचा निघंटु लिहिला असून त्यावर ह्यानें सिद्धमंत्रप्रकाश नांवाची टीका लिहिली आहे. हा वरदानदीच्या कांठच्या वेदपदाख्य गांवच्या धनेश नांवाच्या वैद्याचा शिष्य होता.

ह्यानें केलेले ग्रंथ—(१) कविकल्पद्रुम, (२) कविकामधेन्वाख्या (कविकल्पद्रुमव्याख्या), (३) त्रिंशत्श्लोकी, (४) रामव्याकरण, (५) शार्ङ्गधरसंहिता-गूढार्थदीपिका, (६) सिद्धमंत्र प्रकाश, (७) धातुकोश, (८) परशुरामप्रतापटीका, (९) मुग्धबोधव्याकरण, (१०) हृदयदीप-निघंटु, (११) पदार्थादर्श, (१२) हरिलीला, (१३) मुक्ताफल, (१४) परमहंसप्रिया, (१५) मुकुट. महाराष्ट्रांत बोपदेव दोन होऊन गेले असें म्हणतात.

बोल्होबा—तुकारामाचा पिता.

ब्रजबासीदास—(जन्म स. १७४३) हा हिंदी कवि वल्लभसांप्रदायी असून यानें 'ब्रजविलास' ग्रंथ लिहिला. त्यांत सोरठा, चौपाई, हरीगीतिका वगैरे छंद आहेत. यानें प्रबोधचंद्रोदयाचा अनेक छंदांमध्यें अनुवाद केला (क. कौ. भा. १).

ब्रह्मगुप्त—(स. ५९८-६६५) अबूपर्वताजवळील भिनमाळ नांवाच्या गांवीं स. ५९८ मध्यें हा जन्मला.

यानें आपल्या तिसाव्या वर्षी चाप वंशांतील व्याघ्रमुख राजाच्या कारकीर्दीत 'ब्रह्म-स्फुट-सिद्धांत' हा ग्रंथ लिहिला, आणि त्यानंतर ३७ वर्षांनीं 'खंडखाद्य' नांवाचा दुसरा ग्रंथ रचला. यानें आर्यभट्टास अनेक ठिकाणीं दूषणें देऊन मंगळादि ग्रहांचें गणित आर्यभट्टाच्या ग्रंथावरून चुकतें व माझ्या ग्रंथावरून बरोबर जुळतें असें म्हटलें आहे. तथापि आपल्या शेवटल्या म्हणजे 'खंडखाद्य' नांवाच्या ग्रंथांत यानें आर्यभट्टाचे मूलांक घेऊन त्यांत फक्त दृक्प्रत्यय येण्याजोगा फेरफार मान्य केला असें म्हटलें आहे. एकंदरींत या वेळेपासून वेधावरून येणाऱ्या आंकड्यांनुसार मूलांक बदलण्याची प्रवृत्ति कमी झाली व आमच्या ज्योतिष्यांचें लक्ष आंकडेमोडीकडे व बीजगणिताची वाढ करण्याकडे लागलें. नऊ आंकड्यांच्या भरतीस 'शून्य' हा आंकडा लिहिण्याची कल्पना ब्रह्मगुप्ताच्या सुमारास भारतीय ज्योतिष्यांना सुचली; आणि त्यामुळें दशमान पद्धतीनें संख्यालेखन व बेरीज-वजाबाकी वगैरे कृत्यें लेखी पद्धतीनें झपाट्यानें व बिनचूक पद्धतीनें करणें शक्य झालें. या शून्यलेखनाच्या एका शोधानें अंकगणिताची प्रगति हिंदुस्थानांत शेंदोनशें वर्षांत फारच वेगानें झाली. ती इतकी कीं येथील गणितज्ञांची कीर्ति परदेशांत पोंचून तेथून हिंदी पंडितांना आदरपूर्वक निमंत्रणें आलीं. अशाच प्रकारचें निमंत्रण बगदादच्या अलमनसूर नांवाच्या खलीफाकडून हिंदी ज्योतिष्याकडे आलें व त्याप्रमाणें एका ज्योतिष्यानें तेथें आपला ग्रंथ नेऊन त्याचा प्रसार केला. खलीफानें त्या ग्रंथाचें भाषांतर स. ७७३ मध्यें आरबी भाषेंत करविलें व हा ग्रंथ सिदहिंद नांवानें तिकडे रूढ झाला. अरबांचें इटालींतील लोकांशीं व्यापारी दळणवळण असल्यामुळें हिंदी अंकगणितपद्धतीचा परिचय इटालियनांना आरबांमार्फत झाला; व याच अंकगणितपद्धतीच्या आधारानें न्यूटनसारख्या कल्पक मनुष्यास युरोपांत ज्योतिषशास्त्राची वाढ करतां आली (विज्ञानबोध-चरित्रखंड, पृ. ४५).

ब्रह्मदत्त—(ग्रंथकाल स. १८०२) एक हिंदी कवि. ग्रंथ-विद्वद्विलास व दीपप्रकाश.

ब्रह्मदेव—डल्हणनें निर्देश केलेला सुश्रुतटीकाकार.

ब्रह्मशिव—(स. ११२५) कानडी ग्रंथकार. यानें 'समयपरीक्षा' नांवाचा ग्रंथ लिहिला. त्यांत यानें इतर धर्मांतील दोष दाखवून जैनधर्माची स्तुति केली आहे.

ब्रह्मानंद—यानें ईशावास्य उपनिषदावर श्लोकबद्ध टीका लिहिली आहे. तिचें नांव 'ईशावास्यरहस्य' हें होय.

२. प्राकृतकवि श्रीधराचा पिता.

३. अबूच्या पहाडावर राहणारा भाट. यानें गुजराथी भाषेंत कृष्णवर्णन लिहिलें आहे.

४. हे सहजानंदाचे शिष्य (अच्युताश्रम पाहा). यांचे ग्रंथ—ब्रह्मबोध, प्रणयविवरण, ब्रह्मानंदविवरण, वैरागर (व्याकरण)-हा ग्रंथ यांचा नसून अच्युताश्रमाचा आहे असें सूचिकारांचें मत आहे (सं. सू.).

५. एकनाथचरित्रकार मुकुंदाचें चतुर्थाश्रमांतील नांव.

६. मूळ नांव गणेश. गांव-म्हसवड, गोत्र-विश्वामित्र. राजाराम प्रासादीची व यांची भेट झाली होती. समाधि ब्रह्मनाळ येथें आहे. यांचीं पदें आहेत (सं. सू.).

ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर— (स. १६४९-समाधि स. १७३८) छत्रपति शाहू व थोरले बाजीराव पेशवे यांचे गुरु. याचें जन्मस्थान वऱ्हाडांतील गणपतीचे राजुरीनजीक दुधेवाडी. पिता-महादेवभट. माता-उमाबाई. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. याचें नांव विष्णु. बाराव्या वर्षी आईबाप वारल्यानें हा विरक्त झाला आणि यानें राजुरीच्या गणपतीची आराधना केली. तेव्हां यास विष्णुबावा असें लोक म्हणूं लागले. पुढें हे काशीस जाऊन ज्ञानेंद्रसरस्वतीपासून परमहंस दीक्षा घेऊन हे ब्रह्मेंद्रस्वामी या नांवानें वावरूं लागले. तीर्थयात्रा करून स. १६९० मध्यें हे कृष्णातीरीं आले. पण तेथील राज्यक्रांतीनें खवळलेलें वातावरण पाहून हे कोंकणांत चिपळूणाजवळील पेढें गांवीं आले. तेथेंच आवजी बल्लाळ व बाळाजी विश्वनाथ यांचे यांच्यावर श्रद्धा बसली. पुढें स. १६९८ मध्यें हे परशुरामक्षेत्रीं येऊन राहिले व तेथील मंदिराचा यांनीं जीर्णोद्धार केला (स. १७०७). शाहूचीहि यांच्यावर श्रद्धा बसली. याकूबखान सिद्दी ऊर्फ बडेखान यानें यांना बोलावून दोन गांवें देऊन यांचा गौरव केला. आतां मात्र स्वामींच्या जवळ परिवार जमूं लागला. मोठाल्या लोकांशीं त्यांचा निकट संबंध यऊं लागला. कोंकणांत व देशावर मिळून दहा गांवचे हे जहागीरदार बनले. स. १७२६ मध्यें हबशी सिद्दी सात व स्वामी यांच्यांत हत्तीच्या कारणावरून तंटा होऊन स्वामी धावडशीस येऊन राहिले (कान्होजी आंगरे पाहा).

स्वामींचा संबंध सर्व प्रमुख व्यक्तींशीं असल्यामुळें आणि त्यांचा सल्लाहि घेतला जात असल्यामुळें यांना स्व दृष्टीनें महत्त्व आलें होतें. चहूंकडून द्रव्यसंग्रह करण्याचाहि स्वामींचा स्वभाव होता आणि त्यावर हे किफायतशीर सावकारीहि करीत. त्यामुळें स्वामींचा खजिना संपन्न असे. पण त्याचा उपयोगहि हे लोकोपयोगी कामांतच करीत.

जीर्णोद्धार, नवीं देवळें, तलाव, धर्मशाळा, समाधि, घाट, रस्ते, पूल व अन्नसंतर्पण हे यांचे खर्च असत.

प्रत्येक राजकारणांत लक्ष ठेवून योग्य सल्ला देण्याचें काम सतत चालू असे. नवीं माणसें पारखून त्यांना उत्तेजन देण्याचें कामहि यांनीं केलें आहे. घरगुती तंटेहि यांनीं तोडले आहेत. असे हे त्या कालांत मोठे प्रभावशाली व थोर पुरुष होऊन गेले. शेवटीं रामनामाचा उच्चार करीत यांनीं देह ठेवला. पुढें स.१७५८ मध्यें छत्रपति शाहूनें सुरू केलेलें यांच्या समाधीचें काम पुरें झालें. रा. ब. पारसनीस यांनीं यांचें चरित्र व पत्रव्यवहारहि प्रसिद्ध केला आहे. त्यावरील कै. राजवाडे यांची टीका लक्षांत घेण्यासारखी नाहीं.

ब्रिज—(१८ व्या शतकाचा प्रारंभ) भरतपूरच्या जाटाचा मूळ पुरुष. औरंगजेबाचे कारकीर्दीत यानें प्रथम पुंडावे करून व नंतर सिनासनी येथें राज्य स्थापून बादशाही मुलखास उपद्रव दिला. तेव्हां याची व बादशाही सैन्याची लढाई होऊन तींत हा मारला गेला. याच्या मागून याचा मुलगा चूडामण जाटांचा पुढारी झाला (ऐ. च. भा. २).

भ

भगवानदास कच्छवाह—(मृत्यु स. १५८९) अंबरचा राजा व बिहारीमलाचा पुत्र होय. याची मुलगी मानबाई अकबराची सून असून त्याची याजवर फार मर्जी होती. पंजाबची सुभेदारी याजकडे होती. यानें मानसिंहास दत्तक घेतलें. हा शूर व बुद्धिमान् राजा लाहोरास मरण पावला. याच्या मृत्यूनें अकबरास फार दुःख झालें (मु. रि. मा. १, पृ. ३४८-४९).

भगवत् रसिक—(स.१७०८ सुमार) हा हिंदी कवि टट्टी संप्रदायी स्वामी ललित मोहनीदासचा शिष्य असून यानें गुरूची गादी न स्वीकारतां आपला काळ ईश्वरभजनांत घालविला. यानें भक्तिपर पद्यें रचिलीं आहेत.

भगवंतराय—'राघवाभ्युदय' या संस्कृत नाटकाचा कर्ता.

भगवंतराय खीची—(लेखनकाल स. १८१७) हा फत्तेपूर(असोथर)चा राजा असून हिंदी कविहि होता. शिवसिंहसरोज ग्रंथांत यानें संपूर्ण रामायणाचें काव्य केल्याचा उल्लेख आहे.

भगवंतराव पिंगळे—यांचा पुत्र गोविंदराव हा पुण्याच्या पिंगळे घराण्याचा संस्थापक.

भगवंतराव रामचंद्रराव अमात्य—(जन्म स. १६७६-मृत्यु स. १७५५) हा रामचंद्रपंताचा थोरला मुलगा. यासुद्धां चार मुलें रामचंद्रपंताच्या उतार वयांत झालीं. याचा जन्म माघ शु. १५ शके १५९८ मध्यें झाला (इ. सं. पे. द. मा. पृ. १). रामचंद्रपंत वारला तेव्हां हा चाळीस वर्षांचा होता. हा कोल्हापूर राज्याचा अमात्य झाला. परंतु या घराण्यावर संभाजी व शाहू या दोघांची इतराजी असल्यामुळें याला देशाच्या राजकारणांत स्थान नव्हतें. हा तेजस्वी व बाणेदार होता. कोल्हापूरकर जिजाबाई लिहिते, "तुम्हासहि रामचंद्रपंतांनीं सकलकलाविद्यासंपन्न केलें. त्यामागें आपण प्रतिदिनीं पुराणश्रवण करून देवब्राह्मणांचे ठायीं भक्ति धरली. धर्मशास्त्र इत्यादि सर्वहि नीति तुम्हास करतलामल" (रा. खं. ८. ९९). यानें शाहूला वैतागून लिहिलें आहे "सेवकाचे चित्ताला हेतु ऐसा आहे जे, साहेबांची सेवा करावी, कालेंवपरीत्यें वडिलांचे हातून सेवेसी अंतर पडलें. अलीकडे वडिलाप्रमाणें यथाकालानुसार सेवकानें या राज्यांत सेवा केली. परंतु सार्थक नाहीं. दरबारीं क्षुद्र माणसांचा पर्वकाळ झाला आहे. यास्तव सेवकाचें मन उद्विग्न आहे. साहेबीं दयान्तकरणें स्वाभिमानपुरःसर बहुमानपूर्वक सेवकाचे हातून सेवा घेतली तरी हजीर आहे." (भा. व. प. या. ५४). परंतु शाहूनें याजवर लोभ केला नाहीं. उदाजी चव्हाणास हाताशीं धरून संभाजीच्या तर्फेनें लढण्याची यानें शिकस्त केली, पण यास यश आलें नाहीं. आपल्या विरुद्ध हा खटपट करतो असें वाटून संभाजीनें याचीं गांवें जप्त केलीं. यासंबंधांत जिजाबाईशीं याचा पत्रव्यवहार पाहण्यालायक आहे (रा. खं. ८. ९२-१३५). विशेषतः द्वारकोजी यादवाचें पत्र भाषा, भावना व कारस्थान या दृष्टीनें वाचण्यासारखें आहे. आंगरे व

सावंत यांच्या दरम्यान अमात्याचा प्रदेश असल्यानें त्यांच्याशीं याचें युद्धप्रसंग वारंवार होत (रा. खं. ८. १५१). वारणेच्या तहाच्या प्रसंगीं आपली व्यवस्था लावण्याकरितां हा साताऱ्यास गेला होता, पण याची दाद लागली नाहीं. पुनः स. १७४० मध्यें हा संभाजीबरोबर साताऱ्यास गेला तेथें शाहूनें दोघांची गोडी करून दिली व अमात्यांची नीट व्यवस्था लावण्याबद्दल संभाजीकडून शाहूनें शपथ घेवविली. पण पराक्रमाला वाव नसल्यानें हा निजामाकडे जाण्याच्या बेतांत होता (रा. खं. ८. १७२–१८२). इतक्यांत अंतकाळीं रामराजास आणण्याकरितां शाहूस भगवंतरावाची जरूरी लागली आणि रामराजा गादीवर आल्यावर सातारचें अमात्यपद यास मिळालें. तथापि पेशव्यानें सर्व आटोप केल्यामुळें भगवंतरावाचा उत्कर्ष झाला नाहीं. हा स. १७५५ मध्यें पुण्यास मरण पावला. याची पत्नी व्यंकूबाई ही निळोपंत पिंगळ्याची मुलगी असून मोठी कर्ती होती. याचा पुत्र कृष्णराव यास स. १७५० मध्यें कोल्हापूरचें अमात्यपद मिळालें (म. रि. मध्य. ३. २९१).

भगीरथ—याच्या पित्याचें नांव हर्षदेव. हर्षदेव हा जगच्चंद्राचा पुरोहित होता. जगच्चंद्र हा कूर्मांचलाधिपराजा ज्ञानचंद्राचा पुत्र होय.

भगीरथ अथवा **मेघडक्कर**—(स. १४०० सुमार) महेश ठक्करच्या तीन मुलांपैकीं हा दुसरा होय. यानें वर्धमानाच्या कुसुमांजलिप्रकाशावर 'जलद' नांवाची टीका लिहिली आहे. तीस कुसुमांजलि–प्रकाश–प्रकाशिका असेंहि म्हणतात. याशिवाय वर्धमानाच्या आणखी दोन ग्रंथांवर यानें टीका लिहिल्या आहेत, (१) किरणावली–प्रकाश–प्रकाशिका व (२) (न्याय) लीलावती-प्रकाशव्याख्या.

भगीरथ कदंब—(स. ३८५–४१०) हा बनवासीच्या कंगवर्मा कदंबाचा पुत्र.

भगीरथराव शिंदे—(स. १७७९ सुमार) हा व पराशर दादाजी गोहलकर हे दोघेजण जमावानिशीं गुलजारखानाचें पारिपत्य करीत होते असा उल्लेख ता. ६–१०–१७७९ चे महादजीनें फत्तेसिंगास लिहिलेल्या पत्रांत आला आहे (म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. २४५).

भट्टकल्लट—(स. ८५० सुमार) मुकुल कवीचा पिता. हा वसुगुप्ताचा शिष्य होता. हा अवंतीवर्मन्च्या वेळेस म्हणजे स. नवव्या शतकांत होता. रत्नाकरपंडित व हा समकालीन होय.

भट्टकेदार—(स. १५०० सुमार) एक हिंदी कवि. दयालदासकृत 'राठौडांरी' मध्यें निर्देशिलेल्या 'जयचंद-प्रकाश' या अनुपलब्ध महाकाव्याचा कर्ता. 'पृथ्वीराजारासो' या ग्रंथांत याचा निर्देश आहे.

२. (केदारभट्ट पाहा).

भट्टजयंत—(अभिनंद पाहा).

भट्टतौत किंवा **तौन**—(स. ९६०–९० सुमार) हा लोचनकार अभिनवगुप्ताच्या गुरूंपैकीं एक. यानें 'काव्यकौतुक' नांवाचा ग्रंथ लिहिल्याचा लोचनांत निर्देश आहे. तसेंच अभिनवभारतींतहि याच्या अनेक मतांचा उल्लेख आला आहे. शान्तरस हा मोक्षकारक असल्यानें सर्व रसांत श्रेष्ठ आहे. दुसरा नायक, त्याचा कर्ता व रसिक यांना एकच अनुभव येतो. तिसरा तो विषय प्रत्यक्ष पुढें असल्याची संवेदना झाली म्हणजे रसोद्गम होतो. अभिनवभारतींत याचा उताराहि आढळतो. हेमचन्द्रानें काव्यानुशासनांत याची तीन पद्यें दिलीं आहेत. यानें शंकराचें खंडण केलें आहे. याचा काव्यकौतुक हा महत्त्वाचा ग्रंथ अद्यापि अप्रसिद्धच आहे.

भट्टनायक—(स. ९००–१००० सुमार) याचा हृदयदर्पण नांवाचा ग्रंथ छापलेला नाहीं आणि त्याची हस्तलिखित प्रतहि उपलब्ध नाहीं. इतर ग्रंथांतील त्याच्या उल्लेखावरून त्याचें अस्तित्व दिसून येतें. मम्मट व हेमचंद्र वगैरेंनीं त्याचा निर्देश केला आहे. लोचनकारानें यासंबंधी कटु शब्दांची योजना केली आहे त्यावरून हा लोचनाकराचा समकालीन असावा.

भट्टनारायण—हा काश्मीराकडील कवि होय. 'स्तवचिंतामणि' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता. उत्पलभट्ट व हा हे दोघे समकालीन होत. क्षेमराज हा याच्या मागला होय. कारण याच्या ग्रंथावर त्याची टीका आहे.

२. (नारायणभट्ट पाहा).

भट्टभास्कर—एक मोठा मीमांसक.

२. यानें वेदांवर भाष्यें लिहिलीं आहेत. सायणानें ऋग्वेद भाष्यांत याच्या मताचा निर्देश केला आहे. तैत्तिरीयसंहिता व ब्राह्मण यांवरील याचीं भाष्यें छापूनहि झालीं आहेत (म्हैसूर ओरि. सीरीज). याच्या ब्रह्मावरील भाष्याचें कै. का. वा. लेले यांनीं मराठींत भाषांतर केलें आहे. यानें चारहि वेदांवर भाष्यें लिहिलीं असावींत.

भट्टंभट्टात्मज शिवराम अकोलकर—(स. १७५६ सुमार) यानें प्राकृतांत वेगवेगळ्या वृत्तांत श्लोकबद्ध असा 'चैतन्यचंद्रिका' (श्लोक ६४) नांवाचा एक ग्रंथ रचिला (मं. श. १८३६, वा. इ. ले. ५७).

भट्टमूर्ति—(काव्यकाल स. १५६०) हा तेलंगी ब्राह्मण. पेनुमंडळ सुभ्यांतील एका खेड्यांत जन्मला असें कविचरित्रांत म्हटलें आहे. हा विजयनगरच्या रामरायाच्या आश्रित कवींतील मुख्य. याला 'रामराजभूषण' अशी पदवी होती. यानें 'वसुचरित्रम्' व 'नरसभूपालीयम्' असे दोन ग्रंथ लिहिले. यानें स. १५६० मध्यें लिहावयास सुरुवात केली आणि सहा वर्षांत अपूर्व कीर्ति संपादन केली. हा रामरायानंतर तिरुमलाचाहि आश्रित होता. याचा अलंकारशास्त्रावरील 'नरसभूपालीय' हा ग्रंथ म्हणजे संस्कृत ग्रंथाचें तेलगू भाषांतर होय. याशिवाय यानें 'हरिश्चंद्र, नलोपाख्यान' हा ग्रंथ दुसऱ्या वेंकट राजाचे कारकीर्दीत लिहिला. याचा छंदःशास्त्रावरहि ग्रंथ आहे.

भट्टवामुख—हा रुद्रकाचा पिता.

भट्टस्वामी—(भट्टि पाहा).

भट्टाकलंकदेव—कानडी भाषेचा जैनधर्मी कवि. गुरु-अकलंकदेव. हा विजयनगरच्या श्रीरंगाचा आश्रित होता (स. १५७३-१५८४). पेनगुंडीच्या व्यंकटपतिरायाचा याला आश्रय होता (स. १५८६-१६१५). ग्रंथ-कर्नाटकशब्दानुशासन (ले. का. स. १६०४).

हा संस्कृत, प्राकृत, मागधी, कानडी इत्यादि सहा भाषांत निष्णात होता. कर्नाटकशब्दानुशासन हा कानडी भाषेचा व्याकरणग्रंथ असला तरी तो संस्कृतमध्यें लिहिला आहे. त्यावरील स्वकृत वृत्ति व व्याख्याहि संस्कृतमध्येंच लिहिली आहे. उदाहरणें मात्र प्रसिद्ध कानडी ग्रंथांतून घेतलीं आहेत, त्यामुळें केवळ कानडी भाषा जाणणारांत याच्या ग्रंथाचा विशेष प्रचार झाला नाहीं. हा ग्रंथकार कानडी भाषेचा, ती भाषा शास्त्रोपयोगी आहे म्हणून, अभिमान बाळगतो (क. क. च. भा. २, पा. ३४८).

भट्टाचार्य—जैनग्रंथांत कुमारिलभट्टाचा या नांवानें निर्देश आहे.

भट्टार्क मैत्रक—(स.४९०-५२६) हा वलभीच्या मैत्रक घराण्याचा संस्थापक होय. यानें मैत्रक घराण्याची स्थापना स. ४९० मध्यें केली. याला चार मुलगे होते. याचा ध्रुवसेन नांवाचा मुलगा फार प्रसिद्ध राजा होऊन गेला. ध्रुवसेन स. ५२६ च्या सुमारास गादीवर आला. ध्रुवसेनाचे कारकीर्दीत जैन लोकांनीं याचे राज्यांत शिरकाव करून धर्माचा फैलाव केला. यास सेनापति म्हटलेलें आहे. हा गुप्त सम्राटांच्या सैन्यांतील एक सरदार होता. पुढें जेव्हां गुप्त साम्राज्य नाममात्र राहिलें, तेव्हां हा वलभीच्या जहागिरीचा स्वतंत्र राजा बनला. आणि पूर्वीपासून चालत आलेलें सेनापति हें नांव यानें बहुमानास्पद म्हणून कायम ठेवलें.

भट्टि—(स. ५००-६५० सुमार) सुप्रसिद्ध भट्टि काव्याचा कर्ता. भट्टि काव्याचे बावीस सर्ग असून व्याकरणाच्या नियमांनीं सिद्ध झालेल्या रूपांचे प्रयोग करून दाखविण्याच्या प्रधान हेतूनेंच यानें हें काव्य रचलें आहे. त्याचीं प्रकीर्णकाण्ड (सर्ग १-५), अधिकारकाण्ड (सर्ग ६-९), प्रसन्नकाण्ड (सर्ग १०-१३) व तिङन्तकाण्ड (सर्ग १४-२२) अशीं चार काण्डें आहेत.

भट्टीच्या काळाचें विवेचन व निर्णय कै. प्रो. कमळाशंकर प्राणशंकर त्रिवेदी यांनीं मुंबई सरकारच्या संस्कृतग्रंथमालेंत छापलेल्या भट्टिकाव्याच्या प्रस्तावनेंत केला आहे. आपल्या ग्रंथाच्या अंतिम श्लोकांत भट्टीनें स्वतःच सांगितलें आहे कीं, 'काव्यमिदं विहितं मया वलभ्यां श्रीधरसेननरेन्द्रपालितायाम् ।' म्हणजे श्रीधरसेन मैत्रक राजाच्या संरक्षणाखालीं असलेल्या वलभी नगरीमध्यें मीं हें काव्य लिहिलें. जयमंगला टीकेंत 'श्रीधरसूनु नरेन्द्र' असा पाठ आहे. धरसेन नांवाचे राजे वलभीमध्यें होऊन गेले. त्यांपैकीं पहिल्या धरसेनाचें राज्य केव्हां चालू झालें हें नीट समजत नाहीं. दुसऱ्या धरसेनाच्या अगदीं पहिल्या पत्रावर वलभी शकाचें २५२ हें वर्ष आहे. तसेंच चवथ्या धरसेनाचें शेवटचें दानपत्र वलभी शक ३३२ या वर्षांतील आहे. वलभी शक स. ३१९ च्या सुमारास चालू झाला. म्हणजे वरील दोन वर्षे स. ५७१ व ६५१ हीं येतात. पहिल्या धरसेनाच्या मागून राज्यावर आलेल्या द्रोणसिंहाच्या राजवटींतील वलभी शक १८३ म्हणजे स. ५०२ हें वर्ष एका ठिकाणीं नमूद केलेलें असल्यामुळें त्यापूर्वी कांहीं वर्षे पहिला धरसेन सिंहासनावर आलेला असला पाहिजे. म्हणजे भट्टीचा काल स. ५०० पासून ६५० पर्यंत कोणता तरी असला पाहिजे.

भट्टिकाव्याच्या हस्तलिखित प्रतींत भट्टीचें नांव अनेकवार भट्टस्वामी किंवा भर्तृस्वामी असें दिलें असून याच्या पित्याचें नांव जयमंगला नामक टीकेंत श्रीस्वामी व विद्याविनोद नामक टीकाकारानें श्रीधरस्वामी असें दिलें आहे. कित्येक पंडितांच्या मतें भट्टिकाव्याचा कर्ता भट्टि, व वलभी शक ३४४ म्हणजे स. ६६३ या वर्षी चवथ्या धरसेनाचा पुत्र तिसरा ध्रुवसेन यानें ज्याच्या नांवानें दानपत्र करून दिलें आहे तो बप्पपुत्र भट्टिभट्ट एकच होत. पण डॉ. हुल्टश यानें या मतावर एपिग्राफिका

इंडिका, ग्रंथ १ मध्यें आक्षेप काढले आहेत (पान ५२). मंदोसरच्या सूर्यमंदिरांतील शिलालेखांत जो एक वत्सभट्टि म्हणून सांगितला आहे तोच भट्टिकाव्याचा कर्ता होय, असें बॉंबे रॉयल एशियाटिक सोसायटीच्या स. १९०४ च्या जर्नलमध्यें श्री. मुजुमदार यांनीं प्रतिपादिलें आहे. हा मंदोसर-शिलालेख स. ४७३ या वर्षीचा असून डॉ. फ्लीटनें प्रसिद्ध केलेल्या गुप्तांच्या कोरीव लेखसंग्रहांत क्रमांक १८ मध्यें छापला आहे. श्री. मुजुमदारांचें मत त्या लेखांतील श्लोक व भट्टिकाव्यांतील दुसऱ्या सर्गांतील शरद्वर्णनाचे श्लोक यांच्या साम्यावरून झालेलें आहे. तें मान्य केल्यास भट्टि हा पहिल्या धरसेनाच्या राजवटींत होऊन गेला असें म्हणावें लागतें. पण प्रो. कीथ यांनीं त्या मताला सर्वथैव अग्राह्य म्हटलें आहे. अशा रीतीनें भट्टीच्या निश्चित कालाविषयीं कीथ व मुजुमदार यांमध्यें वाद असला तरी भट्टि हा भारवि व दंडी यांच्यापूर्वी होऊन गेला, व भट्टिकाव्य वाक्यपदीयाचा कर्ता भर्तृहरि यानें रचलेलें नव्हे याविषयीं उभयतांचें एकमतच आहे. भट्टिकाव्यावरील अनेक टीकांची माहिती आफ्रेक्ट्च्या सूचीवरून मिळते.

भट्टिभट्ट—बप्पाचा मुलगा (भट्टि पाहा).

भट्टेन्दुराज—(स. ९९० सुमार) हा सौचुकाचा नातू आणि भूतिराजाचा पुत्र. याचें गोत्र कात्यायन. हा अभिनवगुप्ताचा गुरु होता.

भट्टोजी दीक्षित—(स.१६३० सुमार) एक वैय्याकरणी कृष्णयजुर्वेदी तैत्तिरीय ब्राह्मण. स. १६३० च्या सुमारास हा हयात होता. याच्या बापाचें नांव लक्ष्मीधर. भट्टोजीचा गुरु शेषकृष्ण होता. ह्यांनीं पाणिनीच्या व्याकरणावर सिद्धांतकौमुदी ही प्रख्यात टीका लिहिली आहे. ही इतकी लोकप्रिय झाली आहे कीं, तिच्यामुळें पाणिनीचें व्याकरण व इतर व्याकरणकारहि मागें पडले आहेत.

भट्टोजीच्या नांवावर प्रौढमनोरमा (सिद्धांतकौमुदीवरील टीका), वैय्याकरणभूषण, संध्यामंत्रव्याख्यान, शब्दकौस्तुभ अपूर्ण (अष्टाध्यायावरील टीका, या ग्रंथावर उपटीका झाल्या आहेत), अशौचनिर्णय इत्यादि बरेच ग्रंथ आढळतात. हा काशीस वारला. याला मनाजोगा विद्यार्थी न मिळाल्यानें हा राक्षस झाला व पुढें यानें एका विद्यार्थ्यास व्याकरण शिकवून त्याच्याकडून गति घेतली अशी दंतकथा आहे (बेलवलकर-सि. सं. ग्रामर).

भट्टोत्पल—(स. ९६६) हा एक मोठा टीकाकार होऊन गेला. यानें खंडखाद्यावरील टीका पूर्ण केली. तसेंच वराहाच्या 'यात्रा' या ग्रंथावरहि टीका बृहत्संहिता टीकेच्या पूर्वी केली असें तीमधील उल्लेखावरून दिसतें. लघुजातकावरहि याची टीका आहे. म्हणजे यात्रा, बृहज्जातक, लघुजातक आणि बृहत्संहिता इतक्या ग्रंथांवरील टीका भट्टोत्पलानें केल्या. पैकीं 'यात्रा' वरील टीका प्रस्तुत उपलब्ध नाहीं. खंडखाद्यावरील दुसरी टीका विशेष प्रसिद्ध आहे. यावरून हा काश्मीरांतील राहणारा असावा असें अनुमान काढतां येईल. यानें वराहमिहिराच्या बृहज्जातकावर स. ९६६ मध्यें जगच्चंद्रिका नांवाची टीका लिहिली. याचा गणितस्कंधावर स्वतंत्र ग्रंथ असावा असें वाटतें व दुसरा 'प्रश्नज्ञान' या नांवाचा ७२ आर्यांचा ग्रंथहि यानेंच केला आहे. हा प्राचीन ग्रंथाचा शोधक होता. याचें वाचनहि बरेंच असल्याचें यानें घेतलेल्या जुन्या आधारावरून दिसतें. हें नांव भटोत्पल असें भा. ज्यो. कारांनीं लिहिलें आहे.

भद्र नारायण—बाणभट्टकवीचा मित्र.

भद्रपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं चोविसावा सिद्ध होय. जात ब्राह्मण.

भद्रबाहु—(मृत्यु ख्रि. पू. २९७) हा जैन आचार्य मौर्य सम्राट् सम्प्रतीचा गुरु होता. भद्रबाहुचरित्र नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांत याच्या चरित्राबरोबर मौर्य साम्राज्यविषयक अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा निर्देश आला आहे. त्यांत पुढील माहिती आढळते. अवंति देशांत चंद्रगुप्ति नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याची राजधानी उज्जयनी होती. एकदां चंद्रगुप्ति निजला असतां भावी अरिष्टसूचक सोळा स्वप्नें पडलीं. सकाळी उठतांच भद्रबाहुस्वामी आल्याची त्याला बातमी मिळाली. उज्जयनीमधील एका सुंदर बागेंत याचा मुक्काम होता. राजाहि मुनिसमुदायासह भद्रबाहूच्या दर्शनार्थ गेला आणि आपल्या स्वप्नाचें फळ याला विचारलें. स्वप्नाचें फळ समजावून घेतल्यावर त्यानें याच्यापासून जैनधर्माची दीक्षा घेतली, व तो याच्या सेवेंत तत्पर झाला. कांहीं दिवसांनंतर हा शेठ जिनदासाच्या घरीं आला. तेथें पाळण्यांत निजलेल्या एका साठ दिवसांच्या मुलानें याला पाहून 'जा जा' असें म्हणण्यास सुरुवात केली. हें ऐकतांच याच्या ध्यानांत आलें कीं लवकरच बारा वर्षांचा भयंकर दुष्काळ पडावयाचा आहे. मग यानें आपल्या पांचशें मुनींसह दक्षिणेकडे जाण्याचा निश्चय केला. दक्षिणेत पोंचल्यावर याच्या ध्यानांत आलें कीं आपलें आयुष्य थोडें राहिलें आहे. म्हणून यानें आपल्या जागीं विशाखाचार्याची योजना करून स्वतः एकांतांत मृत्यूची वाट पाहत राहूं

लागला. चंद्रगुप्ति तेथें याच्याजवळ राहत असे. यानें त्याला जवळ न राहण्याविषयीं पुष्कळ सांगितलें, पण उपयोग झाला नाहीं. भद्रबाहूनें लवकरच देह ठेविला व जैनधर्माची दीक्षा घेऊन याच्याबरोबर नेहमीं राहणाऱ्या मौर्य सम्प्रतीनेंहि तेथेंच देह ठेवला. हें ठिकाण म्हणजे श्रवणबेलगोला (म्हैसूर) हें होय. तेथील स्थानिक शिलालेख व आख्यायिका यांचाहि या गोष्टीस दुजोरा आहे. वादग्रस्त प्रश्न फक्त हा चंद्रगुप्ति म्हणजे चंद्रगुप्त मौर्य किंवा संप्रति मौर्य, हा आहे. संप्रति मौर्य असावा.

भद्रबाहु नांवाचे दोन आचार्य झाले. एक ख्रि. पू. ४३३–३५७ व दुसरा ख्रि. पू. १२ या वर्षी झाला. पण यांसंबंधीं अधिक निर्णय करतां येत नाहीं. प्रारंभीं दिलेला निर्वाणकाल संप्रति मौर्याच्या कालानुसार दिला आहे.

याचे ग्रंथ १ श्रीमंडलप्रकरणवृत्ति (ज्योतिष), २ चतुर्विंशतिप्रबंध, ३ दशवैकालिकानिर्युक्ति, ४ आवश्यकसूत्रनिर्युक्ति, ५ उत्तराध्ययनसूत्रनिर्युक्ति, ६ आचारांगसूत्रनिर्युक्ति, ७ सूत्रकृतांगसूत्रनिर्युक्ति, ८ दशश्रुतस्कंधसूत्र, ९ कल्पसूत्र, १० व्यवहारसूत्र, ११ सूर्यप्रज्ञप्तिसूत्र, १२ श्रीभाषितसूत्र.

यानें ज्ञानाची एक स्वतंत्र शाखा सुरू केली.

भद्रापा नायक—(स. १५६५ सुमार) हा केलडीच्या सदाशिव नायकाचा भाऊ होय. जेव्हां सदाशिव म्हातारा झाला आणि कारभार पाहण्यास असमर्थ झाला तेव्हां त्यानें याला 'इम्मडी सदाशिव नायक' ही पदवी देऊन केलडीच्या गादीवर बसविलें. गादीवर आल्यावर यानें आपली केलडी राजधानी बदलून इक्केरीस नेली. याची कारकीर्द फार थोडी होती. याला विजयनगरच्या रामरायानें पदच्युत केलें.

भद्रापा बिदनूरकर—(स. १६६२–६३) शिवापा बिदनूरकराचा मुलगा. त्यानंतर हा बिदनूरकराच्या गादीवर आला. याच्या मागून सोमा शंकर किंवा सोमशेखर हा त्याच्या गादीवर आला.

भरद्वाज—या कवीचें 'कालीयकुतूहलम्' नांवाचें संस्कृत काव्य प्रसिद्ध आहे.

भर्तृदामा क्षत्रप—(स. २८४–२८९) हा दुसऱ्या रुद्रसेन क्षत्रपाचा पुत्र. याचीं नाणीं शा. श. २०६–२१८ पर्यंतचीं मिळालीं आहेत. हा महाक्षत्रप होता. याचा पुत्र विश्वसेन.

भर्तृप्रपंच—(स. ५०० सुमार) एक आचार्य. यानें बृहदारण्यकोपनिषदावर विस्तृत भाष्य लिहिलें होतें. श्री आद्यशंकराचार्यांनीं तें भाष्य पाहिलें असावें असें त्यांच्या 'तस्या इयमल्पग्रन्था वृत्तिरारभ्यते' या लिहिण्यावरून दिसतें. आनन्दगिरीनें आपल्या भाष्यांत स्पष्टीकरणहि तसें केलेलें आहे (बृह. उ. १. १. १). आनंदगिरीच्या भाष्यामधून याचे सर्व उतारे शोधून काढून प्रो. हिरियाना यानें एक लेख लिहिला आहे. आणि तो मद्रासच्या तिसऱ्या ओरिएंटल कॉन्फरन्सच्या प्रोसिडिंगमध्यें छापला आहे (स. १९२४, पृ. ४३०–४५०).

भर्तृभट्ट गुहिलोत—(स. ९०३) मेवाडच्या गादीवर हा मत्तटानंतर आला. याला भर्तृभट असेंहि म्हणतात. याला सिंह व ईशानभट असे दोन पुत्र होते. त्यांपैकीं सिंह याच्यानंतर गादीवर आला व ईशानभट चारसुच्या (जयपूर राज्यांत) आसपासच्या प्रदेशावर राजा झाला.

२. (स. ९४२–४३) हा मेवाडच्या गादीवर तिसऱ्या खुंमाणानंतर आला. हा तिसऱ्या खुंमाणाचा पुत्र होय. याच्या पत्नीचें नांव महालक्ष्मी होय. ती राष्ट्रकूट घराण्यांतील होती. तिचा पुत्र अल्लट होय. ही महालक्ष्मी हथूंडी (हस्तिकुंडी) च्या राठोड राजा मंमटाची मुलगी असावी. कदाचित् बहीण असेल. तो याचा समकालीन व संबंधी होता. याच्या वेळचे दोन शिलालेख आतांपर्यंत मिळाले आहेत. एक वि. सं. ९९९ (स. ९४२) श्रावण शु. १ चा प्रतापगड येथें मिळाला आहे. खोंमाणचा पुत्र महाराजाधिराज श्रीभर्तृभट्टानें घोंटावर्षी (प्रतापगडापासून सात मैलांवरील घोंटासी) गांवच्या इंद्रराजादित्यदेव नांवाच्या सूर्यमंदिराला पलासकूपिका (परासिया मंदोसरपासून १५ मैल दक्षिणेस) गांवचें बंबूलिका शेत दिलें (एपि. इंडि. १०.२४), असें एका लेखांत आहे. दुसरा वि. सं. १००० (स. ९४३) ज्येष्ठ शु. ५ चा फुटका आहे. तो आहाड येथें मिळाला. त्यांत भर्तृनृपाच्या वेळीं आदिवराह नांवाच्या मनुष्याच्या द्वारें गंगोद्भेद (आहाडांतील गंगोभेद) तीर्थावर आदिवराहाचें मंदिर बांधल्याचा निर्देश आहे (राजपूताना म्युझियम् (अजमेर) चा १९१३-१४ चा रिपोर्ट, पा. २). मेवाडांतील भर्तृपुर (भटेवर गांव), व जैनांचे भर्तृपूरीयगच्छ हे यांच्या नांवानें बसविलेले आहेत असें मानितात. याचा मुलगा अल्लट हा वि. सं. १००८ (स. ९५१) मध्यें राजा होता त्या अर्थी याचा मृत्यु वि. सं. १०००–१००८ (स. ९४३–९५१) च्या मध्यें केव्हांतरी झाला असावा.

भर्तृयज्ञ—(स. ८०० पूर्वी) एक प्राचीन टीकाकार. यानें कात्यायनश्रौतसूत्र, पारस्करगृह्यसूत्र व गौतमधर्मसूत्रांवर टीका लिहिल्या होत्या असें उताऱ्यांवरून दिसतें.

भर्तृस्वामी—(भट्टि पाहा).

भर्तृहरि—(मृत्यु स. ६५०) एक व्याकरणकार. याचा वाक्यपदीय ग्रंथ प्रसिद्ध होता. आगम, वाक्य, प्रकीर्ण (पद) अशा तीन कांडांत यानें त्रिपादीची व्याख्या केली. ती सध्यां उपलब्ध आहे. व्याडीचा संग्रहग्रंथ नष्ट झाला आणि अध्ययनपरंपरा नष्ट झाल्यामुळें महाभाष्यहि दक्षिणेंत केवळ ग्रंथरूपानें शिल्लक राहिलें. तेव्हां हा थोडक्यांत सर्व समजून घेऊं इच्छिणाऱ्याकरितां वाक्यपदीय ग्रंथ लिहिला, असें वाक्यपदीयाच्या दुसऱ्या कांडाच्या अंतीं लिहिलेलें आहे. चिनी प्रवासी इत्सिंग आपल्या प्रवास-वृत्तांत, हा स. ६५० मध्यें मरण पावल्याचें लिहितो. याचें एक वाक्य कुमारिलानें उद्धृत केलें आहे.

२. शतकत्रयकर्ता भर्तृहरि यापेक्षां वेगळा मानतात.

भलहपा—यालाच भवपा असें म्हणतात. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एकोणचाळिसावा सिद्ध होय. हा जातीनें क्षत्रिय होता.

भलिपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं बासष्टावा सिद्ध होय. हा जातीनें कृष्णधृतवणिक असून राहणारा इगत-पुरीचा होय.

२. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं चौऱ्यांशीवा सिद्ध होय. यालाच व्यालिपा असें म्हणतात. हा जातीनें ब्राह्मण होता.

भल्लट—भल्लटशतक नांवाच्या संस्कृत ग्रंथाचा कर्ता. अभिनवगुप्तानें ध्वन्यालोकलोचनांत याचा निर्देश केला आहे. भल्लटशतक काव्यमालेंत छापलें आहे. ' रत्नत्रये भल्लटशतकम् समाप्तम् ' असें शेवटीं म्हटलें असल्यामुळें भल्लटशतकाशिवाय आणखी याचे दोन ग्रंथ असावेत.

भवदेवभट्ट—(स. १००० सुमार) बंगाल्यांतील वर्म घराण्यांतील हरिवर्म राजाचा मंत्री. यानें ओरिसांतील भुवनेश्वराचें देऊळ बांधलें. तेथें याच्या घराण्याची माहिती शिलालेखांकित आहे. याचे ग्रंथ–१ व्यवहारतिलक, (अप्रसिद्ध), २ प्रायश्चित्तविवरण, ३ तौतातिकमततिलक.

याचा पिता गोवर्धन. माता सांगोका. यानें ' बाल-वलभीभुजंग ' अशी पदवी धारण केली होती.

भवनंदी—(स. १२०० सुमार) यानें तिसऱ्या कुलोत्तुंग चोलाच्या वेळीं नन्नुल हें तामीळ व्याकरण लिहिलें.

भवभूति—(स. ७००–५०) संस्कृत भाषेंतील महाकवि. याचे ग्रंथः–१ महावीरचरित, २ मालतीमाधव, ३ उत्तररामचरित, ४ गुणरत्न (१३ श्लोक अपूर्ण). पहिलीं तीनहि नाटकें आहेत. पहिलें अर्धे राहिलेलें दुसऱ्यानें पुरें केलें आहे. दुसरें नाटक दहा अंकी असून कल्पित कथेवर रचलेलें दिसतें. पहिलें व तिसरें मिळून समग्र रामचरित्र गायिलेलें दिसतें. यांचें उत्तररामचरित हें नाटक करुणरसाबद्दल विशेष प्रसिद्ध आहे.

हा विदर्भांतील पद्मपूरचा राहणारा. कुलनाम उदुंबर. काश्यपगोत्री तैत्तिरियशाखी ब्राह्मण. भट्टगोपाल-नीलकंठ-श्रीकंठ (भवभूति) असा याचा वंश आहे. माता जातुकर्णी. गुरूचें नांव ज्ञाननिधि. यांचें पद्मपूर चांद्याजवळील नसून मंदोसरजवळचें असावें, असें कांहीं लोक म्हणतात. हा कनोजच्या यशोवर्मनृच्या पदरीं होता, असें राजतरंगिणींत म्हटलें आहे. या यशोवर्म्याच्या पदरीं वाक्पतिराज नांवाचा कवि होता आणि त्यानें यशोवर्म्याचें गुणवर्णन करणारें ' गौडवहो ' नांवाचें काव्य लिहिलें त्यांत याचा निर्देश आहे. कुमारिलभट्टाचा भवभूति शिष्य होता, व मीमांस-वार्तिकावर टीका लिहिणारा अंबेक व हा एकच होय, असें डॉ. भांडारकर ' मालतीमाधव'च्या प्रस्तावनेंत म्हणतात.

भवानभगत—हा खंबायत परगण्यांत राहणारा कानफाट्या गोसावी होता. यानें ' आत्मज्ञान ' नांवाचा ग्रंथ गुजराथींत केला.

(श्रीनिवास ऊर्फ) भवानराव प्रतिनिधी—(मृत्यु स.१७७७) औंधचे श्रीपतराव हे निपुत्रिक वारल्या-मुळें त्यांच्या चुलत नातवास तें पद मिळालें. मध्यंतरी दादासाहेब पेशव्यांनीं एक वर्ष हें पद नारो शंकर यास दिलें होतें. तेव्हां हा पेशव्यांविरुद्ध उठून निजामासहि जाऊन मिळाला होता. स. १७६८ त यांचें व पेशव्यांचें सख्य होऊन याला पुन्हां पद मिळालें. हा बारभाईंतील असून नानांच्या मर्जीतील होता. हा स. १७७७ मध्यें वारला. त्या वेळीं याच्या काशीबाई व यमुनाबाई नांवांच्या दोन बायका होत्या.

भवानंद सिद्धांत वागीश—(स. १६२५ सुमार) हा राघवेंद्राचा गुरु. याचे ग्रंथ–१ तत्त्वचिंतामणिदीधिति-प्रकाशिका, २ प्रत्येकालोकसारमंजरी, ३ तत्त्वचिंतामणि-टीका, ४ कारकविवेचन (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४७९).

भवानी काळो-लू—(स. १७६४–१८०३ सुमार) हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण असून वऱ्हाडांतील मंगरूळ तालुक्यांतील खडीधामणी वगैरे गांवांचा वतनदार पट-वारी होता. पुढें हा साबाजी भोसल्याचा दिवाण झाला. साबाजी जानोजीविरुद्ध माधवरावाचे पक्षास मिळण्याचे बेतांत असतांना ह्यानें त्याची समजूत घातली, आणि जानोजीचें व साबाजीचें सख्य करून दिलें. नंतर हा जानोजीच्या पदरीं राहून भोसल्यांच्या फौजेचा मुख्य झाला. हा देवाजीपंताचे पक्षाचा असून ह्यानेंच वार्शीम

येथील प्रसिद्ध बालाजीचे मूर्तीची स्थापना केली व देवालय बांधलें. पुढें साबाजी-मुधोजी लढ्यांत हा कांहीं दिवस मुधोजीच्या पक्षांत असावा (ना. भो. ब. पृ. २). चिमणाजी बापूच्या बंगालवरील स्वारींत हा त्याजबरोबर होता. कटक प्रांताचा सुभेदार शिवभट साठे यानें बंड केलें असतां ह्यास त्याची जागा देण्यांत आली (स. १७६१ एप्रिल). दिवाकरपंताचे मागून हा दिवाणाचेंहि काम पाहूं लागला. हा चिमणाजी बापूचे पक्षाचा असल्यामुळें रघूजीची यावर गैरमर्जी झाली. ह्याच्या वाडिलाचें नांव काळोजी होतें. त्यावरून या घराण्याचें आडनांव काळो-ळू असेंच पडलें (ना. प्रां. इ.).

भवानीपंत मुनशी—(मृत्यु ता. १९. २. १७९०) भवानी नागनाथ हा जानोजीचा सल्लागार होता. जानोजीचे कारकीर्दीचे अखेरीस दिवाकरपंत हा मागें पडून भवानीपंत मुनशी व भवानी काळो हे पुढें आले. देवाजीपंताविषयीं पेशवे व जानोजी या दोघांचींहि मनें कलुषित झालीं होतीं.

भवानीपंत हा एलिचपूरकडील राहणारा असून प्रथम एलिचपूरच्या नबाबाचे पदरीं होता. हा फार्सी लिहिणेवाचणें उत्तम जाणत असे. हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण होता. याचे वंशज नागपुरास आहेत. त्यांचा वाडा व देवळें प्रसिद्ध आहेत.

हा एलिचपुराहून पहिल्या रघूजीचे वेळीं नागपुरास आला व देवगडकर गोंडराजे बुर्‍हाणशहा याजकडे फार्सी पढविण्याकरितां राहिला. स. १७५१ मध्यें रघूजी भोसले व बंगालचा नबाब अलीवर्दीखान यांजमध्यें तह झाला त्या वेळीं याचे फार्सी मसुदे फार पसंत पडल्यामुळें रघूजीनें यास आपल्या पदरीं ठेविलें.

स. १७६३ चे निजाम व पेशवे यांच्या मोहिमेंत भवानीपंत मुनशी हा दिवाकरपंताबरोबर हजर होता. दिवाकरपंतावर इतराजी झाल्यानंतर मुनशी हा पुढें आला, व जानोजीचा दिवाण बनला. हा देवाजीपंताच्या विरुद्ध पक्षाचा मुख्य होता.

भवानीबाई महाडीक—(स. १६७९-१७२८) ही संभाजीची मुलगी म्हणजे थो. शिवाजीची नात होय. हिचा जन्म ता. २९ जानें. १६७९ रोजीं शृंगारपूर येथें झाला. ही आपली आई येसूबाई, व बंधु शाहू यांबरोबर औरंगजेबाच्या कैदेत होती. हिचें लग्न औरंगजेबाच्या छावणींत हरजीराजे महाडीक यांचा पुत्र शंकरजी राजे याजबरोबर झालें. शंकरजी हा औरंगजेबाचे नोकरींत कर्नाटकांत असतांच शाहूचे सुटकेपूर्वी दक्षिणेंत आला. त्या वेळीं भवानीबाईहि आली. राज्यावर बसतांच शाहूनें हिला वाडिलार्जित तारळें महालाच्या देशमुखीच्या सनदा करून दिल्या (स. १७०९). धामधुमींत वाताहत झालेल्या तारळ्याची १ जुलै १७१० रोजीं तारळेकरास बोलावून हिनें पुनः वसाहत केली. शाहूची हिच्यावर माया होती. हिचे पुत्र दुर्गाजी व अंबाजी. स. १७२८ च्या सुमारास शंकरजी वारला आणि हिनें सहगमन केलें.

भवानीबाई शिंदे—ही सिधोजी घाटगे याची मुलगी व महादजी शिंदे यांची बायको.

२. संगमनेरकर देशमुखांची मुलगी व महादजीची दुसरी बायको. हिचें लग्न ता. २३।१२।१७१७ रोजीं झालें (खरे ले. १९५३).

भवानीबावा—अनंतफंदीचा बाप.

भवानीराम ऊर्फ **चिमणाबहादुर**—हा राजा गिरिधराचा मुलगा. बापानंतर हा माळव्याचा सुभेदार होता.

भवानी शंकरदास—(कविताकाल स. १६५०) बंगाली कवि. हा पश्चिम बंगाल्यांतील होय (क. कौ. भा. ७).

भवानी शिवराम—हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण साबाजी भोसल्याचा दिवाण होता. पांचगांवचे लढाईत साबाजी पडल्यावर हा उमरावतीकर शिवाजी भोसल्यास जाऊन मिळाला. यानंतर यानें निजामाकडे माणसें पाठवून त्याची मदत मागितली. बाराभाईकडील व निजामाकडील मदत यास मिळाली असती तर शिवाजी भोसल्याचें बंड चांगलेंच रंगांत आलें असतें. परंतु ती न मिळाल्यामुळें हें बंड लवकरच मोडलें.

भवानी शिवराम हा यानंतर निजामाकडे व तेथून पुण्यास पेशव्याकडे गेला; पुन्हां नागपुरास आला नाहीं (अप्र. का.).

भंगप्पदेव चोल—चोल घराण्यांपैकीं विजयनगरच्या इतिहासांत येणारें नांव.

भंडि—या नांवाचा हर्षाचा एक मामा होता, असें हर्षचरित्रांत बाणभट्टानें लिहिलें आहे. वत्सराजानें भंडिकुल राजाचा पाडाव करून स्वतःकडे साम्राज्य घेतलें, असें भोजाच्या सागरतालच्या शिलालेखांत म्हटलें आहे. हा भंडिकुलांतील राजा इंद्रराज किंवा इंद्रायुध असावा. हा भंडि मौखरी कुलांतील असावा (म. भा. २ पा. १७९).

भागावती—(स. १६०० सुमार) ही मुहम्मदकुली कुत्बशाहा याची आवडती पत्नी. या गोवळकोंड्याच्या सुलतानानें हिच्या नांवानें भागानगर ऊर्फ हैद्राबाद

हें नगर वसविलें. हिचा मुलगा हैदर म्हणून त्या शहरास पुढें हैद्राबाद म्हणूं लागले.

भागीरथीबाई शिंदे—(मृत्यु स. १७९९) ही कर्डेकरांची कन्या व महादजीची पत्नी. ही महादजीच्या मृत्यूनंतर हयात होती. दौलतरावाच्या लक्षांत होती ती ही असावी. ही नगर येथें कैदेंत असतां १५-६-१७९९ मध्यें ऑगस्टांत वारली (म. रि. उ. २, पा. ४११). हिच्यामुळेंच बाया व दौलतराव यांच्यांत तेढ वाढत गेली.

भागीरथीबाई होळकर—हरिराव होळकराची बायको.

भागोदास—एक कबीरसांप्रदायी. विजक ग्रंथाचा कर्ता.

भाग्यवती—ही पश्चिम चालुक्यांपैकीं दशवर्म्याची पत्नी.

२. राष्ट्रकूट राजा जगत्तुंगाची कन्या व पालांपैकीं राज्यपालाची पत्नी.

भादेपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं बत्तिसावा सिद्ध होय. हा जातीनें ब्राह्मण असून श्रावस्ती प्रांतांत राहणारा होय. हा कण्हपाचा शिष्य. याचा एकहि ग्रंथ उपलब्ध नाहीं. चर्यागीतीमध्यें याच्या कांहीं कविता प्रसिद्ध आहेत. त्यांवरून हा हिंदी कवि होता.

भानदास—याचा जन्म स. १७२१ मध्यें झाला. शंकराचार्य व हस्तामलकाचार्य यांचा संवाद यानें रचला, आणि तो वाचनीय झाला आहे. त्यांत हस्तामलकाचार्यांनीं द्वैताद्वैताचें चांगलें विवेचन केलें आहे.

भानुकर किंवा **भानुदत्त**—(स. १५५० सुमार) वाघेल घराण्यांतील जो वीरभानू (स. १५४०–१५५५) त्याची यानें आपल्या ग्रंथांत स्तुति केलेली आहे. भानुकर आणि भानुदत्त एकच असून तो वाघेल घराण्यांतील वीरभानूच्या पदरीं होता.

हा गणेश्वराचा पुत्र आणि विदेह देशांत गंगातीरावर राहणारा होता (रसमंजरींतील शेवटचा श्लोक). विदर्भभू असाहि पाठभेद सांपडतो, पण तो गंगेच्या तीराशीं जमत नाहीं. भानुदत्त हा मैथिल होता, असें बर्नेलकृत तंजावरच्या ग्रंथनामावलींत स्पष्ट म्हटलें आहे. कोणी गोपाळानें रसमंजरीवर स. १४३७ त टीका लिहिलेली आहे. भानुदत्ताचा लेखनकाल तेराव्या शतकाच्या शेवटीं किंवा चवदाव्याच्या आरंभीं असा कांहींतरी असावा. याचे रसतरंगिणी व रसमंजरी असे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पहिल्या ग्रंथाचे आठ तरंग असून त्यांत भाव, विभाव, स्थायिभाव, अनुभाव, सात्विकभाव, व्यभिचारभाव यांचें वर्णन आहे. दुसऱ्या ग्रंथांत नायिकांचे प्रकार, नायक वगैरेंचे प्रकार सांगितले आहेत.

यानें अलंकारतिलक, रसमंजरी, रसतरंगिणी, शृंगारदीपिका, गीतगौरीपति आणि कुमारभार्गवीय असे ग्रंथ संस्कृतांत लिहिले.

भानुगुप्त—(स. ४९९) गुप्तवंशांतील बुधगुप्ताचा उत्तराधिकारी. यानें गेलेला पश्चिमेकडील प्रांत हूणराजाकडून परत घेण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत याला सफलता प्राप्त झालेली दिसत नाहीं. एरण येथील शिलालेखावरून सूचित होतें कीं गुप्त सं. १९१ (स. ५१०) मध्यें 'अर्जुनासारखा पराक्रमी श्रीभानुगुप्ताबरोबर राजा गोपराज एरण येथें आला व पराक्रमानें लढून मेला. त्याची स्त्री तेथें सती गेली' (फ्लीट, गु. इं. ले. ३६). हें युद्ध तोरमाणाशीं झालें असावें. तोरमाण व त्याचा पुत्र मिहिरकुल यांनीं गुप्तांचें राहिलेलें राज्य घेतलें, व गुप्तघराणें नामशेष झालें.

भानुचंद्र—(अकबर पाहा).

भानुदत्त—(भानुकर पाहा).

भानुदास—(स. १३७८–१५१३) हा एक महाराष्ट्रीय संत असून एकनाथाचा पणजा होय. हा सूर्यप्रसादानें झाला म्हणून याचें नांव भानुदास पडलें. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून प्रथम कापड विकण्याचा धंदा करीत असे. परंतु पुढें एक महान् भगवद्भक्त झाला. अनागोंदीच्या किरीटी रामराजानें पंढरीहून नेलेली पांडुरंगाची मूर्ति यानें परत आणली, ह्याबद्दल ह्याची फार प्रसिद्धि आहे. ह्याचे सर्व अभंग प्रकाशित नाहींत. ह्यासच चक्रपाणी नांवाचा एक मुलगा होता.

भानु दीक्षित—(स. १६३०–४१) हा अमरकोशावरील एक टीकाकार होय. रामाश्रम या नांवानेंहि हा प्रसिद्ध आहे. याच्या बापाचें नांव भट्टोजी दीक्षित होतें. याचा सत्वराज नांवाचा एक शिष्य होता. 'देवसेना' या टीकेचा कर्ता जो हरिचरणदास त्यानें याचा उल्लेख केला आहे.

भानुभट्ट—(स. ९७८) एक भारतीय ज्योतिषी व तत्त्वज्ञानी. याचा रासायनतंत्र नांवाचा तंत्रग्रंथ आणि 'करणपटतिलक' नांवाचा करणग्रंथ प्रसिद्ध आहे. खंडखाद्याच्या वरुणकृत टीकेंत भानुभट्ट याच्या ग्रंथांतले कांहीं अनुष्टुप श्लोक घेतले आहेत. खंडखाद्याची वरुणकृतटीका शके ९६२ मधील आहे.

२. (हरिकवि पाहा).

भामह—(स. ६५० सुमार) हा रक्किलगोमिन्‌चा पुत्र. गोमिन् यावरून हा बौद्ध होता, असें प्रो. एम्. टी. नरसिंह अय्यंगार यांनीं प्रतिपादिलें आहे. ब्रि. रॉयल

एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्यें यासंबंधीं उलटसुलट चर्चा आली आहे (१९०५ पा. ५३५-५४५; १९०८ पा. ५४३). प्रो. पाठक यांनीं म्हटलें आहे कीं, गोमिन् हें गोस्वामिन् शब्दाचें संक्षिप्त रूप नसून तो पूज्य किंवा मान्य अशा अर्थाचा शब्द आहे. रक्किल हा बौद्ध होता. 'गोमिन् पूज्ये' (चांद्र व्याकरण सू. ४. २. १४४) गोमान् अन्यः, या सूत्रांना अनुसरून प्रो. पाठक यांनीं आपलें विधान केलें आहे. पण नांवावरून केवळ निर्णय करणें धोक्याचें आहे.

भामहाच्या काव्यालंकारांत सध्यां न आढळणारीं अशीं कित्येक पद्यें वाणीविलासग्रंथमालेंत प्रसिद्ध झालेल्या वामनकाव्यालंकारसूत्रवृत्तीची जी कामधेनु टीका आहे तींत भामहाचीं म्हणून दिलीं असून त्यांत सूत्र, वृत्ति यांच्या व्याख्या व साहित्यशास्त्रविषयक गोष्टी आल्या आहेत. वृत्तरत्नाकर नांवाच्या ग्रंथावरील एक टीकाकार नारायण यानें भामहाच्या ग्रंथांतून लांबलचक अवतरणें दिलीं आहेत. त्यावरून भामहानें छंदःशास्त्रावरहि ग्रंथ लिहिला असावा असें दिसतें. वररुचीच्या प्राकृत व्याकरणावर टीका लिहिणारा भामह नांवाचाच आहे. पण तो व काव्यालंकार करणारा व्यक्ति एकच कीं भिन्न, याचा निर्णय करितां येण्यासारखा नाहीं. भामहाचा व दंडीचा काळ एकच आहे.

भामिनी—कानीफनाथाची आई व सुरथ राजाची बायको.

भारतीचंद—(मृत्यु स. १५७४) हा राजा रुद्रप्रताप बुंदेले यांचा मुलगा (मु. रि. भा. २, पृ. २६८).

भारतचंद्र—(स. १७२२-१७६०) हा बंगाली कवि ब्राह्मण असून नरेन्द्रनारायणाचा पुत्र होय. हा हुगळी जिल्ह्यांतील राहणारा असून ह्याचा जन्म वसन्तपूरच्या एका जमीनदार घराण्यांत झाला. जमिनविरून यास बरद्वानच्या महाराजांबरोबर झगडावें लागल्यानें याची सर्व मालमत्ता जप्त झाली. ताजपूरच्या संस्कृत शाळेंत याचें अध्ययन झालें. यानें आईबापांच्या इच्छेविरुद्ध हलक्या जातीच्या ब्राह्मण मुलीशीं लग्न लावलें. त्यामुळें बापानें यास घरांत घेतलें नाहीं. हा प्रथम कृष्णचन्द्र मुनशी व नंतर फरास दंगचा इंद्र नारायण चौधरी यांचा आश्रित होता. याची प्रतिभा पाहून यास नवद्वीपचा राजा श्रीकृष्णचंद्र यानें द. मा. ४० रु. वेतन, व सिवा राजानें १०५ रु. जहागीर व 'रायगुणाकार' ही पदवी दिली. स. १७५२ मध्यें यानें 'अन्नदामंगल' ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ बंगालमध्यें फार लोकप्रिय आहे. याशिवाय यानें रसमंजरी, चण्डीनाटक व गानसंग्रह हीं पुस्तकें लिहिलीं (क. कौ. भा. ७).

भारतीतीर्थ—वेदांताधिकरणमालाकार. काश्मीरकडील कवि.

२. हा विद्यारण्यांना पंचदशी रचूं लागणारा साहाय्यक. पंचदशीचा टीकाकार जो रामकृष्ण पंडित त्यानें याप्रमाणें म्हटलें आहेः "नत्वा श्रीभारतीतीर्थविद्यारण्यमुनीश्वरौ!" सांख्यसारांत एका पाश्चिमात्य पंडितानें विज्ञानभिक्षूच्या ग्रंथाचें भाषांतर इंग्रजींत लिहितांना हा विद्यारण्याचा गुरु असें म्हटलें आहे तें चुकीचें आहे (विद्यारण्य पाहा).

भारती विश्वनाथ—हा जातीनें न्हावी असावा. यानें नाभिकपुराण नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ मराठींत लिहिला आहे. त्यांत न्हावीजातीसंबंधीं माहिती दिली आहे. ग्रंथसमाप्तीचा काल श. १४६० दिला आहे. पण तो चुकीचा असून ग्रंथ गेल्या शतकांतील असावा (म. कविचरित्र भा. २, पा. १०८-११६).

भारद्वाज—हें महाराष्ट्रांतील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण घराणें सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं काशीस जाऊन राहिलें. यांपैकीं मूळ पुरुष महादेवभट्ट हा नारायणभट्टाच्या वंशाचा जांवई होता. यानेंच सिद्धांतमुक्तेवरील दिनकरी नांवाची टीका लिहिली. या घराण्यांतील महामहोपाध्याय दामोदरशास्त्री हे बनारस कॉलेजांत व म. म. गोविंदशास्त्री हे कलकत्ता येथें गेल्या पिढींत अध्यापक होते.

भारवि—(स. ५७५) अविनीत हा भारवीचा टीकाकार वर दिलेल्या सनाच्या सुमारास होता. हा राजनीतिशास्त्रांत निपुण होता, असें काव्यांतील निर्देशांवरून दिसतें. हा एखाद्या राजाचा राजकीय सल्लागार असावा. हा शैव होता, असें काव्यांतील शिवविषयक निर्देशांवरून वाटतें. याला छत्रभारवि असें म्हणतात. कारण याच्या काव्यांत (कि. ५. ३९) तसा निर्देश आहे (ओरिएंटल कॉन्फरस, सहावा रिपोर्ट). माघाला घंटामाघ असें म्हणत, असें त्याच निबंधांत दाखविलें आहे (माघ ४. २०; सिंहविष्णु पल्लव पाहा).

हा धारानगरीचा रहिवासी. याच्या बापाचें नांव श्रीधर व आईचें नांव सुशिला. याचें लग्न भडोचच्या चंद्रकीर्ति नांवाच्या गृहस्थाच्या रसिका नांवाच्या मुलीबरोबर झालें होतें. याचा बाप विद्वान् होता, पण त्यालाहि यानें आपल्या विद्वत्तेनें मागें टाकलें. पण हा गर्विष्ठ असल्यानें याची प्रगति खुंटली होती. तेव्हां त्यानें गर्वपरिहार होण्याकरितां

याला सहा महिने सासुरवाडीस राहावयास पाठविलें. तेथें चार दिवस सन्मान झाल्यावर याच्याकडे गाई रानांत नेण्याचें काम आलें. हा रानांत गेल्यावर गुरें चरावयास लावून झाडाच्या पानांवर काव्यानें श्लोक लिहिण्याचें काम करी. ते श्लोक म्हणजे किरातार्जुनीय काव्य होय.

किरातार्जुनीय काव्यांतील 'सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदम्' (२. ३०) हा श्लोक गहाण ठेवून याच्या बायकोनें पैसे आणल्याची एक आख्यायिका आहे. तसेंच तो श्लोक वाचल्यानें अनेक अनर्थ टळल्याच्याहि आख्यायिका आहेत.

याचा उल्लेख स. ६३४ मधील अय्याहोळे येथील शिलालेखांत आहे. तेथें याला प्रसिद्ध कवि म्हटलें आहे.

भारुचि—(स. १०५० पूर्वी) संस्कृत धर्मशास्त्रकार. विष्णुधर्मसूत्रावरील टीकाकार.

भालुकी—याचे वैद्यकांपैकीं शल्यतंत्रावर कांहीं ग्रंथ असावेत असें चक्रपाणीच्या टीकेंत आलेल्या याच्या शास्त्रविषयक उताऱ्यावरून दिसतें (सुश्रुत सूत्र. ८).

भावमिश्र—(स. १५५० नंतर) हा 'भावप्रकाश' ग्रंथाचा कर्ता होय. याच्या ग्रंथाचा उल्लेख माधवानें आपल्या 'आयुर्वेदप्रकाश' या ग्रंथांत केला आहे. हा कान्यकुब्ज असावा. हा वैद्यशास्त्रावरील ग्रंथकार शार्ङ्गधर व वङ्गसेन यांच्यापेक्षां अलीकडचा होय. यानें फिरंगरोगाचा निर्देश केला आहे.

भावसिंगराव टोके—(स. १७३१) हा त्रिंबकराव दाभाड्याचा मावसभाऊ. यानें फितुर होऊन त्रिंबकराव दाभाड्यास बाजीरावाकरितां ठार केलें.

भावसिंह कच्छवाह—(मृत्यु स. १६२१) मानसिंहाचा पुत्र. मानसिंह हा अकबराचा सेनापति होता.

भावसिंह वाघेल—(स. १६६०-१६९०). रेवा येथील एक वाघेल राजा. हा स. १६६० मध्यें गादीवर आला.

हा विद्वान् लोकांचा फार भोक्ता होता. यानें काश्मीरमधून सोमदेवाच्या 'कथासरित्सागरा'ची एक प्रत आणली व दरबारच्या पंडितांकडून तपासून घेतली. त्या प्रतीच्या भाषांतराचें काम रूपणिमिश्राकडे दिलें. रूपणिमिश्रानें त्यांत ९९ कवितांची भर घालून त्यांत भावसिंहाविषयींची, त्याच्या दरबारची वगैरे माहिती दिली असून भावसिंहाच्या घराण्याची वंशावळहि दिलेली आहे. याचे दरबारीं बालकृष्ण, किशोरा, गोवर्धनबाजपेयिन्, लालमणि, चवि आणि कमलनयन हे विद्वान् पंडित होते. याशिवाय हौत्र-कल्प-द्रुमाचा कर्ता लक्ष्मणभट्ट हाहि याचेच दरबारीं होता (Dr. S. Krishnaswami Aiyangar Commemoration Volume, 1936, 52).

भावा गणेश—हा विश्वनाथ दीक्षिताचा पुत्र. याच्या गुरूचें नांव विज्ञानभिक्षु. हा योगसूत्रवृत्ति ग्रंथाचा कर्ता.

भावेव्यास—हा महानुभाव सांप्रदायांतील ग्रंथकार होय.

भास—(ख्रि. पू. ४५०-३७०) संस्कृत भाषेंतील अत्यंत जुना नाटककार.

याचीं एकंदर १३ नाटकें आहेत. तीं प्रथम १९०९-१० सालीं उपलब्ध झालीं. तीं येणेंप्रमाणें-(१) मध्यमव्यायोग, (२) पंचरात्र, (४) दूतवाक्य, (४) दूतघटोत्कच, (५) कर्णभार, (६) ऊरुभंग, (७) प्रतिमा, (८) अभिषेक, (९) बालचरित, (१०) प्रतिज्ञायौगंधरायण, (११) स्वप्नवासवदत्त, (१२) अविमारक आणि (१३) चारुदत्त.

यांपैकीं पहिलीं सहा महाभारतावर रचलेलीं आहेत. प्रतिमा व अभिषेक हीं रामायणावर रचलेलीं आहेत. बालचरित हें हरिवंशावर रचलेलें आहे. प्रतिज्ञायौगंधरायण व स्वप्नवासवदत्त हीं वत्सराज व वासवदत्ता यांच्या ऐतिहासिक गोष्टींवर रचलेलीं आहेत. त्यांतील उदयन, प्रद्योत, दर्शक हे ऐतिहासिक आहेत. अविमारक व चारुदत्त हीं कशावर रचलेलीं आहेत हें निश्चितपणें सांगतां येणार नाहीं. उपलब्ध असलेल्या कोठल्याहि हस्तलेखांत नाटककाराचें नांव आढळत नाहीं. परंतु ह्या नाटकांचा खोल अभ्यास केल्यावर असें दिसून येतें कीं, तीं सर्व एकाच माणसानें व महामहोपाध्याय गणपतीशास्त्री यांचे म्हणण्याप्रमाणें, महाकवि कालिदास याच्या स्तुतीस पात्र झालेल्या भासानेंच लिहिलीं आहेत.

भासाची नाट्यलेखनपद्धति सामान्य नाटकांत दिसून येणाऱ्या पद्धतीहून कांहीं बाबतींत निराळी असल्याचें दिसून येतें. बाणभट्टानें म्हटल्याप्रमाणें याच्या सर्व नाटकांत सूत्रधार अगदीं पहिल्या प्रथम प्रवेश करतो. याच्या मध्यमव्यायोग या नाटकांत तर नांदीचाहि पत्ता नाहीं. याचें अपूर्ण स्थितींत राहिलेलें चारुदत्त नाटक खेरीज करून याच्या इतर सर्व नाटकांत "नांद्यन्ते ततः प्राविशति सूत्रधारः" हें वाक्य दृष्टीस पडतें. ग्रंथकाराच्या नांवाचा कोठेंहि उल्लेख केलेला नाहीं. नाटकाचा शेवट ठराविक पद्धतीनें केलेला आहे. "तुम्हांला संतुष्ट करण्यास मी आणखी काय करावें?" हा नेहमींचाच ठराविक मंत्र बहुतेक सर्वत्र शेवटीं आढळतो. बहुतेक सर्व नाटकांचे

भरतवाक्य 'इमामपि महीं कृत्स्नां राजसिंहः प्रशास्तु नः।' असेंच किंचित् फरक करून आहे. नाटकांत आर्षप्रयोग बऱ्याच ठिकाणीं आढळतात. नाटकांत 'प्रस्तावना' ऐवजीं 'स्थापना' हा शब्द आढळतो.

भासानें आपलें स्वप्नवासवदत्ता हें नाटक अग्नींत टाकलें असतांहि जळलें नाहीं, अशा तऱ्हेची आख्यायिका राजशेखर कवीनें आपल्या एका पद्यांत दिली आहे. गौडवहो (पद्य ८००) यांत भासाला 'जलणमित्त' असें जें म्हटलें आहे तें या आख्यायिकेवरूनच म्हटलें असावें.

हा मगधदेशांतील असून विष्णूचा उपासक होता.

भास्कर—कळटाच्या शिष्यपरंपरेंतील चौथ्या पिढीचा पुरुष. मीमांसासंग्रह–कौमुदी आणि पद्यामृत–सोपान हे दोन ग्रंथ याचे आहेत. याच्या बापाचें नांव दिवाकर होतें. हा काश्मीरकडे राहत असे.

२. (स. १५३८–१५७८) यानें भागवताचा दशमस्कंध ओवीबद्ध लिहिला तो अर्धवट उपलब्ध आहे (मं. वार्षिक १८३६, ले. ३१).

३. 'उन्मत्तराघव' नांवाचें एकअंकी नाटक लिहिणारा कवि.

४. (स. १३७५ सुमार) विजयनगरच्या पहिल्या बुक्कराय संगमाचा एक पुत्र. हा उदयगिरि येथें असे.

भास्कर ऊर्फ भानुभट वोरीकर—(स. १२७३ सुमार) मराठी महानुभाव कवि. शिशुपालवध नांवाचें काव्य यानें मराठींत केलें आहे. भागवताचा एकादशस्कंधहि पुढें यानेंच केला.

भास्कर नारायण—सवाई माधवरावाच्या वेळचा एक राजकीय कैदी. पायांत जड बेड्या घालून याला पंधरासोळा वर्षे कैदेंत ठेविलें होतें (ऐ. टि. १५).

भास्करमिश्र सोमयाजी—(स. १००० सुमार) याचा एक 'आपस्तंबध्वनितार्थकारिका' नांवाचा प्रबंध आहे. याच्या पित्याचें नांव 'वादिमुद्गरकुठारकुमारस्वामि सूरि' असें आहे. ग्रंथकाराची पत्नी 'त्रिकांडमंडन' अशी आहे आणि त्यामुळें ग्रंथहि 'त्रिकांडमंडन' या नांवानें प्रसिद्ध आहे. यांत श्रौतसूत्राधारें सोमयागविषयक कांहीं गोष्टींचा विचार आहे. कांहीं ग्रंथांतल्या कारिकाहि उद्धृत आहेत. त्यांवरून हा हेमाद्रीच्याहि पूर्वी दोनशें वर्षे झाला होता असें दिसतें (रा. गो. भांडारकर रिपोर्ट, स. १८८३–८४, पृ. २७–२८).

भास्कर्रराज—हा भासुरानन्द, भास्करानंदनाथ अगर भास्करराय इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध आहे. हा १७ व्या शतकांत उदयास आला. यानें कठ, केन, जाबाल, त्रिपुर, महामुंडक इत्यादि उपनिषदांवर भाष्यें लिहिलीं आहेत. यांशिवाय अभिनवगुप्तिरत्नाकर, अवधूतगीताव्याख्या, अष्टावक्रगीताव्याख्या, आत्मबोधव्याख्या, वृत्तचंद्रोदय इत्यादि १५–२० ग्रंथ लिहिले आहेत.

भास्कर राम कोल्हटकर—(मृ. स. १७४४) चित्पावन ब्राह्मण. हा रत्नागिरी जिल्ह्यांतील नेवारच्या रामाजीपंत कोल्हटकराचा मुलगा व प्रसिद्ध कोन्हेर-रामाचा भाऊ होय. हा व कोन्हेरराम प्रथम नागपुरास रघूजीकडे आले.

रघूजी कर्नाटकाचे स्वारीवर गेला असतां त्यानें यास नागपुरास अधिकारावर ठेवलें होतें. याच वेळेस मीर हबीब ह्याचेकडे अलाविर्दीखानाविरुद्ध मदत मागण्यास आला. पण रघूजीच्या परवानगीशिवाय एवढी मोहीम स्वतःचे जबाबदारीवर घेण्यास हा तयार नव्हता. रघूजी नागपुरास आल्यावर ह्यानें त्याजपासून परवानगी घेऊन स. १७४२ सालीं बंगालवर पहिली स्वारी केली. ह्या वेळीं त्यानें हुगळी शहर काबीज केलें व कटवा, मिदनापूर वगैरे सर्व भागांत आपला अम्मल बसवला.

अलाविर्दीखानानें पुढें नानासाहेब पेशव्याची मदत घेतली व बालसोरजवळ स. १७४२ चे दसऱ्याचे सुमारास याचा मोड केला. यानें बंगाल्यांतूनच रघूजीस मदतीसाठीं पत्रें लिहिलीं होतीं व त्याप्रमाणें रघूजीहि सैन्य जमवून निघाला होता, परंतु तितक्यांत याचा मोड होऊन हा नागपुरास परत आला.

स. १७४३ त रघूजीबरोबर भास्करपंत बंगालचे दुसरे स्वारीचे वेळेस हजर होता. परंतु रघूजीचा नानासाहेब पेशव्यानें मोड केल्यामुळें हा नागपुरास परत आला.

स. १७४४ त रघूजीनें भास्करपंताबरोबर २० हजार फाज देऊन यास बंगालवर पाठवलें. ह्या खेपेस अलाविर्दीखानानें विश्वासघात करून भास्कर राम व त्याजबरोबरील २० सरदारांस ठार मारलें. भास्करपंत मानकुरा येथें मारला गेला. ह्या वेळेस ह्याची बायको ताईबाई ह्याजबरोबर होती ती या गडबडींत पळून काशीस गेली. एका पठाणाच्या बायकोनें तिला डोलींत घालून काशीस पोंचविलें, अशीहि आख्यायिका आहे. या वेळेस ती गरोदर होती. ती काशीसच बाळंत होऊन तिला पुत्र झाला, त्याचें नांव काशीराव असें ठेवलें.

भास्कर रामाचे खुनानंतर याचा भाऊ कोन्हेर राम यास त्याचें शांतवन करण्यासाठीं रघूजीनें दरसाल २५ हजारांची नेमणूक करून दिली, व भास्करपंताची स्त्री

ताईबाई हिचे नांवानें वऱ्हाडचे सुभ्याचा कारभार करून दिला व तिच्यातर्फे कृष्णाजी गोविंद यांस कारभारी नेमलें.

यास नागपूरच्या भोंसल्यांच्या पदरीं सरंजाम मिळाला होता. यानें उत्तरेस व पूर्वेस मराठ्यांचा दरारा चांगलाच बसविला. यास शाहूनें भोंसल्यांच्या पदरीं लावून दिलें. हा पेशव्यांच्या विरुद्ध जाऊन भोंसल्यास मदत करीत असे. हा मुत्सद्दी नसून केवळ शिपाईगडी होता. त्यामुळें याचा नाश झाला. हा स्वतः उत्कृष्ट सेनापति असल्यानें हा आपल्या फौजेची व्यवस्था अशी लावी कीं याची थोडी जरी सेना असली तरी ती शत्रूला फार मोठी वाटे.

भास्करराय—चंद्रसेन जाधवाचा गुरु.

भास्करराय गंभीरराय भारती—(स. १६२९) यानें सप्तशतीवर विस्तृत अशी गुप्तवती नांवाची टीका लिहिलेली आहे. हा आपणास पदवाक्यप्रमाणपारावारीण-धुरीण व सर्वतंत्रस्वतंत्र अशीं विशेषणें लावून घेतो. हा दीक्षित असून महाम्निचित् होता. याच्या गुरूचें नांव जगन्नाथ दिसतें. हा वर्ध्यास राहत असे. याशिवाय याचे ग्रंथ-(१) ललितासहस्रनामभाष्य, (२) रुद्राध्यायभाष्य, (३) सौभाग्यभास्कर, (४) नित्यषोडशी नामक तंत्रशास्त्र ग्रंथावर सेतुबंध नांवाची टीका लिहिली. वरील ग्रंथ वामकेश तंत्राचा एक भाग आहे. या ग्रंथांत मुख्यत्वेंकरून श्रीदेवी व देवी-उपासना वर्णिली आहे.

भास्करराव—हा एक यशवंतराव होळकरांचा खास वकील होय. बाजीराव (दुसरा) महाडास असतां त्यानें त्याच्याकडे यास पाठविलें होतें.

२. रामदुर्ग संस्थानच्या दादाजीचा पुत्र.

भास्करराव रघुनाथ पेशवे—(जन्म स. १७६२) हा रघुनाथरावाचा सर्वांत वडील मुलगा होता. याचा जन्म संवत् १८२० चे सुमारास म्हणजे शके १६८४ त झाला. हा तरुण असतांनाच यास दादांनीं प्रारंभींच प्रतिनिधिपद देऊन राजेबहादर याचा मुतालिक केलें. परंतु याच सुमारास उपजत वैराग्य असलेल्या अशा ह्या पुरुषानें पुण्यांतून पोबारा केला. पुढें हा भटकत भटकत हाथरस या गांवीं आला. तेथें यास गुरूपदेश झाला. तपश्चर्येच्या शेवटीं यानें हाथरस येथेंच आपलें मुख्य राहण्याचें ठिकाण मुकर केलें; व शेवटीं तेथेंच वयाच्या ८० वे वर्षीं यानें आपली इहलोकींची यात्रा संपविली.

यानें हिंदी भाषेंत बरींच काव्यें केलीं आहेत. यानें 'घटनारामायण' या नांवाचा एक संपूर्ण ग्रंथ व 'पद्य-सागर' नांवाचा एक अपूर्ण ग्रंथ, असे दोन ग्रंथ लिहिले.

यानें आपल्या आत्मचरित्रांत असें सांगितलें आहे कीं, तुळसीदासाचें अर्धवट राहिलेलें काम पुरें करण्याकरितांच आपला जन्म झाला आहे. म्हणूनच यानें सवाई तुळसी-दास स्वतःस म्हणवून तुळसीदासाचे मागील ग्रंथ पूर्ण लिहिण्याचें महत्त्वाचें कार्य पुरें केलें (विविधज्ञानविस्तार, व. ६२, अं. ६, पृ. २०१-२).

भास्करवर्मन्—(कुमारराज पाहा).

भास्कराचार्य—(जन्म स. १११४) विख्यात ज्योतिषी. पिता व गुरु महेश्वर. गांव-सह्यपर्वताजवळील विज्जलविड. बेदरपेक्षां हें बीडच असण्याचा संभव दिसतो.

ग्रंथ-सिद्धांतशिरोमणि (लेखनकाल स. ११५०), २ करणकुतूहल (ले. का. ११८३), ३ वासनाभाष्य (सिद्धांतशिरोमणीच्या ग्रहगणित व गोलाध्याय यांवरील स्वकृत टीका, ले. का. स. ११८३).

खानदेशांत चाळिसगांवच्या नैर्ऋत्येस १० मैलांवर पाटण म्हणून खेडें आहे. त्यांत भवानीच्या देवळावर एक शिलालेख आहे. भास्कराचार्यांचा नातू चंगदेव हा देव-गिरीच्या सिंघण यादवाचा ज्योतिषी होता. चंगदेवानें भास्कराचार्यांच्या व वंशांतील इतर लोकांच्या ग्रंथांच्या अध्ययनाकरितां पाटण येथें मठस्थापना केली. त्याला सिंघणाचा मांडलिक सोइदेव निकुंभ व त्याचा भाऊ हेमाडी यांनीं नेमणूक दिली. नंतर चंगदेवानें वरील शिलालेख लिहिला. त्यांत भास्कराचार्यांचा वंश पुढील-प्रमाणें दिला आहे:-त्रिविक्रम-भास्करभट्ट-गोविंद-प्रभाकर-मनोरथ-महेश्वर-भास्कर-लक्ष्मीधर-चंगदेव. भास्करा-चार्यांपासून पूर्वीचा सहावा पुरुष भास्कर हा भोजराजाचा विद्यापति होता. लक्ष्मीधर हा जैत्रपाल यादवाचा ज्योतिषी होता (स. १०४२).

सिद्धांतशिरोमणीचे लीलावती, बीजगणित, ग्रहगणित व गोल असे चार भाग असून प्रत्येक भाग म्हणजे गणि-ताच्या शाखेवरचा एक स्वतंत्र ग्रंथच आहे. लीलावतींत अंकगणित आहे, बीजगणितांत वर्गसमीकरणापर्यंतचा विषय आहे, ग्रहगणितांत पंचांग करण्यास लागणारें गणित आहे, आणि गोलाध्यायांत गोलीय त्रिकोणमितीचें विवेचन आहे. याच्या ग्रंथांत सर्व विवेचन इतकें पद्धतशीर आहे कीं, त्याच्या अध्ययनानें गणिताच्या चारहि शाखांतली उदाहरणें सोडविण्याची सोय त्या वेळच्या विद्यार्थ्यांची झाली. यामुळें भास्कराचार्यांच्या या ग्रंथांचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर झाला व इतर ग्रंथ मागें पडले. ब्रह्मगुप्तास भास्कराचार्य आपला गुरु मानतो. पण सिद्धांतशिरोमणीच्या सोइस्कर पद्धतीनें ब्रह्मसिद्धांताचें देखील अध्ययन लोकांना

नकोसें झालें. भास्कराचार्यांच्या ग्रंथांत सोप्या रीती व कांहीं नवीन शोध आहेत.

भिऊबाई बारामतीकर—(मृत्यु स. १७४७) ही बाळाजी विश्वनाथाची मुलगी होती. स. १७१२ मध्यें हिचें लग्न आबूजी नाईक बारामतीकर जोशी यांच्याशीं झालें. ही ता. ७.६.१७४७ मध्यें वारली. पुणें पेठ शनवार येथील अमृतेश्वराचें देऊळ यांनीं बांधिलें.

भिकाजीपंत रास्ते—याचा पिता शामजी. यांची मुलगी गोपिकाबाई बाळाजी बाजीराव पेशव्यास दिली होती.

भिकार—याचें दुसरें नांव भिक्षु. हा भिक्षुमुनि मानभाव होता. याच्या गुरूचें नांव आत्माराम. यानें अभंग, पदें व (१) प्राणबोध आणि (२) प्रार्थना-स्तोत्र अशीं दोन प्रकरणें रचलेलीं आहेत. हा आपला सांप्रदाय 'दत्तसांप्रदाय निरंजनपंथ परमहंस' याप्रमाणें सांगतो. याचें काव्य मराठी व हिंदी भाषेंत आहे. याची काव्यप्रतिभा स्वयंभू नसून बहुतेक तुकाराम, रामदास, कबीर इत्यादिकांवरच विशेष दिसते (मं. श. १८३७ वा. इ. ले. १५९).

भिकारीदास—(दास पाहा).

भिखनपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एकसष्टावा सिद्ध. जात शूद्र, शालिपुत्र येथील राहणारा.

भिमराव तिमाजी पारसनीस—(स. १६३०-१७१४) हा पुणें पारसनीसांचा मूळ संपादक. हा शाहूच्या दरबारीं होता. याचा वंशक्रम–बनाजी–माधवजी–तिमाजी–भिमाजी–बापूजी–कृष्ण.

भिल्लम यादव—(स. ८२५ सुमार) हा यादव घराण्यांतील पहिला धाडियप्पा याचा मुलगा होय.

२. (स. १०००) सेऊण-देश येथील यादव घराण्यांतील जो बद्दिग त्याचा हा मुलगा होय. स. १००० मध्यें हा आपल्या बापानंतर गादीवर आला.

पश्चिम चालुक्य राजा दुसऱ्या तैलाकरितां यानें परमार राजाचा पराभव केला. याच्या नंतर याचा मुलगा वेसूगि हा गादीवर आला (B.).

३. (स. १०४० सुमार) हा यादव घराण्यांतील एक राजा होय. हा कोणाचा मुलगा याचा उल्लेख आलेला नाहीं. तरीपण हा या घराण्यांतील अर्जुन राजा याच्या मागून गादीवर आला, हा मात्र उल्लेख आलेला आहे. यानें चालुक्यवंशीय जयसिंहाच्या मुलीशीं लग्न लाविलें होतें.

४. हा यादवांपैकीं दुसऱ्या वेसुगीचा मुलगा. याचा मुलगा दुसरा सेऊणचंद्र.

५. (स. ११८७-९१) देवगिरीच्या यादव घराण्यांतील मल्लुगीचा मुलगा होय.

यानें होयसळ राजपुत्रास ठार मारिलें आणि कल्याणी घेतली, असें म्हणतात. यानें आपली राजधानी देवगिरी (दौलताबाद) ही केली. होयसळ राजा बल्लाळ २ रा यानें याचा सोरतूर येथें पराभव केला. या पराभवानंतर थोड्याच दिवसांनीं हा मरण पावला. नादोलच्या केल्हण राजानें सुद्धां याचा पराभव केला होता. याच्यानंतर याचा मुलगा जैतुगी १ ला हा गादीवर आला (B.). यानें सोमेश्वर चालुक्याचें मांडलिकत्व झुगारून दिलें. यानें प्रतापचक्रवर्ति व महाराजाधिराज हीं बिरुदें धारण केलीं.

भिल्लादित्य प्रतिहार—हा मंदोसरच्या प्रतिहार-वंशांतील झोटाचा पुत्र. यानें तारुण्यात राज्य केलें. पुढें आपला पुत्र कक्क याच्यावर राज्यभार सोंपवून हरिद्वारला गेला. तेथें अठरा वर्षे राहून शेवटीं यानें अनशनव्रतानें देह ठेवला.

भिवा सुतार—(स. १७८० सुमार) उत्तम मूर्तिकार. प्रतिनिधींचें 'रामपंचायतन', पुण्यांतील रास्त्यांचा राम, वाईचा मुरलीधर वगैरे प्रसिद्ध मूर्ति याच्या हातच्या आहेत.

भिक्षु—(भिकार पाहा).

भीम—हा एक गुजराथी वाङ्मयांतील प्रसिद्ध लेखक. याचें राहण्याचें गांव सिद्धपूर. हा मोढ जातीचा ब्राह्मण. यानें भागवत गुजराथी भाषेंत केलें.

भीमगुप्त—नेपाळच्या गोपाळ घराण्यांतील हर्ष-गुप्ताचा मुलगा.

भीम (पश्चिम) चालुक्य—(स. ७३३ सुमार) हा पश्चिम चालुक्य घराण्यांतील विजयादित्याचा मुलगा. हा दुसऱ्या कीर्तिवर्म्यानंतर गादीवर आला, व याच्यानंतर याचा मुलगा कीर्तिवर्मा तिसरा गादीवर आला.

भीम (पूर्व) चालुक्य—हा पहिल्या विक्रमादित्याचा मुलगा. यानें आपल्या भावाकडून गेलेला वेंगी देश परत मिळवला; व कृष्ण राष्ट्रकूटाचा पराभव केला. याचें दुसरें नांव द्रोहार्जुन असें होतें.

२. (स. ९२६-२७) हा पूर्व चालुक्यांपैकीं पहिल्या अम्माचा मुलगा. तैलपाचा मुलगा दुसऱ्या युद्धमल्लानें याची कत्तल करून याचें राज्य घेतलें.

३. (स. ९३४-४५) हा पूर्व चालुक्यांपैकीं चवथ्या विजयादित्याचा मुलगा. याच्या राणीचें नांव लोकमहादेवी. यानें राष्ट्रकूटांतील पांचव्या गोविंदाचा पराभव केला. यालाच सातवा विष्णुवर्धन म्हणतात.

भीमजी पारख—(स.१६७१) या नांवाच्या कंपनीच्या दलालानें कांहीं ब्राह्मणी लिखाण छापण्याकरितां इंग्लंडांतून एक छापणारा बोलावून त्याचा पगार देण्याचें कबूल केलें (प. सा.१३७४). 'याच्या इच्छेप्रमाणें आलेला मुद्रक याच्या भाषेचे नवे टाईप पाडूं शकत नाहीं तरी दुसरा तज्ज्ञ इसम पाठवावा. एकंदरींत पाहतां देशी भाषेंत छपाई करणें अशक्य वाटत नाहीं' असें स. १६७७ मधील पत्र आहे (पत्र सा. १९०९). याच्या मागणीप्रमाणें सर्व साहित्य मुंबईस ३ वर्षांनीं आलें व मुद्रकाचा पगार सालाचा पन्नास पौंड ठरला (प. सा. १६२४).

भीमट चंदेल्ल—याला कलिंजरपति (चंदेल्ल) भीमट असें म्हणत. यानें पांच नाटकें संस्कृतांत लिहिलीं. त्यांत 'स्वप्नदशानन' हें सर्वोत्कृष्ट आहे.

भीमदेव सोळंकी—(स. १०२१-६३) हा अनहिलवाडच्या सोळंकी घराण्यांतील वल्लभसेनाचा मुलगा. हा गादीवर आल्यावर याचा गझनीच्या महमूदानें पराभव केला व यास पदच्युत केलें. परत याचा चुलता दुर्लभरायाच्या मृत्यूनंतर हा गादीवर आला. याच्या राणीचें नांव उदयमती. यानें आबूच्या पहाडावर प्रख्यात जैनमंदिरें, पालीठाणा व चंद्रावती येथील देवालयें बांधलीं. यानें आपल्या पहिल्या कर्ण नांवाच्या मुलास राज्य देऊन आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारला, व सरस्वतीतटावर मंडूकेश्वर नांवाच्या तीर्थावर जाऊन तपश्चर्या करीत राहिला.

२. (स.११७८-१२४१) हा अनहिलवाडच्या सोळंकी घराण्यापैकीं अजयपाळाचा पुत्र. याला भोळा असें उपपद होतें. याचें व पृथ्वीराज चौहानाचें फार वांकडें होतें. याच्या पदरीं अमरकोशकार अमरसिंह नांवाचा विद्वान् होता. याच्या मुलाचें नांव त्रिभुवनपाल. यानें व पृथ्वीराज चौहाणानें अबूचा राजा जैस परमाराच्या इच्छिनीकुमारी नांवाच्या मुलीला मागणी घातली असतां या दोघांचें भांडण होऊन पृथ्वीराज चौहानानें याचा पराभव केला. पुढें हा मेल्यानंतर याचा मुलगा गादीवर बसला. याच्याजवळ पुष्कळ जहाजें होतीं.

भीमपाळ शाही—पंजाबांतील शाही घराण्यापैकीं त्रिलोचनपालाचा मुलगा.

भीमभट्ट—रावणार्जुनीय काव्याचा कर्ता. काश्मीरी कवि.

भीमसिंह—हा सिसोदें येथील राणा शाखेपैकीं त्रिभुवनसिंहाचा पुत्र. याच्या बायकोचें नांव पद्मिणी. याचा पुत्र जयसिंह.

२. (स. १४६९-मृत्यु स. १४८९) हा चितोडच्या सुजनसिंहाच्या वंशांतील कर्णसिंहाचा पुत्र. कोंकणांतील स्वारींत या बापलेकांनीं सर्व कुंठित झालें असतां घोरपडीच्या साहाय्यानें किल्ला सर केला. त्यांत कर्णसिंह पडला. या अतुल पराक्रमाबद्दल चौऱ्यांशी खेडयांसह मुधोळ व रायबाग आणि वाईकडील किल्ले आणि राणा या पदवीच्या ऐवजीं राजा घोरपडेबहादूर हा किताब आणि घोरपडीच्या चिन्हाचा झेंडा देण्यांत आला. तेव्हांपासून घोरपडे हें नांव प्रचारांत आहे. तेच मुधोळचे घोरपडे होत.

भीमसिंह गुहिलोत—(स. १७६८-१८२८) हा उदेपूरचा राणा व अरिसिंहाचा पुत्र होय. रत्नसिंहास बराच विरोध असल्यामुळें यास स. १७७८ त गादी मिळाली. यानें गादीवर आल्याबरोबर सेनापति व मंत्री यांच्या साहाय्यानें राज्यकारभार करण्याचें ठरविलें. पुढें यानें मल्हारराव होळकराच्या मदतीनें चितोडवर स्वारी केली. या लढाईंत अंबूजी इंगळे व सेनापति मोहकमसिंह यांची फार मदत झाली. पुढें यानें इंग्रजांची मदत घेतली, त्यामुळें व्यापाराचें निमित्त करून इंग्रजांनीं हळुहळू सर्व राज्यकारभार आपले हातांत घेतला. याच्या सतरा राण्यांपैकीं पद्मकुंवर ही याची आवडती राणी होती. हा दयाळू व न्यायी होता. हा कवि असून ह्यानें 'भीमविलास' हा ग्रंथ लिहिला. शेवटीं कृष्णा-कुमारीचें आत्मबलिदान व एकुलत्या एक पुत्राचें निधन यांमुळें हा मरण पावला.

भीमसेन दिक्षित—(ग्रंथकाल स. १७२२) हा शांडिल्यगोत्री असून कान्यकुब्ज देशांतील राहणारा. यानें मम्मटाच्या काव्यप्रकाशावर 'सुधासागर' नांवाची टीका लिहिली. हा मोठा वैय्याकरणी होता.

भीमसेन बऱ्हाणपुरी— यानें औरंगजेबाच्या कारकीर्दीचा इतिहास फार्शी भाषेंत लिहिला (मु. रि. भा. २, पृ. ३२०).

भीमस्वामी—(मृत्यु स. १६६३) हे सतीबाई शहापूरकर यांचे भाचे. यांना भिकाजीबुवा ऊर्फ भिमाजीबाबा किंवा भीमस्वामी म्हणत. यांना शके १५६७ मध्यें मसर मुक्कामीं समर्थांनीं अनुग्रह दिला. शके १५७७ चे कार्तिकांत समर्थांनीं व्यंकोजीराजे यांस अनुग्रह दिला व तंजावर

येथें मठ स्थापन केला व तेथें यांना ठेविलें. यांचा मुक्काम सज्जनगडास शके १६०३ चे माघ-फाल्गुनांत होता. समर्थनिर्याणप्रसंगीं यांनीं केलेल्या पन्नास ओव्या श्री. सां. वि. विषय खंड १ क्रमांक २५ मध्यें प्रसिद्ध झाल्या आहेत. या ओव्या सांपडण्यापूर्वी याच भीमस्वामींनें लिहिलेलें पण अपूर्ण सांपडलेलें असें दुसरें एक समर्थचरित्र रामदासी ग्रंथाच्या दुसऱ्या भागांत प्रसिद्ध झालें आहे. या अपूर्ण चरित्रांत समर्थांनीं सावधान शब्द ऐकून उड्डाण केल्याची व सतीबाईची कथा प्रामुख्यानें वर्णिली आहे. याला शके १५६४ मध्यें शहापूरच्या मठाचें महंतपण मिळालें.

२. (समाधि स. १७७१) हा नरहरी मोरेश्वराचा गुरु होता. याच्या थोरल्या भावाचें नांव गिरिधर. याचा मठ बीड येथें हल्लीं आहे. यानें समाधि शके १६९२-९३ च्या सुमारास घेतली. यास बीडकर भीमस्वामी असेंहि म्हणतात. याचें दुसरें नांव भिवाजीबाबा असें होतें (मं. श. १८३७ वा. इ. ले. १९८).

३. (ग्रंथकाल स. १७९७) यांना भिमाजीबुवा असेंहि म्हणत. हे रामदासस्वामींच्या शिष्यपरंपरेपैकीं एक असून शिरगांव (चाफळजवळ) मठाचे अधिपति होते. दत्तात्रय-राघव-यशवंत-भिमाजी असा वंशवेल आहे. यानें आपला भक्तलीलामृत हा ग्रंथ श. १७१९ मध्यें लिहिला. प्रथम यांत समर्थचरित्र गायिलें असून पुढें वेगळाल्या सदतीस भक्तांचीं चरित्रें आहेत. भक्तांची निवड केलेली नाहीं. रामदासपंचायतनांतील प्रमुख साधुपुरुष किंवा रामदासपंथांतील मुख्य मुख्य शिष्य यांचाहि समावेश या ग्रंथांत नाहीं. कथाहि चौकसपणानें लिहिल्या नाहींत. हा ग्रंथ ओवीबद्ध नसून अभंगमय आहे (मं. तृतीय सं. पा. ११६-११७). यानें अवंति येथें समर्थचरित्रात्मक १२१ अभंग पुरे केले, असें आंतील लेखावरून वाटतें.

भीमाबाई बुळे—(मृत्यु स. १८५८) ही यशवंतराव होळकराची मुलगी होय. हिला इंग्रजांनीं बुंदेलखंडांतील कुचचा जिल्हा जहागीर म्हणून दिला. स. १८०९ च्या फाल्गुनांत हिचें लग्न गोविंदराव बुळे यांजबरोबर झालें होतें. ही पुढें नोव्हेंबर स. १८५८ त मरण पावली.

भीमेश्वरवर्मन् पल्लव—हा सिंहविष्णु पल्लवाचा धाकटा भाऊ.

भीवराव पानसे—(मृत्यु स. १७७९ मार्च) पेशवाईंतील एक सरदार होय.

सदाशिवरावाचा तोतया जेव्हां कोंकणांत बंडाळी करूं लागला, तेव्हां हा व शिंदे भिन्न घाटांनीं तोतयावर उतरले. पानशांनीं बोरघाटांत तीन चार लढाया चांगल्या मारिल्या. ता. ८ मार्च १७७९ रोजीं इष्टुर फांकड्यास मारून तळेगांवावर इंग्रजास जेर करणारा शूर पुरुष हाच होय. हा तोफखान्याचा कामदार थोडा ताप येऊन एकाएकीं मरण पावला (शके १७०० फाल्गुन व. ६ सोम.). याच्याविषयीं खालील उल्लेख आढळतोः

'भीवराव कर्ता माणूस. इंग्रजांचे लढाईंत यंदां फारच मेहनत केली. तसा मनुष्य होणें दुस्तर. भीवराव बहुत थोर, शहाणे, कर्ते, एकनिष्ठ, सालमजकूर व तोतयाचे मसलतींत बहुत मेहनत करून नानाचे उपयोगीं पडले. आयुष्यमर्यादा सरली त्यास इलाज नाहीं. मोठी धुराच या काळांत गेली. तोफखान्याचा बंदोबस्त चांगला राखीत होते. पुत्र राजाबाचें सांत्वन केलें. स्त्रीनें सहगमन केलें.' (ऐ. ले. सं. २४८९).

भीष्माचार्य--(स. १३५३ सुमार) एक महानुभाव. हा रामदेवराव यादवाच्या दरबारांतील बोपदेवाचा शिष्य. उपाध्य आम्नायांतील हेतुस्थळकर्ते न्यायव्यास हे यांचे दीक्षागुरु होत. यांनीं संस्कृत व मराठी अनेक ग्रंथ केले आहेत. दिनकरप्रबंध (अध्याय २४) आणि ब्रह्मोपनिषदावरील धाराबिम्बसंज्ञक भाष्य हे यांचे प्रमुख संस्कृत ग्रंथ होत. दिनकरप्रबंध हा ग्रंथ कवीश्वराम्नाय जयकृष्णसूरि यांचे वचनावरून आणि दत्तात्रयप्रबंध हा जंबूकोपाभिध कमळाकर विख्यात योगी यांचे वचनावरून लिहिल्याचा उल्लेख आहे. कै. भावेकृत कविकाव्यसूचीमध्यें अनेक मराठी ग्रंथ यांचे नांवावर नमूद आहेत. त्यांत पदार्थदीपिका, मार्गप्रभाकर, धनंजयकोशावरील टीका, पंचवार्तिक, मुक्तामाला, नामविभक्ति, सिद्धांतस्थळ इत्यादि प्रमुख होत. यांची गीतगोविंदावर 'महाराष्ट्रसुबोधिनी' नांवाची टीका प्रसिद्ध आहे. नामविभक्ति हा ग्रंथ व्याकरणशास्त्रावर असून पंचवार्तिक हा भाषाशास्त्रावरील ग्रंथ आहे. पंचवार्तिक हा ग्रंथ श्री. मोने यांनीं 'मराठी भाषेचे व्याकरणकार' या ग्रंथांत प्रसिद्ध केला आहे (म. वा. इ. २. ७३३).

भीष्माचार्य लासुरकर--(ग्रंथकाल स. १३९८) एक महानुभाव. यांना भिवबा लासुरकर म्हणत. हे पारमांडल्य आम्नायांतील नागनाथाचे शिष्य. यांनीं शके १३२०च्या सुमारास आनेराज व्यासकृत, सुभाषिताक्षरीवर मराठीमध्यें टीप लिहिली आहे. तसेंच हयग्रीव व्यासकृत दशमस्कंधावर गद्यराज म्हणून श्लोकबद्ध निर्यमक काव्य आहे त्यावरहि टीप लिहिली आहे (म. वा. इ. २. ७३८).

भुजबळ--(कायविररस पाहा).

'भुजबलराय' 'वसवराय'—(स.१५०३-९) विजयनगरच्या नरसिंहराय साळुवाचा महामंत्री नरसा नायक तुलुवाचा हा मुलगा.

भुजबळ गंग—बिट्टिदेव होयसळाचें नामांतर.

भुला—(स. १७८१) हा गार्ग्यगोत्री ब्राह्मण नर्मदेच्या संगमाच्या पूर्वेस ६ मैलांवर दर्धाचि येथील राहणारा होय. यानें शके १७०३ मध्यें 'ब्रह्मसिद्धांतसार' नांवाचा ग्रंथ लिहिला. त्यांत १२ अधिकार आहेत. पैकीं पहिल्या अधिकारांतील १२४ श्लोकांत सिद्धांताशिरोमणि मध्यमाधिकाराचा संक्षेप आहे. यांतील कांहीं पद्धति ग्रहलाघवासारखी आहे.

भुवनचंद्र—(स. १२६५) चैद्रगच्छाचे जैन आचार्य. यांचा शिष्य रत्नप्रभसूरि. हा तेजसिंहाच्या वेळीं मेवाडांत होता.

भुवनसिंह—हा सीसोदें येथील राणाशाखेपैकीं पृथ्वीमल्लाचा पुत्र. वि. सं. १४९६ मधील राणपुर येथील शिलालेखांत कीतू चौहान व अलाउद्दीन खल्जी याला जिंकणारा असें याला म्हटलें आहे, पण तें बरोबर नाहीं. कारण कीतू हा सामंतसिंह व कुमारसिंह यांचा समकालीन होता व अलाउद्दीनचा समकालीन रत्नसिंह होता. याचा पुत्र भीमसिंह.

भुवनैकमल्ल चालुक्य—पश्चिम चालुक्यांपैकीं दुसऱ्या सोमेश्वराचें नामांतर.

भूषण—हा कवि वेहेकळ गांवचा राहणारा. गुजराथी जातीचा रायकवाड ब्राह्मण. भविष्यविषयाष्टक हा याचा ग्रंथ गुजराथींत आहे.

भूदकवि—संखकवीच्या श्रीकंठचरिताचा परीक्षक.

भूतुग गंग—स. ७२७ त किग्गटनाड (कूर्गप्रांत) येथील शिलालेखावरून स. ८८७ मध्यें गंग घराण्यांत सत्यवाक्य कोंगुणीवर्मन् परमानडी नांवाचा राजा होऊन गेला असें दिसतें. आष्कुरा शिलालेखावरून दिसतें कीं हा राष्ट्रकूट कृष्णराजा(तिसरा)चा मांडलिक असून यानें इरेयप्पाचा मुलगा ठार मारून गंगवाडी प्रांत हस्तगत केला.

२. (स. ८७०) पश्चिम गंगांपैकीं हा तिसऱ्या इरेयप्पाचा मुलगा.

३. (स. ९३९-९५३) हा पश्चिम गंग घराण्यांतील दुसरा भूतुग होय. हा चवथ्या इरेयप्पाचा मुलगा. याला नन्नीयगंग व जयदुत्तरंग अशा पदव्या होत्या. याचें तिसऱ्या कृष्ण राष्ट्रकूटाशीं सख्य होतें. यानें राजादित्य चोल पहिला यास नक्कोलम येथील लढाईंत ठार केलें. यानें आपला भाऊ राचमल्ल याचा खून केला. याच्या बायकारेवकन्नीम्मडी (चंद्रोबेलब्बे) ही तिसऱ्या राष्ट्रकूट कृष्णाची बहीण होती; शिवाय कल्लब्बरासी ही एक दुसरी बायको होती.

लग्नाच्या वेळीं याला पुलीगर, वेळवोल, किस्सुकाड आणि बागेनाड हे परगणे हुंड्यामध्यें मिळाले, असें ठरतें. पुढें तिसरा कृष्णराज राष्ट्रकूटानें यानें राजादित्य चोलास मारल्याबद्दल बनवासी नांवाचा आणखी एक परगणा यास जहागीर दिला. यानें महेंद्र १ ला या पल्लवराजाचा सामीय येथें पराभव केला होता.

भूदेव शुक्ल—(स. १५००-५० सुमार) याचा पिता शुकदेव. यानें धर्मविजय नांवाचें पांचअंकी अन्योक्तिरूप संस्कृत भाषेंत नाटक लिहिलें आहे.

२. (ग्रंथकाल स. १५५०) हा 'रसविलास' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता होय.

यानें आपल्या ग्रंथांत 'श्रीवत्सलांछन' याच्या संस्कृत ग्रंथांतील कांहीं उतारे घेतले आहेत.

भूधर दैवज्ञ—भास्कराचार्यकृत गणिताध्याय व गोलाध्याय यांवरील तिसरा टीकाकार.

भूपति—(स. १७३३) एक हिंदी कवि. हा अमेठीचा राजा गुरुदत्तसिंह होय. याची शृंगारिक सतसई प्रसिद्ध आहे. उदयनाथ कवींद्र याचा आश्रित होता.

भूमक क्षत्रप—(स. ७८ सुमार) क्षहरातवंशांतील एक क्षत्रप राजा. याचीं राजपुतान्याच्या पुष्कर वगैरे भागांत तांब्याचीं पुष्कळ नाणीं सांपडलीं आहेत. त्यांवर याला क्षहरात क्षत्रप असें म्हटलें आहे. याच्या नाण्यांवर काळ दाखविणारे संवत् वगैरे कांहीं नाहीं. तसेंच हा कधीं महाक्षत्रप झाला होता किंवा नाहीं हेंहि आढळत नाहीं. याच्यानंतर नहपान क्षत्रप झाला असावा.

भूमंडली—कृष्णदेव रायडूच्या राणीची दासी. तेनाल रामलिंग हिच्याच आश्रयानें त्या राजाच्या दरबारांत लागला होता.

भूमिमित्र—(भूमित्र पाहा).

भूयिकादेवी—ही रघुवंशी प्रतिहार देवराजाची पत्नी. हिचा मुलगा वत्सराज.

भूविक्रम गंग—(स. ६०० सुमार) पश्चिमगंगांपैकीं श्रीविक्रमाचा पुत्र. यास भीमकोप किंवा श्रीवल्लभ असेंहि म्हणत. यानें विलंद येथें पल्लवांचा पराभव केला.

भूषण—(स. १६१४-१७१६) याचा पिता रत्नाकर. हा काश्यपगोत्री असून कान्यकुब्ज ब्राह्मण होता. याचें

गांव यमुनेच्या उत्तर तीरावरील त्रिविक्रमपूर (तिकमनपूर) होय. मतिराम व चिंतामणि असे याला दोन भाऊ होते. शिवसिंहसरोजमध्यें जटाशंकर नांवाचा तिसरा भाऊ दिला आहे. यांच्या क्रमाबद्दल मतभेद आहे. भूषणाचा जन्म वि. सं. १७३८ (जन्म स. १६८१) मध्यें झाला. वि. सं. १७९७ पर्यंत हा हयात असल्याचा पुरावा मिळतो. याचें आडनांव त्रिपाठी असून त्याचा अपभ्रंश तिवारी असा आहे. याला एकंदर बारा तेरा आश्रयदाते होते. ते पुढीलप्रमाणें– (१) चित्रकूटचा सोलंकी रुद्रसाहि हृदयराम (हृदयशाहि किंवा हरिहरशाह), (२) रेवानरेश अवधूतसिंह, (३) छत्रपति शाहू, सातारा, (४) कमाऊं नरेश ज्ञानचंद्र, (५) बाजीराव पेशवा, (६) (चिंतामणि) चिमणाजीआप्पा पेशवे, (७) महाराज छत्रसाल बुंदेला, (८) रावराजा बुधसिंह बुंदीनरेश, (९) जयपूरनरेश सवाई जयसिंह, (१०) जहांदरशाहा दिल्लीनरेश, (११) भगवंतसिंह खीची असोथरनरेश, (१२) अनिरुद्धसिंह पौरचनरेश, (१३) फतहशाहि.

या सर्वांचा काळ निश्चित आहे. बाराव्याचा काळ अज्ञात आहे. यांपैकीं एकहि छत्रपति शिवाजीच्या वेळचा नसून सर्व नंतरचे आहेत. शिवाजीमहाराज स्वर्गवासी झाले तेव्हां यांपैकीं फक्त छत्रसाल तीस वर्षांचा हयात होता. यावरून हा सुप्रसिद्ध कवि शिवाजीच्या वेळीं नव्हता ही गोष्ट उघड होते. यांनीं लिहिलेली शिवबावनी, शिवाजीच्या नंतर शिवाजीचें हिंदुधर्माच्या उद्धाराचें कार्य पाहून आदरानें लिहिली आहे. बावनींत बाजीरावच्या वेळच्या सिरोजप्रकरणाचा निर्देशहि आहे (४६). (नागरीप्रचारिणी सभा त्रैमा. ६.१, पंडित भागीरथीप्रसाद दीक्षित काशी यांच्या लेखावरून). चित्रकूटच्या सोलंकी राजानें यास कविभूषण अशी पदवी दिली.

शिवाजीचे पराजय अथवा गैर कृत्यें यांचेंहि यानें वर्णन केलें आहे (शि. भू. छं. ६३; ९९; २१२; २१३; २५२).

शिवाजी देवीभक्त होता तसाच शिवभक्तहि होता (शि. भू. छं. १४; १५८; २३६; ३२६). याचें भूषण काव्य स. १६७४ मध्यें संपलें, असें शिवचरित्रप्रदीपांत लिहिलें तें बरोबर आहे, असें रा. सा. सरदेसाई म्हणतात व याची हयात १०२ वर्षांची देतात (स. १६१४–१७१६).

याचे ग्रंथ–शिवराजभूषण, भूषणहजारा, भूषणउल्हास, दूषणउल्हास. हिंदी साहित्यसंमेलनानें भूषणग्रंथावलींत याचें सर्व वाङ्मय प्रसिद्ध केलें आहे. प्रसिद्ध दोहाकार वृंद व शीतल कवि याचे वंशधर म्हणवितात.

भूषणभट्ट—बाणभट्टाचा पुत्र. बाणाच्या कादंबरीचा उत्तरार्ध यानें पुरा केला. याचें अध्ययन बापाजवळ झालें होतें. पुलिन व हा एकच असावेत.

भूसुकुपा—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं एकेचाळिसावा सिद्ध होय. हा राजकुमार जातीचा होता. हा नालंदा प्रांतांतील राहणारा होय. याच्या वेळेस देवपाल नांवाचा राजा होता (स.८०९–८४९). याचें नांव शांतिदेव असेंहि होतें. हा राहणारा बंगालचा असावा, असें डॉ. भट्टाचार्य यांनीं लिहिलें आहे.

याचे एकंदर सहा ग्रंथ आहेत, आणि तंत्रावर तीन आहेत. भुसुके या नांवावर दोन ग्रंथ आहेत. त्यांत चक्रसंवरतंत्राची टीका आहे. आणि सहजगीति (तं. ४८।१) हा ग्रंथ हिंदीमध्यें आहेत. हा ग्रंथ भूतानी भाषेमध्येंहि लिहिला आहे. याच्या कांहीं हिंदी कविताहि आहेत.

भैरव अवधूत ज्ञानसागर—(समाधि स.१८४३) हा विश्वामित्रगोत्री आश्वलायनशाखेचा देशस्थ ब्राह्मण असून याला एक सुंदर, अप्रतिम वक्ता व गवयी असा दिगंबर नामक मुलगा होता. सातारा जिल्ह्यांत खानापूर तालुक्यांतील विटें येथें हा सत्पुरुष व कवि होऊन गेला. हा उद्धवचिद्घन स्वामीचे गुरु जे चिद्घनस्वामी त्यांच्या भगिनीच्या वंशांत जन्मला असून यास आपाजीबुवा असेंहि म्हणत. याच्या वडिलांचें नांव ज्योतिपंत व आईचें नांव यमुना असें होतें. याच्या भक्तीमुळें पैठणची दत्तमूर्ति विट्यास आली (शके १७३३ आषाढ शु. ७). तेथें प्रतिवर्षी दत्तजयंतीचा उत्सव होतो. यानें शिवाजी चैतन्याकडून गुरूपदेश घेतला होता. यानें स. १८४० त संन्यासदीक्षा घेतली. याची एकंदर कविता हजाराच्या आंत असून यानें ज्ञानसागर हा अध्यात्मपर ग्रंथ लिहिला आहे. याची समाधि विटें येथें असून तेथें यानें बांधलेल्या दत्तमंदिरास खर्चासाठीं द. सा. १५० रु. देवासचे पवार यांजकडून मिळतात (म. क. च. भा. २, पृ. १८०–१९६).

भैरवजी घोरपडे—(मृत्यु स. १८०७) (बाजी घोरपडे पाहा).

भैरवमिश्र—हा नागोजीभट्टाचा शिष्य व काशींतील सुप्रसिद्ध पंडित. यानें परिभाषेन्दुशेखरावर लिहिलेली टीका भैरवी नांवानें प्रसिद्ध आहे.

भोगनाथ—(स. १३००–१४००) हा माधवाचार्याचा धाकटा भाऊ होय.

याच्या आईबापाचें नांव मायण आणि श्रीमती असें होतें. हा भारद्वाजगोत्री होता. हा विजयनगरच्या पहिल्या बुक्क संगम राजाच्या पदरीं असून हा त्याचा 'नर्मसचिव' होता, त्याचप्रमाणें राजकविहि होता असें यानेंच बिट्रगुंटच्या ताम्रपटांत म्हटलें आहे (एपि. कर्ना. व्हा. ३ पा. ३०-३१).

भोगवर्मन् मौखरी—(स. ६८५-७१५) हा एक मौखरी वंशांतील राजपुत्र होय. मगध येथील आदित्यसेनाचा हा समकालीन असून त्याच्या मुलीशीं यानें लग्न केलें होतें. त्यावरून त्या वेळीं याचें वजन चांगलें असावें असें दिसतें. परंतु मगधचे राजे याचे शत्रु होत. यानें आपली मुलगी वत्सदेवी ही नेपाळच्या दुसरा शिवदेव लिच्छवी राजास देऊन त्याच्याशीं मैत्री संपादन केली. याच्या नंतर यशोवर्मन् हा गादीवर आला (मौखरी by E. A. Pires, p. 134-135).

भोजदेव—याचा शृंगारप्रकाशिका नांवाचा एक अश्रुतपूर्व अलंकारग्रंथ आहे. हा ग्रंथ मल्याळ देशांत सांपडला. याची प्रत मद्रासच्या गव्हर्नमेंट ग्रंथसंग्रहालयांत आहे. अलंकारशास्त्रावर एवढा मोठा ग्रंथ दुसरा संस्कृतांत नाहीं. यांत सुमारें ३०००० श्लोक असतील. 'प्रकाश' नामक प्रकरणें ३६ आहेत. आतांपर्यंत आपणांस माहीत नसलेल्या पुष्कळ ग्रंथकारांच्या ग्रंथांतून उतारे यांत दिले आहेत. सर्गांतीं 'आनंद' शब्द असला म्हणजे तें काव्य 'पंचशिख'नामक कवीचें असें जाणावें म्हणून भोज आपल्या शृंगार प्रकाशिकेंत सांगतो. श्रीहर्षाच्या नैषधीय चरिताच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटल्या श्लोकांत आनंद शब्द आलेला आहे. यावरून भोजाचें म्हणणें कोणत्या अर्थाचें आहे हें सांगतां येत नाहीं (वि. वि. लक्ष्मणरायाचा लेख, स. १९२३).

भोज परमार—(स. १०४९-१०४२) माळव्याच्या परमारांपैकीं सिंधुराजाचा पुत्र आणि मुंज राजाचा दत्तक. हा आपणास त्रिभुवननारायण अशी पदवी लावून घेत असे. हा मोठा दाता, योद्धा आणि विद्वान् होता. ग्वाल्हेर राज्यांतील उदयपूर येथें सांपडलेल्या शिलालेखांत म्हटलें आहे कीं, कैलासापासून दक्षिणेंतील मलयपर्वतापर्यंत याचें राज्य होतें (एपि. इंडि. भा. १, पृ. २३५ श्लोक १७). यांत कदाचित् थोडी अतिशयोक्ति असेल. यानें चेदि देशाच्या राजाला, इंद्ररथ, तोग्गळ, भीम वगैरेंना, कर्नाटक, लाट आणि गुजराथ येथील राजांना, तसेंच तुर्कांना जिंकलें होतें. याला कविराज म्हणत. यानें केदार, रामेश्वर, सोमनाथ, सुंदीर (?), काळ (महाकाळ), अनळ व रुद्र यांचीं मंदिरें बांधलीं (एपि. इंडि. भा. १, पा. २३५-३६). वरील राजांपैकीं चेदि देशाचा राजा गांगेयदेव याचा यानें पराभव केल्याची माहिती मिळते. गुजराथचा पहिला भीमदेव सोळंकीचा पराभव याचा सेनापति कुलचंद्र यानें केल्याची माहिती प्रबंधचिंतामणीमध्यें मिळते. इंद्ररथ व तोग्गळ यांची कांहींच माहिती अद्यापि मिळाली नाहीं. मुंजाला तैलपानें ठार केलें याचा सूड सिंधुराज घेऊं शकला नाहीं. पण यानें त्याचा नातू जयसिंह याच्यावर स्वारी करून त्याला पराजित केलें.

अवंतीचा राजा भोज यानें सांभरचा चौहान राजा वीर्यराम यास मारलें होतें, असें पृथ्वीराजविजय महाकाव्यांत लिहिलें आहे (सर्ग ५. ६७). याच्या अखेरीस गुजराथच्या पहिला भीमदेव सोळंकी व चेदीचा राजा गांगेयदेवाचा पुत्र कर्ण यांनीं धारानगरीवर स्वारी केली, तेव्हां युद्धांत याचा देहान्त झाला आणि राज्यांत अव्यवस्था माजली. पण उदयादित्य परमारानें या कृत्याचा सूड घेतला व गेलेला सर्व मुलूख परत मिळवला.

हा प्रसिद्ध विद्वान् होता. यानें साहित्यशास्त्रावर 'सरस्वतीकंठाभरण', योगशास्त्रावर 'राजमार्तंड', ज्योतिषावर 'राजमृगांक' व 'विद्वज्जनमंडन', शिल्पावर 'समरांगण', व्याकरणावर एक व 'शृंगारमंजरी' वगैरे ग्रंथ संस्कृतांत लिहिले आहेत. यानें 'कूर्मशतक' नांवाचे दोन काव्यग्रंथ प्राकृतांत केले आहेत.तेहि दगडावर खोदलेले मिळाले आहेत. यानें धारा नगरींत सरस्वतीकंठाभरण (सरस्वतीसदन) नांवाची पाठशाळा बांधली होती. तिच्यांत कूर्मशतक व भर्तृहरीच्या कारिका दगडावर खोदून ठेवल्या होत्या. भोजाच्या नंतर उदयादित्य,अर्जुनवर्मा वगैरेंनीं कांहीं पुस्तकें खोदून तेथें ठेवलीं होतीं, पण मुसलमानांच्या स्वारीनंतर ते विद्यामंदिर पाडून तेथें मशीद झाली. ती तेथें आज कमालमौला नांवानें प्रसिद्ध आहे. तेथील ग्रंथ कोरलेले दगड साफ करून त्यांची फरशी केली. कांहीं ग्रंथ कोरलेले दगड उलटे टाकले होते ते आतां तेथून काढले आहेत. त्यांवरून प्राकृतांतील दोन्ही कूर्मशतकें व पारिजातमंजरी नांवाची नाटिका प्राप्त झाली आहे (कूर्मशतक एपि. इंडि., भा. ८, पृ. २३३-६०; पारिजातमंजरी एपि. इंडि. भा. ८, पृ. १०१-२२).

हा राजा गुणग्राहक असून एक एक श्लोकाला लाख लाख रुपये देण्याबद्दलची याची प्रसिद्धि अद्यापि लोकांच्या तोंडीं आहे. भोजप्रबंधकर्ता बल्लाळ आणि प्रबंधचिंतामणिकर्ता मेरुतुंग यांनीं, कालिदासादि कवींनीं याच्यापासून

सन्मान मिळविला होता असें लिहिलें आहे, पण तें कालदृष्ट्या चुकीचें असल्यामुळें विश्वासार्ह नाहीं. याच्या वेळीं धनपाल जिवंत होता व त्यानें याच्या वेळीं तिलकमंजरी लिहिली.

हा चितोड येथें मधूनमधून राहत असे. तेथें यानें त्रिभुवननारायण नांवाचें विशाल शिवमंदिर बांधिलें (ना. प्र. प. भा. ३, पृ. १–१८), त्याचा जीर्णोद्धार महाराणा मोकलनें वि. सं. १४८५ (स. १४२८) मध्यें केला. सध्यां त्याला अदबदजी (अद्भुतजी) किंवा मोकलजीचें मंदिर असेंहि म्हणतात. कल्हणाच्या राजतरंगिणीमध्यें पुढील माहिती मिळते. ' काश्मीरच्या अनंतदेव नांवाच्या राजाच्या मर्जीतील एक पद्मराज नांवाचा पानें विकणारा होता. त्यानें माळव्याचा राजा भोज याच्याकडे कांहीं सोनें पाठविलें. त्या सोन्यानें भोजानें काश्मीरांत कपटेश्वर येथें एक कुंड बांधलें. त्या कुंडाचें नांव पापसूदन होय. भोजाचा असा नियम होता कीं, त्यांतील पाण्यानें रोज तोंड धुवावयाचें. पद्मराजानें हा नियम पाळण्याकरितां कांचेच्या कुप्यांतून पाणी पाठवून हा याचा नियम चालवण्यास मदत केली' (राजतरंगिणी ७. १९०–९३). भोजपूर(भोपाळ)ची विस्तृत झीलहि यानें बांधली. ती पुढें माळव्याचा (मांडूचा) सुलतान हुशंगशाहानें पाडली (इंडि. अँटि. १७, पृ. ३५०–५२, तिचा नकाशा पा. ३४८).

भोजाच्या वेळचीं आतांपर्यंत दोन दानपत्रें मिळालीं आहेत. त्यांपैकीं बांसवाड्याचें वि. सं. १०७६ (स. १०१९) व दुसरें वि. सं. १०७८ (स. १०२१) मधील आहे (एपि. इंडि. भा. ११, पृ. १८२–८३. इंडि. अँटि. भा. ६, पृ. ५३–५४). शा. श. ९६४ (वि. सं. १०९९) मध्यें यानें राजमृगांककरण नांवाचा ग्रंथ लिहिला (एपि. इंडि. भा. १, पृ. २३२–३३). याच्यानंतर जयसिंह गादीवर आला. त्याचा पहिला लेख दानपत्र वि.सं. १११२ मधील आहे, त्याअर्थी याचा देहांत वि.सं. १०९९–१११२ पर्यंत केव्हां तरी झाला असावा.

२. (स.१२९०–१३०८ सुमार) माळव्याच्या परमारांपैकीं तिसऱ्या जयसिंहाचा उत्तराधिकारी. हंमीरमहाकाव्यांत हंमीराच्या विजययात्रेंत लिहिलें आहे कीं, मंडलदुर्ग म्हणजे मांडूचा किल्ला घेऊन हा त्वरेनें धारला पोंचला व परमार भोजाला नमवलें. जर हें खरें असेल तर हें कवाळजीच्या कुंडावरील लेख (वि. सं. १३४५) आणि हंमीराचा मृत्यु (वि. सं. १३५८) यांच्या मध्यें कधींतरी झालें असावें. धार येथें अब्दुल्लाशाह चंगालच्या कबरीच्या दरवाज्यांत एक फार्सी शिलालेख लावलेला आहे. त्यांत चंगालच्या प्रशंसेबरोबर वरचा घुमुट अलाउद्दीन घोरीनें बनवला आणि त्याची महमूदशाह खल्जीनें दुरुस्ती केली असें म्हटलें आहे. ही कबर वि. सं. १५१० मध्यें बांधली. येथें हेंहि लिहिलें आहे कीं, चंगालची करामत पाहून राजा भोज मुसलमान झाला (बॉबे ए. सो. ज. स. १९०५ चा एक्स्ट्रा नंबर पृ. ३५२). पहिल्या भोजाच्या वेळीं मुसलमानांचा कांहीं अंमल नव्हता. दुसऱ्या भोजाबद्दलहि ही गोष्ट कालदृष्ट्या जुळत नाहीं. याच्यानंतर चौथा जयसिंह गादीवर आला.

भोज(देव) प्रतिहार—(स. ८४४–८२) रघुवंशी प्रतिहारांपैकीं रामभद्राचा पुत्र. याच्या मातेचें नांव अप्पादेवी. याला मिहिर किंवा आदिवराहहि म्हणत. हा आपल्याजवळच्या राठोड राजा ध्रुवराज दुसऱ्याशीं लढला त्यांत राठोडांच्या म्हणण्याप्रमाणें याचा पराभव झाला. याच्या वेळचे पांच शिलालेखहि वि. सं. ९०० ते ९३८ (स. ८४३–८८१) पर्यंतचे मिळाले आहत (एपि. इंडि. भा. ५, पृ. २११ दौलतपूरचें दानपत्र, एपि. इंडि. भा. १, पृ. १८६–८८ पेहेवाचा शिलालेख). तसेंच चांदीचे व तांब्याचे शिक्के मिळाले आहेत. त्याच्या एका बाजूला ' श्रीमदादिवराह ' असा लेख व दुसऱ्या बाजूला वराहा- (नरवराहा)ची मूर्ति आहे (स्मि. कै. का. इं. म्यु. पृ. २४१–४२ प्लेट २५, सं. १८). हा भगवतीदेवीचा भक्त होता. याची राणी चंद्रभट्टारिकादेवी होती. तिच्यापासून यास महेन्द्रपाल झाला. याचा युवराज नागभट नांवाचा होता अशी माहिती मिळते. पण महेन्द्रपाल व विनायकपाल यांनीं दिलेल्या वंशांत त्याचें नांव नाहीं. त्याअर्थी तो हयात असतांच हा मेला असावा. याच्यानंतर महेन्द्रपाल गादीवर आला.

दौलतपुरा (जोधपूर राज्य) येथें मिळालेलें दानपत्र वि. सं. ९०० फाल्गु. शु. १३ चें दानपत्र आहे (राजपुताना म्युझियम). शेवटला शिलालेख वि. सं. ९३८ मधला आहे. यावरून हा साधारणपणें अडतीस वर्षे कनोजच्या गादीवर होता असें ठरतें. कदाचित् थोडा अधिकहि असेल. हा महीपालाचा दादा आणि महेंद्रपालाचा पिता होय. यानें ' आदिवराह ' शिक्क्यांचीं बरींच नाणीं पाडलीं असावीं. कारण स. १०२० च्या 'सियाडोनी' येथील लेखांतून आदिवराह–द्रव्याचा (रुपयांचा) उल्लेख आहे (एपि. इंडि. भा. १, १७४). हें नाणें पुढें शंभर वर्षे प्रचारांत होतें. यानें अल्ल नांवाचा एक गुजराथेंतील आनंदपूरचा नागर ब्राह्मण ग्वाल्हेरला किल्लेदार नेमला होता (एपि. इंडि. भा. १, पा. ९५७).

२. (स. ९३१ सुमार) हा महेंद्रपाल प्रतिहाराचा पुत्र. यांच्या मातेचें नांव देहनागादेवी. महीपाल वडील किंवा भोज वडील हें अद्यापि समजलें नाहीं.

भोज भगत—(स. १७८५–१८५०) गुजराथी कवि व साधु. याचे फटके प्रसिद्ध आहेत.

भोजमल्ल—(स. १३६६) विजयनगरचा सेनापति. मुहंमद बहामनीनें याला जखमी केलें, तेव्हां हा पळाला. तेव्हां तोफा वापरल्या होत्या (मु. रि. भा. १, पृ. ७३).

भोजराज मिनेगार—हा मिन्याचें काम करण्यांत कुशल होता. याला पुण्यास बोलावून याच्याकडून आपल्या लोकांना मिन्याचें काम शिकवावें असें नानाफडणीसाच्या मनांत होतें. पण पुढें याला महादजीनें लष्करांस नेलें. तेथून हा जयपुरास गेला. पण तेथें गेल्यावर राजकारणाच्या संशयामुळें याला त्रास झाला, व बाहेर पुणें येथें जाण्यास प्रतिबंध झाला. राजकीय परिस्थितीमुळें कलाकौशल्याचा प्रसार होण्यास कसा प्रतिबंध होई हें यावरून दिसून येतें (इ. सं. १. ५ ऐ. टि. २५).

भोजराज गुहिलोत—(स. ५८६–६०६) उदेपूरच्या गादीवर गुहिलानंतर आला. याच्यामागून महेंद्र गादीवर आला.

भोजवर्मा—(स. १०७९ सुमार) हा बंगालच्या वर्म घराण्यांतील सामलवर्माचा मुलगा.

याचे बेलव येथील शिलालेख प्रसिद्ध असून ते सध्यां ढाक्का येथील म्युझियममध्यें आहेत. त्या शिलालेखांवरून याच्या घराण्याची माहिती बरीच मिळते (मॉडर्न रिव्ह्यू, नवं. १९३२, पा. ५३०).

भोज शिलाहार—(स. ११७८–१२०७) हा कोल्हापूरच्या शिलाहार घराण्यांतील एक राजा. हा विजयार्क शिलाहाराच्या मागून गादीवर बसला असावा. खलिगल म्हणजे खेळणा ऊर्फ विशाळगड हा किल्ला यानें स. १२०० त बांधला, असा उल्लेख आहे. हा 'श्रीमहालक्ष्मीलब्धवरप्रसाद' ही पदवी आपल्या नांवास जोडीत असे.

भोसले (घोरपडे व मुधोळ) घराणें—लक्ष्मणजी (मेवाडचा महाराणा), अजयसिंह (स. १३०१), १ सुजनसिंह (मृ. स. १३५९), २ दिलीपसिंह (मृ. स. १३६५), ३ सिद्धजी (मृ. स. १३९७), ४ भैरवजी ऊर्फ भोसाजी (मृ. स. १४०७), ५ देवराज (मृ. स. १४२२), ६ उग्रसेन (मृ. स. १४५५, भाऊ प्रतापसिंह), ७ कर्णसिंह १ ला (मृ. स. १४६९), ८ भीमसिंह (स. १४४३–८९), ९ खेलोजी (मृ. स. १५१४), १० मालोजी १ ला (मृ. स. १५३२), ११ अखैजी (मृ. स. १५४८), १२ कर्णसिंह २ रा (मृ. स. १५६५, याचा भाऊ भीमसिंह), १३ चोलराज (मृ. स. १५७८), १४ पिलाजी (मृ. स. १५९६, भाऊ कानोजी, वल्लभसिंह), १५ प्रतापराव (मृ. स. १५९६, भाऊ हणमंतराव), १६ बाजीराजे (मृ. स. १६४५), १७ मालोजी दुसरा (मृ. स. १६६४, भाऊ शंकराजी), १८ अखैजी २ रा (स. १६७५ सुमार), १९ पिराजी (स. १७०० सुमार, भाऊ बाजी व जयसिंह), २० मालोजी ३ रा (स.१७१६–१८०५, भाऊ संकोजी व राणोजी), २१ गोविंदराव (मृ. स. १७७०, भाऊ केदारराव, पर्वतराव, मल्हारराव व बाजी), २२ नारायणराव (राज्यकाल स. १८०५–१५), २३ गोविंदराव (मृ. स. १८१८ भाऊ व्यंकटराव व लक्ष्मण), २४ बळवंतराव (मृ. स. १८६२) व्यंकटरावाचा मुलगा), २५ वेंकटराव (मृ. स. १९००), २६ रामचंद्रराव (भाऊ मालोजी ४ था व लक्ष्मण), सध्यां सर मालोजीराव चौथे हे मुधोळच्या गादीवर आहेत, २७ गोविंदराव (मृ. स. १९२०) भाऊ जयसिंह (मृ. स. १९३१) व भैरवसिंह. नांवांमागील आंकडे पिढ्यांचे दर्शक आहेत.

भोसले घराणें (सातारचें)—उग्रसेन (इंद्रसेन), शुभकृष्ण (स. १४५० सुमार), रूपसिंह (स. १४७० सुमार), धोपजी (स. १४९० सुमार), खेळकर्ण (स. १५०० सुमार), जयकर्ण (स. १५२० सुमार) संभाजी (स. १५४० सुमार).

१ बाबाजी भोसले, २ मालोजी भोसले, ३ शहाजी भोसले (स. १५९४–१६६४), ४ शिवाजी १ ला (स. १६७४–८०), ५ राजाराम (ता.२१.४.१६८०–१६.३. १६८१), ६ संभाजी १ ला (स. १६८१–१६८९), ७ राजाराम (दुसऱ्यांदा स. १६८९–१७००), ८ शिवाजी २ रा (स.१७००–७), ९ शाहू १ ला (स.१७०७–१७४९), १० रामराजा द. (स. १७४९–१७७७), ११ शाहू २ रा द. (१७७७-१८०८), १२ प्रतापसिंह (स.१८०८–१८३९), १३ शहाजी २ रा (स. १८३९–१८४८). निपुत्रिक मरण पावल्यावर ब्रिटिश सरकारने राज्य खालसा केलें. दत्तकवंश साताऱ्यास आहे.

२. (कोल्हापूरचें)—१ ताराबाई (साताऱ्याच्या राजारामाची बायको), २ संभाजी २ रा (स. १७३०–

१७६०), ३ शिवाजी ३ रा द. (स. १७६०–१८१२) ४ संभाजी ३ रा (स. १८१२–१८२२ खून झाला), ५ शाहजी (स. १८२२–१८३७), ६ शिवाजी ४ था द. (स. १८३७–१८६६), ७ राजाराम द. (स. १८६६–१८७०), ८ शिवाजी ५ वा द. (स. १८७०-१८७३), ९ जसवंतराव द. (स. १८७३–८३), १० शाहू (मृत्यु स. १९२२), ११ राजाराम (प्रस्तुत).

२. (**तंजावरचें**)—शहाजी भोसले (व्यंकोजीचा बाप), १ व्यंकोजी (स. १६७४-८५), २ शहाजी (स. १६८५–१७११), ३ सर्फोजी (स. १७११-२७) ४ तुकाजी (स १७२७–३५), ५ बाबाजी (स.१७३५–३८), ६ शाहुजी (स. १७३८–४१), ७ प्रतापसिंह (स. १७४१–४९), ८ शाहुजी पुन्हां (स. १७४९–६५) ९ तुळजाजी (स.१७६५–८७), १० अमरसिंह (स. १७८७–९७), ११ सर्फोजी (स. १७९७–१८२४), १२ शिवाजी (स. १८२४–५५). ह्या घराण्यांतील आद्य संस्थापक शहाजी भोसल्याचा मुलगा व्यंकोजी होय. यानें स. १६७४ मध्यें तंजावरचा राजा सिंगमल्लदासाकडून राज्य बळकाविलें.

४. (**नागपूरचें**)—१ परसोजी, २ कान्होजी, ३ रघूजीबाबा (मृ. स. १४–२–१७५५), जानोजी (मृ. स. १७७१), ५ रघूजी २ रा (मृ. स. १८१६), ६ परसोजी (१८१७ खून), ७ मुधोजी (स. १८१७–४०), ८ रघूजी द. (स. १८१८–५३), जानोजी द. (मृ. स. १८८१), १० रघूजीराव विद्यमान (बंधु राजे लक्ष्मणराव मृ. स. १९३२).

म

मकरंद—(ग्रंथकाल स. १४७८) एक भारतीय ज्योतिषी. यानें पंचांगसाधन फार सुलभ रीतीनें करतां येण्यासारखा ' मकरंद ' नांवाचा सारणी-ग्रंथ रचला. वरील ग्रंथ सूर्यसिद्धांतानुसार आहे. मकरंद ज्योतिषी काशी येथें राहणारा होता. या ग्रंथावर टीका दिवाकर या विद्वानानें केली असून तिचें नांव ' मकरंदविवरण ' असें आहे. काशी व ग्वाल्हेर येथें या ग्रंथावरून पंचांगें तयार करतात. हा ग्रंथ सांप्रत उत्तरहिंदुस्थानांत काशी येथें छापिला आहे. शके १६८८ मध्यें गोकुळनाथ दैवज्ञानें यांतील सारण्यांची उपपत्ति लिहिली आहे. तीहि छापिली आहे (भा. ज्यो.).

मॅकार्टने—(स. १७८१) हा प्रथम रशियांत इंग्रजांचा वकील व पुढें हिंदुस्थानांत मद्रासचा गव्हर्नर होता.

मच्छकुंद—(ग्रंथकाल स. १६७८) याचा श्रीभार्गवचरित्र नांवाचा ओवीबद्ध अपुरा ग्रंथ धुळ्याच्या शंकर श्रीकृष्ण देवांना उपलब्ध झाला आहे (मं. वार्षिक शके १८३६ ते १९).

मजमून—ऊर्दू कवि. याचें नांव शेख शर्फुद्दीन मजमून. गांव अकराबाद (जाजमऊ). ग्रंथ-मजमून (क. कौ. ४).

मजहर—(स. १६९६–१७७८) ऊर्दू कवि. याचें नांव मीर्झा जानजाना. याचा एक फार्सी व दुसरा ऊर्दू कवितासंग्रह आहे (क. कौ. ४).

मज्झन्तिक—अशोकाच्या प्रेरणेनें भरलेल्या तिसऱ्या बौद्धमहासभेंत याला काश्मीर व गांधार या देशांतील मुख्य प्रचारक नेमिलें होतें. हा काश्मीरांत गेला तेव्हां तेथें ' आखाल ' नांवाचा नाग राजा राज्य करीत होता. तो अत्यंत प्रभावी होता, तरी यानें आपला प्रभाव त्याच्यावर पाडून तेथें बौद्धधर्माचा प्रचार केला, असें महावंशांत म्हटलें आहे; व दीपवंशांतहि तशीच माहिती सांपडते. तिबेटी ग्रंथ दुल्व यांत या माहितीला दुजोरा मिळतो (मौर्य-साम्राज्यका इतिहास, पा. ५४८).

मज्झिम—अशोकाच्या प्रेरणेनें भरलेल्या तिसऱ्या बौद्धमहासभेंत यास हिमालय प्रदेशाचा मुख्य प्रचारक नेमण्यांत आलें. सांची येथें सांपडलेल्या अवशेषांत याचें नांव असलेला एक अवशेष सांपडला आहे. दुसऱ्या एका अवशेषावर ' मज्जिम कश्यपगोत हिमवताचार्य ' असेंहि लिहिलेलें आढळलें. त्यावरून महावंश व दीपवंश या आख्यायिकात्मक ग्रंथांत मिळालेल्या माहितीस ऐतिहासिकत्व प्राप्त झालें आहे.

मज्हर अलीखान—यानें तुहफत-इ-अकबरशाही याच्या पहिल्या भागाचें उर्दूत भाषांतर केलें (कार्नवाली-सचीं कारकीर्द) व त्याला तारीख-इ-शेरशाही असें नांव दिलें (बील).

मझुलाखान—(स. १६०२) विजापूरकरांचा एक सेनापति. याचा चिक्क संकण्णानें स. १६०२ मध्यें पराभव केला.

मणिक—(स. १३०० सुमार) या नेपाळी गृहस्थानें ' अभिनवराघवानंद ' व ' सत्यमंगलरत्नखेट ' हीं दोन नाटकें लिहिलीं.

मणिदेव—एक हिंदी कवि (गोकुळनाथ पाहा).

मणिभद्रा (योगिनी)—ही चौऱ्यांयशीं सिद्धांपैकीं पासष्टावी सिद्धीण होय. ही जातीनें गृहदासी. ही कुकुरिपा याची शिष्या होय.

मणियार पारशी—(स. १७८१-८२) रघुनाथराव पेशवे यांचा इंग्लंडला गेलेला वकील.

मणिराम—(ग्रंथकाल स. १७७४) एक ज्योतिषी. यांचें गोत्र भारद्वाज होतें; व हा यजुर्वेदी ब्राह्मण होता. याच्या पित्याचें नांव लालमणि असें होतें. याचा गुरु काश्यपगोत्राचा असून त्याचें नांव वत्सराज असें होतें. मणिरामला कोणीं नुसतें ' राम ' असेंहि म्हटलें आहे. याचा ' ग्रहगणितचिंतामणि ' ग्रंथ प्रसिद्ध आहे (भा. ज्यो.).

मतिराम—(जन्म स. १६१७) हा रीतिकालांतील एक प्रमुख हिंदी कवि होय. याचे चिंतामणि व भूषण हे बंधु होत. हा बुंदीच्या भावसिंहाच्या आश्रयास असून यानें ललित-ललाम, छंदसार, रसराज, साहित्यसार, लक्षणशृंगार व मतिरामसतसई हे ग्रंथ लिहिले. याला अनुप्रास फार चांगले साधले आहेत.

मतिसिंह—उंगपो या चिनी प्रवाशानें हिंदुस्थानांत धारण केलेलें नांव.

मत्तट गुहिलोत—(स. ७७३-९३) खुम्माणानंतर मेवाडच्या गादीवर आला. याच्यानंतर भर्तृभट्ट गादीवर बसला.

मत्स्येंद्रनाथ—(समाधि स. १२१० सुमार) हा आदिनाथसांप्रदायाचा प्रवर्तक असून हा विष्णूचा अवतार समजला जातो. गोरक्षनाथ याचाच शिष्य होय. हा विक्रम शकापूर्वी सुमारें चारशें वर्षे होऊन गेला. याचा जन्म मत्स्याच्या पोटीं झाला असून यास बद्रिकाश्रमीं दत्तानें योगमार्गाचा उपदेश केला. यानें सातारा जिल्ह्यांत मत्स्येंद्रगड येथें चैत्र वद्य ५ ला समाधि घेतली. यानें योगमार्गावर ' मत्स्येंद्रसंहिता ' नामक ग्रंथ लिहून हटयोग व शाबरी मंत्रतंत्रविद्येचा प्रसार केला. याचा नेपाळांत यात्रोत्सव सात दिवस साजरा होतो (नाथलीलामृत २, भक्तविजय २९). कृष्णाकांठीं शाळूस मत्सिंटरी जोंधळा म्हणतात. नाथांच्या बाह्य वेषाचें वर्णन पुढीलप्रमाणें आहेः

शैली शृंगी कंथा झोली विभूत लगाया तनमो
कोटि चंद्रका तेज झुलत है चली आपने गतमो ।
(म. वा. इ. भा. १).

मथनसिंह गुहिलोत—(स. ११९१-१२११). मेवाडच्या गादीवर कुमारसिंहानंतर त्याचा पुत्र मथनसिंह आला. कुंभलगडच्या शिलालेखांत याचें नांव महणसिंह असें दिलें आहे. रावळ समरसिंहाच्या वेळचा वि. सं. १३३० (स. १२७३) मधील उदयपूरच्या जवळ चीखागांवच्या शिलालेखांत लिहिलें आहे कीं यानें टांटरड (टांटेड) जातीच्या उद्धरण नांवाच्या माणसाला नागन्हद नगराचा तलारक्ष (कोतवाल, नगररक्षक) नेमला. टांटेड जात सध्यां नष्ट झाली आहे.

मथुरादास—' वृषभानुजा ' या संस्कृत नाटिकेचा कर्ता. गांव-गंगा व यमुना यांच्या कांठीं सुवर्णशेखर.

मथुरानाथ—(ग्रंथकाल स. १७८२) हा मालवांत ब्राह्मण काशी येथील संस्कृत पाठशाळेंत पुस्तकालयाच्या कामाकडे स. १८१३ पासून स. १८१८ पर्यंत होता. यास ज्योतिषाचें ज्ञान चांगल्यापैकीं असे. इतकेंच नव्हे, तर यास फार्सी भाषाहि येत असे. यानें ' यंत्रराजघटना ' नांवाचा ग्रंथ केला. त्याची ग्रंथसंख्या सुमारें १००० आहे.

मथुरानाथ तर्कवागीश—(स. १५७० सुमार) याच्या वडिलांचें नांव श्रीराम तर्कालंकार असें असून हा आपले वडील व त्यांचे गुरु रघुनाथशिरोमणि ह्या दोघांचाहि शिष्य होय. तर्कशास्त्रावरील टीका यानें ' माधुरी ' या नांवानें लिहिल्या. याचे ग्रंथः (१) तत्त्वचिंतामणिरहस्य, (२) तत्त्वचिंतामण्यालोकरहस्य ', जयदेवाच्या आलोकावरील उपटीका, (३) ' दीधितिरहस्य ', (४) 'सिद्धांतरहस्य', (५) ' किरणावलिप्रकाशरहस्य ', वर्धमानाच्या ग्रंथावरील उपटीका, (६) 'न्यायलीलावतीप्रकाशरहस्य', (७) ' न्यायलीलावतीप्रकाशदीधितिरहस्य ', (८) ' बुद्धधिकाररहस्य ', (९) ' अयुर्दायभावना ', (१०) ' आदिक्रियाविवेक '.

मथुरानाथानें निर्देशिलेल्या सुंदर उपाध्याय व हरिनाथ उपाध्याय यांच्याविषयीं कांहीं माहिती उपलब्ध नाहीं.

मथुराबाई आंगरे—(स. १७३० सुमार) हीं कान्होजी आंगरे यांची पत्नी व बाकाजी महाडिकांची

कन्या. ही फार कर्तृत्ववान् व मराठी राज्याची अभिमानी होती. हिचा व ब्रह्मेंद्रस्वामींचा पत्रव्यवहार वाचण्यासारखा आहे. हबशाच्या युद्धांत हिनेंच आंग्र्यांच्या तर्फे पुढाकार घेतला होता. ब्रह्मेंद्रस्वामींच्या इच्छेवरून अंजनवेल व गोवळकोट वगैरे काबीज करण्याकरितां हिनें बाकाजी नाईकास पाठविलें. त्या वेळच्या त्यांच्या पराक्रमाचीं हिनें लिहिलेलीं वर्णनें वाचण्यासारखीं आहेत (रा. खं. ३.३०.५६.८५). हिचे पुत्र सेखोजी व संभाजी.

मदन—(स. १२१२–१५) हा मूळचा बंगाली असून पुढें धारच्या अर्जुनवर्मा परमाराचा हा अध्यापक झाला. याचें दुसरें नांव बालसरस्वती असून यानेंच 'पारिजातमंजरी' ही प्रसिद्ध नाटिका लिहिली. बिल्हणाच्या कर्णसुंदरीप्रमाणेंच हिच्यांतहि तत्कालीन गोष्टींचा उल्लेख सांपडतो. वरील सालांतील यानें लिहिलेले ताम्रपट उपलब्ध आहेत.

मदनपंत—मादण्णाचें नामांतर.

मदनपाल—(स. ११४२–६१) हा बंगाल्यांतील पाल घराण्यांपैकीं रामपालाचा मुलगा. याच्या पत्नीचें नांव चित्रमटिका. हा बौद्ध होता तरी याच्या पत्नीनें महाभारत ऐकलें म्हणून एक गांव ब्राह्मणास दिलें (JRASB ६९,१·६६). याच्या वेळेस पालांच्या राज्यास उतरती कळा लागली (हिं. भा. अ. पा. ३५०). रामपालाचा नातू गोपाळ हा राज्यावर येऊन अपमृत्यूनें मेल्यामुळें हा गादीवर आला. हा गोपाळचा चुलता होय. रामपालानें स्थापन केलेल्या रामावती या राजधानींत हा राहत असे (हि. का. मार्च १९२९).

२. (ग्रंथकाल स. १३६०–९०) संस्कृत भाषेंतील धर्मशास्त्रकार. हा टाक कुळांतील राजा. यमुनेच्या तीरावर काष्ठा येथें याचें राज्य होतें. याच्या पित्याचें नांव साधारण, थोरल्या भावाचें नांव सहजपाळ, व आजा हरिश्चंद्र. त्यापूर्वीचीं नांवें अनुक्रमें भवपाळ व रत्नपाळ अशीं आहेत. याचे ग्रंथ–१ आनंदसंजीवन, २ तिथिनिर्णयसार, ३ यंत्रप्रकाश, ४ शूद्रधर्मबोधिनी, ५ सिद्धान्तगर्भ, ६ स्मृतिकौमुदी, ७ मदनपालनिघंटु, ८ वैद्यक. हे सर्व ग्रंथ यानें विश्वेश्वरभट्टाच्या साहाय्यानें लिहिले. मदनपारिजात व मदनमहार्णव ग्रंथ याचेच होत.

मदनपाल गाहडवाल—(स. ११००) हा चंद्र गाहडवालाचा मुलगा. याची लेखांत मिळणारी माहिती विशेष नवीन कांहीं सांगत नाहीं. याचा पुत्र गोविंदचंद्र. याच्या पत्नीचें नांव पृथ्वीश्रीका असें होतें. हिच्या संमतीनें दिलेल्या दानाचा लेख उपलब्ध झाला आहे.

मदनवर्मा चंदेल्ल—(स. ११२८–६५) हा पृथ्वीवर्मन्चा पुत्र. यानें सिद्धराज जयसिंह या गुर्जर राजाचा पराभव केला. यानें मदनसागर नांवाचा तलाव बांधला. यानें चेदीच्या राजाचा पराभव केला, माळव्याच्या राजाची कत्तल केली व काशीच्या राजाचा स्नेह संपादन केला. याचा पुत्र वारल्यामुळें याचा नातू परमर्दी गादीवर आला.

मदनसिंग—हा छत्रपति संभाजीचा दासीपुत्र. हा दिल्लीच्या बादशहाच्या कैदेंत तीस वर्षें होता.

बाळाजी विश्वनाथ व सय्यद यांची भेट ज्या वेळेस झाली त्या वेळेस हा सुटला (ता. २३–२–१७१९).

मदनसिंह—(स. १४२५–५० सुमार) संस्कृत धर्मशास्त्रकार. यानें 'मदनरत्न' हा ग्रंथ गोपीनाथ, विश्वनाथ, गंगाधरभट्ट व रत्नाकर यांच्या साहाय्यानें लिहिला. या ग्रंथाचे सात उद्योत आहेत व त्यांत आचार, व्यवहार वगैरे विषय आहेत. हा आपणास महाराजाधिराज म्हणवतो. याचा वंश महीपालदेव-दामोदर-देवीदास-सूर्यदास-शक्तिसिंह-मदनसिंह असा आहे.

मदलंबिका—बसवाची माता.

मदारी मेहेतर फरास—या मुसलमान गृहस्थानें शिवाजीची आग्र्याहून सुटका करण्यास मदत केली. हा शिवाजीचा एकनिष्ठ सेवक होता. ह्याच्या स्वामिनिष्ठेबद्दल शिवाजीनें यास पोशाख, सोन्याचीं कडीं, एक वंशपरंपरा हक्क व राज्याभिषेकाच्या वेळची नरसिंहाची पूजा दिली. याच्या मुलाचें नांव सादुल्ला फरास होय (मं. त्रै. व. ४ अं. १–४ पृ. ३६–३७).

मदुरान्तकी—कुलोत्तुंगाची पत्नी.

मधुकरसा—(मृत्यु स. १५९३) बुंदेलखंडाचा राजा भारतीचंदाचा भाऊ. भारतीचंद मरण पावल्यावर हा गादीवर बसला. अकबरास हा प्रांत मिळवावयाचा असल्यामुळें स. १५७८ त सादतखान नामक सरदारास ओर्च्छावर पाठविलें. पुढें उभयतांच्या अनेक चकमकी झडून हा अकबरास शरण गेला. तेव्हां बादशहानें याचें राज्य परत दिलें.

मधुकामार्णव गंग—(स. १०१९–१०३८) हा त्रिकलिंगाच्या प्राच्य गंगांपैकीं पहिल्या वज्रहस्ताचा मुलगा. याची वैदुंबराजकन्या विनया ही पत्नी होय.

मधुकेश्वर कदंब—बनवासीच्या कदंबघराण्याचा मूळ पुरुष.

मधुर—(स. १३८५) विजयनगरच्या दुसऱ्या हरिहर संगमाच्या दरबारीं हा कवि होता. यानें 'धर्मनाथपुराण' नांवाचा ग्रंथ लिहिला

मधुरवाणी—(स. १६१४ सुमार) एक संस्कृत कवयित्री. ही तंजावरच्या रघुनाथ नायक नांवाच्या राजाच्या दरबारांत होती. यज्ञनारायण दीक्षिताच्या साहित्यरत्नाकर-काव्यावरून आणि राजचूडामणीच्या रुक्मिणीपरिणय काव्यावरून रघुनाथ नायक हा स. १६१४–१६६२ पर्यंत राज्य करीत होता, असें दिसतें. याच्या तेलंगी भाषेंतील रामायणाचा हिनें संस्कृतमध्यें अनुवाद केला. या काव्यांत १४ सर्ग व १५०० श्लोक आहेत.

हिचें मूळचें नांव वेगळें असून हिच्या कवित्वामुळें मधुरवाणी असें हिला नांव प्राप्त झालें. ही वीणा वाजविण्यांत कुशल होती. संस्कृत व तेलंगी भाषेंत हिची कवित्वशक्ति अद्भुत असून ही शीघ्रकवि होती. तसेंच ही अष्टावधानी असे. नैषधकाव्य व कुमारसंभव यांचे छायानुवाद हिनें केले आहेत. तसेंच हिनें कांहीं चंपूंहि लिहिले आहेत. ही अद्वैतमताची होती. हिनें आपल्या आश्रयदात्यांची पुष्कळ स्तुति केली असली तरी आपले मातापिता किंवा वंश याबद्दल एक अक्षरहि लिहिलें नाहीं. हिचीं पुस्तकें तेलंगी लिपींत म्हैसूर प्रांतांत सांपडतात (प्राचीन पंडित और कवि, पा. ७०).

मधुरान्तक पोरप्पि चोल—(स. १२८६–१३१०) चोल घराण्यांपैकीं एक राजा. याला मुसलमानांनीं पदच्युत केलें.

मधुवैज—हा लिंगायत असून बसवाचा अनुयायी होता. म्हणून बिज्जल राजानें कमरेस दोऱ्या बांधून यास रस्त्यांतून फरपटत ओढून ठार मारलें.

मधुसूदन—विद्वद्भूषणनामक संस्कृत ग्रंथाचा कर्ता. २. (हनुमान् पाहा).

मधुसूदन ठक्कर—(स. १५७५) पक्षधरानें आपल्या आलोकांत गंगेशाच्या ग्रंथावर केलेल्या खोडसाळ टीकेचें खंडन करण्यासाठीं यानें 'तत्त्वचिंतामण्यालोककंटकोद्धार' व धाकट्या वाचस्पतिमिश्राच्या 'द्वैतनिर्णया'वर 'कंटकोद्धार' नांवांचे ग्रंथ लिहिले.

मधुसूदनदास—या हिंदी कवीचा रामाश्वमेध ग्रंथ प्रसिद्ध आहे.

मधुसूदन सरस्वती—(स. १६५० सुमार) विश्वेश्वर व श्रीधर सरस्वतीचा शिष्य आणि पुरुषोत्तम सरस्वतीचा गुरु. यानें अद्वैतसिद्धि, अद्वैतरत्नरक्षण, प्रस्थानभेद, सिद्धांततत्त्वबिंदु वगैरे अनेक ग्रंथ केले. यानें द्वैतवाद्यांच्या भक्तीचा स्वीकार करून द्वैताचें खंडन केलें आणि अद्वैतमताची प्रतिष्ठा वाढविली.

मध्वनाथ—या मराठी कवीनें ५४ ओव्यांचें असें एक 'श्रीकृष्णजन्म' या नांवाचें चटकदार प्रकरण लिहिलें आहे. काव्य अत्यंत चटका लावणारें आहे (मं. वा. इ. श. १८३७ ले. १४५).

२. एक मराठी कवि. यानें 'गुरुचरित्र' नांवाचा एक ग्रंथ लिहिला. त्या चरित्रांत यानें 'एका जनार्दना'चा गुरु म्हणून उल्लेख केला आहे (मं. वा. इ. शके १८३७, ले. २८).

मध्वमंदिर—या कवीनें महाभारततात्पर्य ग्रंथ लिहिला. हा मध्वाचार्यांच्या पूर्वी होऊन गेला.

मध्वमुनीश्वर—(समाधि स. १७३१) हा प्रसिद्ध सत्पुरुष व कवि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून नाशिक येथें राहत असे. याचें घराणें कट्टर वैष्णव असून ह्याचे गुरु काशीचे अद्वैतानंद हे होत. याच्या संबंधानें निरनिराळ्या ग्रंथकारांनीं परस्परविरोधी माहिती दिली आहे. त्यांपैकी महिपतीची भक्तलीलामृतांतील माहिती विश्वसनीय वाटते. हा महाराष्ट्र कवि अमृतराय याचा शिष्य असावा. याच्या चमत्काराच्या बऱ्याच आख्यायिका प्रसिद्ध आहेत. याचे 'धनेश्वराचें अभंगबद्ध चरित्र', 'सखूचें चरित्र', 'गणेशाष्टक' व कांहीं पदें आणि अभंग प्रसिद्ध आहेत. याच्या त्र्यंबक नामक शिष्यानें आपल्या 'प्रल्हादचरित्र' ग्रंथांत याचा स्पष्ट उल्लेख केला आहे. कान्होजी आंग्र्याचा पंडित भास्करराव याचा यानें वादांत पराभव केला. याचे वंशज अद्याप पैठण व औरंगाबाद या बाजूस आहेत (म. क. च. भा. १ ला, पृ. ३४४–३५१). याची समग्र कविता प्रसिद्ध आहे (म. पुरस्कृत ग्रं. ३०). याचें नांव त्रिंबक, वडिल नारायणाचार्य, माता द्वारावतीबाई.

मध्वाचार्य—(जन्म स. ११९९–बद्रिकाश्रमप्रयाण स. १२७८) द्वैतमताचे प्रख्यात आचार्य. यांचा पिता–मध्यगेह व माता–वेदवती. जन्मस्थळ–उडुपी जवळ (पाजकक्षेत्र). सध्यां तें स्थळ बेल्ली या नांवानें प्रसिद्ध आहे. यांचे गुरु अच्युतप्रेक्षाचार्य होत. यांनीं अध्ययन संपविल्यावर गृहस्थाश्रम न स्वीकारतां एकदमच संन्यास घेतलेला दिसतो. यांनीं हिंदुस्थानांत अनेक वेळां प्रवास करून आपल्या वैष्णवमताचा प्रचार केला.

मध्व असा स्वतंत्र शब्द संस्कृतांत नाहीं. पण यांच्या नांवामुळेंच त्याला संस्कृतांत स्थान प्राप्त झालें आहे (मं. इ. वृ. १८३५). जयसिंह चालुक्या(कल्याणी)नें यांचा सन्मान केल्याचा निर्देश आहे.

याच्या मतें स्वतंत्र व अस्वतंत्र अशीं दोन तत्त्वें आहेत. भगवान् विष्णु हा स्वतंत्र असून तो सर्व सद्गुणांनीं मंडित व दोषरहित आहे; तदितर सर्व अस्वतंत्र आहेत. जीवेश्वरभेद, जडेश्वरभेद, जीवजीवभेद, जीवजडभेद, जडाजडभेद, अशे

पांच प्रकारचे भेद यानें मानले आहेत. सच्चिदानंदस्वरूपी परमात्मा हा या सर्व जगाचें मूळ कारण असून तो अंतर्यामी स्वरूपानें सर्व वस्तूंमध्यें राहतो. तो केवळ सुखाचाच तेवढा उपभोग घेतो, दुःखाचा त्याला स्पर्श देखील होत नाहीं. परमात्मा व जीव यांमध्यें मोक्षावस्थेंत देखील कधींच अभेद होत नाहीं. जो दिसतो तो केवळ भ्रम होय. मोक्षावस्थेमध्यें जीवाला मुळींच दुःख होत नाहीं. या अवस्थेमध्यें त्याला क्रीडादि अनेक प्रकारचीं सुखें उपभोगितां येतात. पण परमात्म्याची जी लक्ष्मी, श्रीवत्स व जगदुत्पादकशक्ति हीं तीन वैभवें तीं मात्र जीवाला प्राप्त करून घेतां येत नाहींत. सर्व जीवांना सारखीच मुक्तावस्था मिळत नाहीं. जीव हा ज्ञाता आहे तरी त्याचें ज्ञान मर्यादित आहे. मोक्षप्राप्तीसाठीं जीवानें परमात्म्याची अंकन (विष्णुचिन्हें अंगावर डागून घेणें), नामकरण व भजन या तीन प्रकारांनीं सेवा केली पाहिजे. श्रीविष्णूच्या ज्ञानाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि साधनानें मोक्षाची प्राप्ति होत नाहीं. जीव हा सांश व निरंश आहे. या जगाची उत्पत्ति नित्य परमाणूपासून होते. सर्व गुणांनीं युक्त अशा विष्णूच्या ज्ञानानें आपलीं सांसारिक दुःखें नाहींशीं करून जीवानें श्रीविष्णूच्या समीप आनंदानें वास करणें हाच मोक्ष होय. जग हें पारमार्थिक दृष्ट्या सत्य आहे, असें याचें मत होतें.

भक्तिमार्गाच्या चार (विष्णु–लक्ष्मी–ब्रह्म–वायु) संप्रदायांपैकीं हा एक संप्रदाय आहे. या पंथांत विष्णूच्या खालोखाल वायूला फार महत्त्व आहे. रामाचा जसा हनुमान् तसा कृष्णाचा वायुपुत्र भीम (अर्जुन नव्हे) हा सखा होय. मध्वांच्या धर्मग्रंथांतून महाभारतांत भीमाचीं वर्णिलेलीं अनेक अचाट कृत्यें सोडून त्यानें मणिमत् राक्षसाला मारिलें (वनपर्व) हें एवढेच त्याचें कृत्य महत्त्वाचें गणिलें आहे. यांचे ग्रंथ—

१ गीताभाष्य, २ ब्रह्मसूत्रभाष्य, ३ अणुभाष्य, ४ अनुव्याख्यान, ५ प्रमाणलक्षण, ६ कथालक्षण, ७ उपाधिखंडन, ८ मायावादखंडन, ९ प्रपंचमिथ्यात्वानुमानखंडन, १० तत्त्वसंख्यान, ११ तत्त्वविवेक, १२ तत्त्वोद्योत, १३ कर्मनिर्णय, १४ विष्णुतत्त्वनिर्णय, १५ ऋग्भाष्य (पहिल्या चार अध्यायांवर), १६ दशोपनिषद् भाष्य, १७ गीतातात्पर्यनिर्णय, १८ भारततात्पर्यनिर्णय, १९ भागवततात्पर्यनिर्णय, २० संन्यायविवृत्ति, २१ नरसिंहनखस्तोत्र, २२ द्वादशस्तोत्र, २३ कृष्णामृतमहार्णवम्, २४ सदाचारस्मृति, २५ तंत्रसार, २६ यतिप्रणवकल्प, २७ जयंतीनिर्णय, २८ यमकभारत. हे सर्व ग्रंथ संस्कृतांत आहेत.

मनभट जोशी उपाध्ये—(स. १८१८ सुमार) कृष्णंभट उपाध्यायाचा पुतण्या. आप्पासाहेब भोसल्यानें ह्याच्याचकरवीं परसोजी भोसल्याचा खून करविला, असा त्या वेळीं प्रवाद होता. इंग्रजांचें व आप्पासाहेबांचें सीताबर्डी येथें युद्ध चालू असतां अरब सैन्याचा मुख्य हा होता व यानें त्या लढाईंत शौर्य गाजवलें. आप्पासाहेब याच्या मताविरुद्ध इंग्रजांस शरण गेला तेव्हां यानें इंग्रजांच्या ताब्यांत शहर देण्याचें नाकारलें, परंतु अरब फितुर झाल्यामुळें यास इंग्रजांच्या स्वाधीन व्हावें लागलें, व शेवटीं हा त्यांच्या कैदेंतच मरण पावला. मनभटानेंच नागपूरचें राज्य बुडविलें असा आरोप याजवर केला जातो. परंतु त्यांत फारसें तथ्य नाहीं (ना. प्रां. इ.). याच्या घराण्यास आचवळ ऊर्फ रहाळकर असेंहि म्हणतात. या घराण्याचा मूळ पुरुष दादंभट (रा. पांडववाडी) हा होय.

मनरो—(स. १७६१–१८२७) इंग्रजी राज्याची घडी आरंभीं बसवून देणारा एक इंग्रज सेनापति. धारवाड, सोंडूर, सोलापूर, बदामी इत्यादि ठिकाणच्या संग्रामांत यानें पराक्रम केला. शेवटीं अंगच्या हुषारीमुळें हा मद्रासचा गव्हर्नर झाला. परंतु लवकरच गुत्तीजवळ महामारीच्या उपद्रवानें मरण पावला. हा लेखक असून यानें वेलस्ली,हेस्टिंग्ज इत्यादिकांच्या जयिष्णु कारभाराचा निषेध केला आहे.

मनसाराम—(मृत्यु स. १७३९) बनारसच्या चेतसिंग राजाचा हा आजोबा व बळवंतसिंगाचा बाप होय. रुस्तुमअली नांवाचा सादतखानाचा हस्तक बनारसचे कारभारावर होता, त्याचे वशील्यानें मनसारामानें बनारस येथ आपला जम बसविला; आणि सन १७३८ त जोनपुर, चुनार व बनारस या परगण्यांची जहागीर मुलगा बळवंतसिंग याचे नांवानें बादशहापासून संपादन केली. त्याच वेळीं बळवंतसिंगास राजाबहादूर हा किताब मिळाला.

मनाक्ष—हा नेपाळांतील सोमवंशी राजा. हा निमिषामागून गादीवर बसला.

मनियारसिंह—(ग्रंथकाल स.१७८४)एक हिंदी कवि. ग्रंथ–महिम्नभाषा, सौंदर्यलहरी, हनुमत्छबीसी, सुंदरकांड.

मनीरामामिश्र—(स.१७७२) हिंदी कवि. कनोजच्या इच्छारामामिश्राचा पुत्र. ग्रंथ–छंदछप्पनी, आनंदमंगल.

मनु—याचा काल बराच अनिश्चित आहे. यानें बृहन्मानसकरण नांवाचा ग्रंथ लिहिला आहे व त्यावर उत्पलकृत टीकाहि आहे. याचा संक्षेप करून मुंजालानें लघुमानस केलें, असें अल्बेरुणी लिहितो. लघुमानस शक ८५४ चें आहे, यावरून बृहन्मानस शके ८०० चें असावें व मनु हा त्याच कालांतील असावा असें वाटतें.

मनुमसिद्ध—(स. १२५०) नेल्लूर येथील सूर्यवंशी राजा. तिक्कन सोमयाजी याचा दिवाण होता.

मनूची—(स. १६३९-१७१७) एक इटालियन प्रवासी. याचें निकोलो मनूची असें नांव होतें. हा स. १६५६ ते १७१७ पावेतों हिंदुस्थानांत फिरत होता. शिवाजीची व जयसिंगाची भेट झाली तेव्हां हा जयसिंहाजवळ तोफखाना-कामगार होता. संभाजी पोर्तुगिजांशीं लढत असतां हा त्यांचा वकील म्हणून संभाजीकडे गेला होता. हा लोकांत मिसळणारा असून याचें बहुतेक आयुष्य मोगलांच्या दरबारीं गेलें. औरंगजेबाचा वडील पुत्र शहाआलम (मुअज्जम) याजपाशीं मनूची डॉक्टर म्हणून पुष्कळ वर्षें राहिला. हा मद्रास येथें मरण पावला, तेव्हां याजपाशीं दीड लाखाची संपत्ति होती. यानें मोगल बादशाहीचा तत्कालीन वृत्तान्त विस्तृत व खुलासेवार लिहिला आहे. त्याचें भाषान्तर विल्यम आयर्व्हिन यानें चार भागांत प्रसिद्ध केलें आहे. संभाजीसंबंधानें यानें शेंपन्नास पानें मजकूर लिहिला आहे. त्यावरून संभाजीच्या पराक्रमाविषयीं आदर वाटूं लागतो. आणि पोर्तुगीज, इंग्रज व मोगल बादशहा यांना त्याची केवढी दहशत पडली होती, हें स्पष्ट कळून येतें. मनूची सर्व मराठ्यांना शिवाजी हेंच नांव देतो.

मनोरथ—दामोदराच्या तीन मुलांपैकीं दुसरा मुलगा. याला चार मुलें झालीं (हि. का. १. ३२-३३).

२. मंख कवीचा आजा व विश्ववर्ताचा बाप.

३. हा आनंदवर्धनाच्या वेळेस होता.

४. (कविताकाल स. १५६३) हिंदी कवि. अकबराच्या दरबारांत असे. ग्रंथ-शतप्रश्नोत्तरी.

मनोहर गुप्त—काश्मीरी पंडित.अभिनवगुप्ताचा भाऊ.

मनोहरदास गौर—अशेरीचा किल्लेदार राजा गोपाळदासचा मुलगा; व राजा विठ्ठलदासचा पुतण्या. स. १६५२ मध्यें यास अशेरी(माहीमजवळ)ची किल्लेदारी मिळाली. पुढें यास स. १६६५ मध्यें माहुली किल्ल्याची (जि. ठाणें) हवलदारी सांगितली. यानें माहुलीच्या किल्ल्याची चांगली तटबंदी केली. उत्तरभागीं पलासगड, मध्यभागीं माहुली, व दक्षिणभागीं भंडारगड मिळून माहुलीचा बळकट किल्ला बनतो. हा किल्ला पुरंदरच्या तहाप्रमाणें (स.१६६५) औरंगजेबाकडे आला. स.१६७० मध्यें तह मोडल्यावर हा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला, पण याच्या सावधगिरीमुळें शिवाजीला या किल्ल्याचा नाद सोडावा लागला. पण यानें न झेपणारी शिवाजीशीं विरोध करण्याची कामगिरी सोडली व अलावर्दीखान किल्लेदार झाला (सरकार-शिवाजी पृ. १९०). शिवाजीनें पुढें हा किल्ला घेतला (१६ जून १६७०). ता. ८।२।१६६८ चा एक फार्सी शिलालेख सांपडला आहे. या लेखाचा दगड कांहीं वर्षांपूर्वी रा. के. आ. पाध्ये वकील, ठाणें, यांना तेथील कोर्टाच्या इमारतींत सांपडला. याचें वर्णन डॉ. मोदी यांनीं केलें आहे (JRASBB, १९१५).

ममता—तुळसीदासाची माता.

ममलकत मदारखान मुहम्मद—(स. १५५७ सुमार) विजापूरच्या दुसऱ्या अली आदिलशाहाचा दिवाण. यानेंच अलीस गादीवर बसविलें, पण हा लवकरच मेला.

मम्मट—(स. ११०० सुमार) हा महाभाष्यप्रदीपकार कैयट व ऋक्प्रातिशाख्यभाष्यकार उवट यांचा वडील बंधु असून याच्या पित्याचें नांव जैयट असें होतें, असें सुधासागर ग्रंथांत भीमसेनानें म्हटलें असल्याचें डॉ. पिटरसननें लिहिलें आहे (पिटरसनकृत पहिलें ग्रंथवृत्त, पा. ९४). मम्मटाचा जन्म काश्मीरांत झाला, पण अध्ययन काशी येथें झालें व यानेंच आपल्या दोन्ही बंधूंना शिकविलें असेंहि त्या ग्रंथांत म्हटलें आहे. पण भीमदेव हा मम्मटानंतर सुमारें सहाशें वर्षांनीं झालेला असल्यामुळें त्याचें विधान कल्पनेवरच उभारलेलें दिसतें. मम्मट, कैयट, उवट या नांवांतील ध्वनिसाम्यावरून ते भाऊ होत अशी कल्पना त्यानें लढविली असावी. उवटाच्या ऋक्प्रातिशाख्यभाष्यावरून त्याच्या पित्याचें नांव वज्रट असें होतें. तो आनंदपुरवासी असून भोजराजा राज्य करीत असतां त्यानें वाजसनेयसंहिताभाष्य लिहिलें. हा उवटाचा बंधु मानल्यास कैयटाचा बंधु मानतां येणार नाहीं. कारण कैयटाचा पिता जैयट होता व उवटाचा वज्रट होता. नैषधीय चरिताचा कर्ता जो श्रीहर्ष त्याचा मम्मट हा मातुल होता, अशी काश्मीरी पंडितांत प्रसिद्धि आहे (बुल्हरकृत काश्मीरग्रंथवृत्त, पा. ६८).

मम्मट हा मोठा पंडित विद्वान् असून याचें वाचनहि फार विस्तृत होतें असें दिसतें. याचा व्याकरणशास्त्राचा गहन व्यासंग होता. महाभाष्य व वाक्यपदीय या ग्रंथांतील वचनें यानें उद्धृत केलीं असून यानें उपमेचे विभाग व्याकरणशास्त्राच्या दृष्टीनें केले आहेत. विभावनेच्या व्याख्येंत क्रिया शब्द हेतु या अर्थानें योजिला आहे. शब्दांच्या जात्यादि संकेतासंबंधानें विवेचन करतांना वैयाकरणांच्या मतांचा अनुवाद केला आहे व वैयाकरण म्हणजेच पंडित असें समीकरण ठरविलें आहे. 'शब्दव्यापारविचार' नांवाचा याचा दुसरा एक ग्रंथ असून तो निर्णयसागरांत अभिधा-

वृत्तिमातृकेबरोबर छापला आहे. या ग्रंथांत काव्यप्रकाशाच्या दुसऱ्या उल्लासांतील अभिधा व लक्षण या शब्दवृत्तींचा विचार अधिक सविस्तर केलेला आहे. सन्मानदर्शक राजानक हें विशेषण याच्या नांवामागें लावण्यांत येतें. हा सगळ्या भारतवर्षांत अत्यंत लोकप्रिय असा साहित्यग्रंथकार झालेला आहे, ही गोष्ट काव्यप्रकाशावरील टीकांच्या प्रचंड संख्येवरून दिसून येते. आजवर काव्यप्रकाशावरील सुमारें सत्तर टीका उपलब्ध झाल्या आहेत (पां. वा. काणे यांचा साहित्यशास्त्राचा इतिहास).

मम्मटाच्या हातून काव्यप्रकाश पुरा झाला नाहीं. यानें परिकरालंकारापर्यंतच काव्यप्रकाश रचलेला असून पुढील काव्यप्रकाश अल्लट नांवाच्या कवीनें रचला आहे, असें काव्यप्रकाशावरील माणिक्यचंद्र, सरस्वतीतीर्थ, सोमेश्वर, इत्यादि टीकाकारांचें म्हणणें आहे. त्यांत आनंद कवींनीं आपल्या निदर्शना नांवाच्या टीकेंत पुढीलप्रमाणें म्हटलें आहे: " कृतः श्रीमम्मटाचार्यवर्यैः परिकरावधिः । प्रबन्धः पूरितः शेषो विधायाल्लटसूरिणा । " यावरून काव्यप्रकाश हा ग्रंथ यानें आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत रचण्यास प्रारंभ केला असावा.

मयणल्लदेवी— ही अनहिलवाडच्या पहिल्या कर्ण राजाची पत्नी. सिद्धराज जयसिंह हा हिचाच पुत्र होय. सिद्धराजाच्या लहानपणीं हीच कारभार पाहत असे.

मयूर—(स. ६४८ सुमार) एक प्रसिद्ध संस्कृत कवि. याच्या बालपणाविषयीं व जन्मस्थानाविषयीं कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. याचा धंदा सर्पविद्याचा असावा असें, याला विशेषण लावण्यांत येतें त्यावरून दिसतें. हा हर्षाच्या पदरीं होता. यानें मयूराष्टक, सूर्यशतक व इतर बऱ्याच कविता लिहिल्या. ह्यांचें सूर्यशतक हें गौडी भाषापद्धतींत लिहिलें असून तें फार नांवाजलेलें आहे. मयूर हा बाणाच्या बायकोचा भाऊ असून तिच्या शापानें कुष्ठरोगी बनला. यानें आपला रोग सूर्याच्या शंभर श्लोकांत प्रार्थना करून घालविला, अशी दंतकथा आहे.

मयूरवर्मन् कदंब—(स. ३४०–६०) हा एकंदर कदंबवंशाचा मूळपुरुष दिसतो. हा मानव्यगोत्री ब्राह्मण होता. याच्या पूर्वी बनवासी येथें चुटूशातकर्णी घराण्यापैकीं हारितीपुत्र, शिवस्कंद वगैरे राजे राज्य करीत होते. हा चालुक्य राजांप्रमाणें आपण हारितीचे वंशज आहों असें म्हणवितो. यानें कांचीच्या पल्लवावर स्वारी करून बनवासीचें राज्य स्वतंत्र केलें.

२. उत्तरेकडील कदंब घराण्यांतील एक राजा. यानें दक्षिणेकडील पुलयांचें राज्य सहाव्या शतकांत नष्ट केलें. यानें स. च्या ६।७ व्या शतकांत 'नवीन कदंब' वंशाची गादी गोव्याकडे स्थापली. हा वैष्णवपंथी होता. यानें राजपुतान्याकडून सुमारें दोन हजार ब्राह्मण आणविले, अशी दंतकथा आहे. सारा कोंकण प्रांत परशुरामानें समुद्र हटवून निर्माण केला व तो त्यानें ब्राह्मणांस दान दिला. हे ब्राह्मण त्यानें कोंकणांतल्या कोळ्यांपासून निर्माण केले. त्यांचीं जाळीं तोडून त्यांच्यासाठीं जानवीं केलीं. पण ते आचारभ्रष्ट व कृतघ्न झाल्यानें दुसरे ब्राह्मण आणविले, इत्यादि पौराणिक कथांचें तात्पर्य दक्षिण कानडा जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्यें वर्णिलें आहे. हे दुसरे ब्राह्मण कदाचित् मयूरवर्म्यानेंच आणिले असावेत व ते काठेवाडांतील सारस्वत असावेत. ही ब्राह्मणांची कथा मूळ सह्याद्रिखंडांत आहे.

३. (स. ११३१) हानगलच्या कदंब घराण्यापैकीं तैलाचा पुत्र. हा तैल राजास बाचलादेवीपासून झाला. हा आपल्या बापाबरोबर कारभार करीत होता. पश्चिम चालुक्य तिसऱ्या सोमेश्वराचा हा मांडलिक होता.

मरळसिद्ध—हा मुक्तेश्वराचा शिष्य. हा मुक्तेश्वर एकनाथाचा नातू असावा. याचा 'निरंजनभेदु' नांवाचा दशदेहाचें विवरण करणारा ओवीबद्ध ग्रंथ उपलब्ध आहे (मं. वार्षिक १८३६, क्र. २५).

मरुलदेव गंग—(स. ९५३–६१) पश्चिम गंगांपैकीं दुसऱ्या भूतुगाचा पुत्र. याची पत्नी बिजब्बे ही राष्ट्रकूटांपैकीं तिसऱ्या कृष्णाची मुलगी.

मरुसुंदर पांड्य—ह्याचा सोमशेखरनंतर उल्लेख केलेला आहे. यानें चोल-चेर यांना जिंकलें.

मर्यमकानी—(हमीदाबानू पाहा).

मर्युम—विजापूरच्या युसुफ आदिलशहाची मुलगी व पहिल्या बुर्हाण निजामशहाची पत्नी होय.

मलक्या महार साधु—(स. १७३० सुमार) दारव्ह्याजवळ अंजनी येथें मलक्या या नांवाचा एक महार साधु होता. त्याजविषयीं एक पोवाडा त्याचे घराण्यांत उपलब्ध आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, कान्होजी भोसल्यानें त्या साधूस त्रास दिल्यावरून त्यानें त्यास शाप दिला कीं, तुझें राज्य जाऊन तुझा निर्वंश होईल. त्याप्रमाणें कान्होजीचा अधिकार जाऊन तो कैद झाला. नंतर त्याचा मुलगा रायाजी यानें त्या साधूची फार विनवणी केली, व रायाजीची स्थिति थोडी सुधारली. परंतु

" होयाचं तें झालं तुझ्या कुळीमध्यें अंधार। बोलला सबद माग परतून नाहीं येणार." असें मलक्यानें सांगितलें व रायाजी निपुत्रिक मरण पावला.

यांतील शाप झाल्याचें कारण जरी सोडून दिलें तरी रायाजी निपुत्रिक मरण पावला ही गोष्ट मात्र त्यानें सिद्ध होते.

मलमंगलम् नम्बूतिरी—कालीकत येथील जो झामोरीन राजा त्याच्या दरबारीं हा एक विद्वान् होता. कोचीन संस्थानांतील पेरुमाणम् गांवचा हा राहणारा होय. संस्कृत व मल्याळी भाषेंत यानें ग्रंथ लिहिले.

यानें 'भाषानैषधचम्पु' या नांवाचा ग्रंथ लिहिला. 'शृंगारकवि' म्हणून याची कीर्ति चोहोंकडे पसरली होती. कल्पना, भाषालंकार, खोल विचार वगैरे बाबतींत याच्या वेळीं याला मागें टाकणारा दुसरा कोणी कवि नव्हता. वरीलशिवाय यानें 'आशौचप्रायश्चित्तविधि', 'मलमंगलम्भानम्' आणि 'कोटिविरहम्' हे ग्रंथ लिहिले असें म्हणतात.

मलयध्वज पांड्य—कुलशेखर पांड्याचा मुलगा.

मलयवर्म प्रतिहार—(स.१२२३-१२३३) ग्वाल्हेर राज्यांत कुरेब येथें याचें एक दानपत्र मिळालें आहे. तें वि. सं. १२७७ मधील आहे. त्यांत हा विग्रहाचा पुत्र म्हणून दिला असून त्याच्या मागील पुरुष प्रतापसिंह व नटुळ असे क्रमानें दिले आहेत. याची माता लाल्हणदेवी होय. लाल्हणदेवीच्या पित्याचें नांव केल्हणदेव असें आहे. याच्या भावाचें नांव नृवर्मा (नरवर्मा). याचीं नाणीं मिळालीं आहेत तीं वि.सं.१२८०-१२९० पर्यंतचीं आहेत. याच्यानंतर याचा भाऊ नृवर्माचें दानपत्र मिळालें आहे.

मलय्या—तेलंगी कवि. हा प्रथम ब्राह्मण होता, नंतर लिंगायत झाला. यानें राजशेखर राजाचें चरित्र लिहिलें. तें नंदाल अपय्यास अर्पण केलें (क. च.).

मलीक अली मुबारिक—(स. १३४४-१३४६) बंगालचा राजा जो फकिरुद्दीन त्याला यानें ठार मारून तें राज्य आपण घेतलें. हा एक सरदार होता. पण पुढें दोन वर्षांतच हाहि मारला गेला. याच्यानंतर हाजी-इल्यास ऊर्फ शम्सुद्दीन पूर्वी हा बंगालच्या गादीवर आला. यालाच कें. हिस्टरीमध्यें अलीशाहा असें म्हटलें आहे.

मलीक अहमद—(अहमद निजामशाह पाहा).

मलीक अहमदखान फारुकी—(स.१३८२-९९) खानदेशांतील राज्याचा संस्थापक. बहामनी राज्याविरुद्ध बंड पुकारणाऱ्या बहरामखान माझंदराणीस मदत करणाऱ्या सरदारांपैकीं मलीक अहमदखान हा एक होता. यास दक्षिणेंतून पळ काढावा लागला तेव्हां तापी नदीचे कांठीं थळनेर गांवीं येऊन यानें ठाणें दिलें. स. १३८२ पर्यंत त्यानें थळनेर भोंवतालचा बराच प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला. हा या प्रदेशावर स्वतंत्रपणें राज्य करी. यास मलीकराजा किंवा राजा अहमद असें म्हणत. यानें राजसत्तानिदर्शक असें नांव धारण केलें नाहीं. खान म्हणवून घेण्यांतच यास संतोष वाटे. हा आपल्यास खान म्हणवीत असल्यामुळेंच याच्या राज्यास 'खानाचा देश' अथवा खानदेश हें नांव मिळून तें देशनाम कायमचें प्रचारांत आलें.

खानदेशच्या फारुकी राजांचा संस्थापक जो मलीक व हा हे दोघेहि एकच होत.

मलीक इब्न दिनार—चेरमाण पेरुमाल राजानें मुसलमान झाल्यावर अरबस्थानांतून हिंदुस्थानांत पाठविलेला मौलवी.

मलीक उत्तुजार—(स. १४५३ सुमार) अलाउद्दीन बहामनीचा सरदार. स. १४५३ त यानें कोंकणांतील शिर्क्यांचा पराभव केला. नंतर ज्या वेळेस यानें शिर्क्यांस मुसलमान होण्याचा आग्रह केला तेव्हां शिर्क्यांनीं स्वतःच्या सुटकेकरितां यास कोंकणांतील खेळणा परगण्यावर पाठविलें, व तेथील राजानें याचा पराभव करून यास ठार मारलें व मुसलमानांची कत्तल केली. हा मूळचा इराणी तुर्क होय (मु. रि. भा. १, पृ. २२६-२७).

मलीक करणफुल अथवा मुबारकशाह—(स. १३९९-१४०२) हा जौनपुरचा राजा असून मलीक सखरच्या मागून गादीवर आला. त्याचा हा दत्तक होय. ह्याच्या राज्यांत जौनपूर, अयोध्या, बिहार, तिरहुत व गंगेच्या दुआबांतील काइलपर्यंतचा प्रदेश मोडत होता. स. १४०१ मध्यें हा कनोजला असतांना मुहम्मदशहा व मल्लूखान वजीर यांनीं जौनपूर घेण्याकरितां स्वारी केली होती, परंतु शेवटीं तह झाला. ह्याच्यानंतर याचा भाऊ शम्सुद्दीन इब्राहीमशाहा गादीवर बसला.

मलीक कुत्बुल्मुल्क कुत्वशाह—महमूदशाहानें सुलतान कुलीस स्वतःचा जीव वांचवला म्हणून दिलेली पदवी.

मलीक खल्जी—समर प्रांताचा सुभेदार व खल्जीचा मूळ पुरुष. हा प्रथम बल्बनच्या पदरीं होता. याचाच मुलगा जलालुद्दीन फीरूज होय.

मलीक खाजा लोदी—मलीक बहरामाचा पुत्र.

मलीक खुस्रव—(मृत्यु स. १३२१) हा आपला धनी मुबारक खल्जी यास ठार मारून नासिरुद्दीन हें नांव धारण करून दिल्लीचा सुलतान बनला. हा मूळचा परिया म्हणजे अंत्यज असून पुढें मुसलमान झाला. सुलतान झाल्यावर दिल्ली येथें हिंदुपदपादशाही स्थापन करण्याची याची इच्छा होती, असें मुसलमान ग्रंथकार म्हणतात. यानें प्रथम फौजेस वश करून घेतलें होतें. यानें देवलदेवीशीं लग्न केलें व स्वतःच्या नांवाचीं नाणीं पाडलीं. यानें खल्जी घराण्यांतील पुरुषांची कत्तल करून सर्व मशिदींत मूर्ति स्थापिल्या. शेवटीं पंजाबचा सुभेदार गाजी बेग तुघ्लक यानें यास ठार मारलें व तो स्वतः घियासुद्दीन हें नांव धारण करून गादीवर बसला (मु. रि. भा. १ ला, पृ. १४६-४७).

मलीक (नायब) काफूर (हजार दिनारी)—(स. १२९७–मृत्यु स. १३१६) स. १२९७ मध्यें सुलतान अलाउद्दीनाचा सरदार नुस्रतखान यास खंबायत लुटतांना हा तृतीयप्रकृती गुलाम मिळाला. अंगच्या हुषारीमुळें ह्यानें सुलतानाची मर्जी संपादन केली व पुढें हा सेनापति झाला. गुजराथचा राजा कर्ण याची मुलगी देवलदेवी ही देवगिरीस होती. तिला पकडून आणण्याकरितां व ठरलेला करभार देवगिरीहून न आल्यामुळें सुलतानानें तेथील राजा रामदेवराव यादवावर ह्यास पाठविलें. शेवटीं तो शरण आल्यावर तेथें वसुलाकरितां मुसलमान कारभारी नेमून हा परत गेला. तेलंगणच्या तिसऱ्या प्रतापरुद्रदेव काकतीयाचा पराभव करून त्यास मांडलिक केल्यावर ह्यानें दुसऱ्या बल्लाळ होयसलाच्या द्वारसमुद्रावर स्वारी करून व पांड्यांचें मदुरा शहर लुटून अफाट संपत्ति दिल्लीस नेली. ह्यानेंच अला उद्दीनाचें त्याच्या बायकोविषयीं व मुलांविषयीं मन कलुषित करून त्यांना कैद करावयास लावलें. अलाउद्दीनाच्या मागून ह्यानें शिहाबुद्दीन उमर नांवाच्या एका मुलाला गादीवर बसविलें आणि खिजरखान व शादीखान ह्या राजकुमारांचे डोळे काढून त्यांस आंधळें केलें. नपुंसक असतांहि अला उद्दीनाचे बायकोशीं लग्न लावून तिचे दागिने, जवाहीर व खाजगी दौलत बळकाविली व नंतर तिला पुन्हां कैदेंत ठेविलें. पुढें राजवाड्यावरील संरक्षक सैनिकांपैकीं कांहींस मुबारक नांवाच्या तिसऱ्या युवराजाचे डोळे काढावयास पाठविलें. मुबारकनें सैनिकांस राजनिष्ठेच्या कर्तव्याची आठवण दिली. त्यांना जवाहीर देऊन खूष केलें व मलीक नायबचा खून करण्याचे कामगिरीवर त्यानेंच पाठविलेल्या सैनिकांस परत पाठविलें. त्यांनीं आपली कामगिरी पार पाडिली. ७ फेब्रुवारी १३१६ रोजीं सैनिकांनीं मलीक नायब काफूर हजारदिनारीचा वध केला.

मलीक नासिर फारुकी—(स. १३९९-१४३७) हा खानदेशांतील फारुकी राजांचा मूळ पुरुष मलीकाचा पुत्र होय. गादीवर आला तेव्हां याच्या ताब्यांत थळनेरचा किल्लाच फक्त होता. परंतु पुढें विश्वासघात करून यानें अशीरगड मिळविला. याचा गुरु झैनुद्दीन याच्या स्मरणार्थ यानें तापीच्या पूर्व थडीवर झैनाबाद व बुऱ्हाणउद्दीन या अवलियाच्या स्मरणार्थ बुऱ्हाणपुर हीं गांवें बसविलीं. अहमद बहामनीच्या मदतीनें यानें गुजराथेवर केलेल्या स्वारींत याचा पराभव झाला व हा लळींगच्या किल्ल्यांत कोंडला जाऊन तेथेंच मरण पावला. यास मिरान नांवाचा मुलगा होता.

मलीक नीकपाई—(स. १३३७–३८) सुलतान मुहम्मद तुघ्लकानें केलेल्या तिबेटवरील स्वारींत हा मुख्य सेनापति होता. याजबरोबर १ लक्ष घोडेस्वार व तितकेंच पायदळ देण्यांत आलें. हें सैन्य हिमालयाच्या पायथ्याशीं आल्यावर तेथील झोडपाऊस व दमट हवा सहन न झाल्यामुळें परत फिरलें असतांना त्यावर डोंगरी टोळ्यांनीं हल्ला केल्यामुळें हा, दोन अधिकारी व १० घोडेस्वार यांच्या शिवाय बाकीचें सर्व सैन्य गारद केलें. त्या मोहिमेमुळें सुलतानाची तिजोरी रिकामी होऊन त्याचा दरारादेखील नाहींसा झाला व त्यामुळें शेवटीं तो मूर्ख ठरला.

मलीक बहराम लोदी—दिल्लीच्या लोदी घराण्याचा मूळ पुरुष.

मलीक मकबूल—(मृत्यु स. १३७३) हा मूळचा तेलंगी ब्राह्मण असून पुढें मुसलमान झाला. दिल्लीचा बादशहा मुहम्मद तुघ्लकच्या दक्षिणेवरील स्वारींत हा त्याजबरोबर असतांना ह्यानेंच त्याच्या हुकमावरून भडोच भागांतील वसूलखात्यावरील सर्व अधिकारी लोकांची कत्तल केली. पुढें तो वारल्यावर खोजा जहान नामक सरदारानें घियासुद्दीन मुहम्मद २ रा यास गादीवर बसविलें, हें यास पसंत पडलें नाहीं. शेवटीं फीरुझशाहानें याच्या मदतीनें त्यास पदच्युत करून स्वतः गादीवर बसला व यास आपला वजीर केलें. सुलतान स्वारीवर असतां राज्यांत फार गोंधळ होऊन बंडें होत तेव्हां हा त्यांतून युक्तीनें मार्ग काढीत असे. याच्या मरणानंतर सुलतानानें याच्यावरील प्रेमामुळें याच्या मुलासच याची जागा व किताब दिला.

मलीक मुघीस खानजहान खल्जी—(स.

१४३६) हा अलीशेरचा पुत्र असून याचा मुलगा महमूदानेंच माळवा प्रांत घोरी राजाचा खून करून बळकाविला.

मलीक मुहम्मद ज्यायसी—(स. १५४० सुमार) या हिंदी कवीचा जन्म गाझीपूरला झाला असावा. हा शेख मोहिदीचा शिष्य असून रायबरेली जिल्ह्यामधील जायसचा राहणारा होय. हा कुरूप असून अमेठीच्या राजघराण्यांत याला फार मान मिळत असे. यानें 'पद्मावत' व 'अखरावट' हे ग्रंथ लिहिले. यानें ईश्वर, सृष्टि, जीव वगैरेंचें विवरण लहान लहान पुस्तकांतून केलें आहे. याचा शिष्यगण मोठा असून ते याचें बारोमास काव्य गात असत. अमेठीच्या राजास याच्याच प्रसादानें पुत्रप्राप्ति झाली. स्वतंत्र विषयावर गौडी (अवधी) भाषेंत पद्यमय असा 'पद्मावत' हा पहिलाच ग्रंथ होय. यानें हें आपलें काव्य अन्योक्तिपर आहे असें म्हटलें आहे. रत्नावली नाटकाचा याच्यावर परिणाम झाला आहे. नायकाचे भीमसिंहाच्या ऐवजीं रत्नसिंह असें यानें नांव चुकीनें घेतलेलें दिसतें.

मलीकशाह लोदी—(स. १३४०) अफगाण उमराव. यानें मुहम्मद तुघ्लकाचे कारकीर्दीत मुलतानला बंड करून तेथील सुभेदार मलीक बिरझादचा वध केला व मुलतान काबीज केलें. परंतु स्वतः सुलतान याचें पारिपत्य करण्यास निघाला तेव्हां हा व याचे अनुयायी अफगाणिस्थानचे डोंगरांत पळून गेले.

मलीक सखर खोजा जहान—(स. १३९३-१३९९) जौनपूरच्या राज्याचा संस्थापक. हा तृतीयप्रकृति मनुष्य प्रथम दिल्लीच्या सुलतानाचे पदरीं असून पुढें वजीर झाला. यानेंच महमूदशहा तुघ्लकास गादीवर बसविलें. यानें गंगेच्या दुआबांतील व अयोध्या परगण्यांतील बंडें मोडल्यावर जौनपुर येथें स्वतंत्र राज्य स्थापलें. नंतर यानें तिरहूत व बिहारमध्यें आपली सत्ता स्थापून बंगालचे सुभेदारास आपला मांडलिक बनविलें. यानें तैमूरलंगाचे स्वारीचे वेळीं दिल्लीच्या बादशहास मदत केली नाहीं. याच्या मागून याचा मुलगा मलीक करमफूल गादीवर आला.

मलीकंबर—(स. १५४६-१६२६) अहमदनगरच्या निजामशाहींतील प्रसिद्ध दिवाण. हा हबशी गुलाम असून, याला मीर कासीमनें विकत घेतलें. पुढें हा अहमदनगर येथील चंगीझखानाजवळ गुलाम म्हणून राहिला. हा आपल्या धन्यास नेहमीं खूष ठेवून स्वतः थोडक्यांत समाधान मानीत असे. पुढें हा इब्राहीम आदिलशाहाचे नोकरीस राहिला. पण यानें त्याच्या हाताखालीं गुलामगिरीची वृत्ति सोडून हा राजकारणांत भाग घेऊं लागला व नंतर हा निजामशाहींत गेला. तेथें यानें चांगली कामगिरी केल्यामुळें याला २५० घोड्यांवरील अधिकाऱ्याची जागा मिळाली. पुढें ज्या वेळेस मोगलांनीं अहमदनगरचें राज्य बुडविण्यासाठीं अहमदनगरवर स्वारी केली, त्या वेळेस यानें आपल्या शौर्याच्या व अकलेच्या जोरावर मोगल सरदारांस पळवून लाविलें. अशा प्रकारें हा विजयी झाल्यानंतर सर्व सरदार यास येऊन मिळाले. या वेळीं याच्या जवळ ७००० सैन्य चांगल्या प्रकारचें होतें. पुढें यानें राज्यावर राजा पाहिजे म्हणून बुऱ्हाणशाहाचा नातू शाह-अली यास आणून गादीवर बसविलें. दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाशीं दोस्ती राखण्यासाठीं आपल्या मुलाचें (फत्तेखान) लग्न याकूब नांवाच्या त्याच्या गुलामाच्या मुलीशीं केलें. स. १६१४ त जहांगीराचा सरदार खान-खानानें अहमदनगरच्या सैन्याचा पराभव केला, तेव्हां यानें त्याच्याशीं तह केला. पण पुढें यानें आपला गेलेला मुलूख परत मिळविला. यानें मोगल सैन्यावर शहाजी भोसल्याच्या मदतीनें भातवडी येथें फार मोठा जय मिळविला (स. १६२४). त्यामुळें याची कीर्ति चोहोंकडे पसरली गेली; व ह्यामुळेंच याचें वाढतें वर्चस्व सहन न होऊन दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाशीं याचा विरोध आला. पण यानें कशाचीहि पर्वा न करतां आपला राज्य वाढविण्याचा उद्योग जारीनें सुरू केला. पुढें हा लवकरच मरण पावला (स. १६२६). याच्याच हाताखालीं लुखजी जाधव व शहाजी भोसले उदयास आले (H. Q., Vol. IX, 624-644).

मलीका जहाज—(२ इब्राहीम आदिलशाह पाहा).

मलूकदास—(जन्म स. १५७४-मृत्यु स. १६८२) हिंदी कवि. गांव कडा (जि. अलाहाबाद). धंदा घोंगडी विणण्याचा. गुरु-विठ्ठलदास. हा गृहस्थाश्रमी होता. याच्या पंथाचे लोक तिकडे आढळतात. हा एकशेंआठ वर्षे जगला. ग्रंथ—रत्नखान व ज्ञानबोध. याचीं वचनें मनोहर आहेत.

मॅलेट—(स. १७५२-१७९८ प्रयाण) हा प्रथम ई. इं. कंपनींत कारकून होता. नंतर मुंबईच्या गव्हर्नरचा सेक्रेटरी व शेवटीं पुणें दरबारीं रेसिडेंट झाला. महीवरील लढाईंत दादाचा पराभव झाला असतांना ह्यानें मदत करून त्यास सुरतेस पोंचविलें. पेशव्यांच्या गादीबद्दल बाळोबा तात्या व शिंदे यांच्या लढ्याचा निकाल लावण्यास यानें मदत केली. महादजी वरचढ होतो असें दिसतांच यानें नानाची कास धरली. मराठ्यांचें सार्वभौमत्व नाहींसें करून त्या ठिकाणीं इंग्रजांचें सार्वभौमत्व

स्थापणाऱ्या मुत्सद्यांत याची गणना होते. यानें सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला असून पुण्यांत पाश्चात्य औषधांचा पुष्कळ प्रसार केला होता. सर्व मराठामंडळाची मर्जी सांभाळून इंग्रज सरकारचें हित पाहण्याची हुषारी दाखविल्यामुळें ह्यास 'सर' ही बहुमानाची पदवी मिळाली. ह्याचें दुसऱ्या बाजीरावावर फार वजन होतें (म. रि. उ. वि. ३).

मल्ल—(स. ९०० सुमार) वेल्लनांडू घराण्याचा संस्थापक. कृष्णानदीच्या दक्षिणेस राज्य करणारें घराणें. यास पिदुवरादित्य असेंहि म्हणत.

२. वेल्लनांडू घराण्यांतील पहिल्या एरियाचा मुलगा. हा पूर्वचालुक्य भीम २ रा याचा मांडलिक. याची पत्नी कोल्लपांबा.

३. वेल्लनांडू घराण्यांतील दुसऱ्या एरियाचा मुलगा.

४. वेल्लनांडू घराण्यांतील नन्नाचा मुलगा. हा गादीवर आला नाहीं.

मल्ल कदंब—(स. १२१८) हा हानगलच्या कदंब घराण्यापैकीं कामदेवाचा मुलगा.

मल्लगुप्त—(स. ११७५) हा गुप्त घराण्यांतील पहिल्या गुप्ताचा मुलगा. हा आपल्या बापानंतर गादीवर बसला. यालाच मल्लिदेव म्हणत. हा स.१११५ त गोविंदराजाचा मांडलिक होता.

मल्लज—तेलगू कवि. बोम्मन पोतराजु नामक राजाचा पुत्र. हा ब्राह्मण होता. रुक्मांगदाचा विंध्यावलीशीं झालेला विवाह यानें वर्णिला आहे. हें वीररसप्रधान काव्य आहे (क. च.).

मल्लण किंवा **मल्लप संगम**—(स. १४१२-२१) हा विजयनगरच्या संगम घराण्यांतील पहिल्या देवरायाचा मुलगा. हा गादीवर आला नव्हता.

मल्लदेव—(स. १५५१-६९) 'मल्लप्रकाश' ग्रंथाचा कर्ता. ग्रंथ कायस्थ लोकनाथानें याच्या नांवानें लिहिलेला दिसतो. याचा पिता गांग राठोड. जोधपूरचा मालदेव व हा एकच होत.

मल्लनार्य—(स. १३७०) कानडी कवि. गुब्बीच्या मल्लनार्यानें 'वीरशैवामृत', 'शिवभक्तपुराण', 'भावचिंतारत्न' यांसारखे पुष्कळ ग्रंथ रचले.

मल्लपदेव चालुक्य—(स.१२०२) पिठापुरम् येथील चालुक्य घराण्यापैकीं एक प्रमुख शूर राजा.

मल्लयव्वी संगम—विजयनगरच्या संगम घराण्यापैकीं देवरायाची दुसरी बायको.

मल्लवादिन्—(स. ८२७ सुमार) एक श्वेतांबर जैन. यानें बौद्धतर्कशास्त्रावरील न्यायबिंदुटीका या ग्रंथावर 'धर्मोत्तरटिप्पणक' नांवाची टीका लिहिली. हा शिलादित्य राजाच्या बहिणीचा मुलगा होता. यानें जैनधर्माची पुनर्घटना करून शत्रुंजयावरील आदिनाथाच्या मूर्तीस पूर्ववैभव प्राप्त करून दिलें (हिस्टरी ऑफ इंडियन् लॉजिक).

मल्लादेवी संगम—विजयनगरच्या संगमवंशांतील दुसऱ्या हरिहराची पट्टराणी. ही देवगिरीच्या रामदेवरावाच्या वंशांतील होती. हिला मल्लांबिका असेंहि म्हणत.

मल्लापा वासकर—हा वारकरी पंथांतील विख्यात भक्त. जातीचा लिंगायतवाणी होता. एकदां महादजी शिंदे पंढरपुरास आले असतां मल्लापाच्या दर्शनास गेले. महादजीस विद्येचाहि बराच संस्कार होता. त्यानें पुष्कळ अभंग केले होते व भगवद्गीतेवर माधवदासी या नांवाची ओवीबद्ध टीका थोडक्यांत केली होती. तीं दोनहि पुस्तकें त्यानें मल्लापापुढें ठेवलीं व आपणहि एकदां अवलोकनांत आणावींत अशी यास विनंति केली. तुकारामाचे अभंग व ज्ञानेश्वरीसारखी भगवद्गीतेची रसाळ टीका वाचणाऱ्या या भाविक वारकऱ्यानें महादजीदेखतच त्याची कविता वाचली. तीं अभंगांत तुकारामाचीं वाक्यें जशींच्या तशींच उतरून घेतलेलीं यास आढळलीं. तेव्हां 'उष्टया पत्रावळी करोनिया गोळा । दाखविती कळा कवित्वाची ॥' ही तुकारामाची कविता म्हणून या स्पष्टवक्त्या पुरुषानें त्याची थट्टा केली व माधवदासींतील कित्येक ओव्या वाचून हंसून म्हणाला कीं, 'ही दासी खरीच, ज्ञानेश्वरीसारखी आई नव्हे. त्या आईचें दुग्धपान करायचें सोडून ह्या दासीच्या नादीं कोणीं लागूं नये !'

पूर्वी महादजीनें कित्येकांस आपली कविता दाखविली होती. तेव्हां तोंडपुजेपणा करून सर्वांनीं माना डोलविल्या. परंतु मल्लापाच्या भेटीच्या वेळीं महादजीस आपली खरी योग्यता समजली. पुढें त्यानें त्याचा उपदेश घेतला. तेव्हां वासकरानें त्याच्या गळ्यांत तुळशीची माळ घातली. फावल्या वेळीं हीच माळ हातांत घेऊन पाटीलबाबा भगवन्नामाचा जप करीत असे (भा. व. खं. ३ ऐ. गो. पृ. २२) याचाच फड वारकरी लोकांत सध्यां प्रमुख समजला जातो.

मल्लारि—(स. १६०२) याचा जन्म विष्णूच्याच कुळांत झाला. यानें ग्रहलाघवावर टीका लिहिली आहे पण तींतील टीकाकाल मात्र चमत्कारिक रीतीनें कला आहे. टीकेचा काल शके १५२४ असावा असें दिसें यानें

मल्लारीचे टीकेंत ग्रहलाघवाची उपपत्ति लिहिली आहे. ग्रहलाघवासारख्या ग्रंथाची उपपत्ति लावणें हें सिद्धांताच्या उपपत्तीपेक्षां कठीण आहे, तरीसुद्धां यानें आपल्या विद्वत्तेनें तें काम तडीस नेलें (भा. ज्यो.).

मल्लांबिका—(मल्लादेवी संगम पाहा).

मल्लिकार्जुन—(स. १२४५) कानडी भाषेंतील ग्रंथकार. 'शब्दमणीदर्पणा'चा कर्ता जो काशिराज, त्याचा हा पिता. हा वीरसोमेश्वराच्या (स.१२३४–१२५४) वेळीं होऊन गेला. यानें 'काव्यसार' नांवाचा ग्रंथ लिहिला. त्यांत यानें पूर्वी झालेल्या सर्व कवींच्या कवितांचा १८ विषयांखालीं मोठा उपयुक्त संग्रह करून ठेविला आहे.

मल्लिकार्जुन कदंब—(स. ११३२–४४) हा हानगलच्या दुसऱ्या तैलप कदंबाचा पुत्र. याला त्रिभुवनमल्लरस म्हणत. हा स. ११३२–३५ पर्यंत तिसऱ्या सोमेश्वराचा आणि स. ११४४ मध्यें दुसऱ्या जगदेकमल्लाचा जहागीरदार होता. हा आपल्या बापाबरोबर कारभार करीत असे.

मल्लिकार्जुन रट्ट—(स. १२०४) हा कार्तवीर्य रट्टाच्यानंतर गादीवर आला.

मल्लिकार्जुन शिलाहार—(स. ११५५–७५) हा ठाण्याच्या शिलाहारांपैकीं हरपालाचा मुलगा. यानें राजपितामह ही पदवी धारण केल्यामुळें गुजराथच्या कुमारपाल चालुक्यानें कोंकण जिंकण्याकरितां आपला सेनापति अंबड यास पाठविलें. बलसाडजवळ लढाई होऊन अंबडाचा पराभव झाला. पण अंबड पुनः तयारी करून आला व त्यानें याचा पराभव केला. इतकेंच नव्हे, तर जगदेव परमारानें याला ठार मारलें. याचे दोन लेख स. ११५६ व ११६० (चिपळूण व वसई) चे मिळाल्याचें गॅझेटियरमध्यें लिहिलेलें आहे. परंतु त्यांचा पत्ता तेथें दिलेला नाहीं (हिं. भा. अ. पा. ३६६–६७).

मल्लिकार्जुन संगम—(स. १४४६–६५) हा विजयनगरच्या दुसऱ्या देवरायाचा पुत्र. याचा भाऊ विरूपाक्ष. याला 'प्रौढप्रताप', 'इम्मडि', 'विजय', वगैरे पदव्या होत्या. याचे पुत्र राजशेखर व विरूपाक्ष. याच्यानंतर याचा भाऊ विरूपाक्ष गादीवर आला.

मल्लिनाथ—एकोणिसावे तीर्थंकर (तीर्थंकर पाहा).

२. (स. १४५० सुमार) हा सुप्रसिद्ध टीकाकार थोडेसे अलीकडच्या शतकांत झाला असावा. याची टीका खालील आदिलशाही आढळतेः–रघुवंश, किरात, माघ, नैषधीयखालीं गुलामी. दूत, विद्याधरप्रणीत एकावली (टीकानाम तरल). वरदराजकृत तार्किकरक्षेवर मल्लिनाथाची टीका आहे.

याला पुत्र दोन. पेद्दार्य व कुमारस्वामिन् सोमपीथी. कुमारस्वामिन्‌ची प्रतापरुद्रीयावर रत्नापण नांवाची टीका आहे (पेद्दार्य पाहा).

मल्लिनाथ संगम—(स. १३६२) विजयनगरच्या संगमवंशांतील पहिल्या बुक्करायाचा हा पांचवा मुलगा. याला हरिहर २ रा, कप्पन ३ रा, विरूपाक्ष व भास्कर असे चार भाऊ होते. याला चेन्नप्पा किंवा वाच्चप्पा या नांवाचा एक मुलगा होता.

मल्लिसेनसूरि—(स. १२९२) उदयप्रभसूरीचा शिष्य व नागेंद्रगच्छशाखेचा जैन. याची हेमचंद्राच्या 'वीतरागस्तुति' (अन्ययोगव्यवच्छेदिका) अथवा द्वात्रिंशिका या ग्रंथावर 'स्याद्वादमंजरी' नांवाची टीका आहे.

मल्लुगि यादव—हा यादवांपैकीं पहिल्या सिंघणाचा पुत्र. याच्यानंतर पांचव्या भिल्लमापर्यंत या वंशाची नीट माहिती मिळत नाहीं.

मल्लू आदिलशाह—(राज्यकाल स. १५३४) हा विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील इस्माईलचा थोरला मुलगा. याच्या बापाच्या म्हणण्याप्रमाणें याला असदखान नांवाच्या सरदारानें गादीवर बसविलें. हा गादीवर आल्यावर याची वर्तणूक असदखानास पसंत न पडल्यामुळें, त्यानें जागेचा राजीनामा दिला. याचे राज्यांत फारच अंदाधुंदी होती. यानें लोकांचा नानाप्रकारानें छळ केला. हा दारू, नृत्यगायनादि अनेक दुष्ट व्यसनांत निमग्न होता. शेवटीं याचें वर्तन अगदींच बेफामपणाचें झाल्यामुळें याच्या आजीनें एका सरदाराच्या हातून यास पकडून, याचे डोळे काढविले; व याच्यानंतर याचा भाऊ इब्राहीम यास राज्यावर बसाविलें. यानें एकंदर सहा महिने राज्य केलें.

मल्लूखान—(स. १२ नोव्हेंबर १४०५ रोजी) हा महमूदशाह तुघ्लकच्या कारकीर्दीत एक उपद्व्यापी सरदार होता. यानें दिल्लीचा कारभार आपल्याकडे राहण्यासाठीं नानातऱ्हेनें खटपट केली. स. १३९८ त तैमूरलंगाचे सैन्यास तोंड देण्याकरितां हा बादशहास निघाला, पण याचा पराभव होऊन हा पळून गेला. शेवटीं खिजतरखान नांवाच्या मुसलमानानें याजवर हल्ला करून दिपालपूरजवळ याचा वध केला.

मल्हार दादो बर्वे—(मृत्यु स. १७४८) हा बाळाजी विश्वनाथाचा साहाय्यक होता. यानें शाहूस चांगली मदत केली. हा पंढरीच्या विठोबाचा भक्त होता.

याची मुलगी मनुबाई ही कृष्णराव महादेव जोशास दिली होती.

मल्हारभट देऊळगांवकर—(स. १६४८) हा देऊळगांवचा कुलकर्णी व ग्रामजोशी. हा पुढें शहाजीच्या पदरीं राहून त्याजबरोबर कर्नाटकांत गेला. स. १६४८ मध्यें शहाजीबरोबर हाहि विजापूरकरांच्या तुरुंगांत होता. हा सुटका व्हावी म्हणून शंकराच्या अनुष्ठानास हातांत जीभ धरून बसला होता (मराठी दप्तर रु. १). सुटका झाल्यावर यास शिंगणापुर येथें राहावयास सांगून तेथील उत्पन्न दिलें. यास विनोदानें शंभूभट म्हणत. याचा मुलगा मुद्गलभट. याच घराण्याकडे पुढें छत्रपतिघराण्याचें उपाध्येपण आलें. सध्यां हें घराणें राजोपाध्ये व पंडितराव या नांवानें सातार्‍यास प्रसिद्ध आहे.

मल्हारराव पानसे—(स. १७७६) पेशवाईतील एक सैन्याधिकारी. स. १७७६ मध्यें यास हरिपंतानें गोविंदराव गायकवाडावर पाठविलें होतें.

मल्हारराव रघुजी कदम (बांडे)—यास छत्रपति शाहूनें आपली मुलगी गजराबाई दिली होती (शा. रो. ९२).

मल्हारराव रामराव चिटणीस—(ग्रंथकाल स. १८१०) हा प्रतापसिंह छत्रपतीचा चिटणीस होता. हा सखाराम हरीचा जांवई होता. यानें मराठी राजांच्या बखरी लिहिल्या. यानें लिहिलेलें सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र परिश्रमपूर्वक लिहिलें आहे. त्याचा लेखनकाल स.१८१० आहे.

मल्हारराव होळकर—(जन्म स. १६९३ एप्रिल ५–मृत्यु स. १७६६ मे २०) इंदूर राज्याचा संस्थापक. हा जातीनें धनगर असून पुणें जिल्ह्यांतील होळगांवचा (नीरेच्या कांठीं) राहणारा. लहानपणीं बाप वारल्यावर हा आपल्या खानदेशांतील तळोदें या मामाच्या गांवीं राहिला. याची पत्नी गौतमा ही याची मामेबहीण होती.

हा प्रथम बडवाणीकराकडे चाकरीस होता. नंतर बांड्यांचे लष्करांत मामा बारगळांच्या वतीनें काम करी. तेथून बाजीरावानें यास आपणाकडे घेतलें.

हा बाजीराव पेशव्याकडे साधारण शिपाई म्हणून लागला आणि पुढें वाढत जाऊन (स. १७२५) माळव्यांतील चौथाई व सरदेशमुखी गोळा करण्याचें काम पवार व शिंदे यांच्याबरोबर याचेकडे सोपविण्यांत आलें. मोकासा बाबतींत थोडीशी रक्कम तोडून देण्यांत आली (स. १७२८).

शिंदे होळकरांची चुरस राणोजीच्या वेळेपासूनच होती. ' मल्हारराव व राणबा एके जागा राहत नाहींत ' असा उल्लेख स. १७४५ पूर्वीच्या कागदांत आहे (पु. द. १·१५९). ईश्वरसिंग व माधोसिंग यांच्या प्रकरणांत ती उघड झाली (स. १७४६). पेशव्यांचीहि सत्ता यावर चालत नसे. यानंतर यानें जोधपूरच्या रामसिंगाचें प्रकरण मिटवलें (पु. द. १·१५७).

दिल्लीच्या सफदरजंग वजीरानें बोलावल्यावरून हा, शिंदे व बादशाही सैन्य यांनीं अन्तर्वेदींत बहादुरखान रोहिल्याचा पूर्ण पराभव केला (२० मार्च). अहमदखान बंगष प्रयागाकडे पळाला होता. तो फर्रुखाबादेकडे आला. त्यालाहि यानें पिटाळून लावलें (स.१७५१ एप्रिल १९).

त्याबद्दल वजीरानें यास तीन कोट रुपये व पंचवीस लक्षांचा मुलुख अंतर्वेदींत देऊं केला (रा. खं.३·३८३). रोहिल्यावर मिळविलेल्या ह्या अपूर्व जयानें मराठ्यांची इभ्रत वाढली व दिल्लींत मराठ्यांचा वचक बसला. तथापि रोहिल्यांचा पुरा मोड झाला नव्हता. पावसाळा संपल्यानंतर पुन्हां लढाईस सुरुवात झाली. व मार्चमध्यें तह झाला (को. द. १,९३,९६). ९ मार्चास रोहिल्यांपासून साठ लाख रुपये घेऊन त्यांचा निम्मा मुलुख मराठ्यांस देण्यांत आला. व काशीची सनदहि वजीरानें दिली (रा. खं. ३,४७१). भालकीच्या तहाचे वेळीं हा हजर होता (१७५३ जानेवारी). कुंभेरीला वेढा पडून त्यांत याचा पुत्र खंडेराव मारला गेला. त्यामुळें हा चिडून इरेला पेटला तेव्हां सर्वांनाच त्रास झाला. ' सुरजमल्लाचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन नाहीं तर प्राणत्याग करीन ' अशी यानें प्रतिज्ञा केली होती असें भाऊसाहेबाचा बखरकार म्हणतो. मीर शहाबुद्दीनविरुद्ध बादशहा व वजीर हे जाटास मदत करतात असें समजतांच यानें अहमदशाहास कैदेंत टाकून दुसर्‍या आलमगिरास गादीवर बसविलें (ता. ३ जून १७५४).

या वेळीं उत्तर हिंदुस्थानांतील प्रमुख राजकारणें याच्या तंत्रानें चालत असत.

यानें गाजीच्या मीर शहाबुद्दीन नांवाच्या मुलास जाटाविरुद्ध मदत करून जाटाच्या मदतीस आलेल्या दिल्लीच्या बादशाहाचा पराभव केला (स. १७५४). यानें राघोबादादास साहाय्य केलेलें दिसतें. तथापि पेशव्यांनीं उत्तर हिंदुस्थानच्या कारभारांत ढवळाढवळ करणें यास पसंत नव्हतें. त्यामुळें पेशव्याविरुद्ध नजीबासारखीं माणसें राखण्याचा यानें प्रयत्न केला. दत्ताजी शिंदे अब्दालीशीं लढत असतां यानें येण्यास उशीर केला (पे. द. २·११७), त्यामुळें दत्ताजी पडला. पुढें यानें

गंगाधर यशवंत चंद्रचूडाच्या प्रमुखत्वाखालीं अब्दालीशीं धावपळीचें युद्ध करण्याचा प्रयत्न केला. पण याला त्यांत यश आलें नाहीं. खुद्द पानपतच्या युद्धाच्या वेळीं भाऊसाहेबांशीं पटत नव्हतें तरी हा त्यांना साहाय्य करीत होता. शेवटीं पळांत हा निघून आला आणि त्यामुळें पुष्कळ लोक वांचले. सदाशिवरावानें बायकामुलें सुरक्षित घेऊन जाण्याचें काम याच्यावर सोपविलें होतें असें 'होळकरांची थैली' या सवाई माधवरावाच्या वेळीं लिहिलेल्या बखरींत म्हटलें आहे (रा. खं. ३.१७२).

यानंतर राक्षसभुवनच्या लढाईंत (स. १७६३) जाटानें दिल्लीस घातलेल्या वेढ्यांत (स.१७६४) हा होता. सुजाउद्दौल्याच्या मदतीस इंग्रजांविरुद्ध गेला होता तेव्हां याचा मोड झाला (स. १७६५ मे २०), ही गोष्ट यास फार लागली होती. राघोबाच्या उत्तरेकडील मोहिमेंत (स. १७६६) यानें भाग घेतला होता.

हा व उदाजी यांची बाजीरावावर फारच छाप होती. बाजीराव चिमाजीलाहि यांची मर्जी सांभाळण्याविषयीं लिही (पे. द. १३.३०,३३). पण बाजीरावानंतर पेशव्यांचें लक्ष आक्रमणापेक्षां सत्तेचें केंद्रीकरण करण्याकडे लागलें. तेव्हां मल्हाररावासारखीं स्वतःच्या कर्तबगारीवर पुढें आलेलीं माणसें त्यांना जुमानीनात. आणि त्यांचें स्वतः सुरक्षित राहण्याचें धोरण त्यांना स्वार्थीपणाचें दिसू लागलें. वास्तविक मुख्य सत्तेबद्दल आदर ठेवून स्वतःचेंहि आसन स्थिर ठेवण्याचें यांचें धोरण होतें.

हा जाटाच्या पारिपत्याकरितां अलमपुरास (दतिया) आला आणि तेथें यानें वैशाख शु. ११ मंगळवारीं दोन प्रहरीं देह ठेवला (ता.२०-५-१७६६). मृत्युसमयीं याचें वय ७३ वर्षांचें होतें. हरकूबाई मागें राहिली. गौतमाबाई आधींच वारली होती. द्वारकाबाई व बजाबाई यांनीं सहगमन केलें. क्रियेस दीड दोन लक्ष रुपये खर्च व्हावयाचा होता असा निर्देश आहे. यास गौतमाबाईपासून खंडेराव नांवाचा एक मुलगा झाला, तो कुंभेरीच्या वेढ्यांत ता. १७-३-१७५४ रोजीं गोळी लागून मरण पावला. उदाबाई व सीताबाई अशा दोघी मुली मल्हाररावास असून उदाबाईचें सासर वाघमारे यांजकडे होतें. तुकोजी होळकर याचा नातलग होता. त्यास यानें हाताखालीं ठेवून वाढविलें. हा तुकोजीच अहल्याबाईच्या वेळच्या मुलुखगिरींत प्रमुख होता.

२. (मृत्यु स. १७९७) तुकोजीचा पुत्र. पुणें येथें मारामारींत मेला.

मसहफी--(जन्म स. १६४३–मृत्यु स. १८२३) एक उर्दू कवि. याचें नांव गुलाम हमदानी. याला सुलेमान शुकोहचा आश्रय होता. याचे सहा दीवान आहेत. याची कबर लखनौंत आहे (क. कौ. ४). याच्या चांगल्या कविता विकल्या गेल्यामुळें वाईट कविता शिल्लक राहिल्या.

मसूद—(स. १६८६) हा विजापूरच्या शेवटल्या सिकंदर आदिलशाहाचा वजीर. सिदीजोहार ऊर्फ सलाबतखानाचा जांवई. याच्याच वेळीं स. १६८६ मध्यें औरंगजेबानें विजापूरचें राज्य खालसा केलें.

मसूद खल्जी—(स. १२५० सुमार) हा मलीक खल्जीचा पुत्र. याला शिहाबुद्दीन किंवा नस्त्रुद्दीन म्हणत. याला अलाउद्दीन व अल्मस बेग अशीं दोन मुलें होतीं.

मसूद गझनवी—(अलाउद्दौला मसूद ऊर्फ अल्करीम गझनवी पाहा).

३. (स. १०४९ डिसें. २२) मौदूद गझनवीनंतर त्याच्या या तीन वर्षांच्या मुलास गादीवर बसविलें. पण गझनीच्या उमरावानें २९ डिसेंबरला याला पदच्युत करून याचा चुलता अली अबू अल् हसनला अमीर केलें.

२. (स.१०१०–४०) हा हिंदुस्थानावर बारा स्वाऱ्या करणाऱ्या महमूद गझनवीचा पुत्र. यानें आपला भाऊ मुहम्मदकडून राज्य घेतलें व त्याला आंधळा केलें (अरियास्क व तिलक पाहा). तथापि याच्या सैन्यानें मुहम्मदला पुनः राज्य दिलें; व याला तुरुंगांत टाकलें. नंतर त्याचा मुलगा अहमद गादीवर बसला, व त्यानें याचा वध केला.

मसूदखान घोरी—(स. १४३५) माळव्याचा सुलतान गझनीखान घोरी याचा हा मुलगा. हा आपल्या बापानंतर गादीवर आला. याच्यानंतर माळव्यांत खल्जी घराणें राज्य करूं लागलें.

मसीती—युसफ आदिलशहाची मुलगी व अहमद बाहमनीची पत्नी.

मस्तानी—(मृ. स.१७४०) ही बाजीराव पेशव्याची रक्षा असून हिचा वंश बांदा संस्थानांत राज्य करीत आहे. हिच्या मुलाचें नांव समशेरबहादर असें होतें. बाजीरावाला ही छत्रसालाकडून किंवा निजामाकडून मिळाली अशा आख्यायिका आहेत. पण ही बाजीरावानें नादीं लावून आणलेली घरगुती स्त्री असून हिच्या आप्तांनीं तक्रार केल्याचें एक पत्र उपलब्ध आहे (पे. द. ९. ३६). बाजीराव हिच्या नादीं लागलेला पाहून चिमाजीआपा व राधाबाई यांना वाईट वाटे. त्यांनीं बाजीरावाला हिला सोडण्यासाठीं नानातऱ्हेनें समजावून सांगितलें, पण त्याचा कांहीएक उपयोग झाला नाहीं. बाजीरावानें हिला राहण्यासाठीं शनवारवाड्यांत स्वतंत्र जागा बांधली व त्या दरवाजाला

'मस्तानी दरवाजा' असें नांव दिलें. एकदां तर चिमाजीआपानें हिला कैदेंत ठेविलें होतें; परंतु ही तेथून बाजीरावाकडे पळून गेली. हिला पाबळ, केंदूर हीं गांवें इनाम होतीं. ही बाजीरावानंतर लवकरच मेली असें दिसतें. हिची कबर पाबळ येथें आहे.

हिला मद्यप्राशनाचा नाद असल्यामुळें तो नाद बाजीरावास लागला होता, व ही फार रूपवान् असल्यामुळें बाजीराव प्रेमांध व विलासी बनला. ही नृत्य व संगीत यांत कुशल होती.

बाजीराव फार प्रेमांध व विलासी होऊन मस्तानीच्या आधीन झाला, त्या वेळीं नानासाहेबांनीं गुप्त कारस्थानें करून मस्तानीस वश करून घेण्याचा प्रथम प्रयत्न केला, हें बाबुराव गणेश याच्या ता. १९ ऑगस्ट १७३९ च्या नानासाहेबास लिहिलेल्या पत्रावरून दिसून येतें (इतिहाससंग्रह पु. १ ले, अंक ८ वा, पृ. १० ऐतिहासिक चर्चा).

ह्या पत्रांत नानासाहेबाचें व मस्तानीचें विशेष मित्रत्व जडल्याचा उल्लेख आहे. परंतु मस्तानीस त्याचा खरा हेतु समजतांच पुढें तें मित्रत्व टिकलें नाहीं.

मस्तानीचा वंश

बाजीराव (मस्तानी)
|
समशेरबहादर (स. १७३४ ते ६१)
|
अलीबहादर (स. १७५८–१८०२)
|
समशेरबहादर (स. १७८४–१८२३) — झुल्फिकार अली (मृ. १८२३)
|
अलीबहादर (मृ. स. १८७३)

महमवानी शिलाहार—(स. १०४०–७०) हा ठाण्याच्या शिलाहारांपैकीं अरिकेसरीचा तिसरा मुलगा. हा आपला भाऊ नागार्जुनाच्या नंतर गादीवर आला. याचा कल्याणपासून सहा मैलांवर असणाऱ्या अंबरनाथ स्टेशनाजवळ आम्रनाथाच्या मंदिरावर एक शिलालेख सांपडला आहे. तो स. १०६० चा असून त्यांत याच्या नांवाचा महमवानी असा उच्चार आहे. हें नांव दुसरीकडे मामवानी किंवा मुम्मुनी असें आढळतें. या लेखांत असें म्हटलें आहे कीं, जुन्या कच्छच्या देवळाऐवजीं दगडाचें देऊळ राजगुरूनें बांधलें. देवळाजवळ त्याच सालचा आणखी एक शिलालेख इमारत बांधल्याबद्दल सांपडला आहे. या वेळीं परमार हतप्रभ झाले होते व कदंब प्रबळ होते.

महल्ल सोलंकी—सोरठचा राजा. याचा थोरला भाऊ कल्ल.

महमूद—(स. १५०२–१५२८) मुलतानचा राजा. हा पहिल्या हुसेनशाहाचा मुलगा. हा मेल्यावर याचा मुलगा (दुसरा) हुसेनशाहा गादीवर आला.

२. (स. १५३३–३८) बंगालचा राजा.

महमूद खल्जी—(स. १४३५–७५) माळव्याचा राजा. हा माळव्यांतील खल्जी घराण्याचा संस्थापक. यानें माळव्याच्या घोरी घराण्यांतील गज्नीखानास ठार मारून माळव्याचें राज्यपद बळकावलें. याच्या बापाचें नांव मलीक मुघीस खानजहान खल्जी. हा फार शूर व चतुर होता. हुशंगशाहानें सुरू केलेली मशीद यानें पुरी केली. यानें राज्यांत हिंदूंना त्रास दिला नाहीं. याच्यानंतर याचा मुलगा घियासुद्दीन गादीवर बसला (कुंभकर्ण गुहिलोत पाहा).

२. (स. १५११–१५२६) माळव्याचा राजा. हा नासिरुद्दीन खल्जीचा मुलगा. याचा मुख्य कारभारी मेदिनीराय नांवाचा रजपूत सरदार होता. पुढें याचें व मेदिनीरायाचें, नोकरींत हिंदूंचा भरणा केल्यामुळें वांकडें येऊन हा गुजराथच्या मुज्फरशाहाची मदत मिळविण्यासाठीं पळून गेला. पण शेवटीं याचा खून झाला (स. १५२६); व मेदिनीरायाचा पराभव होऊन माळवा प्रांत गुजराथच्या राज्यास जोडला गेला.

महमूद गझनवी—(स. ९६७–१०३०) हा गझनवीचा सुलतान. हा सबक्तगीनाचा दासीपुत्र होता. यानें 'सुलतान' ही पदवी स. ९९८ त घेतली. हा शरीरानें बळकट असून, मोठा महत्त्वाकांक्षी होता. यानें हिंदुस्थानावर एकंदर अकरा स्वाऱ्या करून, सबंध पंजाब प्रांत हस्तगत केला. याची स. १०२४ मधील सोरटी सोमनाथावरची स्वारी फार प्रसिद्ध आहे. ह्या स्वारींत याला अगणित द्रव्यलाभ झाला. यानें इराणवर स्वारी केली. नंतर याला मधुमेहाचा विकार जडून, त्याच विकारानें वयाच्या त्रेसष्ठाव्या वर्षी ता. ३० एप्रिल सन १०३० रोजीं हा मरण पावला. हा पैशाचा अतिशय लोभी होता. मरतेसमयीं हा आपल्या संपत्तीचें शेवटचें दर्शन घेत असतां यास रडूं कोसळलें. हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्याचा जो यानें एकसारखा पंचवीस वर्षे उद्योग केला, त्यामुळें हिंदुस्थानांत येण्याची वाट मुसलमानांना परिचयाची झाली, व त्यांना आपणास हिंदुस्थान जिंकतां येईल असा

आत्मविश्वास वाटूं लागला. हा विद्वानांचा आश्रयदाता होता. यानें गझनवी येथें एक पाठशाळा स्थापून तिच्यांत पुस्तकालय, पदार्थसंग्रहालय, व विद्वान् शिक्षक वगैरेंची उत्तम तरतूद केली. यानें दरसाल विद्वान् मंडळींच्या उत्तेजनार्थ तीस लाख रुपयांची नेमणूक केली होती.

महमूदच्या स्वारीचे वेळची हिंदुस्थानची राजकीय परिस्थितिः विंध्यपर्वताचे उत्तरेकडील प्रदेश–

(१) हिंदू 'शाहीय' राजवंशाचें राज्य. सिंधु नदीचे कांठीं असलेलें 'ऊंद' राजधानी. लढाय ब्राह्मणानें हा राजवंश स्थापन केला. स. ९९० चे सुमारास महमूदानें या राजवंशाचा उच्छेद केला. (२) पंजाबः राजधानी 'भातिंद'. राजे जयपाल १, आनंदपाल, जयपाल २, भीमपाल. स. १०२१ मध्यें भीमपाल अजमीरला पळून गेल्यावर प्रांत महमूदाचे राज्यांत दाखल झाला. (३) सांभर अथवा अजमीरः चौहाण घराण्याचें राज्य. (४) दिल्ली, तोमर राजघराणें. (५) चितोडः गुहिलोत घराणें. (६) कनोजः गुर्जरप्रतिहार घराणें. हर्षाचे वंशज. (७) जिहोती (आधुनिक बुंदेलखंड): चंदेल्ल राजघराणें. चंदेल्ल गोंड लोकांपैकीं गोंड लोकांनीं उत्तरेकडे राज्यविस्तार सरकवीत नेऊन कनोजचे सरहद्दीपर्यंत आपली सरहद्द नेऊन भिडविली होती. यमुनेस ते आपली सरहद्द समजत. (८) गुजराथः चालुक्य घराणें अथवा सोळंकी घराणें. चावर घराण्यास पदच्युत करून सोळंकींनीं हें राज्य मिळविलें. (९) जाट लोकः वस्ती सिंधूचे कांठीं, मुलतान व सुलेमान पर्वतांचे ओळीमधील प्रदेश. (१०) चेदीः जिहोतीचे दक्षिणेकडील प्रदेश. कलचुरी अथवा हैहय घराणें. गोंड-लोकांपैकीं. (११) माळवाः परमार घरणें स. ९०० चे सुमारास स्थापना. (१२) बंगालः पाल घराणें (गोपालानें आठव्या शतकांत हा राजवंश स्थापिला.) राजधानी ओदंतपुरी (बिहार). (१३) कामरूप अथवा असामः कोच राजघराणें. तिबेटी–चिनी वंशापैकीं पूर्णपणें हिंदु झालेलें. (१४) काश्मीरः कर्कोटक राजघराणें. (१५) ग्वाल्हेरः कच्छवाह रजपूत घराणें. बहुधा जिहोतीचे मांडलिक (केंब्रिज हिस्टरी व्हा. ३, पा. ५०५).

महमूद गवान—(स. १४०३–८१) हा बेदरच्या बाहामनी राज्यांतील प्रसिद्ध इराणी प्रधान. हा मूळ इराणांतील राजघराण्यांतील होता. यानेंच विजापूरचें राज्य स्थापणारा युसुफ आदिलशाहास एका व्यापाऱ्याकडून विकत घेतलें, व त्याला याच्या मृत्यूनंतर बाहामनी राजानें विजापूरचा सुभेदार नेमलें. हा वयाच्या चाळिसाव्या वर्षी हिंदुस्थानांत आला. याच्या अंगचे गुण पाहून यास हुमायूनशाहाचे कारकीर्दीत 'मलीक-उत्-तुजार' हा किताब मिळाला; व बाहामनी राजा मुहम्मदशाहानें याला 'खाजे-खान' असा किताब दिला होता. हा कवि होता. याच्या कवितांपैकीं 'रोझन–उल्–इनशा' ही कविता प्रसिद्ध आहे. शेवटीं याला मुहम्मदशाहा बाहामनीच्या हुकमानें जोहर नांवाच्या हबशी गुलामानें ठार केलें. यानें मरणापूर्वी अहमदाबाद बेदर येथें एक पाठशाळा बांधली होती.

याची योग्यता त्या वेळीं सर्व लोकांत फार होती. तत्कालीन मुसलमानांमध्यें इतका शहाणा व थोर मनुष्य निपजला नाहीं, असें समजतात. हा निःस्वार्थी व एकनिष्ठ होता. औदार्यानें व निःपक्षपातानें यानें केलेल्या सुधारणा, युद्धकलेंत दिसून आलेलें याचें चातुर्य व धीटपणा, याची अप्रतिम न्यायबुद्धि आणि खाजगी व सरकारी संबंधांत परोपकार करण्याची इच्छा इत्यादि अनेक गुणांनीं इतिहासांत याचें नांव अजरामर झालें आहे. याच्यापाशीं अगणित संपत्ति होती. तिचा व्यय हा गोरगरिबांना दानधर्म करण्यांत करी. एकदां तर राजानें आपला झगा याचे आंगांत घातला होता (मु. रि. भा. १ ला, पा. २३३-३४).

महमूद (गुजराथ) बेगडा—(स. १४५९-१५११) गुजराथचा सुलतान. हा फार जुलमी व पराक्रमी होता. याला बेगडा हें टोपणनांव होतें. यानें स. १४६८ त काठेवाडवर स्वारी करून, तो देश काबीज केला. पुढें यानें स. १४८३ मध्यें चांपानेरच्या जयसिंगावर स्वारी करून, त्यास ठार मारलें. स. १५१० त यानें पाटणवर स्वारी केली. व नंतर हा मरण पावला. हा तापट होता.

२. (स. १५२६) गुजराथचा सुलतान. हा दुसऱ्या मुज्फरशहाचा मुलगा.

३. (स. १५३७–५४) गुजराथचा सुलतान. हा तिसऱ्या लतीफखानाचा मुलगा. हा राज्यकारभारांत निष्णात होता. वजीर बुर्हाण-उल्मुल्क बाबींनें याचा खून केला.

महमूद गुलाम—(मृत्यु स. १२८५) हा गुलाम वंशांतील बल्बनचा मुलगा. याला याच्या बापानें तैमूरशाहाच्या फौजेशीं लढाई करण्यासाठीं पाठविलें. यानें मोगलांचा पूर्ण मोड करून गेलेला प्रदेश मिळविला (स. १२८३). स. १२८५ मध्यें हा परत मोंगलांवर चालून गेला व लांबपर्यंत त्यांचा यानें पाटलाग केला, पण मोगल सैन्य उलटून त्यांनीं याला ठार मारलें.

महमूद तुघ्लक–(नासिरुद्दीन महमूद तुघ्लक पाहा).

महमूद बाहामनी—(स. १३५७–७४) हा बाहामनी वंशांतील अलाउद्दीन हसन कांगोचा पुत्र. याला मुहम्मद म्हटलेलें आढळतें.

२. (स. १३७८–९६) बाहामनी राजा. हा अलाउद्दीनाचा मुलगा. हा विद्वान्, दयाळू व सद्गुणी होता. यानें विद्येस उत्तेजन दिलें. याच्या वेळीं दुर्गादेवीचा दुष्काळ पडला होता.

३. (स. १४८२–१५१८) दुसऱ्या मुहंमदशाहा बाहामनीचा हा मुलगा. याच्या कारकीर्दीत शिया व सुनी या दोन पंथांचे तंटे विकोपास जाऊन त्यांतच बाहामनी राज्याची अखेर झाली. हा चैनबाजीत नेहमीं निमग्न असे; याचा अधिकार कोणी जुमानीत नसे.

महमूद लोदी—(स. १५१७ सुमार) हा लोदी घराण्यांतील निजामखानाचा मुलगा. याला इब्राहीम, इस्माईल व हुसेन असे तीन भाऊ होते. यांपैकीं इब्राहीम दिल्लीच्या गादीवर आला.

महमूदशाहा शर्की—(स. १४३६–१४५७) जोनपूरचा राजा. हा शम्सुद्दीन इब्राहीमशहाचा मुलगा. यानें माळव्याचा सुभेदार नासिरशाहा याच्यावर त्याच्या दुर्वर्तनाबद्दल स्वारी केली; व तह केला (स.१४१४); व माळव्याच्या राजाच्या सांगण्यावरून राधनची सुभेदारी दिली. पुढें यानें बहलोल लोदीचा पराभव करण्यासाठीं दिल्लीवर चाल केली, पण त्यांत याच्या सैन्याचा पराभव होऊन हा परत आला. परत बहलोल लोदी जोनपुरावर चालून आला असतां, या दे[illegible]त्वाचा तह झाला व राज्याच्या सीमा ठरविण्यांत आल्या. परत यानें बहलोलवर स्वारी केली. कारण त्यानें राज करण नांवाच्या एका हिंदूची नेमणूक सुभेदारीवर केल्यामुळें याला राग आला. पण युद्धाचा शेवट होण्याचे अगोदरच हा मरण पावला.

महाकश्यप—बुद्धदेवाच्या एका प्रमुख शिष्याचें हें नांव आहे. हा महातीर्थ या गांवचा राहणारा होता. याच्या पित्याचें नांव कपिल. याचें नांव प्रथम पिप्पल असें होतें. बुद्धदेवानें आपल्या तिसऱ्या चातुर्मास्यांत याला प्रव्रज्या दिली. बुद्धदेवाच्या निर्वाणानंतर शतपर्णी गुंफेंत यानें पांचशें भिक्षूंसहित अधिनायकाचें आसन स्वीकारून अभिधर्म नांवाच्या त्रिपिटिकावर प्रवचन केलें, त्या वेळीं याला महास्थविर अशी उपाधि दिली.

महाकुलतिष्य—(सनाचें पहिलें शतक) सिंहलद्वीपचा राजा. कोरांग राजाचा वडील भाऊ (ग्या. इं. को.).

महागुत्त—(मागुत्त पाहा).

महादजी कृष्ण जोशी—(स. १७०२) साताऱ्यास याचा व भानूचा परिचय होता म्हणून हा भानूस जाऊन भेटला व त्याचे मार्फत भोरास शंकराजी नारायण सचीव यांजकडे नोकरीस राहिला. बाळाजीची स्थापना ताराबाईच्या हातानें यानें रांगणें मुक्कामीं केली, असाहि उल्लेख आहे (पं. सं. वृ. ले. १-२). बाजीरावाची बायको काशीबाई ही याची मुलगी होती.

महादजी गदाधर—(स. १७३४) हा गदाधर प्रल्हादाचा मुलगा. हा वरील शकांत अमात्यपदावर होता. याचा शरीरसंबंध अत्रे घराण्याशीं दिसतो. नाशिक जिल्ह्यांत चांदवडकडचे हे असावेत. दे. रू. ब्रा. (मं. त्रै. व. ७; पे. द. ४४).

महादजी गायकवाड—(स. १७३२) हा पहिल्या पिलाजी गायकवाडाचा भाऊ. यानें बडोदा जिंकून राजधानी केली.

महादजी गोमाजी पानसबळ ऊर्फ खंडेराव—(स. १६८७) पन्हाळगडीं यास सेनापति नेमलें. हा मेल्यावर संताजी घोरपडे सेनापति झाले.

महादजीपंत पुरंदरे—(मृत्यु स. १७६०) हा अंबाजीपंताचा दुसरा मुलगा.

हा पेशव्यांचा मुतालिक होता (स. १७४०–५०). हा नानासाहेबांच्या बरोबर नेहमीं पुण्यास व स्वारींत असे. स. १७५० हा मध्यें सखाराम बापूच्या मसलतीनें पेशव्यांवर रुसून घरीं बसला (रा. खं. ६, पृ. ६०). परंतु पुढें लवकरच याची समजूत झाली (रा. खं. ६ पृ. ७१ व ८१). यानें निजामावरील स्वारींत पराक्रम केल्यामुळें यास नानासाहेबांनीं फौजेंत सरदारी दिली. याला एक पुत्र असून त्याचें नांव नीळकंठ असें होतें. याचा पेशव्यांशीं झालेला पत्रव्यवहार बराच उपलब्ध आहे.

२. (मृत्यु स.१७९१) हा नीळकंठ महादजीचा मुलगा.

महादजी बल्लाळ लष्करी—(स. १७८९ सुमार) हा वर्णीचा राहणारा होता. जात ऋ. देशस्थ ब्राह्मण. मुधोजी भोसल्यानें काशीराव लक्ष्मण प्रभू यास आपल्या खाजगी कामाकडील कारभारी म्हणून नेमिलें व त्याचे जोडीस यास दिलें.

हा पुढें प्रसिद्धीस आला. स. १७८९ मध्यें चिमणाजी बापू यास रघूजी व त्याचा विश्वासू कारभारी यांनीं मूठ घालून मारलें अशी बातमी उठली होती.

फार्स्टरनें केलेल्या नागपूरच्या वर्णनांत तो म्हणतो–– "रघूजीची मर्जी भवानी काळूवर मुळींच नसून तो त्याला कामावरून काढण्याच्या खटपटींत आहे. रघूजीच्या मनांत यास दिवाणगिरीवर नेमावयाचें आहे.

कारण महादजी हा कोणाजवळ द्रव्य आहे ह्या गुप्त बातम्या रघूजीस देतो व त्यांचेकडून पैसे उकळण्याच्या युक्त्या रघूजीस सांगतो; त्यामुळें याचेवर रघूजीची मर्जी आहे." (ना. प्रां. इ.).

महादजी भोसले—बिंबाजी भोसल्याची बायको आनंदीबाई हिचा हा कारभारी होता (ना.प्रां.इ.पा.२१४).

महादजी राम पारसनीस—याला दोन मुलगे होते, त्यांचीं नांवें अनुक्रमें विठ्ठल व त्रिंबक अशीं होतीं. हा व याचे मुलगे आंग्र्याविरुद्ध मानाजीस मिळाले होते. त्यासंबंधांत यास मानाजीनें पत्र लिहिलेलें प्रसिद्ध आहे (३० मे १९०५ केसरी).

महादजी शामराज—(स. १६५७) हा शिवाजी-महाराजांचा सुरनीस होता (पत्रसारसंग्रह ७२२).

महादजी शिंदे—(जन्म स. १७२७–मृत्यु स. १७९४ फेब्रु. १२) प्रसिद्ध मराठा वीर व मुत्सद्दी. हा राणोजीला चिमाबाई नांवाच्या रजपूत बाईच्या पोटीं झालेला मुलगा. राणोजीच्या पश्चात् हा पेशव्यांच्या खासगी पागेंत असल्यामुळें आणि स्वाऱ्यांवरहि जात असल्यामुळें युद्धकलेचें व मुत्सद्दीपणाचें यास शिक्षण मिळालें होतें.

यानें प्रथम तळेगांव-उंबरीच्या लढाईंत शौर्य गाजवून नांव मिळविलें. यानंतर औरंगाबाद (स. १७५१), साखर खर्डा (स. १७५६) व पंजाबकडील (स. १७५९) मोहिमांत हा हजर होता. निजामाला मिळालेल्या जानोजी भोसल्यास शह देऊन यानें परत आणलें. सदाशिवरावाबरोबर हा पानपतावर गेला होता, पण शेवटीं पळांतून हा सुरक्षित आला. वाटेंत एका पठाणानें डाव्या पायावर वार करून यास कायमचें लंगडें केलें, पण राणाखान नांवाच्या शिपायानें याला शेवटपर्यंत निभावून आणलें (स. १७६१).

गोहदच्या जाटावर राघोबानें स्वारी केली. तींत प्रथम शिंद्यांच्या दौलतीतर्फे मुख्य म्हणून यानें प्रथम भाग घेतला (स. १७६६–६७; ईश्वरसिंग पाहा). नंतर याला सरदारीचीं वस्त्रें मिळालीं (ता. १८-११-१७६८).

केदारजी व मानाजी फाकडे शिंद्याची सरदारी आपणांस मिळावी असा प्रयत्न करीत होते.

विसाजी कृष्णानंतर दिल्लीकडे पुनः लक्ष देण्याची नाना-महादजींच्या मनांत कल्पना आली आणि त्यांना बंगाल-कडे मोर्चा वळवावा असेंहि वाटलें (स. १७७९), पण सालबाइच्या तहानंतर (१७८२ मे १७) इंग्रजांविरुद्ध आपणहून कुरापत काढणें याला बरें वाटेना. यापूर्वी यानें स्वतंत्रपणें इंग्रजांशीं तह केला होताच (स. १७८१ आक्टो. १३). दिल्लीच्या बादशाहीवर इंग्रज, मराठे व जाठ हे लक्ष ठेवून होते. दिल्लींत इंग्रजांना योग्य तऱ्हेचा पाठिंबा नव्हता. मीर्झा नजबखान मेल्यावर अधिकारासाठी भांडणाऱ्या हमदानी व मीर्झा शफींनीं यास समक्ष भेटून याला बादशाहीची व्यवस्था लावण्याविषयीं सांगितलें (स. १७८२ जुलै ९, चमेलीतीर; रणजितसिंग जाट पाहा).

पण मीर्झा शफीचा (नजबखानाचा पुतण्या) मुहम्मद बेग हमदानीनें (आग्र्याचा सुभेदार) खून केला (स. १७८३ सप्टें. २३). तसेंच अफरासियाबखान (नजबखानाचा मुलगा) हा मराठ्यांची मदत घेतो म्हणून हमदानीचा भाऊ जैनुल आबिदीनखानानें त्याचाहि खून केला. सारांश, मराठ्यांची मदत घेणाऱ्याचा विरुद्ध पक्षांनीं खून करण्याचा सपाटा सुरू केला.

यांनींहि डिभाईच्या हाताखालीं सैन्याची तयारी सुरू करून आग्र्यास बादशहाची भेट घेतली (स. १७८४ जुलै). बादशहांनीं पेशव्यांना वकील मुतलकी आणि याला मीरबक्षीगिरी दिली (स. १७८४). नंतर यानें जयपूरचा प्रतापसिंह कच्छवाह व रणजितसिंह जाट यांचा हळुहळू बंदोबस्त केला. पुढें यास दरबार भरवून मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें देण्याचा समारंभ झाला (स. १७८४ मे १). यानंतर शीख व मुसलमान एक झाले आणि त्यांना शहाजादा जवानबख्त सामील झाला. पाटीलबाबा-जवळ सैन्य पुरेसें नव्हतें. मराठी अधिकारी मिजाशींत राहतात म्हणून यानें सर्व अधिकारी हिंदुस्थानी नेमले. जुने कारभारी रामचंद्र गंगाधर यांस कारभारांतून काढलें आणि जिवबादादा बक्षीलाहि तुरुंग दाखविला. नौबतराय बक्षीला सैन्याची बक्षिगिरी दिली; आणि जयपूर-जोधपूरकरांचे खंडणीकरितां स्वारी केली. तेव्हां याच्याविरुद्ध एकंदर लोकमत होऊन सैन्यहि फितुर झालें.

लालसोट येथें जयपूर–जोधपूरवाले आणि मुसलमान हे एकत्र होऊन यास विरोध करण्याकरितां उभे राहिले. खंडेराव हरी, अंबाजी इंगळे, शिवाजी विठ्ठल व धारराव शिंदे वगैरेंनी जोरानें तोंड दिलें. हमदानी मेला, पण त्याचे हिंदुस्थानी अधिकारी फितुर झाल्यामुळें लढाईत अपयश आलें (स. १७८७). याच वेळीं दिल्ली व बादशहा ताब्यांत घेऊन गुलामकादरनें कहर केला. दिल्लीस बादशहाच्या संरक्षणाकरितां ठेवलेला लाडोजी देशमुख मराठे बादशहास न विचारतां रातोरात पळाला. महादजीला वेळेवर मदत कोणाकडूनहि झाली नाहीं (अलीबहादर व तुकोजी होळकर पाहा). यानें उज्जयनीच्या स्वतःच्या वाड्यांतील रुपें काढून सात लक्ष रुपये उभे केले आणि

संकटकाल वारला. हळुहळूं यानें मथुरावृंदावन ताब्यांत घेतलें व शेवटीं लखबादादांनीं गुलामकादरचाहि पूर्ण समाचार घेतला (१७८८ मे).

रजपुतांनीं शेवटपर्यंत याला विरोध करण्याची कमाल केली. त्यांनीं शहाजादा अहसनबख्त यास दिल्लीच्या गादीवर बसवून यास विरोध करण्याचें ठरविलें, आणि दोन्ही सैन्यांच्या पाटणजवळ दोन लढाया झाल्या. पहिल्या लढाईंत निकाल लागला नाहीं म्हणून दुसरी लढाई झाली. या लढाईमध्यें मराठ्यांचा चांगलाच जय झाला. त्यामुळें रजपूत पूर्ण ताब्यांत आले आणि इस्माईल-बेगचाहि निकाल लागला, तेव्हां हा निर्वेध झाला. याच्या या कृत्यांनीं मराठ्यांचें राज्य यानें परमोच्च बिंदूला नेऊन पोचविलें.

मथुरा शहर याचें फार आवडतें होतें. उत्तरेंतील सात वर्षांचा याचा काल बहुतेक मथुरेच्या छावणींत गेला. मथुरावृंदावनच्या सनदा बादशहानें यास दिल्या (स.१७९० ऑगष्ट). सबंध हिंदुस्थानांत गोवधबंदीचें फर्मानहि बादशहाकडून यापूर्वीच यानें मिळविले होतें (ता. ४।९। १७८९). काशी व काशीविश्वेश्वर मंदिर यांची व्यवस्था मात्र याला करतां आली नाहीं. नंतर हा दक्षिणेकडे परत फिरला. बीड येथें मनसुरशाहा गुरूचें दर्शन घेऊन ५ मेला तुळजापुरास आला. तेथें भोंपे कदमाच्या मुलीशीं लग्न केलें आणि ११ जून रोजीं पुण्यास संगमावर दाखल झाला. ता. ११ जून १७९२ पासून ता. १२।२।१७९४ पर्यंत २० महिने पुण्यास मुक्काम झाला. पैकीं पहिलें एक वर्ष काय तें कामांत गेलें व पुढें ८ महिने आजारी-पणांत गेले. दिल्लीच्या कारभाराप्रमाणें पुण्याचा कारभारहि आपल्या ताब्यांत असावा अशी याची इच्छा असणें स्वाभाविक होतें. पण त्याकरितां हीन दर्जाचें कारस्थान करण्याचा किंवा लष्करी सामर्थ्याचा उपयोग करण्याचा यानें कधीं प्रयत्न केला नाहीं. द्रव्यबळाचाहि उपयोग करण्याची याची इच्छा नव्हती. आपली महत्त्वाकांक्षा राज्यहिताच्या आड हा केव्हांहि येऊं देत नसे. आपणच फक्त राज्यहित करणारे आणि इतरांच्याजवळ ती भावना नाहीं अशी प्रौढीची बागणूकहि हा करीत नसे. त्यामुळें पुण्याच्या दरबारांत याचें सारखें वजन वाढत चाललें. पण मराठी राज्याच्या दुर्दैवानें हा लवकरच ज्वरानें वानवडी येथें मृत्यु पावला. मृत्युसमयीं याचें वय ६७ वर्षांचें होतें.

यास अकरा लग्नें करूनहि पुत्रसंतति नव्हती. फक्त लाडोजी शितोळे यांस दिलेली बाळाबाई ही एकच मुलगी होती.

याची बीडचा मुसलमान साधु मनसूर व उज्जयनीच्या दत्तनाथ या दोन साधूंवर श्रद्धा असे.

हा मध्यम उंचीचा काळासावळा गृहस्थ असून कृष्णभक्त होता. याचे कांहीं अभंग, पदें व ज्ञानेश्वरीदासी नांवाचा ग्रंथ आहे (मल्हापा वासकर पाहा). याच्या वेळीं उज्जयनी ही शिंद्यांची राजधानी होती. ग्वाल्हेर येथें लष्कर असे.

महादजी सदाशिव गोडसे—हा रघुनाथराव पेशव्यांच्या अत्यंत विश्वासांतील असून गंगाबाई पेशवे हिला पुरंदरावर पोंचविण्याचें काम यानें केलें (मं. त्रै. ९. ४. पा. ५).

महादेव—अशोकाच्या प्रेरणेनें भरलेल्या तिसऱ्या बौद्ध महासभेंत याला महीशमंडलांतील मुख्य प्रचारक नेमलें होतें. महीशमंडल म्हणजे म्हैसूर प्रान्त असें स्मिथ म्हणतो (अशोक, पा.४४). यानें तेथें 'देवदत्तसुत्तन्त'चा उपदेश केला (महावंश).

२. नामदेवाचा वडील मुलगा.

३. (स. १३५७) 'कामधेनुकरणाचा ' कर्ता. गोदावरीच्या कांठचे त्र्यंबकेश्वरीं राज्यसभेंत कौंडिण्यगोत्री बोपदेव नांवाचा एक सामान्य ब्राह्मण होता, त्याचा हा पुत्र होय. यानें केलेल्या ग्रंथांत ३५ श्लोक आहेत व २२ कोष्टकांच्या पटांत तिथिसिद्धि होते असें म्हटलें आहे (भा. ज्यो.).

४. (स.१६६२,६८,७३) महादेव (मतिमत् प्रधान) रांझेकर हा कांहीं दिवस शिवाजीमहाराजांचा पेशवा होता. हा शामराज नीळकंठानंतर पेशवा झाला (शि. च. सा. २.२१९-२२०; २५३-५६).

५. याच्या पित्याचें नांव कान्हजित द्वाडप. याला रैवत राजाचा आश्रय होता. याचा कुंडप्रदीप नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

६. (स.१६९३) कृष्णसूर्याचा पुत्र. गोत्र कौंडिण्य. याचें 'अद्भुतदर्पण' नांवाचें नाटक आहे. हा तंजावर प्रांतांत पाळमाखेरीचा राहणारा. याला तंजावरच्या शहाजीचा आश्रय होता. याचा गुरु बाळकृष्ण. उन्मत्तराघवकर्ता महादेवशास्त्री व हा एकच कीं काय हें सांगतां येत नाहीं.

७. तुकारामाचा वडील मुलगा.

८. यानें चक्रेश्वरानें अर्धवट लिहिलेला ग्रंथ पुरा केला. परशुराम व पद्मनाथ याचे पिता व पितामह होत. गांव रासिण (गोदाकांठ). हा गुजराथी असावा.

महापात्र नरहरि बंदीजन—(स. १५०५-१६१०) हिंदी कवि. अकबरानें यास महापात्र ही पदवी दिली. याचे ' रुक्मिणीमंगल ', ' छप्पयनीति ' व ' कवितासंग्रह ' हे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

महादेव काकतीय—(स. ११९१–९९) हा पहिल्या प्रतापरुद्र काकतीयाचा धाकटा भाऊ. याच्या मातेचें नांव मुप्पलादेवी. याचा मुलगा गणपति हा प्रतापरुद्रानंतर गादीवर आला. तेव्हां हा कारभार पाही. जैतुगी यादवाच्या लढाईत हा मारला गेला.

महादेव दीक्षित—सत्याषाढ श्रौतसूत्रावरील वैजयन्ती नांवाची टीका करणारा. ही वैजयन्ती टीका पहिल्या सहा प्रश्नांवर आहे व शेवटल्या अठ्ठावीस, एकोणतीस प्रश्नांवरहि वैजयन्ती नांवाची टीका आहे आणि तिचाहि महादेवशास्त्री कर्ता आहे. पण हे दोघे टीका करणारे भिन्न असावेत.

२. दुसऱ्या एका महादेव दीक्षितांची सत्याषाढ श्रौतसूत्राच्या सव्वीस व सत्ताविसाव्या प्रश्नांवर उज्ज्वला नांवाची टीका आहे.

महादेव पुणतांबेकर—(स. १७०० सुमार) महाराष्ट्रीय तर्कशास्त्रज्ञ. यानें भवानंदी टीकाग्रंथावर टीका लिहिली (हिस्टरी ऑफ संस्कृत लॉजिक, पा. ४८६).

महादेवभट्ट गोविंदराव हिंगणे—(मृत्यु स. १७४४) हे पेशव्यांचे नाशिक येथील तीर्थोपाध्ये देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. हा शंकराजी मल्हार सचीवाबरोबर प्रथम बाळाजी विश्वनाथाचे स्वारींत दिल्लीस गेला. आणि पुढें पंचवीस वर्षेपर्यंत दिल्लीत मराठी सत्तेचा जम बसाविण्याची यानें विलक्षण खटपट केली. हा पिशाचलिपि व फार्सी भाषा जाणत होता. वक्तृत्व व बहुश्रुतपणा याच्या जोरावर यानें आपली छाप सर्वत्र बसाविली. हा स. १७३० पासून दिल्लीचे मराठी वकिलातीवर असल्याचा दाखला मिळतो. दिल्लीस माळवा वगैरे प्रान्तांच्या सनदा मिळविण्यास यानें मोठी खटपट केली (रा. खं. ६. ९५-९७). या कामगिरीबद्दल संतोष दर्शवून बाजीरावानें यास वर्षासन ठरवून दिलें (रा. खं. ६·१२३). सवाई जयसिंगाकडून पैसे मिळवून कर्जमुक्त होण्याची खटपट नानासाहेबानें (पेशव्यानें) याचेमार्फत सिद्धीस नेली. हळुहळूं यानें सावकारीचा धंदा आरंभिला आणि सर्व उत्तर हिंदुस्थानांत प्रतिष्ठा मिळविली. 'मनसूर अलीखान व अमीरखान दिल्लीस आले आहेत. सांप्रत यांनीं सवाई जयसिंग मेल्यावर त्याची वकिली आपणाकडे घेतली आहे. हा मनसूर अलीखान यांच्या दरबारी गेला. बरोबर सवाईकडील जमादार व प्यादे होते. तेथें हक्काबद्दल कांहीं बोलणीं झालीं. तेव्हां यानें शिवी दिली आणि आपले लोकांस त्यांना धरण्याविषयीं हुकूम केला. त्या लटपटींत हा जखमी झाला व घरीं आल्यावर त्या मध्यरात्रीं मृत्यु पावला.' (पुरंदरे दप्तर १.१५४). हें पत्र २५ मोहोरममध्यें लिहिलें आहे. जयसिंग स. १७४३ मध्यें मरण पावला. नंतर मोहोरम स. १७४४ फेब्रुवारींत येतो. स. १७४५ च्या पुढें महादेवभटाचें नांव येत नाहीं. त्यावरून हा स. १७४४–४५ सालीं वारला असावा. बादशाही उमरावास तोंडावर शिवी देऊन हा धरा म्हणतो यावरून तेव्हां मराठ्यांचा जोर किती वाढला होता याची कल्पना येते (म. रि. मध्य. ३.२९३-९४). महादजी शिंद्याचें दिल्लीस वर्चस्व होईपर्यंत या घराण्याचें तेथें वर्चस्व होतें. याचे पुत्र बापू, दामोदर, पुरुषोत्तम व देवराव.

महादेव यादव—(स. १२६७–७१) सिंघणपुत्र जैतुगी ऊर्फ जैत्रपालाचा दुसरा मुलगा व कृष्णदेवाचा हा भाऊ होय. याच्या कारकीर्दीचें वर्णन हेमाद्रीनें दिलें आहे. हा शिशु, शरणागत व स्त्रियांवर कधींहि शस्त्र चालवीत नसे. म्हणून हा राज्य करीत असतां आंध्रानें आपल्या गादीवर एक स्त्री बसाविली व मालवेश्वरानें एक अर्भक बसाविलें.

यानेंहि तैलंगण, गुजराथ व कोंकणांत स्वाऱ्या केल्या. यानें ठाणें येथील सोमेश्वर शिलाहार राजास मारून उत्तर कोंकण आपल्या राज्यास जोडलें. या वेळची लढाई दक्षिणेवर झाली. तींत सोमेश्वराचीं बहुतेक गलबतें बुडाली. महादेवानें आपणास 'चक्रवर्ती' म्हणविलें. हेमाडपंत हा महादेवाच्या कारकीर्दीत यादवसाम्राज्याचा श्रीकरणाधिप झाला.

महादेवराव शिवदेव ओढेकर—हा पवारांचा दिवाण होता. याला शिवराम व रंगराव असे दोन पुत्र होते.

महादेवशास्त्री फोंडेकर—(स. १७७५) हा कोल्हापुरचा वकील असून पुणें दरबारीं होता.

महादेवी—ही दुसऱ्या कुमारगुप्ताची पत्नी होय.

२. ही उच्चंगीच्या इरुक्कपाळ पांड्याची मुलगी. ही एरेयंग होयसलला दिली होती.

महादेवी अक्का—(स. ११६० सुमार) कानडी कवयित्री, व वचनकर्त्री, वीरशैव. हिचा उडुतडी गांवांत जन्म झाला. ग्रंथ–वचन, योगांगत्रिविधि, सृष्टिवचन. हिने तेथील राजाशीं विवाह करण्याचें नाकारून ही विरक्त होऊन कल्याण येथें बसव वगैरे राहत होते तेथें गेली. ही लिंगायत लोकांत विशेष प्रसिद्ध असल्यामुळें 'महादेवी अक्काचें' पुराण नांवाचा ग्रंथ हिच्यावर झाला आहे. हिच्या प्रत्येक वचनाच्या शेवटीं चन्नमल्लिकार्जुन हा शब्द येतो. हिचीं वचनें आजहि प्रसिद्ध आहेत. दुसरा ग्रंथ

पद्यरूप व तिसरा गद्यरूप आहे (क. क. च. भा. १, पा. १८८).

महादेवी मलयवती--हिचा उल्लेख वात्स्यायनाच्या कामसूत्रांत आढळतो. हिनें कुंतला शातकर्णी याचा कात्रीनें खून केला. ही कुंतला शातकर्णीची बायको नसून गणिका असावी. पण ज्याअर्थी हिचा उल्लेख महादेवी असा केला आहे, त्याअर्थी ही मुख्य राणी असावी.

महाधर्मरक्षित--अशोकाच्या प्रेरणेनें भरलेल्या तिसऱ्या बौद्धमहासभेंत याला महारठ्ठ देशांत मुख्य प्रचारक नेमलें होतें. महारठ्ठ म्हणजे महाराष्ट्र होय. तेथें यानें महानारदकस्सपह्वजातकाचा उपदेश केला.

महानंदिन् शिशुनाग--(ख्रि. पू. ४०० सुमार) शिशुनागवंशांतील हा शेवटला राजा. यास औरस संतति नव्हती. महापद्म नांवाचा एक दासीपुत्र होता. येथें क्षत्रियवंश संपून शूद्रवंश सुरू झाला.

महापद्मनंद--(ख्रि. पू. ३७१) हा महानंदिन् यास एका शूद्र स्त्रीपासून झाला. यानें ख्रि. पू. ३७१ मध्यें मगधचें राज्य बळकावून नंद घराण्याची स्थापना केली.

महाप्रजावती—ही गौतम बुद्धाची सावत्र आई होती. हिला प्रजावती किंवा प्रजापती असेंहि म्हणत. ही महामायेची बहीण होय. हिनें बुद्धदेवाचें पालनपोषण केलें होतें. महाराज शुद्धोदनाचा देहांत झाल्यावर हिनें बुद्धदेवाकडून प्रव्रज्या देण्याविषयीं मागणी केली. पण त्यानें स्त्रियांना दीक्षा देण्यास नकार दिला, पण आनंद वगैरेंच्या विनंतीवरून पुढें दीक्षा दिली. हिचा पुत्र नंद होय.

महाबतखान—(मृत्यु स. १६७२) चितोडचा राणा प्रतापाचा भाऊ संगराजित. तो प्रथमपासूनच मोगलांस जाऊन मिळाला होता. त्या संगराजितचा हा मुलगा. यानें जहांगीर,शहाजहान व औरंगजेब या तिघांच्या कारकीर्दीत मोगल बादशाहीचीं अनेक कामें केलीं. स. १६११ पासून हा मुसलमान होऊन मोगल दरबारीं वागत होता. स. १६३२ मध्यें यानें दौलताबादचा किल्ला घेतला. त्यानंतर सं. १६७१ मध्यें हा फिरून दक्षिणेंत आला. आणि अहिवंत व मार्कंडा वगैरे किल्ले यानें घेतले. तसेंच औंढा व पट्टा हे दोन किल्ले काबीज केले, तेव्हां दिलेरखानानें चाकण व सालेरच्या किल्ल्याला वेढा दिला. तेव्हां प्रथम भ्यालों असें दाखवून नंतर प्रतापराव गुजर व मोरोपंत पिंगळे यांनीं उलटून निकराची लढाई दिली, आणि मोगलांचा पुरा मोड करून अद्भुत पराक्रम गाजवला. तेव्हा याला बादशहानें परत बोलावून घेतलें आणि अफगाणिस्थानावर पाठविलें. तिकडेच हा ८० वर्षांचा वृद्ध सेनानायक स. १६७२ मध्यें मेला.

महाबळ—तिबेटी ग्रंथावरून असें दिसतें कीं, हा ख्रि. शकाच्या दुसऱ्या शतकांत बौद्धधर्माच्या प्रचारार्थ चीन देशांत गेला होता.

महामौद्गलायन—हा राजगृह नगराच्या जवळ असलेल्या कोलित गांवच्या सुजात ब्राह्मणाचा पुत्र. हा राजगृह येथें सारिपुत्रासह बुद्धदेवाचा शिष्य झाला होता. प्रथम संजय नांवाच्या संन्याशाचा हा शिष्य होता. हा शतपर्णीच्या धर्मसंघांत महाकश्यपाबरोबर त्रिपिटकांचा संग्रह करणाऱ्यांतील एक होता.

महायक—(स. ८५३-७८) मेवाडच्या गादीवर दुसऱ्या खुंमाणनंतर हा आला. याच्यानंतर तिसरा खुंमाण गादीवर आला.

महाराक्षित—अशोकाच्या प्रेरणेनें भरलेल्या तिसऱ्या बौद्धमहासभेंत यास योन देशांतील मुख्य प्रचारक नेमिलें होतें. योन म्हणजे हिंदुस्थानचा उत्तरपश्चिम सरहद्दप्रांत होय. पण सध्यांच्या उत्तरपश्चिम सीमेपेक्षां अशोकाच्या वेळीं ही मर्यादा पुष्कळच पलीकडे होती.

महाराजगुप्त—हा गुप्तराज्याचा मूळ संस्थापक होय. याच्या वेळीं गुप्तांचें लहान राज्य असावें. हा व याचा पुत्र याच्या वेळीं गुप्तांचें राज्य पाटलीपुत्रापासून अयोध्येपर्यंत गंगेच्या कांठानें पसरलें होतें. पण याचा नातू पहिला चंद्रगुप्त यानें आपलें राज्य वाढविण्यास सुरुवात केली.

महालक्ष्मी—भर्तृभट्ट गुहिलोताची पत्नी. ही हर्षुडीच्या राठोडांपैकीं होती.

महालिंगदास—(स. १५४४ सुमार) यांनीं रचलेला 'सिंहासनबत्तिशी' हा ग्रंथ बराच प्रसिद्ध व लोकप्रिय आहे. तो बराच जुनाहि असावा असें वाटतें. पूर्व खानदेशांत गिरणा नदीच्या कांठीं वाडें हें गांव आहे. तेथें हा ग्रंथ लिहिला. त्यावरून तेथीलच हे असावे असें दिसतें. हे संस्कृतज्ञ होते. शके १४८७ च्या सुमारास यांचें वास्तव्य वाडें गांवांत होतें. यांनीं बरेच मोठाले ग्रंथ वाचिले होते. यांनीं लिहिलेल्या ग्रंथावरून यांची योग्यता ताबडतोब कळून येते (मं. श. १८३१ वा. इ. ले. ३०).

यांचे ग्रंथ -शालिहोत्र (अश्वचिकित्साशास्त्र), २ पंचोपाख्यान, ३ सिंहासनबत्तिशी, ४ वेताळपंचविंशी. हे तीन ग्रंथ मनोरंजनार्थ लिहिलेले आहेत आणि ते गद्यावरून पद्यमय केलेले दिसतात. ५ याची एक चाणक्यनीतीवर टीकाहि उपलब्ध आहे.

महावीर—(ख्रि. पू. ५२६ निर्वाण) हा जैनांचा चोविसावा तीर्थंकर होय. सध्यां प्रचलित असणाऱ्या जैनधर्माचा हा उद्दीपक होय. याच्यापूर्वी अडीचशे वर्षे तेविसावे तीर्थंकर पार्श्वनाथ हे होऊन गेले. याच्या पित्याचें नांव सिद्धार्थ असून ते ज्ञात नांवाच्या क्षत्रियकुलांतील होते. म्हणून यांना ज्ञातपुत्र म्हणत. प्रथम याचा गर्भ ऋषभदत्त नांवाच्या ब्राह्मणाच्या देवानंदा नांवाच्या स्त्रीच्या पोटीं होता, पण तो नंतर सिद्धार्थाच्या त्रिशला नांवाच्या राणीच्या पोटीं आला, अशी जैन दंतकथा आहे. त्रिशला ही क्षत्रियकन्या होती. याचे आईबाप पार्श्वनाथाचे अनुयायी होते.

हा राजपुत्र होता तरी पहिल्यापासूनच अत्यंत विरक्त असे. यानें बारा वर्षे प्रवास करून इंद्रियें ताब्यांत आणलीं. अंगावरील वस्त्राचेंहि यास भान नसे. नंतर याच्या या कडक तपश्चर्येमुळें यास केवलज्ञान झालें. त्या वेळीं याचें वय ४२ वर्षांचें होतें. बाकीचीं तीस वर्षे यानें धर्मोपदेश करण्यांत व तपश्चर्येचे नियम लोकांना समजावून देण्यांत घालविलीं. अश्विन वद्य अमावास्येच्या मध्यरात्रीं हा निर्वाणाला गेला. म्हणजे कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून वीर संवतला सुरुवात होते. त्याचें आज (स. १९३६, नवं. १५ रोजीं) २४६३ वें वर्ष सुरू आहे. मगधच्या बिंबिसार राजानें यांच्यापासून जैनधर्म स्वीकारला होता. याच्यानंतर सुधर्मन् हा याच्या गादीवर आला. याच्या नांवावर असलेलीं मागधी भाषेंतील बारा सूत्रें याच्या तत्त्वज्ञानाचा संग्रह करून मागाहून ग्रथित केलीं आहेत. तीं पुढील होतः

१ आचारांग, २ सूत्रकृतांग, ३ स्थानांग, ४ समवायांग, ५ भगवती, ६ अंतकृद्दशांग, ७ अनुत्तरोपपातिकदशांग, ८ विपाक, ९ उपासकदशांग, १० प्रश्नव्याकरण, ११ ज्ञाताधर्मकथा, १२ दृष्टिवाद (अनुपलब्ध).

२. (स. ८५३ सुमार) एक ज्योतिषी. याचा सारसंग्रह नांवाचा एक ग्रंथ व्यक्तगणितावर आहे. त्यांत अंकगणित आणि क्षेत्रगणित हे विषय आहेत. हा जैनधर्मी होता, आणि जैनधर्मी राजा पहिला अमोघवर्ष राष्ट्रकूटाचा याला आश्रय होता. सारसंग्रह ग्रंथ भास्कराचार्यांच्या लीलावतीसारखा आहे; परंतु तिजपेक्षां तो विस्तृत स्वरूपाचा आहे. सारसंग्रहांत श्रीधराचार्य नामक ग्रंथकाराच्या ग्रंथांतील मिश्रक व्यवहारांतील कांहीं वाक्यें आलीं आहेत.

महासिंह कच्छवाह—अकबराचा प्रमुख सरदार जो मानसिंह त्याचा हा नातू व भावसिंहाचा मुलगा होय. हा पराक्रमी नसल्यासुळें मोगलांच्या दरबारीं जयपूरचें वजन ओसरून जोधपूरचें वाढलें. पुढें मानसिंहाचा भाऊ जगत्सिंह याचा नातू जयसिंह याची जहांगीरनें आपली राणी जोधाबाई हिच्या सल्ल्यानें अंबरच्या गादीवर स्थापना केली. हा जयसिंह पुढें मीर्झा राजा या नांवानें प्रसिद्धीस आला.

महासुखतावज्र (शांतिगुप्त)—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं होय. याच्या ग्रंथांचा अनुवाद गुजराथचा पंडित पूर्णवज्र आणि लामा तारानाथ यांनीं मिळून केला. ग्रंथकर्ता शांतिगुप्त हुमायून अथवा अकबर यांचा समकालीन असावा. याचा जन्म दक्षिणेंत जयमंडल देशामध्यें झाला. याचे महासुखतागीतिका (तं. ४८।३१) व योगगीता (तं. ८६।८९) वगैरे ग्रंथ होत.

महासेन गुप्त—(स. ६०० सुमार) हा दामोदर गुप्ताचा मुलगा. हा एक माळव्याचा राजा होय. कनोजच्या मौखरीवंशांतील जो सुस्थितवर्मन् त्याचा हा समकालीन होता. यानें लौहित्य (ब्रह्मपुत्रा) नदीच्या तीरापर्यंत स्वाऱ्या करून त्या भागामधील राजास आपलें वर्चस्व स्वीकारणें भाग पाडलें. पुढें यानें अवंतिवर्मनाच्या कारकीर्दीत कामरूप येथील राजाचा पराभव केला. त्या प्रसंगी मौखरी राजानें द्रव्य व सैन्य या रूपानें बरीच मदत केली. याला देवगुप्त नांवाचा पुत्र होता. हें गुप्त घराणें माळव्यावर प्राचीन काळीं राज्य करीत होतें.

महासेनगुप्तदेवी—ही माळव्याच्या गुप्त घराण्यापैकी जीवितगुप्ताची मुलगी. ही आदित्यवर्धनाची पत्नी.

महाक्षपणक—(स. ३५०–३९५ सुमार) एक जैन. अनेकार्थध्वनिमंजरी व एकाक्षरकोश या ग्रंथाचा कर्ता. यानें उणादिसूत्रावर टीका लिहिली असावी.

महिमहंसगणि—मेघदूतावरील टीकाकार.

महीदेवीदेवी—रघुवंशी प्रतिहारांपैकीं ही विनायकपालाची माता.

महीधर—याचें शुक्लयजुर्वेदाच्या वाजसनेय शाखेवरील भाष्य निर्णयसागर मुद्रणालयाकडून छापून प्रसिद्ध झालें आहे. याचें हें भाष्य उवट व माधव यांचें भाष्य पाहून नंतर लिहिलें आहे.

महीपत त्रिंबक—(मृ. स. १७८५, बजाबा पुरंदरे पाहा).

महीपतराव—हा भोसल्याचा रामपूरचा सुभेदार होता. जातीनें ब्राह्मण (ना. प्रां. इ. पृ. २९४).

महीपतराव ऊर्फ काकाजी फणसे—याच्या वडिलांचें नांव अंताजी प्रयाग असें होतें. हा गायकवाडांच्या फौजेचा मुख्य अंमलदार होता. स. १८०४ मध्यें होळकरांशी इंग्रजांचें युद्ध सुरू झालें त्यांत गायकवाडाची फौज इंग्रजांकडील जरी होती तरी हा व सखाराम हे त्यांच्याविरुद्ध वागूं लागले.

महीपतराव दिनकर प्रभू (गुप्ते)—(स. १७६९) हा दिनकर विनायक गुप्ते याचा पुत्र होय. जानोजी भोसले व मुधोजी भोसले यांच्या भांडणांत हा मुधोजीकडे असून त्याच्या विश्वासास पात्र झाला होता. मुधोजीचा दिवाण सदाशिव हरी हा जानोजीचे पक्षास मिळाल्यावर मुधोजीनें यास आपला मुख्य कारभारी नेमलें. यानें दोघां भावांमध्यें सख्य घडवून आणण्यासाठीं मुधोजीस बरीच मदत केली.

मुधोजीचें ठाणें चंद्रपुर यास माधवराव पेशव्यांनीं वेढा घातला असतां त्याचे संरक्षणार्थ मुधोजीनें यास पाठवलें. परंतु याचे आप्त पेशव्यांच्या सैन्यांत असल्यामुळें जानोजीस याची खात्री येईना. परंतु मुधोजीनें याची खात्री दिली व त्याप्रमाणें हा इमानानें वागला. पेशव्यांनीं यास फितुर करण्याचा बराच प्रयत्न केला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

हा मोठा कांवेबाज होता. पेशव्यांच्या फौजेपुढें आपला टिकाव लागणार नाहीं हें पाहून दिवाकरपंताच्या सांगण्यावरून, त्यास पत्रें अशा रीतीनें पाठवावयाचीं कीं, तीं पेशव्यांचे लष्करांत धरलीं जाऊन ते घाबरून जावेत. ती युक्ति सफळ होऊन वेढा उठला (स. १७६९ फेब्रु.) पण पुढें दिवाकरपंत दिवाण होऊन हा मागें पडला.

महीपति—(स. ८७९) हा धर्माधिकारी घराण्यांतील होय. सर्वांआधीं काशीक्षेत्रीं कोण महाराष्ट्रीय गेले हें आज ठामपणें सांगतां येणें कठीण असलें तरी संवत् ९३६ च्या सुमारास महाराजा यशपाल याच्या वेळीं पंचगंगा येथें राहणार हे व यांचेच बनकटे पुराणिक यांचें अशीं दोन घराणीं तेथें होतीं. महाराज यशपाल राजानें याला षोडश संस्कारांचा संपूर्ण अधिकार दिला होता. हा विद्वान्, तपस्वी, तेजस्वी व धर्मशास्त्रकोविद असल्यानें याला षोडश संस्कारांचे सर्वाधिकार दिले (केसरी, ता. ६ ऑक्टोबर १९३६).

२. निळोबाचा मुलगा. नानासाहेब पेशव्यांचा हा चिटणीस होता.

३. यानें हिंदी भाषेंत गोपीचंदाख्यान रचिलेलें आहे (मं. श. १८३७ वा. इ. ले. १६०).

महीपति ऊर्फ ढोलीबुवा (उज्जनीकर)—(समाधि स. १८२२) हा कवि पैठण येथील राहणारा असून जनार्दनस्वामीचा वंशज होता. हा पैठणहून काशीयात्रेच्या निमित्तानें उत्तर हिंदुस्थानांत जाण्यास निघाला. वाटेंत यशवंतराव होळकरांनीं याजपासून गुरुमंत्र घेतला. तेथून हा तडक काशीस जाण्यास निघाला. तोंच रस्त्यांत भोपाळनजीक यास उज्जनीस असलेल्या दत्तात्रय भाऊ नांवाच्या एका संताविषयीं कोणीं माहिती सांगितली. तेव्हां हा उज्जनीस गेला. तेथें याला आश्रय मिळाला. दत्तभाऊंच्या मठांत याची अद्यापि बरीच अप्रकाशित हिंदी व मराठी कविता व (ग्रंथ) पुस्तकें आहेत. पुढें हा ग्वाल्हेरीस गेला. तेथें याचें माहात्म्य फार वाढलें; परंतु पुढें लवकरच तेथें यानें शके १७४४ त पौष शु. १३ स समाधि घेतली. याचा उज्जनी व ग्वाल्हेर येथें बराच मोठा शिष्यसंघ आह. याच्या गुरूंचें गांव नरहरी असें होतें. याची गादी अद्याप ग्वाल्हेरांत चालू आहे. वरील तिथीस तेथें याचा मोठा भंडारा दर वर्षी होत असतो. ग्वाल्हेर संस्थानाकडून याच्या संस्थानास मोठें उत्पन्नहि चालू आहे (मं. श. १८३७ वा. इ. ले. १९९).

महीपतिबोवा ताराबादकर—(स. १७१५-९०) हे मराठी भाषेंतील कवि व साधुपुरुष होत. हे नगर जिल्ह्यांत राहुरी तालुक्यांत ताराबाद म्हणून एक गांव आहे, तेथले राहणारे. देशस्थ ऋग्वेदी वसिष्ठगोत्री ब्राह्मण. उपनांव कांबळे. यांच्या वडिलांचें नांव दादोपंत व आईचें नांव गंगाबाई. वयाची साठी उलटल्यावर त्यांस शके १६३८ मध्यें एक पुत्र झाला, तो हा होय. हा लहानपणीं जरा खोडकर होता. पण वयाचे सोळाव्या वर्षी वडील निवर्तल्यामुळें संसाराचा भार याचेवर पडला. वडील हयात असतांच हा पंढरीची वारी करूं लागला होता. लहानपणापासून धर्माचे व विद्येचे बाबतींत यास शिक्षा मोरोबा तांभेरकर नांवाच्या एका गृहस्थाश्रमी सत्पुरुषाची असे. तांभेर हें गांव ताराबादेपासून सहा मैलांवर आहे. यानें त्यासच गुरु म्हटलें आहे. याचें हस्ताक्षर मात्र उत्तम आहे.

दादोपंत वारल्यानंतर गांवची कुलकर्णीपणाची वृत्ति करून हे संसार संभाळून असत. यांनीं सरकारी अधिकाऱ्यांशीं झालेल्या कुरबुरीनें कानांतील लेखणी विठ्ठलाच्या पायावर ठेवली व 'गांवकृत्याचें लिहिणें लिहिणार नाहीं' अशी शपथ घेतली. ही प्रतिज्ञा अद्यापहि यांच्या घराण्यांत पाळणारे कांहीं आहेत.

भजनादि कार्यक्रम चालू असतां ग्रंथरचना करण्याचें बुवांच्या मनांत आलें. यांना तुकोबांनींहि स्वप्नांत येऊन सांगितलें कीं 'नामदेवाची शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा राहिली होती ती मीं पुरी केली. आतां संतचरित्रें वर्णन करण्याचें काम त्वां करावें.' हाच दृष्टान्त

तुकोबाचा गुरूपदेश मानून बुवा संतवर्णनाचे कार्यास लागले. या वेळीं बुवा पन्नाशीच्या घरांत गेले होते.

संतचरित्रें वर्णन करावयाचीं तीं आपले पूर्वी होऊन गेलेल्या नाभाजी व उद्धवचिद्घन यांच्या ग्रंथाधारें वर्णन करावीं, असा संकल्प करून हे ग्रंथरचनेस लागले, असें भक्तविजयाच्या प्रारंभावरून दिसतें. प्रारंभींचीं चरित्रें वरील ग्रंथकारांच्या बरहुकूम यांनीं उठविलीं. पण नामदेव, ज्ञानेश्वरादिकांच्या चरित्रापर्यंत आल्यावर नाभाजीपेक्षां या प्रान्तांत अधिक व भिन्न माहिती प्रचलित आहे असें पाहून यानें नाभाजीचा ग्रंथ सोडून इकडील ग्रंथाच्या आधारें हीं चरित्रें लिहिण्याचें ठरविलें. १२–१५ हे अध्याय नामदेवाच्या तीर्थावळीवरून रचले. सच्चिदानंदबावाच्या 'ज्ञानेश्वरविजय' ग्रंथाचा उल्लेख यानें कोठेंहि केलेला नाहीं. तीर्थावळीतील संत संपल्यावर हा पुनः नाभाजीच्या ग्रंथाकडे वळला. पुढील सोळा-सत्रा हे अध्याय भक्तमालेच्या आधारें रचिले. एकोणिसाव्या अध्यायानंतर दामाजी, भानुदास वगैरेंचीं चरित्रें सांगितलीं. भानुदासाचें चरित्र सांगतांना याच्यासारख्या वारकऱ्यास त्याच्या वंशजाकडून अधिक माहिती मिळाली, व तिचा यानें ग्रंथांत उपयोग केला. पुढें बहिरंभटाचें चरित्र लिहिल्यानंतर हा तुकारामाच्या चरित्रावर आला. तुकारामाची माहिती यानें स्वतःमिळवली व फारच सुंदर रंगविली. नंतर बोधलेबुवा, गणेशनाथ, संतोबा पवार व उद्धवचिद्घन व विसोबा सराफाचें चरित्र लिहून भक्तविजय पुरा केला. ग्रंथसमाप्ति शके १६८४ चित्राभानु संवत्सर वैशाख व. २ स केली.

यानंतर कार्तिकव्रत, माघमाहात्म्य, वैशाखव्रत, एकादशीमाहात्म्य व त्यासंबंधीं पौराणिक कथा सांगणारा कथासारामृत नांवाचा ग्रंथ श.१६८७ श्रावण शु.५ स पुरा केला. नंतर शंकरपार्वतीसंवादरूपानें पांडुरंगमाहात्म्य लिहिलें आणि त्यांत पुंडलिकाची कथा गायिली (शके १६८८ भाद्रपदमासीं).

एकंदरींत पौराणिक कथाभागापेक्षां चरित्रात्मक ग्रंथ सांगतांना यांच्या वाणीला भरतें येतें असें दिसतें. नंतर स्वतः माहिती मिळवून भक्तविजयांत न आलेलीं चरित्रें संतलीलामृतांत यांनीं वर्णिलीं (श. १६८९).

यानंतर तुलसीमाहात्म्य, गणेशपुराण, दत्तात्रयचरित्र, यांसारखीं लहान चरित्रें, मुक्ताभरण, ऋषिपंचमी, अनंतचतुर्दशी इत्यादि व्रतकथा लिहून संतविषयक तिसरा ग्रंथ भक्तलीलामृत लिहिला. यांत पहिल्या दहा अध्यायांत चांगदेवाचें चरित्र लिहिलें. तें त्याचा वंशज शामजी याच्या ग्रंथाधारें लिहिलें असें म्हटलें आहे. पुढें नानक, रोहिदास यांचीं चरित्रें लिहून अकरा अध्यायांत एकनाथाचें चरित्र व सोळा अध्याय तुकारामचरित्र लिहिलें आहे. पण चाळीस अध्यायांत सहाच चरित्रें आलीं असें पाहून पुढील दहा अध्यायांत सुमारें पन्नास चरित्रें कोंबलीं आणि तो भाग तितका सरसहि झाला नाहीं. हा ५१ अध्यायांचा ग्रंथ शके १६९६ मध्यें पुरा केला.

यानंतर संतविजय नांवाचा ग्रंथ यांनीं आरंभिला, पण तो अपुरा असून त्यांत रामदासस्वामींचें व बाबाजी अरणगांवकर गोसाव्याचें अशीं दोनच चरित्रें आहेत. संतविजयाचा सत्ताविसावा अध्याय उपलब्ध झाला असून मुद्रित आहे (मं. त्रै. ८ १-२ पा. ३–१४).

महीपतीबोवा जशी माहिती मिळेल तसें एकेक चरित्र पुरें करीत व मागाहून ग्रंथरूपानें जुळवीत. संतविजय ग्रंथांत नमन, उपसंहार वगैरे कांहीं नाहीं, यावरून वृद्धपणामुळें हा ग्रंथ अपुराच राहिला असें दिसतें. यांचें एक अपराधनिवेदनस्तोत्र आहे, पण त्यांत आत्मचरित्रापेक्षां भक्तिभाव आहे. तुकारामाप्रमाणें यांनीं एक विठोबाला पत्रहि लिहिलेलें आहे. त्यांत हे वारीला निघाले असतां घोड्यावरून पडल्यामुळें यांस परत यावें लागलें, असें लिहिलें आहे, व विठोबाच्या पायाचा आश्रय मागितला आहे. प्रसिद्ध शनिमाहात्म्य यांचेंच होय.

हे आपल्या वयाचे ७५ वे वर्षी शके १७१२ (स. १७९०) मध्यें श्रावण वद्य १२ ला मरण पावले. यांच्या मागें विठोबा व नारायण असे दोन पुत्र होते (मं. तृतीय सं. शके १८३७, पा. ११२–११८).

ओवीवृत्ताप्रमाणें पुढील चरित्रें यांनीं अभंगवृत्तांतहि गायिलीं आहेत. श्रीनामदेवचरित्र अभंग ६२, हरपाळचरित्र अभंग ५८, कमालचरित्र अभंग ६७, नरसिंहमेहताचरित्र अभंग ५२, राकाकुंभारचरित्र अभंग ४७, जगमित्रनागाचरित्र अभंग ६२, माणकोजी बोधले चरित्र अभंग ६३, संतोबा पवारचरित्र १०२, चोखामेळाचरित्र अभंग ४७.

महीपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं सदतिसावा सिद्ध होय. यालाच महीलपा असेंहि म्हणत. हा मगध देशांतील शूद्र होता. हा कण्हपाचा शिष्य. तंजूरमध्यें याचा एक ग्रंथ उपलब्ध आहे. त्याचें नांव वायुतत्त्वदोहागीतिका (तं. ८४।१०) होय. हा मगधभाषेंत आहे. याच्या कांहीं कवितांवरून हा हिंदी भाषेचा कवि होता असें दिसतें.

महीपाल—(स. १०४४) दिल्लीचा राजा. याने महमूद गझनवी वारल्यावर त्याचा मुलगा व नातू यांचे कारकीर्दीत मुसलमानांची हिंदुस्थानांतील सत्ता

कमजोर झाली होती, त्या संधीचा फायदा घेऊन हौंसी, ठाणेश्वर व कांग्रा हीं ठाणीं काबीज केलीं. पंजाबांतील लोकांमध्यें मुसलमानांची सत्ता उखडून टाकण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न करण्याचे यानें प्रयत्न केले. महमूदनें फोडलेल्या कांग्र्याच्या प्रसिद्ध देवालयांतील जी मूर्ति नेली होती त्या मूर्तीसारखी दुसरी मूर्ति तयार करवून यानें लोकांत अशी वदंता पसरविली कीं, महमूदनें नेलेली मूर्ति परत आली आहे व म्हणूनच मुसलमानांची सत्ता झुगारून देण्याची वेळ आली आहे. मुसलमानांचीं तीन ठाणीं जिंकण्यांत आलेल्या यशानें उत्तेजन मिळाल्यामुळें हा लाहोरवर चालून गेला. परंतु आपसांतील भांडणांत प्रतिकार करण्याची उपेक्षा केलेले लाहोरचे उमराव जागे होऊन त्यांनीं यास एकोप्यानें तोंड दिल्यामुळें यास यश आलें नाहीं.

२. (स. १०१३–१०६५ सुमार) हा बंगालच्या पालांपैकीं दुसऱ्या विग्रहपालाचा मुलगा. 'अनधिकृत लोकांनीं बळकाविलेलें आपलें पैतृक राज्य यानें पुनः मिळवलें' असें सारनाथ येथील लेखांत म्हटलें आहे. या सारनाथलेखावर वि. सं. १०८३ (स. १०२६) दिलेला आहे (इंडि. अँटि. १४. १३९). सर स्मिथनें स. १९०९ च्या इंडि. अँटि. मध्यें पालांच्या उपलब्ध सर्व लेखांची यादी विस्तृत माहितीसह दिली आहे व त्यांची राज्यारोहणाच्या संभवनीय काळासह वंशावळ दिली आहे. त्याप्रमाणें याचा राज्यारोहणकाल स. ९८० आहे, पण वर दिलेला कालहि आडळतो. यानें ५२ वर्षे राज्य केलें. याचें राज्य मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळें पांगलेल्या क्षत्रियांपैकीं कोणीं घेतलें किंवा कांबोज राज्यापैकीं कोणीं घेतलें हें निश्चित समजत नाहीं. बंगाल्यांत अद्यापहि याचीं गाणीं ऐकूं येतात. याच्या वेळीं सहजच बौद्धांचा उत्कर्ष होऊन धर्मपाल वगैरे साधु स. १०१३ मध्यें तिबेटांत गेले (हिं. भा. अ. पा. ३४४).

३. (स. १०८०) हा बंगाल्यांतील तिसऱ्या विग्रहपालाचा पहिला मुलगा. हा स. १०८० च्या सुमारास आपल्या भावास कैदेंत टाकून गादीवर आला. या वेळीं बरेंद्र म्हणजे उत्तर बंगाल्यांत दिव्योकाच्या नेतृत्वाखालीं कैवर्तांनीं बंड केलें त्यांत हा मारला गेला. या वेळीं पालांच्या राज्याला उतरती कळा लागली (हिं. भा. अ. पा. ३१५).

महीपाल गाहडवाल— (स. १०५० सुमार) कनोजच्या गाहडवालांपैकीं यशोविग्रहाचा पुत्र. कनोजचें राज्य संपादन करणारा चंद्र किंवा चंद्रदेव याचा पुत्र होय.

महीपाल परमार—(स. १००२ सुमार) आबूच्या परमारांपैकीं धरणीवराहाचा पुत्र. याला देवराज असेंहि नांव होतें. याचें एक दानपत्र वि. सं. १०५६ (स. १००२) मधील मिळालें आहे तें अद्यापि प्रकाशित झालें नाहीं.

महीपाल प्रतिहार—(स. ९१०–४०) रघुवंशी प्रतिहारांपैकीं हा महेंद्रपालाचा पुत्र. याला क्षितिपालहि म्हणत. याच्या वेळीं काव्यमीमांसादि ग्रंथांचा कर्ता राजशेखर कनोज येथें होता. त्याच्या प्रचंडपांडव व बालभारत या नाटकांत याचा निर्देश आहे. तो याला आर्यावर्ताचा महाराजाधिराज, तसेंच मुरल, मेकल, कलिंग, केरल, कुलूत, कुंतल व रमठ या देशांच्या राजांना पराजित करणारा असें म्हणतो. हा दक्षिणेंतील राष्ट्रकूटांपैकीं तिसरा इंद्रराज किंवा नित्यवर्ष याच्याशींहि लढला होता. त्यांत राष्ट्रकूटांच्या म्हणण्याप्रमाणें याचा पराजय झाला. याच्या वेळचें काठेवाडांतील हड्डाला येथें शा. श. ८६३ (स. ९१४) मधील दानपत्र मिळालें आहे. यावरून वढवाण येथें याचा सामंत चावडावंशी धरणीवराह राज्य करीत होता. याचा आणखी एक शिलालेख वि. सं. ९७४ (स. ९१७) मधील मिळाला आहे.

राजशेखरच्या बालभारत नाटकाचा प्रयोग कान्यकुब्ज प्रांतांत महोदय येथें झाला, त्या वेळीं हा त्या प्रांताचा राजा होता. बुल्हरनें कांहीं कारण न दाखवितां यास चूडासमा आभीर राजांत (गिरनारजुनागडच्या) मानलें आहे (इंडि. अँटि. १२.१९०-९५).

महीदिव्यास—यानें लीलाचरित्र नांवाचा एक ग्रंथ लिहिला असून त्यांत चक्रधर कृष्णाच्या पंधराशें लीलांचा संग्रह केलेला आहे. यालाच महीभट्ट असेंहि म्हणत.

महेश—(ग्रंथकाल स. १७००) 'युक्तिविवाद' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

महेशक—'सदाचारचंद्रोदय' नांवाच्या संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

महेश ठक्कर—(स. १६०० सुमार) याचा जन्म दरभंग्याच्या नैऋत्येस १७ मैलांवर कमलानदीच्या तीरावर वसलेल्या भाऊर या गांवीं झाला. हा धीरा व चंद्रपति यांचा पुत्र होय. महादेव, भगीरथ व दामोदर यांचा हा धाकटा भाऊ होय. याचा जन्म खंडवाल कुटुंबांत झाला. पक्षधरमिश्रानें गंगेशाच्या ग्रंथावर लिहिलेल्या आलोकावर यानें 'दर्पण' नांवाची एक टीका लिहिली. ह्या ग्रंथांतील वरील भागच फक्त हल्लीं उपलब्ध आहे. यानें इतरहि बरेच ग्रंथ लिहिले आहेत. उ. तीर्थचिंतामणी इ.

शंकरमिश्रानें आपल्या 'त्रिसूत्रिनिबंधव्याख्या' या ग्रंथांत याच्या 'दर्पणा'चा तर्कज्ञानावरील 'आधारभूत ग्रंथ' म्हणून निर्देश केला आहे.

याच्या शिष्यांपैकीं रघुनंदनदास राय हा तर्कज्ञानांत प्रवीण असून अकबराच्या सांगण्यावरून तो चारी दिशांस वादविवादासाठीं गेला होता. अकबरानें त्याजवर खूष होऊन त्यास मिथिलेचा भाग बहाल केला. परंतु त्यानें तो आपल्या या गुरूस गुरुदक्षिणा म्हणून देऊन टाकला. अशा रीतीनें महेश ठक्कर हा दरभंग्याच्या राजघराण्याचा संस्थापक बनला (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४५७-५८).

यानें अकबर बादशहाचें एक संस्कृत चरित्र लिहिलें आहे, तें इंडिया ऑफिसांत आहे. हा महेश दर्भंग्याच्या महाराजांचा पूर्वज होय.

याचींच काव्यप्रकाशावर टीका आहे. 'तत्त्वचिंतामण्यालोकदर्पण' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता हाच होय. हा रामेश्वरभट्टाचा शिष्य होता.

महेश्वर--(जन्म स. ११४८) हा भास्कराचार्यांचा पिता होय. याचा जन्म शक १०७० च्या सुमारास झाला असावा.

शेखर नांवाचा करणग्रंथ, लघुजातक-टीका, एक फलग्रंथ आणि 'प्रतिष्ठाविधिवृत्तशत' या नांवाचा आणखी एक ग्रंथ यानें लिहिलेला आहे (भा. ज्यो.).

२. (स. १११९) विश्वप्रकाशकोशाचा कर्ता. याचा वंशक्रम पुढीलप्रमाणें आहेः—

हरिश्चंद्र-श्रीकृष्ण- मल्हण-केशव -श्रीकृष्ण- महेश्वर. हा हरिश्चंद्रचरित्रावरील टीकाकार होता.

३. यानें भारतांतील सभापर्वावरील कथाभागावर सभानाटक लिहिलें आहे.

महेश्वरभट्ट रामचंद्रभट्ट सुखटणकर—(स. १७१८-१८१६) एक विद्वान् सारस्वत ब्राह्मण. गोमांतकांतील कुंभारजुव्यानजीक महाशाळ गांवचे राहणारे. हे ऋग्वेदी, आश्वलायन, कौशिकगोत्री होत. यांच्या मातेचें नांव जानकीबाई. श्रीमद्भागवतावरील श्रीधरी टीकेची पूरणिका यांनीं केली आहे. वेदांतग्रंथांपैकीं स्वात्मनिरूपण नांवाच्या ग्रंथावर यांनीं स्वात्मदीपिका नांवाची टीका लिहिली आहे. याशिवाय भगवद्गीता, अद्वैतमकरंद, वाक्यसुधा, सिद्धांतचंद्रिका इत्यादि ग्रंथांवर यांनीं मराठींत अनुवादात्मक टीका केली आहे. तसेंच वाक्यसुधेवर पानपात्र नांवाची समश्लोकी टीका, गीतगोविंदाचा पद्यात्मक मराठींत अनुवाद इ. संस्कृत ग्रंथ मराठींत आणले. तसेंच मोरोपंताच्या मराठी मंत्रभागवतावर संतोषिणी नांवाची टीका संस्कृतांत लिहिली. याशिवाय भानुशतककाव्य, गद्यसुधांशु, मांगिरीशाष्टक (सटीक), यांशिवाय अनेक टीका लिहिल्या. धर्मशास्त्रावर त्रिंशत्श्लोकी, चतुर्दशश्लोकी, निर्णयसिंधूंतील सापिंड्यकन्यकानिर्णयाविषयीं अतिशय दुर्बोध अशा पद्यपंचकावर टीका, ज्योतिषांपैकीं मुहूर्तमालेवर सौंदर्यबोधिनी नांवाची सुरस टीका केली. याशिवाय न्याय वगैरे शास्त्रांवरील ग्रंथावरहि यांचे टीकाग्रंथ असावेत (सारस्वतरत्नमाला, पा. १०-२२).

महेश्वरोपाध्याय—हा धर्माब्धि नामक ग्रंथाचा कर्ता. हा पंढरपूरच्या काशिनाथोपाध्यायाच्या पूर्वीचा ग्रंथकार दिसतो.

महेंद्र—(कुमारगुप्त पाहा).

२. हा पिठापुरच्या राजा. अलाहाबादच्या शिलालेखावरून असें दिसतें कीं समुद्रगुप्तानें अश्वमेधाच्या वेळीं याचा पराभव केला होता.

महेंद्र गुहिलोत—(स. ६०६-२६) मेवाडच्या उदेपूर येथील रजपुतांच्या राज्यांत हा भोजानंतर गादीवर आला. याच्यानंतर नाग गादीवर आला.

२. (स. ६८८-७३४) नागानंतरचा मेवाडचा राजा. याच्यानंतर कालभोज गादीवर आला.

महेंद्रपाल—(स. ११९३) बंगाल्यांतील पालांपैकीं शेवटचा राजा इंद्रद्युम्न व हा एकच असावा.

महेंद्रपाल प्रतिहार—(स.८९३-९०७) रघुवंशी प्रतिहारांपैकीं भोजदेवाचा पुत्र. याच्या आईचें नांव चंद्रभट्टारिकादेवी. याला महेन्द्रायुध, महिंदपाल, निर्भयराज व निर्भयनरेन्द्र असेंहि म्हणत. याच्या वेळचे दोन शिलालेख आणि तीन ताम्रपत्र मिळाले आहेत. ते वि. सं. ९५०-९६४ (स, ८९३-१०७) पर्यंतचे आहेत. त्यांत एक वलभी संवत् ५७४ (वि. सं. ९५०) मधील जुनागड राज्यांतील उना येथील दानपत्र आहे (एपि. इंडि. भा. ९, पृ. ४-६). तसेंच दुसरा वि. सं. ९६४ (स. ९०७) मधील सीयडोनीचा शिलालेख आहे (एपि.इंडि. भा. १, पृ. १७३). तीन ताम्रपत्रांपैकीं दोन काठेवाडांत मिळाले आहेत. त्यांवरून काठेवाडच्या दक्षिण भागावरहि याचें राज्य असल्याचें समजतें. तेथें याचा सोळंकी सामंत राज्य करीत होता. याचा प्रतिनिधी तेथें धोइक होता, असें ताम्रपत्रावरून कळतें. काव्यमीमांसादि ग्रंथांचा कर्ता राजशेखर याचा गुरु होता. हा भवानीचा उपासक होता. याच्या महीपाल, भोज व विनायकपाल या तीन

पुत्रांचा पत्ता लागला आहे. भोजाच्या मातेचें नांव देहनागादेवी व विनायकपालाच्या मातेचें नांव महीदेवी-देवी होतें.

२. (स. ९४६) रघुवंशी प्रतिहारांपैकीं विनायकपालाला प्रसाधनादेवीपासून झालेला पुत्र. याच्या वेळचा एक शिलालेख प्रतापगड येथें मिळाला आहे. तो वि. सं. १००३ (स. ९४६) मधील आहे. त्यावरून घोटावर्षिका(घोटासीं-प्रतापगडापासून सहा मैल)चा इंद्रराज चौहाण याचा सामंत होता. त्या वेळीं मंडपिका (मांडू) येथें सेनापति कोक्कटानें नेमलेला श्रीशर्मा राहत होता. तसेंच माळव्याचा तंत्रपाल (शासक) महासामंत, महादंडनायक माधव (दामोदराचा पुत्र) उज्जैन येथें राहत होता. इंद्रराज चौहानानें बांधलेले घोटावर्षिका (घोटासीं)-चे इंद्रराजादित्यदेव नांवाचे सूर्यमंदिराला खर्परपद्रक नांवाचें गांव दुसऱ्या महेन्द्रपालानें भेट दिलें होतें. त्यावर वरील माधवाचें हस्ताक्षर आहे (एपि. इंडि. भा. १४, पृ. १८२–८४).

महेंद्र मौर्य—(ख्रि. पू. २३२) हा लंका येथें पाठविलेल्या बौद्धधर्माच्या प्रचारकांचा मुख्य होता.याच्याबरोबर आणखी चार भिक्षु होते. यानें लंकेत बुद्धधर्माचा कसा प्रचार केला याची माहिती महावंश, दीपवंश, दिव्यावदान,अशोकावदान व ह्यूएनत्संगच्या प्रवासवृत्तांत आढळते.

हा अशोकाचा पुत्र होता, असें महावंश व दीपवंश यांत लिहिलें आहे. पण दिव्यावदान ग्रंथांत हा अशोकाचा भाऊ होता असें म्हटलें आहे. ह्यूएनत्संगनेंहि भाऊ होता असेंच म्हटलें आहे. स्मिथनेंहि भाऊ होता, या म्हणण्याला संमति दिली आहे.

हा एकदम मध्यें न थांबतां लंकेत गेला, असें महावंश वगैरे ग्रंथांत म्हटलें आहे, पण लंकेतील माहिती याच्याविरुद्ध आहे. महेंद्र दक्षिण भागांत प्रचार करीत कावेरीच्या तीरावर पोंहोचला, व तेथें यानें एक विहार बांधला. सनाच्या सातव्या शतकांत ह्यूएनत्संग यानें हा विहार भग्नावस्थेंत पाहिला होता. तो लिहितो, 'या शहराच्या (मालकूट) पूर्वेस बऱ्याच दूर एक संघाराम आहे. याचें मुख्य भवन व अंगण यांवर रानटी गवत उगवलें आहे. फक्त भिंती उभ्या आहेत. हा अशोकाचा भाऊ महेंद्र यानें बांधला होता.' (बुद्धिस्ट रेकार्ड ट्र दि वेस्टर्न वर्ल्ड २, पा. २३१). हा दक्षिणेंत संचार करीत लंकेत गेला असेंच प्रो. ओल्डनबर्गचें मत आहे (विनयपिटकाची प्रस्तावना).

याचा लंकाधिपति तिस्स यानें अत्यंत सन्मान केला. याच्याकरितां एक विहार बांधला व त्याचें नांव महाविहार असें ठेवण्यांत आलें. पुढें संघमित्रा हीहि लंकेत येऊन राहिली. तिच्याकरितां एक स्त्रीविहार बांधण्यांत आला. हा तेथें नव्वद वर्षांचा होऊन मृत्यु पावला. त्या वेळीं लंकेत तिस्सपुत्र उत्तिम हा राज्य करीत होता.

यानें आपलें सर्व आयुष्य सिलोनमध्येंच काढलें. याच्या नांवाचा एक स्तूप मिहीताले येथें आहे. तेथेंच याला शेवटीं जाळला (V. Smith, p. 195). बुद्धधर्म इतर देशांतून जास्त भरभराटीस येण्याचें कारण म्हणजे हाच होय.

महेंद्रवर्मा पल्लव—(स. ६००–६३०) हा कांचीच्या सिंहविष्णु पल्लवाचा मुलगा. यानें मत्तविलास नांवाचें एक प्रहसन लिहिलें आहे. हें प्रहसन त्रिवेंद्रम-संस्कृत सीरीजमध्यें प्रसिद्ध झालें असून त्याच्या प्रस्तावनेंत याच्या वंशादिकांची माहिती मिळते. यानेंच महेंद्रवाडी, मामेंदूर, त्रिचनापल्ली, पल्लीवरम् येथें पर्वतांत देवमंदिरें (खोदून) निर्माण करवलीं. बहुतेक यानेंच कुडुमियमलै येथील संगीतशास्त्रांसंबंधीं शिलाशासन तयार केलें. हा रुद्राचार्याचा शिष्य होता, असें त्या शासनावरून दिसतें (एपि. इंडि. व्हा. १२, पा. २३१). याच्या वडिलानें सुप्रसिद्ध भारवि कवीस आश्रय दिला असल्यामुळें याचा व त्याचाहि संबंध आला असावा.

मामल्लपुर किंवा माबलिपुर किंवा महाबलिपुर हें लहानसें खेडें मद्रासच्या दक्षिणेस तीस मैलांवर समुद्रास लागून आहे. तेथें पर्वतांत कोरलेलीं अजिंठ्याप्रमाणें मोठालीं लेणीं आहेत. हीं पल्लवांच्या वेळीं झालीं. हीं शिल्पकलेबद्दल प्रसिद्ध असून तेथें सिंहविष्णु व त्याचा मुलगा महेंद्रवर्मा यांच्या मूर्ति सांपडल्या आहेत. तेथें सात देवळें असून त्यांना सात रथ असें म्हणतात (इंपीरियल गॅझेटियर, सेव्हन पॅगोडाज्, बाय मेसर्स डब्ल्यू. एम्. चेंबर्स).

याला पुष्कळ बिरुदें आहेत. यानें पुळ्ळूर येथें दुसऱ्या पुलकेशिन् पश्चिम चालुक्याचा पराभव केला. हें कांजीवरम् हद्दींत आहे. पुलकेशिन्चा सुरुवातीचा काल व याचा शेवटचा काल एक आहे.

हा शैवसाधु तिरुनाबुक्करशु याचा द्वेष्टा होता. त्याचा यानें खून केला. परंतु यानें त्याचींच मतें स्वीकारलीं.

याची प्रसिद्धि महाबलिपुरम् येथील भव्य व शिल्पदृष्टीनें महत्त्वाच्या लेण्यांमुळें विशेष झाली. पुढील कालांत याच्या शिल्पाचें अनुकरण दिसतें.

महाबलिपुराचें पहिलें नांव 'कडळमलाइतळशयनम्' असें होतें.

येथें आदिवराहाचें देऊळ महत्त्वाचें आहे. त्यांत सिंहविष्णु व महेंद्रवर्मन् या दोन पल्लव पितापुत्रांच्या प्रतिमा आहेत (हिरास–स्टडीज् इन् पल्लव हिस्टरी).

२. (स. ६६८–७०) एक राजा.

मंख कवि—(स. ११२०–११७०) काश्मीरच्या राजाचा दिवाण अलंकार त्याचा हा भाऊ. श्रीकंठचरितम् नांवाचा याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे व त्यांत यानें त्रिपुरवधवर्णन केलेलें आहे. ह्याच्या वेळेस जयसिंह (स. ११२७–४९) काश्मीरांत राजा होता. मंखाच्या बापाचें नांव विश्ववर्त व आजाचें नांव मनोरथ असें होतें. हे एकंदर चौघे भाऊ होतेः १ शृंगार, २ भंग, ३ अलंकार आणि चौथा हा. यास क्वचित् लंक अथवा मंखक असेंहि म्हणत. यानें रुय्यक नांवाच्या पंडिताजवळ अध्ययन केलें. त्याजवळच मंडन हा याच्या पूर्वीचा अध्ययन करणारा होता. मंखानें केलेला एक कोशहि आहे.

मंखली—गोशालचा पिता.

मंखलीपुत्त—गोशालचें नामांतर.

मंगय्य पांड्य—हा उचंगीचा पांड्य होय. याला आदित्यसेन असेंहि म्हणत.

मंगराज—(स. १३६० सुमार) कानडी जैन कवि. हा होयसळ राज्यांतील देवळगी देशांतील मुगुळियपूरचा अधिपति होता आणि पूज्यपादाचा शिष्य. पत्नी कामलता. ग्रंथ-खगेंद्रमणिदर्पण (विषवैद्य ग्रंथ).

यानें विजयनगरच्या हरिहराच्या (स. १३३६–५३) कारकीर्दीचा उल्लेख केला आहे (क. क. च. भा. १, पा. ४१७).

२. (ग्रंथकाल स. १५०८) होयसळ देशांतील होसवृत्ती देशांतील कल्लहल्लीचा अधिपति. हा चंगाल्वांच्या प्रधानांपैकीं होता.

ग्रंथ—सम्यक्त्वकौमुदी (स. १५०८), जयनृपकाव्या, नेमिजिनेशसंगति, पाकशास्त्र, प्रभंजनचरित, श्रीपालचरित इत्यादि. याच्या पित्याचें नांव विजयेंद्र (क. क. च. भा. १, पा. ४१७).

मंगलभवदेव—(स. ११९६–१२३२) परिहार रजपूत घराण्यांतील मालदेव राजाचा मुलगा. ग्वाल्हेरचा राजा. स. ११९६ मध्यें शिहाबुद्दीन मुहंमद घोरीनें ग्वाल्हेरवर स्वारी करून तेथील राजाकडून करभार देण्याचें कबूल करवून घेऊन वेढा उठविला. कुतुबुद्दीन ऐबकनें ह्या किल्ल्याची जहागीर शम्सुद्दीन अल्तमशला दिली होती. त्यानें दिल्लीचा सुलतान झाल्यावर स. १२३२ मध्यें त्यानें आपली पहिली जहागीर हिंदु राजांनीं बळकाविली होती ती परत मिळविण्याकरितां ग्वाल्हेरवर फेब्रुवारींत स्वारी केली. किल्ल्यास वेढा दिला तो फेब्रुवारी ते डिसेंबरपर्यंत चालू राहिला. १२ डिसेंबरला राजा किल्ल्यांतून निसटला. राजा निसटल्यामुळें चिडून त्यानें ७०० हिंदूंची कत्तल केली.

मंगलराज (पश्चिम) चालुक्य—(स. ७३१) लाट देशाचा जहागीरदार जयसिंहवर्म्याचा दुसरा पुत्र. हा राज्यावर असतांनाचें एक दानपत्र मिळालें आहे (इंडि. अँटि. १३. ७५). तें शा. श. ६५३ (वि. सं. ७८८; स. ७३१) मधील आहे. त्यांत याचीं बिरुदें विनयादित्य, युद्धमल्ल व जयाश्रय अशीं आहेत. शीलादित्य युवराज असतांच मेला असावा म्हणून हा जयसिंहानंतर राजा झाला असावा. याच्या मागून याचा धाकटा भाऊ पुलकेशी गादीवर आला. हें घराणें बदामीच्या सोलंकीपैकीं होतें.

मंगलीश (पश्चिम) चालुक्य—(स. ५९७–६१०) पश्चिम चालुक्यांच्या घराण्यांपैकीं हा पुलकेशीचा धाकटा मुलगा. हा पहिल्या कीर्तिवर्म्यानंतर गादीवर आला. यानें ऐहोल येथील शिलालेखांत कलचुरीस जिंकल्याचा निर्देश आहे. याचा मुलगा इंद्रवर्मा. यानें इंद्रवर्म्यास गादी मिळवून देण्याचा प्रयत्न केला, त्यांत हा मारला गेला. यानें खेतीद्वीप, कोंकणचा कांहीं भाग, मातंगलोक व चेदीचा शंकरगण याचा पुत्र बुद्ध इत्यादिकांस जिंकलें. यास मंगलेश्वर, मंगलराज व रणविक्रांत अशीं नांवें होतीं. याच्यामागून पहिला सत्याश्रय पुलकेशी गादीवर आला.

फ्लीटच्या मतें याला सत्याश्रय-ध्रुवराज-इंद्रवर्मन् नांवाचा एक मुलगा होता. पण त्याविषयीं फ्लीटसुद्धां साशंक आहे.

मंगि युवराज—(स. ६७२–६९६) हा दुसऱ्या विष्णुवर्धनाचा मुलगा होता. याला युवराज ही पदवी होती. यालाहि सर्वलोकाश्रय हें उपपद व विजयसिद्धी हें बिरुद होतें. याचा एक शिलालेख सांपडला आहे. यानें २४ वर्षेपर्यंत राज्य केलें.

मंचन—बिजल राजाचा कारभारी. बसवाचा बोभाटा हा राजास कळवीत असे.

मंचनामात्य—तैलंगी ब्राह्मण. यानें सामुद्रिक विद्येचा ग्रंथ संस्कृतांत लिहिला आहे.

मंचित—(स. १७८० सुमार) हिंदी कवि. गांव मदु. याची भाषा अवधी नसून व्रज आहे. ग्रंथ–१ सुरभीदानलीला, २ कृष्णायन.